सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

वर्धा जिल्हा



वर्धा जिल्हा
गॅझेटिअर

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वर्धा जिल्हा

संपादक

डॉ. कि. का. चौधरी

एम. ए., पीएच. डी.

मुंबई

दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन

१९९२

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर
वर्धा जिल्हा

प्रथम आवृत्ती [इंग्रजी] : १९०६
द्वितीय आवृत्ती [इंग्रजी] : १९७४
मराठी आवृत्ती [सुधारित] : १९९२

किंमत रु. ९१-५०

प्रकाशक :

कार्यकारी संपादक व सचिव
दर्शनिका विभाग
महाराष्ट्र शासन
मुंबई

मुद्रक :

व्यवस्थापक
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
कोल्हापूर

ग्रंथ मिळण्याची ठिकाणे :

[१] शासकीय ग्रंथ भांडार, नेताजी सुभाष रोड
मुंबई–४०० ००४

[२] शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार, सिव्हिल लाईन्स
नागपूर–४४० ००१

[३] शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथ भांडार
पुणे–४११ ००१

[४] शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार
औरंगाबाद–४३१ ००१

अनुक्रमणिका

प्रस्तावना

वर्धा जिल्हा गॅझेटिअर हा ज्ञानकोशसदृश ग्रंथ प्रकाशित करताना मनस्वी आनंद होत आहे. दीड-दोन वर्षे केलेल्या परिश्रमांची फलश्रुती या ग्रंथरूपाने मी अभ्यासकांसमोर ठेवीत आहे. हा ग्रंथ ऐतिहासिक संदर्भ साहित्यात बहुमोल भर घालीत आहे असा विश्वास वाटतो. वास्तविकपणे गॅझेटिअर-निर्मिती ही एक स्वतंत्र विद्याशाखा झालेली आहे. त्यामुळे गॅझेटिअरची संकल्पना स्थितिशील राहणे असंभव आहे. गॅझेटिअर म्हणजे केवळ प्राकृतिक भूस्वरूप, नद्या, पर्वत व स्थळांची भौगोलिक माहिती आणि लोक, राजघराण्यांचा इतिहास, आर्थिक स्थिती, महसूल प्रशासन आणि पुरावशेषांचा तपशील देणारा कोश नव्हे. जुनी संकल्पना प्रमाण मानून गॅझेटिअरची कक्षा संकुचित करणे योग्य होणार नाही. नवनवीन संशोधनातून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे प्रत्येक विषयाच्या विविध पैलूंचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे. नवीन साहित्याच्या आधारे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर नवा प्रकाश टाकणे अपरिहार्य आहे. या दृष्टिकोनातून विद्यमान ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठीमधील जिल्हा गॅझेटिअर मालिकेतील हे तिसरे पुष्प.

वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरची पहिली इंग्रजी आवृत्ती आर. व्ही. रसेल या आय. सी. एस. अधिकाऱ्याने संपादित करून १९०६ मध्ये प्रकाशित केली. या आवृत्तीचे पुनर्मुद्रण करून आम्ही अभ्यासकांना उपलब्ध करून दिली आहे. इ. स. १९०६ पूर्वीसुद्धा या प्रदेशाची माहिती असलेले गॅझेटिअरसदृश साहित्य उपलब्ध होते. तथापि रसेलची निर्मिती हेच पहिले वर्धा गॅझेटिअर मानावे लागते. इंग्रज अधिकारी व स्थानिक जाणकारांच्या मदतीने रसेलने हा ग्रंथ तयार केला होता. हा ग्रंथ खचितच अभ्यासपूर्ण होता. त्याची खास विशेषता म्हणजे प्रमुख जातींची समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून दिलेली माहिती. ही माहिती पंडित हिरालाल यांनी संकलित केली होती. रसेलने लिहून ठेवलेला इतिहास मात्र तत्कालीन अपुऱ्या आधारसाहित्यावर आधारलेला असल्याने त्यात बऱ्याच त्रुटी आहेत. त्याकाळी अज्ञात असलेल्या, तथापि नंतरच्या संशोधनाने महान राजघराणे म्हणून मान्यता पावलेल्या, वाकाटक सम्राटांचा रसेलने नामोल्लेख देखील केलेला नाही. वाकाटकांची राजधानी प्रवरपूर तथा पवनारला होती, हे रसेलच्या काळी ज्ञात नव्हते. महसूल प्रशासनाचा इतिहास मात्र फार चांगला आहे.

इ. स. १९७४ मध्ये वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरची सुधारित इंग्रजी आवृत्ती निघाली. त्यात प्राचीन काळ व मध्ययुगीन काळावरील इतिहास प्रथमच पद्धतशीर लिहिण्यात आला. नागपूरच्या भोसले राजवटीबाबत विपूल माहिती देण्यात आली. आधुनिक काळावर मात्र भर देण्यात आला नव्हता.

इतिहास लेखन ही एक संशोधन प्रक्रिया आहे. नवनवीन संशोधन, स्वातंत्र्य आंदोलनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, आधुनिक काळातील भारतीयांच्या आशाआकांक्षा व त्यासाठी त्यांनी केलेले आंदोलन यांचा परामर्श इतिहास लेखकास घेणे आवश्यकच असते. विद्यमान वर्धा गॅझेटिअरमध्ये आधीच्या आवृत्तींमधील त्रुटी भरून काढण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. स्वाभाविकपणे हा ग्रंथ पूर्वीच्या आवृत्तींचे भाषांतर अथवा रूपांतर नसून नवीन संशोधनपर लेखनाचा अंतर्भाव असलेली ही नवनिर्मिती आहे. इ. स. १९७४ च्या आवृत्तीतील १९ प्रकरणांची पुनर्रचना करून नवीन आकृतिबंधानुसार १२ प्रकरणे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. पूर्वीच्या आवृत्तींमधील सर्वच माहिती उद्धृत न करता आवश्यक तेवढा भाग घेण्यात आलेला आहे. नवीन बाबींवर प्रकाशझोत टाकलेला आहे. घराण्यांच्या इतिहासावर भर न देता समाजाच्या सांस्कृतिक व आर्थिक स्थितीबाबत ऐतिहासिक माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. नवीन आधारसाहित्य, राष्ट्रीय अभिलेखागारातील अस्सल कागदपत्रे व गृह विभागातील गोपनीय अहवाल, शोध प्रबंध, पुस्तके, नियतकालिके, शासकीय कार्यालयांमधून प्राप्त झालेली मूलभूत माहिती, तसेच क्षेत्रीय सर्वेक्षण व जाणकार नागरिकांशी केलेल्या चर्चेद्वारे उपलब्ध माहितीचा समावेश विद्यमान ग्रंथात केलेला आहे. महात्मा गांधींचे संकलित वाङ्मय, ब्रिटिश गुप्तचरांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील अहवाल आणि पुरावशेषांच्या संशोधनाचा उपयोग करून हा ग्रंथ समृद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पवनार, खैरवाडा, टाकळघाट, भागीमहारी, नैकुंड, माहूरझरी, जुनापानी व कुही-मांढळ परिसरात झालेल्या संशोधनाच्या आधारे प्रागितिहासकालीन व इतिहासकालीन संस्कृतीचे वर्णन दिले आहे. पवनारच्या गंगा भगवतीची मूर्ती फ्रेंच शिल्पाकृतींची बरोबरी करू शकेल इतकी आकर्षक आहे. सातवाहन, वाकाटक, कलचुरी, राष्ट्रकूट, कल्याणीचे चालुक्य व यादव कालखंडाचा इतिहास दिला आहे. अलाउद्दिन खलजीच्या विजयानंतर दक्षिणेत बहमनींचा प्रभावी राजवंश उदयास आला. बहमनीकालीन सामाजिक व धार्मिक स्थिती, गोंड राजे, वऱ्हाडचे अकबराला अभ्यर्पण, मुघलकालीन प्रशासन व्यवस्था व नागपूरकर भोसलेंचा इतिहास लिहिला आहे.

आधुनिक काळाचा इतिहास या ग्रंथाची एक खास विशेषता आहे. महात्माजींच्या वास्तव्याने पुनीत झालेले सेवाग्राम म्हणजे तत्कालीन भारताची

अशासकीय राजधानी. गांधीजींनी १९३४ मध्ये वर्ध्यास स्थलांतर केल्यापासून भारताचे भवितव्य घडविणारे अतिशय महत्त्वाचे निर्णय या परिसरात घेण्यात आले. तेव्हापासून काँग्रेस आंदोलनाचे सूत्रसंचालन सेवाग्रामहून होऊ लागले. महान दानशूर दाता, गांधीवादी साधक, विशाल क्रियाशीलता व वैराग्यमूर्ती असलेले जमनालालजी बजाज यांचे राष्ट्रवादी कार्यातील स्थान फार मोठे होते. महात्माजी व जमनालालजींच्या प्रेरणांमुळे अखिल भारतीय पातळीवर विधायक कार्य करणाऱ्या अनेक गांधीवादी संस्था येथे उदयास आल्या. स्वाभाविकपणे वर्धा-सेवाग्राम-पवनार परिसर देशप्रेमी भारतीयांचे तीर्थक्षेत्र बनला. राष्ट्रवादी चळवळीचे केंद्रस्थान असलेल्या सेवाग्रामला प्रत्येक पुढाऱ्याचे अनेकवेळी आगमन झाले. तसेच जगातील असंख्य राजकीय पुढाऱ्यांचे व विचारवंतांचेही आगमन झाले. वर्धा-सेवाग्रामचा १९३४ पासूनचा इतिहास स्फूर्तिदायक तसेच बोधप्रद आहे.

गांधीजींनी १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाची सिद्धता केली सेवाग्राममधूनच. पवनार आश्रमस्थ विनोबाजी भावे हे तर वैयक्तिक सत्याग्रहातील देशाचे पहिले सत्याग्रही होते. भारतालाच नव्हे तर संपूर्ण ब्रिटिश साम्राज्यास प्रभावी हादरा देणाऱ्या छोडो भारत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला वर्धा-सेवाग्रामलाच. छोडो भारतची सत्याग्रही युद्धनीती ठरविण्यात आली येथूनच. 'वर्धा ठराव' आणि ७–८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत भरलेले अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अधिवेशन या दरम्यान खूप हालचाली झाल्या. संपूर्ण देशामधून कार्यकर्ते गांधीजींचे मार्गदर्शन घेण्यास येऊन गेले. छोडो भारत क्रांतीमध्ये वर्धा जिल्ह्याने मोठे योगदान दिले. आष्टी-चिमुरच्या स्वातंत्र्य समराने भारतीयांची मने हेलावून गेली. प्रा. जे. पी. भंसाळींचे ६२ दिवसांचे ऐतिहासिक उपोषण म्हणजे स्वातंत्र्य आंदोलनातील एक महत्त्वाचे उपाख्यान होय. प्राणाची बाजी लावून शासनकर्त्यांच्या अत्याचाराविरुद्ध केलेला हा जीवनमरणाचा लढा होता. स्वातंत्र्य आंदोलनातील दुःखद घटना व हुतात्म्यांचा या ग्रंथात उल्लेख केलेला आहे. आपल्या उपोषणाबाबतची भूमिका स्पष्ट करणारे प्रा. भंसाळींचे अप्रकाशित निवेदन इतिहास प्रकरणात छापले आहे. छोडो भारतबाबतचा वर्धा ठराव व मुंबई ठराव यांचा मसुदा जोडलेला आहे. गुप्तवार्ता पोलिसांचे अहवाल, ब्रिटिश श्रेष्ठींचा पत्रव्यवहार, कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, गोपाळराव वाळुंजकरांचे "ग्रामसेवा मंडळाचा इतिहास" हे हस्तलिखित, ट्रान्स्फर ऑफ पॉवर डॉक्युमेन्टस यावरील पहिले चार खंड आणि इतर कागदपत्र तसेच मान्यवर पुस्तकांच्या आधारावर हा इतिहास लिहिला आहे. सत्याच्या अधिकाधिक जवळ जाण्यासाठी हा इतिहास प्रत्यक्ष स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्या अनेक स्वातंत्र्य सैनिकांना मी समक्ष दाखविलेला आहे. त्यांच्या सूचनांबरहुकूम लेखनात बदलही केले आहेत.

विद्यमान ग्रंथाची दुसरी खास विशेषता म्हणजे " लोक " आणि "संस्कृति" या विषयांवर लिहिलेली अभ्यासपूर्ण प्रकरणे. जिल्ह्यातील प्रमुख जाती व जमातींची समाजशास्त्रीय माहिती दिली आहे. प्रत्येक जातीच्या लोकांमधील पोटभेद, रूढी व चालीरीती याबाबतची माहिती प्रकाशित पुस्तके व अहवालांव्यतिरिक्त प्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारे तपासून पाहिली आहे. शक्यतो वस्तुनिष्ठ माहिती देण्याचा प्रयत्न आहे. जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा, हिंदू धर्मपंथ, संत परंपरा, साहित्यिक, संगीत, शिल्पकला आणि चित्रकलेचे विवेचन दिले आहे. भूगोल, अर्थव्यवस्था, प्रशासन आणि स्मारकशिल्पे व प्रेक्षणीय स्थळांची बरीच माहिती दिली आहे. बऱ्याच माहितीची सत्यता प्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारे पडताळून पाहिली आहे. तरीसुद्धा काही त्रुटी अनवधानाने राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. एवढे मात्र खरे की, ग्रंथातील माहिती संकलित केल्यानंतर प्रकाशनास विलंब होत असल्याकारणाने त्यामध्ये मंदन अवधी [Time-lag] गेलेला आहे.

महत्त्वाची स्मारकशिल्पे व प्रेक्षणीय स्थळांची रंगीत व कृष्णधवल छायाचित्रे आणि खास तयार करून घेतलेले नकाशे दिलेले आहेत. विस्तृत संदर्भ सूची आणि नाम व विषय निर्देश सूचीनेही ग्रंथाची उपयुक्तता वाढलेली दिसेल. मात्र जिल्ह्यातील गावांची दर्शिका १९७४ च्या आवृत्तीत दिलेली असल्याने स्थलसंकोचास्तव या आवृत्तीत देणे शक्य झाले नाही.

जिल्हा गॅझेटिअर मालिकेव्यतिरिक्त राज्य स्तरावरील मालिकेत इतिहास [३ खंड], वनस्पतीशास्त्र [४ खंड], महाराष्ट्र–भूमि व लोक, भाषा व साहित्य आणि प्राणिशास्त्र या महत्त्वाच्या विषयांवरील ग्रंथ या विभागाने इंग्रजीत प्रकाशित केलेले असून " इतिहास : आधुनिक काळ " आणि "भूगोल" यावरील इंग्रजीतील उर्वरित ग्रंथांचे लेखन सुरू आहे. या ग्रंथांची उपयुक्तता मोठी आहे.

या ग्रंथातील बरेच लेखन कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेले असून इतिहास, भूगोल, भूशास्त्र व खनिज संपत्ती आणि संस्कृति या विषयांवरील लेखन सहयोगकर्त्या लेखकांकडून करून घेतलेले आहे. सखोल संपादकीय तपासणीनंतर सर्व मजकूर महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर संपादक मंडळातील संबंधित विषयांचे तज्ञ असलेल्या सभासदांनी तपासून दिला. तत्कालीन संपादक मंडळातील पुढील सदस्यांचा ऋणनिर्देश करणे माझे कर्तव्य आहे :–

(१) सचिव, सामान्य प्रशासन विभाग, श्री. रा. च. अय्यर (अध्यक्ष)
(२) डॉ. भा. ल. भोळे
(३) श्री. द्वा. भ. कर्णिक

(४) डॉ. अ. प्र. जामखेडकर
(५) डॉ. चं. धुं. देशपांडे
(६) प्रा. या. शि. महाजन
(७) डॉ. यु. म. पठाण
(८) डॉ. पी. एन. चोप्रा
(९) श्री. शं. ग. सुरडकर
(१०) डॉ. कि. का. चौधरी (कार्यकारी संपादक व सचिव).

स्वातंत्र्य आंदोलनाचे समकालीन पुरस्कर्ते व विरोधक यांनी कधी संवादी तर कधी विसंवादी भूमिका घेतलेल्या दिसतात. सविनय कायदेभंग आंदोलनानंतर अशा काही विसंवादी भूमिका प्रकट झाल्या. मात्र स्वातंत्र्यप्राप्ती हे प्रत्येकाचे ध्येय होते. विद्यमान लेखन हा तटस्थपणे लिहिलेला इतिहास होय. आणि इतिहास म्हटला की, वस्तुनिष्ठ नि:पक्षपाती दृष्टी आलीच. म्हणून स्वातंत्र्य आंदोलन इतिहासाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी बऱ्याच जाणकार लोकांशी चर्चा तर केलीच परंतु त्यांना लेखन देखील दाखविले. या कामी सक्रीय मदत करणारे कै. गोपाळराव वाळुंजकर, प्रा. ठाकूरदास बंग, श्री. वामनरावजी गावंडे, श्रीमती मदालसा नारायण, श्री. उमाशंकर शुक्ल, सौ. कमलाताई लेले, श्री. आपटे गुरुजी व श्री. के. ब. कदम यांचा ऋणनिर्देश करणे क्रमप्राप्त आहे.

विद्यमान ग्रंथाच्या संकलन व प्रकाशन प्रक्रियेमध्ये मला सहाय्य करणाऱ्या डॉ. वि. ना. गुरव, सहसंपादक (सेवानिवृत्त), आणि श्री. शा. कृ. खिलारे, उपसंपादक, श्री. प्र. नि. नारखेडे, श्री. नि. रा. पाटील व श्री. भि. म. कौसल, संशोधन अधिकारी यांचे आभार मानतो. तसेच सौ. मा. सु. मोदिखाने, सौ. नं. श. अळवणी (सेवानिवृत्त), सर्वश्री के. झिं. राऊत, ध. जि. नावडकर, वि. बा. सांगरुळकर, रा. र. हनवतकर या व इतर सहाय्यक संशोधन अधिकाऱ्यांचेसुद्धा आभार मानतो. प्रशासनिक अधिकारी या नात्याने श्री. प्र. सा. खोबरेकर यांचे सहाय्य आणि कार्यालयातील लघुलेखक, सहाय्यक व विविध स्तरांवरील कर्मचाऱ्यांनी केलेल्या मदतीचाही उल्लेख करणे आवश्यक आहे.


या ग्रंथाची छपाई उत्तम व शीघ्र गतीने करण्यासाठी श्री. प्र. शं. मोरे, संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, मुंबई आणि श्री. श्री. वि. केळापुरे, व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर, यांनी केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचे आभार मानणे आवश्यक आहे. तसेच छायाचित्रांसाठी डॉ. अ. प्र. जामखेडकर, नागपूरचे पुरातत्त्व सहाय्यक संचालक श्री. वि. रा. वेरुळकर

व त्यांचे छायाचित्रकार आणि जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी, यांचेही आभार मानतो.

हा ज्ञानकोशसदृश ग्रंथ इतिहासकार, विद्वान, संशोधक आणि प्रशासकांना उपयुक्त वाटेल अशी आशा व्यक्त करतो.

मुंबई
९ ऑगस्ट १९९१

डॉ. कि. का. चौधरी
कार्यकारी संपादक व सचिव


वर्धा नदी
अप्पर वर्धा प्रकल्प
कार नदी
कार प्रकल्प
आष्टी
वि. गृ.
प्रे.स्थ.
कारंजा
नागपूर कडे
तळेगाव
अमरावती कडून
गारपीट
मनेरी
प.क्षे.
हेटी
ढगा
आर्वी
न.प.
वाढोणा
नवरगाव
बोरी
बोर प्रकल्प
हिंगणी
घोराड
केळझर
सेलू
रोहणा
लोअर वर्धा प्रकल्प
अंजी
धाम नदी
पवनार
वर्धा
सेवाग्राम
मुंबई कडून
पुलगाव
का.उ.
देवळी
बोर नदी
हिंगणघाट
अल्लीपूर
कुटकी
कृ.के.
नारायणपूर
कापसी
पार्डी
पोहणा
हैद्राबाद कडे
ना
ग
पू
र
जि
ल्हा
य
व
त
मा
ळ
अ
म
रा
व
ती
जि
ल्हा

वर्धा

—++—०—++—

प्रकरण १–भूगोल[1]

ईशान्य महाराष्ट्रातील वर्धा-वैनगंगा खोऱ्याच्या पश्चिम भागात वर्धा जिल्हा आहे. पवनार उत्खननातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार या परिसरात इसवी सन पूर्व १००० ते इ. स. पूर्व ८०० पासून मानव वसाहत असावी. जिल्ह्याच्या उत्तरेस सातपुडा पर्वत रांग असून पश्चिमेस पूर्णा नदीचे खोरे किंवा वऱ्हाडचा 'पायनघाट' नामक मैदानी प्रदेश आहे. पूर्वेस नागपूर जिल्ह्याचा मैदानी प्रदेश असून जिल्ह्याच्या उत्तर, पश्चिम व दक्षिण सीमेवरून वर्धा नदी वाहते. पूर्वेकडे वेणा व तिच्या उपनद्या वाहतात आणि वेणा वर्धेला मिळत असल्याने संपूर्ण जिल्हा वर्धा नदीच्या खोऱ्यात वसलेला आहे असे म्हणता येईल.

वर्धा नदीने जिल्ह्याच्या उत्तर, पश्चिम व दक्षिण सीमा निश्चित केल्या असल्यामुळे नदीच्या नावावरूनच ब्रिटिशांनी जिल्ह्यास वर्धा हे नाव दिले. स्थानिक लोकांच्या परंपरागत समजानुसार वर्धा नदी वराहाच्या मुखातून उगम पावते व वराह हा विष्णूचा अवतार आहे. त्यामुळे नदीचे मूळ नाव वराह असून वर्धा हे वराहाचे अपभ्रंश रूप आहे, अशी एक व्युत्पत्ती सांगण्यात येते. पंडित हिरालाल यांच्या मते वरदा म्हणजे 'वर दायीनी' (आशीर्वाद देणारी) नदी. त्यामुळे 'वरदा' वरून वर्धा नदी असे नाव पडले असावे. वर्धा नदीच्या खोऱ्यात पूर्वी वडाची झाडे खूप होती. त्यामुळे जनरल कनिंगहॅमने[2] वर्धा हे नाव वडावरून पडले असे प्रतिपादन केले. परिसरात वड असलेली नदी ती वर्धा असे त्याचे म्हणणे. नावाबद्दलच्या या तिन्ही व्युत्पत्तींपैकी पंडित हिरालालजींचा युक्तिवाद अधिक योग्य वाटतो.

जिल्ह्याच्या पुनर्रचनेचा इतिहास

सध्याचा वर्धा जिल्हा इ. स. १८६२ पर्यंत नागपूर जिल्ह्यात समाविष्ट होता. त्यावेळच्या नागपूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुलभ प्रशासनाच्या दृष्टीने खूपच मोठे होते. म्हणून नागपूर जिल्ह्याचे दोन भाग करणे आवश्यक पडले. त्यामुळे १८६२ मध्ये नागपूरमधून सध्याचा वर्धा जिल्ह्याचा भाग वेगळा करण्यात आला व पुलगावजवळील कवठा गावी जिल्ह्याचे मुख्यालय ठेवण्यात आले. इ. स. १८६६ मध्ये जिल्हा मुख्यालय पालकवाडी नामक खेड्यात म्हणजेच सध्याच्या ठिकाणी हलविण्यात आले व तेथे वर्धा शहर वसविण्यात आले.[3]

---

[1] भूगोल विषयावरील पृ. २ ते ९ चे लेखन डॉ. श्रीकांत कार्लेकर, पुणे, यांनी केले आहे.

[2] कनिंगहॅम, आर्कियालॉजिकल रिपोर्टस, खंड १७, पृ. १४०.

[3] अधिक माहितीसाठी प्रकरण २-इतिहास पहावे.

वर्धा जिल्ह्यातील तालुक्यांच्या सीमांमध्ये १९११ ते १९८० पर्यंत बदल करण्यात आलेला नव्हता. सन १९५६ मध्ये राज्य पुनर्रचनेच्या वेळी हा जिल्हा मध्यप्रदेशातून मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला व १ मे १९६० पासून महाराष्ट्र राज्याचा एक भाग झाला आहे. शासनाने दिनांक १ मे १९८० पासून जिल्ह्यातील विकास गटांना स्वतंत्र तालुक्यांचा दर्जा दिल्यामुळे वर्धा जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या सात झाली. तसेच १५ ऑगस्ट १९८४ पासून कारंजा आणि आर्वी तालुक्यांची पुनर्रचना करून नवीन आष्टी तालुका निर्माण करण्यात आला. अशा प्रकारे आता वर्धा जिल्हा तीन उपविभाग व आठ तालुक्यांचा आहे.

सन १९८१ च्या जनगणनेप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत वर्धा जिल्ह्याचे क्षेत्रफळ २.०५ टक्के व लोकसंख्या १.४८ टक्के आहे. जिल्ह्याचे तालुकानिहाय क्षेत्रफळ, लोकसंख्या व गावांची संख्या खाली दिली आहे.[४]

उपविभाग/तालुका	क्षेत्रफळ चौ. कि. मी.	खेडी			लोकसंख्या
		एकूण	ओसाड	वसलेली	
वर्धा उपविभाग—					
वर्धा ..	७५६.१३७	१५२	४९	१०३	२,०२,६८०
सेलू ..	७०१.९०४	१७७	५३	१२४	९३,६०१
देवळी ..	६४७.८७२	१५०	५२	९८	१,२८,७३४
हिंगणघाट उपविभाग—					
हिंगणघाट ..	९०५.०९१	१८९	५८	१३१	१,५७,०९४
समुद्रपूर ..	१,०४३.३३७	२२२	५४	१६८	९५,४४७
आर्वी उपविभाग—					
आर्वी ..	८८१.७९२	२२०	४९	१७१	१,३०,०२५
कारंजा ..	४७४.९९०	११८	५१	६७	५६,९२८
आष्टी ..	६१८.५१०	१५३	५४	९९	६२,२२८
एकूण ...	६,०२९.६३३	१,३८१	४२०	९६१	९,२६,७३७[५]

सन १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात मुख्यत: काम करणाऱ्या ३,९७,२८२ व्यक्ती, सीमांतिक कामगार २१,७३२ आणि काम न करणाऱ्या ५,०७,६०४ व्यक्ती होत्या.

सीमा : वर्धा जिल्हा २०° २८′ व २१° २१′ उत्तर अक्षवृत्त आणि ७८° ४′ व ७९° १५′ पूर्व रेखावृत्त यामध्ये पसरला आहे. पूर्वेस नागपूर जिल्ह्याचे काटोल, नरखेड, नागपूर (ग्रामीण), हिंगणा, भिवापूर व उमरेड तालुके, आग्नेयेस चंद्रपूर जिल्ह्याचा वरोरा तालुका, दक्षिणेस व नैऋत्येस यवतमाळ जिल्ह्याचे कळंब, राळेगाव व मारेगाव तालुके आणि पश्चिमेस व उत्तरेस अमरावती जिल्ह्याचे चांदूर (रेल्वे), तिवसा, मोर्शी व वरुड तालुके आहेत.

[४] वर्धा जिल्हाधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित.

[५] १९८१ जनगणनेत लोकसंख्या ९,२६,६१८ आणि १९९१ मध्ये १०,६५,५८९ होती.

जिल्ह्याच्या ईशान्य टोकापाशी वर्धा नदी व तिची डाव्या बाजूची उपनदी कार यांचा संगम आहे. येथील भूप्रदेशाची समुद्रसपाटीपासून उंची ३४८ मीटर आहे. येथूनच पश्चिमेकडे वाहत जाणाऱ्या वर्धा नदीने जिल्ह्याची उत्तर सीमा निश्चित केली आहे. या सीमेच्या उत्तरेस अमरावती जिल्हा आहे. मारू नदी या उजव्या बाजूच्या उपनदीशी वर्धा नदीचा परतोडाच्या उत्तरेस संगम झाल्यानंतर तेथून वर्धा नदी एकदम दक्षिणेकडे वळते. दक्षिणेकडे वाहताना ही नदी जिल्ह्याची पश्चिम सीमा आखते. नदीच्या पश्चिमेस अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांचे भाग आहेत. दक्षिणेकडे बेंबला नदी सावंगी गावाजवळ वर्धा नदीला येऊन मिळते. येथून पुढे वर्धा नदी आग्नेयेकडे वाहू लागते. साधारणपणे ३५ कि. मी. अंतर वाहत जाऊन अंजी गावापासून वर्धा दक्षिणवाहिनी होते. दक्षिणेकडे वर्धा नदीला तिची मुख्य उपनदी वेणा येऊन मिळते. येथील भूप्रदेशाची समुद्रसपाटीपासून उंची २०० मीटर आहे. वेणा नदीच्या संगमापासून वर्धा जिल्ह्याची आग्नेय सीमा उत्तरेकडे पोथरा नदीच्या संगमापर्यंत जाते. येथून पुढे पोथरा नदीला समांतर गेलेली ही सीमा लाई नदीच्या संगमानंतर पुन्हा पूर्वेकडे जाते व १३ कि. मी. वर ईशान्येकडे वळते. ताडगावच्या पूर्वेस साधारणपणे २ कि. मी. वर कासारबोडी टेकड्यांच्या पायथ्याजवळून पूर्व सीमा पुन्हा उत्तरेकडे वळते. उत्तरेकडे जाणारी ही सीमा लाई नदीला छेदून थोडी पुढे जाते व पुन्हा वायव्येकडे वळते. अदमासे ३२७ मीटर उंचीच्या एका टेकडीवरून ही सीमा उत्तरेकडे जाते व अनेक लहान मोठी वळणे घेत सरळ वायव्येकडे जाते. कुर्ला गावाजवळ ही सीमा नांद नदीला मिळते. तेथून काही अंतरावर लगेचच नांद नदी छेदून पुढे वायव्येकडे जाते, वेणा नदीला व हिंगणघाट–नागपूर रस्त्याला छेदते आणि वर्धा–नागपूर रेल्वेमार्ग व अमरावती–नागपूर रस्त्याला छेदून कार नदीला समांतर जाते. उत्तरेस ही सीमा वर्धा नदीला जाऊन मिळते.

प्राकृतिक भूस्वरूप

प्राकृतिकदृष्टया वर्धा जिल्ह्याचे दोन नैसर्गिक विभाग पडतात––उत्तरेकडील व ईशान्येकडील डोंगराळ प्रदेश आणि दक्षिणेकडील व आग्नेयेकडील उंचसखल मैदानी प्रदेश. उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशात प्रामुख्याने सातपुडा पर्वताच्या दक्षिणेकडे व आग्नेयेकडे पसरलेल्या डोंगर रांगांचा समावेश होतो. दक्षिणेकडील मैदानी प्रदेश वर्धा नदीच्या रुंद खोऱ्याचा प्रदेश असून येथे अनेक लहानमोठ्या उपनद्यांची खोरी आणि छोटेमोठे अवशिष्ट डोंगर सर्वत्र पसरलेले आढळतात. संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील प्रदेशाचा उतार दक्षिणेकडे आहे. उत्तरेकडील प्रदेशाची सरासरी उंची ४५० मीटर व दक्षिणेकडील प्रदेशाची सरासरी उंची २५० मीटर आहे. उत्तरेकडील प्रदेश तीव्र उताराचा तर दक्षिणेकडील भाग सौम्य उताराचा आहे.

सध्याच्या आष्टी, आर्वी आणि कारंजा तालुक्यांचा बराचसा भाग डोंगराळ असून येथे जास्तीत जास्त उंची ६०० मीटर व कमीत कमी ३०० मीटर इतकी आहे. कमी उंचीचे प्रदेश पश्चिमेकडे वर्धा नदीच्या खोऱ्यालगत आहेत. वर्धा तालुक्याच्या उत्तर सीमेची उंची ३०० मीटर असून माळेगाव व मनोली या ईशान्येकडील भागात ती थोडी जास्त म्हणजे ६०० मीटर इतकी आहे. वर्धा तालुक्याचा उर्वरित भाग तसेच देवळी, सेलू, संपूर्ण हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यांचा भूभाग सपाट मैदानी आहे. येथील प्रदेशाची जास्तीत जास्त उंची ३९० मीटर व कमीत कमी २०० मीटर असल्याचे आढळते.

जिल्ह्याच्या उत्तरेकडील सातपुडा पर्वताच्या रांगा वायव्येकडून आग्नेयेकडे पसरलेल्या असून त्या बऱ्याचशा सलग व एकसुरी स्वरूपाच्या आहेत. या पर्वत रांगांच्या प्रदेशात अनेक छोटया छोटया खोऱ्यांचे प्रदेश आहेत. या प्रदेशात सर्वत्र सपाट माथ्याचे डोंगर आणि संरचनी मंच (Structural Benches) आढळतात. डोंगरांच्या पायथ्याशी सर्वत्र भरड स्वरूपाच्या गाळाचे निक्षेपण झालेले आढळून येते. ओबडधोबड स्वरूपाच्या या प्रदेशात सर्वत्र बेसाल्ट (Basalt) खडकांचे विदारीत तुकडे पसरलेले दिसून येतात. पावसाळयात या प्रदेशात मिश्र स्वरूपाच्या झाडाझुडपांची वाढ होते. पण उन्हाळयात सर्वत्र डोंगर व डोंगर उतार उघडे पडलेले असतात. वायव्येकडच्या पर्वत रांगेवर सतारपूर आरक्षित जंगलांच्या प्रदेशात ४२३ मीटर व ४४७ मीटरचे स्थलांक (Spot Heights) आहेत. आर्वीच्या ईशान्येस ढगा आरक्षित जंगल प्रदेशात ४८२ मीटर व ५३७ मीटर आणि वर्धा तालुक्याच्या उत्तरेस मनोली आरक्षित जंगल प्रदेशात ५३३ मीटर व ६०३ मीटरचे स्थलांक आढळतात. मनोलीच्या प्रदेशात जास्तीत जास्त उंची ५५० ते ६२० मीटर असून ही उंची आग्नेयेकडे हळूहळू कमी होत जाते. वर्धा तालुक्याच्या पूर्वेस ही उंची ३७० मीटरपर्यंत कमी आढळते. जिल्ह्यातील या वायव्य-आग्नेय पसरलेल्या डोंगर कण्याची एकूण लांबी ८० कि.मी. असून याची अधीकतम रुंदी ३५ कि. मी. आहे. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रापैकी २५ प्रतिशत क्षेत्र या डोंगराळ भागाने व्यापले आहे. या डोंगर कण्याच्या दक्षिण उताराचे स्वरूप पूर्णपणे लाव्हा पठारी (Basaltic Plateau) प्रकारचे आहे. त्यामुळे या उतारावर तीव्र कडे व सौम्य उताराच्या सपाटीचे प्रदेश एकावर एक रचलेले आढळतात.

आर्वीचे मैदान : पश्चिमेकडील वर्धा नदी आणि मध्यवर्ती भागातील डोंगराळ प्रदेश यांच्या दरम्यान आर्वी तालुक्यात थोडा मैदानी प्रदेश आहे. संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील हाच भाग सर्वांत अधिक सुपीक आहे. या खोऱ्यात नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाचे संचयन झाले आहे. या खोऱ्याची रुंदी ६ ते ८ कि. मी. व लांबी ७० कि. मी. आहे. जिल्ह्याच्या अती दक्षिणेला हिंगणघाट तालुक्यात असलेल्या मैदानी प्रदेशाइतके हे मैदान सपाट नसले तरी सुपीकतेच्या दृष्टीने व नैसर्गिक वनस्पतींच्या दृष्टीने आर्वीचे मैदान अधिक महत्त्वाचे आहे.

उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश व दक्षिणेकडील सपाट मैदानी प्रदेश यांच्यामध्ये असलेल्या प्रदेशात अनेक अलग अलग टेकडया आहेत. वर्ध्याच्या उत्तरेस हनुमानगडच्या आजूबाजूस आणि सेलूच्या ईशान्येस व उत्तरेस हिंगणीच्या आजूबाजूस अशा बऱ्याच टेकडया आढळतात.

दक्षिणेकडील मैदानी प्रदेश : पुलगावच्या दक्षिणेकडील कारला व नागझरीच्या टेकडया आणि सालोडच्या पूर्वेकडील टेकडया वगळता सर्वसाधारणपणे नागपूर–मुंबई या वर्ध्यातून पूर्व-पश्चिम जाणाऱ्या रेल्वेमार्गाच्या दक्षिणेकडे सर्वत्र सपाट मैदानी प्रदेश आढळतो. समुद्र-पूरच्या ईशान्येस असलेल्या गिरडच्या प्रदेशात मात्र ३९० मीटर उंचीचे भूभाग आढळतात. या संपूर्ण मैदानी प्रदेशात अर्धा ते तीन मीटर जाडीचे रेगूर प्रकारच्या मृदेचे आवरण आढळते

नद्या

संपूर्ण वर्धा जिल्ह्याचा प्रदेश वर्धा-वैनगंगा खोऱ्यात वसलेला असून वर्धा व तिची मुख्य उपनदी वेणा या प्रदेशातून जलनि:सारण करतात. जिल्ह्यातील सर्व नद्या विविध डोंगर-माथ्यांवर व उत्तरेकडील सातपुडा पर्वताच्या रावणदेव-गरमसूर टेकडया, माळेगाव टेकडया,

नांदगाव टेकड्या व ब्राह्मणवाडा टेकड्यांवर उगम पावतात. वर्धा व वेणेचा काही भाग वगळता सर्वच नद्या हंगामी स्वरूपाच्या आहेत. पावसाळ्यात सर्व नद्यांना भरपूर पाणी असते. मुख्य नद्यांना पावसाळ्यात येणाऱ्या पुरामुळे, आजूबाजूच्या शेतजमिनीचे खूपच नुकसान होते. लहान नदी प्रवाह पावसाळ्यात भरड स्वरूपाच्या गाळ प्रदेशातून वाहतात आणि सपाटीला आल्यावर विस्तृत भागावर गाळाचे संचयन करून पुढे वाहतात. उन्हाळ्यात सर्वच नद्या व उपनद्यांतील पाणी अगदी कमी होते. काही नद्यांत पाण्याचे अगदी लहान व कमकुवत प्रवाह शिल्लक राहतात. तर काहीत पाण्याची डबकी तयार होतात. वर्धा आणि वेणा नद्यांच्या डाव्या किनाऱ्यांची उंची उजव्या किनाऱ्यापेक्षा कमी असल्यामुळे डाव्या किनाऱ्याच्या प्रदेशात पावसाळ्यात पुराचे पाणी सहजपणे पसरते.

देवळी, वर्धा, सेलू, हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यांतील जलोत्सारण आकृतिबंध (Drainage Pattern) वृक्षाकार (Dendritic) स्वरूपाचा आहे. उत्तरेकडील आष्टी, कारंजा आणि आर्वी तालुक्यांतील आकृतिबंध मात्र समांतर (Parallel) किंवा सहसमांतर (Sub-parallel) स्वरूपाचा आहे. याचे मुख्य कारण म्हणजे उत्तरेकडील नद्यांच्या प्रवाह-मार्गावर असलेले बेसाल्टमधील जोड पातळ्यांचे (Joint-planes) नियंत्रण होय. त्यामुळे उत्तरेकडील बऱ्याचशा नद्या मुख्य नदीला समांतर अशा उत्तर-दक्षिण दिशेने वाहतात.

वर्धा नदी : अबूल फझल या इतिहासकाराने लिहिलेल्या **ऐन-इ-अकबरी** ग्रंथात वर्धा नदीचा उल्लेख आहे. सातपुड्याच्या मुलताई पठारावर ७८६ मीटर उंचीवर बेतुलनजीक वर्धा नदी उगम पावते. तेथून दक्षिणेकडे प्रवास करीत ही नदी वर्धा जिल्ह्यात प्रवेश करते. जिल्ह्याच्या उत्तर, पश्चिम व दक्षिण सीमेवरून प्रवास करीत ती दक्षिणेकडील चंद्रपूर जिल्ह्यात प्रवेश करते. आष्टी आणि आर्वी तालुक्यांत या नदीचे पात्र (River bed) बरेच खडकाळ आहे. नदीमार्गात काही ठिकाणी प्रचंड शिळा आढळतात. नदीच्या संपूर्ण मार्गात अनेक ठिकाणी सुस्पष्ट अशी आयताकार वळणे आहेत. वर्धा जिल्ह्यातील बेसाल्ट खडकात अनेक ठिकाणी उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिम, नैऋत्य-ईशान्य इत्यादी दिशांत असलेले अनेक संधी अथवा जोड (Joint) आहेत. त्यांचाच परिणाम होऊन नदीमार्गात अशी स्पष्ट वळणे तयार झाली आहेत. जिल्ह्याच्या पश्चिमेकडील पूर्णा नदी खोऱ्याच्या भ्रंश क्रियेमुळे (Rifting) तसेच त्या दिशेने असलेला प्रदेशाचा उतरता कल (Tilt) यामुळे वर्धा नदीच्या उपनद्यांचा आकृतिबंध विशेषतापूर्ण दिसतो. वर्धेच्या या उपनद्या तिला समांतर वाहतात. त्यांनी बनविलेले जाळे विस्कळीत (Deranged) स्वरूपाचे दिसते. या नदीमध्ये उन्हाळ्यात पाणी साठलेले अनेक डोह आढळतात. उन्हाळ्यात नदीला सुलभ उतार असतो. मात्र पावसाळ्यात मोठे पूर येतात. पुलगाव शहराजवळ नदीवर रेल्वे पूल आहे. तसेच देवळी-कळंब मार्गावर सीरपूरजवळ (१९३७–३८) आणि पुलगाव–अमरावती मार्गावर पुलगावजवळ आणि कलकत्ता–नागपूर–धुळे–मुंबई राष्ट्रीय महामार्गावर खडका गावाजवळ पूल आहेत.

निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत या नदीवर आर्वी तालुक्यातील धनोडी गावाजवळ मातीचे धरण बांधण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे (१९८१). धरणाची संकल्पित लांबी सुमारे ९ कि. मी. आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर जिल्ह्यातील ४४,१५० हेक्टर जमिनीस जलसिंचनाचा लाभ मिळेल. याच नदीवर अमरावती जिल्ह्यात मोर्शी तालुक्यातील सिंभोरा येथे अप्पर वर्धा प्रकल्प बांधण्याचा प्रस्ताव आहे. त्याचा वर्धा जिल्ह्यातील १६,५०० हेक्टर क्षेत्रास लाभ होईल.

वेणा नदी : ही वर्धेची मुख्य उपनदी आहे. जिल्ह्याच्या पूर्व भागातून वाहणारी ही नदी काही अंतरापर्यंत वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यांच्या सीमेवरून वाहते व सावंगीजवळ वर्धेला मिळते. नागपूर जिल्ह्यात महाडगड नजीक या नदीचा उगम होऊन सिंदी रेल्वे स्टेशनच्या आग्नेयेस तीन कि. मी. वर वर्धा जिल्ह्यात प्रवेश करते. हिंगणघाट शहराजवळून वाहत ही दक्षिणेकडे जाते व वर्धा नदीस मिळते. बोर नदीच्या संगमापासून हिंगणघाटपर्यंत वेणा नदीस वर्षभर थोडे फार पाणी असते. फेब्रुवारीनंतर पाण्याचा प्रवाह मात्र खूपच लहान असतो. या नदीवर बनारस–नागपूर–केप कामोरीन राष्ट्रीय महामार्गावर कांडळी आणि हिंगणघाट येथे पूल बांधण्यात आलेत (१९६७–६८).

पोथरा नदी : समुद्रपूरच्या ईशान्येस गिरड टेकड्यांवर ३९० मीटर उंचीवर ही नदी उगम पावते. वेणा नदीची ही मुख्य उपनदी असून सेकापूर गावाच्या ईशान्येस चार कि. मी. अंतरावर वेणाला मिळते. नदीच्या पात्रात अनेक ठिकाणी वाळूचे फार मोठे संचयन आढळते. वेणा नदीच्या संगमप्रदेशात व तेथून साधारणपणे ६ ते ८ कि. मी. च्या नदीमार्गात, दोन्ही किनारे सहज ढासळणारे, ठिसूळ व कमकुवत असे आढळतात. गिरडच्या डोंगराळ प्रदेशातून अनेक उपनद्या या नदीस येऊन मिळतात व त्यामुळे नदीप्रवाहाच्या खालच्या विभागात गाळाचे फार मोठे संचयन आपोआपच होते. या नदीवर समुद्रपूर तालुक्यातील झुनका (रुनका) गावाजवळ १९८२ मध्ये मातीचे धरण बांधण्यात आले. त्यापासून समुद्रपूर आणि हिंगणघाट तालुक्यांतील ६,३१५ हेक्टर क्षेत्रास जलसिंचनाचा लाभ झाला आहे.

बोर नदी : वेणा नदीची ही उपनदी नागपूर जिल्ह्यात बाझारगाव जवळच्या टेकड्यांत ४८८ मीटर उंचीवर उगम पावते. उगम प्रदेशाजवळ नदी तीव्र उतारांच्या घळईतून पुढे दक्षिणेकडे वाहते. सावंगीजवळ हिला धाम नदी येऊन मिळते. संगमाजवळच्या प्रदेशाची उंची २२० मीटर आहे. येथून पुढे साधारणपणे तीन कि. मी. वर मांडगावच्या उत्तरेस ही वेणा नदीला जाऊन मिळते. बोर नदीच्या मार्गात अनेक लहानमोठी वळणे असून बऱ्याच मोठ्या नदीमार्गात वाळूचे संचयन आढळते. वर्धा तालुक्यातील बोर गावानजीक या नदीवर १९६९ मध्ये मातीचे धरण बांधण्यात आले. या नदीवर नागपूर–वर्धा–यवतमाळ मार्गावर सेलू येथे पूल आहे.

धाम नदी : ही उपनदी बोर नदीला मिळते. हिचा उगम ढगा या आरक्षित जंगल प्रदेशातील ब्राह्मणवाडा टेकड्यांत ४६५ मीटर उंचीवर होतो. नदी मार्गात अनेक ठिकाणी किनारे ढासळून पात्रात गाळ व दगड-धोंड्यांचे संचयन झाल्याचे आढळते. कामठी ते अंजी व अंजी ते पवनार या मार्गात नदी अनेक लहानमोठ्या नागमोडी वळणांनी प्रवास करते. पवनारजवळ धाम नदीचे पात्र रुंद झाले असून पात्रात दगड-धोंड्यांचे व वाळूचे संचयन झालेले दिसते. पवनारच्या पश्चिमेस असलेल्या महाकाळजवळ उत्तरेकडून येणारी पंचधारा नदी धामला येऊन मिळते. आर्वी तालुक्यातील महाकाळी गावाजवळ धाम प्रकल्पाचे काम १९७४ मध्ये सुरू झाले. त्यावर १९८७ पर्यंत १५,०४.३६ लक्ष रुपये खर्च झाले. या नदीवर नागपूर–वर्धा–यवतमाळ मार्गावर पवनारजवळ, वर्धा–आर्वी मार्गावर येळाकेळी आणि अंजी गावाजवळ, खरांगणा-कोंढाळी मार्गावर खरांगणा (मोरांगणा) जवळ (१९६९-७०) आणि खरांगणा (गोडे)–हमदापूर मार्गावर वाघाळा गावाजवळ (१९८३–८४) पूल बांधले आहेत.

पंचधारा नदी : ही धामची उपनदी असून मनोली आरक्षित जंगल प्रदेशात समुद्र-सपाटीपासून ५९९ मीटर उंचीवर उगम पावते. या नदीच्या वरच्या मार्गात आधारित खडकांचा प्रभाव दिसून येतो. नदीचा नागमोडी वळणविरहित मार्ग, नदीला काटकोनात येऊन मिळणाऱ्या उपनद्या व कर्तित नागमोडी वळणे (Entrenched Meanders) या सर्व बाबी भूसंरचनात्मक नियंत्रण दर्शवितात. या नदीवर सेलू–झडशी–टाकळी मार्गावर झडशी गावाजवळ (१९८४) पूल बांधण्यात आला.

यशोदा नदी : वर्धा नदीची ही उपनदी सातपुडा पर्वत प्रदेशात ३५७ मीटर उंचीवर उगम पावते. नदीचा उगम सातपुड्याच्या वायव्य उतारावर होतो. तेथून ती आग्नेयवाहिनी होऊन हिंगणघाट तालुक्यातील अल्लीपूरपर्यंत येते. तेथून नदीप्रवाह दक्षिणवाहिनी होतो. पुढे टाकळी गावाच्या दक्षिणेस समुद्रसपाटीपासून २३० मीटर उंचीच्या प्रदेशात ही नदी वर्धेस मिळते. या नदीवर देवळी–कळंब मार्गावर इसापूरजवळ पूल बांधला आहे (१९३७-३८).

बाकळी नदी : आष्टी तालुक्यातील सतारपूर आरक्षित जंगल प्रदेशात ४३५ मीटर उंचीवरील भूभागात ही नदी उगम पावते. पारगोठाण रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेस ही वर्धेला मिळते. आष्टी आणि आर्वी तालुक्यांत ही नदी वर्धेला जवळजवळ समांतर अशी उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते. या नदीवर आर्वी–देऊरवाडा मार्गावर नांदपूरजवळ पूल बांधला आहे (१९८०).

कार नदी : जिल्ह्याच्या ईशान्येकडील कोंढाळी पठारावर ६५० मीटर उंचीवर कारचा उगम होतो. उगमानंतर वायव्येकडे वाहत जाऊन ही नदी वर्धा नदी जेथे या जिल्ह्यात प्रवेश करते तेथेच तिला मिळते. ही नदी तीव्र उताराच्या अरुंद दरीतून व खडकाळ तळावरून वाहते. वर्धेला मिळण्यापूर्वी या नदीत अनेक नागमोडी वळणे तयार झाली आहेत. नदीपात्रात अनेक ठिकाणी लांबलचक वाळूचे दांडे (Sand bars) तयार झाले आहेत.

भौगोलिक विभाग[६]

जिल्ह्याची प्राकृतिक रचना व सांस्कृतिक पर्यावरण यावर आधारित असे तीन प्रमुख विभाग करता येतात. उत्तरेकडील व ईशान्येकडील डोंगराळ प्रदेश, आर्वीचे मैदान, आणि वर्धा–हिंगणघाटचा मैदानी प्रदेश.

उत्तरेकडील व ईशान्येकडील डोंगराळ प्रदेश : पश्चिमेकडील वर्धा नदी खोऱ्याचा सखल प्रदेश आणि वर्धा, सेलू व देवळी तालुक्यांचा उत्तरेकडील थोडाफार भाग वगळता जवळजवळ सर्व आर्वी तालुका, कारंजा तालुका आणि संपूर्ण आष्टी तालुक्यांचा या विभागात समावेश होतो. तळेगाव–कारंजा पठाराचा हा भाग असून हे पठार उत्तरेकडे कललेले आहे. या पठाराचे उतार उत्तरेकडे, पश्चिमेकडे व दक्षिणेकडेही कललेले आहेत. दक्षिणेकडील उताराचा समावेश वर्धा जिल्ह्यात होतो. या उतारावर ३०० मीटर, ४०० मीटर व ५०० मीटर या सरासरी उंचीवर सपाटीचे मंच (Ghat terraces) आढळतात. हे तीनही सपाटीचे प्रदेश तीव्र उतारांच्या कड्यांनी विलग केलेले आहेत. उंचीच्या या तीनही पातळ्या लाव्हा रसाच्या उद्रेकाच्या सर्वसाधारण पातळ्या दर्शवितात. पश्चिमेकडे हे सपाट प्रदेश

[६] ही माहिती १९८८ मधील आहे.

अधिक अरुंद आहेत. तळेगाव–कारंजा पठाराचे विखंडन फार मोठ्या प्रमाणावर झाले नसले तरी पठाराच्या दक्षिण उताराच्या प्रदेशावर नद्यांच्या खोल प्रवाह मार्गांनी अधिक झीज केल्याचे आढळते. या दक्षिण उतारावरून असंख्य हंगामी जलप्रवाह वाहतात. पाचशे मीटर उंचीच्या जवळपास सर्वत्र नद्यांच्या खोऱ्यांत झरे आढळतात. सच्छिद्र असे वरचे खडक व त्याखाली असलेले अच्छिद्र बेसाल्ट यांच्या संपर्क रेषेवर (Contact Zone) हे झरे आढळतात. त्यामुळे या प्रदेशात अनेक ठिकाणी उथळ विहिरी खोदण्यात आल्या असून त्यांना पुरेसा पाणीपुरवठा असतो.

पश्चिमेकडील व दक्षिणेकडील डोंगर उतारावरील भूपृष्ठावर सर्वत्र दगड-धोंडे व भरड पदार्थांचे आवरण आहे. या मृदांना खरडी व बरडी मृदा म्हणतात. या मृदा करड्या व तांबूस रंगाच्या असतात. बेसाल्टच्या भस्मीकरणामुळे (Oxidation) व पावसाळ्यात जमिनीची होणारी धूप यामुळे जमिनी निकृष्ट प्रतीच्या आहेत. पश्चिमेकडील डोंगर उतारावर सर्वत्र विदारीत खडकांचे तुकडे पसरल्यामुळे या मृदाही निकृष्ट आहेत. डोंगराच्या पायथ्याशी व नद्यांच्या काठांवर जेथे थोडेफार गाळाचे संचयन झाले आहे फक्त त्या जमिनीच उपयुक्त असून तेथे खरिपाची काही पिके घेतली जातात.

या प्रदेशात उत्तर, ईशान्य व पूर्व उतारांवर आढळणारी जंगले मिश्र स्वरूपाची व अधिक घन आहेत. सागाची झाडे विपुल प्रमाणात असून त्याबरोबर ऐन, धावडा, मोह व तेंदूची झाडेही येथे आढळतात. गेल्या काही वर्षांत झालेल्या खूप मोठ्या जंगलतोडीमुळे पठाराच्या माथ्याजवळ व डोंगर उतारावर जंगले नाहीत. जंगलांच्या तोडीमुळे येथील जमिनीची खूप मोठ्या प्रमाणावर धूप झालेली आहे. दक्षिण व नैॠत्येकडील खडकाळ डोंगर उतारांवर व बोर, यशोदा आणि धाम नद्यांच्या उगमाच्या प्रदेशात खैर, पळस, ऐन, करवंद या जाती मुख्यत्वे आढळतात. निरनिराळ्या प्रकारची झुडपे व गवतही वाढते.

या प्रदेशात शेतीयोग्य तथापि पडीत (Culturable waste) जमिनीचे प्रमाण खूप मोठे आहे. खरीप हंगामात ज्वारी, मूग, तूर, भुईमूग व रताळी ही पावसावर अवलंबून असलेली पिके घेतली जातात. आर्वी भागात तांदूळही घेतला जातो. आर्वी आणि कारंजा गावांजवळील पठारी प्रदेशात संत्र्यांच्या बागा असून तेथील अर्थव्यवस्था संत्र्यांच्या उत्पन्नावरच अवलंबून आहे.

आर्वीचे मैदान : सुमारे ७० कि. मी. लांब व ६ ते ८ कि. मी. रुंदीचे व उत्तर-दक्षिण पसरलेले हे अरुंद चिंचोळे मैदान आर्वी तालुक्याच्या पश्चिमेस असून ते वर्धा खोऱ्याला लागूनच आहे. या मैदानाची उंची अदमासे ३०० मीटर आहे. हे मैदान पूर्णपणे सपाट नसून उंचसखल आहे. नद्या व उपनद्यांच्या जवळ या मैदानात काळ्या मातीचा जाड थर आढळतो. नद्यांपासून दूर व डोंगराळ प्रदेशाच्या पायथ्याशी आढळणारी मृदा कमी जाडीची, करडी व काळी आहे. मृदेतील चुन्याचे प्रमाण लक्षणीय आहे. आर्वीच्या मैदानातील मृदा संपूर्ण वर्धा जिल्ह्यात सर्वांत अधिक सुपीक आहेत. या मैदानात कुठेही जंगले नाहीत. नद्यांच्या काठी मात्र वड किंवा आंब्याची झाडे आढळतात. डोंगरांच्या पायथ्याशी व कमी उंचीच्या डोंगरावर काही ठिकाणी चराऊ कुरणे आढळतात.

शेती हा मुख्य व्यवसाय असून खरीप हंगामात प्रामुख्याने कापूस व ज्वारी घेतात. रब्बी हंगामात गहू पिकविला जातो.

वर्धा–हिंगणघाटचा मैदानी प्रदेश : सेलू व वर्धा तालुक्यांचा दक्षिणेकडील भाग, देवळी तालुका आणि हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यांचा या विभागात समावेश होतो. हा सर्व प्रदेश सपाट मैदानी असून दक्षिणेकडे वर्धा नदीच्या दिशेने तो उतरता होत गेला आहे. मैदानाची उत्तरेकडील उंची ३५० मीटर असून दक्षिणेकडे २०० मीटर इतकी आहे. पूर्वेकडील प्रदेशाची उंची जास्त आहे. गिरडजवळ ही उंची ३९० मीटर आहे. समुद्रपूर तालुक्यातील भूभाग सर्वत्र उंचसखल असून विदारीत खडकांच्या तुकड्यांनी झाकलेला आहे. या प्रदेशातील नद्या दक्षिणेकडे अथवा आग्नेयेकडे वाहतात. यशोदा नदी वर्धेला मिळते. इतर सर्व नद्या वेणेच्या उपनद्या आहेत. हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यांतील उंचसखल भागात अनेक ठिकाणी बंधारे घालून लहानमोठे तलाव बांधण्यात आले आहेत. यातील पाण्याचा वापर रबी हंगामात जलसिंचनाकरिता केला जातो. समुद्रपूर तालुक्यातील समुद्रपूर व जाम, देवळी तालुक्यातील नाचणगाव व वर्धा तालुक्यातील वायगाव येथील तलाव मोठे आहेत. या संपूर्ण मैदानी प्रदेशात पूर्वेकडचा प्रदेश वगळता सर्वत्र ५ ते ८ मीटर खोलीवर भूजल आढळते.

गिरडच्या जवळ आढळणाऱ्या मृदा उथळ व कनिष्ठ दर्जाच्या आहेत. इतरत्र वर्धा व वेणा नद्यांच्या खोऱ्यांतील मृदा खोल व चुनायुक्त आहेत. त्यांची बाष्पधारण क्षमता अधिक आहे. मैदानाच्या उत्तर सीमेवर मात्र या मातीतील भरड पदार्थांचे प्रमाण जास्त आहे. या प्रदेशातही जंगलाचे प्रमाण जवळजवळ नगण्यच आहे. नद्यांच्या काठी काही ठिकाणी खजुराची झाडे आहेत. गिरडच्या आसपास आरक्षित जंगलांचे प्रमाण अधिक आहे. नाहनी, मंगरूळ व मोहगाव हे आरक्षित जंगल प्रदेश याच विभागात आहेत.

एकूण मैदानी प्रदेशाचे ७५ प्रतिशत क्षेत्र लागवडीखाली आहे. पश्चिमेकडील भागात विहिरींद्वारे तर पूर्वेकडील भागात तलावांमधून जलसिंचन केले जाते. कापूस व ज्वारी खरीप हंगामात व गहू रबी हंगामात घेतला जातो. शिवाय दोन्ही हंगामात भुईमूग घेतला जातो.

भूशास्त्र व खनिज संपत्ती[७]

जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागात एका अरुंद पट्ट्यात टेकड्यांचे पुंजके आहेत. दक्षिणेकडील भागात सौम्य चढउतार असून त्यात अधूनमधून काही टेकड्या विखुरलेल्या आहेत. मुख्य उतार दक्षिणेकडे व आग्नेयेकडे आहे. समुद्रसपाटीपासूनची जिल्ह्यातील सर्वसाधारण उंची ४०० ते ६०० मीटर आहे.

हिंगणघाट परिसरातील ट्रॅप खडकांचा अभ्यास प्रथम डब्ल्यू. टी. ब्लॅन फोर्डने (१८६८) केल्याचे आढळते. त्यानंतर १८७७ मध्ये टी. डब्ल्यू. ह्युजिसने आर्वी, वर्धा व हिंगणघाट तालुक्यांच्या काही भागांचे भूशास्त्रीय नकाशे तयार केले. डी. भट्टाचार्यने १९२३ मध्ये आर्वी तालुक्याच्या भागाचा सुधारित नकाशा केला. अलीकडील काळात ए. के. आर. हेमाडी (१९६४–६५), ए. आर. पाटील (१९६४–६५) व जी. सूर्यनारायण यांनी हिंगणघाट तालुक्यातील प्रदेशाचा भूशास्त्रीय अभ्यास केला.

भूशास्त्र : मध्य क्रेटेशसकालीन लॅमेटा मालेचे चुनखडक व शेल काही ठिकाणी अल्प प्रमाणात आढळतात. त्यांच्यावर उत्तर क्रेटेशस ते इओसीनकालीन डेक्कन ट्रॅपचा मुख्यत्वेकरून बेसाल्ट या ज्वालामुखी खडकाचे थर आहेत. काही ठिकाणी बेसाल्टच्या थरांमधील

[७] या विषयावरील लेखन कै. प्रा. र. पां. आगस्ते, भूशास्त्रज्ञ, यांनी केलेले आहे.

आंतरट्रॅपियन (इंटर-ट्रॅपियन) खडक उघडे पडलेले आढळतात. बेसाल्ट खडकांवर काही ठिकाणी सब-रिसेंट जांभा (लॅटेराइट) खडक अगदी क्वचित आढळतो. मात्र या काळातील गाळ वर्धा नदी व तिच्या प्रमुख उपनद्यांमध्ये पसरलेला आढळतो.

लॅमेटा मालेचे बेसाल्टाखालचे इन्फ्राट्रॅपियन खडक जिल्ह्यातील सर्वांत जुने खडक म्हणून नमूद करण्यात आलेले आहेत. मात्र जिल्ह्याच्या आग्नेय कोपऱ्यातील सीमेजवळ चंद्रपूर जिल्ह्यातील काही विहिरींमध्ये याहीपेक्षा जुने कँब्रियनपूर्व, आर्कियन ग्रनाइट–नाईस हे रुपांतरित पट्टिताश्म आढळले आहेत. वर्धा जिल्ह्याच्या आग्नेय भागात जमिनीखाली ग्रनाइट-नाईस असण्याची शक्यता आहे. मात्र भूपृष्ठावर ते कोठे दृश्यांशाच्या स्वरूपांत उघडे पडले असल्याची नोंद नाही. लॅमेटा मालेचे खडक अवसादी म्हणजे गाळांचे असून ते नादेय व नदीमुखाजवळील खाडीतील गाळापासून तयार झालेले आहेत. लाल व करड्या रंगांच्या मृत्तिका, चुनखडक व वालुकाश्म हे या मालेचे खडक होत. देशामध्ये इतरत्र या मालेच्या खडकांमध्ये शंख व शिंपले या मृदुकाय प्राण्यांचे, मत्स्यांचे तसेच डायनोसॉरांसारख्या सरिसृप (सरपटणाऱ्या) प्राण्यांचे अवशेष सापडले आहेत. मात्र या जिल्ह्यात तसे कोठे आढळले नाहीत. या मालेचे खडक खामबाद येथील पोथरा नदीमध्ये अगदी ठळकपणे उघडे पडले आहेत, तसेच काही तुटक दृश्यांश वर्धा नदीच्या खोऱ्यात आहेत.

डेक्कन ट्रॅपच्या बेसाल्टांचे थर वर्धा जिल्ह्यामध्ये बहुतेक सर्वत्र पसरलेले आहेत. थरांच्या टोकांच्या बाजूला ते जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणे अथवा मांडणीसारखे दिसतात, म्हणून पायरी या अर्थाच्या ट्रॅप या शब्दावरून त्यांना असे नाव देण्यात आले. हा खडक दख्खनच्या पठारावर सर्वत्र आढळतो म्हणून दख्खन म्हणजेच डेक्कन ट्रॅप असे नाव पडले. वर्धा जिल्ह्यातील बेसाल्ट मुख्यत्वेकरून "आ-आ" (हवाई बेटांतील एका प्रकारच्या ज्वालामुखी बेसाल्टाचे नाव) प्रकाराचे आहेत. हे बेसाल्ट घट्ट, पक्के व कठीण असतात. वातावरण क्रियेने त्यांच्यात वर्तुळाकार कवचयुक्त झीज, म्हणजे "गोलकाभ अपक्षय" आढळतो. त्यांच्यात स्तंभाकार संधी (भेगा) असून काही भाग कुहरींनी युक्त (म्हणजे वाटाण्याच्या अथवा बदामाच्या आकाराच्या पोकळ्यांनी युक्त) आहेत. बेसाल्टाच्या पृष्ठभागावर लाव्हारसाच्या वहनामुळे तयार झालेले संकोणाश्मन (फुटलेल्या तुकड्यांनी युक्त) आढळते. वहनामुळे तयार झालेल्या या संकोणाश्मनामध्ये किंवा दलिक पृष्ठभागावर अणकुचीदार किंवा उपकोनीय (काहीसे गोलवट) तुकडे आढळतात. हे तुकडे काही सेंटिमीटर ते मीटरहून अधिक आकारमानाचे असून ते तांबूस, तपकिरी रंगाच्या कुहरी आधारकात आढळतात. कुहरी प्रकारच्या बेसाल्टातील पोकळ्या अनेक द्वितीयक खनिजांनी भरलेल्या आहेत. त्यात क्वॉर्ट्झ, चॅल्सेडोनी, कॅल्साइट, ॲगेट व विविध झिओलाइट वर्गातील खनिजे आढळतात. कुहरी भागाचा वरचा भाग हा बेसाल्टाच्या थराचा सामान्यत: वरचा पृष्ठभाग अथवा प्रत्येक थराची वरची सीमा असल्याचे दिसते. समुद्रपूर तालुक्यातील गिरड भागामधील १२० मीटर उंचीच्या उभ्या स्तंभामध्ये बेसाल्टाचे एकूण सात थर आढळले आहेत. प्रत्येक थर सुमारे १० ते ३० मीटर जाडीचा आहे. बेसाल्टाच्या अपक्षरणाने काळी कसदार शेतजमीन तयार झाली आहे. ही जमीन कापूस पिकास उत्तम आहे.

काही ठिकाणी बेसाल्टांच्या थरांमध्ये अर्धा ते तीन मीटरपर्यंत जाडीचे आंतरट्रॅपियन (इंटर-ट्रॅपियन) अवसादी थर आहेत. खालचा बेसाल्टाचा एक थर तयार झाल्यानंतर परत लाव्हारसाचे प्रक्षेपण होऊन दुसरा नंतरचा नवीन थर होण्यामध्ये जो कालावधी असतो

त्या कालातील नद्यांच्या पात्रांमध्ये व सरोवरांमध्ये निक्षेपित झालेले हे अवसाद होत. आंतरट्रॅपियन थर हिरव्या व तांबड्या मृत्तिका, हिरवे चर्ट आणि उदी रंगाच्या चुनखडकांचे बनलेले आहेत. काही ठिकाणी त्यांच्यात उदरपाद म्हणजे शंखांचे अवशेष सापडले आहेत. असे आंतरट्रॅपियन अवसाद समुद्रपूर तहसिलीतील सेवा, गिरड, दसोडा, खुर्सीपार, सेलू इत्यादी ठिकाणी व कारंजा तहसीलमधील बांगडापूर, सिंदी विहरी व लिंगा मांडवी ठिकाणी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आर्वी तालुक्यातील नागझरी व धानोलीच्या परिसरात काही ठिकाणी जांभ्याचे (लॅटेराइट) तुटक पट्टे ठिगळांप्रमाणे आहेत. ते बेसाल्टांच्या पठारांवर शिरस्त्राणासारखे (टोपीसारखे) आढळतात. अवसादी (गाळाचे) निक्षेप सामान्यतः नद्यांच्या किनाऱ्यावरच मर्यादित आहेत. नद्यांच्या गाळाचे चार ठळक पट्टे आढळले आहेत. यापैकी दोन पुलगाव व तळेगाव भागात वर्धा नदीच्या किनाऱ्यावर आहेत. तिसरा पट्टा आसोदा नाल्याच्या किनाऱ्यावर सोनेगाव भागात व चौथा पिंपळगावजवळ हिंगणघाटच्या दक्षिणेला आहे. या अवसादाची जाडी १५ ते १८ मीटर असून भरड वाळू व खडी नद्यांच्या पात्रात तर बारीक गाळवट (रेती) व मृत्तिका नद्यांच्या किनाऱ्यांवर आढळतात. बेसाल्टाच्या अपक्षरणाने काळी कसदार जमीन तयार होते. ही मृदा चुना, लोह व क्षार या मूलद्रव्यांनी समृद्ध आहे. या मृदेची कमाल जाडी ३ मीटरपर्यंत आहे. त्यात कापूस चांगला पिकतो.

जिल्ह्यातील भूतांत्रिकी योजना : निम्न वर्धा योजना– ही भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणाच्या (जी.एस.आय्.) सहाय्याने कार्यान्वित होत आहे. पाटबंधाऱ्याच्या योजनेनुसार पुलगावजवळ वर्धा नदीवर मातीचे धरण बांधण्यात येणार आहे.

भूजल : डेक्कन ट्रॅप बेसाल्टची जल झिरपणे व संचयन करण्याची क्षमता अत्यंत अनियमित असल्यामुळे भूजलाची परिस्थिती अत्यंत अनिश्चित आहे. भूजलाचे झिरपणे व त्याच्या भूमिगत हालचाली प्रामुख्याने बेसाल्टमधील संधींची (भेगांची) रुंदी, त्यांची खोली, विपुलता (संख्या) तसेच अपक्षरित खडकाची जाडी, बेसाल्टचा कुहरी प्रकार इत्यादींवर अवलंबून असतात. सुटी वाळू व खडी यांच्यामुळे अवसादी पट्ट्यात पाण्याचे प्रमाण अगदी भरपूर असते. हे पाणी भूजल पृष्ठाच्या व बंदिस्त स्वरूपाच्या दोन्ही परिस्थितींमध्ये आढळते. जमिनीखालील पाण्याची पृष्ठभागापासून खोली ठिकठिकाणी भिन्न असते. घट्ट व पक्क्या बेसाल्टमधील अपक्षरित व संधीयुक्त भागांत ती सामान्यतः ६ ते १२ मीटर, कुहरी ट्रॅपमध्ये ६ ते ९ मीटर व अवसादी निक्षेपांत १० ते १५ मीटर इतकी खोल असते. या भागांतील योग्य अशा भूगतिकी परिस्थितीतील प्रत्येक विहिरीतून प्रतिदिनी २०० किलोलीटर पाणी मिळू शकते.

हवामान व ऋतू

या जिल्ह्यातील हवामानाची विशेषता म्हणजे कडक उन्हाळा. पावसाळा वगळता वर्षभर हवामान शुष्क असते. संपूर्ण वर्षभराचे चार ऋतू कल्पिलेले आहेत :– हिवाळा डिसेंबर ते फेब्रुवारी, उन्हाळा मार्च ते मध्य जून, त्यानंतर नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा काळ म्हणजे पावसाळा ऑक्टोबरच्या पहिल्या सप्ताहापर्यंत, मान्सुनोत्तर ऋतू ऑक्टोबरचा दुसरा आठवडा ते नोव्हेंबरपर्यंत.

पर्जन्यमान : वर्धा जिल्ह्यातील तीन पर्जन्यमापक केंद्रांची ९५ वर्षांची आकडेवारी उपलब्ध आहे. इ. स. १८८८–८९ ते १८९३–९४ या वर्षांतील पर्जन्याची आकडेवारी तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविली आहे.[८] वर्धा, हिंगणघाट आणि आर्वी येथील पर्जन्यमापक केंद्रांतील काही वर्षांचे पर्जन्यमान तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविले आहे. वार्षिक सरासरी पर्जन्य १०९०.३ मि. मी. (४२.९६") असून जून ते सप्टेंबर महिन्यांत एकूण पर्जन्याच्या ८७ टक्के पाऊस पडतो. जुलै सर्वाधिक पर्जन्याचा महिना आहे. जिल्ह्यात पश्चिमेकडून पूर्वेकडे पर्जन्याचे प्रमाण वाढत जाते. पावसाळ्यानंतर अत्यल्प पाऊस पडतो. जिल्ह्यातील वर्धा, हिंगणघाट व आर्वी पर्जन्यमापक केंद्रांमधून प्राप्त झालेली १९०१ ते १९५० ची पर्जन्यविषयक माहिती (प्रसामान्य पर्जन्य, २.५ मि. मी. पेक्षा अधिक पाऊस पडलेल्या दिवसांची संख्या, कमाल व किमान पावसाच्या सरासरीचे शेकडा प्रमाण इत्यादी) तक्ता क्रमांक ३ मध्ये दिली आहे. उपरोक्त ५० वर्षांच्या कालखंडात १९३३ मध्ये सर्वाधिक पावसाची नोंद झाली. त्या वर्षी वार्षिक प्रसामान्य पर्जन्यापेक्षा १५३ टक्के अधिक पाऊस पडला. त्याउलट १९२० मध्ये सर्वांत कमी म्हणजे सरासरीच्या ४९ प्रतिशत पाऊस पडला. उपरोक्त ५० वर्षांत आठ वर्षे अशी होती की, तेव्हा प्रसामान्यापेक्षा ८० टक्क्याहून कमी पाऊस पडला होता. त्यापैकी दोन वर्षे लागोपाठची होती. तक्ता क्रमांक ३ आणि ४ वरून स्पष्ट होते की, ५० पैकी ३७ वर्षांत जिल्ह्यात ९०० ते १४०० मि. मी. पावसाची नोंद झाली. प्रतिदिनी २.५ मि. मी. किंवा त्याहून अधिक पाऊस पडलेल्या पर्जन्य दिवसांची सरासरी संख्या ५६ होती. अशा पर्जन्यदिनांची संख्या आर्वीला ५२ तर हिंगणघाटला ५७ होती. जिल्ह्यात एकाच दिवशी अतिवृष्टी होण्याचे प्रसंग अत्यल्प असतात. अतिवृष्टी झालेला असा एक प्रसंग हिंगणघाटला १८ जुलै १९१३ रोजी उद्‌भवला होता. त्या दिवशी २४ तासांत ३१२.९ मि. मी. (१२.३२″) पावसाची नोंद झाली होती.

अलीकडील काळात जिल्ह्यातील पर्जन्यमान कमी झाल्याचे दिसते. एके काळी निश्चित पाऊस पडणाऱ्या या जिल्ह्यात पावसाची अनिश्चिती वाढलेली दिसते. अवर्षणाव्यतिरिक्त अवेळी व अनियमितपणे पडणाऱ्या पावसामुळेही कृषी अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो. अलीकडे तीन वर्षे अवेळी व अपुऱ्या पावसामुळे दुष्काळ तथा टंचाईची स्थिती निर्माण झाली. काही वर्षांतील पर्जन्यमान पुढे दिले आहे :— १९६२–१०५४.३ मि. मी.; १९६६–८८१.३ मि. मी.; १९७२–६७९.४ मि. मी.; १९७८–१३२०.० मि. मी.; १९८०–११४०.१ मि. मी. आणि १९८२–८८३.२ मि. मी.

तपमान : वर्ध्याला अलीकडील काळात वेधशाळा स्थापन करण्यात आलेली असून तेथील मोसम विज्ञानविषयक माहिती व निष्कर्ष संपूर्ण जिल्ह्यास लागू पडतात.[९] आल्हाददायक हिवाळ्यानंतर मार्चच्या प्रारंभापासून तपमानात सातत्याने वाढ होत जाते. मे महिना सर्वाधिक तपमानाचा असून सरासरी दैनिक कमाल तपमान ४३° सेल्सियस आणि सरासरी दैनिक किमान तपमान २७° सेल्सियस असते. मे महिन्यातील काही दिवशी कमाल तपमान ४७° सेल्सियसपर्यंत वाढते. उन्हाळ्यात दिवसाचे तपमान असह्य असते, रात्री किंचित थंड असतात. दुपारनंतर कधी कधी मेघगर्जनेसह पर्जन्य होऊन तपमानात घट होते, तथापि असे

---

[८] सर्व तक्ते या प्रकरणाच्या शेवटी दिलेले आहेत.

[९] मोसम विज्ञान अपर महानिदेशक, भारत सरकार, पुणे, यांचेकडून जानेवारी १९८७ मध्ये प्राप्त झालेली माहिती.

दिवस अत्यल्प असतात. तपमानातील घट अल्पकालीन असते. नागपूरपेक्षा वर्ध्यातील तपमान थोडे कमी असते. मध्य जूनमध्ये नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे पाऊस पडल्यावर तपमानात घट होते. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यानंतर पावसाळा साधारणपणे संपतो आणि दिवसाच्या तपमानात थोडी वाढ होते. ऑक्टोबरातील बरेच दिवस उकाड्याचेच असतात. नोव्हेंबरच्या प्रारंभापासून रात्रीच्या तपमानात सातत्याने घट होते. डिसेंबर हा सर्वाधिक थंडीचा महिना असून सरासरी दैनिक कमाल तपमान २९° सेल्सियस आणि सरासरी किमान तपमान १३° सेल्सियस असते. जानेवारीतही कडक हिवाळा असतो. उत्तर हिंदुस्थानात थंडीची लाट पसरल्यावर त्याचा प्रभाव येथील तपमानावर होतो. काही वेळा रात्रीचे तपमान ७° सेल्सियसपर्यंत घटते. भारत सरकारच्या मोसम विज्ञान अपर महानिदेशक कार्यालयाने पाठविलेली सरासरी तपमान व सापेक्ष आर्द्रताविषयक माहिती तक्ता क्रमांक ५ मध्ये दिली आहे.

आर्द्रता : पावसाळ्याखेरीज वर्षभर जिल्ह्यातील हवामान शुष्क असते. पावसाळ्यात आर्द्रतेचे प्रमाण ७० टक्के असते. उन्हाळा गरम व शुष्क हवामानाचा असतो. त्या काळात दुपारनंतर सापेक्ष आर्द्रतेचे प्रमाण २० टक्के असते.

जूनच्या मध्यापासून मान्सूनचे वारे वाहू लागतात. वाऱ्यांची दिशा सामान्यपणे नैऋत्येकडून ईशान्येकडे असते. हे वारे अरबी समुद्राकडून आलेले असतात. वाऱ्यांबरोबर ढग येऊन पावसास मृग नक्षत्रात प्रारंभ होतो. मृग नक्षत्रात पाऊस पडणे शेतीच्या दृष्टीने हितकारक असते. नोव्हेंबरपासून आकाश सामान्यपणे निरभ्र असते. तेव्हापासून वारे उत्तरेकडून अथवा ईशान्येकडून वाहतात. तक्ता क्रमांक ६ मध्ये वर्धा शहरावरून वाहणाऱ्या वाऱ्यांचा महिनानिहाय वेग दिलेला आहे. जून ते सप्टेंबरच्या कालावधीत कमी दाबाचे पट्टे तयार झाल्यामुळे त्याप्रसंगी जोरदार वृष्टी होते. बंगालच्या उपसागरावर निर्माण झालेले कमी दाबाचे पट्टे पश्चिमेकडे सरकून देशाच्या मध्यभागी आल्यावर वर्धा जिल्ह्यात जोरदार वादळी पाऊस पडतो. अरबी समुद्रावरील कमी दाबाचे पट्टे क्वचित वर्ध्याच्या बाजूला सरकतात. धुळीची वादळे फक्त उन्हाळ्यात उद्‌भवतात.

वनसंपदा

भूशास्त्र व वनशास्त्रातील पुराऐतिहासिक दृष्टिकोनातून वर्धा जिल्ह्याचा 'गोंडवन' नामक प्रदेशात समावेश होतो. 'गोंडवन' वनस्पती प्रणालीमधील काही विशिष्ट वनस्पतींच्या जाती येथे आढळतात. या प्रणालीचा प्रभाव चंद्रपूर, गडचिरोली व पेंच वनांवर अधिक असला तरी या प्रणालीतील बऱ्याच जाती (Species) या जिल्ह्यातही आढळतात. मागील १०० वर्षांत बरीच वने नष्ट झालीत. तत्पूर्वी इकडे पुष्कळ वनसंपदा होती. महानुभाव वाङ्मयानुसार या प्रदेशाला "झाडिमंडल" म्हणत असत.[१०] त्यावरून स्पष्ट दिसते की, येथे प्राचीन काळी व मध्ययुगीन काळात घनदाट झाडी होती. पवनार उत्खननातील पुराव्यांवरूनही स्पष्ट झाले की, या प्रदेशात इ. स. पूर्व १००० वर्षांपासून मानव वसाहती असून येथे नैसर्गिक साधनसंपदा विपुल प्रमाणात होती. कालांतराने जनसंख्या वाढून मानवाने वनसंपदेवर आक्रमण केले. मागील १०० वर्षांत मानवाच्या बेछूट व निर्दय वनसंहाराने वनसंपदेचा नाश आरंभिला. परिणामतः वनसंपदेचा ऱ्हास जलद गतीने होत आहे. आज जी वने शिल्लक आहेत ती केवळ प्रतिकात्मक !

---

[१०] या ग्रंथातील प्रकरण २—इतिहास यातील मध्ययुगीन काळ यावरील वर्णन पहावे.

वर्धा–नागपूर जिल्ह्यांतील वनस्पतींचा सखोल अभ्यास अद्याप झालेला नाही. इ. स. १९२३ पासून नागपूरला विद्यापीठ असूनही हा महत्त्वाचा विषय अद्याप दुर्लक्षित राहिलेला दिसतो. ग्रॅहमने १९११ मध्ये नागपूर परिसरातील ३०९ वनस्पती जातींचा (Species) केलेला अभ्यास पहिला प्रयत्न म्हणता येईल. त्यानंतर हेन्सने १९१६ मध्ये थोडी भर घातली. आर. आय. पटेल यांनी (१९६४) केलेला मेळघाट वनस्पतींचा अभ्यास विदर्भातील वनस्पती शास्त्रात अधिक भर घालतो. पटेलांनी ७१६ जातींचा अभ्यास केला (Angiosperms). डॉ. बाळापुरेंनी १९६६ व १९७१ मध्ये अधिक अभ्यास करून वनस्पतींच्या याद्या प्रकाशित केल्या. बाळापुरेंच्या निष्कर्षानुसार भूतपूर्व सेंट्रल प्रॉव्हिन्स प्रदेशात २००० जाती आहेत.[११] तथापि त्या सर्व जातींच्या माहितीचे सर्वंकष संकलन व विवेचन करणे अद्याप बाकी आहे.

वर्धा–नागपूर प्रदेशातील वनस्पती शुष्क पानझडी (Dry Deciduous) प्रकारची आहे. त्यात मुख्यत्वे आढळणाऱ्या जाती पुढीलप्रमाणे होत :—

साग (Tectona grandis),	पळस (Butea monosperma),
अर्जुन सादडा (Terminalia arjuna),	धावडा (Anogeissus latifolia),
सालई (Boswellia serrata),	तेंदू (Diospyros melanoxylon),
ऐन (Terminalia tomentosa),	बोर (Zizyphus jujuba),
जिलहिली (Woodfordia fruticosa),	लेंडी (Largerstroemia parviflora),
मोवई (Lannea grandis),	बेल (Aegle marmelos),
कळंब (Mitragyna parcifolia),	मोह (Madhuca latifolia),
बेहेडा (Terminalia belerica),	आपटा (Bauhinia racemosa),
खैर (Acacia catechu),	हिवर (Acacia leucophloea),
दूधी (Wrightia tinctoria),	हिंगणा (Balanites roxburghii),
चांदोर (Zizyphus enoplea),	घाटबोर (Z. xylopyra).

Acacia fernasiana, Combretum ovalifolium, Gmelina asiatica, Ficus hispida, Phoenix sylvestris, A. pinnata, Carissa congesta, L. mitis, Lantana Camara, Capparis, Zeylanica, C. horrida.

Herbaceous Plants :

घेटुली, पुनर्नवा-आसु[१२] (Boerhaavia diffusa), Berleria cristata, Justicia simplex, Amaranthus tricolour, Aerualanata.

वर्धा जिल्ह्यामध्ये दक्षिण व नैऋत्येकडील उतारांवर प्रामुख्याने तीव्र उतार असलेल्या खडकाळ जमिनीवर मोठी वृक्षवल्ली आढळत नाही. जलविभाजकाच्या उंच प्रदेशात आणि दक्षिणेकडे असलेल्या बोर व धाम नद्यांच्या खोऱ्यात सालईची झाडे मोठ्या प्रमाणात आहेत. अवर्षणप्रवण क्षेत्रात खुरटी झाडे आढळतात. मोकळ्या मैदानी भागात बोरीची

[११] महाबळे, टी. एस., **बॉटनी अँड फ्लोरा ऑफ महाराष्ट्र**, स्टेट गॅझेटिअर, (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८७), पृ. ३८८.

[१२] सावंत, सदाशिव यशवंत, **महाराष्ट्रातील दिव्य वनौषधी** (कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७४).

व बाभळीची झाडे सर्वत्र आढळतात. त्याशिवाय खैर, पळस, लेंडी, साजा, देवडा, मोईन व करवंद या प्रमुख वनस्पती जाती या जंगलात आहेत. तिखाई गवताचा उपयोग औषधी तेलाकरिता केला जातो. जिल्ह्यात उत्तर, ईशान्य व पूर्वेकडील पठारांच्या उतारांवर चांगली वने आहेत. त्यात मिश्र जातीची झाडे असून साग ही प्रमुख जात आहे. उत्तरेकडील सौम्य उतारावर व नदी खोऱ्यांच्या उतारावर चांगली वने असून दक्षिणेकडील प्रदेश मात्र वनहीन आहे. येथील जंगलात सागाशिवाय बिजेसाल, ऐन, तिवस, धावडा, लेंडी, मोह, मोवई इत्यादी झाडे आहेत. पठारांच्या सपाट पृष्ठभागी व त्यांच्या सौम्य उतारावर जंगले आढळत नाहीत. मागील काही वर्षांत स्थलांतरित शेती कसणारांनी शेतीसाठी फार जंगलतोड केली. क्षयन क्रियेमुळे जमीन पडीत व खडकाळ झालेली आहे. त्या ठिकाणी वनांची लागवड व संवर्धन करण्याची नितांत गरज आहे. येथील जंगलातून मौल्यवान सागाशिवाय विडी बनविण्यासाठी तेंदूची पाने, कुशल, घोनल, मुशान, मारवेल आणि शेडा जातींचे गवत प्राप्त होते.

उंचसखल व खडकाळ प्रदेशात गवताची बरीच कुरणे आहेत. काही ठिकाणी कुरणांसाठी सुधारित गवताची प्रक्षेत्रे शासनाने तयार केली आहेत. गवताचा दर्जा सुधारण्यासाठी संशोधन केंद्रे उघडली आहेत. या जिल्ह्यात गौळाऊ जातीची जनावरे आहेत. हेटी येथे पशुपैदास क्षेत्र स्थापन करण्यात आले आहे. हे स्थान नागपूर–अमरावती रस्त्याच्या दक्षिणेला व आर्वी तालुक्याच्या पूर्व सीमेलगत आहे. अनेक ग्रामीण कुटुंबे दुग्धोत्पादनात विशेष लक्ष देत असून लोणी व तूप तयार करतात. वर्धा–आर्वी मार्गावरील पिंपळखुटा हे गाव चांगल्या प्रतीच्या लोण्यासाठी प्रसिद्ध आहे. पशुखाद्य व हिरव्या वैरणीचा पुरवठा करण्यासाठी वैरण व खाद्य विकास कार्यक्रम राबविला जात आहे.

आर्वी, कारंजा, आष्टी, सेलू आणि समुद्रपूर तालुक्यांत उल्लेखनीय वनक्षेत्र आहे. उर्वरित तीन तालुक्यांत (देवळी, हिंगणघाट आणि वर्धा) वनक्षेत्राचा अभाव आहे. जिल्ह्यातील एकूण जंगलाचे क्षेत्रफळ अदमासे ८५८.०८७ चौ. कि. मी. आहे. त्यामध्ये ५२७.८८२ चौ. कि. मी. राखीव वनक्षेत्र व ३३०.२०५ चौ. कि. मी. संरक्षित वनक्षेत्र आहे. याशिवाय अवर्गीकृत वनक्षेत्र २७.८० चौ. कि. मी. आहे. वर्धा जिल्ह्यातील वनक्षेत्र एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या फक्त १४ टक्के आहे.[१३] ही बाब शोचनीय म्हणावी लागेल. वर्धा जिल्ह्यासाठी स्वतंत्र वन विभाग असून त्याच्या ताब्यात असलेल्या वनाचा तालुकानिहाय क्षेत्रफळाचा तपशील खाली दिला आहे.

तालुका		राखीव वन चौ. कि. मी.	संरक्षित वन चौ. कि. मी.	एकूण वनक्षेत्र चौ. कि. मी.
आर्वी	..	१८४.३९५	१०६.४१४	२९०.८०९
कारंजा	..	१८४.८२८	१४१.८९५	३२६.७२३
सेलू	..	११३.३५४	७०.०६८	१८३.४२२
समुद्रपूर	..	४५.३०५	११.८२८	५७.१३३
एकूण	..	५२७.८८२	३३०.२०५	८५८.०८७

[१३] विभागीय वन अधिकारी, वर्धा यांच्या माहितीप्रमाणे.

सागाची जंगले : जिल्ह्यात सागाची जंगले तीन प्रकारची आढळतात.

चांगल्या प्रतीची सागाची जंगले : ही जंगले आर्वी आणि हिंगणघाट वनक्षेत्रांत आढळतात. त्यांत साग वृक्षांशिवाय धावडा (Anogeissus latifolia), सालई (Boswellia serrata), तेंदू (Diospyros melanoxylon) आणि ऐन (Terminalia tomentosa), या जातीची झाडे आढळतात. येथील झाडांची सर्वसाधारण उंची १० ते १२ मीटर आणि झाडांचा सरासरी घेर ०.७ मीटर आढळतो. साग झाडांचा सरासरी घेर (girth) ०.९ मीटर आढळतो. तेथे बांबूची झाडे आढळत नाहीत. मात्र खैर (Acacia catechu), बोर (Zizyphus jujuba), पळस (Butea monosperma), जिलहिली (Woodfordia fruticosa) या प्रमुख झाडांच्या जाती आढळतात.

निकृष्ट प्रकारची साग जंगले : ही जंगले आर्वी, कारंजा आणि हिंगणी वनक्षेत्रांत आढळतात. ही चौथ्या दर्जाची जंगले असून झाडांची सरासरी उंची ११ मीटरपर्यंत आणि वाढलेल्या झाडांचा घेर सरासरी ०.६ मीटर आढळतो. सागाशिवाय धावडा (Anogeissus latifolia), लेंडी (Largerstroemia parviflora), सालई (Boswellia serrata), मोवई (Lannea grandis), ऐन (Terminalia tomentosa) इत्यादी वृक्ष आढळतात.

मिश्र जंगले : ही जंगले खडकाळ भागात विखुरलेली आढळतात. तेथे ऐन (Terminalia tomentosa), बेल (Aegle mermelos), कळंब (Mitragyna parcifolia), पळस (Butea monosperma), मोह (Madhuca latifolia), बेहेडा (Terminalia belerica) इत्यादी वृक्षांच्या जाती आढळतात.

इतर उपयुक्त वनस्पतींमध्ये तेंदू, कडई किंवा कुल्हा आणि उपयुक्त गवताचा समावेश होतो. आर्वी वनक्षेत्रामध्ये मोठमोठी कुरणे आहेत. गवताच्या प्रमुख जातींमध्ये कुसळ, घोनळ, मुशान, मारवेल आणि शेडा यांचा समावेश होतो. सालई आणि मोवई वृक्षांपासून संत्र्यांसाठी पेटारे तयार करतात, तर धावड्यापासून डिंक प्राप्त होतो.

नियोजित पद्धतीनुसार कुपातील झाडांची तोड करून तोडलेल्या सागवान व जळाऊ लाकडाचा जाहीर लिलाव करण्यात येतो. गवती कुरणे, तेंदू पाने व इतर गौण उत्पादनांचाही जाहीर लिलाव करण्यात येतो. त्यापासून शासनास मिळणारे महसुली उत्पन्न पुढीलप्रमाणे होते.

वर्ष	इमारती लाकूड		जळाऊ लाकूड		इतर मालाचे उत्पन्न (रुपये)
	उत्पादन घ. मी.	उत्पन्न रुपये	उत्पादन घ. मी.	उत्पन्न रुपये	
१९७५–७६	५,९८२	२९,७६,०००	२९,०३०	६,२२,०००	५,०८,०००
१९७७–७८	६,२००	३८,०६,०००	१५,७००	१६,३४,०००	८,५३,०००
१९७९–८०	८,४७०	५९,५५,०००	५५,५२७	२९,५८,०००	१०,५७,०००
१९८१–८२	९,९५३	१,८९,६०,००५	१८,३८२	६,८३,९१५	२१,३१,८६५
१९८३–८४	११,८६५	२,१८,६५,००५	४८,९८८	१५,८४,२००	११,८१,४९५

सामाजिक वनीकरण : या योजनेअंतर्गत जिल्ह्यात १९८७-८८ पर्यंत १८४ गावांत १,९८३ हेक्टर क्षेत्रात साग व सुबाभळीची लागवड झाली. किसान रोपवाटिका योजनेद्वारे शेतकऱ्यांकडून रोपे तयार करून जनतेला वितरित केली जातात. वर्धा, हिंगणघाट, चिकणी, दहेगाव, खरांगणा, आर्वी, आष्टी, कारंजा, जोगापूर आणि पुलगावला रोपवाटिका आहेत. त्यात सुबाभूळ, रेन-ट्री, शिसू, निलगिरी, पेल्टोफोरम, बांबू, गुलमोहर, अशोक ही झाडे तसेच फळझाडांची रोपे तयार करतात. शासनाने निकृष्ट प्रतीची जंगले सुधारण्यासाठी पडीत जमीन विकास कार्यक्रम सुरू केला आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळाने वर्धा येथे वन प्रकल्प विभाग १५ डिसेंबर १९८७ पासून सुरू केला.

प्राणीसृष्टी

वन्य प्राणी : जिल्ह्यातील जंगले लहान लहान भागात विखुरलेली असल्यामुळे वन्य प्राण्यांना पुरेसे संरक्षण मिळत नाही. उत्तरेकडील जंगलात आणि बोर अभयारण्यात चित्ते, रानटी मांजर, मुंगूस, कोल्हे, नीलगाय, अस्वले, सांबर, चितळ आणि रानटी डुक्कर इत्यादी वन्य प्राणी तसेच काळ्या तोंडाचे माकड लहान लहान कळपांत आढळतात. लाल तोंडाचे माकड या जिल्ह्यात आढळत नाही.

वन्य पक्षी : वन्य पक्ष्यांमध्ये हुमा, करक, मोर, तितीर हे पक्षी आढळतात.

बोर अभयारण्य : या अभयारण्याची स्थापना १९७० मध्ये करण्यात आली. त्याचे एकूण क्षेत्रफळ ६१.१० चौ. कि. मी. असून त्यापैकी २८.७३ चौ. कि. मी. संरक्षित आणि ३२.३७ चौ. कि. मी. राखीव वन आहे. या ठिकाणी चित्ता, नीलगाय, सांबर, चितळ, रान डुक्कर, अस्वल, जंगली कुत्रे, रान मांजर इत्यादी वन्य प्राणी व मोर पक्षी आढळतात. सन १९८३-८४ मध्ये झालेल्या वाघांच्या शिरगणतीनुसार जिल्ह्यातील जंगलात सहा चित्ते आणि दोन वाघ होते.

बोर धरण येथे हौसी पर्यटकांना राहण्यासाठी एक निवास कुटी आहे. या अभयारण्याच्या विकासासाठी १९८३-८४ पर्यंत १०,२३,१९० रुपये खर्च करण्यात आले.

मासे व मत्स्यव्यवसाय : वर्धा, वेणा आणि धाम या बारमाही वाहणाऱ्या नद्या असून जिल्ह्यातील नद्यांची एकूण लांबी ४३० कि. मी. आहे. त्याशिवाय बोर धरण, केळझर तलाव, नाचणगावचा देव तलाव, आर्वीचा सांगपूर तलाव, आष्टीचा कपिलेश्वर तलाव आणि पोथरा जलाशय हे प्रमुख जलसाठे आहेत. लहानमोठ्या तलावांची एकूण संख्या १०४ असून त्यांचे जलक्षेत्र ३,५०० हेक्टर आहे. हे तलाव ग्रामपंचायती, जिल्हा परिषद अथवा पाटबंधारे विभागाच्या मालकीचे आहेत. बहुसंख्य म्हणजे ६५ तलाव हंगामी व ३७ बारमाही असून त्यांचे जलक्षेत्र अनुक्रमे ७३० व १,०४० हेक्टर आहे. केवळ दोन तलाव मोठे असून त्यांचे जलक्षेत्र १,७०० हेक्टर आहे. जिल्ह्यातील माशांच्या जाती पुढीलप्रमाणे आहेत.

शास्त्रीय नाव	स्थानिक नाव
1. Carps and Barbs	
Family—Cyprinidae	
Chela atpar (Ham.)	बोंकांसो
Oxygaster clupeoides (Bl.)	चेला
Rasbora daniconius (Ham.)	कन्हेरी
Danio devario (Ham.)	डुब्री
Puntius ticto (Ham.)	करवडी
Puntius sophore (Ham.)	पतीहू
Puntius kolus (Sykes)	कोळशी
Puntius sarana (Ham.)	पोष्टी
Obsteobrama vigrosii (Sykes)	कोळी
Tor tor (Ham.)	वारीस
Cirrhinus reba (Ham.)	रेवळी
Labeo fimbriatus (Bl.)	तांबीर
Labeo calbasu (Ham.)	कानोशी
Labeo bata (Ham.)	बाटा, नबरी
Labeo boggut (Sykes)	गोहरीया
Labeo rohita (Ham.)	रोहू
Catla catla (Ham.)	कटला
2. Razor fishes	
Family—Notopteriade	
Notopterus notopterus (Pallas)	पातुळा
Notopterus chitala (Ham.)	चीतळ
3. Loaches	
Family—Cobitiidae	
Lepidocephalichthys guntea (Ham.)	गुरगुटेची
Noemacheilus botia (Ham.)	तेलीन
4. Catfishes	
Family—Siluridae	
Wallago attu (Schn.)	शीरडा, सरवडा
Ompak bimaculatus (Bl.)	गुंगा माची
Family—Saccobranchidae	
Heteropneustes fossilis (Bl.)	सिंघन

शास्त्रीय नाव	स्थानिक नाव
Family—Clariidae	
Clarias batrachus (L.)	वागूर
Family—Bagaridae	
Mystus aor (Ham.)	सिंघरी
Mystus seenghala (Sykes)	शींगटा
Family—Sisoridae	
Bagarius bagarius	बाढ

5. Eels

Family—Anguillidae	
Anguilla bengalensis (G and V.)	तेंबू मच्छी

6. Garfishes

Family—Belonidae	
Xenetodon cancila (Ham.)	चाचा मच्छी

7. Mullets

Family—Mugilidae	
Rhinomugil corsula (Ham.)	अरवरी, वारडोरी

8. Snake-heads or Murrels

Family—Ophocephalidae	
Channa striatus (Bl.)	ढोक
Channa marulius (Ham.)	फुल मुरेल
Channa gachua (Ham.)	बिलोना
Channa punctatus (Ham.)	बोटरी

9. Perches

Family—Nandidae	
Nandus nandus (Ham.)	डुक्कर मच्छी
Badis badis (Ham).	

10. Glassfishes

Family—Ambassidae	
Ambassis ranga (Ham.)	झंझाडी
Ambassis nama (Ham.)	चांदवा

शास्त्रीय नाव	स्थानिक नाव
11. Gobies	
Family—Gobiidae	
Glossogobius guiris (Ham.)	घसरा
12. Spiny eels	
Family—Mastocembelidae	
Mastocembelus pancalus (Ham.)	बाम
Mastocembelus armatus (Lac.)	वैर

जिल्ह्यात ५,००० मासेमारी करणारे लोक असून त्यापैकी १,५०० पूर्णवेळ मच्छीमार आहेत. कोळ्यांच्या पोटजातींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :– धोनियार, भोई, केवट, पालावर भोई, भनारी, मच्छिद्र, बेंदोरा, झिंगो भोई आणि बसतला.

बोर आणि केळझरला मत्स्यबीज निर्माण केंद्रे शासनाने सुरू केली आहेत. मत्स्य विकासाद्वारे मासेमारांचे आर्थिक जीवन सुधारण्यासाठी एक योजना आखण्यात आली असून तिला वर्धा योजना म्हणतात. त्यानुसार केळझर व बोर प्रक्षेत्रांची वाढ करून ग्रामपंचायतींच्या अखत्यारीतील तलावांची दुरुस्ती करण्यासाठी कर्ज देण्यात येते. मत्स्यबिजाचे गुणन करण्यासाठी आधारभूत बीज कलकत्याहून आणतात. सहकाराद्वारे विकास करण्यास्तव २१ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था निर्माण झाल्या आहेत. शासकीय सवलतींचा या संस्था लाभ उठवतात. तथापि त्यांच्या कार्याची व्याप्ती अथवा भांडवल अत्यल्प आहे.

तक्ता क्रमांक १

जिल्ह्यातील १८८८–८९ ते १८९३–९४ या वर्षांतील पर्जन्यमान

(पर्जन्यमान इंचात)

महिना	सरासरी	१८८८–८९	१८८९–९०	१८९०–९१	१८९१–९२	१८९२–९३	१८९३–९४
जून	७.००	६.२७	५.८३	५.३१	०.७६	४.२०	६.०४
जुलै	१५.००	१६.५३	१५.०४	१५.०६	२१.०६	१७.८४	९.०२
ऑगस्ट	७.००	३.८२	१२.२६	५.८५	४.१३	८.६१	१२.४४
सप्टेंबर	७.५०	३.२९	४.३६	९.०६	२०.९३	७.९४	६.०६
ऑक्टोबर	२.००	०.३७	६.०२	०.२३	०.८८	५.२७	४.३०
नोव्हेंबर	०.५०	२.४७	..	२.०१	..	०.०९	२.८४
डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी	१.००	..	..	१.७३	०.८३	२.५५	०.१३
वार्षिक	४०.००	३३.७३	४४.४५	४०.२३	४८.६५	५२.७४	४१.१०

आधार : रिपोर्ट ऑन दि लॅण्ड रेव्हेन्यू सेटलमेंट ऑफ वर्धा डिस्ट्रिक्ट, १८९१-९४, पृ. ९.

तक्ता क्रमांक २

जिल्ह्यातील पर्जन्यमान

(आकडे मि. मी. मध्ये)

	वर्धा					हिंगणघाट				
	१९६३	१९६७	१९७१	१९७८	१९८०	१९६३	१९६७	१९७१	१९७८	१९८०
जानेवारी ..	..	१०.४	४.४	०.२	९.२	..	..	..	५.३	२०.८
फेब्रुवारी ..	२२.०	..	१४.४	७०.८	७.२	१४.८	..	२.६	१८.६	१४.०
मार्च ..	११.०	६१.०	५.२	६५.८	..	१०.६	९४.३	१७.४	७.०	..
एप्रिल ..	३८.०	१०.४	१६.४	३३.२	९.८	४९.०	३.७	..	..	..
मे ..	२०.८	..	२०.२	..	..	३७.७	..	..	..	..
जून ..	२०६.४	१८१.५	३७१.०	१४४.८	२९०.६	१३५.५	१७२.३	३३४.५	२५८.४	२८३.०
जुलै ..	१५६.०	४१६.१	१५९.६	३६०.४	१८८.४	२४५.७	३३०.६	६७.८	५१७.२	२५०.४
ऑगस्ट ..	३८१.४	१२५.८	१४३.८	४४८.२	४३६.२	३८६.८	१३८.६	२२७.५	४४९.५	३७८.६
सप्टेंबर ..	७६.२	३९.२	१०५.८	५१.०	१०९.८	२०.५	६३.५	५२.८	७७.५	१०१.९
ऑक्टोबर ..	५८.०	२.१	२१५.४	४०.०	१४.०	७३.०	१२.२	७४.२	२३.१	..
नोव्हेंबर ..	..	..	..	५.८	..	..	..	..	३४.८	..
डिसेंबर ..	उ. ना.	१०९.९	..	८६.४	३२.६	उ. ना.	९७.०	..	८५.८	६७.८
वर्षातील एकूण ..	उ. ना.	९५६.४	१,०५६.२	१,३०६.६	१,०९७.८	उ. ना.	९१२.२	७७६.८	१,४७७.२	१,११६.५

तक्ता क्रमांक २–चालू

(आकडे मि. मी. मध्ये)

	आर्वी				
	१९६३	१९६७	१९७१	१९७८	१९८०
जानेवारी	..	..	..	..	५३.८
फेब्रुवारी	६.७	..	२.७	३६.०	७.०
मार्च	११.८	९८.२	१७.४	२९.६	..
एप्रिल	१३.७	..	..	३४.६	४.२
मे	..	..	२०.९	..	..
जून	२८७.४	२५७.४	२३५.४	१५९.०	२७१.२
जुलै	३०२.५	४४१.२	९३.६	३१९.०	२३७.०
ऑगस्ट	३०९.१	१३८.५	९२.१	४१५.८	५५३.२
सप्टेंबर	५९.२	९५.६	१४४.६	३१.२	६३.३
ऑक्टोबर	६५.४	५.२	४२.५	८.२	..
नोव्हेंबर	..	..	..	६९.२	..
डिसेंबर	..	१७३.६	..	७३.६	१६.३
वर्षातील एकूण	उ. ना.	१,२०९.७	६४९.२	१,१७६.२	१,२०६.०

तक्ता क्रमांक ३

प्रसामान्य आणि अतिविषम पर्जन्य (१९०१–१९५० मधील सरासरी)

(अ=सरासरी पर्जन्य मि. मी.; ब=२.५ मि. मी. पेक्षा अधिक पाऊस पडलेले सरासरी दिवस)

	वर्धा		हिंगणघाट		आर्वी		एकूण जिल्हा	
	अ	ब	अ	ब	अ	ब	अ	ब
जानेवारी	१२.५	०.९	१२.२	०.८	१२.९	१.०	१२.५	०.९
फेब्रुवारी	१८.८	१.३	१९.६	१.५	१७.०	१.१	१८.५	१.३
मार्च	११.४	१.१	१२.२	१.३	९.४	०.८	११.०	१.१
एप्रिल	१३.२	१.२	१२.९	१.१	९.९	०.७	१२.०	१.०
मे	१५.७	१.४	१५.५	१.५	१२.५	१.३	१४.६	१.४
जून	१९२.३	९.३	१८९.२	९.२	१८१.४	८.५	१८७.६	९.०
जुलै	३३७.८	१५.१	३८१.०	१६.०	३०४.८	१४.३	३४१.२	१५.१
ऑगस्ट	२३१.९	१२.०	२३९.५	१२.२	२१२.३	१०.८	२२७.९	११.७
सप्टेंबर	२१३.४	१०.३	१८१.४	९.५	१६५.३	९.३	१८६.७	९.७
ऑक्टोबर	५८.७	२.८	४८.३	२.७	४१.४	२.४	४९.५	२.६

तक्ता क्रमांक ३–चालू

	वर्धा		हिंगणघाट		आर्वी		एकूण जिल्हा	
	अ	ब	अ	ब	अ	ब	अ	ब
नोव्हेंबर	१९.८	१.१	२०.६	१.१	१९.३	१.१	१९.९	१.१
डिसेंबर	८.९	०.७	९.१	०.६	८.६	०.७	८.९	०.७
वार्षिक	१,१३४.४	५७.२	१,१४१.५	५७.५	९९४.८	५२.०	१,०९०.३	५५.६
कमाल वार्षिक पर्जन्याची प्रसामान्याशी टक्केवारी व वर्ष	१४२ (१९३३)		१५९ (१९३३)		१५८ (१९३१)		१५३ (१९३३)	
किमान वार्षिक पर्जन्याची प्रसामान्याशी टक्केवारी व वर्ष	४५ (१९२०)		४५ (१९२०)		५३ (१९५०)		४९ (१९२०)	
२४ तासातील जास्तीत जास्त पर्जन्य								
प्रमाण (मि. मी.)	२४१.३		३१२.९		२९०.८			
दिनांक	१९०५, सप्टेंबर ७		१९१३, जुलै १८		१९२७, जून १९			

आधार : मोसम विज्ञान अपर महानिदेशक, भारत सरकार, पुणे, यांनी पाठविलेली माहिती.

तक्ता क्रमांक ४

वार्षिक पर्जन्यमानाची वारंवारता (Frequency) (१९०१–१९५०)

कक्षा मि. मी.	वर्ष संख्या	कक्षा मि. मी.	वर्ष संख्या
५०१–६००	१	११०१–१२००	७
६०१–७००	१	१२०१–१३००	६
७०१–८००	४	१३०१–१४००	७
८०१–९००	३	१४०१–१५००	२
९०१–१०००	१४	१५०१–१६००	१
१००१–११००	३	१६०१–१७००	१

तक्ता क्रमांक ५

दैनिक तपमान आणि सापेक्ष आर्द्रता : अल्प कालावधीतील सरासरी (वर्धा वेधशाळा)

महिना	कमाल (से.)	किमान (से.)	कमाल तपमान		किमान तपमान		सापेक्ष आर्द्रता प्रमाणवेळ	
			से.	दिनांक	से.	दिनांक	०८–३० टक्के	१७–३० टक्के
जानेवारी ..	२९.३	१४.१	३४.४	८–१–१९७३	७.२	१६–१–१९६८	५०	३१
फेब्रुवारी ..	३३.१	१६.९	३९.८	२१–२–१९६७	१०.०	४–२–१९७९	३७	२२
मार्च ..	३६.९	२०.५	४२.८	२९–३–१९७२	११.८	१०–३–१९७९	३३	१८
एप्रिल ..	४१.०	२४.३	४६.४	२७–४–१९७३	१७.६	२०–४–१९६८	३०	१७
मे ..	४३.०	२६.८	४७.२	४–५–१९७३	२१.०	१९–५–१९७१	३३	२०
जून ..	३७.३	२५.६	४६.३	२–६–१९६८	२०.२	३०–६–१९७८	६४	४८
जुलै ..	३२.३	२३.८	४०.४	१२–७–१९६६	२०.२	१४–७–१९८१	७९	६७
ऑगस्ट ..	३०.७	२६.८	३७.६	३०–८–१९६९	१९.४	८–८–१९७४	८२	७१
सप्टेंबर ..	३२.१	२२.५	३६.८	१८–९–१९७४	१७.८	३०–९–१९६९	७७	६५
ऑक्टोबर ..	३३.६	१९.८	३७.५	२–१०–१९६६	१३.६	२६–१०–१९६८	५७	४१
नोव्हेंबर ..	३१.१	१५.९	३५.२	१–११–१९६९	९.०	३–११–१९६८	४९	३४
डिसेंबर ..	२८.९	१३.५	३३.०	१–१२–१९६७	७.४	१०–१२–१९८१	५१	३६
वार्षिक ..	३४.१	२०.९	..	..	..	..	५३	३९

आधार : मोसम विज्ञान अपर महानिदेशक, भारत सरकार, पुणे.

तक्ता क्रमांक ६

वर्धा येथील वाऱ्यांचा सरासरी वेग (कि. मी. दर तासी)

जानेवारी	फेब्रुवारी	मार्च	एप्रिल	मे	जून	जुलै	ऑगस्ट	सप्टेंबर	ऑक्टोबर	नोव्हेंबर	डिसेंबर	वार्षिक
५.२	४.९	६.३	७.०	९.६	१०.८	१०.६	९.६	७.४	५.४	५.५	५.१	७.३

प्रकरण २—इतिहास

वर्धा जिल्ह्याच्या प्रागितिहास कालाबाबत अद्याप सखोल संशोधन झालेले नसल्याने बऱ्याच बाबींवर प्रकाश पडणे बाकी राहिलेले आहे. तथापि मागील तीस वर्षांत बरेच संशोधन झाल्याने प्रागितिहास कालाबाबत बरीच माहिती उपलब्ध झालेली आहे. पवनार व इतर काही ठिकाणी उत्खनन केल्यानंतर पुरातत्त्वज्ञांनी ज्ञानात मोलाची भर घातलेली आहे. तरी वर्धा जिल्ह्याच्या प्राचीन काळाबरोबरच मध्ययुगीन काळावरदेखील अधिक संशोधन होण्याची आवश्यकता आहे. आज जे ज्ञात आहे त्यात बरीच भर पडण्याची गरज आहे. जिल्ह्याचा आधुनिक काळातील इतिहास उज्ज्वल आहे. खरे तर वर्धा-सेवाग्राम ही स्वातंत्र्य आंदोलन काळातील भारताची अशासकीय राजधानीच होती. भारताचे भवितव्य ठरविणारे बहुसंख्य निर्णय या परिसरात घेण्यात आलेले आहेत. स्वाभाविकपणेच या जिल्ह्याच्या इतिहासात आधुनिक काळाचा इतिहास विशेष खुलून दिसतो. जिल्ह्याच्या संपूर्ण इतिहासाचे पुढीलप्रमाणे कालखंड कल्पिले आहेत—(१) प्राचीन काळ[१], (२) मध्ययुगीन काळ[२] आणि (३) आधुनिक काळ[३].

प्राचीन काळ

पुराश्मयुग : दख्खनच्या पठारावर २,००० ते २,५०० फूट उंचीच्या पट्ट्यात मोठी अरण्ये असल्याने आदिमानवाने पुराश्मयुगात महाराष्ट्रात वस्ती केली नसावी असे पुरातत्त्वज्ञांनी अनुमान काढले होते.[४] पण नासिक, अकोला, पुणे इत्यादी ठिकाणी गेल्या अर्धशतकात करण्यात आलेल्या संशोधनाने हा समज खोटा ठरविला. दख्खनच्या सर्व पठारावर, कोकणासह, आदिमानवाने वस्ती केली असावी यात शंका नाही. नद्यांची पात्रे आतापेक्षा अधिक विस्तृत व उथळ होती. त्या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे नद्यांच्या पात्रात डोंगराच्या पायथ्यापासून मोठमोठे दगडगोटे वाहून आले होते. या अतिवृष्टीपूर्ण भूगर्भशास्त्रीय कालखंडाच्या शेवटी शेवटी त्यावर केवटचाचा थर निर्माण झाला. आजच्या काळात अगदी कोरडे हवामान व कमी पाऊस असलेल्या अहमदनगर व पुणे यासारख्या प्रदेशातील समकालीन जीवाश्मांचा (Fossils) पुरावा लक्षात घेतला तर महाराष्ट्रात त्या काळात रानटी बैल, हत्ती व गेंडे यासारख्या एरवी पाणथळ प्रदेशात आढळणाऱ्या प्राण्यांचा वावर होता असे दिसते. वरील जीवाश्मांच्या पुराव्यावरूनही पूर्व-पुराश्मयुगात (Early Palaeolithic Period) पर्जन्याचे प्रमाण जास्त होते या तर्कास दुजोरा मिळतो.

---

[१] **प्राचीन काळ** यावरील लेखन डॉ. अ. प्र. जामखेडकर, संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी केलेले आहे.

[२] **मध्ययुगीन काळ** यावरील लेखन डॉ. कि. का. चौधरी, कार्यकारी संपादक व सचिव, महाराष्ट्र गॅझेटिअर, यांचे आहे.

[३] **आधुनिक काळ** यावरीलही लेखन डॉ. कि. का. चौधरी यांनीच केलेले आहे.

[४] अश्मयुगातील महाराष्ट्र व विदर्भ याविषयीचे विवेचन मुख्यत: **प्रीहिस्टरी अँड प्रोटो-हिस्टरी ऑफ इंडिया अँड पाकिस्तान**, ह. धी. सांकलिया, द्वितीयावृत्ती, १९७४, यावर आधारित आहे.

वर्धा आणि वैनगंगा नद्यांच्या पात्रांत व काठावरील निक्षेपात गोट्यांची हत्यारे (Pebble Tools) तसेच उत्तर-अश्यूलियनसारख्या प्रगत तंत्राच्या टोकदार हातकुऱ्हाडी व फरशा (Hand Axes, Cleavers) यासारखी हत्यारे मिळतात. जवळच्या चंद्रपूर जिल्ह्यातील झरपट नदीच्या तीरावर, चंद्रपूर शहरापासून फार दूर नसलेल्या, पापामिया टेकडीजवळील प्रागितिहासिक स्थळात या विषयीचा महत्त्वाचा पुरावा सापडलेला आहे. येथे पूर्व-पुराश्मयुग, मध्य-पुराश्मयुग (Middle Palaeolithic) आणि नंतरच्या काळातील प्रागितिहासिक हत्यारे सापडली असून वर्धा खोऱ्यात अगदी प्राचीन काळापासून आदिमानवाने वस्ती केलेली होती असा पुरावा त्याद्वारे उपलब्ध झालेला आहे.

मध्य-पुराश्मयुगातील हवामान पूर्वीच्या कालखंडापेक्षा वेगळे होते. निसर्गाबरोबरच प्राणीही बदलले. या बदललेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी आदिमानवाने आपला शस्त्रसंभार बदलला. तो अजूनही अन्नाच्या शोधार्थ भटके आयुष्य व्यतीत करीत होता. पण त्याची हत्यारे बदलली. ती आता अधिक टणक, चर्ट आणि चाल्सिडनीसारख्या दगडाची, तंत्रदृष्टचा प्रगत आणि लहान आकाराची झाली. पापामिया टेकडीजवळील निक्षेपात तासण्या (Scrapers), वेधण्या (Borers) आणि लहान हातकुऱ्हाडी अशी हत्यारे मिळाली आहेत.

पापामिया टेकडीजवळील नदीकाठच्या निक्षेपातील अगदी वरच्या थरात चर्ट व चाल्सिडनीच्या टणक दगडाची पाती (Blades) सापडली. ही उत्तर-पुराश्मयुगातील की आंतर-अश्मयुगातील हे निश्चित करता येत नसले तरी त्यावरून पुराश्मयुगाच्या शेवटापासून ते नवाश्मयुगाच्या आरंभापर्यंत मानवाने वर्धा नदीच्या खोऱ्यात वस्ती केली हे लक्षात येते. पापामिया टेकडीजवळील पुरातत्त्व स्थळाइतका स्पष्ट पुरावा वर्धा जिल्ह्यात मिळालेला नसला तरी वर्धा नदीच्या वरच्या भागातील आदिमानवाचे आयुष्य कसे होते याची त्या पुराव्यावरून सहज कल्पना करता येते.

नवाश्मयुग-ताम्रपाषाणयुग : पुराश्म व आंतर-अश्मयुगानंतर एक महत्त्वाचे स्थित्यंतर घडून आले. त्याने मानवाच्या जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा ओलांडला. तो भटकंतीचे जीवन सोडून स्थायी जीवन कंठू लागला. अन्न गोळा करण्यापेक्षा त्याचे उत्पादन करणे अधिक सुखावह ठरल्याने पशुपालन व धान्यपिके काढण्यास सुरुवात केली. त्यासाठी उपयुक्त अशी हत्यारे अधिक परिश्रमपूर्वक व नव्या तंत्राने बनविली. या युगाचे दुसरे वैशिष्टच असे की, मानवाने मातकामाची कला अवगत करून मातीची भांडी आणि उपकरणे बनविण्यास सुरुवात केली. नवाश्मयुगात सुरू झालेल्या स्थायी जीवनातूनच पुढे नागरी संस्कृतीचा विकास झाला असल्याने हा टप्पा महत्त्वाचा मानला जातो. महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचा पाया निखळ नवाश्मयुगीन संस्कृतीच्या आधाराने घातलेला नसून त्यात ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा वाटा आहे. महाराष्ट्रातील शेतीचा पाया घालणाऱ्या या संस्कृतीला माळवा-जोर्वे संस्कृती असे नाव पुरातत्त्वज्ञांनी दिले असून त्या संस्कृतीची वैशिष्टचे नासिक, नेवासा, दायमाबाद (जि. अहमदनगर), चांडोली, सोनेगाव व इनामगाव (जि. पुणे) येथे सापडलेल्या त्या काळच्या अवशेषांवरून स्पष्ट झाली आहेत[५].

---

[५] सांकलिया, **प्रीहिस्टरी अँड प्रोटो-हिस्टरी ऑफ इंडिया अँड पाकिस्तान** ; शां. भा. देव, **पुरातत्त्व विद्या** ; शं. आ. साळी, **दायमाबाद** ; आणि म. के. ढवळीकर, **एक्सकॅवेशन्स अॅट इनामगाव**.

जोर्वे मृदभांड्यांचे वैशिष्टय असे की, तांबड्यालाल अथवा नारिंगी पृष्ठभागावर काळ्या रंगात भौमितिक नक्षीबरोबर प्राणी व पक्ष्यांचे चित्रण असते. ही माळवा संस्कृतीची मृदभांडी म्हणून ओळखली जातात. या भांड्यातील काही आकारांवरून त्या संस्कृतीचा संबंध पश्चिम आशियातील, विशेषत: इराणमधील, सियाल्क संस्कृतीशी जोडला जातो. मध्य प्रदेशातील नावडातोडी येथे या संस्कृतीचा प्रातिनिधिक पुरावा मिळतो. घराच्या भिंती कुडाच्या व घरे चौकोनी व गोल होती. दगडाच्या पात्यापासून शस्त्रे बनविण्याची कला त्यांना अवगत होती. तसेच तांब्याचा वापर माहीत असून त्यापासून कुऱ्हाडी व तलवारी करीत. ते गहू, वाल, वाटाणे या धान्यांची पिके घेत. या माळवा संस्कृतीचा प्रसार मुख्यत्वे गुजरात व महाराष्ट्रात झाला. दायमाबाद, .नेवासा व इनामगाव या ठिकाणी जोर्वे-पूर्व स्तरात (इ. स. पू. १६००–१४००) या संस्कृतीचा पुरावा मिळाला.

ताम्रपाषाणयुगात, माळवा संस्कृतीच्या कालखंडानंतर, संस्कृतीच्या आकृतिबंधात फरक पडला नाही; पण थोडा गुणात्मक फरक पडला. माळवा मृदभांड्यांऐवजी जोर्वे प्रकारची मृदभांडी प्रचारात आली. ही माळवा मृदभांड्यापेक्षा वेगवान चाकावर तयार केली असून त्यांच्या मातीचा कस उत्तम असल्याने परिणामत: अधिक टणक व कणखर होती. तांबड्या पृष्ठभागावर काळ्या रंगात भौमितिक नक्षीचे चित्रण असे. त्यावर कधी कधी आकृती कोरल्या जात. शेती व पशुपालन व्यवसाय पूर्वीच्या कालखंडाप्रमाणेच असले तरी त्यात गुणात्मक फरक पडलेला दिसतो. तसेच उपकरणांमध्येही बदल झाला. तांब्याच्या चपट्या कुऱ्हाडी व छिन्न्या आणि कठीण दगडांच्या पात्याबरोबरच नवाश्मयुगीन दगडी कुऱ्हाडींचाही वापर ते करीत. त्यांचे तांबकाम करण्याचे कसब तांब्याचे मणी करण्याइतपत प्रगत झाले होते.

इ. स. पू. १४००–१००० या कालखंडात इनामगाव येथे उत्कर्षाची अवस्था होती, तर नंतरच्या काळात (इ. स. पू. १०००–७००) ती विलयावस्थेकडे झुकू लागली. समृद्धीच्या काळात खरीप आणि रबी या दोन्ही हंगामात पिके घेतली असल्याचा पुरावा असून जव, गहू, तांदूळ व ज्वारीव्यतिरिक्त कुळीथ, वाटाणा, तूर आणि हरभरा ही कडधान्ये पिकविली जात. गव्हाचे पीक कदाचित या काळात पाटाच्या पाण्यावर घेत असावेत असा पुरावा मिळाला आहे. या समृद्धावस्थेचा दुसरा भाग असा दिसतो की, अधिकाऱ्यांची घरे गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी असून कामगारवर्गाची घरे गावाच्या वेशीवर होती. कुंभाराचा आवा व घडाईच्या ठिकाणावरून कुंभाराच्या व मणिकाराच्या तसेच सोनाराच्या घरांचा पत्ता लागतो. सधन घरांतून कणग्या, स्वयंपाकघर ही ठिकाणे वेगळी दाखवता येतात. घरे मोठी व आयताकार होती. कामगारांची घरे गोलाकृती होती.

वरील प्रकारच्या समृद्ध जीवनाची पातळी मात्र इनामगाव येथील जोर्वे कालखंडाच्या उत्तर काळात (इ. स. पू. १०००–७००) टिकली नाही असे दिसते. शाकाहाराबरोबरच लोक शेळ्या-मेंढ्यांचे मांस आणि मासे यांच्यावर उपजीविका करीत असत. उत्तर काळात मात्र रानटी व पाळीव पशूंच्या मांसावर गुजराण करण्याची त्यांच्यावर पाळी आली. पाळीव पशूंच्या यादीत बैल, शेळ्या, मेंढ्या व गायीचा मुख्यत्वे समावेश होता. उत्तर काळामध्ये पावसाचे प्रमाण कमी झाल्याने व दुष्काळाच्या परिस्थितीमुळे शेती किफायतशीर न राहिल्याने शिकार करूनच गुजराण करण्याची पाळी आली.

विदर्भामध्ये माळवा-जोर्वे संस्कृतीचा ठोस पुरावा अद्याप मिळालेला नाही. अशा प्रकारची संस्कृती कदाचित वऱ्हाडात असावी असा अंदाज तुळजापूर गढी (जि. अकोला) येथील पांढरीच्या टेकाडावर मिळालेल्या जोर्वे-सदृश, तांबड्या पृष्ठभूमीवर काळ्या रंगात चित्रण असलेल्या, खापरांवरून विद्वानांनी काढलेला आहे. तसेच विदर्भातील सर्वांत प्राचीन शहर कौंडिण्यपूर येथील तत्सम खापरांचाही काळ निश्चित ठरविता आलेला नाही. उत्खनकांच्या मते तो इ. स. पू. २००० इतका असावा. कदाचित ही खापरे जोर्वे-सदृश असल्यानेही असा निष्कर्ष काढला असण्याची शक्यता आहे. नुकत्याच अर्णी येथे झालेल्या पांढरीच्या तसेच खैरवाडा (जि. वर्धा), टाकळघाट, भागीमहारी आणि नैकुंड (जि. नागपूर) येथील उत्खननांतील पुराव्यावरून, तसेच मांढळ आणि अडम (ता. कुही) येथील उत्खननात प्राप्त झालेल्या नवाश्मयुगीन दगडी कुऱ्हाडीवरून असे दिसते की, विदर्भातील बृहदश्मयुगीन संस्कृतीच्या मुळाशी जोर्वे अथवा तत्सम नवाश्मयुग-ताम्रपाषाणयुगाचे प्रतिनिधित्व करणारी शेतीप्रधान संस्कृती असावी.

बृहदश्मयुगीन संस्कृती : जोर्वे संस्कृतीच्या उत्तरकालात (इ. स. पू. १०००–७००) ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा ऱ्हास झाला व लोकांवर शेतीचा त्याग करून शिकारीवर गुजराण करण्याची पाळी आल्याचा वर उल्लेख केला आहे. बृहदश्मांचा आढळ व तत्कालीन वसतिस्थानांची टेकाडे व त्यांचे उत्खनन याबाबतचा पुरावा मात्र विदर्भात (विशेषत: नागपूर, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यांत) मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झालेला आहे. वर्धा जिल्ह्यातील खैरवाडा (ता. आर्वी) येथे मोठ्या संख्येने (सुमारे १,४००) शिळावर्तुळे सापडली असून, पवनार येथील उत्खननात इतिहासपूर्वकालीन स्तरांमध्ये मिळणारा पुरावा बृहदश्मयुगाशी संबंधित आहे याविषयी तज्ज्ञांच्या मनात संदेह नाही.

बृहदश्मयुगातील बहुतांश अवशेष हे विदर्भात (महाराष्ट्रातील ८३ स्थळांपैकी ७२) व विशेषत: नागपूर, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यांत असल्याने या सर्व स्थळांतील पुरावा लक्षात घेऊनच बृहदश्मयुगीन संस्कृतीचे चित्र थोडक्यात यापुढे मांडले आहे. हे चित्र मुख्यत्वे टाकळघाट, नैकुंड, भागीमहारी (जि. नागपूर) व खैरवाडा (जि. वर्धा) येथील पांढरीच्या टेकाडांवर झालेल्या व माहुरझरी, खापा, जुनापानी, बोरगाव (जि. नागपूर) व खैरवाडा येथील बृहदश्मांच्या उत्खननातील उपलब्धीवर आधारलेले आहे.

नागपूर, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यांत बृहदश्मे (Megalith) मोठ्या प्रमाणावर आढळतात याचा वर उल्लेख केला आहेच. तेथे मँगनीज व लोखंडाची खनिजे आणि कोळसा मोठ्या प्रमाणावर सापडतो हा योगायोग नव्हे. या संदर्भात हेही नमूद करणे आवश्यक आहे की, बृहदश्मयुगात शेतीप्रधान संस्कृतीला थोडी माघार घ्यावी लागली असली तरी लोह गाळण्याचे तंत्रज्ञान मानवाने आत्मसात केले. नैकुंड येथे डेक्कन कॉलेज व राज्य पुरातत्त्व विभागाने केलेल्या उत्खननातील सर्वांत महत्त्वाची निष्पत्ती म्हणजे तेथे सापडलेल्या लोहमृत्तिकेपासून लोखंड गाळण्यासाठी तयार केलेल्या भट्ट्या. यांचा काळ इ. स. पू. सातवे शतक असून भारतात लोखंड गाळण्याचा हाच पहिला प्रत्यक्ष पुरावा आहे.

लोखंडाची शस्त्रे, हत्यारे व दैनंदिन उपयोगाची अवजारे यांचा यात समावेश असून शेतीची अवजारे फारच कमी आहेत. त्यामुळे वरील चार ठिकाणच्या उत्खननातून गहू, जव, उडीद, तूर, वाटाणा यांचा पुरावा मिळालेला असला तरी बृहदश्मयुगीन मानवाच्या

आहारातील शाकाहाराचे प्रमाण बरेच कमी असावे. पूरक आहार म्हणून पाळीव व जंगली प्राण्यांचे मांस आहारात असले पाहिजे हे गाय, बैल, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व डुकरांच्या मोठ्या प्रमाणात सापडणाऱ्या हाडांवरून सिद्ध होते. वसतिस्थळांच्या उत्खननात सापडलेल्या तांब्याच्या गळावरून मासेदेखील आहारात होते असे दिसते.

बृहदश्मयुगीन संस्कृती ही मुख्यत्वे धातूंचे कसब जाणणाऱ्या लोकांची संस्कृती होती. टाकळघाट, माहुरझरी व नैकुंड येथे सापडलेल्या वस्तूंमधील लोखंडाची शुद्धता फार वरच्या प्रतीची आहे (अनुक्रमे ९९.६ टक्के, ९९.१ टक्के व ९८.२ टक्के). नैकुंड येथील भट्टीच्या अभ्यासावरून असा निष्कर्ष निघाला आहे की, प्रत्येक भट्टीवाला प्रत्येक भट्टीतून १० ते १२ कि. ग्रॅ. लोहमृत्तिकेपासून ३ कि. ग्रॅ. पर्यंत लोखंड दररोज गाळत असावा. या कारागिरांचे धातुकामातील कसबसुद्धा उच्च प्रतीचे असले पाहिजे. लोखंडी वस्तूबरोबरच तांब्याची व काशाची गृहोपयोगी उपकरणे व अलंकार मोठ्या प्रमाणात आढळून आले आहेत. अत्यंत पातळ पत्र्यापासून बनविलेले डबे, झाकण्या व निरनिराळ्या आकाराच्या घंटांवरून त्यांच्या कसबाची कल्पना येते. एक चंबू दोन भागात बनविलेला असून जोडाच्या ठिकाणी बसविलेले खिळे (Rivets) स्थूल दृष्टिक्षेपात लक्षात येत नाहीत इतके बेमालूमपणे बसविले आहेत. एका लहान तलवारीची मूठ काशाची, तर पाते लोखंडाचे आहे. काही वेगळ्या आकाराची सोन्याची कर्णभूषणेसुद्धा आढळली. यावरून क्वचित प्रसंगी धातू जरी आयात केलेला असला तरी कारागिरी स्थानिक असून चांगल्या प्रतीची होती असे दिसते.

विदर्भाच्या बृहदश्मात मानवी सांगाडे अथवा अस्थिसंचय सुस्थितीत मिळालेले नाहीत. त्यामुळे वंशदृष्टचा ते कोणत्या गटात मोडतात याविषयीचे निष्कर्ष निर्दोष असणे कठीण आहे. माहुरझरीच्या सुमारे २१ सांगाड्यांच्या आधारावर काही निष्कर्ष काढलेले आहेत, पण त्यांच्या मर्यादा आहेत.

इतिहासाच्या परिभाषेत भारतीय संदर्भात ताम्रपाषाणयुग व बृहदश्मयुग ही युगे इतिहासाच्या संधिकाळात (Proto-History) मोडतात. या कालासंबंधी लिखित पुरावा उपलब्ध नसला तरी तत्कालीन मौखिक परंपरेने आलेल्या वाङ्मयातून तसेच सांप्रतच्या आदिवासी जमातींच्या पुराणकथांतून इतिहासाच्या पुनर्रचनेचे दुवे मिळण्याची शक्यता आहे.

पूर्व-इतिहास काल : अशोकाच्या धर्ममहामात्राच्या देवटेक येथील शिलालेखाबरोबरच इतरही पुरातत्त्वीय पुरावा महत्त्वाचा आहे. पौनी (जि. भंडारा) येथे उत्खननात सापडलेल्या स्तूपांपैकी मोठा स्तूप हा निश्चितपणे मौर्यकाळात बांधला गेला होता. त्या काळातील उत्तर भारताशी असलेल्या संपर्काची आणखी एक निशाणी म्हणजे विदर्भात निरनिराळ्या ठिकाणी सापडणारी आहत नाणी (punch-marked coins). भंडाऱ्याव्यतिरिक्त अशी नाणी वर्धा जिल्ह्यात हिंगणघाट व पवनारला सापडली.[६] अशोकानंतरच्या कालातही विदर्भ मौर्य साम्राज्याचा एक भाग होता याविषयी अभिलेखविषयक पुरावा नसला तरी **मालविकाग्निमित्र** या नाटकातील घटनांचे वर्णन पाहता विदर्भातील राजांचा पाटलीपुत्राच्या राजकारणात सहभाग होता असे दिसते. विदर्भराज यज्ञसेन अग्निमित्राची व पर्यायाने पुष्यमित्राची सत्ता जुमानत नव्हता. त्याचा चुलत भाऊ माधवसेन याची बाजू

[६] दीक्षित, मो. गं., **मध्यप्रदेश के पुरातत्व की रूपरेखा**, पृ. ४३–४४.

घेऊन अग्निमित्राने आपली सेना विदर्भात पाठविली आणि यज्ञसेनाचा पराभव केला. पराभवानंतर झालेल्या समझोत्याप्रमाणे विदर्भाचे "वरदा" नदी ही विभाजक सीमा धरून दोन भाग करण्यात आले.

सातवाहन काल : उत्तरेतील मौर्योत्तर राजघराण्यांचा अस्त झाल्यानंतर सातवाहनांनी दख्खनमध्ये आपली सत्ता प्रस्थापित केली, हे सर्वमान्य असले तरी ती नेमकी केव्हा केली याविषयी एकमत नाही. सातवाहनांनी आपला राज्यकाल विशिष्ट शकात दिलेला नसल्याने तसेच खारवेल-सातवाहन, शुंग-सातवाहन यांचे परस्पर संबंध व त्यांचे राज्यकाल आणि नासिक-औरंगाबाद या ठिकाणच्या प्राचीन गुंफा यांच्या कालनिश्चितीविषयी पुरावा उपलब्ध नसल्याने अनिश्चिती कायम राहिली आहे. **पुराणां**मधून या राजवंशाच्या राजांची यादी त्यांच्या राज्यकालासह आढळते. पण त्यातही दोन परंपरा असल्याने या प्रश्नांची उकल होण्याऐवजी उपप्रश्न वाढले आहेत. स्थूलमानाने म्हणता येईल की, इ. स. च्या दुसऱ्या शतकाच्या सुरुवातीपासून ते तिसऱ्या शतकाच्या प्रथमार्धापर्यंत उत्तरकालीन सातवाहनांनी दख्खनवर राज्य केले. पूर्वकालातील सातवाहनांचा प्रारंभ इ. स. पूर्व २५० च्या सुमारास अथवा इ. स. पूर्वीच्या दुसऱ्या शतकाच्या शेवटी (म्हणजे इ. स. पू. ११० च्या सुमारास) झाला असे म्हणता येईल. सातवाहन राजे स्वतःला "त्रिसमुद्रतोयपीतवाहन" (ज्यांच्या अश्वांनी तिन्ही समुद्रांचे पाणी चाखले आहे) असे म्हणत असत. त्यामुळे ते सकल दक्षिणापथाचे अधिपती असले तरी त्यांच्या तीन-चारशे वर्षांच्या काळात सर्व दक्षिणापथावर त्यांची अधिसत्ता निर्विवाद होती असे मानणे चुकीचे ठरेल. विलिवायकुरासारखे त्यांच्याच वंशाच्या शाखेचे अथवा स्थानिक राजघराणी सातवाहनांची अधिसत्ता मान्य करून राज्य करीत असावीत यात शंका नाही. भंडारा जिल्ह्यातील पौनी येथे इ. स. च्या प्रथम शतकात राज्य करणारा भारवंशी भगदत्त हा स्वतंत्रपणे राज्य करीत असला पाहिजे.[७]

सातवाहन राजकुलाची माहिती पुढील गृहीतकृत्ये धरून देण्यात आली आहे :— (१) खारवेलचा काल इ. स. पू. सुमारे १५० ; (२) नहपानाने उल्लेखिलेला संवत हा शक संवत आहे ; (३) नाण्यावर अथवा शिलालेखात सातवाहन राजांच्या नावात आढळणारे शिवश्री हे पद सन्मानदर्शक आहे, ते लावल्याने राजाचे नाव वेगळे होत नाही आणि (४) मोठी वंशावळ ही अधिक सयुक्तिक असून सातवाहनांची कारकीर्द इ. स. पू. च्या तिसऱ्या शतकात सुरू झाली असावी.[८]

सातवाहनांच्या पूर्व-इतिहासाच्या माहितीच्या दृष्टीने नाणेघाट येथील नागनिकेचा व इतर शिलालेख फार महत्त्वाचे आहेत. त्यात बरीच महत्त्वपूर्ण माहिती मिळते. या शिलालेखांबरोबरच राजघराण्यातील महत्त्वाच्या व्यक्तींचे पुतळे गुंफेत कोरण्यात आलेले होते व ते पुतळे ज्यांचे होते त्यांची नावे कोरलेली होती. त्यावरून घराण्याचा संस्थापक सिमुक (शिमुक अथवा श्रीमुख) सातवाहन, सातकर्णी व त्याची राणी नागनिका यांचे उल्लेख मिळतात. पुराणातसुद्धा सिंधुक/सिमुक सातवाहन हाच घराण्याचा मूळ पुरुष असल्याचा उल्लेख आहे. प्रसिद्ध राजा सातकर्णी हा त्याचाच पुत्र होता.

---

[७] मिराशी, वा. वि., **सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास**, प्रस्ता., पृ. १९

[८] कित्ता, प्रस्ता., पृ. २३, ५०–५७, व ७५–९८.

अगदी प्रारंभापासूनच सातवाहन कुलाचा विदर्भावर अंमल होता. त्यामुळेच सातकर्णी क्तिश्री आणि दुसरा सातकर्णी यांची नाणी महाराष्ट्राबाहेर जबलपूर व माळवा भागात पडली तर आश्चर्य नाही.[९] सातवाहनांच्या वंशावळीतील सातकर्णीनंतरचे दुसरे हत्त्वाचे राजे म्हणजे आपीलक आणि मेघस्वाती होत. त्यापैकी आपीलकाचे नाणे बिलासपूर जल्ह्यातील बालपूर येथे सापडले असून मेघस्वातीचे नाणे आंध्र प्रदेशात मिळाले आहे[१०].

हाल हा त्यानंतरच्या काळातला सातवाहन कुलातला प्रसिद्ध राजा. त्याच्या रसिकत्वाने वाङ्मयप्रेमामुळे संस्कृत-प्राकृत वाङ्मयात त्याला अजरामर स्थान प्राप्त झालेले असून नेक आख्यायिकांचा तो नायक आहे. **लीलावई** नावाचे आठव्या शतकातील काव्य त्याच्या रित्राभोवतीच गुंफले आहे. हालाची **गाथासप्तशती** प्रसिद्ध असून भारतातील जनजीवनावर आधारित काव्यसंग्रहाचा तो आद्य नमुना मानला जातो. आश्चर्याची गोष्ट अशी की, त्याचा शिलालेख अथवा नाणे अद्यापही मिळाले नाही, आणि असे असताही त्याचा या आढाव्यात उल्लेख करणे आवश्यक आहे. पुराणांतील यादीप्रमाणे मेघस्वाती आणि गौतमीपुत्र सातकर्णी या दरम्यानच्या काळात हालव्यतिरिक्त अनेक राजे होऊन गेले. आणि विद्वानांच्या मते शकांच्या आक्रमणामुळे सातवाहन वंशाला वाईट काळ आला. त्यांच्या ताब्यातील कोकण व उत्तर महाराष्ट्रातील मोठ्या प्रदेशावरचा त्यांना ताबा सोडावा लागला व जुन्नरहून राजधानीचे स्थलांतर पैठणला करावे लागले. पण दुरावस्थेतून वंशाचा उद्धार गौतमीपुत्र सातकर्णीने केला. हा राजा दुसऱ्या शतकाच्या प्रारंभी झाला असावा याबद्दल सर्वसाधारणपणे एकमत आहे.

नासिकच्या क्रमांक तीनच्या गुंफेतील शिलालेखावरून स्पष्ट होते की, गौतमीपुत्राचा विदर्भावर अंमल होता. या लेखात त्याला बेनाकटकस्वामी (वेण्याकटक म्हणजे वैनगंगा नदीच्या तीरावरील प्रदेश) म्हटले आहे. वर्धा जिल्ह्याचा त्याच्या साम्राज्यात अंतर्भाव होता यात शंका नाही.

गौतमीपुत्रानंतर त्याचा पुत्र वासिष्ठीपुत्र पुळुमावी (इ. स. १३२–१६०) याने चोवीस वर्षे राज्य केले. पुळुमावीनंतर स्कंद आणि वासिष्ठीपुत्र सातकर्णी यांच्यात सातवाहन साम्राज्याची विभागणी होऊन पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक, विदर्भ या प्रदेशावर वासिष्ठीपुत्राने व स्कंद सातकर्णीने आंध्र प्रदेशावर राज्य केल्याचे दिसते. पुळुमावी व स्कंद सातकर्णीच्या चांदीच्या नाण्यांवर मुखवटा कोरलेला असून ती आंध्र प्रदेशात मिळाली आहेत. वासिष्ठीपुत्र सातकर्णीनंतर यज्ञ सातकर्णी राज्यावर आला. त्याचे कोरीव लेख नासिक व कान्हेरी येथे आणि आंध्र प्रदेशातील कृष्णा जिल्ह्यात सापडले आहेत. यज्ञ सातकर्णीची शिडाच्या जहाजाचे मागील भागावर चित्रण असलेली नाणी सापडली आहेत. सागरी व्यापाराला सातवाहनांनी दिलेले महत्त्व त्यावरून लक्षात येते. यज्ञ सातकर्णीनंतर माढरीपुत्र शकसेन राज्यावर आला. अकोला जिल्ह्यातील तऱ्हाळा येथील नाणेनिधीत त्याचा शक सातकर्णी म्हणून उल्लेख आहे. त्याचे विदर्भ व आंध्र प्रदेशावर वर्चस्व होते. माढरीपुत्रानंतर सातवाहनांची महाराष्ट्रातील व पर्यायाने विदर्भातील सत्ता संपुष्टात आली.

[९] **कित्ता, प्रस्ता.**, पृ. २२–२३ **व** ७७–८२.

[१०] **कित्ता, प्रस्ता.**, पृ. २३.

वाकाटक वंश : महाभारत महाकाव्यात उल्लेखिलेला कुंडिनपूर येथे राज्य करणारा दमयंतीचा पिता, तसेच रुक्मिणीचा पिता भीष्मक व **मालविकाग्निमित्र** नाटकात उल्लेखिलेले विदर्भराज माधवसेन व यज्ञसेन खरोखरीच होऊन गेले असे मानले तरी खऱ्या अर्थाने ऐतिहासिक म्हणता येईल असा विदर्भातील पहिला राजवंश वाकाटकांचा म्हणता येईल.[११] या राजवंशाचे ताम्रपट विदर्भ तसेच उत्तर व पूर्वेस लागून असलेल्या मध्यप्रदेशातील जिल्ह्यांत मिळाले असून त्यांची सत्ता याच भागात असावी हे मान्य करता येते. त्यांच्या ताम्रपटांमधील कालनिर्देशावरून मात्र या राजवंशाने व त्यातील राजांनी नेमके कोणत्या शतकात अथवा वर्षात राज्य केले याची कल्पना करता येत नाही. कारण कालनिर्देश (सातवाहन राजांप्रमाणेच) प्रत्येकाचे राज्यवर्ष देतो. ताम्रपटात प्रत्येक राजाचे दुसऱ्याशी नाते दिले असले तरी त्यामुळे अनुक्रम कळतो. राज्यकालनिर्देशामुळे प्रत्येकाने कमीत कमी किती काळ राज्य केले ते कळते. पण वंशाने एकूण किती वर्षे राज्य केले ते कळत नाही. तसेच शक अथवा विक्रम संवत् यांचा उल्लेख नसल्याने[१२] निश्चित काळ कळत नाही. त्यामुळेच काही काळपर्यंत वाकाटक वंशाचा कालखंड आठव्या शतकाइतका उशीरा गणला गेला. मात्र रुद्रसेनाची महाराणी प्रभावती गुप्ता ही गुप्तराजवंशातील चंद्रगुप्त द्वितीय (इ. स. ३८५–४१५) याची कन्या होती हा उल्लेख प्राप्त झाल्यानंतर तसेच प्रथम पृथ्वीषेणाच्या 'वर्षशतमभिवर्धमानकोशदण्डसाधनसन्तानपुत्रपौत्रिण:' या उल्लेखावरून त्याच्या काळात वाकाटकांच्या सत्तेला १०० वर्षे पूर्ण झाली असावीत असे दिसते.[१३] सातवाहनांच्या अस्तानंतर वाकाटकांची सत्ता प्रस्थापित झाली असे मानले तर प्रथम विन्ध्यशक्ती (२५०–२७०), प्रथम प्रवरसेन (इ. स. २७०–३३०), गौतमीपुत्र व प्रथम रुद्रसेन (इ. स. ३३०–३५०) हे वाकाटक राजकुलातील चार पुरुष १०० वर्षांच्या काळात होऊन गेले असे दिसते. त्यानंतर झालेल्या प्रथम पृथ्वीषेणाच्या काळातीलही लेख आज उपलब्ध नाहीत. अपवाद फक्त प्रथम रुद्रसेनचा. देवटेक (जिल्हा चंद्रपूर) येथील त्याचा शिलालेख हा वाकाटकांचा पहिला उपलब्ध शिलालेख आहे.

त्यांच्या वंशजांच्या ताम्रपटावरून प्रथम प्रवरसेनाची माहिती मिळते ती अशी. वाकाटक हे जन्माने ब्राह्मण असून त्यांचे गोत्र विष्णुवृद्ध होते. प्रवरसेनाने अनेक यज्ञयाग केले ते मुख्यत्वे जास्त प्रतिष्ठित स्वरूपाचे म्हणजे सोमयागाच्या प्रकारातील होते. त्याव्यतिरिक्त त्याने चार अश्वमेध यागही केले. ते मुख्यत्वे आपले सार्वभौमत्व दर्शविण्यासाठीच होते. पुष्यमित्र शुंगाने पुनरुज्जीवित केलेल्या या यागाचरणाला प्रवरसेनाने उजाळा दिलेला दिसतो. पुराणांमध्येही त्याने वाजपेय इत्यादी याग केले व पुरिका आणि चनका येथे ६०

---

[११] कित्ता, पृ. १४६–५५. प्रा. मिराशी यांच्या मते हा मान मुंड राजवंशाला जाईल. त्यांच्या मते सातवाहनांच्या अस्तानंतर जवळजवळ ४० वर्षे अकोला जिल्ह्याच्या आसपास त्यांनी राज्य केले असावे. पण हा वंश वाकाटकानंतर उदयास आला असावा असे मानण्यास जागा आहे. प्रा. मिराशींनी पूर्वी अशाच प्रकारचे मत व्यक्त केले होते. (पहा वि. प्र. रोडे, "आदित्यराजाचा अचलपूर ताम्रपट," **विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक,** १९७४, पृ. १३९–१४४.)

[१२] अपवाद म्हणजे वत्सगुल्म शाखेच्या श्रीदेवसेनाचा काल शक संवतात दिलेला आढळतो त्या हिस्सेबोराला शिलालेखावरून तो शक संवत ३९० मध्ये राज्य करीत होता असे दिसते.

[१३] मिराशी, **वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ,** पृ. ३९; १९३–२०२.

वर्षे राज्य केल्याचा उल्लेख आहे.[१४] त्याने वाजपेय याग केला असल्यानेच त्याचा उल्लेख सम्राट म्हणून केला आहे. हा याग फार महत्त्वाचा व क्षत्रियांनी करावयाच्या राजसूय यागाच्या तोडीचा समजला जातो. प्रथम प्रवरसेनाचे ताम्रपट अथवा शिलालेख उपलब्ध नाहीत. पण पुरिका या त्याच्या राजधानीच्या उल्लेखावरून तो विन्ध्याच्या दक्षिणेस राज्य करीत असावा.

प्रवरसेनानंतर रुद्रसेन (इ. स. ३३०–३५०) राज्यावर आला. त्याचा देवटेक येथील शिलालेख अपेक्षेप्रमाणे चौथ्या शतकातील पेटिकाशीर्ष लिपीत असून रुद्रसेन राजाच्या धर्मस्थानाविषयी त्यात उल्लेख आहे. हे देवालय शिवाचे असावे असा प्रा. मिराशींचा तर्क आहे. या शिलालेखामुळे रुद्रसेनाच्या वाटयास आलेला भाग चंद्रपूरच्या आसपास असावा असे दिसते.[१५]

त्याच्यानंतर त्याचा पुत्र प्रथम पृथ्वीषेण (इ. स. ३५०–४००) राज्यावर आला. तो गुणसंपन्न व धार्मिक प्रवृत्तीचा असल्याने त्याच्या दीर्घकालीन राज्यकाळात विदर्भात समृद्धी व शांतता नांदत असावी असे दिसते. समकालीन गुप्त सम्राटाशी विशेषतः चंद्रगुप्त द्वितीय याच्याशी त्याचे सलोख्याचे संबंध होते. चंद्रगुप्ताने आपली मुलगी प्रभावती गुप्ता वाकाटक युवराज द्वितीय रुद्रसेन याला दिली व हे संबंध दृढ केले. या वैवाहिक संबंधामुळेच माहेश्वर घराण्यातील हा राजा विष्णुभक्त बनला. आपल्याला मिळालेले राज्य चक्रपाणीच्या म्हणजे भगवान विष्णूच्या प्रसादाने प्राप्त झाले असे मानण्याइतपत त्याची श्रद्धा गाढ होती.

नागपूर जिल्ह्यातील कुही-मांढळ येथे इ. स. च्या चौथ्या-पाचव्या शतकाइतके प्राचीन मंदिरावशेष व शिल्पे सापडली आहेत. ही मंदिरे वाकाटक नृपतींच्या आश्रयानेच उभारण्यात आली असावीत. मंदिरावशेषात सापडलेली ताम्रपत्रे वाकाटक राजांनीच दिलेली असून मंदिरे कदाचित प्रथम पृथ्वीषेण व द्वितीय रुद्रसेनाच्या काळात बांधली असावीत. या परिसरात द्वितीय रुद्रसेनाने (इ. स. ४००–४०५) आपल्या पाचव्या शासन वर्षात दिलेला ताम्रपट मिळाला असून त्यामुळे वरील अनुमानास आधार मिळाला आहे. वाकाटकांची राजधानी याच काळात नागपूर जिल्ह्यातील सांप्रतच्या नगरधन (नन्दिवर्धन) येथे आणण्यात आली असावी.

यानंतर लवकरच द्वितीय रुद्रसेनाचे अकाली निधन झाले असावे असे म्हणावयास आधार आहे. प्रभावती गुप्ताच्या प्रसिद्ध पुणे ताम्रपटात वाकाटकांची वंशावळ न देता गुप्तांची वंशावळ दिलेली असून ती युवराज दिवाकरसेनाच्या वतीने राज्यकारभार करीत होती हे स्पष्ट दिसते. हा ताम्रपट नन्दिवर्धनहून तिच्या शासनकाळाच्या तेराव्या वर्षात दिलेला होता. ती या काळात युवराज दिवाकरसेनाच्या वतीने राज्यकारभार पाहत होती हे उघड

---

[१४] कित्ता, पृ. १५, ३०–३४.

[१५] कित्ता, पृ. ३५. पुराणातील माहितीप्रमाणे प्रवरसेनाचे चार पुत्र राजे झाले. त्यामुळे वाकाटकांच्या नंदिवर्धन व वत्सगुल्मच्याव्यतिरिक्त आणखी दोन शाखा असाव्यात असा प्रा. मिराशींचा तर्क आहे. गौतमीपुत्राचा भाऊ सर्वसेन व त्याचे वंशज हा वत्सगुल्म, म्हणजे हल्लीचे अकोला जिल्ह्यातील वाशीम, येथे राज्य करीत होते हे त्यांच्या वंशजांच्या शिलालेखावरून दिसते. तिसरी व चौथी शाखा अनुक्रमे कुंतल व दक्षिण कोसलवर राज्य करीत असावी; पण त्यांचा राष्ट्रकूट व नलवंशी राजाकडून नाश झाला असावा असा तर्क आहे.

आहे. दिवाकरसेनाचाही पुढे अकाली अंत झाला असावा असे दिसते. कारण तिचा ऋद्धपूर ताम्रपट प्रवरसेनाच्या २९ व्या शासन वर्षात दिलेला आहे. साकोलीजवळ काही वर्षांपूर्वी सापडलेल्या दुसऱ्या एका ताम्रपटात ती दोन राजांची जननी असल्याचा उल्लेख आहे. त्यावरून एका पाठोपाठ अथवा एकाच वेळी तिचे दोन पुत्र सार्वभौम म्हणून राज्य करीत असावेत असे दिसते.

वाकाटकांच्या ज्येष्ठ शाखेचा सर्वांत प्रभावशाली राजा म्हणून प्रवरसेनाचीच (इ. स. ४२०–४५०) गणना करावी लागेल. द्वितीय रुद्रसेन व द्वितीय पृथ्वीषेणाच्या काही ताम्रपटांव्यतिरिक्त ज्येष्ठ शाखेचे सर्वच ताम्रपट प्रवरसेनाचे आहेत. त्यांची संख्या १२ हून अधिक भरेल. ही ताम्रपत्रे अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा व मध्यप्रदेशातील बेतूल व बालाघाट जिल्ह्यांत सापडली असून निरनिराळ्या ठिकाणांहून दिली आहेत. यापैकी नन्दिवर्धन व प्रवरपूर या राजधान्या होत्या. त्याच्याच राज्यकाळात राज्यवर्ष ११ व १८ च्या दरम्यान (चम्मक ताम्रपट) राजधानी नन्दिवर्धनहून प्रवरपूरला हलविण्यात आली. ताम्रपटांची संख्या व त्यांच्या सापडण्याच्या ठिकाणांच्या व्याप्तीवरून प्रवरसेनाच्या साम्राज्याची कल्पना करता येते. या संदर्भात महत्त्वाची बाब अशी की, द्वितीय प्रवरसेनाचा त्याच्या दुसऱ्या राज्यवर्षात दिलेला ताम्रपट जांब (जाम) येथे व अकराव्या वर्षात दिलेला ताम्रपट वर्धा जिल्ह्यात मिळाला आहे. तसेच धाम नदीच्या काठावरील विनोबाजींच्या पवनार आश्रमातील स्थापत्यशिल्पावशेष हे वाकाटक काळातील असून पवनार हेच वाकाटकांच्या ताम्रपटातील प्रसिद्ध प्रवरपूर असे संशोधकांचे अनुमान आहे.

पवनार येथे १९६६–६७ मध्ये नागपूर विद्यापीठातर्फे उत्खनन करण्यात आले. त्या-अगोदर तेथील विनोबाजींच्या आश्रमात मिळालेल्या शिल्पावरून विशेषतः गंगेच्या सुंदर मूर्तीवरील पेटिकाशीर्ष लिपीतील लेखावरून असे अनुमान करण्यात आले की, हे मंदिर इ. स. च्या पाचव्या शतकाच्या मध्यकाळचे असावे. प्रवरसेनाची माता प्रभावती गुप्ता विष्णूची दृढ भक्त असल्याने, राम या विष्णूच्या अवताराचे मंदिर प्रवरसेनाने तिच्यावरील प्रेमामुळे बांधले असावे. तथापि प्रवरपूर म्हणजे पवनार हे समीकरण अद्याप सर्वसंमत झालेले नाही. सापडलेल्या शिल्पपटांपैकी प्रा. मिराशी मानतात त्याप्रमाणे सर्वच **रामायण** महाकाव्याशी संबंधित नाहीत. काही कृष्णलीलांशी संबंधित आहेत. उदा. धेनुकासुर वध, कंसवध यांसारखे शिल्पपट, तसेच आश्रमापासून थोड्याच अंतरावर असलेल्या शेषशायी मूर्तीवरून या ठिकाणी देवगढ (उत्तर प्रदेश) येथील गुप्तकालीन विष्णुमंदिराप्रमाणेच विष्णुमंदिर असावे. या शिल्पांचा काळही आतापर्यंतच्या समजाप्रमाणे इ. स. ४२०–४५० नसून इ. स. ४७५–५०० असावा. पवनार म्हणजे प्रवरपूर नसून पद्मनगर असावे असा एक दावा आहे.[१६] या पद्मनगरचा राष्ट्रकूट नन्नच्या ताम्रपटात उल्लेख आला आहे. ही शिल्पे वाकाटक-कालीन असल्याने धाम नदीच्या तीरावर समोरच्या बाजूला गावठाणापासून जवळ असलेल्या किल्ला या प्राचीन वस्तीच्या टेकाडावर उत्खनन करण्यात आले. अशा उत्खननाचा हेतू असा होता की, त्यामुळे वाकाटक कालावर प्रकाश पडेल आणि विशेषतः पवनार ही राजधानी

[१६] जामखेडकर, अ. प्र. "नॅरेटिव्ह स्कल्पचर्स फ्रॉम पवनार : ए रीॲप्रेजल", **इंडियन एपिग्राफी ॲंड इट्स बेअरिंग ऑन आर्ट हिस्टरी** (वाराणसी, १९७५), पृ. ८३–८६.

होती किंवा कसे व राजधानी असल्यास तिचे स्वरूप कळावे. परंतु उत्खननात सर्वांत प्राचीन वस्ती इ. स. पूर्वच्या पहिल्या सहस्रकात झाली असावी हे सिद्ध झाले. नंतरच्या म्हणजे सातवाहनकाळातील रोमन मद्यकुंभ व भांडी मिळाली, तसेच सातवाहनोत्तर काळातील वस्तीचा पुरावा मिळाला. पण थेट वाकाटककालीन असा खास पुरावा मिळाला नाही.[१७]

वाकाटकांच्या ताम्रपटांपैकी ज्या तीन ताम्रपटांत सुप्रतिष्ठाहाराचा उल्लेख आहे ते पुढीलप्रमाणे[१८] :– प्रभावती गुप्ताचा पुणे ताम्रपट, जांब (जाम) ताम्रपट आणि वडगाव ताम्रपट.[१९]

प्रवरसेनानंतर त्याचा पुत्र नरेन्द्रसेन (इ. स. ४५०–४७०) व त्यानंतर त्याचा नातू द्वितीय पृथ्वीषेण राज्यावर आला (४७०–४९०). मालव आणि मेकल देशांच्या राजांनी नरेन्द्रसेनाचे अधिपत्य स्वीकारले असल्याचा उल्लेख त्याचा पुत्र द्वितीय पृथ्वीषेणाच्या बालाघाट ताम्रपटात आला आहे. द्वितीय पृथ्वीषेणाची आई कुन्तलदेशची राजकन्या असून तो आपल्या पणज्याप्रमाणे 'परमभागवत' होता. प्रवरसेनानंतर राजधानी आणखी एका ठिकाणी बदलली. ती प्रवरपुराहून पद्मपुरास हलविली गेली. हे पद्मपूर व भवभूतीने आपल्या नाटकात उल्लेखिलेले विदर्भातील पद्मपूर हे एकच असून ते भंडारा जिल्ह्यातील पद्मपूर असावे.

वाकाटकांच्या राजधानीबाबत इतिहास संशोधकांमध्ये एकमत नसले तरी इतके मात्र स्पष्ट दिसते की, वाकाटक राजवंश भारतातील एक बलवान व समृद्ध राजवंश होऊन गेला. सन २५० पासून अदमासे ५५० पर्यंत वाकाटकांनी विदर्भावर राज्य केले. या तीनशे वर्षांच्या काळात त्यांची सत्ता नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत व अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत पसरली. वाकाटक राजांनी संस्कृत व प्राकृत कवींना उदार आश्रय दिला. त्या काळातल्या विदर्भातील वाङ्मयनिर्मितीमध्ये वैदर्भी आणि वच्छोमी रीतींना मानाचे स्थान प्राप्त होऊन कालिदासासारख्या महाकवींना त्याप्रमाणे काव्यरचना करण्याची स्फूर्ती मिळाली. स्वतःच काही वाकाटक राजांनी काव्यनिर्मिती केलेली असून, त्यांच्या काव्याची बाण व दण्डी यासारख्या कवींनी व कुन्तक आणि हेमचन्द्र यासारख्या लेखकांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. वाकाटक राजा सर्वसेन हा सुप्रसिद्ध प्राकृत काव्य **हरिविजय** याचा लेखक मानला जातो. या काव्याची इतर अनेक कवी व साहित्य समीक्षकांनी प्रशंसा केली आहे. इतकेच नव्हे तर नंतरच्या काळामध्ये कालिदास व प्रवरसेन दुसरा यांनी निर्माण केलेल्या साहित्यनिर्मितीवर देखील सर्वसेनाच्या शैलीचा प्रभाव पडलेला दिसतो. वाकाटकांनी उत्तुंग देवालये बांधल्याचे दिसते. ती देवालये आज पूर्णरूपाने अस्तित्वात नसली तरी त्यांच्या अवशेषांवरून ती उत्कृष्ट कलाकृतीपूर्ण असावीत. अजंठा व गुलवाडा येथील काही विहार व चैत्य लेणी त्यांच्या काळात कोरली गेली. वाकाटक काळात संस्कृत भाषा व संस्कृत वाङ्मयाचा विलक्षण विकास झालेला दिसतो. दुर्दैवाने वाकाटककालीन विपुल साहित्यनिर्मितीपैकी फारच थोडे साहित्य सध्या उपलब्ध आहे. कालिदासाचे **मेघदूत** नामक खंडकाव्य व प्रवरसेनाचे **सेतुबंध**

[१७] देव, शां. भा., **पुरातत्त्व विद्या**, पृ. २०१.

[१८] मिराशी, पूर्वोक्त, पृ. २६८.

[१९] कित्ता, कोरीव लेख क्र. २, ३ आणि १२.

हे प्राकृत काव्य विशेष उल्लेखनीय आहे. कालिदासाची इतर काव्ये व नाटके विदर्भाबाहेर माळवा प्रांतात लिहिली गेली. त्यामुळे त्यातील वर्णन विदर्भाला लागू पडेलच असे म्हणता येत नाही. तत्कालीन सामाजिक परिस्थिती समजून घेण्याचे उत्तम साधन म्हणजे अजंठ्याची क्रमांक १६, १७ व १९ लेणी होत. ही लेणी वाकाटक काळात कोरली होती व त्यातील चित्रेही त्याच काळात काढली होती. त्यावरून तत्कालीन सामाजिक परिस्थिती समजण्यास मदत होते.

अजंठ्याच्या चित्रांवरून तत्कालीन लोकांची घरे, दिवाणखान्यातील सामान, महिला व पुरुषांचे वस्त्रालंकार, धनिक लोकांची अत्यंत तलम वस्त्रे, केशरचना, शिरोभूषणे इत्यादींबाबत माहिती प्राप्त होते. वाकाटककाळी स्त्री-पुरुषांना अलंकाराची बरीच आवड असावी असे दिसते. राजघराण्यातील महिला व पुरुष किमती अलंकार घालीत असत. महिलांचे अलंकार अत्यंत सुंदर व विविध प्रकारचे असत.

वाकाटकांच्या काळी अभूतपूर्व धार्मिक जागृती झाली होती. राजे स्वत: मोठमोठे याग करीत असत.

सांप्रतकाळी जेथे पवनार आश्रम आहे त्या ठिकाणी रामचंद्राचे एक उत्तुंग देवालय होते असे डॉ. मिराशी यांनी मतप्रदर्शन केले आहे. **रामायण** महाकाव्यातील बऱ्याच प्रसंगांवरच्या शिल्पाकृती त्यावर कोरलेल्या होत्या. त्यापैकी काही पुरावशेष तेथे सापडले आहेत. त्यांच्या राज्यात हिंदू धर्माप्रमाणे बौद्ध धर्मही प्रचलित होता. वाकाटक व त्यांच्या मांडलिक राजांच्या दानपत्रांचे निरीक्षण केल्यास तत्कालीन धार्मिक प्रवृत्तीवर थोडाफार प्रकाश पडू शकतो. डॉ. मिराशी यांच्या मते त्याकाळी बौद्ध धर्माची हळूहळू पिछेहाट होऊन हिंदू धर्माचा अधिक प्रसार झाला.

स्वत: वाकाटक राजांनी ललितकलांप्रमाणेच काव्यलेखनास बरेच उत्तेजन दिलेले दिसते. सातवाहन राजांचे लेख प्रामुख्याने प्राकृत भाषेत असत. तथापि वाकाटकांचे बहुसंख्य लेख संस्कृतमध्ये लिहिलेले आहेत. याला एक मोठा अपवाद म्हणजे वाशीम दानपत्राचा आहे. परंतु या दानपत्रातील आरंभीचा राजवंशवर्णनाचा भाग संस्कृतात असून पुढील दानविषयक भाग मात्र प्राकृत भाषेत आहे. त्यावरून स्पष्ट दिसते की, संस्कृत भाषा हळूहळू प्राकृतची जागा घेऊ लागली होती. दण्डीसारख्या आद्य अलंकारिकांनी आपल्या ग्रंथांमध्ये वैदर्भी रीतीची उत्कृष्ट रीती म्हणून स्तुती केलेली आहे. मूळचा माळवा प्रांतातील कविकुलगुरू कालिदास आकर्षित होऊन त्यानेही आपली नाटके व काव्यनिर्मिती या रीतीतच केली. त्यावरून या प्रदेशातील तत्कालीन संस्कृत काव्याच्या उत्कृष्ट दर्जाबाबत मत बनविता येते.

वाकाटककाळी राज्य शासनात ब्राह्मण उच्च पदांवर असले तरी बरेच क्षत्रियसुद्धा शासकीय पदांवर नियुक्त केलेले होते. त्यांच्या दानपत्रांत क्षत्रिय नावांचा ब्राह्मण नावांपेक्षा अधिक उल्लेख आढळतो.

डॉ. मिराशी यांनी वाकाटक राजांचा तयार केलेला कालक्रम बराच विश्वसनीय असल्याकारणाने खाली दिलेला आहे.

- प्रथम विन्ध्यशक्ती (सन २५० ते २७०)
  - प्रथम प्रवरसेन (सन २७० ते ३३०)
    - [ज्येष्ठ शाखा]
      - गौतमीपुत्र
        - प्रथम रुद्रसेन [सन ३३० ते ३५०]
          - प्रथम पृथ्वीषेण [सन ३५० ते ४००]
            - द्वितीय रुद्रसेन [सन ४०० ते ४०५]
              - दिवाकरसेन [सन ४०५ ते ४२०]
              - दामोदरसेन ऊर्फ द्वितीय प्रवरसेन [सन ४२० ते ४५०]
                - नरेन्द्रसेन [सन ४५० ते ४७०]
                  - द्वितीय पृथ्वीषेण [सन ४७० ते ४९०]
    - [वत्सगुल्म शाखा]
      - सवसेन [सन ३३० ते ३५५]
        - द्वितीय विन्ध्यशक्ती [सन ३५५ ते ४००]
          - द्वितीय प्रवरसेन [सन ४०० ते ४१०]
            - पुत्र [नाम अज्ञात] [सन ४१० ते ४५०]
              - देवसेन [सन ४५० ते ४७५]
                - हरिषेण [सन ४७५ ते ५००]
                  - पुत्र [नाम अज्ञात] [सन ५०० ते ५१०]

कलचुरी : वाकाटकांची अधिसत्ता इ. स. ५१५ च्या सुमारास लयास गेली. तथापि वत्सगुल्म शाखा हरिषेणानंतर एखाद्या पिढीपर्यंत अस्तित्वात असेल. त्यानंतर या मोठ्या साम्राज्याचे विघटन झाले. सातव्या शतकात बदामीच्या चालुक्यांची अधिसत्ता महाराष्ट्रभर प्रस्थापित होईपर्यंतच्या काळात माहिष्मतीला एका नव्या राजघराण्याचा उदय झाला. इ. स. ५५० मध्ये कृष्णराज कलचुरीने प्रभुसत्ता प्रस्थापित केली. कृष्णराजाचे शिलालेख मिळत नसले तरी त्याची नाणी बऱ्याच काळपर्यंत प्रचारात होती. त्याच्या राज्याचा विस्तार गुजरात, कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भावर असावा असे दिसते.[२०] कल्याणीच्या मंगलेश चालुक्याने कलचुरी साम्राज्याच्या दक्षिण प्रदेशावर स्वारी करून त्यांचा पराभव केला.[२१] पुढील काळात चालुक्यांनी त्रिमहाराष्ट्रकावर आपली प्रभुसत्ता प्रस्थापित केली असा उल्लेख असला आणि हिएन्-त्संगच्या प्रवासवर्णनात पुलकेशी द्वितीय हा महाराष्ट्राचा राजा असल्याचा उल्लेख असला तरी त्याच्या प्रत्यक्ष अमलाखालील राज्याचा विस्तार किती होता याची निश्चित कल्पना येत नाही. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात त्याचे मांडलिक म्हणून किंवा स्वतंत्रपणे काही घराणी राज्य करीत होती. कलचुरी राजांचे विदर्भातील मांडलिकत्व राष्ट्रकुटांनी स्वीकारले. राष्ट्रकुटांची एक शाखा अचलपूरहून (जि. अमरावती) राज्य करीत होती. बेतूल जिल्ह्यातील मुलताई आणि तीवरखेड येथे त्यांचे दोन ताम्रपट मिळाले आहेत. हे दोन्ही त्यांच्या अचलपूर या राजधानीतून नन्नराज युद्धासुर या राष्ट्रकूटवंशी राजाने दिले आहेत.[२२] याचा अर्थ नन्नराज बेतूल-वर्धा भागात इ. स. ६९३ ते ७०९ काळात निश्चितपणे राज्य करीत होता.

राष्ट्रकूट : दन्तिवर्मन् हा या प्रभावशाली राष्ट्रकूट घराण्याचा मूळपुरुष. त्यांच्या वंशावळीत नंतर इन्द्र पृच्छकराज, गोविन्दराज व कर्क हे राजे इ. स. ६६५ ते ७१५ च्या दरम्यान होऊन गेले. कर्काला इन्द्र, ध्रुव, कृष्ण आणि नन्नराज असे चार पुत्र होते. हे घराणे मूळचे वेरूळचे, पण इन्द्राने (इ. स. ७१५–७३५) उत्तरेकडे राज्य विस्तार केला. इन्द्रानंतर त्याचा पुत्र दन्तिदुर्ग (इ. स. ७३५–७५५) राज्यावर आला. त्याने फार तर वीस वर्षे राज्य केले व तरुण वयातच त्याचे निधन झाले. पण त्या काळात एका साम्राज्याची मुहूर्तमेढ रचली गेली. त्याने कांची, कलिंग, श्रीशैल, कोसल, मालव व लाट देशांच्या नृपतींचा युद्धात पराभव केल्याचा उल्लेख येतो. माळव्यावरील विजयानंतर तेथील गुर्जरप्रतीहार राजा हिरण्यगर्भदान समारंभात त्याचा प्रतीहार झाला असे अलंकारिक भाषेत म्हटले आहे. अशा रीतीने विदर्भ आणि पर्यायाने वर्धा जिल्हा वेरूळच्या राष्ट्रकुटांच्या वर्चस्वाखाली आठव्या शतकाच्या सुरुवातीस आला असावा.

राष्ट्रकूट सम्राट कृष्ण (इ. स. ७५६–७७२), गोविन्द तृतीय (इ. स. ७९३–८१४) आणि कृष्णराज तृतीय (९३९–९६७) यांचे ताम्रपट विदर्भात सापडले आहेत. याचा

---

[२०] मिराशी, **कलचुरी नृपति आणि त्यांचा काळ**, पृ. ६–७.

[२१] कित्ता, पृ. ७.

[२२] दीक्षित, मो. गं. पूर्वोक्त, पृ. ६१–६२. मुलताई आणि सांगळूद (जि. अकोला) येथे सापडलेल्या ताम्रपटांचा शक संवत् ६३१ व ६१५ आहे, तर तीवरखेडच्या ताम्रपटाचा ५५३ आहे. विद्वानांच्या मते हा बनावट आहे.

अर्थ असा की, राष्ट्रकूट साम्राज्याच्या अंतापर्यंत विदर्भ त्यांच्याच अमलाखाली होता. कृष्ण प्रथमच्या नांदीपुरीहून प्रदान केलेल्या आणि भांदक (भद्रावती) येथे सापडलेल्या शक ६९४ मधील (इ. स. ७७२) ताम्रपटात उदुम्बरमती (यवतमाळ जिल्ह्यातील राणी उमरावती) येथील आदित्य मंदिरास नागणागाव दान दिल्याचा उल्लेख आहे. यातील ऊंबरग्राम हे सेलू तहसिलीतील अंतरगावच्या पश्चिमेस असलेले उमरगाव, तर अंतरैग्राम हे अंतरगावच असावे असे विद्वानांचे अनुमान आहे.[२३]

राष्ट्रकूट घराण्यात बरेच पराक्रमी सम्राट होऊन गेले आणि त्यांनी उत्तरेतील गुर्जर-प्रतीहार व पाल आणि दक्षिणेतील वेंगीचे चालुक्य, पल्लव, चोल आणि पाण्डच या राजांवर आपली जरब बसविली. त्यांची मांडलिक घराणीसुद्धा पराक्रमी निघाली; उदा. शिलाहार, गुजरातचे राष्ट्रकूट आणि यादव.

गोविन्द तृतीयाचे मयूरखंडीहून काढलेले चार ताम्रपट शासन विदर्भाशी निगडीत आहेत असे समजले जाते. यानंतरच्या काळातील विदर्भाशी संबंधित ताम्रपट म्हणजे कृष्णराज तृतीयाचा देवळी ताम्रपट होय. वर्ध्यापासून १७ कि. मी. अंतरावरील देवळी येथे सापडलेल्या या ताम्रपटात दान दिलेली गावे नागपूर–रामटेक भागातली असावीत.[२४]

कल्याणीचे चालुक्य : राष्ट्रकूट कृष्ण तृतीयाच्या मृत्यूनंतर विदर्भावर चालुक्य घराण्याची अधिसत्ता प्रस्थापित झाली. चालुक्य नृपति विक्रमादित्य सहावा (इ. स. १०७६–११२६) याच्या काळातील तीन लेख विदर्भात मिळाले आहेत. पहिला सीताबर्डी शिलालेख (शके १००८) या नावाने प्रसिद्ध आहे. दुसरा लेख परमार नरवर्म्म देवाचा असून विक्रमसंवत् ११६१ (इ. स. ११०४–०५) मध्ये दिलेल्या दानाविषयी आहे. दुसऱ्या एका परमार नृपति जगद्देवाचा उल्लेख डोंगरगावच्या (जिल्हा यवतमाळ) शके १०३४ (इ. स. १११२) च्या शिलालेखात आला आहे.

यादव : कल्याणीच्या चालुक्यांनंतर दख्खनमध्ये तीन सत्ता प्रबळ झाल्या :– कर्नाटकात होयसळ, आंध्रात काकतीय आणि महाराष्ट्रात सेऊण यादव. यादवांचे शिलालेख व ताम्रपट विपुल प्रमाणावर सापडले आहेत. त्यांच्या भरभराटीच्या काळात समकालीन राजवंशांच्या अभिलेखांतूनही त्यांची माहिती मिळते. यादवांच्या काळात मराठी भाषेत वाङमय लिहिण्यास मोठ्या प्रमाणात चालना मिळाल्याने समकालीन वाङमयातूनही त्यांच्याविषयी उल्लेख आढळतात.

विदर्भात मिळणारे यादवांचे शिलालेख मुख्यत्वे सिंघण (१२१०–४७), कृष्ण (१२४७–६०) आणि रामचंद्र (१२७१–१३११) यांचे आहेत. त्यात वऱ्हाडातला पहिला शिलालेख (शके १०९८) आमडापूरचा आहे. संपूर्ण वऱ्हाड व चंद्रपूरवर सिंघणाचा अंमल होता हे आंबेजोगाई येथील खोलेश्वराच्या प्रशस्तीवरून दिसून येते.[२५] हा खोलेश्वर

---

[२३] देव, पूर्वोक्त, पृ. २९३; व दीक्षित, मो. ग., पूर्वोक्त, पृ ६२.

[२४] कित्ता, पृ. १९६–९७; दीक्षित, कित्ता, पृ. ६४.

[२५] खरे, ग. ह., **मध्ययुगीन दख्खनच्या इतिहासाची साधने, खंड ४ था,** पृ. ५५–७८.

मूळचा उमरावतीचा.[२६] त्याने अनेक लढाया करून साम्राज्यविस्तार केला आणि संपूर्ण वऱ्हाड सिंघणाच्या वर्चस्वाखाली आणला. विदर्भात त्याने अनेक मंदिरे बांधली. पयोष्णी व वरदा नद्यांच्या काठी त्याने अग्रहारांना दाने दिली.

सिंघणानंतर त्याचा नातू कृष्ण (इ. स. १२४७–१२६०) गादीवर आला. त्याच्या राज्यकाळात उत्तरेकडील सीमेवरील काही विजयांव्यतिरिक्त विशेष असे घडले नाही. कृष्णाचा मुलगा रामदेव अल्पवयी असल्याने कृष्णानंतर त्याचा भाऊ महादेव (इ. स. १२६०–१२७०) राज्यावर आला. महादेवाने ठाणे येथील शिलाहार वंशाची राजवट सोमेश्वराच्या काळात (इ. स. १२४०–६५) संपुष्टात आणली ही जमेची बाजू होती. महादेवाने रामदेवाला राज्यावर बसविण्याऐवजी आपल्या मुलाला, आमणाला, राज्यावर बसविले (इ. स. १२७०). पण रामदेवाला अमात्यमंडळाचा पाठिंबा असल्याने त्याला देवगिरीची राज्यप्राप्ती झाली.

रामचन्द्र यादवाने प्रदीर्घ काळपर्यंत म्हणजे ४१ वर्षे राज्य केले (इ. स. १२७१–१३११–१२). त्याने केलेल्या महत्त्वाच्या मोहिमांत होयसळ, झाडिमंडल (पूर्व विदर्भ), त्रिपुरी व वाराणसी या मोहिमांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. विदर्भाच्या इतिहासाच्या दृष्टीने त्याच्या भांडागार (भंडारा) व वज्राकर (गडचिरोली जिल्ह्यातील वैरागड) या मोहिमा महत्त्वाच्या आहेत. त्यापलीकडे लांजी (मध्यप्रदेश) येथेही त्याचा शिलालेख आढळतो. सिंघणाच्या काळात यादवांच्या अमलाखाली वऱ्हाड व चंद्रपूरचा भाग होता. पण रामचंद्राने त्याही पलीकडच्या पूर्व विदर्भावर आपला अंमल बसविला, हे त्याच्या रामटेक व लांजीच्या शिलालेखांवरून लक्षात येते.

मात्र इ. स. १२९६ मध्ये यादवांच्या सार्वभौमत्वाला अलाउद्दिन खलजीच्या स्वारीमुळे तडा गेला तो कायमचाच. या स्वारीत त्याला मोठी खंडणी द्यावी लागली. पुढे सिंघणाने खंडणी देण्याचे नाकारल्याने सुलतानाने इ. स. १३१३ मध्ये मलिक काफुरास मोठे सैन्य घेऊन देवगिरीवर पाठविले व सिंघणाचा पराभव केला. थोड्या संक्रमणावस्थेनंतर इ. स. १३१८ मध्ये देवगिरीकर यादवांचे हिंदू राज्य नष्ट होऊन मुसलमान सुलतानांची राजवट प्रस्थापित झाली.

मध्ययुगीन काळ[२७]

नागपूर विद्यापीठाच्या विद्यमाने डॉ. शां. भा. देव व त्यांच्या सहकाऱ्यांनी पवनारला केलेल्या उत्खननातून इ. स. पूर्व १०००–८०० पासून इ. स. च्या पंधराव्या शतकापर्यंत विपुल ऐतिहासिक साधनसामग्री उपलब्ध झाली आहे. देवनागरी लिपीत उत्कीर्ण केलेला चौदाव्या-पंधराव्या शतकातील एक शिलालेखही सापडला आहे. याशिवाय

[२६] हे उमरावती म्हणजे हल्लीचे अमरावती की आणखी दुसरे कोणते वऱ्हाडातले गाव होते याबद्दल खरे यांना खात्री नव्हती (पहा, खरे, कित्ता, पृ. ५७). हल्लीच्या जिल्ह्याच्या मुख्यालयाऐवजी यवतमाळमधील राणी उमरावती असावे असा य. खु. देशपांडेंचा तर्क आहे. (पहा, **विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक**, १९६९, पृ. २९–३५); पण तो बरोबर नाही.

[२७] **मध्ययुगीन काळ** या विषयावरील लेखन डॉ. कि. का. चौधरी, कार्यकारी संपादक व सचिव, महाराष्ट्र, गॅझेटिअर यांनी केले आहे.

पवनारमधील एका घरात देवनागरीतील दुसरा लेखही प्राप्त झाला आहे. हा लेख बुरहाण निजामशहाच्या वेळचा (१५१०–१५५३) असून भिंतीत बसविलेला आहे. पवनारच्या मुख्य टेकाडावरील मध्ययुगीन मशिद आणि किल्ला, टेकाडाभोवतीची तटबंदी व बुरुज तेथील मध्ययुगीन वसाहतीची साक्ष देतात. त्यावरून निश्चितपणे सांगता येते की, वाकाटकांपासून मुसलमान राजवटीपर्यंतच्या कालावधीत पवनारला मानवी वसाहत अव्याहत होती. पवनार उत्खननात तेथील प्राचीन वसाहतीचे नऊ थर स्पष्ट स्वरूपात सापडले. डॉ. देवांनी त्यांची पाच कालखंडांत वर्गवारी करून त्यावरून महत्त्वाचे निष्कर्ष काढले. उत्खननात सापडलेली चिनीमातीची भांडी, काचेच्या द्रवाचा लेप दिलेली मुसलमान कालीन मडकी व तुघलकांची नाणी यावरून या कालखंडाची कालनिश्चिती नववे-दहावे ते चौदावे-पंधरावे शतक अशी करण्यात आली.[२८]

या कालखंडात सामाजिक समृद्धीला ओहोटी लागली. असे अनुमान निघण्याची सयुक्तिक कारणे म्हणजे घरांची निकृष्ट बांधणी, कमी प्रतीची खापरे, खापरांची खालच्या दर्जाची भाजणी व घरांची रचना ही होत. विविध सुलतानांमधील संघर्ष व अस्थिरतेचा लोकजीवनावर प्रतिकूल प्रभाव पडून समृद्धीचा ऱ्हास झाला. गरिबी वाढली व दैन्य पसरले. संशोधनात सापडलेल्या चिनीमातीच्या भांड्यांवर बहुतांश निळ्या रंगात नाजूक फुलांची नक्षी रंगविलेली आढळते. ही भांडी साधारणपणे बशीच्या आकाराची आहेत. या कालाच्या उत्तरार्धात सुखवस्तू लोकांच्या वापरात असलेली काचेचा द्रव लावलेली भांडी मात्र डोळ्यात भरण्यासारखी आहेत. त्यावरील रंगीत नक्षी सुंदर आहे. बहुरंगी काचेच्या बांगड्या याच काळात प्रचलित झाल्या. या मनोहारी बांगड्यांमध्ये प्रामुख्याने हिरवा, भगवा, पिवळा, पांढरा व निळा हे रंग आढळतात.[२९] तटबंदी व किल्ल्याच्या अवशेषांवरून लक्षात येते की, जोरदार आक्रमणांपासून संरक्षणास्तव त्यांची बांधणी भक्कम केलेली होती. तटबंदी दगडी शिळा वापरून बांधलेली होती. तेथील अवशेषांवरून निश्चित म्हणता येते की, तत्कालीन दक्षिणेतील स्थित्यंतरे व संघर्षात पवनारला बरेच स्थान असावे.

पुरावशेषांव्यतिरिक्त नाणकशास्त्रीय अभ्यासावरूनही पवनारच्या मध्ययुगीन इतिहासावर थोडाफार प्रकाश पडतो. विनोबाजी भावेंच्या पवनार आश्रमाच्या दक्षिणेस धाम नदीच्या दक्षिण तीरावर बंधाऱ्याजवळ ६० नाणी सापडली. या तांब्याच्या नाण्यांचे वजन प्रत्येकी सुमारे ११ ग्रॅम आहे. नाण्यांवर अरबी भाषेत 'बिस्मिल्ला' हा शब्द छापलेला आहे. नाणी हिजरी सन १०६२ व १०६८ मधील आहेत. ही नाणी औरंगजेबकालीन असून ती बख्त बुलंद नामक स्थानिक राजाने निर्गमित केलेली असावी. हा राजा मूळचा गोंड असून त्याने औरंगजेबाकडे आश्रय मागितला होता. औरंगजेबाने त्यास आश्रय दिला, सत्ता दिली. बख्त बुलंदने धर्मांतर केले. बख्त बुलंदची ऐतिहासिक कामगिरी म्हणजे त्याने नागपूर शहराची केलेली स्थापना.

हिंदू राजवटीचा अंत

देवगिरीच्या मराठी भाषिक यादवांच्या अपकर्षसमयी वर्धा जिल्ह्यासकट संपूर्ण विदर्भ, सध्याचा पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, मध्यप्रांत, दक्षिण गुजरातचा काही भाग आणि

[२८] देव, डॉ. शां. भा., "पवनार उत्खनन : एक मूल्यमापन", **विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक : १९६७ (नागपूर, १९६८).**

[२९] कित्ता.

कर्नाटकातील महाराष्ट्रालगतचा भाग यावर यादवांचे साम्राज्य होते. राज्याच्या बहुतां भागात सुबत्ता व सधनता होती. यादवांच्या उत्तेजनामुळे कला, साहित्य, व्यापार व कुटिरोद्योगांची विपुल भरभराट झाली. विशेष म्हणजे परराष्ट्र व्यापारही प्रगत झालेल होता. पैठण, देवगिरी व विदर्भातून उंची कापड निर्यात करून त्या मोबदल्यात सोने प्राप्त होत असे. इ. स. १२९६ मध्ये यादवांचे राज्य व वैभव सुबत्तेच्या शिखरावर पोहोचले होते.[३०] इषामीने देवगिरीच्या वैभवाचे केलेले वर्णन[३१] जरी राजधानीपुरते मर्यादित असले तरी त्यावरून विदर्भाच्या वैभवाची कल्पना येते. हा प्रदेश सुपीक असल्यामुळे तेथे वैभव होतेच महानुभाव पंथी वाङ्मयानुसार वर्ध्यानजीकच्या रिद्धपूर व अचलपूरला या पंथाची केंद्रे होती. या वाङ्मयात उल्लेख आहे की, सर्व राज्यात तीर्थक्षेत्रांना व देवस्थानांना राजांकडून विपुल दाने मिळत असत. ब्राह्मणांना अध्ययन व विद्यादानासाठी मदत करण्यास्तव गावे 'अग्रहार' म्हणून लावून दिलेली होती. वर्धा नदीच्या पूर्वेकडील प्रदेशाचा महानुभाव वाङ्मयात 'झाडिमंडल' (गोंडवन) असा नामोल्लेख आढळतो. झाडिमंडल प्रदेश यादव साम्राज्याला जोडण्याचे सर्व श्रेय यादवांचा प्रधान हेमाद्री ऊर्फ हेमाडपंत यास द्यावे लागते. हेमाद्री मूळचा विदर्भातील रहिवासी होता. तथापि त्याबाबत इतिहासकारांमध्ये एकमत नाही. महादेव यादव राजाचा प्रधान झाल्यावर त्यास श्रीकर्णाधिप हा दरबारी हुद्दा प्राप्त झाला. हेमाद्री महान विद्वान असून त्याने भारतीय आचारधर्मांवर **चतुर्वर्गचिंतामणी** नामक ग्रंथ लिहिला. वर्धा नदीच्या काठावरील वेदपद, सांप्रतचे बेलोद, या गावचा रहिवासी असलेला बोपदेव हा महान विद्वान ब्राह्मण हेमाद्रीचा आश्रित होता. बोपदेवाने लिहिलेल्या अभ्यासपूर्ण ग्रंथांमध्ये संस्कृत व्याकरणावरील दहा ग्रंथांचा समावेश होतो. शिवाय त्याने आयुर्वेदावर नऊ, तिथिनिर्णयासंबंधी एक, काव्यावर तीन व भागवत संप्रदाय तत्त्वज्ञानावर तीन ग्रंथ लिहिले. हेमाद्रीने देवालयांच्या बांधणीच्या नवीन स्थापत्य पद्धतीचा प्रारंभ केला. त्या पद्धतीला "हेमाडपंती" पद्धती असे नाव मिळाले. हेमाद्री व बोपदेव हे दोघे विद्वान म्हणजे वर्ध्याच्या सांस्कृतिक इतिहासातील रत्ने होत.

वैभवसंपन्नतेसाठी सर्वश्रुत असलेल्या देवगिरी राज्याकडे दिल्लीच्या तुर्कवंशी खलजी घराण्यातील अलाउद्दिन खलजीची लोभी दृष्टी स्वाभाविकपणे आकृष्ट झाली. आपला हेतू साध्य करण्यासाठी खलजी अलाहाबादनजीकच्या कडाहून (Kara) निघून दक्षिणेकडे निघाला. गुप्तपणे मोहीम करण्याच्या दृष्टीने पारंपरिक आसीरगड मार्गाने न येता त्याने थोपटमार्गाने अचलपूर गाठायचे ठरविले. त्याने हंडिआनजीक नर्मदा पार केली. नैऋत्येकडे वळून नेहमीच्या बुऱ्हानपूर-आसीरगड मार्गाने न येता तो मेळघाट मार्गाने अचलपूरला गुपचूपपणे दाखल झाला. वर्धा तेव्हा अचलपूरच्या यादव राजाच्या मांडलिकाच्या अधिपत्याखाली

[३०] शेरवानी, एच. के. आणि जोशी, पी. एम. (संपा.), **हिस्टरी ऑफ मिडीव्हल डेक्कन, ग्रंथ १** (आंध्र प्रदेश शासन, हैदराबाद, १९७३), पृ. ३६.

[३१] **इषामी फुतूहुज-सलातीन** (Futuhu's-Salatin) मध्ये देवगिरीचे पुढीलप्रमाणे काव्यात्म वर्णन दिले आहे :—

After singing praises of the richly bedecked ladies of the Yadava capital, Ishami continues : "Every house possessed heaps of diamonds and was full of silver and gold. Huge stocks of silk were found everywhere and on every side scents were available in abundance. In every street gold could be found in unlimited quantities and there were many treasures ....Very attractive types of cloth were found; and where else can be had such variety of cloth except at Devagiri ?"

(पहा शेरवानी व जोशी, पूर्वोक्त, पृ. ३६).

होते. अचलपूर-वर्धा प्रदेशावर त्याप्रसंगी पोन्वार (पोवार) अधिपतींची सत्ता होती व ते यादवांचे विश्वासू मांडलिक होते. अचलपूरच्या अधिपतीस खलजीने आपल्या हेतूचा पत्ता लागू न देता पाहुणचार घेतला. दख्खनचा सुप्रसिद्ध इतिहासकार मुहम्मद कासिम फेरिश्ता ऊर्फ हिंदुशाह याने **गुलशन-इ-इब्राहीमी** नामक इतिहास ग्रंथात लिहून ठेवले की, खलजीने बतावणी केली की, खाली दक्षिणेकडील एखाद्या हिंदू दरबारी चाकरी करून भाग्योदय करण्यासाठी आपण पुढे जात आहोत. त्यामुळे त्याला कुठेही अडथळा आला नाही. तेथून खलजी लासूरला पोहोचल्यावर मात्र त्याचा आक्रमक हेतू स्पष्ट झाला. लासूरच्या कन्हा (Kanha) नामक यादव अधिकाऱ्याने आक्रमणाचा मुकाबला करण्याची तयारी केली आणि देवगिरीला बातमी कळविली. या मुकाबल्यात कन्हाला मदत केली स्थानिक दोन शूर मराठा वीरांगनांनी. या अनामिक वीरांगना सिंहिणींसारख्या लढल्या.[३२] खलजीने तिघांना बंदिवान करून वेळ न दवडता तो देवगिरीला हजर झाला. कन्हाने रामचंद्र यादवला सावध केले असले तरी रामचंद्रची काहीच तयारी नव्हती. त्याचे अन्वेषण खाते कमालीचे अकार्यक्षम असावे. त्याउलट खलजीस पूर्णपणे माहीत होते की, यादवांचे सैन्यदल दुसऱ्या मोहिमेवर गेलेले होते. रामचंद्र यादवच्या सेनादलाच्या तत्कालीन हालचालीविषयक माहिती उपलब्ध नाही. या प्रसंगानंतर ३०० वर्षांनंतर लिहिणारा फेरिश्ता मात्र म्हणतो की, रामचंद्रचे सेनादल तीर्थक्षेत्री गेलेल्या त्याच्या राण्यांसमवेत गेलेले होते. तथापि हे संभवनीय वाटत नाही, कारण यात्रेसारख्या किरकोळ प्रयोजनासाठी संपूर्ण यादव सेना पाठविण्याचे काहीच कारण नव्हते.[३३]

खरे तर अलाउद्दिनजवळ ८,००० पेक्षा अधिक सेनादल (घोडदल) नव्हते. त्याला तोंड देण्यासाठी रामचंद्र यादवने कसेबसे ४,००० सेनादल उभारले. रामचंद्र गडामध्ये दडून बसला. त्यामुळे जे स्वाभाविक होते तेच घडले. खलजी देवगिरीत फक्त पंचवीस दिवस होता. त्याची ही स्वारी विस्मयकारकच नव्हे तर विद्युत वेगाने पार पडली. द्रव्य प्राप्त करून चटकन निसटून जाणे हे त्याचे ध्येय होते, आणि अपेक्षेपेक्षा त्याला अनेक पटींनी द्रव्य प्राप्त झाले होते. रामचंद्र यादवच्या अगतिकपणाचा फायदा उठवून खलजीने अमाप लूट केली आणि तहाच्या जाचक अटी लादून अफाट खंडणी घेतली. फेरिश्ताच्या माहितीनुसार खलजीने सहा मण सोने, सात मण मोती, दोन मण पाचू, रत्ने व हिरे, एक हजार मण चांदी आणि किमती रेशमी कापडाच्या ४,००० गासड्या हस्तगत केल्या. शिवाय इतर मौल्यवान दख्खनी वस्तू, हत्ती व घोडे हस्तगत केले. खलजीच्या सैन्याने देखील आपणास शक्य होईल तेवढी वैयक्तिक लूट मिळवून भाग्योदय करून घेतला. शिवाय खलजीने अचलपूर सुभ्याच्या महसुलाचे अधिकार मिळविले. खलजीच्या अफाट प्राप्तीबाबत इतिहासकार ब्रिग्ज (Briggs) याने पुढीलप्रमाणे उद्गार काढले आहेत :— "In the long volumes of history, there is scarcely anything to be compared with this exploit, whether we regard the resolution in forming the plan, the boldness of its execution or the great good fortune which attended its accompaniment."[३४]

देवगिरीच्या लुटीनंतर अलाउद्दिन निघाला तो सरळ आपल्या मुख्यालयाकडे (कडा). द्रव्यप्राप्तीच्या आनंदात त्याने वाटेतील प्रजाजनांना कोणत्याही प्रकारचा त्रास दिला नाही.

---

[३२] शेरवानी व जोशी, पूर्वोक्त, पृ. ३४.

[३३] कित्ता, पृ. ३६.

[३४] **ब्रिग्ज फेरिश्ता, खंड १, पृ. ३११.**

वस्तूत: खलजीच्या स्वारीमुळे हानी झाली फक्त राजधानी देवगिरीची व लासूरची. अन्यत्र प्रजाजनांना यातना भोगाव्या लागल्या नाहीत. किंबहुना इतर प्रदेशाला लढाईची झळ अजिबात लागली नाही. तुर्की सैन्य निघून गेल्यावर रामचंद्र यादवचे प्रशासन पूर्ववत सुरू झाले. त्याच्या सत्तेला जोरदार हादरा बसला हे मात्र खरे. तथापि त्याच्या दारुण पराभवाची व खलजीने लादलेल्या तहाच्या अटींची त्याच्या मांडलिक राजांना कल्पनासुद्धा आली नाही. सार्वभौम राजा म्हणून त्याच्या इभ्रतीला फारसा धक्का बसला नाही.

खलजीच्या विजयानंतर तेराव्या शतकाच्या अखेरीस व चौदाव्या शतकाच्या प्रारंभी दिल्लीकडून सूफी धर्मप्रसारक मोठ्या संख्येने दक्षिणेत आले. वस्तूत: सूफी धर्मप्रसारक इस्लामचा प्रचार करण्यासाठी दक्षिणेकडे आले होते. इतिहासकारांच्या मते १३०९ च्या सुमारास सातशे सूफी महाराष्ट्र व दक्षिणेत विखुरलेले होते. सूफींच्या धर्मप्रसाराचा उपयोग प्रामुख्याने झाला तो महाराष्ट्रात मुसलमान सत्ता स्थिर करण्यासाठी. प्रारंभी धर्मप्रसार मन वळवून केला जात होता. पण नंतर त्यासाठी राज्यशक्तीचा व बळाचा उपयोग करण्यात येऊ लागला.

रामचंद्र यादवच्या निधनानंतर (१३११–१२) त्याच्या मुलाने (सिंघण तथा शंकरदेव) खलजीविरुद्ध बंड केले. तथापि तो मारला गेला व देवगिरीचे राज्य मलिक काफूरने खालसा केले (१३१३). मलिक तेथे सुमारे दोन वर्षे सुभेदार होता. त्या कालावधीत अलाउद्दिनने देवगिरीच्या टाकसाळीतून आपल्या नावे नाणी काढली. रिव्हेट-कार्नाकच्या सेटलमेंट रिपोर्टप्रमाणे (१८६६) अलाउद्दिनची नाणी वर्धा जिल्ह्यात अहवालाच्या काळातसुद्धा सर्वत्र आढळत होती. यादव राज्याची शोकांतिका अधिकाधिक भीषण होत असतानाच रामचंद्रचा जावई हरपालदेव याने राज्य परत मिळविले. तथापि कुतबुद्दिनच्या स्वारीत त्याच्यासकट यादवांची सत्ता कायमची नष्ट झाली. त्याबरोबर १३१८ पासून विदर्भावर खलजीचा अंमल सुरू झाला. अचलपूरला मुसलमान शासनाचे एक मोठे ठाणे म्हणून महत्त्व प्राप्त झाले.

बहमनी

दिल्लीच्या सुलतानांची राजवट असली तरी स्थानिक मांडलिक राजेच या प्रदेशावर राज्य करीत. दक्षिणेतील सत्तासंघर्षाचा फायदा घेऊन अलाउद्दिन हसन बहमन शहाने[३५] ३ ऑगस्ट १३४७ रोजी बहमनी राजसत्तेची स्थापना केली. त्याबरोबर दक्षिणेत एक प्रभावी राजवंश उदयास आला. तथापि वर्धा जिल्ह्याचा भाग बहमनींच्या अमलाखाली आला १३५८ च्या सुमारास. इ. स. १४८१ पर्यंत बहमनी साम्राज्याची सीमा पूर्वेकडे बऱ्याच भूभागापर्यंत जाऊन पोहोचली.[३६] बहमनींची विदर्भावर राजवट असताना सुलतान अहमदने

[३५] बहमनी राजवंशाचा हा संस्थापक पूर्वाश्रमीचा ब्राह्मण होता हा फेरिश्ताने प्रतिपादित केलेला सिद्धांत इतिहासकारांनी संशोधनांती असत्य ठरविला आहे. फेरिश्ताच्या मते बहमन शहा दिल्लीच्या गंगू नामक ब्राह्मणाचा नोकर होता. त्याच्या प्रामाणिकपणाने प्रभावित होऊन गंगू ब्राह्मणाने त्याची रदबदली करून दिल्लीच्या दरबारात त्याला मोठेपणा मिळवून दिला, ही कथा असत्य असून बहमन शहा हा मूळात मुसलमानच होता. त्याचे पूर्वज इराणी होते.

[३६] शेरवानी व जोशी, पूर्वोक्त, नकाशा, पृ. २०६–०७.

(१४२२–३६) गाविलगडची पुनर्बांधणी केली. या गडाच्या मूळ बांधणीचा अधिकृत इतिहास ज्ञात नसला तरी इतके निश्चितपणे म्हणता येईल की, तुर्कांच्या आक्रमणापूर्वी स्थानिक गवळी अधिपतींनी या ठिकाणाचे लष्करी डावपेचाच्या दृष्टीने महत्त्व ओळखून तेथे लहान किल्ला बांधला होता. गाविल नावाची व्युत्पत्ती गवळी राजावरून झाली असावी. गाविलगडची बांधणी हिंदू स्थापत्य पद्धतीची आहे[३७] यात शंका नाही. विदर्भाच्या संरक्षणाच्या दृष्टीने गाविलगडचे महत्त्व अनन्यसाधारण होते. गाविलगडइतका वऱ्हाडातील दुसरा महत्त्वाचा किल्ला म्हणजे नरनाळा. ज्याच्या हाती गाविलगड व नरनाळा त्याच्या हाती वऱ्हाड असे म्हणत असत. नरनाळासुद्धा सुलतान अहमदनेच डागडुजी करून दुरुस्त केला. विदर्भाच्या इतिहासात या दोन्ही गडांचा डावपेचांच्या दृष्टीने सर्व राजांनी उपयोग केल्याचे पुरावे आहेत. पुढील काळात नागपूरच्या भोसल्यांनाही संकटकाळी गाविलगडावर आश्रय घ्यावा लागला होता.

शम्सुद्दिन मुहम्मद तिसरा (१४६३–८२) च्या कारकिर्दीत महमूद गावान (ख्वाजा) वजीर म्हणून उदयास आला. संपूर्ण बहमनी राजवटीत खुलून दिसणाऱ्या या विद्याप्रेमी व गुणग्राहक वजिराने बऱ्याच शैक्षणिक व प्रशासकीय सुधारणा केल्या. बिदरचा सुविख्यात मदरसा (College of learning) हे तर त्याचे ज्वलंत स्मारक आहे. इतिहासकार मार्शलने म्हटल्याप्रमाणे, " It ranks among the greatest architectural creations in the East." बहमनी साम्राज्यातील अभ्यासक तेथे जात असत. प्रशासन अधिक परिणामकारक करण्यास्तव त्याने प्रांतिक पुनर्रचना केली. पूर्वीच्या चार प्रांतांचे (Atraf) विभाजन करून आठ प्रांत निर्माण केले. त्यानुसार वऱ्हाड प्रांताचे विभाजन करून गाविलगड व माहूर असे स्वतंत्र प्रांत निर्मिले. केंद्र सत्तेची पकड घट्ट करून नियंत्रण सुलभ करणे हा त्याचा उद्देश होता. गाविलगडचा उल्लेख उत्तर वऱ्हाड तर माहूरचा दक्षिण वऱ्हाड तर्फ (तरफ) असाही करण्यात येतो. गावानपूर्व कालीन पद्धतीनुसार प्रत्येक प्रांतामधील सर्व किल्ले तेथील तर्फदाराच्या (प्रांताधिकारी) अधिकार कक्षेत असत. त्यामुळे महत्त्वाकांक्षी अथवा बंडखोर तर्फदारास केंद्र सत्ता झुगारून लावणे शक्य होत असे. हा दोष घालविण्यासाठी गावानने तर्फदाराकडे केवळ एका किल्ल्याचे अधिकार ठेवून उर्वरित गड केंद्र सरकारकडे घेतले. प्रत्येक प्रांतातील काही भागाचा जमीन महसूल केंद्र सरकारकडे घेऊन महसुलाचे दर नव्याने निर्धारित केले. शिवाय महसूल वसुली केंद्रीय अधिकारी करू लागल्यामुळे तर्फदारांच्या अंतस्थ कारभारावर अंकुश ठेवणे शक्य झाले. महत्त्वाची बाब म्हणजे कृषी जमिनीची वर्गवारी करून जमीन मोजणीची प्रथा सुरू केली. जमिनीची प्रत व आकारावरून महसूल निर्धारित केला. पूर्वापार वतनदारांची वतनदारी नष्ट करण्यात मात्र गावानला यश आले नाही. परिस्थितीवशात वंशपरंपरागत वतने चालू ठेवणे त्यालाही भाग पडले. गावानच्या कारकिर्दीत इकडे पर्शिअन भाषेचा प्रसार झाला. त्याच्या वधानंतर (१५ एप्रिल १४८१) सुलतानाच्या लक्षात आले की, ख्वाजा महमूद गावानकडे केवळ ३०० लारी (Lari) इतकीच मिळकत शिल्लक होती, आणि ती मिळकत त्याने इराणमधून येताना आणलेल्या ४०,००० लारींच्या गुंतवणुकीपोटी मिळालेल्या व्याजापोटी आलेली होती.[३८] त्याच व्याजातून तो प्रतिदिनी ५०० व्यक्तींना जेवण व गरिबांना मदत करीत असे. स्वाभाविकपणे गावान सर्व थरांतील प्रजेमध्ये लोकप्रिय होता. निष्पाप गावानच्या वधाच्या टोचणीने व्यथित झालेला सुलतान पश्चात्ताप होऊन बरोबर एक चांद्र वर्षाने इहलोक सोडून गेला.

[३७] कुंटे, भ. ग., **गुलशने इब्राहिमी,** १९८२, पृ. १७७, ५७५.
[३८] शेरवानी व जोशी, पूर्वोक्त, पृ. १९३.

सामाजिक व धार्मिक स्थिती

यादव काळात सतीची प्रथा होती. खुद्द रामचंद्र यादवच्या निधनसमयी त्याच्या राणीला सावत्र मुलगा सिंघणने बळजबरीने सती जाण्यास भाग पाडले होते. त्या महिलेच्या हृदयद्रावक शोकपूर्ण आर्जवांची दखल न घेता तिला सिंघणने चितेवर नेल्याची नोंद इतिहासाने घेतलेली आहे.[३९] तथापि अशा घटना फार घडत नसत. वर्णव्यवस्थेस विकृत स्वरूप आले होते. सामाजिक अन्यायाची झळ केवळ शुद्रांनाच नव्हे तर वैश्यांनादेखील पोहोचली. जातियवाद फोफावला. त्यात भर पडली परकीय आक्रमकांच्या अत्याचारांची. आक्रमकांच्या उपद्रवाने निर्माण झालेली सामाजिक व धार्मिक व्यथा संत नामदेवाने पुढील शब्दात व्यक्त केली आहे :–

> दैत्याचेनि भारें दाटली अवनी ।
> ऐसे देव देहि फोडिले तुरकी । घातले उदकी बोभातीना ।।

जुलमी राजसत्तेमुळे सर्वत्र दैन्य, निराशा व अगतिकता पसरली होती. अशा अंधःकारमय काळी भागवत पंथ व महानुभाव पंथीय संतांनी परमेश्वर भक्ती व धर्माचरण हाच जीवित-साफल्याचा मार्ग आहे अशी शिकवण दिली. भक्तिभावातून दुःख व नैराश्यावर मात व परमेश्वराच्या आराधनेतून जीवनात आशा पल्लवित करण्याचा आध्यात्मिक मार्ग संतांनी दाखविला. हा आचार व विचार वारकरी पंथियांनी विदर्भातही प्रसृत केला. संत ज्ञानेश्वर व संत नामदेवाचा महिमा वर्ध्यापर्यंत पसरला. चिखली तालुक्यातील मेहुणा गावचा संत चोखा मेळा याची ख्याती व त्याचे अभंग आर्वी–वर्धा–हिंगणघाटपर्यंत पोहोचले.

बहमनी राजवटीत नाथ संप्रदायसुद्धा प्रसृत झाला होता. विदर्भातील वारकरी व नाथ संप्रदायांचा महत्त्वाचा समकालीन पंथ होता महानुभाव पंथ. अचलपूरला तर महानुभावांचे मोठे केंद्रच होते. चक्रधरस्वामींच्या **लीळाचरित्र** नामक ग्रंथात अचलपूरचा उल्लेख अळजपूर असा करून त्याचे वर्णन दिलेले आहे. अळजपुरात भैरव आणि आंबिनाथ मंदिरे होती.[४०] मुसलमान राज्यकर्त्यांनी अचलपूरचे एलिचपूर असे नामांतर केले. महानुभावांचे दुसरे महत्त्वाचे केंद्र रिद्धपूर हे अमरावती जिल्ह्यात असून आर्वीपासून जवळच आहे. रिद्धपूर तर महानुभावांचे बनारस मानले जाते. रिद्धपूरचा राजमठ व कृष्ण मंदिराची स्थापना खुद्द चक्रधरस्वामीने केल्याचा **अमरावती डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर** मध्ये (१९६८) उल्लेख आहे. चक्रधराने या प्रदेशात बरेच भ्रमण केल्याचे दिसून येते. माहूर ऊर्फ मातापूर हे सुद्धा महानुभावांचे बहमनी कालीन तीर्थक्षेत्र होते. इतके मात्र खरे की, वारकरी पंथ अधिक लोकाभिमुख असल्यामुळे महानुभाव पंथाचा प्रचार मर्यादित झाला.

बहमनी कालीन विदर्भात दत्त संप्रदायाचाही प्रचार झालेला होता. दत्त संप्रदायाचे पुनरुज्जीवन करणाऱ्या नृसिंह सरस्वतीचा जन्म तर याच भागातील लाडकारंजा गावी झालेला होता. बहमनी काळात नृसिंह सरस्वतीने वैदिक धर्मरक्षणाचे कार्य मोठ्या धडाडीने केले. त्या कार्यात काही मुसलमान सत्ताधाऱ्यांनीही मदत केल्याचा पुरावा आहे. अलाउद्दिन अहमद दुसरा (१४३६–५८) हिंदू प्रजाजनांमध्येही लोकप्रिय होता. दत्त संप्रदायाच्या

---

[३९] कित्ता, पृ. २१७.

[४०] नेने, ह. ना. (संपा.), **महाराष्ट्रीय आद्य चरित्रकार म्हाईम्भट संकलित लीळाचरित्र, भाग १**, पृ. ४.

गुरुचरित्र ग्रंथात अलाउद्दिनचे औदार्य, अंतःकरणाची विशालता व धर्मसहिष्णुतेबद्दल त्याची स्तुती केलेली आहे. तो ब्राह्मणांचा आदर करून त्यांच्याकडे भक्तिभावाने बघत असे. ब्राह्मणांबरोबर तो पवित्र वेदांवर चर्चा करीत असल्याचाही **गुरुचरित्रा** मध्ये उल्लेख आहे. इतकेच नव्हे तर त्याच्या धर्मविषयक उदार आचारविचारांमुळे काही सनातनी ब्राह्मण व मुसलमान क्रुद्ध झाल्याची स्पष्टोक्ती या ग्रंथात केलेली आहे.[४१]

फेरिश्ताच्या माहितीनुसार हिंदू लोकांमध्ये बालविवाहाची प्रथा सर्वसंमत होती. **ज्ञानेश्वरी व लीळाचरित्र** या ग्रंथांतून या विधानास दुजोरा मिळतो. विवाहसोहळे धुमधडाक्यात व उधळपट्टी करून संपन्न होत. मुसलमान सत्ताधीश हिंदू तरुणींशी विवाह करीत, परंतु हिंदू पुरुष मुसलमान तरुणीशी विवाहबद्ध झाल्याचे पुरावे नाहीत.

मुहम्मद दुसरा (१३७८–९७) स्वतः चांगला कवी होता. त्याने राज्यात एलिचपूर, दौलताबाद, जुन्नर, चौल, दाभोळ, कंधार, बिदर व गुलबर्ग्याला शैक्षणिक केंद्रे विकसित केली. येथे इस्लामिक विद्यादान करण्यात येई. विद्याप्रेमी ख्वाजा महमूद गावानने स्थापन केलेल्या बिदरच्या मदरसाचा उल्लेख वर आलेलाच आहे. बहमनी राज्यातील अभ्यासू या केंद्रामध्ये जात असत. तथापि या दोन राज्यकर्त्यांव्यतिरिक्त इतर बहमनींनी शैक्षणिक कार्य केल्याचे दिसत नाही. बहमनी काळात पंढरपूर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, घृष्णेश्वर, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर आणि बनारस ही हिंदू प्रजेची महत्त्वाची तीर्थक्षेत्रे होती. अकोल्याजवळचे शिरपूर जैनांचे तीर्थक्षेत्र होते.[४२]

बहमनींची केंद्रसत्ता दुर्बल झाल्यामुळे राज्याचे तुकडे पडून पुढीलप्रमाणे पाच स्वतंत्र राज्ये निर्माण झाली :—अहमदनगरची निजामशाही (१४९६), विजापूरची आदिलशाही (१४८९), गोवळकोंडयाची कुतुबशाही (१४९८), बिदरची बरीदशाही (१५०४) आणि वऱ्हाडची इमादशाही (१५१०). इमादशाहीची स्थापना करून फथउल्ला इमादशहाने अचलपूरला आपली राजधानी ठेवली (अचलपूरला एलिचपूर असे नाव देण्यात आले). मात्र संरक्षणाच्या दृष्टीने गाविलगडला इमादशहाने सेनादलाचे मुख्यालय ठेवले. वस्तुतः बहमनी दरबारातील कपटकारस्थान व अस्थिरतेचा लाभ घेऊन इमादशहाला १४८६ मध्ये आपले स्वातंत्र्य घोषित करता आले असते. तथापि सांगोपांग विचार करून त्याने १४८६ पासून आसन शांतपणे स्थिरस्थावर करण्यास प्रारंभ केला. मात्र मलिक हसनचा वध व कासिम बरीदचा बिदरवर प्रभाव प्रस्थापित होताच फथउल्ला इमादशहाने आपले स्वातंत्र्य घोषित केले. सन १५१० पर्यंत त्याने इमादशाही राजवट स्थिर केली. फथउल्लाच्या निधनाबाबत इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. फेरिश्ता त्याचा उल्लेख फक्त १५०९ पर्यंत करतो तर सय्यद अली १५०६ मध्ये फथउल्ला मरण पावल्याचे म्हणतो. सर वुल्सले हेगच्या मते तो १५०४ मध्ये मरण पावला असावा. हा तारखांमधील घोळ बघता इमादशाहीच्या स्थापनेबाबत संभ्रम निर्माण होतो. तथापि प्रा. शेरवानींनी संशोधन करून सिद्ध केले आहे की, फथउल्ला इमादशहाचा मृत्यू १५१० मध्ये झाला असावा. त्याच्यानंतर अलाउद्दिन इमादशाह (१५१०–१५३०), दर्या इमादशाह (१५३०–१५६१),[४३] व बुऱ्हान इमादशाह

---

[४१] शेरवानी व जोशी, पूर्वोक्त, पृ. २०९.

[४२] कित्ता, पृ. २२१.

[४३] फेरिश्ता त्याचा १५६१ नंतर उल्लेख करीत नाही.

(१५६२–१५७४) यांनी राज्य केले. इमादशाही राजवटीचा अंमल पूर्वेला फक्त वर्धा नदीपर्यंतच प्रस्थापित झाला. त्यामुळे वर्धा जिल्ह्याचा इतिहास देताना इमादशाहीबाबत कथन करणे अनावश्यक होय.

गोंड राजे

शेरवानी व जोशी यांनी वर्धा नदी हीच इमादशाही राज्याची पूर्व सीमारेखा दाखविली आहे.[४४] त्यांनी तयार केलेल्या नकाशावरून (१४६०–१५७४) सिद्ध होते की, इमादशाही राजवट वर्धा नदीपर्यंत असून वर्धा जिल्हा गोंडवनात समाविष्ट होता. बहमनींच्या ऱ्हासानंतर स्थानिक गोंड राजे स्वतंत्र झाले. त्यांच्यावर आपली सत्ता प्रस्थापित करणे इमादशाही आणि नंतरच्या निजामशाहीला शक्य झाले नाही. वुल्सले हेग या इतिहासकाराने दाखविल्याप्रमाणे बहमनी काळात १३९८ पर्यंत बहमनी साम्राज्याची पूर्व सीमा पेंच नदीपर्यंत पोहोचली होती.[४५] वर उल्लेख केल्याप्रमाणे हेगच्या मते इमादशाही राजवटीची सीमा वर्धा नदीपर्यंतच होती.

तत्कालीन गोंड राजांचा सलग इतिहास अद्याप उपलब्ध झालेला नाही. वस्तुतः फेरिश्ता प्रथम मूर्तजा निजामशहाच्या (१५६५–१५८८) दरबारी होता आणि नंतर त्याने विजापूर दरबारी मानाचे स्थान मिळविले. या प्रदेशात प्रदीर्घ काळ राहून देखील फेरिश्ताने गोंड राजांबद्दल विशेष लिहून ठेवलेले नाही. इतके मात्र निश्चितपणे म्हणता येईल की, बहमनींच्या विघटनानंतर गोंडवनात चार राज्ये अस्तित्वात आली. त्यांची नावे पुढीलप्रमाणे होती :—(१) उत्तरेकडील गढ-मांडल्याचे राज्य, (२) देवगडचे राज्य, (३) खेरल्याचे राज्य व (४) दक्षिणेकडील चांदा ऊर्फ चंद्रपूरचे गोंड राज्य. वर्धा जिल्ह्यातील उत्तरेकडचे तालुके खेरल्याच्या राज्यात तर दक्षिणेकडील तालुके चांदा राज्यात समाविष्ट होते.[४६]

या प्रदेशात अत्यंत दाट झाडी होती. म्हणूनही त्याचा महानुभाव साहित्यामध्ये झाडिमंडल असा उल्लेख करण्यात आला असावा. गोंड लोक द्रविड वंशीय हिंदू होते. प्रामुख्याने यादवांच्या अंतानंतर गोंड राजे उदयास आले. बहमनींचे राज्य गोंडवनाच्या काही भागावर प्रस्थापित झाले होते, तरी गोंडांची सत्ता अबाधित राहिली. त्यांनी बहमनींचे औपचारिक सार्वभौमत्व मान्य करून खंडणी भरली असावी. तथापि त्यांच्या अंतर्गत कारभारात सार्वभौम सत्तेचा प्रभाव नसावा. नंतरच्या इमादशाही व निजामशाही राजांना मात्र गोंडवन ताब्यात घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे गोंडवनावर राज्य राहिले गोंडांचे.

वऱ्हाड अकबरला अर्पित

अहमदनगरच्या निजामशाहीमध्ये दुरावस्था पसरल्यामुळे दक्षिणेवर आपले सार्वभौमत्व प्रस्थापित करण्याची अकबराची महत्त्वाकांक्षा जागृत झाली. अहमदनगर, खानदेश, विजापूर

---

[४४] शेरवानी व जोशी, पूर्वोक्त, पृ. २८६–८७ मधील नकाशा.

[४५] वुल्सले हेग (संपा.), **दि केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया**, ग्रंथ ३ (एस. चांद अॅण्ड कं., नवी दिल्ली, १९६५), पृ. १९२–९३ मधील नकाशा क्र. ४.

[४६] अकबर कालीन **ऐन-इ-अकबरी** मध्ये खेरला राज्य वऱ्हाड सुभ्यातील एक भाग असल्याचा उल्लेख आहे. परंतु ही घटना पुढील काळातील होती. खेरला म्हणजे बेतुलजवळील पुरातन गोंड घराण्याचे स्थान असलेला प्रसिद्ध किल्ला होय.

व गोवळकोंड्याच्या सुलतानांकडे वकील पाठवून (१५९१) मुघलांचे सार्वभौमत्व मान्य करण्यास त्याने संदेश पाठविला. तसेच खंडणीची मागणी केली. शक्तिशाली अकबराची ही मागणी म्हणजे उघड धमकीच होती. खानदेशच्या सुलतानाने मागणीस मान्यता दिली, तर विजापूर व गोवळकोंड्याच्या राजांनी मौल्यवान नजराणे पाठवून वेळ मारून नेली. तथापि अहमदनगरने बादशहाची मागणी अमान्य केली. इब्राहीम निजामशहाच्या निधनानंतर (१५९५) चांदबिबीने राज्यकारभार आपल्या ताब्यात घेतला. त्याचबरोबर अहमदनगर दरबारमध्ये संघर्ष सुरू झाले. मियान मंझू या अहमदनगरच्या सरदाराने अकबराचा मुलगा मुराद याला मदतीस बोलावले. अकबरला ही तर सुसंधीच मिळाली. त्याने अहमदनगरवर सैन्य पाठविले. मुघली सैन्याने अहमदनगर किल्ल्यास वेढा दिला. विजापूर व गोवळकोंड्याच्या राजांनी या उत्तरेकडील अस्मानी संकटाचे गांभीर्य ओळखून चांदबिबीला मदत केली. चांदबिबीच्या प्रशंसनीय शौर्यामुळे मुरादला विजय मिळाला नाही, परंतु तिला मुरादबरोबर तह करावा लागला (१४ मार्च १५९६).[४७] तहानुसार मुघलांनी वऱ्हाड हस्तगत केला व चांदबिबीने बहादूर निजामशहाला सुलतान म्हणून मान्यता मिळवून मुघलांचे सार्वभौमत्व मान्य केले. अशा प्रकारे अकबराच्या दक्षिण दिग्विजयाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पडला.

तहानंतर अल्पावधीत मुघल सेनापती खान-इ-खानानने नरनाळा व गाविलगड ताब्यात घेऊन वऱ्हाडातील जालन्यास तळ ठोकला. दरम्यान मुघल व अहमदनगर यांच्यात प्रस्थापित झालेली अल्पकालीन शांतता भंग पावली. अहमदनगर, विजापूर व गोवळकोंड्यामध्ये एकोपा झाला व त्यांनी गोदावरीकाठी सोनपतला (सोनपेठ) मुघल फौजांचा मुकाबला केला. परंतु त्यांचा २७ जानेवारी १५९७ रोजी पूर्ण पराभव झाला. मुघलांचे सामर्थ्य वाढतच राहिले. राजपुत्र मुराद २ मे १५९९ रोजी मरण पावल्यावर[४८] अकबरने राजपुत्र दानीयालला दक्षिणेवर पाठविले. त्याने अहमदनगरला पुन्हा वेढा दिला. आता तर ही लढत भयंकर विषम होती—एका बाजूला मुघलांचे प्रचंड सामर्थ्य तर दुसऱ्या बाजूला घसरगुंडीला लागलेल्या सुलतानशाहीचे मर्यादित बल. प्राप्त परिस्थितीत चांदबिबीने मुघलांना शरण जाण्याचे ठरविले. ते काही सेनाधिकाऱ्यांना पसंत नसल्याने त्यांनी तिचा खून केला. त्यामुळे अहमदनगरची शोकांतिका अधिकाधिक विदारक बनू लागली. दिनांक १६ ऑगस्ट १६०० रोजी मुघली सुरुंगांनी अहमदनगर किल्ल्यास भगदाडे पाडून गड जिंकला व सुलतान बहादुरशहास बंदिवान केला.[४९] अशा प्रकारे अहमदनगरची निजामशाही समाप्त होऊन वऱ्हाड मुघल साम्राज्यात समाविष्ट झाला. अल्पावधीत चंद्रपूरच्या गोंड राजाने अकबराचे सार्वभौमत्व मान्य केले. त्यानंतर इतर गोंड राजांनीही मुघली सत्ता मान्य केली. त्याबरोबर वर्धा जिल्हा मुघलांच्या साम्राज्यात समाविष्ट झाला.

उपरोक्त मोहिमेच्या वेळी एलिचपूर व बाळापूरला काही दिवस वास्तव्य केलेल्या अबुल फझलने लिहिलेल्या **ऐन-इ-अकबरी** मध्ये वऱ्हाडची सविस्तर माहिती दिलेली आहे. **ऐन-इ-अकबरी** मध्ये पवनारचा उल्लेख पनार (Punar) असा असून तेथील भक्कम किल्ल्याचे वर्णन केलेले आहे. किल्ल्याच्या तिन्ही बाजू दोन नद्यांनी वेढलेल्या असल्याची त्यात माहिती

[४७] शेरवानी व जोशी, पूर्वोक्त, पृ. २५९.

[४८] कित्ता, पूर्वोक्त, पृ. २६०.

[४९] कित्ता.

आहे. **ऐन-इ-अकबरी** व इतर समकालीन आधार साहित्य तसेच नंतरच्या काळातील ग्रंथांच्या आधारे इतिहासकार प्रा. इर्फान हबीब यांनी १६०१ मधील मुघल साम्राज्याचा अॅटलास[५०] प्रकाशित केला आहे. त्यानुसार वऱ्हाड सुभ्याचे क्षेत्रफळ ४९,७८६ चौरस मैल (१,२८,९४५.७४ चौ. कि. मी.) असून जमीन महसूल (जमा) ६४,३२,०३,१९४ दाम इतका होता. दाम हे तांब्याचे नाणे असून **ऐन-इ-अकबरी** काळी ४० दामचे सममूल्य एक रुपया होते.[५१] वऱ्हाड सुभ्याचे मुख्यालय एलिचपूर येथे असून सुभ्याची विभागणी १६ सरकार (उपविभाग) यामध्ये केलेली होती. त्यांपैकी विद्यमान वर्धा जिल्ह्याचा बहुतांश भाग गाविल व पवनार सरकारांमध्ये तर काही भाग खेरला सरकारामध्ये समाविष्ट होता. गाविल सरकारचे मुख्यालय एलिचपूरला होते. किल्ल्याच्या नावावरून त्यास गाविल नाव ठेवलेले होते. गाविल सरकारात कवठे महाल व आर्वी महाल असून या सरकारचे क्षेत्रफळ ५,१४९ चौरस मैल (१३,३३५.९१ चौ. कि. मी.) व जमीन महसूल १३,४६,६६,१४० दाम होता.[५२] या सरकारमध्ये आष्टी, अंजी व करंजा-वढोणा ही इतर मोठी गावे होती. पवनार सरकारचे मुख्यालय पवनारलाच (पनार) असून त्यातील तत्कालीन महालांची नावे पुढीलप्रमाणे होती :—पवनार महाल, केळझर महाल व गिराड—मांडगाव महाल. गिराड-मांडगाव हा एकच महाल असल्याचा अब्दुल-हमीद लाहोरीलिखित **बादशाह नामा** या ग्रंथात उल्लेख सापडतो. तथापि याच महालाचे नाव **ऐन-इ-अकबरी** मध्ये मांडगाव-गिराड असे दिलेले आढळते.[५३] पनार सरकारचे क्षेत्रफळ १,३९४ चौरस मैल (३,६१०.४६ चौ. कि. मी.) असून जमीन महसूल १,३४,४०,४०० दाम होता.[५४] यावरून स्पष्ट होते की, गाविल सरकारचे क्षेत्रफळ व महसूल पवनारपेक्षा बऱ्याच पटीने जास्त होता. खेरला सरकारमध्ये वायगाव परिसरातील भूभाग अंतर्भूत होता.

ऐन-इ-अकबरी मध्ये वर्धा जिल्ह्याचे बरेच संदर्भ आलेले आहेत. पवनारच्या भक्कम किल्ल्याचे त्यात वर्णन केलेले आहे. आजही या किल्ल्याचे बुरुज व तटबंदीचे अवशेष आढळतात. छिंदवाड्याच्या देवगड गोंड राज्याचाही **ऐन-इ-अकबरी** मध्ये उल्लेख आहे. या ग्रंथातील माहितीनुसार वर्धा जिल्हा परिसरात कापूस, ज्वारी, गहू व भाताचे पीक प्रामुख्याने घेतले जाई. येथील शेतजमीन सुपीक व समृद्ध होती. वर्धा नदीचा उगम तापीच्या उगमस्थानापासून केवळ दहा कुरो (Kuroh) अंतरावरून झालेला असल्याचा उल्लेख या ग्रंथात आहे. एलिचपूरच्या टाकसाळीतून १५९५ मध्ये पाडलेल्या रुपयाच्या नाण्यांची **ऐन-इ-अकबरी** मध्ये नोंद आहे. अकबराचे काळी वर्धा जिल्ह्यातील सर्व शेतजमीन लागवडीखाली होती. जमीन महसुलाचा दर मात्र भयंकर जाचक म्हणजे एकूण उत्पादनाच्या एकतृतियांश होता. जमीन महसुलाव्यतिरिक्त सार्वभौम सत्तेचा प्रजेशी फारसा संबंध येत नव्हता.

ऐन-इ-अकबरी नंतर वर्धा जिल्ह्याबाबत अत्यल्प माहिती उपलब्ध आहे. गोंड राजांचे आपापसात सख्य नसले तरी मुघल अधिकाऱ्यांशी ते वैर पत्करत नसत. त्यामुळे या प्रदेशात बहुतांश काळी शांतता होती. औरंगजेबाच्या दक्षिणेकडील आक्रमणानंतर इकडील स्थानिक

---

[५०] इर्फान हबीब, **अॅन अॅटलास ऑफ दि मुघल एम्पायर** (ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली, १९८२), पृ. ७.

[५१] कित्ता, पृ. ७.

[५२] कित्ता, पृ. ७.

[५३] कित्ता, पृ. ३६.

[५४] कित्ता, पृ. ७.

मुघल सत्ता दुर्बळ बनली. त्याचा फायदा घेऊन देवगडचा गोंड अधिपती वऱ्हाडातील मुघल प्रदेशावर आक्रमण करू लागला. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी मुघल सेना त्याच्यावर चाल करून आली. आपले प्राण वाचविण्यास्तव त्याने औरंगजेबाकडे धाव घेतली. वर सांगितल्या-प्रमाणे बादशहाने त्याला आश्रय दिला तो इस्लाम धर्म स्वीकारल्यावर. त्यालाच बख्त बुलंद असे नाव देण्यात आले. त्याने नागपूर शहर वसविले. बख्त बुलंदच्या चांद सुलतान नामक वंशजाने नागपूरला राजधानी स्थलांतरित केली. वर्ध्याचा दक्षिण भाग त्याच्या राज्यात समाविष्ट करण्यात आला. अशा प्रकारे हा भाग मूळच्या देवगड राजाच्या ताब्यात गेला. तथापि उत्तरेकडील आष्टी व इतर भाग मराठ्यांकडे गेला.

छत्रपती शिवाजीचा सेनापती प्रतापराव गुजर याने १६७० मध्ये वैभव संपन्नतेसाठी प्रसिद्ध असलेल्या कारंज्यावर आक्रमण केल्यापासून या प्रदेशावर मराठ्यांची छाप पडली. कारंज्याच्या लढाईतील विजयाचे महत्त्व असे की, तेव्हापासून मराठ्यांना चौथाई वसुलीचा अधिकार प्राप्त झाला. त्याच आधारावर कालांतराने बाळाजी विश्वनाथ पेशव्याने मुघलां-कडून वऱ्हाड सुभ्याच्या चौथाईची सनद मिळविली.

प्रशासन व्यवस्था

अकबराच्या काळी तोडरमलनिर्मित "झबात" (Zabat) नामक जमीन महसूल 'बंदोबस्त' निर्धारित करण्यात आला होता. वऱ्हाड प्रांतातील या बंदोबस्ताबाबतची सखोल माहिती उपलब्ध नाही. खरे म्हणजे ही पद्धती या प्रदेशात प्रयोगावस्थेत होती. अकबरानंतर प्रशासन व्यवस्थेकडे औरंगजेबाने अधिक लक्ष पुरविले. औरंगजेबास दख्खन व विदर्भ प्रदेशाची चांगली माहिती होती. त्याच्या मुरशिद-कुली-खान नामक अधिकाऱ्याने या प्रांता-तील लागवडीखालील जमिनीची मोजणी करून घेतली. प्रत्येक जमीनधारकाकडील धारण क्षेत्राच्या नोंदी घेतल्या. जमिनीची उत्पादकता, उत्पादनाचे मूल्य व शेतीच्या आकारावरून जमीन महसुलाचे दर निर्धारित केले. हे दर 'बिघा' हे एकक मानून रूपयांमध्ये निर्धारित केले होते. औरंगजेबाचे काळी महसुलाचे दर एकूण उत्पन्नाच्या एक-तृतियांश ते एक-द्वितियांश-पर्यंत होते. अर्थातच हे दर प्रजेच्या दृष्टीने अत्यंत जाचक होते. अकोला जिल्ह्यातील अडगावच्या देशपांडे घराण्याकडील कागदपत्रांनुसार विदर्भातील जमिनीचे वर्गीकरण 'कीर्द' (लागवडीखालील) व 'नाकीर्द' (पडीक) असे करून कीर्द जमिनीमध्ये जिराईत व बागाईत असा फरक करण्यात आला होता. याशिवाय जमिनीचे वर्गीकरण खालसा, इनाम, काळी व पांढरी या चार प्रकारांत करण्यात आले होते. काळी जमीन म्हणजे लागवडी योग्य तर पांढरी म्हणजे गावठाणास योग्य असा फरक करून त्यानुसार जमिनीचे मूल्य ठरविण्यात आले होते.

" बेरीज दस्तुर लवाजीमा " (Berija Dastura Lawajima) नामक कागदपत्रांनुसार स्पष्ट होते की, औरंगजेबकालीन विदर्भात जमीन महसुलाव्यतिरिक्त इतर अनेक कर प्रजेकडून वसूल करीत. त्यातील काही करांची नावे पुढे दिली आहेत :—राहदारी (Rahdari), जकात, बाजार चुंगी, निहाल, सिंग-सिंगोटी, सरकीया दर, लाकडे जकाती, टोबारा व खावडी रोखा.[५५] याशिवाय विवाहाप्रीत्यर्थ एक कर लादण्यात आलेला होता. पुनर्विवाह

[५५] राहदारी = रस्त्यावरून नेलेल्या मालावरील कर. निहाल = फळ झाडांवरील कर. सिंग-सिंगोटी = पशुधनावरील विक्री कर. सरकीया दर = कापूस व सरकीवरील कर. लाकडे जकात = लाकडांवरील विक्री कर. टोबारा = बाजारातील घोड्यांच्या खाद्य-पिशवीवरील कर. खावडी रोखा = घर, घोडे व इतर काहींच्या विक्रीवरील कर.

करणाऱ्या दाम्पत्यावरसुद्धा कर बसविण्यात आला होता. शेतकरी प्रजेव्यतिरिक्त तांबोळी, तेली, रंगारी, कलाल, गोवारी, कसाई, खाटीक इत्यादी व्यवसाय गटांवर देखील कर लादण्यात आले होते. गमतीची बाब अशी की, या करांचे उत्पन्न केंद्र सरकारला न लाभता बऱ्याच वेळी स्थानिक अधिकाऱ्यांच्या खिशात जात असे.

त्या काळी वतनदार पद्धती चांगली प्रचलित झालेली होती. जमीनदार व वतनदार प्रजाजनांचा छळ करून महसूल गोळा करीत असत. या प्रदेशातील मुलकी प्रशासन सैनिकी स्वरूपाचे होते. वऱ्हाडचा प्रमुख सुभेदार असून त्याच्याखाली दिवाण, तहसीलदार, फौजदार व कोतवाल हे अधिकारी असत. या सर्व अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करताना त्यांची लढाऊ क्षमता विचारात घेतली जात असे. प्रशासकांचा जनतेशी फारसा संपर्क येत नसे. जो अल्पसा संपर्क यायचा तो फक्त वसुलीच्या कामासाठीच. स्वाभाविकपणे प्रशासक व प्रजा यांच्यामध्ये प्रचंड दरी निर्माण होत असे.

गोंड काळातील प्रशासन सरंजामी पद्धतीचेच होते. पहिल्या रघुजी भोसल्याने हा प्रदेश जिंकून घेईपर्यंत त्यावर राजगोंडांचे राज्य होते. राजगोंडांच्या अधिपत्त्याखाली स्थानिक गोंड राजे, रईस व ठाकूर नामक अधिकारी कारभार बघत असत. देवगडच्या राजाला खूष ठेवून ते प्रजेवर आपणास हवे तसे राज्य करीत असत.

नागपूरकर भोसल्यांनी हा प्रदेश जिंकून घेईपर्यंत येथे गोंडवन प्रशासन पद्धती अस्तित्वात होती. त्यानुसार ठाकूर नामक अधिकाऱ्याकडे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम असे. ठाकुराचे अधिकार मर्यादित असत. चोऱ्या, लुटालूट, बलात्कार इत्यादी स्वरूपाच्या गुन्ह्यांचा समाचार तो घेत असे. खरे तर ठाकूर म्हणजे काही ग्रामसमूहांचा प्रमुख होता. स्थानिक राजे व रईस देवगडच्या राजाच्या संरक्षणाखाली कारभार बघत असत. अंतर्गत बाबीमध्ये त्यांना स्वातंत्र्य असे. राजे, रईस व ठाकूर हे मानकरी देवगडच्या राजाकडे महसुलाचा भरणा करीत असत. गोंडवन प्रशासनाची एक विशेषता म्हणजे देशमुख व देशपांडे यासारखी वतने वंशपरंपरागत नव्हती. वर्धा नदीच्या पश्चिमेस वऱ्हाडात देशमुख व देशपांडे वतनदार अस्तित्वात होते. परंतु वर्धेच्या पूर्वेकडील प्रदेशात वंशपरंपरागत देशमुख व देशपांडे वतनदार भोसल्यांच्या काळी निर्माण झाले. गोंड काळी वर्धा-नागपूर परिसरात महसूल गोळा करण्याकरिता मुहरीर, वऱ्हाडपांडे, हुदार (Hudar), देशमुख व देशपांडे नामक अधिकारी नेमलेले होते. तथापि त्यांच्या नेमणुका वंशपरंपरागत नव्हत्या. पुढे भोसल्यांचे राज्य प्रस्थापित झाल्यानंतर हुदार यांना कमाविसदार आणि मुहरीर यांना फडणवीस अशी नावे प्राप्त झाली. भोसल्यांनी वऱ्हाडपांडे हे पद मात्र तसेच कायम ठेवले. गोंडवनातील विविध भागांत विविध प्रकारची प्रशासन पद्धती प्रचलित होती.

नागपूरचे भोसले

नागपूरचे भोसले क्षत्रीय कुळातील असून मराठ्यांच्या शहाण्णव कुळीत मोडतात. शिवछत्रपतींचे भोसले घराणे दौलताबादजवळच्या वेरुळचे. नागपूरचे भोसले हिंगणीकर म्हणून ओळखले जातात. पुणे जिल्ह्यातील दौंड व हिंगणीनजीकचे बेरडी हे उजाड झालेले खेडे नागपूरकर भोसल्यांच्या एका पूर्वजाने पुन्हा वसविले होते. त्याचे नाव अज्ञात असले तरी तो शिवाजीचा आजोबा मालोजीचा समकालीन असावा. नागपूरचे भोसले मूळचे उदयपूरचे सिसोदे राजपूत कुळातील होते, असे बखरकारांनी प्रतिपादिले आहे. त्यामुळे

शिवाजी महाराजांचे घराणे व नागपूरकरांचे घराणे एकाच कुळीतील असावे असे इतिहासकार मानतात. संभाजीपुत्र शाहू मुघलांच्या कैदेतून मुक्त झाल्यावर परत आला, तेव्हा तो तोतया असल्याचा दावा ताराबाईने केला होता. शाहूच्या जीवनातील हा कसोटीचा काळ होता. त्यावेळी नागपूरच्या परसोजी भोसल्याने शाहूसमवेत एका ताटात जेवून शाहू हा छत्रपती संभाजीचाच मुलगा आहे असे जोरदार प्रतिपादन केले. परसोजीने शाहूस सेनादलाचीही मदत केली.

परसोजीने शिवाजीच्या काळातही पराक्रम गाजवून मोठी कामगिरी केली होती. वऱ्हाड-गोंडवनात परसोजीने मराठ्यांचा प्रभाव निर्माण केला. त्याच्या कामगिरीवर संतुष्ट होऊन प्रथम छत्रपती राजारामने १६९९ मध्ये त्यास सेना-साहेब-सुभा हा किताब देऊन वऱ्हाड-गोंडवनातील चौथाई वसूल करण्याचे अधिकार बहाल केले. वर सांगितल्याप्रमाणे परसोजीने शाहूला छत्रपतिपद मिळण्यासाठी बरीच मदत केल्यामुळे १७०७ मध्ये शाहूनेही त्यास सेना-साहेब-सुभा हे पद पुन्हा बहाल केले. शाहूने दिलेल्या सनदेनुसार परसोजीस रिद्धपूर वऱ्हाड, देवगड व चंद्रपूर-गोंडवनावरील अधिकार प्राप्त झाले. त्यामध्ये गाविल, नरनाळा, माहूर, खेरला, पवनार व कळंब भागाचा समावेश होता. परसोजीनंतर त्याचा मुलगा कान्होजीस सेना-साहेब-सुभा हे पद प्राप्त झाले. यवतमाळ जिल्ह्यातील भाम गावी कान्होजीने आपले ठाणे केले. भामहून त्याने वऱ्हाड व गोंडवन प्रांतात मुलुखगिरी केली. इतके मात्र खरे की, शाहूच्या विश्वासातील पराक्रमी कान्होजी निजामाच्या कुटील राजनीतीस बळी पडल्याने त्याने शाहूविरुद्ध बंडाचा प्रयत्न केला (१७२५). म्हणून त्याने शाहूची मर्जी गमावली.

कान्होजीनंतर रघुजी पहिला यास सेना-साहेब-सुभा हे पद शाहूने बहाल केले (१७२८). वस्तुत: सेना-साहेब-सुभा हा सातारच्या छत्रपतीचा मांडलिकच होता. तथापि शाहू व पेशव्याच्या मर्जीमुळे रघुजीस बरेच अधिकार प्राप्त झाले. रघुजी (पहिला) याने १७३७ च्या सुमारास देवगडची राणी रतनकुवर हिला घरगुती यादवीत मदत करून देवगडच्या राज्याचा एक तृतियांश भाग पदरात पाडून घेतला. थोड्याच कालावधीत त्याने आपली राजधानी भामवरून नागपूरला स्थलांतरित केली. सन १७४८ पर्यंत वर्धा व नागपूरसह संपूर्ण देवगड राज्य रघुजीच्या अमलाखाली आले. रघुजीने नागपूरला आपले स्थान बळकट केले. राज्यकारभारात सुधारणा केली आणि राज्यविस्तार करण्यावर भर दिला. रघुजी जेव्हा सेना-साहेब-सुभा पदाची वस्त्रे घेऊन वऱ्हाडकडे गेला तेव्हा त्याने पुणे व सातारा भागातील अनेक मुत्सद्दी बरोबर नेले होते. त्यांनी प्रशासन सुधारण्यास चांगली मदत केली. त्यांच्यामधून रघुजीने दिवाण, चिटणवीस, पोतनीस, फडणवीस, बक्षी व शिक्केनवीस या पदांवर वाकबगार माणसांची नियुक्ती केली. ही सर्व मुत्सद्दी माणसे शाहूच्या शिफारशीवरून रघुजीने नेली होती. सर्व जण शाहूच्या विश्वासातील असल्याकारणाने रघुजीच्या कारभारावर सातारच्या छत्रपतीस नजर ठेवणे शक्य झाले. शिवाय भोसल्यांची सत्ता स्थिरस्थावर होण्याच्या कामीही त्यांचा चांगला उपयोग झाला.

सेना-साहेब-सुभा हा सर्वाधिकारी राजा नव्हता. सांविधानिकरीत्या तो सातारचा छत्रपती व पेशव्यास जबाबदार होता. पेशवा अथवा छत्रपतीचे आदेश त्याच्यावर बंधनकारक होते. तथापि शाहूच्या निधनानंतर छत्रपतीची केंद्रसत्ता कमकुवत झाली. नागपूरचे भोसले स्वतंत्रपणे वावरू लागले. त्यामुळे पेशवे व भोसले यांच्यात मधूनमधून कलह निर्माण होत

असत. रघुजीने कारभार हाती घेताच प्रशासन व्यवस्थेची रचना अधिक कार्यक्षम केली. रघुजीचा दिवाण राज्यकारभारविषयक सर्व बाबींवर लक्ष ठेवत असे. त्यास कारभारी असेही म्हणत. या पदावर भास्करपंत कोल्हटकरची नेमणूक केली. चिटणवीस म्हणजे भोसल्यांचा मुख्य सचिव. राजाचा खाजगी पत्रव्यवहार, राजाच्या नावे काढलेली आज्ञापत्रे व ताकीदपत्रे, करविषयक बाबींमध्ये सूट देण्यासाठी निर्गमित केलेले परवाने आणि राज्यकारभारविषयक महत्त्वाच्या बाबींची जबाबदारी चिटणविसाकडे होती. त्याशिवाय चिटणवीस राजनीतीविषयक बाबींमध्ये राजास सल्ला देत असे. रखमाजी गणेश रणदिवे हा रघुजीचा चिटणवीस होता. राजनिष्ठेसाठी रघुजीने त्यास नागपूर जिल्ह्यातील वरंभ गाव वंशपरंपरागत इनाम म्हणून दिले. रघुजीच्या सेनाप्रमुख पदी भास्कर राम होता. त्याने बंगालवरील स्वाऱ्यांमध्ये विशेष शौर्य गाजविले. तथापि भास्कर राम भोसल्यांच्या सर्व सेनेचा प्रमुख नव्हता. त्याच्याव्यतिरिक्त रघुजी करंडे, आनंदराव वाघ, बाबाजी घाडगे, झुंझारराव आणि संभाजी शिर्के या सरदारांच्या सेना रघुजीस स्वतंत्ररीत्या उपलब्ध होत्या. भोसल्यांच्या दरबारातील पोतनीस नामक अधिकाऱ्याकडे खजिना, राजघराण्याचे जडजवाहिर, दागिने आणि किमती वस्तूंची जबाबदारी होती. फडणवीस खऱ्याअर्थी वित्त सचिव होता. सेनादलातील कर्मचाऱ्यांना वेतन वाटण्याचे काम बक्षीकडे होते. भोसल्यांची राजमुद्रा व इतर शिक्के ठेवण्याची जबाबदारी शिक्केनवीसकडे होती. नंतरच्या भोसल्यांनी मुनशी नामक परराष्ट्र व्यवहार सचिवाचे पद निर्माण केले. मुनशी पदावरील व्यक्तीस फारशी भाषेचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक होते. कारण बराचसा पत्रव्यवहार फारशीमधून चालत असे. नंतरच्या भोसल्यांच्या काळात एकाच व्यक्तीकडे दोन-दोन खाती असल्याचेही दिसून येते. जमीन महसूल गोळा करण्याची जबाबदारी वऱ्हाडपांडेकडे होती. मराठा सरदारांना मानकरी म्हणत. सर्व मानकरी राजाज्ञा पाळीत.

भोसल्यांचा दरबार खुल्या दरबारगृहात भरत असे. मंत्री, सचिव व सेनाधिकारी दरबारात हजर असत. सर्व व्यवहार खुल्या पद्धतीने होत असे. राजा नागरिकांची गाऱ्हाणी ऐकून त्यावर स्वतः निर्णय देत असे. बहुतांश दिवाणी आणि फौजदारी दाव्यांचा निकाल महसूल खात्याकडून दिला जाई. ग्रामप्रमुखांना न्यायदानाचे काही अधिकार होते. महत्त्वाच्या दाव्यांवर सेना-साहेब-सुभा याच्याकडे अपील करता येत असे. त्यावर अंतिम निवाडा भोसले आपल्या दरबारात करीत. भोसले प्रशासनात ब्रिटिश पद्धतीच्या औपचारिक प्रथा नव्हत्या. इतके मात्र खरे की, परगणा व ग्राम पातळीवरील प्रशासक शेतकऱ्यांचे शोषण करीत. महसुलाचे दर जाचक तर होतेच. शिवाय वसुली निर्दयपणे करण्यात येई.

पराक्रमी रघुजी १४ फेब्रुवारी १७५५ रोजी निधन पावला. त्याच्यानंतर मुधोजी व जानोजी या सावत्र भावांमध्ये गादीसाठी तंटा निर्माण झाला. त्यात बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्याने तडजोड घडवून जानोजीकडे दौलतीची मालकी व सेना-साहेब-सुभ्याचे पद दिले. मुधोजीस चंद्रपूर व छत्तीसगड प्रांत देऊन त्यास 'सेना-धुरंधर' असा किताब दिला. ही तडजोड १७५७ मध्ये झाली तरी जानोजीची सनद ऑगस्ट १७६१ पर्यंत निर्गमित झाली नव्हती. दरम्यान त्या दोघांमध्ये वादतंटे चालूच होते. परंतु जानोजी व मुधोजीने उत्तर भारतात मराठ्यांचा जम बसविण्याचा प्रयत्न केला. जानोजीने बुंदेलखंडातील राजांना वर्चस्वाखाली आणले. मुधोजीने मात्र विशेष कामगिरी केली नाही. जून १७६१ मध्ये जानोजी नागपूरला परत आला. जानोजी व माधवराव पेशवा यांच्यात सख्य निर्माण झाले नाही. वऱ्हाडात भोसले व निजामाचा संयुक्त अंमल चालत होता.

त्यामुळेही कारभाराच्या प्रश्नावरून त्यांच्यात संघर्ष निर्माण होई. माधवराव, रघुनाथराव आणि जानोजी यांच्यात सख्य नव्हतेच. त्या संघर्षात भर पडत असे निजामाची. देवाजीपंत चोरघडे हा पेशवाईतील तेव्हाच्या साडेतीन शहाण्यांपैकी एक होता. जानोजीने त्यास माधवरावकडे शिष्टाईस पाठविले. तथापि देवाजीपंताच्या शिष्टाईचा काही उपयोग झाला नाही. विश्वासपात्र नसलेल्या देवाजीने पेशवाविरोधी कारवाया केल्याने माधवरावला त्यास अटकेत ठेवावे लागले. जानेवारी १७६९ पर्यंत पेशव्याने वर्ध्याच्या पश्चिमेकडील प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. पुढे जानोजीने पेशव्याशी सलोखा केला. जानोजी १६ फेब्रुवारी १७७२ रोजी मरण पावल्यावर भोसले गादीसाठी पुन्हा वाद निर्माण झाला. मुधोजीने जानोजीचा मुलगा साबाजी यास लढाईत ठार करून भोसले गादी मिळवली. नंतर नाना फडणविसाच्या सल्ल्यानुसार सेना-साहेब-सुभा हे पद दुसऱ्या रघुजीकडे आले. त्याने १८०० च्या सुमारास आपली सत्ता उत्तरेकडील नर्मदेपासून दक्षिणेस गोदावरीपर्यंत आणि पश्चिमेस वऱ्हाडपासून बंगालच्या उपसागरापर्यंत विस्तारित केली.

देवगावच्या तहानुसार (१७ डिसेंबर १८०३) दुसरा रघुजी भोसले इंग्रजांचा अंकित बनला. मराठेशाहीच्या नाशाचा हा एक टप्पाच होता. नागपूरला रेसिडेंटचा कारभार सुरू झाला. नागपूरचा रेसिडेंट म्हणून माऊंटस्टुअर्ट एलफिन्स्टनची नेमणूक झाली (२९ जानेवारी १८०४). तेव्हापासून नागपूरकर भोसल्यांची सत्ता घसरू लागली. नागपूरची गादी खालसा करणे ब्रिटिशांना धोक्याचे वाटत होते. परंतु रघुजी भोसल्याच्या वंशात वारस नव्हता. अशा स्थितीत ब्रिटिशांनी नागपूरच्या गादीवर तिसऱ्या रघुजीस स्थानापन्न केले. संपूर्ण सत्ता मात्र रेसिडेंटच्याच हाती होती. कालांतराने राजाची उर्वरित सत्ताही संपुष्टात आली. सर रिचर्ड जेन्किन्स, कॅप्टन हॅमल्टन, वाइल्डर आणि मॅनसेल हे एका पाठोपाठ रेसिडेंट पदी आले.

रघुजीच्या कारकिर्दीतील उल्लेखनीय घटना म्हणजे ब्रिटिश सरकारच्या आदेशानुसार (१८३७) सतीची चाल बंद करण्यात आली. सन १८४९ मध्ये नागपूर शहरात पहिला विलायती पद्धतीचा दवाखाना उघडण्यात आला. याच सुमारास मिशनरी रेव्हरंड स्टीफन हिस्लॉप याने नागपूरला इंग्रजी शाळा सुरू केली. शाळेत **बायबलचे** धडे शिकवण्यात येत असत. तिसरा रघुजी ११ डिसेंबर १८५३ रोजी निपुत्रिक मरण पावल्यावर नागपूर संस्थान खालसा करण्याची इंग्रजांना संधी मिळाली. लॉर्ड डलहौसीच्या सरकारने नागपूरचा रेसिडेंट मॅनसेल याची सूचना स्वीकारून नागपूर संस्थान खालसा केले. रेसिडेंट मॅनसेल हाच नागपूरचा पहिला कमिशनर बनला, आणि १३ मार्च १८५४ पासून ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाली.

नवीन स्थित्यंतर

भोसल्यांची गादी खालसा केल्यावर नागपूर आणि सागर-नर्मदा परिसरातील प्रदेश प्रशासनाच्या दृष्टीने इंग्रजांना एक समस्या वाटू लागली. या प्रदेशांमध्ये भाषिक भेदांव्यतिरिक्त सांस्कृतिक व वांशिक भेदही होते. वर्धा-नागपूर-भंडारा परिसरात बहुसंख्य प्रजा मराठी भाषिक तर उत्तरेकडील व पूर्वेकडील भागात हिंदी व गोंडी भाषिक लोक होते. रघुजी भोसल्याने (पहिला) १७४३ मध्ये नागपूरला राजधानी स्थापन केल्यापासून पश्चिम महाराष्ट्र व वऱ्हाडातून शेकडो मराठी भाषिक कुटुंबे नागपूर-वर्धा भागात स्थलांतरित झाली. त्यांच्यात क्षत्रीय व लढवय्यांखेरीज मुत्सद्दी, व्यापारी, सावकार, पुरोहित आणि

कारागीर समाविष्ट होते. त्यांच्या आगमनाबरोबर स्थानिक समाजरचनेत परिवर्तन होणे अपरिहार्य होते. हे नवीन आप्रवासी (Immigrants) गबर होऊन त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. राजघराण्यात त्यांचे वजन असल्याने त्यांनी महत्त्वाच्या जागा मिळविल्या. त्यामुळे प्रजेलाही त्यांचे प्रभुत्व मान्य करावे लागले. परिणामतः एके काळी प्रमुख असलेले गोंड अधिकारी व त्यांचे अनुयायी उत्तरेकडील सातपुडा, महादेव व मैकल डोंगर रांगांमध्ये स्थलांतरित झाले. गोंडीऐवजी मराठी भाषा अधिक प्रचारात आली. सामाजिक स्थित्यंतर होऊन त्याचे बरेच परिणाम झाले. मराठी भाषिक आप्रवाशांव्यतिरिक्त राजस्थान, विंध्यप्रदेश व मैकल भागांतूनही बरीच कुटुंबे वर्धा-नागपूर परिसरात स्थायिक झाली. त्यांनी व्यापार व सावकारीवर भर दिला. सावकाशपणे आपली आर्थिक स्थिती सुधारून तेही प्रबळ बनले. द्रव्यबळामुळे समाजात त्यांचेही स्थान उंचावले. अशा प्रकारे मराठी व हिंदी भाषिकांनी आपापले स्थान स्थिर केल्यावर त्यांच्यात कलह निर्माण होणे स्वाभाविकच होते. त्याशिवाय १८५७ चा उद्रेक पसरला त्या प्रदेशाच्या सीमेजवळच वर्धा-नागपूर भाग होता. या उद्रेकात पांडुरंग खानखोजेंच्या आजोबाने मोठी कामगिरी केली होती. त्या स्मृती वर्धा-आर्वी भागात जागृत होत्या. प्राप्त परिस्थितीत सामाजिक कलहाबरोबर इंग्रजविरोधी भावना प्रबळ होत गेल्या. ही स्थिती इंग्रजांना चिंताजनक वाटू लागली.

अठराशे सत्तावनचा अनुभव व वाढत्या प्रशासकीय समस्यांवर उपाय म्हणून १८६१ मध्ये इंग्रजांनी नागपूर आणि सागर-नर्मदा प्रदेशातील मराठी व हिंदी जिल्ह्यांचा समावेश करणारा सेंट्रल प्रॉव्हिन्सेस नामक प्रांत निर्माण केला. विविध भाषा, संस्कृती व वंशांच्या जनतेला एकत्र बांधण्याचा इंग्रजांनी विचार केला असावा. त्यातील दुसरी असंगती (Anomaly) अशी की, सेंट्रल प्रॉव्हिन्सेसवर गव्हर्नरची नेमणूक न करता चीफ कमिशनरची नियुक्ती केली. मुंबई इलाखा किंवा इतर प्रांतांच्या गव्हर्नरांना असलेले अधिकार चीफ कमिशनरला नव्हते. प्रत्येक महत्त्वाच्या आदेशासाठी त्याला कलकत्त्याच्या गव्हर्नर जनरलवर अवलंबून राहावे लागे. इतका मोठा भूभाग, पण त्याचा प्रमुख चीफ कमिशनर! त्यामुळे प्रशासनात अडचणी येत, इतर इलाख्यांसारखी प्रशासनातील कार्यक्षमता नव्हती. रिचर्ड जेन्किन्सने प्रारंभिलेली (१८२२) प्रशासन पद्धतीच बहुतांशपणे चालू राहिली. प्रारंभी नागपूर जिल्ह्यातच वर्ध्याचा भाग समाविष्ट केलेला होता. कालांतराने इतक्या मोठ्या भूभागावर जिल्हा प्रशासन करणे गैरसोयीचे वाटल्याने १८६२ मध्ये नवीन जिल्हा निर्माण करून त्याचे मुख्यालय पुलगावनजीकच्या कवठा गावी ठेवण्यात आले.

सन १८६१–१८६५ दरम्यान अमेरिकेत झालेल्या भीषण यादवी युद्धामुळे इंग्लंडमधील कापड उद्योगास अमेरिकन कापूस मिळेनासा झाला. भारतीय कापसाव्यतिरिक्त अमेरिकन कापसावर इंग्लंडमधील कापड उद्योग अवलंबून होता. अमेरिकेकडून आयात बंद झाल्यामुळे भारतीय कापसास अभूतपूर्व मागणी येऊन विलक्षण तेजी आली. त्या स्थितीस "कॉटन बूम" असे संबोधण्यात येते. कॉटन बूमच्या कालावधीत कापसास श्वेत सुवर्ण (White Gold) म्हणून महत्त्व आले. मुंबईच्या शेअर बाजारात तेजीने आकाश गाठले. त्यास "शेअर मॅनिआ" असे नाव मिळाले. प्रत्येक दिवशी कापसाचे भाव वाढत असत. मुंबईतील कापसाचे व्यापारी, विशेषतः भाटिआ, बनिआ व पारसी, मिळेल तेथून कापूस उपलब्ध करीत. त्यांचे एजंट गुजरातव्यतिरिक्त खानदेश व विदर्भात कापूस खरेदीच्या मोहिमेवर असत. हिंगणघाटच्या कापसाने तत्पूर्वीच इंग्लंडच्या कापड उद्योगात नाव मिळविले होते. येथील कापूस 'हिंगणघाट' या नावानेच इंग्लंडमध्ये ओळखला जात असे. परिणामतः हिंगणघाटबरोबर

संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील कापसास मागणी वाढली. भाव वाढले व आर्थिक स्थिती सुधारली. अशा परिस्थितीत कवठ्यासारख्या खेड्यात जिल्हा मुख्यालय ठेवणे अधिकाऱ्यांना पसंत नव्हते. मुंबई-नागपूर लोहमार्ग वर्ध्यापर्यंत पोहोचलेलाच होता. म्हणून मूळ पालकवाडी नाव असलेल्या लोहमार्गावरील गावी मुख्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. शहराचे नियोजन चांगल्याप्रकारे करण्यासाठी पालकवाडीतील घरे पाडण्यात आली. नगर नियोजनाचा आराखडा तयार करण्यात आला आणि १८६६ मध्ये नवीन शहर वसविले. वरदायिनी वर्धा नदीवरून नव्या शहरास वर्धा नाव देण्यात आले. जिल्हा मुख्यालयाचे वर्ध्याला स्थलांतर त्याच वर्षी करण्यात आले. पुढील वर्षापासून लोहमार्गावरून आगगाड्या धावू लागल्या आणि मुंबई-पुण्याशी दळणवळणाची सुविधा उपलब्ध झाली. व्यापारी मालाच्या वाहतुकीबरोबरच रेल्वेने मुंबई-पुण्याशी सांस्कृतिक व शैक्षणिक अभिसरणाची प्रक्रिया सुरू केली. सन १८७७ मध्ये वर्ध्याहून वरोऱ्यापर्यंत दुसरा लोहमार्ग कार्यान्वित करण्यात आला.

इंग्रजांची सत्ता, प्रशासकीय सुधारणा, मराठी व हिंदी भाषिकांचा आप्रवास आणि रेल्वे सुविधांमुळे झालेला शिक्षणाचा प्रचार याव्यतिरिक्त वर्धा जिल्ह्याच्या सामाजिक आणि राजकीय जीवनावर प्रभाव टाकणारी आणखी एक शक्ती उदयास आली. ही शक्ती म्हणजे मालगुजारी. जमीन खंडाने देणारा व सरकारचा वसूल जमा करून देणारा मालगुजारांचा वर्ग प्रभावी झाला. इंग्रजांनी मालगुजारीला मंजुरी देऊन एका एका मालगुजाराकडे गावेची गावे सोपवून दिली. या जमीन धारा पद्धतीनुसार आपल्या महालातील वसुली करण्याची जबाबदारी मालगुजारांवर टाकण्यात आली. मागील शतकातील मालगुजार शेती कसणाऱ्यांचे शोषण तर करीतच शिवाय इंग्रजांचा अनुग्रह संपादन करण्यासाठी दडपशाही-चाही अवलंब करीत. मालगुजारांच्या रूपाने प्रभावी वर्ग वर्ध्यात निर्माण झाला. बरेच मालगुजार इंग्रज अधिकाऱ्यांशी स्नेहसंबंध ठेवीत, तर मुत्सद्दी अधिकारी मालगुजारांना आपलेसे करीत.

जमनालालजींसारखा महान राष्ट्रीय वृत्तीचा मालगुजार उदयास आल्यावर मात्र परिस्थिती बदलू लागली. गांधीजींची असहयोग चळवळ फोफावल्यावर आणि विशेषत: डिसेंबर १९२० चे नागपूर काँग्रेस अधिवेशन गांधीजींनी यशस्वी करून दाखविल्यावर जमनालालजींचे हात बळकट झाले.[५६] धनिक व्यापारी व काही मालगुजार हे बजाज व गांधीजींचे अनुयायी बनले. बरेच मालगुजार काँग्रेसच्या प्रचारकार्यात उतरले तर काहींनी अर्थ सहाय्य देऊन राष्ट्रीय कार्यात भाग घेतला. गांधीजींनी सेवाग्रामला आश्रम स्थापन केल्यावर धनिक व मालगुजारांचा काँग्रेस चळवळीतील सहभाग आणखीच वाढला.

आधुनिक काळ[५७]

महात्मा गांधींच्या वास्तव्याने पुनित झालेले सेवाग्राम म्हणजे तत्कालीन भारताची अशासकीय राजधानी. गांधीजींनी १९३४ मध्ये वर्ध्यास स्थलांतर केल्यापासून भारताचे भवितव्य घडविणारे अतिशय महत्त्वाचे निर्णय (Momentous Decisions) या पवित्र

[५६] या विषयाचे विस्तृत विवेचन "**आधुनिक काळ**" या भागात केले आहे.

[५७] **आधुनिक काळ** यावरील लेखन डॉ. कि. का. चौधरी, **कार्यकारी संपादक व सचिव,** महाराष्ट्र गॅझेटिअर, यांनी केले आहे.

परिसरात घेण्यात आलेत. प्रांतिक स्वायत्तता मंजूर करून भारतीय संघीय सरकार पातळीवर स्वायत्ततेचे तत्त्व नाकारणाऱ्या १९३५ च्या भारत सरकार अधिनियमावर (Government of India Act, 1935) बहिष्कार घालण्याचा काँग्रेसचा निर्णय येथेच झाला. प्रांतिक स्वायत्तता तत्त्वानुसार व्हावयाच्या निवडणुकीचा काँग्रेसचा महत्त्वपूर्ण निवडणूक जाहीरनामा येथूनच घोषित करण्यात आला. काँग्रेस बहुमतात असलेल्या प्रांतांमध्ये व्हाइसरॉयने गांधीजींना दिलेल्या हमीनंतर, काँग्रेसने अधिकारग्रहण करण्याचा निर्णय घेतला सेवाग्रामलाच. दुसऱ्या जागतिक महायुद्धात भारतीयांचा आणि काँग्रेसचा कौल न घेता भारताला महायुद्धाच्या खाईत व्हाइसरॉयने लोटले, याचा निषेध करण्यात आला सेवाग्रामहून. केवळ शाब्दिक निषेधावर न थांबता काँग्रेस प्रांतांमधील लोकनियुक्त सरकारांना सत्तात्याग करण्याचा आदेश देण्यात आला सेवाग्राममधूनच. गांधीजींनी १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या शांततामय युद्धतंत्राची सिद्धता केली येथूनच. पवनार आश्रमस्थ विनोबाजी भावे हे तर वैयक्तिक सत्याग्रहातील देशातले पहिले सत्याग्रही. आणि तदनंतर भारतालाच नव्हे तर संपूर्ण ब्रिटिश साम्राज्यास प्रभावी हादरा देणाऱ्या "छोडो भारत" आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला वर्धा-सेवाग्रामला. छोडो भारतची सत्याग्रही युद्धनीती ठरविण्यात आली येथूनच.

राष्ट्रवादी चळवळीचे केंद्रस्थान असलेल्या वर्धा-सेवाग्रामला प्रत्येक पुढाऱ्याचे अनेक वेळी आगमन झाले. तसेच जगातील असंख्य महान राजकीय पुढाऱ्यांचे व विचारवंतांचेही आगमन झाले. ग्रेट ब्रिटनचे पंतप्रधान जोसेफ चेंबरलेन व सर विंस्टन चर्चिल, अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट इत्यादी महासत्ताधीशांचे लक्ष वेधून त्यांना अस्वस्थ करणाऱ्या प्रेरणा येथूनच प्रसृत झाल्या. स्वराज्य, सत्य व अहिंसेचा संदेश गांधीजींनी जगाला येथूनच दिला. चर्चिलने ज्याचा नंगा फकीर म्हणून उल्लेख केला त्याचे हे निवासस्थान होते. चार्ली अँड्रयूज (C. F. Andrews), जॉर्ज स्लोकोम्ब, लुई फिशर इत्यादी उदारमतवादी राजकीय विचारवंतच नव्हे तर १९४२ ची विफल क्रिप्स योजना आणणारा सर स्टॅफर्ड क्रिप्ससुद्धा १९३९ मध्ये बापू कुटीमध्ये शेणाने सारवलेल्या जमिनीवर आसनस्थ झाला होता. इंग्लंडचा एक महान नौसेनाधिपती ॲडमिरल स्लेड याची ध्येयवेडी सुकन्या मिस मॅडेलीन स्लेड महात्माजींनी बहाल केलेले मीरा बेन हे नाव धारण करून लक्षावधींचे लक्ष वेधून येथे राहिली. खरे तर गांधीजींच्या आधीच मीरा बेन सेवाग्रामला आश्रमस्थ झाल्या.

भारतीयांचे स्फूर्तिस्थान असलेल्या वर्धा-सेवाग्रामचा १९३४ पासूनचा इतिहास खचितच स्फूर्तिदायक तसेच बोधप्रद आहे. तथापि तत्पूर्वी काँग्रेसच्या स्थापनेपासूनचा (१८८५) राजकीय व सामाजिक इतिहास देणे आवश्यक आहे. म्हणून काँग्रेसची स्थापना झाल्यापासूनचा इतिहास खालील परिच्छेदांमध्ये दिला आहे.

काँग्रेसची स्थापना व पूर्वेतिहास

काँग्रेसच्या स्थापनेपासून पाश्चिमात्य शिक्षण प्राप्त केलेल्या व्यक्तींमध्ये राष्ट्रवादाचा विचार सावकाशपणे मूळ धरू लागला. नवविचाराचा प्रसार होऊ लागला. सन १८६७ पर्यंत मुंबईहून वर्धा-नागपूरपर्यंत रेल्वे आलेलीच होती. त्याबरोबर नवविचार व जागृतीचे वारेही आले. सन १८८८ पर्यंत रेल्वे कलकत्त्यापर्यंत पोहोचल्यावर बंगालमधील राजकीय विचार इथपर्यंत येणे सुलभ झाले. राष्ट्रवादी विचार पाश्चिमात्य शिक्षणाने प्रभावित

झालेल्या माणसांपर्यंतच मर्यादित होता. परंतु मुंबई-पुण्याकडून राजकीय प्रेरणा सारख्या येत होत्या. आर्वीला वैचारिक केंद्र तयार झाले. विचार प्रसार करणारे ग्रंथालय तेथे १८६५ मध्येच स्थापन करण्यात आलेले होते. त्याच काळात नागपूर-अमरावती प्रदेशात रघुनाथ नरसिंह मुधोळकर (१८५७–१९२१), सर गंगाधरराव माधवराव चिटणवीस (१८६३–१९२९), गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे (१८५४–१९३८) आणि बी. के. बोस यांचेसारखे पुढारी उदयास आले. धुळ्यात जन्मलेले मुधोळकर मुंबईच्या एलफिन्स्टन महाविद्यालयातून १८७७ मध्ये बी.ए. व गव्हर्मेन्ट लॉ स्कूलमधून १८८० मध्ये एलएल. बी. पदवी प्राप्त करून अकोला येथे व नंतर अमरावतीस वकिली करू लागले. अल्पावधीतच ते कॉंग्रेसकडे आकर्षित होऊन १८८८ पासूनच कॉंग्रेसमध्ये दाखल झाले आणि १९१७ पर्यंत त्या पक्षाचा विचार प्रसृत करण्यात मग्न झाले. भारतीयांची गाऱ्हाणी ब्रिटिशांच्या नजरेस आणण्यासाठी १८९० मध्ये जे कॉंग्रेस शिष्टमंडळ इंग्लंडला गेले त्यात मुधोळकरांचा समावेश होता.[५८] पुणे सार्वजनिक सभेच्या धर्तीवर मुधोळकरांनी वऱ्हाड सार्वजनिक सभेची १८८६ मध्ये स्थापना केली. हा एक नवीन विचारमंच सुरू झाला व त्याचा प्रभाव पसरला. आर्वीस या विचारमंचाचे बरेच प्रभावक्षेत्र निर्माण झाले. कॉंग्रेस अधिवेशनासाठी १८८९ (मुंबई कॉंग्रेस) पासूनच वर्धा जिल्ह्यातून प्रतिनिधी जाऊ लागले. हरिभाऊ केळकर, दामोदर खरे व पुरुषोत्तम परांजपे अधिवेशनास नेहमी जात असत. लखनौ कॉंग्रेसच्या (१८९९) निर्णयानुसार कॉंग्रेसमध्ये प्रांतांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्यात आले. त्यात वर्ध्याचे हरिभाऊ केळकर यांना निवडण्यात आले.[५९]

गंगाधरराव चिटणवीस हे दुसरे प्रभावी व्यक्तिमत्व या परिसरात निर्माण झाले. गंगाधरराव सुशिक्षित तसेच जमीनदार वर्गात बरेच लोकप्रिय होते. अशा परिस्थितीत मुधोळकर, चिटणवीस व बोस यांच्या प्रयत्नांमुळे कॉंग्रेसचे १८९१ चे अधिवेशन नागपूरला भरविण्यात आले. कॉंग्रेसची गंगोत्री विदर्भात आली. कार्यकर्त्यांना अनुभव येऊन राष्ट्रीय कार्य करण्याची संधी मिळाली. नागपूर कॉंग्रेसचे अध्यक्ष होते आनंद चार्लू.

गोपाळ कृष्ण गोखले व बाळ गंगाधर टिळकांचा १८८९ च्या मुंबई कॉंग्रेसपासून राजकीय उदय झाल्यावर टिळकांना अमरावतीच्या दादासाहेब खापर्ड्यांसारखा अनुयायी लाभला. मुधोळकर, चिटणवीस व खापर्डे या समकालिनांपैकी मुधोळकर व चिटणवीस यांनी गोखले, सुरेंद्रनाथ बानर्जी व मुंबईच्या पुढाऱ्यांची राजकीय विचारधारा पत्करली, तर खापर्डे बनले टिळकवादी. या तिघांमध्ये विलक्षण संघटना कौशल्य होते. इतके मात्र खरे की, त्यांच्या पुढारीपणाखाली कॉंग्रेसला मध्यप्रांतात[६०] पाठिंबा मिळाला प्रामुख्याने श्रीमंत मालगुजार, सावकार व बँक व्यवसायी, व्यापारी आणि वकील वर्गाचा. या सर्वच वर्गांचे प्रांतिक ब्रिटिश शासनाशी व्यवसायाच्या नात्याने संबंध होते. मध्यप्रांतातील तत्कालीन पुढाऱ्यांमध्ये मवाळ वकील, सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी व अल्पशिक्षित जमीनदारांचा

---

[५८] सेन, एस. पी. (संपा.), **डिक्शनरी ऑफ नॅशनल बायोग्राफी, खंड ३** (इंस्टिट्यूट ऑफ हिस्टॉरिकल स्टडीज, कलकत्ता, १९७४), पृ. १४७–४८.

[५९] कडवे, रघुनाथ, **१९४२ चा आष्टी-स्वातंत्र्य संग्राम** (संस्कार प्रकाशन, नागपूर, १९८६), पृ. ४-५.

[६०] तत्कालीन सेंट्रल प्रॉव्हिन्सेसमधील वर्धा, नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यांसाठी या लेखनात मध्यप्रांत ही संज्ञा वापरलेली आहे.

समावेश असल्यामुळे "मवाळ विचारधारा" असलेल्यांचे प्राबल्य होते.[६१] वंशपारंपरिक सावकारीचा व्यवसाय करणारे चिटणवीस राजकारणात आले ते मुळी जिल्हा मंडळ सदस्य (१८८८), मानसेवी दंडाधिकारी (१८८९), नागपूर नगरपालिका अध्यक्ष (१८९६–१९१८), व्हाइसरॉयच्या विधान परिषदेचे सदस्य (१८९३–१८९५, १८९८–१८९९ आणि १९१८) इत्यादी मानाच्या जागा भूषवित. त्यांना सरकारी किताब बहाल करण्यात आले. सातव्या एडवर्डच्या राज्यारोहण सोहळ्यास उपस्थित राहण्यास्तव १९०२ मध्ये त्यांना बादशहाचे अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. सन १९०७ ते १९१६ दरम्यान त्यांनी प्रांतिक विधान परिषदेत मध्यप्रांतातील मालगुजारांचे प्रतिनिधित्व केले होते. एकूण चिटणवीस बडी असामी होती. मोठे प्रस्थ असल्यामुळे त्यांचे भोवती काँग्रेसजन गोळा होत. आणि मुधोळकर तर त्यांचे उत्साही राजकीय पाठिराखेच होते.[६२] गंगाधर-रावांचा आर्वी, वर्धा, हिंगणघाट व पुलगाव येथील समाज जीवनावर खूपच प्रभाव होता. सन १९०० मध्ये पुलगाव कापड गिरणीचे ते अध्यक्ष होते. ही गिरणी कृष्णराव फाटकांच्या खटपटीने सुरू झाली होती. हिंगणघाटची गिरणी तर केशवराव भवाळकरांच्या प्रयत्नाने स्थापन झाली होती.

दादासाहेब खापर्डे १८९१ च्या नागपूर काँग्रेसपासून टिळकांचे निकटवर्ती झाले. टिळकांची राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रांतील विचारसरणी त्यांनी शिरोधार्ह मानली. इतकेच नव्हे तर ते टिळकांचे प्रबळ समर्थक बनले. राष्ट्रीय पुढाऱ्यांमधील 'जहाल' व 'मवाळ' या संघर्षात त्यांनी जहाल पक्ष स्वीकारला. त्यांना आर्वीत अनेक अनुयायी मिळाले. अमरावती, नागपूर व आर्वीच्या आपल्या अनुयायांसह खापर्डे राष्ट्रवादी कार्य करू लागले.

खापर्डे, मुधोळकर, चिटणवीस व काँग्रेसमध्ये नव्याने प्रवेश करणारे बाळकृष्ण शिवराम मुंजे (१८७२–१९४८) यांच्या प्रयत्नाने १८९७ चे काँग्रेस अधिवेशन अमरावतीस भरले. त्यामुळे अमरावती-आर्वी-वर्धा-नागपूर-यवतमाळ परिसरातील कार्यकर्त्यांना राजकीय क्षेत्रात काम करण्यास उत्तेजन मिळाले, संधी उपलब्ध झाली. अमरावती काँग्रेसचे अध्यक्ष सर शंकरन नायर, ज्येष्ठ पुढारी सुरेंद्रनाथ बानर्जी, खापर्डे इत्यादींनी कारागृहात असलेल्या टिळकांच्या विमोचनासाठी प्रभावी भाषणे केली. तथापि त्या विषयीचा ठराव संमत होऊ शकला नाही. जहाल आणि मवाळांमधील संघर्ष अमरावती काँग्रेसपासून वाढीस लागला.

सन १८९१ नंतर अवघ्या सहा वर्षात मध्यप्रांतातील अमरावतीस भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाने (१८९७) या परिसरातील सुशिक्षितांमध्ये बराच उत्साह निर्माण झाला. अमरावती-नागपूरबरोबर आर्वी हे राष्ट्रीय चळवळीचे केंद्र बनले. टिळकांचा चाहता वर्ग तेथे निर्माण झाला. नेटिव लायब्ररी नावाने आर्वीस स्थापन झालेल्या ग्रंथालयास टिळकांचे नाव देण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. त्यास अर्थातच इंग्रजांचा विरोध होता. शेवटी संयोजकांनी टिळकांच्या नावाचा आग्रह न धरता लोकमान्य वाचनालय असे नाव स्वीकृत केले (१९२७).

वंगभंग चळवळ व स्वदेशी आंदोलनाने (१९०५) वर्धा जिल्ह्यात मूळ धरले. लोकमान्य टिळकांनी प्रचार दौरे करून येथे जनजागरणाचे कार्य केले. टिळकांच्या सभांना बराच

[६१] चौधरी, के. के., **महाराष्ट्र अॅण्ड इंडियन फ्रीडम स्ट्रगल** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८५), पृ. १४.

[६२] कित्ता, पृ. १५.

जनसमुदाय जमत असे. सन १९०६ च्या कलकत्ता काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी टिळकांच्या नावाचा जहालांनी पुरस्कार केला. त्यात खापर्डे अग्रभागी होते. तथापि काँग्रेस श्रेष्ठींनी दादाभाई नवरोजींना इंग्लंडमधून मुद्दाम आणून अध्यक्ष केले. पुढील वर्षाची काँग्रेस (१९०७) नागपूरला भरविण्याचे खापर्डे, वीर वामनराव जोशी, मुंजे व नारायणराव अळेकर गटाने निकराने प्रयत्न केले. टिळकांना अध्यक्षपद प्राप्त व्हावे हा त्यांचा उद्देश होता. त्यासाठी या परिसरातील बरेच कार्यकर्ते कलकत्त्याला गेले होते. परंतु या उपक्रमाला वेगळेच स्वरूप आले. जहाल आणि मवाळ यांचा वाद कलकत्त्यात अधिकच वाढला. फिरोजशाह मेहता, दिनशा वाच्छा, गोखले व मुंबईचे इतर पुढारी यांच्या गटाने १९०७ ची काँग्रेस नागपूरलाच भरविण्याचे कलकत्त्यास ठरविले. मवाळ पुढाऱ्यांचा खरा हेतू होता की, गंगाधरराव चिटणवीस, बोस व मुधोळकर या स्थानिक पुढाऱ्यांचा उपयोग करून टिळकांना काँग्रेस अध्यक्षपदापासून वंचित करावे. टिळकांनी अध्यक्षपदासाठी जोरदार मोहीम उघडली. म्हणून चिटणवीस–मुधोळकर-बोस हे पुढारी टिळकांना रोपविण्यात यशस्वी ठरण्याची शक्यता अत्यल्प असल्याचे फिरोजशाह-गोखले यांच्या लक्षात आले. प्राप्त परिस्थितीत नागपूरच्या नेत्यांवर विसंबून न राहता १९०७ चे अधिवेशन आपला बालेकिल्ला असलेल्या सुरतला घेण्याचा ठराव फिरोजशाहांच्या निवासस्थानी घेण्यात आला.[१३] त्यानुसार मुंबई इलाख्यात अधिवेशन होणार असल्याने टिळकांना अध्यक्षपदापासून पुन्हा वंचित व्हावे लागले. या संघर्षात टिळकांचे मोठे समर्थक होते खापर्डे व नरसिंह चिंतामण केळकर.

गधर पक्षाचे पांडुरंग सदाशिव खानखोजे (१८८४–१९६७) :–– टिळकांचे अनुयायी असलेले आणि महान क्रांतिकारी कार्य केलेले खानखोजे म्हणजे वर्धा जिल्ह्यातील एक मोठे पुढारी होते. खानखोजेंचे आजोबा व्यंकटेश खानखोजे मूळचे काटोलचे असून त्यांनी १८५७ च्या बंडामध्ये भाग घेतला होता. गोसावी अथवा फकिराचा वेश धारण करून व्यंकटेश खानखोजे १८५७ च्या बंडातून सहीसलामत सुटून पालकवाडी (वर्धा) येथे स्थायिक झाले. अशा या क्रांतिकारकाच्या घरात पांडुरंग खानखोजेसारख्या क्रांतिकारी गधर पुढाऱ्याचा जन्म झाला. पांडुरंगाचा जन्म वर्धा शहरात ७ नोव्हेंबर १८८४ रोजी झाला. त्याच्या कुटुंबास खानखोजे असे नाव पडण्याचे कारण की, नागपूरकर भोसल्यांच्या काळात नागपूरजवळील आदिवासी गोंड लोकांचे गुप्तपणे धर्मांतर करणाऱ्या एका खानाचा शोध (खोज) घेण्यासाठी भोसल्यांनी पांडुरंगाच्या एका पूर्वजाची नियुक्ती केली होती. त्यानुसार खानाचा खोज करणारे हे खानखोजे बनले.

शालेय जीवनापासूनच पांडुरंग क्रांतिकारी वृत्तीचा आणि निधड्या छातीचा विद्यार्थी होता. तरुणपणापासून 'बाल समाज', 'बांधव समाज' आणि 'समर्थ शिवाजी समाज' या क्रांतिकारी संघटनांचा पांडुरंग सभासद बनला. ब्रिटिशांविरुद्ध उठाव करण्याच्या घोषणांमुळे त्यास शाळेतून दोनदा काढून टाकण्यात आले होते. इतकेच नव्हे तर त्याचे लग्न दोनदा ठरले असताना देखील आपल्या क्रांतिकार्यात वैवाहिक जीवनाची बाधा येईल म्हणून पांडुरंगाने विवाहबद्ध होण्यास नकार दिला. (एकदा तर आपल्या नियोजित वधूच्या पित्यास त्याने सांगितले की, क्रांतिकार्यामध्ये आपण ठार झाल्यास तुमची मुलगी विधवा होईल. असा त्याचा बाणेदारपणा होता.)

[१३] चौधरी, के. के., पूर्वोक्त, पृ. २६.

सन १९०२ ते १९०५ या दरम्यान पांडुरंगाने बऱ्याच गुप्त संघटना आणि क्रांतिकारकांशी संपर्क साधला. क्रांतिकार्यासाठी परदेशात जाऊन लष्करी शिक्षण घेण्याचे त्याने ठरविले. टिळक, स्वामी रामतीर्थ आणि इतर पुढाऱ्यांनी सुद्धा पांडुरंगाच्या या कल्पनेस पाठिंबा दिला. परदेशगमनाचे त्याने बरेच प्रयत्न केले. शेवटी १९०६ मध्ये सायगावला जाणाऱ्या फ्रेंच आगबोटीवर सफाईगाराची नोकरी पत्करून परदेशगमन केले. त्याचा सहप्रवाशी होता हनुमंत नायडू. सायगावला पोहोचल्यानंतर काही चिनी क्रांतिकारकांच्या मदतीने पांडुरंग जपानला गेला. जपानमधील भारतीय क्रांतिकारकांच्या सहाय्याने त्याने टोकीयो येथे नोकरी पत्करली. सन १९०८ मध्ये सान फ्रान्सिस्को परिसरात भूकंप झाल्यामुळे अंगमेहनतीचे काम करणाऱ्या मजुरांची मागणी वाढली. या संधीचा फायदा घेऊन पांडुरंग आणि हनुमंत नायडू अमेरिकेत गेले. तेथे कॅलिफोर्नीयामधील लष्करी शिक्षण शाळेमध्ये प्रवेश मिळवून पांडुरंगाने १९०९ मध्ये त्या विषयातील पदविका मिळविली. त्याशिवाय कृषिशास्त्राचा अभ्यास करून भारतीय स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या अमेरिकेतील भारतीय कार्यकर्त्यांशी संपर्क साधला. या दरम्यान खानखोजे, लाला हरदयाल आणि भाई परमानंद यांनी अमेरिकेत इंडियन इंडिपेन्डन्स पार्टी स्थापन केली.

सन १९१३ मध्ये उपरोक्त पक्षाला गधर पार्टी असे नाव देण्यात आले. १९१४ ते १९२० या काळात पांडुरंगाने गधर पक्षाच्या कार्यासाठी पूर्णपणे वाहून घेतले. तो त्या पक्षाचा मोठा पुढारी बनला. दरम्यान इंग्लंडच्या आग्रहानुसार गधर पक्षाच्या हालचालींवर अमेरिकन सरकारने सक्त नजर ठेवली. पहिले महायुद्ध सुरू झाल्यानंतर गधर पक्षाच्या आंदोलनास गती मिळाली. पक्षाचे क्रांतिकार्य परिणामकारक करण्यासाठी खानखोजे, हरदयाल आणि भाई परमानंद यांनी जर्मनीची मदत घेऊन ब्रिटिशांशी लढण्याचा निर्धार केला. त्यानुसार खानखोजे अमेरिकेतून ग्रीस आणि टर्कीमध्ये गेले. आपल्या साथीदारांसह ते बर्लिनला जाऊन पोहोचले. जर्मन सरकारच्या मदतीने गधर क्रांतिकारकांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड करण्यासाठी पश्चिम आशिया, पर्शिया, अफगाणिस्तान आणि बलुचिस्तानकडे प्रयाण केले. या उपक्रमात वेषांतर करून खानखोजेंनी मुस्लिम नाव धारण केले होते. पर्शियातील ब्रिटिशांविरुद्धच्या बंडामध्ये खानखोजेंनी भाग घेतला. दुर्दैवाने बंडखोरांचा पराभव झाल्यामुळे खानखोजे गुप्तपणे बगदादला पोहोचले. तेथे ब्रिटिशांशी लढणाऱ्या काशघई (Kashghai) टोळ्यांमध्ये ते सामील झाले. ब्रिटिश सैन्याबरोबर झालेल्या लढाईत खानखोजे गंभीरपणे जखमी होऊन मृतप्राय झाले. ते मरणासन्न असल्यामुळे त्यांना युद्धकैदी म्हणून औषधोपचार मिळाले. तथापि थोडे बरे झाल्यावर येथून ते निसटले. महायुद्ध संपल्यानंतरसुद्धा (१९१८) ब्रिटिश सरकारचा त्यांच्या मागे अविरत ससेमिरा होताच.

पुढे १९१९ मध्ये वेषांतर करून ते एका सरदाराचा सचिव म्हणून भारतात आले आणि टिळकांना भेटले. टिळकांच्या सल्ल्यानुसार ते पुन्हा बर्लिनला परत गेले[६४] आणि १९२१ ते १९२४ पर्यंत तेथेच राहिले. इतक्या वर्षांच्या अविरत क्रांतिकार्यानंतर खानखोजेंनी १९२४ मध्ये मेक्सिकोमध्ये जाऊन कृषिशास्त्राचा उच्च अभ्यास केला. कृषिशास्त्रात डॉक्टरेट पदवी प्राप्त करून मेक्सिकन सरकारच्या कृषी विभागाचे ते संचालक बनले. कृषिशास्त्राच्या ज्ञानात त्यांनी बरीच भर घातली. क्रांतिकार्याच्या अंतानंतर १९३६ मध्ये त्यांनी एका बेल्जियन महिलेशी लग्न करून संसारी जीवनाचा प्रारंभ केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मध्यप्रांत

[६४] कित्ता, पृ. ३९-४०, आणि एस. पी. सेन, पूर्वोक्त, खंड २, पृ. ३३३-३४.

सनाने कृषी सुधारणा समितीचे अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी त्यांना १९४९ मध्ये रतात आमंत्रित केले. त्यानुसार त्यांनी कृषी सुधारणा समितीसाठी आपले योगदान रून मोठी कामगिरी केली.

तरुणपणापासून १९२४ पर्यंत भारतीय स्वातंत्र्य आंदोलनासाठी परदेशात क्रांतिकार्य रणाऱ्या खानखोजेंचे कार्य महान आहे. युरोप व पश्चिम आशियामधील त्यांच्या हालचाली णि कारवाया अत्यंत रोमांचकारी होत्या. या क्रांतिकारकाने १८ जानेवारी १९६७ रोजी हलोक सोडला.

म रूलपासून असहयोगाकडे

टिळकांनी होम रूल चळवळीस पाठिंबा मिळविण्यासाठी या प्रांताचा झंझावाती दौरा ला. आर्वीत टिळकांचे मोठे स्वागत झाले व त्यांना २००० रुपयांची थैली अर्पण करण्यात ली. सेठ खुशालचंद जाजू, पुरुषोत्तम चिपळूणकर, परशुराम थत्ते व वसंत कदमांनी बरेच रिश्रम घेतले. वर्ध्यातही होम रूल कार्यकर्ते उदयास आले. गंगाधर देशमुख, तुकाराम दार व मनोहर देशपांडेंचा त्यात समावेश होता.[६५] फेब्रुवारी १९१८ मध्ये टिळकांनी वर्धा, र्वी, पुलगाव, हिंगणघाट व सिंदीला दौरा करून प्रचारकार्यास चालना दिली. त्यामुळे म रूल चळवळीचा वर्धा जिल्ह्यात प्रसार होऊन १९१९ मध्ये होम रूल लीगच्या शाखा र्धा, आर्वी, हिंगणघाट, सेलू व आष्टीस स्थापन झाल्या.[६६] अल्पावधीतच (१९२० मध्ये) र्वी तालुका काँग्रेस समिती स्थापन झाली.

राजकीय जागृतीशी संबंधित अशा या काळातील घटनांचा उल्लेख करणे आवश्यक हे. मुंबईशी रेल्वे दळणवळण इतके वाढले की, मुंबई-नागपूर एकेरी लोहमार्ग अपुरा डल्यामुळे लोहमार्ग दुहेरी करणे भाग पडले. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर हे काम ९१९ मध्ये सुरू करून १९३२ पर्यंत पूर्ण केले. तसेच दिल्ली-मद्रास लोहमार्गही बांधून रा करावा लागला. आता वर्धा शहराचा मुंबई, पुणे, कलकत्ता, दिल्ली व मद्रासशी लोह-ार्गाने संपर्क प्रस्थापित झाला. शिक्षणासाठी बरेच विद्यार्थी या शहरांना जाऊ लागले. ागपूरला कला, विज्ञान, वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये होतीच. नागपूर विद्या-ठाची १९२३ मध्ये स्थापना झाल्यावर उच्च शिक्षणास उत्तेजन मिळाले. सन १९१८ मध्ये नर्माण झालेल्या हिंदी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने राष्ट्रीय पुढाऱ्यांचे इकडे येणे वाढले. राठी भाषिकांनी नागपूरला १९२३ मध्ये विदर्भ साहित्य संघाची स्थापना करून एक गळे व्यासपीठ निर्माण केले. त्याचा राजकीय प्रचारासाठी उपयोग होणे अपरिहार्य होते.

सावकार, धनिक, मालगुजार व वकिलांच्या प्रभावाखालील नागपूर-वर्धा-अमरावती रिसरात दोन नवीन संघटना उदयास आल्या :—नोव्हेंबर १९२३ मध्ये स्थापन झालेली हिंदू हासभा व १९२५ मध्ये उदयास आलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. हिंदू महासभेचे अध्वर्यु ोते डॉ. मुंजे, तर आर. एस. एस. चे संस्थापक होते डॉ. केशव बळीराम हेडगेवार. हिंदुत्वाची

[६५] **नागपूर प्रांताचा इतिहास : १८८५-१९३५** (नागपूर प्रांतिक काँग्रेस सुवर्ण महोत्सव मंडळ, नागपूर, १९३५), पृ. २४-३५.

[६६] बेकर, डी. इ. यू., **चेंजिंग पॉलिटिकल लीडरशीप इन ॲन इंडियन प्रॉव्हिन्स : दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲंड बेरार : १९१९-१९३९** (ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, नवी दिल्ली, १९७९), पृ. ४६.

जोपासना करणे दोन्ही संघटनांचे ध्येय असले तरी हेडगेवारांचा दृष्टिकोन क्रांतिकारी स्वातंत्र्यवाद्याचा होता तर मुंजे वसाहतीच्या स्वराज्याचे (Dominion Status) पुरस्कर्ते होते. हेडगेवारांनी गांधीजींच्या असहयोग आंदोलनात सक्रीय भाग घेतला. मुंजेंनी देखील सक्रीय पाठिंबा दिला. हेडगेवारांचा वर्धा-आर्वी भागात बराच चाहता वर्ग होता. वर्धा जिल्ह्याच्या पुढील राजकीय चळवळीमध्ये या दोन्ही संघटनांचा सहभाग कधी काँग्रेसशी सुसंवादी तर कधी विसंवादी होता.

जमनालाल बजाज यांचा उदय

जमनालालजींचा उदय ही वर्धा जिल्ह्याच्या दृष्टीने महत्त्वाची घटना होती. भारतीय राजकारणाच्या दृष्टीनेही ही महत्त्वाची घटना होती. राष्ट्रीय आंदोलनाचे केंद्रस्थान पुण्या-मुंबईतून वर्ध्याला येण्यास त्यामुळे चालना मिळाली. रचनात्मक राष्ट्रवादी व दानशूर[६७] जमनालालजींमुळे कार्यकर्त्यांचे मोहोळ व क्रियाशील संघटना वर्ध्याभोवती निर्माण होण्यास मदत झाली. संघटना व संस्था निर्मितीस लागणारी जागा व वित्तबळ जमनालालजींनी तत्परतेने प्रदान केल्यामुळे राष्ट्रीय संस्थांचा मार्ग मोकळा झाला. जमनालालजींमुळे महात्माजींचे प्रभाव क्षेत्र विकसित होण्यास मदत झाली. बजाज गांधीजींचे शिष्यच नव्हे तर "पाचवे पुत्र" बनले (१९२०). तेव्हापासून जमनालालजींनी २२ वर्षे महात्माजींचे अनुयायी, शिष्य व मदतगार म्हणून उत्कृष्ट भूमिका वठविली. जानेवारी १९२१ पासून निधनापर्यंत त्यांनी काँग्रेसचे कोषाध्यक्ष म्हणून अतिमहत्त्वाची कामगिरी केली. खेडा सत्याग्रह, चंपारण सत्याग्रह व रौलट सत्याग्रहानंतर गांधीजींनी असहयोग आंदोलन उभारले. त्याबरोबरच त्यांनी तत्कालीन जुन्या काँग्रेस पुढाऱ्यांना धक्का दिला होता. दिनांक १ ऑगस्ट १९२० रोजी असहयोग आंदोलन सुरू झाले होते. पण जुने काँग्रेस पुढारी त्याकडे उदासीन दृष्टिकोनातून बघत होते. गांधीजींना आपल्या सत्याग्रही आंदोलनाची अपरिहार्यता अद्याप सिद्ध करावयाची होती. आणि त्याचसाठी सप्टेंबर १९२० च्या कलकत्ता विशेष काँग्रेसनंतर डिसेंबर १९२० चे नागपूर काँग्रेस अधिवेशन यशस्वी करून दाखवायचे होते. असहकारविषयक ठराव संमत करून घ्यावयाचा होता. नागपूर काँग्रेस म्हणजे खऱ्या अर्थी गांधीजी व काँग्रेसची सत्वपरीक्षा होती. या पार्श्व-भूमीवर गांधीजींनी नागपूर काँग्रेसच्या स्वागत समितीचे अध्यक्षपद स्वीकारण्यास बजाजना सांगितले.[६८] ही तर बजाजजींना आपले कौशल्य व निष्ठा सिद्ध करण्यासाठी लाभलेली सुसंधी होती. त्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अधिवेशन सर्वतोपरी यशस्वी करण्यासाठी वर्धा-नागपुरातील सर्व व्यापारी, धनिक मारवाडी, प्रगतिशील स्वयंसेवक व कार्यकर्त्यांनी अधिवेशनाच्या यशासाठी खूप परिश्रम घेतले. बजाजजींनी पंडित भगवानदीन आणि अर्जुनलाल सेठी, व पंडित सुंदरलाल या अनुक्रमे राजस्थान व उत्तर प्रदेशातील कार्यकर्त्यांना इकडे आणले. सर्वत्र जोरदार प्रचार सुरू करण्यात आला. या उपक्रमात गांधीजींना मोलाची आणखी मदत केली वीर वामनराव जोशी[६९] व केशवराव

---

[६७] स्वतः शिक्षणास वंचित झालेल्या बजाजजींनी बनारस हिंदू विद्यापीठाच्या मदन मोहन मालवीय ग्रंथालयास ५०,००० रुपये व जे. सी. बोस यांच्या शास्त्रीय संशोधन कार्यासाठी कलकत्त्याच्या एका संशोधन संस्थेस ३०,००० रुपयांची देणगी दिली.

[६८] कलकत्ता अधिवेशनातही बजाज यांनी असहयोग आंदोलनाचा जोरदार पुरस्कार केला होता. आपल्या राय बहादूर किताबाचा त्याग करून त्यांनी इतरांनाही किताब बहिष्कारासाठी प्रोत्साहित केले होते.

[६९] थोर मराठी नाटककार म्हणूनही त्यांनी लौकिक मिळविला.

डगेवारांनी. वीर वामनराव एके काळचे क्रांतिकारी मतवादी व नंतर झालेले टिळकभक्त होते. तथापि टिळकांनंतर महात्माजींच्या सत्याग्रही प्रणालीने ते फार प्रभावित झाले. गांधीजी हेच टिळकांचे खरे उत्तराधिकारी असा रोकठोक प्रचार त्यांनी केला. मराठी साहित्य व नाटकांच्या रसिकांना प्रिय असलेले वामनराव आता सच्चे गांधीवादी झाले होते, प्रांतिक पातळीवर महान स्वातंत्र्य सेनानी म्हणून लौकिकास पात्र झाले होते. जमनालालजीं-सह वीर वामनराव, केशवराव, आर. एस. रुईकर, पुनमचंद राका, एन. एम. घटवाई, व्ही. एस. दांडेकर, एम. जे. कानेटकर, समिउल्ला खान इत्यादी तरुणांचा नागपूर काँग्रेसच्या यशात वाटा होता.

अधिवेशनास १४,५८२ काँग्रेस प्रतिनिधी हजर होते. ही संख्या अभूतपूर्व होती. यापैकी ७९.०४ प्रतिशत प्रतिनिधी विदर्भ व मुंबईतून आलेले होते.[७०] भारताच्या इतिहासाला वळण देणारे नागपूर अधिवेशन विलक्षण यशस्वी ठरले. असहयोगाचा आविष्कार, पुरस्कार व प्रत्यक्ष कृतीचा आदेश देणारे हे अधिवेशन! वर्धा जिल्ह्याच्या दृष्टीने बघितल्यास जमनालालजींना मोठेपण प्राप्त करून देणारे हे अधिवेशन होते. अधिवेशनास उपस्थित असलेल्या बॅ. मुकुंदराव जयकरांनी नंतर पुढीलप्रमाणे उद्गार काढले :— "Gandhi had made one of his finest conquests in Jamnalal." नागपूर अधिवेशनाचे परिणाम दूरगामी झाले.

बजाज व वीर वामनरावांनी विद्यार्थी तसेच सामान्य जनांना काँग्रेस चळवळीत आणले. अनेक वकिलांनी सरकारी न्यायालयांवर बहिष्कार टाकला. गांधीजींच्या आवाहनानुसार नीळकंठराव देशमुखांनी प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीतील आपली उमेदवारी मागे घेतली. एकटचा वर्धा तालुक्यातील शासकीय व निमशासकीय शाळांमधून १२०० विद्यार्थ्यांनी असहयोग आंदोलनास अनुसरून शाळा सोडल्या. तालुक्यात २२ राष्ट्रीय शाळा स्थापन करण्यात आल्या. बजाजजींच्या मारवाडी विद्यालयाने (स्थापना १९१०) सर्वस्वी राष्ट्रीय शिक्षणाचा अभ्यासक्रम अंगीकारला. वर्धा तालुक्यात १६ ठिकाणी तंटे निवारण्यासाठी राष्ट्रवाद्यांनी लवाद न्यायमंडळे स्थापन केली. आर्वी व हिंगणघाट तालुक्यांमध्ये सुद्धा राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा उघडण्यात आल्या. शेकडो तरुणांनी शासकीय शाळांवर बहिष्कार घातला. सन १९२१ मध्ये एकटचा वर्धा तालुक्यात ७,९४६ काँग्रेस सभासद नोंदण्यात आले. गांधीजींनी उभारलेल्या टिळक स्वराज फंडासाठी जमनालालजींनी एक लाखाची देणगी दिली तर सामान्य जनांनी १७,८१० रुपयांचा निधी जमविला. आर्वीत बारा हजारांवर निधी गोळा झाला. जिल्ह्यातील बऱ्याच मानसेवी दंडाधिकाऱ्यांनी पदत्याग केला, त्यात पाच वर्धा तालुक्यातील होते. सर्व जिल्हाभर, विशेषतः नागरी भागात, विदेशी कापड व दारूच्या दुकानांवर निरोधने करण्यात आली. सर्वत्र चळवळीचा जोर होता.

नागपूर काँग्रेसच्या यशासाठी उपरोक्त पुढाऱ्यांव्यतिरिक्त शेकडो कार्यकर्ते वर्धा, आर्वी व हिंगणघाट तालुक्यांमधून नागपूरला गेले होते. आष्टीसारख्या लहानशा गावीसुद्धा मार्च १९२१ मध्ये परगणा परिषद भरविण्यात आली होती. याच आष्टीस १९४२ मध्ये मोठा संग्राम घडला. आष्टीला गव्हर्नर सर फ्रँक स्लाय याच्या आगमन प्रसंगीच्या सरकारी सोहळ्यावर स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांनी बहिष्कार घालण्याचे धैर्य दाखविले. खरांगणा येथेही त्याच वर्षी परगणा परिषद भरली.[७१]

---

[७०] चौधरी, पूर्वोक्त, पृ. ६९.

[७१] **नागपूर प्रांताचा इतिहास,** पूर्वोक्त, पृ. २५, ३५, ४४.

गांधीजी व बजाज यांच्याव्यतिरिक्त अर्जुनलाल सेठी, सुंदरलाल, डॉ. हेडगेवार, वीर वामनराव, घटवाई, नीळकंठराव देशमुख, इत्यादींची नावे जनतेच्या मुखी होती. स्थानिक काँग्रेसवर आतापर्यंत टिळकवाद्यांचा प्रभाव होता. पण सन १९२१ मध्ये बजाज समर्थकांनी वर्धा जिल्हा काँग्रेस समितीवर आपले स्थान प्रस्थापित केले. बजाज व असहयोग आंदोलनाचा प्रभाव अपेक्षेपेक्षा वाढला होता. त्यामुळे नागपूर प्रांतिक काँग्रेसमध्ये सुद्धा १९२३ साली जमनालाल बजाज यांना बहुमत प्राप्त झाले.[७२]

सत्याग्रह आश्रम

साबरमती आश्रमाचे कार्य पाहून प्रभावित झालेल्या जमनालालजींनी आश्रमाचे स्थलांतर वर्ध्यास करण्यासाठी गांधीजींना विनंती केली. तथापि साबरमती आश्रमाचे स्थलांतर न करता त्याची शाखा वर्ध्यात काढण्यास गांधीजींनी अनुमती दिली. त्यानुसार साबरमतीहून रमणिकलाल मोदींना पाठविण्यात आले. मोदी आजारपणामुळे काही करू न शकल्यामुळे बजाजजींच्या आग्रहानुसार वर्धा आश्रम व्यवस्थितपणे स्थापण्यासाठी गांधीजींनी विनोबा भावेंना पाठविले. वस्तुतः विनोबाजींना साबरमतीहून मुक्त करण्यास गांधीजी तयार नव्हते. तथापि बजाजजींच्या आग्रहास्तव रघुनाथ धोत्रे, द्वारकानाथ हरकरे, वल्लभस्वामी, कृष्णदास गांधी, केशव गांधी व शिवाजी भावे यांच्यासह विनोबा ८ एप्रिल १९२१ रोजी वर्ध्यात हजर झाले. मगनवाडीत बजाजजींच्या बागेतील बंगल्यात कार्यारंभ झाला. राधाकृष्ण बजाज, गोपाळ वाळुंजकर, गोपाळ काळे, बाबाजी मोघे, घाणेकर, दीपकदत्त चौधरी (रविंद्रनाथ टागोरांची नात सरलादेवी चौधराणीचा मुलगा) इत्यादी कार्यकर्ते रचनात्मक कार्यात सामील झाले. सत्याग्रह आश्रमाची रीतसर स्थापना जुलै १९२१ मध्ये करण्यात आली.[७३] जळगावचे टिळकभक्त वासुदेव विठ्ठल ऊर्फ अण्णासाहेब दास्ताने सुद्धा काही दिवस आश्रमात होते. श्रीकृष्णदास जाजू देखील बजाजजींसारखेच आश्रमासाठी झटले. बांधिलकी असलेल्या सत्याग्रहींचा संवर्ग निर्माण झाला.[७४]

आश्रमात साबरमतीच्या आकृतिबंधानुसार कडक शिस्त, आत्मसमर्पणाची भावना, देशभक्ती व व्रतस्थ जीवनाचे धडे दिले जात. रुचिहीन पण सात्विक भोजनाबरोबर देशासाठी जीवनमरणास तत्पर राहण्याचे बाळकडूही पाजण्यात येई. साबरमतीच्या धर्तीवर अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह, परिश्रम, अस्वाद, निर्भयता, सर्वधर्म समानत्व, स्वदेशी आणि स्पर्शभावना ही एकादश सूत्री विनोबांनी आश्रमात आचरणात आणली. सर्व कार्यकर्त्यांकडे विशिष्ट कामे सोपविली जात. राधाकृष्ण बजाज खादी व गोसेवा कार्यात मग्न असत. वल्लभस्वामी सर्व सेवा संघाचे काम बघत. मनोहर दिवाण महारोग निवारण कार्य करीत.[७५] पुढे त्यांनी वर्धा-नागपूर मार्गावर दत्तपूरला महारोगी सेवा मंडळ ही संस्था काढून भारतभर कीर्ती मिळविली. भाऊ पानसे चरखा साहित्य निर्मितीचे सरंजाम कार्यालय चालवित. दत्तोबा दास्ताने यांनी पुढील काळात गांधी सेवा संघाची धुरा उचलली. द्वारकानाथ लेलेंनी खादी कार्यास वाहून घेतले व खादीतील निपुणतेसाठी भारतभर लौकिक

---

[७२] बेकर, पूर्वोक्त, पृ. ७७.

[७३] श्रीमन नारायण, **विनोबा : हिज लाईफ अँण्ड वर्क** (पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७०), पृ. ५३-५४.

[७४] गोपाळ राजाराम वाळुंजकर यांचे "ग्रामसेवा मंडळाचा इतिहास" या हस्तलिखिताचा आश्रमवासियांच्या कार्याचा तपशील देण्यासाठी उपयोग केला आहे.

[७५] श्रीमन नारायण, पूर्वोक्त, पृ. ५३-५४.

मिळविला. ही सर्व मंडळी विनोबांच्या तालमीत तयार झालेली होती. जमनालालजींचा ज्येष्ठ मुलगा कमलनयनदेखील विनोबाजींचा शिष्य म्हणून आश्रमात काही वर्षे राहिला.[७६] गांधीजी वर्षातून एक महिना सत्याग्रह आश्रमात निवास करीत.[७७]

सत्याग्रह आश्रमाच्या स्थापनेपासूनच असहयोग आंदोलनाने वर्धा परिसरात तीव्रता धारण केली. विनोबांनी सत्याग्रहात प्रत्यक्ष भाग घेतला नव्हता. तथापि इतर शेकडो कार्यकर्त्यांनी सत्याग्रह करून बंदिवास पत्करला. राष्ट्रीय जागृतीच्या कार्यास गती प्राप्त झाली. पुढील सर्वच आंदोलनांमध्ये सत्याग्रह आश्रमाने मोठे योगदान दिले. आश्रमवासियांचे पहिले मोठे आंदोलन म्हणजे नागपूरचा झेंडा सत्याग्रह.

नागपूरचा झेंडा सत्याग्रह

झेंडा सत्याग्रह हे स्वातंत्र्य आंदोलनातील एक यशस्वी उपाख्यान मानावे लागते. निर्धार, अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ती व शिस्त या निकषांवर हा सत्याग्रह विशेष खुलून दिसतो. या सत्याग्रहामुळे वल्लभभाई पटेल, त्यांचे बंधू विठ्ठलभाई, व जमनालालजींची प्रतिमा सुशोभित झाली. राष्ट्रीय पुढाऱ्यांमध्ये त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले. जालिअनवाला बाग शोकांतिकेच्या स्मरणानिमित्ताने काँग्रेसजनांनी नागपूरच्या सिव्हील लाईन्स भागातून १३ एप्रिल १९२३ रोजी राष्ट्रीय झेंड्याची मिरवणूक काढली. पोलिसांनी त्यास मज्जाव केला तरी कार्यकर्ते निर्धारपूर्वक शांततामय प्रतिकारास सिद्ध झाले. पोलिसांनी अकारण बळाचा वापर केला. त्याचा निषेध म्हणून बजाज, भगवानदीन, सुंदरलाल व बाबासाहेब देशमुख यांनी सत्याग्रहाचे नेतृत्व पत्करून अहिंसात्मक प्रतिकाराची सिद्धता केली. एकामागून दुसरी तुकडी सरकारी बंदिहुकुमाचा निषेध करून पुढे जात होती.[७८] बजाजजींच्या नेतृत्वाखालील नागपूर सत्याग्रह समितीने नेत्रदिपक कार्य केले. पोलीस बळास व दडपशाहीस न घाबरता जमनालालजींच्या नेतृत्वाखाली शेकडो स्वयंसेवक कारावासात गेले. जमनालालजींना दीड वर्षाची शिक्षा झाली. अल्पावधीत एक मोठे जनआंदोलन उभे राहिले. सत्याग्रह आश्रमातील कार्यकर्त्यांनी आंदोलनात उडी घेतली. काही दिवसांत विनोबाजी सत्याग्रहात उतरले. त्यांना प्रथमच कारावास घडला. नागपूर कारागृहातही त्यांनी आश्रम जीवनाचा पुरस्कार केला.[७९] या सत्याग्रहात वर्धा, आर्वी, हिंगणघाट, आष्टी व पुलगावचे शेकडो कार्यकर्ते सहभागी होते.

झेंडा सत्याग्रहात उपरोक्त पुढाऱ्यांव्यतिरिक्त वर्ध्याचे नीळकंठ देशमुख आणि नागपूरचे पुनमचंद राका, मंचरशा आवारी, ए. आर. तिजारे, जी. एन. टिकेकर, अंबुलकरजी, कालीचरणजी, दांडेकर. चतुराबाई कोटक, सुभद्राबाई चव्हाण आणि अबिद अली यांनीही मोठी कामगिरी केली. मुंबईतूनही शेकडो स्वयंसेवक सत्याग्रहासाठी आले होते. प्रारंभी नागपूर-वर्ध्याच्या लोकांनी उभारलेल्या या सत्याग्रहास अखिल भारतीय स्वरूप आले. आंदोलनाची यशस्वी सांगता करण्यासाठी काँग्रेस कार्यकारी समितीने पटेल बंधूंना नागपूरला पाठविले. आपल्यावरील जबाबदारी पटेल बंधूंनी अत्यंत समर्थपणे पार पाडली. जमनालालजींच्या अटकेनंतर सर्व सूत्रे वल्लभभाई व विठ्ठलभाईंकडे आली. पटेल बंधूंनी

[७६] कित्ता, पृ. ५९.

[७७] कित्ता, पृ. ६१.

[७८] वाळुंजकरांचे हस्तलिखित, पूर्वोक्त.

[७९] श्रीमन नारायण, पूर्वोक्त.

सत्याग्रह समर्थपणे हाताळून गव्हर्नर सर फ्रँक स्लाय यास समेट करण्यास आणि झेंडा मिरवणुकींना परवानगी देण्यास भाग पाडले.

या सत्याग्रहाने जमनालालजी व त्यांच्या समर्थकांचे राष्ट्रीय आंदोलनातील स्थान उंचावले. त्यांना सरकारने ठोठावलेला ३००० रुपयांचा दंड वसूल करण्यास्तव सरकारने त्यांच्या गाडीचा जाहीर लिलाव पुकारला. तथापि एकही ग्राहक पुढे आला नाही. विदर्भात गाडीचा लिलाव होणे अशक्य असल्यामुळे शेवटी ती गाडी सरकारला काठेवाड भागात नेऊन विकावी लागली. इतका बजाजजींचा प्रभाव होता. सत्याग्रहातील त्यांच्या कार्याचा गौरव करण्यास्तव अखिल भारतीय काँग्रेस समितीचे खास अधिवेशन ८–१० जुलै १९२३ रोजी नागपूरला भरविण्यात आले. जमनालालजींचे अभिनंदनपर विशेष ठराव पास करून सत्याग्रहींना अखिल भारतीय पाठिंबा व्यक्त करण्यात आला. सत्याग्रहाचे विशेष पडसाद मुंबईला उमटले. मुंबईच्या बॉम्बे ग्रेन मर्चंटस असोसिएशन, मारवाडी बाजार, बुलिअन एक्सचेंज व शेअर बाजारातील व्यापाऱ्यांनी आंदोलनासाठी निधी व कार्यकर्ते पाठवून हरताळही पाळला. अखेर सत्याग्रहापुढे सरकार नमले व झेंडा मिरवणुकांना परवानगी दिली. ही फलनिष्पत्ती गांधीवाद्यांच्या दृष्टीने जणूकाय विजयाचा कळस होता आणि बजाजजींचा तर विजयच होता.[८०]

झेंडा सत्याग्रहाच्या यशानंतर बजाजजींचे प्रभाव क्षेत्र वाढून ते १९२५ मध्ये प्रांतिक पातळीवरून राष्ट्रीय पातळीच्या राजकारणात महत्त्वाच्या ठिकाणी गेले. त्यांच्यानंतर प्रांतिक पातळीवरील पोकळी भरण्यासाठी मोतीलाल नेहरुंच्या सूचनेनुसार नागपूरचे मोरेश्वर वासुदेव अभ्यंकर (एकेकाळचे टिळकभक्त) यांना पुढे आणण्यात आले. वीर वामनराव जोशी व अभ्यंकरांच्या युतीने प्रांतिक काँग्रेसमध्ये नारायण भास्कर खरे, पुरुषोत्तम बळवंत गोळे (अकोला), ब्रिजलाल बियाणी (अकोला), समिउल्ला खान इत्यादींना संघटित केले. रुईकर आधीपासूनच प्रांतिक काँग्रेसमध्ये होते.

सत्याग्रह आश्रमाच्या विद्यमाने १९२४ पासून सत्याग्रहाव्यतिरिक्त अस्पृश्यता निवारण, ग्राम सफाई, अंधश्रद्धा निर्मूलन, वस्त्रविद्या प्रयोग, कृषिविद्या प्रयोग, गोसेवा, आहार प्रयोग, प्रार्थना व स्वाध्याय हे रचनात्मक कार्य अविरतपणे चालू करण्यात आले. गावोगावी आश्रमवासी जाऊन अस्पृश्यांना आत्मबलाची शिकवण देत. स्पृश्यांना धर्माधारायोगे पटवून देत की, अस्पृश्यता हे परमेश्वराच्या नावे केलेले पाप आहे. ग्रामसफाईचे महत्त्व पटवित. शौचकुपांचे विविध नमुने प्रसारित करीत. चरखा, विणकाम, टकळी आणि संबंधित साहित्य व कृतींचे शिक्षण देऊन सूतकताई व विणाईच्या उपकरणांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयोग करण्यात येत. बाळकोबा भावे, विनोबाजी व वाळुंजकर हे तर गोसेवा व आहारासारख्या सकृतदर्शनी क्षुल्लक वाटणाऱ्या बाबींवरही लक्ष ठेवीत. प्रार्थना व स्वाध्याय नित्यनियमाने करीत. त्याचबरोबर संतवाङ्मय, **उपनिषद** व **भगवद्गीते**ची पारायणे होत. **महाराष्ट्र धर्म** नावाचे साप्ताहिक जून १९२४ ते एप्रिल १९२७ पर्यंत प्रसिद्ध करण्यात आले. त्यातून गांधीजी व विनोबांव्यतिरिक्त इतर विचारवंतांचेही लेख प्रकाशित होत.[८१]

असहयोग आंदोलनातून सरकारी विद्यालयांवर बहिष्कार घालण्यास प्रारंभ झाला. त्याबरोबर राष्ट्रीय शाळांचा उपक्रम सुरू झाला. त्याच धर्तीवर बजाजजींच्या मारवाडी

[८०] चौधरी, पूर्वोक्त, पृ. ७६-७७.

[८१] वाळुंजकर, पूर्वोक्त.

विद्यालयाचे राष्ट्रीय विद्यामंदिरात रूपांतर करून राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार करण्यात आला (१९२६). त्यातून सर्वांगीण शिक्षण दिले जात असे. या विद्यालयातून शिकून राष्ट्रीय कार्य करणाऱ्यांत कमलनयन बजाज, कुंदर दिवाण व दत्तात्रेय दास्ताने यांचा समावेश होता. सविनय कायदेभंगात तेथील विद्यार्थी व शिक्षकांनी भाग घेतल्यामुळे विद्यालय जवळ-जवळ बंद पडले होते. पण पुढे १९३२ मध्ये ते कायमचे बंद पडले. राष्ट्रीय विद्यामंदिराला जोडूनच १९२८ मध्ये कन्याशाळा काढण्यात आली. साबरमतीच्या मुली आल्यावर कन्याशाळेचे रूपांतर करून कन्याश्रम नावाची नवीन संस्था १९३३ मध्ये सुरू झाली. गांधीजी सप्टेंबर १९३३ मध्ये वर्ध्यास राहण्यास आले तेव्हा ते प्रारंभी याच कन्या-श्रमात राहत. एकदोन वर्षाच्या आत कन्याश्रमाचे महिलाश्रमात रूपांतर करून महिला शिक्षणासाठी स्वतंत्र संस्था काढण्यात आली.[८२]

सत्याग्रह आश्रमाचे कार्य वर्धा व नालवाडीलाच केंद्रित न करता सेलू, नागझरी, रोहिणी व इतर काही गावी सुद्धा रचनात्मक कार्य हाती घेण्यात आले. सत्याग्रह आश्रमाने रचनात्मक कार्यावर मोठा भर दिला. अखिल भारतात या कार्याचा प्रचार करण्यासाठीही येथील कार्यकर्ते झटू लागले. रचनात्मक कार्याची स्वातंत्र्य आंदोलनाशी सांगड घालण्याचा गांधीजींचा मनोदय अमलात आणण्यासाठी सर्व कार्यकर्ते कार्यरत झाले. एक महत्त्वाचा उल्लेख करणे आवश्यक आहे, आणि तो म्हणजे जमनालालजींनी वर्धा शहरातील प्रसिद्ध लक्ष्मीनारायण मंदिर १९ जुलै १९२८ रोजी हरिजनांसाठी खुले केले. कर्मठ विचारसरणीच्या त्या काळी ही घटना मोठी होती.[८३] या कृतीचे भारतात अनेक ठिकाणी अनुकरण करण्यात आले.

बजाज राष्ट्रीय स्तरावर गेल्यावर (१९२५) नागपूर प्रांतिक काँग्रेसमध्ये असहकार-वादी (Non-co-operationist) आणि प्रतिसहकारवादी (Responsivist) यांच्यातील

---

[८२] वाळुंजकर, पूर्वोक्त.

[८३] जुलै १७ रोजी देवस्थानच्या विश्वस्तांनी एकमताने पुढील ठराव संमत केला :—

"ज्याअर्थी तथाकथित अस्पृश्यांना श्रीलक्ष्मीनारायणाच्या मंदिरात प्रवेश देण्याचा प्रश्न विश्वस्तांपुढे अनेक वेळा आलेला आहे व आतापर्यंत त्यांना निश्चित निर्णय घेता येणे शक्य झाले नाही; आणि ज्याअर्थी देशातली सर्वांत मोठी प्रातिनिधिक संस्था जी काँग्रेस तिनेही अस्पृश्यता निवारणाचा आग्रह चालविला आहे आणि त्याच-बरोबर हिंदू महासभेनेही सर्व सार्वजनिक मंदिरे तथाकथित अस्पृश्यांना खुली करणे आवश्यक व योग्य आहे असे प्रतिपादन केले आहे, आणि देशातील प्रमुख पुढाऱ्यांनी असेच मत व्यक्त केले आहे, त्याअर्थी वर निर्दिष्ट केलेल्या सर्व गोष्टींचा विचार करून आणि देशाची सामाजिक व धार्मिक परिस्थिती नीट लक्षात घेऊन वर्ध्यातील हे श्रीलक्ष्मीनारायणाचे मंदिर अस्पृश्यांना खुले करण्याचे या ठरावान्वये विश्वस्त जाहीर करीत आहेत आणि मंदिराचे कार्यकारी विश्वस्त शेठ जमनालाल बजाज यांनी हा ठराव त्यांना योग्य वाटेल त्या प्रकाराने अमलात आणावा असा अधिकार त्यांना देण्यात येत आहे."

त्यानुसार १९ जुलै रोजी सुमारे १२०० हरिजनांसह विनोबा भावेंनी मंदिरात प्रवेश केला. त्या प्रसंगी कोणताही अनिष्ट प्रकार घडला नाही. वर्ध्यासारख्या महत्त्वाच्या शहरात श्रीलक्ष्मीनारायण मंदिरासारखे सुप्रसिद्ध मंदिर अस्पृश्यांना जाहीरपणे खुले करण्यात येत असता सनातन्यांनी विरोधाचा ब्रही काढू नये, हे खरोखर **आश्चर्य-कारक** आहे. (**महात्मा गांधी संकलित वाङ्मय, खंड ३७, पृ. १०३–१०४**).

तणाव वाढीला लागले. प्रतिसहकारवादी लोक केंद्रीय व प्रांतिक कायदेमंडळांमध्ये जाण्यासाठी (Council-entry) प्रयत्न करीत तर असहकारवादी अधिकृत काँग्रेसच्या धोरणानुसार त्यास विरोध करीत. अशा परिस्थितीत अभ्यंकर-खरे यांच्या असहकारवादी गटाने प्रतिसहकारवादी असलेल्या मुंजे गटास आळा घातला खरा, परंतु त्यांच्यात सलोखा नांदणे अशक्य होते. मुंजेंनी आपली सर्व शक्ती पणास लावली. मोतीलाल नेहरूंच्या पाठिंब्याने अभ्यंकरांनी आपले नेतृत्व व्यापक करून १९२६ मध्ये समांतर प्रांतिक काँग्रेस समिती स्थापन केली. हे प्रांतिक राजकारण हा सरळ प्रकार नव्हता. प्रतिसहकारवाद्यांच्या प्रयत्नांना आळा घालण्यासाठी काँग्रेस कार्यकारी समितीने मुंजेंचे प्रांतिक समितीतील महत्त्व कमी करून अभ्यंकरांच्या अध्यक्षतेखालील प्रांतिक समितीला पूर्ण पाठिंबा घोषित केला.[६४] अभ्यंकरांनी १९२८ व १९२९ मध्ये जिल्हा व तालुका काँग्रेस समित्यांच्या निवडणुका घेऊन आपले बहुमत प्रस्थापित केले. सन १९२६–१९२९ या काळात अभ्यंकर, खरे व बजाजजींचे समर्थक यांनी मराठी तसेच हिंदी भाषिकांमध्ये काँग्रेसचा प्रभाव बराच वाढवला. रुईकरांनी गिरणी कामगारांचा तर समिउल्ला खान यांनी मुसलमानांचा काँग्रेसला पाठिंबा मिळविण्यासाठी मोठी कामगिरी केली. सन १९२८ मध्ये खरे व रुईकरांच्या प्रयत्नाने नागपूरला ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची शाखा स्थापन झाली. त्यामुळे सुसंघटित कामगारांचा काँग्रेसमधील सहभाग खूपच वाढला. स्वातंत्र्य आंदोलनासाठी सुसंघटित मनुष्यबळ उपलब्ध झाले.

काँग्रेसचा कार्यक्रम आणि आंदोलनाशी समरस होणे डॉ. मुंजेंना शक्य नसल्यामुळे त्यांनी १९२७ मध्ये हिंदू महासभेच्या कार्यास वाहून घेतले, आणि ते केंद्रीय कायदे-मंडळाचे सभासद बनले. तेव्हापासून त्यांनी हिंदू महासभेच्या चळवळीस व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. कायदेमंडळात लष्करविषयक बाबींवर त्यांनी महत्त्वाची चर्चा घडवून आणली.

सविनय कायदेभंग आंदोलन

लाहोर काँग्रेसच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावानंतर गांधीजींच्या आदेशानुसार २६ जानेवारी १९३० हा पहिला स्वातंत्र्यदिन जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये साजरा करण्यात आला. ही तर आगामी सविनय कायदेभंगाची नांदीच होती. त्या निमित्ताने सर्वत्र जनजागृती करण्यासाठी प्रांतिक पुढाऱ्यांनी दौरे काढले. गांधीजींच्या मार्गदर्शनानुसार २६ जानेवारी १९३० पासूनच जनमत तयार करण्यासाठी वर्ध्यातील कार्यकर्ते कटिबद्ध झाले. जमनालालजी, भगवानदीन, नीळकंठराव देशमुख, घटवाई, अभ्यंकर, खेर व पुनमचंद राका प्रचारार्थ व स्वयंसेवकांना कार्यान्वित करण्यासाठी दौरे करू लागले. नागपूर प्रांतिक काँग्रेस समितीने कायदेभंग आंदोलनासाठी पहिल्या प्रांतिक युद्धमंडळासाठी (War Council) सभासद निवडले. गांधीजींनी १२ मार्चला साबरमतीहून दांडी यात्रेसाठी प्रयाण करताच उपरोक्त पुढाऱ्यांनी चौथ्या दिवशी (१६ मार्च) आंदोलनाची द्वाही फिरविली. प्रांतिक स्तरा-व्यतिरिक्त जिल्हा व तालुका स्तरांवरही युद्धमंडळे स्थापन केली. स्वयंसेवक नोंदणीस वेग देण्यात आला. त्याकामी सत्याग्रह आश्रमातील कार्यकर्ते आघाडीवर होते. खुद्द जमनालाल-जींची गांधीजींनी मुंबईचे पहिले काँग्रेस सर्वाधिकारी (Congress Dictator) म्हणून नियुक्ती केली. ते, जानकीदेवी व कमलनयनजी काही दिवस दांडी यात्रेत होते. याचे कारण असे की, दांडी सत्याग्रहाखालोखाल मुंबईतील विलेपारले येथील सत्याग्रह केंद्र भारतात

[६४] बेकर, पूर्वोक्त, पृ. ८१.

त्वाचे होते. जमनालालजींचा हा तर बहुमानच होता. मुंबईलाच त्यांना ८ एप्रिल रोजी क करण्यात आली. दांडी समुद्र किनाऱ्यावरून सविनय कायदेभंगाची गांधीजींनी घोषणा ताच वर्धा जिल्ह्यातील युद्धमंडळे कामास लागली. अकोला जिल्ह्यातील दहिहंडा गावी ऱ्या पाण्याची विहीर होती. त्या पाण्यापासून मीठ बनविण्यासाठी जय्यत तयारी केली. र्ग जिल्ह्यासह संपूर्ण नागपूर प्रांतातून शेकडो काँग्रेस कार्यकर्ते दहिहंड्याला गेले. मीठ मितीद्वारे कायदेभंग करून मीठ विकण्यात आले. अर्थातच विहिरीच्या पाण्यापासून मीठ विण्याच्या बऱ्याच मर्यादा होत्या. त्या लक्षात घेऊन जंगल सत्याग्रह, विदेशी कापड ाने व मद्य विक्रेत्यांवरील निरोधने अशा उपक्रमांवर भर देण्यात आला.

सत्याग्रह आश्रमातील कार्यकर्त्यांनी सत्याग्रहास प्रथम आरंभ केला. त्यासाठी जनमत ार करून ठेवलेच होते. मिठाचा सत्याग्रह व जंगल सत्याग्रह या स्वरूपात कायदेभंग ावयाचा होता. जंगल सत्याग्रहासाठी आश्रमवासियांनी शिंदीच्या झाडांची तोडणी वडली. शिंदीच्या झाडापासून मद्य तयार करण्याची प्रथा होती. शिवाय त्या मद्यावर षणकर्ते इंग्रज कर बसवून महसूल गोळा करीत. या महसुलाचा ब्रिटिश राजवट स्थिर रण्यासाठी उपयोग होत असे. म्हणून शोषणाचे प्रतीक व दारुबंदीचे निदर्शक या त्याने शिंदीची झाडे तोडण्याच्या उपक्रमावर वाळुंजकर, दत्तोबा दास्ताने, दिवाण, घे इत्यादी आश्रमवासियांनी भर दिला. शिंदीची बहुसंख्य झाडे मालगुजारांच्या अथवा ठ्या शेतकऱ्यांच्या मालकीची होती. तथापि राष्ट्रीय भावना इतकी तीव्र झाली होती ी, मालक सत्याग्रहींना झाडे तोडण्यास संमती तर देतच, परंतु स्वतःही त्यात सहभागी त. सत्याग्रहास सर्वच ग्रामवासियांचा उत्तम प्रतिसाद होता. गावातील लोक त्याग्रहींच्या अन्नपाण्याचीही व्यवस्था करीत. हे एक महान राष्ट्रीय कार्य असल्याची ोकांची धारणा बनली. सत्याग्रह आश्रमातील मंडळींनी सेलुकाटे, नेरी, धोत्रा, अल्लीपूर, झाळा वगैरे गावी सत्याग्रह केला.[८५]

जमनालाल बजाज यांना मुंबईत अटक झाल्यावर वर्धा जिल्ह्यात सार्वत्रिक हरताळ ाळला. विनोबाजींनी जमनालालजींचे अभिनंदन केले. त्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह धिकच वाढला. वर्धा जिल्ह्यातील कायदेभंगाचे नेतृत्व स्थानिक पुढाऱ्यांकडे राहणेच ्रमप्राप्त होते. तसेच मार्गदर्शनासाठी विनोबा भावे बाहेर राहणेच अधिक चांगले होते. हणून त्यांनी प्रत्यक्ष सत्याग्रहात भाग घेतला नाही. मिठाच्या सत्याग्रहाचा प्रारंभ आर्वी ाणि हिंगणघाटला १३ एप्रिल व वर्ध्याला २७ एप्रिल १९३० रोजी झाला. या सत्याग्रहाचे ुरीण होते, रामभाऊ श्रोत्री, घटवाई, थत्ते, तेजराम गहलोत, कन्हैयालाल, अडकोबा पाटील, ीळकंठराव देशमुख, अंबादास देशपांडे, बळीराम जळीत, केशव भुसारी, वल्लभदास जाजू, ारायण वाघ, शिवराज चुडिवाले, काशिनाथ दलाल, साळवे वकील, बॅ. गोविंदराव देशमुख, चिरंजीलाल, मोतीलाल बाबू, श्रीकृष्णदास जाजू, डॉ. आपटे, नानाजी कदम, गुलाबराव ाघ, दीनदयाळ गुप्त, मश्रूवाला, गोपाळराव राठी इत्यादी.[८६] एकामागून दुसरे अशी ऱीच युद्धमंडळे नियुक्त करण्यात आली. एक युद्धमंडळ अटकेत पडल्यावर दुसरे पुढे ेई. युद्धमंडळांची व कार्यकर्त्यांची मालिका अखंडपणे चालू होती.

काही कार्यकर्ते जंगल सत्याग्रह करीत तर काही निरोधने करीत. प्रभात फेऱ्या, परदेशी दुकानांसमोरील निरोधने ही तर नित्याची बाब होती. प्रचार साहित्याचे वितरण, सरकारी

---

[८५] वाळुंजकर, पूर्वोक्त.

[८६] ही नामावली अपुरी असून केवळ प्रतिकात्मक आहे.

अधिकाऱ्यांचे मन वळवून आंदोलनास पाठिंबा मिळविणे, पोलिसांचे हृदयपरिवर्तन, सरकारी कर्मचाऱ्यांना पदत्याग करण्यास प्रवृत्त करणे इत्यादी स्वरूपाच्या कार्यात पुष्कळ पुरुष व महिला भाग घेत असत. ताराबाई लिमये, कमल देशमुख, विमल अभ्यंकर, गंगूताई वाळुंजकर, जानकीदेवी बजाज, शरयू धोत्रे आणि इतर अनेक महिलांनी तर मोलाची कामगिरी केली.[८७]

कायदेभंग आंदोलनात माधव श्रीहरी अणे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रतिसहकारवादी पुढारी—मुंजे, रामराव देशमुख व डॉ. हेडगेवार—यांनीही कायदेभंगास पाठिंबा देऊन प्रत्यक्ष भाग घेतला. दहिहंड्याच्या सत्याग्रहास ही सर्वच मंडळी उपस्थित राहिली. मुंजेंना या चळवळीत आणण्याचे बरेच श्रेय अणेंना द्यावे लागेल. आर. एस. एस. चा कायदेभंगात अधिकृतरीत्या पक्षपातळीवरून सहभाग नसला तरी हेडगेवारांनी सर्व अनुयायांना वैयक्तिकपणे भाग घेण्यास अनुमती दिली. त्यानुसार हेडगेवारांसह बऱ्याच आर. एस. एस. कार्यकर्त्यांनी कायदेभंगात भाग घेऊन कारावास भोगला.

धारासनाच्या मीठ सत्याग्रहासाठी वर्ध्याहून जानकीदेवी, मदालसा, केशव जंगमवार, किटकुले, घासिराम, गणपत उपदेव व रामचंद्र परशराम गेले होते. जिल्ह्यातील सत्याग्रहांमध्ये तळेगावचे आंदोलन सर्वांत मोठे होते. नागपूर प्रांतिक युद्धमंडळाने जंगल सत्याग्रहासाठी पहिले प्रांतिक केंद्र म्हणून तळेगावची निवड केलेली होती. डॉ. खरे, ढवळे वकील, बाबासाहेब देशमुख, विभूती महाराज, भोसले, वल्लभदास जाजू इत्यादी हजर होते. दिनांक १ ऑगस्ट १९३० रोजी सत्याग्रहाचा प्रारंभ झाला. गणपतराव टिकेकर व श्रीधरराव दातेंच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांनी नेत्रदिपक कार्य केले. या सत्याग्रहात ३०,००० लोकांनी भाग घेतला होता. तळेगावनंतर मोठा सत्याग्रह झाला केळझरला. पोलिसांचा प्रचंड फौजफाटा व जिल्ह्यातील सर्व बड्या अधिकाऱ्यांच्या हजेरीत ३०,००० ते ४०,००० लोक जमले होते. सत्याग्रहासाठी प्रत्येकी चार जणांचा गट या पद्धतीने शेकडो गट एकामागून दुसरा असे जात होते. शेकडो कार्यकर्ते पकडले गेले. शिस्तबद्ध व शांततामय अशा या आंदोलनाने सनदी नोकरसुद्धा भारावून गेले होते. या व्यतिरिक्त लहानमोठे बरेच सत्याग्रह झाले.

काँग्रेसजनांनी जिल्ह्यात मालगुजार व मुकादमांची परिषद घेतली. त्याद्वारे ताडीचे ठेके न घेण्याबद्दल ठेकेदारांना आवाहन करण्यात आले. आवाहनास प्रतिसाद न देणाऱ्या ठेकेदारांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमास बरेच यश आले. ठेके विकले न गेल्यामुळे ताडीचे उत्पादन घटून शासकीय महसुलास जोरदार फटका बसला. जंगल सत्याग्रहात शिंदीची झाडे तोडणे, गवत कापून नेणे, वनसंपत्तीचा मुक्त वापर करणे व वन खात्यास महसूल न देणे यांचा समावेश होता.

विदेशी मालावरील बहिष्काराबरोबर दारुबंदीसाठी सत्याग्रहींनी जीवाचे रान केले. ठिकठिकाणी जात पंचायत समित्या स्थापन करून त्यांच्यामार्फत मद्यपानविरोधी मोहीम उघडली. मद्यपींवर पंचायतींनी सामाजिक बहिष्काराचे शस्त्रही उपसले. त्याचा अपेक्षित परिणाम होऊन मद्यविक्रीत घट झाली. सरकारी अहवालांवरूनही ही वस्तुस्थिती दिसते. बऱ्याच ठिकाणी देशी दारूचे लिलाव स्वयंसेवकांनी बंद पाडले. बऱ्याच गावांतील दारूची दुकाने निदान काही आठवडे तरी बंद होती. राजकीय आंदोलनासह ही झालेली सामाजिक व नैतिक सुधारणा अपूर्व होती.

[८७] वाळुंजकर, पूर्वोक्त.

ांधी दिन, गढवाल दिन, जमनालाल दिन, जालिअनवाला दिन, टिळक पुण्यतिथी ादी कार्यक्रमांच्या निमित्ताने सभा मिरवणुका होत. त्यात कार्यकर्ते सरकारविरुद्धचा तोष, विदेशी मालावर बहिष्कार, दारुबंदी आणि संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करीत त. स्फूर्तिदायक कवने व चेतनामय गर्जनांनी आसमंत भरून जात असे. विदेशी कापड-त्यांचे तर धाबेच दणाणले. त्यांनी कापडाचे गठ्ठे बांधून ठेवून दिले. सुसंस्कृत काँग्रेस सेविका दुकानांवर निरोधनासाठी आल्यावर विक्रेते व ग्राहकांना स्वतःची लाज वाटे, टी दुकानदारसुद्धा सत्याग्रहींना साथ देऊ लागले. पुढाऱ्यांच्या प्रेरणेने अनेक गावांमधून सारा तहकुबीसाठी अर्ज करण्यात आले.

वानरसेना व देशसेविकांचे कार्य महत्त्वाचे होते. त्यांना पकडण्यात पोलिसांना अडचण ते. शिवाय त्यामुळे प्रौढ व्यक्ती प्रभावित होऊन सक्रीय भाग घेत. कमलनयन बजाज चा वानरसेनेत मोठा सहभाग होता.

वृत्तपत्रांवरील अध्यादेशाला (Press Ordinance) प्रत्युत्तर म्हणून युद्धमंडळाच्या रेखीखाली **काँग्रेस पत्रिका** सुरू केली. प्रकाशन विभागाचे प्रमुख होते बाबासाहेब देशमुख. पत्रिका काही दिवस साप्ताहिक होती. कालांतराने वृत्तपत्रे काँग्रेस प्रचारास साथ न देऊ गल्यामुळे **काँग्रेस पत्रिका** दैनिक रूपात प्रकाशित करण्यात आली. आंदोलनासाठी निधीची वश्यकता होती. त्या कामी व्यापारी, धनिक तसेच सामान्यजनांकडूनही युद्धमंडळाने गया मिळविल्या. बजाज कुटुंबाने तर फार मोठा हातभार लावला.

जंगल सत्याग्रहाचे स्वरूप जरी गवत कापून आणणे, वनोत्पादन हस्तगत करणे आणि दीची झाडे तोडणे इतकेच असले, तरी त्यामुळे प्रांतिक शासनावर त्याचा मोठा आघात ला. तळेगावच्या सत्याग्रहात काँग्रेसव्यतिरिक्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, दलित युद्धमंडळ अनाथ विद्यार्थीगृह या संघटनांनीसुद्धा स्वयंसेवक पाठविले होते. राजकीय आंदोलकांशिवाय डखोलकर यांच्यासारख्या साहित्यकारांनीही त्यात भाग घेतला.

जंगल सत्याग्रहाने वर्धा, अमरावती, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यांत तीव्र स्वरूप धारण केले ते. सत्याग्रहींनी आर्वी परिसरात शासनाची स्थिती डळमळीत केली होती. वर्धा जिल्हा लीस अधीक्षकाला गृह मंत्र्याच्या बैठकीत कबूल करावे लागले की, आर्वी तहसीलमध्ये च्या अर्थाने शासन अस्तित्वातच नव्हते. हजारो ताडीची झाडे नष्ट झाली. स्वयंसेवक हजगत्या खेडुतांना झाडे तोडण्यास सांगत आणि त्यांच्या आदेशांचे खेडूत अनुपालन करीत, धिकाऱ्यांचे नव्हे. जुलै १९३० च्या अखेरीस व्हाइसरॉयच्या अध्यक्षतेखाली सिमल्यात रलेल्या गव्हर्नर परिषदेत मध्यप्रांताचा गव्हर्नर सर मॉंटेग्यू बटलर याने पसरत चाललेल्या गल सत्याग्रहाबद्दल भीती व्यक्त केली. त्याने स्पष्ट कबुली दिली की, नागपूर-जबलपूर रिसरातील परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेलेली आहे. परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी टलरने गोळीबार करण्याच्या आवश्यकतेचेही प्रतिपादन केले.[८८] शासनाला जोरदार ादरा बसला होता, कारण १९३० मध्ये या प्रांतात मद्यपानात ३३ प्रतिशत घट झाली ोती. अबकारी कराचा महसूल १९२९–३० मधील १,२५,४४,००० रुपयांवरून १९३०-३१ ध्ये ८६,२७,००० रुपयांपर्यंत घसरला. महसुलातील ही घसरण परकीय राजवटीच्या ृष्टीने अत्यंत गंभीर होती, कारण अबकारी कर महसूल साधनांतील दुसऱ्या क्रमांकाचे ाय साधन होते.[८९]

---

[८८] चौधरी, पूर्वोक्त, पृ. ९१–९२.

[८९] कित्ता, पृ. ९२.

परिणामतः मध्यप्रांत शासनाने या परिसरात प्रिव्हेन्शन ऑफ इंटिमिडेशन ऑर्डिनन्स जूनमध्ये जारी केला. जुलैपासून शासनाने आक्रमक भूमिका घेतली. मद्याचा व्यापार हाणून पाडणे व जंगलविषयक कायद्याचे उल्लंघन करण्यात काँग्रेसने जे यश मिळविले होते त्याचा मुकाबला करण्यासाठी शासनाने अध्यादेशांचे अधिराज्य निर्माण केले. दडपशाहीचा अंमल सुरू झाला. तथापि ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत पोलिसांना आंदोलन चिरडून टाकणे शक्य झाले नाही.[९०] दरम्यान ऑगस्टमध्ये शेकडोंना कारावासात डांबण्यात आले. ऑगस्ट ३ ते १० हा बहिष्कार सप्ताह आखलेला होता. या सप्ताहात झेंडा दिन, बहिष्कार दिन, पिकेटिंग दिन, गांधी दिन, महिलांचा दिवस, गढवाल दिन व राजबंदी दिन साजरे करण्यात आले. ऑगस्ट १९३० मध्ये सत्याग्रहाचा परमोच्च बिंदू होता.

याच सुमारास प्रतिसहकारवादी पक्षाच्या पुढाऱ्यांनी जनमत व काँग्रेसच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करून ते गोलमेज परिषदेसाठी (१२ नोव्हेंबर १९३० ला भरलेली) इंग्लंडला गेले. त्यामुळे स्वातंत्र्य आंदोलकांच्या भावना दुखावल्या गेल्या. पुढील काही दिवस गोलमेज परिषद व त्यासाठी गेलेल्या व्यक्तींविरुद्ध निदर्शने करण्यात आली, अविश्वासदर्शक ठराव पास करण्यात आले. नोव्हेंबर १९३० ते २५ जानेवारी १९३१ पर्यंत आंदोलन सुरूच होते, पण आता त्याची तीव्रता निवळली होती. (सेंट्रल प्रॉव्हिन्सेस इंटेलिजन्स रिपोर्ट, १९३०).

दिनांक २५–२६ जानेवारी १९३१ रोजी गांधीजी व काँग्रेस कार्यकारी समितीच्या सभासदांना बंधमुक्त केल्यावर गांधीजी व व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्या दरम्यान वाटाघाटींचा प्रारंभ झाला. त्यांचीच फलनिष्पत्ती म्हणजे १९३१ चा गांधी-आयर्विन करार. याच करारास मार्च १९३१ च्या कराची काँग्रेसने अनुमती दिली. आयर्विनच्या प्रयत्नांनुसार आणखी एक गोलमेज परिषद भरविण्याचे ब्रिटनच्या पंतप्रधानांनी मान्य केले. आगामी परिषदेसाठी काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी म्हणून जाण्यास गांधीजींचा विरोध होता. त्यांना त्यातील विफलता स्पष्ट दिसत होती. तथापि कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार (९ जून १९३१) साशंक व व्यथित अंतःकरणाने गांधीजींनी लंडनला प्रयाण केले.[९१]

सविनय कायदेभंगाचा पुनरारंभ

गोलमेज परिषदेहून वैफल्यग्रस्त मनःस्थितीत गांधीजी मुंबईला उतरतात न उतरतात (२८ डिसेंबर १९३१) तोपर्यंत सरकारी दडपशाहीमुळे पुढील आंदोलन अटळ बनले. किंबहुना त्पूर्वीच खान अब्दुल गफार खान व पंडित नेहरूंना अटकेत टाकलेले होते. शांततेची चिन्हे व्हती. नवीन व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन युध्दमान (Belligerent) पवित्रा घेऊन उभा होता. नयतीच्या संकेताप्रमाणेच झाले. व्हाइसरॉय समेटासाठीच काय पण गांधीजींना मुलाखत देण्यासही तयार नव्हता.[९२] किंबहुना घातपात व आंदोलन चिरडण्यासाठी सरकारने जंगी तयारी केलेली असल्याचे त्याने ठामपणे गांधीजींना कळविले. काँग्रेसपुढे एकच पर्याय होता, आणि त्यानुसार ४ जानेवारी १९३२ रोजी आंदोलनाचा पुनरारंभ झाला. वस्तुतः दरम्यानच्या

[९०] कित्ता. पृ. ९२.

[९१] गांधीजींचे याबाबतचे मनोगत त्यांच्याच शब्दांत मांडणे श्रेयस्कर : "I have not come to the decision to go to London without fear, trembling and serious misgivings."

[९२] व्हाइसरॉयचा गांधीजींना आलेला २ जानेवारी १९३२ चा तार संदेश.

शांतता काळात मराठी मध्यप्रांतातील कॉंग्रेस कार्यकर्ते निश्चिंत होते. पुन्हा सत्याग्रह करावा लागेल असा त्यांना अंदाज नव्हता.[९३] त्यामुळे त्यांनी फारसे नियोजनही केलेले नसावे. भारतभर जणू लष्करी कायद्याचे अधिराज्य सुरू झाले. सरकारने चार वटहुकूम जारी केले आणि अल्पावधीत कॉंग्रेसला हतबल करून टाकण्याचा जणू चंग बांधला. कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी नवीन युद्धमंडळे स्थापन केली. परंतु एकामागून एक युद्धमंडळे पकडली गेली. वर्ध्यातील आंदोलनाचा प्रारंभ शिबिरे स्थापन करण्यापासून झाला. त्याबरोबर विदेशी कापड व दारूच्या दुकानांवरील निरोधने तीव्र करण्यात आली. तथापि सर्व प्रकारची निरोधने दडपून हुकूमशाही स्वरूपाची राजवट सुरू झाली. सत्याग्रहींना निर्दयपणे मारण्यात आले. जमनालालजींचा निवासी बंगला, बाग आणि इतर इमारती जप्त करण्यात आल्या. १९३२ मध्ये एकट्या वर्धा तालुक्यामध्ये ३६ सर्वाधिकारी झाले. त्यात २७ पुरुष व नऊ महिला होत्या. आर्वी व हिंगणघाट तालुक्यांमध्येही अनेक सर्वाधिकारी होऊन गेले. दिनांक १६ फेब्रुवारी १९३२ रोजी वर्ध्यात अमानुष लाठीहल्ला करण्यात आला. या शोककारक घटनेचे पडसाद सर्वत्र उमटले. सशस्त्र पोलिसांच्या आणि गोऱ्या अधिकाऱ्यांच्या तुकड्या नागपूरहून येऊन दहशत बसवू लागल्या. बहुसंख्य पुढारी आणि प्रमुख कार्यकर्ते कारावासात गेले.

विनोबा भावे, जमनालालजी, जानकीदेवी, गोपाळराव काळे, भाऊ पानसे, वाळुंजकर, द्वारकानाथ हरकरे, दत्तात्रय दास्ताने इत्यादी कार्यकर्ते पकडले गेले.

सन १९३० च्या कायदेभंग आंदोलनात भाग घेऊनही विनोबांना अटक करण्यात आली नव्हती. तथापि १९३२ च्या आंदोलनात भाग घेतल्याबरोबर त्यांना पकडून धुळे कारागृहात ठेवण्यात आले. येथे उल्लेख करण्याजोगे असे की, धुळे कारागृहात त्यांनी **भगवद्गीते** वर दिलेली विद्वत्तापूर्ण प्रवचने पुस्तक स्वरूपात **गीता प्रवचने** नावाने प्रकाशित करण्यात आली. या पुस्तकाचे सर्व भारतीय भाषांव्यतिरिक्त इंग्रजी, संस्कृत व नेपाळी भाषेतही भाषांतर प्रसिद्ध झाले. **भगवद्गीते** चे हे एक अत्युत्कृष्ट निरूपण मानावे लागते.

विनोबाजी, काळे, पानसे, हरकरे, वाळुंजकर व दास्तानेंना जानेवारी १९३२ मध्ये अटकेत टाकल्यानंतर सत्याग्रह आश्रम जप्त होणार अशी खात्री वाटत होती. कारण सर्व बाजूंनी नाकेबंदी करण्याचे शासकीय धोरण होते. त्याप्रमाणे आश्रम जप्त करण्यात आला. आश्रमावर अवकळा पसरली. तेथील फक्त ग्रामोद्योगी स्वरूपाचे काम चालू राहिले.

सन १९३० पेक्षा १९३२ चे आंदोलन अधिक तीव्र होते. सविनय कायदेभंगाचा जोर आता शासकीय महसूल बुडविण्यावर होता. सर्व कार्यकर्ते त्यासाठी निकराने लढले. तथापि सरकारी दडपशाही व पोलिसांचे अत्याचार पूर्वीपेक्षा अधिक कठोर होते. अल्पावधीतच गंगूताई वाळुंजकर, शरयू धोत्रे, मालती थत्ते व विमल जोग यांना अटक झाली. सन १९३२ च्या आंदोलनाची तीव्रता विदर्भातील नागपूर, वर्धा व अकोला या तीन जिल्ह्यांमध्ये अधिक होती. त्यात प्रामुख्याने विदेशी कापड व मद्यविक्रेते यांच्याविरुद्धच्या निरोधनांवर अधिक भर होता. ग्रामीण भागात वनविषयक कायद्यांचे उल्लंघन करण्यावरही भर होता. सरकारी दडपशाहीमुळे या भागातील आंदोलन मे १९३२ पासून कमकुवत झाले. पुढे आंदोलन चालू राहिले, पण फक्त शहरांमध्ये. ब्रिटिश पंतप्रधानांच्या जातीय निवाड्याच्या निषेधार्थ

[९३] **नागपूर प्रांताचा इतिहास,** पूर्वोक्त, पृ. २८.

गांधीजींनी २० सप्टेंबर १९३२ पासून तुरुंगात उपोषणाचा प्रारंभ केला. सर्व आश्रमवासी व काँग्रेसजनांचे लक्ष प्रामुख्याने गांधीजींवर केंद्रित झाले. लवकरच गांधी-आंबेडकर कर झाल्यावर (२४ सप्टेंबर) सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला. त्यानंतर सविनय कायदेभ आंदोलन फक्त प्रतिकात्मक स्वरूपात उरले होते.

सत्याग्रह आश्रमातील कार्यकर्त्यांची महत्त्वाची कामगिरी म्हणजे गावोगावी जाउ सत्याग्रहासाठी स्वयंसेवक संघटित करणे आणि जनजागृती करणे. बहुसंख्य स्वयंसेव कारागृह अधिकाऱ्यांना आपला पत्ता म्हणून सत्याग्रह आश्रमाचे नाव सांगत. त्यामु नागपूर कारागृहातील बंदिवानांमध्ये ७०० लोक वर्धा सत्याग्रह आश्रमातील असल्या आढळून आले. नागपूरशिवाय अमरावती व धुळे कारागृहांत[१४] देखील बरेच आश्रमवा आढळले. त्यामुळे सरकारने आश्रम जप्त केला. परंतु २५ डिसेंबर १९३२ रोजी सरका जप्ती हुकूम मागे घेतला. तथापि विनोबांचे मन त्यात रमेना. म्हणून त्यांनी नालवाडी नवीन आश्रमाची स्थापना करून (२५ डिसेंबर १९३२) त्यास ग्रामसेवा मंडळ असे न दिले. पुढील काळात या मंडळाने उत्तम रचनात्मक कार्य केले.

सरकारने बंदी घातलेले १९३३ चे काँग्रेसचे अधिवेशन कलकत्त्यात भरविण्याचे ठरले हो अधिवेशनासाठी वर्ध्याहून जाणाऱ्या कार्यकर्त्यांच्या एका तुकडीचे नेतृत्व राधाकृष्ण बजा तर दुसरीचे गोपाळराव काळे यांचेकडे होते. दोघे पुढारी सर्व कार्यकर्त्यांसह एप्रिलच पहिल्या आठवड्यात पकडले गेले. इतरही अनेक कार्यकर्ते अटकेत गेले. तरीही सत्याग्र आश्रम व वर्धा जिल्ह्याची कायदेभंग चळवळीतील कामगिरी चांगली होती हे निश्चित.

जंगल सत्याग्रह चिरडण्यासाठी मध्यप्रांत शासनाने अमानुष उपाययोजना केली. सत्य ग्रहींना फटके मारण्याची (Whipping) शिक्षा होई. दंडाची वसुली बेदरकारपणे के जाई. काही ठिकाणी पनिटिव (Punitive) पोलीस ठेवलेले होते. जणूकाय जुल वटहुकुमांचे अधिराज्य आले. लॉर्ड आर्यविन व्हाइसरॉय असताना निदान अमान वागणुकीचे प्रमाण कमी होते. लॉर्ड विलिंग्डन हा तर निर्दय नोकरशहा होता. त्या महात्माजी, सत्याग्रही आत्मसंयम, भारतीय स्वातंत्र्यप्रेम व काँग्रेसचा राष्ट्रीय कार्यक्र याबाबत आदर नव्हता. त्याचे एकमेव ध्येय होते ब्रिटिश साम्राज्यशाही टिकवणे.

कायदेभंग चळवळीतील लक्ष वेधून घेणारी बाब म्हणजे महिलांच्या दृष्टिकोनात महात्म जींनी घडविलेली क्रांती. आतापर्यंत पडदानशील असलेल्या महिलादेखील राष्ट्रीय आंदोलन सामील झाल्या. प्रभात फेऱ्यांमध्ये तर प्रामुख्याने महिला भाग घेत असत. परदेशी काप दुकानांवरील निरोधनांचे पुष्कळ श्रेय त्यांनाच होते. जानकीदेवी बजाज, गंगूताई वाळुंजक शरयू धोत्रे, मालती थत्ते, विमल जोग, विमल अभ्यंकर इत्यादी महिलांनी जनजागृतीबरोब सत्याग्रही स्वयंसेवक संघटित करण्याचे महत्त्वाचे कार्य पार पाडले. १९३० च्या चळवळी जिल्ह्यातील सुमारे ५० महिला कारागृहात होत्या, त्यापैकी बहुसंख्य नागझरी गावाती होत्या. युद्धमंडळाच्या सूचनांबरहुकूम मद्यविक्रेते व मद्यपींचे मतपरिवर्तन करणे सो नव्हते. तथापि त्या कामी महिलांनी उत्कृष्ट कामगिरी केली. नागपूरच्या अनसुया का

[१४] धुळे कारागृहात एकाचवेळी विनोबा भावे, बजाज, प्यारेलाल, गुलजारीलाल नंद खंडूभाई देसाई, मणीलाल कोठारी, साने गुरुजी, आपटे गुरुजी, बाळूभाई मेहत अण्णासाहेब दास्ताने व लक्ष्मणशास्त्री जोशी या मोठ्या व्यक्ती होत्या. (वाळुंजक पूर्वोक्त).

अकोल्याच्या दुर्गा जोशी आणि अमरावतीच्या पार्वती पटवर्धन यांनी या जिल्ह्यातील महिलांचा आंदोलनातील सहभाग वाढविण्याचे कामी मदत केली. जानकीदेवी तर जमनालालजींच्या धर्मपत्नीच. प्रारंभापासून महिलांचा सहभाग वाढविण्याकडे गांधीजींचा कटाक्ष होता. कायदेमंडळांवर बहिष्कार घालण्याच्या गांधीजींच्या आवाहनानुसार कायदेमंडळाचा राजीनामा देणाऱ्यांमध्ये नागपूरच्या अनसुया काळेंचा समावेश होता. त्यांनी १९३० मध्ये कायदेमंडळाचा राजीनामा देऊन महिलांना आंदोलनात आणण्यासाठी खूप प्रयत्न केले. त्यानुसार पुष्कळ सुशिक्षित महिला आंदोलनात सामील झाल्या.

सविनय कायदेभंगाची आणखी एक फलनिष्पत्ती म्हणजे अधिकाधिक जनता राष्ट्रीय प्रवाहात आली. आतापर्यंत स्वातंत्र्य आंदोलनात सुशिक्षितांचाच मोठ्या प्रमाणात सहभाग होता. १९३०–१९३२ च्या आंदोलनात बहुजनसमाज सामील झाला. स्वातंत्र्यसैनिकांच्या लोकसंख्येतील प्रमाणात सरहद्द प्रांतानंतर वर्धा तालुक्याचा भारतात दुसरा क्रमांक होता. काँग्रेसची मुळे ग्रामीण जनतेतही खोलवर रुजली व हा पक्ष जनआंदोलनाचे एक प्रतिक बनला. त्याचा प्रत्यय पुढे १९४२ च्या छोडो भारत प्रसंगी प्रकर्षाने जाणवला.

सविनय कायदेभंग आंदोलनाची समाप्ती झाल्यावर गांधीजी व आश्रमवासियांनी हरिजन उद्धार कार्यास वाहून घेतले. गांधीजींचा प्रसिद्ध हरिजन दौरा ७ नोव्हेंबर १९३३ रोजी वर्ध्याहून सुरू झाला. हरिजनांना मंदिर-प्रवेश व विहिरी खुल्या करण्यावर भर देण्यात आला. नालवाडीसही विधायक कार्य वेगाने सुरू झाले. नालवाडीच्या चर्मालयास प्रारंभी राजेंद्रप्रसाद, कमलादेवी चट्टोपाध्याय व गंगाधरराव देशपांडे या पुढाऱ्यांनी भेटी दिल्या. वर्धा परिसरात सरंजाम कार्यालय, परिश्रमालय, कुष्ठ सेवा मंडळ, गांधी सेवा संघ इत्यादी उपक्रम वेगाने कार्य करू लागले. देवळी, सिंदी, सेलू, भिवापूर, पवनार व नागझरी येथेही विधायक कार्याचा प्रारंभ झाला. मनोहर दिवाणांनी मे १९३६ मध्ये दत्तपूरला महारोगी सेवा मंडळ स्थापन करून या कार्यास वाहून घेतले.

महात्मा गांधीजींचे सेवाग्रामला आगमन

सविनय कायदेभंग आंदोलनासाठी साबरमती आश्रमातून प्रयाण करण्यापूर्वी गांधीजींनी दृढनिश्चय केला होता की, संपूर्ण स्वराज्य प्राप्तीखेरीज साबरमतीला परत येणार नाही. साबरमतीचा निरोप घेऊन गांधीजी १२ मार्च १९३० रोजी दांडीयात्रेस निघाले होते. तथापि सविनय कायदेभंग आंदोलनातून संपूर्ण स्वराज्य प्राप्त झाले नाही. गांधीजींना आपली प्रतिज्ञा कायम ठेवावयाची होती. म्हणून ज्यावर विलक्षण प्रेम केले होते त्या साबरमती आश्रमात ते परतले नाहीत. इतकेच नव्हे तर ३१ जुलै १९३३ रोजी साबरमती आश्रम ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन केला. आपणास अभिप्रेत असलेल्या मार्गाने स्वराज्य मिळविण्यास काँग्रेस हे सुयोग्य साधन नाही असेही गांधीजींना वाटू लागले, आणि त्याबरोबरच त्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निश्चय केला. दरम्यान गांधीजी वर्ध्याच्या कन्याश्रमात राहावयास गेले (सप्टेंबर १९३३). त्यानंतर २६ ते २८ ऑक्टोबर १९३४ रोजी मुंबईच्या वरळी परिसरात भरलेल्या काँग्रेस अधिवेशनामध्ये गांधीजींनी काँग्रेसचा राजीनामा दिला. इतःपर ते काँग्रेसचे चार आण्याचे सुद्धा सभासद राहिले नाहीत. परंतु गांधीजींनी पत्करलेली ही सेवानिवृत्ती म्हणजे स्वातंत्र्य आंदोलन किंवा काँग्रेसच्या चळवळीतून निवृत्ती नव्हती. विधायक आणि रचनात्मक कार्यासाठी हा मार्ग त्यांनी पत्करला होता. अशा परिस्थितीत जमनालाल बजाज यांनी गांधीजींना वर्ध्यास कायम वास्तव्य करण्याबाबत विनंती केली.

त्यानुसार काँग्रेसच्या मुंबई अधिवेशनातून गांधीजी थेट गेले ते वर्ध्यास (२९ ऑक्टोबर १९३४). तेथे कन्याश्रमामध्ये गांधीजी वास्तव्य करू लागले. तेव्हापासून त्यांनी रचनात्मक कार्यास वाहून घेतले. पुढे २० फेब्रुवारी १९३५ पासून गांधीजींनी जमनालालजींच्या बागेतील आश्रमात स्थलांतर केले. त्या स्थानाला पुढे मगनवाडी हे नाव प्राप्त झाले.[९५]

मुंबई काँग्रेसच्या (१९३४) ठरावानुसार गांधीजींनी अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळाची १४ डिसेंबर १९३४ रोजी वर्ध्यात रीतसर स्थापना केली. या मंडळाने भावी काळात महान राष्ट्रीय कार्य केले.

वर्ध्यासारख्या नगरात राहण्यापेक्षा खेडेगावात आपल्या कार्याची उभारणी करण्याचा गांधीजींनी निश्चय केला. एप्रिल १९३६ मध्ये लखनौ येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनातून परत येताना गांधीजींचा मुक्काम नागपूरला होता. खेड्यामध्ये राहण्याचा आपला निश्चय त्यांनी तेथेच प्रकट केला. याबाबत नागपूरच्या अखिल भारतीय साहित्यिक परिषदेमध्ये गांधीजींनी आपले विचार पुढीलप्रमाणे प्रकट केले. "माझे अंतःकरण खेड्यात आहे. बऱ्याच दिवसांपासून वर्ध्यानजीकच्या खेड्यात जाण्याची परवानगी मागण्यास्तव मी सरदार वल्लभभाईंकडे पुष्कळ प्रयत्न करीत आहे. त्यांना अजून हे पटलेले नाही. पण माझ्या मनास शांतता लाभणार नाही आणि परमेश्वर इच्छेनुसार थोड्याच अवधीत वर्ध्यानजीकच स्थायिक होईन अशी मी आशा बाळगतो".[९६] वस्तुतः गांधीजींची खेड्यात राहण्याची कल्पना जमनालाल बजाज तसेच वल्लभभाई पटेल या दोघांनाही पसंत नव्हती. तरी गांधीजींच्या निश्चयापुढे त्यांनी माघार पत्करली.

वर्ध्याहून सेवाग्रामला : दिनांक १७ एप्रिल १९३६ रोजी वर्ध्याच्या आग्नेयेस आठ किलोमीटर अंतरावरील सेगावला जाऊन गांधीजींनी तेथे स्थायिक होण्याचा आपला मनोदय खेडुतांच्या पुढे व्यक्त केला. सेगाव प्रामुख्याने हरिजन वस्तीचे गाव असून जमनालालजींच्या मालगुजारीत होते. सेगावच्या खेडुतांना गांधीजी म्हणाले, "मी स्वतःस तुमच्यावर लादून घेणार नाही. तुमची सेवा करण्याव्यतिरिक्त कोणत्याही हेतूने मी येथे येत नाही. पुष्कळ ठिकाणी मी व माझ्या कार्यक्रमांची लोकांना मोठी भीती वाटते. या भीतीमागील एक कारण असे आहे की, अस्पृश्यतानिवारण हे मी माझे जीवनकार्य मानलेले आहे. तुम्हास मीरा बेनकडून समजले असेलच की, मी अस्पृश्यतेचा पूर्ण त्याग केलेला असून सर्व धर्मांचे व जातींचे लोक समान लेखतो. तसेच जन्मावर आधारित भेदभाव मी अनैतिक मानतो. . . . परंतु मला सांगायचे आहे की, मी माझे विचार तुमच्यावर लादणार नाही. माझ्या उदाहरणावरून मतपरिवर्तनाद्वारे मी ते साध्य करीन. रस्ते आणि ग्रामसफाई करून मी तुमची सेवा करीन. आजारामध्ये तुमची शुश्रुषा करीन. तसेच ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन करून स्वयंनिर्भरता शिकवून तुम्हाला मदत करीन. तुम्ही माझ्याशी सहकार्य केल्यास मला आनंद होईल आणि न केल्यास तुमच्यामध्येच सामावून घेऊन मी समाधान मानीन".[९७]

रस्ते, डाक व तारघराचा अभाव असलेल्या सहाशे लोकवस्तीच्या या गावी राहण्याचा गांधीजींचा निर्धार त्यांच्या बहुसंख्य सहकाऱ्यांना पसंत नव्हता. तरीसुद्धा त्यांनी आपला

---

[९५] वाळुंजकर, पूर्वोक्त.
[९६] **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, खंड ६२**, पृ. ३४५.
[९७] कित्ता, पृ. ३३१–३२.

ार प्रत्यक्षात आणला. दिनांक ३० एप्रिल १९३६ रोजी गांधीजी वर्ध्याहून सेगावला लत गेले. तेथे त्यांच्यासाठी तेव्हा निवाराही नव्हता. बांबूच्या चटयांची एक झोपडी ारण्यात आली. तेथेच त्यांनी आपल्या कामाचा प्रारंभ केला. जून महिन्यामध्ये एक ी तयार झाली. ही कुटी म्हणजे सेवाग्रामला असलेले सध्याचे 'आदिनिवास' होय.[९८] ैमध्ये कस्तुरबा, मनू गांधी, डॉ. खान साहेब व तुकडोजी महाराज आदिनिवासामध्ये न दाखल झाले व तेथेच राहू लागले. सेगावची निवड बजाजजींमुळे झाली असा साधारण समज आहे. तथापि सेगावची जमीन बजाजजींनी दान केली असली ी सेगावची निवड पूर्णपणे मीरा बेनची होती. मीरा बेनचे मूळ नाव मॅडेलीन स्लेड ून ती एका ब्रिटिश अॅडमिरलची मुलगी होती. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाकडे आणि ाग्रही आंदोलनाकडे आकृष्ट होऊन कु. मॅडेलीन १९२५ मध्ये गांधीजींची शिष्या ली, नव्हे मानस कन्या बनली. खरे तर गांधीजींपूर्वीच मीराबेन सेगावला स्थायिक लेल्या होत्या. म्हणून त्यांच्याच इच्छेनुसार गांधीजींनी सेगावची निवड केलेली होती. नवाडीमध्ये शहरी परिसरामुळे खेडेगावाची विशेषता पूर्णपणे नव्हती, म्हणून सेगावची वड करणे गांधीजींना श्रेयस्कर वाटू लागले. सन १९३७ च्या प्रारंभी आदिनिवासमधून ुजींनी मीराबेनच्या लहान कुटीत स्थलांतर केले. तिलाच बापू कुटी असे नाव प्राप्त ले. गावाचे नाव सार्थ करण्यासाठी गांधीजींनी ५ मार्च १९४० पासून सेगावचे वाग्राम" असे नाव ठेवले. त्याचे आणखी कारण असे होते की, वऱ्हाडमध्ये शेगाव नावाचे रे गाव असल्याकारणाने बऱ्याच वेळेला डाक सेवेमध्ये गोंधळ निर्माण होत असे.[९९]

ातंत्र्य आंदोलनाचे सूत्रसंचालन

सन १९३६ पासून काँग्रेस आंदोलनाचे सूत्रसंचालन सेवाग्रामहून होऊ लागले. हा आश्रम णजे भारताची अशासकीय राजधानी बनली. वस्तुतः गांधीजी काँग्रेसचे चार आण्याचे- द्रा सभासद राहिले नव्हते. तथापि त्यांच्या प्रेरणेशिवाय अथवा सल्ल्याशिवाय काँग्रेस ारी फारसे करीत नसत. सन १९३५ च्या भारत सरकार कायद्यानुसार प्रांतिक ायत्ततेचे धोरण अमलात यावयाचे होते. त्या दृष्टीने प्रांतिक कायदेमंडळासाठी निवडणुका ावयाच्या होत्या. काँग्रेसचा निवडणूक जाहीरनामा बहुतांशी जवाहरलाल नेहरूंनी तयार ा होता. त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले सेवाग्रामला. सर्वाधिक प्रांतांमध्ये ग्रेस पक्ष मताधिक्याने निवडून आला. तथापि भारत सरकार कायद्यातील एका कलमा- बत व्हाईसरॉयने स्वतंत्र मतप्रदर्शन केल्याने सत्ताग्रहण करण्यासाठी काँग्रेसने नकार ला. त्याबरोबर काँग्रेसने मताधिक्य प्राप्त केलेल्या सर्व प्रांतांमध्ये कोंडी निर्माण झाली. बाबत वर्ध्याला विचारविनिमय करून गांधीजींनी व्हाईसरॉयबरोबर चर्चा केली णि आश्वासन मिळविले की, प्रांतिक गव्हर्नर आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करणार ही. या आश्वासनानंतर काँग्रेस मंत्रिमंडळे अधिकारारूढ झाली. मुंबई राज्याच्या पंत- ्रधान पदावरून निर्माण झालेल्या प्रकरणी सेवाग्रामला चौकशी झाली.[१००]

सी. पी. अॅण्ड बेरारच्या पंतप्रधानपदी डॉ. ना. भा. खरेंची निवड झाली. डॉ. खरेंच्या तप्रधानपदाबाबतही वाद निर्माण झाला, आणि त्याचीही शहानिशा करण्यात आली

[९८] चौधरी, के. के., "महात्माजींचे पुण्यधाम : सेवाग्राम", **लोकसत्ता**, २८ सप्टेंबर १९८६.

[९९] **कित्ता.**

[१००] चौधरी, के. के., **हिस्टरी ऑफ बॉम्बे : मॉडर्न पिरिअड** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८७), पृ. २४९.

सेवाग्रामलाच. काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यानंतर गांधीजींच्या आग्रहानुसार सी. पी. अॅण्ड बेरार शासनाने मद्यबंदीचे धोरण अमलात आणले. त्यापाठीमागे आग्रही भूमिका होती गांधीजींची.

सप्टेंबर १९३९ मध्ये ब्रिटिशांनी काँग्रेसच्या अनुमतीशिवाय भारतास महायुद्धाच्या खाईत लोटले. व्हाईसरॉयने घेतलेला हा एकतर्फी निर्णय सर्वत्र निषेध व असंतोषाचा विषय बनला. ब्रिटिश सरकारने सामंजस्य न दाखवता व भारतीयांच्या इच्छा झिडकारून युद्ध प्रयत्नांसाठी भारतीय साधनसामग्री व मनुष्यबळ वापरण्यास सुरुवात केली. प्राप्त परिस्थितीत काँग्रेस मंत्रिमंडळांना राजीनामा देण्याखेरीज पर्याय उरला नाही. चमत्कारिक स्थिती निर्माण झाली. जागतिक महायुद्धाचा जोरदार भडका उडाल्यामुळे देशव्यापी सविनय कायदेभंग करण्यासाठी काँग्रेस तयार नव्हती. दुसऱ्या बाजूने सरकारने लोकांची इच्छा झिडकारली होती. अशा हतबल अवस्थेमधून मार्ग काढण्यासाठी गांधीजींनी व्यक्तिगत सत्याग्रहाची घोषणा केली. सत्याग्रहाची आखणी सेवाग्रामलाच करण्यात आली. व्यक्तिगत सत्याग्रह हा अभिनव प्रकार असल्याकारणाने त्यासाठी निष्ठावान सत्याग्रहींची स्वतःच निवड करण्याचे गांधीजींनी ठरविले. त्यानुसार पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा भावेंची गांधीजींनी निवड केली. दुसरे सत्याग्रही म्हणून जवाहरलाल नेहरू तर तिसरे म्हणून दिल्लीचे ब्रह्मदत्त यांची निवड झाली. मर्यादित क्षेत्रापलीकडे विनोबा भावे तेव्हा प्रसिद्ध नव्हते. तथापि व्यक्तिगत सत्याग्रहासाठी त्यांच्याइतकी पातळी असलेला दुसरा सत्याग्रही नसल्याचे गांधीजींनी जाहीर केले. विनोबा भावे हे तर महान वाचस्पती, बृहस्पती, संस्कृत पंडित, गणिततज्ञ, इतिहासाचे अभ्यासक, चिकित्सक विचारवंत आणि महान धर्मज्ञ होते. बहुतेक सर्व भारतीय भाषांव्यतिरिक्त इंग्रजी, अरेबिक, फ्रेंच, जर्मन इत्यादी भाषांवरसुद्धा त्यांचे प्रभुत्व होते. सन १९१७ मध्ये गांधीजींनी सी. एफ. अँड्रूजबरोबर परिचय करून देताना विनोबांना आश्रमातील मोती म्हटले होते. अशा श्रेष्ठ गांधीवाद्याची व्यक्तिगत सत्याग्रहासाठी नियुक्ती करणे क्रमप्राप्त होते. विनोबांनी १९३७ मध्ये पवनारला स्थापन केलेला परमधाम आश्रम ही एक नमुनेदार संस्था बनली. त्याचे सर्व श्रेय त्यांनाच होते. विनोबांनी गांधीजींच्या सूत्रसंचालनानुसार १७ ऑक्टोबर १९४० रोजी पवनारला पहिले 'युद्धविरोधी' भाषण करून व्यक्तिगत सत्याग्रहाचा शुभारंभ केला. त्यानंतर त्यांनी वर्ध्याजवळील सूरगाव, सेलू व देवळी या गावी युद्धविरोधी भाषणे करून सत्याग्रह केल्यामुळे २१ ऑक्टोबर रोजी त्यांना अटक करण्यात आली. विनोबा भावे १५ जानेवारी १९४१ रोजी कारागृहातून सुटून आल्यानंतर लगेच दोन दिवसांनी त्यांनी सत्याग्रहास पुन्हा प्रारंभ केला. त्यामुळे त्यांना पुन्हा अटक करण्यात आली. त्यांचा पहिला कारावास तीन महिन्यांचा होता, तर दुसरा सहा महिन्यांचा. त्यानंतर त्यांनी तिसऱ्यांदा सत्याग्रह केल्यामुळे पुन्हा एक वर्षाची शिक्षा देण्यात आली.

सन १९४१ मध्ये वर्ध्यातील शेकडो काँग्रेसजनांनी व्यक्तिगत सत्याग्रहात हिरिरीने भाग घेतला. सेवाग्राम व परमधाम आश्रमातील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी सत्याग्रहासाठी कारावास पत्करला. या सत्याग्रहामध्ये जमनालाल बजाज यांनी अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली. विशेष म्हणजे रामकृष्ण बजाज या सर्वांत लहान सत्याग्रहीची निवड महात्माजींनी केली होती.

व्यक्तिगत सत्याग्रहापूर्वी फेब्रुवारी १९३९ मध्ये बजाजजींनी जयपूर संस्थानात आंदोलन उभारले. संस्थानी राजवटीने त्यांना संस्थानात प्रवेश करण्यास प्रतिबंध केला. तथापि त्याची तमा न बाळगता ते संस्थानात गेले. तेथील आंदोलनास्तव त्यांना मोरानसागर किल्ल्यात बंदिस्त करण्यात आले. मोरानसागरच्या प्रतिकूल हवामानाचा त्यांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम झाला व त्यातून ते पूर्णपणे सावरलेच नाहीत. तरीसुद्धा व्यक्तिगत सत्याग्रहात त्यांनी भाग घेतलाच. बंदिवासातच आजारी पडल्याने ३ जून १९४१ रोजी त्यांना मुक्त करण्यात आले. त्यानंतर आध्यात्मिक साधना करण्यावर त्यांनी भर दिला. या उपक्रमाला पोषक असा गोसेवा उपक्रम त्यांनी हाती घेतला. या कार्यास संघटित स्वरूप देण्यासाठी त्यांनी गोसेवा संघाची स्थापना केली आणि अकरा दिवसांनी म्हणजे ११ फेब्रुवारी १९४२ रोजी वयाच्या ५३ व्या वर्षी त्यांचे अकाली निधन झाले.

वैराग्यमूर्ती असलेला हा महात्माजींचा शिष्य व सहकारी लौकिक अर्थाने भांडवलदार, मालगुजार होता. तथापि खऱ्या अर्थाने तो महान दानशूर दाता, गांधीवादी साधक व विशाल क्रियाशीलता असलेला थोर राष्ट्रीय पुढारी होता. जानेवारी १९२१ पासून काँग्रेसचा कोषाध्यक्ष या नात्याने या दात्याने काँग्रेसला वित्तबळाची उणीव भासू दिली नाही. जमनालालजी कोषाध्यक्ष या नात्याने शेवटपर्यंत काँग्रेस कार्यकारिणीचे सभासद राहिले. सत्यासत्य विवेकातून शब्दयोजना करण्यात त्यांचे नैपुण्य असल्याकारणाने कार्यवाहीचा मसूदा अचूक लिहिण्यासाठी त्यांची काँग्रेस कार्यकारिणीस नेहमीच गरज भासत असे. गांधीजींच्या एका पत्रातील बजाजजींबाबतचा मजकूर अत्यंत सूचक आहे : " I seldom undertook an activity in which he did not co-operate with body, mind and wealth. I never fancied what goes by the name of politics, nor did he. He came into it because I was involved in it. But my real political activity was confined to the constructive programme. So was his. I had hoped that after me he would completely take over all those activities which are regarded as peculiarly mine. He had even assured me to this effect. " (*Collected Works of Mahatma Gandhi, Vol. 75, p. 315*).

बृहत् बजाज परिवार राष्ट्रीय आंदोलनात होता. या परिवारातील जानकीदेवी, जमनालालजींची मुले, बहीण, चुलते, पुतणे इत्यादींनी कारावास पत्करला. कमलनयन बजाजवर तर विनोबाजींच्या पवनार आश्रमाचेच संस्कार होते. रामकृष्ण बजाज यांचा जीवनौघ सुरू झाला वयाच्या अठराव्या वर्षी केलेल्या व्यक्तिगत सत्याग्रहाने. व्यक्तिगत सत्याग्रहासाठी गांधीजींनी विहित केलेल्या प्रणालीनुसार सरकारविरोधी आंदोलन करण्याचा निग्रह रामकृष्णने व्यक्त केला. या कोवळ्या वयात रामकृष्णच्या सत्याग्रहास गांधीजी अनुकूल नव्हते. तथापि या तरुणाची जिद्द व कमलजींच्या आग्रहास्तव गांधीजींनी परवानगी तर दिलीच परंतु वर्ध्याच्या उप आयुक्तास पत्र लिहून (१२ एप्रिल १९४१) रामकृष्णच्या नियोजित सत्याग्रहाबाबत आगाऊ सूचनाही दिली. छोडो भारत आंदोलनात रामकृष्ण बजाज यांनी मुंबईहून आणलेला काँग्रेसचा कार्यक्रम प्रसृत करून तरुणांना प्रेरित केले व त्यासाठी १९४४ पर्यंत प्रदीर्घ कारावास पत्करला. एकूण बृहत् बजाज परिवाराने देशकार्य व स्वातंत्र्यासाठी महान योगदान केले.

महात्मा गांधींच्या वर्धा-सेवाग्राम वास्तव्यापासून अखिल भारतीय पातळीवर विधायक कार्य करणाऱ्या अनेक गांधीवादी संस्था येथे उदयास आल्या. सत्याग्रह आश्रम जुलै १९२१ मध्ये स्थापन झाला. जमनालालजींच्या प्रेरणेनुसार वर्ध्यात १९२२ मध्ये कन्या आश्रम

कार्यरत झाला. या संस्थेचेच नंतर महिलाश्रमात रूपांतर करण्यात आले. त्यानंतर स्थापन झालेली अखिल भारतीय पातळीवरील महत्त्वाची संस्था म्हणजे १९२५ मध्ये गांधीजींनी स्थापिलेला अखिल भारतीय चरखा संघ (ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशन) होय. प्रारंभापासूनच गांधीजी संघाचे अध्यक्ष होते. गांधीजी कारागृहात असताना मात्र काही काळ विठ्ठलदास जेराजानी तात्पुरते अध्यक्ष झाले. अखिल भारतीय चरखा संघाच्या अनेक प्रांतिक शाखा देखील होत्या. संघाची महाराष्ट्र शाखा प्रारंभी वर्ध्यात होती. परंतु नंतर शाखेचे चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे स्थलांतर करण्यात आले. पुण्याचे अनंत वासुदेव सहस्रबुद्धे ऑक्टोबर १९४२ पर्यंत महाराष्ट्र शाखेचे सचिव होते.[१०१]

काँग्रेसशी संबंधित असलेला चरखा संघ ही एक सेवाभावी संस्था होती. संस्थापक व अध्यक्ष या नात्याने गांधीजींनी या संस्थेच्या विद्यमाने महान कामगिरी केली. खादी निर्मितीमध्ये गरिबांना सहाय्य करण्यास्तव ही संस्था कार्यरत होती. सन १९३४ मध्ये संघास काँग्रेसने अंगीकृत केले होते, तरी सेवाभावी संस्था म्हणूनच संघ कार्य करीत होता. संघाने प्राप्त केलेल्या नफ्यावर आयकर बसविणे संघाला अयोग्य वाटले. तरीसुद्धा सरकारने संघाला पाच लाख रुपयांची आयकर थकबाकी वसूल करण्यासाठी जंगजंग पछाडले. संघाने मुंबई उच्च न्यायालयाकडे अपील केले. तथापि काही कायदेशीर त्रुटींच्या निमित्ताने उच्च न्यायालयाने अपील फेटाळून लावले. त्यासाठी संघाने प्रिव्ही कौन्सिलकडे पुन्हा अपील केले. अपिलाचा निकाल लागेपर्यंत आयकर वसुलीस स्थगिती देण्याची गांधीजींची विनंती फेटाळून लावण्यात आली. वस्तुतः १९२२ ते १९४२ या वीस वर्षांच्या काळात संघाने भरीव कामगिरी करून खादी निर्माण करणाऱ्या गरीब लोकांना चार कोटी रुपये मजुरीपोटी वितरित केलेले होते. अशा या सेवाभावी संस्थेकडून पाच लाख रुपयांची वसुली सरकारने केली. या प्रकरणी गांधीजींना व्हाईसरॉयकडे दाद मागावी लागली. त्यासाठी गांधीजींनी व्हाईसरॉयला ८ फेब्रुवारी १९४२ रोजी पत्र लिहिले.[१०२] लिनलिथगो यांनी सरकार या प्रकरणी दुष्ट हेतूने वसुली करीत असल्याच्या आरोपाचा इन्कार केला. तथापि प्रिव्ही कौन्सिलच्या निवाड्यापर्यंत वसुलीस स्थगिती देण्याचे सौजन्य दाखविले. आयकरातून सूट द्यावयाची विनंती मात्र फेटाळून लावली. शिवाय सूट देणे शक्य असल्यास ती पूर्वलक्षी प्रभावाने न देता पुढील कालावधीसाठी देणे शक्य होईल असेही व्हाईसरॉयने नमूद केले.[१०३] लहानसहान बाबीमध्येसुद्धा सरकार काँग्रेसच्या संस्थांना तऱ्हेतऱ्हेने उपद्रव करीत असे.

छोडो भारत आंदोलन सुरू झाल्यानंतर अखिल भारतीय चरखा संघ व संघाच्या प्रांतिक शाखांनीसुद्धा आंदोलनामध्ये सक्रीय भाग घेतला. हजारो कार्यकर्ते आंदोलनात उतरले. काहींनी भूमिगत कार्य केले, तर काही कार्यकर्ते घातपाती कृत्यांकडेसुद्धा वळले. संघाच्या महाराष्ट्र शाखेचे सचिव अनंत वासुदेव सहस्रबुद्धे यांनीसुद्धा भूमिगत आंदोलनास वाहून घेतल्याने त्यांची जागा घेतली द्वारकानाथ विष्णू लेलेंनी.[१०४]

---

[१०१] अनंत वासुदेव सहस्रबुद्धेंनी मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रँचपुढे दिलेली कबुली, होम पोलिटिकल फाईल क्र. ३/७९/४२, राष्ट्रीय अभिलेखागार, नवी दिल्ली.

[१०२] गांधीजींचे लिनलिथगो यांना पत्र, ८ फेब्रुवारी १९४२, **ट्रान्स्फर ऑफ पॉवर, खंड १** (हर मॅजेस्टिज स्टेशनरी ऑफिस, लंडन, १९७०), पृ. १३५.

[१०३] लिनलिथगो यांचे गांधीजींना उत्तर, २० फेब्रुवारी १९४२, कित्ता, पृ. २१२.

[१०४] होम पोलिटिकल फाईल क्र. ३/७९/४२, पूर्वोक्त.

सत्याग्रह आश्रमाचा त्याग करून विनोबा भावेंनी २५ डिसेंबर १९३२ रोजी नालवाडीला ग्रामसेवा मंडळाची स्थापना केली होती. या मंडळाच्या कार्याचा तपशील वर आलेला आहेच. गांधीजींनी वर्ध्याला वास्तव्य केल्यावर अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळ (ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रिज असोसिएशन) स्थापन केले (१९३५). काही दिवस श्रीकृष्णदास जाजू अध्यक्ष होते. परंतु नंतर गांधीजींना अध्यक्ष पद सांभाळावे लागले. ग्रामोद्योग मंडळाच्या बहुतांश कार्यकर्त्यांनी छोडो भारत आंदोलनामध्ये विलक्षण कामगिरी केली. मनोहर दिवाणांनी गांधीजींच्या प्रेरणेने मे १९३६ मध्ये प्रारंभिलेले दत्तपूरचे महारोगी सेवा मंडळ म्हणजे भारतातील या क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट संस्था होती. महिला आश्रमाच्या महिलांनी वर्धा, चंद्रपूर, नागपूर, अमरावती, अकोला, शिवनी व जबलपूर जिल्ह्यांमध्ये छोडो भारत आंदोलनात नेत्रदिपक कामगिरी केल्याचे पुरावे सरकारी गोपनीय कागदपत्रांमध्ये नमूद केलेले आहेत.[१०५] जमनालालजी यांनी त्यांच्या निधनापूर्वी अकरा दिवस आधी स्थापन केलेला गोसेवा संघ (जानेवारी १९४२) ही केवळ गोसेवा करणाऱ्यांची नव्हे तर स्वातंत्र्य आंदोलकांची महत्त्वाची संस्था होती. उपरोक्त सर्वच संस्थांच्या शेकडो कार्यकर्त्यांनी आंदोलनामध्ये सक्रीय भाग घेऊन कारावासही पत्करला. गांधीवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार केलेल्या स्वयंसेवकांना व कार्यकर्त्यांना छोडो भारत आंदोलनामध्ये भूमिगत घातपाती कार्यही करावे लागले.

छोडो भारत आंदोलन

व्यक्तिगत सत्याग्रहाचे अपयश व क्रिप्स योजनेची विफलता यानंतर भारतीयांना नैराश्याच्या अंधारातून बाहेर काढण्यासाठी परिणामकारक देशव्यापी आंदोलनाची संकल्पना गांधीजींनी काँग्रेसपुढे मांडली सेवाग्राममधूनच. आपले निकटवर्ती व व्यक्तिगत अनुयायी मीरा बेन (मिस मॅडेलीन स्लेड), खुर्शीद बेन नौरोजी, राम मनोहर लोहिया, राजकुमारी अमृत कौर इत्यादींपुढे गांधीजींनी आपली संकल्पना प्रथम मांडली. मीरा बेन, खुर्शीद बेन, डॉ. लोहिया व नंदन केवलार यांना ओरिसा, बंगाल, आसाम व बिहारच्या स्फोटक प्रदेशातील युद्धविषयक स्थिती, लोकांचे मनोधैर्य व आंदोलनास अनुकूलता अजमावण्यासाठी गांधीजींनी पाठविले. त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या वस्तुनिष्ठ अहवालांनुसार गांधीजींची खात्री पटली की, इंग्रजांना भारत सोडून जाण्यास्तव निर्वाणीचा इशारा देण्याची हीच वेळ आहे. त्यानुसार छोडो भारत ठरावाचा मसुदा तयार करून २७ एप्रिलपासून १ मे पर्यंत अलाहाबादला भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या विचारार्थ पाठविला. हा मसुदा पाठविला मीरा बेन या खास दूताकरवी. सेवाग्रामहून मीरा बेननी आणलेला मसुदा एका गटास पसंत नव्हता. गांधीजींचा गट मात्र मसुदा जसाचा तसा संमत करण्यासाठी कटिबद्ध होता. तथापि काँग्रेसमधील संभाव्य फूट टाळण्यासाठी तडजोडीचा ठराव संमत झाला. मूळ गाभा नष्ट करणारी ही तडजोड गांधीजींना मान्य नव्हती. म्हणून काँग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांना त्यांनी सेवाग्रामला बोलवून मूळ प्रस्ताव संमत करण्यासाठी सांगितले. काँग्रेसने आंदोलनास प्रारंभ न केल्यास व्यक्तिगत जबाबदारीवर आंदोलन उभारण्याचा गांधीजींनी निर्धार केला. त्यांनी आता क्रांतिकारक बंडखोराची भूमिका घेतली. महात्माजींच्या निर्धारापुढे सर्व काँग्रेस पुढाऱ्यांनी नमते घेऊन सेवाग्रामला झालेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत छोडो भारत ठराव संमत केला. ठरावास विरोध करणाऱ्या

---

[१०५] फोर्टनाईटली रिपोर्ट ऑफ दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अॅण्ड बेरार गव्हर्मेन्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर १९४२, राष्ट्रीय अभिलेखागार, नवी दिल्ली.

राजगोपालचारी व भुलाभाई देसाईंनी काँग्रेस कार्यकारिणीचा राजीनामा दिला. सेवाग्रामच्या ठरावावर ६ ते १४ जुलै म्हणजे नऊ दिवस प्रदीर्घ चर्चा झाली होती. सेवाग्रामच्या ठरावास सर्वसाधारणपणे 'वर्धा ठराव' म्हटले जाते.

वर्धा ठराव काँग्रेसच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासामध्ये एक क्रांतिकारी पाऊल होते. हा ठराव संमत होत असतानाच वर्धा-सेवाग्रामभोवती सरकारचे कान व डोळे भिरभिरत होते. ब्रिटिशांना अशी आशा होती की, राजगोपालचारी व आझाद गटाच्या भूमिकेमुळे संकल्पित छोडो भारत आंदोलनाचा प्रारंभ होणार नाही. तथापि ब्रिटिशांची ही आशा फोल ठरली, आणि वर्धा ठराव १४ जुलै रोजी एकमताने संमत झाला. याच ठरावावर ५–६ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेस कार्यकारिणीने पुनर्विचार करून त्यास अंतिम स्वरूप दिले. अंतिम स्वरूपात अवतीर्ण झालेल्या ठरावास छोडो भारत ठराव असे नाव प्राप्त झाले. हे दोन्हीही ठराव ऐतिहासिक महत्त्वाचे असल्याकारणाने व त्यातील साम्यभेद अवलोकन करण्यासारखे असल्याकारणाने त्यांचा मूळ मसुदा या प्रकरणाच्या शेवटी जोडलेला आहे.

वर्धा ठराव आणि ७–८ ऑगस्ट रोजी मुंबईत भरलेले अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अधिवेशन या दरम्यानच्या कालावधीत वर्ध्याला प्रचंड हालचाली झाल्या. संपूर्ण देशामधून काँग्रेस कार्यकर्ते गांधीजींचे मार्गदर्शन घेण्यास वर्ध्यास येऊन गेले. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या सभासदांखेरीज इतरही शेकडो कार्यकर्ते सेवाग्रामला येऊन गेले. या कालावधीत गांधीजींनी काँग्रेसजन व आपल्या निकटवर्तीयांना विविध प्रकारच्या सूचना देऊन ठेवल्या. चरखा संघाचे कार्यकर्ते, महिला आश्रमातील महिला, ग्रामोद्योग मंडळाचे कार्यकर्ते तसेच इतर गांधीवादी संस्थांचे कार्यकर्ते गांधीजींचे मार्गदर्शन घेऊन गेले. सेवाग्राम आश्रमवासियांना तर गांधीजींनी स्पष्ट शब्दात सांगितले की, संकल्पित आंदोलन प्रत्यक्षात आल्यास आश्रमाचे अन्नपाणी देखील सरकारकडून बंद होण्याची शक्यता आहे. म्हणून जे कार्यकर्ते अपुऱ्या अन्नपाण्याशिवाय येथे राहू शकतील त्यांनीच आश्रमात राहावे, अन्यथा त्यांनी आपल्या घरी परतावे. तथापि कोणीही आश्रमवासी आश्रम सोडून गेला नाही. राष्ट्रीय युवक संघाच्या स्वयंसेवकांनी गांधीजींची भेट घेतली असता त्यांच्यासमोर गांधीजींनी आपला मनोदय पूर्णतः व्यक्त केला. **महात्मा गांधी संकलित साहित्या**मध्ये या विषयावर अनेक कागदपत्र प्रकाशित झालेले आहेत. हे संकलित साहित्य विलक्षण अभ्यासनीय आहे.[१०६] दिनांक २ ऑगस्टला गांधीजींनी मुंबईला कलकत्ता मेलने जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. त्यानंतर गांधीजी सेवाग्रामला परत आले ते ऑगस्ट १९४४ मध्येच.

अखिल भारतीय काँग्रेस समितीने मुंबईत छोडो भारत ठराव संमत करताच गांधीजींसह काँग्रेस श्रेष्ठींना मुंबईतच अटक करण्यात आली. आणि ९ ऑगस्टच्या प्रभातकाली आंदोलनास प्रारंभ झाला. अधिवेशनासाठी मुंबईला गेलेल्या काँग्रेसजनांना त्यांच्या परतीच्या वाटेवर अटक करण्यात आली. विदर्भातील काँग्रेसजनांना मलकापूर रेल्वेस्थानकातच गाडी थांबवून पोलिसांनी ताब्यात घेतले. सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अ‍ॅण्ड बेरारचे भूतपूर्व प्रमुख रविशंकर शुक्ल व द्वारकाप्रसाद मिश्रांव्यतिरिक्त अठरा पुढाऱ्यांना मलकापूरला बुलढाणा पोलीस अधीक्षकाने अटक केली.[१०७]

---

[१०६] **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, खंड ७६.**

[१०७] पोलीस अधीक्षक, बुलढाणा, १७ ऑगस्ट १९४२ चा अहवाल, चोप्रा, पी. एन. (संपा.), **क्विट इंडिया मुव्हमेंट : ब्रिटिश सिक्रेट डॉक्युमेंट्स** (इन्टरप्रिन्ट, नवी दिल्ली, १९८६), पृ. ५६.

महात्माजी व काँग्रेस श्रेष्ठींना अटक केल्याचे खळबळजनक वृत्त ९ ऑगस्टच्या सायंकाळपर्यंत वर्ध्यात पसरले. विनोबा भावेंना पहिल्याच दिवशी अटक करण्यात आली. त्यांना प्रथम नागपूरला व नंतर वेलोर मध्यवर्ती कारागृहात डांबण्यात आले. दिनांक १० ऑगस्ट रोजी वर्ध्यात मिरवणुका व निषेध सभांना जोर चढला. जनमत प्रक्षुब्ध झाले परंतु राधाकृष्ण बजाज व दीनदयाल चुडिवालेंनीं प्रक्षुब्ध जमावास आवरले. दि. ११ ऑगस्टच्या दुपारी गोळीबारात जंगलु धोंडबाजी ढोरे पहिला हुतात्मा झाला. त्यामुळे लोक अधिकच प्रक्षुब्ध झाले. गांधीजींना अटक केल्याच्या निषेधार्थ वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा. ठाकूरदास के. बंग यांनी आपल्या प्राध्यापक पदाचा राजीनामा दिला (११ ऑगस्ट). या पार्श्वभूमीवर वर्धा व देवळी ही दोन्ही गावे लोकांच्या प्रक्षोभरूपी अग्नीने पेटली. देवळीतील वातावरण अधिकच प्रक्षुब्ध झाले आणि तरुण स्वयंसेवक छोडो भारतच्या प्रचारार्थ गावोगाव जाऊ लागले.

जमनालाल बजाज यांचे सुपुत्र रामकृष्ण बजाज आणि दुसरे काँग्रेस पुढारी गोपाळराव काळे काँग्रेस अधिवेशनासाठी मुंबईस गेलेले होते. मुंबईहून आगगाडीने वर्ध्यास परत येताना हे दोघे पुलगावहून देवळीस गेले (११ ऑगस्ट). त्यांनी देवळीतील लोकांना आंदोलनात एकमताने भाग घेण्यासाठी आवाहन केले. मुंबईहून आणलेला काँग्रेसचा कार्यक्रम त्यांनी लोकांपुढे ठेवला. त्यांच्या आवाहनास देवळीमध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. ऑगस्ट १४ ला प्रक्षुब्ध जनतेने देवळीचे डाकघर व पोलीस ठाणे भस्मसात करून तारयंत्रणेची खूप नासधूस केली.[१०८]

नागपूरला स्वातंत्र्य आंदोलकांनी केलेल्या बंडाच्या बातम्या वर्ध्याला ११–१२ ऑगस्ट रोजीच येऊन पोहोचल्या होत्या. त्यांचे पडसाद स्थानिक काँग्रेसजन आणि आश्रमवासियांवर उमटणे अपरिहार्य होते. गोविंदराम सेकसरिया महाविद्यालयाचे विद्यार्थी अधिकच प्रक्षुब्ध झाले, अनावर झाले. ब्रिजलाल बियाणींच्या ११ ऑगस्टच्या **मातृभूमी** मधील पुढील आवाहनाने वातावरण अधिकच खवळले :—"विद्यमान लढा एका विशिष्ट पक्षाचा किंवा धर्मीयांपुरता मर्यादित नसून अखिल भारतीयांचा आहे." गांधीजींचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविताना बियाणींनी आवाहन केले की, "या अंतिम लढ्यात त्यांनी व्यक्तिगत भवितव्याचा विचार न करता आत्मसमर्पणाच्या भावनेने उडी घ्यावी, कारण राष्ट्राच्या जीवनातच व्यक्तीचे जीवन समाविष्ट असते. आता विचार करीत बसण्यास वेळ नाही. विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन आंदोलनाच्या यज्ञात आपले जीवित साफल्य शोधावे."[१०९] सरकारी बळाची तमा न बाळगता विद्यार्थी शहरात व परिसरातील गावांमध्ये उग्र निदर्शने करू लागले. पोलिसांच्या आक्रमक कारवाईमुळे विद्यार्थी अनावर झाले होते. अल्पावधीत विद्यार्थी व आश्रमवासियांनी प्रचंड जनआंदोलन उभारले.

वर्धा व देवळीनंतर खरांगणा गावी आंदोलन तीव्र स्वरूपात पसरले. खरांगणाचे स्थानिक काँग्रेस पुढारी भानुराव उमक यांनी झेंडावंदनाचा समारंभ घडवून सरकारविरुद्ध बंड करून उठण्याची घोषणा केली (१५ ऑगस्ट). तत्पूर्वी १३ तारखेस गांधीजींचे सहकारी महादेव अनंत मोघे खरांगण्याला गेले होते. त्याबरोबरच खरांगण्यातील जनमत सरकारविरुद्ध प्रक्षुब्ध होऊन लोकांनी तेथील पोलीस उप निरीक्षक व चार हवालदारांना चोप दिला होता. अशा

[१०८] सी. पी. अॅण्ड बेरार गुप्तवार्ता पोलिसांचा अहवाल.

[१०९] चोप्रा, पूर्वोक्त, पृ. १९-२०.

प्रक्षुब्ध वातावरणामध्ये भानुराव उमकांच्या घोषणेने खरांगणामध्ये बंडाळीचे वातावरण निर्माण केले.[११०] मात्र सरकारने अतिरिक्त पोलीस कुमक पाठवून खरांगणाचे बंड मोडून काढले.

गुप्तवार्ता पोलिसांच्या अहवालांवरून दिसून येते की, काँग्रेस आंदोलनाचा मुंबईहून आणलेला कार्यक्रम प्रथम लोकांपुढे ठेवला रामकृष्ण बजाज व गोपाळराव काळे यांनी. लेखी स्वरूपात आणलेला हा कार्यक्रम त्यांनी जाहीर सभेत वाचून दाखविला. या कार्यक्रमात विद्यालये व महाविद्यालयांवरील बहिष्कार तसेच रेल्वे आणि दूरसंचरण व्यवस्था विस्थापित करणे समाविष्ट होते. जिल्हा पोलीस अधीक्षकाने कार्यक्रमाची प्रत सभेत जाऊन हिसकावून घेतली खरी परंतु त्यामुळे पोलिसांना जनसमुदायाने घेराव घातला. प्रा. बंग यांनी पोलिसांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले. तसेच पोलिसांना जीवनावश्यक वस्तूंची विक्री न करण्याचीही सूचना केली. प्रक्षुब्ध जनता दुकानांची लुटालूट करण्याची शक्यता असल्याने दुकानदारांनी दुकाने बंद ठेवावी असेही सुचविले.[१११]

दिनांक १४ ऑगस्ट पासून नवभारत विद्यालय अदमासे ६ आठवडे बंद होते, तर कॉमर्स कॉलेज ४–५ महिने बंद राहिले. कॉलेजमधील २०० पैकी ५० विद्यार्थ्यांना व १२ प्राध्यापकांपैकी प्राचार्यांसह सहा प्राध्यापकांना कारावास घडला. भूमिगत विद्यार्थ्यांनी खेडोपाडी खूप प्रचार कार्य केले. त्यांच्यापैकी मोतीराम होले हा विद्यार्थी शेवटपर्यन्त पकडला गेला नाही. किशोरलाल मश्रूवाला यांनी **हरिजन** पत्रकाद्वारे **छोडो भारत** कार्यक्रमाची कल्पना स्पष्ट केली. थोड्या दिवसात त्यांना अटक झाली. गोपाळराव काळे **हरिजन** ची स्थानिक मराठी आवृत्ती काढीत. आचार्य आर्यनायकम, श्रीकृष्णदास जाजू, जे. सी. कुमारप्पा, श्रीमन नारायण, दादा धर्माधिकारी इत्यादी गांधीवाद्यांना कारावास घडला. बोरगावच्या (मेघे) सत्याश्रमातून स्वामी सत्यभक्त प्रचार पत्रक काढीत असल्याचा व बोरगावला भूमिगत पुढारी बाबा राघवदास आल्याचा दावा केला जातो.

शासनाची पूर्वनियोजित कारवाई : छोडो भारत आंदोलनाच्या प्रारंभापूर्वीच प्रांतिक शासनाने कडक उपाययोजना नियोजित केलेली होती. केंद्रीय गुप्तवार्ता अधिकारी राय साहेब शुकूल याने मे १९४२ पासूनच वर्ध्याभोवती गुप्त वार्ताहरांचे जाळे पसरले होते. छोडो भारतचा गांधीजींचा मूळ प्रस्ताव भारत सरकारला प्रथम समजला सी. पी. अॅण्ड बेरारचा गव्हर्नर सर हेन्री ट्वायनॅम (Twynam) याचेकडून. ट्वायनॅमला शुकूलने १९ मेच्या सुमारासच ही गुप्तवार्ता दिली होती. गांधीजींच्या संकल्पित आंदोलनाचे पारिपत्य करण्यासाठी ट्वायनॅमने व्हाईसरॉय लिनलिथगो यांना सल्ला देण्याचा प्रारंभ त्याच्या २५ मे १९४२ च्या पत्रापासून केल्याचे स्पष्ट दिसते.[११२] याच पत्रात गव्हर्नर कळवितो की, ताज्या गुप्तवार्ता अहवालानुसार गांधीजींनी पुनमचंद राका आणि इतर कार्यकर्त्यांना देशव्यापी आंदोलनासाठी जनमत तयार करण्यासाठी व काँग्रेस स्वयंसेवक पथके उभारण्यासाठी सूचना दिल्या. स्थानिक काँग्रेसजन आंदोलनाबाबत फारसे उत्साही नसले तरी गांधीजी मात्र कटिबद्ध आहेत. ट्वायनॅमच्या या पत्रातील माहिती, विश्लेषण व सल्ला यासाठी लिनलिथगोंनी त्याचे मनःपूर्वक आभार मानून लिहिले की, "महात्मा गांधींवर मी आता

[११०] सी. पी. अॅण्ड बेरार गुप्तवार्ता पोलिसांचा अहवाल.

[१११] कित्ता.

[११२] सर हेन्री ट्वायनॅमचे लॉर्ड लिनलिथगो यांना पत्र, २५ मे १९४२, **ट्रान्स्फर ऑफ पावर, खंड २** (हर मॅजेस्टिज स्टेशनरी ऑफिस, लंडन, १९७१), पृ. ११७-१९.

त नजर ठेवली आहे."[११३] दिनांक ९ जून १९४२ च्या पत्रात सर हेन्री लिहितो की, ९३२ च्या आंदोलन प्रसंगी गांधी व काँग्रेसला चिरडून टाकल्यामुळे गांधींना काँग्रेसमधून वृत्ती पत्करावी लागली होती, तशीच कठोर कारवाई करून गांधींना निष्प्रभ करून कावे. याच पत्रात सर हेन्रीने अवास्तव आत्मविश्वासही व्यक्त केला की, या प्रदेशात धींचे संकल्पित आंदोलन व्यापक तर होणार नाहीच, पण फुसके ठरेल.[११४] ऑगस्ट १९४२ रच्या घटना बघता सर हेन्रीचा आत्मविश्वास अनाठायी होता, ते त्याचे मनोराज्य ते. काँग्रेस पक्षावर त्वरित बंदी आणून गांधींना सक्त धमकी देण्याचा त्याचा सल्लाही साच आततायीपणाचा होता. सर हेन्री लिहतो " In my last letter, I expressed onfidence that any subversive movement launched by Gandhi will not e a success in this Province: it may be of interest if I analyse the osition a little more closely. I can count on Berar remaining almost holly aloof; in fact, there are large purses waiting for me there which ave been collected without any pressure and which are larger than nything that Gandhi would be able to collect, I venture to say, for ny of his schemes.... Then, in the Nagpur Division, including andhi's home town district of Wardha, there is a large Maratha nd Marathi speaking element which thinks on much the same lines Berar, although demonstrations could be successfully staged in agpur City ".[११५] उपरोक्त आशावाद वऱ्हाडचे बाबतीतसुद्धा खरा नव्हता. मात्र थील धनिक व जमिनदारांनी सरकारी युद्ध निधीसाठी मोठमोठ्या रकमा दिल्या होत्या. यापि वर्धा-नागपूरचे बाबतीत मात्र ट्वायनॅमचा अंदाज खोटा ठरला.

दिनांक ९ जुलैच्या गुप्तवार्ता अहवालाने ट्वायनॅमच्या आशावादास पहिला धक्का ला. या अहवालात स्पष्टपणे नमूद केले होते की, वर्ध्यातील काँग्रेस कार्यकारिणीच्या ठकीत गांधींनी ठणकावून सांगितले की, छोडो भारत आंदोलनाद्वारे ब्रिटिश युद्ध यंत्रणा मकुवत करून भारताने दोस्त राष्ट्रांच्या शत्रूंबरोबर बरोबरीच्या नात्याने वाटाघाटी राव्या. गांधीजींच्या याच पवित्र्यामुळे ब्रिटिश सरकार चिंताग्रस्त झाले होते. ट्वायनॅमच्या ९ जुलैच्या पत्रातील भाषा बदलली. येऊन ठेपलेले आंदोलन 'उघड बंड' (Open ebellion) असून परिणामकारक प्रतिरोधक उपाय आणि दहशत बसविण्यासाठी हणून गांधींना देशाबाहेर हद्दपार करण्याचाही त्याने व्हाईसरॉयला सल्ला दिला. The latest information available to me indicates that the movement ill be designed on the most subversive and dangerous lines...... irmest possible measures at the start are essential to prevent the movement gaining ground and absorbing the whole time of the Police force."[११६] ातिवंत आय. सी. एस. नोकरशहा असलेला ट्वायनॅम आंदोलन चिरडून टाकण्यास्तव ाधीच कटिबद्ध होता. शून्य तासात प्रकाशित करण्यासाठी त्याने आधीच असाधारण ाजपत्र आणि जिल्ह्यातील अधिकाऱ्यांसाठी सांकेतिक सूचनांचा मसुदा तयार ठेवला ोता.[११७]

---

[११३] लिनलिथगो यांचे सर हेन्रीस उत्तर, ६ जून १९४२ चे पत्र, कित्ता, पृ. १८४-८५.
[११४] सर हेन्री ट्वायनॅमचे लिनलिथगो यांना पत्र, ९ जून १९४२, कित्ता, पृ. १९५-९६.
[११५] सर हेन्री ट्वायनॅमचे लिनलिथगो यांना पत्र, २४ जून १९४२, कित्ता, पृ. २६५.
[११६] २९ जुलै १९४२ चे पत्र, कित्ता, पृ. ४९१-९२.
[११७] १ ऑगस्ट १९४२ चे पत्र, कित्ता, पृ. ५२७.

गांधीजींचे **हरिजन** मधील उतारे व वर्धा-सेवाग्राममधील वार्ता दिल्लीस पाठविण्यासाठी शासकीय यंत्रणा तत्पर होती. आधीपासूनच अतिरिक्त पोलीस बळ व सैन्यदल सर्व संवेदनाक्षम भागात तैनात केलेले होते. नागपूरच्या एअर-रेड ऑफिसरला वर्धा जिल्ह्यासाठी विशेष पोलीस अधिकारी म्हणून नियुक्त केले होते. नागपूर सेक्रेटरिअटमधील दोन अवर सचिव व एका उप सचिवाकडे वर्ध्यासाठी विशेष दंडाधिकाऱ्याचे अधिकार देण्यात आले. हे अधिकारी पोलीस व सैन्यदलाच्या पथकांबरोबर तैनात करण्यात आले होते. नवीन भरती केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना मुंबई, महू व सिकंदराबादला पाठवून प्रशिक्षित करण्यात आले.[११८]

सरकारने आक्रमक पवित्रा घेतला होता. काँग्रेसजन व विद्यार्थी स्वयंसेवकही लढयास सिद्ध होते. वर्धा-नागपूरमधील बंडखोरीच्या घटना तसेच मुंबई, बनारस, अलाहाबाद, बालीया, गाझीपूर इत्यादी ठिकाणच्या स्फूर्तिदायक बातम्यांनी वर्धा, देवळी, आष्टी व खरांगणा गावांतील प्रजाजन प्रेरित झाले. "करू अथवा मरू" या घोषवाक्याने (Do or Die Slogan) सर्व परिसर जागृत झाला. नागपूरच्या सेंट्रल इंटेलिजन्स ऑफिसरच्या २० ऑगस्टच्या अहवालानुसार प्रारंभापासूनच वर्धा जिल्हा आंदोलनाच्या ज्वालांनी पेटला होता.

आष्टीचा स्वातंत्र्य संग्राम : गोविंदराम सेकसरिया कॉलेज आणि वसतिगृह शासनाने ताब्यात घेतले. वसतिगृहातून विद्यार्थ्यांची पोलिसांनी हकालपट्टी करताच विद्यार्थी गावोगाव गेले ते गांधीजींचा संदेश घेऊनच. आर्वी, आष्टी व परिसरातील गावांमध्ये विद्यार्थी व स्वयंसेवक प्रचार पत्रके घेऊन गेले. ऑगस्ट ११ रोजी आष्टीत पहिली गुप्त सभा झाली. पुढील दिवशीच्या सभेत संत तुकडोजींनी मार्गदर्शन केले. आष्टीच्या आवेशपूर्ण सभेत स्फूर्तिदायक भजनांद्वारे त्यांनी नागरिकांची मने जागृत केल्यावर खडकी, सिरसोली, मोझरी इत्यादी पंधरा गावांमध्ये मने उद्दिपित केली. तेरा ऑगस्टच्या आष्टीमधील सभेत आष्टीच्या पोलीस ठाण्यावर १७ तारखेला सत्याग्रह करण्याचे ठरले. आष्टीच्या परिसरातील गावांमध्ये प्रचार पत्रके पाठविण्यात आली. खडकी गावात पाटील-पटवाऱ्याच्या कागदपत्रांना आग लावण्यात आली. त्याबरोबर क्रियाशील कार्यकर्ते किन्हाळा, अंतोरा, खंबीत व वडाळयाकडे निघाले. आरती मंडळ नावाची काँग्रेस स्वयंसेवकांची संघटना कमालीची क्रियाशील बनली. मुंबईत काँग्रेस कार्यकारिणीने पारद केलेल्या ठरावाच्या प्रती स्वयंसेवक वाटत. गावोगावी शासकीय कागदपत्रे नष्ट करण्याची व सरकारच्या निषेधाची मोहीम निघाली. सोळा ऑगस्टला वडाळयाचे १००–१५० स्वयंसेवक नियोजित सत्याग्रहासाठी आष्टीला येऊन पोहोचले. विलक्षण स्फूर्तिदायक वातावरणात सर्व सत्याग्रही आष्टीच्या गांधी चौकात जमले. याच स्थळी गांधीजींनी १७ मार्च १९२१ रोजी प्रेरणादायक भाषण केले होते. त्याची स्मृती म्हणून १७ ऑगस्ट १९४२ रोजी आष्टीचा सत्याग्रह आयोजित केलेला होता. सोळा ऑगस्ट १९४२ च्या सकाळी ३००० सत्याग्रही गांधी चौकातून पोलीस ठाण्यावर मिरवणुकीने गेले. ठाण्यावर पोलीस उपनिरीक्षकाच्या दिमतीला सात हवालदार होते. पोलीस ठाण्यावर राष्ट्रीय ध्वज फडकवणे व कागदपत्र नष्ट करणे हा सत्याग्रहींचा उद्देश होता. आंदोलकांनी सत्याग्रही निर्धाराने पोलीस उपनिरीक्षकास आपला उद्देश सांगून खादी पोषाख परिधान करण्यास सांगितले. उपनिरीक्षकास प्रसंगावधान पाळणे भाग असल्याकारणाने त्याने ती सूचना मान्य केली, तथापि सरकारी कागदपत्रांचे रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त केला. दरम्यान आंदोलकांच्या एका पुढाऱ्यास पोलिसांनी बंदिस्त केले.

[११८] फोर्टनाईटली रिपोर्ट, ऑगस्ट १९४२, पूर्वोक्त.

आंदोलक भडकले, आणि काही जणांनी मागच्या बाजूने जाऊन कागदपत्र हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. तात्काळ उपनिरीक्षकाने हवालदारास गोळीबार करण्यास खुणावले. क्षणार्धात गोळ्यांचा वर्षाव होऊन सात स्वातंत्र्यवीर हुतात्मा झाले. शांतियुद्धाचा हा पूर्वरंग अशा प्रकारे रक्तरंजित झाला.

गोळीबाराने जमाव पांगला. तथापि त्याची प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होते. उपनिरीक्षकाच्या हटवादीपणाचा त्याच्या दोन सहकाऱ्यांनीसुद्धा निषेध केला. सर्व पोलीस ठाण्यातून निघून गेले. उरला फक्त उपनिरीक्षक. इतक्यात आष्टी परिसरातील गावांमधून शेकडो सत्याग्रही आष्टीस आले. अधिक मोठा जमाव पोलीस ठाण्यावर चाल करून गेला, हिंसेचा बदला हिंसेने घेण्याच्या तयारीने. अशा स्फोटक परिस्थितीतसुद्धा उपनिरीक्षक हिंसक पवित्र्यातच होता. त्याने गोळीबार केलाच व एका तरुणाला ठार केले. खवळलेल्या जनसमुदायाने प्राप्त परिस्थितीत स्वाभाविक तेच केले.

सरकारी गुप्त अहवालांनुसार असे दिसते की, आंदोलकांनी पोलिसांना खादी कपडे घालून मिरवणुकीत तिरंगी झेंडा हातात घ्यावयाला भाग पाडले. ही मिरवणूक गावभर फिरवून आंदोलकांनी उपनिरीक्षक व तीन हवालदारांना ठार केले आणि दोन हवालदारांना जिवंत जाळले. सर्वांच्या देहांची विटंबना केली. पोलीस ठाण्यावर तिरंगा फडकवला. ठाणे जाळून खाक केले. त्याचबरोबर शासकीय विश्रामगृह, शाळा आणि महसूल कार्यालय तसेच डाक घर लुटून जाळून टाकण्यात आले. शिवाय गाव परिसरातील वन विभागाचे दहा आगार व शासकीय कागदपत्रे नष्ट केली.[११९] एकूण सात हवालदारांपैकी पाच हवालदारांची व उपनिरीक्षकाची हत्या करण्यात आली.

आष्टी पोलिसांच्या हत्येस्तव अनेक काँग्रेसजनांवर सरकारने खटला भरला. या खटल्यात हिंसाचाराची जबाबदारी काँग्रेसवरच टाकण्यात आली. हे कोर्टाच्या निकालपत्रातील खालील उताऱ्यावरून दिसून येते.

> "At about 11 a. m. a mob consisting of about 250 men came right upto the gate of the Station House shouting the usual Congress slogans. The Sub-Inspector and Head Constable met them at the gate, and the former tried to argue with them in vain. He was even prepared to shout with them the Congress slogans and to permit them to hoist the Congress flag on the Station House building, but the leaders of the mob wanted him to hand over the Station House Records for destruction........When he declared that he would protect Government property with his life, the leaders ordered the mob to get to their work......At this stage, finding the mob uncontrollable, two constables opened fire knocking down about half a dozen men out of whom five succumbed to their injuries. The firing had the desired result and the mob fled in disorder." [१२०]

समकालीन स्वातंत्र्य आंदोलकांच्या आठवणीनुसार कुणालाही जिवंत जाळण्यात आले नव्हते. उपनिरीक्षकावर जनसमुदायाने मात करून त्याला ठार केल्यावर लपून बसलेल्या

[११९] चोप्रा, पूर्वोक्त, पृ. ४१, ४६, ८४.

[१२०] स्पेशल क्रिमिनल कोर्टाचे निकालपत्र.

पाच पोलिसांना लोकांनी शोधून काढून त्यांची हत्या केली व सर्वांच्या पार्थिव देहांना अग्नी दिला. उपनिरीक्षकाच्या विधवा पत्नीने न्यायालयात अशाच अर्थाची साक्ष दिली. पोलिसांच्या कुटुंबियांना लोकांनी मारहाणही केली नाही.

आष्टीच्या स्वातंत्र्य संग्रामात काँग्रेसजनांव्यतिरिक्त मुसलमानही समाविष्ट होते. हुतात्मा नबाब रसीदखान सहादतखान हा त्यांच्याचपैकी एक देशभक्त होता. तीनचार वीरांगनाही गोळीबारात जखमी झाल्या. गुलाबराव वाघ, पांडुरंग सव्वालाखे, मोतीराम होले, रामभाऊ लोहे व नत्थोबाजी हे नेते होते.

आष्टीची मुलींची शाळा व अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल बरेच दिवस बंद करण्यात आले होते. आष्टीच्या शोकांतिकेने सरकारी यंत्रणेचा क्रोध अनावर झाला. सूडबुद्धीने भडकलेल्या नोकरशाहीने लोकांना ठेचून काढण्याचा पवित्रा घेतला. गोरे सेनादल व कडवी निवडक भारतीय पलटण आष्टीस आली. धरपकड व दहशतीचे वातावरण निर्माण केले. गावातील बहुसंख्य पुरुषांना ताब्यात घेतले. गावात शिल्लक राहिले फक्त म्हातारे, मुले व महिला. सूडबुद्धीने आष्टी व १० मैलांच्या परिसरातील गावांवर एकूण ५०,००० रुपयांचा सामूहिक दंड (Collective Fine) ठोठावण्यात आला.[१३१] दंडाची वसुली हा मूर्तिमंत पाशवी अत्याचार होता. म्हातारे व महिलांच्या छातीवर संगिनी रोखून त्याची वसुली करण्यात आली. घरातील सामान जप्त केले. गोऱ्या तसेच बऱ्याच काळ्या सैनिकांनी महिलांवर पाशवी दुराचार केले. चिमूर व आष्टीच्या अत्याचारांच्या निषेधार्थ प्रा. भंसाळी यांनी केलेल्या उपोषणाचा इतिहास पुढे दिलेला आहे.

आष्टीप्रमाणेच देवळी व खरांगणा गावांमध्येही जोरदार आंदोलन झाले. देवळीच्या आंदोलनासही हिंसक वळण लागून डाकघर व पोलीस ठाणे भस्मसात झाले. देवळी नगर-परिषदेने आपले स्वातंत्र्य घोषित केले. त्याचा प्रतिकार म्हणून शासनाने नगरपरिषद बरखास्त केली.[१३२] खरांगणा गावातील जनतेनेही शासनाविरुद्ध बंड करून गावावर ताबा प्रस्थापित केला. त्याचा सूड म्हणून शासनाने सेनादलाच्या मदतीने आपली सत्ता पुन्हा प्रस्थापित केली. सेनादलास सर्वाधिकार देऊन आंदोलन चिरडून टाकले.[१३३] आर्वीतील परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी पोलीस व सेनादलाने भीषण गोळीबार केला. संत तुकडोजींना अटक केल्यावर त्यांचे अनुयायी भूमिगत झाले. जनसामान्यांना जागृत करून आंदोलनाची तीव्रता वाढविण्यासाठी ते अहोरात्र झटत. आष्टी व चिमूरच्या हत्या-कांडानंतर ते हिंगणघाटपासून शिवनीपर्यंत भूमिगत संचार करून जनआंदोलन पेटवित.

छोडो भारतची मूळ संकल्पना हिंसात्मक नव्हती. तथापि सरकारने हिंसावादी अत्याचार केल्यामुळे आंदोलनास हिंसक वळण लागले. परिणामतः सेवाग्रामचे आश्रमवासी, नालवाडी आश्रमातील स्वयंसेवक व वर्ध्याच्या महिलाश्रमातील महिला देखील भूमिगत झाल्या. बाबाजी मोघे, सदूभाऊ गद्रे, कुंदर दिवाण, भाऊ पानसे, गोपाळराव वाळुंजकर यांच्यासारखे गांधीवादी कार्यकर्तेसुद्धा घातपाती कृत्यांना विरोध करण्याच्या मनस्थितीत नव्हते.

सरकारी हिंसाचार केवळ पोलिसांपुरताच मर्यादित नव्हता, तर इतर अधिकारीसुद्धा सूडबुद्धीने अथवा केवळ हौसेखातर हिंसा करीत. हिंसाचार व गोळीबार ही नित्याची बाब

---

[१३१] सी. पी. अ‍ॅण्ड बेरार शासनाचे २२ ऑगस्ट १९४२ चे विशेष राजपत्र.

[१३२] चोप्रा, पूर्वोक्त, पृ. ३५, ३७, ४४, ८४.

[१३३] कित्ता, ३५, ४४.

होती. सी. पी. अॅण्ड बेरार शासनाने गोळीबाराची चौकशी करण्यास स्पष्ट नकार दिला. सामूहिक दंडाची अंमलबजावणी दडपशाहीने केली. रु. ५,००० पर्यंत सामूहिक दंड ठोठावण्याचे अधिकार जिल्हा दंडाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले.[१२४] वसुली करण्यासाठी मात्र काहीच संहिता नसल्याने कोणत्याही मार्गाने वसुली करीत. या सर्व प्रकाराचा निषेध म्हणून वर्ध्याच्या दोन सरकारी अभियोक्त्यांनी (Public Prosecutors) राजीनामे दिले.[१२५]

नागपूरच्या एका गुप्तवार्ता अधिकाऱ्याच्या २० ऑगस्टच्या अहवालानुसार वर्धा जिल्ह्यातील स्थिती भयानक होती.[१२६] वर्धा, आष्टी, देवळी, खरांगणा, आर्वी इत्यादी गावे व त्यांचा परिसर भयंकर पेटला होता.

हिंसाचारास न जुमानता सेवाग्राम व नालवाडी आश्रमातील स्वयंसेवक निर्धाराने आघाडीवर राहिले. महिला आश्रमातील महिला प्रचंड मिरवणुका काढीत, खेडुतांमध्ये प्रेरणा व स्फूर्ती निर्माण करीत. चंद्रपूर, जबलपूर व शिवनीपर्यंत त्या भूमिगत कार्यही करीत. शंभरापैकी ३०–४० मुली व आचार्या कमलाताई लेले पकडल्या गेल्या. काही महिला पुढारी घातपाती कार्यातही सामील झाल्या. फेब्रुवारी १९४३ मध्ये नागपूरला पकडलेल्या घातपाती टोळीमध्ये महिलाश्रमाची माजी सभासदही होती. या टोळीकडे पिस्तूल, दारुगोळा व स्फोटक रसायनेसुद्धा सापडली. एकूण पाच घातपाती व दहशतवादी कृत्यांमध्ये व रोकड रकमेच्या लुटीच्या दोन प्रकरणांमध्ये विनोबाजींच्या पवनार आश्रमातील स्वयंसेवक होते. त्यांना सरकारने प्रयत्नांची पराकाष्ठा करून पकडले.[१२७] नंदूरबार खजिना लुटीतील पैशाचा विनियोग चांगला करण्यास खादी तज्ञ द्वारकानाथ लेलेंचा मोठा हातभार होता.[१२८]

आंदोलन चिरडण्याचा शासनाचा निर्धार इतका खोलवर होता की, खाजगी रेडिओ संच सुद्धा घराघरातून जप्त करण्यात आले. बजाज कुटुंबातील दोन रेडिओ संच असेच जप्त केले. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने आपल्या अधिकारांचा दुरुपयोगही केला.[१२९] **हरिजन** नियतकालिकावर बंदी आणण्यात आली. शिक्षा मंडळाचे श्रीकृष्ण मुद्रणालय शासनाने जप्त केले. वृत्तपत्रांवर कठोर बंधने लादल्यामुळे नागपूरच्या चार वृत्तपत्रांनी प्रकाशन बंद केले. दिनांक १२ ऑगस्टपासूनच काँग्रेस प्रचार पत्रकांचा वर्ध्यात प्रसार होऊ लागला होता. नागपूरची पहिली **काँग्रेस पत्रिका** त्याच दिवसापासून वर्ध्यात प्रसारित झाली. अहमदाबाद व मुंबईहून पाठविलेली प्रचार पत्रके वर्ध्यात नियमितपणे येत असत. पोस्टातून आलेले प्रचार साहित्य व खाजगी पत्रे पोलीस हस्तगत करीत. म्हणून काँग्रेसने दूतसेवा उभारली होती. श्रीकृष्ण गांधी व डॉ. भारतन कुमारप्पा प्रचार पत्रकांचे काम करीत. राजकुमारी अमृत कौर पंजाबमधून **हरिजन** पत्रक बेकायदारीतया चालवीत. त्याच्या वितरण व्यवस्थेत दत्तात्रय दास्ताने बहुमोल कामगिरी करीत. पोलिसांनी हे पत्रक अनेक वेळा हस्तगत केले. "आकाशवाणी" नामक छापील पत्रकही विद्यार्थी मुक्तपणे वितरित करीत.[१३०]

---

[१२४] कित्ता, पृ. १३५.
[१२५] कित्ता, पृ. १३५.
[१२६] कित्ता, पृ. ८३.
[१२७] **काँग्रेस रिसपॉन्सीबीलिटी पॅम्फलेट** (भारत सरकार, नवी दिल्ली, १९४३), पृ. ३४.
[१२८] कमलाताई लेलेंची मुलाखत.
[१२९] **स्टेटस्मन,** नवी दिल्ली.
[१३०] फोर्टनाईटली रिपोर्ट, ऑक्टोबर १९४२, पूर्वोक्त.

संपूर्ण ऑगस्टमध्ये आंदोलनाचा जोर कायम राहिला. शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, आश्रमवासी व काँग्रेसजनांच्या प्रेरणेने सर्व जिल्हा नोकरशाहीशी प्राणपणाने लढला. नोकरशहांची विशेष नजर होती विद्यार्थी व आश्रमवासियांवर. विद्यार्थ्यांना आंदोलनातून वगळण्यासाठी त्यांनी कडक उपाययोजना आखली. दिनांक १ सप्टेंबर १९४२ पर्यंत वर्गात दाखल न होणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयांतून काढून टाकण्याची शासनाने घोषणा केली. शिष्यवृत्ती आणि इतर सवलती रद्दबातल करण्याचीही घोषणा केली. तथापि गांधीजींच्या हाकेने पेटलेल्या विद्यार्थ्यांनी अशा शिक्षात्मक उपाय-योजनेला भीक घातली नाही. आता विद्यार्थ्यांबरोबर महिलाही आंदोलनात उतरल्या होत्या. सरकारच्या अत्याचारी दडपशाहीमुळे खुल्या आंदोलनाचे प्रमाण कमी होत असले तरी सप्टेंबरपासून आंदोलन भूमिगत झाले. सरकारी दडपशाहीची प्रतिक्रिया म्हणून घातपाती व विघातक कारवायांना जोर आला. लोहमार्ग व दूरसंचरण व्यवस्था विस्थापित करण्यावर तरुणांनी लक्ष केंद्रित केले. लोहमार्गाच्या संरक्षणासाठी सरकारने सेनादलाच्या मदतीने गस्त पथके तैनात केली. लोहमार्गाच्या संरक्षणासाठी खेडुतांना जबाबदार धरले. तरी देखील घातपात चालूच राहिला. वस्तुत: घातपाती कार्य काँग्रेस आंदोलनात अभिप्रेत नव्हते. तथापि क्रूर दडपशाहीमुळे आंदोलनास घातपाती स्वरूप आले.

छोडो भारतचा पहिला मासिक वर्धापन दिन प्रचंड मिरवणूक व हरताळच्या स्वरूपात साजरा करण्यात महिला व विद्यार्थी आघाडीवर होते (९ सप्टेंबर १९४२). शासनाने वर्धा तहसील इमारतीचे कारागृहात रूपांतर केले. वर्ध्याच्या मुख्य कारागृहात काँग्रेस बंदिवानांनी अन्न सत्याग्रह केला. आश्रमवासियांनी जंगल सत्याग्रहात खेडुतांना सामील करून घेतले. शासनाने जंगल सत्याग्रहाचा सूड म्हणून संबंधित गावांवर सामूहिक दंड ठोठावला. पोलीस अधिकाऱ्यांना दडपशाही यशस्वी करण्याबद्दल बक्षिसे देण्यात आली.[१३१]

सी. पी. ॲण्ड बेरार शासनाच्या ऑक्टोबरच्या पाक्षिक गोपनीय अहवालात दावा करण्यात आला होता की, सर्वत्र शांतता असून काँग्रेस चळवळ जवळजवळ मृतवत झाली. तथापि वस्तुस्थिती निराळीच होती. उघडपणे आंदोलन करून प्राण धोक्यात घालण्यापेक्षा निष्ठावान स्वयंसेवकांनी भूमिगत कार्यास वाहून घेतले. बहुसंख्य लोकांचे भूमिगत आंदोलकांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहकार्य लाभत असे. जनमानसात आंदोलनाच्या प्रेरणा इतक्या रुजल्या होत्या की, गुप्तचर अधिकाऱ्यांना गुन्हा अन्वेषणात खेडुतांचे अजिबात सहकार्य लाभत नसे. त्यामुळे पोलिसांना भयंकर अडचणी येत.[१३२] ऑक्टोबर १९४२ च्या पहिल्या पंधरवड्यातील सनसनाटी घटना म्हणजे वर्धा–बल्लारशा लोहमार्गावर सैन्यदलाच्या विशेष आगगाडीस घातपात करून उध्वस्त करण्याचा प्रयत्न. या गाडीने बरेच सैन्यदल आणि शस्त्रास्त्रे मद्रासकडे नेण्यात येत होती. वर्धा आणि चंद्रपूरच्या काँग्रेसजनांना याचा सुगावा लागताच त्यांनी घातपाती योजना आखली. तथापि या गाडीच्या पुढे पथदर्शक मोकळी गाडी (Pilot Train) रेल्वे अधिकाऱ्यांनी सोडल्यामुळे या गाडीचे व लोहमार्गाचे अपरिमीत नुकसान झाले, पण सेनादलाची गाडी सुरक्षित राहिली. या घातपाती प्रयत्नाचा सूड म्हणून लोहमार्गाच्या बाजूच्या गावांवर शासनाने सामूहिक दंड ठोठावला, खेडुतांना फटके मारण्याच्या शिक्षा (Whipping) केल्या. लोहमार्ग व दूरसंचरण व्यवस्थेच्या संरक्षणासाठी सरकारने ७ ऑक्टोबर १९४२ पासून ग्रामप्रमुखांना

[१३१] कित्ता, सप्टेंबर १९४२.
[१३२] कित्ता, ऑक्टोबर १९४२.

जबाबदार धरले. डिफेन्स ऑफ इंडिया रुलच्या नियम क्रमांक ५९(अ) अनुसार सरकारी मालमत्तेच्या संरक्षणासाठी काही खेडुतांना मानधन तत्त्वावर नियुक्त करण्यात आले. स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना बेसुमार अधिकार प्रदान केले. त्याशिवाय सेनादलाच्या कडक नजरेखाली गावकरी गस्त पथके उभारण्यात आली.[१३३]

प्रांतिक शासनाने वर्धा जिल्ह्यात "मांजर आणि उंदीर" (Cat and Mouse) धोरण अमलात आणले. बहुसंख्य आश्रमवासी अकोला, नागपूर व जबलपूर कारागृहांमध्ये सत्याग्रही निर्धाराने उपोषण करीत. त्यावर इलाज म्हणून काहींना बाहेर आणून बळजबरीने भरविण्यात येई तर काहींना कारागृहातच भरविण्यात येई. इतके करून या सर्व प्रकारांचा काँग्रेसविरुद्ध प्रचाराकरिता उपयोग करीत असत. नागपूर कारागृहातील परिस्थिती इतकी विकोपास गेली होती की, कारागृह अधीक्षक पदी एका आय. सी. एस. अधिकाऱ्याची नेमणूक करावी लागली.[१३४]

हिंदुस्थानी लालसेना व फॉरवर्ड ब्लॉकचे सर्व अनुयायी जिल्ह्यातील आंदोलनात उतरले होते. नागपूरच्या आर. एस. रुईकरांचे बरेच फॉरवर्ड ब्लॉक समर्थक वर्धा जिल्ह्यात होते. (उदा. सत्यनारायण बजाज). आंदोलनाच्या तीव्रतेमध्ये त्यांनी मोठी भर घातली. त्यामुळे घातपाती कृत्यांना अधिक जोर चढला. वर्धा स्थानकापासून तीन किलोमीटर अंतरावर अडीच फूट लांबीचा लोहमार्ग १९ ऑक्टोबरला कापण्यात आला होता. या कटातील आंदोलक पोलिसांच्या हाती लागले नाहीत. परंतु वर्ध्यातील पाच फॉरवर्ड ब्लॉक स्वयंसेवकांना संशयित म्हणून पकडले आणि नजीकच्या गावांवर सामूहिक दंड ठोठावण्यात आला.[१३५]

प्रा. भंसाळींचे ऐतिहासिक उपोषण : प्रा. भंसाळींचे ६२ दिवसांचे उपोषण म्हणजे वर्धा-चंद्रपूर-नागपूरच्या स्वातंत्र्य आंदोलनातील एक महत्त्वाचे उपाख्यान होय. आपल्या प्राणाची बाजी लावून शासनकर्त्यांच्या पाशवी अत्याचारांविरुद्ध केलेला हा जीवनमरणाचा लढा होता. उपोषणाद्वारे भंसाळींनी सैनिकांच्या दुराचारांना जशी वाचा फोडली तसेच त्यांनी ब्रिटिशांशी सहकार्य करणाऱ्या काही भारतीय पुढाऱ्यांची अगतिकता सुद्धा उघडकीस आणली. लंडन विद्यापीठाच्या भारदस्त वातावरणात तीन वर्षे राहून विद्याविभुषित झालेले भंसाळी अल्पकाळ मुंबईच्या एलफिन्स्टन महाविद्यालयात अधिव्याख्याते होते. तेव्हढयावरूनच त्यांच्या नावामागे प्राध्यापक ही उपाधी लागली. महात्माजींच्या विचारधारेने प्रभावित झालेल्या भंसाळींनी १९२६ मध्येच महाविद्यालयातील अधि-व्याख्यातापदाचा त्याग करून साबरमती आश्रमाची दीक्षा घेतली आणि ऋषितुल्य जीवनाचा अंगीकार केला. लंडनला शिकलेल्या भंसाळींनी हिमालयात जाऊन तपस्या केली. सतत सात वर्षे त्यांनी मौनव्रताचे पालन केले. मौनव्रताचा कदापीही भंग होऊ नये म्हणून त्यांनी तांब्याच्या जाड तारेने आपले ओठ जखडून ठेवले होते. सात वर्षांची तपस्या समाप्त केल्यावर सुद्धा भंसाळी एका नळीद्वारे पातळ पेज मुखात घेऊन खडतर जीवन जगत होते. गांधीजींच्या आग्रहावरूनच त्यांनी मौनव्रताचा त्याग केला. उंच, धिप्पाड प्रा. भंसाळी सेवाग्राम आश्रमात अत्यंत आखुडसा पंचा परिधान करून भर उन्हात काम करीत. हा विद्याविभुषित प्राध्यापक गरीब व पददलितांना साक्षरतेचे पाठ देत असे, राष्ट्रजागृती व मानवतेचा प्रसार करीत असे.

[१३३] कित्ता, ऑक्टोबर १९४२.

[१३४] कित्ता.

[१३५] कित्ता.

छोडो भारत आंदोलनात भंसाळींनी प्रत्यक्ष भाग घेतला नाही. तथापि आंदोलनाच्या प्रारंभानंतर आठव्या दिवशी आष्टी व चिमूरला झालेल्या हत्याकांडाने त्यांचे मन व्यथित झाले. हत्याकांडातील अत्याचारांच्या परिमार्जनासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. तथापि नोकरशाहीने अजिबात दाद दिली नाही. प्राप्त परिस्थितीत दाद मागण्यासाठी आणि चिमूर-आष्टीच्या त्या व्यथित व अत्याचारित महिलांना न्याय मिळविण्यासाठी प्रा. भंसाळी व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात मंत्रिपदी असलेल्या माधव श्रीहरी अणेंकडे १ नोव्हेंबर रोजी गेले. याच भागातील रहिवासी असलेल्या अणेंनी आपल्या पदाचा उपयोग करून हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी व अन्यायाचे परिमार्जनार्थ प्रयत्न करावे अशी कळकळीची विनंती केली. निदान बलात्कारित महिलांचे सांत्वन करण्यासाठी तरी अणेंनी चिमूर-आष्टीला समक्ष भेट द्यावी अशीही विनंती केली. तथापि एकेकाळी काँग्रेस पुढारी असलेल्या अणेंनी त्यालाही संमती दिली नाही किंवा चौकशीचे आश्वासनही दिले नाही. इतकेच नव्हे तर स्वातंत्र्य आंदोलनातील हिंसाचाराबाबत गांधीजींवरच ठपका ठेवला.[१३६] सेनादल छावण्यांच्या परिसरात असे अत्याचार नित्याचे असल्याने चिमूर-आष्टीच्या अत्याचारांबद्दल आपणास आश्चर्य वाटत नसल्याचेही अणेंनी भाष्य केले. त्यावर भंसाळी म्हणाले की, तसे असल्यास ही बाब सत्ताधिशांना अशोभनीय आहे. कारागृहांमधील अत्याचारांचा भंसाळींनी उल्लेख करताच अणे म्हणाले की, "त्यांच्यापेक्षा आपणास अधिक माहिती आहे. तथापि अत्याचारांची जबाबदारी स्थानिक अधिकाऱ्यांची असून त्यांच्या कार्यपद्धतीत आपण हस्तक्षेप करणार नाही". तरीसुद्धा भंसाळींनी आर्जवी भाषेत चौकशी समिती नेमण्याची विनंती केली. या प्रसंगी समक्ष हजर असलेले सत्यन लिहितात : " Prof. Bhansali again appealed to the good sense of Mr. Aney to have these serious complaints investigated. On this the Hon'ble Member got angry and said that he regarded the Congress and those taking part in the movement as his enemies and he had no sympathy with them. "[१३७]

या सर्व प्रकाराने प्रा. भंसाळी अधिकच व्यथित झाले आणि ते अणेंना म्हणाले की, आम्ही केलेल्या पर्यायी सूचनांपैकी एकही सूचना आपणास मान्य नसल्याकारणाने सेवाग्रामला जिवंत परत जाण्यापेक्षा आपण मरण पत्करू. एकेकाळी काँग्रेसचे अध्यक्ष (१९३३) असलेल्या माधवराव अणेंनी साध्या चौकशीचेही आश्वासन न देता अन्याय परिमार्जनासाठी काहीच करू नये याचे भंसाळींना वैषम्य वाटले. त्यांचेबरोबर आश्रमवासी बलवंतसिंग आणि सत्यन होते. अणेंनी भंसाळी व बलवंतसिंग यांना परत जाण्यास सांगितले. अणेंच्या प्रतिक्रियेने व्यथित होऊन भंसाळींनी अणेंच्या बंगल्यासमोरील पादपथावर त्वरित अन्न सत्याग्रहाचा प्रारंभ केला. लगेच नोकरशाहीने भंसाळी व बलवंतसिंग यांना डिफेन्स ऑफ इंडिया रुल-खाली दिल्ली प्रदेशातून तीन तासांत बाहेर जाण्याचा हुकूम फर्मावला. हा हुकूमही अणे थांबवू शकले नाहीत. परिणामतः साडेपाच वाजता फर्माविलेल्या हुकुमाची पोलिसांनी पावणे दहाला अंमलबजावणी करून दोघा सत्याग्रहींना नवी दिल्ली पोलीस ठाण्यात अटक केली व बंदोबस्तात त्यांची वर्ध्यास रवानगी केली.[१३८]

---

[१३६] सीतारामैय्या, डॉ. पट्टाभी, **हिस्टरी ऑफ दि इंडियन नॅशनल काँग्रेस, खंड २** (एस. चांद आणि कंपनी, दिल्ली, १९४६), पृ. ४८९.

[१३७] सत्यन यांच्या दैनंदिनीतील नोंद, **इंडिया रॅव्हेज्ड** (निनावी पुस्तक), पृ. ३८.

[१३८] सीतारामैय्या, पूर्वोक्त, पृ. ४८९.

सन १९३०–१९३३ मध्ये सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतलेल्या व १९३३ मध्ये काँग्रेसच्या अध्यक्षपदी राहिलेल्या अणेंची चिमूर-आष्टी प्रकरणाबाबतची उदासीनता भंसाळींना दुखःकारक वाटली. अणेंवर वृत्तपत्रांतूनही टीका झाली. **नागपूर टाईम्स** मधील अग्रलेखात म्हटले होते : " Mr. Aney speaks in Amery's voice. " मुंबईहून प्रकाशित झालेले **काँग्रेस बुलेटिन** व इतर प्रचारपत्रकांनीही अणेंवर टीका केली. आपल्या उपोषणा-बाबतची भूमिका स्पष्ट करण्यास्तव प्रा. भंसाळींनी २४ नोव्हेंबर १९४२ रोजी निवेदन प्रसृत केले. तथापि सरकारने त्यावर अभ्यवेक्षणाद्वारे बंदी घातली. त्या निवेदनातील उतारा या प्रकरणाच्या शेवटी परिशिष्ट २ म्हणून जोडला आहे.

चिमूर-आष्टीची शोकांतिका व सत्ताधाऱ्यांचा निषेध म्हणून भंसाळींनी आमरण उपोषणाचे हत्यार ११ नोव्हेंबरपासून हाती घेतले. त्या दिवशी ते चिमूरला गेले. हेतू असा की, निदान आमरण उपोषणाद्वारे त्या व्यथित महिलांचे व अत्याचारितांचे सांत्वन करावे. तथापि पोलिसांनी त्यांना अटक करून १३ नोव्हेंबरला सेवाग्रामला आणून ठेवले. पुन्हा १९ नोव्हेंबर रोजी वर्धा ते चिमूर हे १०० किलोमीटर अंतर पायी चालत जाऊन भंसाळी २२ तारखेला चिमूरला पोहोचले. लगेच पोलिसांनी त्यांना पुन्हा अटक करून सेवाग्रामला आणून सोडले (२३ नोव्हेंबर). सत्याग्रही वृत्तीच्या भंसाळींनी तिसऱ्यांदा चिमूरला जाण्यासाठी २५ नोव्हेंबरला पदयात्रा काढली. तथापि ७२ किलोमीटर चालून गेल्यावर पोलिसांनी त्यांना अटक केली (२७ नोव्हेंबर), व वर्धा शहराबाहेर जाण्यास बंदी घातली. विशेष म्हणजे अन्नाबरोबर भंसाळींनी पाण्याचाही त्याग केलेला होता, आणि अशा परिस्थितीत त्यांनी एव्हढी मोठी पदयात्रा तीनदा केली.[१३९] कालांतराने त्यांची प्रकृती अन्नपाण्याच्या अभावी खालावत गेली व त्यांना सेवाग्रामहून बजाज विश्रामगृहात हलविण्यात आले. अनेक हितचिंतकांनी उपोषण समाप्तीसाठी त्यांना आर्जवे केली. तथापि त्यांनी पाणी घेण्यासही नकार दिला. मुंबईहून कन्हैयालाल मुन्शी त्यांचे मन वळविण्यासाठी आले. शेकडो पत्रे व तारा आल्या. पण भंसाळींची तपस्या चालूच राहिली.

भंसाळींच्या उपोषणाच्या अत्यंत लहान बातम्या वर्तमानपत्रांतून प्रकाशित होत. वस्तुस्थितीनिष्ठ बातम्या देण्यावर बंदी होती. पत्रकार उमाशंकर शुक्ल मात्र या उपोषणाचे वृत्त वृत्तपत्रांकडे पोचवित. परिणामतः त्यांना आपली नगरपरिषद शाळेतील शिक्षकाची नोकरी गमवावी लागली. उपोषणाचे अपुरे वृत्त गांधीजींनी वाचल्यावर त्यांनी मुंबई प्रांतिक शासनाच्या गृह विभागाला तार पाठविली की, "कारागृह अधीक्षकामार्फत भंसाळींशी तार संदेशाद्वारे संपर्क साधून उपोषणाचे कारण जाणून घेण्याची माझी इच्छा आहे. तसेच उपोषण नैतिकदृष्टचा असमर्थनीय असल्यास उपोषण सोडण्यासाठी मी त्यांचे मन वळविन. मानवतेच्या भूमिकेतून मी ही विनंती करीत आहे".[१४०] या तारेचे सहा दिवसांनी गांधीजींना उत्तर आले ते नकारात्मक—भंसाळींशी तार संदेशाद्वारे संपर्क साधण्यासाठी केलेली गांधीजींची विनंती मुंबई सरकारने अमान्य केली.

भंसाळींच्या उपोषणाचे उद्दिष्ट दुहेरी होते :—सेनादल व पोलिसांनी केलेल्या अत्याचारांची न्यायालयीन चौकशी व अत्याचारितांच्या दुःखाचे सांत्वन. तथापि इंग्रज अधिकारी व काही भारतीय लोक प्रचार करीत होते की, माधव श्रीहरी अणेंना अडचणीत टाकण्यासाठी उपोषणाचा उपक्रम आरंभिलेला आहे. सी. पी. अँड बेरार शासनाच्या मते अणेंना अडचणीत

[१३९] कित्ता, पृ. ४९०.

[१४०] **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, खंड ७६,** पृ. ४१७.

आणून सेनादल व पोलिसांच्या अतिरेकी कारवाईची चौकशी करण्यास सरकारला भाग पाडणे हा उपोषणाचा उद्देश होता.[१४१] परंतु भंसाळींनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. उपोषणाच्या प्रारंभापासून अडतीस दिवसांनी भंसाळींची प्रकृती अत्यंत क्षीण झाली. त्यांच्यासाठी लोक प्रार्थना करीत होते. काही आश्रमवासी उपोषणास प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करीत. तथापि निर्दय शासनाने उपोषणाबाबतची कोणतीही बातमी छापण्यावर डिफेन्स रूल ४१(१)(बी) खाली बंदीहुकूम काढला. बंदीहुकूम काढला हे उघड करण्यावरही बंदी घातली. परिणामतः भंसाळींची प्रकृती इत्यादीबाबतचे वृत्तच वृत्तपत्रातून दिसेनासे झाले.[१४२] त्यांच्या उपोषणास प्रतिसाद म्हणून सी. पी. ॲण्ड बेरार महिला परिषदेच्या २०० महिला सभासदांनी तीन दिवस उपोषण केले. डिसेंबर उत्तरार्धाच्या शासकीय अहवालात नमूद केले आहे की, त्यांची प्रकृती चिंताजनक असून वैद्यकीय अभिप्रायानुसार त्यांचे मरण अटळ आहे. तरीसुद्धा शासनाने आपली भूमिका अजिबात बदलली नाही. इतकेच नव्हे तर भंसाळींच्या अंत्यविधीची तयारी करून ठेवली व मोजक्याच लोकांना अंत्यविधीत भाग घेण्यास परवानगी देण्याचे ठरविले.[१४३]

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून डॉ. ना. भा. खरेंनी सर हेन्री ट्वायनॅमचे मन वळवून आश्वासन मिळविले की, महिलांची प्रतिष्ठा व त्यांच्यावरील हल्ल्यांपासून त्यांचे संरक्षण करण्याबाबत शासन एक आदेश अमलात आणेल, तसेच चिमूर-आष्टीच्या बातम्यांवरील सर्व शासकीय बंधने मागे घेण्यात येतील. चौकशी आयोग नियुक्त करण्यास मात्र गव्हर्नरने साफ नकार दिला, कारण त्याबाबतचे अखिल भारतीय धोरण भारत सरकारनेच विहित केलेले होते. अणेंनी देखील चिमुरला जाण्याचे आश्वासन देऊन अन्याय परिमार्जनार्थ पुष्कळ प्रयत्न केले. प्राप्त परिस्थितीत सर्वांच्या इच्छेला मान देऊन प्रा. भंसाळींनी ६३ व्या दिवशी म्हणजे १२ जानेवारी १९४३ रोजी उपोषणाची सांगता केली.

इतिहासकार पट्टाभी सीतारामैय्यांनी म्हटले आहे, " Prof. Bhansali would have few equals in history." [१४४] " His was a striking personality that would impress even a casual observer with its imposing character and true to his personality he achieved a feat of 62-day fast which will abide in the Nation's memory long. " [१४५]

आष्टी प्रकरणात पोलिसांच्या वधासाठी दहा स्वातंत्र्य सैनिकांना फाशीची शिक्षा तर ५५ सैनिकांना जन्मभर हद्दपारी व इतर नऊ जणांना विविध कालावधीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. फाशीची शिक्षा झालेल्यांमध्ये आष्टीचे दोन काँग्रेस पुढारी होते.[१४६] नोव्हेंबरपासून घातपाती कृत्यांचा जोर वाढला. त्यामुळे जी. आय. पी. रेल्वेच्या मुख्य लोहमार्गावर दर मैलास चार शिपाई ठेवण्यात आले. शिवाय गावकऱ्यांची संरक्षक पथकेही त्यांच्या दिमतीस ठेवली. जनजागृती करणारे संत तुकडोजी कारागृहातून सुटून आल्यावरही त्यांना वर्धा व चांदा (चंद्रपूर) जिल्ह्यांत प्रवेश करण्यावर बंदी घालण्यात आली.

---

[१४१] फोर्टनाईटली रिपोर्ट, डिसेंबर १९४२, पूर्वोक्त.

[१४२] कित्ता.

[१४३] कित्ता.

[१४४] सीतारामैय्या, पूर्वोक्त, पृ. ४९०.

[१४५] कित्ता, पृ. ४९२.

[१४६] फोर्टनाईटली रिपोर्ट, नोव्हेंबर १९४२. (फाशी माफीचा वृत्तांत पुढे दिला आहे).

सन १९४२–१९४३ मध्ये युद्धजन्य परिस्थिती आणि प्रतिकूल शेती हंगामामुळे न्नधान्याची टंचाई निर्माण झाली. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा घटला. महागाई वाढली. खर व रॉकेल दुर्मिळ झाले. तथापि शासकीय कर्मचाऱ्यांना संतुष्ट ठेवण्यासाठी त्यांच्या-ठी स्वस्त धान्याची दुकाने शासनाने उघडली. धान्य खरेदीसाठी लिपिकवर्गियांना ५० रुपये तर चतुर्थ वर्गातील कर्मचाऱ्यांना ३० रुपयांचे अग्रिम देण्यात आले. शिवाय ातंत्र्य आंदोलनाचा प्रतिकार करून आंदोलकांना ठेचून काढण्याची कृती करणारांना सनाने विशेष बक्षिसे दिलीत. आंदोलकांविरुद्ध अधिकाराचा दुरुपयोग करणारे सेच अनावश्यक गोळीबार करणारे पोलीस किंवा सेनादलातील अधिकाऱ्यांविरुद्धच्या कारींची चौकशीही करण्यास शासनाने नकार दिला. सामान्य जनता महायुद्ध आणि रुपशाहीचे घाव झेलत असताना शासकीय कर्मचाऱ्यांना मात्र किमतीच्या निर्देशांकानुसार ानुवारी १९४३ पासून महागाई भत्ता वाढवून देण्यात आला. आंदोलन चिरडून टाकण्या-ठी इंग्रज सर्व प्रकारची बरी वाईट उपाययोजना करीत होते.

नालवाडी-पवनार आश्रम खटला : सप्टेंबर १९४२ मध्ये लोहमार्गावर घातपात ल्याच्या आरोपावरून पवनार व नालवाडी आश्रमवासियांना संशयावरून अटक करण्यात ली. शासनाचा डोळा नालवाडी आश्रमाचे व्यवस्थापक राधाकृष्ण बजाज यांच्यावर ता. तथापि त्यांच्याविरुद्ध सकृतदर्शनी ठोस पुरावा उपलब्ध न झाल्याने डॉ. मनोहर वाण, भाऊ पानसे व आश्रमवासीयांसह १४ व्यक्तींवर शासनाने खटला भरला. पाळराव वाळुंजकरांनाही खटल्यात गोवण्यात आले. तथापि ते भूमिगत झाल्याने लिसांच्या हाती लागले नाहीत. स्पेशल क्रिमिनल कोर्टस ऑर्डिनन्सखाली विशेष न्याया-शापुढे हा खटला बरेच दिवस चालला. पुरेसा पुरावा नसल्याकारणाने कोर्टाने खटला गे घेण्यास सरकारला सुचविले. तरीसुद्धा शासनाने खटला मागे न घेता नवीन पुरावे णण्याचा खटाटोप चालूच ठेवला.[१४७] खटला पुन्हा रचण्यात आला. नवीन पुरावे सादर ण्यासाठी शासनाने जंगजंग पछाडले. याबाबत प्रांतिक शासन व भारत सरकार यांच्यातही ाच पत्रव्यवहार झाला. शासनाने हा प्रतिष्ठेचा प्रश्न म्हणून अनेक मार्गांनी घसास वला. तथापि कोर्टाने शासनाचे पुरावे अग्राह्य ठरविले आणि खटला पुन्हा निकाली ढला. तरीसुद्धा शासनाने खटल्याचा निकाल राखून ठेवला.[१४८] खटल्यातील अपयशाचा ा म्हणून शासनाने नालवाडी व पवनार आश्रम बेकायदा ठरविले. इंडियन क्रिमिनल अमेंडमेंट ॲक्टच्या कलम १६ खाली दोन्ही आश्रम पोलिसांनी हस्तगत केले (१२ जून ९४३). भारत सरकारला स्पेशल क्रिमिनल कोर्टस ऑर्डिनन्सचे ५ जून १९४३ पासून रसन करावे लागल्यामुळे प्रांतिक शासनाने हा खटला पुन्हा नव्याने साध्या कोर्टापुढे डला. सर्वतोपरी प्रयत्नांची शिकस्त करून खोटे साक्षीदार उपस्थित करण्यात आले.[१४९] लवाडी व पवनार आश्रम हस्तगत केल्यावर एका आठवड्यात ग्राम सेवा मंडळ, सत्याग्रह श्रम व गांधी सेवा संघ या सेवाभावी संस्थांवरही बंदी घालण्यात आली. वस्तुतः या तिन्ही था स्वतंत्ररीत्या नोंदणी झालेल्या होत्या. तथापि आश्रमवासी व काँग्रेसजनांची सर्व जूंनी नाकेबंदी करण्यासाठी शासनाने जणू कंबर कसली होती. रेंगाळत पडलेल्या पवनार-लवाडी खटल्याचा नोव्हेंबरच्या पूर्वार्धात निकाल लागला. सत्र न्यायाधीशांनी निकाल

[१४७] कित्ता, एप्रिल १९४३.
[१४८] कित्ता, मे १९४३.
[१४९] कित्ता, जून १९४३.

पत्रात स्पष्ट म्हटले की, घातपाताचा तथाकथित कट झालाच नव्हता. तथापि तीन आरोपींना व्यक्तिगत अपराधांसाठी शिक्षा देऊन उर्वरित आरोपींना निर्दोष सोडले.[१५०]

आश्रमवासियांप्रमाणेच अखिल भारतीय चरखा संघ, महाराष्ट्र चरखा संघ आणि अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळ अशा गांधीवादी संस्थांच्या कार्यकर्त्यांनाही जास्तीत जास्त शासन करण्याचे प्रयत्न अविरत चालू होते. थोर गांधीवादी नेते आणि अखिल भारतीय चरखा संघाचे सचिव जे. सी. कुमारप्पा यांनी **ग्राम उद्योग पत्रिके**त "अ स्टोन फॉर ब्रेड" हा लेख लिहिल्याबद्दल त्यांच्यावर खटला भरण्यात आला. या लेखात त्यांनी इतकेच म्हटले होते की, लोक भाकरीची मागणी करीत असताना सरकार त्यांना दगड मारत असल्या-कारणाने शेतकऱ्यांनी कागदी नोटांच्या बदल्यात अन्नधान्य विकू नये. त्यासाठी त्यांना दोन वर्ष सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली.

गांधीजींनी १० फेब्रुवारी १९४३ पासून उपोषणाचा प्रारंभ करताच सरकारच्या दुराग्रहीपणाचा वर्धा जिल्ह्यात निषेध करण्यात आला. सर्वत्र असंतोष पसरला. वर्धा परिसरात सामूहिक सूतकताई व प्रार्थना आयोजित केल्या. गांधीजी २१ दिवसांचे उपोषण निश्चित यशस्वी करतील असा गांधीवाद्यांना विश्वास होता. परंतु सामान्य कार्यकर्ते मात्र चिंताग्रस्त होते. काही गांधीवाद्यांनी महात्माजींच्या उपोषणापर्यंत अन्न सत्याग्रह केला. नागपूर, जबलपूर व बुलढाणा कारागृहांतील वर्ध्याच्या बंदिवानांनी सहानुभूतीपर उपोषण केले. किशोरलाल मश्रूवाला व रामकृष्ण बजाज या सुरक्षा कैद्यांनी उपोषण काळात गांधीजींच्या जवळपास राहण्यास्तव पुण्याच्या कारागृहात बदली करण्यासाठी सरकारला विनंती केली. ही विनंती सरकारने अमान्य केली हे सांगणे न लगे. मश्रूवालांच्या बदलीचा अर्ज तर प्रांतिक शासनाने केंद्र सरकारकडे पाठविला होता. सरकारने त्यालाही दाद दिली नाही. प्रा. भंसाळींनीही तीन दिवस सहानुभूतीपर उपोषण केले.[१५१]

गांधीजींच्या उपोषणानंतर छोडो भारतची तीव्रता कमी झाली. सन १९४२–४३ चा प्रतिकूल शेती हंगाम व स्वातंत्र्य आंदोलनात निर्माण झालेली कोंडी यामुळे नैराश्य पसरले. काँग्रेसजन व आश्रमवासींनी आंदोलन चालू ठेवले. पण ते प्रतिकात्मक होते. छोडो भारतचा वार्षिक वर्धापन दिन ९ ऑगस्ट १९४३ रोजी यथोचित साजरा करण्यात आला. तथापि त्याच सुमारास घडलेली प्रतिकूल घटना म्हणजे हिंदुस्तान रेड आर्मीचे जहाल पुढारी मगनलाल बागडी व त्यांच्या पाच भूमिगत सहकाऱ्यांना मुंबईत झालेली अटक.[१५२]

छोडो भारत आंदोलनात काँग्रेसच्या खांद्याला खांदा लावून रेड आर्मी व फॉरवर्ड ब्लॉक पक्षीय कार्यकर्ते प्राणपणाने लढले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदू महासभा मात्र मेळावे, सभा आयोजित करीत होते. सेनादलात हिंदूंनी नोकऱ्या मिळवाव्या असा प्रचार करीत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघास उत्तर म्हणून काँग्रेस पुढाऱ्यांनी राष्ट्रीय युवक संघ कार्यान्वित केला. युवक संघाचे स्वयंसेवक काँग्रेसजनांबरोबर आघाडीवर असत. नागपूरचे कामगार पुढारी रुईकर यांचे वर्धा जिल्ह्यातील गिरणी कामगारांवर बरेच वजन होते. हिंगणघाटला राय साहेब मोहता मिल व राय बहादुर बंसिलाल अबीरचंद मिल तर पुलगावला पुलगाव कॉटन मिल होती. या तिन्ही गिरण्यांचे मालक व कामगार काँग्रेसधार्जिणे असल्याकारणाने छोडो भारत आंदोलनात या गिरण्यात अनेक संप घडून आले. संपांना गिरणी मालकांचाही पाठिंबा असे.

[१५०] कित्ता, नोव्हेंबर १९४३.

[१५१] कित्ता, फेब्रुवारी १९४३.

[१५२] कित्ता, ऑगस्ट १९४३ [पूर्वार्ध]. बागडींच्या शिरावर सरकारने मोठे पारितोषिक पूर्वीच घोषित केले होते.

रकारी युद्ध प्रयत्नांमध्ये बाधा आणणे हे मालकांचे व कामगारांचे ध्येय होते. तिन्ही ारण्यांतील कामगारांचा आंदोलनास चांगला प्रतिसाद लाभला. कोळशाच्या अभावानेही ारण्या बऱ्याचवेळी बंद पडल्या. कोळशाच्या पुरवठ्यात खंड पाडण्यासाठी काँग्रेसजन कामगार प्रयत्नशील असत. रुईकरांनी शिवनी कारागृहात केलेल्या उपोषणास ागपूरप्रमाणे वर्ध्याच्या गिरणी कामगारांनीही संप करून प्रतिसाद दिला.[१५३]

ब्रिटिशांच्या आंदोलनविरोधी दडपशाहीचा निषेध करण्यास्तव आर. के. पाटील यांनी ाय. सी. एस. चा राजीनामा देऊन या परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबियांसाठी नधी गोळा करण्याचे बहुमोल कार्य हाती घेतले. गावोगावी हिंडून पाटील निधी गोळा रीत, स्वातंत्र्य आंदोलनातील बंदिवानांच्या आणि हुतात्म्यांच्या कुटुंबियांना दिलासा त.[१५४] शेतीचे उत्पादन कमालीचे घटले होते. कापसाचे भाव पडल्यामुळे शेतकरी, शेतमजूर सेच गिरणी कामगारांची स्थिती हलाखीची झाली होती (१९४३–४४).

फेब्रुवारी-मार्च १९४४ मध्ये अकाली पडलेला जोरदार पाऊस व गारांचा वर्षाव यामुळे िकांची अतोनात हानी झाली.[१५५] कापूस हे नगदी पीक आधीच हातचे गेले होते. त्यात ार म्हणून कापसाच्या किमती कोसळल्या. ज्वारी अत्यल्प पिकली. शासनाने त्या वर्षीची ाणेवारी सात आणे ठरविली. खरे तर वस्तुस्थिती फारच गंभीर होती. अशा हलाखीच्या स्थितीत आर. के. पाटील गावोगावी जाऊन शेतकऱ्यांना दिलासा देत. महसूल वसुलीबाबत ासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या दंडेलीचा प्रतिकार करीत. सर्व तालुका मुख्यालयांच्या ावी त्यांनी कृषी संघटना उभारून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. स्वातंत्र्य आंदोलनाच्या निराशाजनक काळी त्यांनी केलेले कार्य महान होते हे निश्चित.

कस्तुरबा गांधींचे पुण्यातील आगाखान पॅलेस कारागृहात निधन झाल्याच्या (२२ फेब्रुवारी १९४४) बातमीने संपूर्ण वर्धा जिल्हा शोकाकूल झाला. संपूर्ण जिल्ह्यात ृरताळ पाळण्यात आला. सर्वांना प्रिय असलेल्या "बा" यांच्या स्मरणार्थ निधी उभारण्याची ल्पना पुढे आली. थोड्याच महिन्यांत निधी उभारण्यास प्रारंभही झाला. गांधीजी लेरियाने गंभीररीत्या आजारी पडल्याने सरकारलासुद्धा चिंता वाटू लागली. या खेपेस ांधीजींना तुरुंगात मरण आल्यास सरकारला महाग पडणार होते. म्हणून त्यांना ६ मे १९४४ रोजी मुक्त करण्यात आले. मुक्तीनंतर मुंबईतील वास्तव्य संपवून गांधीजी जुलै अखेरीस वर्ध्यास परत आले. डॉ. जीवराज मेहतांसमवेत १२ साथीदारांसह गांधीजी ३ ऑगस्टला सेवाग्राम आश्रमात आले. वर्धा–सेवाग्राम परिसर पुन्हा गजबजू लागला. यांच्या भेटीसाठी आलेले पहिले राष्ट्रीय पुढारी होते राजगोपालचारी. त्यानंतर आले ामप्रसाद मुखर्जी. मागील २४ महिन्यांमध्ये देशभक्तांनी अनुभवलेल्या स्फूर्तिदायक ेरणा, त्याग, वेदना व शिक्षांचा स्मृतिपट सर्वांच्या नजरेसमोर उभा राहिला. आश्रमाने ुलै १९४२ पासून अनुभवलेल्या संवेदनांनी सर्वांची मने हेलावून गेली. अल्पावधीत स्वातंत्र्यही लाभले. तथापि स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद अल्पकालीन ठरला. जातीय दंगे ामविण्याच्या महाभयंकर दिव्यातून यशस्वीपणे बाहेर पडल्यावर महातमाजी फेब्रुवारी १९४८ मध्ये सेवाग्रामला स्वगृही येणार होते.[१५६] तथापि तत्पूर्वीच ते देवाघरी गेले होते.

[१५३] कित्ता, एप्रिल १९४४.
[१५४] कित्ता, ऑगस्ट १९४३.
[१५५] कित्ता, मार्च व एप्रिल १९४४.
[१५६] महात्मा गांधींचे २९ जानेवारी १९४८ चे पत्र, **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, खंड ९०**, पृ. ५१९.

आंदोलनातील काही दुःखद घटना : संपूर्ण आंदोलनात जिल्ह्यातील हजारो कार्यकर्त्यांनी अपार कष्ट व यातना भोगल्या. शेकडोंनी मारहाण पत्करली. त्यांचा पाढा वाचणे येथे शक्य नाही. तथापि चटका लावून गेलेल्या काही घटनांचा येथे उल्लेख करणे उचित वाटते. गांधीजींप्रमाणे वर्धा-सेवाग्रामला अतिशय प्रिय असलेल्या महादेवभाई देसाईंचे कारावासात अचानक झालेले निधन हा दुःखाचा पहिला आघात होता. महादेवभाईंच्या शोककारक निधनाची बातमी आगाखान पॅलेसपासून पुण्यातील नजीकच्या तार कार्यालयात पोहोचवण्यास 'कार्यक्षम' ब्रिटिश नोकरशहांना तब्बल १३ तास लागले. निधनाची तार त्याच्याही नंतर अक्षम्य विलंबाने दुर्गाबाई देसाईंना (महादेवभाईंची पत्नी) पाठविण्यात आली. या सर्व दुःखात भर म्हणून की काय, महादेवभाईंच्या शेकडो चाहत्यांनी गांधीजींना पाठविलेले शोकसंदेशही ब्रिटिश महासत्तेने गांधीजींपर्यंत पोहोचवले नाहीत. ज्याच्यावर आपल्या पुत्रांपेक्षाही अधिक प्रेम केले होते त्या महादेवच्या निधनाबाबत महात्माजींना हिमालयाएवढे दुःख होणे स्वाभाविकच होते. तथापि त्याची पुसटशी प्रतिक्रियासुद्धा वर्तमानपत्रांमध्ये न उमटू देण्याचा बंदोबस्त सरकारने केलेला होता.

महादेवभाईंच्या निधनानंतर दुसऱ्याच दिवशी आष्टीची रक्तरंजित शोकांतिका घडून आली. त्यात आठ स्वातंत्र्य सैनिकांना हौतात्म्य प्राप्त झाले. वर्ध्यात एक हुतात्मा तत्पूर्वीच धारातीर्थी पतन पावला होता. खरांगणा-मोरांगणा व देवळीतही काही काँग्रेस स्वयंसेवकांना हौतात्म्य प्राप्त झाले. या उलट सरकारी हिंसाचारास जनतेने दिलेल्या प्रतिहिंसात्मक प्रत्युत्तरात सहा पोलिसांचा वध झाला. हिंसेचा अहिंसेशी झालेल्या संघर्षाची ही परिणती होती. (स्वातंत्र्य समरात हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्म्यांची महाराष्ट्र शासनाने स्मारके उभारली आहेत. त्यांची माहिती परिशिष्ट क्रमांक १ मध्ये दिली आहे.)

आष्टीच्या संग्रामात पोलिसांच्या वधासाठी क्रिमिनल कोर्टाने दहा स्वातंत्र्य सैनिकांना फाशीची शिक्षा दिली. सर्व लोक हळहळले. फाशी निवारण समितीच्या अनुसयाबाई काळे ना. भा. खरे, मा. गं. चिटणवीस, गणपत बुटी, समीउल्लाखान, युसूफ शरीफ, डॉ. चोळकर, हरकरे, वाळुंजकर इत्यादींच्या प्रयत्नांनी १५ एप्रिल १९४४ रोजी चार सेनानींची फाशीची शिक्षा रद्द झाली. वकील होते केदार व घाटे. बाकीच्यांची मुक्तता न्यायालयाद्वारे होण्याची आशा मावळल्यावर सहाशे सेवाभावी संस्था व दोन लाख लोकांच्या दयेच्या अर्जाचा प्रयोग झाला. लोकाग्रहामुळे १९ जानेवारी १९४५ रोजी गव्हर्नरने चौघांची फाशी रद्द केली. उर्वरित दोघांसाठी (आणि चिमुरचे पाच) अनुसयाबाई, खरे, राजेंद्रप्रसाद व गांधीजींनी केलेल्या प्रयत्नांना यश येऊन १६ ऑगस्ट १९४५ रोजी व्हाइसरॉयने फाशीची शिक्षा रद्द केली. बरोबर तीन वर्षानंतर हा न्याय मिळाला. (रघुनाथ कडवे, पूर्वोक्त, पृ. ११०–१२०).

सत्यमूर्तींचे कारागृहात निधन, गांधीजींचे उपोषण, प्रा. भंसाळींचे महाप्रदीर्घ उपोषण व गांधीजींचे आजारपण यांची शोककळा तर सार्वत्रिक होतीच. तथापि याहीपेक्षा अधिक शोककारक घटना विधिलिखित होती. ती घटना म्हणजे कस्तुरबाजींचे निधन. कारावासात मरण येऊ नये असे वाटणाऱ्या या साध्वीला मरण आले परकीयांच्या कारावासात.

भूदान

वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा उपसंहार करताना भूदान-सर्वोदय तत्त्वप्रणाली व तिची फलनिष्पत्ती यांचा थोडक्यात परामर्श घेणे उचित आहे. महात्माजींचे जीवन व तत्त्वज्ञानावर सर्वोदय तत्त्वप्रणाली आधारित आहे. शोषणविरहित समाज व सर्वांच्या अभ्युदयाची काळजी घेतली जाईल असा समाज म्हणजे सर्वोदय समाज अशी सर्वोदय कार्यकर्त्यांची धारणा आहे. समाजात प्रचलित असलेली आर्थिक विषमता ही प्रामुख्याने हिंसेला कारणीभूत आहे असे त्यांचे मत आहे. त्यांच्या मते मूलतः शोषणावर आधारलेली विषमता कधीही हिंसा अथवा प्रतिहिंसेने नष्ट होऊ शकणार नाही. सर्वोदयवादी विचारवंत प्रतिपादन करतात की, योग्य शिक्षणाद्वारे लोकांचे मतपरिवर्तन करून हिंसा व आर्थिक

षमता नाहीसी करता येईल. म्हणून सर्वोदयवाद्यांनी मतपरिवर्तनाद्वारे समाज परिवर्तनाचा योग करण्यासाठी सर्वोदय कार्यक्रम हाती घेतला. सर्वोदय विचारसरणीतून भूदान हा भूमी श्नावरील उत्तम उपाय म्हणून आचार्य विनोबा भावेंनी भूदान कार्य हाती घेतले. त्यांची शी धारणा होती की, भूमिपतींनी त्यांच्या जमिनीचा काही भाग भूमिहीनांच्या र्वसनासाठी दिल्यास भूमिपती व भूमिहीन यांच्यातील संघर्ष टाळता येईल.

भूदान यज्ञातील पहिले दान आंध्र प्रदेशाच्या तेलंगण भागातील पोचमपल्ली गावाच्या मचंद्र रेड्डी नावाच्या गृहस्थाने केले. भूतपूर्व हैदराबाद संस्थानातील तेलंगण प्रदेशातील रीब भूमिहीनांनी साम्यवादी तत्त्वप्रणालीच्या अमलाखाली येऊन ठिकठिकाणी जमीनदारां-रुद्ध उघड व हिंसात्मक उठाव केला होता. या हिंसाचारामुळे सर्वोदयवादी विचारवंत चिंत झाले. त्यामुळे त्या वर्षाचे सर्वोदय संमेलन हैदराबादलाच घ्यावयाचे ठरले. मेलनासाठी आचार्य भावे वर्धा ते हैदराबाद पदयात्रा करून जात असताना एका गावातील रिजन लोकांनी त्यांच्याकडे जमिनीच्या स्वरूपात मदतीची याचना केली. त्याच गावातील मिपतींची बैठक घेऊन विनोबाजींनी त्यांना विनंती केली की, भूमिहीनांना योग्य न्याय यास्तव जमिनीचे दान करा. त्यांच्या विनंतीला प्रतिसाद म्हणून उपरोक्त व्यक्तीने पहिले न केले. हाच भूदान यज्ञाचा प्रारंभ होय. येथे लाभलेल्या दानाची ज्योत विनोबांनी चालू वली. त्याच वर्षी ते पुन्हा मध्य व उत्तर भारतातील राज्यांच्या मोठ्या पदयात्रेवर निघाले णि डिसेंबर १९५१ पर्यंत त्यांनी अदमासे तीन लाख एकर भूमी प्राप्त केली.[१५७]

भूदान चळवळीच्या इतिहासाचे दोन कालखंड दिसून येतात. पहिला कालखंड १९५१ १९५७ असा असून या कालखंडात भूदान चळवळीचा जोर फार मोठा होता. या काल-डात अखिल भारतातून ४३,८१,८७१ एकर जमीन दानामध्ये प्राप्त झाली. दुसरा कालखंड ९५८ पासून सुरू झाला. या कालखंडात मात्र चळवळीची प्रगती न होता दानामध्ये घट ली. घट होण्याचे कारण की, मिळालेल्या जमिनींपैकी बऱ्याच जमिनी दात्यांचा जमिनीवर पूर्ण हक्क असल्याकारणाने किंवा जमिनी कौटुंबिक कलहात असल्यामुळे अथवा अशाच र कारणांकरिता शासनाने नामंजूर केल्या. याशिवाय काही जमिनी स्वतः दात्यांनीच त घेतल्या. भूदान आंदोलनास पुढे ग्रामदानाचे स्वरूप प्राप्त झाले. तथापि कालांतराने दोन्हीही चळवळी अस्तंगत होत गेल्या.[१५८] प्रारंभापासून १९६९ पर्यंत वर्धा जिल्ह्यात २,५४७.४० एकर जमीन भूदान यज्ञाखाली प्राप्त झाली होती.[१५९] वर्धा जिल्ह्यामध्ये प्रभावी दान होणे क्रमप्राप्त होते. महाराष्ट्रातील जिल्ह्यांपैकी यवतमाळ व वर्धा जिल्ह्यांमध्ये दान कार्य अधिक व्यापक प्रमाणावर झाले. त्याचे कारण असे दिसते की, या परिसरामध्ये र्वोदयवादी विचारवंत निवास करीत असल्याकारणाने कार्यकर्त्यांनी तेथे सखोल कार्य ले. या दोन जिल्ह्यांमधून, विदर्भातील एकूण खेड्यांपैकी ३९.२९ टक्के खेड्यांनी, भूदान र्यास सक्रीय दान केले. या दोन जिल्ह्यांमधील दात्यांनी दिलेली जमीन विदर्भातील आठ ल्ह्यांतील दात्यांनी दिलेल्या जमिनीच्या ६३.७६ टक्के होती. विदर्भातील एकूण वितरित मिनीपैकी अदमासे ६७ प्रतिशत जमीन या दोन जिल्ह्यांनी वितरित केली.[१६०]

---

[१५७] नानेकर, कृ. र. आणि खांदेवाले, श्री. वि., **विदर्भातील भूदान** (नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर, १९७०), पृ. २–५.

[१५८] कित्ता, पृ. २, ६.

[१५९] कित्ता, पृ. ४२.

[१६०] कित्ता, पृ. ९९, १०१.

परिशिष्ट १

वर्धा जिल्ह्यातील हुतात्मा स्मारके[१६१]

	हुतात्म्याचे नाव	जन्म	मृत्यू	गाव
१	हुतात्मा स्मारक वर्धा—			
	जंगलू धोंडबाजी ढोरे	..	११–८–१९४२	वर्धा
२	हुतात्मा स्मारक सेवाग्राम—			
	महादेव हरिभाई देसाई	१८९२	१५–८–१९४२	..
	कस्तुरबा मोहनदास गांधी	१८६९	२२–२–१९४४	..
३	हुतात्मा स्मारक खरांगणा-मोरांगणा—			
	केशव बळीराम बोनगीरवार	१९२५	१६–८–१९४२	मोरांगणा
४	हुतात्मा स्मारक नरसापूर—			
	बाकेराव विठुजी भडके	..	..	नरसापूर
५	हुतात्मा स्मारक खडकी—			
	गंगाराम भगवानजी नागापूरे	१८९७	२–७–१९४३	खडकी
६	हुतात्मा स्मारक आष्टी—			
	उदेभान डोमाजी कुबडे	१९०७	१६–८–१९४२	वडाळा
	पंछी पोलसू धुर्वे (गोंड)	१९०७	१६–८–१९४२	वडाळा
	गोविंदराव बळीरामजी मालपे	१९१०	१६–८–१९४२	आष्टी
	नवाब रसिदखान सहादतखान	१९०८	१६–८–१९४२	आष्टी
	केशवराव श्रावण ढोंगे	१९१८	१९४२	वडाळा
	मारोती राजाराम चोहटकर	१८९०	१९४३	आष्टी
	पलू शंकर कनेर	१९१८	..	आष्टी
	हरिलाल बिहारीलाल कहार	१९१४	..	खडकी
७	हुतात्मा स्मारक अहमदपूर पेठ—			
	नवाब रसिदखान सहादतखान	१९०८	१६–८–१९४२	आष्टी
८	हुतात्मा स्मारक वडाळा—			
	कृष्णा गोविंदराव राऊत	..	..	वडाळा
	विश्वनाथ सखाराम घुडे	..	..	वडाळा
	गुलाबराव सूर्यभान घुडे	..	..	वडाळा
	पंछी पोलसू धुर्वे (गोंड)	१९०७	१६–८–१९४२	वडाळा
	उदेभान डोमाजी कुबडे	१९०७	१६–८–१९४२	वडाळा
	केशवराव श्रावण ढोंगे	१९१८	१९४२	वडाळा

[१६१] सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे कागदपत्रांतून ही माहिती संकलि केलेली आहे. काही हुतात्म्यांच्या जन्म अथवा मृत्यूच्या तारखा उपलब्ध नाही काही हुतात्म्यांची स्मारके दोन ठिकाणी उभारलेली आहेत.

परिशिष्ट २

Statement issued to the public by Prof. J. P. Bhansali on reasons for his Fast and his Determination to Sacrifice his life in order to secure Redress for the outrages

No man likes to depart from this world easily. I had taken a vow to pin for at least fourteen hours a day till I lived. But it was with a pang hat I had to abandon the spinning vow in the face of the conflagration aging around me. I could not for the life of me harbour the peaceful dea of spinning away my time when my dear village sisters were raped y British and Indian soldiers who looted and plundered their wealth nd corn, leaving nothing for them to eat, taking away their clothing, eaving very little for them to dress with. I have seen old men at Chimur veeping before me, destitute as they were. I have seen aged women vith tearful eyes weeping before me at the atrocities of the British Government. I have seen children of Chimur looking still dazed at the hings that had happened there. God only knows the intensity of feeling nd the helplessness of these mortals. A Deputy Superintendent of Police himself admitted before me that there might have happened a ape here or a rape there and that there was general beating of the eople in the beginning to impress upon their mind the might of the mperial Government. Looking at all these dreadful and painful ircumstances I cannot help feeling that life is not worth living if hese things cannot be remedied.

I demanded of the D. C. an independent and impartial investigation. My letter has been unheeded. I wrote to Mr. Aney of the Imperial Government my intention to fast till death but no reply has been vouchsafed to me.

The course of my conduct is clear. The English, who complain of he Japanese and German barbarities, are to my mind more barbaric han the heathens of old. The honour of India is at stake and I have lecided to defend it by sacrificing my life and to leave this mortal body of mine as a protest against the barbarism practised by the British Government in the name of law and order.

My last prayer to God is : May He open the eyes of the Government to the dire distress and havoc they are causing to a helpless nation. May He give them the wisdom to understand that as you do unto others you would be done by. But my innermost prayer to God is : Forgive them for they know not what they do.

24th November 1942. (Signed) J. P. BHANSALI.

परिशिष्ट ३

Text of the Resolution adopted by the Congress Working Committee at Wardha on 14th July 1942

The events happening from day to day and the experience that the people of India are passing through, confirm the opinion of Congressmen that British rule in India must end immediately, not merely because foreign domination, even at its best, is an evil in itself and a continuing injury to the subject people, but because India in bondage can play no effective part in defending herself and in affecting the fortunes of the war that is desolating humanity. The freedom of India is thus necessary not only in the interest of India, but also for the safety of the world and for the ending of Nazism, Fascism, militarism and other forms of imperialism, and the aggression of one nation over another. Ever since the outbreak of the world war, the Congress has studiedly pursued a policy of non-embarrassment. Even at the risk of making its satyagraha ineffective, it deliberately gave it a symbolic character in the hope that this policy of non-embarrassment, carried to its logical extreme, would be duly appreciated and that real power would be transferred to popular representatives so as to enable the nation to make its fullest contribution towards the realisation of human freedom throughout the world, which is in danger of being crushed. It had also hoped that negatively nothing would be done which was calculated to tighten Britain's hold on India.

These hopes have, however, been dashed to pieces. The abortive Cripps' proposals showed in the clearest possible manner that there was no change in the British Government's attitude towards India and that the British hold on India was in no way to be relaxed. In the negotiations with Sir Stafford Cripps, Congress Representatives tried their utmost to achieve a minimum, consistent with the national demand, but to no avail. This frustration has resulted in a rapid and widespread increase of ill-will against Britain and a growing statisfaction at the success of Japanese arms.

The Working Committee view this development with grave apprehension as this, unless checked, will inevitably lead to a passive acceptance of aggression. The Committee hold that all aggression must be resisted, for any submission to it must mean the degradation of the Indian people and the continuation of their subjection. The Congress is anxious to avoid the experience of Malaya, Singapore, and Burma and desires to build up resistance to any aggression on or invasion of India by the Japanese or any foreign Power. The Congress would change the present ill-will against Britain into goodwill and make India a willing partner in a joint enterprise of securing freedom for the nations and peoples of the world and in the trials and tribulations which accompany it. This is only possible, if India feels the glow of freedom.

The Congress representatives have tried their utmost to bring about solution of the communal tangle. But this has been made impossible y the presence of the foreign Power, whose long record has been to ursue relentlessly the policy of divide and rule. Only after the ending of oreign domination and intervention, can the present unreality give lace to reality, and the people of India, belonging to all groups and arties, face India's problems and solve them on a mutually agreed basis.

The present political parties formed chiefly with a view to attract e attention of and influence the British power, will then probably ease to function. For the first time in India's history, the realisation vill come home that the princes, 'Jagirdars', 'Zamindars' and propered and monied classes derive their wealth and property from the orkers in the fields and factories and elsewhere, to whom essentially ower and authority must belong. On the withdrawal of British rule India, responsible men and women of the country will come together form a provisional government, representative of all important ections of the people of India which will later evolve a scheme hereby a Constituent Assembly can be convened in order to prepare constitution for the Government of India acceptable to all sections f the people. Representatives of free India and representatives of reat Britain will confer together for the adjustment of future relaons and for the co-operation of the two countries as allies in the ommon task of meeting aggression.

It is the earnest desire of the Congress to enable India to resist aggreion effectively with the people's united will and strength behind it. making the proposal for the withdrawal of the British rule from ndia, the Congress has no desire whatsoever to embarrass Great ritain or the Allied Powers in their prosecution of the war, or in any ay to encourage aggression on India or increase pressure on China y the Japanese or any other Power associated with the Axis group. Jor does the Congress intend to jeopardise the defensive capacity of e Allied powers.

The Congress is, therefore, agreeable to the stationing of the armed orces of the Allies in India, should they so desire, in order to ward ff and resist Japanese or other aggression and to protect and help China. The proposal of withdrawal of the British power from India vas never intended to mean the physical withdrawal of all Britishers rom India, and certainly not of those who would make India their ome and live there as citizens and as equals with the others. If such withdrawal takes place with goodwill it would result in the establihing of a stable provisional Government in India and co-operation etween this Government and the United Nations in resisting aggression nd helping China. The Congress realises that there may be risks nvolved in such a course. Such risks, however, have to be faced by ny country in order to achieve freedom, and more especially at the

present critical juncture in order to save the country and the larger cause of freedom the World over from far greater risks and perils. While, therefore, the Congress is impatient to achieve the national purpose, it wishes to take no hasty steps and would like to avoid, in so far as is possible, any course of action that might embarrass the United Nations. The Congress would be pleased with the British power if it accepts the very reasonable and just proposal herein made, not only in the interest of India but also that of Britain and of the cause of freedom to which the United Nations proclaim their adherence. Should, however, this appeal fail the Congress cannot view without the gravest apprehension the continuation of the present state of affairs involving a progressive deterioration in the situation and the weakening of India's will and power to resist aggression. The Congress will then be reluctantly compelled to utilise all the non-violent strength it might have gathered since 1920, when it adopted Non-violence as part of its policy for the vindication of the political rights and liberty. Such a widespread struggle would inevitably be under the leadership of Mahatma Gandhi. As the issues raised are of the most vital and far-reaching importance to the people of India as well as to the peoples of the United Nations, the Working Committee refer them to the All-India Congress Committee for final decision. For this purpose the A. I. C. C. will meet in Bombay on the 7th of August, 1942.

परिशिष्ट ४

Text of the Resolution adopted by the All-India Congress Committee on 8th August 1942

" The All-India Congress Committee has given the most careful onsideration to the reference made to it by the Working Committee n their resolution dated July 14, 1942, and to subsequent events, inclu- ing the development of the war situation, the utterances of respon- ible spokesmen of the British Government, and the comments and riticisms made in India and abroad. The Committee approves of and ndorses that resolution, and is of opinion that events subsequent to t have given it further justification, and have made it clear that the mmediate ending of British rule in India is an urgent necessity, both or the sake of India and for the success of the cause of the United Nations. The continuation of that rule is degrading and enfeebling ndia and making her progressively less capable of defending herself nd of contributing to the cause of World freedom.

" The Committee has viewed with dismay the deterioration of the ituation on the Russian and Chinese fronts, and conveys to the Russian and Chinese peoples its high appreciation of their heroism in lefence of their freedom. This increasing peril makes it incumbent on ll those, who strive for freedom and who sympathise with the victims f aggression, to examine the foundations of the policy so far pursued y the Allied Nations, which have led to repeated and disastrous ailure. It is not by adhering to such aims and policies and methods hat failure can be converted into success, for past experience has shown hat failure is inherent in them. These policies have been based not n freedom so much as on the domination of subject and Colonial Countries, and the continuation of the Imperialist tradition and method. The possession of Empire, instead of adding to the strength of the uling power, has become a burden and a curse. India, the classic land f modern imperialism, has become the crux of the question, for by the reedom of India will Britain and the United Nations be judged, and he peoples of Asia and Africa be filled with hope and enthusiasm.

" The ending of British rule in this country is thus a vital and mmediate issue on which depend the future of the war and the success f freedom and democracy. A free India will assure this success by hrowing all her great resources in the struggle for freedom and against he aggression of Nazism, Fascism and Imperialism. This will not only ffect materially the fortunes of the war, but will bring all subjects and ppressed humanity on the side of the United Nations, and give these nations, whose ally India would be, the moral and spiritual leadership f the world. India in bondage will continue to be the symbol f British Imperialism and the taint of that imperialism will affect the fortunes of all the United Nations.

"The peril of today, therefore, necessitates the independence of India and the ending of British domination. No future promises or guarantees can affect the present situation or meet that peril. They cannot produce the needed psychological effect on the mind of the masses. Only the glow of freedom now can release that energy and enthusiasm of millions of people which will immediately transform the nature of the war.

"The A. I. C. C., therefore, repeats with all emphasis the demand for the withdrawal of the British power from India. On the declaration of India's independence, a provisional Government will be formed and free India will become an ally of the United Nations, sharing with them in the trials and tribulations of the joint enterprise of the struggle for freedom. The provisional Government can only be formed by the co-operation of the principal parties and groups in the country. It will thus be a composite Government, representative of all important sections of the people of India. Its primary functions must be to defend India and resist aggression with all the armed as well as the non-violent forces at its command, together with its Allied Powers, and to promote the well-being and progress of the workers in the fields and factories and elsewhere to whom essentially all power and authority must belong. The provisional Government will evolve a scheme for a Constituent Assembly which will prepare a constitution for the Government of India acceptable to all sections of the people. This constitution, according to the Congress view, would be a federal one, with the largest measure of autonomy for the federating units, and with the residuary powers vesting in these units. The future relations between India and the Allied Nations will be adjusted by representatives of all these free countries conferring together for their mutual advantage and for their co-operation in the common task of resisting aggression. Freedom will enable India to resist aggression effectively with the people's united will and strength behind it.

"The freedom of India must be the symbol of and prelude to this freedom of all other Asiatic nations under foreign domination. Burma, Malaya, Indo-China, the Dutch Indies, Iran and Iraq must also attain their complete freedom. It must be clearly understood that such of these countries as are under Japanese control now must not subsequently be placed under the rule or control of any other Colonial Power.

"While the A. I. C. C. must primarily be concerned with the independence and defence of India in this hour of danger, the Committee is of opinion that the future peace, security and ordered progress of the world demand a World Federation of free nations, and on no other basis can the problems of the modern world be solved. Such a World Federation would ensure the freedom of its constituent nations, the prevention of aggression and exploitation by one nation over another, the protection of national minorities, the advancement

' all backward areas and peoples, and the pooling of the world's sources for the common good of all. On the establishment of such World Federation, disarmament would be practicable in all countries, ıtional armies, navies and air forces would no longer be necessary, ıd a world federal defence force would keep the world peace and event aggression.

" An independent India would gladly join such a World Federation ıd co-operate on an equal basis with other countries in the solution ' international problems.

" Such a federation should be open to all nations who agree with s fundamental principles. In view of the war, however, the federaon must inevitably, to begin with, be confined to the United 'ations. Such a step taken now will have a most powerful effect on ıe war, on the people of the Axis countries, and on the peace to come.

" The Committee regretfully realizes, however, that despite the agic and overwhelming lessons of the war and the perils that overang the world, the governments of few countries are yet prepared take this inevitable step towards world federation. The reactions f the British Government and the misguided criticism of the foreign ress also make it clear that even the obvious demand for India's ıdependence is resisted, though this has been made essentially to ıeet the present peril and to enable India to defend herself and help 'hina and Russia in their hour of need. The Committee is anxious ot to embarrass in any way the defence of China or Russia, whose eedom is precious and must be preserved, or to jeoparadise the efensive capacity of the United Nations. But the peril grows both to ıdia and these nations, and inaction and submission to a foreign dministration at this stage is not only degrading India and reducing er capacity to defend herself and resist aggression, but is no answer that growing peril and is no service to the peoples of the United 'ations. The earnest appeal of the Working Committee to Great ritain and the United Nations has so far met with no response and ıe criticisms made in many foreign quarters have shown an ignorance f India's and the world's need, and sometimes even hostility to India's eedom, which is significant of a mentality of domination and racial uperiority which cannot be tolerated by a proud people conscious f their strength and of the justice of their cause.

"The A. I. C. C. would yet again, at this last moment, in the interest f world freedom, renew this appeal to Britain and the United Nations. ut the Committee feels that it is no longer justified in holding the ation back from endeavouring to assert its will against an imperialist nd authoritarian Government which dominates over it and prevents from functioning in its own interest and in the interest of humanity. 'he Committee resolves, therefore, to sanction for the vindication of

India's inalienable right to freedom and independence, the starting of a mass struggle on non-violent lines on the widest possible scale, so that the country might utilize all the non-violent strength it has gathered during the last 22 years of peaceful struggle. Such a struggle must inevitably be under the leadership of Gandhiji and the Committee requests him to take the lead and guide the nation in the steps to be taken.

" The Committee appeals to the people of India to face the dangers and hardships that will fall to their lot with courage and endurance, and to hold together under the leadership of Gandhiji and carry out his instructions as disciplined soldiers of Indian freedom. They must remember that non-violence is the basis of this movement. A time may come when it may not be possible to issue instructions or for instructions to reach our people, and when no Congress Committees can function. When this happens, every man and woman who is participating in this movement must function for himself or herself within the four corners of the general instructions issued. Every Indian who desires freedom and strives for it must be his own guide urging him on along the hard road where there is no resting place and which leads ultimately to the independence and deliverance of India.

" Lastly, whilst the A. I. C. C. has stated its own view of the future governance under free India, the A. I. C. C. wishes to make it quite clear to all concerned that by embarking on a mass struggle, it has no intention of gaining power for the Congress. The power, when it comes, will belong to the whole people of India. "

प्रकरण ३—लोक

वर्धा जिल्ह्यात कुणबी, मराठा, तेली, भोयर, कोष्टी, बौद्ध व गोवारी लोक मोठ्या संख्येने आढळतात. इतरत्र न आढळणारा भोयर समाज कारंजा भागात आढळतो. ोंड, परधान, कोलाम इत्यादी आदिवासी जमाती जिल्ह्यात आढळतात. गोंड प्रामुख्याने त्तरेकडील डोंगराळ भागात आढळतात. गांधीजी, विनोबाजी व जमनालाल बजाज यांनी स्पृश्योद्धारासाठी महान प्रयत्न केले. जमनालालजींनी आपले लक्ष्मीनारायण मंदिर रिजनांना प्रथम खुले केले (१९२८). धम्मचक्रप्रवर्तनानंतर महार जातीतील लोकांनी ौद्ध धर्माचा केलेला स्वीकार ही महत्त्वाची घटना होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरला लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. सन ९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात १,२९,०२१ (१३.९ टक्के) बौद्धधर्मीय होते. ल्ह्यातील प्रमुख जाती-जमातींच्या लोकांची माहिती या प्रकरणात दिली आहे. ही माहिती बंधित समाजातील जाणकारांच्या मुलाखती, क्षेत्रीय सर्वेक्षण (१९८७–८८) आणि शोधनपर आधारसाहित्यावर आधारित आहे. बऱ्याच चालीरीती आता प्रचलित नसल्या री समाजशास्त्र दृष्टिकोनातून त्यांची माहिती दिली आहे.

लोकसंख्या

इ. स. १९८१ मध्ये जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ९,२६,६१८ असून (१९९१ मध्ये ०,६५,५८९) राज्यातील १.४८ प्रतिशत लोक येथे राहतात. लोकसंख्येनुसार ल्ह्याचा राज्यात २५ वा क्रमांक लागतो. इ. स. १९०१ पासून लोकसंख्या व प्रत्येक कातील वाढीचे प्रमाण खाली दिले आहे.

वर्ष	लोकसंख्या	दशकातील फरक	दशकातील फरकाचे प्रमाण
१९०१	३८६,०१२	..	..
१९११	४६०,७७५	+ ७४,७६३	+ १९.३७
१९२१	४६३,६९६	+ २,९२१	+ ०.६३
१९३१	५१६,२६६	+ ५२,५७०	+ ११.३४
१९४१	५१९,३३०	+ ३,०६४	+ ०.५९
१९५१	५३८,९०३	+ १९,५७३	+ ३.७७
१९६१	६३४,२७७	+ ९५,३७४	+ १७.७०
१९७१	७७९,५६२	+ १,४५,२८५	+ २२.९१
१९८१	९२६,६१८	+ १,४७,०५६	+ १८.८६
१९९१	१०,६५,५८९	+ १,३८,९७१	+ १४.९९

इ. स. १९०१ मधील तीव्र दुष्काळानंतरच्या काही वर्षांत पीक चांगले आल्यामुळे १९०१ ते १९११ या काळात लोकसंख्येत १९.३७ टक्के वाढ झाली. इन्फ्ल्यूएंझाच्या भयानक साथीने १९१८–१९ मध्ये अनेक बळी घेतल्यामुळे तसेच १९११–१९२१ या दशकातील शेतीचे काही हंगाम चांगले नसल्यामुळे लोकसंख्येत फक्त ०.६३ टक्के वाढ झाली. १९२१ ते १९३१ या दशकात मात्र लोकसंख्येत ११.३४ टक्के वाढ झाली. १९४१ मधील जनगणना युद्धजन्य परिस्थितीत झालेली असल्यामुळे त्यात बऱ्याच त्रुटी आहेत. हिवताप, पटकी, देवी व प्लेगच्या साथींमुळे बरीच माणसे मरण पावल्यामुळे १९४१–१९५१ या दशकात लोकसंख्या अल्प प्रमाणात वाढली असावी. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने सार्वजनिक आरोग्याबाबत केलेल्या उपाययोजनांमुळे मृत्यूचे प्रमाण बरेच कमी होऊन लोकसंख्या वाढीचे प्रमाण वाढले. तेव्हापासून लोकसंख्या वृद्धीची घोडदौड सुरूच आहे. इतके मात्र खरे की, राज्यातील लोकसंख्या वाढीच्या तुलनेत जिल्ह्यातील वाढीचे प्रमाण कमी आहे.

तक्ता क्रमांक १ मध्ये १९८१ च्या जनगणनेनुसार तालुकानिहाय ग्रामीण व नागरी लोकसंख्या व लोकवस्तीची घनता दर्शविली आहे.[1] सन १९८१ च्या जनगणनेनंतर झालेल्या तालुक्यांच्या विभाजनानुसार सध्या वर्धा, हिंगणघाट, आर्वी, सेलू, देवळी, समुद्रपूर, कारंजा आणि आष्टी हे तालुके आहेत. तथापि नवीन तालुक्यांनुसार लोकसंख्येची विश्लेषणात्मक आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे जनगणनेनुसार मोजणी झालेल्या जुन्या तालुक्यांचीच आकडेवारी येथे दिली आहे. विभाजित आठ तालुक्यांची १९८१ मधील फक्त लोकसंख्येची आकडेवारी प्रकरण १–भूगोल यात दिली आहे. जिल्हा आणि राज्याच्या लोकसंख्येची १९०१ पासूनची निव्वळ प्रतिशत वाढ खाली दिलेली आहे.

वर्ष	वर्धा जिल्हा	महाराष्ट्र
१९०१–८१	+ १४०.०५	+ २२३.७७
१९०१–११	+ १९.३७	+ १०.७४
१९११–२१	+ ०.६३	– २.९१
१९२१–३१	+ ११.३४	+ १४.९१
१९३१–४१	+ ०.५९	+ ११.९९
१९४१–५१	+ ३.७७	+ ११.२७
१९५१–६१	+ १७.७०	+ २३.६०
१९६१–७१	+ २२.९१	+ २७.४५
१९७१–८१	+ १८.८६	+ २४.५४

वरील विवरणपत्रावरून जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचे प्रमाण महाराष्ट्रातील तत्सम प्रमाणापेक्षा सातत्याने कमी असल्याचे दिसून येते. जिल्ह्यातील उत्तरेकडील तालुक्यांतून नागपूर, अमरावती व मुंबईकडे होत असलेले स्थलांतर हे त्याचे प्रमुख कारण होय.

[1] सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिले आहेत.

लोकवस्तीची घनता : महाराष्ट्र राज्य, वर्धा जिल्हा आणि त्यातील तालुके यांची १९५१, ९६१, १९७१ आणि १९८१ मधील लोकसंख्येची घनता खालील विवरणपत्रात दिली आहे.

राज्य / जिल्हा		दर चौरस किलोमीटरला				१९८१ मधील जिल्हा लोक-संख्येची टक्केवारी
		१९५१	१९६१	१९७१	१९८१	
महाराष्ट्र राज्य	..	१०५	१२९	१६४	२०४	..
वर्धा जिल्हा	..	८५	१०१	१२४	१४७	१००.००
वर्धा तालुका	..	११९	१३६	१६९	२०१	४५.८४
आर्वी तालुका	..	६३	७८	९४	१०८	२६.८९
हिंगणघाट तालुका	..	७६	८८	१०८	१३४	२७.२७

जिल्ह्यातील लोकवस्तीची घनता १९२१ मध्ये दर चौरस मैलास १९१ होती. वर्धा लुक्यात इतर तालुक्यांच्या मानाने दाट लोकवस्ती असल्यामुळे तेथील लोकवस्तीची नताही अधिक आहे. परंतु वर्धा जिल्ह्यातील लोकवस्तीची घनता राज्याच्या सरासरीपेक्षा त कमी असल्याचे दिसते. (१९९१ मध्ये १६९).

नागरी लोकसंख्या : १९०१ पासून प्रत्येक जनगणनेनुसार जिल्ह्याची नागरी लोकसंख्या णि दशकातील फरक यासंबंधीची आकडेवारी तक्ता क्रमांक २ मध्ये दिली आहे. इ. स. ९०१ पासून प्रत्येक जनगणनेच्या वेळची शहरांची संख्या, नागरी लोकसंख्येत प्रत्येक कात झालेल्या फरकाचे प्रमाण आणि नागरी लोकसंख्येचे एकुण लोकसंख्येशी असलेले ाण पुढे दिले आहे.

वर्ष		शहरांची संख्या	नागरी लोकसंख्येतील फरकाचे प्रमाण	एकूण लोकसंख्येमधील नागरी लोकसंख्येची टक्केवारी
१९०१	..	५	..	११.२६
१९११	..	७	+ ३९.६०	१३.१७
१९२१	..	७	+ १७.१६	१५.३३
१९३१	..	७	+ १९.९९	१६.५२
१९४१	..	७	+ १७.७२	१९.३३
१९५१	..	७	+ २५.३६	२३.३५
१९६१	..	६	+ १९.२०	२३.६५
१९७१	..	६	+ २७.३९	२४.५१
१९८१	..	६	+ २१.१४	२४.९८

इ. स. १९०१ पासून १९८१ पर्यंत जिल्ह्यातील नागरी लोकसंख्या ४३२.७६ टक्क्यांनी ढली तर राज्याची ५८३.६२ टक्क्यांनी वाढली. महाराष्ट्र राज्याशी तुलना करता या ल्ह्यातील नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण कमी दिसते.

ग्रामीण लोकसंख्या : इ. स. १९०१ पासून ग्रामीण लोकसंख्येतील फरकाचे प्रमाण आणि
एकूण लोकसंख्येतील ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी खाली दिली आहे.

वर्ष		ग्रामीण लोकसंख्येतील फरकाचे प्रमाण	ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी
१९०१	..	..	८८.७४
१९११	..	+ १६.८०	८६.८३
१९२१	..	— १.८७	८४.६७
१९३१	..	+ ९.७७	८३.४८
१९४१	..	— २.७९	८०.६७
१९५१	..	— १.४१	७६.६५
१९६१	..	+ १७.२४	७६.३५
१९७१	..	+ २१.५२	७५.४९
१९८१	..	+ १८.१२	७५.०२

जिल्ह्याची ग्रामीण लोकसंख्या १९०१–१९८१ या कालावधीत १०२.९२ टक्क्यां
वाढली. तर राज्याच्या बाबतीत ही वाढ १५२.१९ टक्के आहे. इ. स. १९८१ मध्ये जिल्ह्
तील एक हजाराहून कमी लोकसंख्या असलेली खेडी ७८.७२ टक्के असून त्यात ४२.१
टक्के लोक राहात होते. एक हजारापेक्षा अधिक लोकसंख्या असलेली खेडी २१.२८ टक
असून त्यांची लोकसंख्या ५७.८७ टक्के होती. जिल्ह्यातील खेड्यागणिक सरासरी लोकसंख
६८५ असून महाराष्ट्रात ती १,०३६ आहे.

वयमान गट : इ. स. १९७१ व १९८१ मधील स्थूल वयमानगटानुसार लोकसंख्ये
पुरुष व महिलांचे प्रमाण खाली दिले आहे.

वयमान गट		१९७१		१९८१	
		पुरुष	महिला	पुरुष	महिला
०–४	..	१४.५६	१५.०४	११.११	११.४२
५–१४	..	२६.८१	२७.७८	२६.४२	२७.६२
०–१४	..	४१.३७	४२.८२	३७.५३	३९.०४
१५–३४	..	२७.६३	२८.१२	३१.२८	२९.९६
३५–५९	..	२४.१०	२१.९९	२३.३०	२३.१०
१५–५९	..	५१.७३	५०.११	५४.५८	५३.०६
६० आणि अधिक	..	६.८९	७.०७	७.८८	७.९०
एकूण	..	१००.००	१००.००	१००.००	१००.००

तक्ता क्रमांक ३ मध्ये जिल्ह्यातील वयमानगटानुसार लोकसंख्या दिली आहे.

महिला-पुरुष प्रमाण : वर्धा जिल्ह्यातील एकूण, ग्रामीण व नागरी क्षेत्रातील हिला-पुरुषांचे प्रमाण (दर १,००० पुरुष लोकसंख्येमागे महिलांची संख्या) खाली ले आहे.

वर्ष		एकूण	ग्रामीण	नागरी
१९०१	..	९८७	९९३	९४१
१९११	..	९८३	९९०	९३७
१९२१	..	९७३	९८८	८९२
१९३१	..	९७५	९९५	८८१
१९४१	..	९७८	९८९	९३१
१९५१	..	९८३	९९३	९५०
१९६१	..	९६४	९८०	९१७
१९७१	..	९४९	९६३	९०६
१९८१	..	९४८	९५४	९२१
१९९१	..	९४१	..	..

इ. स. १९०१ ते १९८१ या कालावधीत जिल्ह्याच्या एकूण नागरी लोकसंख्येतील हिला-पुरुष प्रमाण राज्यातील तत्सम प्रमाणापेक्षा अधिक असून ग्रामीण लोकसंख्येतील हिला-पुरुष प्रमाणात चढउतार दिसून येतो.

वैवाहिक स्थिती : तक्ता क्रमांक ४ मध्ये १९८१ ची वयमानगटानुसार वैवाहिक र्गाची आकडेवारी तर १९५१, १९६१, १९७१ आणि १९८१ मधील वयमानगटा- ार वैवाहिक लोकसंख्येची टक्केवारी तक्ता क्रमांक ५ मध्ये दिली आहे.

भाषा : जिल्ह्यात मराठी ही प्रमुख भाषा असून १९८१ च्या जनगणनेनुसार ८६.६४ क्के लोकांची ती मातृभाषा होती. १९८१ मध्ये ग्रामीण व नागरी क्षेत्रात मराठी लणाऱ्यांचे प्रमाण अनुक्रमे ९०.६५ व ७४.६२ टक्के होते. हिंदी भाषा बोलणाऱ्यांचा सरा क्रमांक होता. एकूण लोकसंख्येच्या ६.५५ टक्के लोक हिंदी भाषा बोलणारे होते. ामीण भागातील हिंदी बोलणाऱ्यांचे ग्रामीण लोकसंख्येशी प्रमाण फक्त ४.०८ टक्के, तर गरी लोकसंख्येशी हे प्रमाण १३.१४ टक्के होते. नागरी व ग्रामीण क्षेत्रात उर्दू, गुजराथी तेलुगु या इतर भाषा आहेत. याशिवाय नागरी क्षेत्रात पंजाबी व सिंधी भाषाही बोलल्या ातात. तक्ता क्रमांक ६ मध्ये १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील भाषानिहाय ोकसंख्या दिली आहे. इ. स. १९८१ मधील जिल्ह्यातील भाषानिहाय लोकसंख्येची क्केवारी पुढे दिली आहे.

भाषा		एकूण लोकसंख्येशी टक्केवारी	
	एकूण	ग्रामीण	नागरी
आसामी ..	अत्यल्प	अत्यल्प	..
बंगाली ..	०.०१	०.०१	०.०३
गुजराथी ..	०.४१	०.१६	१.१६
हिंदी ..	६.५५	४.०८	१३.९४
कन्नड ..	०.०२	०.०१	०.०४
काश्मिरी ..	अत्यल्प	..	अत्यल्प
मल्याळम ..	०.०३	०.०२	०.०६
मराठी ..	८६.६४	९०.६५	७४.६२
ओरिया ..	०.०२	०.०१	०.०४
पंजाबी ..	०.१३	०.०७	०.३१
सिंधी ..	०.६३	०.०४	०.४२
तामीळ ..	०.०४	०.०३	०.०७
तेलुगु ..	०.३०	०.२५	०.४४
उर्दू ..	२.०७	१.०६	५.१०
इतर[२] ..	३.१५	३.६१	१.७७
एकूण ..	१००.००	१००.००	१००.००

इ. स. १९०१, १९५१ आणि १९६१ च्या जनगणनेनुसार भाषिकांची एकूण लोकसंख्येशी तुलनात्मक टक्केवारी खाली दिली आहे.[३]

भाषा	१९०१	१९५१	१९६१
बंजारी ..	०.३४	०.३२	०.३२
गोंडी ..	९.९३	४.११	२.६९
गुजराथी ..	..	०.४९	०.४७
हिंदी ..	१२.३४	७.१९	५.४६
कोलामी ..	..	०.४५	०.४४
मराठी ..	७६.३३	८३.३९	८६.६६
सिंधी ..	..	०.६१	०.५४
तेलुगु ..	०.५३	०.३८	०.२८
उर्दू ..	..	२.४४	२.५७
इतर ..	०.५३	०.६२	०.५७
सर्व भाषा ..	१००.००	१००.००	१००.००

[२] यात भारतीय संविधानाच्या परिशिष्ट ८ मध्ये नमूद न केलेल्या भाषा बोलणाऱ्यांची टक्केवारी दर्शविली आहे.

[३] १९७१ च्या जनगणना निर्देशग्रंथात भाषांची भिन्न वर्गवारी दिलेली असल्यामुळे १९७१ ची तुलनात्मक टक्केवारी येथे दिलेली नाही.

इ. स. १९८१ च्या जनगणना निर्देशग्रंथात भाषानिहाय व वारी करताना भारतीय विधानाच्या परिशिष्ट आठ मध्ये समाविष्ट असलेल्या भाषा व सदर परिशिष्टात समाविष्ट लेल्या भाषा अशा दोन स्थूल गटांत भाषांची विभागणी केली आहे. या परिशिष्टात ाविष्ट असलेल्या भाषांमध्ये पंधरा मुख्य भाषांचा अंतर्भाव आहे. त्यापैकी चौदा भाषांची कडेवारी तक्ता क्रमांक ६ मध्ये दिलेली आहे. शिवाय वर्धा जिल्ह्यात भिली किंवा भिलोडी, ग्लिश, गोंडी, गोरखली किंवा नेपाली, हलबी, खानदेशी, कोलामी, कोकणी, कोरकू आणि या या दहा भाषा बोलल्या जातात. त्या बोलणाऱ्यांची संख्या २९,००७ आहे. त्यापैकी ४,९४० ग्रामीण भागात व ४,०६७ नागरी भागात आहेत. त्यांची आकडेवारी खाली ली आहे.

भाषा		ग्रामीण	नागरी	एकूण
भिली/भिलोडी	..	७२४	६	७३०
इंग्लिश	..	१४	१४	२८
गोंडी	..	१७,८८३	१,२५५	१९,१३८
गोरखली/नेपाली	..	४७	५९	१०६
हलबी	..	१,८१०	२,४७६	४,२८६
खानदेशी	..	२८	१०	३८
कोलामी	..	३,८२७	४	३,८३१
कोकणी	..	४	६	१०
कोरकू	..	..	६	६
कोया	..	..	२१	२१
इतर भाषा	..	६०३	२१०	८१३
एकूण	..	२४,९४०	४,०६७	२९,००७

धर्म : इ. स. १९०१, १९६१, १९७१ व १९८१ मधील जिल्ह्यातील धर्मनिहाय लोक-ख्येची टक्केवारी खाली दिली आहे.

धर्म		१९०१	१९६१	१९७१	१९८१
बौद्ध	..	..	१५.०८	१४.३५	१३.९२
ख्रिश्चन	..	०.०४	०.१३	०.१४	०.१५
हिंदू	..	८५.९६	८०.६२	८०.८५	८१.२०
जैन	..	०.६२	०.५८	०.८४	०.५९
इस्लाम	..	३.८१	३.५२	३.६९	४.०३
शीख	..	..	..	०.१२	०.०६
इतर	..	९.५७	०.०७	०.०१	०.०५
सर्व धर्म	..	१००.००	१००.००	१००.००	१००.००

हिंदूंचे प्रमाण घटले असून बौद्ध, मुसलमान व ख्रिश्चनांच्या टक्केवारीत वाढ झाली आहे. बौद्धधर्मीयांच्या टक्केवारीत वाढ होण्याचे कारण पूर्वीच्या हिंदू महारांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला हे होय. यामुळेच हिंदूंच्या लोकसंख्येत घट दिसून येते. तक्ता क्रमांक ७ मध्ये जिल्ह्यातील धर्मनिहाय लोकसंख्या दिली आहे.

अनुसूचित जाती : वर्धा जिल्ह्यामध्ये शासनाने १६ जाती अनुसूचित जाती अधिसूचित केल्या असल्या तरी १९६१ व १९७१ मध्ये अनुक्रमे १३ (मांग गारूडी धरून) व १२ जाती नोंदविण्यात आल्या आहेत. १९५१ ते १९८१ या कालावधीतील अनुसूचित जातींचे एकूण ग्रामीण व नागरी प्रतिशत प्रमाण खाली दिले आहे.

वर्ष		एकूण	ग्रामीण	नागरी
१९५१	..	१७.१७	१७.९३	१४.६८
१९६१	..	२.३९	१.९८	३.७०
१९७१	..	३.०२	२.५०	४.६२
१९८१	..	३.९३	३.४५	५.३७

इ. स. १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील अनुसूचित जातींची आकडेवारी तक्ता क्रमांक ८, ९ व १० मध्ये दिली आहे.

अनुसूचित जमाती : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा, १९७६ नुसार अनुसूचित क्षेत्र बंधन दूर करण्यात आले. त्यामुळे १९७६ नंतर बिगर अनुसूचित क्षेत्रात निवास करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचासुद्धा अनुसूचित जमातीअंतर्गत समावेश करण्यात आला. त्यामुळे १९८१ च्या जनगणना अहवालात वर्धा जिल्ह्यातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या नमूद केली आहे. जिल्ह्यातील सर्व अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची एकूण, ग्रामीण व नागरी लोकसंख्येशी १९८१ मधील[४] टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

एकूण	ग्रामीण	नागरी
१५.३५	१७.५२	८.८३

जिल्ह्यातील अनुसूचित जमातींची आकडेवारी तक्ता क्रमांक ११, १२ व १३ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक १४ मध्ये १९८१ व १९९१ मधील लोकसंख्या दिली आहे.

प्रमुख जाती व जमाती

जनगणनेनुसार जिल्ह्यात १९८१ मध्ये ८१.२० टक्के हिंदू, ४.०३ टक्के मुसलमान व १३.९२ टक्के बौद्ध होते. बहुसंख्य लोक हिंदू असल्यामुळे त्यांच्यातील प्रमुख जातींची माहिती देणे उचित आहे. सन १९५६ च्या धम्मचक्रप्रवर्तनानंतर हिंदू महार जातीने

[४] इ. स. १९७१ जनगणना वर्षापर्यंत अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची वर्धा जिल्ह्यात नोंद नाही.

सामूहिकरीत्या बौद्ध धर्मात प्रवेश केला. जिल्ह्यातील प्रमुख व काही विशेषतापूर्ण जाती व जमातींच्या परंपरांची समाजशास्त्रीय माहिती पुढे दिली आहे. स्वातंत्र्यानंतर जनगणना ग्रंथात जाती व जमातीसंबंधी सविस्तर आकडेवारी दिलेली नाही. १९३१ च्या जनगणनेनुसार जाती व जमातींची आकडेवारी खालीलप्रमाणे होती.

हिंदू :—अहिर, ४,६९४ (पुरुष २,४२०, महिला २,२७४); बैरागी, १४८ (पु. ८०, म. ६८); बनिया, ५,३७० (पु. २,८०६, म. २,५६४); बारई, ९,४७९ (पु. ४,७९४, म. ४,६८५); बेलदार, १,९०१ (पु. ९४६, म. ९५५); भामटा, १,१७६ (पु. ५९३, म. ५८३); भिल, १३ (पु. ९, म. ४); भुंजिया, २५ (पु. १४, म. ११); ब्राह्मण, १५,३३९ (पु. ८,६८२, म. ६,६५७); चांभार, ३,५६९ (पु. १,८३१, म. १,७३८); दर्जी, २,८२६ (पु. १,४४०, म. १,३८६); धीमर, १३,५८७ (पु. ६,८५४, म. ६,७३३); धोबी, ४,९९१ (पु. २,५४४, म. २,४४७); गोंड, ११,९८५ (पु. ५,९३५, म. ६,०५०); गोसावी, १,६२४ (पु. ८३२, म. ७९२); गोवारी, १७,५३९ (पु. ८,८९६, म. ८,६४३); गुजर, ८४ (पु. ४७, म. ३७); हलबा, ३,२८० (पु. १,७३४, म. १,५४६); जंगम, ३१६ (पु. १४५, म. १७१); कहार, २९४ (पु. १५०, म. १४४); कलार, ३,७६६ (पु. १,९५३, म. १,८१३); कापेवार, ८८ (पु. ४१, म. ४७); कवार, १ (पु. — म. १); कायस्थ, २१८ (पु. १३३, म. ८५); केवट, ७ (पु. ५, म. २); खंगार, ४ (पु. २, म. २); खाटिक, ९१७ (पु. ४५७, म. ४६०); कोल, २३८ (पु. ११९, म. ११८); कोलाम, २,०३४ (पु. १,०६१, म. ९७३); कोळी, ४४९ (पु. २२०, म. २२९); कोमटी, ५६८ (पु. २८१, म. २८७); कोरी, २१२ (पु. १२८, म. ८४); कोरकू, ५६० (पु. २८१, म. २७९); कोष्टी, ७,४८७ (पु. ३,७७५, म. ३,७१२); कुंभार, २,५१४ (पु. १,३०७, म. १,२०७); कुणबी, ९३,१०७ (पु. ४७,२०४, म. ४५,९०३); कुरमी, १३० (पु. ६४, म. ६६); लोधी, १,०४४ (पु. ५३०, म. ५१४); लोहार, ४,०५४ (पु. २,१३६, म. १,९१८); माळी, २१,३६३ (पु. १०,९१७, म. १०,४४६); माना, ३,४५७ (पु. १,७७८, म. १,६७९); मांग, ७,३३७ (पु. ३,६८०, म. ३,६५७); मराठा, ८,७७८ (पु. ४,४७४, म. ४,३०४); मेहरा, ८०,७८० (पु. ३९,९९४, म. ४०,७८६); मेहतर, ९८० (पु. ४९४, म. ४८६); नाई, ४५३ (पु. २२१, म. २३२); ओझा, १२१ (पु. ६५, म. ५६); परधान, १,४०९ (पु. ६९३, म. ७१६); पारधी, ३६१ (पु. १७२, म. १८९); रज्जहार, २५ (पु. ११, म. १४); राजपूत, ३,९४८ (पु. २,१८४, म. १,७६४); सतनामी, ३९ (पु. १८, म. २१); सुनार, ५,१७६ (पु. २,५७१, म. २,६०५) ; तेली, ५५,८२३ (पु. २७,९१४, म. २७,९०९); वडार, ४६३ (पु. २३७, म. २२६) व वंजारी, १,६७९ (पु. ८७९, म. ८००).

जैन :—बनीया, २,८९९ (पु. १,४८८, म. १,४११).

मुसलमान :—बोहरा, ३७२ (पु. २२०, म. १५२); फकीर, ४६४ (पु. २२९, म. २३५); आणि खाटिक, ६३ (पु. २९, म. ३४).

कुणबी

संख्याबलाने सर्वाधिक अशी ही शेतकरी जात आहे. वस्तुतः कुणबी हा शब्द व्यवसाय-दर्शक असून जातदर्शक नाही. कुल्लूक भट्ट (इ. स. ११५०–१२००) या विद्वानाच्या मते "कुळंबी" या शब्दापासून कुणबी ही संज्ञा निर्माण झाली असावी. कुळपती-कुळवई-कुळवी-कुणबी या क्रमाने अपभ्रंश होऊन कुणबी शब्द बनला असावा. महाराष्ट्रातील बौद्ध लेण्यांतील काही उत्कीर्ण लेखांत कुटुम्बिन या शब्दाचा उल्लेख येतो. त्यापासून कुणबी ही संज्ञा रूढ झाली असावी असेही एक मत आहे.

अकराव्या शतकात कुणबी गुजरातमधून खानदेशात आले असे मानतात. तेथून १४ व्या शतकात ते नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांच्या प्रदेशात पसरले. नागपूरकर भोसल्यांच्या राजवटीत या परिसरात देशमुख आणि देशपांडे वंशपरंपरागत वतनदार बनले. देशमुख काही खेडी मिळून बनलेल्या परिमंडळाचा प्रमुख असे आणि त्या भागातील राजस्व गोळा करण्याची जबाबदारी त्याच्यावर असे. देशपांडे प्रमुख पटवारी होता. देशमुख वतन साधारणतः मराठे अथवा प्रमुख कुणब्यांकडे असे. वर्धा जिल्ह्यात अजूनही देशमुख आडनावाचे बरेच कुणबी आढळतात. रघूजी भोसल्याच्या काळात कुणबी मोठ्या संख्येने वर्धा जिल्ह्यात स्थायिक झाल्याचे दिसून येते.

इ. स. १९८७–८८ मध्ये सर्वेक्षण करता आढळले की, कुणब्यांच्या साडेबारा पोटजाती आहेत. त्यापैकी झाडे या पोटजातीचे कुणबी जिल्ह्यात सर्वप्रथम स्थायिक झाले असावे. खैरे, धनोजे, तिरोळे, वांढेकर आणि बावणे या पोटजाती जिल्ह्यात प्रामुख्याने आढळतात. पोटजातींमध्ये रोटीव्यवहार चालतो परंतु बेटीव्यवहार होत नाही. शिक्षणाचा प्रसार वाढल्यामुळे काही जुन्या प्रथा लोक विसरू लागले आहेत व त्याचा परिणाम म्हणून काही प्रमाणात आता बेटीव्यवहार सुद्धा होऊ लागले आहेत.

जिल्ह्यातील कुणब्यांची आडनावे पुढीलप्रमाणे आढळतात :—जवादे, कार्लेकर, ठाकरे, वसू, वाघ, खडसे, लोहोकरे, सबाने, काळे, राऊत, कदम, कोल्हे, झाडे, मांडवकर, देवतळे, भुरकूटे, कुडे, धोटे, भोयर, सातपुते, धुटे, झोटिंग, निखाडे, नवघरे, बोभाटे, कोंगरे, पावडे, जीवतोडे, माथनकर, पोफळे, मोरे, अखूज, चौधरी, देशमुख, टोनपे, निवरती, झलके इत्यादी. सामाजिकदृष्टया मराठे कुणब्यांपेक्षा श्रेष्ठ समजले जातात. बहुतांश कुणबी स्वतःस मराठे म्हणवून घेतात.

समान कुळ किंवा समान देवक असलेल्यांचा विवाहसंबंध घडून येत नाही. मामेबहिणीशी विवाह करता येतो. परंतु आतेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा नाही. मुलगी पसंत असल्यास साक्षगंध किंवा साखरपुडा होतो. प्रथम मुलाकडे शालमुदीचा कार्यक्रम होतो. यामध्ये गणेश-पूजन करून वधूपित्याकडून वरास कपडे व शक्य असल्यास सोन्याची अंगठी दिली जाते. अशाच प्रकारचा विधी वधूकडे सुद्धा साजरा केला जातो. यात वराचा पिता भावी सुनेचे पाय धुतो व तिला कपडे देतो. भोजनाचा कार्यक्रम होतो. पूर्वी बालविवाह करण्याची प्रथा होती. आता मात्र बालविवाह केला जात नाही.

लग्नाच्या एकदोन दिवस आधी कुलदेवतांची पूजा केली जाते. त्या प्रसंगी भोई लोक "डाहाका" वाजवितात. लग्नविधी निर्विघ्नपणे पार पडावा हा यामागील उद्देश असतो.

लग्नाच्या एक दिवस आधी पाच सुवासिनी जात्यावर हळद दळतात. यानंतर पाच सुवासिनी वाजतगाजत कुलदैवत व गावदेवतांना हळद चढवितात. यानंतर वधूवरांना हळद लावण्यात येते.

हळद लावण्याच्या कार्यक्रमास न्हानोरा म्हणतात. मंडपपूजनानंतर मातीच्या मडक्याची विधिवत स्थापना करतात. नवरदेव वधूपक्षाकडे जाताना इष्टदेवतांचे दर्शन घेऊन गावाच्या वेशीजवळ वऱ्हाड थांबते. वधूपक्षाकडील मंडळी त्यांचे स्वागत करून वराला तेथील मारुतीच्या मंदिराजवळ थांबविण्यात येते. वऱ्हाडातील लोक जानोस्यावर जातात. तेथून वराचे वडील इतर मंडळीसह वधूगृही येतात. मध्यंतरी व्याहीभेट हा कार्यक्रम होतो. यात एकमेकावर गुलाल उधळून पानसुपारी दिली जाते. लग्नमंडपात आल्यावर वरपिता वधूचे पाय धुतो व तिला नवीन कपडे आणि दागिने देतो. याचवेळी वधूकडील सुवासिनी व वधूचा मामा सगून-घागर घेऊन मारुतीचे मंदिरात जातात. तेथे वराला गोड घास देतात व त्याला वाजतगाजत लग्नमंडपी आणतात. वधूपिता वराचे पाय धुतो व त्याला नवीन कपडे देतो. लग्न लावताना अंतरपाट धरतात. अंतरपाट धरण्यासाठी मामास सांगितले जाते. पुरोहिताने मंगलाष्टके म्हटल्यावर प्रथम वधू वराच्या पायावर अक्षता घालून त्याला हार घालते. त्यानंतर वर वधूच्या डोक्यावर अक्षता टाकून तिला हार घालतो. वर वधूच्या गळयात मंगळसूत्र बांधतो. यानंतर ते एकमेकांची करंगळी धरून बोहल्यावर बसतात. लग्नविधी आटोपल्यावर आप्तेष्ट वधूवरांचे डोके एकमेकाला लावतात. त्यास सुलग्न असे म्हणतात. लाजाहोम करण्याची प्रथा नाही. परंतु सप्तपदी करतात.

कुणबी समाजात विधवेला पुनर्विवाह करण्याची अनुमती आहे. तिरोळे कुणबी पोट-जातीत पुनर्विवाहाला परंपरेनुसार अनुमती नाही. पुनर्विवाहास पाट लावणे असे म्हणतात. पाटाचा कार्यक्रम बहुधा कृष्णपक्षात केला जातो. कुणब्यांच्या बहुतांश विवाहपद्धती मराठ्यांप्रमाणेच असतात.

स्त्रीचे पहिले बाळंतपण तिच्या माहेरी होते. सातव्या महिन्यात तिचे आईवडील तिला साडी-चोळी देतात. गरोदर स्त्रीचे डोहाळे पुरविले जातात. कुणबी समाजात प्रथमच गर्भवती झालेल्या स्त्रीचे फार कौतुक केले जाते. तिला कष्टाची कामे करू देत नाहीत. मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवीची व सहाव्या दिवशी सटवीची पूजा करतात. ही पूजा अंधश्रद्धेचा भाग होय. धर्मशास्त्रात या प्रकारांस स्थान नाही. मूल जन्मल्यानंतर घराच्या दरवाजावर टेंभूर्णीच्या झाडाची काठी आडवी ठेवतात. मुलाचे नामकरण बाराव्या दिवशी करतात. तोपर्यंत सुहेर पाळतात. नामकरणविधी सव्वा महिन्यानंतरसुद्धा करतात.

कुणबी समाजात प्रेत जाळणे आणि पुरणे या दोन्ही प्रथा आढळतात. परंतु प्रेताला जाळण्याकडे त्यांचा अधिक कल असतो. प्रेताला गरम पाण्याने आंघोळ घालून नवीन कपडे घालतात व तिरडीवरून स्मशानात नेतात. स्मशानाकडे जात असताना मध्यंतरी तिरडी खाली ठेवून तिरडीच्या चार टोकांवर थोडे थोडे धान्य टाकतात व या ठिकाणी प्रेत वाहून नेणारे लोक खांदा बदलतात. अंतिम संस्कार करताना प्रेताचे डोके दक्षिणेकडे ठेवतात. बहुतेक लोक प्रेत जाळत असले तरी लहान मूल मरण पावल्यास त्याचा देह पुरतात. अस्थींचे

नदीत अथवा तीर्थक्षेत्री विसर्जन केले जाते. लहान मुलांसाठी तीन दिवस तर प्रौढांसाठी १० ते १३ दिवस सुतक पाळतात. दहाव्या दिवशी दसक्रियां किंवा तेराव्या दिवशी तेरवी करतात. त्या दिवशी ज्ञातिबांधवांना भोजन देतात. भाद्रपदातील पितृपक्षात वार्षिक श्राद्ध करण्याची प्रथा आहे.

जिल्ह्यातील कुणबी हनुमान, महादेव, राम, कृष्ण, विठ्ठल, भवानी, मरीआई इत्यादी देवदेवतांची पूजा करतात. मारुतीची पूजा प्रामुख्याने शनिवारी करतात. त्यामुळे शनीची बाधा होत नाही असा समज आहे. अनेक देवदेवतांचे पूजक असले तरी बरेच कुणबी वारकरी पंथीय आहेत.

कुणबी हा जिल्ह्यातील बहुजनसमाज आहे. किंबहुना त्यांच्या संस्कृतीवरूनच तेथील सर्वसाधारण संस्कृतीचे दर्शन घडते. कुणबी आर्थिक परिस्थितीनुरूप गुढीपाडवा, अक्षय तृतीया, आषाढी एकादशी, श्रावण सोमवार, रक्षाबंधन, पोळा, गणेश चतुर्थी, दसरा, दिवाळी, मकर संक्रांत, महाशिवरात्री, होळी, इत्यादी सण साजरे करतात. शुभ मुहूर्तावर त्यांचा विश्वास असल्याकारणाने गुढीपाडवा, अक्षय तृतीया, दसरा व दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी शुभकार्यास प्रारंभ करतात. प्रत्येक सणाचे प्रसंगी मिष्टान्न भोजनाचे पदार्थ ठरलेले असतात. कास्तकरी समाज असल्याने पोळा मोठ्या प्रमाणावर साजरा करतात. तथापि सर्वांत आनंदाचा सण म्हणजे दिवाळी. दिवाळीत धनत्रयोदशी, नरकचतुर्थी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा व भाऊबीज हे स्वतंत्र सण नित्याने करतात. आषाढी व कार्तिकी एकादशी, महाशिवरात्री तसेच श्रावणातील सर्व सोमवारी उपवास करतात.

कुणबी शाकाहारी तसेच मांसाहारी असतात. रोजच्या जेवणात ज्वारीची भाकरी, भाजी, वरण, मिरचीचा ठेचा (चटणी) आणि आंबील असते. कुणबी शेतकरी दिवसातून साधारणतः तीन वेळा जेवण करतो. सकाळी न्याहारी करून शेतावर जातो. दुपारी शेतात जेवण घेतो व रात्री घरी आल्यावर पुन्हा जेवण करतो. तंबाखू खाण्याचे प्रमाण जास्त आढळते.

परंपरेने शेती हा मुख्य व्यवसाय असला तरी या समाजात शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. त्यामुळे सुशिक्षित स्त्री-पुरुष अनेक प्रकारच्या शासकीय व निम-शासकीय नोकऱ्या करीत आहेत. काही कुणबी व्यापारसुद्धा करू लागले आहेत.

जिल्ह्यातील कुणबी मध्यम उंचीचे व मध्यम बांध्याचे आणि गव्हाळ वर्णाचे आहेत. शेतकरी डोक्यावर पागोटे किंवा टोपी, कमरेला धोतर, अंगात सदरा व त्यावर उपरण्या-सारखे एखादे वस्त्र असा पोषाख करतात. म्हातारे टोपी किंवा पागोटे हमखास घालतात. शहरीकरणापासून पाश्चिमात्य पद्धतीचा पोषाख रूढ झाला आहे. जुन्या विचारांच्या वृद्ध कुणबी महिला अंगात चोळी व नऊवारी लुगडे नेसतात. सुस्थितीतील महिला विविध प्रकारचे दागदागिने घालतात.

कुणब्यांमध्ये प्रगतिशील शेतकऱ्यांचा वर्ग वाढत आहे. हुंडाबंदी, प्रौढ विवाह, विधवा-विवाह व स्त्री शिक्षण यासारख्या नवविचारांचा या समाजाने स्वीकार केल्याचे दिसते. सुशिक्षित कुणब्यांचा सामाजिक व राजकीय क्षेत्रांत प्रभाव दिसून येतो.

राठा

मराठ्यांचा प्राचीन उल्लेख इ. स. पूर्व १०० मधील नाणेघाटातील उत्कीर्ण लेखात ाढळतो. महारठी त्रणकयिर असा हा उल्लेख आहे. महारठी त्रणकयिर हा तत्कालीन राठ्यांचा प्रमुख असावा असा अभ्यासकांचा समज आहे. याच परिसरातील बेडसा येथील ण्यात इ. स. पहिल्या शतकातील लेखात एका राणीचा महारठीनी असा उल्लेख आढळतो. शाच प्रकारचे उल्लेख भाजा आणि कार्ले येथील लेखांमध्येसुद्धा आढळतात. परंतु असे मपणे सांगणे कठीण आहे की, महारठी व महारठीनी या संज्ञा महाराष्ट्राचे रहिवाशी या र्थाच्या सूचक आहेत का मराठा या शब्दाचे प्राचीन जातिवाचक स्वरूपाचे कुणा व्यक्तीचे व आहे. यापैकी पहिले अनुमान तर्कसंगत वाटते, कारण इ. स. ४८० च्या **महावंश** या हल ग्रंथात महारठ्ठ देशाचा उल्लेख आढळतो. चिनी प्रवासी युगांग-च्वांग (इ. स. २९–६४५) याने "मो-हो-लो-च" या राज्याचा व तेथील लढाऊ रहिवाशांचा त्याच्या वास वर्णनात उल्लेख केलेला आहे. इ. स. सातव्या शतकाच्या मध्यकालीन विजापूर ल्ह्यातील बदामी जवळील ऐहोळे येथील उत्कीर्ण लेखात रट्ठ आणि चालुक्य साम्राज्यांचा ल्लेख असून चालुक्य नृपती पुलकेशी द्वितीय याने महाराष्ट्राचा त्याच्या ९९,००० ड्यांसहित कसा ताबा मिळविला याचे वर्णन आहे. या सर्व उल्लेखांवरून असे दिसते की, राठा हे नामाभिधान महाराष्ट्र या शब्दापासून निर्माण झाले असावे किंवा मराठे वास्तव्य रीत असलेल्या प्रदेशाला महारठ्ठ अथवा महाराष्ट्र हे नाव पडले असावे. गिरनार येथील स. पू. २४५ चा एक प्रस्तर लेख म्हणतो की, सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसार व वाराकरिता काही बौद्ध भिक्षू राष्ट्रीक, पेतेनिक आणि अपरान्त येथे पाठविले. पेतेनिकची ळख (Identification) गोदावरी तीरावरील आधुनिक पैठणशी झालेली आहे. परान्त म्हणजे उत्तर कोकणचे जुने नाव. राष्ट्रीक हे बहुधा दख्खनच्या पठारावर हणारे रट्ठ असावेत. ज्याप्रमाणे भोज वंशाच्या राजांना कालपरत्वे महाभोज हे नामा-धान प्राप्त झाले त्याप्रमाणे रट्ठ वंशीय हे कालांतराने महारठ्ठ अथवा महाराठ म्हणून ळखले जात असावेत.[५]

इ. स. १०२० च्या आसपास अरब भूगोलतज्ञ अल्बेरुनी नर्मदेच्या दक्षिणेला मऱ्हाट देश प्रांताचा उल्लेख करतो. इ. स. १३४० मध्ये आफ्रिकन प्रवासी इब्न-बतूता लिहितो की, दौलताबाद किंवा देवगिरीचे लोक मराठे असून त्यांचे स्वामी ब्राह्मण आहेत." फेरिश्ता पल्या **गुलशन-इ-इब्राहीमी** नामक ग्रंथात मराठ्यांचा अनेकदा उल्लेख करतो. अलाउद्दिन लजीच्या विजयाबाबत लिहितांना फेरिश्ता म्हराट प्रांतातील मराठ्यांचा उल्लेख करतो. वाजी महाराजांच्या राज्य स्थापनेपासून मराठे विशेष नावारूपाला आले.

मराठे स्वतःला क्षत्रिय समजतात. अस्सल मराठ्यांची विभागणी शहाण्णव कुळी आणि तघरे या प्रवर्गात केली जाते. प्रत्येक कुळ बहिर्विवाह गट असून त्यातील व्यक्तींना आपल्या ळातील व्यक्तीशी विवाह परंपरेने निषिद्ध आहे. परंपरेने सातघरे स्वतःस श्रेष्ठ समजतात णि या भागातील भोसले त्याच गटात समाविष्ट आहेत. भोसल्यांचे विवाह प्रामुख्याने तघऱ्यांच्या गटातच होतात, तथापि शहाण्णव कुळींशी विवाहबद्ध होण्यावर बंदी नाही.

[५] एन्थोवेन, आर. इ., **दि ट्राइब्स ॲण्ड कास्टस ऑफ बॉंबे, खंड ३** (कास्मो पब्लीकेशन, पुनर्मुद्रण १९७५), पृ. ४–५.

परंपरेने शहाण्णव कुळी व सातघरे विधवाविवाह निषिद्ध मानतात. पूर्वी त्यांच्यात 'पडदा' पद्धती रूढ होती. क्षत्रिय असल्याकारणाने विवाहबद्ध झाल्यापासून मराठा पुरुष जानवे घालतो.

शहाण्णव कुळी मराठ्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत :— अहिराव, भालेराव, भिसे, भोइटे, भोसले, दाभाडे, दळवी, ढमढेरे, ढवळे, धुमाळे, गायकवाड, घाटे, साबळे, घोरपडे, गुजर, जगदाळे, जाधव, जगताप, कदम, काळे, खंडागळे, क्षीरसागर, महाडीक, मालुसरे, माने, मोहिते, चव्हाण, मोरे, नलावडे, निंबाळकर, पाटणकर, फाळके, पिंगळे, पिसाळ, रत्नवरे, देशमुख, राऊत, राणे, साळुंके, सावंत, शेलार, शेळके, शिंदे, शिर्के, शितोळे, सुर्वे, थोरात, वाघ, वाळके, यादव, भांडवलकर, खडतकर, जवादे, मिसाळ, हिवाळे, उन्हाळे, निघडे, आंबोरे, रहांदळे, रहागुडे इत्यादी. सांप्रत मराठ्यांत शेकडो आडनावे आढळून येतात. त्यातील पाच किंवा सात कुळांचे गट केलेले आढळतात. अशा कुळांचा पूर्वज एक असावा चालुक्य, यादव, कदंब, शिलाहार, मौर्य, नल, मानव्य, कलचुरी, मल्लसूर, गुर्जर, पल्लव, परमार व शालिवाहन या इतिहासप्रसिद्ध नावांवरूनच चाळके, जाधव, कदम, शेलार, मोरे, नलावडे, माने, कलचुरे (कचरे), मालुसरे, गुजर, पालव, पवार, साळवी इत्यादी नावे रूढ झाली असावीत. मराठा महिला आर्थिक परिस्थितीनुसार सोन्याचे अलंकार वापरण्यावर जास्त भर देतात.

मराठ्यांच्या देवकांमध्ये झाडे, पशू, पक्षी आणि विविध वस्तूंचा समावेश आहे. उदा. आंबा, आपटा, आवळा, बाभूळ, बेहेडा, बेल, बोर, चिंच, जांभूळ, कदंब, कमळ, केवडा, खैर, रुइचे फूल, नागवेल, निरगुडी, पळस, फणस, पिंपळ, साग, ताड, उंबर, वड, घोडा हरिण, कासव, कुत्रा, कोल्हा, म्हैस, शेळी, नाग, राजहंस, मोर, कोया, कुऱ्हाड, मोरपीस, नारळ, पाणकणिस, साळुंखीचा पंख, शमी, शंख, सोने, तांबे, तरवार इत्यादी. विवाहप्रसंगी, नवीन गृहप्रवेश करताना व खळे तयार करताना देवकपूजा केली जाते. मराठ्यांची गोत्रे पुढीलप्रमाणे आहेत :— अगस्ती, अंगिरा, अत्री, कौंडिण्य, वैरुण्य, कौशिक, माल्यवंत, भारद्वाज, गर्ग, गौतम, दालभ्य, वाल्मिकी, जमदग्नी, कपिल, काश्यप, पराशर, शांडिल्य, वासिष्ठ आणि विश्वामित्र. परंतु बऱ्याच व्यक्तींना स्वतःचे गोत्र माहीत नसते.

मराठे लोक मध्यम उंचीचे, सुदृढ बांध्याचे व नाकीडोळी नीटस असतात. काही देखणेही असतात. कुणबी लोकांपेक्षा हे वर्णाने उजळ असतात. परंपरेने पुरुषांच्या डोक्याला पागोटे किंवा पटका, कमरेला धोतर, अंगात बाराबंदी किंवा सदरा व त्यावर उपरणे आणि पायात वहाणा असा त्यांचा पोषाख असे. मराठा महिला अंगात चोळी घालीत, नऊवारी लुगडे नेसत व पडद्यात राहत. पडदा प्रथा आता बंद झालेली आहे. सुशिक्षित मराठा महिला आता आधुनिक वेशभूषासुद्धा करतात. पुरुषदेखील आता धोतर किंवा पँट व शर्ट परिधान करतात.

पहिले बाळंतपण माहेरी करण्याची प्रथा आहे. पूर्वी सूतिकागृहे नसल्यामुळे बाळंतपण घरीच सुईणीच्या मदतीने करीत असत. सुईणींमध्ये न्हावी जातीच्या महिला अधिक कुशल समजल्या जात. सांप्रत काळी सुद्धा खेड्यांमध्ये बाळंतपणे पूर्वीच्याच पद्धतीने होतात.

बाळाची नाळ कापणे, बाळबाळंतीणीस आंघोळ घालणे, शेक देणे ही सर्व कामे सुईण पार पाडते. दहा दिवस सुहेर पाळून रात्रभर दिवा तेवत ठेवतात. शांतिपाठही म्हणतात. प्रसादन विधी म्हणून पाचव्या दिवशी पाचवीची व सहाव्या दिवशी सटवीची पूजा करतात. त्या दिवशी बाळंतीणीच्या खोलीत एक विड्याचे पान व विळा ठेवून फुले, चंदन, धूप इत्यादी उपचारांनी देवीला संतुष्ट करतात. हा अंधश्रद्धेचा भाग असून त्यास शास्त्राधार नाही. अकराव्या दिवशी सर्व घराचे शुद्धिकरण करून बाळंतीणीची खोली सडा-सारवण करून सुहेरमुक्ती होते. बाराव्या दिवशी मुलाचे बारसे अथवा नामकरण करतात. काही लोक सोयीनुसार सव्वा महिन्यानंतरसुद्धा बारसे करतात.

मराठा समाजात सगोत्र विवाह निषिद्ध नाही. परंतु समान देवक असलेल्या कुलांचा विवाहसंबंध घडून येत नाही. मामेबहिणीशी लग्न करता येते. पण आतेबहिणीशी लग्न करीत नाहीत. मृत पत्नीच्या बहिणीशी लग्न करता येते. दोघे भाऊ दोघी बहिणींशी लग्न करू शकतात. हुंडा पद्धती अस्तित्वात होती परंतु आता त्यावर कायद्याने बंदी आल्यामुळे ही प्रथा कमी होत आहे. पूर्वी बालविवाह प्रथा होती परंतु आता त्याला कायद्यानेच बंदी घातलेली आहे. सामान्यतः मुलीच्या वडिलाकडून विवाहाचा प्रस्ताव येतो. लग्नाचा निर्णय झाल्यावर भावी पतिपत्नीची जन्मकुंडली पाहिली जाते. लग्नाचा दिवस ठरविला जातो. सर्वप्रथम साखरपुडा किंवा साखर-साडी नावाच्या कार्यक्रमात वराकडील एखादा वडील माणूस वधूला कुंकू लावून तिला वस्त्रालंकार देतो व तिच्या तोंडात साखर घालतो. जमलेल्या लोकांना पानसुपारी दिली जाते व कार्यक्रम संपतो. अशाच प्रकारचा कार्यक्रम वधूपिता वराकडे जाऊन करतो त्याला शालमुदी असे म्हणतात. पत्रिकापूजन, अक्षत, घाणा, हळदी, रुखवण, देवकप्रतिष्ठा,[६] वीरपूजा,[७] अनुष्ठान,[८] इत्यादी विधी करतात आणि गोंधळ नामक कार्यक्रम करतात. वाग्दान, केळवण, सीमांतपूजन, घटिकास्थापन, गौरीहरपूजन इत्यादी विधी विवाहाच्या मुख्य विधीपूर्वी केले जातात. मुख्य समारंभ वधूगृही उभारलेल्या मंडपात होतो.

प्रथम वधूपिता मुहूर्त-पत्रिकेची पूजा करतो. त्यानंतर वधूवरांना समोरासमोर उभे करून त्यांच्यामध्ये अंतरपाट धरतात. त्यावेळी वधूवरांचे मामा त्यांच्यामागे हातात तरवारी घेऊन वधूवरांच्या मस्तकावरून एकमेकींना भिडवतात. मग मंगलाष्टके म्हणून उपस्थित पाहुणे वधूवरांवर अक्षता टाकतात. अंतरपाट बाजूला सारल्यावर वधूवर आपल्या हातातले तांदूळ, जिरे व साखर यांचे मिश्रण परस्परांच्या डोक्यावर थोडे थोडे पाच वेळा टाकतात. त्यावेळी पुरोहित मंत्र म्हणतो आणि रणशिंग, तुताऱ्या व वाद्यांचा गजर होतो. मालार्पणानंतर मधुपर्क, कन्यादान, विवाहहोम व सप्तपदी करतात. निमंत्रितांना फुले देऊन अत्तर लावतात. यानंतर कंकणबंधन, आंबवण, रुखवत, ध्रुवदर्शन, सुनमूखदर्शन, ऐरणी किंवा झाल, वरात, लक्ष्मीपूजन, तोंड धुणे, रासन्हाणी इत्यादी कार्यक्रम होतात. शेवटी देवकोत्थापन विधी करून लग्न समारंभ संपन्न होतो. लग्नकार्यात भरपूर खर्च करण्याची या समाजाची प्रवृत्ती आहे.

मराठे प्रामुख्याने शिव-पार्वतीचे उपासक असल्यामुळे खंडोबा, भैरव, खळोबा, रोकडोबा व महादेव या स्वरुपांत शंकराची तर अंबा, भवानी, दुर्गा, शितळा, लक्ष्मी, जोगाई व बोलाई

---

[६] हा कार्यक्रम वधू व वर दोहोंकडेही केला जातो.

[७] ज्यांच्या घरातील कुणी व्यक्ती युद्धात मारली जाते तेच लोक हा विधी करतात.

[८] लग्न निर्विघ्नपणे पार पडावे म्हणून गणपती, कुलदैवत, मृत्युंजय आणि वाईट ग्रह यांची शांती ब्राह्मणाद्वारे केली जाते.

स्वरुपांत पार्वतीची पूजा करतात. या व्यतिरिक्त राम, मारुती, विठ्ठल, गणपती व नाग-देवतांचीही उपासना करतात. संक्रांत, होळी, गुढी पाडवा, अक्षय तृतीया, नागपंचमी, गणेश चतुर्थी, दसरा व दिवाळी साजरी करतात. क्षत्रिय मराठे पूर्वी सरदार, जहागीरदार किंवा देशमुख होते. काही मराठ्यांकडे गावची पाटीलकीही असते. बरेच मराठे सधन शेतकरी असल्यामुळेही त्यांना समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले. काही मराठे मालगुजार होते. स्वतंत्र भारतात मालगुजारी हक्क नष्ट केल्यामुळे त्यांची जमीनदारी कमी झाली. तथापि समाजातील त्यांचे वर्चस्व अद्याप टिकून आहे. परंपरेने मराठे मांसाहारी असले तरी आर्थिक परिस्थितीनुसार मांसाहार करतात.

मृतदेह जाळण्याची त्यांच्यात प्रथा आहे. स्नान घालून प्रेत पांढऱ्या कापडात गुंडाळतात व तिरडीवर बांधून मृतदेहास स्मशानात नेतात. प्रेतावर फुले, पाने व गुलाल उधळतात. दहनानंतर प्रेतयात्रेतील व्यक्ती नदीत स्नान करतात किंवा घरी आल्यावर स्नान करतात. दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी रक्षा गोळा करून रक्षा दहनाच्या जागेजवळच पुरतात तर उर्वरित अस्थींचे पवित्र नदीत किंवा तीर्थक्षेत्री विसर्जन करतात. दहाव्या दिवशी पिंडदान करून अकराव्या दिवशी सुतक संपविण्यासाठी पंचगव्य प्राशन करतात. बाराव्या दिवशी पुन्हा पिंडदान करून तेराव्याला श्राद्ध करण्यात येते. चौदाव्या दिवशी पक्वान्नाची मेजवानी देऊन अंत्यसंस्कारांची इतीश्री होते. त्यानंतर दरवर्षी भाद्रपद कृष्ण पक्षात वार्षिक श्राद्ध करण्यात येते.

इ. स. १९०१ च्या जनगणनेनुसार मराठा पुरुषांमधील साक्षरांचे प्रमाण २० टक्के होते. अलीकडील काळात साक्षरांचे प्रमाण पुष्कळ वाढल्याचे या प्रकरणातील सांख्यिकी माहितीवरून दिसून येईल.

ब्राह्मण

महाराष्ट्रात ब्राह्मणांच्या अदमासे तीस शाखा असल्या तरी या जिल्ह्यात देशस्थ ब्राह्मणांची संख्या सर्वाधिक आहे. देशस्थांव्यतिरिक्त स्थानांतर केलेले कोकणस्थ व कऱ्हाडे ब्राह्मणसुद्धा या प्रदेशात स्थायिक झालेले आहेत. सर्वच ब्राह्मण वेदप्रामाण्यवादी आहेत. परंपरेनुसार धर्मशास्त्र आणि ग्रंथांचा अभ्यास करणे प्रत्येक ब्राह्मणास अनिवार्य असते. तथापि वेदाभ्यास किंवा धर्मशास्त्राचा अभ्यास केलेले ब्राह्मण अत्यल्प आहेत. हा उच्चवर्णीय वर्ग असला तरी त्यांच्यात देवकवाद व चेतनवाद यावर श्रद्धा असलेले लोक बरेच आहेत. त्यांच्या सर्व शाखा परंपरेनुसार स्वतंत्र आंतरविवाह गट असून त्यांच्यात मिश्रविवाह अनुज्ञेय नाही. कोकणस्थ ब्राह्मण स्वतःस इतर शाखांपेक्षा श्रेष्ठ समजत असल्यामुळे ते देशस्थांशी विवाह-संबंध करीत नाहीत. तथापि अलीकडील काळात परंपरेची विवाहविषयक बंधने शिथिल झालेली आहेत.

या जिल्ह्यातील देशस्थांत ऋग्वेदी व यजुर्वेदी हे गट आहेत. अथर्ववेदी गटाची कुटुंबे या भागात अत्यल्प आहेत. शिवाय कण्व शाखेचे काही ब्राह्मण या भागात आढळतात. ऋग्वेदी स्मार्त (शिवभक्त) किंवा वैष्णव असतात. ऋग्वेदींना आश्वलायन असेही दुसरे नाव आहे. यजुर्वेदींमध्ये शुक्ल यजुर्वेदी व कृष्ण यजुर्वेदी या पोटशाखा आहेत. शुक्ल यजुर्वेदी शाखेचे लोक स्वतःस श्रेष्ठ समजतात. शुक्ल यजुर्वेदी व इतर ब्राह्मण शाखांमधील व्यक्ती यांच्या-पासून झालेल्या औरस संततीस कृष्ण यजुर्वेदी असे संबोधिले जाते. पूर्वी शुक्ल यजुर्वेदी

कृष्ण यजुर्वेदी यांच्यात मिश्रविवाह होत नसत. तथापि अलीकडील काळात परंपरेची धने शिथिल झालेली आहेत. याशिवाय या जिल्ह्यात काही तेलंगी ब्राह्मण असल्याचेही ांगण्यात आले.

इ. स. १९०१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात अदमासे दहा हजार ब्राह्मण असून ते एकूण ोकसंख्येच्या केवळ तीन प्रतिशत होते. स्वातंत्र्योत्तर काळात जातीनिहाय जनगणना होत सल्याकारणाने त्यांची सध्याची लोकसंख्या उपलब्ध नाही. इतके मात्र खरे की, मागील व्वद वर्षांमध्ये लोकसंख्येच्या नैसर्गिक वाढीनुसार तसेच इतर प्रदेशातून स्थलांतर केल्यामुळे ाह्मणांची संख्या काही प्रमाणात वाढली असावी. वस्तुतः या परिसरातील देशस्थ काही तकांपूर्वी पुणे-सातारा-बेळगाव परिसरातून स्थलांतर करून आले. तथापि असे लक्षात येते ी, स्थानिक देशस्थ पुणे-सातारा-जळगाव या प्रदेशातील बांधवांपेक्षा अधिक कर्मठ आहेत. ांच्यातील कर्मठपणा अलीकडे शिथिल होऊन बरीच सुधारणा झालेली दिसते.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांत अगस्त्य, अंगिरस, अत्री, कपी, भृगु, काश्यप, वासिष्ठ, विश्वा- मित्र, कौशिक, गौतम, जामदग्न्य, भारद्वाज, शांडिल्य इत्यादी ५२ गोत्रे आढळतात. शुक्ल जुर्वेदी माध्यंदिन शाखेची १३० गोत्रे आहेत. सर्वसाधारणपणे गोत्र म्हणजे वंशप्रमुखाचे ाव आणि प्रवर म्हणजे गोत्रांचे पूर्वज असे म्हटले जाते. हे दोन्ही रक्तसंबंध दर्शवितात. ामुळे सगोत्र, सप्रवर व सपिंड विवाह निषिद्ध मानले जातात.

देशस्थ ऋग्वेदी शाकल शाखेचे असून त्यांचे कर्मकांड आश्वलायन गृह्यसूत्राप्रमाणे ातात. त्यांचे उपाध्याय स्वजातीय असतात. स्मार्त लोक शंकराचार्यांचे अनुयायी आहेत. ुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण शृंगेरी पीठाचे अनुयायी आहेत. या व्यतिरिक्त रामदासी, त्त, गाणपत्य व भागवत संप्रदायांचे लोकही यांच्यात पुष्कळ आहेत.

देशस्थ ऋग्वेदींमध्ये मामेबहिणीशी अथवा आतेबहिणीशी विवाह करण्यास अनुज्ञा आहे. ुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण विवाहासाठी मातूलगोत्र वर्ज्य मानत असल्यामुळे त्यांच्यात ातूल कन्यापरिणय (मामाच्या मुलीशी लग्न करणे) रूढ नाही. लग्न निश्चित झाल्यावर ीमांतपूजन हा पहिला कार्यक्रम असतो. त्यात वधूगृही आगमन झाल्यावर वराचा सत्कार रतात. त्यानंतर विवाहाचा संकल्प करून गणपतिपूजन, कुलदेवतापूजन, मातृकापूजन, ेहमख, पुण्याहवाचन, वाङनिश्चय, मधुपर्क वगैरे विधी करतात. कन्यादान, लाजा होम, प्तपदी हे प्रमुख विधी झाल्यावर ऐरणीदान, वरात, लक्ष्मीपूजन वगैरे उपचार होतात व ववाह समारंभ संपतो.

पौरोहित्य व भिक्षुकी हे यांचे मूळचे मुख्य व्यवसाय होते. तथापि अनेक देशस्थ शेती व ावकारी करतात. त्यांची आडनावे व्यवसायावरून किंवा मूळ गावावरून पडलेली आहेत. दाहरणार्थ, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, जोशी, उंबरकर, भागवत, असेरकर, पाचखेडे, ाकडे, हातेकर, मुजुमदार, उदास, पुरेकर व कांबळी. पांडे आणि देशपांडे हे मराठा शासनातील जमीन महसुलाचा हिशेब ठेवणारे अधिकारी असत. कमाविसदार किंवा रगण्याचा प्रमुख अधिकारी हा साधारणतः ब्राह्मण असे. सध्या शासकीय सेवा, खाजगी त्र व शिक्षण क्षेत्रात त्यांचे प्रमाण बरेच असून शहरी भागात ते जास्त प्रमाणात आढळतात. रेच लोक वकिली व वैद्यकीय व्यवसाय करतात. या जिल्ह्यात स्वातंत्र्य लढ्यात सहभागी ालेली ब्राह्मण कुटुंबेही बरीच आहेत. उदाहरणार्थ, यज्ञेश्वरशास्त्री भागवत, गंगाधरराव ोडगे, बापुराव तांबेकर, देशमुख इत्यादी.

भोयर

भोयर, भोयेर, भोयिर, भोयार, भोइर, भुयर इत्यादी नावांनी ही जात ओळखली जाते. परंतु "भोयर" हेच नाव प्रचलित आहे. हे लोक जिल्ह्यातील कारंजा भागात जास्त असल्यामुळे त्या भागाला भोयर पट्टी म्हणतात. ते मध्य भारतातील भोपावर एजंसी (धार, मथवाड अलिराजपूर, बारवानी व झाबुआ) व रेवाखंड एजंसी (छोटा उदेपूर, पावागड, पाली, पावालगड) येथून बेतूलमार्गे वर्धा जिल्ह्यात स्थलांतर करून इकडे स्थायिक झाले असावेत.

भोयर लोकांची आडनावे खालीलप्रमाणे आढळतात :—बारंगे, वाघमारे, हरने, बन्नगरे, लोखंडे, भोंगाडे, ढोले, कडवे, पवार, भोयर, सोनवणे, हिंगवे, ठाकरे, चौव्हान, राऊत, चौधरी, ठवरे, चोपडे, गाडगे, मानमोडे, देशमुख, पठारे, घागरे, गारपरे, डोंगरे, कसारे, हजारे, राठोड, पिंजारे, कोरडे, कोडले इत्यादी. भोयर जातीच्या पवार, पावरा या शाखा आहेत. तथापि या शाखा राजस्थानातील राजपूत पवार यांच्या तत्सम शाखा नाहीत. भोयर लोकांतील पवार स्वतःस वीर जगदेव पवार याचे वंशज समजतात. तथापि हा दावा निराधार वाटतो. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या निष्कर्षानुसार भोयरांची पवार शाखा ही पवरा, पावरा व पवार या भिल्ल शाखांची तत्सम असावी. सध्या भोयर व पवार या दोन शाखा उरलेल्या आहेत.

भोयरांच्या विवाहपद्धतीनुसार वधूवरांचे मामकूळ समान असता कामा नये. समान कुळांत विवाह निषिद्ध मानतात. तसेच समरक्त समुहात विवाह निषिद्ध मानतात—जसे की, मामेबहीण, मावसबहीण, आतेबहीण यांच्याशी लग्न करीत नाहीत. पूर्वी बालविवाहाची प्रथा होती. गर्भवतीच्या पोटाला कुंकू लावून वाङ्‌निश्चय करीत. घरजावयाची पद्धत परंपरेने रूढ होती. आता नष्ट होत आहे. वडील भावाच्या विधवेशी लग्न करणे मंजूर होते. बहुपत्नीविवाह पूर्वी संमत होता. आता कायद्याची बंधने असल्यामुळे ही प्रथा नष्ट होत आहे. भोयर पौरोहित्यासाठी ब्राह्मणांना न बोलविता त्यांच्यातीलच जाणकार व्यक्ती पौरोहित्य करते. वरपक्षाकडून वधूपित्यास देज देण्याची प्रथा आहे.

मातृसत्ताक पद्धतीच्या संस्कृतीचे अवशेष त्यांच्यात आढळतात. पूर्वीच्या काळी भोयर महिला मुलींची लग्ने जमवीत. त्यास पुरुष मान्यता देत. लग्न संबंध जमविताना जातीचे स्थानिक प्रमुख व वयोवृद्धांची संमती आवश्यक मानत असत. पूर्वी बहुतांश विवाह विधी अक्षय तृतीयेला एकाच दिवसात करीत असत. त्यामुळे विवाहसोहळ्यांना सामूहिक स्वरूप येत असे. जातिबाह्य विवाहास मनाई होती.

भोयरांमध्ये गोत्रे नाहीत. परंतु एकाच रक्तसंबंधाने एकत्र आलेले व ज्यांचा पूर्वज एकच आहे असे कुटुंब म्हणजे कुळ असते. तथापि कुळ प्रतिकांबाबत माहिती उपलब्ध नाही.

भोयरांमध्ये गुडभात्या, काजपूजा, मंढा भोजन व दुल्हासार नामक विधी प्रत्यक्ष विवाहसोहळ्यापूर्वी करण्याची प्रथा आहे. वर विवाहासाठी वधूगृही प्रयाण करतो, त्यास दुल्हासार म्हणतात. तत्पूर्वी नवरदेवाला आंघोळ घालतात. वस्त्राभूषणांनी सजवितात. त्याच्या डोक्याला सेहरा मौडी म्हणजे बाशिंग बांधतात. नवरदेवास गूळ व खोबरे देतात. तो इष्टदेवतांना नमस्कार करून लग्नासाठी प्रस्थान ठेवतो. नवरदेव वधूच्या गावच्या सीमेवर आल्यावर वधूपक्ष वऱ्हाडाचे स्वागत करतो. तेथे मेलीजोली नावाचा कार्यक्रम होतो. यास आनंदभेट म्हणता येईल. त्यानंतर काही विधी आटोपल्यावर वरपक्ष वधूगृही जातो. अंतरपाट

धरण्याची प्रथा आहे. मंगलाष्टके झाल्यावर वधू प्रथम वराच्या गळ्यात माळा घालते व त्याच्या पाया पडते. नंतर वर वधूच्या गळ्यात माळा घालतो. विदर्भात सर्वसाधारणपणे प्रचलित असलेला सुलग्न नावाचा उपचार करतात. यात आप्तेष्ट वधूवरांचे अभिनंदन करून त्यांना भेटवस्तू देतात. लग्न विधी आटोपल्यावर भोजन समारंभ होतो. वरात काढण्याची प्रथा आहे.

विधवेला विवाह करण्याची अनुमती असली तरी अविवाहित तरुणाशी किंवा पतीच्या धाकट्या भावाशी लग्न करणे उचित समजले जात नाही. तसेच विधुरास एखाद्या कुमारिकेशी किंवा विधवा वहिनीशी विवाह करणे शिष्टसंमत नाही. घटस्फोट घेण्याची महिला किंवा पुरुषाला परवानगी आहे. अलीकडे घटस्फोटांचे प्रमाण कमी होत आहे. सबळ कारणाशिवाय केलेला घटस्फोट उचित मानला जात नाही.

वर्धा जिल्ह्यातील भोयर सुस्थितीतील समाज आहे. त्यामुळे गरोदर स्त्रीचे डोहाळे पूर्ण करण्यात येतात. बाळंतपणानंतर पाचवी करण्याची प्रथा आहे. सटवीची पूजा करतात. बहुधा बाराव्या दिवशी नामकरण करतात. मृतदेहाचे दहन करतात.

या जातीची गृहदेवता सेंदरेदेव तर ग्रामदेवता डोंगरदेव व भवरदेव आहे. मृतांना पितरदेवता मानतात व त्यांना "मानिनि" म्हणतात. देवदेवतांमध्ये कालीदेवीस चंडी, धरती मातेस मांजी देवी मानतात. तसेच महादेवाची पूजा करतात. जातीचे वैशिष्टय म्हणजे बाघदेव आणि इंद्रदेवाची पूजा करतात.

अक्षय तृतीया हा या जातीचा मुख्य सण होय. त्या प्रसंगी गोडधोड जेवण करतात. पूर्वजांच्या नावाने पूजा करतात. आषाढी एकादशीला कुलदेवताची पूजा करतात. दिवाळी थाटाने साजरी करतात. त्याचप्रमाणे महाशिवरात्री, होळी, नागपंचमी व रक्षाबंधन परंपरेप्रमाणे साजरे करतात.

भोयरांची बोलीभाषा वऱ्हाडी बोलीपेक्षा भिन्न आहे. तिच्यावर राजस्थानी, गुजराथी निमाडी, मालवी, भिल्ली, हिंदी व मराठीचा प्रभाव पडलेला दिसतो. विविध कालखंडांत त्यांनी केलेल्या स्थानांतरणामुळे तेथील स्थानिक भाषांचा प्रभाव बोलीभाषेवर पडणे स्वाभाविक वाटते.

तेली

तैलिक किंवा तैल या संस्कृत शब्दांवरून तेली हे नाव पडले आहे. तेल गाळणे हा त्यांचा परंपरागत मुख्य व्यवसाय होय. तेल्यांच्या एकूण साडेबारा पोटजाती असल्याचे जिल्ह्यातील लोक सांगतात. परंतु सर्वेक्षणप्रसंगी (१९८७–१९८८) साडेबारा पोटजाती आढळल्या नाहीत. सर्वेक्षणप्रसंगी साव, एरंडे, घाण आणि गुल्हाणे या पोटजाती आढळल्या. जिल्ह्यातील साव तेली सर्व पोटजातींमध्ये प्रतिष्ठित गणले जातात. ते सावकारीचा व्यवसाय करीत. त्यावरूनच त्यांना साव नाव पडले असावे. घाणतेल्यांकडे तेलाच्या घाण्या असत त्यावरून घाणतेली नाव पडले. घाणतेल्यांचे एक बैले व दोन बैले असे पोटभेद आहेत. दोन बैले घाण तेल्यांना तराणे असेही म्हणतात. घाणतेल्यांमधील दोन्ही पोटभेदात रोटीव्यवहार चालतो. परंतु बेटीव्यवहार चालत नाही. एरंडीचे तेल काढण्याचा व्यवसाय करणारे एरंडेतेली झाले. पूर्वी पोटजातींमध्ये बेटीव्यवहार होत नसत, परंतु आता हे सामाजिक बंधन पाळले

त नाही. तेली लोकांची आडनावे पुढीलप्रमाणे आढळतात :– महाजन, पिसे, वंजारे, पसे, बांगडे, पाटील, सातपूते, झोरे, देवतारे, तराळे, शेंडे, पिंपळे, बावणे, साहू, ल्हाणे, वाघमारे, देशमुख, चौधरी, वैद्य, बकाणे, झाडे, आकरे, डोळस, भोळे, अवचट, नमोडे, सहारे, खंडाईत, तेलरांधे, गोमासे, बुटले, कवळेकर, देवतळे, वंजारी इत्यादी.

समान कुळात विवाह निषिद्ध मानले जातात. मामेबहीण किंवा आतेबहिणीशी लग्न रता येते. मुलगी पसंत असल्यास तिला साखरेची पुडी दिली जाते. यानंतर वराकडे ालमूदी नामक विधी होतो. यात वधूचा पिता आर्थिक परिस्थितीनुसार मुलाला पडे व अंगठी भेट देतो. त्यानंतर वधूकडे साक्षगंध होऊन वाङ्‌निश्चयाची परिपूर्ती होते. वाहाची तिथी ठरवून त्या दिवशी विवाह संपन्न होतो. विवाहविधी हिंदू पद्धतीप्रमाणेच सतो. यात न्हानोरा, देवादेवी, डेळमाथन, उरभेट, भातक, सगूण-घागर, उसंगी, हाराडेरा त्यादी विधी पार पाडतात. विधवाविवाहाला मान्यता आहे. विधवेचा पुनर्विवाह करण्या- र्वी तिच्या पहिल्या पतीच्या मृतात्म्याला शांत करण्याची प्रथा आहे. यासाठी नवऱ्या ुलाच्या घरी बकऱ्याच्या रक्तात विधवेच्या पायाचा अंगठा भिजविला जातो. त्यामुळे तात्म्याला शांती मिळते असा समज आहे. कुमारिकेचे लग्न विधुराशी करावयाचे झाल्यास थम कृष्णाशी तिचे लग्न लावले जाते.

प्रथम बाळंतपण सामान्यतः माहेरी करण्याची प्रथा प्रचलित आहे. सातव्या किंवा नवव्या हिन्यात पाळणा नावाचा कार्यक्रम होतो. हा कार्यक्रम गर्भवतीच्या माहेरी आणि सासरी- ुद्धा केला जातो. या कार्यक्रमांतर्गत सुवासिनीकडून गर्भवतीची ओटी भरून साडी-चोळी दली जाते. गर्भवतीचे कौतुक केले जाते. आवश्यकता असेल तरच बाळंतपण प्रसूतिगृहात रतात. अन्यथा फार थोडे सुशिक्षित वगळता बाळंतपण घरीच करतात. खेड्यातील महिला गदी बाळंतपणापर्यंत घरगुती व शेतीची कामे करतात. बाळंतपण गावातील सुईण करते. ूल जन्मल्यावर पाचव्या दिवशी पाचवीपूजन करतात. त्या दिवशी बाळंतीणीच्या खोलीत ात्रभर दिवा तेवत ठेवतात. सहाव्या दिवशी सटवीची पूजा करतात. मूल जन्मल्यानंतर राच्या प्रवेशद्वारावर टेंभूर्णीच्या झाडाची एक काठी आडवी ठेवतात. भूतबाधा टाळण्यास्तव ी कृती करतात. बाराव्या दिवशी किंवा सव्वा महिन्यानंतर नामकरण करतात. बारा दिवसपर्यंत सुहेर पाळतात.

तेली समाजात अग्निसंस्कार तसेच मृतदेह पुरण्याचीही प्रथा आढळते. अग्निसंस्कार र्चाचा असल्याकारणाने पुरण्याची अनुज्ञा आहे. तथापि अग्निसंस्कारास पसंती असते. ल्पवयीन व्यक्ती मरण पावल्यास प्रेत पुरतात. बाळंतीण किंवा गरोदर महिला मृत्यू ावल्यास प्रेत जाळतात. आध्यात्मिक जीवन जगणाऱ्याचे प्रेत मात्र पुरतात. याचे कारण र्वेक्षणप्रसंगी कळू शकले नाही. मरणासन्न व्यक्तीला जमिनीवर कपडा अंथरून त्यावर वतात. त्याचा मुलगा किंवा कुणी जवळचा नातेवाईक मृत्युशय्येवर पडलेल्या माणसाचे ोके आपल्या मांडीवर ठेवतो. त्याच्या तोंडात गंगाजल किंवा साखरेचे पाणी टाकतात. ाणोत्क्रमण झाल्यावर देहास आंघोळ व नवीन कपडे घालून स्मशानात नेतात. अंतिम ंस्कार करताना प्रेताचे डोके उत्तरेकडे ठेवतात. तिसऱ्या दिवशी अस्थी गोळा करून वळच्या नदीत किंवा पवित्र तीर्थक्षेत्री विसर्जित करतात. दहाव्या दिवशी दसक्रिया ाणि तेराव्या दिवशी तेरवी करतात. दहा दिवस सुतक पाळतात. तेरवीनिमित्ताने ातिभोजन घालतात.

तेली लोक प्रामुख्याने महादेव, गणेश, भवानी, हनुमान व राम या देवतांची पूजा करतात. याच जातीमध्ये संताजी नामक संतपुरुष होऊन गेला. त्याच्याबद्दल नितांत भक्तिभाव दिसून येतो. हिंदूंचे सर्व सण व उत्सव तेली साजरे करतात.

तेल गाळणे हा परंपरागत व्यवसाय असला तरी वर्धा जिल्ह्यातील बऱ्याच तेल्यांनी शेती यवसाय पत्करला आहे. आष्टीच्या देशमुख घराण्यातील तेली प्रामुख्याने शेतकरीच आहेत. यांच्याकडे मुघल काळापासून देशमुख वतन चालत आलेले आहे. या समाजात शिक्षणाचा सार बऱ्यापैकी झालेला आढळून येतो. परिणामतः बरेच जण शासकीय व निमशासकीय ोकऱ्या करतात.

तेली प्रामुख्याने शाकाहारी असले तरी मांसाहार निषिद्ध मानत नाहीत. ज्वारीची ाकरी, भाजी, वरण, आंबील हा त्यांचा रोजचा आहार होय. तेली शरीरयष्टीने मध्यम ंचीचे व मध्यम बांध्याचे असून त्यांचे राहणीमान व वेशभूषा कुणब्यांसारखीच दिसून येते. हुतांश तेली गव्हाळ वर्णाचे असतात.

ोष्टी

ही विणकर व्यावसायिकांची जात असून त्यांना मराठीत कोष्टी व तेलुगुमध्ये सालेवार हणतात. कोष्टी स्वतःला मार्कंडेय ऋषीचे वंशज समजतात. कमळाच्या फुलापासून काढ-ल्या धाग्याचे कापड देवांकरिता मार्कंडेयाने बनविल्याची आख्यायिका आहे. या कृत्याने व प्रसन्न होऊन सूर्य कन्येशी त्याचा विवाह करण्यात आला. विवाहाप्रीत्यर्थ भवानी नावाचा ाक्षस व एक वाघ त्याला आंदण म्हणून मिळाले. परंतु राक्षस आज्ञा भंग करू लागल्यामुळे ार्कंडेयाने त्याला ठार केले व त्याच्या हाडांपासून पहिला हातमाग तयार केला. वाघ मात्र ाज्ञाधारक राहिला. वाघ त्यांना त्रास देत नाही असा समज आहे. कदाचित याच ारणास्तव कोष्टी वाघाला ठार करीत नाहीत. विवाहप्रसंगी भाट आपल्या पोथीसोबत ाघाचे एक चित्र घेऊन येतो (त्याला पाडग्या असे म्हणतात). कोष्टी त्या चित्राची जा करतात. कोष्टी सिंहवाहिनी देवीची सुद्धा पूजा करतात.

हलबा, लाड, गधेवाल, देशकर, देवांग आणि पटवी या कोष्टयांच्या पोटजातींपैकी वर्धा जल्ह्यात हलबा, लाड आणि गढेवाल या पोटजाती आढळतात. त्याचप्रमाणे काही जैन ोष्टी असून ते जैन धर्माचरण करतात. सालेवारांचे सुतसाले, पद्मसाले व सगुनसाले असे ीन प्रकार आढळतात.

वरगृही विवाह होतो. विवाहप्रसंगी वधूवर आपल्या आईवडिलांसोबत गोलाकार बसतात. यांच्याभोवती तागाच्या दोराचे सात फेरे घातले जातात. नंतर वधूची आई हातात दिवा रते व वराची आई एका भांड्यातून जमिनीवर पाणी ओतते. सालेवार विवाह समारंभ धूचे घरी साजरा करतात. थून किंवा हातमागाच्या लाकडाचा एक ठोकळा वधू व वराच्या रम्यान जमिनीवर ठेवलेला असतो. वर पूर्वेकडे तोंड करून उजवा पाय त्या ठोकळ्यावर वतो, आणि वधू त्याच्या विरुद्ध दिशेला उभी राहून आपला डावा पाय ठोकळ्यावर ठेवते. ाह्मण मध्ये अंतरपाट धरतो व वधूवर पाच वेळा एकमेकांच्या डोक्यावर अक्षता टाकतात. हूर्त समयी वधू व वर माल्यार्पण करून विवाहबद्ध होतात आणि लाकडी ठोकळ्यावर सतात. वधूचा पिता वराचे पाय धुऊन कपडे भेट करून त्याला नमस्कार करतो. नंतर ाजतगाजत वरात काढतात. ती परत आल्यावर वरगृही मेजवानी दिली जाते.

विधवेला पुनर्विवाह करण्याची अनुमती आहे. विधवा माहेरी राहत असल्यास तिच्या मातापित्यास नवरदेवाकडून काही रक्कम दिली जाते. परंतु ती सासऱ्याकडे असल्यास अशी रक्कम दिली जात नाही. पुनर्विवाह प्रसंगी ओटी भरण्याची प्रथा आहे. दुसऱ्या दिवशी ज्ञातिबांधवांना मेजवानी दिल्यावर पुनर्विवाह संपन्न होतो. परंपरेने घटस्फोट घेण्यास परवानगी असली तरी तसे प्रसंग फारच कमी उद्‌भवतात, कारण विणकर व्यवसायात महिलांचा कामाकरिता उपयोग खूप होतो.

गणपती हे कोष्टयांचे मुख्य दैवत होय. गणेशचतुर्थीचा सण ते मोठया उत्साहाने साजरा करतात. त्या दिवशी विणकामाचे सर्व साहित्य धुऊन त्याची पूजा करतात. गणपतीची प्रतिष्ठापना करून मूर्तीला फुले व हळद-कुंकू वाहतात. गणेशचतुर्थीला उपवास करतात. काही कोष्टी लिंगायत, कबीरपंथी तर काही कोष्टी गुरुमुखी पंथाचे आहेत. कळमेश्वर-जवळील धापेवाडयाच्या कोळीबाबाचे (कोलबास्वामी) ते शिष्य असून गुरूच्या नावाने घरी नारळाची पूजा करतात. मतवाळे नावाचा आणखी एक पंथ त्यांच्यात आहे. या पंथाचे लोक विष्णूची नारायण देव म्हणून पूजा करतात. परंपरेने धार्मिक उत्सवाचे वेळी हे लोक मद्यसेवन करीत असल्यामुळे त्यांना मतवाळे असे म्हणतात. विणकामाच्या उपकरणांना ते पवित्र मानतात. ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतो. कोष्टी मांस सेवन करतात. लाड, जैन आणि हातघर कोष्टी मात्र शुद्ध शाकाहारी आहेत.

लिंगायत व कबीर पंथी लोक प्रेत पुरतात. तथापि इतर जाळतात. विवाहित व्यक्ती मरण पावल्यास पाच दिवस व अविवाहिताचा मृत्यू झाल्यास तीन दिवस दुखवटा पाळतात. मृत व्यक्तीच्या पत्नीला पाचव्या दिवशी नदीवर किंवा तळयावर नेऊन तिच्या बांगडया फोडतात, मंगळसूत्र तोडतात व कपाळावरील कुंकू पुसून तिच्या पायातील जोडवे सुद्धा काढून टाकतात. चौथ्या दिवशी पंच किंवा जातीतील काही प्रतिष्ठित व्यक्ती मृत व्यक्तीच्या घरातील प्रमुखास फेटा बांधून बाजारात घेऊन जातात. त्यानंतर त्याचेकडून थोडे विणकाम करवून घेऊन आपल्याबरोबर जेवण घ्यायला लावतात. या समारंभानंतर दुखवटयाचा काळ संपून नित्याचे व्यवहार सुरू होतात. श्राद्ध करण्याची प्रथा नाही. परंतु अक्षय तृतीयेच्या दिवशी मृत व्यक्तीच्या नावे गोड जेवण देतात.

गोवारी

वर्धा जिल्ह्यात गोवारींची लोकसंख्या १८९१ मध्ये १०,३९७ (२.५ टक्के), १९११ मध्ये १५,८२३ (३ टक्के) व १९२१ मध्ये १६,४१८ (४ टक्के) होती. जिल्ह्यातील बहुसंख्य कुटुंबे १५०–२०० वर्षांपूर्वी भंडारा व बालाघाट जिल्ह्यांतून स्थलांतरित झाली असावीत.

गोवारी जातीत सेंदरे, नेवारे, चौधरी, भोकरे, सहारे, राऊत, कोहळे, आंबडारे, वाघाडे, सोनवाने, गजबे, वगारे, चामलाटे, भास्करे, बोरजवाडे, मोकाशी, आत्राम, मसराम, कुसराम, पदिले, बोटरे, येसनसुरे, नागोसे, काळसर्पे, मोगरे इत्यादी कुळे आहेत. काही कुळांत दोन पोटभेद आहेत. उदा. राऊत दोबोकडे, राऊत मुंगभाते, तीतीर सहारे, चंडी सहारे, ढोर वाघाडे, काशी वाघाडे, पोहनपाट नेवारे, वाकी नेवारे, चोर कोहळे इत्यादी. पूर्वी काही कुळे बहिर्विवाह गट होते.

पूर्वी बहुपतित्वाची पद्धत या समाजात रूढ असावी असे म्हणतात. परंपरेनुसार एकाच कुळात लग्न करीत नाही. तसेच मुलीचे व मुलाचे मामेकुळ एकच असेल तर विवाह निषिद्ध मानतात. मावसभाऊ व मावसबहिणींचे एकमेकाशी लग्न करीत नाही. या प्रथेला दूध पारखणे किंवा दूध पाळणे असे म्हणतात.

गर्भवती महिलेस सात महिने झाल्यानंतर शुक्ल पक्षात तिला माहेरी नेऊन हिरवा चुडा व साडीचोळी देऊन सासरी पाठवितात. बाळंतपण घरीच केले जाते. बाळंतपणासाठी सुईणीची मदत घेण्यात येते. लहान बाळाला पाचवी होईपर्यंत दूध न पाजता गुळाचे पाणी पाजतात. पाचव्या दिवशी वडा व पुरीचे जेवण देऊन व आप्तेष्टांना बोलवून पाचवी करतात. नामकरण विधी बाराव्या दिवशी करतात. त्याप्रसंगी जातप्रमुखातर्फे गुळाचे पाणी उपस्थित मंडळीला प्यायला देऊन रामराम हा शब्द उच्चारतात. सर्वांना गूळखोबऱ्याचा प्रसाद देऊन कुंकवाचा टिळा लावतात. तुळशी वृंदावनात काही द्रावण टाकतात. या क्रियेला पोस्ता म्हणतात. हा सुहेरानंतर करावयाचा शुद्धीकरण विधी होय.

वर उल्लेखिल्याप्रमाणे मामेकुळात विवाह करीत नाहीत. बरेच आईवडील मुलाची सोयरिक लहानपणीच करतात. लग्नात मुलाकडून साडेबारा रुपये देज व थोडे धान्य घेण्याची पद्धत आहे. विवाहपूर्वदिनी देवादेवी (देवकारण) नामक विधी करून देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी बकरे, कोंबडे अथवा डुकरे बळी देऊन त्यांचे रक्त शिंपडतात व मांस शिजवून समाजातील लोकांना जेवण देतात. नंतर गोंधळ घातला जातो. देवादेवीच्या रात्री भोई लोक डहाका वाजवितात. त्या प्रसंगी घरातील पूर्वजांच्या स्तुतीपर तालबद्ध गाणी म्हणतात. तसेच त्या वर्षात त्या कुटुंबातील निधन झालेल्यांच्या नावाने पान उजवतात. चांदी किंवा पितळाचे पान सोनाराकडून तयार करून विधिवत देव्हाऱ्यावर ठेवतात. कुळातील लोकांना कंकण बांधण्याची पद्धत आहे. देवादेवी झाल्यावर जवळची मंडळी एकत्र जमून कवळी खातात.

विवाहप्रसंगी नवरा मुलास हळद लावून त्याला पाच जोडप्यांसमवेत आंघोळ घालून नान्होरा नामक सोहळा करण्यात येतो. मग तो वधूच्या गावी जातो. ग्रामदेवतांची यथोचित पूजा करतात. दुसऱ्या दिवशी गोरज मुहूर्तावर लग्न लावतात. विवाहप्रसंगी अंतरपाट, अक्षता इत्यादी बाबी असतातच. जातप्रमुख मंगलाष्टके म्हणतात. मंगलाष्टके संपल्यावर नवरी व नवरदेव एकमेकांवर अक्षता घालतात. तदनंतर मालार्पण करून नवरा मुलगा वधूच्या गळचात काळी पोत घालतो. हे सौभाग्यलेणे होय. वराकडून वधूच्या आजीस वरघडी देतात. आर्थिक स्थितीनुसार दागिने घालतात, त्यात पाटल्या व गळचातील सरीचा समावेश असतो. पूर्वी लग्न पाचसहा दिवस चालत असे. हल्ली दोन-तीन दिवसांत आटोपते घेतात. शहरी भागातील लोक एका दिवसात लग्न आटोपतात. आंदण व अहेर देण्याची प्रथा आहे. त्यानंतर गुलाल उधळण्याचा म्हणजे ढेंढा लावण्याचा कार्यक्रम होतो. नवीन लाल साडीवर ढेंढा लावतात. त्यावेळी नवरदेव वधूला कडेवर उचलून घेतो. इतरही पाच जोडपी त्यात सहभागी होतात. वधूवर एकमेकांवर गुलाल उधळतात. त्यानंतर त्यांना मंडपात आंघोळ घालतात. नवरदेव नवरीला ओल्या कपडचानिशी उचलून देव्हाऱ्याजवळ नेऊन देवाला नमस्कार करतो. अल्पावधीत वधूपक्षातील मंडळी तिची बोळवण करण्यास सिद्ध होतात. वडिलधारी मंडळी वधूवरास आशीर्वाद देतात. निरोपप्रसंगी म्हणावयाची लोकगीते म्हणतात. वधूची आई तिला दूधभात खाऊ घालते व विडा देऊन नवरदेवासोबत जाण्यासाठी

अनुमती देते. वरात निघते. वऱ्हाड वरपक्षाच्या घरी आल्यावर काही पारंपरिक विधी पार पाडण्यात येतात. आधीच प्रज्वलित केलेला दिवा अखंड तेवत ठेवतात. दिव्यास सर्व अभ्यागत व वधूवर नमस्कार करतात. नाचगाणी व मनोरंजनाचे कार्यक्रम रीतीप्रमाणे करण्यात येतात. स्वगृही आल्याबरोबर वराची आई मंडपाबाहेर वधूवरांचे पाय धुऊन त्यांना ओवाळते. भाताचे गोळे दोन्ही बाजूला फेकतात. देव्हाऱ्याजवळ जाऊन नवरानवरी आपल्या पूर्वजांची पूजा करतात. वरमाता मुलाचे लग्न लावण्यासाठी जात नाही. त्या दिवशी ती उपवास करून वरवधू घरी आल्यानंतर सुनेचे मुख पाहिल्यावर उपवास सोडते.

नवरदेव पिठाच्या हरणाची धनुष्यबाणाने शिकार करतो. काही ठिकाणी नवरदेव घरापासून बाण मारीत तलाव किंवा नदीपर्यंत जातो. बाण जेथे पडेल तेथे नवरी अक्षता टाकून नमस्कार करते. त्यानंतर वधूवरांना पुन्हा आंघोळ घालतात. गोतआंबील खाण्याचा कार्यक्रम झाल्यावर मंडप समाप्ती करतात. मांसाहारी जेवण देण्याची प्रथा आहे. विवाहविधी संपन्न झाल्यावर वधू माहेरी जाते व पुढील महिन्यातील शुक्लपक्षात हिरवा चुडा भरण्यासाठी तिला सासरी आणले जाते.

गोवारी जातीत विधवाविवाहाला मान्यता आहे. विधवेचा विवाह रुईच्या झाडाबरोबर (कृष्णपक्षात) केला जातो. मयत पतीचा भाऊ अविवाहित असल्यास त्याच्याशीच पुर्नविवाह करण्यास अधिक पसंती देतात. अन्यथा दुसऱ्या अनुरूप पुरुषाचा विचार करावा लागतो.

गोवारी लोक हिंदूंचे सण साजरे करतात. तथापि काही सण वेगळ्या पद्धतीने साजरे करतात. दिवाळी हा त्यांचा मुख्य सण आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळी पळसाची फांदी तोडून घरी आणून तिची पूजा करतात. फांदीला गायीच्या गळ्यातील घंटा बांधून रात्रभर नाचतात. ही पूजा प्रमुख गायक्याकडे (गायी राखणाऱ्या गोवाऱ्यांना गायकी म्हणतात) असते. दिवाळीला कोंबडा बळी देण्याची रूढी आहे.

गायीला गोवारी फार मानतात. वर्षाऋतूमध्ये मोरपिसांच्या रंगीबेरंगी माळा घालून गायींना सजवितात. गावातील सर्व गायी, बैल व वासरे सजवितात. गायक्याला पाटील व जास्त गुरे असलेल्या लोकांकडून नवीन वस्त्रे दान म्हणून दिली जातात. नवीन कपडे परिधान करून तो गायीची पूजा करतो व गोड घास घालतो.

आर्वी, आष्टी व कारंजा तालुक्यांमधील गावांत बलीप्रतीपदेच्या दिवशी गोपूजा झाल्यावर गावातील सर्व गायी कळपाकळपाने गोळा करतात. प्रत्येक कळपातील एक गाय मारुतीचे मंदिरात नेऊन तिने गायक्याच्या मागोमाग पाच प्रदक्षिणा घातल्यावर त्याला गायी खेळविल्या असे म्हणतात. या प्रकारच्या उपचारांमधून त्यांचे गायीबद्दलचे प्रेम दिसून येते.

पितृमोक्ष अमावस्येला गोवारी अमावस्या म्हणूनही ओळखतात. त्या दिवशी गोवारी लोक पितरांची पूजा करतात. व्यासपूजा किंवा आखाडीच्या दिवशी गोवारी सिवाऱ्या नामक देवाची पूजा करून कोंबडा बळी देतात. हा देव गुरांना गावाच्या सीमेबाहेर जाऊ देत नाही व भटकलेल्या गुरांना गावाची वाट दाखवितो असा त्यांचा समज आहे.

माघ महिन्याच्या शुक्ल पक्षात देवमाई म्हणजेच कुलदैवतांची पूजा करतात. तसेच तीन र्षांनंतर तिजान हा विधी करतात. गोवाऱ्यांच्या काही कुळांत सात देव तर काही कुळांत हा देव देवमाईच्या वेळी पुजतात. राऊत, ठाकरे व पदिले हे सात देव, तर नेवारे व नागोसे सहा देव पुजतात. सात देवांमध्ये, खोडेखोडवान, नारायणदेव, दुल्हादेव, मोठादेव, लहान-व, वाघदेव व साखरादेवीचा समावेश होतो. प्रत्येक पूर्वजाच्या नावाने सेंदूर व कुंकवाचे ोळे तयार करून मडक्यात लाल कापडात गुंडाळून ठेवतात. गोळ्यांना देव (पूर्वज) समजून विशेष प्रसंगी त्यांची पूजा करतात. देव सांभाळण्याची जबाबदारी कुटुंबातील मोठ्या ावाकडे असते. मंगलप्रसंगी पूर्वज पूजेची प्रथा रूढ आहे. तिजान व उतरण नामक विधी र्वज पूजेप्रीत्यर्थ केले जातात.

निधन झाल्यावर मृतदेह पूर्वेला पाय करून जमिनीवर गोधडीवर ठेवतात. नंतर ती ोधडी पुरण्याच्या जागी पेटवितात. प्रेताला गरम पाण्याने आंघोळ घालून नवीन कपडे ालतात. हळद कुंकू लावून तिरडीवर ठेवतात. मृत व्यक्तीची मुले खांदा देऊन प्रेतयात्रा निघते. स्मशानात खड्डा खोदून पाय पूर्वेकडे राहतील अशा तऱ्हेने विवस्त्र पुरतात. मृत्यु-समयी पंचक लागला असेल तर पिठाचे पाच पुतळे हळद-कुंकू लावून चार कोपऱ्यांवर पुरतात. ेत पुरण्याची प्रथा आहे. स्मशानातून आल्यावर नदीत किंवा घरी सर्व व्यक्ती आंघोळ करतात.

मृत व्यक्तीला नैवेद्य दाखविण्यासाठी एका पानात त्याला आवडणारे सर्व पदार्थ ठेवून स्मशानात जातात. कावळा त्या पदार्थांना स्पर्श करेपर्यंत सर्व तेथे थांबतात. अल्पवयीन मुले निधन पावल्यास कोणतेही विधी करीत नाहीत.

गोवारी लोकांचा प्रमुख व्यवसाय गुरे राखणे हा आहे. काही अल्पभूधारक असून बहुसंख्य गोवारी शेतमजुरी व वनोत्पादन गोळा करण्याचा व्यवसाय करतात. रोजच्या जेवणात भाकरी, चटणी आणि आंबील असते. मोहफूल अन्न म्हणून खातात. परंपरेने गोवारी मांसाहारी आहेत. पुरुषांचा पोषाख म्हणजे खांद्यावर घोंगडी, हातात काठी, डोक्याला फेटा, डाव्या हातात धातूचा कडा, कमरेपासून गुडघ्यापर्यंत धोतर व अंगात बंडी असा असतो. हातात तेंदूची काठी असते. काठीची विधिवत पूजा केली जाते. महिलांना गोंदण्याची फार हौस असते. जंगली भागातील महिला गोंडी पद्धतीप्रमाणे, पण वेगळ्या प्रकारची, लुगडी नेसतात. पूर्वी महिला चोळी घालीत नसत. अलीकडील काळात पोषाखात बरेच परिवर्तन झाले आहे.

अजूनही खेडेगावांत गोवारींची जातपंचायत टिकून आहे. वंशपरंपरागत जातपंचायतीच्या प्रमुखास शेंड्या म्हणतात. जातीचे नियम मोडून अनैतिक वर्तन करणारांना बहिष्कृत करतात. शेंड्याने दिलेला निर्णय अंतिम असतो. तथापि पंचायतीने ठोठावलेला दंड भरल्या-नंतर पुन्हा जातीत घेतले जाते. आंतरजातीय विवाह परंपरेने निषिद्ध आहे. सामाजिक व कौटुंबिक भांडणे जातपंचायतीमध्ये मिटविली जातात.

धनगर

शेळ्यामेंढ्या पाळण्याच्या व्यवसायावरून या जातीला धनगर हे नामाभिधान प्राप्त झाले. जिल्ह्यात सर्वत्र विखुरलेले असले तरी आर्वी तालुक्यात या लोकांची संख्या जास्त आढळून येते. इ. स. १९०१ मध्ये जिल्ह्यात ६,००० धनगर होते. विविध भागांतून स्थलांतर

करून येथे जे धनगर एकत्र आले त्यांच्या दोन मुख्य शाखा पडल्या :— वऱ्हाडातून आलेले वराडी व कन्नड मुलखातून आलेले कानोरे. जमीन नांगरताना शेळ्या व मेंढ्या वारुळातून बाहेर आल्या, त्यांची निगा राखण्यासाठी महादेवाने पहिला धनगर तयार केला असा त्यांचा समज असल्याने ते दिवाळीच्या दिवशी वारुळाची पूजा करतात.

यांच्यात झाडे, खुटेकर, हटकर इत्यादी पोटजाती असून त्यांची आडनावे पुढीलप्रमाणे आहेत— खराबे, चाफले, झाडे, चांभारे, गावंडे, लवनकर, तिनगसे, घोडे, वागे, होटे, थोटे, महाजन, आसकर, भूतकर, लोणारे, बुधे, चिवाने, मातकर, बोबडे, खाडे, सरोदे, बनकर, धवने, घायवट, अवताडे, गिरे, पुनसे, अवघड, खुरपे, कश्यप इत्यादी.

या समाजातील विवाह, जन्म व अंत्यसंस्कार हिंदू रूढीप्रमाणेच पार पाडले जातात पौष महिना हा शुभ कार्यासाठी अशुभ मानतात. सर्व हिंदू सण व उत्सव साजरे करतात परंतु पोळा आणि दिवाळी हे सण विशेष उत्साहाने साजरे करतात.

गवळी

गवळी लोक श्रीकृष्णाला आपला पूर्वज मानतात. गवळ्यांना अहीर गवळी असेही म्हणतात. त्यांच्या यादववंशी व नंदवंशी या पोटजाती आहेत. जिल्ह्यातील गवळ्यांची आडनावे यादव, राठोड, कालोकर, साठे, येवले, गहाट, चेके, काळे, डोळे, भड, खंडारे, आसोले, महाजन, चावरे, घसाळ व चारोडे आहेत. गवळी लोक आर्वी, सेलू व कारंजा तालुक्यांत अधिक प्रमाणात आढळतात. ते प्रामुख्याने श्रीकृष्ण व चक्रधरस्वामीची आराधना करतात. बहुसंख्य गवळी महानुभावपंथी आहेत. सत्यनारायणाच्या ऐवजी मंगलप्रसंगी ते चक्रधरस्वामीचे पारायण करतात.

जन्म, विवाह आणि मृत्यू विषयक संस्कार वगळता त्यांच्या इतर चालिरीती बहुजन हिंदू प्रथाप्रमाणेच आहेत. मृतदेह पुरण्याकडेच यांचा कल अधिक आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये मृतदेह जाळतात. प्रेताचे डोके पश्चिमेकडे व पाय पूर्वेकडे ठेवतात. मृत्यूनंतर दहा दिवसपर्यंत मृत व्यक्तीच्या नावे जेवणाचे पान वाढतात. महानुभाव पंथाच्या स्वामीजींना आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार अन्नदान करतात. दहा दिवस सुतक पाळतात. विधवा किंवा इतरांना महानुभाव पंथाची दीक्षा देताना मुंडन करतात.

गोकुळाष्टमी गवळी लोकांचा अत्यंत महत्त्वाचा सण असून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. पोळ्यानंतर चार दिवसांनी येणारा भालदेव नामक सण देखील फार उत्साहाने साजरा केला जातो. गवळी गणेशचतुर्थी साजरी करीत नाहीत. चक्रधरस्वामीची जयंती मात्र धुमधडाक्यात साजरी करतात.

गवळी शुद्ध शाकाहारी असून भात, भाजी, वरण, भाकरी व मिरचीचा ठेचा हे त्यांचे नित्याचे जेवण. दुग्ध व्यवसाय हा मुख्य व्यवसाय असला तरी शेतीमध्ये त्यांनी पुष्कळ प्रगती केली आहे.

कोलाम

कोलम, कोळम, कोलमा किंवा कोल्हमा, कोल्हाम व कोलामा या विविध नावांनी ही जमात ओळखली जाते. परंतु या जमातीचे खरे नाव "कोलाम" किंवा "कोलावान" असे असून ही उपजमात नसलेली जमात आहे. कोलाम किंवा कोलावान हे नाव कसे पडले

ाविषयीची माहिती मिळत नाही. कोलाम लोक मूळचे निलगिरी जिल्ह्यातील कोलंबाई कडयातील असावेत असे पंडित हिरालाल यांचे मत आहे. संस्कृतमध्ये "कोल" या ब्दाचा अर्थ वराह असा होतो. वराहाची शिकार करण्यात अतिशय वाकबगार असलेला ा कुशल शिकारी वर्ग कोलाम किंवा कोलावान या नावाने ओळखला गेला असावा.

कोलामांच्या भाषेला लिपी नाही. कोलामी भाषा द्राविडी प्रवर्गातील असून तिच्यात लुगु भाषेचे शब्द सर्वाधिक आढळतात. यावरून ही जमात तेलुगु भागातून निकटच्या द्रपूर, यवतमाळ व वर्धा परिसरात पसरली असेल असा एक समज आहे. परंतु ते योग्य ाटत नाही. हे लोक वऱ्हाडच्या चारही जिल्ह्यांत आधी असतील व मग ते इतरत्र पसरले से सेतु माधवराव पगडी यांचे मत आहे. गोंड आणि कोलाम यांच्यात बरेच साम्य असून यांच्यात थोडी जवळीकही आहे. या दोन जमातींचे साहचर्य प्राचीन काळापासूनच असावे से वाटते. कोलाम आणि गोंडांतील साम्यामुळे कोलाम हे गोंड वंशातील आहेत असा एक मज आहे. परंतु तो समज बरोबर नाही. कोलाम व गोंड यांच्यात आंतरविवाह होत ाहीत. गोंडांना कोलामांच्या हातचे अन्न चालत नाही. कोलामांना मात्र चालते. गोंड थानिक राजे अथवा जमीनदार होते तर कोलाम त्यांचे नोकर किंवा सेवक होते.

कोलाम बहुधा गावात राहत नाहीत. गावापासून सुमारे अर्धा कि. मी. अंतरावर गवती ोपडयांची त्यांची स्वतंत्र वसाहत असते. देवळी तालुक्यातील कोल्हापूर गावी केवळ ोलामांचीच वस्ती आहे. जिल्ह्यातील आंजी-विरूळ पट्टयात कोलाम जास्त आढळतात. ोलामांच्या स्वतंत्र वस्तीला पोड असे म्हणतात. वस्तीचे स्वतंत्र न्यायव्यवस्थामंडळ असून यात नाईक, कारभारी, महाजन व घटया नामक पदाधिकारी असतात.

कोलामांची घरे गवती छपरांची असतात. झोपडया अगदी जवळजवळ असतात. क्वचित रांमध्ये सिंद भरून किंवा कूड करून दुसरी खोली काढली जाते. खिडकी नसलेल्या झोपडीचे ार अत्यंत ठेंगणे व अरुंद असते. शिकारी व्यवसाय असल्यामुळे घरात सोटा व कुऱ्हाड निश्चित आढळते.

पुरुष काळया वर्णाचे व धष्टपुष्ट बांध्याचे तर महिला काळया असल्या तरी बांधेसूद असतात. वर्धा जिल्ह्यातील कोलाम गोंडांपेक्षा अगदी निराळे दिसतात. डोक्याला ते फेटया-सारखे फडके गुंडाळतात. जाडेभरडे व आखूड असे धोतर दोन्ही काचे मारून नेसतात. अंगात कुडते किंवा बंडी घालतात. बरेचसे कोलाम नेहमी उघडेच राहतात. अर्थात दारिद्र्यामुळेच अशा सवयी जडलेल्या असतात. महिला गुडघ्याच्या वरून दुमड घातलेले लुगडे नेसतात. गोंड महिलांपेक्षा त्यांची नेसण्याची पद्धती वेगळी आहे. गोवारी बायकांची व कोलाम बायकांची लुगडे नेसण्याची पद्धती सारखीच आहे. कोलाम महिला पूर्वी चोळया घालत नसत. लुगडयाचा पदर उरोजांवरून दुमडून घेत. परंतु अलीकडे चोळी वापरू लागल्या आहेत. कपाळाला सुके लाल कुंकू लावतात. क्वचित डोळयात काजळ घालतात. त्यांच्याकडे निकृष्ट चांदीचे अत्यल्प दागिने असतात. पायाच्या अंगठयाजवळच्या बोटात जोडवी आणि गळयात काळया मण्यांचे मंगळसूत्र प्रत्येक विवाहित महिला घालते. महिला लाजाळू असल्यामुळे इतर पुरुषांपुढे सहसा येत नाहीत. पुरुष व महिला पूर्वी पादत्राणे वापरीत नसत. परंतु आता काही जण वापरू लागले आहेत. जेवणात ज्वारीची भाकरी, तुरीचे, मुगाचे किंवा मटकीचे वरण व मिरचीचे तिखट असते. कण्या अथवा घुगऱ्या खाण्याचे प्रसंग दारिद्र्यामुळे त्यांच्यावर

नेहमीच येतात. मांसाहारी असले तरी मांस विकत घेऊन खात नाहीत. शिकार करून मांसभक्षण करतात. वराहाची शिकार मिळाली तर त्यांना फार आनंद होतो. हनुमानावरील भक्तीमुळे वानर मारीत नाहीत. पाळीव प्राण्यांना मारणाऱ्या कोलामांना जातीबाहेर टाकण्यात येते.

कोलामांची आडनावे पुढीलप्रमाणे आढळतात :—अतराम, अरधुने, आस्वले, कसार, कापरे, किनारे, किरीट, कुंबरे, कुंभेकर, कोंढेकर, कोमटी, कोल्हे, खडसे, गुजाराम, गुंजटे, घासाडे, घाटेकर, जांभे, झेडगे, झोले, टेकाम, डेबरे, ढोबरे, तलवारे, ताडाम, दाभे, दाभेकर देवगडे, देवटकर, धोटे, पाटोले, नाईकवाडे, पाडसी, बोदे, बाडे, बोरकर, भिवईकर, भिवनकर, भोराडे, भोसे, भोसेकर, मडावी, मराठे, मसराम, मांगुर्ले, मादनी, मारेगाम, मुंजाळे, मुंढेकर, मोरे, मोवरे, येडसे, राऊत, राजूर, राजूरकर, रामगडे, रामपूरे, लुंगसे, लोणकर, लव्हाणे, वडे, वरझकर, वाढोडे, शिंदे, शिबले, सकरापुरे, सापोडे, सिवनकर, सुकली, सोरांबले, हिवरी इत्यादी.

संपूर्ण कोलामसमूह पुढील चार कुलगटांमध्ये म्हणजेच गोत्रांत विभागला गेला आहे :— चारदेवे, पाचदेवे, सहादेवे व सातदेवे. चार देवतांची पूजा करणारे ते चारदेवे. कोलामात सगोत्र विवाह होत नाहीत. मुले नवस केल्यामुळेच होतात अशा गाढ श्रद्धेमुळे लग्न झाल्यावर काही महिन्यांतच नवस करण्यासाठी ते भगताकडे जातात. भगताच्या अंगात बहुधा भिवसनदेव येतो. काही भगतांच्या अंगात आईमाय येते. पुत्रेच्छू जोडपे त्या देवाला नमस्कार करते व लवकर मूल होऊ दे अशी प्रार्थना करते. गर्भवती महिलासुद्धा प्रसूतीपर्यंत दैनंदिन कामे व मोलमजुरीची कामे करीत असते. कोलाम सुईणीला माटेरताद किंवा माटेमुरताल असे म्हणतात. बाळंतपणानंतर पहिले पाच दिवस विटाळ पाळला जातो. सहाव्या किंवा सातव्या दिवशी बाळंतीण घराबाहेर पडते व कामालाही जाते. फक्त पाच दिवस घरात राहण्याचा या जमातीचा दंडक आहे. असाधारण परिस्थितीत ही मुदत पंधरा दिवसपर्यंत वाढते. परंतु त्यानंतर माता कष्टासाठी बाहेर पडतेच. मूल जन्मल्यावर दुसऱ्या दिवशी घरचे लोक कोलाम वस्तीत तिळगूळ व खोबरे वाटून आनंद व्यक्त करतात. काही भागातील कोलाम बाराव्या दिवशी बारसे करतात. परंतु ही प्रथा फारच कमी आढळते. बहुतेक कोलाम मुलाचे नाव ठेवण्याचा विधी पाचव्या दिवशीच करतात. त्याला पाचवी असे म्हणतात. नवसाच्या रूपाने जे कबूल केले असेल ते न चुकता दिले जाते.

कोलामांमध्ये पोटजाती नाहीत. लग्न जमवताना काही कुलसंच वगळण्याचा नियम आहे. कुलदेवतांच्या पूजेवरून कोलामांत चार कुलगट पडले आहेत याचा उल्लेख वर आलाच आहे. एकाच कुलगटात विवाह निषिद्ध मानतात.

मुलीला पळवून नेऊन लग्न करण्याची पद्धत पूर्वी कोलामात होती. आता ही प्रथा बंद पडली आहे. तरीसुद्धा एक लाक्षणिक विधी म्हणून ही प्रथा आजही पाळली जाते. आता विवाह नवीन पद्धतीने होऊ लागले आहेत. मामाच्या मुलीशी लग्न करता येते, परंतु आतेबहिणीशी नाही. सोयरिकीसाठी मुलाचा बाप पुढाकार घेऊन मुलीच्या गावातील कोलामांचे मुख्य पंच एकत्र येतात व त्यांच्या साक्षीने वाङनिश्चय होतो. लग्नापूर्वी मुलाकडे शालमुदीचा कार्यक्रम आणि मुलीच्या घरी साखरपुडा केला जातो. दोन्हीकडील कार्यक्रमास साक्षगंध म्हणतात. कार्तिक एकादशीनंतर लग्ने सुरू होतात. पौष महिना लग्नासाठी अशुभ मानला जातो. कारण तो महिना सामुदायिक श्राद्धाच्या स्वरूपात कोलाम पाळतात. पौषात

नाची बोलणीसुद्धा करीत नाहीत. कोलाम जमातीतील वेताळक नामक व्यक्ती त्यांचा ज्जी असतो. लग्नासाठी शनिवार व बुधवार जास्त शुभ समजले जातात. पूर्वी कोलामांचे वाहसमारंभ पाचपाच दिवस चालत. आता लग्न तीन चार दिवसांत आटोपतात.

लग्नाच्या दिवशीच मुलाला हळद लागते. लग्न वराच्या घरी लागते. त्यासाठी वधू ाच्या घरी जाते. वधू वराकडे जाण्यास निघते तेव्हा तिच्यासह काही बायका गाणी म्हणत ततात तर काही पुरुष डफ व पावा वाजवितात. वराचे गाव आले की, गावाबाहेर "आई" मक देवतेसमोर वधूला बसवून पूजा करतात. वधू स्वतःच्या हाताने कोंबडीचे पिलू कापते. ाकडील पाच सुवासिनी गृहदेवतेपासून वधू बसलेल्या आईच्या देवळापर्यंत गाणी म्हणत च वेढे घालतात. दरम्यान वराकडील पाचदहा मुख्य लोक पाण्याने भरलेली एक घागर रुन वधूकडील मंडळीस सामोरे जातात. या घागरीला "सगुर-घागर" असे म्हणतात. नंतर वाजतगाजत वधू व वधूकडील लोक वरमंडपाजवळ येतात. वरमंडपाजवळ येऊन ू थांबते व वर मांडव सोडून तिला सामोरा जातो. नंतर दोघेही मंडपात येऊन बोहोल्यावर ततात. बोहोल्यामागे सालईचे झाड रोवलेले असते. त्याला मुंडा म्हणतात. या मुंड्याच्या ळाशी दोन मडकी ठेवलेली असतात. वधूवरांमध्ये अंतरपाट धरण्यात येतो. विवाहाचे रोहित्य वेताळक करतो. तांदूळ अथवा ज्वारीच्या अक्षता वधूवरांवर फेकून "शावेदान" ते वेताळक उच्चारतो. लग्न लागल्यावर वर वधूच्या गळ्यात काळ्या मण्यांची पोत धतो. वधू वराच्या हाताला कंकण बांधते व त्यानंतर वर वधूला कंकण बांधतो. कंकण-धनानंतर वधूला मांडीवर घेऊन वर बोहोल्यावर बसतो. रात्रभर लग्नमंडपात नृत्य ण्याचा कार्यक्रम चालतो. वधूवरांना रात्रभर जागे ठेवले जाते.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशी सामुदायिक स्नानाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडतो. प्रकारास न्हाणुरा म्हणतात. न्हायला पतिपत्नीने जोड्यानेच बसले पाहिजे असा संकेत हे. दुसऱ्याच दिवशी तांबोळ नावाचा कार्यक्रम होतो. याप्रसंगी साधारणपणे मांसाहारी वण देतात. तिसऱ्या दिवशी पोस्त नावाच्या कार्यक्रमात नवरदेवाकडील लोक सर्वांना टाणे वाटतात. पूर्वी वधूवरांना यावेळी दारू पाजीत असत. आता गुळाचे पाणी पाजतात. ध्याकाळी वधूला कडेवर घेऊन वर बोहोल्याभोवती पाच वेळा फेरे घालतो. चौथ्या दिवशी ान-भोजनादी कार्यक्रमांची पुनरावृत्ती होते. पाचवा दिवस लग्नाचा शेवटचा दिवस असतो. ा दिवशी महादेवाची काठी नावाचा कार्यक्रम झाल्यावर वधूवर वधूच्या घरी येतात. थील विधी कमी असतात. त्यातील एक गमतीदार प्रकार असा की, वधूला अनिच्छेने सासरी वे लागत असल्यामुळे नवरदेव तिला उचलतो व आपल्या मंडळीमध्ये नेऊन ठेवतो. वधूला रोप दिला जातो.

विधवाविवाहास कोलामांत मान्यता आहे. पुनर्विवाहासाठी धाकटी मेहूणी जाती यमान्वये चालत नाही. लग्नानंतर जीवनाचे शिक्षण म्हणूनच की काय कोलामांमध्ये वविवाहित जोडप्याला पहिला बाजार करायला जोडीने पाठविले जाते.

कोलाम लोकांची देवदेवतांवर विलक्षण श्रद्धा असते. त्यांच्या देवदेवतांची नावे अशी :– ी, आया, बेक, कारायमेराय, माणकूबाई, लाळाबाई, भुताय, वाघाय, भोवानी, सावारी, माय्याक, सानसुर्याक, पारध्याक, जयतुर, चाणखाण, कलासूर, चुराघाली (माटचा), हीत, बहीस, सकोबा, म्हसोबा, भयरूप, मेटी दियाम, दियाम साटवन, मोराम, महादेव व

मारुती. त्यांच्या सणांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :– फणमोडी (वर्षप्रतिपदा), मोहडोंबरी (अक्षय तृतीया), गावबांधणी (वैशाख ते ज्येष्ठ महिन्यात केव्हाही), माटचा (उन्हाळ्यात), चैत (चैत्र पौर्णिमा), भीमाय्यकाला बी देणे (पाऊस येण्यापूर्वी २–३ दिवस किंवा पाऊस सुरू झाल्यावर २–३ दिवसांनी), भीमाय्याकाची आंघोळ (वैशाख), मोरामा देवाचा उत्सव (नव्याने वस्ती वसविताना, नंतर दर तीन वर्षांनी), वाघाईची पूजा (आषाढी पौर्णिमा), जयतूर देवाची पूजा (आषाढातील शेवटचे दोन-तीन दिवस किंवा श्रावणानंतर दोन-तीन दिवसांनी), कारगुल व काष्टाफेडी, नागपंची, फूलझडणी किंवा झाडपेरणी (नागपंचमी), पोका (पोळा), अतारी (पोळ्यानंतर), अखरपख (पितृमोक्ष अमावस्या), दसरा, दिवाळी, मोहरम, मेटी दियाम (हिवाळा), पेट्टा दियाम (पौष), आईची पूजा (माघ) आणि होळी.

इतर आदिवासींप्रमाणेच कोलामांच्या जीवनात नृत्याला महत्त्व आहे. कोणताही उत्सव नृत्याशिवाय पूर्ण होत नाही. संपूर्ण रात्र नाचगाण्यात घालवितात. "इतिहास" नावाच्या कार्यक्रमात कोलाम जनजीवनाचे संपूर्ण चित्र नृत्यगायनाच्या रूपाने साकार करण्यात येते. निसर्गातील साहित्याचा कलात्मक वापर करून हस्तकला वस्तू बनविण्यात त्यांचे कौशल्य दिसून येते. शरीर गोंदून घेण्याची स्त्री पुरुषांत आवड आढळते.

प्रत्येक वस्तीत पंचायत किंवा पंचमंडळ असते. आपापसातील न्यायनिवाडे या मंडळाकडूनच होत असतात. पंचायतीचे निर्णय बंधनकारक असतात. न्यायमंडळात नाईक, महाजन, कारभारी व घटचा असे पदाधिकारी असतात. वनव्यवसायाव्यतिरिक्त अलीकडे शेती व शेतमजुरी करून उदरनिर्वाह करतात.

कोलामी भाषेविषयी ग्रिअर्सन, हेग आणि वूलस्ले या विद्वानांनी दिलेली माहिती फारच त्रोटक आहे. इ. स. १९५० मध्ये सेतु माधवराव पगडी यांनी कोलामी भाषेचे व्याकरण प्रकाशित केले. इ. स. १९५०–५१ मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठातील संस्कृतचे प्राध्यापक टी. ब्युरो व एस. बी. भट्टाचार्य यांनी किनवट व पांढरकवडा भागातील काही कोलामी शब्द जमविले. त्यानंतर १९५५ मध्ये कोलामी भाषेवरील डॉ. एम. बी. एमेन्यू यांचा प्रबंध प्रकाशित झाला. त्यांनी १९३७ मध्ये वर्धा भागातील कोलामी भाषेची माहिती गोळा करून प्रबंध लिहून पुढे प्रकाशित केला. डॉ. एमेन्यू, डॉ. केतकर, डॉ. इरावती कर्वे व सेतु माधवराव पगडी या विद्वानांनी या भाषेला कोलामी असेच नाव दिले. भाऊ मांडवकरांनीही कोलाम जमातीवर प्रबंध लिहिला असून तो प्रकाशीत झाला आहे. तेलुगुला जवळचे बरेच शब्द कोलामीत आढळतात. कोलाम मराठी व हिंदीतही बोलतात. संभाषणात मराठी शब्दांचा बराच वापर करतात. जिल्ह्यातील काही कोलाम स्वभाषेपेक्षा मराठी अधिक चांगले बोलतात.

मरणासन्न व्यक्तीला तळजमिनीवर ठेवतात. प्राणोत्क्रमणानंतर जमलेल्या लोकांना गूळपाणी वाटून अंत्यसंस्कार करतात. प्रेत तिरडीवरून किंवा खाटेवर नेऊन स्मशानात पुरतात, दहनाची प्रथा नाही. प्रेतयात्रेतील सर्व नंतर आंघोळ करून ओल्या वस्त्रांनिशी वस्तीवर परत येतात. त्यांच्या अंगावर मोहाचे पाणी शिंपडण्यात आल्यावर त्यांची शुद्धी झाल्याचे मानले जाते. सुतक एकच दिवस पाळून मृताचे घरी गोमूत्र शिंपडण्यात येते. इतर विधी फारसे करीत नाहीत. श्राद्ध पौष महिन्यातच करण्यात येते. फक्त पहिल्याच वर्षी श्राद्ध करण्यात येते.

गोंड

मेजर जनरल कनिंगहॅमच्या मते गोंड ही संज्ञा गौड प्रदेशावरून (पूर्व बिहार व बंगाल) आली असावी. जबलपूरजवळील त्रिपूर किंवा तेवार येथील एका चेदी राजाच्या बनारस उत्कीर्ण लेखात म्हटले आहे की, तो हयहय वंशीय आहे. या वंशाचे लोक नर्मदेच्या परिसरात राहतात. याच परिसरातील इतर तीन चार उत्कीर्ण लेखांत सुद्धा गौड राजांचा उल्लेख आढळतो. तथापि वर म्हटल्याप्रमाणे बंगालच्या भागाला गौड म्हणत असत. काही शंकास्पद उत्कीर्ण लेख सोडले तर मध्यप्रांताकरिता गौड संज्ञेचा वापर आढळत नाही. मेजर जनरल कनिंगहॅम मध्यप्रांताचा गौड असा उल्लेख करतो याचे मुख्य कारण असे की, इ. स. ६०५ मध्ये गौड राजा, कनौज विरुद्ध (हर्षवर्धनाचा थोरला भाऊ) माळव्याच्या राजाच्या मदतीला धावून आला. या लढाईत कनौज मारला गेला. स्मिथ याच्या मते वरील प्रसंगातील गौडचा संबंध मध्यप्रांताशी नसून बंगालशी आहे. यावरून मेजर जनरल कनिंगहॅमचे मत विसंगत असून गोंड शब्दाची त्याने दिलेली व्युत्पत्ती कालबाह्य वाटते. हिस्लॉप प्रतिपादन करतो की, गोंड हा शब्द 'कोंड' या शब्दाचे रूप आहे. खोंड जमातीचा उच्चारसुद्धा तो अशाच प्रकारे करतो. हिस्लॉप पुढे म्हणतो की तेलुगु लोक खोंड या शब्दाचा गोंड किंवा कोड असा उच्चार करतात. कनिंगहॅमने दाखविले आहे की, मध्यप्रांतात गोंड शब्दाचा उच्चार साधारणतः गौड असा करतात. त्याचा गोड असा अर्थ ध्वनित होतो आणि ग व क च्या बदलाने कोड असा शब्द बनतो. अशा प्रकारे गोंड आणि कोड हे दोन्ही शब्द मध्यप्रांतातील गोंड आणि गोड या शब्दांप्रमाणे एकच आहेत. वस्तुतः गोंड ही संज्ञा तेलुगु लोकांनी प्रचलीत केल्याची शक्यता जास्त आहे. तामीळ, कन्नड आणि तेलुगु प्रमाणेच गोंड द्राविडी भाषा बोलतात. यावरून असे वाटते की, गोंड हे दक्षिणेकडून मध्यप्रांतात आले असावे. गोदावरी ओलांडून ते चंद्रपूर भागात आले असावे. तेथून ते इंद्रावती पार करून बस्तर आणि छत्तीसगडच्या दक्षिण व पूर्वेकडील डोंगराळ भागात पसरले आणि वर्धा व वैनगंगा नद्या ओलांडून सातपुडा भागात गेले. चंद्रपूरवर काही शतके गोंडवंशीय राजांनी राज्य केले. तेव्हा तेलुगु भाषिकांशी त्यांचा संबंध आला असावा आणि येथेच त्यांना गोंड हे नाव प्राप्त झाले असावे. गोंडांच्या उत्पत्तीबाबत अनेक आख्यायिका आहेत. तथापि त्यांना पुष्टीकारक पुरावे उपलब्ध नाहीत.

गोंडांच्या व्यवसायावरून पडलेल्या अनेक पोटजाती आढळतात. उदा. आगरीय (Agaria = Iron workers), ओझा (Ojha = Soothsayers), परधान (Pardhan = Priest), सोलाह (Solaha = Carpenters) आणि कोयलभूती (Koilabhuti = Dancers). या पोटजाती गोंडांशी इतर कनिष्ठ जमातींच्या संकरातून निर्माण झालेल्या असाव्या. गोंडांमध्ये राजगोंड आणि खातोला (Khatola) हे मुख्य उपविभाग आहेत. राजगोंड रजपूत व गोंड यांच्या संकरातून निर्माण झालेले असावेत. खातोला हे नाव बुंदेलखंडातील खतोला राज्यावरून पडलेले आहे. खतोलावर एके काळी गोंड राजाचे राज्य असावे. सर्वसाधारणपणे गोंड स्वजातियांशी विवाहसंबंध जोडतात. मध्यप्रांतात गोंडांच्या स्थानिक उपजाती आढळत असल्या तरी वर्धा जिल्ह्यात फक्त राजगोंड असल्याचे प्रत्यक्ष सर्वेक्षणात आढळून आले.[१]

यांच्यात गोत्रांतर विवाहाचा नियम आहे. ऑस्ट्रेलियातील काही वन्य जमातींत ही पद्धती आढळते. गोत्रांतर विवाह पद्धतीमुळे ही जमात चार भागांत विभक्त झालेली आहे.

[१] इ. स. १९८७–१९८८ मध्ये या कार्यालयाने सर्वेक्षण केले.

हे चार विभाग देवांच्या संख्येवरून पडलेले आहेत. उदा. चारदेवे, पाचदेवे, सहादेवे आणि सातदेवे. एकाच गोत्रात विवाहसंबंध घडून येत नाहीत. मामेबहिणीशी लग्न करण्याची पद्धती आढळते. गोंडांमध्ये दुसरे लग्न करायचे तर धाकट्या मेव्हणीस प्राधान्य दिले जाते.

गोंडांची आडनावे प्राणी व वनस्पतींच्या नावाप्रमाणे आढळतात :–तेकाम किंवा टेकाम (सागाचे झाड), मरकाम (आंब्याचे झाड), पुरकाम (भोपळा), गेडाम (लाकूड), इळपाते (मोहाचे झाड), मडावी (झाड), तोडसाम (माती), कोडापे (घोडा), नेताम किंवा नैताम (कुत्रा), आतराम किंवा अतराम (कुत्रा), मसराम (नाक), खंडाते (मांसाचा तुकडा) इत्यादी.

वधूवराकडील मंडळी विवाह निश्चित करतात. बालविवाहाची प्रथा आता अस्तित्वात नाही. पूर्वी एखाद्या मुलीने स्वेच्छेने कुणा मुलावर हळदपाणी टाकले की तो तिला स्वतःची पत्नी म्हणून घरी नेत असे व यास समाज मान्यता असे. विवाहित महिला सुद्धा आपल्या पतीला सोडावयाचे झाल्यास अशाप्रकारे दुसरा विवाह करीत असत. परंतु असे प्रकार आता क्वचितच घडतात.

पूर्वी वराच्या घरी लग्न लागे. परंतु बहुजनसमाजाच्या प्रभावामुळे आता वर वधूच्या घरी जाऊन लग्न लावतो. तरीसुद्धा क्वचित प्रसंगी वराकडे लग्न लागते.

गोंड अंधश्रद्धाळू असून गरोदर महिलेस हत्ती किंवा घोड्याजवळ जाऊ देत नाही. हत्ती किंवा घोड्याजवळ गेल्यास ते गर्भवतीवर आक्रमण करतात असा त्यांचा समज आहे. बाळंतपण सुलभ होण्यासाठी वाहत्या झऱ्याचे पाणी पाजतात किंवा वीज पडून झाडाच्या झालेल्या तुकड्यांची माळ तिच्या गळ्यात घालतात. पाचवी किंवा सटवीची पूजा करीत नाहीत. बाराव्या दिवशी बारसे किंवा नामकरण करतात. बाराव्या दिवसापर्यंत सुहेर पाळला जातो.

बहुसंख्य गोंड प्रेत पुरतात. प्रेताचे पाय साधारणतः उत्तरेकडे ठेवून विवस्त्र प्रेत पुरतात. नंतर सर्वजण नदीवर जाऊन स्नान करून मद्यपान करतात. मृताचा प्राण गेला असेल त्या ठिकाणी एका टोपलीत तांदूळ, दोन हळकुंडे, थोडेसे पीठ व कोंबडीचे पिल्लू ठेवून त्यावर झाकण ठेवतात. दुसऱ्या दिवशी कोंबडीचे पिल्लू बळी देऊन मृतात्म्यास त्याचा स्वीकार करण्याची विनंती करतात. दारूच्या मडक्यात निंबाची डहाळी बुडवून शोकाकूल व्यक्तींच्या डोक्यावर शिंपडतात. अंत्यसंस्कारात मद्यपान करण्याची परंपराच आहे. पूर्वी मृतांना घरात किंवा अंगणात पुरण्याची प्रथा होती. यामागे समज असा होता की, मृत व्यक्ती परत जन्म घेईल. परंतु ही प्रथा आता आढळत नाही. गरोदर माता किंवा बाळंतपणानंतर महिला लगेच मरण पावल्यास तिचे प्रेत दूर जंगलात पुरतात. कारण तिच्या आत्म्याकडून निकटवर्तींना त्रास होतो असा समज आहे. मातेचे दूध पिणारे मूल मरण पावल्यास त्याला मोहाच्या झाडाच्या मुळाशी पुरतात. समज असा की, आईप्रमाणे त्या झाडापासून मूल रसपान करू शकते. गोंडांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. मृत व्यक्तीच्या शरीरावर काजळ किंवा हिंगुळाची खूण करतात व नवजात बालकाच्या शरीरावर अशी एखादी निशाणी दिसल्यास त्या मृत व्यक्तीचा पुनर्जन्म झाला असे समजतात. दुखवटा साधारणतः तीन दिवस पाळतात. प्रेताला खांदा देणारे व आप्तेष्टांना जेवण देऊन तीन दिवसानंतर

दुखवटा संपून घरातील लोक सामान्य जीवन जगायला सुरुवात करतात. मृत व्यक्ती आपल्या पितरात विलीन होण्यासाठी देवकारण हा एक महत्त्वाचा विधी करतात. देवकारण झाल्याशिवाय त्या कुटुंबात इतर कोणतेही मंगल कार्य होत नाही.

जानको, मानको, जंगो, लिंगो, राहूड मेडचाल, कल्यासूर, भीमाल, डोंडेरा, सिपीसेळमा, बुरालपेन, पेरसापेन, डुवालपेन, निशानपेन, सतीक इत्यादी आराध्य देवता, तसेच हीरा-ज्योती, कोरेसुंगाल, नागदेव व नारायणदेव या कुलदेवतांची ते आराधना करतात. कोटापरदोली, धनेगाव पटाळ, देऊरकसा, कोयलीकचाळ, भैसागढ, ढगा आणि भीमगढ ही गोंडी देवतांची तीर्थक्षेत्रे होत.

मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर गोंड धरणीमातेची ओटी भरताना खालील गीत गातात.

सोनेता तिफून हिराना जाडा।
चांदीता कासरांग मसांग।।
संगलोवेईलो मळमिना जोडा।
पोहराना सरता वीता।।
मोतीना कळोपने येददाना मोहतूर।
धरतीना ओटी निहीता।।

अर्थ—"सोन्याच्या तिफणीला चांदीच्या कासरांनी हिऱ्यांची धुरा बांधली. लग्नाच्या माझ्या अर्धांगीनीने मुहूरांच्या सरल्यातून मोत्यांच्या ओंजळीने धरतीमायची ओटी भरली".

पावसाळ्यात पीक डोलू लागल्यावर ते खालील गाणे म्हणतात.

मोटेरा मोट पारंग जियाल।
वळी नेकाल पिलम पोया।।
तला मिसे मिचके कियाल।
कन्क मिर्चानि परो।।
सिपीसेळमा नीक मुकदीरा।
कोई कुयवान सहावार।।

अर्थ—"मोटेच्या पाण्याने ढोलकीचे बोल उमटले. वाऱ्याने बासरी छेडली अन जमिनीत डोके खुपसून लपलेल्या लसणाने छछोर मिरचीवर डोळे मिचकावले. संगीत देवतेस वंदन असो. गोंड पामरांना आशिष मिळो".

गोंडांची पर्जन्यदेवता भीमालपेन होय. पाऊस पडण्याकरिता ते भीमाला बोलावतात. भीमालपेन, राहूड, कल्यासूर आणि जंगोरायताड या देवता काटोळांच्या अंगात संचार करवतात. काटोळा भगत हा जादूमंत्र जाणणारा पुजारी आणि कुशल रोगनिवारक वैद्यही असावा लागतो. भावी संकटाचा पूर्व इषारा देणारा देव म्हणजे राहूड. विश्वनिर्मिती पेरसापेनच्या इच्छेने होते असे गोंड मानतात. पेरसापेन हा अत्युच्च देव होय. फळापेन हे रूप परमश्रेष्ठ या अर्थाने त्यास चिकटले आहे. जनन आणि संगोपन हे फळापेनचे मुख्य कार्य गोंड लोकांनी लिंगपिंडम्च्या स्वरूपात प्रतिबिंबित केले आहे. जंगोरायताड ही देवता गोंड

लोकांच्या संपूर्ण जीवनात भिनलेली महत्त्वाची देवता होय. याशिवाय ते नागदेवता व नारायण-देवाची सुद्धा पूजा करतात. गोंडांचा मंत्रातंत्रावर फार विश्वास आहे. मंत्रातंत्राने रोग बरे होतात अशी त्यांची समजूत आहे. म्हणून खेड्यापाड्यांतील गोंड अशा वेळी वैद्यकीय उपचार न घेता मंत्रतंत्र जाणणाऱ्या भगताकडे जातात. खेड्यात साथीचा रोग पसरल्यास भूमक किंवा गावाचा पुजारी "गाव बांधणी" नामक विधी करतो. गावातील लोकांसोबत डुकराचे पिल्लू गावाच्या सीमेभोवती फिरवतो. त्यानंतर डुकराचा बळी देऊन त्याचे रक्त सर्व ग्रामदेवतांवर शिंपडतात आणि मांस भक्षण करतात. गाव बांधणीच्या दिवशी कुणीही मनुष्य किंवा प्राण्याला गावाबाहेर जाऊ देत नाहीत. गोंडांचा शकून अपशकुनावर तसेच भूत-पिशाच्च्यावर फार विश्वास असल्याचे आढळते.

श्रावण अमावस्येला पोळा या सणानिमित्ताने बैलाची पूजा केली जाते. गोंडी भाषेत बैलास "कोनंदा" असे म्हणतात. कोनंदा मराठीतील नंदीचे प्रतिरूप असावे. गोंड प्राणिपूजक व देवकवादी आहेत. परंपराभिमुख असलेली ही जमात समाजशास्त्रदृष्टचा विशेषतापूर्ण आहे.

रंगाने काळे असून त्यांची शरीरयष्टी मध्यम परंतु काटक असते. शरीररचनेची एक विशेषता म्हणजे त्यांचा चेहरा गोलाकार व पसरट असून नाक रुंद आणि बसके असते. गोंड महिलासुद्धा काटक असून पायात कासाचे वाळे, हातात लाखेच्या किंवा निकृष्ट धातूच्या बांगड्या व गळ्यात मण्यांच्या माळा घालतात. गुढग्याचे वरून लुगडे नेसून पदर खांद्यावरून घेतात. चोळी घालत नाही. परंतु अलीकडे गोंड महिला वेशभूषा करू लागल्या आहेत. सुस्थितीतील महिला परंपरागत आभूषणांशिवाय किंमती अलंकारसुद्धा घालतात. अंगावर गोंदून घेण्याची प्रथा लोकप्रिय आहे. गोंदण हे मृताबरोबर परलोकात जाते अशी समजूत आहे.

आता गोंड तरुण शिक्षणाकडे आकृष्ट होत आहे. तरी गरिबीमुळे शिक्षणाचे प्रमाण कमीच आहे. बहुतेक गोंडांची घरे कुडाची व गवती छपराची असतात. मातीची घरे क्वचितच आढळतात. खिडक्यासुद्धा नसतात. स्वयंपाकासाठी बहुतेक मातीची मडकी अथवा अल्यु-मिनियमची भांडी आढळतात. रोजच्या जेवणात ज्वारीची भाकरी, चटणी व आंबील असते. गरिबीमुळे घुगऱ्या व मोहाची फुले खाण्याचे प्रसंग त्यांच्यावर बरेचदा येतात. मोहाच्या फुलांचा खाण्यासाठी व दारू काढण्यासाठी उपयोग करतात. दारू गोंड जनजीवनातील महत्त्वाचा पदार्थ आहे. डुक्कर, ससा, हरिण, बकरा, कोंबडा, घोरपड, मासे, उंदीर इत्यादी प्राण्यांचे मांस ते आवडीने खातात. उंदीर हा उत्कृष्ट खाद्यपदार्थ समजून त्याला पकडण्या-करिता खूप मेहनत घेतात.

गोंडांची जातपंचायत असते. लहानमोठे तंटे पंचायतीद्वारे सोडविले जातात. जातीच्या रूढींचा भंग करून परस्त्रीगमन अथवा अनैतिक कृत्य करणारास जाती बहिष्कृत केले जाते. तथापि दिलेली शिक्षा भोगल्यावर त्या व्यक्तीस पुन्हा जातीत घेतले जाते. गुन्हेगार व्यक्ती पंचायत सभासदांना दंड देते. हे पैसे दारूवर खर्च केले जातात.

दुर्गम भागातील अशिक्षित गोंड आपापसात गोंडी भाषा बोलतात. इतर लोकांशी मात्र ते मराठी बोलतात. अलीकडे मराठी संभाषणाचा प्रसार बराच झालेला दिसतो.

परधान

ही आदिवासी जमात प्रामुख्याने जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागात आढळते. जिल्ह्यातील पारगोठाण, ब्राह्मणवाडा, काचनूर, वाठोडा, नांदपूर इत्यादी खेडी केवळ परधानांच्याच वस्तीची आहेत. परधान हे नाव "प्रधान" या शब्दापासून आले आहे. हे लोक स्वत:ला "पाळाल" जातीचे समजतात. गोंड राजाचे वंशज या नात्याने "कोयतूर" लोक स्वत:ला गोंड म्हणवितात तर गोंड प्रधान मंत्र्यांचे वंशज म्हणून पाळाल लोक स्वत:ला परधान म्हणवून घेतात. परधानांना काही भागात "पळंगाल" असेही म्हणतात. पूर्वी परधान हे गोंडांचे पुरोहित व भाट होते. मध्ययुगात ते गोंड राजांच्या दरबारात वंशावळी ठेवण्याचे काम करीत, असे एक मत आहे. काही लोक इतिहास कथन व कथाकथन गीतरूपाने सांगून चरितार्थ चालवित. "घटचा" व "भूमक" लोक परधान जमातीतील असून ते नेता आणि धर्मगुरू अशा आशयाची भूमिका पार पाडतात. गोंडांची राज्ये आपण चातुर्याने व अक्कलहुशारीने चालवून गोंडांना मार्गदर्शन केले, ही बाब परधान लोक अभिमानाने सांगतात. काही परधान महिला गोंड लोकांकडे सुईणीचे व त्यांच्या मुलींच्या अंगावर गोंदण भरण्याचे काम करीत. गोंड राज्याच्या अस्तानंतर त्यांची ही कामे आपोआप बंद पडली व ते मोलमजुरी करू लागले.

परधानांना पन, पठारी, देसाई, मोकाशी किंवा भाऊ अशीही नावे आहेत. त्यांची आडनावे देवावरून पडलेली असून पुढीलप्रमाणे आहेत : **सातदेवे**—पंधराम (पंधरे), मडावी, कुलसंगे, मसराम, धुर्वे, करनाके, कन्नाके, जुमनाके, जुगनाके, नवराते, सयाम व पुरकाम; **सहादेवे**—चिडाम, सीराम, पेंदाम, गेडाम, पेंदोर, श्रीरामे, उईके, कुळमेथे, मराफे, आत्राम, कुसराम, मरतेकी, नरपाचे व तोंडासे; **पाचदेवे**—किन्नाके, येटे, कुंभरे, सुरपाम, कोरचे आणि **चारदेवे**—पोयाम, सिडाम, मडकाम, कोवे, आडे, टेकाम व घोडाम.

परधान लोक समरक्त गटातही (Consanguine Group) विवाह करतात. यानुसार आतेबहीण व मामेबहिणीशीही विवाह होऊ शकतो. पण त्यासाठी मुलामुलींची पसंती लक्षात घेतली जाते. पूर्वी मुलीस दहेज (Bride Price) देण्याची प्रथा होती. आता ही प्रथा बंद पडलेली आहे. पूर्वी लग्न उकीरड्यावर आणि वराकडे लागत असे. सांप्रत ही प्रथा बंद पडली असून आता लग्न मुलीकडे लागते. साखरपुड्याच्या निमित्ताने "आरती", साडीचोळी देण्याचा विधी करून वाङ्‌निश्चय करतात.

विवाहविधी तीन दिवस चालतो. पहिल्या दिवशी मांडव घालून मुलीला हळद लावली जाते. नातेवाईकांच्या घरी तिला आंघोळीसाठी बोलावतात. देवादेवीचा कार्यक्रम होतो. दुसऱ्या दिवशी घडी चढविण्याचा कार्यक्रम होतो. यात सर्व आप्तेष्ट एकत्र जमतात. पाच सवाहित जोडपे मुलीसह आंघोळ करून तिला नवीन कपडे देतात. नातेवाईक मुलीच्या आईवडिलांना अहेर देतात. अशाच प्रकारचे उपचार वराकडेसुद्धा होतात. वधूला किंवा वराला हळद लावण्यापूर्वी महिला वाजतगाजत भिवसन देवाजवळ जातात व त्याची पूजा करून त्याला हळद वाहतात. मंडपातील बोहल्यावर नवरानवरीस समोरासमोर उभे करून अंतरपाट धरतात. वधूवर हातात अक्षत व फूलमाळा घेऊन उभे असतात. मंगलाष्टके म्हणण्यासाठी ब्राह्मणास न बोलावता कुणीतरी जाणकार माणूस ते कार्य पार पाडतो. वर वधूच्या गळ्यात काळी पोत बांधतो. यानंतर तो तिला कडेवर घेऊन बोहल्याभोवती

फिरतो. यावेळी "किकसा" (हळद व ज्वारीच्या पिठाचे मिश्रण) एकमेकाच्या अंगावर फेकतात. वाद्यांच्या गजरात गाणी म्हटली जातात. यानंतर सर्व लोक नदी किंवा तलावावर आंघोळ करतात. विवाहविधी आटोपल्यानंतर वधू नऊ दिवसपर्यंत वराकडे राहते. नंतर काही दिवसासाठी माहेरी येते.

पहिले बाळंतपण माहेरी करण्याची प्रथा आहे. पहिल्या बाळंतपणात कोडकौतूक केले जातात. एरवी आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे प्रसूतीची वेळ जवळ येईपर्यंत महिला काम करीत असतात. पाचव्या दिवशी पाचवी करतात. या दिवशी गोड जेवण असते. सहाव्या दिवशी सटीची पूजा करताना शेजारच्या महिलांना बोलावून जेवण व दारू देतात. या दिवशी मुलाचा मामा त्याच्या डोक्याच्या मागचे व पुढचे दोन दोन केस कापतो. बाळंतीणीच्या खाटेजवळ दिवा तेवत ठेवतात. पण त्याच्याकडे नवजात अर्भकाची दृष्टी गेल्यास ते तिरळे बनते अशा समजुतीमुळे आवश्यक खबरदारी घेतात. बाराव्या दिवशी बारसे केले जाते.

मुलगा झाल्यास अंगणात एक भाला ठेवतात. याचा अर्थ असा की, एक क्षत्रिय जन्माला आला. मुलगी झाल्यास मातेच्या माहेरी अंगणात भाला ठेवतात. घरातल्या वीरासाठी आम्हाला भावी बायको मिळाली, असे त्यावरून सूचित होते.

भगवान ही त्यांची मृत्यू देवता आहे. मृत्यूनंतर माणसाचा आत्मा भगवानाकडे जातो, त्याच घरात मुलाच्या रूपाने जन्माला येतो किंवा असमाधानी भूत म्हणून गावाभोवती फिरत राहतो अशी त्यांची समजूत आहे. आसन्नमरण माणसाचे सर्व नातेवाईक जमतात. मृत्यूनंतर त्याच्या तोंडात एक नाणे व थोडे दही घालून शोकगीते गातात. आर्थिक परिस्थितीनुसार मृतदेह पुरतात किंवा जाळतात. प्रेत खड्ड्याभोवती तीनदा फिरवून त्याचे डोके दक्षिणेकडे ठेवून पुरतात. अंत्येष्टीला येताना प्रत्येक व्यक्ती सिवला झाडाच्या डहाळ्या आणतो आणि थडग्यात टाकतो. प्रेत जाळावयाचे असेल तर त्या फांद्या मृताच्या मोठ्या मुलाकडे देतात आणि तो त्या चितेवर टाकतो. प्रेत जळत असताना एकजण त्याच्या डोक्याकडे व दुसरा पायाकडे बसतो. मग ते दोघे एकमेकाकडे तीनदा कुऱ्हाड टाकतात. प्रेत जळल्यावर सर्व जण झऱ्यावर स्नान करून मृताच्या घरी जातात. तिथे त्यांना हात, पाय व डोक्याला लावायला थोडे तेल आणि प्यायला दारू देतात. दहाव्या दिवशी घरातील महिला रक्षा गोळा करून नदीत टाकतात. पुनर्जन्मावर विश्वास असल्यामुळे नदीतला एक मासा पकडून नवीन मडक्यात ठेवतात. संध्याकाळी भोजन झाल्यावर मृतात्मा परत आला आहे असे समजून तो मासा फेकून देतात. रात्री नृत्याचा कार्यक्रम होतो. सहा महिन्यानंतर आणि वर्षानंतर श्राद्ध करतात.

परधान गोंडापेक्षा अधिक भावनाप्रधान आहे. धार्मिक मनोवृत्तीचा परधान सकाळी उठल्याबरोबर जमिनीवर पाय ठेवण्यापूर्वी तिला हाताने स्पर्श करतो. वृद्ध परधान मुखमार्जन झाल्यावर आपले "बना" वाजवून काही स्तोत्रे म्हणतो. परधान लोक निरनिराळे सण व उत्सव विशेषतापूर्वक साजरे करतात. आषाढी एकादशी, जीवती, पोवती, नागपंचमी, दिवाळी, महाशिवरात्री आणि शिमगाफाग हे सण मोठ्या धडाक्याने साजरे करतात. दर तिसऱ्या वर्षी साजरा करण्यात येणारा "नारायणपेन" नावाचा एक उत्सव या जमातीत साजरा करतात. विदर्भातील पिंपळगावला एका भक्ताच्या अंगात येणारी देवता "जगोबाई" व "राहू" आणि वाठोडा गावी भक्ताच्या अंगात येणारा "भीमा" यांचे दरवर्षी मोठे समारंभ होतात. त्यात हजारो परधान भाग घेतात. नागपूर भागातील भीमगड येथेही परधानांची भव्य यात्रा भरते.

भीम ही परधानांची ज्येष्ठ देवता आहे. हा भीम पांडवांपैकी नसून तो वरुण देवता आहे. ीमाच्या कृपेने पाऊस पडतो अशी त्यांची श्रद्धा आहे. परधानांचा हा भीम महादेवाचा ख्खा भाचा आहे अशी त्यांची समजूत आहे. परधानांचे कारून व जीवती हे सणोत्सव ाद्धाशी संबंधित आहेत. आषाढीला व जीवतीला प्रत्येक परधान आपापल्या कुलदेवतेची जा करतो. नागपंचमीला "बाऱ्या" नावाची लोकगीते गातात. त्या दिवशी जादुटोण्याच्या त्रांची काही परधान उजळणी करतात. शिमगाफाग हा परधानांचा एक महत्त्वाचा सण ाहे. धुलीवंदन व होळीचा सण इतरांप्रमाणेच असला तरी फाग गीते ही त्यांची विशेषता ाय. होळीला हे लोक गिरजामाय म्हणतात. तिला "माणको देवी" असेही म्हणतात. ही हाकालीची प्रतिमा आहे. वराहपूजेचा नारायणपेन नामक उत्सव दर तीन वर्षांनी साजरा रतात. या उत्सवात डुकराच्या पिलाची पूजा करतात. हे पिलू मुद्दाम वाढविलेले असते. ारायणपेनाची पूजा करताना नृत्यगायनाचा कार्यक्रम होतो. पूजा संपल्यावर वराह ाजून खातात.

परधान ही जमात गीतप्रेमी असून लोकरंजनात्मक लोकगीत गायनासाठी प्रसिद्ध आहे. यांच्या बोली भाषेत लोकगीते भरपूर आहेत. नृत्यगायनात ते बना नामक वाद्याचा पयोग करतात. बना वाद्यावर त्यांची फार भक्ती असते. बना हे लाकडी वाद्य असते. रधानांच्या जीवनात त्याला फार मोठे स्थान असते. ते बडापेनचे प्रतीक आहे असे ते मजतात. बना वाजवल्यामुळे बडापेन पृथ्वीवर उतरला अशी त्यांची एक कथा आहे. ोरपिसे, घुंगरू व लोकरीचे गोंडे लावून बनाला सजवतात.

परधान गोंडापेक्षा बुद्धिमान, हजरजबाबी आणि विनोदी असतो. दिसायलाही गोंडापेक्षा ांगला असून त्याचे शरीर चिवट आणि चपळ असते. महिला देखण्या असून त्यांना दागिन्यांची ावड असते. हे लोक मांसाहारी आहेत. दारूचा उपयोग मुक्तपणे केला जातो. कारण दारू यांच्या धार्मिक जीवनातील अविभाज्य बाब आहे. रोजच्या जेवणात ज्वारीची भाकरी, ुखादी भाजी, चटणी व आंबील समाविष्ट असते. गरीब लोक फक्त सणासुदीला भात ातात.

सावकाश का होईना परंतु गोंड, कोलाम व परधान या समाजात शिक्षणाचा प्रसार होऊ ागला आहे. जिल्ह्यातील काही तरुण परधान उच्च शिक्षित असून शासकीय सेवेत आहेत. यांच्यात समाजसुधारणा करणाऱ्यांना शासनाने "आदिवासी सेवक" पुरस्कार देऊन गौरविले ाहे. बहुसंख्य लोक मात्र गरीब मजूर असून अशिक्षित आहेत. परधानांचा भूतपिशाच्च्यावर विश्वास असतो. ते चेतनवादी व प्राणिपूजक आहेत. त्यांची स्वतंत्र बोली भाषा असून तिचे ोंडी बोलीशी साम्य आढळते. समूह नृत्य व लोकगीते ही त्यांची सांस्कृतिक विशेषता आहे.

ारधी

पारध व्यवसायावरून या जातीला पारधी हे नामाभिधान प्राप्त झाले. जिल्ह्यात फासे-पारधी अधिक आहेत. त्यांच्या साडेबारा जाती आहेत असे सर्वेक्षण प्रसंगी काहींनी सांगितले. परंतु त्या जाती कोणत्या हे कोणालाही सांगता आले नाही. त्यांची आडनावे भोसले, पवार, चव्हाण, राठोड व जाधव अशी असतात. समान कुळात हे लोक लग्न करीत नाहीत.

विवाह प्रसंगी मुलाकडे सात मेडीचा व मुलीकडे पाच मेडीचा मंडप घातला जातो. मंडपाला जांभूळ व उंबर वृक्षांच्या डहाळ्यांनी सजवतात. मंडप पूजनानंतर वर वधूकडे

जाण्यासाठी निघून सरळ मंडपात येतो. तेथे मंडपाच्या प्रवेशद्वारावर आडवी काठी धरून वधूकडील पाच जोडपी वराला ओवाळतात. आप्तेष्ट महिलांच्या हजेरीत मग वधूवर कवड्या खेळतात. एकमेकांवर पाणी उडवितात. लग्न लागण्यापूर्वी पदर आडवा घेऊन वधूवरांच्या हाताला कंकण बांधतात. यानंतर त्यांना देवासमोर बसवून यांच्यातील भगत नवरानवरीला टिका लावतो. हाच लग्नविधी होय. विवाहविधी संपन्न झाल्यानंतर नवरीकडेच चार दिवस भोजन असते. भोजनाचा सर्व खर्च वराचा पिता करतो. पाचव्या दिवशी वधूपिता सर्व मंडळींना जेवण घालतो. पाचही दिवस वधूवरांना सकाळ-संध्याकाळ हळद लावून आंघोळ घातली जाते. पाचही दिवस वधूला केस मोकळे ठेवावे लागतात. पहिले दोन दिवस वधूला हिरवी साडी व तिसऱ्या दिवशी लाल साडी नेसावी लागते. लाल साडी नेसूनच वधूला वराबरोबर त्याच्या घरी जावे लागते. यावेळी व्याह्यांची उरभेट होते.

पहिल्या प्रसूतीसाठी गर्भवतीला माहेरी पाठविण्याची प्रथा या जातीत नाही. पाचव्या दिवशी पाचवीची पूजा व बाराव्या दिवशी बारसे होते. पाच दिवस सुहेर पाळतात. मुलगा झाल्यास तीन महिने व मुलगी झाल्यास चार महिने बाळंत बाईला स्वयंपाक करू दिला जात नाही.

मृतदेह जाळण्याची प्रथा या जातीत प्रचलित नाही. पाय उत्तरेकडे व डोके दक्षिणेकडे ठेवून मृतदेह पुरतात. पुरलेल्या ठिकाणी तीन दगड ठेवून त्यांना तेल व शेंदूर लावतात. अविवाहित व्यक्ती मरण पावल्यास त्यावर दगड ठेवीत नाहीत व शेंदूर अथवा तेल लावीत नाहीत. पुरुषाचे तेरवे व महिलेचे अकरावे करतात.

दसरा पारध्यांचा मुख्य सण होय. याप्रसंगी माहूरच्या देवीच्या नावाने एक रेडा व बकरा बळी देतात. घोराळे नावाचा दुसरा महत्त्वाचा सण गुढीपाडव्याला साजरा करतात. तेव्हा भवानीला तीन बोकड व एक मेंढा बळी देतात.

फासेपारधी दणकट व स्वच्छंदी असून गुरेढोरे व कुटुंबासह स्थलांतर करतात. पुरुषांच्या डोक्याला मुंडासे अथवा पागोटे आणि कमरेला अपुरे धोतर असते. बायका आखूड लुगडे-चोळी अथवा घागरा नेसतात. त्यांच्या कानांत बाळचा आणि पायांत साखळ्या असतात. महिला व पुरुष गळ्यात रंगीबेरंगी मण्यांच्या माळा घालतात. स्थायिक झालेल्या पारध्यांचा पोषाख कुणब्यांप्रमाणे असतो. शिकारीव्यतिरिक्त दगडी वस्तू बनविणे, औषधी वनस्पती विकणे व मोलमजुरी हे त्यांचे मुख्य व्यवसाय होत. बहुतेक पारधी वाघरी बोली भाषा बोलतात. वाघरीचे जाटांच्या भाषेशी साम्य दिसते.

बौद्ध

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ मध्ये आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यामुळे भारतात बौद्ध धर्माच्या पुनरुत्थानाला चालना मिळाली. महाराष्ट्रात महार जातीच्या लोकांनी त्यावेळी मोठ्या प्रमाणावर बौद्ध धर्म स्वीकारला. वर्धा जिल्ह्यात १९८१ च्या जनगणनेनुसार १,२९,०२१ बौद्धधर्मीय असून ते सर्वत्र आढळतात. १४ ऑक्टोबर १९५६ पूर्वी सर्वत्र हा समाज महार म्हणून ओळखला जात होता. त्यावेळी महारांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती अत्यंत दयनीय होती. डॉ. आंबेडकरांच्या महान प्रयत्नांनी आज हा समाज बराच सुधारल्याचे दिसून येते. इ. स. १९८१ च्या जनगणनेनुसार १,२९,०२१

यक्ती बौद्ध असल्या तरी तोपर्यंत ७,४६१ महारांनी बौद्ध धर्म स्वीकारलेला नव्हता. पूर्वी ा भागात महारांचे लाडवण, सोमवंशी, बावने, कोकरे, अंधवन, बारके, भाट, इत्यादी ोटभेद आढळत. वर्धा जिल्ह्यात सोमवंशी व लाडवणांची संख्या अधिक होती. धर्मांतरामुळे यांच्या जीवनात बराच बदल घडून आला. त्यांनी निकृष्ट दर्जाची पारंपरिक गावकीची ामे बंद केली. बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे जुने हिंदू रीतीरिवाज बंद केले. तथापि काही हिंदू ण ते साजरे करतात. बौद्ध धर्माचे अनुयायी झाल्यामुळे तत्त्वतः ते आता जाती अथवा पोट- ाती मानीत नसले तरी व्यवहारात अजूनही जाती-पोटजातींचे अवशेष आहेत. जिल्ह्या ील बौद्धांची आडनावे पुढीलप्रमाणे आहेतः—काळभांडे, दहाट, खाकसे, चतुरे, मागले, कांबळे श्राम, रामटेके, वानखेडे, सरदार, कळके, पानतावणे, कस्तूरे, नारनवरे, तायडे, तागडे वई, देशभ्रतार, चहांदे, सूर्यवंशी, नागदिवे, शेंडे, अंबादे, बोदेले, टेंभूर्णे, भैसारे, शहारे- ांभूळकर, राऊत, लाडे, वालदे, कोटांगले, सौदागर, गवळी, विघ्ने, तेलगोटे, धोंगडे, म्हैसकर, नबंधू, गेडाम, वाघमारे, ताकसांडे, हगवणे, बनसोड, थोरात, जाधव, खांडेकर, किटके, वादे, खंडेराव, नगराळे, सवाईथूल, डोळे, खोब्रागडे, मून, मूल, भगत, सोनवणे इत्यादी

निव्वळ शेतीवर उपजीविका होत नसल्यामुळे शेतमजुरी करावी लागते. नागपूर शहर वळ असल्यामुळे बरेच लोक कामधंद्यासाठी तिकडे धाव घेतात. शिक्षण घेण्याकडे कल दिसतो. परिणामी शासकीय नोकऱ्यांमध्ये त्यांचा भरणा वाढला आहे. तरी बहुसंख्य लोक ार्थिकदृष्टया दुर्बल आहेत.

दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर अनुक्रमे डॉ. आंबेडकरांचा जन्मदिन व महापरिनिर्वाण- दिन म्हणून पाळतात. दसरा किंवा १४ ऑक्टोबर धम्मचक्रप्रवर्तन दिन म्हणून व वैशाख ौर्णिमा बुद्ध जयंती म्हणून मोठ्या उत्साहाने साजरे करतात. या प्रसंगी मिरवणुका व ाहीर सभा घेतल्या जातात. प्रत्येक पौर्णिमेला बौद्धधर्मीय लोक खास तिथी मानतात. ारण बौद्ध धर्मातील बऱ्याच महत्त्वाच्या घटना पौर्णिमेस घडलेल्या आहेत. जन्म, नामकरण, विद्यारंभ, दीक्षा, लग्न आणि मृत्यूनंतर मृतकदान हे विधी साजरे करण्याबद्दल बौद्ध संस्कार विधीमध्ये सविस्तर माहिती दिली आहे. त्याप्रमाणे ऐपतीनुसार हे विधी बौद्ध लोक ार पाडतात.

सर्वसाधारणपणे मुलीचे व मुलाचे लग्नाचे वय अनुक्रमे १८ व २१ वर्षांचे असते. बाल- विवाहाची प्रथा बंद होत आहे. मुलीची निवड झाल्यावर मुलाचे आईवडील आपले निवडक ातेवाईक आणि काही प्रमुख व्यक्तींसह साखरपुड्यासाठी मुलीच्या घरी जातात. एका उच्चासनावर भगवान बुद्ध व डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमांसमोर अगरबत्या व मेणबत्या ावतात. सुवासिनी नियोजित वधूला कुंकूम तिलक लावतात. वधूवराने पांढरी नवी वस्त्रे रिधान केलेली असतात. बौद्धाचार्य किंवा भिक्षू नियोजित वधूवरांना प्रतिमांना फुले अर्पण रावयास लावून त्रिसरण व पंचशील प्रदान करतो. यानंतर त्रिरत्न वंदना म्हटली जाते. धूवरास समोरासमोर उभे करतात. सोन्याच्या अंगठ्या एकमेकांच्या बोटात घालतात किंवा पुष्पगुच्छ देतात.

विवाह समारंभ मुलीच्या घरी उभारलेल्या मंडपात किंवा मंगलकार्यालयात होतो. ग्नप्रसंगी वधूवर पांढरे वस्त्र परिधान करतात. उच्चासनावर भगवान बुद्ध व डॉ. ांबेडकरांच्या प्रतिमा ठेवून त्यांच्यापुढे अगरबत्या व पाच मेणबत्या लावतात. प्रतिमांसमोर ाण्याने भरलेला मातीचा नवीन कुंभ असतो. त्यात आंब्याची, बोधिवृक्षाची अथवा नाग- लीची पाने ठेवतात. कुंभाच्या तोंडाला तीन किंवा पाच पदरी पांढरा धागा गुंडाळलेला

असतो. वधूवर प्रतिमांना फुले अर्पण करतात व त्यांच्यापुढे एकमेकासमोर तोंड करून उभे राहतात. कुंभाच्या तोंडाला गुंडाळलेल्या धाग्याचे एक टोक भिक्षू किंवा बौद्धाचार्य वधूवराच्या हातात देतो. दुसरे टोक आपल्या हातात धरतो. भिक्षू त्रिसरण व पंचशील म्हणतो आणि त्याच्या मागे वधूवर म्हणतात. यानंतर भिक्षू त्रिरत्न वंदनापाठ करतो. त्रिरत्न वंदना झाल्यावर वधूवराच्या हातातील धागा काढून घेऊन तो कुंभात सोडतात व त्यांच्या हातात पुष्पमाला देतात. भिक्षू किंवा बौद्धाचार्य जयमंगल अठ्ठगाथा म्हणण्यास प्रारंभ करतो. प्रत्येक गाथेच्या शेवटी उपस्थित लोक वधूवरावर पुष्पवृष्टी करतात. शेवटची गाथा संपल्यावर वधूवर एकमेकांच्या गळ्यात हार घालतात. वाद्यांचा गजर होतो. त्याचवेळी पुष्पवृष्टी करून लोक टाळ्या वाजवतात. वधूवर प्रतिमांसमोर हात जोडून उभे राहतात व भिक्षू काही गाथांचे पठण करून वधूवराचे अभिष्टचिंतन करतो. कुंभातील धागा वधूवराच्या हाताला बांधतो. अशा प्रकारे विवाह विधी संपन्न होतो.

नामकरण, विवाह व अत्येष्टी हे तीन प्रमुख संस्कार होत. काही लोक विद्यारंभ हा संस्कार करतात. मुलाच्या जन्मानंतर साधारणतः १२ व्या दिवशी नामकरण विधी होतो. काही लोक एक वर्षात केव्हाही नामकरण करतात. यावेळी बाळ आणि त्याचे आईवडील पांढरे कपडे घालतात. भगवान बुद्ध व डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून त्यासमोर अगरबत्ती व मेणबत्ती लावतात. पाण्याने भरलेला मातीचा नवीन कुंभ ठेवतात. त्याच्या गळ्यात तीन किंवा पाच पदरी नवीन धागा बांधतात. भिक्षू त्रिसरण व पंचशील म्हणतो. धाग्याचे एक टोक भिक्षू किंवा बौद्धाचार्य स्वतःच्या हातात धरतो व दुसरे टोक नवजात मूल, त्याचे मातापिता व उपस्थितांच्या हातात देतो. यानंतर तो बुद्ध, धम्म व संघवंदना तसेच रतनसुत्त, करणीयमेत्तसुत्त, महामंगल गाथा इत्यादींचे पठण करतो. सुत्तपठणानंतर तो मुलाचे नाव जाहीर करतो. पांढरा धागा मुलाच्या, त्याच्या आईवडिलांच्या व उपस्थितांच्या हातात बांधतो. हा धागा व कुंभातील पाणी पवित्र समजले जाते.

बौद्ध लोक मृत्यू ही दुःखद घटना मानत असले तरी धर्माच्या शिकवणुकीनुसार अनासक्त राहून मृत शरीराची अंत्येष्टी योग्यतऱ्हेने करण्यापलीकडे त्यास महत्त्व देत नाहीत. अंतसमयी भिक्षूचे दर्शन करवितात. मुंडण, अश्मा, पाण्याने भरलेले मडके खांद्यावर घेऊन चितेभोवती फिरणे, सुतक, पिंडदान व श्राद्ध यापैकी काहीही करीत नाहीत. मृतास आंघोळ घालून वस्त्राने अंग झाकून तिरडीवर बांधतात. यानंतर भिक्षू पंचशील व त्रिसरण म्हणतो, त्याच्यामागून उपस्थित सर्वजण म्हणतात. तिरडी उचलून लोक स्मशानाकडे चालू लागतात. स्मशानात गेल्यावर पुन्हा पंचशील व त्रिसरण म्हटले जाते. मृतास अग्नी देतात किंवा पुरतात. अग्नी देताना किंवा पुरताना भिक्षू काही गाथांचे पठण करतो. तिसऱ्या दिवशी मृताच्या अस्थी गोळा करून विधिवत नदीत विसर्जन करतात. आर्थिक ऐपतीनुसार ज्ञातिबांधवांना दहाव्या किंवा तेराव्या दिवशी किंवा सोयीनुरूप भोजन देतात. यावेळी भिक्षूस दान देतात.

मांग

जंब ऋषीपासून आपली उत्पत्ती झाली असे हे लोक सांगतात. जिल्ह्यात यांच्या अस्सल मांग, दखने मांग, बुरुड, माजगी व मांग-गारुडी या पोटजाती आढळतात. त्यांची मुगले, पानखेडे, जाधव, लोखंडे, बेंडे, खंडारे, बोरकर, गायकवाड, डोंगरे, बेहाडे, निखाडे, कामरे, दुगे, डोके, पोटफोडे, बावणे अशी आडनावे आढळतात.

प्रत्येक गट अंतर्विवाह गट असून त्यांच्यात सकुळ विवाह निषिद्ध आहे. मामेबहिणीशी लग्नास परवानगी असून आतेबहिणीशी लग्न निषिद्ध मानतात. विवाह हिंदू विवाह पद्धतीनुसार कुणब्यांप्रमाणेच होतात. उपाध्ये, जंगम पौरोहित्य करतात. यांच्या बहिरोबा, खंडोबा व काळूबाई या कुलदेवता आहेत. यांच्यात घटस्फोट, पुनर्विवाह अथवा विधवाविवाहास मान्यता असून विधवाविवाह कृष्णपक्षात रात्री गांधर्वविवाह पद्धतीने होतो. त्यास पाट लावणे असेही म्हणतात. यांच्यात देवक बसवितात. देवकांत कोल्हा, अंडूर (बेंडे गवत), आंब्याची पाने, लव्हाळी व उंबर यांचा समावेश असतो. समान देवकात विवाह निषिद्ध मानतात. पूर्वी बालविवाह होत. आता ही प्रथा लोप पावली आहे. विदर्भातील मांग महाराष्ट्रातील इतर मांगापेक्षा आपण वरच्या दर्जाचे असल्याचा दावा करतात.

प्रसूतीनंतर पाचव्या दिवशी सटवाईची पूजा करतात. सुहेर बारा दिवस पाळतात. बाराव्या दिवशी बाळ-बाळंतीणीला स्नान घालून मुलाचे नाव ठेवतात. मुलाचे जावळ एक ते तीन वर्षांच्या दरम्यान काढतात.

पार्थीव देहास स्नान घालून नवीन कपडे नेसवून तिरडीवर ठेवतात. वस्त्राच्या टोकाला तांब्याचे नाणे व धान्य बांधतात. वाटेत थांबून मृताच्या वस्त्रातील नाणे फेकून देतात. स्मशानात खड्डा खणून त्यात प्रेत पालथे पुरतात. प्रेतावर माती लोटून नदीवर स्नान करतात. तिसऱ्या दिवशी उत्तराधिकारी स्मशानात जातो आणि मृतात्म्याला अन्नदान करतो. तेराव्या दिवशी तो स्मशानात तेरा द्रोण पाण्याने भरून ठेवतो. त्याच दिवशी आप्तेष्टांना जेवण देतात. मांग लोक शैव असून ते महादेवाला भजतात. बहिरोबा, खंडोबा, म्हसोबा, अंबाबाई, जनाई, विठोबा व बमाई त्यांच्या मुख्य कुलदेवता आहेत. पूर्वी गावात पटकी उद्‌भवल्यास ते मरीआईस बकरा बळी देत असत. मांग चेतनवादी असून मंत्रतंत्र, जादूटोणा, भुताटकी यावर विश्वास ठेवतात.

मुख्य अन्नात ज्वारीची भाकरी, वरण आणि मिरच्यांची चटणी असते. क्वचित प्रसंगी मांसाहार करतात.

पूर्वी काही मांग लोक गावचे पहारेकरी असत. या कामासाठी जमीन इनाम मिळालेली असे. सांप्रत बरेच लोक वाकाचे दोर वळून विकतात. काही जण केरसुण्या, टोपल्या व सुपे बनवतात तर काही वाजंत्री वाजवतात. बांबू कामातील कौशल्यासाठी त्यांची प्रसिद्धी आहे.

चांभार

चामड्याच्या वस्तू व पादत्राणे बनवणारी ही एक जात. या लोकांना मोची, चमार अशीही नावे आहेत. चर्मकार या संस्कृत शब्दापासून चमार, चांभार हे शब्द आले आहेत. जिल्ह्यात चांभारांचे डोहर व चांभार असे दोन पोटभेद आढळतात. डोहरांना चांभारांपेक्षा कमी लेखतात. डोहर मेलेल्या गुरांचे कातडे फाडून कमावण्याचे काम करतात तर चांभार कातड्याच्या वस्तू व पादत्राणे बनवितात. शहरांमध्ये उत्तर भारतातील मोचीही आढळतात. वर्धा जिल्ह्यात चांभारांची आडनावे पुढीलप्रमाणे आढळतात :— गिरडकर, सावरकर, चांदेकर, विजयकर, कललकर, हांडे, व्यवहारे, घोडे, म्हस्के, बोरकर, हरसूलकर, वाडेकर, काकडे, ठाकरे, भागवते, ठोंबरे, खेकडे, चाफेकर, लांडगे, कुरील, भगत, दांडेकर इत्यादी. चांभार व डोहर अंतर्विवाह गट असून ते सगोत्र व समान देवकात विवाह करीत नाहीत.

लग्न मंडपात एक खांब उभारतात. त्याच्या भोवती सात फेरे घालणे हा लग्नातील मुख्य विधी असतो. इतर सर्व विधी हिंदू पद्धतीप्रमाणेच केले जातात. मूल जन्माला आल्यावर महिला सोहर (सुहेर) गीते गातात. नवजात मुलाला भुताखेताची बाधा होऊ नये म्हणून तवा वाजवून आवाज करतात. बाराव्या दिवशी नामकरण विधी करतात.

हे लोक मृतांना पुरतात किंवा जाळतात व श्राद्ध करतात. दहाव्या दिवशी ज्ञातिभोजन असते. प्रामुख्याने नागपंचमी, दिवाळी व होळी हे सण चांभार पाळतात. गोवर्धन दिवाळी नावाचा आणखी एक सण असतो. त्या दिवशी गोमयाची कृष्णप्रतिमा करून बाल गोपाळांना जेवणही घालतात. चांभारामध्ये कबीर पंथीय व नानक पंथीय असून काही सतनामी पंथाचे अनुयायी आहेत. शिवाय ते अनेक साधू व बैराग्यांना भजतात. शिव, भैरव, गणपती व हनुमान या दैवतांनाही हे लोक भजतात. हे लोक अंधश्रद्धाळू असून त्यांच्यात भूतपूजा प्रचलित आहे. दगड-धोंडे, वृक्ष-वेली व पशु-पक्षी यांच्यात भुतेखेते वास करतात अशा समजुतीने हे लोक त्यांची पूजा करतात. काही चांभार सर्पपूजक आहेत.

भोई

नदीत मासे पकडणारी ही जात वर्धा जिल्ह्यात सर्वत्र आढळते. काही भोई स्वतःला माया मच्छिद्राचे तर काही वाल्मिकी ऋषीचे वंशज समजतात. यांच्या भणारी, मच्छिद्र, गाढव भोई, झिंगा भोई व धीवर या पोटजाती आहेत. जिल्ह्यात भणारी आणि मच्छिद्र भोई या पोटजातींचे लोक अधिक आहेत. मच्छिद्र व गाढव भोई यांच्यात विवाह होत नाहीत. बाकी सर्व बहिर्विवाह गट आहेत. मच्छिद्र भोई नाथपंथी आहेत. एकाच मामेकुळात व सकुळ विवाहसंबंध स्थापित होत नाहीत. यांची आडनावे पुढीलप्रमाणे आढळतात :— मडामे, मारबदे, मेश्राम, सिंदी मेश्राम, भोयर, शेंडे, चांदेकर, उके, दुधडके, कांबळे, हजारे, केवट, बुरे, मेसरे, कुकडे, बावने, सुरजूसे, निमसेळे, गाढवे, मोहिजे, पारिसे, कुरवाडे, डायरे, शिवरकार, कुंभलकार, मांढरे, पचारे, कावडे, चाचरकर इत्यादी.

पहिल्या गर्भारपणात सातव्या महिन्यात गर्भवतीची ओटी भरतात. तिला माहेरी आणून हिरवी साडी-चोळी व हिरवा चुडा घालतात. पहिले बाळंतपण सर्वसाधारणपणे माहेरीच करतात. पाचवी व षष्टी आणि बाराव्या दिवशी मुलाचे नामकरण करतात. विवाह हिंदू पद्धतीप्रमाणेच करतात. मृतदेह पुरण्याची प्रथा आहे. ऐपतदार मृताचे दहन करतात. मृत्यू संस्कार इतर हिंदू लोकांप्रमाणेच केला जातो. सर्व हिंदू सण व उत्सव साजरे करतात. महादेव हे मुख्य दैवत मानतात. मासेमारी मुख्य व्यवसाय असला तरी भणारी भोई फुटाणे भाजतात. त्यांना भडभूंजे असेही म्हणतात. गाढवे पाळणारांना गाढव भोई म्हणतात. ते चुना-रेती वाहण्याचे काम करतात. भणारी भोई डुकरे पाळतात. ते मच्छीमारी व शिकार करतात. शेती व्यवसाय, टरबूज व कलिंगडे पिकविणे हाही काहींचा व्यवसाय आढळतो.

सिंधी

सिंधी समाजाची वस्ती प्रामुख्याने वर्धा, आर्वी, हिंगणघाट व पुलगाव शहरांत आढळते. इ. स. १९८१ च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या ५,८४० होती. सर्वसाधारण हिंदूंप्रमाणेच त्यांच्यातही जातिभेद आहेत. त्यांच्या जाती व्यावसायिक गटांमध्ये विभागलेल्या आहेत. लोहाणा, भाटिया व खत्री प्रामुख्याने व्यापारी असतात. उच्चवर्णीय ब्राह्मणांत सारस्वत,

पुष्कर्णा जाजिक व भाट यांचा समावेश होतो. याशिवाय सोनार, वानहन, गुर, सहत व छप्रू याही जाती आढळतात. यापैकी बहुसंख्य सिंधी लोहाणा जातीचे आहेत. धर्माचरणाचे बाबतीत सिंधी इतर हिंदूंप्रमाणे कटाक्षाने वागतात. रामनवमी, दसरा, दिवाळी हे सण तर ते साजरे करतातच परंतु त्यांचे काही खास सण व उत्सव आहेत. त्यांत चेतीचांद, चालिहो, तिजरी, थडारी, महालक्ष्मी व गुरुप्रभ नामक धार्मिक उत्सवांचा समावेश होतो. त्यांच्या धार्मिक जीवनात जलदेवतेला विशेष स्थान आहे. भारताच्या फाळणीपूर्वी सिंध प्रांतात नद्यांची जलदेवता म्हणून पूजा करीत असत. जीवनदायिनी नदी त्यांना पूर्वीपासून वंद्य ! आपल्या पूर्वाश्रमीच्या प्रथा सिंधी लोक या प्रदेशात आल्यावरही आचरीत आहेत. हिंदू देवतांव्यतिरिक्त सिंधी लोक शीख गुरू नानकास भजतात. गुरु नानकाचा जन्मदिवस मोठ्या उत्साहाने व भक्तिभावाने साजरा करतात. त्यास गुरुप्रभ असे म्हणतात.[१०]

जैन

वर्धा जिल्ह्यात जैनधर्मीय एकूण लोकसंख्येच्या ०.५९ टक्के असून त्यांची वस्ती प्रामुख्याने नागरी भागात आहे. त्यातील बहुसंख्य व्यापारी आहेत. ग्रामीण भागातसुद्धा जैन आहेत. परंतु त्यांची संख्या कमी आहे. जैनांच्या दिगंबर आणि श्वेतांबर या शाखा आहेत. श्वेतांबर हे स्थानकवासी म्हणूनही ओळखले जातात तर दिगंबर जैनांचे तेरापंथी, वीसपंथी आणि तरणतारण असे तीन उपविभाग आहेत. जिल्ह्यातील जैनांची आडनावे पुढीलप्रमाणे आहेत :– खंडेलवाल, बघेरवार, सैतवार, बन्नोरे, धाकड, पल्लीवाल, पोरवाल, परवार, गंगेरवार, बडजाते, पाटणी, गंगबाल, पांडे, उमाठे, फुलंबरकर, मेघळ, चतूर, कहाते, भागवतकर, अवथनकर, रोडे, फुरसुले, पोफळी, कवडे, चवडे, फत्तेपुरीया, बैद, भुसारी, काळे इत्यादी.

धर्मनिष्ठ जैन सकाळी उठल्याबरोबर आपला उजवा खांदा जमिनीवर टेकतो. मग पूर्वाभिमुख होऊन उठतो आणि जिनदेवाची प्रार्थना करतो. नंतर पार्श्वनाथासारख्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात जातो व शक्यतो मनुष्य वा पशूचे दर्शन टाळतो. नंतर घरी येऊन समंत्रक गरम पाण्याने स्नान करतो. स्नानोत्तर धूतवस्त्र परिधान करून प्रार्थना करतो. घरातील देवदेवतांपुढे गंधफूल व मिठाई ठेवतो व जैन मंदिरात जाऊन जिनाची पूजा करतो. तेथील स्वामी जैन पुराण वाचतो. जप करतो. सूर्यास्तापूर्वी सायंकाळचे जेवण होते. पुन्हा मंदिरात जाऊन पुराणश्रवण करतात. विशेषतः चातुर्मासात जैन महिलाही प्रातःकाळी उठल्याबरोबर पार्श्वनाथाचे दर्शन घेऊन झाडलोट, स्वयंपाक वगैरे घरकाम करतात. स्नानोत्तर धूतवस्त्र परिधान करून, कुंकुमतिलक भाली लावून पुन्हा देवदर्शन घेतात. तीर्थ मस्तकी धारण करतात. सायंकाळी पुराणश्रवण करतात.

वर्ध्याच्या जैनांचे धर्माचरण म्हणजे मंदिरात चोवीस तीर्थंकरांची पूजा, तीर्थस्थानांना जाणे व उपवास करणे, घरांतील देवांची व क्षेत्रपालांची पूजा करणे आणि रोगराईचा प्रसार करणाऱ्या भूतपिशाच्चादिकांची नैमित्तिक शांती करणे असे म्हणता येईल. प्रत्येक महिन्यात चतुर्थी, अष्टमी, एकादशी, चतुर्दशी, पौर्णिमा व अमावस्येला जैन उपवास करतात. वैदिक हिंदूंचे पुष्कळ सण जैनधर्मीय साजरे करतात. हिंदू घरात जसे देवघर व देव्हारा असतो तसाच जैन घरातही असतो.

---

[१०] अधिक माहितीसाठी **ग्रेटर बॉम्बे गॅझेटिअर, ग्रंथ १** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८६), पृ. ६८२–८६ पहावे.

संस्कार : जैनांचे सोळा संस्कार वैदिकांसारखे आहेत. वर्ध्याचे जैन उपनयन, विवाह, ऋतुप्राप्ती व अंत्यविधी हे संस्कार अवश्य करतात. मात्र या प्रसंगी म्हणण्यात येणारे मंत्र वैदिक नसतात. जन्म संस्कार हे वैदिकांसारखेच असतात. आठ ते सोळा वर्षांपर्यंत मुलांचे उपनयन होते. या प्रसंगी आप्तेष्ट व इष्टमित्रांना निमंत्रित करतात. मात्र अक्षत देण्याला प्रथम जैन मंदिरात जातात. देवापुढे नारळ ठेवून मुलाचा बाप उपाध्यायाला मौंजीबंधन संस्कार करण्याची विनंती करतो. देवक, नांदीश्राद्ध वगैरे प्रकार त्यांच्यात नाहीत. बाकी मुहूर्त पाहणे, मुलांची श्मश्रू करणे, नंतर जानवे घालणे, होम करणे, भिक्षावळीसाठी आई, मावशी, आत्या व काकू यांच्यासमोर झोळी घेऊन "ओम् भवति भिक्षां देहि" म्हणणे, हे सर्व प्रकार तसेच आहेत. एक आठवड्यानंतर सोडमुंज वैदिक पद्धतीप्रमाणे करतात.

परंपरेनुसार विवाह सोहळा पाच दिवस चालतो. तथापि अलीकडे विवाह सोहळा एका दिवसात आटोपतात. मुख्य विधी वधूगृही करतात. वराचे पादप्रक्षालन करून त्यास बोहल्यावर बसवतात. अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणून वधूवरांचे अभिष्टचिंतन सर्व उपस्थित मंडळी करतात. मुहूर्ताचा क्षण येताच अंतरपाट दूर करण्यात येतो. वधूवर एकमेकांचे अवलोकन करतात. वर वधूला कुंकूमतिलक लावतो आणि वधू त्याला पुष्पहार घालते. यानंतर त्यांचे पतिपत्नीचे नाते प्रस्थापित होते. पाहुणे मंडळीला पानसुपारी, अत्तर, गुलाब देण्यात येते. ध्रुवदर्शन घडविण्यात येते.

गेल्या दोन-अडीचशे वर्षांत विधवा पुनर्विवाह जैनांत होऊ लागला आहे. पत्नीला पतीपासून विभक्त राहता येते पण तो जिवंत असेपर्यंत दुसरे लग्न करता येत नाही.

मुसलमान

जिल्ह्यातील मुसलमान देशाच्या सर्वच भागांतून आलेले आढळतात. परंतु सर्वांत जास्त मुसलमान पूर्वीच्या हैदराबाद राज्यातून आलेले आहेत. त्यातील काही परिवार अठराव्या शतकाच्या सुरुवातीला जिल्ह्यात स्थायिक झाले. व्यवसायानुसार मुसलमानांत अनेक पोटभेद आहेत. एकूण ३० ते ३२ पोटभेद असावेत. तथापि फारच थोड्या पोटभेदांचे मुसलमान वर्धा जिल्ह्यात आढळतात. इ. स. १९०१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात १५,००० मुसलमान असून त्यांची वस्ती आर्वी व वर्धा शहरांत सर्वाधिक होती. आर्वी तहसीलमधील ५३ गावांत त्यांची वस्ती फार मोठी होती. अलीकडील जनगणना अहवालांद्वारे प्राप्त माहिती या प्रकरणात अन्यत्र दिली आहे.

मुसलमानांमध्ये जातीय भेदभाव नसला तरी शेख, सय्यद, पठाण व मुघल स्वतःस सामाजिकदृष्टया श्रेष्ठ समजतात. वर्धा जिल्ह्यात या पोटभेदांव्यतिरिक्त अत्तार, कसाई, बागवान, मोमिन, जुलाहा व खोजा मुसलमान आढळतात. खोजा अल्पसंख्य असून शिया पंथीय आहेत. तथापि बहुसंख्य मुसलमान सुन्नी आहेत.

जिल्ह्यातील मुसलमान त्यांच्या इतर बांधवांप्रमाणेच प्रामुख्याने रमझान ईद (ईद-उल-फितर), बकरी ईद (ईद-उद-झुआ), मोहरम व ईद-ए-मिलाद हे सण साजरे करतात. त्याप्रसंगी अन्नवस्त्राचे दान करतात. हज यात्रेला जाणे जीवनातील परमश्रेष्ठ व परमपवित्र कार्य मानले जाते. तथापि श्रीमंत मुसलमानच हज यात्रेला जाऊ शकतात. सर्व मुसलमान विहित पद्धतीने प्रार्थना करतात.

इस्लामी संस्कार : मुलाच्या जन्मानंतर सातव्या दिवशी सुन्नत किंवा सुंता नावाचा अनिवार्य विधी करतात. या दिवशी हा विधी पार पाडता आला नाही तर सातव्या किंवा बाराव्या वर्षापर्यंत तरी सुन्नत करावीच लागते. पूर्वी सुन्नत समारंभ तीन ते चार दिवस चालत असे. परंतु आता एका दिवसातच विहित उपचार उरकतात. या प्रसंगी नातेवाईक आणि इष्टमित्रांना मेजवानी दिली जाते.

बिस्मिल्ला : मूल चार वर्षे चार महिने व चार दिवसांचे झाले की त्याच्या शिक्षणाचा शुभारंभ म्हणून हा विधी करतात. खरे तर हा दीक्षा संस्कार असून गांभीर्यपूर्वक पार पाडला जातो. तत्प्रसंगी मुलाचे तोंडून पवित्र **कुराणा** मधील काही वचने वदवून घेतात.

निकाह : निकाह किंवा शादी हे शब्द अनुक्रमे अरबी व फारसी आहेत. इस्लामप्रमाणे निकाह किंवा विवाह हा शुद्धी संस्कार नसून तो एक सामाजिक करार आहे. मुलाचा बाप मुलीच्या बापाकडे किंवा बाप हयात नसल्यास कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तीकडे मुलीची मागणी घालतो. दोन्ही पक्षांची संमती ठरल्यावर वर पक्षाकडील मंडळी वधूकडे वस्त्रालंकार व खाद्यपदार्थ घेऊन जातात. दोन्ही पक्षातील ज्येष्ठ मंडळी, काझी व मौलाना एकत्र बसून वधूचा मेहेर किती असावा हे निश्चित करतात. मेहेर म्हणून जी रक्कम प्राप्त होते त्यावर वधूचा अधिकार असतो. विवाहाची तिथी ठरवितात. वधूपिता सुद्धा आपल्या ऐपतीनुसार वराला वस्त्रालंकार प्रदान करतो. रीतीरिवाजाप्रमाणे विवाहसोहळा तीन दिवस चालतो. परंतु आर्थिक कारणास्तव अलीकडे विवाह एक दिवसातच उरकतात. विवाहाच्या चार दिवस आधी महिला "रज्जक" नावाचा समारंभ करतात. त्यावेळी अल्लाच्या स्तुतीपर गाणी म्हणतात. दुसऱ्या दिवशी एक सुवासिनी वराला नकळत त्याच्या कपड्याला हळद लावते, या विधीस चोरहळद असे म्हणतात. यानंतर उघडपणे वधूवरांना हळद लावली जाते, याला सावहळद असे म्हणतात. वधूवरांना अहेर केला जातो. मुख्य सोहळा वधूगृही साजरा होतो. वधूपक्षाकडून कपडे, मिठाई, मेंदी व इतर वस्तू वराकडे पाठविल्या जातात. वराच्या हातापायाला मेंदी लावून काही वेळाने ती धुऊन टाकतात. आंघोळ झाल्यानंतर पूर्वी पायजमा, सदरा, शेरवानी व फेटा असा पोषाख घालीत. पण सध्या सूट घालतात व त्यावर मोगरा, जाई, इत्यादी फुलांची आपादमस्तक जाळी घातलेली असते, यास सेहरा असे म्हणतात. अशा प्रकारे वर सजून मिरवणुकीने वधूकडे जातो. वधूच्याही हातापायाला मेंदी लावली जाते. वरात वधूकडे आल्यावर वरपक्षाचे स्वागत केले जाते. त्यानंतर काझी विवाहाची नोंद करतो. वधूपक्षाकडील एक गवाह व मुलाकडील दोन गवाह काझीसमोर घोषित करतात की, या विवाहाला त्यांची अनुमती असून त्याबाबत पुरावा देण्याकरिता ते तयार आहेत. यापूर्वी गवाह वधूला भेटून वराविषयी सर्व माहिती तिला सांगून त्याच्याशी विवाहबद्ध होण्याची तिची इच्छा जाणून घेतात. यानंतर काझी किंवा मौलवी **कुराणा**तील मंत्र (आयता) म्हणून लग्न लावतात. **कुराणा**तील विवाहविषयक नियम काझी वाचून दाखवितो. काझीने विवाहाची नोंदणी केल्यावर वर घोषित करतो की, 'नोंद केलेली रक्कम म्हणजे मेहेर देऊन मी वधूला माझी पत्नी म्हणून स्वीकार करतो.' यानंतर वर वधूपित्याला आलिंगन देतो व सर्वांना अभिवादन करतो.

वधूपक्षाकडून काही वस्तू वराला आंदण म्हणून दिल्या जातात. या सर्व वस्तूंची नोंद काझी आपल्या कार्यालयात करून ठेवतो कारण तलाक (घटस्फोट) प्रसंगी त्याचा उपयोग होतो. काझी **कुराणा**तील पाच पवित्र कलमे वधूवराकडून वदवून घेतो. नोंदवहीत लग्नाची नोंद करतो व त्यावर साक्षीदारांची स्वाक्षरी घेतो. या सर्व कार्यक्रमाच्या वेळी महिला व

वधू दुसऱ्या बाजूला पडद्याआड बसतात. निकाह् आटोपल्यावर संध्याकाळी समाजाच्या महिला जमा होऊन जलवा नामक विधी करतात. त्याप्रसंगी वधूवर एकमेकांचे प्रथमच दर्शन घेतात असे मानले जाते. पूर्वीच्या काळी तसेच व्हायचे. तथापि अलीकडे मुलाने मुलीस बहुधा आधीच पाहिलेले असते.

अंत्यसंस्कार : मरणासन्न व्यक्तीच्या तोंडात सरबत किंवा मक्केचे पवित्र जल घालतात. **कुराण** ग्रंथातील काही अध्यायवाचन करतात. गुरुवारी, शुक्रवारी किंवा रमझान महिन्यातील कोणत्याही दिवशी मृत्यू येणे चांगले समजले जाते. मृत व्यक्तीची विधवा त्याच्याजवळ बसून दोन साक्षीदारांच्या समक्ष मेहेर माफ करते. प्राण गेल्यावर मृत-देहास आंघोळ घालतात. अत्तर शिंपडतात. आंघोळीच्या वेळी **कुराणा**तील काही कडवे म्हणतात. सर्व सांध्यांवर कापडाचे तुकडे ठेवतात. यानंतर मृतास कफन गुंडाळतात. पुरुषाचे कफन तीन तुकड्यांचे तर महिलांचे कफन पाच तुकड्यांचे असते. पार्थिव देह जनाजात (शवपेटी) ठेवून मृताने इच्छा व्यक्त केलेल्या ठिकाणी किंवा कबरस्तानात नेतात. जनाज़ा नेत असताना "कलमा-इ-शहादत" चा घोष सुरू असतो. प्रेतयात्रेस फक्त पुरुष असतात. प्रेताला खांदा देणे पवित्र समजले जाते. मृताचे तोंड मक्केकडे राहील या बेताने प्रेत कबरीत ठेवताना धर्माज्ञेप्रमाणे यथोचित गांभीर्यपूर्वक मंत्र म्हणतात. "सुरा-ए-यासीन" व "सुरा-ए-तबारक" हे **कुराणा**तील मंत्र म्हणतात. मृत व्यक्तीच्या घरी तीन दिवस शोक पाळला जातो. तिसऱ्या दिवशी सकाळी "जियारत" नावाचा विधी करतात. नातेवाईक व ईष्टमित्र मशिदी-मध्ये **कुराण** पठण करतात. मृतात्म्यास शांती प्राप्त होण्यास्तव प्रार्थना करतात. यानंतर ऐपतीप्रमाणे जेवण दिले जाते. धर्मरीतीनुसार अंत्यसंस्कार चाळीस दिवस करण्यात येतात.

शेख फरीद : मुसलमान संत बाबा शेख फरीद यांची आराधना जिल्ह्यात बऱ्याच मोठ्या प्रमाणात केल्याचे आढळून येते. सर्वच जाती-धर्मांचे लोक बाबा फरीदची आराधना करतात. त्यामुळे अरिष्टे येत नाहीत अशी स्थानिक लोकांची समजूत आहे. बाबा फरीदची आराधना केल्याने इच्छित प्राप्ती होते असाही समज आहे. बाबा फरीदला जिल्ह्यातील बरेच लोक आपले दैवत मानतात.

घरे

वर्धा जिल्ह्यातील बरीच गावे नदी अथवा नाल्यांच्या काठांवर वसलेली आहेत. मराठा-कालीन व तदनंतरच्या काळात वाडे किंवा प्रशस्त घरे प्रामुख्याने गढ्यांच्या परिसरात असत. पेंढाऱ्यांच्या उपद्रवामुळे स्वसंरक्षणार्थ लोक गढीचा आश्रय घेत असत. मालगुजारांची घरे गढीतच असल्याचा १९०६ च्या **वर्धा गॅझेटिअर** मध्ये उल्लेख आहे. मालगुजाराचे घर म्हणजे वाडा ही संबंधित गावातील सर्वोत्कृष्ट वास्तू असे. ही इमारत आयताकृती असून त्या भोवती भिंतीचे कुंपण असे.

पूर्वीचे सरदार, मालगुजार व देशमुखांचे वाडे चौक पद्धतीचे, दुमजली, दगडी अथवा भाजलेल्या विटांच्या भिंतीचे व कौलारू असत. भव्य आणि प्रशस्त अशा प्रवेशद्वाराला दिंडी दरवाजा असे. आत चौकाभोवती देवडी बैठक व कार्यालयाचे दालन असे. वाडा सुमारे ०.९० मीटर उंच जोत्यावर उभारलेला असे. वाड्यात ओटी, पडवी, माजघर, स्वयंपाकघर, देवघर, स्नानगृह, शौचालय, झोपण्याच्या खोल्या असत, गुरांचा गोठा मागील बाजूस असे. मागील परसात फुलझाडे लावलेली असत. घरासमोर तुळसी वृंदावन असे. वर्धा जिल्ह्यात

असे वाडे फार नसले तरी आर्वीत अद्याप असे वाडे आढळून येतात. अलीकडे असे वाडे बांधणे बंद झाले असून नवीन पद्धतीच्या इमारती बांधल्या जात आहेत.

खेड्यातील शेतकऱ्यांची घरे मातीची किंवा कच्च्या विटांची, कौलारू अथवा धाब्याची असतात. शेतकऱ्याचे आर्थिक परिस्थितीनुसार बांधकामाचा दर्जा असतो. घराशेजारी जागा उपलब्ध असेल त्याप्रमाणे गुरांचा गोठा असतो. विदर्भातील अन्य भागाप्रमाणेच येथील घरांचेही बांधकाम असते. हा प्रदेश उष्ण हवामानाचा असल्यामुळे छपरावर पत्रे न घालता कौले घालतात. उष्णतेचा उपद्रव कमी करण्यास्तव मुख्य इमारतीभोवती छप्पर असलेली ओसरी असते. त्यामुळे मुख्य घरात उष्णतेचा उपद्रव कमी होतो. काही घरांना ढेलज (Portico) असते. चौथरा पद्धतीची घरेही (Tiered houses) अल्प प्रमाणात आढळतात. गरीब मजूर आणि मागासवर्गीयांची घरे म्हणजे झोपड्याच. गरिबांच्या झोपड्या बांबूच्या कामट्या, पऱ्हाट्या अथवा तत्सम इतर काठ्यांवर चिखल थापून केलेल्या असतात. काही घरांच्या भिंती मातीच्या असतात. झोपडीला लागूनच बहुधा उघड्यावरच, क्वचित तट्टे लावलेले, स्नानगृह (न्हाणी) असते. घराला साधारणतः एकच दार असते. अत्यंत गरीब तसेच आदिवासी लोकांच्या झोपडीचे दार तुराट्यापराट्यांचे असते. घराला खिडक्याही नसतात. काही झोपड्यांची छपरे गंजलेल्या टिनाच्या पत्र्याचीही आढळतात.

जुन्या घरांची बांधणी निवारा आणि सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने केलेली असे. तर आधुनिक घरे सुखसोयी, मितव्यय, स्वच्छता व आवश्यक सुरक्षा या बाबी ध्यानात घेऊन बांधली जातात. श्रीमंत लोकांचे सुखसोयींनी युक्त स्वतंत्र बंगले आहेत. यात द्वारमंडप, व्हरांडा, दिवाणखाना, शयन कक्ष, अतिथी कक्ष, अध्ययन कक्ष, स्वयंपाक घर, भोजन कक्ष, स्नानगृह व शौचालय आढळते. परंतु अशी घरे फारच कमी. खेड्यापाड्यातील घरांच्या रचनेत विशेष बदल झालेला आढळत नाही. खेड्यांतील काही श्रीमंत शहराप्रमाणे सीमेंट काँक्रीटची घरे बांधतांना दिसतात, परंतु त्यावरही ग्रामीण छाप पडलेली असते.

पोषाख

वर्ध्याकडील पोषाख वऱ्हाडातील लोकांप्रमाणेच असतो. जुन्या वळणाचे लोक पगडी अथवा रेशमी दुपट्टा वापरतात. बंडी वापरण्याची पद्धती बरीच जुनी आहे. अंगरखा सर्रास वापरत असत. उच्चवर्णीय तसेच प्रतिष्ठित कुणबी व मराठे बाहेर जाताना बोडके कधीच जात नसत. बोडके जाणे अशुभ मानत असले तरी उष्णता अथवा थंडीची बाधा होऊ नये हा त्याचा मूळ उद्देश असावा. जेवताना मात्र डोक्यावरील शिरस्त्राण हमखासपणे काढून ठेवत असत. तसे न करणे अशिष्टपणाचे मानत. हवामानाला अनुकूल असा फेटा बांधण्याची पद्धत सर्वत्र रूढ होती. महिला नऊवारी लुगडे व चोळी घालीत. विवाहप्रसंगी पैठणी किंवा बनारसी शालू परिधान करीत. मालगुजार व श्रीमंतांकडे उंची पैठण्या व शालू असत. सुवासिनी पांढरे वस्त्र घालत नसत, कारण तो विधवेचा पोषाख समजला जाई. अर्थात रंगीत किनार अथवा ठसे असलेले पांढरे लुगडे सुवासिनींना अनुज्ञेय होते. गरीब लोकसुद्धा, आदिवासींचा अपवाद सोडल्यास, अंगभर कपडे वापरीत. जरीची वस्त्रे समारंभ प्रसंगी परिधान करीत.

अलीकडे पोषाखात बरेच परिवर्तन झालेले आढळते. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सर्व-साधारण पोषाख धोतर, सदरा व खांद्यावर उपरण्यासारखा कपडा आणि डोक्यावर टोपी

असा असतो. रोजचे कपडे साधे असले तरी सणावाराला किंवा काही विशिष्ट समारंभाला किमती कपडे असतात. हिवाळ्याच्या दिवसात जिल्ह्यात थंडी पडत असल्यामुळे लोक आपापल्या ऐपतीप्रमाणे लोकरी कपडे वापरतात.

अद्याप शहर आणि खेड्यातील जुन्या वळणाच्या महिला नऊवारी लुगडे, कासोटा घालून नेसतात. लुगड्यांना विभिन्न प्रकारचे काठ किंवा किनार असते. लुगड्याचा पदर डाव्या खांद्यावरून घालतात. महिला अंगात चोळी घालतात. चोळीला गाठ मारतात. अशा चोळ्या आता बऱ्याच कमी झालेल्या आहेत. आता गाठ न मारता बटन लावण्याची प्रथा आहे. काही मागासवर्गीय महिला लुगडे गुडघ्याच्या वर नेसतात. आदिवासी जमातीतील जुन्या वळणाच्या महिला अंगात चोळी घालत नाहीत. नागरी भागातील व ग्रामीण भागातील सुशिक्षित महिला साडेपाच मीटर लांबीच्या गोलसाड्या नेसतात. ही साडी परकर किंवा घागऱ्यावर नेसतात. जुन्या प्रकारच्या चोळीऐवजी कंचुकी (Brassier) आणि पोलके वापरतात. शहरातील सुशिक्षित मुली पंजाबी ड्रेस, जीन्स पॅन्ट व सलवार कमीज असेही वेष परिधान करतात.

अलंकार

जिल्ह्यात बहुतेक सर्व समाजात अलंकार वापरण्याची प्रथा आढळून येते. प्रत्येक समाजातील अलंकरणाच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. त्यातही महिला, पुरुष व मुले यांचे अलंकार भिन्न भिन्न प्रकारचे आढळतात. हे अलंकार डोके, कान, नाक, गळा, बाहू, मनगट, अंगुली, कमर, पाय आणि पायाचे बोट इत्यादी शरीराच्या विविध भागांवर घातले जातात. हिंदू समाजात सोन्याला फार पवित्र मानले जाते. म्हणून सोन्याचे दागिने कटिभागाखाली घालणे उचित मानले जात नाही. ब्राह्मण आणि मराठा महिलांचे डोक्यावर आणि बाहुदंडावर घालण्याचे दागिने साधारणपणे सोन्याचेच असतात. सोने किंवा चांदी या किमती धातूऐवजी इतर धातूंचे दागिने अलीकडे उपलब्ध आहेत व त्यांचा वापरसुद्धा बऱ्याच प्रमाणावर होऊ लागला आहे. तथापि महिलांचे सोन्याबद्दलचे आकर्षण कमी झालेले नाही.

मनोरंजन

शहरी भागातील मनोरंजनाचे प्रमुख साधन सिनेमा आहे. सिनेमाचा सुळसुळाट एवढा वाढला आहे की, ग्रामीण भागातसुद्धा फिरती सिनेमागृहे आहेत. आता सर्वत्र रेडिओ आणि दूरदर्शनचे प्रस्थ वाढले आहे. खेड्यापाड्यात रेडिओ व दूरदर्शन संच आढळतात. ही मनोरंजनाची मुख्य साधने बनत आहेत. असे असले तरी जिल्ह्यातील शेतकरी व कष्टकरी वरील साधनांचा विशेष उपभोग घेत नाहीत. तसेच ही साधने खेड्यापाड्यांपर्यंत पोचली असली तरी ती खर्चिक असल्यामुळे सर्वसामान्य जनता त्याचा उपभोग घेऊ शकत नाही. बऱ्याच खेड्यांतून आखाडे आढळतात. त्यात तरुण मुले व माणसे कुस्तीसारखे मर्दानी खेळ खेळतात. काही सणोत्सवांचे वेळी किंवा यात्रेच्या प्रसंगी नाचगाण्याचे कार्यक्रम होतात. यात तमाशा व कव्वालीचा समावेश असतो. भजनी मंडळे सर्वत्र आढळतात. किंबहुना भजन मनोरंजनाचे प्राचीन काळापासूनचे साधन आहे. कीर्तन हे सुद्धा असेच लोकप्रिय माध्यम आहे. वर्तमानपत्र व नियतकालिके वाचण्याची प्रवृत्ती खेड्यापाड्यांत सुद्धा दिसून येते. वर्ध्याव्यतिरिक्त आर्वी, पुलगाव व हिंगणघाटला मोठी सार्वजनिक वाचनालये आहेत. आर्वी येथील वाचनालय तर अदमासे सव्वाशे वर्षांपूर्वीचे आहे.

मुलेमुली कबड्डी व खो-खो हौसेने खेळतात. शाळांमधून या खेळांना प्रोत्साहन दिले जाते. विटी-दांडू व्यतिरिक्त क्रिकेटचे वेड ग्रामपातळीपर्यंत पोहोचले आहे. याशिवाय नागरी ागात फूटबॉल व व्हॉलीबॉल शाळा व महाविद्यालयांद्वारे खेळतात.

तीर्थयात्रा

वर्धा जिल्ह्यात मोठी तीर्थक्षेत्रे नाहीत. स्थानिक यात्रांना व ऊरूसांना बरीच गर्दी जमते. ारकरी संप्रदायाचे अनुयायी सर्वाधिक असल्याने आषाढी व कार्तिकी एकादशीला पूर्वी जिल्ह्यातून पंढरपूरला नित्यनियमाने पालख्या जात असत. शेकडो मैलांचे अंतर पदयात्रा रून पार करीत. आताही शेकडो भाविक पंढरपुरी जातात, पण रेल्वेने. कारंजा तालुक्या-ील ढगा येथे महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. त्यावेळी असंख्य भाविक तेथे जातात. गा तीर्थक्षेत्र मानले जाते. अष्टधाम, बारा ज्योतिर्लिंग व अष्टविनायकांची यात्रा करणारे जारो स्त्री-पुरुष आजही आहेत. रेल्वे प्रवासाच्या उपलब्धतेने यात्रा करणारांची संख्या ाढलेलीच दिसते. महानुभाव मंडळी रिद्धपूर व नेवासा येथे तर दत्तपंथीय कोल्हापूर जिल्ह्या-ील नरसोबावाडीस जातात. मागील पाव शतकात शेगावच्या गजानन महाराजांच्या माधीच्या दर्शनार्थ हजारो भक्तगण प्रतिवर्षी शेगावला जातात. माहूरची रेणूका व अंबे-ोगाईची अंबादेवी या तर बहुतांश सर्वच ब्राह्मणांच्या कुलदेवता आहेत. त्यांच्या दर्शनार्थ ाविक हजारोंनी जातात. शिक्षणाबरोबर बुद्धिप्रामाण्यवादाचा प्रसार होत असला तरी क्तिभाव, निदान वरकरणी तरी, कमी झालेला दिसत नाही.

तक्ता क्रमांक १

जिल्ह्याची तालुकानिहाय ग्रामीण व नागरी लोकसंख्या व लोकवस्तीची घनता, १९८१

	एकूण/ ग्रामीण/ नागरी	लोकवस्तीची घनता (दर चौ.कि.मी.)	लोकसंख्या		
			व्यक्ती	पुरुष	महिला
र्धा जिल्हा	एकूण	१४७	९२६,६१८	४७५,६९६	४५०,९२२
	ग्रामीण	१११	६९५,१०८	३५५,७७४	३३९,३३४
	नागरी	७,७८४	२३१,५१०	११९,९२२	१११,५८८
र्धा तालुका	एकूण	२०१	४२४,७७०	२१८,८६९	२०५,९०१
	ग्रामीण	१३६	२८३,४५४	१४५,५१७	१३७,९३७
	नागरी	७,०३१	१४१,३१६	७३,३५२	६७,९६४
ार्वी तालुका	एकूण	१०८	२४९,१८८	१२७,५९४	१२१,५९४
	ग्रामीण	९५	२१८,०६९	१११,६४३	१०६,४२६
	नागरी	९,८४८	३१,११९	१५,९५१	१५,१६८
हगणघाट तालुका	एकूण	१३४	२५२,६६०	१२९,२३३	१२३,४२७
	ग्रामीण	१०३	१९३,५८५	९८,६१४	९४,९७१
	नागरी	९,११७	५९,०७५	३०,६१९	२८,४५६

तक्ता क्रमांक २

जिल्ह्यातील शहरांची १९०१ ते १९८१ पर्यंतची लोकसंख्या व त्यामधील फरक

शहर	वर्ष	क्षेत्रफळ (चौ.कि.मी.)	लोकसंख्या	दशकातील फरक	दशकातील फरकाचे प्रमाण	पुरुष	महिला
वर्धा ..	१९०१	..	९,८७२	..	..	५,१०५	४,७६७
	१९११	..	१०,५४१	+ ६६९	+ ६.७८	५,७१९	४,८२२
	१९२१	..	१६,०४४	+ ५,५०३	+ ५२.२१	८,८४५	७,१९९
	१९३१	..	१९,५७१	+ ३,५२७	+ २१.९८	१०,७९०	८,७८१
	१९४१	..	२८,३५९	+ ८,७८८	+ ४४.९०	१४,९८५	१३,३७४
	१९५१	..	३९,८२७	+ ११,४६८	+ ४०.४४	२०,८१६	१९,०११
	१९६१	७.७७	४९,११३	+ ९,२८६	+ २३.३२	२५,९७९	२३,१३४
	१९७१	७.७७	६९,०३७	+ १९,९२४	+ ४०.५७	३६,७०७	३२,३३०
	१९८१	७.७७	८८,४९५	+ १९,४५८	+ २८.१८	४६,०५६	४२,४३९
हिंगणघाट ..	१९०१	..	१२,६६२	..	..	६,४८६	६,१७६
	१९११	..	१४,९४३	+ २,२८१	+ १८.०१	७,६९०	७,२५३
	१९२१	..	१७,२००	+ २,२५७	+ १५.१०	८,८८७	८,३१३

	१९३१	..	२२,६०१	+	५,४०१	+	३१.४०	११;८१२	१०,७८९
	१९४१	..	२८,०४०	+	५,४३९	+	२४.०७	१४,२९८	१३,७४२
	१९५१	..	३२,८६८	+	४,८२८	+	१७.२२	१६,५२३	१६,३४५
	१९६१	६.४२	३६,८९०	+	४,०२२	+	१२.२४	१८,९४३	१७,९४७
	१९७१	६.४२	४४,३४९	+	७,४५९	+	२०.२२	२३,०९१	२१,२५८
	१९८१	६.४८	५९,०७५	+	१४,७२६	+	३३.२०	३०,६१९	२८,४५६
पुलगाव ..	१९११	..	५,४६६		..		..	२,८७०	२,५९६
	१९२१	..	७,४४३	+	१,९७७	+	३६.१७	४,०५६	३,३८७
	१९३१	..	७,८४५	+	४०२	+	५.४०	४,२८१	३,५६४
	१९४१	..	८,८०६	+	९६१	+	१२.२५	४,६११	४,१९५
	१९५१	..	१८,९७९	+	१०,१७३	+	११५.५२	९,८२२	९,१५७
	१९६१	१३.७०	२८,०६३	+	९,०८४	+	४७.८६	१५,०६२	१३,००१
	१९७१	२.६७	३३,३८२	+	५,३१९	+	१८.९५	१७,७०५	१५,६७७
	१९८१	२.६७	३१,३५८	−	२,०२४	−	६.०६	१६,२०८	१५,१५०

तक्ता क्रमांक २—चालू

शहर		वर्ष	क्षेत्रफळ (चौ.कि.मी.)	लोकसंख्या	दशकातील फरक	दशकातील फरकाचे प्रमाण	पुरुष	महिला
आर्वी	..	१९०१	..	१०,६७६	..	..	५,६८१	४,९९५
		१९११	..	११,९०२	+ १,२२६	+ ११.४८	६,१३४	५,७६८
		१९२१	..	१३,२४८	+ १,३४६	+ ११.३१	६,९१८	६,३३०
		१९३१	..	१६,२९३	+ ३,०४५	+ २२.९८	८,८२३	७,४७०
		१९४१	..	१६,२२८	— ६५	— ०.४०	८,४७४	७,७५४
		१९५१	..	१८,२२३	+ १,९९५	+ १२.२९	९,२६७	८,९५६
		१९६१	१०.४४	२१,४७८	+ ३,२५५	+ १७.८६	१०,९०३	१०,५७५
		१९७१	३.०६	२६,४९४	+ ५,०१६	+ २३.३५	१३,६१४	१२,८८०
		१९८१	३.१६	३१,११९	+ ४,६२५	+ १७.४६	१५,९५१	१५,१६८
देवळी	..	१९०१	..	५,००८	..	..	२,४५५	२,५५३
		१९११	..	५,५७५	+ ५६७	+ ११.३२	२,८०८	२,७६७
		१९२१	..	५,९९१	+ ४१६	+ ७.४६	३,२२२	२,७६९
		१९३१	..	६,२०९	+ २१८	+ ३.६४	३,११२	३,०९७
		१९४१	..	६,६४६	+ ४३७	+ ७.०४	३,३२५	३,३२१
		१९५१	..	६,७८१	+ १३५	+ २.०३	३,४३८	३,३४३

	१९६१	२.६४	७,८४५	+	१,०६४	+	१५.६९	३,९९२	३,८५३
	१९७१	२.६४	९,५०८	+	१,६६३	+	२१.२०	४,८१८	४,६९०
	१९८१	२.६४	११,५६६	+	२,०५८	+	२१.६४	५,९४६	५,६२०
सिंदी ..	१९०१	..	..		..		..	..	..
	१९११	..	५,९८१		..		..	२,९५०	३,०३१
	१९२१	..	५,४४४	—	५३७	—	८.९८	२,७३४	२,७१०
	१९३१	..	६,८८३	+	१,४३९	+	२६.४३	३,५२९	३,३५४
	१९४१	..	५,८५६	—	१,०२७	—	१४.९२	२,९६३	२,८९३
	१९५१	..	५,४४८	—	४०८	—	६.९७	२,७३४	२,७१४
	१९६१	७.०२	६,६२६	+	१,१७८	+	२१.६२	३,३८२	३,२४४
	१९७१	७.०२	८,३३२	+	१,७०६	+	२५.७५	४,३३२	४,०००
	१९८१	७.०२	९,८९७	+	१,५६५	+	१८.७८	५,१४२	४,७५५

तक्ता क्रमांक ३

जिल्ह्यातील वयमानगटानुसार लोकसंख्येची वर्गवारी, १९६१, १९७१ व १९८१

वयमानगट	१९६१			१९७१			१९८१		
	एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला
सर्व वये ..	६३४,२७७	३२२,८९४	३११,३८३	७७९,५६२	४००,०४०	३७९,५२२	९२६,६१८	४७५,६९६	४५०,९२२
०—१४ ..	२५०,२८१	१२६,०८४	१२४,१९७	३२८,०२५	१६५,५१३	१६२,५१२	३५४,१५९	१७८,३६३	१७५,७९६
१५—१९ ..	४२,१३०	२३,७०७	१८,४२३	६१,३४३	३४,२९८	२७,०४५	९०,६५१	४८,७५७	४१,८९४
२०—२४ ..	५५,१३८	२४,४५२	३०,६८६	५५,३९५	२८,७४१	२६,६५४	७७,६३९	४२,६१८	३५,०२१
२५—२९ ..	५३,६०५	२६,०१८	२७,५८७	५१,३१२	२३,७९४	२७,५१८	६१,९७६	३०,६२५	३१,३५१
३०—३९ ..	८६,२१७	४६,३००	३९,९१७	९८,६१३	४९,५८२	४९,०३१	१०६,५०६	५३,२००	५३,३०६
४०—४९ ..	६१,८९९	३३,१४९	२८,७५०	७७,९२८	४२,३०२	३५,६२६	९३,६६८	४७,६३६	४६,०३२
५०—५९ ..	४२,३४३	२२,९५९	१९,३८४	५२,५६३	२८,२४७	२४,३१६	६७,९५१	३६,५६४	३१,३८७
६०—६९ ..	२६,३६५	१२,९८७	१३,३७८	३५,०४१	१८,४१३	१६,६२८	४७,२३६	२४,६०१	२२,६३५
७० + ..	१५,७५४	६,९९९	८,७५५	१९,१९५	९,०७३	१०,१३२	२५,७९१	१२,८२९	१२,९६२
वय न सांगितलेले ..	५४५	२३९	३०६	१४७	७७	७०	१,०४१	५०३	५३८

तक्ता क्रमांक ४

जिल्ह्यातील लोकसंख्येच्या वयमानगटानुसार वैवाहिक दर्जा, १९८१[११]

वयमानगट		अविवाहित		विवाहित		विधूर किंवा विधवा		घटस्फोटित किंवा विभक्त	
		पुरुष	महिला	पुरुष	महिला	पुरुष	महिला	पुरुष	महिला
०—९	..	११४,७५८	१११,५१६	..	..	..	..	..	..
१०—१४	..	६२,९१२	६३,७७४	५८५	४७७	१०	५	..	..
१५—१९	..	४७,७७८	३१,९७७	८१४	९,५७४	२०	९६	५	२३२
२०—२४	..	३४,१३७	४,९०७	८,२०५	२९,३१९	१०६	२९९	६८	४९१
२५—२९	..	८,३५६	५८०	२१,८१८	२९,८०४	१८३	५५१	२२३	४१६
३०—३४	..	१,२२०	१९५	२४,८९७	२५,४१४	२९५	८१६	२१७	२४३
३५—३९	..	४५३	९२	२५,५५५	२५,०४०	३७४	१,३०१	१३५	२०५
४०—४४	..	३२७	४९	२३,१७९	२१,६९४	६०७	२,४५६	१४०	२१३
४५—४९	..	२३९	५५	२२,१०१	१८,१७६	९२८	३,२७०	९९	११९
५०—५४	..	२३९	२९	१९,३०७	१३,६८८	१,२००	४,८२८	१६५	९५
५५—५९	..	१५१	५	१३,९४९	८,२०९	१,४७७	४,४८८	४०	३९
६०—६४	..	१२०	५	१२,६०७	६,२१५	२,२११	७,९२५	५०	७७
६५—६९	..	८४	..	७,८२७	२,८८३	१,६५१	५,५०१	२५	२५
७० +	..	९९	१५	९,१०२	२,०१९	३,४९८	१०,८८८	६५	३९
सर्व वये[१२]	..	२७१,१५०	२१३,५११	१९०,१५०	१९२,६८८	१२,५७५	४२,४६३	१,२३३	२,२०६

[११] वैवाहिक दर्जा न सांगितलेल्या व्यक्तींचा समावेश करण्यात आलेला नाही.

[१२] 'सर्व वये' या गटात वय न सांगितलेल्या व्यक्तींचा समावेश करण्यात आलेला नाही.

तक्ता क्रमांक ५

जिल्ह्यातील पुरुष व महिलांची वयमानगट व वैवाहिक दर्जानुसार एकूण पुरुष व महिलांची टक्केवारी

वर्ष	वयमानगट	एकूण		अविवाहित		विवाहित		विधूर/विधवा		घटस्फोट घेतलेले किंवा विभक्त	
		पुरुष	महिला	पुरुष	महिला	पुरुष	महिला	पुरुष	महिला	पुरुष	महिला
१९५१ ..	०—१४	१००	१००	९९.१५	९४.०६	०.८३	५.८८	०.०१	०.०५	०.०१	०.०१
	१५—३४	१००	१००	३८.४८	६.१४	५८.६६	८८.१६	१.९०	४.८४	०.९६	०.८६
	३५—५४	१००	१००	१.५३	१.०६	८७.६२	६७.६८	९.७८	३०.७१	१.०७	०.५५
	५५ +	१००	१००	०.८७	०.१९	६९.८०	२२.७५	२९.००	७६.१५	०.३३	०.९१
	सर्व वये	१००	१००	४९.४०	३७.९४	४४.६६	४६.१२	५.३६	१५.४६	०.५८	०.४८
१९६१ ..	०—१४	१००	१००	९९.७४	९८.२६	०.२६	१.७०	..	०.०२	..	०.०२
	१५—३४	१००	१००	४१.७५	६.३२	५५.७२	८९.५३	१.४६	२.७१	१.०७	१.४४
	३५—५४	१००	१००	१.७८	०.१९	८८.९०	७२.१५	८.०१	२६.३६	१.३१	१.३०
	५५ +	१००	१००	०.९६	०.११	७५.१०	२३.५५	२३.०३	७५.८४	०.९१	०.५०
	सर्व वये	१००	१००	५२.२१	४१.३२	४२.८४	४४.८१	४.२६	१३.११	०.६९	०.७६

..	०—१४	१००	१००	९८.२२	९९.६३	१.७७	०.२६	..	०.०८	०.०१	०.०३
	१५—३४	१००	१००	५०.६४	१४.४७	४७.८६	८२.७७	०.८४	१.५९	०.६६	१.१७
	३५—५४	१००	१००	१.९२	०.१९	९०.९७	८१.३५	५.९३	१७.४६	१.१८	१.००
	५५+	१००	१००	१.१४	०.३३	७८.८८	३५.२८	१७.६६	६३.६८	२.३२	०.७१
	सर्व वये	१००	१००	५५.१५	४६.८०	४०.९६	४२.५७	३.२३	१०.०२	०.६६	०.६१
..	०—१४	१००	१००	९९.६१	९९.७१	०.३३	०.२७	०.०१	..	०.०५	०.०२
	१५—३४	१००	१००	६२.५४	२७.११	३७.४९	६९.७५	०.४१	१.३०	०.५६	१.०४
	३५—५४	१००	१००	१.३२	०.२५	९४.७७	८६.०८	३.२७	१२.९८	०.६४	०.६९
	५५+	१००	१००	१.३६	०.६९	८१.५७	३९.९०	१६.५३	५९.००	०.५४	०.४१
	सर्व वये	१००	१००	५७.००	४७.३५	३९.९७	४२.७३	२.६५	९.४२	०.३८	०.५०

तक्ता क्रमांक ६

जिल्ह्यातील भाषानिहाय लोकसंख्येची वर्गवारी, १९८१[13]

जिल्हा/तालुका/शहरे	आसामी	बंगाली	गुजराथी	हिंदी	कन्नड	काश्मिरी	मल्यालम
वर्धा जिल्हा ..	९	१४५	३,७४३	६०,२९९	१९७	४	२४९
तालुके :—							
वर्धा ..	९	१२०	२,२४८	३१,५१४	१५३	..	२०५
आर्वी ..	..	६	३६१	१६,९३७	६	..	८
हिंगणघाट ..	..	१९	१,१३४	११,८४८	३८	४	३६
शहरे :—							
वर्धा ..	..	३६	१,४३७	१३,११९	५७	..	८५
पुलगाव ..	..	१५	३३४	५,७०२	७	..	१५
देवळी ..	..	..	३९	५४१	१७	..	..
सिंदी ..	..	..	५२	८२९	..	..	..
आर्वी ..	..	१	२६८	४,२१६	..	..	१
हिंगणघाट ..	..	१९	५३८	७,६६०	२०	४	३५

[13] **हाऊसहोल्डस अॅन्ड हाऊसहोल्ड पॉप्यूलेशन बाय लॅंग्वेज मेनली स्पोकन इन दि हाऊसहोल्ड, सेन्सस ऑफ इंडिया,** १९८१, सिरीज १२, महाराष्ट्र, पेपर १ ऑफ १९८७. यात फक्त कौटुंबिक लोकसंख्येचा व बेघर लोकसंख्येचा समावेश केलेला आहे.

तक्ता क्रमांक ६–चालू

जिल्हा/तालुका/शहरे	मराठी	ओरिया	पंजाबी	सिंधी	तामीळ	तेलुगु	उर्दू
वर्धा जिल्हा ..	७९८,१४७	१७१	१,१८८	५,८४०	३५०	२,७७०	१९,०६३
तालुके :—							
वर्धा ..	३६६,५५६	४४	६१७	३,४०६	२५४	१,२२५	८,०२९
आर्वी ..	२०१,१०८	२२	१५६	९९२	३०	५७०	७,४४२
हिंगणघाट ..	२३०,४८३	१०५	४१५	१,४४२	६६	९७५	३,५९२
शहरे :—							
वर्धा ..	६४,९०७	१०	२०४	२,८५७	७८	२८१	३,२५६
पुलगाव ..	२२,१६२	१३	२३४	४९२	३९	११९	१,११०
देवळी ..	१०,४६४	..	४	..	..	२	४१३
सिंदी ..	७,७३४	..	..	२७	..	८	४२६
आर्वी ..	२१,८८५	२२	४५	९७९	१२	१८२	२,६२१
हिंगणघाट ..	४४,५६९	४५	२२४	१,२१४	४०	४२६	३,०३३

तक्ता क्रमांक ७

जिल्ह्यातील लोकसंख्येची धर्मनिहाय विभागणी, १९८१

जिल्हा/तालुका/शहरे	एकूण लोकसंख्या	बौद्ध	ख्रिश्चन	हिंदू	जैन	इस्लाम	शीख	इतर धर्म	धर्म न सांगितलेले
वर्धा जिल्हा ..	९२६,६१८	१२९,०२१	१,३६८	७५२,३९३	५,४८२	३७,३६८	५६३	३३१	९३
तालुके :—									
वर्धा ..	४२४,७७०	६३,२११	१,०००	३३९,७१५	३,४५८	१६,९६४	१९१	१६८	४३
आर्वी ..	२४९,१८८	२४,४८१	१३५	२११,८६९	७५४	११,५८६	२५३	८५	२५
हिंगणघाट ..	२५२,६६०	४१,३०९	२३३	२००,८०८	१,२७०	८,८१८	११९	७८	२५
शहरे :—									
वर्धा ..	८८,४९५	८,३८४	४४३	७१,०४१	१,९७०	६,५३१	१००	१७	९
पुलगाव ..	३१,३५८	६,७९१	८२	२०,९९४	६६८	२,८१५	३	..	५
देवळी ..	११,५६६	८४६	७	१०,१२१	९२	४५५	१६	२९	..
सिंदी ..	९,८९७	५५४	२२	८,६१६	८४	६२१	..	..	..
आर्वी ..	३१,११९	२,२०९	१४	२४,७४१	४३२	३,६८६	३४	..	३
हिंगणघाट ..	५९,०७५	७,४०१	८१	४५,४२२	९६०	५,११३	९२	..	६

तक्ता क्रमांक ८

जिल्ह्यातील अनुसूचित जातींची तालुकानिहाय लोकसंख्या, १९८१

जिल्हा/तालुका	एकूण/ग्रामीण/नागरी	व्यक्ती	पुरुष	महिला
वर्धा जिल्हा ..	एकूण	३६,४१२	१८,७८३	१७,६२९
	ग्रामीण	२३,९७४	१२,३९६	११,५७८
	नागरी	१२,४३८	६,३८७	६,०५१
वर्धा ..	एकूण	१७,२१८	८,८८५	८,३३३
	ग्रामीण	९,७७४	५,०३५	४,७३९
	नागरी	७,४४४	३,८५०	३,५९४
आर्वी ..	एकूण	११,०७२	५,७३५	५,३३७
	ग्रामीण	८,८७६	४,६१३	४,२६३
	नागरी	२,१९६	१,१२२	१,०७४
हिंगणघाट ..	एकूण	८,१२२	४,१६३	३,९५९
	ग्रामीण	५,३२४	२,७४८	२,५७६
	नागरी	२,७९८	१,४१५	१,३८३

तक्ता क्रमांक ९

जिल्ह्यातील अनुसूचित जातींची लोकसंख्या, १९८१

अनुसूचित जाती	एकूण	पुरुष	महिला	अनुसूचित जाती	एकूण	पुरुष	महिला
सर्व जाती ..	३६,४१२	१८,७८३	१७,६२९	कोलुपूल बंडलु	४	३	१
बहना, बहाना ..	१५	८	७	कोरी	७२	३२	४०
बलाही, बलाई ..	४३	१९	२४	लिंगडेर	१,३९९	७५५	६४४
बसोर, बुरूड, बांसोर, बांसोडी ..	२९७	१५१	१४६	मादगी	१९	११	८
बेडा जंगम, बुडगा जंगम ..	४०	२२	१८	महार, मेहरा, तराळ, धेगू-मेगू	७,४६१	३,९४९	३,५१२
बेडर ..	२३७	१२४	११३	माला	४९४	२६८	२२६
भांबी, भांभी, असादरु ..	७,२४२	३,७१४	३,५२८	माला जंगम	१९९	१०१	९८
भंगी, मेहतर, ओलगना ..	२,८१३	१,४६४	१,३४९	माला संन्यासी	२५	१०	१५
ढोर, कक्कय्या, कंकया, डोहर ..	५७	२९	२८	मांग, मातंग, मिनिमादिग	१३,१३३	६,६५८	६,४७५
डोम, डुमार ..	२८	१३	१५	मांग-गारोडी, मांग-गारुडी	३२२	१५८	१६४
गंडा, गंडी ..	४	३	१	मन्ने	१२	७	५
घासी, घासीया ..	२०	११	९	मिठा अयलवार	२	१	१
होलार, व्हलार ..	३४	१७	१७	पासी	१७	८	९
कैकाडी (अकोला, बुलढाणा) ..	४५	२३	२२	सांसी	८	३	५
कटिया, पथरिया ..	१	१	..	शेणया, चेणवा, सेडमा, रावत	६	४	२
खाटिक, चिकवा, चिकवी ..	२,२७९	१,१७१	१,१०८	तिरगार, तिरबंदा	११	६	५

तक्ता क्रमांक १०

अनुसूचित जातींची तालुकानिहाय साक्षरता, १९८१

जिल्हा/तालुका		एकूण/ग्रामीण/नागरी	व्यक्ती	पुरुष	महिला
वर्धा जिल्हा	..	एकूण	१५,५४३	१०,२२३	५,३२०
		ग्रामीण	९,२२७	६,२५१	२,९७६
		नागरी	६,३१६	३,९७२	२,३४४
वर्धा	..	एकूण	७,७४९	५,०७४	२,६७५
		ग्रामीण	३,७५९	२,५६२	१,१९७
		नागरी	३,९९०	२,५१२	१,४७८
आर्वी	..	एकूण	४,८८९	३,२१०	१,६७९
		ग्रामीण	३,७७७	२,५०७	१,२७०
		नागरी	१,११२	७०३	४०९
हिंगणघाट	..	एकूण	२,९०५	१,९३९	९६६
		ग्रामीण	१,६९१	१,१८२	५०९
		नागरी	१,२१४	७५७	४५७

तक्ता क्रमांक ११

जिल्ह्यातील अनुसूचित जमातींची तालुकानिहाय लोकसंख्या, १९८१

जिल्हा/तालुका		एकूण/ग्रामीण/नागरी	व्यक्ती	पुरुष	महिला
वर्धा जिल्हा	..	एकूण	१४२,२४४	७२,५७९	६९,६६५
		ग्रामीण	१२१,८०६	६२,०५०	५९,७५६
		नागरी	२०,४३८	१०,५२९	९,९०९
वर्धा	..	एकूण	५८,१९९	२९,७०६	२८,४९३
		ग्रामीण	४६,२८३	२३,५९५	२२,६८८
		नागरी	११,९१६	६,१११	५,८०५
आर्वी	..	एकूण	५०,२०६	२५,६२८	२४,५७८
		ग्रामीण	४७,४६५	२४,२१०	२३,२५५
		नागरी	२,७४१	१,४१८	१,३२३
हिंगणघाट	..	एकूण	३३,८३९	१७,२४५	१६,५९४
		ग्रामीण	२८,०५८	१४,२४५	१३,८१३
		नागरी	५,७८१	३,०००	२,७८१

तक्ता क्रमांक १२

वर्धा जिल्ह्यातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या, १९८१

अनुसूचित जमाती	एकूण	पुरुष	महिला	अनुसूचित जमाती	एकूण	पुरुष	महिला
सर्व जमाती ..	१,४२,२४४	७२,५७९	६९,६६५	कमार	२२८	११३	११५
आंध ..	२६	११	१५	काथोडी, कातकरी	११८	६२	५६
बैगा ..	३	१	२	कवर, कांवर, कोर	२१२	११२	१००
बावचा, बामचा ..	४५	२७	१८	खैरवार	११५	५६	५९
भारिया, भूमिया ..	६८	४३	२५	खरिया	५१०	२७०	२४०
भिल्ल, भिल गरासिआ, ढोली भिल	२,९६५	१,४९७	१,४६८	कोकणा, कुकणी, कुकना	५९	३४	२५
भुंजिया ..	८८	४५	४३	कोल	२१३	९९	११४
बिंझवार ..	१	१	..	कोलाम, मुन्नेरवारलू	४,८६३	२,५१०	२,३५३
बिरहुल, बिरहोर ..	१	..	१	कोळी ढोर, टोकरे कोळी	६३५	३२८	३०७
ढाणका, तडवी, तेतारिया, वळवी	६	३	३	कोळी महादेव, डोंगर कोळी	२,५९५	१,३४०	१,२५५
धनवार ..	५,९१४	३,०५६	२,८५८	कोळी मल्हार	२,३३५	१,२०५	१,१३०
धोडिया ..	१२	७	५	कोरकू, बोपची, मोवासी	५०४	२६०	२४४
दुबळा, तलाविया, हळपति ..	१	१	..	कोया, भिनेकोया, राजकोया	६५	३२	३३

गामित, गामटा, गाविल, मावची, पाडवी	३	७	६	नगेसिया, नगासिया	९	२	७
गोंड, राजगोंड, आरख	९५,३८५	४८,५१९	४६,८६६	नाइकडा, नायका	९४	५०	४४
				उरांव, धनगड	७०३	३७६	३२७
हलबा, हलबी	१२,०६१	६,१९७	५,८६४	परधान, पाथरी, सरोटी	८,०२९	४,०७०	३,९५९
				पारधी, आडवी चिंचेर	१,७४८	८७०	८७८
				पारजा	३०	१६	१४
				पटेलिया	९	५	४
				राठवा	४	३	१
				ठाकूर, ठाकर, वारली	२,४११	१,२६८	१,१४३
				विटोलिया, कोट वालिया	२	२	..
				बारोडिया	१०	५	५

तक्ता क्रमांक १३

जिल्ह्यातील अनुसूचित जमातींची तालुकानिहाय साक्षर लोकसंख्या, १९८१

जिल्हा/तालुका	एकूण/ग्रामीण/नागरी	व्यक्ती	पुरुष	महिला
वर्धा जिल्हा ..	एकूण	४९,४५७	३२,७८४	१६,६७३
	ग्रामीण	३८,२६८	२५,८६३	१२,४०५
	नागरी	११,१८९	६,९२१	४,२६८
वर्धा ..	एकूण	२१,९६६	१४,२८४	७,६८२
	ग्रामीण	१५,३४०	१०,२५२	५,०८८
	नागरी	६,६२६	४,०३२	२,५९४
आर्वी ..	एकूण	१६,१५९	१०,८४७	५,३१२
	ग्रामीण	१४,८२१	९,९९८	४,८२३
	नागरी	१,३३८	८४९	४८९
हिंगणघाट ..	एकूण	११,३३२	७,६५३	३,६७९
	ग्रामीण	८,१०७	५,६१३	२,४९४
	नागरी	३,२२५	२,०४०	१,१८५

तक्ता क्रमांक १४

१९८१ व १९९१* च्या जनगणनेनुसार वर्धा जिल्ह्यातील लोकसंख्या [तुलनात्मक]

वर्ष	एकूण लोकसंख्या	दशकातील वाढ [%]	साक्षर	दशकातील वाढ [%]	साक्षरांची टक्केवारी	हजार पुरुषामागे महिलांची संख्या	लोकसंख्येची घनता (चौ. कि. मी.)
१९८१							
पुरुष	४,७५,६९६	—	२,९०,२२५	—	६१.०२	—	—
महिला	४,५०,९२२	—	१,८२,७७५	—	४०.५३	—	—
एकूण	९,२६,६१८	१८.८६	४,७३,०००	—	५१.०४	९४८	१४६.८४
१९९१							
पुरुष	५,४८,९१८	१५.३९	३,७५,२३९	२९.२९	६८.३६	—	—
महिला	५,१६,६७१	१४.५८	२,७०,५७८	४८.०४	५२.३७	—	—
एकूण	१०,६५,५८९	१४.९९	६,४५,८१७	३६.५४	६०.६१	९४१	१६८.८७

* १९९१ ची आकडेवारी तात्पुरती आहे.

प्रकरण ४—कृषि व जलसिंचन

कृषक लोकसंख्या

वर्धा जिल्ह्यात १९८१ च्या जनगणनेनुसार ७२.९४ टक्के लोक शेतीवर अवलंबून होते. इ. स. १९६१, १९७१ आणि १९८१ ची कृषक लोकसंख्या खाली दिली आहे.

जिल्हा/तालुका[१]	वर्ष	एकूण लोकसंख्या	कृषक लोकसंख्या	कृषक लोकसंख्येची टक्केवारी
वर्धा जिल्हा ..	१९६१	६,३४,२७७	२,४४,८०४	३८.६०
	१९७१	७,७९,५६२	२,३३,१३७	२९.९१
	१९८१	९,२६,६१८	३,०५,६५४	३२.९९
वर्धा ..	१९६१	२,८७,७३७	९२,९८१	३२.३१
	१९७१	३,५७,३७६	८९,७२९	२५.११
	१९८१	४,२४,७७०	१,२१,७९१	२८.६७
आर्वी ..	१९६१	१,७९,२७६	८३,१३२	४६.३७
	१९७१	२,१७,७८३	८०,७५१	३७.०८
	१९८१	२,४९,१८८	९८,३६९	३९.४८
हिंगणघाट ..	१९६१	१,६७,२६४	६८,६९१	४१.०७
	१९७१	२,०४,४०३	६२,६५७	३०.६५
	१९८१	२,५२,६६०	८५,४९४	३३.८४

वर्धा तालुक्यात नागरी लोकसंख्या अधिक असल्यामुळे कृषक लोकसंख्येचे प्रमाण सर्वांत कमी आहे. शेती हा प्रामुख्याने कुणबी, मराठा, तेली, मारवाडी, माळी आणि गोंड लोकांचा व्यवसाय आहे. सन १९०८—१९१२ च्या सेटलमेंट रिपोर्टनुसार १९११ च्या जिल्ह्याच्या ४,५९,७९६ एकूण लोकसंख्येपैकी जमीनधारकांची संख्या ७,१२२ (१.५५ टक्के) आणि कुळांची संख्या १,२९,६६८ (२८.२० टक्के) होती. काही ब्राह्मण, मराठा, मारवाडी आणि कुणबी मालगुजार असून बरीचशी गावे त्यांच्या मालकीची होती. इ. स. १९११ मध्ये वर्धा

[१] तालुक्यांचे विभाजन झाल्यामुळे पुनर्रचित तालुक्यांची १९८१ ची आकडेवारी उपलब्ध नाही.

हिंगणघाट व आर्वी तालुक्यांत अनुक्रमे २,५३४; १,४३१ व २,५८१ मालगुजार होते, तर बहुतांश कुणबी, तेली, माळी आणि गोंड शेती कसणारे होते. इ. स. १९११ मध्ये कुळांचे जातीनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे होते.

तालुका	कुणबी	तेली	माळी	ब्राह्मण	इतर	एकूण
वर्धा	५,६२३	३,१३१	१,३९५	१,१२२	५,५३७	१६,८०८
हिंगणघाट	३,९५४	१,७२०	३२०	५१६	४,२९८	१०,८०८
आर्वी	३,१११	८९६	१,०७०	५०८	५,७९८	११,३८३
एकूण	१२,६८८	५,७४७	२,७८५	२,१४६	१५,६३३	३८,९९९

कृषि हंगाम

जिल्ह्यात शेतीचे खरीप आणि रबी असे दोन प्रमुख हंगाम असून खरीप हंगाम जूनमधील मृग नक्षत्रापासून सुरू होऊन डिसेंबरमध्ये संपतो. या हंगामात कापूस, ज्वारी, तूर, भात, बाजरी, भुईमूग आणि मूग या खरीप पिकांची पेरणी मान्सूनच्या जोरदार प्रारंभानंतर सुरू करून जुलैच्या मध्यापर्यंत आटोपतात. रबी हंगाम ऑक्टोबर ते मार्च असतो. या हंगामात ज्वारी, गहू, हरभरा, जवस व करडई ही प्रमुख पिके घेतात. जलसिंचनाची बारमाही सोय उपलब्ध असलेल्या जमिनीत केळी, पपई, संत्री, हळद व ऊस ही नगदी पिके घेतात. सिंचनाच्या वाढत्या सोयींमुळे दुसोटा पिके घेण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

जमीन

जिल्ह्याचा संपूर्ण भाग काळ्या किंवा गर्द करड्या मातीच्या पातळ थरांनी आच्छादित आहे. ही जमीन ज्वालामुखीच्या उद्रेकापासून तयार झालेली असल्याने कापूस आणि ज्वारीच्या पिकांकरिता सुपीक मानली जाते. मृदेच्या थरांची जाडी सरासरी एक मीटरपर्यंत आढळते. काही ठिकाणी ती पाव मीटर ते तीन मीटरपर्यंत आढळते. या मृदेत चुनखडीचे खडे आढळतात. डोंगराळ भाग सोडल्यास बहुतांश भागात गाळाची व सखल जमीन आहे. डोंगराळ प्रदेशातील हलक्या प्रकारच्या मृदेस बरडी म्हणतात. आर्वी, कारंजा, आष्टी, वर्धा, देवळी व सेलू तालुक्यांतील डोंगराळ भागात हलक्या प्रकारची मुरमाड जमीन आहे. हिंगण-घाट व समुद्रपूर तालुक्यांचा अधिकांश भाग, सेलू तालुक्याचा उत्तरेकडील भाग आणि आर्वी, कारंजा व आष्टी तालुक्यांच्या भागात मृदेचे थर कमी जाडीचे आहेत. हिंगणघाट तालुक्याच्या पश्चिमेकडील पट्ट्यात मध्यम प्रकारची जमीन तर आर्वी तालुक्यात वर्धा नदीच्या काठी गाळाची सुपीक जमीन आहे.

जिल्ह्यातील जमिनीचे काळी, मोरांड, खरडी आणि बरडी असे चार प्रमुख प्रकार आहेत. जिल्ह्याचा अधिकांश भाग काळ्या जमिनीने व्यापला असून तिची उत्पादकता सर्वाधिक आहे. प्रथम दर्जाची काळी जमीन आर्वी व कारंजा तालुक्यांत असून दुय्यम दर्जाची काळी

जमीन हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यांत आहे. या जमिनीमध्ये ओलावा धारणक्षमता जास्त आहे. मोरांड ही काळी किंवा गर्द तपकिरी रंगाची जमीन असून त्यात चुनखडीचे लहान लहान खडे आढळतात. जास्त पावसामुळे सुद्धा या जमिनीत चिखल होत नाही किंवा उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणावर भेगा पडत नाहीत. अशी जमीन जिल्ह्यात सर्वत्र असून तिचे मोरांड-१ आणि मोरांड-२ असे उपप्रकार आहेत. ही जमीन वैनगंगेच्या मैदानी भागात असून गव्हाच्या पिकास योग्य समजली जाते.

जिल्ह्याच्या पूर्व आणि उत्तरेकडील डोंगराळ भागात सुमारे ७५ मि. मी. जाड थराची खरडी आणि बरडी प्रकारची जमीन आढळते. खरड्या जमिनीत काळ्या जमिनीचे गुणधर्म असले तरी ती वाळूमिश्रित आहे. बरड्या जमिनीत दगडांचे प्रमाण अधिक आढळते. या जमिनीची स्थानपरत्वे पुन्हा रेताड आणि कचार (गाळाची जमीन) अशी वर्गवारी केली जाते. रेताड जमिनीत वाळूचे प्रमाण जास्त असते तर कचार जमीन नदीकाठांवर आढळते. उत्तम प्रतीच्या जमिनीला स्थानिक लोक गोहारी नावाने ओळखतात. जिल्ह्यातील लागवडीखालील जमिनीपैकी सुमारे १० टक्के जमीन काळी-१ प्रकारची, ७४ टक्के काळी-२ आणि १६ टक्के जमीन खरडी आणि बरडी प्रकारची आहे.

सर्वसाधारणपणे जिल्ह्यातील जमिनीचे खालीलप्रमाणे रासायनिक विश्लेषण करता येईल.[२]

पी. एच. मूल्य	८ ते ८.४ टक्के
एकूण क्षार द्रव्ये	०.२५ टक्के
गाळ	२१.५० टक्के
चिकण माती	४१.०० टक्के
चुनखडी	५.९ टक्के
विनिमय योग्य कॅल्शियम (एम. इ.) १०० ग्रॅम ..	४५.६
विनिमय योग्य मॅग्नीशियम (एम. इ.) १०० ग्रॅम ..	१०.३
विनिमय योग्य सोडीयम + पोटॅशियम (एम. इ.) १०० ग्रॅम	१.५
एकूण नैट्रोजन	०.२५ टक्के
सरासरी P_2O_5 (मि. ग्रॅ.) १०० ग्रॅम ..	१३.६९
सरासरी K_2O (मि. ग्रॅ.) १०० ग्रॅम ..	२५.०७

जमिनीचे उपयोजन

इ. स. १८९१–९२ मध्ये एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ५९.७४ टक्के क्षेत्र विविध पिकांखाली होते. इ. स. १९८०–८१ मध्ये ते ६८.०४ आणि १९८५–८६ मध्ये ते ७४.२१ टक्क्यांपर्यंत वाढले. याउलट झाडेझुडपे, गवत, कुरणे आणि पडीत जमिनीच्या क्षेत्रात घट झाली आहे. वनक्षेत्र ८.२० वरून १०.९६ टक्क्यांपर्यंत वाढलेले आहे. तक्ता क्रमांक १ मध्ये जिल्ह्यातील जमिनीचे उपयोजन आणि टक्केवारी दिलेली आहे.[३]

[२] **बॉटनी अँड फ्लोरा ऑफ महाराष्ट्र** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८५), पृ. ३९.
[३] **सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिले आहेत.**

मृद संधारण

निरनिराळ्या नैसर्गिक घटकांद्वारे होणारी जमिनीची धूप थांबवून जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी शासनाने पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून मृद संधारण कार्यक्रम हाती घेतला. त्यानुसार कार्यास गती देण्यासाठी १९६० मध्ये वर्ध्यास विभागीय मृद संधारण कार्यालय उघडण्यात आले. जिल्ह्यात जमीन सुधारणा मंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाच्या शिफारसी आणि मंजुरीनुसार जमीन सुधारणेची कामे केली जातात. एखाद्या पाणलोट क्षेत्रातील किमान ६७ टक्के खातेदारांनी लेखी विनंती केल्यास त्या क्षेत्रात ही योजना शासन राबविते. सध्या पाणलोट क्षेत्र आधारभूत धरून २८७ गावांतील ४२२ पाणलोटांची संयुक्तरीत्या निवड करण्यात आली आहे. यातील १३,०८८ एकूण लाभार्थींपैकी ३,२५१ अल्पभूधारक; १,९१३ अत्यल्प भूधारक; १,२९० अनुसूचित जाती व ९५८ अनुसूचित जमातींचे आहेत. जिल्ह्यातील मृद संधारण योजनांची माहिती पुढे दिली आहे.

ढाळीची बांधबंदिस्ती योजना : मृद संधारण कार्यक्रम राबविताना भौगोलिक परिस्थिती, जमिनीचा प्रकार आणि पर्जन्यमानाचा विचार करण्यात येतो. या जिल्ह्याचा समावेश हमखास व नियमित पावसाच्या प्रदेशात होत असल्याने ढाळीच्या बांधबंदिस्तीची योजना १९६० पासून कार्यान्वित आहे. या योजनेनुसार नियमित पावसाच्या भागात ढाळीचे बांध व चर काढून अतिरिक्त पाण्याचा निचरा करून जमिनीची धूप थांबविली जाते. त्यामुळे जमिनीतील घटक द्रव्यांचे संरक्षण होते. या योजनेत शेतकऱ्यांना खर्चाच्या २५ टक्के सूट देण्यात येते. ही योजना विभागीय मृद संधारण अधिकारी, वर्धा, आणि आर्वी, वर्धा व हिंगणघाट येथील उपविभागीय अधिकाऱ्यांकरवी १९६० पासून राबविली जात आहे. जिल्ह्यात बांधबंदिस्ती योग्य जमिनीचे क्षेत्र ३,५०,००० हेक्टर असून त्यापैकी १,९३,७८१ हेक्टर क्षेत्रात ऑगस्ट १९८९ पर्यंत ढाळीची बांधबंदिस्ती करण्यात आली. ही कामे रोजगार हमी योजनांतर्गत १९७४–७५ पासून केली जातात.

पाटस्थळ योजना : बांधबंदिस्तीमुळे जमिनीचे पोत सुधारून व कालव्यांद्वारे सिंचन करून अधिक उत्पादन काढण्याच्या योजनेला आयाकट किंवा पाटस्थळ असे म्हणतात. ज्या सुपीक जमिनीवरील पिके पाण्याअभावी नष्ट होतात अशा ठिकाणी ही योजना राबविण्यात येते. ही योजना जिल्ह्यात १९६६ पासून कार्यान्वित झाली असून सुरुवातीस ती एकाच उपविभागाद्वारे राबविली जात होती. या उपविभागाने १९६९ मध्ये प्रत्यक्ष कामास सुरुवात केली. परंतु बोर, डोंगरगाव आणि पंचधारा प्रकल्पाखाली जादा क्षेत्र आल्यामुळे १९७० मध्ये दोन उपविभाग स्थापण्यात आले. या प्रकल्पांखालील कामे पूर्ण झाल्यावर एप्रिल १९७३ मध्ये एक उपविभाग नागपूरला स्थलांतरित केला. या योजनेखाली १९७० पर्यंत १७,५४८.२६ हेक्टर क्षेत्रासाठी ९३.२० लाख रुपये खर्च करण्यात आले व ५,५०० शेतकऱ्यांना लाभ मिळाला. धाम, अप्पर वर्धा आणि लोअर वर्धा प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर असून या योजनेनुसार जमीन सुधारणा कार्यक्रम राबविल्यास ओलिताचे क्षेत्र दीड पटीने वाढेल असा शासकीय अंदाज आहे. या विभागाने ऑगस्ट १९८९ पर्यंत[४] जिल्ह्यात केलेल्या कार्याची माहिती पुढे दिली आहे.

---

[४] विभागीय मृद संधारण अधिकारी, वर्धा, यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती (१९८९).

(हेक्टर)

कामाचा तपशील		उपलब्ध क्षेत्र	ऑगस्ट १९८९ पर्यंत झालेली कामे	पुढील कामासाठी उपलब्ध क्षेत्र
वनीकरण	..	७,०००	१,९६८	५,०३२
ढाळीचे बांध	..	३,५०,०००	१,९३,७८९	१,५६,२११
जमीन सपाटीकरण	..	१४,०००	१२६	१३,८७४
चिबड जमीन	..	२,७५०	१४७	२,६०३
नाला बांधाची कामे	..	२,००० प्लग	२७५	१,७२५ प्लग
नाला सरळीकरण	..	१,५००	१७३	१,३२७
आंबा लागवड	..	३,०००	१३४	२,८६६

योजना : राष्ट्रीय विकास कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात २० पाणलोटांची निवड करण्यात आली असून जाम पाणलोटाचे काम पूर्ण झालेले आहे. इतर पाणलोटांतील कामे प्रगतिपथावर आहेत. विविध योजनांवर सन १९८७–८८, १९८८–८९ आणि ऑगस्ट १९८९ पर्यंत अनुक्रमे १३.६६; १५.५८ आणि ९.०८ लाख रुपये खर्च करण्यात आले. या विभागामार्फत कृषी पंढरी गावांतील मृद संधारणाची कामे अग्रक्रमाने पूर्ण केली जातात. आतापर्यंत जाम, गंगापूर आणि सरूळ या कृषी पंढरी गावातील मृद संधारणाची बहुतेक कामे पूर्ण झाली आहेत. तसेच १९८६–८७ मध्ये १५ भूमिगत बंधारे, २६ नालाबांध व ५५ सिमेंटची नालाबांधाची कामे पूर्ण झाली आहेत. वरील योजनांवर १९८६–८७, १९८७–८८ व १९८८–८९ मध्ये अनुक्रमे १०.००; १३.३९ आणि १८.४६ लाख रुपये खर्च झाले.

सहकारी शेती

सहकारी शेतीचा प्रयोग फारसा यशस्वी झालेला नाही हे खालील आकडेवारीवरून दिसून येते. जिल्ह्यातील पहिली संयुक्त सहकारी संस्था १९५८–५९ मध्ये स्थापन झाली.

बाब		१९६५–६६	१९७६–७७	१९८४–८५
संयुक्त सहकारी शेती संस्था	..	८	९	२
सामुदायिक सहकारी शेती संस्था	..	२	२	..
सभासद	..	२४८	१५०	२३
भाग भांडवल (रुपये)	..	६२,०००	१९,०००	६,०००
खेळते भांडवल (रुपये)	..	३,८६,०००	५,२५,०००	१,०४,०००
मालकी फंड (रुपये)	..	२६,०००	२६,०००	..
एकूण क्षेत्र (हेक्टर)	..	७४९.४९	७८०	..
लागवडीखालील क्षेत्र (हेक्टर)	..	३१५.२५	५८५	..
कृषी उत्पादन (रुपये)	..	२,०१,०००	१,०४,०००	..
तोट्यात असणाऱ्या संस्था	..	६	४	..
तोटा (रुपये)	..	७,०००	६,०००	..

सन १९८५ पासून जिल्ह्यातील सर्व संयुक्त सहकारी शेती संस्था परिसमापित झाल्या आहेत. फक्त गोविंदपूर येथील महाकाली सामुदायिक सहकारी कृषी संस्था कार्यरत असून संस्थेच्या मालकीची १२.२५ हेक्टर जमीन लागवडीखाली आहे.

तृणधान्ये

खरीप व रबी ज्वारी, गहू, भात व बाजरी ही प्रमुख तृणधान्ये आहेत. या पिकांची माहिती पुढे दिली आहे.

ज्वारी : हे प्रमुख पीक सर्व तालुक्यांत घेतात. पूर्वी ज्वारीचे हलकी आणि भारी असे दोन प्रकार प्रचलित होते. हलक्या प्रकारची ज्वारी खरड्या आणि बरड्या जमिनीत आणि कमी पावसाच्या भागात घेत असत. चांगल्या जमिनीत गणेरी आणि हलक्या जमिनीत डुकरी ज्वारी पेरत असत. याशिवाय लालपाकरी आणि मोतीचुरा हे वाणसुद्धा प्रचलित होते. खरीप ज्वारीची पेरणी जूनच्या शेवटी किंवा जुलैच्या प्रारंभी करतात. ज्वारीमध्ये मूग किंवा तुरीचे मिश्र पीक घेतात. पारंपरिक पद्धतीने दर हेक्टरी १० ते १२ किलोग्रॅम बियाणे वापरतात. खरीप ज्वारीची नोव्हेंबरमध्ये कापणी करतात. रबी ज्वारीची पेरणी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये करून कापणी फेब्रुवारी-मार्च महिन्यात करतात. जिल्ह्यातील ज्वारीखालील क्षेत्र व उत्पादनाची माहिती खाली दिली आहे.[५]

वर्ष	खरीप क्षेत्र (हेक्टर)	उत्पादन (मे. टन)	दर हेक्टरी सरासरी उत्पादन (कि.ग्रॅ.)	रबी क्षेत्र (हेक्टर)	उत्पादन (मे. टन)	दर हेक्टरी सरासरी उत्पादन (कि.ग्रॅ.)
१९६०–६१	१,३३,७००	७३,८००	५५२	१,१००	४००	३८६
१९७०–७१	१,२२,३००	३५,४००	२८९	२,९००	४००	१४७
१९७५–७६	१,२९,६००	६९,४००	५३६	१,२००	३००	२७५
१९८०–८१	१,२५,०००	१,०२,९००	८२३	१,१००	४००	३६४
१९८४–८५	१,१८,३००	१,३०,६००	१,१०४	९००	३००	३४०
१९८७–८८	१,१०,३००	१,०४,५००	९४७	४००	२००	४६४

जिल्ह्यात अलीकडे ज्वारीच्या अधिक उत्पादन देणाऱ्या संकरित जातीचे पीक खरीप आणि रबी हंगामात घेतात. रासायनिक खतास भरपूर प्रतिसाद ही संकरित ज्वारीची विशेषता आहे. संकरित जातींपैकी सावनेर, सी.एच.एस-१ आणि सी.एच.एस-२ या जातींची लागवड करतात. सन १९७९–८० मध्ये संकरित ज्वारीखाली ५९,७५९ हेक्टर, १९८४–८५ मध्ये ९४,११२ हेक्टर आणि १९८६–८७ मध्ये १०,४२० हेक्टर क्षेत्र होते. संकरित जातीचे पेरणीसाठी दर हेक्टरी १२.५ किलोग्रॅम बियाणे वापरतात. पेरणीनंतर दर पंधरा दिवसांनी डवरणी आणि आवश्यकतेनुसार रासायनिक खते देतात. या पिकास दर हेक्टरी ३७.५ किलोग्रॅम नायट्रोजन खत आणि ३५ किलोग्रॅम पोटॅश देतात.

[५] **कृषि विभागाची सांख्यिकीविषयक सर्वसाधारण जिल्हावार माहिती : १९८५–८६ व १९८८–८९ (महाराष्ट्र शासन, पुणे).**

संकरित ज्वारीचे क्षेत्र वाढविण्यासाठी शासन आणि जिल्हा परिषद अनेक कार्यक्रम राबवित आहेत. सन १९७६–७७ च्या खरीप हंगामात ३,७५९.३६ हेक्टर क्षेत्रात संकरित ज्वारीचे पथप्रदर्शक प्रकल्प राबविण्यात आले. त्यावेळी प्रति हेक्टर ३३.५३ क्विंटल सरासरी उत्पादन झाले. अशा प्रकल्पांसाठी जिल्हा परिषदेमार्फत बी-बियाणे आणि महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळातर्फे खते व कीटकनाशके पुरविली जातात. संकरित वाणाच्या प्रचारासाठी जिल्ह्यात संकरित बियाणे योजना राबविण्यात येत आहे.

ज्वारीच्या संशोधनासाठी वर्धा जिल्हा परिषदेच्या कृषि विभागातर्फे १९७४–७५ व १९७७–७८ मध्ये अनुक्रमे २८ आणि १२७ खरीप ज्वारी चाचणी प्रयोग करण्यात आले. पंजाबराव कृषि विद्यापीठानेही त्यावर्षी अनुक्रमे ८ आणि ६ चाचणी प्रयोग केले. ज्वारीवर खोडकिडा, खोडमाशी, भुंगरी, लष्करी अळी, तुडतुडे इत्यादी किडी; आणि मावा, काणी, काजळी व तांबेरा हे रोग पडतात. त्यावर एन्ड्रीन, एन्डोसल्फान, बी.एच.सी. आणि गंधकाची भुकटी इत्यादी कीटकनाशके आणि औषधे वापरतात.

गहू : हे जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे पीक असून जलसिंचनाच्या वाढत्या सोयींमुळे ओलिताखालील गव्हाच्या क्षेत्रातही दिवसेंदिवस वाढ होत आहे. वर्धा नदी लगतच्या भागात व बोर प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात बागायती गहू घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. गव्हाखालील क्षेत्र, एकूण उत्पादन आणि दर हेक्टरी सरासरी उत्पादनाची माहिती खाली दिली आहे.[६]

वर्ष		क्षेत्र ('००' हेक्टर)	उत्पादन ('००' मे. टन)	हेक्टरी उत्पन्न (किलोग्रॅम)
१९६०–६१	..	४३१	१६१	३७२
१९७०–७१	..	३५४	१२९	३६४
१९७५–७६	..	४२९	४३०	१,००२
१९८०–८१	..	३७९	४८७	१,०१९
१९८४–८५	..	३२६	३३१	१,०१५
१९८७–८८	..	२१७	१४८	७८२

इ. स. १८९२–९४ मध्ये एकूण पिकाखालील क्षेत्राच्या २१ टक्के, १९१५–१६ मध्ये १४ टक्के तर १९८४–८५ मध्ये २० टक्के क्षेत्रात गहू होता.

खरीप हंगामातील ज्वारी, बाजरी, मका, भात अथवा कापसाचे पीक काढल्यानंतर रबी हंगामात गव्हाची पेरणी ऑक्टोबरमध्ये करतात. कोरडवाहू पिकास रासायनिक खते देणे शेतकऱ्यास परवडत नाही. ओलिताखालील पिकास दर हेक्टरी सुमारे २५ ते ३० गाड्या शेणखत तसेच रासायनिक खते देतात. बहुधा या पिकास अंतरमशागतीची गरज भासत नाही. परंतु बागायती गव्हास अंतरमशागतीचा फायदा होतो. पीक ४५ दिवसांचे होईपर्यंत आवश्यकतेप्रमाणे एक-दोन कोळपण्या देण्याची पद्धत आहे. कोरडवाहू व बागायती पिकासाठी दर हेक्टरी १८ ते २७ कि. ग्रॅ. बियाणे वापरतात. चार ते पाच महिन्यांत पीक

[६] कित्ता.

कापणीसाठी तयार होते. कापणी साधारणपणे फेब्रुवारी-मार्चमध्ये करतात. काणी, तांबेरा मूळकूज, खोडकिडा, वाळवी व मावा यांच्या उपद्रवापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी कीटकनाशके आणि पीक संरक्षक द्रव्ये वापरतात.

भात (धान): जिल्ह्यात भाताचे पीक अल्प प्रमाणात घेतात. भाताची लागवड प्रामुख्याने स्थानिक बियाणे वापरून पेरणी पद्धतीने करतात. अलीकडे काही ठिकाणी संकरित भाताची लागवड करतात. इ. स. १८९२ मध्ये जिल्ह्यात भाताखाली सुमारे १,२१४ ते २,४२८ हेक्टर क्षेत्र होते. त्यापैकी सर्वाधिक क्षेत्र हिंगणघाट तालुक्यातील गिरड भागात होते. त्यावेळी दर एकरी उत्पादन ३१७ कि. ग्रॅम होते. भाताखालील क्षेत्र आणि उत्पादनाची आकडेवारी खाली दिली आहे.[७]

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	उत्पादन (मे. टन)	दर हेक्टरी उत्पन्न (किलो ग्रॅम)
१९६०–६१	..	३,३००	१,९००	५८२
१९७०–७१	..	७,१००	७,५००	१,०५६
१९७५–७६	..	९,१००	१०,३००	१,१३२
१९८०–८१	..	७,४००	४,७००	६३५
१९८५–८६	..	९,७००	१०,०००	१,०३०
१९८७–८८	..	७,८००	१,९००	२४१

भाताच्या पिकावर गादमाशी, लष्करी अळी, पाने गुंडाळणारी अळी, खोडकिडा, तुडतुडे, करपा, कडा करपा इत्यादी कीड व रोग पडतात.

बाजरी : बाजरीच्या पिकाखाली १९८४–८५ मध्ये फक्त ६०० हेक्टर क्षेत्र होते. बाजरी फक्त खरीप हंगामात घेतात. ज्वारीप्रमाणेच पूर्वमशागत करून जून/जुलैमध्ये पहिल्या पावसानंतर पेरणी करतात. ऑक्टोबरमध्ये बाजरीची कापणी व मळणी करतात. अलीकडे अधिक उत्पादन देणाऱ्या संकरित वाणाचा वापर करतात. दर हेक्टरी पेरणीसाठी ३.७५ ते ५.०० किलोग्रॅम बियाणे लागते.

कडधान्ये

जिल्ह्यात तूर, मूग व हरभरा या प्रमुख कडधान्यांशिवाय मठ, उडीद, वाल, चवळी, वाटाणा व मसूर ही कडधान्येही घेतात.

तूर : इ. स. १९०२–०३ मध्ये या पिकाखाली ३४,४०० हेक्टर तर १९८५–८६ व १९८७–८८ मध्ये २६,६०० व ३३,६०० हेक्टर क्षेत्र होते. तुरीचे पीक कापूस आणि ज्वारीच्या पिकासोबत मिश्र-पीक म्हणून घेतात. त्यामुळे कापूस आणि ज्वारीच्या पिका-बरोबरच जून-जुलैमध्ये त्याची पेरणी करतात. मुख्य पिकामध्ये तुरीच्या रांगा ठराविक

[७] कित्ता.

अंतरावर असतात. जानेवारी-फेब्रुवारीमध्ये कापणी व मळणी करतात. तुरीखालील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी उत्पन्नाची आकडेवारी खाली दिली आहे.[८]

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	उत्पादन (टन)	दर हेक्टरी उत्पन्न (किलोग्रॅम)
१९६०-६१	..	२६,८००	५९,८००	२,२३४
१९७०-७१	..	२५,५००	२१,१००	८२६
१९७५-७६	..	२५,८००	२६,८००	१,०३८
१९८०-८१	..	३१,६००	२९,४००	७३१
१९८५-८६	..	२६,६००	३३,५००	९१६
१९८७-८८	..	३३,६००	३५,९००	१,०६९

अलीकडे अधिक उत्पादन देणाऱ्या संकरित जातीच्या तुरीचे स्वतंत्ररीत्या पीक घेतात शासनाच्या प्रशिक्षण व भेट योजनेंतर्गत १९८२-८३ पासून तुरीखालील क्षेत्रात वाढ करण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत.[९] त्यानुसार तुरीखालील क्षेत्र खालीलप्रमाणे होते.[१०]

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	वर्ष		क्षेत्र (हेक्टर)
१९८२-८३	..	३३,५७५	१९८६-८७	..	५१,८००
१९८३-८४	..	४१,०१४	१९८७-८८	..	५३,१००
१९८४-८५	..	४५,०००	१९८८-८९	..	५५,४४५
१९८५-८६	..	४९,८६५			

तुरीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी पीक पद्धतीत काही बदल करण्यात आले. त्यानुसार कापसाखालील काही क्षेत्र खरीप तुरीखाली व गव्हाखालील काही क्षेत्र अर्ध-रबी तुरीखाली आणण्यात आले. त्यामुळे १९८२-८३ ते १९८८-८९ दरम्यान कापसाच्या क्षेत्रात १,८३,९६५ हेक्टरवरून १,६०,००० हेक्टरपर्यंत घट झाली तर तुरीच्या क्षेत्रात ३३,५७५ हेक्टरवरून ५५,४४५ हेक्टरपर्यंत वाढ झाली. प्रशिक्षण व भेट योजनेंतर्गत लागवडीसाठी तुरीच्या सी-२, ई.बी-३८ आणि हैदराबाद ३८ या संकरित बियाण्यांची पेरणी करतात. त्यासाठी १९८२-८३, १९८३-८४, १९८४-८५ आणि १९८७-८८ मध्ये अनुक्रमे ६६; १०४; ७४ आणि ७१.२१ क्विंटल बियाणे वाटप करण्यात आले.

[८] कित्ता.

[९] कृषि संचालनालय, पुणे, यांनी प्रकाशित केलेल्या आकडेवारीवरून उपरोक्त तुरीच्या पिकाचे क्षेत्र घेतले आहे. तथापि कृषि अधिकारी, प्रशिक्षण व भेट योजना, वर्धा, यांनी जे तुरीचे क्षेत्र नमूद केले आहे त्यांचेशी मेळ बसत नाही.

[१०] कृषि अधिकारी, प्रशिक्षण व भेट योजना, वर्धा.

मूग : या खरीप पिकाखाली १९६५–६६ मध्ये ९,७०१ हेक्टर क्षेत्र होते. त्यापैकी सर्वाधिक क्षेत्र वर्धा तालुक्यात होते. इ. स. १९८८–८९ मध्ये ६,१०० हेक्टर क्षेत्रातून १,९०० मे. टन उत्पादन झाले. ज्वारीबरोबर मुगाचे मिश्र-पीक घेतात. जुलै महिन्यात पेरणी करून सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये हे पीक घेतात. काहीं ठिकाणी कोपरगाव नामक मुगाचे बियाणे पेरतात.

हरभरा : खरीप ज्वारीच्या शेतात रबी हंगामात हरभऱ्याचे दुसोटा पीक घेतात. त्याखाली १९८४–८५ मध्ये ७,९९९ हेक्टर आणि १९८८–८९ मध्ये १४,२०० हेक्टर क्षेत्र होते. हे पीक प्रामुख्याने समुद्रपूर, हिंगणघाट व कारंजा तालुक्यात घेतात. हरभरा व गव्हाची मशागत पद्धती व पेरणीचा हंगाम सर्वसाधारणपणे सारखाच असतो. फेब्रुवारीत काढणी करतात. हरभऱ्याखालील क्षेत्र, उत्पादन आणि दर हेक्टरी उत्पादनाची आकडेवारी खाली दिली आहे.[११]

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	उत्पादन (टन)	उत्पन्न (कि. ग्रॅ.)	अन्नपिकांच्या उत्पादनाशी टक्केवारी
१९६०–६१	..	३,८००	१,१००	२९०	०.६९
१९७०–७१	..	५,३००	१,२००	२३५	१.४०
१९७५–७६	..	५,२००	२,०००	३१४	१.२८
१९८०–८१	..	५,७००	१,८००	३१२	०.९४
१९८५–८६	..	५,८००	२,१००	३६२	उ.ना.
१९८७–८८	..	७,९००	२,८००	३५५	उ.ना.

कापूस

वर्धा जिल्ह्यातील कापूस लागवडीचा **ऐन-इ-अकबरी** व **बादशाहनामा** या अकबरकालीन ग्रंथांत उल्लेख आहे. कापसामुळे होत असलेल्या संपन्नतेमुळे अकबराने या प्रदेशावर अधिसत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. या नगदी पिकावर जिल्ह्याची कृषी अर्थव्यवस्था अवलंबून आहे. इ. स. १८६३, १८९२–९४ व १९०४–०५ मध्ये कापसाखाली अनुक्रमे ७४,४६२; १,०१,५७६ आणि १,६३,४९३ हेक्टर क्षेत्र होते. त्या काळी कापसाची अधिक उत्पन्न देणारी परंतु आखूड धाग्याची **जरी** नामक जात अदमासे तीन–चतुर्थांश क्षेत्रात पेरली जात होती. सन १८५० च्या आसपास हिंगणघाट परिसरात तुलनात्मकरीत्या अधिक लांब धाग्याचा **बनी** जातीचा कापूस शुद्ध स्वरूपात पिकवित असत. या कापसास लँकेशायरमध्ये मोठी मागणी होती. त्याच्या प्रसिद्धीमुळे **बनी** कापसास हिंगणघाट असेही नाव प्राप्त झाले होते. अमेरिकन यादवी युद्धकाळात (१८६१–१८६५) या कापसास विलक्षण मागणी होती. त्यामुळे त्याच्या उत्पादनात पुष्कळ वाढ झाली होती. तथापि युद्धजन्य तेजी ओसरल्या-वर हिंगणघाट **बनी** कापसाची मागणी घटली व किंमती कोसळल्या. त्यामुळे पुढील वर्षामध्ये शेतकऱ्यांनी **बनी** बियाणे शुद्ध स्वरूपात जतन करून ठेवले नाही. परिणामत: ही लांब धाग्याची जात नष्ट झाली. विद्यमान शतकाच्या प्रारंभी **जरी, बनी** आणि **अपलँड जॉर्जिअन**

[११] कित्ता.

(अमेरिकन जात) यांचे मिश्रण आढळत असे. सन १८८७ मध्ये अपलँड जॉर्जिअनचे बियाणे सरकारने पुरविले होते, तथापि ही जात निराशाजनक ठरली. हिंगणघाटची बनी शुद्ध स्वरूपात न राहिल्यामुळे जरी मूळ नाव टिकून असले तरी तिच्यात उपरोक्त तिन्ही बियाण्यांचे मिश्रण होते. निवडक वर्षांमधील कापसाखालील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी सरासरी उत्पन्नाची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	उत्पादन[१२]	हेक्टरी उत्पन्न (कि. ग्रॅ.)
१९१२–१३	..	१,६२,७३२	उ. ना.	उ. ना.
१९२०–२१	..	१,६५,०८५	उ. ना.	उ. ना.
१९३१–३२	..	१,८५,२१६	उ. ना.	उ. ना.
१९४०–४१	..	१,१८,१६२	उ. ना.	उ. ना.
१९६०–६१	..	१,५०,४००	६८,४००	७७
१९७०–७१	..	१,८३,३००	२४,४००	२३
१९८०–८१	..	१,८८,७००	८१,०००	७२
१९८५–८६	..	१,७५,८००	१,८६,९००	१८१
१९८७–८८	..	१,४८,४००	८५,५००	९८

काळ्या व मोरांड जमिनीत कापसाचे उत्तम पीक येत असले तरी दरसाल पुनरावृत्ती केल्यास जमिनीचा कस कमी होतो म्हणून पीक आळीपाळीने काढणे उपयुक्त असते. तथापि पुष्कळ शेतकरी या बाबीकडे दुर्लक्ष करतात. आपल्या ऐपतीनुसार शेतकरी शेणखत, कंपोस्ट व रासायनिक खते देतात. कापसाची पेरणी मान्सूनचा प्रारंभ होताच करतात. कापसाबरोबर तूर किंवा मुगाचे मिश्र-पीक घेण्याची पद्धत रूढ आहे. कापसाच्या बारा ओळीनंतर तुरीच्या दोन ओळी पेरतात. कापूस वेचणी हंगाम नोव्हेंबरपासून फेब्रुवारीपर्यंत असतो.

कापूस पिकावर मावा, तुडतुडे, लाल कोळी, पिवळ्या ठिपक्याची बोंड अळी, घाटे पोखरणारी अळी, तांबडे व पांढरे ढेकूण यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो. संरक्षक उपाय म्हणून डी.डी.टी. व गंधक, एंड्रीन अथवा बी.एच्.सी. रसायनांची फवारणी करतात. नवनवीन संशोधनामुळे अधिक उत्पादन देणाऱ्या कापसाच्या बुरी १००७, एल-१४७, एच-४, डी.एच.वाय.-२८६, एस.आर.टी.-१, निमकर, एके-२३५, गोदावरी आणि वरलक्ष्मी या जातींची लागवड करतात. एच-४ या संकरित जातीची कोरडवाहू जमिनीत अधिक प्रमाणात लागवड करतात. संकरित कापूस प्रामुख्याने ओलिताच्या जमिनीत घेतात. तिफण नामक लाकडी अवजाराने चौकोन तयार करून त्यात हाताने संकरित बी लावतात.

तेलबिया

जिल्ह्यात तेलबियांमध्ये प्रामुख्याने तीळ, जवस आणि भुईमूगाचा समावेश होतो.

तीळ : इ. स. १९०४–०५ मध्ये तिळाखाली सुमारे १,२१,४०० ते २,०२,३४३ हेक्टर क्षेत्र होते. खरीप व रबी हंगामात हे मिश्र-पीक म्हणून सर्वत्र घेण्यात येत असले तरी हिंगणघाट

[१२] कापसाचे उत्पादन १०० गाठीत असून एक गाठ १७० किलोग्रॅमची आहे.

व समुद्रपूर तालुक्यात सर्वाधिक क्षेत्र आहे. मात्र हिंगणघाट तालुक्यात तीळ मुख्यतः रबी हंगामात घेतात. या पिकाखालील क्षेत्राची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	वर्ष		क्षेत्र (हेक्टर)
१९१२–१३	..	६,५८१	१९६१–६२	..	७,४८४
१९२०–२१	..	१०,१६९	१९७०–७१	..	४,६००
१९३१–३२	..	४,४६४	१९८४–८५	..	५,९७०
१९४०–४१	..	६,९३६	१९८८–८९	..	१६,१००

ढावरी (पांढरे तीळ) व माघेली किंवा बोऱ्या (लाल तीळ) या स्थानिक जाती प्रचलित आहेत. तिळाचे मिश्र-पीक असल्यामुळे मुख्य पिकाबरोबरच त्याची पेरणी करतात. मात्र स्वतंत्र पीक घ्यावयाचे असल्यास तिफणीद्वारे पेरणी करतात. माघेली तिळाची कापणी माघ महिन्यात होते. भुईमूग व सोयाबीनच्या लागवडीमुळे तिळाखालील क्षेत्रात अलीकडे घट होत आहे.

जवस : जवस खरीप आणि रबी हंगामात पूर्वीपासून घेतात. इ. स. १८९० मध्ये जवसाच्या लागवडीखाली ५,६६,५६० हेक्टर क्षेत्र होते. परंतु तिळाच्या तेलास जवसापेक्षा अधिक भाव असल्यामुळे जवसाखालील क्षेत्र हळूहळू कमी होऊन १९०४–०५ मध्ये ते २४,२८१ हेक्टर झाले. सन १९१२–१३ पासून जवसाचे क्षेत्र खालीलप्रमाणे होते.

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	वर्ष		क्षेत्र (हेक्टर)
१९१२–१३	..	३७,३५२	१९७०–७१	..	१०,९००
१९२०–२१	..	८,३३७	१९७९–८०	..	१२,५८०
१९३१–३२	..	६,८०७	१९८४–८५	..	१०,३४५
१९४०–४१	..	२१,०५१	१९८८–८९	..	७,८००
१९६१–६२	..	११,५७४			

जवसाचे पीक सर्वत्र घेण्यात येत असले तरी हिंगणघाट आणि समुद्रपूर तालुक्यांत ते अधिक प्रमाणात घेतात. हे पीक सर्व प्रकारच्या जमिनीत येते. जवसाच्या हावरा आणि काध्या या स्थानिक जातींची तसेच सी-४-२९ व एस-३६ या जातींचीही लागवड करतात. पेरणीसाठी हेक्टरी ८ ते १० किलोग्रॅम बियाणे लागते. रबी जवसाची कापणी फेब्रुवारी मध्यापर्यंत होते.

भुईमूग : खाद्य तेलाच्या वाढत्या मागणीमुळे दिवसेंदिवस जिल्ह्यातील भुईमूग लागवडीत वाढ होत आहे. कारंजा आणि आर्वी तालुक्यात भुईमुगाचे क्षेत्र जास्त आहे. गाळाच्या जमिनीत हे पीक सलग पेरतात. निचऱ्याच्या मध्यम ते भारी प्रतीच्या जमिनीत पीक चांगले

येते. पेरणीपूर्वी जमिनीची पूर्वमशागत आवश्यक असते. भुईमुगाच्या उपट्या, निमपसऱ्या व पसऱ्या या स्थानिक आणि एके-१२-२४, एस-बी-११, कोपरगाव-३, कोपरगाव-१, एके-१०, के-४-११ या संकरित जाती पेरतात. मान्सूनच्या आगमनानंतर जून-जुलैमध्ये पेरणी करतात. पसऱ्या जातीचे दर हेक्टरी ८० किलोग्रॅम बियाणे लागते. पेरणी तिफणीने (पाभर) किंवा टोकण पद्धतीने करतात. पेरणीनंतर दोन आठवड्यांनी कोळपणी व खुरपणी करावी लागते. साधारणपणे ऑक्टोबर-नोव्हेंबरपर्यंत भुईमुगाचे पीक तयार होते. दर हेक्टरी १० ते १५ क्विंटल उत्पादन येते. पिकास मावा, टिक्का हे रोग आणि पाने गुंडाळणाऱ्या अळीचा उपद्रव होतो. भुईमुगाखाली खालीलप्रमाणे क्षेत्र होते.

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	वर्ष		क्षेत्र (हेक्टर)
१९१५–१६	..	२४	१९७०–७१	..	७,८००
१९२०–२१	..	७६	१९७९–८०	..	९,०२८
१९३१–३२	..	४२५	१९८४–८५	..	११,१००
१९४०–४१	..	२,५४९	१९८८–८९	..	१७,९००
१९६१–६२	..	१,२१४			

उपरोक्त तेलबियांशिवाय जिल्ह्यात करडई व सूर्यफूल पिकवितात. इतर तेलबियांखालील क्षेत्राची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	वर्ष		क्षेत्र (हेक्टर)
१९१२–१३	..	५६३	१९६०–६२	..	उ. ना.
१९२०–२१	..	४५८	१९७०–७१	..	१००
१९३१–३२	..	३३२	१९८०–८१	..	१,९१,०००
१९४०–४१	..	१०२	१९८४–८५	..	३४,०००
१९५०–५१	..	उ. ना.	१९८८–८९	..	६,३००

ऊस

वर्धा जिल्ह्यात विद्यमान शतकाच्या प्रारंभकाळी ऊस क्वचितच लावत असत. या पिकाखाली १९२०–२१ मध्येसुद्धा केवळ ३२ हेक्टर क्षेत्र होते. तथापि उसामुळे व साखर कारखान्यांमुळे पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात आर्थिक संपन्नता आल्याने वर्धा जिल्ह्यातही ऊस लावण्याकडे कल निर्माण झाला. त्यातून सहकारी साखर कारखान्याची कल्पना पुढे आली. कारखाना सुरू होणार या कल्पनेने ऊस क्षेत्रात वाढ झाली. सन १९८४–८५ मध्ये २०० हेक्टरमध्ये ऊस लागवड केली होती. जामणी (सुकळी) येथे सहकारी कारखानाही स्थापन झाला. तथापि ऊस उत्पादनात फारशी वाढ झाली नाही, हे खालील आकडेवारीवरून स्पष्ट होते.

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	उत्पादन (मे. टन)	दर हेक्टरी उत्पन्न (किलोग्रॅम)
१९७०–७१	..	१००	६००	६,०००
१९८०–८१	..	२००	१,५००	८,०००
१९८४–८५	..	२००	२,०००	१०,०००
१९८८–८९	..	१००	६,८००	..

उसाची लागवड काळ्या व मोरांड जमिनीत आणि बारमाही ओलिताची सोय असलेल्या ठिकाणी करतात. शेणखत किंवा मिश्रखत घालून जमिनीची पूर्वमशागत केल्यावर १ ते १.२५ मीटर अंतरावर नांगराने चरी घालून जमिनीच्या उताराप्रमाणे योग्य अंतरावर सिंचनासाठी पाट तयार करतात. ऊस लागवडीचे सुरू, पूर्वहंगामी आणि आडसाली असे तीन हंगाम असून ते स्थानिक परिस्थिती, हवामान व जमिनीच्या प्रकारावर अवलंबून असतात. तीन डोळे असलेल्या उसाच्या कांड्यांना बेणे म्हणतात. बेण्याकरिता उसाची कांडी तयार करण्यासाठी आठ नऊ महिने वाढीचा ऊस वापरतात. लावणीच्या वेळी उसाला पहिले पाणी, तर चार दिवसांनी दुसरे पाणी देतात. यानंतर सुमारे दहा दिवसांच्या अंतराने नियमितपणे पाणी देतात. लावणीनंतर सुमारे दोन महिन्यांनी कोळपणी केल्यास पिकाच्या वाढीवर चांगला परिणाम होतो. सुमारे पाच महिन्यानंतर उसाचे दोन-तीन पेरे दिसू लागल्यावर कुदळीने किंवा नांगराने उसाची भरणी करतात. त्यानंतर दोन वेळा निंदणी करावी लागते. मधून मधून रासायनिक खते घालावी लागतात. ऊस लावल्यापासून सुमारे बारा महिन्यांत तयार होतो. तोडणीपूर्वी १०–१५ दिवस पाणी देणे बंद करतात. तोडणी झाल्यावर शेतातील पालापाचोळा जाळून पाणी देतात. त्यामुळे उसाच्या बुंध्यांना अंकूर येतात. यालाच खोडव्याचा ऊस म्हणतात.

शेंड्यातील काणी व पानांवरील तपकिरी ठिपके या रोगांपासून तसेच किडीपासून उसाचे नुकसान होते. ते टाळण्यासाठी अनुक्रमे एंड्रिन, बी.एच.सी., क्लोरडेन, आल्ड्रिन किंवा हेप्टाकोर या औषधांचा उपयोग करतात.

फळे

संत्री : नागपूरची संत्री भारतभर प्रसिद्ध आहेत. आर्वी व कारंजा तालुक्यांतील संत्र्याचाही नागपूर संत्र्यांमध्ये समावेश होतो. काळ्या कसदार जमिनीत संत्री उत्तम होत असली तरी दुय्यम प्रतीच्या काळ्या अथवा गाळाच्या जमिनीतही हे पीक काढले जाते. संत्री लागवड अत्यंत किफायतशीर असली तरी दरवर्षीच्या उत्पादनाबाबत अनिश्चितता असते. आर्वी आणि कारंजा तालुक्यात संत्र्यांची बरीच लागवड आहे. रोपांच्या लागवडीसाठी जमिनीच्या मगदुराप्रमाणे ६ × ६ किंवा ८ × ८ मीटर अंतरावर १ × १ × १ मीटर आकाराचे खड्डे उन्हाळ्यात खणून त्यात संत्र्याची कलमे जुलै-सप्टेंबरमध्ये लावतात. पाच वर्षांनंतर झाडे फलधारणेस परिपक्व होतात. खरा बहर मात्र सात वर्षांनंतर येण्यास प्रारंभ होतो. या पिकाची निगा कौशल्यपूर्ण राखणे महत्त्वाचे असते. त्यावर फलधारणा अवलंबून असते. संत्र्याच्या झाडांना वर्षातून दोन बहर येतात, एक आंबेबहर व दुसरा मृगबहर. आंबेबहराची फळे ऑक्टोबर ते डिसेंबर आणि मृगबहराची फळे फेब्रुवारीपासून एप्रिलपर्यंत उपलब्ध असतात. आंब्यांना मोहोर येतो त्याच सुमारास संत्र्यांना आलेल्या मोहोरास आंबेबहर म्हणतात. मृग नक्षत्रात (जून ७ ते २२) आलेल्या मोहोरास मृगबहर म्हणतात. मृगबहर मुख्य बहर असून तेव्हाची फळे अधिक रूचकर व टिकाऊ असतात. त्यामुळे त्यांना जास्त किंमत मिळते. संत्र्याच्या झाडावर कीटकनाशक औषधांची फवारणी करावी लागते. त्यामुळे पाने खाणारी अळी, पांढरी माशी इत्यादी किडीपासून प्रतिबंध होतो. जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट संत्र्याची बाग आर्वी तालुक्यातील कवाडी गावी असून तेथे बागेत ५,००० झाडे आहेत. संत्र्याच्या एका झाडाचे सरासरी उत्पन्न आणि जिल्ह्यातील उत्पादनाची माहिती पुढे दिली आहे.[१३]

---

[१३] **कृषि विभागाची सांख्यिकीविषयक सर्वसाधारण जिल्हावार माहिती : १९८८–८९** (महाराष्ट्र शासन, पुणे).

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	उत्पादन (टन)	झाडाचे सरासरी उत्पन्न		प्रती हेक्टरी फळे धारण करणारी झाडे
				किलो	फळांची संख्या	
१९७५–७६	..	१,८९७	७,९९०	१४.३७	१०८	२९०
१९७७–७८	..	१,९९५	५,६७०	१६.२२	१३५	१७६
१९७९–८०	..	२,०००	४,८१०	११.६८	१०७	२०६
१९८१–८२	..	२,०००	३,५००	१२.४८	१०९	१४०
१९८३–८४	..	२,०७६	६,०३०	२०.४४	१४३	१४२
१९८५–८६	..	२,३३८	८,७३०	२१.११	१८३	१७७
१९८६–८७	..	२,५००	१२,५५०	२०.६६	२२३	२४३

झाडांची योग्य निगा राखल्यास त्यापासून २५ ते ३० वर्षेपर्यंत संत्री मिळतात. संत्र्याशिवाय मोसंबी, लिंबू व पेरुंचे उत्पादनही घेतात. सेलू परिसरात पपईचे पीक घेतात. पपईखाली १९६७–६८ व १९७८–७९ मध्ये अनुक्रमे ४० आणि १०० हेक्टर क्षेत्र होते.

केळी : जिल्ह्यात १९५७–५८ मध्ये केळीखाली १८७ हेक्टर क्षेत्र होते. त्यापैकी १५६ हेक्टर क्षेत्र वर्धा तालुक्यात होते. बोर धरणाच्या जलसिंचन लाभक्षेत्रात प्रामुख्याने बसराई जातीच्या केळीची लागवड करतात. काही ठिकाणी सोन केळीचे पीक घेतात. सन १९७९-८० पर्यंत केळीच्या क्षेत्रात १,१०० हेक्टरपर्यंत वाढ झाली. जमिनीची पूर्वमशागत करून मान्सूनच्या प्रारंभी लावणी करतात. केळीला भरपूर खत व जलसिंचनाची आवश्यकता असते. शेणखताव्यतिरिक्त नायट्रोजनयुक्त खते, सल्फेट, फॉस्फेट व पोटॅशची गरज असते. जिल्ह्यातील केळीचे क्षेत्र खालीलप्रमाणे होते.[१४]

वर्ष		क्षेत्र (हेक्टर)	एकूण उत्पादन (टन)	दर हेक्टरी उत्पन्न (टन)
१९७६–७७	..	९००	३१,६००	३५.१५
१९७८–७९	..	८००	३५,५००	४४.९०
१९८०–८१	..	८००	३७,३००	४६.५९
१९८२–८३	..	७००	३१,३६०	४४.८०
१९८४–८५	..	७००	२३,९००	३४.२१
१९८६–८७	..	६००	२३,०००	३८.३३

फलोद्यान विकास : जिल्ह्यात संत्री, केळी, पेरू व पपई ही फळे निदान शंभर वर्षांपासून पिकविली जात होती असा उल्लेख आढळतो. फळबाग विकासाकरिता जिल्ह्यात १९६३–६४ पासून फलोद्यान विकास योजना सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत संत्र्यांकरिता १९६३–६४ ते १९७४–७५ पर्यंत सुमारे १५ लाख रुपयांचा कर्जपुरवठा करण्यात आला. सन १९७५–७६ मध्ये कर्जपुरवठा बंद करण्यात आला. फळबागा लागवडीसाठी राष्ट्रीयीकृत व सहकारी बँका कर्जपुरवठा करतात. त्यावर शासनातर्फे ३३.३३ टक्के अनुदान दिले जाते. फळझाडांची रोपे अथवा कलमे शासकीय फळरोपवाटिकेतून पुरविली जातात. शासनाने फळझाडांच्या विकासासाठी १९८१ मध्ये फलोत्पादन संचालनालय सुरू केले असून जिल्ह्यात १९८२–८३ मध्ये स्वतंत्र कार्यालय स्थापन केले. सेलू तालुक्यातील केळी तर आर्वी आणि कारंजा तालुक्यांतील संत्री प्रसिद्ध आहेत.

[१४] कित्ता.

या योजनेखाली शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती खाली दिली आहे.

योजना	वर्ष	खर्च (लाख रुपये)	भौतिक साध्य
फळपिकांकरिता	१९८२–८३	०.२५	१२ लाभार्थी १२.०० हेक्टर क्षेत्र
भांडवली	१९८३–८४	१.५०	१११ –,,– ९६.९० –,,–
अनुदान.	१९८४–८५	०.६९	६० –,,– ५५.९५ –,,–
	१९८८–८९	२.७६	११८ –,,– १२०.०० –,,–
गावठी आंबा व	१९८३–८४	०.०९	७,५३५ बोरी व ५१० आंब्यांची झाडे
बोरीच्या	१९८४–८५	०.०५	४,११० –,,– व २१७ –,,–
झाडांची	१९८८–८९	०.१७	१०,६६४ –,,– व ३,१११ –,,–
श्रेणीवाढ.			
भरभक्कम	१९८३–८४	..	२.४० लाख रोपे } २८ लाभधारकांना वाटप
लागवड	१९८४–८५	..	१.४० –,,–
अपारंपरिक फळ पिकांचा विकास.	१९८४–८५	..	६० लाभार्थींना ४८० रोपांचे वाटप

सेलू येथे जिल्हा फळरोपवाटिका आणि नाचणगाव, बोर व तळेगावला तालुका फळरोपवाटिका आहेत. याशिवाय ४३ खाजगी फळरोपवाटिका आहेत.

मसाल्याची पिके

जिल्ह्यात मिरची, हळद व धणे ही मसाल्याची पिके असून मिरचीचे उत्पादन बरेच होते.

मिरची : मिरचीच्या पिकाखाली १९५७–५८, १९६३–६४, १९७९–८० व १९८८–८९ मध्ये अनुक्रमे २,५६३; ३,२८५; १,७०० आणि १,२०२ हेक्टर क्षेत्र होते. जिल्ह्यात मिरचीच्या पांढुर्णी आणि भिवपुरी नामक जातींची प्रामुख्याने लागवड करतात. सध्या अधिक उत्पादन देणाऱ्या ज्वाला, एन.पी., ४६-अ, संकेश्वरी-३२ आणि पंत-सी-१ या सुधारित जातींचीही लागवड करतात.

रोपे तयार करण्यासाठी १ × ३ मीटरचे गादी वाफे तयार करून त्यात बियाणे टाकतात. वाफ्यांवर जलसिंचन करावे लागते. रोपांचे पुनर्रोपण करण्यापूर्वी जमिनीची पूर्वमशागत करतात. पावसाळी लागवड जून-जुलै, हिवाळी लागवड सप्टेंबर-ऑक्टोबर व उन्हाळी लागवड मार्च-एप्रिलमध्ये करतात. मिरचीच्या जातीप्रमाणे हेक्टरी आठ ते दहा क्विंटल उत्पादन मिळते.

हळद : सन १९६५–६६ मध्ये हळदीखाली ५५ हेक्टर क्षेत्र होते. हिंगणघाट तालुक्यातील वायगावला एकोणिसाव्या शतकातही हळदीचे पीक काढत असत. या पिकामुळे त्या गावास हळद्या वायगाव असेही म्हणतात. वायगाव व नवगाव तलावांच्या सिंचनाचा लाभ हळदीच्या पिकास होत असे. ओल्या हळदीचे उत्पादन हेक्टरी १६४ ते १७० क्विंटल तर वाळलेल्या हळकुंडाचे उत्पादन ३२ ते ३४ क्विंटल येते. इतर जातीपेक्षा वायगाव हळदीस जास्त भाव मिळतो. हळदीची लागवड प्रामुख्याने मध्यम काळ्या, कसदार व पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीत करतात.

खते

जमिनीची सुपीकता आणि कसदारपणा वाढविण्यासाठी खताची नितांत गरज असते. शेणखत हे पारंपरिक खत असले तरी मागणीपेक्षा त्याचा पुरवठा कमी पडतो. जिल्ह्यात १९८४–८५ मध्ये ३,४४,३१२ जनावरे होती व त्यापासून वर्षाला सुमारे ६,००,६०० टन शेणखत उपलब्धीची क्षमता होती.

शासनाचा कृषि विभाग व कृषि विद्यापीठाद्वारे कोणत्या पिकांसाठी कोणते खत वापरावे याचे प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन केले जाते. वर्धा जिल्ह्यातील रासायनिक खतांच्या उपयोजनाची आकडेवारी पुढे दिली आहे.

(मे. टन)

वर्ष		नत्र	स्फुरद	पालाश
१९७५–७६	..	४,२८४	८२६	१,५४९
१९८१–८२	..	६,२३२	२,०४७	१,५००
१९८४–८५	..	११,३६३	२,८७५	१,७१८
१९८५–८६	..	१३,८७१	४,२०२	१,९७७
१९८६–८७	..	११,१९९	६,०२९	३,०३८
१९८७–८८	..	११,००८	४,९९४	२,१८५

पशुसंवर्धन

वर्धा जिल्हा गौळाऊ जातीच्या जनावरांचे माहेरघर असून त्यांना सर्वत्र चांगली मागणी असते. याशिवाय काही प्रमाणात नागपुरी-गोंडी जातीची जनावरेही पाळतात. इ. स. १९८२ च्या पशुगणनेनुसार जिल्ह्यात चार लाखापेक्षा जास्त जनावरे होती. पशुसंवर्धनासाठी जिल्ह्याची दोन उपविभागात विभागणी केली असून पहिल्यात आर्वी, कारंजा व आष्टी तालुक्यांचा समावेश आहे. हा प्रदेश गौळाऊ जातींच्या जनावरांसाठी फार पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. ही जात दुष्काळी परिस्थितीला तोंड देणारी असून प्रामुख्याने हेटी गवळी लोक गोपालन करतात. गौळाऊ बैल डोंगर भागातील शेतीकरिता फार उपयुक्त असतात. या उपविभागात १,३६,००० जनावरांना २४,६२० हेक्टर चराऊ रान उपलब्ध आहे. चराऊ रानात १,१५,०८८ मे. टन, तर इतरत्र ३,६६० मे. टन गवत प्राप्त होते. कुरणांमध्ये पावना, शेडा, गधा शेडा, कुसळ, धुनेर इत्यादी प्रकारचे गवत मिळते. पिंपळखुटा येथील लोणी प्रसिद्ध आहे. पशुसंवर्धन विकास कार्यक्रमामुळे या प्रदेशाचे आर्थिक चित्र पालटेल. दुसऱ्या उपविभागामध्ये वर्धा, सेलू, देवळी, हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यांचा समावेश होतो. वर्ध्यात दूध प्रकल्प कार्यान्वित आहे. या भागातील वैरणीच्या उत्पादन क्षेत्राचा विचार केल्यास तेथे पशुसंवर्धनाच्या विकासाकरिता नैसर्गिक साधनांची उपलब्धता नाही.[१५]

जिल्ह्यात सध्या चांगल्या जातीच्या देशी गायीची किंमत २,००० ते २,५०० रुपये व संकरित गायीची किंमत ४,५०० ते ६,५०० रुपये आहे. मुऱ्हा जाफराबादी म्हशीची किंमत ५,००० ते ६,००० रुपये तर इतर प्रकारच्या म्हशीची किंमत ३,००० ते ४,००० रुपये आहे.

[१५] **रिपोर्ट ऑन रिसोर्सेस सर्व्हे ऑन लाइव्हस्टॉक, डेअरी अँण्ड पोल्ट्री डेव्हलपमेंट, (नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य).**

इ. स. १९५१ ते १९८२ दरम्यानच्या पशुधनगणनांनुसार जिल्ह्यातील पशुधनाची आकडेवारी खाली दिली आहे. कंसातील आकडे एकूण पशुधनाशी टक्केवारी दर्शवितात.

(आकडे '००' मध्ये)

पशुधन	१९५१	१९५६	१९६१	१९६६	१९७२	१९७८	१९८२
बैल व गायी ..	३,३३९	३,४९९	३,६१४	३,६४०	३,७४५	३,९८२	३,७३२
	(७५.८७)	(७२.०२)	(७३.५८)	(६९.६५)	(६९.४०)	(६६.२०)	(६४.७४)
म्हशी व रेडे ..	३८६	४१८	४०७	४०८	४४७	४९७	४१७
	(८.७८)	(८.६०)	(८.२९)	(७.८०)	(८.२९)	(८.२७)	(७.२५)
शेळ्या ..	७६	११६	७२	१,०३३	१,०६२	१,३८८	१,४६२
	(१.७३)	(२.३९)	(१.४७)	(१९.७७)	(१९.६९)	(२३.०८)	(२५.३७)
मेंढ्या ..	५२१	७४२	७७२	८४	८७	९२	८०
	(११.८४)	(१५.२८)	(१५.७१)	(१.६०)	(१.५६)	(१.५३)	(१.३९)
घोडे व तट्टू ..	३२	३३	१६	१८	१५	१६	१४
	(०.७२)	(०.६८)	(०.३२)	(०.३५)	(०.२८)	(०.२६)	(०.२५)
इतर पशुधन ..	४७	५०	३१	४३	४१	४०	५८
	(१.०६)	(१.०३)	(०.६३)	(०.८३)	(०.७६)	(०.६६)	(१.००)
एकूण पशुधन ..	४,४०१	४,८५८	४,९१२	५,२२६	५,३९७	६,०१५	५,७६३
कोंबड्या, वगैरे ..	७७४	१,१९४	१,३७७	१,१७२	१,२३५	१,७६७	उ. ना.

महाराष्ट्र शासनाने पशुधन विकास व दुग्धविकासासाठी ऑपरेशन मिल्क फ्लड अर्थात दुधाचा महापूर ही योजना कार्यान्वित केली असून पशुपालनाद्वारे ग्रामीण भागातील गरीब शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे हा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती खाली दिली आहे.

हेटी पशुपैदास क्षेत्र : या केंद्रात पशुपैदासीसाठी लागणारे उत्तम प्रजनन क्षमता व आनुवंशिकता असलेले शुद्ध देशी जातीचे तसेच संकरित वळू निर्माण केले जातात. त्यासाठी निवडक गायी ठेवून त्यांच्या दुग्धोत्पादन व प्रजोत्पादन क्षमतेचा अभ्यास केला जातो. हेटी येथे १९८६–८७ मध्ये पैदासक्षम गौळाऊ जातीच्या ५८ गायी होत्या. या पशुपैदास क्षेत्रात १९८६–८७ मध्ये ३२४.०० हेक्टर जमीन होती.

आधारभूत ग्रामकेंद्र योजना : आर्वी आणि खरांगणा येथील आधारभूत ग्राम केंद्रांमार्फत प्रामुख्याने गायी-म्हशींची दुग्धोत्पादन क्षमता वाढविली जाते. शिवाय जनावरांचे सुसंस्करण, लैंगिक आरोग्य नियंत्रण, औषधोपचार आणि रोगनियंत्रण उपाययोजना, चांगली वैरण व खाद्यांचा वापर व वासरांच्या संगोपनाच्या प्रशिक्षणाची सोय उपलब्ध केली जाते. या व्यतिरिक्त जनावरांची प्रदर्शने व सामूहिक प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जातात. या ग्रामकेंद्रांची प्रत्येकी सहा उपकेंद्रे असून प्रत्येक उपकेंद्राच्या कक्षेत सुमारे १,००० प्रजनन क्षमतेच्या गायी-म्हशी असतात. आर्वी[१६] आणि खरांगणा आधारभूत ग्रामकेंद्रांच्या १९८४–८५ मधील कामकाजाची आकडेवारी खाली दिली आहे.

	आर्वी	खरांगणा
आधारभूत केंद्राखालील उपकेंद्रांची संख्या ..	६	६
पैदाशीयोग्य गायी-म्हशींची संख्या––		
गायी	११,७१९	५,२८२
म्हशी	२,३१२	१,१५९
कृत्रिम रेतन केलेल्या गायींची संख्या	८४६	८८४
कृत्रिम रेतनापासून जन्मलेली सुधारित वासरे ..	२४४	२६९
गर्भधारणेबाबत निदान––		
गायी	१,१५६	१,०१७
म्हशी	१२८	४८
वांझपणाकरिता तपासणी––		
गायी	७४६	२६०
म्हशी	१३७	४८
उपचार केलेली जनावरे	६,४८८	३,३५७
खच्ची केलेले बेरड वळू	६६४	३०७
शस्त्रक्रिया	२१८	५२
लस टोचणी	३५,१४८	२५,८८९
पुरविलेल्या गवताचे संच/रोपटी संख्या	११,५००	१४,०००
पुरविलेल्या वैरणीच्या पिकांचे बी-बियाणे (किलो) ..	९३९	४८९
संघटित केलेल्या कामाच्या मोहिमा	१२	१२
पशुप्रदर्शने	२	२

[१६] आर्वी आधारभूत ग्रामकेंद्र २४ जानेवारी १९५५ रोजी सुरू झाले.

वैरण व खाद्य विकास : अपेक्षित दुग्धोत्पादनासाठी पुरेसे पशुखाद्य व हिरव्या वैरणीचा पुरवठा आवश्यक असतो. त्यासाठी विभागीय कृत्रिम रेतन केंद्रे, आधारभूत ग्राम केंद्रे आणि स्थानिक क्षेत्रात ज्या ज्या ठिकाणी संकरित पैदासीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे तेथे वैरण विकास कार्यक्रम राबविला जातो. सर्व पशुपैदास क्षेत्रांवर वैरणीच्या पिकांची लागवड केली जाते. तसेच काही निवडक पशुपैदास क्षेत्रांवर वैरणीच्या बीजगुणनाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यानुसार हिरव्या वैरणीच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांना उत्तेजन दिले जाते. शिफारस केलेल्या वैरणीचे पीक काढण्यासाठी सुधारित जातीचे बी-बियाणे व ठोंबे शेतकऱ्यांना किफायतशीर किमतीत पुरवून मार्गदर्शन केले जाते. प्रात्यक्षिक आणि विस्तार कार्यक्रमांतर्गत हिरव्या चाऱ्याच्या सुधारित उत्पादनासाठी जिल्हा परिषदेमार्फत काही निवडक शेतकऱ्यांच्या शेतावर प्रात्यक्षिके केली जातात. आवश्यक बी-बियाणे मोफत पुरविले जाते. या कार्यक्रमाखाली १९८४ मध्ये १३७ शेतकऱ्यांना अनुदान दिले होते.

विभागीय कृत्रिम रेतन केंद्र : या केंद्राच्या कक्षेतील गायी व म्हशींच्या दुधामध्ये वाढ करणे हे उद्दिष्ट आहे. यासाठी वासरांचे मेळावे, जनावरांची प्रदर्शने व सामूहिक प्रशिक्षण वर्ग आयोजिले जातात. पाचव्या पंचवार्षिक योजनेपूर्वी स्थापन झालेल्या सधन पशुसुधार प्रकल्पाखालील विभागीय कृत्रिम रेतन केंद्रात प्रत्येकी १५ उपकेंद्रे आहेत. नागपूर येथील सधन पशुसुधार प्रकल्पांच्या अंतर्गत वर्धा जिल्ह्याचा समावेश होतो. जिल्ह्यात द्रववीर्य उपचार करणारे एक उपकेंद्र आणि गोठविलेल्या वीर्याचे प्रयोग करणारी १५ उपकेंद्रे आहेत. या १५ उपकेंद्रांवर १९८६–८७ मध्ये १५,९७७ प्रजननक्षम गायी आणि २,८९२ म्हशी होत्या. या उपकेंद्रांमध्ये विदेशी, संकरित व महिष वळूंच्या रेतापासून कृत्रिम रेतन केलेल्या जनावरांची संख्या अनुक्रमे २,०११; १,१८१ व ३९ होती. गर्भधारणेसाठी ३,०२२ गायी व २०४ म्हशींची तपासणी, वांझपणावर उपचार करण्यासाठी अनुक्रमे १,३४० व ७७ गायी व म्हशींची तपासणी, २,१०३ बेरड वळूंचे खच्चीकरण, १,१२५ जनावरांवर शस्त्रक्रिया आणि ७१,७८६ जनावरांना लस टोचण्यात आली. वैरण लागवडीसाठी गवतांच्या रोपट्यांचे ८३,७३० संच व ६,०६४ किलोग्रॅम बी-बियाणे पुरविण्यात आले. निरनिराळ्या प्रकारच्या ४० कार्य मोहिमा संघटित केल्या व एक पशुप्रदर्शन भरविले.

जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र : जिल्ह्यातील सर्व संस्थांना वळूवीर्य पुरवण्यासाठी विदेशी, संकरित व देशी जातींचे वळू तसेच रेडे या केंद्रात ठेवण्यात येतात. गायी व म्हशींचे लैंगिक आरोग्य नियंत्रण व वांझपणाची तपासणी व उपचार केले जातात. प्रत्येक वळूचे वीर्य आठवड्यातून तीन वेळा गोळा करतात. द्रववीर्याचा उपयोग हळूहळू कमी करून गोठविलेल्या वीर्याचे प्रयोग वाढविण्याच्या शासकीय धोरणानुसार जिल्ह्यात काम पूर्ण झाले असून जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रात गोठविलेल्या वीर्याची पेढी आहे. इ. स. १९८३–८४ आणि १९८७–८८ मध्ये वळूंच्या रेतापासून कृत्रिम रेतन केलेल्या जनावरांची संख्या अनुक्रमे ४,०४४ आणि ६,२६७ होती. मुख्यालयात केलेल्या कृत्रिम रेतनापासून २०१ संकरित वासरे जन्मली. गर्भधारणेसाठी ४३३ गायी आणि चार म्हशींची व वांझपणावर उपाय करण्यासाठी ५१ गायी आणि ४ म्हशींची तपासणी करण्यात आली.

पशु वैद्यकीय चिकित्सालये : सर्व सोयींनी सुसज्ज असे पशुवैद्यकीय चिकित्सालय वर्ध्यात आहे. त्यात एक फिरते पथक असून त्याद्वारे कृत्रिम पैदास व लैंगिक आरोग्य नियंत्रण केले

जाते. इ. स. १९८४–८५ मध्ये चिकित्सालयात व फिरत्या पथकाद्वारे उपचार केलेल्या पशुंची संख्या अनुक्रमे ५,२४२ व २,३३७ होती. त्याशिवाय १४८ बेरड वळूंचे खच्चीकरण, ९५ मोठ्या व ३६४ लहान शस्त्रक्रिया आणि १४,०२३ जनावरांना लस टोचली. विदेशी व संकरित वळूंच्या रेतापासून ११५ जनावरांना कृत्रिम रेतन, गर्भधारणेच्या निदानासाठी ११६ गायी व ३६ म्हशींची तपासणी व ६८ गायी आणि २६ म्हशींच्या वांझपणावर उपचार केले.

पशु वैद्यकीय संस्था : जिल्ह्यातील ८२ पशुवैद्यकीय संस्थांपैकी ५० जिल्हा परिषदेंतर्गत, ३० शासकीय आणि दोन नगरपालिकेकडे आहेत. जिल्हा परिषदेचे पशुवैद्यकीय दवाखाने, शाखा दवाखाने आणि प्राथमिक पशु उपचार केंद्रांद्वारे १९८४ मध्ये १,६१,१९१ जनावरांवर उपचार; ८,३७१ बेरड वळूंचे खच्चीकरण; ४,१५,८३९ जनावरांना लस टोचणी; ८,११० जनावरांवर शस्त्रक्रिया; १,१८४ जनावरांची नमुना तपासणी व २६३ जनावरांची उत्तरीय तपासणी केली. जिल्हा परिषदेच्या फिरत्या पशुरोग नियंत्रक पथकाने १९८४–८५ मध्ये बुळकांडी, मानमोडी, घटसर्प, फऱ्या आणि लाळ व खुरकुत रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी ४६,५९५ जनावरांना लस टोचली.

विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम : या कार्यक्रमांतर्गत दुर्बल घटकांकडील संकरित कालवडींना वयाच्या बत्तीस महिन्यापर्यंत सुग्रास पशुखाद्य अनुदान तत्त्वावर पुरविले जाते इ. स. १९८४–८५ मध्ये या कार्यक्रमाचा ८० अल्पभूधारक, ३७ अत्यल्प भूधारक व ३३० शेतमजुरांना लाभ मिळाला. त्यापैकी विशेष घटक योजनेखाली अनुसूचित जमातींचे ४४ लाभधारक होते. कार्यक्रमांतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक आणि शेतमजुरांना अनुक्रमे ४६ १५ व २७१ हजार रुपयांचे अनुदान आणि ४, २ व २० हजार रुपयांचे बँक कर्ज वाटप करण्यात आले.

गोकुळ ग्राम योजना : सन १९८४–८५ पासून ही योजना पिपरी (हिंगणघाट पंचायत समिती) व वाघोडा (कारंजा पंचायत समिती) येथे राबविली जात आहे. पशुसंवर्धन व दुग्धशाळा विकास विभाग ही योजना राबवून पशुधन विकासाद्वारे आदर्श गाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. गावात पशुरोग निदान शिबिरे व संकरित जनावरांचे मेळावे आयोजिले जातात. ही योजना सोनोरा (देवळी) आणि हमदापूर (सेलू) येथेही सुरू करण्यात आली आहे. तसेच कृषी पंढरी योजनेतील सात गावांत पशुसंवर्धनाच्या विविध योजना प्राधान्याने राबविण्यात येतात.

गांधी योजना : या योजने अंतर्गत सेवाग्राम (वर्धा) व नंदोरी (समुद्रपूर) येथील पशु-प्रथमोपचार केंद्रांच्या दर्जात वाढ करून त्यांचे पशुचिकित्सालयात रूपांतर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम : ही योजना केंद्र सरकार पुरस्कृत असून २० ऑगस्ट १९७७ पासून जिल्ह्यात राबविली जात आहे. या योजनेंतर्गत १९८६ पर्यंत २,७२४ लाभधारकांच्या संकरित कालवडींना सुग्रास पशुखाद्य मंजूर करण्यात आले. अल्प भूधारक व शेतमजूर वर्गातील या लाभधारकांना डिसेंबर १९८६ पर्यंत ३०.४६ लक्ष रुपये किमतीचे अनुदान खाद्यरूपाने देण्यात आले.

दुग्धव्यवसाय विकास

वर्धा जिल्हा दूध उत्पादनाकरिता प्रसिद्ध आहे. आर्वी तालुक्यातील लोक चांगल्या प्रतीची दुभती जनावरे पाळून दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. पिंपळखुटा, कारंजा, सारवाडी, माळेगाव, मासोद व रोहणा ही गावे गौळाऊ गायींसाठी विशेष प्रसिद्ध आहेत.

सन १९६१ पासून आर्वी परिसरातील दूध नागपूरला पाठविण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यातूनच १५ नोव्हेंबर १९६१ रोजी आर्वी तालुका दूध व तूप उत्पादक संघ स्थापन झाला. जून १९६६ मध्ये आर्वीस दूध संकलन केंद्र सुरू झाले. दूध संघाने १९६४ मध्ये पिंपळखुटा येथे स्वतंत्र शीतकरण केंद्र आणि बर्फाचा कारखाना सुरू केला. संघाचे कार्यालय ८ डिसेंबर १९७७ ला वर्ध्यास स्थलांतरित करण्यात आले. शासनाने सन १९७३ मध्ये प्रतिदिनी दोन हजार लीटर दूध शुद्धीकरण क्षमतेचे डेस्को शीतकरण केंद्र वर्ध्यास सुरू केले. इ. स. १९७७ मध्ये स्थापन झालेल्या वर्धा तालुका सहकारी दूध संस्था संघाच्या कार्यकक्षेत सध्याचे वर्धा, देवळी व सेलू तालुके आहेत. शासकीय मदत, विक्रीची हमी व वेळेवर मिळणाऱ्या उत्पन्नामुळे शेतकरी, भूमिहीन व अत्यल्प भूधारकांचे या व्यवसायाकडे लक्ष वेधले गेले. परिणामी शासनाने वर्धा येथील डेस्को शीतकरण केंद्राची क्षमता वाढवून त्या जागी प्रतिदिनी ५० हजार लीटर दूध हाताळणी क्षमता असलेली मध्यवर्ती दुग्धशाळा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीमध्ये सुरू केली. दुग्धव्यवसायाच्या प्रगतीमुळे १९७८ मध्ये वर्ध्यास जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकाऱ्याचे कार्यालय स्थापन झाले. नोंदणीकृत सहकारी दूध उत्पादक संघ व संस्थांद्वारे होणारे दूध संकलन व वितरणाची माहिती पुढे दिली आहे.

वर्ष		संघ	संस्था	दूध संकलन (हजार लीटर)	दुधाची किंमत (हजार रुपये)
१९७९–८०	..	४	१६३	५१.२८	१०७.६३
१९८३–८४	..	४	१९९	९१.२९	४६१.२८
१९८७–८८	..	..	..	७१.९४	२५५.०४

दूध योजनेद्वारे वर्धा शहरात १ जानेवारी १९७७ पासून सीलबंद बाटल्यांमधून दुधाचे वितरण सुरू झाले. इ. स. १९७७–७८, १९८०–८१, १९८३–८४ व १९८६–८७ मध्ये अनुक्रमे ७,९३१; २१,७३५; १०,२०१ आणि १,३०,९५,००० लीटर दुधाचे वितरण करण्यात आले.

वैयक्तिक लाभधारकांकरिता असलेल्या योजने अंतर्गत म्हशीच्या एक वर्षाच्या पारड्याचे सवलतीच्या दरात वाटप करण्यात येते. पारड्यांना प्रतिदिनी १.५० रुपये प्रमाणे ३० महिन्यापर्यंत खावटीसाठी सहकारी संस्थांमार्फत अनुदान दिले जाते. भाकड व गाभण म्हशींचे वाटप योजने अंतर्गत त्यांच्या खरेदीसाठी आर्थिकदृष्टचा दुर्बल घटकांतील मागासवर्गीय लोकांना विशेष केंद्रीय अर्थसहाय्य म्हणून १६ आणि २५ टक्के अनुदान दिले जाते.

उर्वरित रकमेची व्यवस्था लाभधारकांस स्वतः अथवा बँकेमार्फत करावी लागते. भाकड व गाभण म्हशी मुंबईतील तबेल्यातून पुरविल्या जातात. तसेच १०० दिवसांकरिता तीनशे रुपये खावटी खर्च देण्यात येतो. याशिवाय दुर्बल घटकांतील शेतकऱ्यांना स्वतःच्या जमिनीपैकी १० गुंठे जमिनीत १०० रुपयापर्यंत हिरव्या चाऱ्याचे बियाणे व रासायनिक खत शासन पुरविते.

जलसिंचन

एकोणिसाव्या शतकात हिंगणघाट तालुक्यातील वायगाव (हळद्या) आणि नवगाव येथील तलावांमधून हळदीच्या पिकाला सिंचनाचा लाभ होत असे. याव्यतिरिक्त विहिरी हेच जलसिंचनाचे साधन होते. सन १८९० मध्ये १,२१० सिंचन विहिरी होत्या. स्वातंत्र्यपूर्वकालीन ओलिताची साधने, सिंचन क्षेत्र आणि टक्केवारी खाली दर्शविली आहे.[१७]

वर्ष		एकूण सिंचन (हेक्टर)	तळ्यांची संख्या	विहिरींची संख्या	एकूण क्षेत्राशी सिंचन क्षेत्राची टक्केवारी
१८९१–९२	..	१,२२५	४	१,२८२	०.३२
१९०१–०२	..	१,३१९	२	२,०८५	०.३३
१९११–१२	..	१,०६२	४	१,४४१	०.२६
१९२१–२२	..	२,२१९	४	३,६५६	०.५२
१९४१–४२	..	२,८३०	२	३,५८७	०.७१

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत बोर प्रकल्प या पहिल्या पाटबंधारे योजनेचे बांधकाम सुरू झाले. त्यानंतर आणखी पाटबंधारे योजना अस्तित्वात आल्या. निरनिराळ्या साधनांद्वारे झालेल्या जलसिंचनाची टक्केवारी खाली दिली आहे.[१८]

वर्ष		शासकीय कालवे	खाजगी कालवे	तळी	विहिरी	इतर साधने
१९०३–०४	..	..	..	००.२९	९८.९८	०.७३
१९१५–१६	..	..	..	१.१३	९७.०५	१.८२
१९२०–२१	..	..	..	०.३७	९९.०७	०.५६
१९३१–३२	..	..	०.८१	..	९८.५४	०.६५
१९४०–४१	..	..	०.१५	..	९९.२५	०.६०
१९५०–५१	..	..	..	०.१६	९९.३७	०.४७
१९६१–६२	..	..	..	०.७२	९४.९४	४.३४
१९६९–७०	..	६.६०	..	..	९२.३०	१.१०
१९७४–७५	..	१४.५१	..	..	८४.४६	१.०३
१९८२–८३	..	१९.४०	०.१२	१.३२	७५.३०	३.८६
१९८५–८६	..	१९.०८	..	१.२३	७८.६६	१.०३

[१७] वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९२९, व्हॉल्यूम बी, स्टॅटिस्टिकल टेबल्स (१८९१–१९२८).

[१८] ॲग्रिकल्चरल स्टॅटिस्टिक्स ऑफ इंडिया, १९१०–११, १९२०–२१, १९३०–३१ (भारत सरकार, नवी दिल्ली).

इ. स. १९०३-०४ ते १९८५-८६ पर्यंतच्या निवडक वर्षांतील निरनिराळ्या पिकांनुसार सिंचनाखालील क्षेत्र तक्ता क्रमांक २ मध्ये दिलेले आहे. जिल्ह्यात १९७६–७७ मध्ये सुमारे ३,००६ भूधारकांना ३,००५ हेक्टर क्षेत्रास कालव्याद्वारे, ९३ भूधारकांना ९५ हेक्टर क्षेत्रास तलावांद्वारे आणि १२,२९४ भूधारकांना १३,२९३ हेक्टर क्षेत्रास विहिरींद्वारे सिंचनाची सोय उपलब्ध झाली. तसेच ९९,५३९ भूधारकांपैकी १५.४६ टक्के भूधारकांच्या एकूण भूधारणा क्षेत्रापैकी केवळ ३.७२ टक्के क्षेत्रास ओलिताच्या साधनांद्वारे लाभ मिळाला.[१९]

विहिरी : इ. स. १९०३–०४ मध्ये एकूण सिंचन प्राप्त क्षेत्रापैकी ९८.९८ टक्के क्षेत्र २,०८५ विहिरींच्या सिंचनाखाली होते. मात्र एकूण पिकाखालील क्षेत्राशी सिंचन क्षेत्राचे प्रमाण केवळ ०.३३ टक्के होते. इ. स. १९६४–६५ पर्यंत एकूण सिंचन क्षेत्राच्या ९६.९८ टक्के क्षेत्रात विहिरींद्वारे सिंचन होत होते. तळ्याखालील सिंचन क्षेत्र केवळ ०.६० टक्के होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून पाटबंधारे प्रकल्पाचे काम सुरू झाल्यामुळे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत शासकीय कालव्यांद्वारे होणाऱ्या सिंचनाखालील क्षेत्रात हळूहळू वाढ झाली. इ. स. १९६० मध्ये एकूण सिंचन विहिरींपैकी ४०.२० टक्के तर १९७८–७९ मध्ये ५७.२२ टक्के विहिरी सिंचनासाठी वापरात होत्या. इ. स. १९८५–८६ मध्ये एकूण बागायती क्षेत्राशी स्वतंत्ररीत्या जलसिंचन विहिरींनी भिजवलेल्या क्षेत्राचे शेकडा प्रमाण ७५.३३ टक्के होते. भूजल विभागाने केलेल्या सर्वेक्षणानुसार ३३,०८५ नवीन विहिरी खोदता येतील. उपलब्ध भूजलाची माहिती खाली दिली आहे.[२०]

तालुका		वार्षिक पर्जन्यमान एकर/फूट	सध्याच्या विहिरींपासून जलपुरवठा एकर/फूट	शिलकी भूजल एकर/फूट
वर्धा	..	१,२१,१२६	२८,८१७	९२,३०९
हिंगणघाट	..	१,१३,३८१	८,४५८	१,०४,९२३
आर्वी	..	१,२३,८९७	३३,५८८	१,००,३०९
		३,५८,४०४	६०,८६३	२,९७,५४१

जिल्ह्यात सिंचनासाठी वापरात असलेल्या व नसलेल्या विहिरींची संख्या खाली दिली आहे.

वर्ष		वापरातील विहिरी	वापरात नसलेल्या विहिरी	एकूण विहिरी
१९६०–६१	..	६,९३२	१०,३१३	१७,२४५
१९७०–७१	..	९,८७४	१०,९४१	२०,८१५
१९७९–८०	..	१६,६७१	११,०१३	२७,६८४
१९८५–८६	..	१४,६५७	१३,७०६	२८,३६३
१९८८–८९	..	..	..	२४,७४९

[१९] **ॲग्रिकल्चरल सेन्सस** (कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, १९७६–७७), पृ. २९३.

[२०] **रिपोर्ट ऑफ दि फॅक्ट फाईंडिंग कमिटी फॉर सर्व्हे ऑफ स्केअरसिटी एरियाज, भाग-२,** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७३), पृ. २९९.

लोअर वर्धा प्रकल्प : वर्धा नदीवर आर्वी तालुक्यात धनोडी गावाजवळ ९ कि. मी. लांबीचे मातीचे मोठे धरण बांधण्यात येणार आहे. धरणाचा समावेश वर्धा आणि अमरावती जिल्ह्यांत होतो. नदीच्या डाव्या तीरावरील कालव्याची प्रस्तावित लांबी ४५ कि. मी. असून त्यामुळे ५२,९८० हेक्टर क्षेत्रास ओलिताचा लाभ होणार आहे. प्रकल्पाचा अंदाजित खर्च ४८०८ लाख रुपये आहे. धरणाचे बांधकाम १९८१ मध्ये सुरू होऊन मार्च १९८९ पर्यंत १४३.५० लाख रुपये खर्च झाला आहे. बांधकाम पूर्ण होण्यासाठी १२ वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे. प्रकल्पामुळे भूतपूर्व आर्वी, हिंगणघाट व वर्धा तालुक्यांतील अनुक्रमे १,६२०; ७,३३३ व ३५,२०० हेक्टर जमीन ओलिताखाली येईल. शिवाय पुलगाव शहरास पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे.

अप्पर वर्धा प्रकल्प : अमरावती जिल्ह्यात मोर्शी तालुक्यातील सिमोरा येथे वर्धा नदीवर मोठे धरण बांधण्याची ही योजना आहे. डाव्या कालव्यापासून जिल्ह्यातील १७,६०० हेक्टर क्षेत्रास जलसिंचनाचा लाभ होणार आहे. डाव्या कालव्याची प्रस्तावित लांबी ४२ कि. मी. आहे. प्रकल्पाचा अंदाजित खर्च १४,३४६ लाख रुपये असून मार्च १९८९ पर्यंत वर्धा जिल्ह्याकरिता १,७१३.५४ लाख रुपये खर्च झाले.

लोअर वेणा प्रकल्प : वेणा आणि नांद नद्यांवर अनुक्रमे वडगाव व सेडेश्वर गावांजवळ मोठी धरणे बांधण्याच्या प्रस्तावास शासनाने ६ फेब्रुवारी १९७९ रोजी मान्यता दिली. हा प्रकल्प नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यात असला तरी त्याच्या उजव्या कालव्यापासून वर्धा व समुद्रपूर तालुक्यांतील ३,६२७ हेक्टर व डाव्या कालव्यापासून समुद्रपूर व हिंगणघाट तालुक्यांतील १०,३९७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाची सोय उपलब्ध होणार आहे. प्रस्तावित अंदाजे खर्च २,४८३ लाख रुपये असून मार्च १९८९ पर्यंत २,१२६.५० लाख रुपये खर्च झाले.

बोर प्रकल्प (यशवंत धरण): वर्धा तालुक्यातील बोरी गावानजीक बोर नदीवर या मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे काम १९५७ मध्ये सुरू होऊन १९६९ मध्ये पूर्ण झाले. जिल्ह्यातील ही पहिली मध्यम पाटबंधारे योजना होय. त्यासाठी ४०५.३६ लक्ष रुपये खर्च झाले. धरणाची उंची ३६.२७ मीटर असून बुडणारे क्षेत्र १,४५३ हेक्टर व जलसाठा क्षमता १२७.३५ दशलक्ष घन मीटर आहे. त्यापासून १६,१९० हेक्टर क्षेत्रास जलसिंचनाची सोय उपलब्ध झाली आहे. धरणास किन्ही, आपटा आणि नंदपूर असे तीन कालवे असून त्यांची लांबी अनुक्रमे १०; २५.६ व १७.६ कि. मी. आहे. शिवाय उपकालव्यांद्वारे बोर, हिंगणी, केळझर आणि दहेगाव भागातील जमिनीस जलसिंचन होते. धरणामुळे सेलू व पवनार परिसरात केळी, गहू व कापूस पिकविणे शक्य झाले आहे.

धाम प्रकल्प : आर्वी तालुक्यात महाकाळी गावाजवळ धाम नदीवर अदमासे १,२०० लाख रुपये खर्चाच्या या मध्यम प्रकल्पाचे बांधकाम १९७४ मध्ये सुरू झाले. मार्च १९८९ पर्यंत २,२२९.९३ लाख रुपये खर्च झाले. प्रकल्पांतर्गत महाकाळी येथे मातीचे मुख्य धरण व वर्धा तालुक्यातील येळीकेळीला उन्नेयी बंधाऱ्याचा समावेश आहे. बत्तीस मीटर उंची व १,४४० मीटर लांबीच्या या धरणातील ६२.५१ दशलक्ष घन मीटर जलसाठ्यापासून १०,२१० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होईल. धरणाचे कालवे व जलवितरिकांची लांबी

३९.५ कि.मी. आहे. उन्नेयी बंधाऱ्यातील पाण्याचा सिंचनासाठी तसेच वर्धा शहरास पाणीपुरवठ्यासाठी उपयोग होईल. मुख्य धरणाचे काम जुलै १९७५ मध्ये सुरू करण्यात आले आहे.

पोथरा नदी प्रकल्प : या मध्यम प्रकल्पांतर्गत समुद्रपूर तालुक्यात पोथरा नदीवर झुनका (रूनका) गावाजवळ मातीच्या धरणाचे काम जुलै १९७८ मध्ये सुरू होऊन जुलै १९८२ मध्ये पूर्ण झाले. प्रकल्पासाठी सुधारित खर्च १,६०३.०६१ लाख रुपये असून त्यापैकी मार्च १९८७ पर्यंत ५०६.२९ लाख रुपये खर्च झाले. एकूण २,२२० मीटर लांबी व १४.२१ मीटर उंची असलेल्या या धरणातील १,४७,२६७ द.ल.घ.मी. पाण्याच्या साठ्यापासून समुद्रपूर आणि हिंगणघाट तालुक्यांतील ६,३१५ हेक्टर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील ५,३१७ हेक्टर क्षेत्रास जलसिंचनाचा लाभ होणार आहे. धरणाला ९ कि.मी. लांबीचा डावा व ३७ कि.मी. लांबीचा उजवा कालवा असून उजव्या कालव्याचे काम पूर्ण झाले आहे. डाव्या कालव्याचे व जलवितरिकांचे काम प्रगतिपथावर आहे.

पंचधारा प्रकल्प : हे मध्यम धरण सेलू तालुक्यातील रिधोरा गावानजीक पंचधारा नदीवर बांधण्यात आले आहे. धरणाचे काम १९७३ मध्ये सुरू होऊन १९७५ मध्ये पूर्ण झाले. प्रकल्पाचा सुधारित खर्च १३९.६६ लाख रुपये आहे. एकूण १८.८५ मीटर उंची आणि १,०१२ मीटर लांबीच्या या धरणात ८.७५ द.ल.घ.मी. पाण्याचा साठा होऊ शकतो. जून १९८७ पर्यंत धरणापासून २,४६० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. धरणाची सर्व कामे पूर्ण झाली असून १९ कि.मी. लांबीचा कालवा व १७ कि. मी. लांबीच्या वितरिकांचे काम पूर्ण झाले आहे.

डोंगरगाव प्रकल्प : सेलू तालुक्यातील जानवाडी गावाजवळील नाल्यावर या मध्यम प्रकल्पाचे काम १९७० मध्ये सुरू होऊन १९७४ मध्ये पूर्ण झाले. या योजनेवर ३७.७८ लाख रुपये खर्च झाले. धरणाची उंची १६.९८ मीटर आणि लांबी ५४३ मीटर असून जलग्रहण क्षेत्र ११९ हेक्टर आणि पाणी साठवण्याची क्षमता ४.४४ द.ल.घ.मी. आहे. तलावामुळे जून १९८९ अखेर ७३० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असून त्यास ७ कि.मी. लांबीचे कालवे व ४ कि.मी. लांबीच्या जलवितरिका आहेत.

लघुसिंचन : राज्य स्तरावरील लघु योजना पाटबंधारे विभागामार्फत आणि स्थानिक स्तरावरील योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात. इ. स. १९७१ पासून स्थानिक स्तरावरील योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आल्या. जिल्ह्यात राज्य स्तरावर १८,६३३ हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या एकूण ७९ लघुसिंचन योजना संकल्पित असून त्यापैकी २० योजना मार्च १९८७ अखेर ४७०.७० लाख रुपये खर्च करून पूर्ण झाल्या. त्यामुळे जून १९८९ पर्यंत ६,८४९ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. जिल्हा परिषदेतर्फे स्थानिक स्तरावर १२,७१९.८७ हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या २५१ योजना संकल्पित असून त्यापैकी मार्च १९८७ पर्यंत २८ योजना पूर्ण झाल्या. त्याद्वारे जून १९८७ पर्यंत २,०५९.११ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. पूर्ण झालेल्या योजनांवर सुमारे १८१ लाख रुपये खर्च झाले. राज्य व स्थानिक स्तरांवर मार्च १९८७ पर्यंत पूर्ण झालेल्या लघुसिंचन योजनांची तालुकानिहाय आकडेवारी पुढील पृष्ठावर दिली आहे.

राज्य स्तर

तालुका		एकूण योजना	पूर्ण झालेल्या योजना	खर्च (लाख रुपये)	सिंचन क्षमता (हेक्टर)	बांधकामाखालील योजना	संकल्पित योजना
वर्धा	..	८	..	..	..	२	६
सेलू	..	५	२	२७.४५	१,०४३	..	३
देवळी	..	१	..	..	..	..	१
आर्वी	..	२५	११	३५३.२२	४,७१८	१	१३
कारंजा	..	१६	३	४७.३३	७१४	..	१३
आष्टी	..	८	३	४०.७३	८०३	..	५
हिंगणघाट	..	८	१	१.९७	१११	..	७
समुद्रपूर	..	८	..	..	..	१	७
एकूण	..	७९	२०	४७०.७०	७,३८९	४	५५

स्थानिक स्तर

तालुका		एकूण योजना	पूर्ण झालेल्या योजना	खर्च (लाख रुपये)	सिंचन क्षमता (हेक्टर)	बांधकामाखालील योजना	संकल्पित योजना
वर्धा	..	२३	३	१३.२६	१२५.११	५	१५
सेलू	..	२३	..	..	..	४	१९
देवळी	..	१३	२	९.३३०	१८८.००	..	११
आर्वी	..	६९	७	४६.७१	५११.७३	११	५१
आष्टी	..	२२	१	१०.२१०	५८.१७	३	१८
कारंजा	..	५२	१४	९५.४१	१,१०३.२६	१२	२६
हिंगणघाट	..	२८	..	..	..	२	२६
समुद्रपूर	..	२१	१	६.०५०	७२.८४	१०	१०
एकूण	..	२५१	२८	१८०.९७	२०५९.११	४७	१७६

कृषि अवजारे

वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची बहुतेक अवजारे जुन्या पद्धतीची व कमी कार्यक्षमतेची आहेत. प्रचलित अवजारांमध्ये नांगर, वखर, पाभर, डवरे, कुदळ, तिफण, फावडे इत्यादींचा समावेश होतो. अलीकडेच काही शेतकऱ्यांनी लाकडी नांगराऐवजी लोखंडी नांगर, स्प्रे-पंप, थ्रेशर व ट्रॅक्टर वापरण्यास सुरुवात केली आहे. सुमारे वीस वर्षापूर्वी जिल्ह्यात कृषी यांत्रिकीकरणास सुरुवात झाली. प्राचीन काळापासून लाकडी नांगर प्रचलित आहे. बाभळीच्या कणखर लाकडापासून बनवलेल्या या अवजारास लोखंडी फाळ बसविलेला असतो. या नांगराद्वारे नांगरणी फार खोलवर होऊ शकत नाही, त्यामुळे सुमारे ४०–४५ वर्षांपासून लोखंडी नांगर प्रचलित झाला. जिल्ह्यात १९८५–८६ मध्ये ५२,९८९ नांगर होते, त्यापैकी ९,६०६ लोखंडी नांगर होते. पंधरा-वीस वर्षांपासून शेती नांगरण्यासाठी सधन शेतकरी

ट्रॅक्टरचा उपयोग करू लागले आहेत. जिल्ह्यात १९८५–८६ मध्ये १८८ ट्रॅक्टर होते. ज्वारी, कापूस व भुईमूग पेरणीसाठी तिफण वापरतात. बी पेरताना चाड्यातून फण्यापर्यंत पत्र्याच्या किंवा बांबूच्या नळ्या जोडतात. पिकांच्या अंतरमशागतीकरिता कोळपे वापरतात. विहिरीतून पाणी काढण्यासाठी चामड्याची मोट वापरीत असत. मोटेची क्षमता मर्यादित असल्यामुळे केवळ एक-दोन हेक्टर जमिनीलाच जलसिंचन होऊ शकते, म्हणून मोटे-ऐवजी डिझेल इंजीन व विद्युतपंपाचा उपयोग प्रचलित झाला आहे. जिल्ह्यात १९८५–८६ मध्ये विहिरी व नदीनाल्यांवर पाणी काढण्यासाठी ३,२६६ ऑईल इंजीन आणि १३,६१० विद्युत पंप वापरात होते. त्याचवर्षी जिल्ह्यात ५०,१२० बैलगाड्या होत्या.

धारण जमीन

जिल्ह्यात १९६१ मध्ये शेती कसणाऱ्या कुटुंबांपैकी ८७.१२ टक्के कुटुंबे स्वतःच्या मालकीची, २.६५ टक्के कुटुंबे कुळवहिवाटीची आणि ९.६३ टक्के कुटुंबे स्वतःच्या मालकीची व खंडाने घेतलेल्या जमिनीची लागवड करीत होती. सन १९७६–७७ मध्ये स्वतःच्या मालकीची जमीन कसणारे जमीनधारक ९८.८६ टक्के असून त्यांचेकडे ९८.१२ टक्के क्षेत्र होते. पूर्णपणे खंडाने घेतलेली जमीन कसणाऱ्या ०.३० टक्के जमीनधारकांकडे ०.२७ टक्के क्षेत्र होते. स्वतःच्या मालकीची आणि खंडाने घेतलेली जमीन कसणाऱ्या ०.८४ टक्के जमीनधारकांकडे १.६१ टक्के क्षेत्र होते. सन १९६०–६१ मध्ये जिल्ह्यातील सरासरी धारण जमिनीचे आकारमान १९.०९ एकर होते. सन १९७६–७७ मध्ये जिल्ह्यातील धारण जमिनीच्या क्षेत्राची सरासरी ४.५६ हेक्टर तर राज्याची सरासरी ३.६६ हेक्टर होती.

कृषी गणना १९७६–७७ नुसार जिल्ह्यातील वहितीखालील जमीनधारकांचे गटाप्रमाणे जमीनधारकांची व क्षेत्राची आकडेवारी खाली दिली आहे.[२१]

धारक गट (हेक्टर)		जमीनधारक	धारण क्षेत्र (हेक्टर)	जमीन-धारकांचे प्रतिशत प्रमाण	धारण क्षेत्राचे प्रतिशत प्रमाण
० ते १	..	९,७२६	६,८२३	९.७७	१.५०
१ ते ३	..	३६,५४०	७१,१४०	३६.७१	१५.६७
३ ते ५	..	२१,४९४	८३,९८३	२१.५९	१८.५०
५ ते १०	..	२२,५९६	१,५७,६२९	२२.७०	३४.७२
१० ते ३०	..	८,९९६	१,२६,५८६	९.०४	२७.८८
३० ते ५०	..	१५६	५,५६४	०.१६	१.२२
५० पेक्षा जास्त	..	३१	२,३२८	०.०३	०.५१
एकूण	..	९९,५३९	४,५४,०५३	१००	१००

सन १९७६–७७ मध्ये एकूण खातेदारांपैकी ९० टक्के वैयक्तिक खातेदार असून त्यांचेकडे ८८ टक्के क्षेत्र होते. संयुक्त खाती ९.९४ टक्के, (क्षेत्र १२.०० टक्के) व संस्थांची खाती ०.०५ टक्के असून त्यांचेकडे नगण्य क्षेत्र होते.

[२१] **ॲग्रिकल्चरल सेन्सस,** पूर्वोक्त, पृ. २९१.

कमाल जमीन धारणा अधिनियम : सर्वसाधारण जनतेच्या कल्याणासाठी शेतजमिनीची वाटणी करण्यासाठी महाराष्ट्र शेतजमीन धारणा (कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१, दिनांक २६ जानेवारी १९६२ पासून वर्धा जिल्ह्यात लागू करण्यात आला. त्यानुसार आर्वी व वर्धा ही स्थानिक क्षेत्रे निवडून तेथे कोरडवाहू पिकांसाठी अनुक्रमे ३८.८५ व ४३.७१ हेक्टर अशी कमाल मर्यादा ठरवून देण्यात आली. ओलिताखालील जमिनीबाबत दोन्ही क्षेत्रांतील कमाल मर्यादा सारखी असून ती बारमाही ओलिताखालील क्षेत्रासाठी ७.२८ हेक्टर, दोन हंगामात ओलिताची सुविधा प्राप्त क्षेत्रासाठी १०.९३ हेक्टर आणि एका हंगामात ओलित होणाऱ्या क्षेत्रासाठी १९.४२ हेक्टर आहे. जमीन धारणेच्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक जमीन असलेल्या धारकांवर या अधिनियमानुसार बंधने घालण्यात आलेली आहेत. कमाल मर्यादेहून अधिक असलेली जमीन अधिनियमानुसार निश्चित होईपर्यंत ती दुसऱ्याच्या नावे करून देण्याची मुभा नाही, तसेच अशा जमिनीची वाटणीही करता येत नाही. जमीनधारकास अशा जमिनीची माहिती जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करावी लागते. त्यानंतर जिल्हाधिकारी चौकशीअंती अधिक जमीन किती आहे ते ठरवितो. अशा जमिनी राज्य शासनाच्या स्वाधीन केल्यावर त्याबद्दल जमीनधारकास नुकसान भरपाई देता येते. अधिक जमीन भूमिहिनांना किंवा इतरांना वाटण्याची अधिनियमात तरतूद आहे.

सन १९६१ च्या कायद्याने ठरविलेले कमाल मर्यादा क्षेत्र कमी करणे आणि ते भूमिहीन व इतर व्यक्तींना वितरित करणे यासाठी अधिक जमीन उपलब्ध व्हावी म्हणून या अधिनियमात सुधारणा करण्यात आली. सुधारित अधिनियम २ ऑक्टोबर १९७५ पासून अंमलात आला. त्यानुसार बागायती जमिनीकरिता जलसिंचनाच्या सोयीनुसार ७.२८ ते १४.५७ हेक्टर कमाल मर्यादा क्षेत्र ठरविण्यात आले. कोरडवाहू जमिनीच्या बाबतीत खात्रीलायक पावसाच्या क्षेत्रातील भाताच्या लागवडीखालील जमिनीकरिता १४.५७ हेक्टर व इतर सर्व जमिनीकरिता २१.८५ हेक्टर कमाल मर्यादा क्षेत्र ठरविण्यात आले. या सुधारित कमाल मर्यादेचा अंमल कुटुंब हा घटक धरून केला जातो. सन १९६१ चा मूळ अधिनियम व सन १९७५ चा सुधारित अधिनियम या दोन्हीनुसार ज्यांच्या अतिरिक्त जमिनी ताब्यात घेण्यात आल्या आहेत त्यांना भरपाई देण्यात येते.

वर्धा जिल्ह्यात १९७९–८० मध्ये अतिरिक्त म्हणून ठरविलेल्या जमिनीचे एकूण क्षेत्र मूळ अधिनियमाप्रमाणे ८०.६१ हेक्टर आणि सुधारित अधिनियमाप्रमाणे ३,८७२.७४ हेक्टर होते. त्यापैकी मूळ अधिनियमाप्रमाणे ७.६१ हेक्टर आणि सुधारित अधिनियमाप्रमाणे २,५९६.२६ हेक्टर जमिनीचे वाटप करण्यात आले. उर्वरित जमिनीचे वाटप व्हावयाचे आहे. उपरोक्त जमिनीचे वाटप २९७ अनुसूचित जाती, २२ भटक्या जाती, १३ विमुक्त जमाती, २१७ नवबौद्ध आणि २७१ इतर व्यक्तींना करण्यात आले. सन १९८७–८८, १९८८–८९ आणि १९८९–९० मध्ये अनुक्रमे ५६५; ३०९ आणि ४०० हेक्टर अतिरिक्त जमिनीचे वाटप करण्यात आले.

तुकडेजोड योजना : विविध कारणांमुळे शेतीचे लहान लहान तुकडे होतात, त्यामुळे शेती कसण्यात अडचणी निर्माण होऊन उत्पादनात घट होते. यावर उपाययोजना म्हणून शासनाने मुंबईचा १९४७ चा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतचा अधिनियम वर्धा जिल्ह्यात १ एप्रिल १९५९ पासून लागू केला आणि शेतजमिनी एकत्रीकरण योजनेचे काम १९६० पासून सुरू झाले. अधिनियमाच्या

पहिल्या भागानुसार जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्यात आला. त्यानुसार स्थानिक क्षेत्र व प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आले. तुकड्यांचे हस्तांतरण बेकायदेशीर ठरवून नवीन तुकडे पाडण्यावर निर्बंध घालण्यात आले. सदरहू अधिनियमानुसार कोरडवाहू तुकड्यासाठी किमान दोन एकर प्रमाणभूत क्षेत्र तर बागायती तुकड्यासाठी अर्धा एकर प्रमाणभूत क्षेत्र निर्धारित करण्यात आले. प्रमाणभूत क्षेत्राहून कमी आकार असलेली सर्व शेते जमिनीचे तुकडे समजले जातात. असे तुकडे फक्त लगतच्या भूधारकांकडे हस्तांतरित करता येतात. अधिनियमाच्या पहिल्या भागाची अंमलबजावणी गावस्तरावर महसूल विभागाकडून केली जाते.

अधिनियमाच्या दुसऱ्या भागानुसार जमीन एकत्रीकरण योजनेचे काम हाती घेण्यात आले. त्यासाठी गावे निवडण्याबाबतचा हेतू प्रथम अधिसूचित केला जातो. एकत्रीकरण योजनेनुसार शेतकऱ्यांची विखुरलेली शेते एकत्र करून त्यांचे कमीत कमी संलग्न गट तयार करण्यात येतात. त्यामुळे जमीन कसण्यामधील वेळ, खर्च व श्रमात बचत होऊन शेतीत सुधारणा करणे शक्य होते. जिल्ह्यात १९६१ पर्यंत १५ खेड्यांतील १३,६७३ एकरांतील २,३९१ तुकडे जोडण्यात आले. सध्या योजनेचे काम प्रगतिपथावर असले तरी जिल्हानिहाय माहिती उपलब्ध नाही.

कुळवहिवाट व भूधारणा पद्धती

मार्च १८५४ पासून या प्रांतात ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाल्यावर जमीन खंडाने देणारा व सरकारचा वसूल जमा करून देणारा मालगुजारांचा वर्ग वर्धा जिल्ह्यात प्रभावी झाला. तत्कालीन मध्यप्रांतातील वर्धा, नागपूर, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये मालगुजारी पद्धती रूढ झाली. गोंडांच्या राजवटीत ही पद्धती नसावी असे दिसते. गोंडाचे राज्य जिंकल्यावर नागपूरच्या भोसल्यांनी ही पद्धती रूढ केली. भोसल्यांचे राज्य काबीज केल्यावर (मार्च १८५४) ब्रिटिशांनी मालगुजारीला मंजुरी देऊन मालगुजारांकडे गावेची गावे अथवा महाल सोपवून दिले.[२२] मालगुजारी हा वतनदारीचाच प्रकार होता. मालगुजार स्वतः शेती कसत नसे, तर खंडकरी शेतकऱ्यांना कसण्यासाठी देत असे. खंडकरी शेतकऱ्यांना शाश्वती नसल्यामुळे ते शेती सुधारणा करीत नसत. शिवाय मालगुजार खंड वसुलीसाठी जुलूमही करीत. शोषणकर्त्या मालगुजारांचा वर्ग शासकीय अधिकाऱ्यांना खुष ठेवून हवे तसे वर्तन करीत असे. हा वर्ग सरकारनिष्ठ होता. वर्ध्याचे प्रसिद्ध मालगुजार जमनालाल बजाज हे पहिले अपवाद होते. जमनालालजींनी काही मालगुजारांना इंग्रज निष्ठेकडून वळवून काँग्रेसच्या राष्ट्रीय विचारसरणीच्या प्रवाहात आणले. बऱ्याच मालगुजारांच्या परिवर्तनाबाबत बजाज यशस्वी झाले.

मालगुजारांमध्ये देशमुख, देशपांडे हे ब्राह्मण तसेच देशमुख, पाटील हे मराठा अथवा कुणबी बरेच होते. पाटील ही सर्वसमावेशक संज्ञा होती.

सन १८१८–१८३० दरम्यान नागपूर दरबारी रेसिडेन्ट पदी असलेल्या सर रिचर्ड जेन्कीन्सच्या प्रशासन व भूधारणाविषयक अहवालातील माहिती उपयुक्त असल्याने पुढे दिली आहे.

---

[२२] या ग्रंथातील प्रकरण २–इतिहास पाहावे.

पाटील हा खेड्याचा खंड गोळा करणारा व त्याचे संविभाजन करणारा सरकारचा प्रतिनिधी होता. या कामाची त्याच्याकडे संपूर्ण जबाबदारी होती. त्याला दुय्यम आणि निर्धारित न केलेल्या स्वरूपाचे दंडाधिकार व न्यायिक प्राधिकार होते. त्याला त्याच्या कामगिरीसाठी अथवा प्रतिनिधिकत्वासाठी मिळणारा मोबदला पैशाच्या अथवा खंड माफ जमिनीच्या स्वरूपात देण्यात येत असे. त्याशिवाय त्यास खंडकऱ्याकडून मिळणारे शुल्क, देणी व विशेषाधिकार हे सरकारला मिळणाऱ्या वसुलाच्या अदमासे एक-चतुर्थांश असत. परंतु हे प्रमाण अनेक बाबी वजा जाता वास्तवात एक-षष्ठांशपर्यंत असे. त्याचे हे पद सरकारच्या मर्जीवर अवलंबून असे. ते आनुवंशिक किंवा हस्तांतरणीय नव्हते. त्याने राजीनामा दिल्यावर अथवा त्याला सरकारने बेदखल (Ejection) केल्यानंतर त्यास स्वामीत्व (मालिकाना) अनुज्ञेय नव्हता. पाटील मरण पावल्यावर बहुतेक त्या पदावर त्याचा मुलगा अथवा त्याच्या कुटुंबातील इतर व्यक्ती येत असे. परंतु हे आनुवंशिकतेनुसार होत नसून सरकारने नवीन नियुक्ती केल्याप्रमाणे होत असे. अशा मालगुजार पाटलास पाटीलकीचे सर्व विशेषाधिकार मिळत असत. तसेच त्या पदाच्या कर्तव्यांची पूर्ण जबाबदारी त्याच्यावर असे.[२३]

जेन्कीन्सने १८२२ मध्ये जरी म्हटले की, पाटीलकी वंशपरंपरागत नसून प्रत्येक वेळेला शासन नियुक्ती करीत असे, तरी पुढील काळात, १८५४ मध्ये ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाल्यावर, पाटीलकी अथवा मालगुजारीचे अधिकार वंशपरंपरागत बनले. किंबहुना हा प्रस्थापितांचा एक वर्ग त्यांनी निर्माण केला. १८५७ च्या बंडाची या भागातील प्रतिक्रिया लक्षात घेऊन ब्रिटिशांनी मालगुजारांचा अनुनय करण्यास प्रारंभ केला.

कालांतराने मलिक-मकबुझा नामक भूधारणा पद्धती कायद्याने प्रस्थापित करण्यात आली.[२४] हे मालगुजारी पद्धतीचेच दुसरे स्वरूप होते. सन १९०३–०४ मधील जिल्ह्यातील ११,५६,००० एकर धारण जमिनीचे वाटप पुढीलप्रमाणे होते[२५]: (१) सीर जमीन—१,३२,००० एकर (११.५ प्रतिशत); (२) खुदकाश्त जमीन—९७,००० एकर (८.५ प्रतिशत); (३) मलिक-मकबुझा—५२,००० एकर (४.५ प्रतिशत); (४) पूर्ण वहिवाटीचा अधिकार असलेली कुळे—१,६२,००० एकर (१४ प्रतिशत); (५) वहिवाटीचे अधिकार असलेली कुळे—४,०६,००० एकर (३५ प्रतिशत); (६) साधी कुळे—२,९५,००० एकर (२५.५ प्रतिशत); व (७) खंड माफ असलेली कुळे (सेवेच्या बदल्यात)—५,००० एकर (०.५ प्रतिशत).

ब्रिटिश अमदानीतील संपूर्ण भूधारणा पद्धती अत्यंत गुंतागुंतीची होती. त्यास काही ऐतिहासिक कारणे असावीत. त्यातून कुळांचे शोषण तर होतच असे शिवाय त्यामुळे जमीन सुधारणा करण्यास काहीच उत्तेजन नसे. परिणामत: शेतीची उत्पादकता कमी झाली. कॉंग्रेसने १९३७ पासून जाहीर केलेल्या जमीन सुधारणा धोरणानुसार परिवर्तन अपेक्षित होते. त्याची अंमलबजावणी १९५० पासून झाली.

---

[२३] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९०६, पृ. १८७.

[२४] अधिक माहितीसाठी कित्ता, पृ. २०१–२०२ पाहावे.

[२५] कित्ता, पृ. २०७.

इ. स. १९५० च्या मध्यप्रदेश ॲबॉलिशन ऑफ प्रोप्रायटरी राईटस (इस्टेटस, महाल्स ॲण्ड ॲलियनेटेड लँडस) ॲक्टनुसार महाल, इस्टेट किंवा खेड्यातील अन्य संक्रमित जमिनीचे मालकी हक्क रद्द करण्यात आले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कायद्याने मालगुजारी, जमीनदारी, इनामदारी आणि जहागीरदारी नष्ट करून रयतवारी भूधारणा पद्धती प्रचलित केली. रयतवारी पद्धतीमध्ये संपूर्ण जमिनीवर महसूल न आकारता प्रत्येक सर्व्हे क्रमांकावर महसूल आकारला जातो. जमीन महसुलाचे दर ठरविताना सर्वेक्षण क्रमांकाची प्रतवारी, सरासरी पर्जन्यमान, पिकांचे प्रकार, ओलिताच्या सोयी आणि जमिनीची स्थिती या बाबींचा प्रामुख्याने विचार केला जातो.

स्वातंत्र्योत्तर काळातील जमीन सुधारणासंबंधीच्या कायद्यामुळे आर्थिक विकासास नवीन दिशा प्राप्त झाली. जमीन धारणेतील विषमता नष्ट करणे, सामाजिक न्यायावर आधारलेली नवीन शेतीविषयक रचना प्रस्थापित करणे, अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे आणि कुळांना त्यांच्या वहिवाटीखाली असलेल्या जमिनीचे मालकी हक्क प्राप्त करून देणे हा या कायद्याचा उद्देश आहे. बॉम्बे टेनन्सी ॲण्ड ॲग्रिकल्चरल लॅण्ड (विदर्भ रिजन ॲण्ड कच्छ एरिया) ॲक्ट, १९५८, विदर्भ विभागास लागू करण्यात आला. कुळाने द्यावयाच्या खंडाची अंतिम मर्यादा निश्चित करणे आणि कुळांना त्यांच्या कुळवहिवाटीची सुरक्षितता प्राप्त करून देणे हा कुळ कायदा करण्याचा मूळ उद्देश होता. मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८, अन्वये करण्यात आलेल्या सुधारणा अतिशय महत्त्वाच्या आहेत. त्याच धोरणानुसार शासनाने "कसेल त्याची जमीन" हे धोरण अंगिकारले आहे. त्यानुसार अधिनियमात १ एप्रिल १९६१ पासून कुळाकडील जमिनीचे मालकी हक्क सक्तीने कुळांना हस्तांतरित करण्याबाबत तरतूद करण्यात आली. त्यामुळे या दिवसास "कसणाऱ्यांचा दिन" असे संबोधण्यात येऊ लागले.

कृषि शिक्षण व संशोधन

कृषि शिक्षण : जिल्ह्यात कृषि महाविद्यालय नाही. तथापि शेतकऱ्यांच्या मुलांना शेती-विषयक मूलभूत शिक्षणासाठी सेलसुरा, तालुका वर्धा, येथे १९६१–६२ पासून ५० विद्यार्थ्यांची प्रवेशक्षमता असलेली शेतकी शाळा सुरू आहे. येथे दोन वर्षे मुदतीचा कृषि-विषयक अभ्यासक्रम शिकविला जातो. शाळेच्या रोपवाटिकेत बीजगुणन केले जाते. त्याशिवाय न्यू इंग्लिश हायस्कूल, वर्धा; स्वावलंबी विद्यालय, वर्धा व ग्रामीण महाविद्यालय, पिपरी, या संस्थांमध्ये शालान्त परीक्षेनंतर दोन वर्षाचा कृषि अभ्यासक्रम शिकविला जातो.

कृषि संशोधन : कृषि संशोधनासाठी जून १९६७ मध्ये हिंगणघाट तालुक्यातील कुटकी येथे ३२.७८ हेक्टर क्षेत्रावर कृषि संशोधन केंद्र स्थापन केले. अकोला येथील पंजाबराव कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात वर्धा जिल्हा समाविष्ट आहे. कृषि उत्पादन वाढीसाठी विविध पिकांच्या संदर्भात खते, पाणी, रोग, औषधे व सुधारित बी-बियाणे इत्यादीबाबत संशोधन केलेल्या संशोधनाची प्रत्यक्ष चाचणी आणि प्रसार करणे ही केंद्राची प्रमुख कार्ये आहेत. बीज प्रगुणनासाठी योग्य जागेची निवडही केंद्र करते.

बोर प्रकल्प क्षेत्रातील पिकांच्या आकृतिबंधाच्या अभ्यासासाठी जून १९६५ मध्ये प्रायोगिक स्वरूपाचे प्रात्यक्षिक केंद्र स्थापण्यात आले. फळे व बियाण्यांचा दर्जा वाढविण्या-साठी बोरीला ६.७० हेक्टर क्षेत्रात रोपवाटिका आहे.

बीजगुणन प्रक्षेत्रे : जिल्ह्यात पहिल्या पंचवार्षिक योजनेत एकही बीज उत्पादन केंद्र नव्हते. सुधारलेल्या व संकरित बी-बियाण्यासाठी या जिल्ह्याला इतर जिल्ह्यांवर अवलंबून राहावे लागत होते. परंतु दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत शासनाच्या कृषि विभागाने आठ तालुका बीजगुणन प्रक्षेत्रे सुरू केली. कृषि संशोधन केंद्रातून उत्पादित सुधारित बियाण्याचे तालुका बीजगुणन क्षेत्रात बहुगुणन केले जाते. हे मूलभूत बियाणे जिल्हा परिषदेद्वारे निवडक बियाणे उत्पादकांना वाटले जाते. तसेच या प्रक्षेत्रांद्वारे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उत्तम जातीचे आणि सुधारित बी-बियाणे पुरविण्यात येते. तालुका बीजगुणन प्रक्षेत्रांची माहिती खाली दिली आहे.

प्रक्षेत्र	तालुका	स्थापना	क्षेत्र (हेक्टर)
सेलसुरा	वर्धा	मार्च १९५८	२०.६९
लाडनापूर	आर्वी	मार्च १९६०	३७.९४
तळेगाव	कारंजा	फेब्रुवारी १९५९	२०.७२
नाचणगाव	देवळी	एप्रिल १९६०	२८.३२
विरुळ	आर्वी	जानेवारी १९५८	२१.०४
पोहणा	हिंगणघाट	एप्रिल १९५८	१३.६५
जाम	समुद्रपूर	एप्रिल १९५८	२२.०६
सुकळी	वर्धा	एप्रिल १९५८	२२.१६

प्रशिक्षण व भेट योजना[२६] : कृषि संशोधनाचा लाभ प्रत्यक्ष भेटी व प्रात्यक्षिकांद्वारे शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी जिल्ह्यात कृषि विस्ताराची ही महत्त्वाची योजना १ ऑक्टोबर १९८२ पासून कार्यान्वित झाली. योजनेसाठी वर्धा आणि हिंगणघाटला उप विभाग असून १० कृषि अधिकारी व ८७ ग्रामविस्तारक कार्यरत आहेत. योजनेनुसार योग्य पिकांच्या निवडीसाठी जमिनीचा मगदूर, उपलब्ध साधनसामग्री, उत्पादन खर्च व उत्पादन या बाबी विचारात घेतल्या जातात. जिल्ह्यातील पीक पद्धतीच्या अभ्यासाअंती कापसाच्या क्षेत्रात घट करून ते क्षेत्र तूर, भुईमूग व सोयाबीनखाली व ज्वारीखालील क्षेत्र कमी करून भुईमूग, मटकी, हुलगा व सोयाबीनखाली आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. तसेच गव्हाखालील क्षेत्र कमी करून हरभरा व तुरीखाली आणण्याचेही प्रयत्न सुरू आहेत. योजनेच्या सुरुवातीपासून कडधान्ये व गळित पिकांखालील क्षेत्रात खालीलप्रमाणे वाढ झाली.

(हेक्टर क्षेत्र)

पिके		१९८३–८४	१९८५–८६	१९८८–८९
तूर	..	३३,५७५	४५,८६५	५५,४४५
उडीद, मूग, मटकी	..	१७,२३५	११,६७५	२,१८२
हरभरा	..	६,२६५	११,९५०	..
भुईमूग	..	८,८४०	१२,२१०	..
सोयाबीन	..	..	५,५००	७,७१५
तीळ	..	७,१०३	६,१००	६,२९७
जवस	..	९,६१५	९,५००	..
करडी, सूर्यफूल	..	१२२	५०	२,३१९
उन्हाळी भुईमूग	..	१,५६५	४००	..

[२६] कृषि अधिकारी, प्रशिक्षण व भेट योजना, वर्धा यांचेकडून प्राप्त माहिती.

जिल्ह्यात पूर्वी प्रचलित नसलेल्या सूर्यफूल, सोयाबीन, भुईमूग, करडई आणि एरंडीच्या लागवडीसाठी सदरहू योजने अंतर्गत शेतांवर प्रात्यक्षिके आयोजित करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. त्यानुसार संकरित व सुधारित बी-बियाण्यांचे खालीलप्रमाणे वाटप करण्यात आले.

(क्विंटल)

बियाणे		१९८२–८३	१९८४–८५	१९८८–८९
संकरित कापूस	..	१,७५६	२,३००.६४	१,८३५.००
सुधारित कापूस	..	..	..	२,२६५.००
संकरित ज्वारी	..	५,९९६	७,०५९.१५	२,६४४.००
भुईमूग	..	३४	८७४.४०	..
सोयाबीन	..	..	३६१.४०	५.४०
तूर	..	६६	७४.३५	३४.३३
उडीद व मूग	..	२७	३४.०५	..

पीक संरक्षणासाठी खालीलप्रमाणे कीटक नाशके वितरित करण्यात आली.

वर्ष		भुकटी (मे. टन)	द्रव प्रारुप (लीटर)
१९८१–८२	..	५,७३०.००	९६,९४८.००
१९८२–८३	..	७,८८४.००	१,३२,८२९.००
१९८३–८४	..	१०,६३०.००	१४०.७२१
१९८४–८५	..	१५१.१२	२०७.००
१९८५–८६	..	२,०००.००	४५०.००

पेरणीपूर्वी कडधान्ये आणि गळित धान्यांच्या बियाण्यास जीवाणू संवर्धक चोळून लावल्यास पिकांची निरोगी वाढ होऊन उत्पादनात वाढ होते. त्यादृष्टीने १९८१–८२ ते १९८५–८६ दरम्यान प्रत्येक वर्षी अनुक्रमे १२,४५०; १३,९५०; १,१८,०६१; २६,६२५ आणि १०,६०० जीवाणू संवर्धन पाकिटे वाटण्यात आली. अनुषंगाने रासायनिक खतांच्या वापरात वाढ झाली आहे. सन १९८१–८२, १९८५–८६ आणि १९८७–८८ मध्ये अनुक्रमे ९,५००; १८,५०० आणि १८,३३५ मे. टन रासायनिक खते वापरण्यात आली.

कृषी पंढरी योजना : एकात्मिक कोरडवाहू शेती विकास कार्यक्रमाखाली तालुक्यातील एक गाव आदर्श करण्यासाठी कृषी पंढरी योजना ६ मे १९८३ ला सुरू करण्यात आली. त्यासाठी पिंपळखुटा (आर्वी तालुका), तळेगाव (कारंजा), निमगाव (वर्धा), कान्हापूर (सेलू), सरूळ (देवळी), गंगापूर (हिंगणघाट) आणि जाम (समुद्रपूर) ही गावे निवडलेली आहेत. या सात गावांतील १,२५६ शेतकऱ्यांना सुधारित बियाणे, रासायनिक खते व कीटक नाशकांचे वाटप केले जाते.

दुष्काळ

अजूनही शेती व्यवसाय सर्वस्वी पावसावर अवलंबून असल्यामुळे अवर्षण व काही वेळा अतिवृष्टीमुळे कृषी उत्पादनात कमालीची घट येऊन दुष्काळ पडतो. अतिवृष्टीपेक्षा अवर्षण अथवा अवेळी पडलेल्या पावसामुळे दुष्काळाचे प्रसंग अधिक निर्माण होतात. मात्र दुष्काळाची तीव्रता स्थलपरत्वे कमी जास्त असते. सन १८१८ पूर्वी वर्धा जिल्ह्यात दुष्काळ पडल्याची माहिती उपलब्ध नाही. उप आयुक्ताने १८६८ मध्ये लिहिलेल्या एका पत्रात १८१८ ते १८६८–६९ या कालावधीतील १८३२ च्या दुष्काळाविषयी तोंडी चौकशीत मिळालेल्या माहितीच्या आधारे पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :– नोव्हेंबर १८३१ मध्ये अतिवृष्टीमुळे कापणी करून एकत्रित ठेवलेल्या खरीप पिकांची मळणी न करता आल्याने नुकसान झाले. त्याच प्रमाणे रबी हंगामात पेरलेले बी अतिवृष्टीमुळे कुजून गेले. त्यातूनही जी पिके वाढली त्यावर पडलेल्या रोगामुळे ती नष्ट झाली. अशातऱ्हेने दोन्हीही हंगामातील पिके नष्ट होऊन साधारणतः नऊ महिन्यांचा दुष्काळ पडला. परिणामी एप्रिल १८३२ मध्ये एक रुपयाला आठ शेर (७.४६ किलोग्रॅम) इतके धान्याचे भाव वाढले. वऱ्हाड व खानदेशातून अर्धपोटी निर्वासितांचे लोंढे मजुरांची मागणी नसतानाही जिल्ह्यात आल्यानंतर दुष्काळाची तीव्रता अधिकच वाढली. धान्य मिळण्यासाठी अनेक लोकांनी जात बदलली. लोक आपल्या अपत्यांना १० पौंड (४.५४ किलोग्रॅम) गव्हाचे मोबदल्यात विकत होते. या कालावधीत स्थानिक अंदाजानुसार मृत्यूप्रमाण २० टक्के होते. बाहेरून आलेल्या दुष्काळी निर्वासितांना मोठ्या प्रमाणात झळ सोसावी लागली. नागपूरकर भोसले रोज पाच हजार लोकांना शिजवलेले अन्न देत होते. काही मध्यवर्ती ठिकाणी मदत केंद्रेही सुरू केली होती. खाद्यपदार्थ व धान्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती व ज्यांच्याकडे धान्यसाठा होता त्यांना किरकोळ विक्रीचे दर ठरवून दिले होते.[२७]

इ. स. १८३२ ते १८६८ या कालावधीत दुष्काळाची नोंद झालेली नाही. इ. स. १८६८-६९ मध्ये अनियमित व कमी पावसामुळे पिकांचे नुकसान झाले तरी तीव्र दुष्काळ नव्हता. इ. स. १८७७–७८ च्या रबी हंगामातील पिके जरी निकृष्ट होती तरी उप आयुक्ताच्या अहवालानुसार लोकांना कोणत्याही सहाय्याची आवश्यकता नव्हती. मात्र दर हजारी मृत्यू व जन्माचे अनुक्रमे ७० व ३२ हे प्रमाण लक्षात घेता आपत्ती वाटली तरी ती अंशतः पटकी व देवी या साथीच्या रोगांमुळे ओढवली होती. यानंतर इ. स. १८९१–९२ मध्ये पुन्हा दुष्काळी चक्र सुरू झाले. यावर्षी ऑगस्टमध्ये चार इंच (१०१.६ मि. मी.) तर सप्टेंबरमध्ये २१ इंच (५३३.४ मि. मी.) पाऊस पडला. सुरुवातीच्या कमी पावसामुळे भाताचे पीक बुडाले तर सप्टेंबरमधील अतिवृष्टीमुळे ज्वारी व कापसाची पिके नष्ट झाली. सप्टेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत पाऊस न पडल्यामुळे रबी पिकांचेही नुकसान झाले. गहू व हरभऱ्याचे उत्पादन सरासरी हंगामाच्या अनुक्रमे ६० व ३८ टक्के तर ज्वारी, कापूस व भाताचे उत्पादन प्रत्येकी नेहमीच्या ४५ टक्के इतकेच झाले. सन १८९२–९३ हे वर्ष इतर जिल्ह्यांपेक्षा वर्धा जिल्ह्यास अनुकूल होते. रबी पिके नेहमीप्रमाणे चांगली होती. ऑक्टोबरमध्ये पिकांची पेरणी करण्यास पुरेसा पाऊस पडला. परंतु मार्चमध्ये झालेली अतिवृष्टी, ढगाळलेले हवामान आणि अधून मधून झालेल्या गारपिटीमुळे रबी हंगामातील तयार पिकांचे अतोनात नुकसान झाले. ऑक्टोबर व नोव्हेंबर १८९३–९४ मध्ये अनुक्रमे

[२७] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०६, पृ. १७२–७३.

५.५ (१३९.७ मि.मी.) व २ इंच (५०.८ मि.मी.) पाऊस पडल्यामुळे कापूस व तिळाचे फार नुकसान झाले. तसेच पेरणीच्या वेळी पाऊस पडल्याने गहू आणि जवसावर तांबेरा पडून त्यांचेही उत्पादन नेहमीच्या अनुक्रमे ४५ व ३८ टक्के इतकेच झाले. सन १८९४ मध्ये जन्मापेक्षा मृत्यूची संख्या सुमारे ५,००० नी जास्त असल्यामुळे जिल्ह्यात दुष्काळी आपत्ती होती. इ. स. १८९४–९५ च्या सप्टेंबर व ऑक्टोबरमध्ये अनुक्रमे १२.५ (३१७.५ मि.मी.) व ३ इंच (७६.२ मि. मी.) पाऊस पडल्यामुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले. ज्वारी व कापसाचे उत्पादन नेहमीच्या उत्पादनाच्या अनुक्रमे ६८ व ७५ टक्के झाले. तूर व तिळाच्या पिकांचे फार नुकसान झाले, त्यांचे उत्पन्न नेहमीच्या उत्पादनाच्या अनुक्रमे ३० व ४५ टक्के इतकेच झाले. नोव्हेंबर व फेब्रुवारी महिन्यात पडलेल्या तीन इंच (७६.२ मि.मी.) पावसामुळे व ढगाळ हवेमुळे फार मोठ्या प्रमाणावर तांबेरा पडून जवसाचे पीक जवळजवळ संपूर्णपणे नष्ट झाले. मात्र गहू व हरभऱ्याच्या पिकांची तांबेऱ्यामुळे विशेष हानी झाली नाही.

इ. स. १८९६ मध्ये ऑगस्टपर्यंत भरपूर पाऊस पडला, परंतु नंतर तो अचानक थांबला. त्यानंतर सप्टेंबरमध्ये जिल्ह्याच्या काही भागात तुरळक वर्षाव झाला. तर नोव्हेंबरमध्ये सुमारे एक इंच (२५.४ मि.मी.) इतकाच पाऊस पडला. कमी पर्जन्यवृष्टीमुळे भात व तुरीच्या पिकांचे पूर्णपणे नुकसान झाले. मात्र ज्वारी, कापूस व गव्हाचे प्रत्येकी ६० टक्के उत्पादन मिळाले. या वेळी वाढत्या किमतीमुळे टंचाई निर्माण झाली. त्यातच निर्यात मागणीमुळे किमतीत दुष्काळसदृश वाढ झाली. सन १८९७ च्या सुरुवातीस भंडारा, बालाघाट भागातून आलेल्या आणि मजुरांना मागणी नसल्यामुळे वऱ्हाडमधून परतलेल्या मजुरांना टंचाईची तीव्र झळ पोहचली. निराश्रितांकरिता वर्धा आणि इतर काही गावांत मदत केंद्रे सुरू केली होती. बोरगाव आणि रोहणी येथील मालगुजारांनी स्वखर्चाने तलाव व धरणे बांधण्याची कामे सुरू केली. दुष्काळी कामाकरिता रु. २५०० दिले होते. एप्रिल १८९७ मध्ये आर्वी-आष्टी रस्त्याचे दुष्काळी काम सुरू करेपर्यंत शासनाने दुष्काळ निवारणार्थ काहीही केले नव्हते. त्यानंतर वर्धा व हिंगणघाटला पावसाळ्यात मदत केंद्रे सुरू केली. मे १८९७ मध्ये रु. ८९,००० खर्च करून ८,५०० लोकांना विविध तऱ्हेचे सहाय्य केले, मात्र महसूल तहकूब केला नव्हता. ऑगस्टमध्ये ज्वारीचा दर एका रुपयास २१ पौंड (९.५० किलोग्रॅम) यावरून १६ पौंड (७.२६ किलोग्रॅम) इतका होता. अशा तऱ्हेने किमतीत वाढ झाल्यामुळे दुष्काळी स्थिती निर्माण झाली होती. फेब्रुवारी १८९७ मध्ये रंगून तांदळाची आयात केली. तरीही किमती वाढत राहिल्या. ऑगस्ट ते ऑक्टोबर १८९७ दरम्यान तापाच्या भयानक साथीमुळे सुखवस्तू तसेच गरीब लोकही मोठ्या प्रमाणावर मृत्युमुखी पडले. या वर्षी पावसाळा लवकर थांबल्यामुळे गवताची वाढ झाली नाही. परिणामी उन्हाळ्यात चारा न मिळाल्यामुळे गुरढोरेही मृत्युमुखी पडली.

सन १८९८ मध्ये जुलैनंतर फार कमी पाऊस पडला. तो ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये अनुक्रमे साडेतीन, चार व अर्धा इंच इतकाच पडला. तर पुढील थंडीच्या महिन्यात तो अजिबात पडला नाही. ज्वारी आणि कापसाचे उत्पादन नेहमीच्या अनुक्रमे ९० व ७५ टक्के झाले, तर रबी पिकांचे उत्पादन जेमतेम सरासरीच्या ३३ टक्के झाले. इतर दोन तालुक्यापेक्षा रबी पिकांवर अवलंबून असलेल्या हिंगणघाट तालुक्यात खरीप पिकांची मोठ्या प्रमाणावर हानी झाली. ही स्थिती लक्षात घेऊन या तालुक्यात जमीन महसुलात रु. २५,००० ची सूट दिली होती. सन १८९९ च्या जुलैमध्ये फक्त एक इंच (२५.४ मि.मी.)

पाऊस पडला. त्या अगोदर जूनमध्ये ३ इंच (७६.२ मि.मी.) व ऑगस्टमध्ये ६ इंच (१५२.४ मि.मी.) पाऊस पडला. काही ठिकाणी अनियमित तुरळक स्थानिक वर्षाव झाला. अशा तऱ्हेचा वर्धा येथे सप्टेंबरमध्ये तीन इंच (७६.२ मि.मी.) पाऊस पडला. जिल्ह्यात इतरत्र याहूनही वाईट स्थिती होती. परिणामी दोन्ही हंगामातील पिके संपूर्णतः नष्ट झाली. सर्वांत चांगल्या असलेल्या कापसाचे उत्पन्न नेहमीच्या फक्त ४५ टक्के इतकेच झाले. ज्वारी व तिळाचे प्रत्येकी ३० टक्के इतके उत्पन्न मिळाले. रबी पिकांचे काहीही उत्पादन मिळाले नाही. अशा रीतीने १८३१–३२ नंतर प्रथमच १९०० मध्ये वर्धा जिल्ह्यात खऱ्या अर्थाने दुष्काळ पडला. दुष्काळाचे खरे रूप ऑक्टोबर महिन्यात दिसू लागल्यानंतर रोख भत्ता, अन्नछत्र, कामाच्या मोठ्या छावण्या इत्यादी स्वरूपात दुष्काळ निवारणार्थ उपाय सुरू केले. सुरुवातीस लोक आपली गावे सोडून मदत केंद्रावर फार कमी प्रमाणात गेले. मात्र नंतर त्यांनी आपल्या विचारात बदल केला.

नोव्हेंबर १८९९ मध्ये दुष्काळ पीडित कामगारांची संख्या ९,००० होती. ती फेब्रुवारी १९०० मध्ये ४०,००० व मे मध्ये ५०,००० पर्यंत वाढली. मे मधील कामगारांची संख्या जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या १२ टक्के होती. सार्वजनिक बांधकाम खात्याने मोठ्या कामाकरिता एकूण दहा छावण्या सुरू केल्या होत्या. यावेळी सेलू ते पवनार स्टेशन, सेलू ते येळीकेळी, सोनेगाव ते अल्लीपूर, जाम ते समुद्रपूर, वर्धा ते अंजी, वर्धा ते वायगाव, वर्धा ते देवळी आणि हिंगणघाट ते रोहणा हे सुमारे ८० मैल लांबीचे नवीन रस्ते अंशतः किंवा पूर्णतः तयार केले. रेल्वे मार्गास लागणारी खडी फोडण्याची पाच केंद्रे सुरू केली होती. १३ जुने तलाव दुरुस्त केले व देवळी, तरोडा आणि ठाणेगाव हे तीन नवीन तलाव बांधले. समुद्रपूरलाही एक मोठा तलाव बांधला. तसेच ७५ विहिरींची खोली वाढवून त्या दुरुस्त केल्या. यापैकी बरीचशी कामे गावप्रमुखांनी चालविली होती. त्यावर एप्रिल १९०० मध्ये ४,००० कामगार होते. जिल्ह्यात दुष्काळात विहिरी खोदण्याचे काम, दुष्काळी मजुरांना मजुरी देणे व गव्हाच्या पिकास जलसिंचनाची सोय उपलब्ध करणे या दोन्ही दृष्टीने फायदेशीर वाटले. ऑक्टोबर १८८९ ते ऑक्टोबर १९०० या कालावधीत विकलांग गरिबांना रोख भत्ता वाटला. अशा तऱ्हेची मदत ऑक्टोबर १९०० मध्ये ६,५०० लोकांना दिली. खेडेगावांतील शेतकऱ्यांनी खेड्यात राहून शेती करावी या उद्देशाने १९०० च्या पावसाळ्यात ५,००० शेतकऱ्यांना रोख स्वरूपात भत्ते वाटले. दुष्काळाच्या संपूर्ण कालावधीत अन्नछत्रे सुरू ठेवली होती. एप्रिल १९०० मध्ये त्यांची संख्या ३७ होती, ती मे मध्ये ९१, जुलैमध्ये १४३ आणि सप्टेंबरमध्ये १५२ पर्यंत वाढली. जुलैमध्ये सुमारे ५७,००० लोकांना शिजवलेले अन्न वाटण्यात आले. याशिवाय जिल्ह्यात स्वस्त धान्याची दुकाने उघडली होती. त्यात सरसकट १ रुपयास १२ शेर (११ किलो) या दराने धान्य विकले जात असे. जिल्ह्यातील लोकांचे ज्वारी हे प्रमुख अन्न असले तरी पुरेशा प्रमाणात ती उपलब्ध नसल्याने लोकांना तांदूळ व डाळ वाटण्यात आली. नेहमीच्या अन्नपदार्थात बदल झाल्यामुळे दुष्परिणाम दिसू लागले. विशेषतः लहान मुलांच्या मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली.

या दुष्काळात डिसेंबर १८९९ मध्ये २५,००० आणि फेब्रुवारी, मे व जुलै १९०० मध्ये अनुक्रमे ५०,०००; ८०,००० व १,३०,००० दुष्काळ पीडित लोकांना शासकीय मदत दिली. ही संख्या हळूहळू कमी झाली व नोव्हेंबर १९०० मध्ये कोणत्याही दुष्काळ पीडिताला शासकीय मदत दिली नाही. या दुष्काळाच्या कालावधीत रोख २० लाख रुपये खर्च करण्यात

आले. दररोज प्रत्येक व्यक्तीस दीड आणा (नऊ पैसे) या दराने एकूण २१ दशलक्ष दुष्काळ पीडित व्यक्तींना मदत मिळाली. एकूण वार्षिक महसुलाच्या ७७ टक्के म्हणजे सुमारे ५ लाख रुपये जमीन महसूल तहकूब केला होता. सरकारी जंगलाच्या मुक्त वापरास परवानगी दिली होती. जमीन सुधारण्यासाठी २२,००० रुपये व बियाणे आणि बैल खरेदीसाठी १,५०,००० रुपये कर्ज दिले होते. तसेच १,३१,००० रुपये धर्मादाय अनुदान दिले, यापैकी ४३,००० रुपये जिल्ह्यात जमा झाले होते व उर्वरित रक्कम प्रॉव्हीन्शल चॅरिटेबल फंडामधून मिळाली होती.

दुष्काळाबरोबर गुन्ह्यांच्या संख्येत बरीच वाढ झाली. विशेषतः धान्याची चोरी व घरफोडीचे प्रमाण वाढले होते. धान्याच्या किंमती वाढल्यामुळे व्यापारी धान्याची निर्यात करू लागले किंवा शहरातील आपल्या धान्य कोठारात साठवणीकरिता पाठवू लागले. व्यापाऱ्यांच्या या वृत्तीमुळे गुन्हेगारी अधिकच वाढली. गावकऱ्यांनी प्रथम धान्य व्यापाऱ्यांचा तीव्र निषेध केला. परंतु व्यापाऱ्यांनी धान्याची निर्यात न थांबविल्यामुळे लोक संघटितरीत्या धान्य लुटू लागले. यावर उपाय म्हणून गावात रात्रीची गस्त घालण्यासाठी शासनाने मालगुजारांना प्रवृत्त केले. त्यांनी गावातील काही लोकांना धान्याच्या स्वरूपात मदत देऊन त्यांच्याकडे रात्रपहाऱ्याचे काम सोपविले होते. याशिवाय शासनाने बंदुकधारी शिपायांचा वऱ्हाड सरहद्दीवर पहारा ठेवला होता. याचा योग्य तो परिणाम होऊन संघटित गुन्हेगारीला पूर्ण आळा बसला.

दुष्काळाचे हे वर्ष जनावरांच्या दृष्टीनेही वाईट होते. ऑगस्टअखेर गवत वाळून नष्ट झाले. ज्वारीचा कडबाही नेहमीच्या ३३ टक्केच झाला. यामुळे गुरांना पुरेसा चारा न मिळाल्याने काही वेळा झाडपाला गुरांना खावयास देत होते. सरकारी जंगले मुक्त केली होती. परंतु चारा नसल्यामुळे ती निरुपयोगी होती. वरोरामार्गे चंद्रपूरहून गवत आणून ते वर्धा व पुलगावला दर टनास २७ रुपये दराने विकले जात होते. डिसेंबरमध्ये ज्वारीचा कडबा दर हजारी ७० रुपये प्रमाणे व गवत २० रुपयाप्रमाणे विकले जात होते. पुढे या किंमती मोठ्या प्रमाणावर कमी झाल्या. विहिरीचे पाणी फार खोल गेले होते व जलप्रवाहही आटले होते. परिणामी बरीचशी जनावरे दुसऱ्या जिल्ह्यात पाठविली होती, व जी राहिली त्यांना मोकळे सोडले होते. या सर्व घटनांमुळे जिल्ह्यातील एकूण जनावरांच्या १० टक्के म्हणजे ३५,००० जनावरे मृत्युमुखी पडली. जून व जुलै महिन्यात गुरांच्या मृत्यूचे प्रमाण सर्वाधिक होते. १०,००० मण कातडी रेल्वे स्थानकांतून निर्यात केली हे लक्षात घेता एक मणाबरोबर (३७.३२ किलोग्रॅम) आठ कातडी या हिशेबाने ८०,००० जनावरे मृत्युमुखी पडली असावीत.

सन १९०० च्या दुष्काळात मृत्यूचे प्रमाण फार मोठे म्हणजे दर हजारी ९० इतके होते. ते एप्रिल ते ऑगस्टपर्यंत सतत वाढते होते. जिल्ह्यातील सर्व शहरांना व निम्म्याहून अधिक खेड्यांना तसेच दुष्काळ निवारणार्थ काढलेल्या सर्व मदत केंद्रांना उन्हाळ्यात आणि पावसाळ्यातही पटकीच्या साथीने मोठ्या प्रमाणात पछाडले होते. साथ आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. परंतु अशुद्ध पाण्यामुळे साथीचा प्रादुर्भाव अधिकच वाढत राहिला. आयात केलेला रंगून तांदूळ पचावयास जड असल्यामुळे पोटाच्या विकारामुळे तसेच पावसाळ्याच्या सुरुवातीस आलेल्या पालेभाज्यांमुळेही मृत्युसंख्या वाढली होती. सुमारे ३३ टक्के मृत्यू एक वर्षाखालील मुलांचे होते.

सन १९०२–०३ मध्ये जिल्ह्यात सर्वत्र भाताचे पीक बुडाले होते. त्यानंतर १९०७ मध्ये पाऊस अकाली थांबल्यामुळे १९०८ मधील कृषी उत्पादनावर थोडा परिणाम झाला. मात्र खाद्य पदार्थांच्या कमतरतेपेक्षा त्यांच्या वाढत्या किंमतीमुळे दुष्काळसदृश स्थिती निर्माण होऊन सर्व थरातील लोकांना त्याची झळ पोहचली. मोठ्या प्रमाणावर लहानसहान कामे सुरू केल्यामुळे, विणकर लोकांना त्यांच्या व्यापारात मदत केल्यामुळे व इतरांना सानुग्रह मदत दिल्यामुळे या परिस्थितीत सन १९११ पर्यंत सुधारणा होत गेली. मात्र मध्यावधीच्या कालावधीत सन १९०९ मध्ये लोकांना प्लेग, देवी, पटकी व हिवताप या साथीच्या रोगांचा उपद्रव झाला.

सन १९११ ते २१ या दशकातील जिल्ह्याची आर्थिक व कृषीविषयक स्थिती गुंतागुंतीची होती. सन १९११–१२ मध्ये कृषी उत्पादन समाधानकारक होते. परंतु नंतरच्या वर्षी ते नेहमीच्या ७५ टक्के इतकेच झाले. त्यानंतर १९१६–१७ पर्यंत कृषी उत्पादन समाधानकारक होते. मात्र यावर्षी कापूस वेचणीच्या अगोदर अतिवृष्टी झाल्यामुळे कापसाच्या पिकाचे नुकसान झाले. नंतरच्या वर्षीही अतिवृष्टीमुळे कापूस व ज्वारीच्या पिकाचे नुकसान झाले. हिवाळ्यात पाऊस न पडल्यामुळे गव्हाच्या पिकावर प्रतिकूल परिणाम होऊन त्याचे उत्पादन नेहमीच्या ७५ टक्के झाले. सन १९१८–१९ च्या सुरूवातीस सर्वत्र पाऊस चांगला पडला तरी तो नंतर अचानक थांबल्यामुळे आणि नोव्हेंबरपर्यंत पुन्हा न पडल्यामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यांचे उत्पादन नेहमीच्या निम्म्यापेक्षाही कमी झाले. रबी पिकांकरिता तयार केलेली जमीन तिच्यात ओलावा नसल्यामुळे कठीण झाली. परिणामी रबी पिकांची पेरणी करता आली नाही. त्यातच अगोदरच्या वर्षी धान्याची निर्यात केल्यामुळे धान्यसाठा रिक्त होऊन धान्याच्या किंमती वाढल्या होत्या. इन्फ्ल्यूएंझाच्या दोन वेळा आलेल्या साथीमुळे मजूर व शेतकऱ्यांची शक्ती क्षीण झाली होती. पिकांची हानी आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे दुष्काळ अधिक तीव्र झाला होता.

सन १९२०–२१ मध्ये पाऊस न पडल्यामुळे पुन्हा तीव्र दुष्काळ पडला. पिके बुडाल्यामुळे आणि भरमसाठ किंमती वाढल्यामुळे या वेळची दुष्काळाची तीव्रता सर्वाधिक होती. वेळीच पुरेसे उपाय केल्यामुळे आणि अगोदरच्या वर्षाचे कृषी उत्पन्न बऱ्यापैकी आल्यामुळे दुष्काळाची तीव्रता कमी करता आली.

इ.स. १९२६–२७ मध्ये प्लेग आणि पटकीच्या साथीमुळे आणि अनेक नद्यांना पूर आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व मालमत्तेची हानी झाली. सन १९२८–२९ मध्ये कडाक्याच्या थंडीमुळे पिके बुडाली. तसेच सन १९३० च्या मंदीच्या लाटेची पूर्वचिन्हे कापसाच्या किंमतीत सतत होणाऱ्या घटीमुळे १९२६–२७ पासूनच दिसू लागली होती. त्यातच १९३० मध्ये प्लेग, पटकी आणि देवी या साथीच्या रोगांनी लोकांना पछाडले होते. विशेषता हिवतापाने ऑगस्टनंतर सर्वाधिक लोक मृत्युमुखी पडले. मंदीच्या मोठ्या लाटेमुळे सर्व कृषी उत्पादनांच्या किंमती व मजुरीचे दरही कमालीचे घसरले. फक्त ठराविक वेतन मिळणाऱ्या लोकांची स्थिती चांगली होती.

सन १९३० च्या जागतिक मंदीच्या लाटेनंतर जिल्ह्यात १९३६–३७ व १९३९–४० मध्ये टंचाईजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. सन १९४२–४३ च्या हंगामात अवर्षणामुळे पिकांची मोठी हानी झाली. शिवाय १९४३ च्या हिवाळ्यातील मोठा पाऊस व गारांच्या वर्षावाने रबी पिकांची फार हानी झाली.

सन १९४९–५० मध्ये फक्त आर्वी तालुक्यात टंचाईजन्य परिस्थिती होती. यानंतर १९५०–५१ मध्ये वर्धा व हिंगणघाट तालुक्यांतील एका महसूल मंडळास दुष्काळी स्थितीने ग्रासले होते. सन १९५५–५६ मध्ये सात गावे सोडून जिल्ह्यात सर्वत्र अतिवृष्टीमुळे पिके बुडाली होती.

सन १९६५–६६ मध्ये ८३३ गावात टंचाईजन्य परिस्थिती निर्माण होऊन ३,८२,०६० लोकांना झळ पोहचली. एकूण ६७ खेड्यांमधील जमीन महसूल पूर्णपणे स्थगित करण्यात आला होता. अगोदरच १४९ कामे सुरू असल्यामुळे नवीन दुष्काळी कामे सुरू करण्याची गरज भासली नाही. बैल व बी-बियाणे खरेदीसाठी ६३,५७,७९४ रुपये तगाई कर्ज वाटले होते. याशिवाय बिगरशेती कर्ज कायद्यानुसार ६३,८५० रुपये वाटले होते.

इ. स. १९५९, १९६० व १९६१ मध्ये लागोपाठ आलेल्या पुरांमुळे घरे व इतर मालमत्तेचे खूप नुकसान झाले होते. सन १९५९ मध्ये १३ ते १५ सप्टेंबर दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे नदीनाल्यांना पूर येऊन नदी काठांवरील २७४ गावांतील १२,३३२ एकर जमिनीतील पिके नष्ट झाली. या पुराची १२,६७१ लोकांना झळ पोहोचून ५,५३,९३७ रुपयांची हानी झाली होती. शासनाकडून ४६,९६७ रुपयांचे घरबांधणी साहित्य व आर्थिक मदत, तसेच १,१६,०५७ रुपयांचे सानुग्रह सहाय्य देण्यात आले. शेती व इमारतीसाठी ६,९९,१४९ रुपयांचे तगाई कर्ज वाटले. ग्रामीण भागात स्वस्त धान्याची दुकाने उघडण्यात आली होती. मदत म्हणून देणगीदाखल ८,५४६ रुपये गोळा झाले होते. गुरांसाठी वैरण आयात करण्यात आली. पुराची झळ पोहचलेल्यांना ८७० रुपयांची औषधे मोफत वाटण्यात आली. या सर्व कामांसाठी जिल्हा पूरग्रस्त मदतकार्य समितीची स्थापना करण्यात आली होती. यावर कायमचा उपाय म्हणून पुरापासून धोका असणारी गावे उंच ठिकाणी वसविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

इ. स. १९६० मध्ये २६ व २७ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे वर्धा तालुक्यातील बोर नदी आणि हिंगणघाट तालुक्यातील वेणा नदीस पूर येऊन बोर नदीच्या काठांवरील १३ गावातील ५,७५० लोकांना झळ पोहोचली. हिंगणघाट शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सुमारे १५० एकर जमिनीतील ८,००० रुपये किंमतीची पिके बुडून नष्ट झाली होती. उपाययोजना म्हणून शासनाने ३,१८८.४० रुपयांची आर्थिक मदत आणि २,३६५ रुपयांचे घरबांधणी साहित्य पुरविले. सेलू, मोई व हिंगणी गावातील पूरपीडितांना घरे बांधून देण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन केली होती.

इ. स. १९६१ मध्येही पुराने जिल्ह्यात थैमान घातले. ३४६ गावांना पुराचा तडाखा बसला. शिवाय पुलगाव शहरातील सखल भागातील आणि हिंगणघाट शहरातील चार प्रभागातील घरांचे अतोनात नुकसान झाले. सुमारे ३२,७८० एकर क्षेत्रातील ११,३४,९०१ रुपये किंमतीची ज्वारी व कापसाची पिके नष्ट झाली. पुरात एक मनुष्य आणि बारा जनावरे दगावली व १४,५१७ लोक बेघर झाले. त्यांच्यासाठी पुलगाव व हिंगणघाटला अनुक्रमे ५४ व २१ तात्पुरते निवारे बांधले. याशिवाय काही पूरग्रस्तांना नगरपरिषदेच्या सराई व शाळांमध्ये आश्रय देण्यात आला. त्यांना ३४,५६९ रुपयांचे अर्थसहाय्य वाटले. हिंगणघाट

व आर्वी शहरात भांडी व कपड्यांचे वाटप केले. अठरा नवीन गावठाणे उंच ठिकाणी तयार केली. घरे बांधणीसाठी सुमारे ५० गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या. शेतकऱ्यांना पुन्हा पेरणीसाठी गव्हाचे बियाणे वाटण्यात आले व गुरांसाठी वैरणही आयात करण्यात आली.

इ. स. १९७९ च्या ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे विदर्भात सर्वत्र महापूर आले. मोठ्या प्रमाणावर झळ पोहोचलेल्या जिल्ह्यांत वर्धा जिल्ह्याचा समावेश होता. जीवित व वित्तहानी झाली. घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. गुरे व शेतांतील उभी पिके वाहून गेली. पिके मोठ्या प्रमाणात पाण्याखाली बुडाली. वेणा नदीच्या पुरामुळे जिल्ह्यातील बरीचशी गावे जलमय झाली. पुलगाव, आर्वी व हिंगणघाट भागात पुरामुळे जनजीवन उध्वस्त झाले होते. अंदाजे ३९० खेडी व दोन शहरांना पुराची झळ पोहोचली. त्यासाठी तातडीने अनेक ठिकाणी संक्रमण शिबीरे उघडण्यात आली. संकटग्रस्तांना कपडे भांडीकुंडी आणि पुरात सापडलेल्यांना हेलिकॉप्टरमधून जेवणाची पाकिटे पुरविण्यात आली त्यासाठी अनेक सेवाभावी संस्थांनी मदत केली होती.

या पुरामुळे सहा माणसे आणि ३३७ जनावरे दगावली. शासन, जिल्हा परिषद आणि नगरपालिका मिळून ६,१०,७३७ रुपयांची वित्तीय हानी झाली. एकूण १७,५४५.३३ हेक्टरमधील पिकांचे अंदाजे ७३,४८,६०० रुपयांचे नुकसान झाले. तसेच ४२.०९ हेक्टर जमीन लागवडीस निकामी झाली. एकूण ३,०८,६६६ लोक निराधार झाले. त्यांच्या ११,६१९ घरांची अंशत: पडझड होऊन एकूण ६१,७७,९२४ रुपयांची वित्तीय हानी झाली.

पूरग्रस्तांसाठी रोजगार हमी योजनेखाली कामे सुरू करण्यात आली होती. कोसळून पडलेल्या घरांचे ढिगारे उपसणे, घरांची दुरुस्ती व पुनर्बांधणी, नुकसान झालेल्या जोड-रस्त्यांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याच्या विहिरीतील गाळ उपसणे इत्यादी कामासाठी ६,८७९ लोकांना रोजगार मिळाला. त्यावर ३०,८९७ रुपये खर्च करण्यात आले. ४१ शेतकऱ्यांची शेती अवजारे पुरात वाहून गेल्यामुळे ती खरेदी करण्यासाठी मुख्यमंत्री निधीतून ७,७०५ रुपये खर्च करण्यात आला. पुरामुळे लागवडीस निरूपयोगी झालेली जमीन मृद संधारण विभागातर्फे लागवडीस योग्य करण्यासाठी हेक्टरी २५० रुपये प्रमाणे १,८१७ शेतकऱ्यांची २,९३३.४६ हेक्टर जमीन लागवडीयोग्य करण्यात आली. त्यावर अनुदाना-पोटी ३,७४,३४३ रुपये देण्यात आले. तसेच ७५६ शेतकऱ्यांना ७२,३४२ रुपये कर्जरूपाने सहाय्य देण्यात आले. ३८ व्यक्तींना पशुसंवर्धनासाठी अनुदान म्हणून ९,६८७.५० रुपये देण्यात आले. ५४ व्यक्तींना जनावरे विकत घेण्यासाठी ५७,६३८.५० रुपये कर्ज देण्यात आले. पुरामुळे ज्यांचा धान्याचा साठा नष्ट झाला अशा २०० शेतकऱ्यांना ७६,५९७.५० रुपये किमतीचे ५९५ क्विंटल धान्य कर्जरूपाने देण्यात आले. १२ किरकोळ व्यापाऱ्यांना ४,७५० रुपये अनुदान व आठ व्यक्तींना १३,८०० रुपये कर्जरूपाने देण्यात आले. अवजारे वाहून गेलेल्या ४५ ग्रामीण कारागिरांना अवजारे खरेदीसाठी ७,७५० रुपये मुख्यमंत्री निधीतून अर्थसहाय्य देण्यात आले. जिल्ह्यात ३,४८६ पूरपीडितांची घरे बांधण्यासाठी प्रत्येकी १,५०० रुपये अनुदान देण्यात आले.

तक्ता

जिल्ह्यातील जमिनीचे

वर्ष	भौगोलिक क्षेत्र	जंगलव्याप्त क्षेत्र	बिगर शेती उपयोगाकरिता आणलेले क्षेत्र
(१)	(२)	(३)	(४)
१८९१–९२	६,३१,४३० (१००.००)	५१,८१४ (८.२०)[२८]	...
१९०१–०२	६,२३,८२७ (१००.००)	४८,७०२ (७.८०)	...
१९११–१२	६,२२,५५६ (१००.००)	४७,५४७ (७.६३)	...
१९२१–२२	६,२८,६०१ (१००.००)	५२,०७१ (८.२८)	...
१९३१–३२	६,२८,७५२ (१००.००)	५२,०७२	...
१९४१–४२	६,२८,७५६ (१००.००)	५२,०७१ (८.२८)	...
१९५१–५२	६,२८,७६० (१००.००)	५७,२६३ (९.१०)	...
१९६०–६१	६,२८,७०० (१००.००)	६४,७०० (१०.२९)	३५,४०० (५.६३)
१९७०–७१	६,२८,९०० (१००.००)	७०,९०० (११.२७)	३६,५०० (५.८०)
१९८०–८१	६,२८,९०० (१००.००)	६७,३०० (१०.७०)	४०,६०० (६.४६)
१९८५–८६	५,८२,५९८.७०	२७,७२८.२८	३०,१२३.७४

[२८] कंसातील आकडे भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी दर्शवितात.

क्रमांक १

उपयोजन

(हेक्टरमध्ये)

ओसाड जमीन व शेतीस अयोग्य क्षेत्र (५)	एकूण क्षेत्र (६)	कायम कुरणे व इतर चराऊ कुरणे (७)	किरकोळ व झाडेझुडपे यांच्या समुहाखालील निव्वळ पेरलेल्या क्षेत्रात सामील नसलेले क्षेत्र (८)
६७,८६८ (१०.७५)	...	५१,१८३ (८.१०)	...
६८,७९८ (११.०३)	...	४२,३३९ (६.७९)	...
६३,६०२ (१०.२२)	...	३५,१२५ (५.६५)	...
६४,३३८ (१०.२३)	...	३४,७५३ (५.५२)	...
...	...	...	...
६२,५९८ (९.९५)	...	३७,४४८ (५.९५)	...
१,००,२८१ (१५.९५)	...	१७,४८२ (२.७९)	...
७,८०० (१.२४)	४३,२००	५३,२०० (८.४६)	१०,८०० (१.७२)
७,००० (१.११)	४३,५००	४९,६०० (७.८९)	८,४०० (१.३४)
६,९०० (१.१०)	४७,५००	४६,२०० (७.३५)	७,३०० (१.१६)
१३,४४९.६५	...	४६,२१७.४४	३,५२२.७२

तक्ता

वर्ष		लागवडीलायक पण पडीक जमीन	एकूण	चालू पड
(१)		(९)	(१०)	(११)
१८९१–९२	..	...	...	४१,३२८ (६.५५)
१९०१–०२	..	...	...	१९,८६२ (३.१८)
१९११–१२	..	...	..	२५,८३७ (४.१५)
१९२१–२२	..	...	...	१५,००६ (२.३८)
१९३१–३२	..	...	...	१६,५६१
१९४१–४२	..	...	...	२९,२१३ (४.६५)
१९५१–५२	..	३७,१५० (५.९०)	...	१४,९७३ (२.३८)
१९६०–६१	..	२७,९०० (४.४४)	९१,९००	८,३०० (१.३२)
१९७०–७१	..	२०,००० (३.१८)	७८,०००	७,१०० (१.१३)
१९८०–८१	..	१४,७०० (२.३३)	६८,२००	८,२०० (१.३०)
१९८५–८६	..	२०,१६०.२३	...	१०,५०९.६९

क्रमांक १—चालू

(हेक्टरमध्ये)

इतर पड	एकूण पड	पिकांखालील निव्वळ क्षेत्र	दुबार क्षेत्र	पिकांखालील एकूण क्षेत्र
(१२)	(१३)	(१४)	(१५)	(१६)
४२,०६७ (६.६६)	...	...	...	३,७७,१७० (५९.७४)
४७,७११ (७.६५)	...	...	...	३,९६,४१५ (६३.५५)
४२,७७५ (६.८७)	...	...	...	४,०७,६७० (६५.४८)
३९,८५५ (६.३४)	...	...	...	४,२२,७३८ (६७.२५)
६३,४८०	...	...	...	४,२९,६१९
५३,८८२ (८.५७)	...	...	...	३,९३,५४४ (६२.६०)
२३,१०८ (३.६८)	...	...	...	३,७८,५०३ (६०.२०)
१३,२०० (२.१०)	२१,५००	४,०७,४०० (६४.८०)	३,४००	४,१०,८००
५,२०० (०.८३)	१२,३००	४,२४,२०० (६७.४५)	७,९००	४,३२,१००
९,८०० (१.५६)	१८,०००	४,२७,९०० (६८.०४)	३०,३००	४,५८,२००
१५,०२२.३०		४,१५,८०३.८८	१७,३३५.९४	४,३३,९७३.०७

तक्ता क्रमांक २

जिल्ह्यातील पिकांनुसार सिंचनाखालील क्षेत्र[३१], १९०३–०४ ते १९८६–८७

(हेक्टर)

वर्ष १	भात २	ज्वारी ३	मका ४	गहू ५	बार्ली ६	इतर अन्न पिके ७	हरभरा ८
१९०३–०४ ..	...	...	...	१८९(१९.८४)	...	७२९(७६.५०)	...
१९०७–०८ ..	...	...	...	३३८(२५.६०)	...	७७(५.८३)	...
१९१५–१६ ..	...	...	...	३००(१६.२०)	...	३६(१.९५)	...
१९२०–२१ ..	४(०.१९)	२८(१.३९)	२(०.०८)	३५३(१७.५३)	७(०.३४)	५०(२.४९)	...
१९३१–३२ ..	...	१(...)	२(...)	२८८(१४.१९)	२(...)	२४(१.१८)	...
१९३५–३६ ..	...	४(०.१४)	४(०.१४)	३९७(१४.८७)	३(०.११)	१३(०.४८)	...
१९४०–४१ ..	...	१(...)	३(...)	२८०(१०.००)	५३(२.००)	२०(...)	...
१९४५–४६ ..	...	...	५(०.१३)	१९४(५.२५)	१७(०.४५)	१३(०.३५)	...
१९५०–५१[२९] ..	...	...	...	२०२(४.४२)	...	४१(०.९०)	४१(०.९०)
१९५५–५६ ..	...	...	...	४४५(१०.७८)	...	...	४०(०.९६)
१९६१–६२ ..	४०(०.६६)	...	...	...	...	...	४०(०.६६)
१९६४–६५ ..	४०	...	...	१,११३	...	...	४०
१९६९–७० ..	३००	३००	...	२,६००	...	...	१००
१९७४–७५[३०] ..	४००(२.०७)	१००(०.५१)	...	१०,७००(५५.४४)	...	...	३००(१.५५)
१९८०–८१ ..	...	...	...	१५,३००	...	...	२००
१९८५–८६ ..	...	...	...	२७,५००	...	...	७००
१९८६–८७ ..	...	...	...	१३,५००	...	...	१,०००

तक्ता क्रमांक २–चालू

वर्ष १		तूर ९	ऊस १०	इतर अन्न पिके[३२] ११	कापूस १२	इतर अखाद्य पिके १३	एकूण सिंचन क्षेत्र १४
१९०३–०४	..	...	...	२८(२.९३)	...	७(०.७३)	९५३
१९०७–०८	..	...	...	७९०(५९.८५)	...	११५(८.७२)	१३२०
१९१५–१६	..	...	...	१४३६(७७.५८)	...	७९(४.२७)	१८५१
१९२०–२१	..	...	३२(१.५९)	१४२७(७१.००)	४८(२.३९)	५७(३.००)	२००८
१९३१–३२	..	...	२४(१.१८)	८१०(३९.९०)	७(०.३०)	८७८(४३.२५)	२०२९
१९३५–३६	..	...	५४(२.०२)	११९२(४४.६३)	१३(०.४९)	९९१(३७.११)	२६७१
१९४०–४१	..	...	३३(१.००)	२४६७(८७.००)	३(०.००)	१९(०.००)	२८२९
१९४५–४६	..	...	६३(१.७१)	३३८२(९१.४६)	२(०.०५)	२२(०.६०)	३६९८
१९५०–५१[२९]	..	...	४१(०.९०)	४२०८(९२.०१)	...	४०(०.८७)	४५७३
१९५५–५६	..	...	४१(०.९९)	१२२६(५३.९२)	१२१(२.९३)	४०(०.९६)	४१२८
१९६१–६२	..	४०(०.६६)	४०(०.४६)	४०४६(६७.०९)	८०९(१३.४१)	४०(०.६६)	६०३० ५०५५
१९६४–६५	..	४०	८१	४१७७	६८६	८१	६२५८
१९६९–७०	..	१००	१००	...	९००	...	९३००

तक्ता क्रमांक २–समाप्त

वर्ष		तूर	ऊस	इतर अन्न पिके[३२]	कापूस	इतर अखाद्य पिके	एकूण सिंचन क्षेत्र
१		९	१०	११	१२	१३	१४
१९७४–७५[३०]	..	...	१००(०.५१)	...	२७००(१३.९८)	...	१९३००
१९८०–८१	..	...	१००	...	२४००	...	...
१९८५–८६	..	...	...	...	...	...	...
१९८६–८७	..	...	...	...	...	...	...

[२९] १९५०–५१ मध्ये इतर भाजीपाला व मसाले अंतर्गत क्षेत्र १२१५ हेक्टर, १९७४–७५ मध्ये मिरची ६०० हेक्टर, हळद १०० हेक्टर, कांदे २०० हेक्टर, बटाटे २०० हेक्टर व इतर भाजीपाला याखाली ११०० हेक्टर क्षेत्र होते.

[३०] १९७४–७५ मध्ये इतर कडधान्याखाली ओलीत क्षेत्र ३०० हेक्टर होते.

[३१] कंसातील आकडे एकूण सिंचनाखालील क्षेत्राशी प्रत्येक पिकांच्या सिंचन क्षेत्राची टक्केवारी दर्शवितात.

[३२] केळीचे १९७४-७५, ८०-८१, ८५-८६ आणि ८६-८७ मध्ये अनुक्रमे ८००, ८००, ५०० आणि ६०० हेक्टर ओलीत क्षेत्र होते. संत्र्याचे ओलीत क्षेत्र ७४-७५, ८०-८१, ८५-८६ व ८६-८७ मध्ये अनुक्रमे १,९००, २,०००, २,३३८ व २,५०० हेक्टर होते. १९७४-७५ मध्ये इतर फळांखाली ओलीत क्षेत्र १०० हेक्टर होते.

प्रकरण ५–उद्योगधंदे

औद्योगीकरणाचा इतिहास

ब्रिटिश अंमल प्रस्थापित होईपर्यंत खेड्यांचा समूह बहुतांश स्वयंपूर्ण असल्याकारणाने मोठ्या गावांमध्ये पारंपरिक कुटिरोद्योग भरभराटीला असत. जीवनावश्यक वस्तू व शेतीची अवजारे घडविण्याचा व्यवसाय वंशपरंपरेने चालू असे. इंग्रजी सत्ता रूढ झाल्यावर स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थेचा ऱ्हास होण्यास प्रारंभ झाला. इतके मात्र खरे की, १८६७ मध्ये मुंबई-नागपूर लोहमार्ग व १८७७ मध्ये वर्धा-वरोरा लोहमार्ग कार्यान्वित झाल्यावर पाश्चिमात्य पद्धतीची औद्योगिक संरचना उपलब्ध होण्यास प्रारंभ झाला. लोहमार्गाच्या सुविधांबरोबर मुंबईशी निकटचा संबंध आल्यामुळे वर्धा जिल्ह्यात कापसाच्या वटण व दाबणी गिरण्या सुरू झाल्या. कापसाच्या गासड्या मुंबईला पाठविणे अधिक सुलभ झाल्याकारणाने कच्चा कापूस न पाठविता दाबणी केलेल्या गासड्या अधिक प्रमाणात पाठविण्यास सुरुवात झाली. त्या कारणाने वटण व दाबणी गिरण्या वाढू लागल्या. तथापि जिल्ह्याच्या वाणिज्य विकासाचा पहिला महत्त्वाचा टप्पा म्हणजे तेथे झपाट्याने स्थापन झालेल्या कापड गिरण्या. नागपूरची कापड गिरणी कार्यान्वित झाल्यावर सुताला अधिक मागणी प्राप्त झाली. मुंबईच्या कापड गिरण्यांकडूनही सुताला चांगली मागणी होतीच. अमेरिकन यादवी युद्धामुळे (१८६१–१८६५) कापूस व्यवसायाला अभूतपूर्व भरभराट प्राप्त झालेली होती. 'हिंगणघाट' या नावाने ओळखला जाणारा कापूस लँकेशायर व मँचेस्टरमध्ये प्रसिद्धी पावला होता. या भरभराटीमुळे स्थानिक कापसाचे व्यापारी मोठे भांडवलदार बनले. अमेरिकन युद्ध समाप्तीनंतर तेजीचा डोंगर कोसळला व कापूस व्यापारात मंदी आली. तथापि तेजीच्या काळात प्राप्त झालेला अभूतपूर्व पैसा कुठेतरी गुंतविणेही आवश्यक होते. म्हणून तेजीच्या काळात श्रीमंत झालेल्या भांडवलदारांनी भांडवल गुंतवणुकीचा सदुपयोग करून घेण्याच्या दृष्टीने सूत गिरण्या व कापड गिरण्या काढण्याकडे दृष्टी वळविली. भावी काळावर दृष्टी ठेवून त्यांनी पावले उचलली. नागपूर व मुंबईहून सुतास मागणी होतीच. अशा परिस्थितीत भांडवलदारांनी हिंगणघाटला १८८१ मध्ये पहिली सूत गिरणी उभारली. वाफेच्या इंजिनवर चालणारा हा जिल्ह्यातील पहिलाच कारखाना होता. याच कालावधीत संपूर्ण कापड उद्योगास पुन्हा ऊर्जितावस्था प्राप्त झाल्यामुळे हिंगणघाट गिरणीचा उपक्रम यशस्वी झाला. या यशामुळे प्रभावित होऊन लोहमार्गावर असलेल्या पुलगावला संपूर्ण कापड गिरणी काढण्यासाठी भांडवलदार पुढे आले व पुलगावला त्यांनी १८९२ मध्ये सूतकताई व विणाई करणारी कापड गिरणी काढली. आताशा मुंबईचा कापड उद्योग चांगलाच तेजीत आलेला होता. तथापि मुंबईला १८९७ मध्ये आलेल्या प्लेगच्या साथीमुळे कामगारांनी मुंबईतून बाहेरगावी पलायन केले होते. त्याचा लाभ घेऊन भांडवलदारांनी हिंगणघाटला आणखी एक कापड गिरणी १९०० मध्ये स्थापन केली. अशा प्रकारे मागील शतकाच्या अंतसमयी वर्धा जिल्ह्यात तीन मोठ्या गिरण्या कार्यरत होत्या. ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या या प्रदेशाच्या दृष्टीने या उद्योगांना महत्त्व होते.

हिंगणघाटची पहिली गिरणी (१८८९) संयुक्त भांडवल कंपनीच्या मालकीची होती. पुढे ही गिरणी त्या कंपनीकडून रायबहादुर बंसीलाल अबीरचंद नामक भांडवलदार मारवाड्याने विकत घेतली. पुलगावची गिरणीसुद्धा एका संयुक्त भांडवल कंपनीच्या मालकीची होती. हिंगणघाटची दुसरी गिरणी (१९००) मात्र रायसाहेब रेखचंद मोहता या मारवाडी भांडवलदाराने उभारली होती.[१] या गिरण्यांची अधिक माहिती या प्रकरणात पुढे दिली आहे.

कापड गिरण्यांच्या रूपाने जिल्ह्यात यंत्रसज्ज औद्योगीकरणास चांगला प्रारंभ झाला. रेल्वेच्या सुविधाही उपलब्ध झालेल्या होत्या. वर्धा नदीच्या परिसरात जलसंपत्तीही विपुल होती. चांगल्या शेतीमुळे कृषिजन्य उद्योग काढण्यास वाव होता. धनिक मालगुजारांकडे भरपूर पैसाही होता. तथापि पुढील काळात औद्योगीकरण अत्यल्प झाले. त्याची कारणे शोधावी लागतील, पण ते या अभ्यासाच्या कक्षेत बसण्यासारखे नाही. या शतकाच्या आरंभानंतर यंत्रसज्ज कारखाने निर्माण झाले ते १९२१ मध्ये स्थापन झालेल्या दोन खाद्यतेल गिरण्यांच्या रूपाने.

वर्ध्याची खास विशेषता म्हणजे भारतातील खादी व कुटिरोद्योगांच्या विकासासाठी येथील गांधीवादी संस्थांनी केलेले प्रयोग व संशोधन. अखिल भारतीय चरखा संघ व अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळ या गांधीजीप्रणित संस्थांनी खादी व ग्रामोद्योग विकासासाठी नवनवीन प्रयोग करून सुधारित अवजारे व कार्यपद्धती रूढ केलेली आहे. कमी श्रमामध्ये अधिक जलद सूतकताई व कापड विणाईचे तंत्र व चरखे आणि माग विकसित करून भारतातील सरंजाम कार्यालयांना त्यांचे आदिरूप (Prototype) वेळोवेळी दिले. सुप्रसिद्ध अंबर चरखा येथील संशोधनाचीच परिणती होय. सुधारित खादी मागांमुळे अधिक कापडनिर्मिती शक्य झाली आहे. वर्ध्याची 'मगन चूल' भारतात प्रसिद्धी पावली. अहिंसक पद्धतीने मधुमक्षिका पालन, हातबनावटीचा दर्जेदार कागद, अखाद्य तेलांपासून साबण निर्मिती, सुधारित चर्मकला व विविध हस्तोद्योगांचे तंत्र वर्धा-सेवाग्रामला विकसित करण्यात आले. सुधारित तेलघाणीचे आदिरूप वर्ध्यालाच विकसित करण्यात आले. त्यास 'नूतन तेलघाणी' असे म्हणतात. नूतन तेलघाणीचा भारतातील बऱ्याच तेल गाळणारांनी स्वीकार केलेला आहे.

अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळाच्या विद्यमाने भारतातील अनेक संस्थांना विविध प्रकारचे सहाय्य देण्यात येते. मंडळाने विकसित केलेले तंत्र व यंत्र यांची माहिती देण्यास्तव **ग्रामउद्योग पत्रिका** नामक मासिक गांधीवादी विचारवंत किशोरलाल मश्रूवाला चालवित असत. मगनवाडीचे मगन सरंजाम कार्यालय डिसेंबर १९३८ पासून कार्यरत असून तेथून विविध हस्तकला व ग्रामोद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते. नालवाडीमध्ये कातडी कमावणे व इतर ग्रामोद्योगांचे प्रयोग करण्यात येतात.

पंचवार्षिक योजनांच्या प्रारंभानंतर संघटित उद्योगधंद्यांना शासकीय सहाय्य मिळू लागल्यामुळे बऱ्यापैकी विकास होत आहे. तथापि ज्या तीन कापड गिरण्यांनी यंत्रसज्ज औद्योगीकरणाचा प्रारंभ केला त्या गिरण्या आजारी अवस्थेत आहेत, अथवा त्यांना या ना त्या कारणाने अवकळा प्राप्त झालेली आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ

[१] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, व्हॉल्यूम ए, १९०६, पृ. १४३.**

नवीन कारखाने काढण्यासाठी आधारभूत संरचना उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे विकास होत आहे. सन १९५०–५१ पासूनच्या काही वर्षांची नोंदणीकृत कारखान्यांबाबतची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		कार्यरत कारखाने	प्रतिदिनी सरासरी कामगार
१९५०–५१	..	५०	७,६४२
१९६०–६१	..	४०	७,४१६
१९७०–७१	..	४०	६,४०९
१९८०–८१	..	४८	७,५२८
१९८३–८५	..	५४	८,११३

इ. स. १९८३–१९८५ या वर्ष गटातील वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील ५४ कार्यान्वित कारखान्यांमध्ये ८,११३ कामगारांना रोजगार उपलब्ध होता. जिल्ह्याचे मध्यवर्ती स्थान, दळणवळणाची साधने, विपुल व स्वस्त मनुष्यबळ, कच्चा माल व भांडवल उपलब्धता ही आधारभूत संरचना उपलब्ध असूनही जिल्ह्याचा औद्योगिक विकास होऊ शकला नाही.

अलीकडे वर्धा जिल्ह्यात काही मोठे उद्योग सुरू होत आहेत. उदा. डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ विदर्भ (रासायनिक खते); राधा रोलर फ्लोअर मिल; व्योटटो लॅबोरेटरीज (औषधे); इंदिरा सहकारी सूत गिरणी; श्रीमती जी रामा (गोणपाट); व्ही. जी. सराफ (पोलाद); पी. के. गुप्ता (रासायनिक वायू); हिंदुस्थान गॅस व इंडस्ट्री (रासायनिक वायू); अरुणकुमार सवालदार मोहता (मानवनिर्मित कापड); विल्फ्रेड डब्ल्यू ह्मरुम (कॉंप्युटर); विदर्भ फॉस्फेट अँड फोर्टी (रासायनिक खते); डी. वाय. एन. इंडिया (रासायनिक) इत्यादी. या कार्यालयाने केलेल्या नमुना सर्वेक्षण समयी (१९८८) या कारखान्यांची उभारणी सुरू होती.

इ. स. १९८१–१९८३ व १९८३–१९८५ या वर्षांसाठी केलेल्या औद्योगिक सर्वेक्षणाची संक्षिप्त आकडेवारी अनुक्रमे तक्ता क्रमांक १ व २ मध्ये दिली आहे. प्रमुख उद्योगांची टक्केवारी तक्ता क्रमांक ३ मध्ये दिली आहे. तसेच निवडक वैशिष्टयांनुसार उद्योगांचे जिल्ह्यातील स्थान दर्शविणारी माहिती तक्ता क्रमांक ४ मध्ये दिली आहे.[२]

वीज निर्मिती व वितरण

इ. स. १९२७–२८ पूर्वी खरे अँड सन्स कंपनी बॉयलरद्वारे वीज निर्मिती करून वर्धा शहरात वीज पुरवठा करीत असे. मात्र विजेचे ग्राहक फार थोडे होते. मोक्याच्या ठिकाणी गोल आकाराचे ४.५७ मीटर उंचीचे खांब उभारून त्यावर ४० वॅटचे बल्ब लावीत असत. पिठाच्या गिरण्या आणि जिनिंग व प्रेसिंग कारखाने या कंपनीने पुरवठा केलेल्या विद्युत शक्तीवरच चालत होते. याशिवाय हिंगणघाट, आर्वी, कारंजा व पुलगाव येथेही खाजगी वीज निर्मिती केंद्रे होती. नागपूर इलेक्ट्रिक लाईट अँड पॉवर सप्लाय कंपनी, वर्धा व इलेक्ट्रिक अंडरटेकिंग, आर्वी या परवानाधारक विद्युत निर्मिती कंपन्या अनुक्रमे ८ जून १९५१ व ५ ऑक्टोबर १९५१ पासून मध्यप्रदेश विद्युत मंडळाकडून वीज घेऊन घाऊकरीत्या वर्धा व आर्वी शहरांस विद्युत पुरवठा करीत असत. हा विद्युत पुरवठा प्रामुख्याने १९५० मध्ये सुरू

[२] सर्व तक्ते या प्रकरणाच्या शेवटी दिले आहेत.

झालेल्या खापरखेडा औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राद्वारे होत असे. इ. स. १९५६ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशा येथे औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र सुरू झाल्यावर ही दोन्ही केंद्रे वर्धा शहरानजीक ग्रिड पद्धतीने जोडल्यामुळे त्याद्वारे विद्युत पुरवठा सुरू झाला. इ. स. १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना झाल्यावर १ फेब्रुवारी १९५७ रोजी स्थापन झालेल्या मुंबई राज्य विद्युत मंडळाने वरील दोन्ही विद्युत निर्मिती केंद्रे ताब्यात घेतली. मंडळाचे २० जून १९६० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ असे नामाभिधान झाल्यानंतर मंडळाने आर्वी व वर्ध्यातील विद्युत कंपन्या अनुक्रमे १५ जानेवारी १९६७ व १२ मार्च १९६७ ला ताब्यात घेतल्या. तेव्हापासून जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ वीज पुरवठा करीत आहे. सध्या वर्धा शहरात २२० के. व्ही. चे उपकेंद्र आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात वर्धा, आर्वी, पुलगाव, सिंदी, देवळी आणि हिंगणघाट शहरे व ३५ खेड्यांना विद्युत पुरवठा करण्यात आला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत आणखी ५१ खेड्यांचे विद्युतीकरण करण्यात आले. १५ ऑक्टोबर १९८७ पर्यंत जिल्ह्यातील १,०१५ खेड्यांपैकी ९९१ खेड्यांना व सहा शहरांना म्हणजे ९७.६४ टक्के गावांना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे वीज पुरवठा केला जात होता.[३] जिल्ह्यातील तालुकावार विद्युतीकरणाची माहिती खाली दिली आहे.

तालुका	विद्युतीकरण झालेली गावे	कृषी पंप	तालुका	विद्युतीकरण झालेली गावे	कृषी पंप
वर्धा	१०९	६,९२२	कारंजा	१०२	४,५९२ (कारंजा व आष्टी)
सेलू	१३९	४,२०४	आष्टी	८६	
देवळी	१०३	२,८४७	हिंगणघाट	१२७	३,३९६
आर्वी	१६४	३,९५३	समुद्रपूर	१६७	२,००५

जिल्ह्यात ३३ कि. वॅट व ११ कि. वॅट दाबाच्या दोन विद्युत वाहिन्यांमधून विद्युत पुरवठा होतो. उच्च दाबाची दहा व ३३ कि. वॅटची पाच उपकेंद्रे आहेत. त्यांची एकूण क्षमता १३८.२५ एम. व्ही. ए. आहे. जिल्ह्यातील उपकेंद्रे व परिवर्तनांची क्षमता पुढे दिली आहे.

उपकेंद्र	परिवर्तनांची संख्या (एम.व्ही.ए.)	क्षमता (कि. वॅट)	उपकेंद्र	परिवर्तनांची संख्या (एम.व्ही.ए.)	क्षमता (कि. वॅट)
वर्धा	२ × १०	२२०/६६/११	पुलगाव	२ × ५	६६/११
तळेगाव	२ × १०	१३२/३३	देवळी	१ × ५	६६/११
सेलडोह	२ × ५	६६/११	आर्वी	२ × ३	३३/११
सेलू	१ × १०	६६/११	रोहणा	१ × ३.१५	३३/११
सेवाग्राम	१ × १०	६६/११	कारंजा	१ × ३.१५	३३/११
हिंगणघाट	२ × १०	६६/११	खरांगणा	२ × ३.१५	३३/११
धोत्रा	१ × ५	६६/११	आष्टी	१ × ५	३३/११
नंदोरी	१ × १.५	६६/११			

[३] **जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, १९८१, पृ. ३.**

शेती, घरगुती व औद्योगिक विजेची एकूण गरज १२५.३३ कि. मी. लांबीच्या ३३ कि. वॅट दाबाच्या वाहिन्या, २२७६.८७ कि. मी. लांबीच्या ११ कि. वॅट दाबाच्या वाहिन्या तसेच २६.७५ एम. व्ही. ए. क्षमतेचे सहा ट्रॅन्सफॉर्मर व ६७,३४९ कि. वॅट क्षमतेचे १,६०४ वितरण ट्रॅन्सफॉर्मर या मार्फत भागविली जाते.

हिंगणघाट व पुलगावच्या कापड गिरण्या आणि वर्ध्यातील औद्योगिक वसाहतीमुळे विजेचा वापर बराच वाढला आहे. इ. स. १९८६–८७ मध्ये ९५,६४८ हजार किलो वॅट तास (K. W. Hours) विद्युत वापरण्यात आली. त्यापैकी २४ टक्के घरगुती, ५ टक्के व्यापारी कामासाठी, ५३ टक्के औद्योगिक उत्पादनासाठी, ३ टक्के सार्वजनिक दिवाबत्तीसाठी, ८ टक्के शेतीकरिता व ७ टक्के इतर बाबींसाठी वापर करण्यात आला. इ. स. १९५३ ते १९८६–८७ दरम्यान काही वर्षांची विद्युत वापराची माहिती खाली दिली आहे.

(हजार किलोवॅट तासांमध्ये)

वर्ष	घरगुती	व्यापारी	औद्योगिक	सार्वजनिक दिवाबत्ती	कृषी	इतर
१९५३	३६९	२८८	८२६	९६	..	१५२
१९५६.	३४८	३६६	१,०८४	९६	..	८९
१९६०-६१	७९७	११२	१,२००	५४९	९६२	२८९
१९६५-६६	३,१८७	५८६	१८,३७०	६९३	..	११,५७३
१९७०-७१	४,२४३	१,७३२	२३,८११	८०५	..	६,५२०
१९७५-७६	५,३६३	२,०८३	२९,०७८	१,०९०	९,९५८	४५६
१९८०-८१	७,५३०	४,८३०	५१,३९०	१,९००	२०,३१०	४,६५०
१९८६-८७	२३,०७०	४,६११	५०,४४७	२,८७३	७,६७१	६,९६८

कापड उद्योग

इ. स. १८८१ मध्ये हिंगणघाटला संयुक्त भांडवल कंपनीने ३.५ लाख रुपये भांडवल गुंतवून पहिली सूत गिरणी सुरू केली. ही गिरणी आर्थिकदृष्टचा डबघाईस आल्यामुळे १९०६ च्या सुमारास रायबहादुर बंसीलाल अबीरचंद या धनिकाने गहाणात मिळविली. तेव्हा गिरणीत ३१,००० चात्या व ७०० कामगार होते. इ. स. १८९२ मध्ये पुलगावला दुसरी सूतकताई व विणाई करणारी गिरणी सुरू झाली.[४] ही गिरणी सुद्धा संयुक्त भांडवल कंपनीच्या मालकीची असून तिचे भांडवल पाच लाख रुपये होते. सन १९०४ मध्ये या गिरणीत १६५ माग, १७,००० चात्या व सरासरी ९०० कामगार होते. इ. स. १९३४ ते १९३८ मध्ये ती नागपूरचे घटाटे व बुटी यांचे कर्जात परिसमापित (लिक्वीडेशन) झाली. १ जून १९३८ रोजी नागरमल पोद्दार व गौरीशंकर नेवटिया यांनी ती घेऊन पुन्हा चालू केली. इ. स. १९५६ मध्ये या गिरणीचे नूतनीकरण करण्यात आले त्यावेळी तिच्यात ४९१ माग व २२,८०४ चात्या होत्या. इ. स. १९०० मध्ये हिंगणघाटला रायसाहेब रेखचंद मोहता

[४] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, व्हॉल्यूम ए, १९०६,** पृ. २५५.

(मृत्यू १९०६) यांच्या खाजगी मालकीची जिल्ह्यातील तिसरी कापड गिरणी सुरू झाली. तिचे खेळते भांडवल अठरा लाख रुपये होते. सन १९०४ मध्ये या गिरणीत १६० माग, १५,००० चात्या व रोज सरासरी १,००० कामगार होते.

इ. स. १९०४ मध्ये जिल्ह्यात उपरोक्त तीन गिरण्या कार्यरत होत्या. त्यापैकी दोन गिरण्या सूतकताई व विणाई करणाऱ्या तर एक फक्त सूतकताई गिरणी होती. या तिन्ही गिरण्यांत एकूण ३२५ माग व ६३,००० चात्या होत्या. त्यांचे भांडवल २९ लाख रुपये होते. त्यावर्षी त्यांनी ९४,००० मण (३५,०८० क्विंटल) सुताचे व १५,७०० मण (५,८६० क्विंटल) कापडाचे उत्पादन केले. या उत्पादनाची किंमत अनुक्रमे ३०.२ लाख रुपये व ७.६ लाख रुपये होती. इ. स. १९०३ मध्ये हिंगणघाटची पहिली गिरणी तोटयात होती. परंतु पुलगाव येथील सूतकताई व विणाई गिरणी व हिंगणघाटची दुसरी कापड गिरणी फायद्यात होती. त्यांना अनुक्रमे ८७,००० व ४५,००० रुपये नफा झाला. इ. स. १९०४ मध्ये हिंगणघाटच्या दोन्ही गिरण्या तोटयात होत्या. मात्र पुलगावच्या गिरणीस ९,००० रुपये नफा झाला.

गिरण्यातील उत्पादनावर लादलेले ३.५ टक्के उत्पादन शुल्क, औद्योगिक अशांतता, मंदी व भांडवलाचा तुटवडा इत्यादी समस्यांमुळे १९२१ नंतर लागोपाठ तीन वर्षे कापसाचे भरघोस पीक येऊनसुद्धा कापड उद्योगाची पीछेहाट झाली. इ. स. १९२१ मध्ये तिन्ही गिरण्यांत ४,८०६ (३,७७४ पुरुष व १,०३२ महिला) कामगार होते. व्यवस्थापकांमध्ये एक भारतीय व दोन युरोपियन व अँग्लो-इंडियन होते.[५] इ. स. १९२६ मध्ये सरकारने उत्पादन शुल्क रद्द केल्यामुळे व प्रशुल्क संरक्षणामुळे कापड उत्पादनात वाढ झाली. पुढे स्वदेशी चळवळीमुळेही (१९३०–१९३३) या उद्योगात तेजी आली.

इ. स. १९६१ मध्ये जिल्हयातील तीन गिरण्यांत एकूण ७७,९५२ चात्या व १,३०१ माग होते. गिरण्यांमधील ५,१०० कामगारांनी त्या वर्षी १५,५१,४८५ श्रमदिवस काम केले. इ. स. १९६१–६२ मध्ये या गिरण्यांमध्ये ६८.७७ लाख किलोग्रॅम सूत व ३,१५.६३ लाख मीटर कापडाचे उत्पादन झाले. इ. स. १९६८ मध्ये हिंगणघाटची रायबहादूर बंसिलाल अबीरचंद स्पिनिंग अँड विव्हींग मिल राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने व १९७६ मध्ये पुलगावची पुलगाव कॉटन मिल महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाने ताब्यात घेतली. इ. स. १९८७ मध्ये या तीन गिरण्यांत ९८,५०४ चात्या, १,४०१ माग व ७,४९३ कामगार होते.

इ. स. १९७५–१९७७, १९७७–१९७९, १९७९–१९८१, १९८१–१९८३ आणि १९८३–१९८५ या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील कापड गिरण्यांची आकडेवारी तक्ता क्रमांक ५ मध्ये दिली आहे.

वर्धा जिल्हा शेतकरी सहकारी सूत गिरणी व इंदिरा सहकारी सूत गिरणी या नवीन सूत गिरण्यांचे वर्धा शहरात नोंदणीकरण अनुक्रमे ६ ऑगस्ट १९८१ व १४ सप्टेंबर १९८१ ला झाले असून पहिल्या सूत गिरणीने २ ऑक्टोबर १९८७ पासून उत्पादनास सुरुवात केली. इ. स. १९८७–८८ मध्ये या सूत गिरणीने सुमारे ४.५ लाख किलोग्रॅम सुताचे उत्पादन केले.

[५] **सेन्सस ऑफ इंडिया, सी. पी. अ‍ॅण्ड बेरार, इंडस्ट्रिअल स्टॅटिस्टिक्स, पार्ट २, १९२१, पृ. ३९३.**

वटण व दाबणी गिरण्या

अमेरिकन यादवी युद्धामुळे (१८६१–१८६५) जिल्ह्यातील कापूस उत्पादन आणि सूत व कापड उद्योग भरभराटीस आले. यामुळे सरकी काढणे व गासड्या बांधण्याच्या उद्योगासही चालना मिळाली. इ. स. १८९० नंतर कापसाचे वटण व दाबणी करून गासड्या बांधण्याचे अनेक कारखाने सुरू झाले. यातील पुष्कळ कारखाने कापड गिरण्यांच्या मालकीचे तसेच नागपूरच्या एम्प्रेस व स्वदेशी मिलच्या मालकीचे होते. बरेच कारखाने राजा गोकुळदास व इतर मारवाडी व्यापारी, काही ब्राह्मण व कुणब्यांचे होते. इ. स. १९०४ मध्ये हिंगणघाटला दहा, वर्धा व आर्वी येथे प्रत्येकी सात, पुलगावला पाच, सिंदीस तीन आणि इतर ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे सरकी काढण्याचे कारखाने होते. सर्व कारखान्यांत एकूण १,०६५ वटणी यंत्रे होती. यापैकी दोन कारखान्यांत ५० व त्याहून अधिक वटणी यंत्रे तर इतर कारखान्यांत ती सरासरी २७ होती. हिंगणघाट व वर्धा येथे प्रत्येकी चार, पुलगाव व आर्वीला प्रत्येकी तीन आणि पोहणा व सिंदीला प्रत्येकी एक असे एकूण १६ गासड्या बांधण्याचे कारखाने होते. त्या काळी सरकी काढणे व गासड्या बांधण्याच्या प्रत्येकी एका कारखान्याच्या उभारणीस अनुक्रमे १,५०० रुपये व ७०,००० रुपये भांडवली खर्च येत असे. त्या वर्षी सरकी काढणे व गासड्या बांधण्याच्या सर्व कारखान्यांचे एकूण भांडवल २५ लाख रुपयांपेक्षा जास्त होते व त्यांनी सुमारे ३.५ लाख रुपये नफा मिळविला. या कारखान्यांत सुमारे ३,५०० कामगारांना पाच ते सात महिने रोजगार मिळत असे. अकुशल पुरुष व महिला कामगारास प्रत्येकी रोज अनुक्रमे ४ ते ६ आणे (२५ ते ३७ पैसे) व २ ते ३ आणे (१२ ते १८ पैसे) मजुरी मिळत असे. नंतरच्या कालावधीत मात्र येथील कच्चा कापूस बाहेर निर्यात होऊ लागल्यामुळे जिल्ह्यातील सरकी काढणे व गासड्या बांधण्याच्या कारखान्यांच्या संख्येत घट झाली.

इ. स. १९२१[६] मध्ये जिल्ह्यात या उद्योगातील १९ कारखाने होते व त्यांत १,२९५ कामगार होते. इ. स. १९६१ मध्ये १६ कारखान्यांत १,७१६ कामगार होते. त्यांपैकी आठ कारखान्यांनी १,४४,२५४ श्रमदिवस काम केले. इ. स. १९६६ च्या औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात २२ कारखान्यांत १,३०३ कामगार होते. त्यांचे एकूण उत्पादक भांडवल १९.५४ लाख रुपये होते. त्यांनी प्रक्रिया केलेल्या मालाची किंमत १,१९.६१ लाख रुपये होती. हे कारखाने वर्धा, हिंगणघाट, आर्वी, पुलगाव, देवळी, सेलू, सिंदी, आष्टी, रोहणा, वडनेर, कारंजा व खरांगणा (मोरांगणा) येथे आहेत. त्यांची १९७५–१९७७ व त्यानंतरच्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार आकडेवारी तक्ता क्रमांक ६ मध्ये दिली आहे.

रासायनिक उद्योग

वर्ध्यात रासायनिक उद्योग अत्यल्प आहेत. इ. स. १९५१ मध्ये वर्धा येथे लघु उद्योग क्षेत्रात साबणाचा एक कारखाना होता. इ. स. १९६१–६२ मध्ये त्यांची संख्या दोन झाली. इ. स. १९६३–६४ मध्ये या दोन कारखान्यांत १,५५,७१५ किलोग्रॅम साबणाचे उत्पादन झाले. इ. स. १९६६–६७ मध्ये सिंदी येथे एक कीटकनाशक औषध तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. इ. स. १९७४–७५ मध्ये २२ कर्मचारी असलेल्या या कारखान्याचे

[६] कित्ता, पृ. ३९३.

स्थिर भांडवल १,६६,४२२ रुपये होते व त्यास १,३६,७६८ रुपये नफा मिळाला. इ. स. १९७५–१९७७ ते १९८३–१९८५ या वर्षांतील वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील रासायनिक कारखान्यांची आकडेवारी तक्ता क्रमांक ७ मध्ये दिली आहे.

इ. स. १९८४ मध्ये केळझरला महाराष्ट्र एक्सप्लोसिव्हज हा खाजगी क्षेत्रातील कारखाना सुरू झाला. त्यात गुंतलेले भांडवल १२ कोटी रुपये होते. इ. स. १९८५ मध्ये हिंगणीला नोबल एक्सप्लोकेम हा औद्योगिक स्फोटके निर्मितीचा कारखाना सुरू झाला. विदर्भासारख्या अविकसित विभागात या क्षेत्रातील हा सर्वांत मोठा कारखाना आहे. संयुक्त क्षेत्रात उभारलेल्या या कारखान्यात २६ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. त्यास स्वीडनमधील ए. बी. बोफोर्स नामक मोठ्या उद्योगाचे व नार्वेतील डायनो कंपनीचे आर्थिक व तांत्रिक सहकार्य लाभले आहे. त्यात ३८० रोजगारांना संधी मिळणार असून प्रतिवर्षी १५,००० टन नायट्रो-ग्लिसरीन आधारित स्फोटके निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. या उत्पादनाचा उपयोग खाणी, रस्ते व धरण बांधणीसाठी होईल. याशिवाय खंडेलवाल इंजिनियरिंग वर्क्स, वर्धा; व विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांना पुलगावला प्रत्येकी एक कारखाना सुरू करण्यास परवाना मिळाला असून त्यात सुपर फॉस्फेट व सल्फ्युरिक ॲसिडचे उत्पादन होईल. तसेच वर्धा येथे महाराष्ट्र कृषि औद्योगिक विकास महामंडळ खतनिर्मितीचा कारखाना सुरू करीत आहे.

रासायनिक कारखान्यांमध्ये कपडे धुण्याचे साबण, मेणबत्त्या, सोडियम सिलिकेट, कीटकनाशके, स्फोटक पदार्थ इत्यादींचे उत्पादन होते. यासाठी कच्च्या मालाची खरेदी कलकत्ता, मुंबई व दिल्लीहून केली जाते. उत्पादित मालास महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्र-प्रदेश व गुजरात राज्यांत बाजारपेठ आहे. हे कारखाने वर्धा, हिंगणघाट, केळझर, पुलगाव, आर्वी व हिंगणीमध्ये केंद्रित आहेत.

साखर उद्योग

जिल्ह्यात साखर उद्योग नवीनच आहे. इ. स. १९७५–७६ मध्ये हुसनापूरला खांडसरी साखरेचा एक कारखाना सुरू होऊन त्याने दुसऱ्याच वर्षी उत्पादनास सुरुवात केली. त्या वर्षी स्थिर भांडवल १७.२० लाख रुपये होते. पहिल्या वर्षी ६० दिवसांत कारखान्याने फक्त ५०६ क्विंटल खांडसरीचे उत्पादन केले. त्यात २०० कामगार होते. इ. स. १९७७–७८ मध्ये त्यात १३० दिवस उत्पादन सुरू होते व २,६६४ क्विंटल खांडसरीचे उत्पादन झाले. इ. स. १९७६–७७ व १९७७–७८ मध्ये कारखान्यास अनुक्रमे ४,६४,२८१ व ७,७९,७१३ रुपये तोटा झाला. सुरुवातीलाच मोठा तोटा सहन करावा लागल्याने कारखाना इ. स. १९८४–८५ मध्ये बंद झाला.

या जिल्ह्यातील पहिला साखर कारखाना म्हणजे जामणीला ५ मार्च १९८४ रोजी स्थापन झालेला महात्मा सहकारी साखर कारखाना होय. सुरुवातीला त्यास शासनाकडून ३५ लाख रुपयांचे भाग भांडवल मिळाले. इ. स. १९८८–८९ मध्ये त्याचे भाग भांडवल, खेळते भांडवल व एकूण गुंतविलेले भांडवल अनुक्रमे ५,४९.९२; ३,७५.०० व ११,७९.०० लाख रुपये होते. कारखान्यात कायम, हंगामी व प्रशिक्षणार्थी कामगारांची संख्या अनुक्रमे १९७, २२० व ८० होती. कारखान्याची प्रतिदिन गळित क्षमता १,२५० मे. टन आहे. कारखान्याचे १९८८–८९ पर्यंत दोनच गळित हंगाम झाले असून त्यातील उत्पादनाची माहिती पुढे दिली आहे.

	१९८७–८८	१९८८–८९
१. गळित हंगामातील उसाचे गाळप (मे. टन)	१,१४,३३४.५७	६३,७६७.५६
२. साखर उत्पादन (क्विंटल) ..	१,०४,०२५	६५,६६०
३. सरासरी उतारा (टक्केवारी) ..	९.१९	९.९९

खाद्य वस्तूंचे उत्पादन

या उद्योगांतर्गत खाद्य तेल, डाळ गिरण्या, पाव व बिस्कीट आणि कन्फेक्शनरी वस्तू तयार करणे, भात गिरण्या व मिरची-मसाला पावडर इत्यादींचा समावेश होतो. इ. स. १९२१ मध्ये जिल्ह्यातील दोन खाद्य तेल गिरण्यांत ६६ कामगार (५५ पुरुष, ११ महिला) होते. जिल्ह्यात गळिताची धान्ये मोठ्या प्रमाणावर होतात. त्यामुळे इ. स. १९६१ मध्ये गळिताचे नोंदणीकृत पाच कारखाने होते व त्यात २५५ कामगार होते. यापैकी श्री हनुमान ऑईल मिल, वर्धा, व प्रभात ऑईल मिल, हिंगणघाट या मोठ्या तेल गिरण्या होत्या व त्यात अनुक्रमे ५० व १२५ कामगार होते. याच वर्षी डाळ भरडण्याच्या सात गिरण्यांत ९४ कामगार होते. इ. स. १९६६ च्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील १२ कारखान्यांत ३०१ कामगार होते. त्यांत गुंतविलेले उत्पादक भांडवल २१.५२ लाख रुपये व मूल्यवृद्धी १४.२१ लाख रुपये होती. इ. स. १९७५–१९७७ ते १९८३–१९८५ च्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार या उद्योगाची आकडेवारी तक्ता क्रमांक ८ मध्ये दिली आहे. इ. स. १९८७–८८ मध्ये या क्षेत्रात लघु उद्योगांतर्गत ६८ नोंदणीकृत कारखाने होते. त्यांचे स्थिर भांडवल ६३.३० लाख रुपये होते. त्यांत ३४० कामगार होते. शिवाय अस्थायी नोंदणीकृत २५३ कारखाने होते.

वरील कारखाने वर्धा, हिंगणघाट, आर्वी, सेलू, देवळी, कारंजा, सिंदी, पुलगाव, आष्टी व समुद्रपूरला केंद्रित आहेत. नवीन तेल गिरण्यांसाठी मे. विनय वेस्ट रिक्लेमेशन प्रा. लि., हिंगणघाट व मे. महाराष्ट्र स्टेट लिनसीड कमर्शियल अॅण्ड इंडस्ट्रिज कॉर्पोरेशन, मुंबई या कारखान्यांना औद्योगिक परवाना मिळाला असून त्यांत सरकीचे तेल व ढेपीचे उत्पादन होईल.

अभियांत्रिकी उद्योग

इ. स. १९५१ मध्ये जिल्ह्यातील अभियांत्रिकी उद्योगात फक्त ३९ कामगार होते. इ. स. १९६१ मध्ये फक्त एक नोंदणीकृत कारखाना असून त्यात ७६ कामगारांनी २३,५६० श्रमदिवस काम केले. इ. स. १९६६ मध्ये वर्ध्याला सहकारी तत्त्वावर एक अभियांत्रिकी कर्मशाळा सुरू झाली. इ. स. १९७६–७७ मध्ये अशा घटकांची संख्या ८४ झाली.[७] त्यांत २०४ कामगार, गुंतविलेले भांडवल १६,५०,८५० रुपये व उत्पादनाची किंमत ११,३४,३०० रुपये होती. इ. स. १९८३–८४ मध्ये कारखान्यांची संख्या २४६ पर्यंत वाढली.[८] त्यापैकी ८१ कारखाने नोंदणीकृत होते. सर्व कारखान्यांचे एकूण स्थिर भांडवल

[७] सहायक उद्योग संचालक (ग्राउप्र), वर्धा.

[८] **अॅक्शन प्लॅन, (१९८३–८४ ते १९८७–८८)**, जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा, पृ. १८, १९.

२,१९.३० लाख रुपये असून उत्पादित मालाची किंमत २,०९.४० लाख रुपये होती. एकूण १,५२७ लोकांना रोजगार मिळाला. शेतीची अवजारे, स्टील फर्निचर, वायर पिन, टिन प्लेट इत्यादींचे तेथे उत्पादन होते. हे कारखाने वर्धा, हिंगणघाट, आर्वी, सेलू व पुलगावला होते.

आरा गिरण्या

इ. स. १९५१ मध्ये आरा गिरण्यांमध्ये ६० कामगार होते. इ. स. १९६१ मध्ये ३५ कामगार असलेल्या तीन नोंदणीकृत गिरण्यांचे खेळते भांडवल १,६२,००० रुपये, उत्पादित मालाची किंमत ४,५७,००० रुपये व मूल्यवृद्धी १,२३,००० रुपये होती. इ. स. १९७६–७७ मध्ये जिल्ह्यातील ३१ गिरण्यांत १०७ कामगार होते.[१] त्यांत गुंतविलेले भांडवल ९,१७,२०० रुपये व उत्पादनाची किंमत ११,२७,७०० रुपये होती. जून १९८३ मध्ये अशा तऱ्हेचे २६ घटक होते. ते जिल्ह्यातील लघुउद्योगांतर्गत असलेल्या कारखान्यांच्या ७.९८ प्रतिशत होते. इ. स. १९८७–८८ मध्ये वर्धा जिल्ह्यात ४९ लाकूड कापण्याच्या गिरण्या सुरू होत्या व त्यात २४५ लोकांना रोजगार उपलब्ध होता. हे कारखाने मुख्यत्वे वर्धा, आर्वी, हिंगणघाट, आष्टी, पुलगाव, कारंजा व देवळीला वसले आहेत.

अधातू खनिज पदार्थ

इ. स. १९७६–७७ मध्ये वर्ध्यास स्थापिलेल्या सिमेंटच्या वस्तूंच्या पहिल्या कारखान्यात सिमेंट पाईप व खांब तयार होतात. इ. स. १९७७–७८ मध्ये जिल्ह्यात अशा सात कारखान्यांत गुंतविलेले भांडवल १,०६,५०० रुपये होते. त्यांत २० कामगार होते. त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची किंमत १,०६,५०० रुपये होती. इ. स. १९८१–१९८३ व १९८३–१९८५ साठी केलेल्या वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील कारखान्यांची आकडेवारी तक्ता क्रमांक ९ मध्ये दिली आहे.

इ. स. १९८७–८८ मध्ये असलेल्या ८० नोंदणीकृत कारखान्यांमध्ये ४५० कामगार असून स्थिर भांडवल १,१९.४३ लाख रुपये होते. येथील ८५ प्रतिशत उत्पादन जिल्ह्यात व १५ प्रतिशत उत्पादन जिल्ह्याबाहेर विकले जाते. उत्पादनासाठी वापरलेल्या कच्च्या मालापैकी ७५ प्रतिशत माल जिल्ह्याबाहेरील असतो. सिमेंट पाईप, खांब, विटा, कांडी कोळसा, खडू व चुन्याचे उत्पादन होते. हे कारखाने वर्धा, पुलगाव, हिंगणघाट, आर्वी व देवळीला आहेत.

मुद्रण उद्योग

इ. स. १९५१ मध्ये जिल्ह्यातील ११ मुद्रणालयांमध्ये १२७ कामगार होते. इ. स. १९६१ मध्ये मुद्रणालयांची संख्या तीच होती मात्र कामगारांची संख्या १६७ पर्यंत वाढली. इ. स. १९६१ मध्ये आर्वीला सहकारी मुद्रणालय स्थापन झाले. जून १९६९ मध्ये आर्वी, वर्धा, देवळी व हिंगणघाटमध्ये चार सहकारी मुद्रणालये होती. त्यात ३ लाख रुपये भांडवल होते. इ. स. १९७०–७१ मध्ये चार सहकारी मुद्रणालयांचे एकूण भांडवल ४९,००० रुपये व खेळते भांडवल १,०६,००० रुपये होते व त्यांनी २.५ लाख रुपये नफा मिळविला. त्यांचे

[१] सहायक उद्योग संचालक (ग्राउप्र), वर्धा.

एकूण १४७ सभासद होते. इ. स. १९७६–७७ मध्ये जिल्ह्यातील एकूण २७ मुद्रणालयांत ९९ कामगार होते. त्यांत गुंतविलेले भांडवल ६,३६,५५३ रुपये व उत्पादनाची किंमत ३,३६,००० रुपये होती. जून १९८३ मध्ये मुद्रणालयांची संख्या २४ पर्यंत घटली. या मुद्रणालयांत शिलामुद्रण, कोरणी, आम्लकोरण, चित्रठसेकाम, मुद्रित कात्रण, पुस्तक बांधणी व छपाई केली जाते. प्रामुख्याने वर्धा, पुलगाव, आर्वी, हिंगणघाट, देवळी व कारंजाला मुद्रणालये आहेत.

औद्योगिक वसाहत

तिसऱ्या योजनेत बोरगावला भूसंपादन करून सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी सहकारी संस्था प्रयत्नशील होती. वर्धा–सेवाग्राम रस्त्यावर १९७५ मध्ये ६५५.१० हेक्टर क्षेत्रात औद्योगिक वसाहत स्थापन केली असून त्यापैकी १९८७–८८ अखेर ३१२.१९ हेक्टर क्षेत्र विकसित केले. विकसित औद्योगिक क्षेत्रातील २०८ भूखंडांपैकी १५४ भूखंडांचे वाटप केले आहे. या वसाहतीत १९७७ मध्ये पहिला कारखाना सुरू झाला. इ. स. १९८७–८८ मध्ये २५ कारखाने सुरू होते. त्यात भांडवली गुंतवणूक १७,५०.७५ लाख रुपये आणि ९२५ कामगार होते. वसाहतीत सिमेंटचे खांब व पाईप, लाकूड कापण्याच्या गिरण्या, रासायनिक कारखाने, तेल गिरणी, अभियांत्रिकी कारखाने, अॅल्युमिनियमची भांडी व साडीची छपाई करणारे कारखाने सुरू आहेत.

कुटिरोद्योग

कुटिरोद्योगांमध्ये हातमाग, कातडी कमाविणे, चर्मोद्योग, विटा व कौले तयार करणे, लोहार व सुतारकाम, बांबू व वेतापासून वस्तू तयार करणे व तेल गाळण्याचा समावेश होतो. जिल्ह्यात १९८७–८८ मध्ये ४३९ कारखाने सुरू होते व त्यांत १,२९२ कामगार होते. त्यांची एकूण भांडवल गुंतवणूक २४.२२ लाख रुपये होती.

वर्धा–सेवाग्राम परिसरात कुटिरोद्योगांना पोषक असे मूलभूत संशोधन व प्रयोग करण्यात आले. त्यांचा लाभ वर्धा जिल्ह्यापुरता मर्यादित न राहता अखिल भारतास झाला. या मूलभूत कार्याची माहिती खाली दिली आहे.

गांधीजी वर्ध्याला येण्यापूर्वी मगनवाडीत ग्रामोद्योग सुरू होते. जे. सी. कुमारप्पा यांचेकडे गांधीजींनी ग्रामोद्योग संघाचे संचालन सोपविले होते. त्यांनी तेथे संस्था स्थापून विद्यार्थी तयार केले. ग्रामोद्योगांपैकी एक उद्योग नीरा व गूळ बनविणे हा होता. गांधीजी या उपक्रमाने फार प्रभावित झाले होते. गांधीजींनी सरकारकडून खास परवानगी घेऊन सिंदीच्या झाडांपासून गोड नीरा व नीरेपासून ताडगूळ बनविण्याचा उपक्रम सुरू केला. त्यांनी या उद्योगासाठी पुष्कळ कार्यकर्ते व मजूर तयार केले. नीरेपासून गुळाचे नित्य नवे नमुने बनविले जात.

ग्रामसेवा मंडळाची स्थापना २५ डिसेंबर १९३२ रोजी विनोबा भावेंनी नालवाडीला केली. या संस्थेने १९३४ मध्ये गोसेवा चर्मालय, खादी व सरंजाम कार्यालय इत्यादी विभाग सुरू केले. गोसेवा चर्मालयात कातडी कमवून त्यापासून निरनिराळ्या प्रकारची पादत्राणे व पिशव्या तयार करतात. याशिवाय कारागिरांना प्रशिक्षण दिले जाते. खादी विभागात खादी विणकामाबरोबरच विक्री तसेच टकळी व अंबर चरख्याचे उत्पादन होते. ग्रामसेवा मंडळाचा पेटी चरखा प्रसिद्ध आहे. त्यांनी अंबर चरख्याचे महत्त्वपूर्ण संशोधन केले असून ते एक व दोन टकळ्यांच्या अंबर चरख्यांचे उत्पादन करतात.

अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळाची स्थापना डिसेंबर १९३४ मध्ये मगनवाडीत होऊन त्यामध्ये हातकागद, तेलघाणी, साबण, कुंभारकाम व मधुमक्षिका पालन इत्यादी उद्योग सुरू झाले. त्यात बाहेरील कार्यकर्त्यांनाही प्रशिक्षण दिले जाते. या मंडळातर्फे इंग्रजी व हिंदीमध्ये **ग्रामउद्योग पत्रिका** निघत असे. त्यात कुमारप्पा ग्रामोद्योगासंबंधीचे मूलभूत विचार मांडीत असत. अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळाचे १९४८ मध्ये सर्व सेवा संघ या नवीन संस्थेत विलीनीकरण झाल्यानंतर अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग कमिशनने १९५५ मध्ये ग्रामोद्योगांतील समस्यांचा विचार करून संशोधन, अन्वेषण, सुधारित साधने, तंत्रज्ञान व प्रक्रिया विकसित करण्यासाठी जमनालाल बजाज रिसर्च इन्स्टीटयूट स्थापन केली (नोव्हेंबर १९५५). भारत सरकारने मान्य केलेल्या योजनेनुसार ग्रामोद्योगांच्या वाढीसाठी तसेच सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून रोजगार व उच्च राहणीमान प्राप्त होण्याच्या दृष्टीने सध्या अस्तित्वात असलेल्या ग्रामोद्योगांचे तंत्र विकसित करणे तसेच संशोधित अनुमानांचा ग्रामोद्योगांच्या उत्पादनवाढीसाठी उपयोग करणे इत्यादी कामे ही संस्था करते. या संस्थेत तांत्रिक प्रयोगशाळा, जीवरसायनशास्त्र, मृत्तिकाशिल्प, रासायनिक अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, तेल व साबण, कागद व विणकाम विभाग आहेत. हे विभाग तपासणी व संशोधनाच्या हेतूने उत्पादनास मदत करीत असून त्यांत गुणात्मक व संख्यात्मक उत्पादनाची अंतिम तपासणी केली जाते. या संस्थेत अंबर चरखे, हातकागद, तेल, साबण, कुंभारकाम, मृत्तिकाशिल्प इत्यादींवर संशोधन करून उत्पादन केले जाते. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणही दिले जाते. या संस्थेतून आजतागायत अनेक लोकांनी शिक्षण घेऊन जिल्ह्यात व भारतभर व्यवसाय सुरू केले आहेत.

अखिल भारतीय चरखा संघाची स्थापना १९२५ मध्ये झाली. प्रारंभी जून १९४० पर्यंत चरखा संघाचे प्रधान कार्यालय अहमदाबाद येथे होते. जून १९४० नंतर हे कार्यालय वर्धा येथे आल्यावर त्याने खादी संशोधन सुरू करून खादीचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण देशात केला. या संघाने सेवाग्रामला खादी विद्यालयाची स्थापना केली. त्यात कार्यकर्त्यांना खादीसंबंधी विविध प्रकारची माहिती दिली जात होती. चरखा संघात सूत कातणे, कापूस पिंजणे व तत्संबंधी प्रशिक्षण देण्यात येते. खादी उत्पादनात सुधारणा घडवून रेशमी खादी तयार केली जाते. चरख्यामध्येही सुधारणा होऊन अंबर चरख्याने खादी उत्पादनात क्रांती घडवून आणली.

मगन संग्रहालयाची स्थापना ३० डिसेंबर १९३८ ला झाली. संग्रहालयात गांधी विचार व ग्रामोद्योगांना प्रेरणा देणारे हस्तकौशल्य व संग्रहणीय वस्तू ठेवल्या आहेत. मगन संग्रहालयाद्वारे मगन चरख्याचा प्रसार केला जातो. मगन संग्रहालय भारतातील मान्यवर संस्था असून ती कुटिरोद्योग सुरू करण्यास खेड्यातील लोकांना मदत करते.

हातमाग उद्योग : जिल्ह्यात कापड गिरण्या सुरू होण्यापूर्वी अनेक मोठ्या गावात हातमाग व्यवसाय ऊर्जितावस्थेत होता. तथापि गिरण्यांची स्पर्धा वाढल्यामुळे हातमाग व्यवसायाचा ऱ्हास होण्यास प्रारंभ झाला. सूत गिरण्या व कारखान्यांव्यतिरिक्त कापूस उद्योगातील कामगारांची संख्या १८९१ मध्ये १७,००० होती. ती १९०१ मध्ये ७,००० झाली. विणकरांची संख्या जिल्ह्यातील लोकसंख्येच्या २ प्रतिशत होती. सूत कताईचा उद्योग जवळ जवळ नाहीसा झाला. गारपगारी लोक घरी कातलेल्या सुतापासून बिछान्यासाठी नेवार विणत असत. धनगर सुती कापडाच्या जाडया भरडया गोण्या, सतरंज्या व मेंढयांच्या

लोकरीपासून घोंगड्या तयार करीत असत. सालेवार कोष्टी बहुधा गिरण्यातील सुतापासून विणकाम करीत. मोठ्या गावांतील महार विणकरही जाडे भरडे कापड विणून लहान सहान वस्तू तयार करीत. रंगारी प्रामुख्याने हिंगणघाट तालुक्यात होते. ते गालिचे व कापडाच्या इतर वस्तू रंगवित. पारडी व इतर ठिकाणी भामटा जातीचे लोक कापूस साठविण्यासाठी जाळीच्या पिशव्या व तागाच्या चटया तयार करीत.

इ. स. १९३१ च्या जनगणनेनुसार हातमाग हा प्रमुख कुटिरोद्योग होता. त्याचा संचालक, उद्योग खाते (सेंट्रल प्रॉव्हिन्सेस) यांनी पुढीलप्रमाणे अहवाल दिला होता. उद्योग विभागातील वस्त्रोद्योग विभागाचे कार्य १९१६ मध्ये सुधारित हातमाग पुरवून सुरू झाले. त्या दशकाअखेर सुधारित हातमाग आणि इतर उपकरणे सर्व प्रमुख हातमाग केंद्रांमध्ये प्रचलित झाली. सन १९३० अखेर सुमारे ३०,००० सुधारित हातमाग प्रस्थापित करण्यात आले, या सुधारित हातमागांमुळे उत्पादनात अदमासे ७५ टक्के वाढ झाली. मात्र उत्पादन वृद्धीमुळे या उद्योगासमोर नवीन समस्या उद्‌भवल्या. विपणन सुविधा अभावी वाढलेल्या उत्पादनास बाजारपेठ उपलब्ध झाली नाही. तसेच सुधारित मागांमुळे मिळालेल्या फुरसतीच्या वेळेचा उपयोग करता आला नाही. हातमागाचे कापड वापरणारा वर्ग मिलचे कापड वापरू लागला. बदलत्या वस्त्र पद्धतीतील स्पर्धेमुळे कोष्टी अधिक सुधारित वस्त्रे निर्माण करू शकत नव्हता. फक्त जे कोष्टी तलम कापड विणत तेच उद्योगांत टिकून राहिले. त्यांनाही पुढील दशकात मिलमधील कापडाशी तीव्र स्पर्धा करावी लागली. हातमागांवर मोठ्या प्रमाणावर साडी व धोतर विणणाऱ्या कोष्ट्यांची परिस्थिती आणखी खालावत गेली. या व्यवसायासाठी काही करणे अशक्य होते. जेथे फक्त जुनी पद्धती रूढ होती अशा छत्तिसगड सारख्या ठिकाणी हातमाग साड्यांची मागणी टिकून राहिली. त्यामुळे या व्यवसायातील कोष्टी एकदम खालावला नव्हता.

प्रथम महायुद्धाचे काळात गिरणीतील कापडाच्या किमती वाढल्यामुळे हातमाग कापडास मागणी वाढली. गांधीजीप्रणित असहयोग चळवळीमुळेही अनेक लोक हातमाग कापड वापरू लागले. त्यामुळे या उद्योगाची स्थिती तात्पुरती सुधारली. उत्पादन वाढीसाठी तत्कालीन शासनाने चांगल्या प्रतीचे फ्लाय-शटल माग उपलब्ध करून दिले होते तरी बहुतांश विणकर जुन्या पद्धतीचेच माग मोठ्या प्रमाणावर वापरत होते. उद्योग खात्याच्या १९१६ मध्ये सुरू झालेल्या वस्त्रनिर्माण विभागाने हातमाग विणकरांसाठी सुधारित माग प्रसारित करण्याचे प्रयत्न सातत्याने केल्यामुळे महत्त्वाच्या हातमाग केंद्रांत ते लोकप्रिय झाले. परिणामी १९३० च्या अखेरीस ३०,००० सुधारित माग बसविण्यात आले. यामुळे उत्पादनात अदमासे ७५ प्रतिशत वाढ झाली. परंतु बाजारपेठेअभावी वाढलेल्या उत्पादनाची विक्री झाली नाही. गिरणीतील कापड व हातमागाचे कापड यामध्ये स्पर्धा निर्माण झाल्यामुळे हातमाग उद्योगाला अतिशय कठीण परिस्थितीशी तोंड द्यावे लागले. इ. स. १९३१ च्या जनगणनेनुसार हातमाग हा जिल्ह्यातील मोठा कुटिरोद्योग होता.

इ. स. १९५१ मध्ये ९१३ घटकांमध्ये १,१८२ माग होते. त्यापैकी ८०८ माग ग्रामीण भागात होते. या व्यवसायात ३,०३४ विणकर (पुरुष १,५९२ + महिला १,४४२) होते. त्यापैकी २,२०५ विणकर (पुरुष १,१४६ + महिला १,०५९) ग्रामीण भागात कार्यरत होते. इ. स. १९६१ मध्ये १,४३३ माग व १,७०८ विणकर होते. या व्यवसायातील विणकरांनी संघटित होऊन सहकारी हातमाग संस्था काढल्याने हळूहळू खाजगी हातमागांची

संख्या कमी होऊ लागली. परिणामी १९८७–८८ मध्ये जिल्ह्यात फक्त ३२९ हातमाग होते. जाडीभरडी लुगडी, साडी व गोणी (तडव) उत्पादनाचा हा व्यवसाय हिंगणघाट, सेलू, सिंदी, आर्वी, विरूळ, कारंजा, सेगाव (कुंड) व मांडगावला केंद्रित झाला आहे. हातमागावर कापड विणणे हा स्थानिक विणकरांचा परंपरागत व्यवसाय आहे. अधिक उत्पादन करून विणकरांस सुलभपणे काम करणे शक्य होण्यासाठी वंशपरंपरागत पिट लूम ऐवजी अद्यावत फ्रेम लूम रूढ झाले आहेत.

आर्वीला २१ जानेवारी १९४४ रोजी पहिली व सिंदीला २९ जानेवारी १९४४ रोजी दुसरी हातमाग सहकारी संस्था स्थापन झाली. दिनांक ११ ऑगस्ट १९४५ रोजी सेलू व हिंगणघाटला प्रत्येकी एक संस्था स्थापन झाली. इ. स. १९४५ ते १९५४ या काळात या संस्थांनी आपल्या सभासदांना योग्य दराने पुरेशा सुताचा पुरवठा केला व त्यांच्या कापडासही योग्य भाव मिळवून दिला.

इ. स. १९६१ मध्ये जिल्ह्यात आठ सहकारी संस्थांचे एकूण १,००९ सभासद होते. या संस्थांमध्ये १,००० हातमाग होते. त्यांचे भाग भांडवल ४६,००० रुपये व खेळते भांडवल २.१४ लाख रुपये होते. या वर्षी त्यांनी ३.६४ लाख रुपयांचे कापड विणून त्याच्या विक्रीपोटी ४.५१ लाख रुपये मिळविले. इ. स. १९८४–८५ व १९८५–८६ या वर्षाची जिल्ह्यातील हातमाग सहकारी संस्थांची सांख्यिकीय माहिती खाली दिली आहे.

बाब	१९८४–८५	१९८५–८६
संस्था	९	९
सभासद संख्या	१,५७०	१,५७०
भाग भांडवल (रु.)	७,६७,८३६	७,७५,३८३
खेळते भांडवल (रु.)	१७,६४,८६३	१४,१८,१७९
एकूण गुंतविलेले भांडवल (रु.)	२,८१,६५३	३,४०,११४
यंत्र व सयंत्र सामग्री (रु.)	२,३९,४३७	५,५६,७३९
कामगार	९१०	१,११०
कर्मचारी	९	९
उत्पादन (रु.)	२१,५७,५६४	१७,४७,०५३
कच्चा माल (रु.)	१२,३८,२३७	१०,०८,२१६
विक्री (रु.)	१९,७२,८१०	१६,१३,८९५
नफा (रु.)	१५,६३४	२०,७१५

इ. स. १९८७–८८ मध्ये जिल्ह्यातील नऊ संस्थांचे १,६०५ सभासद विणकर समाजातील होते. यापैकी आठ संस्था कार्यरत होत्या. इ. स. १९८७–८८ मध्ये जिल्ह्यात असलेल्या सहकारी हातमाग विणकाम संस्थांची आकडेवारी तक्ता क्रमांक १० मध्ये दिली आहे.

इ. स. १९४४ मध्ये हिंगणघाटला पहिली यंत्रमाग सहकारी संस्था सुरू झाली. इ. स. १९८५–८६ मध्ये जिल्ह्यातील चार यंत्रमाग सहकारी संस्थांची सभासद संख्या ४१० होती व त्यांचे भाग भांडवल व खेळते भांडवल अनुक्रमे ४,१९,१०० व ४,८८,०८८ रुपये होते. या संस्था हिंगणघाट, सिंदी व सेलू येथे होत्या.

कुंभार उद्योग : मातीची भांडी, विटा व कौले तयार करणे हा कुंभारांचा परंपरागत व्यवसाय आहे. मातीची भांडी लाल मातीत घोड्याची लीद मिसळून लाकडी चाकावर करतात. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस हिंगणीला मातीची मोठी भांडी तयार करीत असत. ग्रामीण भागात काही कुंभार अजूनही परंपरागत बलुतेदार आहेत. इ. स. १८९१ मध्ये या व्यवसायात २,८९१ लोक होते. इ. स. १९०६ मध्ये मांडगाव व वाघोलीला कुंभारांची लोकसंख्या सर्वाधिक होती. इ. स. १९२१ मध्ये जिल्ह्यातील या व्यवसायातील कारागिरांची संख्या कमी होऊन ती २,५०५ झाली. इ. स. १९५१ व १९६१ मध्ये या व्यवसायातील कारागिरांची संख्या अनुक्रमे ५८३ व ९५६ होती. धातूच्या भांड्यांच्या वाढत्या वापरामुळे मातीच्या भांड्यांचा वापर कमी झाला आहे. त्याचा कुंभार उद्योगावर अनिष्ट परिणाम झाला आहे.

शहरीकरणामुळे विटा व कौलांचे कारखाने खाजगी मक्तेदारांकडे गेले. इ. स. १९८२-८३ मध्ये ७८ घटकांमध्ये ३०१ कामगार होते. त्यांच्या उत्पादनाची किंमत ७.१३ लाख रुपये होती. इ. स. १९८४–८५ मध्ये ९३ घटकांत ३९५ (२६९ पूर्ण वेळ व १२६ अर्धवेळ) कामगार होते. त्यांच्या उत्पादनाची किंमत ७,६५,६४५ रुपये होती.

सिंदी (मेघे) येथे फेब्रुवारी १९६१ मध्ये पहिली कुंभार सहकारी संस्था सुरू झाली. इ. स. १९६१ अखेर सात सहकारी संस्था होत्या. त्यात वाढ होऊन जून १९६९ मध्ये त्यांची संख्या दहा झाली. या संस्थांचे ४५० सभासद होते. त्यांनी ६०० कामगारांना रोजगार दिला. या संस्थांमध्ये गुंतविलेले भाग भांडवल ५१,००० रुपये व खेळते भांडवल ६०,००० रुपये होते. जिल्ह्यातील कुंभार सहकारी संस्थांची माहिती खाली दिली आहे.

बाब		१९८०–८१	१९८४–८५	१९८५–८६
संस्था	..	४	४	४
सभासद संख्या	..	८४	८७	८७
भाग भांडवल (रु.)	..	२०,६२५	२२,८७५	२२,८७५
खेळते भांडवल (रु.)	..	७६,०१९	८७,६८४	१,०३,०६१
कामगारांची संख्या	..	७७	८७	९६
एकूण उत्पादन (रु.)	..	४१,४२९	५६,०२६	६१,६५८
एकूण विक्री (रु.)	..	५६,४२३	५९,७०६	५७,२२८

दगड खाणकाम : वर्धा तालुक्यात सावंगी, बोरगाव व इंझापूर तसेच देवळी तालुक्यात नाचणगावला दगडाच्या खाणी असून त्यामधून काळा दगड काढण्यात येतो. इमारतीच्या बांधकामासाठी त्याचा उपयोग करतात. आकार देण्याच्या दृष्टीने हा दगड फार कठीण आहे. या व्यवसायात १९२१, १९५१, १९६१ व १९७१ मध्ये अनुक्रमे ३१, ७१, ४२४ व ४७४ कामगार होते.

चर्मोद्योग : बैल, गायी व म्हशींच्या कातड्यांपासून विविध वस्तू तयार करण्याचा चांभारांचा परंपरागत व्यवसाय आहे. इ. स. १८९१ मध्ये या व्यवसायात २,२०१ लोक होते, १९२१ मध्ये त्यांची संख्या २,४३१ झाली. इ. स. १९५१ व १९६१ मध्ये कारागिरांची संख्या अनुक्रमे ८४५ व ९५७ होती. इ. स. १९८२–८३ मध्ये जिल्ह्यातील ४७ चर्मोद्योग घटकांत ६० कामगार होते. त्यांनी उत्पादन केलेल्या मालाची किंमत ३.९५ लाख रुपये होती. इ. स. १९८३–८४ ते १९८७–८८ या कालावधीत ३२ घटकांत ९६ कामगार होते. त्यात २.४२ लाख रुपये भांडवल गुंतविलेले होते. हा व्यवसाय वर्धा, हिंगणघाट, आर्वी, सेलू, देवळी, कारंजा व समुद्रपूर येथे केंद्रित आहे.

जिल्ह्यातील विखुरलेले चर्मकार संघटित होऊन त्यांनी १९५५ मध्ये वर्धा तहसील लेदर औद्योगिक संस्था स्थापन केली. इ. स. १९६१ मध्ये आष्टी व तळेगावला (टालाटुले) सहकारी तत्त्वावर कातडी कमावण्याची केंद्रे सुरू झाली. जून १९६९ मध्ये जिल्ह्यातील सात सहकारी संस्थांचे १३० सभासद होते. त्यात १०० कामगार होते. इ. स. १९८५–८६ मध्ये जिल्ह्यात एकच सहकारी संस्था कार्यरत होती व तिचे १९ सभासद होते.

सुतार व लोहार काम : सुतार व लोहार काम हे अनुक्रमे सुतार व लोहारांचे परंपरागत व्यवसाय आहेत. इ. स. १८९१ मध्ये या व्यवसायांत अनुक्रमे ४,६०३ व २,०५८ कामगार होते, तर १९२१ मध्ये अनुक्रमे ४,९०७ व २,२४९ होते. इ. स. १९५१, १९६१ व १९७१ मध्ये सुतार व्यवसायात अनुक्रमे २,३२०, २,३०९ व ३,२९९ आणि लोहार व्यवसायात १९५१ व १९६१ मध्ये अनुक्रमे ८८६ व ९०९ लोक होते. इ. स. १९८२–८३ मध्ये जिल्ह्यात सुतार व लोहार काम करणाऱ्या ६६ घटकांमध्ये १२९ कामगार होते.[१०] त्यांनी उत्पादन केलेल्या मालाची किंमत ६.०७ लाख रुपये होती. इ. स. १९८७–८८ मध्ये १७८ घटकांत ५३४ लोकांना रोजगार मिळाला. त्यात १३.१५ लाख रुपये भांडवल गुंतविलेले होते. हा व्यवसाय वर्धा, हिंगणघाट, सेलू, समुद्रपूर, देवळी, कारंजा व आर्वीला केंद्रित आहे.

सुतार काम सहकारी संस्था : इ. स. १९६१ मध्ये तीन सुतार सहकारी संस्था होत्या. इ. स. १९७३–७४ मध्ये त्यांचे भाग भांडवल ४३,००० रुपये व खेळते भांडवल ४९,००० रुपये होते. त्यांची सभासद संख्या ५६ होती. इ. स. १९८५–८६ मध्ये १०,६१० रुपये भाग भांडवल व १७ सभासद असलेली एकमेव सहकारी संस्था कार्यरत होती.

बांबू व वेतकाम : बांबूपासून वस्तू बनविण्याचा उद्योग प्रामुख्याने बुरूड जमातीतील लोक करतात. हा व्यवसाय प्रामुख्याने वर्धा, हिंगणघाट, आर्वी, देवळी, समुद्रपूर व कारंजा तालुक्यांत आढळतो. इ. स. १९२१ व १९६१ मध्ये या व्यवसायात अनुक्रमे १,०६२ व १,०६९ कारागीर होते. इ. स. १९८२–८३ मध्ये २२ घटकांत ३५ कारागीर होते. त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची किंमत ६६,००० रुपये होती. इ. स. १९८४–८५ मध्ये ३४ घटकांत ९५ कारागीर होते. त्यांनी उत्पादन केलेल्या मालाची किंमत व विक्री अनुक्रमे

---

[१०] **ॲक्शन प्लॅन, (१९८३–८४ ते १९८७–८८), जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा पृ. २०.**

१,५०,७२५ व २,५९,१६० रुपये होती. कारागिरांच्या वेतनावरील खर्च ९७,५३५ रुपये होता.

कामगार चळवळ

औद्योगिकदृष्ट्या मागासलेपणामुळे जिल्ह्यातील कामगार चळवळीस फारसा इतिहास नाही. कापड उद्योग मागील शतकात सुरू झाला असला तरी कामगार चळवळीने मूळ धरले स्वातंत्र्य आंदोलन काळात. मुळातच उद्योगांची संख्या कमी असल्यामुळे प्रभावी कामगार संघटना नाहीत. विशेष म्हणजे राष्ट्रीय कीर्तीचे कामगार नेते दत्तोपंत ठेंगडी आर्वी गावचे आहेत. नागपूर टेक्स्टाईल लेबर युनियनचे अध्यक्ष आर. एस. रुईकर यांचा वर्ध्यातील गिरणी कामगारांवर मोठा प्रभाव होता. त्यांना २३ सप्टेंबर १९४२ रोजी "छोडो भारत" आंदोलनात पकडल्याच्या निषेधार्थ पुलगाव-हिंगणघाटच्या कामगारांनी संप केला होता.

इ. स. १९५७ मध्ये जिल्ह्यात १९२६ च्या भारतीय कामगार संघटना अधिनियमाखाली नोंदणीकृत दहा कामगार संघटना होत्या. इ. स. १९७०-७१, १९७५-७६ आणि १९८४-८५ मध्ये त्यांची संख्या अनुक्रमे ४० (५,७२९ सभासद), ४६ (९,२६४ सभासद) आणि ५४ (८,२४० सभासद) होती.

जिल्ह्यात १९६० मध्ये ५० औद्योगिक विवादांपैकी १२ विवादांमध्ये समेट होऊन एक विवाद मागे घेण्यात आला व उर्वरित विवाद अयशस्वी झाले. इ. स. १९६४ मध्ये पुलगाव कॉटन मिलमध्ये अधिलाभांशाच्या (बोनस) मागणीसाठी कामगारांनी दोन दिवस संप केला होता. त्यात ३,९१२ श्रमदिवस वाया गेले. इ. स. १९६५ मध्ये विविध मागण्यांसाठी केलेल्या संपांमध्ये ३,९६८ कामगारांनी भाग घेतला. त्यात ९,०८३ श्रमदिवस वाया गेले. इ. स. १९६६ मध्ये आठ कारखाने व एका ग्रामपंचायतीत मिळून १,००७ कामगारांनी संप केला. इ. स. १९७३ मध्ये हिंगणघाटच्या आर. एस. रेखचंद मोहता स्पिनिंग ॲण्ड विव्हींग मिलमध्ये संप झाला होता. इ. स. १९७६–७७ ते १९८३–८४ पर्यंत झालेल्या संपांची माहिती तक्ता क्रमांक ११ मध्ये दिली आहे.

कारखान्यांतील कामगारांच्या सुरक्षिततेसाठी श्रमिक क्षतिपूर्ती कायदा, १९२३, लागू करण्यात आला आहे. या कायद्यानुसार इ. स. १९८०, १९८१, १९८२, १९८३ व १९८४ मध्ये अनुक्रमे २५, ६, १४, १ व ५ अपघातग्रस्त कामगारांना १,८२,५५२ रुपये, ८४,५२८ रुपये, ३३,६२२ रुपये, ४७,१४६ रुपये व २,२३,६२० रुपये नुकसान भरपाई मिळाली.

तक्ता क्रमांक १

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योगांची आकडेवारी, १९८१–१९८३

(लाख रुपये)

बाब	खाद्य पदार्थ	सुती कापड	रसायने व रासायनिक पदार्थ[११] (पेट्रोलियम व कोळसा सोडून)	अधातू खनिज पदार्थ	विद्युत[१२]	दुरुस्ती सेवा
कारखाने	४	३१	७	५	४	४
स्थिर भांडवल	२.७१	४,५७.४१	२२.७३	२८.३७	१७,३२.५६	११.६७
खेळते भांडवल	१.६८	३,८३.८३	३९.२७	१२.०३	४३.४३	०.०५
एकूण गुंतविलेले भांडवल ..	४.६१	१०,८२.५२	८७.२८	४२.५८	१७,८०.५४	११.७०
अदत्त ऋण	..	५,०२.२४	६०.१५	४५.३७	१३,४२.६२	..
कामाचे दिवस	८,३५८	२१,६७,१२९	६३,७८६	३८,८२६	२,०२,३४९	६,५६,४७
एकूण कामगार	५५	७,६२२	१७४	१२१	३८४	१५०
एकूण कर्मचारी	७१	८,६५९	२७६	१५१	५६२	१९१
कामगारांना वेतन	०.५६	४,३१.५३	३.८०	३.२३	३७.७२	२१.१८
एकूण वेतन	१.०४	५,६६.८४	८.१०	५.३६	६८.८५	२८.१३
इंधन	०.४०	२,०८.६८	१२.१९	१.५५	१,०६.५५	१.२४

कच्चा माल	..	..	५१.११	१२,२७.७५	४,२१.२०	४४.२०	७१.७१	५०.२९
अन्य निविष्टी	..	..	७.९४	१,६१.४८	७१.२७	६.६९	५९.८४	३.१८
एकूण निविष्टी	..	..	५९.४५	१५,९७.९१	५,०४.६६	५२.४४	२,३८.२८	५४.७१
यंत्र व सयंत्र सामग्री	..	..	३.३६	७,५१.०१	३३.११	२८.२४	२५,७४.८५	२.१५
मुख्य उत्पादन	..	..	५४.६७	२२,२९.७१	४,६८.०३	६२.३६	४,१६.९३	..
अन्य उत्पादन	..	..	८.४६	२,२२.९५	५८.५२	३.०२	९.९७	८७.४५
एकूण उत्पादन	..	..	६३.१४	२४,५२.६६	५,२६.५६	६५.३८	४,२६.९१	८७.४५
घसारा	..	..	०.१४	५४.३४	२.७०	५.७१	३४.२५	०.६७
मूल्यवृद्धी	..	..	३.५४	८,००.४२	१९.१९	७.२४	१,५४.३७	३२.०७
इतर खर्च	..	..	०.९२	८१.४७	१०.०१	३.९३	१,००.६४	..
निव्वळ नफा	..	..	२.६३	७,१८.९४	९.१८	३.३१	५३.७३	३२.०७

[११] कागद, कागदाच्या वस्तू, मुद्रण, प्रकाशन व संबंधित उद्योगांची संख्या तीनपेक्षा कमी असल्यामुळे त्याविषयीची सर्व माहिती रसायने व रासायनिक पदार्थ उद्योगांत समाविष्ट केली आहे॰

[१२] मूलभूत धातू व मिश्र धातू आणि यंत्र सामग्री, यांत्रिक अवजारे व सुटे भाग या अंतर्गत असणाऱ्या कारखान्यांची संख्या तीनपेक्षा कमी असल्यामुळे त्याविषयीची सर्व माहिती विद्युत अंतर्गत समाविष्ट केली आहे.

तक्ता क्रमांक २

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील उद्योगांसंबंधी आकडेवारी, १९८३–१९८५

(लाख रुपये)

बाब	खाद्य पदार्थ	सुती कापड	रसायने व रासायनिक पदार्थ (पेट्रोलियम व कोळसा सोडून)	अधातू खनिज पदार्थ	दुरुस्ती सेवा[13]
कारखाने ..	४	३३	६	६	६
स्थिर भांडवल ..	१.७८	५,१०.११	२८.६३	६,८४.७६	३०.६०
खेळते भांडवल ..	११.७२	५,४०.७४	३९.०५	७४.४९	७.५७
एकूण गुंतविलेले भांडवल ..	१६.१८	११,३९.५०	१,०९.६३	८,३३.८७	३८.४१
अदत्त ऋण ..	०.७५	७,२७.३८	५५.४६	६,०३.६७	६.३६
कामाचे दिवस ..	७,२२३	२१,५४,४७९	४९,२१५	१,८९,५३१	१०,६१५
एकूण कामगार ..	२६	६,२२८	१४८	४१२	२०८
एकूण कर्मचारी ..	३५	७,०८१	१८८	५३०	२७८
कामगारांना वेतन ..	०.६३	५,१८.८५	४.१४	५७.०३	३०.२२
एकूण वेतन ..	१.१०	६,६१.७३	६.५८	८९.८३	४७.३८
इंधन ..	०.४१	२,७०.५३	१४.५२	३,७७.५४	३.५६

कच्चा माल	..	७९.३०	१३,२४.०५	४,५१.३६	५,१७.८३	६०.२४
अन्य निविष्टी	..	४.३३	१,६३.५४	१७.०९	१,०५.२४	०.८९
एकूण निविष्टी	..	८४.०४	१७,५८.११	४,८२.९७	१०,००.६१	६४.६८
यंत्र व सयंत्र सामग्री	..	२.७६	९,७१.८६	३९.०४	१०,५९.४१	८.३८
मुख्य उत्पादन	..	८७.४९	२४,६७.९१	४,८६.२२	१९,२७.६१	४.६६
अन्य उत्पादन	..	०.५३	२,१६.८२	२४.२०	५.९०	१,०५.५६
एकूण उत्पादन	..	८८.०२	२६,८४.७३	५,१०.४२	१९,३३.५१	१,१०.२२
घसारा	..	०.१९	१,१२.८९	२.६६	८०.९९	१.९३
मूल्यवृद्धी	..	३.७९	८,१३.७३	२४.८०	८,५१.९२	४३.६२
इतर खर्च	..	२.१४	८८.०	८.५३	८६.४८	१.०१
निव्वळ नफा	..	१.६५	७,२५.७४	१६.२६	७,६५.४४	४२.६१

[13] धातूच्या वस्तू व सुटे भाग आणि यंत्र सामग्री, यांत्रिक अवजारे व सुटे भाग या अंतर्गत असणाऱ्या कारखान्यांची संख्या तीनपेक्षा कमी असल्यामुळे त्याविषयीची सर्व माहिती दुरुस्ती सेवा अंतर्गत समाविष्ट केली आहे.

तक्ता क्रमांक ३

जिल्ह्यातील प्रमुख उद्योगांची टक्केवारी

(लाख रुपये)

उद्योग	वर्ष	कारखाने	एकूण गुंतविलेले भांडवल	उत्पादन	रोजगार	मूल्यवृद्धी
खाद्य पदार्थ ..	१९७९–१९८१	७.७	०.४	१.७	१.४	०.२
	१९८१–१९८३	७.४	०.१	१.७	०.७	०.३
	१९८३–१९८५	७.४	०.८	१.७	०.४	०.२
सुती कापड ..	१९७९–१९८१	५९.६	३६.४	६२.३	८३.७	७१.०
	१९८१–१९८३	५७.४	३५.९	६७.७	८७.४	७८.७
	१९८३–१९८५	६१.१	५३.३	५०.४	८७.३	४६.८
रसायने व रासायनिक पदार्थ ..	१९७९–१९८१	११.५	३.६	१३.८	३.७	१.४९
	१९८१–१९८३	११.१	२.८	१४.५	२.७	१.८
	१९८३–१९८५	११.१	५.१	९.६	२.३	१.४
अधातू खनिज पदार्थ ..	१९७९–१९८१	..	..	..	..	..
	१९८१–१९८३	९.३	१.४	१.८	१.५	०.७
	१९८३–१९८५	९.३	३९.०	३६.३	६.५	४९.०

विद्युत ..	१९७९–१९८१	५.८	५८.९	१९.६	९.०	२५.१
	१९८१–१९८३	३.७	४४.६	११.५	५.२	१४.८
	१९८३–१९८५	..	..	..	..	..
दुरुस्ती सेवा ..	१९७९–१९८१	५.८	०.१	१.७	१.३	१.४
	१९८१–१९८३	७.४	०.४	२.४	१.९	३.२
	१९८३–१९८५	७.४	१.३	१.९	३.१	२.५

तक्ता क्रमांक ४

निवडक वैशिष्ट्यांनुसार उद्योगांचे जिल्ह्यातील स्थान–१९८३–१९८५

बाब	पहिला	दुसरा	तिसरा	चौथा
मूल्यवृद्धी ..	अधातू खनिज पदार्थ	सुती कापड	दुरुस्ती सेवा	रसायने व रासायनिक पदार्थ
भांडवल गुंतवणूक ..	सुती कापड	अधातू खनिज पदार्थ	रसायने व रासायनिक पदार्थ	दुरुस्ती सेवा
कामगारांना दिलेली एकूण मिळकत	सुती कापड	अधातू खनिज पदार्थ	दुरुस्ती सेवा	रसायने व रा सायनिक पदार्थ
औद्योगिक उत्पादने ..	सुती कापड	अधातू खनिज पदार्थ	रसायने व रासायनिक पदार्थ	दुरुस्ती सेवा

तक्ता क्रमांक ५

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील कापड गिरण्या

(लाख रुपये)

बाब		१९७५–१९७७	१९७७–१९७९	१९७९–१९८१	१९८१–१९८३	१९८३–१९८५
गिरण्या	..	३	३	३	३	३
स्थिर भांडवल	..	१,५४.८५	१,८४.३५	२,७४.९७	३,९४.०७	४,२८.२३
खेळते भांडवल	..	३.५७	७५.५०	२,५२.२१	३,५८.१६	४,९७.२७
एकूण गुंतविलेले भांडवल	..	४,२६.२९	५,४०.८६	७,५६.४२	१०,०२.५७	१०,२६.९६
अदत्त ऋण	..	२,८९.६५	४,३०.४४	४,७२.२३	४,३६.९६	६,५३.११
कामाचे दिवस	..	१४,२९,९८६	१५,००,१०२	१७,७९,३२३	१७,९०,२२४	१७,६६,६४३
एकूण कामगार	..	३,९९१	४,१७०	४,८८७	४,९२०	४,४८५
एकूण कर्मचारी	..	४,५४५	४,६७४	५,५४९	५,५३४	५,०८३
कामगारांना वेतन	..	२,०८.७८	२,२३.३५	२,९१.२३	३,९९.९३	४,८२.७०
एकूण वेतन	..	२,५७.५०	२,८३.००	३,८७.२४	५,२६.१२	६,१५.२५
इंधन	..	६८.३२	८३.५३	१,२९.५८	१,८६.१५	२,४४.३४
कच्चा माल	..	६,००.४६	८,०२.७०	९,०१.१३	११,८७.५७	१२,७७.२९
अन्य निविष्टी	..	३८.२०	१,०९.९५	१,४०.१३	१,३४.२७	१,३३.९०

एकूण निविष्टी	..	७,०६.९८	९,९६.१८	११,७०.८४	१५,०७.९९	१६,५५.५३
यंत्र व सयंत्र सामग्री	..	३,१६.८३	३,६६.९८	५,१३.१७	६,८५.३३	८,९०.२८
मुख्य उत्पादन	..	९,६१.७२	१३,५१.३२	१८,११.१७	२२,०९.३४	२४,३५.७१
अन्य उत्पादन	..	८.३७	८५.४५	५७.९०	९०.४०	५९.७५
एकूण उत्पादन	..	९,५३.३५	१४,३६.७७	१८,६९.०७	२२,९९.७४	२४,९५.४७
घसारा	..	१७.३७	१६.९३	२६.७३	४८.९२	१,०३.४०
मूल्यवृद्धी	..	२,२९.००	४,२३.६६	६,७१.५०	७,४२.८३	७,३६.५४
इतर खर्च	..	३७.७८	३१.१२	६४.३०	७२.०६	७८.२२
निव्वळ नफा	..	१,९१.२२	३,९२.५४	६,०७.२०	६,७०.७६	६,५८.३२

तक्ता क्रमांक ६

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील वटण व दाबणी गिरण्या

(लाख रुपये)

बाब	१९७५–१९७७	१९७७–१९७९	१९७९–१९८१	१९८१–१९८३	१९८३–१९८५
संख्या ..	२८	२८	२८	२७	२९
स्थिर भांडवल ..	३४.२०	४२.०४	४९.६८	६२.४१	८१.२६
खेळते भांडवल ..	१५.९३	११.८७	१६.००	१६.८७	२३.८८
एकूण गुंतविलेले भांडवल ..	४१.६०	४७.८६	५८.९९	७४.०६	९१.०७
अदत्त ऋण ..	१६.३५	१८.३९	३२.०७	४४.७८	४६.५१
कामाचे दिवस ..	३,४४,८४९	२,७७,९५६	३,३४,९५०	३,५६,७७२	३,६८,६८८
एकूण कामगार ..	२,७१६	२,१०४	२,२७३	२,७०४	१,७०१
एकूण कर्मचारी ..	३,०८९	२,४९४	२,७४४	३,०६०	१,९४१
कामगारांना वेतन ..	१७.२८	१६.१३	२२.८३	३०.५४	३४.८५
एकूण वेतन ..	२१.११	२१.४९	२९.२९	३८.५०	४३.८०
इंधन ..	११.५०	१३.१८	१६.३८	२०.७०	२३.७०
कच्चा माल ..	१४.१२	३५.९८	३३.५०	२७.२१	३३.०५
अन्य निविष्टी ..	११.५५	१४.३१	१८.१३	२५.१९	२६.८१

एकूण निविष्टी	..	३७.१७	६३.४८	६८.०२	७३.१०	८३.५७
यंत्र व सयंत्र सामग्री	..	३५.०४	४०.०४	४९.९७	६२.७०	७८.६०
मुख्य उत्पादन	..	१.००	२२.५७	८.७७	२.१३	१.०३
अन्य उत्पादन	..	७६.३२	८३.५४	१,१२.२३	१,३०.९०	१,५४.५२
एकूण उत्पादन	..	७७.३१	१,०६.११	१,२१.००	१,३३.०३	१,५५.५४
घसारा	..	३.५०	४.०८	३.९३	५.२७	९.३५
मूल्यवृद्धी	..	३६.६५	३८.५६	४९.०५	५४.६६	६२.६३
इतर खर्च	..	२.२१	३.५८	४.४२	५.२२	६.७९
निव्वळ नफा	..	३४.४४	३४.९७	४४.६३	४९.४४	५५.८३

तक्ता क्रमांक ७

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील रासायनिक कारखाने

(लाख रुपये)

बाब	१९७५–१९७७	१९७७–१९७९	१९७९–१९८१	१९८१–१९८३	१९८३–१९८५
कारखान्यांची संख्या ..	७	५	६	६	६
स्थिर भांडवल ..	१९.८४	१५.३०	२१.८१	२२.१३	२८.६३
खेळते भांडवल ..	१७.४७	२.५५	३३.५४	३९.१८	३९.०५
एकूण गुंतविलेले भांडवल ..	५५.३४	४६.०५	७९.९८	८६.६५	१,०९.६३
अदत्त ऋण ..	२६.९८	२७.८६	५३.५५	६०.१५	५५.४६
कामाचे दिवस ..	७२,३०५	४७,२७०	७०,९४४	६१,३९६	४९,२१५
एकूण कामगार ..	२३०	१०३	२६१	१६७	१४८
एकूण कर्मचारी ..	३४७	१६८	३६४	२६८	१८८
कामगारांना वेतन ..	२.८३	१.७८	४.०६	३.४३	४.१४
एकूण वेतन ..	६.००	४.६४	७.६२	७.६६	६.५८
इंधन ..	७.४३	४.८४	१२.२८	१२.१४	१४.५२
कच्चा माल ..	३,५०.५९	२,११.३०	३,५२.१९	४,२१.११	४,५१.३६

अन्य निविष्टी	..	७३.२४	३२.५३	५८.६९	७१.१०	१७.०९
एकूण निविष्टी	..	४,३१.२६	२,४८.६७	४,२३.१६	५,०४.३५	४,८२.९७
यंत्र व सयंत्र सामग्री	..	२६.६६	२७.३६	३०.४२	३१.९२	३९.०४
मुख्य उत्पादन	..	३,७५.३३	२,१७.९८	३,८८.०९	४,६७.९६	४,८६.२२
अन्य उत्पादन	..	७२.८३	३०.९२	५२.९२	५७.७७	२४.२०
एकूण उत्पादन	..	४,४८.१६	२,४८.९०	४,४१.००	५,२५.७३	५,१०.४२
घसारा	..	२.९१	२.२५	२.७०	२.६७	२.६६
मूल्यवृद्धी	..	१३.९९	२.०३	१५.१४	१८.७१	२४.८०
इतर खर्च	..	६.११	३.९४	८.६१	१०.०१	८.५३
निव्वळ नफा	..	७.८८	५.९६	६.५३	८.७०	१६.२६

तक्ता क्रमांक ८

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील खाद्य वस्तूंचे कारखाने

(लाख रुपये)

बाब		१९७५–१९७७	१९७७–१९७९	१९७९–१९८१	१९८१–१९८३	१९८३–१९८५
संख्या	..	५	५	४	४	४
स्थिर भांडवल	..	१.६४	३.५५	२.१९	२.७१	१.७८
खेळते भांडवल	..	१०.८४	२१.२८	८.१९	१.६८	११.७२
एकूण गुंतविलेले भांडवल	..	५.६३	२०.७८	८.३२	४.६१	१६.१८
अदत्त ऋण	..	६.४१	१७.९५	२.९६	..	०.७५
कामाचे दिवस	..	१९,८७५	२४,८७५	१५,९२६	८,३५८	७,२२३
एकूण कामगार	..	९७	७४	९९	५५	२६
एकूण कर्मचारी	..	१२३	१२६	१३६	७१	३५
कामगारांना वेतन	..	०.७९	०.९९	०.६९	०.५६	०.६३
एकूण वेतन	..	१.१५	१.९६	१.२७	१.०४	१.१०
इंधन	..	१.०९	२.१४	०.४४	०.४०	०.४१
कच्चा माल	..	४८.५२	७३.२०	४०.६१	५१.११	७९.३०

अन्य निविष्टी	..	९.८५	१,०४.९१	१२.५०	७.९४	४.३३
एकूण निविष्टी	..	५९.४६	१,८०.२५	५३.५५	५९.४५	८४.०४
यंत्र व सयंत्र सामग्री	..	४.६८	८.७३	१.८२	३.३६	२.७६
मुख्य उत्पादन	..	५१.३७	८५.०२	४३.७६	५४.६७	८७.४९
अन्य उत्पादन	..	१०.५९	१,०२.९७	११.५०	८.४६	०.५३
एकूण उत्पादन	..	६१.९६	१,८७.९९	५५.२६	६३.१४	८८.०२
घसारा	..	०.२८	०.५९	०.०९	०.१४	०.१९
मूल्यवृद्धी	..	२.२२	७.१६	१.६२	३.५४	३.७९
इतर खर्च	..	०.८६	२.९३	०.९६	०.९२	२.१४
निव्वळ नफा	..	१.३७	४.२३	०.६६	२.६३	१.६५

तक्ता क्रमांक ९

वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणानुसार जिल्ह्यातील अधातू खनिज पदार्थ उद्योग

(लाख रुपये)

बाब		१९८१–१९८२	१९८३–१९८४
कारखान्यांची संख्या	..	५	६
स्थिर भांडवल	..	२८.३७	६,८४.७६
खेळते भांडवल	..	१२.०३	७४.४९
एकूण गुंतविलेले भांडवल	..	४२.५८	८,३३.८७
अदत्त ऋण	..	४५.३७	६,०३.६७
कामाचे दिवस	..	३८,८२६	१,८९,५३१
एकूण कामगार	..	१२१	४१२
एकूण कर्मचारी	..	१५१	५३०
कामगारांना वेतन	..	३.२३	५७.०३
एकूण वेतन	..	५.३६	८९.८३
इंधन	..	१.५५	३,७७.५४
कच्चा माल	..	४४.२०	५,१७.८३
अन्य निविष्टी	..	६.६९	१,०५.२४
एकूण निविष्टी	..	५२.४४	१०,००.६१
यंत्र व सयंत्र सामग्री	..	२८.२४	१०,५९.४१
मुख्य उत्पादन	..	६२.३६	१९,२७.६१
अन्य उत्पादन	..	३.०२	५.९०
एकूण उत्पादन	..	६५.३८	१९,३३.५१
घसारा	..	५.७१	८०.९९
मूल्यवृद्धी	..	७.२४	८,५१.९२
इतर खर्च	..	३.९३	८६.४८
निव्वळ नफा	..	३.३१	७,६५.४४

तक्ता क्रमांक १०

हातमाग सहकारी संस्था, १९८७-१९८८

संस्था	सभासद	भाग भांडवल	शासकीय भाग भांडवल	एकूण उत्पादन	एकूण विक्री	एकूण कर्मचारी	कार्यक्षम मागांची संख्या
		रु.	रु.	रु.	रु.		
साईबाबा हातमाग संस्था, हिंगणघाट ..	८३	६,७१०	११,४८०	३,९७,०००	२,८२,०००	२२	२२
सद्‌गुरू हातमाग संस्था, हिंगणघाट ..	९०	७,८५०	५,१६०	३,५४,०००	३,४२,०००	२३	२३
हातमाग संस्था, हिंगणघाट ..	२९५	६८,०००	१,४२,०००	१२,८४,०००	११,४७,०००	१६	१६
नरेश हातमाग संस्था, सिंदी ..	५६	१५,७२५	..	३,५७,०००	३,५८,०००	४०	४०
हातमाग संस्था, सिंदी ..	३५४	१७,०००	२५,०००	१,३०,०००	१,३०,०००	१९	१९
हातमाग संस्था, आर्वी ..	२०६	११,६००	२२,४००	२३,०००	२६,०००	३	३
सेगाव हातमाग संस्था, सेगाव ..	८९	१९,९८०	४२,०००	१,१९,०००	१,१६,०००	१३	१३
जनार्दन स्वामी हातमाग संस्था, मांडगाव	८९	१०,३१०	१४,०००	१,९७,०००	१,८५,०००	२८	२८
हातमाग संस्था, सेलू ..	३४३	..	..	..	..	२३	२३

तक्ता क्रमांक ११

जिल्ह्यातील संप

वर्ष		संपग्रस्त कारखाने	संपातील कामगार	वाया गेलेले श्रमदिवस
१९७६–७७	..	३	५५६	२,०४०
१९७७–७८	..	१	२,१४४	४२,०६७
१९७८–७९	..	३	५६	१२,५२८
१९७९–८०	..	३	३०७	२,१६८
१९८०–८१	..	१	२४७	३,६६०
१९८१–८२	..	१	६५	२,८३५
१९८२–८३	..	२	११५	३१५
१९८३–८४	..	४	१,०२५	३,०९५

प्रकरण ६—बँक व्यवसाय, व्यापार व वाणिज्य

जिल्ह्याचा आर्थिक विकास प्रामुख्याने भौगोलिक स्थान, दळणवळणाची साधने, साधनसंपत्तीची व वित्त पुरवठ्याची उपलब्धता आणि लोकांची उपक्रमशीलता अशा अनेक घटकांवर अवलंबून असतो. सावकार, बँका, सहकारी संस्था, वित्त पुरवठा करणाऱ्या राज्य व राष्ट्रीय पातळीवरील संस्था, भांडवल निर्मिती इत्यादीबाबत वर्धा इतर जिल्ह्यां-सारखाच असला तरी या घटकांचा विकास, संख्या व स्वरूप यात मात्र बरीच भिन्नता आढळून येते. याबाबतचा आढावा खाली घेतलेला आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेत सावकारांचे वर्षानुवर्षे प्रस्थापित झालेले महत्त्व अजूनही टिकून असले तरी सहकारी संस्था, बँक व्यवसायाचा विकास व पतपुरवठा करणाऱ्या संस्थांच्या स्थापनेमुळे सावकारांची परंपरागत मक्तेदारी हळूहळू कमी होत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात १९३४ चा सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार मनिलेंडर्स अ‍ॅक्ट अमलात येण्यापूर्वी सावकार किंवा तत्सम सराफी पतपेढ्यांनी दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर अधिक असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत असे. शेतकरी कर्जाच्या न सुटणाऱ्या चक्रव्यूहात सापडत असे. परंतु १९१२ मध्ये स्थापन झालेली वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि डिसेंबर १९४९ मध्ये स्थापन झालेली वर्धा येथील इंपिरिअल बँक ऑफ इंडियाची पहिली शाखा यांनी सुधारणांचा शुभारंभ केला. त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात झालेला बँक व्यवसायाचा विकास आणि पतपुरवठ्याच्या विविध योजना, विविध क्षेत्रांतील सहकारी संस्थांचा विकास, तसेच १९६९ मध्ये झालेले काही प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण, जिल्ह्यातील अग्रणी बँकेने कार्यान्वित केलेल्या पत योजना या सर्व घटनांमुळे सावकारांचे कर्जपुरवठ्यातील महत्त्व कमी झाल्याचे दिसून येते. बँकांचा विशेषत: ग्रामीण भागात झालेला विस्तार व त्यांनी कार्यान्वित केलेल्या पतपुरवठ्याच्या विविध योजनांमुळे शेतकऱ्यांना सुलभपणे व अल्प दराने कर्ज मिळणे शक्य झाले आहे. बँक व्यवसायात सुसूत्रता आणण्यासाठी व त्यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत सरकारने निरनिराळे अधिनियम अमलात आणून राष्ट्रहित आणि बँकांचे व्यवहार या दोन्ही गोष्टींची सांगड घातली.

सहकारी चळवळीचा स्वातंत्र्यपूर्व काळातील उगम व स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम, १९६० अन्वये या चळवळीला मिळालेली चालना यामुळे विविध प्रकारच्या बहुउद्देशीय संस्था जिल्ह्यात स्थापन झाल्या आहेत. सहकारी चळवळ केवळ आता कर्जबाजारीपणा कमी करण्याची चळवळ राहिली नसून आर्थिक व सामाजिक उन्नतीचे साधन म्हणून तिला मान्यता मिळाली. सहकारी संस्थांच्या सभासदांना आर्थिक व बिगर आर्थिक सहाय्य मिळणे शक्य झाले. सहकारी चळवळीने आज फार मोठी शक्ती निर्माण केली आहे. शेतमालाची विक्री करण्यासाठी चळवळीने प्रगती केली असून सहकारी

पतपेढी आणि वाणिज्य यांची सांगड घालण्यात फार महत्त्वाची भूमिका पार पाडलेली दिसते. कर्ज व विपणन यांची योग्य सांगड न साधल्याने तसेच कर्जाच्या थकबाकीच्या प्रश्नामुळे सहकारी क्षेत्रातील पतपुरवठ्यात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. बँका व सहकारी संस्था यापेक्षा अतिशय सोप्या पद्धतीने व कमीत कमी विलंबात सावकार शेतकऱ्यांना पतपुरवठा करतात. परिणामतः ग्रामीण अर्थव्यवस्थेत सावकारांचे महत्त्व कमी अधिक प्रमाणात अजूनही टिकून आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात वित्त सहाय्य करणाऱ्या संस्थांचे कार्यक्षेत्र आणि कार्यपद्धतीत उल्लेखनीय बदल झालेला आढळून येतो. सार्वजनिक क्षेत्रातील वित्त संस्थांकडून अधिकाधिक कर्जपुरवठा करण्याचे शासनाने प्रयत्न केले. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन वाढीस प्रोत्साहन मिळू लागले. सावकारांच्या गैरव्यवहारांना प्रतिबंध करण्यासाठी शासनाने अधिनियम अमलात आणले. तसेच विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या विकासामुळे वित्त व इतर सहाय्य सुलभपणे मिळणे शक्य झाले. याशिवाय खरेदी-विक्री संस्था आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या स्थापनेमुळे व्यापारातील दलालांची मक्तेदारी नष्ट होऊन शेतकऱ्यास आपल्या मालास योग्य मोबदला मिळविणे शक्य झाले आहे. सहकारी व व्यापारी बँका, शासन पुरस्कृत वित्त संस्था आणि जिल्हा अग्रणी बँकांनी कार्यान्वित केलेली जिल्हा पत योजना यांच्या मदतीने कृषी विकास तसेच उद्योगधंद्यांच्या विकासासाठी सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत.

सावकारी

ऋणको आणि धनको यांचे अस्तित्व फार पूर्वीपासून आहे. मध्ययुगीन काळात सावकार सावकारीव्यतिरिक्त जमीन महसूल गोळा करणे आणि नाणी बदलून देण्याची कामे करीत असत. जे सावकार हुंड्या स्वीकारणे व वटवण्याची कामे करीत त्यांना सराफी पेढीवाले म्हणत असत. सध्या हा व्यवसाय फार कमी झाला आहे.

इ. स. १८९२–१८९४ च्या सेटलमेंटच्या वेळी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीविषयी केलेल्या सखोल पाहणीवरून असे दिसते की, खेडेगावांतील ६,५५६ शेतमालक आणि कुळांपैकी १,७२८ अथवा २६ टक्के कुळांनी कर्ज घेतलेले होते. त्या काळी ही टक्केवारी फार मोठी होती. याची कारणमीमांसा करताना काटकसरीचा अभाव, लग्न समारंभावरील अफाट खर्च, इत्यादी गोष्टी नमूद केल्या आहेत. एकूण ऋणकोंपैकी ५६७ किंवा एकतृतीयांश मालकांवर ३०० रुपयांपेक्षा जास्त कर्ज नव्हते, तर ७ टक्के किंवा ५०० शेतमालकांवर १,००० रुपयांपेक्षा अधिक कर्ज होते. परिणामतः सेटलमेंट रिपोर्टच्या वेळी मालकांची आर्थिक स्थिती समाधानकारक होती. एकूण ४०,००० कुळांपैकी १५,००० किंवा ३९ टक्के कुळे ऋणको होती. परंतु त्यापैकी ६,००० कुळांवर १०० रुपयांपेक्षा अधिक कर्ज नव्हते आणि ३,००० पेक्षा अधिक कुळांवर १०० रुपये ते २०० रुपये कर्ज होते. यावरून असा निष्कर्ष काढला होता की, कुळांची परिस्थिती मालकांएवढी चांगली नव्हती. मालक आणि कुळे यांनी त्यांच्या आर्थिक कुवतीपेक्षा अधिक अमर्याद कर्जाचा फायदा घेतला आणि ते नेहमी कर्जाचा भार सांभाळण्याबाबत सतत निष्काळजी राहिले. दुसरी गोष्ट म्हणजे ऋणको एकापेक्षा अधिक धनकोकडून कर्ज घेत असे. त्यामुळे त्यास त्याच्या ऋणाची कल्पना नसे.[१]

[१] वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९०६, पृ. १२९–३०.

जिल्ह्यातील सावकार प्रामुख्याने अगरवाल किंवा ओसवाल बनिया होते, तर काही ब्राह्मण व काही इतर जातीतील होते. याशिवाय प्रमुख सावकारी कंपन्यांपैकी हिरालाल रामगोपाल होते व त्यांचे जिल्ह्यातील प्रतिनिधी सेठ बच्छराज हे एक सामाजिक कार्यकर्ते होते व त्यांचा सरकारात चांगलाच दबाव होता. त्याशिवाय एम्प्रेस गिरणीचे मालक जमनादास पोतदार, हिंगणघाटचे रायसाहेब रेखचंद मोहता यांच्याही मोठ्या सावकारी कंपन्या होत्या. त्याशिवाय रायबहादुर बन्सिलाल अबीरचंद आणि राजा सेठ गोकुळदास, हिंगणघाटचे लालचंद हिरालाल डागा, आर्वीचे बलदेव बिशुनदास आणि हिंगणघाटचे भवानी राम चुन्नीलाल या सर्व प्रसिद्ध सावकारी कंपन्या होत्या. नागपूरचे बुटी, कोऱ्याचे जनार्दन दामोदर नाईक, समुद्रपूर व आष्टा येथील बलवंत हरी देशपांडे, आष्टीचे केशवराव शामराव आणि अंबादास आत्माराम, चिचोलीचे कृष्णा रामचंद्र सिंगूर, प्रसिद्ध सावकार गंगारामसिंग रजपूत, नागपूरचे गंगाधर माधव चिटणवीस हे सावकार होते. त्याशिवाय जिल्ह्यात लहान प्रमाणावर कर्ज देणारे अनेक सावकार होते आणि अनेक शेतमालक कुळांना कर्जाच्या रूपात धान्य आगाऊ देत असत.[२] खाजगी कर्जावर आकारलेला विशेषत: किरकोळ रोकडीवरील व्याजाचा दर बेसुमार होता. मोठ्या कर्जावर व्याजाचा दर दरवर्षी १२ ते २४ टक्के होता, तर लहान रकमेच्या कर्जावर तो ३ ते ४ महिन्यांसाठी २५ टक्के होता. साधारणत: लहान शेतकरी अल्पमुदतीची व लहान रकमेची कर्जे उत्तर भारतातून आलेल्या रोहिल्ला लोकांकडून घेत असत. हे लोक मोठ्या गावात वास्तव्य करून रोख रकमेच्या किंवा कापड विक्रीच्या स्वरूपात कर्जे देत असत; मात्र त्याची वसुली दामदुप्पटपणे हिंसाचाराची धमकी दाखवून अथवा दिवाणी न्यायालयाचा अवलंब करून करीत. वरेच वेळा कर्जाची रक्कम कापसाच्या रूपात परत करावी अशी अट घालत असत. यामुळे त्यांना सुगीच्या बाजारभावाच्या ३३ टक्के अथवा त्याहून कमी किमतीला कापूस मिळत असे. अशा व्यवहारात जर पिकाचे उत्पादन कमी आले तर कुळाचा फार मोठा तोटा होत असे. ही पद्धत मुख्यत: आर्वी तालुक्यात इ. स. १९०६ पर्यंत प्रचलित होती.

व्यापारी धारणाधिकार मिळविण्यासाठी नियमितपणे बयाणा अथवा इसाऱ्याची रक्कम कर्ज म्हणून देत असत. या कर्जाचा दर पाच मणांच्या एका खंडीला गहू, तीळ, ज्वारी आणि जवस यावर दोन रुपये आणि नऊ मणांच्या एक खंडी कच्चा कापसावर ५ रुपये होता. जे शेतमालक व्यापार व शेती या दोन्ही उद्योगधंद्यांची सांगड घालत असत, ते कुळांवर वरील पद्धतीचा करार आणण्यासाठी दबाव आणत असत. नगद रकमेवर जडजवाहिरांच्या तारणावर व्याजाचा दर ६ ते ९ टक्के होता, तर भूतारणावर तो ६ ते १२ टक्के होता. हा दर ऋणकोच्या आर्थिक स्थैर्यानुसार बदलत असे. सरकीसाठी अथवा निर्वाहासाठी धान्यरूपाने दिलेल्या कर्जावर व्याजाचा दर २५ टक्के होता तर जवसरूपाने दिलेल्या कर्जावर तो ५० टक्के होता. हे कर्ज पीक पेरल्यानंतर देण्यात येत असे आणि त्याची वसुली पिकाचे उत्पादन आल्यावर लगेच करण्यात येत असे. कापसाच्या बाबतीत १८ शेर सरकीचे कर्ज घेतले, तर पीक आल्यावर ९ शेर कच्चा कापूस देऊन कर्जाची परतफेड करावी लागत असे.[३]

[२] कित्ता, पृ. १२८–२९.

[३] कित्ता, पृ. १२७–२८.

पतपुरवठा करणाऱ्या अनेक लहानमोठ्या संस्था आज अगदी खेडोपाडी पोचलेल्या असल्या तरी परंपरागत व्यवसाय करणारे सावकार आणि सराफी पेढीवाले यांचे महत्त्व ग्रामीण भागात अजूनही टिकून आहे.

सावकारी व्यवसायावर नियंत्रण आणण्यासाठी प्रथम १९३४ मध्ये सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार मनिलेंडर्स ॲक्ट अन्वये ब्रिटिश सरकारने विशिष्ट कार्यपद्धती अमलात आणली. ही कार्यपद्धती १९५६ पर्यंत चालू होती. परंतु राज्य पुनर्रचनेनंतर मराठवाडा व विदर्भ विभागातील सर्व जिल्ह्यांचा आणि अनुषंगाने वर्धा जिल्ह्याचा महाराष्ट्र राज्यात समावेश करण्यात आला. त्यानुसार १९४६ चा बॉम्बे मनिलेंडर्स ॲक्ट, १९४७ च्या सुधारित अधिनियम क्रमांक ३१ सहित, विदर्भ व मराठवाड्यास लागू करण्यात आला. वर्धा जिल्ह्यात सदरहू अधिनियमाची अंमलबजावणी १ फेब्रुवारी १९६० पासून करण्यात आली. जुन्या कर्जांच्या संदर्भात लवाद मंडळे स्थापन करून कर्जाच्या रकमा बऱ्याच प्रमाणात कमी करण्यात आल्या. ऑगस्ट १९७५ मध्ये महाराष्ट्र शासनाने मुंबई कर्ज मुक्ती कायदा, १९७४ अन्वये ग्रामीण विभागात ४०० रुपये आणि नागरी विभागात ५०० रुपयांपेक्षा कमी मासिक उत्पन्न मिळविणाऱ्या कर्जदारांची सावकारांकडील कर्जे निर्लेखित केली.

सन १९४६ च्या मुंबई सावकार अधिनियमान्वये राज्य शासनाने सावकारी व्यवहारांचे काम निबंधक, सहकार विभाग, यांच्याकडे सुपूर्द केले. प्रत्येक जिल्हा निबंधकाला (सावकारी) त्याच्या कार्यक्षेत्रातील नोंदणीकृत सावकारांची नोंदवही ठेवावी लागते. या अधिनियमानुसार प्रत्येक सावकारास परवाना धारण करणे, परवान्याचे नूतनीकरण करणे, शासन निर्धारित दरानेच व्याज आकारणे व त्याप्रमाणे वसुली करणे, कर्जवसुलीची जमा पावती कर्जधारकास देणे, कर्ज आदा पावती ऋणकोकडून घेणे, तसेच कर्जवाटपाची नोंद खातेवहीत करणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे ऋणकोने घेतलेल्या कर्जाची रक्कम त्यावरील आकारलेले व्याज, तारण इत्यादी बाबी दर्शविणारे विवरणपत्र प्रत्येक ऋणकोच्या निदर्शनास आणणे, त्याची एक प्रत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांच्याकडे पाठविणे इत्यादी बंधने पाळणे आवश्यक असते. सावकाराने दिलेल्या कर्जावर आकारण्यात येणारा जास्तीत जास्त व्याजाचा दर ठरविण्याचा अधिकार राज्य शासनाला असतो. सावकारी व्यवसायास प्रतिबंध घालण्यासाठी १९४६ चा मुंबई सावकार अधिनियम आणि १९४७ च्या सुधारित अधिनियमात जुलै १९७६ व जुलै १९७७ मध्ये दुरुस्त्या करून त्या अमलात आणलेल्या आहेत.

मुंबई सावकार अधिनियम वर्धा जिल्ह्यात लागू करण्यापूर्वी म्हणजेच दिनांक १ ऑगस्ट १९५९ ते ३१ जानेवारी १९६० पर्यंत जिल्ह्यातील अधिकृत सावकारांची संख्या ४०० होती. परंतु सदर अधिनियमाची १ फेब्रुवारी १९६० रोजी अंमलबजावणी झाल्यानंतर १९६४–६५ मध्ये नोंदणीकृत सावकारांची संख्या २७६ पर्यंत घटली. त्यापैकी १३७ वर्धा तालुक्यात, १०४ हिंगणघाट तालुक्यात आणि ३५ आर्वी तालुक्यात होते. सन १९७९–८० मध्ये जिल्ह्यातील सावकारांची संख्या ८२ होती, त्यापैकी ५६ वर्धा तालुक्यात, १० आर्वी तालुक्यात व १६ हिंगणघाट तालुक्यात होते.[४] इ.स. १९८६–८७ मध्ये जिल्ह्यातील

[४] ही माहिती पूर्वीच्या तालुक्यांची आहे. नवीन पुनर्रचित तालुक्यांप्रमाणे परिगणना करणे शक्य झाले नाही.

सावकारांची संख्या ८० होती. त्यापैकी २८ वर्धा तालुक्यात, १६ देवळीत, १२ सेलूमध्ये, ६ आर्वीमध्ये, २ कारंजामध्ये, १३ हिंगणघाटमध्ये आणि ३ सावकार समुद्रपूर तालुक्यात होते.

जिल्ह्यातील सावकारांची संख्या व त्यांनी व्यापाऱ्यांना व बिगर व्यापाऱ्यांना दिलेले कर्ज याविषयीची आकडेवारी खालील विवरणपत्रात दिली आहे.

वर्ष	परवानाधारक सावकारांची संख्या	व्यापाऱ्यांना दिलेले कर्ज (रुपये)	बिगरव्यापाऱ्यांना दिलेले कर्ज (रुपये)	एकूण कर्ज (रुपये)
१९५९–६०[५]	४००	२२,१२,१३५	३४,३९,२०२	५६,५१,३३७
१९६४–६५	२७६	२,१७,४३५	९,०७,५३२	११,२४,९६७
१९७०–७१	उ. ना.	१०,८७,०००	३८,७१,०००	४९,५८,०००
१९७५–७६[६]	९४	२,८६,०००	२६,३४,०००	२९,२०,०००
१९८०–८१	८०	१,७०,०००	६२,०४,०००	६३,७४,०००
१९८३–८४	८६	१६,७२,०००	६२,०४,०००	७८,७६,०००
१९८६–८७[७]	८०	५,६७,०००	१,३५,७५,०००	१,४१,४२,०००

सहकारी संस्था, व्यापारी व राष्ट्रीयीकृत बँकांचे जाळे खेडोपाडी पसरल्यामुळे व त्यामार्फत बहुसंख्य लोकांच्या आर्थिक गरजा भागविल्या जाऊ लागल्यामुळे सावकारी व्यवसायाचा ऱ्हास होत आहे.

शासनाद्वारे कर्जमुक्तीसाठी केलेले प्रयत्न : पूर्वी सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी लँड इम्प्रुव्हमेंट लोन्स ॲक्ट, १८८३, आणि ॲग्रिकल्चरिस्ट लोन्स ॲक्ट, १८८४, हे दोन अधिनियम अस्तित्वात होते. या अधिनियमांनुसार शेतकऱ्यांना शेकडा साडेसहा टक्के दराने अनुक्रमे शेती सुधारण्यासाठी व बैल आणि म्हशी विकत घेण्याकरिता शासनाकडून कर्ज मिळत असे. या कर्जांना 'तगाई कर्जे' म्हणत. परंतु इतर कामासाठी लागणाऱ्या कर्जासाठी शेतकऱ्यास सावकाराकडेच जावे लागत असे. शासनाकडून मिळणाऱ्या कर्जास विलंब होत असे. तसेच कर्ज मिळविण्यासाठी शासनाच्या अटी प्रत्येक वेळेला शेतकऱ्यास पूर्ण करणे अशक्य असल्यामुळे शेतकरी सावकारांकडेच जाणे पसंत करीत. ॲग्रिकल्चरिस्ट डेटर्स रिलिफ ॲक्ट, १९४७, वर्धा जिल्ह्यास त्याचे महाराष्ट्रात विलीनीकरण झाल्यानंतर लागू करण्यात आला. त्यात शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या.

[५] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७४,** पृ. ३४१.

[६] जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा जिल्हा.

[७] **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, वर्धा जिल्हा, १९८६–८७** (महाराष्ट्र शासन, मुंबई).

इ. स. १९८० मध्ये महाराष्ट्र शासनाने अल्पभूधारकांच्या कर्जमाफीची योजना अमलात आणली. त्यानुसार शासनाने संपूर्ण राज्यातील अल्पभूधारकांना कर्जमुक्त करण्यासाठी ४८ कोटी रुपयांची कर्जमाफीची कार्यवाही केली. अशी कार्यवाही करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होय. कृषि व सहकार विभागातर्फे राबविण्यात आलेल्या या योजनेनुसार ३० जून १९७९ पर्यंत अल्पभूधारक थकबाकीदारांकडे असलेल्या सहकारी पतपुरवठा संस्था व बँकांच्या थकलेल्या पीक कर्जाची संपूर्ण भरपाई शासनाने करून दिली. या योजनेचा लाभ २,४०० रुपयांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या अल्पभूधारकांना झाला.

सहकारी चळवळ

पार्श्वभूमी : सहकारी चळवळीला चालना देण्यास शेतकऱ्यांची आर्थिक दुरावस्था मुख्यत: कारणीभूत झाली. शेतकऱ्यांना पैशाची फार अडचण असे, त्यामुळे सावकारांचा आश्रय घेतल्याशिवाय त्यांना अन्य तरणोपाय नव्हता. दामदुपटीचे कागद, भरमसाठ व्याज, खोटे हिशेब, कर्जापोटी जमीन गमाविण्याची पाळी, इत्यादी अनेक मार्गांनी सावकारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होत असे. त्याची परिणती १८७५–१८७९ दरम्यान उद्‌भवलेल्या दख्खनच्या बंडाळीत (Deccan Riots) झाली. दक्षिणेत सन १८७५ पासून पडलेल्या दुष्काळाने दैन्यावस्था पसरण्यास प्रारंभ झाला, असंतोषास तोंड फुटले. वर्धा जिल्ह्यातही १८७७–७८ मध्ये दुष्काळ पडला होता. पुण्याची पुणे सार्वजनिक सभा या राष्ट्रवादी संघटनेने परकीयांविरुद्धच्या असंतोषास चांगली चालना दिली व त्यामुळे ठिकठिकाणी बंडाळी उद्‌भवली. त्यावर उपाय म्हणून ब्रिटिश सरकारने १८७९ चा कर्जनिवारण कायदा अमलात आणला. तथापि ही उपाययोजना अत्यंत अपुरी ठरल्यामुळे सरकारने १८८३ व १८८४ चे उपरोक्त अधिनियम अमलात आणले.

पुढील कालावधीत सहकारी चळवळीचा प्रसार होऊन शेतकऱ्यांना सहकारी कर्ज-पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध झाल्या.

शेतकरी कर्जपुरवठ्याच्या बाबतीत सहकारी चळवळीला मान्यता मिळताच सहकारी अधिनियम संमत झाला. शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी जर्मनीतील रायफेसन तत्त्वाप्रमाणे अनियमित जबाबदारीच्या शेतकी पतपेढ्या उपयुक्त होतील असे वाटून त्या हिंदुस्थानात ठिकठिकाणी काढल्या व त्याला अनुसरून १९०४ मध्ये भारतात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीज ॲक्ट, १९०४, कार्यान्वित करण्यात आला.[८] या अधिनियमाप्रमाणे शेतकी ग्रामीण पतपेढ्या स्थापन करण्यास परवानगी देण्यात आली. परंतु या अधिनियमात शेतकी पतपेढ्यांशिवाय इतर कोणत्याही संस्था काढण्याची सोय नव्हती.

सन १९०४ च्या अधिनियमात कर्जव्यवहाराशिवाय विविध क्षेत्रात सहकारी चळवळीच्या निकोप वाढीसाठी तरतूद नव्हती. ही उणीव दूर करण्यासाठी को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, १९१२, संमत करण्यात आला. या अधिनियमामुळे सहकारी चळवळीस अधिक चालना मिळाली. कर्जाव्यतिरिक्त मालपुरवठा व खरेदी-विक्री यासारख्या क्षेत्रात सहकारी चळवळीने पदार्पण केले. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संघ, दुग्धसंघ, बी-बियाणे पुरविणाऱ्या संस्था इत्यादी अनेकविध क्षेत्रांत सहकारी संघ निर्माण होऊ लागले. खेड्यातील व

[८] रिचर्ड कॅशमन, **दि मिथ ऑफ दि लोकमान्य** (युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस, कॅलिफोर्निया, १९७५), पृ. २८.

शहरातील अशा वर्गीकरणाऐवजी नियमित अनियमित असे जबाबदारीच्या प्रकारावर संस्थांचे वर्गीकरण करण्यात आले. "सहकारी" हा शब्द अधिनियमाखाली नोंदलेल्या संस्थांनाच लावायचा असा निर्बंध या अधिनियमाने घातला. शिवाय संस्थांची नोंद करणे, लेखापरीक्षा करणे, यासारख्या महत्त्वाच्या बाबतीत या अधिनियमान्वये तरतूद करण्यात आली. याच अधिनियमानुसार २१ ऑक्टोबर १९१२ रोजी स्थापन झालेल्या वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या रूपाने जिल्ह्यात संस्थात्मक सहकारी चळवळीचा पाया घातला गेला. तेव्हापासून हळूहळू जिल्ह्यात सर्वत्र सहकारी संस्था स्थापन होण्यास सुरुवात झाली. माँटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणेनुसार (१९१९) सहकार हा विषय केंद्र सरकारकडून प्रांतिक सरकारकडे सुपूर्द करण्यात आला. यामुळे लोकप्रतिनिधींचा या चळवळीशी थोडा संबंध आला. परिणामतः चळवळीचे स्वरूप व तिच्यापासूनच्या अपेक्षा वाढल्या. याचे प्रत्यंतर त्यावेळच्या मुंबई सरकारच्या १९२५ च्या बॉम्बे को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट या अधिनियमात मिळते. हा अधिनियम बराच परिपूर्ण असून त्यात अनेक महत्त्वाच्या तरतुदी होत्या.

इ. स. १९३० च्या जागतिक मंदीचा जिल्ह्यातील कृषी अर्थव्यवस्थेवर बराच अनिष्ट परिणाम झाला. थकबाकी तसेच लवादनामे वाढले. इ. स. १९३५ मध्ये रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन तिच्या अंतर्गत शेतकी पतपुरवठा खाते सुरू झाले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने एक आदर्शभूत कायदा तयार करून त्याचा राज्य शासनांनी स्वीकार करावा अशी सर्व राज्यांना शिफारस केली. तदनुसार त्यात स्थलकालानुसार बदल करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम, १९६० मंजूर करून २६ जानेवारी १९६२ रोजी कार्यान्वित केला. सहकारी संस्था बलिष्ट करण्याकरिता सरकारी आर्थिक मदत व तिच्या योग्य विनियोगाकरिता सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, यांच्यामार्फत नियंत्रण हा या उपक्रमाचा एक भाग आहे, तर सहकारी चळवळीत जनतेचे वाढते सहकार्य मिळविणे हा महत्त्वाचा भाग आहे. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांमध्ये खुले सभासदत्व, राज्य शासनाची सहकारी संस्थांच्या भांडवलात भागीदारी, सहकारी चळवळीचे बिनसरकारीकरण करण्यावर दिलेला भर, सहकारी संस्थांचे कामकाज लक्षात घेऊन केलेले वर्गीकरण आणि सहकारी संस्थांमधील तंटे सोडविण्यासाठी निर्माण केलेली लवादाची (सहकारी न्यायाधिकरण मंडळाची) विस्तृत योजना या उपाययोजनांमुळे सहकारी चळवळीची सुदृढ पायावर वाढ होण्यास फार मोठी मदत झाली आहे.

इ. स. १९५७–५८ मध्ये वर्धा जिल्ह्यात विविध प्रकारच्या ३९१ सहकारी संस्था कार्यरत होत्या. १९६७–६८ मध्ये त्यांची संख्या ७९८ पर्यंत वाढली, तर १९८७–८८ मध्ये त्यांची संख्या १,१८२ होती.

जिल्ह्यातील सहकारी संस्थांची १९८०–८१ आणि १९८५–८६ या वर्षांतील संख्या तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविली आहे. सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिले आहेत.

जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या विकासाची संक्षिप्त माहिती पुढील विवरणपत्रात दिली आहे. विवरणपत्रात जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांची जून अखेरची एकत्रित माहिती दिली आहे.

(लाख रुपये)

बाब	१९८१	१९८६	१९८७	१९८८
सहकारी संस्थांची संख्या	९६१	११२८	११५०	११८२
एकूण सभासद संख्या	१,९२,७७९	२,०२,६४२	२,०५,३०५	२,१६,४४५
वसूल भाग भांडवल	४१९.८५	१,१२९.६९	१,६६०.३४	२,०५२.८२
सरकारी भाग भांडवल	५३.८५	५३२.६३	१,०१९.१०	१,३२५.०७
संस्था भाग भांडवल	२८०.४३	३९५.८४	४४४.५१	४८३.०६
ठेवी	९३३.१५	२,१८३.४४	२,५७०.६७	२,५८२.८१
खेळते भांडवल	३,६७७.०३	६,५७१.०७	७,०२०.६४	८,८९१.१६
सभासद कर्ज	२,८३३.२७	२,२८७.०४	३,२२७.७७	३,६८०.७०
निव्वळ तोटा	२३.८२	४४.८०	७६.०६	११३.२१
तोटा झालेल्या संस्थांची संख्या	४०२	४६०	४८९	४९१
निव्वळ नफा	४५.४०	८५.७५	६५.९८	११२.९०
नफा झालेल्या संस्थांची संख्या	४०९	४८५	३१५	३३०

कृषी सहकारी पतसंस्था : वर्धा जिल्ह्यातील कृषी पतपुरवठ्यास अर्ध्या शतकाहून अधिक परंपरा आहे. विविध प्रकारच्या पतसंस्थांमध्ये कृषी पतसंस्थांना सर्वांत अधिक महत्त्व आहे. त्यांचा प्रसार खेड्यापाड्यांपर्यंत झालेला आहे. १९५९ पूर्वी या संस्थांचे कार्य त्या विशिष्ट क्षेत्रातील शेतकऱ्यांना अत्यावश्यक कर्ज पुरविणे एवढेच मर्यादित होते. परंतु शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्यासाठी पतपुरवठ्याशिवाय इतर अनेक बाबींची आवश्यकता भासू लागली. त्यामुळे शासनाने मेहता कमिटीच्या (१९६०) शिफारसीनुसार कृषी पतसंस्थांचे रूपांतर सेवा संस्थांमध्ये करण्याचे ठरविले.

कृषी पतसंस्थांमध्ये प्राथमिक कृषी पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती बँक व तिच्या शाखा, भूविकास बँक आणि धान्य बँका यांचा अंतर्भाव होतो. या संस्था पीक कर्जाच्या स्वरूपात अल्प मुदतीचा पतपुरवठा आणि काही प्रमाणात मध्यम मुदतीचा पतपुरवठा करतात. कृषी सहकारी संस्थांना तसेच शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या व औद्योगिक सहकारी संस्थांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अल्प मुदतीची कर्जे देते. राज्य भूविकास बँक शेतीसाठी मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे देते.

प्राथमिक कृषी पतसंस्था : या संस्थांचा उद्देश संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी, कारागीर व मजुरांना धंद्यासाठी लागणारे भांडवल व कच्चा माल पुरविणे व त्यांच्या उत्पादित मालाच्या विक्रीची व्यवस्था करून चांगले बाजारभाव मिळवून देणे हा होय. तसेच या संस्था प्रत्येक सभासदाचे उत्पादन कसे वाढविता येईल याचा आराखडा तयार करतात. शिवाय शेतकऱ्यास लागणारी अवजारे, बी-बियाणे, रासायनिक व इतर खते, पीक संरक्षणासाठी रोग व कीटकनाशक औषधांचा पुरवठा करतात. म्हणून यांना सेवा सहकारी संस्था असेही संबोधतात. या संस्था प्रामुख्याने ग्रामीण भागात विखुरलेल्या असून बहुतेक भूधारक त्यांचे

सभासद असतात. त्यांना सभासदांकडून मिळणारे शुल्क कमी असल्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून मदत घ्यावी लागते. पुढील विवरणपत्रात जिल्ह्यातील प्राथमिक कृषी पतसंस्थांची आर्थिक परिस्थिती व उलाढाल[१] नमूद केली आहे.

(हजार रुपये)

बाब		१९७८–७९	१९८२–८३	१९८७–८८
सस्थांची संख्या	..	४०१	४०३	४००
सभासद	..	९४,८९५	९८,८८५	१,१५,९४४
भाग भांडवल	..	१,५१,५१	१,८८,३४	२,१८,८३
शासकीय भाग भांडवल	..	१,४८	३,०८	११,९५
राखीव व इतर निधी	..	१८,३०	२४,८०	३२,१६
खेळते भांडवल	..	७,४९,८३	११,६६,०८	१५,४७,०३
दिलेले कर्ज	..	१,५१,९७	४,८९,९५	५,८६,१५
वसूल झालेले कर्ज	..	२,६०,८६	५,५२,१३	४,०३,८४
येणे कर्ज बाकी	..	६,०३,३१	८,४१,५५	१,२४,५९
नफा मिळालेल्या संस्थांची संख्या		१५४	१५६	८२
तोटा आलेल्या संस्थांची संख्या		२४७	२४७	१३८
शेती उपयुक्त वस्तूंचे वाटप	..	५३,४१	५४,६१	३६,९५

धान्य बँका : या बँका शेतकरी सभासदांना धान्य खरेदी व्यवहारात मदत करतात. जिल्ह्यात पहिली धान्य बँक १९५७ मध्ये आर्वी येथे स्थापन झाली. धान्य बँकांची माहिती खाली दिली आहे.

(हजार रुपये)

बाब		१९७३–७४	१९८१–८२	१९८४–८५	१९८७–८८
धान्य बँकांची संख्या	..	४	३	३	१
सभासद संख्या	..	३४१	१७३	१७२	२८
भाग भांडवल	..	३४	२,६१	४,९७	१,६८
खेळते भांडवल	..	४४	२,३५	२,४२	१,७६

इ. स. १९८४–८५ मध्ये जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या एकूण तीन धान्य बँकांपैकी एक तोट्यात आणि दोन नफा किंवा तोटा न झालेल्या होत्या.

राज्य सहकारी भूविकास बँक : सध्याच्या भूविकास बँकेची स्थापना वर्धा जिल्हा भूतारण बँक या नावाने १० मे १९३७ रोजी वर्धा येथे झाली. तिचे कार्यक्षेत्र जिल्ह्यापुरते मर्यादित होते. विकासाच्या योजनांचा शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ व्हावा व त्यांना दीर्घ मुदतीची कर्जे कमी दराने देण्यासाठी शासनाने १९७३ मध्ये जागतिक बँकेमार्फत विपुल

[१] **सहकारी मार्गदर्शक : सांख्यिकीय विवरण पुस्तिका, १९८२–८३** (वर्धा जिल्हा सहकारी बोर्ड).

प्रमाणात निधी उपलब्ध करून घेतला. दिनांक १ मे १९७३ रोजी महाराष्ट्र शासनाने भूविकास बँकांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी व संपूर्ण राज्यात एकसूत्री अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व जिल्हा भूविकास बँकांचे शिखर बँकेत विलीनीकरण करून महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक, मुंबई या राज्यस्तरावरील बँकेची स्थापना केली. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राकरिता दीर्घ मुदतीची कर्जे देणारी संस्था अस्तित्वात आली. सर्व भूविकास योजना जिल्हा बँकेच्या माध्यमातून कार्यान्वित करण्याऐवजी राज्यस्तरावरील बँकेमार्फत कार्यान्वित करण्यात येऊ लागल्या. पूर्वीच्या जिल्हा बँकेच्या धोरणापेक्षा या बँकेने कर्जवाटप धोरणात मूलभूत बदल केले. त्यामुळे शेतकऱ्याला त्याची गरज भागविण्यासाठी पीक पद्धतीवर आधारित कर्ज मिळू लागले. त्याचप्रमाणे शेती व्यवसायाशी निगडित फळबाग व दुग्ध व्यवसायासाठीही बँक कर्जपुरवठा करते. महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँकेची वर्धा येथे एक जिल्हा शाखा असून सध्या वर्धा, देवळी, सेलू, आर्वी, कारंजा, हिंगणघाट, समुद्रपूर व आष्टी या तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी उपशाखा आहेत. जिल्हा शाखा व उपशाखा कर्जवाटप व वसुलीचा कार्यक्रम राबवितात. शासनाकडून मिळणारी तगाईसुद्धा या बँकेमार्फत देण्यात येते.

वर्धा जिल्हा सहकारी भूविकास बँकेची सदस्य संख्या व आर्थिक परिस्थिती खाली दर्शविली आहे.

(हजार रुपये)

बाब		१९६५–६६	१९७५–७६	१९८३–८४
उपशाखांची संख्या	..	४	७	७
सभासद संख्या	..	४०,२७	१,७१,७०	२,०७,८६
भाग भांडवल	..	७,२२	८५,२५	१,१६,२८
राखीव व इतर निधी	..	६४	..	..
दिलेले कर्ज	..	३१,४४	१,६१,१३	६६,९६
वसूल झालेले कर्ज	..	८,०८	५२,९५	६६,७५
अदत्त कर्ज	..	५९,५०	५,२८,३४	९,५७,५७
थकित कर्ज	..	६,१७	४९,६७	३,९१,१८

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक : प्राथमिक सेवा सहकारी संस्थांची जिल्हा पातळीवरील ही संघ संस्था आहे. त्यामुळे जिल्हा बँक सहकारामार्फत विकास कार्याचे नेतृत्व करणारी संघटित अशी सहकारी संस्था आहे. पूर्वी व्यक्तीही प्राथमिक पतपेढ्यांच्या बरोबरीने जिल्हा बँकेच्या सभासद होते. परंतु आता धोरणात बदल झाला असून ही बँक फक्त संघ संस्था बनविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. प्राथमिक सहकारी संस्थांनी निवडून दिलेले प्रतिनिधी या बँकेचे कामकाज पाहतात. ही बँक जनतेकडून ठेवी स्वीकारून त्याचप्रमाणे शासन व राज्य सहकारी बँक यांच्याकडून कर्जाऊ रक्कम घेऊन निधी उभा करते. ग्रामीण सहकारी पतसंस्थांप्रमाणेच पणन संस्था, ग्राहक भांडारे, कृषी संस्था, नागरी पतसंस्था, विणकर संस्था व इतर औद्योगिक संस्थादेखील या बँकेचे सदस्य असतात. जिल्हा मध्यवर्ती बँक संलग्न सभासद सहकारी संस्थांनाच अल्पमुदतीचे व मध्यममुदतीचे कर्ज देते.

वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना १९१२ मध्ये को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, १९१२ अन्वये झाली. या बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्हा असून १९८५ पर्यंत बँकेच्या जिल्ह्यात ३१ शाखा होत्या. त्यापैकी वर्धा, आर्वी व हिंगणघाट तालुक्यांत प्रत्येकी पाच, सेलू व समुद्रपूर तालुक्यांत प्रत्येकी चार, देवळी व आष्टी तालुक्यांत प्रत्येकी तीन आणि कारंजा तालुक्यात दोन शाखा होत्या. इ. स. १९८७ मध्ये जिल्ह्यात ३७ शाखा होत्या. वर्धा, आर्वी व हिंगणघाट येथील शाखा कापूस व्यवहार स्वतंत्रपणे हाताळतात. वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची जून अखेरची आर्थिक स्थिती पुढील विवरणपत्रात दर्शविली आहे.

(लाख रुपये)

बाब		१९६१	१९८१	१९८४	१९८८
भाग भांडवल व निधी	..	उ. ना.	१७१.७९	२१७.६२	३२१.१९
ठेवी	..	२६.२०	६४५.३०	११०७.८१	१९४७.९०
गुंतवणूक	..	६.६३	२६८.५१	३८८.६३	८२०.१२
दिलेली कर्जे	..	५३.५२	७८४.८६	१०८८.२२	११३१.१७
एकूण खेळते भांडवल	..	७२.९७	११९५.९६	१६८१.४३	२७४८.८१

या बँकेतर्फे जून १९८८ पर्यंत दिलेली कर्जे १५५८.९७ लाख रुपये, तर जून १९८० पर्यंत ही रक्कम ६५१.४८ लाख रुपये होती.

रिझर्व्ह बँकेच्या निर्देशाप्रमाणे नवीन होणाऱ्या कर्जवाटपामध्ये २० टक्के कर्जवाटप अल्पभूधारकांस करावे अशी अट आहे. इ. स. १९८७–८८ मध्ये बँकेने जिल्ह्यातील ११,२३३ अल्पभूधारकांस १०९.९९ लाख रुपये कर्जवाटप केले होते. यापैकी ३४.८३ टक्के कर्जवाटप अल्पभूधारकांना केले होते.

बँकेने १९८७–८८ पर्यंत ग्रामीण कारागीर सहकारी संस्थांमार्फत एकूण ३,४५७ ग्रामीण कारागिरांना १७.७५ लाख रुपये कर्जपुरवठा केला. यात दारिद्र्य रेषेखालील कारागिरांचाही समावेश होता. याशिवाय बँक एकात्मिक ग्रामीण विकास योजनेखाली दारिद्र्य रेषेखालील लोकांना कर्जवाटप करण्याचे धोरणही राबविते. वखारीत ठेवलेल्या मालाच्या तारणावर बँकेने कर्ज देण्याची योजना सुरू केली आहे. इ. स. १९८४ मध्ये २५ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला. नियंत्रित दराने कापड वाटप योजना व आवश्यक गरजेच्या वस्तू वाटप योजनेअंतर्गत बँकेने सहकारी संस्थांना कर्जवाटप केले.

दरवर्षीप्रमाणे १९८६–८७ मध्येसुद्धा बँकेने राज्य सहकारी बँकेकडून वेगवेगळ्या व्यवहारांकरिता कर्ज मागणी केली होती. त्यानुसार राज्य सहकारी बँकेने या बँकेस मंजूर केलेली अल्प मुदत व मध्यम मुदत रूपांतर कर्ज मर्यादा अनुक्रमे ५०० लाख रुपये आणि २५५ लाख रुपये होती. मात्र बँकेने अल्प मुदतीच्या व मध्यम मुदतीच्या रूपांतर कर्जासाठी अनुक्रमे २९५ लाख रुपये आणि १४९.९४ लाख रुपयांची उचल करून त्याची ठराविक मुदतीत परतफेड केली.

बिगरशेतकी पतसंस्था : व्यापारी, कारखान्यातील कामगार व पगारदार व्यक्ती संघटित होऊन गरजेच्या वेळी पैसा उपलब्ध व्हावा या उद्देशाने अशा प्रकारच्या संस्था स्थापन करतात. या संस्था भाग भांडवल, अल्प व दीर्घ मुदतीच्या ठेवी, तसेच मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेऊन भांडवल निधी उभा करतात. या संस्था प्रामुख्याने नागरी विभागात आढळून येतात. सभासदांना वैयक्तिक हमीवर, मालमत्तेच्या तारणावर तसेच गृहीत उत्पादनावर रोख कर्ज घेता येते. त्याशिवाय धनादेश व हुंडी काढून त्यांची वसुली करण्याचे कामही या संस्था करतात. या प्रकारात औद्योगिक सहकारी बँका, नागरी बँक व नागरी पतपेढ्या, वेतनधारकांची पतसंस्था, गिरणी व कारखाने कामगार पतसंस्था, भिशी संस्था इत्यादींचा अंतर्भाव होतो.

इ. स. १९६१–६२ मध्ये जिल्ह्यात फक्त नऊ बिगरशेतकी पतसंस्था होत्या. त्यांची संख्या १९६५–६६ मध्ये १४ होती, तर १९८०–८१ मध्ये ६३ आणि १९८५–८६ मध्ये ७२ होती. या ७२ पतसंस्थांपैकी चार नागरी बँका व नागरी पतपेढ्या, ६७ वेतनधारकांच्या पतसंस्था आणि एक गिरणी व कारखाने कामगार पतसंस्था होती. वेतनधारकांच्या पतसंस्था महिन्याला निश्चित पगार घेणाऱ्यांना उपयुक्त असतात. जिल्ह्यातील पहिली वेतनधारकांची पतसंस्था १९३८ मध्ये वर्धा येथे स्थापन झाली. एकाच संस्थेतील श्रमिक एकत्रित येऊन सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करतात. अशा संस्थेच्या सभासदांना पगाराच्या ठराविक प्रमाणात संस्थेकडून कर्ज घेता येते व त्याची व्याजासहित दरमहा परतफेड करता येते. या संस्थांची जिल्ह्यातील स्थिती पुढील विवरणपत्रावरून स्पष्ट होते

(आकडे जून अखेरचे)

(हजार रुपये)

बाब	१९६६	१९७४	१९८२	१९८८
संस्थांची संख्या ..	१४	२८	५८	७९
सभासद संख्या ..	३,०००	६,०००	१०,२५२	११,८६१
भाग भांडवल ..	८९	८,३७	३६,५४	१,५३,१८
मालकीचा निधी ..	६२	५८	३,८४	२६,३०
ठेवी ..	२,७५	३२	५,०८	१६,६७
खेळते भांडवल ..	४,६८	१७,०६	उ. ना.	उ. ना.
येणे कर्ज ..	उ. ना.	उ. ना.	३४,७६	२,३९,२३
नफा झालेल्या संस्थांची संख्या	१०	२३	उ. ना.	उ. ना.
नफ्याची रक्कम ..	५	४५	२,६८	७०,८१
तोटा असलेल्या संस्था ..	२	..	उ. ना.	उ. ना.
तोट्याची रक्कम ..	१	..	१,६४	९८

नागरी सहकारी बँका : नागरी बँकांचा मुख्य उद्देश सभासदांना व्यापार, मालमत्ता खरेदी, लग्नकार्य, शिक्षण इत्यादींसाठी कर्ज देणे हा असतो. शिवाय या बँका शेतीसाठी देखील पतपुरवठा करतात. सर्वसाधारण बँक व्यवहाराव्यतिरिक्त वसुली विजेची देयके व कराचे पैसे भरणे ही कामेदेखील करतात.

जिल्ह्यातील पहिली नागरी सहकारी बँक १९६० मध्ये वर्धा येथे स्थापन झाली. जिल्ह्यातील नागरी बँकांची आकडेवारी खालील विवरणपत्रात दिली आहे.

(लाख रुपये)

बाब	१९८१–८२	१९८६–८७	१९८७–८८
संख्या ..	२	३	३
सभासद संख्या ..	७,१५४	१२,८०१	१३,९७९
वसूल भाग भांडवल ..	२२.४७	४५.२९	५०.७६
राखीव व इतर निधी ..	८.३४	१९.७३	२२.५८
ठेवी ..	१८३.५१	४८०.३२	५९५.०४
दिलेले कर्ज ..	१९५.६७	४३३.६१	५५३.०९
येणे कर्ज ..	१७७.२७	४६४.५४	५५१.७८
नफा झालेल्या संस्थांची संख्या	२	२	२
तोटा झालेल्या संस्थांची संख्या	..	१	१

शेतकी बिगर पतसंस्था : या संस्थांमध्ये प्रामुख्याने खरेदी-विक्री संस्था, शेतमाल प्रक्रिया संस्था, दुग्धोत्पादक संस्था, पशुसंवर्धन संस्था, जलसिंचन संस्था, मत्स्यव्यवसाय संस्था, सहकारी शेती संस्था आणि पाणीपुरवठा संस्था यांचा अंतर्भाव होतो.

सहकारी खरेदी-विक्री संस्था : सहकारी शेतमाल खरेदी-विक्री संस्था जिल्हा व तालुका पातळीवर कार्य करतात. व्यक्तिगत शेतकरी व त्यांच्या प्राथमिक सेवा सहकारी संस्था सहकारी शेतमाल खरेदी-विक्री संस्थांचे सभासद असतात. या संस्था सभासद शेतकऱ्यांच्या वतीने त्यांच्या मालाच्या विक्रीबाबत दलाली स्वरूपाचे व्यवहार, मालाची साठवणूक व वाहतुकीची व्यवस्था, पिकाच्या तारणावर ताबेगहाण कर्जवाटप, शक्य असेल तर शेतमाल प्रक्रियेची व्यवस्था, पीक उत्पादनासाठी खते, बी-बियाणे व जंतुनाशक औषधे पुरविणे शेतीच्या अवजारांचा पुरवठा, बाजारपेठेतील किमतींची सभासदांना माहिती पुरविणे इत्यादी कामे करतात.

जिल्ह्यातील पहिली खरेदी-विक्री संस्था १९२९ मध्ये वर्धा येथे स्थापन झाली. पुढील विवरणपत्रात जिल्ह्यातील खरेदी-विक्री संस्थांची माहिती दिलेली आहे.[१०]

(हजार रुपये)

बाब	१९८१–८२	१९८६–८७	१९८७–८८
संस्था ..	७	८	८
सभासद ..	१०,१३२	८,५१९	८,८११
वसूल भाग भांडवल ..	१७,९४	३०,८२	३२,७७
राखीव निधी ..	३९,७८	३२,८२	३२,२९
इतर निधी ..	३७,८४	८५,८७	९०,७०
कर्ज ..	९,५७	२६,३७	४०,९६
नफा ..	४,८५	४,२६	३,९२
शेती उपयोगी माल विक्री	२,०५,९०	४,२१,७४	४,०७,२९
शेती उत्पादित माल विक्री	४८,५१	२,०६,४६	१,८२,४४
ग्राहक उपयोगी वस्तू विक्री	१,६२,०२	१,६४,३०	१,८२,७८
तोटा ..	..	..	३०

[१०] जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा जिल्हा.

कृषी माल प्रक्रिया संस्था : शेतमालावर कमीअधिक प्रमाणात प्रक्रिया करून ग्राहक उपयोगी वस्तू बनविण्याचे कार्य कृषी माल प्रक्रिया संस्था करीत असतात. या संस्था अशा तऱ्हेचा खाजगी व्यवसाय करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती यांची कृषी मालाच्या प्रक्रियेमधील मक्तेदारी दूर करण्यास मदत करतात. त्याद्वारे या संस्था कृषी मालाचे उत्पादन व वितरण यामधील महत्त्वाचा दुवा साधतात. या संस्थांना राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळामार्फत केंद्र व राज्य शासनातर्फे मदत मिळते. दीर्घ मुदतीची कर्जे औद्योगिक वित्त महामंडळ व आयुर्विमा महामंडळाकडून मिळतात.

जिल्ह्यातील पहिली कृषी माल प्रक्रिया संस्था १९६० मध्ये वर्धा येथे स्थापन झाली. ती कापूस प्रक्रिया सहकारी संस्था होती. इ. स. १९८०–८१ मध्ये जिल्ह्यात ११ कृषी माल प्रक्रिया संस्था होत्या, त्यात वाढ होऊन १९८४–८५ मध्ये त्यांची संख्या १७ झाली.

पुढील विवरणपत्रात कृषी माल प्रक्रिया संस्थांची आर्थिक स्थिती दिली आहे.

(हजार रुपये)

बाब	१९८१–८२	१९८६–८७	१९८७–८८
संस्थांची संख्या— ..	१५	१७	१७
अ) कापूस प्रक्रिया ..	१५	१६	१६
ब) गूळ खांडसरी ..	..	१	१
सभासद ..	६,७४१	८,९६२	९,१०७
वसूल भाग भांडवल ..	२५,९६	३३,१६	३४,७१
निधी ..	२८,०८	७०,७०	९१,९३
ठेवी ..	५,५०	२८	३,६०
कर्जे ..	२७,५६	६८,२१	८२,६२
नफा ..	६८	१,२७	२,९९
तोटा ..	२,३०	११,६६	११,३६

दुग्ध व्यवसाय सहकारी संस्था : या संस्था खेड्यापाड्यांतून आपल्या सभासदांकडून दूध गोळा करून जिल्हा पातळीवरील दुग्ध उत्पादन संघाकडे प्रक्रिया व विक्रीसाठी पाठवितात. व्यवस्थापन खर्चासाठी स्थापनेपासून सुरुवातीची तीन वर्षे त्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. या संस्था दूध उत्पादन वाढविणे, दुभत्या जनावरांची निगा राखणे, दुधाची व दुग्ध पदार्थांच्या वाहतुकीची व विक्रीची व्यवस्था करणे, जनावरांना खाद्याचा पुरवठा करणे इत्यादी कामे करतात. दुभत्या जनावरांच्या खरेदीसाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, प्राथमिक सेवा सहकारी संस्था अथवा दुग्ध व्यवसाय सहकारी संस्थांमार्फत मध्यम मुदतीची कर्जे पुरविते. दूध टिकवून त्याची प्रतवारी करण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी लागणारे दीर्घ मुदतीचे कर्ज जिल्हा मध्यवर्ती बँक पुरविते.

जिल्ह्यातील पहिली दुग्ध व्यवसाय सहकारी संस्था १९६१ मध्ये वर्धा येथे स्थापन झाली. पहिला दुग्ध व्यवसाय सहकारी संघ १९६१ मध्ये आर्वी येथे स्थापन झाला. जिल्ह्यातील सहकारी दूध संघाची आणि प्राथमिक दुग्ध व्यवसाय सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती पुढीलप्रमाणे होती.

सहकारी दूध संघ

(हजार रुपये)

बाब		१९८६–८७	१९८७–८८
दूध संघ संख्या	..	१	१
सभासद संख्या	..	६५	८८
वसूल भाग भांडवल	..	७	९
राखीव व इतर निधी	..	..	४,३२
कर्जे	..	..	१२,१२
दूध खरेदी (लिटर)	..	..	५१,९२,९८७
खेळते भांडवल	..	५,६९	३०,२०
नफा	..	..	..
तोटा	..	..	२,१४

प्राथमिक सहकारी दूध संस्था

(हजार रुपये)

बाब		१९८१–८२	१९८६–८७	१९८७–८८
संस्थांची संख्या	..	१९५	२३९	२४७
सभासद संख्या	..	६,७६९	१०,६५८	१०,९२३
वसूल भाग भांडवल	..	५,१३	६,०८	उ. ना.
राखीव व इतर निधी	..	२,९४	३,८९	उ. ना.
कर्जे	..	२१	१५	उ. ना.
दूध खरेदी (लिटर)	..	६८,४८,४०४	१,१४,३५,४५६	५७,४०,७५०
शासकीय योजनेस दिलेले दूध (लिटर)		६२,७५,५८९	९२,७०,८४८	५१,९२,९८७
खेळते भांडवल	..	१७,३५	२४,६७	..
नफा	..	२,५८	८७	..
तोटा	..	८९	१,२६	..

मच्छीमार सहकारी संस्था : जिल्ह्यातील पहिली मच्छीमार सहकारी संस्था १९६३ मध्ये आर्वी येथे स्थापन झाली व जिल्हा मच्छीमार सहकारी संघ वर्धा येथे १९८२ मध्ये स्थापन करण्यात आला. या संस्थांची माहिती पुढे दिली आहे.[११]

[११] किता.

(हजार रुपये)

बाब		१९८१–८२	१९८६–८७	१९८७–८८
संस्थांची संख्या	..	१४	२३	२५
सभासद संख्या	..	१,०९१	१,६४६	१,७०६
वसूल भाग भांडवल	..	४९	९५	१,०३
राखीव व इतर निधी	..	१४	२७	२७
कर्जे	..	४	५	..
पकडलेले मासे (मे. टन)	..	४	३,५५३	२,७१८
किंमत	..	९७	१,४४	१,३६
विक्री	..	१,१९	१,५४	१,५९
नफा	..	३	१६	१३
तोटा	..	६	३७	४८

बिगर शेतकी बिगर पतसंस्था : या संस्थांमध्ये विणकर संस्था, औद्योगिक व बलुतेदार संस्था, ग्राहक भांडारे, गृहनिर्माण संस्था, मजूर संस्था, जंगल कामगार व औद्योगिक वसाहती या सहकारी संस्थांचा अंतर्भाव होतो. या संस्था प्रत्यक्ष पतपुरवठा करीत नसून ठराविक उद्दिष्टपूर्तीसाठी असतात.

विणकर संस्था : जिल्ह्यातील पहिली हातमाग विणकर संस्था १९४५ मध्ये व पहिली यंत्रमाग विणकर संस्था १९४४ मध्ये हिंगणघाट येथे स्थापन झाली. इ. स. १९८०–८१ मध्ये जिल्ह्यात असलेल्या ११ विणकर संस्थांची संख्या १९८५–८६ मध्ये १३ झाली. त्यांची आर्थिक स्थिती पुढीलप्रमाणे होती.

(हजार रुपये)

बाब		१९८४–८५	१९८५–८६
संस्थांची संख्या	..	१३	१३
सभासद संख्या	..	१,९८०	१,९८०
एकूण भाग भांडवल	..	११,८७	११,९४
शासकीय सहभाग	..	५,०९	५,०९
स्वत:चा निधी	..	२,८७	३,४५
ठेवी	..	२१	३,३९
खेळते भांडवल	..	२२,५३	१९,०६
नफा मिळालेल्या संस्था	..	६	५
नफा	..	१२	२१
तोटा आलेल्या संस्था	..	५	६
तोटा	..	७५	७९
नफा किंवा तोटा न झालेल्या संस्था		२	२

गृहनिर्माण संस्था : पहिली गृहनिर्माण संस्था १९५६ मध्ये वर्धा येथे स्थापन झाली. जिल्ह्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांची १९८१–८२, १९८६–८७ व १९८७–८८ मधील आर्थिक स्थिती पुढीलप्रमाणे होती.

(हजार रुपये)

बाब	१९८१–८२	१९८६–८७	१९८७–८८
संस्थांची संख्या (प्रत्यक्ष)	९१	१४९	१,५८
सभासद संख्या ..	४,२४०	५,३२९	५,४५६
वसूल भाग भांडवल ..	४,४२	७,८०	९,११
राखीव व इतर निधी ..	१,६०	५,१५	६,२०
बांधलेली घरे (प्रत्यक्ष) .	२१७	५११	७४४
कर्जे— ..	४०,०५	७४,६७	९७,२६
अ) सरकारी ..	१,१९	१,४८	१,४८
ब) हाऊसिंग फायनान्स	३३,६४	५५,५४	३०,१४
क) इतर ..	५,२२	..	३९,८२
ड) हाऊसिंग व अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन	..	१७,६५	२५,८२

ग्राहक सहकारी संस्था : जिल्ह्यातील पहिली किरकोळ ग्राहक सहकारी संस्था १९४५ मध्ये वर्धा येथे सुरू झाली. जिल्ह्यातील किरकोळ ग्राहक भांडारांची माहिती पुढील विवरणपत्रामध्ये दिली आहे.

(हजार रुपये)

बाब	१९८१–८२	१९८६–८७	१९८७–८८
संस्थांची संख्या ..	५४	५७	६२
सभासद संख्या ..	७,९२९	११,२३७	१२,१९२
वसूल भाग भांडवल ..	२,७६	४,१६	४,५५
निधी ..	३,५५	४,९८	५,१६
ठेवी ..	३५	३४	२९
कर्जे ..	३	१,८१	१,८१
खरेदी ..	८३,७१	८८,४७	८५,१६
विक्री ..	८९,०६	९७,९६	१,०६,२६
नफा ..	८१	१,७०	१,९९
तोटा ..	४१	५७	५९

जिल्ह्यात एक घाऊक ग्राहक संस्था स्थापन झालेली आहे. या संस्थेची आर्थिक स्थिती व कार्य पुढील विवरणपत्रात दर्शविले आहे.

(हजार रुपये)

बाब		१९८६–८७	१९८७–८८
संस्थांची संख्या	..	१	१
सभासद संख्या	..	१,०३०	१,०३०
वसूल भाग भांडवल	..	१,४१	१,४१
निधी	..	१	१
ठेवी	..	१०	१०
खरेदी	..	१,८६	१,७७
विक्री	..	१,०३	१,१२
नफा	..	..	..
तोटा	..	५६	७

व्यापारी बँका

इ. स. १९१२ मध्ये वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही पहिली बँक वर्धा येथे स्थापन झाली आणि ३१ डिसेंबर १९४९ रोजी भूतपूर्व इंपिरिअल बँकेच्या पहिल्या शाखेची तेथेच स्थापना झाली. सन १९५१ मध्ये वर्धा येथे पंजाब नॅशनल बँकेची शाखा उघडली. सन १९५५ मध्ये इंपिरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर वर्धा शाखा स्टेट बँक ऑफ इंडिया या नावाने काम करू लागली. यानंतर १४ जुलै १९६९ रोजी देशातील १४ मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. १९७५ मध्ये आणखी काही बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. राष्ट्रीयीकरणानंतर बँक व्यवसायाचे विकेंद्रीकरण होऊन विकासास वेग आला. इ. स. १९६६ मध्ये जिल्ह्यात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या तीन शाखा व इतर संयुक्त भांडवली बँकांच्या सहा शाखा होत्या.

अनुसूचित व्यापारी बँका : रिझर्व्ह बँकेचे संयुक्त भांडवली बँकांशी प्रस्थापित झालेल्या संबंधांवरून त्यांची विभागणी अनुसूचित व्यापारी बँका व अननुसूचित व्यापारी बँका अशा दोन प्रकारच्या बँकांत केली जाते. ज्या बँकांचे जमा झालेले भांडवल आणि शिल्लक ५ लाख रुपये अगर त्यापेक्षा जास्त असेल अशा बँकांचा निर्देश अनुसूचित बँका असा केला जातो. वर्धा जिल्ह्यात ३१ डिसेंबर १९८७ रोजी[१२] अस्तित्वात असलेल्या अनुसूचित व्यापारी बँकांची नावे व त्यांच्या शाखांची ठिकाणे पुढे दर्शविली आहेत.

[१२] **ॲक्शन प्लॅन : १९८७, वर्धा डिस्ट्रिक्ट,** बँक ऑफ इंडिया.

बँक		शाखांची संख्या	ठिकाणे
स्टेट बँक ऑफ इंडिया	..	१६	अल्लीपूर, आर्वी (२), देवळी, गिरड, हिंगणघाट, कारंजा, पुलगाव, समुद्रपूर, सारवाडी, निंभा, विरूळ, वाढोणा, वायगाव, वर्धा (२).
बँक ऑफ महाराष्ट्र	..	९	अंजी, आर्वी, हिंगणघाट, कन्नमवारग्राम, केळझर, नंदोरी, पुलगाव, तळेगाव, वर्धा.
बँक ऑफ बडोदा	..	३	आर्वी, वायफड, हिंगणघाट.
युनायटेड वेस्टर्न बँक	..	२	आर्वी, वर्धा.
बँक ऑफ इंडिया	..	१७	आष्टी, भिडी, हिंगणघाट, हिंगणी, जाम, कानगाव, मांडगाव, मोरांगणा, नाचणगाव, पुलगाव, रोहणा, साहूर, सेलू, ठाणेगाव, कांढळी, वडनेर, वर्धा.
सेंट्रल बँक ऑफ इंडिया	..	६	पवनार, सालोड (हिरापूर), सेवाग्राम, झडशी, वर्धा (एम.आय.डी.सी.), वर्धा.
पंजाब नॅशनल बँक	..	२	हिंगणघाट, वर्धा.
अलाहाबाद बँक	..	४	सिंदी, विजयगोपाल, वर्धा, वर्ध-मनेरी.
आंध्र बँक	..	१	वर्धा
सिंडिकेट बँक	..	१	वर्धा
युनियन बँक ऑफ इंडिया	..	१	वर्धा

सन १९७०, १९८०, १९८५ आणि १९८८ मधील जून अखेर जिल्ह्यातील बँक कार्यालयांची संख्या, ठेवी व कर्जविषयक आकडेवारी खाली दिली आहे.

बाब		१९७०	१९८०	१९८५	१९८८
बँक कार्यालयांची संख्या	..	१२	३६	६२	६४
ठेवी (लाख रुपये)	..	२७०	२,०६०	५,१६८	६,८५७
दिलेले कर्ज (लाख रुपये)		२४८	१,०४९	३,१११	४,५५५

सन १९८०, १९८५ आणि १९८६ जून अखेर अस्तित्वात असलेल्या व्यापारी बँकांची केंद्रनिहाय माहिती खाली दिली आहे.[१३]

(लाख रुपये)

केंद्र	ठेवी			दिलेले कर्ज			बँक कार्यालयांची संख्या		
	१९८०	१९८५	१९८६	१९८०	१९८५	१९८६	१९८०	८५	८६
आर्वी ..	२,५६	६,५४	६,७१	२,५३	५,७९	५,३८	५	५	५
हिंगणघाट	३,९५	८,४५	९,९५	१,९८	४,६६	५,९६	५	५	५
पुलगाव ..	२,२६	४,६५	६,००	५४	२,२३	३,३०	३	३	३
वर्धा ..	८,९६	२१,०३	२४,४८	३,८३	८,६३	९,१३	९	१२	१२
इतर ..	२,८७	११,०१	१४,४३	१,६१	९,८०	११,३०	१४	३७	३८
एकूण ..	२०,६०	५१,६८	६१,५७	१०,४९	३१,११	३५,०७	३६	६२	६३

व्यापारी बँकांनी १९७३ मध्ये २८१.७७ लाख, १९८० मध्ये १००७.१० लाख, १९८३ मध्ये १८३५.८६ लाख व १९८५ मध्ये २८६५.३८ लाख रुपयांचा पतपुरवठा केला. व्यापारी बँकांनी जिल्ह्यातील विविध व्यवसायांना केलेल्या पतपुरवठ्याचे वर्गीकरण खाली दिले आहे.

(आकडे जून अखेरचे) (हजार रुपये)

व्यवसाय	१९८३		१९८५	
	खात्यांची संख्या	पतपुरवठा रक्कम	खात्यांची संख्या	पतपुरवठा रक्कम
कृषि आणि संलग्न सेवा ..	२७,३३५	९,३९,१४	३६,७८१	१४,२६,२४
उद्योगधंदे ..	५४९	४,१३,७९	१,३८३	६,४२,५९
व्यापार ..	२,६८१	१,७५,११	४,९०३	२,९१,५८
वैयक्तिक कर्ज ..	३,७५३	१,२९,५९	५,४९३	२,८३,७२
इतर ..	४,०५८	१,७८,२३	४,५१४	२,२१,३५
एकूण बँक कर्ज ..	३८,३७६	१८,३५,८६	५३,०७४	२८,६५,३८
त्यापैकी लघुउद्योगधंद्यासाठी	४४९	१,९८,३२	१,०८१	३,७४,०५

[१३] रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून प्राप्त झालेली माहिती.

आयुर्विमा

लाईफ इन्शुरन्स (इमर्जन्सी प्रोव्हिजन्स) ऑर्डिनन्स, १९५६, अनुसार आयुर्विम्याचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून आयुर्विमा महामंडळ ही एकमेव संघटना देशात आयुर्विम्याचा व्यवसाय करीत आहे. लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ॲक्ट, १९५६, अनुसार भारत सरकारने १ सप्टेंबर १९५६ रोजी आयुर्विमा महामंडळाची स्थापना केली. आयुर्विम्याच्या राष्ट्रीयीकरणापूर्वी अनेक खाजगी कंपन्या विमा व्यवसाय करीत असत. त्यामुळे त्यांच्यात स्पर्धा चालू असे. १९७२ मध्ये आग, दुर्घटना, सागरी विमा तसेच आयुर्विमेतर विम्यांचेही राष्ट्रीयीकरण करण्यात आले. आयुर्विमा महामंडळाच्या नवीन प्रशासकीय रचनेनंतर वर्धा जिल्ह्याचा अंतर्भाव पश्चिम परिमंडळातील नागपूर विभागाच्या प्रादेशिक अधिकारात करण्यात आला आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र शाखा असून वर्धा येथेही शाखा आहे. तक्ता क्रमांक २ मध्ये राष्ट्रीयीकरणानंतर आयुर्विमा व्यवसायाची मोठ्या प्रमाणावर झालेली भरभराट निदर्शनास येते.

अल्पबचत योजना

दुसऱ्या महायुद्धामुळे निर्माण झालेल्या आर्थिक दुरावस्थेवर एक उपाय म्हणून ब्रिटिशांनी १९४५ मध्ये अल्पबचत योजना कार्यान्वित केली. प्रारंभी त्यास फारसा प्रतिसाद नव्हता, कारण ब्रिटिशांच्या ध्येयधोरणांबद्दल जनमानसात साशंकता होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नियोजन कार्यासाठी निधी उभारण्यासाठी सरकारने या योजनेचा पुरस्कार केला. कालांतराने योजना फारच लोकप्रिय झाली. तक्ता क्रमांक ३ मध्ये जिल्ह्यातील विविध अल्पबचत योजनांतर्गत एकूण व नक्त जमा दर्शविली आहे.

सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी : ही योजना कमाल १५ वर्षांच्या कालावधीची असून वर्षाला ९.५ टक्के दराने कर्ज व पैसे काढण्याची सोय उपलब्ध आहे. इ. स. १९८६–८७ आणि १९८७–८८ मध्ये जिल्ह्यातील नवीन खात्यांची संख्या अनुक्रमे ५४४ आणि ९१७ होती. या योजनेअंतर्गत ठेवीवर मिळणारे १२ टक्के दराचे चक्रवाढ व्याज करमुक्त असते. जिल्ह्यातील या योजनेअंतर्गत १९७४–७५, १९८४–८५ आणि १९८७–८८ या कालावधीतील एकूण संचयन अनुक्रमे ३.४१ लाख, ८.२४ लाख व २२.०० लाख रुपये होते, तर या कालावधीतील निव्वळ संचयन अनुक्रमे २.४१, ०.६७ आणि २२.०० लाख रुपये होते.

संचयिका : इ. स. १९६५ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत प्रत्येक शाळेत सर्व विद्यार्थ्यांचे मिळून एक बचत खाते उघडण्यात येऊन शाळेतील अधिकाऱ्यांमार्फत ही योजना राबविली जाते. जिल्ह्यातील या योजनेची आकडेवारी खाली दिली आहे.

बाब	१९७६–७७	१९८६–८७	१९८७–८८
कार्यरत संचयिकांची संख्या ..	११६	९४	९१
सभासद संख्या ..	३९,६००	३२,९००	३३,५०९
गुंतवणूक (कोटी रुपये) ..	उ. ना.	०.०४	०.०४

कृषि अर्थसहाय्य

तगाई कर्ज : लँड इम्प्रूव्हमेंट लोन्स अॅक्ट, १८८३ अनुसार स्वातंत्र्यपूर्व काळात शेती विकासासाठी शेतकऱ्यांना शासन अर्थसहाय्य देत असे. याला 'तगाई कर्ज' असे संबोधण्यात येत असे. या अधिनियमानुसार शेतकरी प्रामुख्याने विहिरी खोदण्यासाठी कर्ज घेत असत. तलावाद्वारे सिंचन व बांधबंदिस्ती करण्याकडे त्यांचा फारसा कल नसे. या अधिनियमाखाली १९०० च्या दुष्काळात बियाणे व बैल खरेदी करण्यासाठी १,४२,३८० रुपयांचे कर्ज सरकारने दिले होते.[१४] या रकमेशिवाय १८८१ ते १९०४ या कालावधीत लँड इम्प्रूव्हमेंट लोन्स अॅक्ट अनुसार शेतकऱ्यांना ३२,००० रुपयांचे कर्ज देण्यात आले होते. त्यापैकी ६,००० रुपयांची सूट देऊन उर्वरित रक्कम व्याजासह वसूल करण्यात आली होती. ही सूट १९०० च्या विशेष दुष्काळ कर्जाअंतर्गत सूट देण्याच्या कार्यक्रमाचाच एक भाग होता. परंतु या अधिनियमाखाली दिलेल्या कर्जामुळे सरकारला कोणत्याही प्रकारचा तोटा झाला नाही. इ. स. १८९२ ते १९०४ या कालावधीत ९४ जमीन मालक व ३४४ कुळे अशा एकूण ४३८ सनदींना विविध सुधारणांसाठी मंजुरी देण्यात आली होती. यापैकी ५० सनदींना बांधबंदिस्तीसाठी आणि इतरांना विहिरी खोदण्यासाठी मंजुरी दिली होती. मंजूर झालेल्या सनदींपैकी बहुतांश सनदी १९०० च्या दुष्काळात हाती घेतलेल्या कामासाठी होत्या. खोदलेल्या विहिरींचा उद्देश प्रामुख्याने त्या वर्षातील गंभीर पाणी टंचाई दूर करणे हा होता. त्यांचा सिंचनासाठी उपयोग हा एक दुय्यम हेतू होता.[१५]

अॅग्रिकल्चरिस्ट लोन्स अॅक्ट, १८८४ अंतर्गत वर्धा जिल्ह्यात १८८४ ते १९०३–०४ या कालावधीत ३.१७ लाख रुपयांचे कर्ज देण्यात आले. त्यापैकी १.५० लाख रुपये १९००–०१ च्या दुष्काळात दिले होते. वर नमूद केल्याप्रमाणे यापैकी बरीच मोठी रक्कम नंतर लँड इम्प्रूव्हमेंट लोन्स अॅक्टच्या खात्यात लेखांतरित करण्यात आली होती.[१६]

उपरोक्त १८८३ आणि १८८४ चे अधिनियम व बिगर शेतकरी कर्ज अधिनियम, १९२८ (Non-Agriculturist Loans Act) मधील तरतुदींनुसार विविध कारणांसाठी मंजूर करण्यात आलेल्या सर्व तगाई कर्जापोटी खातेदारांकडून देय असलेल्या अद्यावत कर्जाच्या रकमेची वसुली व्याजासह माफ करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने १९८८ मध्ये घेतला. त्यानुसार ७ नोव्हेंबर १९८८ पर्यंत तगाई कर्जाच्या रकमेची व्याजासह वसुली माफ करण्यात आली. त्याबाबतची अंमलबजावणी तालुका पातळीवर तगाईखाती बंद करून तहसिलदारांकडे सोपविण्यात आली.

महाराष्ट्र शासनाने २२ सप्टेंबर १९७३ पासून तगाई कर्ज वाटप बंद केले असून आता शेतकऱ्यांच्या दीर्घ, मध्यम व अल्प मुदतीच्या कृषिविषयक आर्थिक गरजा सहकारी संस्था, वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँक व राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत भागविल्या जातात. यापैकी सहकारी संस्थांव्यतिरिक्त इतरांना पुर्नवित्तपुरवठा करण्याचे कार्य राष्ट्रीय कृषि आणि ग्रामीण विकास बँक (NABARD) करते.

---

[१४] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९०६, पृ. १२६.**

[१५] **कित्ता.**

[१६] **कित्ता, पृ. १२७.**

महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँक : ही बँक जमीन सुधारणा, नवीन विहिरी खोदणे, जुन्या विहिरी दुरुस्त करणे, विद्युत पंप, ऑईल इंजिन, ट्रॅक्टर खरेदी इत्यादी बाबींकरिता कर्जपुरवठा करते. याशिवाय अल्पभूधारक व नवभूधारकांना मेषपालन, बकरीपालन, वराहपालन, कुक्कुटपालन, गोबर गॅस इत्यादींसाठी भांडवली कर्जपुरवठा करते. नाबार्डकडून या बँकेला पुर्नवित्त पुरवठा होतो. इ. स. १९७०–७१ पासून वर्धा जिल्हा शाखेने कृषी क्षेत्रात केलेल्या पतपुरवठ्याची आकडेवारी खाली दिली आहे.

(लाख रुपये)

उद्देश	१९७०–७१	१९७५–७६	१९८०–८१	१९८४–८५
नवीन विहिरी ..	२५.५४	१२२.२९	०.४८	०.४३
जुन्या विहिरी ..	१४.०२	२२.५२	१.८२	१.४२
विद्युत पंप ..	९.७४	११.०२	४.३४	४.०४
नवीन विहिरीवर विद्युत पंप	..	..	१३०.५१	३७.२५
जुन्या विहिरीवर विद्युत पंप	..	..	१०.७१	..
ऑईल इंजिन ..	..	..	०.४४	०.२२
थ्रेशर ..	..	..	२.८८	३.२५
ट्रॅक्टर ..	..	..	०.८८	३.२५
गायी खरेदी ..	..	..	०.७९	०.८७
पाईपलाईन ..	..	०.८०	२.२०	१.७२
गोबर गॅस ..	..	..	०.१८	०.५१
शेतघर ..	..	..	०.०९	०.१०
जमीन सुधारणा ..	६.१७	०.०९	..	..
साखर कारखाना ..	..	..	..	२.८५
इतर ..	..	३.२३	..	..
फळबाग ..	..	..	..	०.१७
एकूण पतपुरवठा ..	५५.४७	१५९.९५	१५५.३२	५६.०८
एकूण वसुली ..	१८.६९	५२.९५	४९.७८	९१.०२

मध्यवर्ती वित्त संस्था : वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मध्यवर्ती वित्त संस्था म्हणून कार्य करते. खालील विवरणपत्रात शेतकी कर्जवाटपाचे व वसुलीचे आकडे दिलेले आहेत.

(लाख रुपये)

बाब	१९८२–८३	१९८४–८५	१९८६–८७	१९८७–८८
वर्षारंभी कर्ज खाते बाकी ..	६,३२.५४	७,६५.२१	६,९९.३८	८,२८.१०
वर्षातील कर्ज वाटप ..	४,७५.७२	४,३२.२९	५,४९.३२	३,१५.८०
एकूण घेणे कर्ज ..	११,०८.२६	११,९७.५०	१२,४८.७०	११,४३.९०
वर्षभरात झालेली वसुली ..	४,७१.७५	३,४८.४९	४,२०.६०	३,५१.५५
वर्ष अखेर येणे कर्ज बाकी ..	६,३६.५१	८,०९.०१	८,२८.१०	७,९२.३५
त्यापैकी थकीत कर्ज ..	४,५५.६०	६,१८.८९	५,५८.४५	७,१३.१४
कर्ज वसुलीचे मागणीशी शेकडा प्रमाण	५० टक्के	३८ टक्के	३६.६१ टक्के	३४ टक्के
थकबाकीचे मागणीशी शेकडा प्रमाण	५० टक्के	६२ टक्के	६३.३९ टक्के	६६ टक्के

सन १९८० पासून ही बँक व्याज सुटीची योजना राबवित आहे. विहित कालावधीत वसूल देणाऱ्यास ३ टक्के व्याजाच्या सुटीचे धोरण बँकेने राबविले. सदर योजनेचा लाभ ११,५०० शेतकऱ्यांनी घेतला.

जिल्ह्यातील आठही तालुक्यांकरिता खरीप हंगामातील ज्वारी व तूर आणि रबी हंगामातील गव्हाच्या पिकांकरिता शासनाने १९८६–८७ मध्ये पीक विमा योजना लागू केली. सन १९८६–८७ व १९८७–८८ या दोन वर्षांत बँकेने खरीप हंगामात अनुक्रमे ५.५७ लाख व ३.७७ लाख रुपये तसेच रबी हंगामाकरिता अनुक्रमे ०.३० लाख व ०.१० लाख रुपयांचा प्रिमियम विमा कंपनीकडे भरला. सन १९८६–८७ खरीप हंगामातील नुकसान भरपाईची रक्कम १६१.८१ लाख रुपये सभासदांना वाटप करण्यात आली.

ही बँक बैलजोडी, गोठा, विहीर दुरुस्ती, दुभत्या जनावरांची खरेदी तसेच प्रक्रिया संस्थांचे हिस्से घेण्यासाठी तीन वर्ष मुदतीकरिता मध्यम मुदती कर्ज देते. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत मध्यम मुदती कर्जाचे वाटप करते. तसेच ऑईल इंजिन, इलेक्ट्रिक पंप संच, पाईपलाईन, गोबर गॅस प्लँट आणि थ्रेशरकरिता पाच वर्षे मुदतीसाठी कर्ज देते. ट्रॅक्टरकरिता सात वर्षे मुदतीसाठी कर्ज देण्यात येते. बँक नवीन विहीर खोदाई, तुषार जलसिंचन व उपसा जलसिंचन योजना राबवित आहे.

सन १९८७–८८ मध्ये सर्व प्रकारची ३५३.०४ लाख रुपये मध्यम मुदती कर्जे (रूपांतरित कर्जे धरून) येणेबाकी होते. त्यापैकी ६८.१० लाख रुपये थकीत होते.

राष्ट्रीय कृषि आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) : या बँकेची स्थापना नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंट ॲक्ट, १९८१ अन्वये जुलै १९८२ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा कृषी पतपुरवठा विभाग, ग्रामीण नियोजन व पत विभाग आणि कृषी पुर्नवित्त महामंडळ यांचे विलीनीकरण करून झाली. ही बँक ग्रामीण पतपुरवठ्याच्या संघटित संरचनेत शिखर संस्था म्हणून कार्य करते. या बँकेने ग्रामीण भागातील उत्पादक कार्यक्रमासाठी वित्तपुरवठा करणाऱ्या विविध सहकारी संस्था, अनुसूचित व्यापारी बँका, राज्य भूविकास बँक, राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक अशा संस्थांना पुर्नवित्त पुरवठा करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. वर्धा जिल्ह्यात कृषी विकासासाठी १९८२ पासून १९८५ पर्यंत एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम वगळून २३ योजना मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यासाठी २४०.०७४ लाख रुपये कर्ज मंजूर केले होते. त्याबद्दलची माहिती खाली दिली आहे.

योजना		एकूण कर्जाशी प्रतिशत प्रमाण
पंपसंचाचे ऊर्जीकरण	..	५७
लघुसिंचन	..	२५
शेती-यांत्रिकीकरण	..	१४
दुग्धशाळा	..	३
साठवण, बाजारतळ	..	१
एकूण	..	१००

या सर्व योजनांचे लाभार्थी बहुतांश लहान शेतकरी असतात.

उद्योगांना अर्थसहाय्य

राज्यातील विकसनशील व अविकसित भागांचा औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी राज्य शासनाने १९६२ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि १९६६ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ स्थापन केले. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ मध्यम व लघु उद्योजकांना वित्तीय पुरवठा करते. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ ही या क्षेत्रातील आणखी एक संस्था होय.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC– स्थापना १९६२) : महामंडळाच्या कार्याचा आढावा घेताना (१) जागांचा विकास आणि वाटप, (२) गाळ्यांची बांधणी आणि वाटप, (३) औद्योगिक वसाहत क्षेत्रे विकसित करण्यावर केलेला खर्च, (४) उत्पादन चालू असलेल्या उद्योगधंद्यांमधील भांडवल गुंतवणूक आणि (५) विकास उत्पादन घटकांमध्ये उपलब्ध झालेला रोजगार, या बाबी विचारात घेतल्या आहेत. महामंडळाने जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा खाली घेतला[१७] आहे.

[१७] **महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल** (नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, १९८४).

या महामंडळाने स्थापनेपासून १९८३ पर्यंत जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात केलेल्या कार्याची माहिती पुढीलप्रमाणे :– जोडलेले भूखंड, १९३; दिलेले भूखंड, १५१; पाडण्यात आलेल्या भूखंडांची राज्याशी टक्केवारी, १.५३; देण्यात आलेल्या भूखंडांचे पाडण्यात आलेल्या भूखंडाशी प्रतिशत प्रमाण, १६.३०; औद्योगिक वसाहतीच्या विकासावरील खर्च, १४४.९९ लाख रुपये; आणि औद्योगिक क्षेत्राच्या विकासामधील भांडवली गुंतवणूक, १५६ लाख रुपये.

महामंडळाने जिल्ह्यातील औद्योगिक विकासावर स्थापनेपासून मार्च १९८४ पर्यंत ५४.३४ लाख रुपये खर्च केले.[१८] त्यापैकी ७.३१ लाख रुपये १९८३–८४ मधील खर्च होता.

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (MSFC–स्थापना डिसेंबर १९५३) : ऑगस्ट १९६२ मध्ये पुनर्रचना केलेले हे महामंडळ सरकारी क्षेत्रातील कारखान्यांना २० लाख रुपयांपर्यंत व खाजगी उद्योजकांना १० लाख रुपयांपर्यंत कर्ज देऊ शकते.

महामंडळाचे नागपूरला प्रादेशिक कार्यालय असून त्याच्या कार्यक्षेत्रात वर्धा जिल्ह्याचा अंतर्भाव होतो. महामंडळाने स्थापनेपासून १९८५–८६ पर्यंत जिल्ह्यातील २९७ उद्योजकांना मंजूर केलेल्या ३०१.७१ लाख रुपयांपैकी २१४.३७ लाख रुपये वितरित केले.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक आणि गुंतवणूक महामंडळ (SICOM–स्थापना १९६६) : अविकसित भागांमध्ये उद्योगधंदे उभारणाऱ्या उद्योजकांना विविध सोयी सिकॉमतर्फे दिल्या जातात. प्रकल्पाची आखणी, प्रोत्साहन व सहाय्य, भांडवल गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन, उद्योग उभारणी सेवा, वित्त सहाय्य, भांडवल उभारणी आणि गुंतवणुकीला हमी, भाग भांडवली सहभाग या कामी सिकॉम उद्योजकांना मदत करते. केंद्र सरकारच्या योजनेनुसार मिळावयाचे भांडवल गुंतवणुकीवरील अर्थसहाय्यही सिकॉममार्फत देण्यात येते.

महामंडळाने जिल्ह्यात १९६६ ते मार्च १९७४ पर्यंत ३०.७२ लाख व १९७४ पासून १९८३ पर्यंत २.६८ लाख रुपये वित्त सहाय्य वितरित केले.

सिकॉमने सिकॉम वित्तपुरवठा योजनांतर्गत मार्च १९८७ पर्यंत जिल्ह्यात मंजूर केलेले कर्ज १९५.७२ लाख रुपये होते, तर वितरित कर्ज १२६.४३ लाख रुपये होते. तसेच पॅकेज स्किम ऑफ इंसेंटिव्हज, १९८३ अंतर्गत सिकॉमने मार्च १९८७ पर्यंत जिल्ह्यात मंजूर केलेले कर्ज १०६.८५ लाख रुपये होते, तर वितरित कर्ज ७३.५६ लाख रुपये होते.

भारतीय औद्योगिक विकास बँक (IDBI–स्थापना १९६४) : या बँकेने वर्ध्यासाठी वित्तपुरवठा करण्याचे कार्य १९७४–७५ मध्ये सुरू केले. इ. स. १९७४–७५ ते १९८५–८६ दरम्यान जिल्ह्यातील उद्योगघटकांना १८२८ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करून प्रत्यक्षात ८९६.३४ लाख रुपये पतपुरवठा केला. इ. स. १९८५–८६ मध्ये ५७५ लाख रुपये कर्ज मंजूर करून प्रत्यक्ष २७६.९५ लाख रुपयांचा पतपुरवठा केला.

---

[१८] **अर्थविवरण पत्रक आणि कामाचा कार्यक्रम, १९८५–८६,** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

भारतीय औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (स्थापना १९६५) : हे महामंडळ उद्योग-धंद्यांच्या विकासासाठी भारतीय तसेच विदेशी चलनात मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे, शेअर व डिबेंचरमध्ये गुंतवणूक व तद्‌विषयक हमी, उद्योजकांना व्यवस्थापकीय व तांत्रिक सहाय्य करते. डिसेंबर १९८६ पर्यंत जिल्ह्यातील तीन उद्योजकांना ३३२ लाख रुपयांचे कर्ज पुढीलप्रमाणे वितरित केले :—महाराष्ट्र एक्सप्लोसिव्हज १२९ लाख रुपये, नोबल एक्सप्लोकेम १९२ लाख व रायसाहेब रेखचंद ११ लाख रुपये.

विदर्भ विकास महामंडळ (स्थापना ३ डिसेंबर १९७०) : उपलब्ध साधनसामग्रीचा अधिकाधिक उपयोग करून औद्योगिक विकास व रोजगार निर्मिती करण्यास्तव शासनाने हे महामंडळ स्थापन केले. उद्योजकांना प्रोत्साहन, भांडवल निर्मिती व औद्योगिक संरचनेस सहाय्य करणे हे महामंडळाचे धोरण आहे. महामंडळ १८ ते ४० वयोगटातील एस. एस. सी. अथवा आय. टी. आय. उत्तीर्ण उद्योजकांना प्रकल्प किमतीच्या १० ते २२.५ टक्के बीज भांडवली अर्थसहाय्य देते. या कार्यक्रमांतर्गत महामंडळाने दिलेले बीज भांडवली अर्थ-सहाय्य पुढीलप्रमाणे होते.

(लाख रुपये)

वर्ष	घटक	बीज भांडवल	वर्ष	घटक	बीज भांडवल
१९७५–७६	७१	१.८४	१९८१–८२	२४५	७.००
१९७६–७७	१२४	२.३६	१९८२–८३	१८२	९.५०
१९७७–७८	१०१	१.९४	१९८३–८४	११९	८.००
१९७८–७९	१९३	३.७३	१९८४–८५	९७	९.००
१९७९–८०	२६८	४.०६	१९८५–८६	१२१	८.००
१९८०–८१	२४६	५.८५			

शिष्यवृत्ती योजनांतर्गत लघुउद्योग समूहातील उद्योजकांना प्रारंभीच्या काळात तग धरून राहण्यासाठी दरमहा १०० रुपये दराने सहा महिन्यांसाठी शिष्यवृत्ती देते. इ. स. १९८१–८२ ते १९८६–८७ या कालावधीत महामंडळाने जिल्ह्यातील ७१ उद्योग घटकांना ३०,८०० रुपयांची शिष्यवृत्ती दिली. अभियांत्रिकी उद्योजकांना व्याज अनुदान कार्यक्रमांतर्गत महामंडळाने १९८६–८७ पर्यंत जिल्ह्यातील दोन अभियांत्रिकी उद्योजकांना ३१,७४९ रुपये व्याज अनुदानाचे वाटप केले.

अविकसित क्षेत्रात नवीन उद्योगधंदे स्थापण्याच्या योजनेअंतर्गत महामंडळाने विविध सवलत योजनांखाली एकूण १२९ उद्योजकांना पुढीलप्रमाणे आर्थिक मदत केली.

(रुपये)

वर्ष	विक्रीकर सवलत	जकात सवलत	विशेष भांडवल उत्तेजनात्मक सवलत योजना			महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सवलत योजना १९७९
			१९७६	१९७९	१९८३	
१९७८–७९	..	..	६४,९१५	..	..	..
१९७९–८०	..	..	६७,२०२	..	..	..
१९८०–८१	..	..	९४,९५०	..	..	..
१९८१–८२	९,९६९	..	१,७६,३७७	१,३१,१६८	..	..
१९८२–८३	३६,४२८	..	३०,१२४	२,२४,६३८	..	..
१९८३–८४	२१,०४२	..	..	२,००,६५२	..	१९,७६१
१९८४–८५	१,२७,४५०	२,५१४	..	९,७४,६६४	३,०१,९३७	१,२६,९८४
१९८५–८६	८,०८०	..	..	४८,९७१	१,०६,२३४	..

विशेष भांडवल उत्तेजनात्मक सवलत योजना, १९८३–८४ मध्ये बंद करण्यात आली.

संयुक्त भांडवली कंपनी

दिनांक ५ मार्च १९३८ मध्ये स्थापन झालेली जमनालाल अँड सन्स ही जिल्ह्यातील पहिली संयुक्त भांडवली कंपनी होती. त्यानंतर कंपन्यांची संख्या पुढीलप्रमाणे वाढत गेली : १९७१–१४, १९७६–१५, १९८१–१५, १९८३–१८ व १९८७–२१.

बँक पत योजना

परंपरेनुसार व्यापारी बँका कृषी विकासासाठी पतपुरवठा करीत नसत. ही त्रुटी दूर करण्यास्तव स्टेट बँकेच्या पुढाकाराने बँक पत योजना कार्यान्वित करण्यात आली. बँकांकडील ठेवींच्या स्वरूपातील पैशाचा विनियोग कृषी उत्पादन वाढविण्यासाठी करणे हा या योजनेचा महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने "अग्रणी बँक" (Lead Bank) नियुक्त केलेली आहे. त्यानुसार वर्धा जिल्ह्यासाठी बँक ऑफ इंडियाला अग्रणी बँकेची कार्ये करण्यास्तव नियुक्त केलेले असून तिच्यामार्फत पत योजना अमलात आणलेली आहे. बँक ऑफ इंडियाने १९७८ मध्ये वर्ध्यासाठी पहिली पत योजना आखली.

ही बँक रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनानुसार इतर अर्थसहाय्य करणाऱ्या संस्था व राज्य शासनाच्या मदतीने प्रत्येक वर्षासाठी वार्षिक कार्य योजना राबवित असते. उत्पादन व उत्पादकता तसेच रोजगार वाढविणे आणि कृषी उत्पादनात सुधारणा करण्यासाठी ही बँक प्रयत्न करते. या योजनेत इतर व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व भूविकास बँकेचाही सहभाग प्राप्त करण्यात येतो.

रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार १९७८ व १९७९ कॅलेंडर वर्षासाठी एक पत योजना तयार केली होती. त्यानुसार वर्धा जिल्ह्यात केलेल्या वित्त सहाय्याची माहिती खाली दिली आहे.

(लाख रुपये)

बाब	१९७८		१९७९	
	लक्ष्य	साध्य	लक्ष्य	साध्य
कृषी ..	१,२४.३६	९२.१९	१,५०.१०	१,१०.६८
लघुउद्योग ..	७.४५	३३.८८	१२.९०	१५.६२
सामूहिक सुधारणा ..	६.७८	४७.९६	९.९६	२५.४४
एकूण ..	१,३८.५९	१,७४.०३	१,७२.९६	१,५१.७४

दुसऱ्या जिल्हा पत योजने अंतर्गत खालीलप्रमाणे वित्त पुरवठा करण्यात आला.[१९]

(लाख रुपये)

बाब	१९८०		१९८१		१९८२	
	लक्ष्य	साध्य	लक्ष्य	साध्य	लक्ष्य	साध्य (जून पर्यंत)
कृषी	८,०७.४९	८,६५.७७	७,६०.२५	१०,४४.६५	९,८४.००	७,७७.६०
लघुउद्योग	३४.३४	२९.५५	२५.८५	२१.०४	२४.००	१०.५२
इतर प्राधान्य क्षेत्र	४२.८१	३१.३४	४२.१६	३७.०२	४३.५०	२८.९७
एकूण	८,८४.६४	९,२६.६६	८,२८.२६	११,०२.७१	१०,५१.५०	८,१७.०९

[१९] **लिड बँक स्किम, डिस्ट्रिक्ट क्रेडीट प्लॅन, १९८३–८५, अँड ॲक्शन प्लॅन–१९८३,** वर्धा डिस्ट्रिक्ट, बँक ऑफ इंडिया.

सन १९८३–१९८५ च्या पत योजने अंतर्गत कृषी क्षेत्राला इतर क्षेत्रांपेक्षा सर्वांत अधिक पतपुरवठा करण्यात आला. आद्यक्रम ठरवून पीक कर्ज व लघुसिंचन कार्यासाठी अधिक निधी देण्यात आला. त्याबद्दलची आकडेवारी खाली दिली आहे.[२०]

(लाख रुपये)

बाब	लक्ष्य		साध्य		साध्याचे प्रतिशत प्रमाण
	खात्यांची संख्या	रक्कम	खात्यांची संख्या	रक्कम	
कृषी आणि संलग्न कार्यक्रम	५५,२२५	२१,९९.३९	५१,६५७	२३,८९.६९	१०८.६५
लघुउद्योग	८१५	७०.३३	७२५	१३७.६७	१९५.७५
इतर प्राधान्य क्षेत्र	१,२४६	७९.७१	३,३५६	२३२.००	१९१.०६
एकूण	५७,२८६	२३,४९.४३	५५,७३८	२७,५९.३६	११७.४५

रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार १९८५ साठी नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार वार्षिक कार्य योजना आखावी लागली. तसे करताना अग्रणी बँकेने प्राथम्य क्रमानुसार पतपुरवठा केला. त्या वर्षाची माहिती खाली दिली आहे.

(लाख रुपये)

बाब	लक्ष्य		साध्य		साध्याचे प्रतिशत प्रमाण
	खात्यांची संख्या	रक्कम	खात्यांची संख्या	रक्कम	
कृषी आणि संलग्न कार्यक्रम	४२,०९१	१७,८०.५९	३९,६१३	१२,१०.२९	६७.९७
लघुउद्योग	२,४७५	१५९.६०	६४६	८१.३७	५०.९८
इतर प्राधान्य क्षेत्र	३,१७६	२०४.३६	३,८१७	२०१.०५	९८.३८
एकूण	४७,७४२	२१,४४.५५	४४,०७६	१४,९२.७१	६९.६०

[२०] कित्ता.

रिझर्व्ह बँकेने १९८६–१९८७ साठी दोन स्वतंत्र वार्षिक कार्य योजना आखण्याच्या सूचना अग्रणी बँकेला दिल्या होत्या. त्यानुसार केलेल्या पत पुरवठ्याची माहिती खाली दिली आहे.

(लाख रुपये)

बाब	लक्ष्य		साध्य		साध्याचे प्रतिशत प्रमाण
	खात्यांची संख्या	रक्कम	खात्यांची संख्या	रक्कम	
१९८६					
कृषी आणि संलग्न कार्यक्रम	४४,५४४	२०,०८.१२	४०,४९५	१३,५६.५३	६७.५५
लघुउद्योग	२,६५१	१,१७.७८	७६१	७२.०२	६१.१५
इतर प्राधान्य क्षेत्र	३,४७६	२,३५.१६	२,८८६	१,६२.९०	६९.२७
एकूण ..	५०,६७१	२३,६१.०६	४४,१४२	१५,९१.४५	६७.४०
१९८७					
कृषी आणि संलग्न सेवा	३४,६३६	१८,८०.००	३८,८३०	१३,५५.६१	७२.११
लघुउद्योग	१,५६४	१,२५.००	६३९	२,५१.४०	२०१.१२
इतर प्राधान्य क्षेत्र	२,३०७	२,३५.००	३,५५७	२,२१.९८	९४.४६
एकूण ..	३८,५०७	२२,४०.००	४३,०२६	१८,२८.९९	८१.६५

व्यापार

इ. स. १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात ९,४७४ व्यक्ती या क्षेत्रात गुंतल्या होत्या. त्यांची विभागणी खालीलप्रमाणे होती.

	एकूण	पुरुष	महिला
किरकोळ व घाऊक दुकानदार	६,९८९	६,०२३	९६६
उत्पादकांचे दलाल ..	६२	६२	..
घाऊक व किरकोळ विक्रेते ..	७२९	७२२	७
विक्रेते व संबंधित नोकर ..	४३२	४३२	..
फेरीवाले ..	१,२६२	१,१३०	१३२
एकूण ..	९,४७४	८,३६९	१,१०५

एकूण ९,४७४ व्यक्तींपैकी नागरी भागात ५,९९२ (५,३३४ पुरुष व ६५८ महिला) व्यक्ती होत्या. १९७१ च्या जनगणनेनुसार ११,६८१ व्यक्ती व्यापार व वाणिज्य क्षेत्रात काम करीत होत्या. त्यांची ग्रामीण व नागरी क्षेत्रानुसार वर्गवारी खाली दिली आहे.

तहसील	ग्रामीण/नागरी	एकूण	पुरुष	महिला
वर्धा ..	ग्रामीण	१,५६५	१,४४४	१२१
	नागरी	४,९२८	४,६५३	२७५
आर्वी ..	ग्रामीण	१,१०९	१,०६३	४६
	नागरी	१,२८८	१,२४७	४१
हिंगणघाट ..	ग्रामीण	७८५	७२२	६३
	नागरी	२,००६	१,८७१	१३५

१९८१ च्या जनगणनेनुसार या क्षेत्रातील कामकऱ्यांची संख्या १६,६७७ पर्यंत वाढली. त्यांची वर्गवारी खाली दिली आहे.

	एकूण	पुरुष	महिला
एकूण ..	१६,६७७	१५,८००	८७७
नागरी ..	११,०१६	१०,४८२	५३४
ग्रामीण ..	५,६६१	५,३१८	३४३

व्यापारी मार्ग : जिल्ह्यामधून जाणारा मुंबई-कलकत्ता लोहमार्ग हा सर्वाधिक महत्त्वाचा व्यापारी मार्ग आहे. त्याद्वारे भारतातील सर्व प्रमुख बाजारपेठांशी व्यापारी संबंध प्रस्थापित होण्यास मदत झाली आहे. हा मार्ग जिल्ह्यातून पश्चिमेकडून पूर्वेकडे जात असून त्याची लांबी ९६ कि. मी. आहे. पुलगाव, कवठा, दहेगाव, वर्धा, सेवाग्राम, पवनार, तुळजापूर व सिंदी या स्थानकांपैकी पुलगाव, वर्धा आणि सिंदी या व्यापारी पेठा आहेत. या शिवाय दिल्ली-मद्रास हा ग्रँड ट्रंक लोहमार्ग जिल्ह्यातून जातो. त्यामुळे जिल्ह्यातील व्यापारी पेठा उत्तर व दक्षिण भारताशी जोडल्या आहेत. या मार्गावरील वर्धा हे जंक्शन आहे. हिंगणघाट, सोनेगाव व भुगाव या तीन रेल्वे स्थानकांपैकी हिंगणघाट ही व्यापारी पेठ कापसाच्या उलाढालीसाठी प्रसिद्ध आहे. पुलगाव-आर्वी लोहमार्ग मुंबई-कलकत्ता मार्गाचा उपमार्ग (Feeder) या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

लोहमार्गाशिवाय व्यापारी मालाच्या वाहतुकीसाठी जिल्ह्यामध्ये चांगल्या प्रतीचे रस्ते आहेत. मुंबई-कलकत्ता राष्ट्रीय महामार्ग जिल्ह्यातून पश्चिम-पूर्व जातो. त्यामुळे रस्त्यांद्वारे महाराष्ट्राशिवाय इतर राज्यातील पेठांशी हा जिल्हा जोडला आहे. आष्टी आणि कारंजा तालुक्यांतून हा रस्ता जात असल्यामुळे जिल्ह्याच्या उत्तर भागात मोठ्या प्रमाणावर

पिकणाऱ्या ज्वारी, कापूस व कडधान्याची निर्यात होण्यास मदत होते. जिल्ह्यातून उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणाऱ्या नागपूर-हैदराबाद मार्गामुळे उत्तर व दक्षिण भारतातील बाजारपेठांशी हा जिल्हा जोडला आहे. या महामार्गामुळे हिंगणघाट तालुक्यातील कापसाची निर्यात होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे नागपूर-वर्धा-यवतमाळ राज्य महामार्गामुळे नागपूर व यवतमाळ येथील बाजारपेठांत कृषिमाल पाठविणे शक्य होते. वर्धा-आर्वी-आष्टी मार्गामुळे वर्धा, आष्टी आणि आर्वी तालुके मुंबई-कलकत्ता राष्ट्रीय महामार्गावरील व्यापारी पेठांशी जोडले आहेत. तसेच पुलगाव-आर्वी-तळेगाव रस्ता पुलगाव व आर्वी बाजारपेठा मुंबई-कलकत्ता महामार्गाशी जोडतो. अशा तऱ्हेने लोहमार्ग व रस्त्यांच्या सुविधांमुळे जिल्ह्यातील कृषिमालाची निर्यात होण्यास चांगली मदत झाली आहे. त्याचबरोबर व्यापारी व शेतकऱ्यांना इतर बाजारपेठांमध्ये माल पाठविता येतो.

आकृतिबंधातील परिवर्तन : विद्यमान शतकाच्या प्रारंभापासून जिल्ह्यातील व्यापार आकृतिबंधात बदल होत गेला. लोकांचे राहणीमान आणि गरजा बदलल्या. त्याचा परिणाम उपभोग्य वस्तूंच्या मागणीमध्ये झाला. हा बदल व वाहतुकीच्या साधनात झालेली सुधारणा व वाढ यामुळे एकूण व्यापार पद्धतीतसुद्धा परिवर्तन घडून आले. धाऊक उलाढाल होणाऱ्या वस्तूंमध्ये फारसा बदल झाला नाही. पूर्वीप्रमाणेच कापूस, ज्वारी, तूर, भुईमूग हे धाऊक व्यापारातील घटक आजही आपली जागा निश्चित टिकवून आहेत. आकृतिबंधात व सांविधिक नियंत्रणात परिवर्तन झाले आहे. कृषिमालाची विक्री करणाऱ्या सहकारी संस्था, विनियमित बाजारपेठा, सांविधिक बंधने यामुळे शेतमालाच्या व्यापारात बदल झालेला आढळतो. जिल्ह्यात स्थापन झालेल्या अनेक प्रकारच्या बँकांच्या शाखांमुळे भांडवल पुरवठा सहज उपलब्ध होऊन व्यापार वृद्धीस हातभार लागला आहे.

इ. स. १९३२ च्या सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केटस् ॲक्टमुळे कृषिमालाच्या व्यापारातील विक्री व खरेदीच्या पद्धती, नियंत्रित करण्यात आल्या. या कायद्यानुसार बाजार समित्यांची स्थापना करण्यात येऊन त्यांचेकडे पर्यवेक्षणाचे काम सोपविण्यात आले. त्यामुळे व्यापारात सुसूत्रता येऊन त्यातील अनिष्ट प्रथा बंद पडल्या. हा अधिनियम व्यापाराच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा होय. सहकारी संस्थांनी प्रवेश केल्यामुळे कृषिमालाला पुरेसा भाव मिळण्यास मदत होऊन शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यात मदत झाली.

पूर्वीपासून वर्धा जिल्हा कापसासाठी प्रसिद्ध आहे. हिंगणघाट येथील लांब धाग्याचा कापूस भारतातच नव्हे तर इंग्लंडमध्येही प्रसिद्ध होता. सन १९०६ मध्ये प्रकाशित झालेल्या **वर्धा गॅझेटिअर मध्ये** व्यापाराच्या स्थितीबाबत विस्तृत माहिती दिली आहे.[२१] त्या माहितीचा सारांश खाली दिला आहे.

सन १८६७ मध्ये वर्धा जिल्हा लोहमार्गाने मुंबईशी जोडल्यानंतर वर्धा येथील व्यापारात बरीच वाढ झाली. याबाबत मि. ग्रँटच्या १८७० च्या **गॅझेटिअर** मधील उतारा येथे उध्दृत केलेला आहे. "कापसाच्या निर्यातीमुळे वर्धा जिल्ह्यातील व्यापार नावारूपास आलेला आहे. हिंगणघाट येथील कापसाला अमर्याद मागणी असून ब्रिटिश बाजारपेठेत इतर कोणत्याही

[२१] अधिक माहितीस्तव **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९०६, पृ. १५०–६० पहावे.

भारतीय कापसापेक्षा त्याला चांगली किंमत मिळते. वर्धा येथून वर्षाला २५,००० गाठी कापूस निर्यात होतो. लोहमार्ग सुरू झाल्यामुळे आर्वी तालुक्यातील लोण्याच्या व्यापारात बरीच वृद्धी झालेली आहे. हे लोणी मुंबईस पाठविले जाते. सन १८६८–६९ मध्ये ४.४३ लक्ष रुपयांचे २२,००० मण (८० पौंडांचा एक मण) लोणी निर्यात करण्यात आले. वर्धा आणि वऱ्हाडमध्ये अन्नधान्याची थोड्याफार प्रमाणात आयात-निर्यात होते. वऱ्हाडमधून ज्वारीची आयात केली जाते, तर या जिल्ह्यातून वऱ्हाडात गहू व डाळ निर्यात केली जाते. आयात मालामध्ये ३.६० लक्ष रुपये किमतीचे ५१,००० मण मीठ, २ लक्ष रुपये किमतीचे परदेशी कापड, तसेच लोखंड, मसाले आणि इतर किरकोळ वस्तूंचा समावेश होतो."

पुरुषोत्तमदास सेटलमेंट रिपोर्टमध्ये या जिल्ह्यातील व्यापाराबाबत विस्तृत माहिती दिलेली नाही. इ. स. १८८८–१८९२ या कालावधीतील पुलगाव, दहेगाव, वर्धा, पवनार व सिंदी या स्थानकांतून प्रांताबाहेरील ठिकाणी केलेल्या महत्त्वाच्या निर्यातीचे विवरणपत्र दिलेले आहे. परंतु या विवरणपत्रात प्रांतातील वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या निर्यातीची आकडेवारी उपलब्ध नाही. एवढेच नव्हे तर जिल्ह्याची अर्ध्यापेक्षा अधिक निर्यात ज्या हिंगणघाटमधून होते, त्याचा या आकडेवारीत उल्लेख नाही. पुलगाव हे नवीन शहर असून तेथील व्यापारात लक्षणीय वृद्धी झाली.

रेल्वेद्वारे होणारा व्यापार : जिल्ह्यातील वर्धा, पुलगाव, हिंगणघाट व सिंदी या चार मुख्य स्थानकांतून होणारी आयात-निर्यातीची १८९९–१९०४ मधील आकडेवारी उपलब्ध आहे. जिल्ह्यातील एका स्थानकापासून दुसऱ्या स्थानकाला केलेली कापसाची निर्यात १९०४ मध्ये १५,००० मण होती आणि यापैकी बहुतांश माल पुलगाव येथून वर्ध्यास पाठविण्यात येत असे. आर्वी तालुक्यातील उत्पादनापैकी काही माल धामणगाव व काटोल येथे पाठविला जात असे. नागपूर आणि आसपासच्या भागातील कापूस थोड्या प्रमाणात सिंदी येथे आणला जाई. त्याचप्रमाणे हिंगणघाट येथे वऱ्हाड आणि चंद्रपूरहून कापूस व अन्नधान्याची आयात केली जात असे. वऱ्हाडातील बहुतांश कापूस पुलगाव येथे आणला जाई. दहेगाव येथून १९०४ मध्ये ८,००० मण जवसाची निर्यात करण्यात आली. सन १८९९, १९०० व १९०४ या वर्षांची जिल्ह्यातील आयात-निर्यात व्यापाराची आकडेवारी तक्ता क्र. ४ मध्ये दिलेली आहे.

कापूस निर्यात : सन १९०१ ते १९०४ मध्ये जिल्ह्यातील निर्यात व्यापाराच्या सर्व वस्तूंची चार वर्षांतील सरासरी किंमत दीड कोटी रुपये होती. जिल्ह्याच्या लोकसंख्येचा विचार करता हे प्रमाण दरडोई ३८ रुपये होते. पिंजाई न केलेल्या कापसाची निर्यात १९०४ मध्ये एकूण निर्यातीच्या ६६ प्रतिशतपेक्षा अधिक होती. त्या वर्षी साडेपाच लाख मण कापसाची निर्यात झाली. कापूस उत्पादनाचे दर एकरी प्रमाण २८० पौंड कच्चा कापूस व ८० पौंड रुई असे होते. त्यात वाढ होऊन ते अनुक्रमे ३२० पौंड व १०६ पौंड झाले. डेप्युटी कमिशनरच्या तत्कालीन अहवालानुसार जिल्ह्यातील कापूस जिनींग कारखान्यांनी १९०४ मध्ये प्रत्येक वटणी यंत्रामागे सरासरी २२५ खंडी (नऊ मण) कापसाचे जिनींग केले. त्याच वर्षी सर्व कारखान्यांत १,०६५ वटणी यंत्रे होती. आर्वीहून १,३०,००० मण कापूस दरवर्षी निर्यात केला जात होता. निर्यात केलेला बराचसा कापूस नागपूर व थोड्या प्रमाणात जबलपूर व राजनंदगावला पाठविला जाई. सन १९०३ मध्ये १,१४,००० मण व १९०४ मध्ये ५५,००० मण कापूस नागपूरला निर्यात करण्यात आला. सन १९०३ मध्ये

जिल्ह्यातील एका रेल्वे स्थानकाहून दुसऱ्या स्थानकाला १४,००० मण कापूस पाठविण्यात आल्याची नोंद आहे. या शतकाच्या प्रारंभापासून सूत आणि कापडाची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढली. सन १९०६ पूर्वीच्या चार वर्षांमध्ये सरासरी २४ लक्ष रुपये किमतीचे ८०,००० मण सूत निर्यात करण्यात आले. त्याचप्रमाणे ७,००० ते १९,००० मण कापड (किंमत २.७५ लक्ष ते ७.५० लक्ष रुपये) निर्यात करण्यात आले. सूत भंडारा व छत्तीसगडला तर कापड मध्य प्रांत, मध्य भारत व वऱ्हाडकडे पाठविले जाई. मध्य प्रांताच्या उत्तरेकडील जिल्ह्यांमध्ये हिंगणघाटपेक्षा पुलगावच्या कापडाला अधिक मागणी होती.

इतर निर्यात : कापसानंतर तेलबियांच्या उत्पादनाचा क्रमांक लागतो. तेलबियांपैकी उत्पन्न व किंमत या दृष्टीने सरकीला महत्त्व होते. परदेशी निर्यातीसाठी सरकी मुंबईस पाठविली जात असे. थोड्या प्रमाणात पेंडसुद्धा निर्यात केली जात असे. या शतकाच्या प्रारंभीच्या दोन-तीन वर्षांत अन्नधान्य व डाळींची आयात निर्यातीपेक्षा अधिक झाली. या वस्तूंची निर्यात १९०४ मध्ये १.४३ लक्ष रुपयांची होती. तुपाची निर्यातही महत्त्वाची असून प्रतिवर्षी ८,००० ते १४,००० मण तूप निर्यात करण्यात येई. वर्धा व आर्वी तालुक्यांतून तूप मुंबई व नागपूरला पाठविले जाई. मध्य प्रांतातील काही निवडक जिल्ह्यांपैकी वर्धा जिल्हा कमावलेल्या कातड्याची निर्यात करीत असे.

आयात : या शतकाच्या प्रारंभीच्या सहा वर्षातील वार्षिक आयातीचे सरासरी मूल्य ४० लक्ष रुपये होते. सन १९०४ मध्ये ४३ लक्ष रुपयांपेक्षा अधिक किमतीचा माल आयात करण्यात आला. लोकसंख्या विचारात घेता हे प्रमाण दरडोई ११ रुपये होते. कापडाचे तागे, कांडलेला तांदूळ, गहू, गोणपाट, घासलेट, मीठ, साखर, तंबाखू, लाकूड, सुकी फळे, मिरची, कोळसा इत्यादी माल आयात करीत. सन १९०४ मध्ये ६ लक्ष रुपये किमतीचे परदेशी कापड व २ लक्ष रुपयांचे देशी कापड जिल्ह्यात आयात करण्यात आले. परदेशी कापड मुंबईहून व देशी कापड नागपूर व कानपूरहून आणले जाई. रेशमी किनारीचे कापड उमरेड व हैद्राबाद, शाली बनारस व काश्मीरहून व टसर कापड चंद्रपूर व छत्तीसगडहून आयात केले जाई. हिंगणघाटच्या कापड गिरण्या थोडा कापूस नजीकच्या जिल्ह्यातूनही आणत असत. अन्नधान्य व डाळींची १९०४ मध्ये ३ लक्ष मण (किंमत ८.५ लक्ष रुपये) इतकी आयात करण्यात आली. त्याचवर्षी फक्त दीड लक्ष रुपये किमतीच्या धान्ये व डाळींची निर्यात झाली. तांदूळ गोंदियाहून व इतर अन्नधान्य नागपूर, कामठी, गादरवाडा व कानपूरहून आणले जाई.

इतर आयात : इतर आयात मालामध्ये तांबे व लोखंडाचे प्रमाण अधिक होते. हा माल नासिक व पुण्याहून आणीत असत. सुमारे २ लक्ष रुपये किमतीचे घासलेट आयात केले जाई. प्रांताच्या एकूण आयातीपैकी जिल्ह्याचा वाटा १२ टक्के होता. सुमारे २ ते ३ लक्ष रुपये किमतीचे मीठ आयात करीत. इ. स. १९०३ मध्ये मिठाचा दरडोई वापर १५ पौंड होता. आयात केलेल्या मिठापैकी बरेचसे मीठ जनावरांसाठी लागत असे. आयात साखरेची किंमत १९०४ मध्ये साडेसात लक्ष रुपये होती. सोलापूर, पुणे, बेतूल व बंगळुरहून साखर व गूळ येत असे. सर्वसामान्य लोक मॉरिशसची साखर वापरीत असत. परंतु मारवाडी व सनातनी लोक मात्र उत्तर प्रांतातील मिर्झापुरी देशी साखर वापरीत असत. सन १९०४ मध्ये साखरेचा दरडोई वापर १८ पौंड होता. पुणे आणि नागपूरहून विड्या, मुंबईहून सिगारेट व भंडारा आणि चंद्रपूरहून लाकूड आयात केले जात असे. सन १९०४ मध्ये १ लक्ष रुपये किमतीचे १५,००० मण नारळ आणि ८६,००० रुपयांची ११,००० मण मिरची

आयात केली. इतर आयातीमध्ये छिंदवाडा येथून बटाटे, नागपूरहून फळे, वऱ्हाड व रामटेकहून विड्याची पाने, वरोरा व कामठीहून मातीची भांडी, मुंबईहून परदेशी काचेच्या बांगड्या, चंद्रपूरहून देशी बनावटीच्या काचेच्या बांगड्या आणि कानपूर व चंद्रपूर येथून कांबळी आयात होत असत. सुमारे १०,००० मण मोहाची फुले आयात करून देशी मद्य निर्माण होत असे. दीड लक्ष रुपये किमतीचा कोळसा मुख्यत्वे वरोऱ्याहून आणला जात असे.

रेल्वे स्थानके : माल निर्यात करणाऱ्या स्थानकांपैकी पुलगाव व हिंगणघाट ही प्रमुख स्थानके होती. सन १९०४ मध्ये हिंगणघाटहून ५,२५,००० मण माल (एकूण निर्यातीच्या ४२ टक्के) निर्यात केला. त्याच वर्षी पुलगावहून ३,४५,००० मण (२७ टक्के) व वर्ध्याहून २,८९,००० मण (२३ टक्के) मालाची निर्यात करण्यात आली. वरील स्थानकांमधून प्रामुख्याने कापूस पाठविला जात असे. हाडे, कातडी व गोणपाटाची वर्धा येथून निर्यात करण्यात येत असे. तसेच तेलबिया हिंगणघाटहून व अन्नधान्य सिंदीहून निर्यात केले जात असे.

आयातीमध्ये वर्धा स्थानक महत्त्वाचे असून १९०४ मध्ये कोळसा वगळता ३,३८,००० मण (एकूण आयातीच्या ३४ टक्के) माल तेथे आयात केला. पुलगाव व हिंगणघाट स्थानकांपेक्षा वर्धा येथील आयात थोडी जास्त होती. पुलगावला मुख्यत्वे गव्हाची व हिंगणघाटला मीठ व साखरेची आयात होत असे. तेथून चंद्रपूर व वऱ्हाडमध्ये हा माल पाठविण्यात येत असे.[२२]

जिल्ह्यातील निर्यातीमध्ये कापसाचा प्रथम क्रमांक होता. परंतु १९३० नंतर हिंगणघाट बाजारपेठेतील मालाला उतरती कळा लागली. जिल्ह्यामध्ये व जिल्ह्याबाहेर ठिकठिकाणी बाजारपेठांची झालेली स्थापना हे त्यामागील एक कारण आहे. तथापि त्याचे मुख्य कारण म्हणजे १९३० ची जागतिक व्यापार मंदी होय. कापसाला इंग्लंडहून मागणी नसल्यामुळे भाव कोसळले. व्यापाराची स्थिती पूर्ववत होण्यास १९३७–३८ साल यावे लागले.

इ. स. १९४०–४१ व १९६०–६१ या कालावधीतील हिंगणघाट बाजारपेठेतील आवक व किंमत खाली दिली आहे.

वर्ष		आवक (गाड्या)	खंडीची किंमत (७८४ पौंड) (रुपये)
१९४०–४१	..	२५,१४६	५० ते ६५
१९४५–४६	..	१६,२४०	१२५ ते १८०
१९५०–५१	..	२०,९११	२८५ ते ३५०
१९५५–५६	..	९,४८५	२२५ ते ३०५
१९६०–६१	..	२४,१७४	३२५ ते ३८५

[२२] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९०६ पृ. १५०–६०.**

जिल्ह्यामध्ये एल-१४७, १००७, अे के-२३५ व १९७/३ या जातींच्या कापसाचे उत्पादन केले जाते. त्यापैकी १००७ जातीचा कापूस चांगल्या प्रतीचा आहे. याबद्दलची अधिक माहिती प्रकरण ४–कृषि व जलसिंचन यात दिलेली आहे. हिंगणघाटला दोन व पुलगावला एक कापड गिरणी आहे. त्याशिवाय बरेच जिनिंग प्रेस आहेत. कापसाची पिंजाई केल्यानंतर मुंबई, अहमदाबाद, कानपूर व मद्रासला कापसाच्या गासड्या पाठविल्या जातात. ही निर्यात मुख्यत्वे रेल्वेने होते.

कापसाव्यतिरिक्त ज्वारी, तूर, मूग व गव्हाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. वर्धा, आर्वी, हिंगणघाट, पुलगाव, सिंदी व कारंजाहून तूरडाळ मोठ्या प्रमाणावर मुंबई व मद्रासला निर्यात केली जाते. गहू मुख्यत्वे नागपूरला, मूग पश्चिम बंगाल व मुंबईस व हरभरा नागपूरला निर्यात केला जातो. कापूस व अन्नधान्यांशिवाय सरकी व भुईमूग तेलाची निर्यात मुंबई, मद्रास व नागपूरला केली जाते.

विनियमित बाजारपेठा

स्वातंत्र्यपूर्व काळात शासन नियंत्रणाअभावी कृषिमालाच्या व्यापारात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होऊन शेतकऱ्याला तोटा सहन करावा लागत होता. शेतकऱ्याच्या अज्ञानाचा व दारिद्र्याचा गैफायदा व्यापारी घेत. त्यामुळे शेतकऱ्याचे शोषण होई. सन १९२७ च्या रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चरने सर्व परिस्थितीचा अभ्यास करून शेती मालाचा व्यापार नियंत्रित करण्याची शिफारस केली. त्याचप्रमाणे कृषिमालाला चांगला भाव मिळण्यासाठी बाजार समित्यांची स्थापना करण्याची शिफारस वेळोवेळी नेमलेल्या समित्यांनी केली होती. त्यानुसार राज्य शासनाने १९३२ मध्ये सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲंड बेरार कॉटन मार्केटस ॲक्ट, तसेच १९३५ मध्ये सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲंड बेरार ॲग्रिकल्चरल प्रोडयुस मार्केटस ॲक्ट पास केले. त्यानुसार कापूस व अन्नधान्याचा व्यापार विनियमित करण्यात आला. वर्धा जिल्हा महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतर १९६३ चा महाराष्ट्र कृषि उत्पादन खरेदी-विक्री (विनियमन) अधिनियम लागू करण्यात आला.

नवीन कायदा लागू केल्यानंतर बाजार समित्यांच्या घटनेत बदल करण्यात आला. स्वतंत्र शेतकरी प्रतिनिधींच्या ऐवजी सहकारी संस्था व ग्रामपंचायतींना प्रतिनिधित्व देण्यात आले. तसेच व्यापारी प्रतिनिधींची संख्या कमी करून शासननियुक्त प्रतिनिधींची तरतूद करण्यात आली.

बाजार समितीच्या आवारामध्ये कृषिमालाची खरेदी-विक्री समितीच्या नियंत्रणाखाली होते. बाजारात काम करणारे व्यापारी, अडते व मापारी यांना परवाना दिला जातो. समितीचे सेवक मालाच्या लिलाव प्रसंगी हजर असतात. तसेच शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून अडते काम करतात. लिलावाची अंतिम बोली झाल्यावर ज्या व्यापाऱ्याच्या नावाने लिलाव होतो त्याच्या नावे सौदापट्टी होते. त्यावर विक्रेता, खरेदीदार व समिती सेवकांच्या सह्या होतात. परवानाधारक तोलाऱ्याकडून मालाची तोलाई होते. लिलावाचे देयक तयार होऊन शेतकऱ्यास मालाची किंमत दिली जाते. सर्वांच्या माहितीकरिता त्या दिवसातील आवक व किंमत सूचना फलकावर लावली जाते. अशा तऱ्हेचा व्यवहार झाल्यामुळे शेती मालाच्या व्यापारातील अनिष्ठ प्रथांना आळा बसला. त्याचप्रमाणे शेतकरी-व्यापारी यांचे संबंध सुधारण्यास मदत झाली आहे. तसेच परवाना शुल्काद्वारे बाजार समितीला उत्पन्न मिळते.

जिल्ह्यात पहिली बाजार समिती १९३७ मध्ये वर्धा येथे स्थापन करण्यात आली. त्यानंतर पुलगाव, सिंदी, हिंगणघाट व आर्वी येथे बाजार समित्या कार्यरत झाल्या. १९७५ मध्ये आष्टीला बाजार समिती स्थापण्यात आली. आष्टी येथील बाजारपेठ वगळता बाकी सर्व बाजारपेठांची ठिकाणे रेल्वे स्थानके आहेत. त्यामुळे मालाची निर्यात करण्यास मदत होते. वरील सर्व बाजार समित्यांची १९८६–८७ मधील उलाढाल खाली दिली आहे.

माल	आवक	
	वजन (क्विंटल)	किंमत (रुपये)
गहू ..	९,५०६	२२,१५,१३३
ज्वारी ..	२९,७५८	४९,८९,०१३
तूर ..	३८,४९२	२,३३,६८,२९०
हरभरा ..	६,५८२	२७,७९,३३१
भुईमूग ..	१,०००	७,५१,१३१
मूग ..	३०८	१,६२,१००
जवस ..	४,७१०	३०,१०,४४०
कापूस ..	६,७५,५६१	३६,१७,७२,९४४

वर्धा बाजार समिती (स्थापना: २१ जानेवारी १९३७) : वर्धा बाजारपेठेत १९३२ च्या सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार कॉटन मार्केटस ॲक्टनुसार १९३७ मध्ये कापसाचा व्यापार व १९३५ च्या सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार ॲग्रिकल्चरल प्रोडयूस मार्केटस ॲक्ट-नुसार १९४५ मध्ये धान्य बाजार विनियमित करण्यात आला. त्याचप्रमाणे १९३५ च्या अधिनियमान्वये वर्ध्यातील संत्र्याचा व्यापार नियमित करण्यात आला. महाराष्ट्र राज्यात वर्धा जिल्हा समाविष्ट झाल्यानंतर १९६३ चा महाराष्ट्र कृषि उत्पादन खरेदी-विक्री अधिनियम या बाजारपेठेस मे १९६७ मध्ये लागू करण्यात आला.

या बाजार समितीचे कार्यक्षेत्र वर्धा तालुक्यातील १५२ गावांपुरते मर्यादित आहे. सन १९६७–६८ मध्ये समितीचे एकूण १४ सदस्य होते. सन १९७९ मध्ये त्यांची संख्या कमी होऊन १२ झाली. यापैकी सहा शेतकरी, चार व्यापारी व प्रत्येकी एक जिल्हा परिषद आणि नगरपरिषदेचा प्रतिनिधी होता.

समितीचा मुख्य बाजारतळ वर्ध्याला असून तिचा उप-बाजारतळ नाही. बाजारतळावर रस्ते, पाणी, वीज, गोदाम, शेड, इत्यादी सोयी उपलब्ध आहेत. सन १९६७–६८ मध्ये या बाजारपेठेत २३ व्यापारी व ९० अडते होते. सन १९८६–८७ मध्ये एकूण ३० व्यापारी,

६३ अडते, ६४ मापारी, आठ प्रक्रियाकार व १३ सहायक होते. बाजारपेठेत कापूस, गहू, तूर, मूग, कुळीथ, हरभरा, भुईमूग, तीळ, इत्यादी कृषिमालाच्या व्यवहारांचे विनियमन केले जाते.

सन १९६५–६६ मध्ये या बाजारपेठेत १,०८,८९२ क्विंटल कापूस, ४,३७६ क्विंटल ज्वारी, ५३,४४० क्विंटल तूर, १३,४६५ क्विंटल गहू व ६,४५० क्विंटल तेलबियांची आवक झाली. सन १९७०–७१ पासून या बाजारपेठेत झालेली उलाढाल तक्ता क्र. ५ मध्ये दिलेली आहे. इ. स. १९८६–८७ मध्ये या बाजारपेठेत सहकारी संस्थांनी केलेली विक्री खालीलप्रमाणे होती.

संस्था		वजन (क्विंटल)	किंमत (रुपये)
वर्धा तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री संघ	ज्वारी	१,१९४	१,५५,४५१
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ	कापूस	१,५२,५८८	८,१३,४४,७०८

इ. स. १९८६–८७ मध्ये या बाजार समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे १५,८२,४६६ व ७,१५,७४५ रुपये होते.

सिंदी बाजार समिती (स्थापना : १२ ऑगस्ट १९४२) : इ. स. १९४९ पासून येथील बाजारपेठेत कापूस व १९५२ पासून अन्नधान्याचा व्यापार विनियमित केला. सन १९६० पर्यंत ही समिती नगरपालिकेच्या नियंत्रणाखाली कार्यरत होती.

समितीचे कार्यक्षेत्र सेलू तालुक्यातील १७७ गावांपुरते मर्यादित आहे. समितीचा १० ऑक्टोबर १९७३ रोजी सेलू येथे उप-बाजारतळ स्थापन करण्यात आला. मुख्य बाजाराचे आवार ०.६१५ हेक्टर असून उप-बाजार आवार १.४२४ हेक्टर आहे. या आवारात शेतकरी व व्यापाऱ्यांसाठी सर्व सोयी उपलब्ध आहेत. सन १९७७ मध्ये बाजार समितीचे १५ सदस्य होते. सन १९६७–६८ मध्ये बाजारपेठेत चार व्यापारी, सहा अडते व १३ तोलारी होते. सन १९८६–८७ मध्ये एकूण पाच व्यापारी, सहा मापारी, पाच अडते, पाच प्रक्रियाकार व चार सहायक होते. सेलूच्या मुख्य बाजार आवारात गुरांच्या खरेदी-विक्रीचे विनियमन करण्यात येते. बाजार आवारात आलेल्या प्रमुख वस्तूंच्या उलाढालीची आकडेवारी तक्ता क्र. ६ मध्ये दिलेली आहे. सहकारी संस्थांमार्फत या बाजारात झालेली १९८६–८७ मधील विक्री खाली दिली आहे.

संस्था		वजन (क्विंटल)	किंमत (रुपये)
सिंदी सहकारी शेतकी खरेदी-विक्री संघ	ज्वारी	७०	१०,४३६
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ	कापूस	९२,८४६	४,९८,०९,५७५

इ. स. १९८६–८७ मध्ये समितीचे उत्पन्न १४,८६,०५० रुपये व खर्च ५,४५,००४ रुपये होता.

पुलगाव बाजार समिती (स्थापना : २ फेब्रुवारी १९३७) : या समितीने २६ ऑक्टोबर १९६७ पासून धान्य बाजार सुरू केला. समितीचे कार्यक्षेत्र १५० गावांपुरते मर्यादित असून समितीची उप-बाजारपेठ देवळीस आहे. मुख्य बाजारतळाचे क्षेत्र ०.८०९ हेक्टर आहे. बाजार आवारात वीज, पाणी, गोदाम, शेड इत्यादी सोयी आहेत. सन १९६६-६७ मध्ये बाजार आवारात १० व्यापारी व १५ दलाल होते. सन १९८६–८७ मध्ये त्यांची संख्या पुढील-प्रमाणे होती : व्यापारी २०, अडते १६, मापारी १४, सहायक ७ व प्रक्रियाकार ११.

या बाजारपेठेत कापूस, गहू, ज्वारी, मूग, उडीद, हरभरा व भुईमूगाचे विनियमन केले जाते. समितीमार्फत ज्वारी व कापसाची एकाधिकार खरेदी केली जाते. सन १९६६–६७ मध्ये या बाजारपेठेत ५,१४५ क्विंटल (किंमत ५,२४,०२५ रुपये) मालाची उलाढाल झाली. सन १९७२–७३ पासून बाजारपेठेत आवक झालेल्या कृषिमालासंबंधी आकडेवारी तक्ता क्र. ७ मध्ये दिलेली आहे.

या बाजार आवारात सहकारी संस्थांमार्फत झालेली १९८६–८७ मधील बिक्रीबाबतची आकडेवारी खाली दिली आहे.

संस्था		वजन (क्विंटल)	किंमत (रुपये)
देवळी तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री संघ.	ज्वारी	१,८८०	२,३८,८३५
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ.	कापूस	१,०७,३७२	५,६८,४२,५८६

इ. स. १९८६–८७ मध्ये समितीला ६,९५,५८१ रुपये उत्पन्न मिळून ३,७५,०७४ रुपये खर्च झाला.

पुलगाव परिसरात कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते, म्हणून पुलगावला १८९२ मध्ये कापड गिरणी स्थापन करण्यात आली. स्थानिक गरजा भागवून राहिलेला माल मुंबई, मद्रास, अहमदाबाद, इत्यादी ठिकाणी निर्यात केला जातो. त्याचप्रमाणे तूर-डाळ, सरकी व तेलाची निर्यात मुंबई व नागपूरला केली जाते.

आर्वी बाजार समिती (स्थापना : १ फेब्रुवारी १९४०) : आर्वी बाजार समितीचे कार्य-क्षेत्र आर्वी तालुक्यातील २२० गावांपुरते मर्यादित असून रोहणा व खरांगणा येथे समितीचे उप-बाजारतळ आहेत. मुख्य बाजार आवाराचे क्षेत्र १.५४९ हेक्टर असून तेथे गोदाम, पाणी, वीज व शेड आहेत. आर्वीस ५,००० पोती क्षमता असलेल्या राज्य वखार महामंडळाच्या गोदामाव्यतिरिक्त इतर खाजगी गोदामे आहेत.

या बाजारपेठेत कापूस, ज्वारी, गहू, जवस व कडधान्ये यांचा व्यापार विनियमित केला जातो. आर्वी हे लोहमार्ग व रस्त्याने इतर शहरांशी जोडले असल्यामुळे वर्धा तालुका व शजारच्या अमरावती जिल्ह्यातील मोर्शी व चांदूर तालुक्यातील कृषिमालाची या बाजारपेठेत आवक होते. येथून प्रामुख्याने कापूस व तूरडाळ निर्यात होते.

इ. स. १९६६–६७ मध्ये या बाजारपेठेत १६ व्यापारी, ३८ दलाल व ६ तोलारी होते. सन १९८६–८७ मध्ये ८८ व्यापारी व २० अडते, १८ मापारी, २६ सहायक व ९ प्रक्रियाकार काम करीत होते. सन १९६५–६६ मध्ये बाजारपेठेत १,६०,१७६ क्विंटल कापूस, व १९,११५ क्विंटल तुरीची आवक झाली. सन १९७२–७३ पासून बाजारपेठेत आवक झालेल्या प्रमुख वस्तू व त्यांची किंमत तक्ता क्र. ८ मध्ये दिलेली आहे. इ. स. १९८५–८६ मध्ये सहकारी संस्थांमार्फत झालेल्या विक्रीविषयी आकडेवारी खाली दिली आहे.

संस्था		वजन (क्विंटल)	किंमत (रुपये)
आर्वी तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री संघ.	ज्वारी	१,४२७	१,९२,८५३
	तूर	४१२	२,७१,६५८
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ	कापूस	९४,३७२	५,३८,०१,०९८

इ. स. १९८६–८७ मध्ये बाजार समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे ५,५१,३६९ रुपये व ५,८८,१४५ रुपये होता.

हिंगणघाट बाजार समिती (स्थापना : १७ जानेवारी १९४०) : इ. स. १९३९ पर्यंत हिंगणघाट कापूस बाजार नगरपालिकेच्या अधिकाराखाली होता. सन १९३२ च्या अधिनियमानुसार हा कापूस बाजार १९३९ मध्ये विनियमित करून बाजार समितीकडे सोपविण्यात आला. पुढे १९६० मध्ये अन्नधान्याची विक्री समितीच्या अधिकार क्षेत्राखाली आणली. बाजार समितीचे कार्यक्षेत्र हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यांतील ३०४ गावांपुरते मर्यादित असून हिंगणघाट मुख्य बाजारतळाशिवाय समुद्रपूर व वडनेर येथे उप-बाजारतळ उघडले आहेत. मुख्य बाजाराचे आवार २.८३२ हेक्टर असून व्यापारी व शेतकऱ्यांसाठी तेथे आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. सन १९६५–६६ मध्ये या बाजारात ४२ व्यापारी, ३६ अडते व १८ तोलारी होते. सन १९८६–८७ मध्ये या संख्येत वाढ होऊन ती पुढीलप्रमाणे झाली : व्यापारी ३५, अडते ४७, मापारी ४०, सहायक ८९ व प्रक्रियाकार १३.

या बाजारात गहू, ज्वारी, कापूस, तूर, तीळ, मूग, कुळीथ व हरभरा या वस्तूंच्या विक्रीचे विनियमन केले जाते. सन १९६६–६७ मध्ये बाजारतळावर ७३,८३६ क्विंटल कापूस व ५६,६२० क्विंटल तूरडाळीची आवक झाली.

सन १९७२–७३ पासून या बाजारपेठेत आवक झालेल्या मालासंबंधीची माहिती तक्ता क्र. ९ मध्ये दिलेली आहे.

सहकारी संस्थांनी १९८६–८७ मध्ये बाजारपेठेत केलेल्या विक्रीबाबतची माहि
खाली दिली आहे.

संस्था		वजन (क्विंटल)	किंमत (रुपये)
हिंगणघाट तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री संघ	ज्वारी	४१८	५६,८६९
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ	कापूस	१,९१,६५८	१०,१५,१६,७७७
नॅशनल को-ऑपरेटिव्ह कंझुमर्स फेडरेशन	तूर	८,६६३	५१,७४,८७५

हिंगणघाटला या प्रदेशातील कापसाची सर्वांत जुनी बाजारपेठ होती. पूर्वी शेजारच
यवतमाळ, चंद्रपूर व नागपूर जिल्ह्यांतून विक्रीसाठी येथे कापूस आणला जाई. उच्च प्रती
माल म्हणून येथील कापूस नावारूपास आला होता. त्यामुळे केवळ मुंबईच नव्हे
इंग्लंडमधूनसुद्धा कापसाला खूप मागणी होती. व्हॉल्कर्ट ब्रदर्स, रॅली ब्रदर्स या इंग्लिश कंप
व घोषो (Ghosho) ही जपानी कंपनी हिंगणघाटला कापूस खरेदी करीत. परंतु इ
बाजारपेठांची स्थापना झाल्यामुळे हिंगणघाट येथील कापूस बाजाराचे महत्त्व कमी झा
हिंगणघाट येथे दोन कापड गिरण्या, तीन कापूस पिंजाई गिरण्या, तसेच नऊ तेल गिरण्या
चार डाळ गिरण्या आहेत. येथे बँकांच्या शाखा व गोदाम उपलब्ध आहेत. जानेवारी १९
मध्ये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने येथे गोदाम बांधले. सन १९८६–८७ म
हिंगणघाट बाजार समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे १५,७५,४१२ रुपये व ५,२७,६
रुपये होता.

आष्टी बाजार समिती (स्थापना : २ जुलै १९७५) : या समितीचा मुख्य बाजार
आष्टी येथे असून कारंजा व साहूर येथे उप-बाजारतळ आहेत. समितीचे कार्यक्षेत्र आ
व कारंजा तालुक्यांतील २७१ गावांपुरते मर्यादित आहे.

मुख्य बाजार आवार १.४०४ हेक्टर असून तेथे शेड, वीज व पाणी उपलब्ध आहे.
१९८६–८७ मध्ये बाजारपेठेत ५५ व्यापारी, १८ अडते, ७ मापारी, ५ सहायक व
प्रक्रियाकार होते. सन १९८६–८७ मध्ये समितीचे उत्पन्न व खर्च अनुक्रमे २,७२,४
रुपये व ३,५३,२१८ रुपये होता. ही बाजार समिती कृषिमालाव्यतिरिक्त गुरां
खरेदी-विक्रीचा व्यवहार विनियमित करते.

बाजारपेठेतील कापूस व ज्वारीची आवक व किंमत खाली दिली आहे.

वर्ष		कापूस		ज्वारी	
		आवक (क्विंटल)	किंमत (रुपये)	आवक (क्विंटल)	किंमत (रुपये)
१९७५–७६	..	४१,७६३	१,१८,६०,३५३	..	..
१९८०–८१	..	२६,११७	१,४०,३४,०७१	..	..
१९८६–८७	..	३५,७३५	१,८६,५८,२००	७५४	९२,५९२

शिवाय १९८६–८७ मध्ये बाजारपेठेत ८१० क्विंटल तुरीची आवक झाली. या मालाची किमत ४,०५,८५६ रुपये होती.

सहकारी संस्थांनी १९८६–८७ मध्ये बाजारपेठेत केलेल्या विक्रीबाबतची आकडेवारी खाली दिली आहे.

संस्था		वजन (क्विंटल)	किंमत (रुपये)
आष्टी तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री संघ कारंजा तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री संघ	ज्वारी	७५४	९२,५८२
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ	कापूस	३५,७३५	१,८६,५८,२००

सहकारी विपणन

शेतीमालाला योग्य भाव मिळावा या हेतूने सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन करण्यात आल्या. पतपुरवठा शेतीमालाशी संलग्न केल्यामुळे खरेदी-विक्री संस्थांद्वारे शेतमालाची योग्य भावाने विक्री करून शेतकऱ्यांच्या गरजा भागविणे सुकर झाले. विपणन संस्था तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तालुका पातळीवरील खरेदी-विक्री संघ प्राथमिक विपणन संस्था म्हणून ओळखली जाते. शेतीसाठी अवजारे, बी-बियाणे व खते पुरवणे आणि शेतमालाची किफायतशीर विक्री करणे ही प्राथमिक विपणन संस्थांची कर्तव्ये आहेत. वर्धा, आर्वी, हिंगणघाट, कारंजा, देवळी, सिंदी, आष्टी व समुद्रपूर येथे तालुका खरेदी-विक्री संघ कार्यरत आहेत. त्यापैकी हिंगणघाट येथील संघ प्रथम स्थापन झाला. या संघांनी केलेल्या कार्याची माहिती तक्ता क्र. १० मध्ये दिली आहे.

इ. स. १९८६–८७ मध्ये जिल्ह्यात ५८ घाऊक ग्राहक भांडार होते. त्यांची एकूण सभासद संख्या १२,६६७ होती. त्यांनी १.८६ लाख रुपयांची खरेदी करून २.४२ रुपयांची विक्री केली.

वरील संस्थांव्यतिरिक्त विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी शेतकऱ्यांना शेतकी अवजारे, खते, ऑईल इंजिन, बियाणे, कीटकनाशके पुरविते. तसेच शेतमाल, सिमेंट, साखर, लोखंड इत्यादींची खरेदी–विक्री करते. सोसायटीने जानेवारी १९७२ मध्ये वर्धा येथे डेपो सुरू केला. इ. स. १९७५–७६ मध्ये या डेपोने ६९,३७,६४० रुपयांची खरेदी करून ७७,२०,५४१ रुपयांची विक्री केली. इ. स. १९८२–८३ मध्ये १,१०,८१,१४१ रुपयांची उलाढाल करून १,८९,६६५ रुपयांचा नफा मिळविला.

किरकोळ व्यापार

पूर्वी किरकोळ वस्तूंची दुकाने लहान होती व त्यात थोड्याच वस्तू विक्रीस ठेवल्या जात. गरजेनुसार लोक आठवडे बाजारातून वस्तू एकदम खरेदी करीत. लोकांच्या गरजा हळूहळू

बदलत गेल्या, त्यानुसार किरकोळ दुकानांचे स्वरूपही बदलत गेले. हा बदल ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात मोठ्या प्रमाणावर झाला. त्याचे मुख्य कारण म्हणजे नागरी भागात लोकांचे झालेले स्थलांतर होय.

जिल्ह्यामध्ये किराणा, कापड, स्टेशनरी, मिठाई, तयार कपडे, वीजेची उपकरणे, भांडी इत्यादी किरकोळ दुकाने आढळतात. अधिक लोकसंख्येमुळे नागरी भागात अशा दुकानांची संख्या अधिक आढळते.

किरकोळ व्यापारी नागपूर, वर्धा, आर्वी व हिंगणघाट शहरांतून माल खरेदी करतात. काही वेळा कंपन्यांचे प्रतिनिधी दुकानदारांना भेटून माल पुरवितात. तयार कपडे, वीजेची उपकरणे, लोखंडी सामान या वस्तूंची खरेदी जिल्ह्याबाहेरील मोठ्या शहरांतून केली जाते.

१९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यामधील घाऊक व किरकोळ व्यापारात गुंतलेल्या कामकऱ्यांची संख्या तक्ता क्र. ११ मध्ये दिलेली आहे.

राज्य व्यापार व रास्त भावाचीं दुकाने

दुसऱ्या जागतिक महायुद्ध काळात सर्वच जीवनोपयोगी वस्तूंची टंचाई भासू लागली. त्यामुळे भाव वाढून काळ्या बाजारास प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे लोकक्षोभ वाढीत भर पडली. महागाई व टंचाईचे पडसाद छोडो भारत आंदोलनाची उग्रता वाढविण्यात स्पष्ट दिसू लागले. प्राप्त परिस्थितीत परकीय सत्तेला लोकक्षोभ कमी करण्यासाठी रेशनिंग योजना कार्यान्वित करणे भाग पडले. मुंबई शहरात प्रथम रेशनिंग सुरू केल्यावर (१९४३) त्या योजनेची व्याप्ती इतरत्र वाढवावी लागली. सन १९४३ व १९४४ मधील शेती हंगाम अधिकच खराब झाल्यामुळे प्रश्न अधिक बिकट झाला. म्हणून शासनाने लेव्ही पद्धतीने वस्तू हस्तगत करून अधिकृत शिधावाटप दुकानांतून अन्नधान्य, साखर, कापड व रॉकेलचे वाटप सुरू केले. शिधापत्रिकेवर वाटप करण्यासाठी लागणारा अन्नधान्याचा पुरवठा सक्तीच्या लेव्ही पद्धतीने गोळा करताना शेतकऱ्यांवर बराच अन्याय झाला. या पद्धतीत वेळोवेळी बदल करण्यात आले. सन १९५६ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन कमी झाल्यामुळे, तसेच १९६२–६४ काळात वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळे पुन्हा एकदा स्वस्त धान्य दुकानांद्वारे जनतेला अन्नपुरवठा करण्यात आला. इ. स. १९६५ च्या पाकिस्तान आक्रमणामुळे टंचाईसदृश परिस्थिती निर्माण झाली.

धान्याचा पुरेसा पुरवठा व्हावा या हेतूने शासनाने अन्नधान्याची एकाधिकार खरेदी पद्धत सुरू केली. त्यानुसार जिल्ह्यात १९६४–६५ मध्ये एकाधिकार पद्धतीने [Jowar (Restriction on Purchase and Sale and Control of Movement) Order, 1964.] ज्वारीची खरेदी सुरू झाली. तसेच अन्नधान्याचा खुला व्यापार करण्यासही शासनाने बंदी घातली. शासनाने खरेदी केलेल्या धान्याची विक्री सहकारी संस्था, ग्रामपंचायत व अधिकृत व्यापाऱ्यांनी चालविलेल्या दुकानांतून केली जाते. या दुकानांवर जिल्हा पुरवठा अधिकारी व तहसीलदार नियंत्रण ठेवतात. इ. स. १९६५ मध्ये जिल्ह्यात ६१० स्वस्त धान्य दुकाने होती, त्यापैकी २४६ सहकारी संस्था, २१९ ग्रामपंचायती, ४५ नगरपालिका व १०० खाजगी व्यापारी चालवित होते. इ. स. १९८०–८१ मध्ये दुकानांची संख्या ४९४ होती. त्यांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे होती :– वर्धा २१७,

आर्वी १७६ व हिंगणघाट १०१. इ. स. १९८७–८८ मध्ये दुकानाची संख्या ५२१ पर्यंत वाढली. त्यांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे होती :— वर्धा १०४, देवळी ६८, सेलू ४८, आर्वी व आष्टी १२०, कारंजा ४४, हिंगणघाट ९० व समुद्रपूर ४७. या दुकानांतून वाटप केलेल्या मालासंबंधी आकडेवारी तक्ता क्र. १२ मध्ये दिलेली आहे.

शासकीय आधारभूत किमतीत धान्य खरेदी योजनेखाली महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन शासनाने ठरवून दिलेल्या आधारभूत किमतीनुसार शेतकऱ्यांकडील धान्य खरेदी करते. ज्यावेळी धान्याच्या किमती घसरतात त्यावेळी फेडरेशन इच्छुक शेतकऱ्यांकडील धान्य आधारभूत किमतीनुसार खरेदी करते व शेतकऱ्यास संरक्षण देते. खालील विवरणात या योजनेखाली ज्वारी खरेदीची आकडेवारी दिलेली आहे.

वर्ष		ज्वारी खरेदी केंद्रे	खरेदी (क्विंटल)
१९८१–८२	..	१०	४,०२०
१९८२–८३	..	१२	६५,००८
१९८३–८४	..	५	६,९२२
१९८५–८६	..	१२	१,३६,०५१
१९८६–८७	..	१२	१६,३४०

कापूस उत्पादकांच्या मालास किफायतशीर भाव मिळावा आणि मध्यस्थांकडून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून महाराष्ट्र शासनाने एकाधिकार कापूस खरेदी व्यवहार सहकार खात्याच्या अंतर्गत आणला. इ. स. १९७२–७३ पासून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाने जिल्ह्यात केलेल्या कापूस एकाधिकार खरेदीची आकडेवारी तक्ता क्र. १३ मध्ये दिलेली आहे. आर्वी, सिंदी, हिंगणघाट, वर्धा व पुलगाव उपविभागांतील कापूस खरेदी केंद्रे व संलग्न गावांची संख्या खाली दिली आहे.

उपविभाग		खरेदी केंद्रे	खरेदी केंद्रास संलग्न असलेली गावे
आर्वी	..	५	२८५
सिंदी	..	२	१७३
हिंगणघाट	..	५	२९३
वर्धा	..	५	२७४
पुलगाव	..	३	९४

इ. स. १९८३–८४ ते १९८८–८९ कालावधीतील खरेदी केलेल्या कापसाची किंमत खाली दिली आहे.

वर्ष		१०० टक्के रक्कम (रुपये) (हमी दराप्रमाणे)
१९८३–८४	..	३३,३०,२३,३६३
१९८४–८५	..	४८,२१,९६,१८३
१९८५–८६	..	७१,५८,२१,३१२
१९८६–८७	..	२५,७९,०४,६७७
१९८७–८८	..	२३,२८,८८,७०७
१९८८–८९	..	३५,६९,९७,१४२

फेरीवाले

फेरीवाले लहान वस्तूंची विक्री करीत फिरतात. पूर्वी वाहतुकीच्या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे तसेच व्यापाराचे स्वरूप लहान असल्यामुळे फेरीवाल्यांची उपयुक्तता होती. फेरीवाले घरोघरी जाऊन वस्तू विकत त्यामुळे लोकांची सोय होई. तथापि खेडोपाडी किरकोळ दुकानांची संख्या वाढल्यामुळे फेरीवाल्यांचे महत्त्व कमी झाले. १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात १,२६२ फेरीवाले होते, त्यापैकी ८१७ फेरीवाले नागरी भागात होते.

यात्रा

दरवर्षी भरणाऱ्या यात्रांमधून किरकोळ वस्तूंचा व्यापार चाले. अलीकडे मोठ्या खेडेगावी व शहरात पुरेशी किरकोळ दुकाने असल्यामुळे यात्रेमधून चालणारा किरकोळ व्यापार कमी झाला आहे. जिल्ह्यात २३ ठिकाणी यात्रा भरतात. त्यापैकी नागरी भागात हिंगणघाट येथे गाडगे महाराजांची मोठी यात्रा भरते. बाकी उर्वरित यात्रा ग्रामीण भागात भरतात. कारंजा तालुक्यातील ढगा गावी महाशिवरात्री निमित्ताने भरणारी यात्रा मोठी असून तेथे अंदाजे ५०,००० पेक्षा अधिक लोक जमतात. त्याचप्रमाणे हिंगणघाट तालुक्यातील कापसीला नानाजी महाराजांच्या नावे भरणारी यात्रा मोठी असून तेथे बराच मोठा जनसमुदाय उपस्थित असतो. आबाजी महाराजांच्या नावे विरुळ, सोनेगाव, जुनोना व अल्लीपूर या गावी यात्रा भरतात.

आठवडे बाजार

ग्रामीण भागातील लोकांना काही वस्तूंसाठी जवळच्या शहराकडे धाव घ्यावी लागते. परंतु ठिकठिकाणी भरणाऱ्या आठवडे बाजारांमुळे ग्रामीण भागातील लोकांची काही प्रमाणात सोय होते. त्यामुळेच ग्रामीण भागात आठवडे बाजाराला महत्त्व आहे. आठवडे बाजारात फेरीवाले व दुकानदार विविध प्रकारचा माल विक्रीस ठेवतात. तसेच शेतकरी कृषिमाल विकून आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करतो. बाजारामुळे ग्रामपंचायतीला बाजार कराद्वारे उत्पन्न मिळते. काही बाजारात गुरांची विक्री होते.

इ. स. १९६१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यामध्ये १३१ गावांमध्ये आठवडे बाजार भरत होते. त्यापैकी १० बाजारांत गुरांची विक्री होत होती. आठवडे बाजारांची तालुका-निहाय संख्या पुढीलप्रमाणे होती :– आर्वी तालुका ४६, वर्धा ५२, व हिंगणघाट ३३. १९८१ मध्ये आठवडे बाजारांची संख्या १६४ पर्यंत वाढली. त्यापैकी आर्वी तालुक्यात ७२ बाजार, हिंगणघाट ३८ व वर्धा तालुक्यात ५४ बाजार होते.[२३] या बाजारांचा जिल्ह्यातील ३९.१२ टक्के ग्रामीण जनतेला लाभ झाला.

वजने व मापे

पूर्वीच्या काळी जिल्ह्यामध्ये बऱ्याच प्रकारची वजने व मापे होती. स्थळानुसार ही वजने बदलत होती. सन १९०६ च्या **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर** मध्ये वजनमापांविषयी दिलेल्या माहितीचा सारांश पुढे दिला आहे :– जिल्ह्यामध्ये मापांचे पुढील प्रकार अस्तित्वात होते. १ शेर = २५ तोळे, एक अधेली = २ शेर किंवा ५० तोळे, एक पायली = ४ शेर किंवा १०० तोळे, किंवा २$\frac{1}{2}$ पौंड, एक काथा = ४ पायली, १ कुडव = ८ पायली किंवा २० पौंड व १ खंडी = २० कुडव किंवा ५ मण किंवा ४०० पौंड. कुडव ही मापाची पद्धत आता उपयोगात नाही. वर्धा, आर्वी आणि हिंगणघाट शहरात सरकारी काथा व कंगन (२ पौंड) हे मापांचे प्रकार सुरू केलेले होते. कंगन व काथा हे छत्तीसगडमधील मापांचे प्रकार होते. आर्वी तालुक्यामध्ये पायली मापामध्ये बदल आढळतो. देवळी, नाचणगाव व अंदोरी परगाण्यात मात्र २४ कुडवची खंडी वापरीत. तीळ व जवसासाठी वर्धा येथे २२$\frac{1}{2}$ कुडव (८ पायली), आर्वीमध्ये २१$\frac{1}{4}$ कुडव व हिंगणघाटमध्ये २३ कुडवची खंडी वापरीत.

स्वच्छ न केलेल्या कापसाचे वजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे वजने उपयोगात आणली जात. १ पासरी = २$\frac{1}{4}$ शेर किंवा ४$\frac{1}{2}$ पौंड, १ धडा = २ पासरी किंवा ९ पौंड, १ मण = ४ धडे किंवा १८ शेर व १ खंडी = २० मण किंवा ९ सरकारी मण किंवा ७२० पौंड. स्वच्छ केलेल्या कापसाच्या वजनासाठी वर्धा व हिंगणघाट येथे ११ शेराचा मण व आर्वी येथे १४ शेरांचा मण वापरीत. तसेच वर्धा व हिंगणघाट येथे १ बोजा = १५ मण (३३० पौंड) व आर्वी येथे १ बोजा = १० मण (२८० पौंड) वापरात होते. मीठ व साखरेच्या वजनासाठी १ मण = १० शेर हे वजन सर्वत्र अस्तित्वात होते. परंतु तुपाच्या वजनासाठी वरील तीन शहरांत थोडा फरक आढळतो. तुपासाठी वर्धा येथे १ मण = १२ शेर व आर्वी आणि हिंगणघाट येथे १ मण = ११$\frac{1}{2}$ शेर वापरीत. मीठ पायलीने विकत. सोने व चांदीसाठी १ तोळा = १२ मासे (१ मासा = ८ गुंजा) वापरीत. तथापि १ सरकारी तोळा ११ मास्यांचा होता. दुसऱ्या एका वजन प्रकारानुसार १ तोळा = १ सरकारी रुपया किंवा २$\frac{1}{2}$ वाल (१ वाल = २ गुंजा) एवढा होता.[२४]

वेगवेगळ्या वजनामुळे निर्माण होणारा गोंधळ नाहीसा करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने सुटसुटीत वजन मापांची पद्धत प्रचलित करण्याचे ठरविले व त्यानुसार १९५६ मध्ये स्टँडर्डस ऑफ वेटस अँड मेजर्स ॲक्ट पास केला. यानुसार डेसीमल पद्धतीचा वापर सुरू केला. केंद्र सरकारने पास केलेल्या अधिनियमाच्या आधारे राज्य शासनाने स्वतंत्र अधिनियम, १९५८ मध्ये पास केला. त्यानुसार वजन मापांची मेट्रिक पद्धतीवर आधारित नवीन पद्धती १९५८ मध्ये सुरू झाली. तेव्हापासून मेट्रिक पद्धतीनुसार जिल्ह्यातील व्यापार चालतो. प्रचलित वजने मापे बरोबर आहेत किंवा कसे याची उद्योग विभागाकडून तपासणी केली जाते.

---

[२३] पुनर्रचनेपूर्वी अस्तित्वात असलेल्या तालुक्यांचा येथे उल्लेख केला आहे.

[२४] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९०६, पृ. १४५–४७.

तक्ता क्रमांक १

जिल्ह्यातील सहकारी संस्थांची संख्या, १९८०-८१ व १९८५-८६

संस्थेचा प्रकार	संस्था		पहिली संस्था स्थापन झाल्याचे	
	१९८० -८१	१९८५ -८६	वर्ष	ठिकाण
अ) कृषी सहकारी पतसंस्था—				
जिल्हा मध्यवर्ती बँक ..	१	१	१९१२	वर्धा
राज्य भूविकास बँक, वर्धा शाखा ..	१	१	१९३७	वर्धा
प्राथमिक कृषी पतसंस्था ..	४०१	४००	१९३०	आर्वी
धान्य बँका ..	३	३	१९५७	आर्वी
आदिवासी कृषी सहकारी संस्था ..	२	२	१९८१	आर्वी
ब) बिगरशेतकी सहकारी पतसंस्था—				
नागरी बँका ..	३	४	१९६०	वर्धा
वेतनधारकांच्या पतसंस्था ..	५८	६७	१९३८	वर्धा
गिरणी व कारखाने कामगार पतसंस्था	२	१	१९३८	हिंगणघाट
क) शेतकी बिगरपत सहकारी संस्था—				
कृषी पणन संस्था ..	१२	१५	१९२९	आर्वी
कृषी उत्पादन व प्रक्रिया संस्था ..	११	१७	१९६०	वर्धा
साखर कारखाने ..	..	१	१९८१	सिंदी
मत्स्यव्यवसाय संस्था ..	१३	२२	१९६३	आर्वी
जलसिंचन संस्था ..	१	१	उ. ना.	उ. ना.
शेती सहकारी संस्था ..	..	१	उ. ना.	उ. ना.
कृषी प्रक्रिया संस्था—				
दुग्ध व्यवसाय ..	१७७	२३२	१९६१	वर्धा
पशुखाद्य ..	१	१	१९७६	आर्वी

तक्ता क्रमांक १—चालू

संस्थेचा प्रकार	संस्था		पहिली संस्था स्थापन झाल्याचे	
	१९८० –८१	१९८५ –८६	वर्ष	ठिकाण
ड) बिगरशेतकी बिगरपत सहकारी संस्था—				
हातमाग विणकर कामगार संस्था	११	१३	१९४५	हिंगणघाट
सहकारी सूत गिरणी ..	..	२	१९८२	वर्धा
इतर औद्योगिक संस्था ..	३७	४२	१९५९	आर्वी
ग्राहक भांडार ..	५३	५७	१९४५	वर्धा
घरबांधणी संस्था ..	८५	१३८	१९५६	वर्धा
देखरेख संस्था ..	१	१	१९८१	वर्धा
ग्रामस्वराज्य संस्था ..	१	१	उ. ना.	सेवाग्राम
वाहतूक संस्था ..	..	५	१९८२	हिंगणघाट
जंगल कामगार संस्था ..	१३	१७	१९६५	आर्वी
छपाई प्रक्रिया संस्था ..	४	४	१९६१	वर्धा
रुग्णालय संस्था ..	१२	..	उ. ना.	उ. ना.
कामगार कंत्राट संस्था ..	५४	६९	१९४७	वर्धा
जिल्हा सहकारी मंडळे ..	१	१	१९५०	वर्धा
संघ (दुग्धव्यवसाय) ..	४	७	१९६१	वर्धा
एकूण संस्था ..	९६२	११२६	..	..

उ. ना. = उपलब्ध नाही.

तक्ता क्रमांक २

आयुर्विमा महामंडळाचे वर्धा जिल्ह्यातील कार्य

(रुपये)

वर्ष	प्रस्तावित विमापत्रांची संख्या	प्रस्तावित रक्कम	प्रत्यक्ष विमापत्रांची संख्या	एकूण रक्कम	प्रत्येक विमा-पत्राची सरासरी रक्कम	विमा एजंटाची संख्या
१९६१–६२ ..	उ. ना.	उ. ना.	२१३२	६१,१६,२७५	उ. ना.	उ. ना.
१९६६–६७ ..	उ. ना.	उ. ना.	२२७५	१०,९४,९००	उ. ना.	उ. ना.
१९७३–७४[२५] ..	२५४५	१,७४,३०,०००	२४०६	१,६३,१३,०००	६,७८०	१९३
१९७४–७५ ..	२६३८	२,४४,८४,०००	२५४१	२,३८,८५,०००	९,४००	१७७
१९७५–७६ ..	२४८७	१,९६,३९,०००	२२८०	१,७६,३५,०००	७,७३०	१७८
१९७६–७७ ..	२६६७	२,०८,७०,०००	२४३९	१,९३,३०,०००	७,९३०	१६१
१९७७–७८ ..	२२४७	२,२३,५४,०००	२२३५	२,१०,९२,०००	९,४४०	१३७
१९८२–८३ ..	२४३५	३,७०,५१,०००	२४०६	३,६६,१४,०००	१५,२१७	१८७
१९८४–८५[२६] ..	३१४४	४,७३,६५,५००	३१७७	४,५८,३५,५००	१४,७०५	१८०
१९८५–८६ ..	३९३२	६,१७,५१,०००	३८६२	६,०६,६१,५००	१५,७०७	२४८

[२५] आयुर्विमा महामंडळ, नागपूर कार्यालयाकडून प्राप्त माहिती.

[२६] आयुर्विमा महामंडळ, वर्धा शाखा कार्यालयाकडून प्राप्त माहिती.

उ. ना. = उपलब्ध नाही.

तक्ता क्रमांक ३

जिल्ह्यातील योजनानिहाय अल्पबचत गुंतवणूक[२७]

(कोटी रुपये)

योजना	१९८२–८३		१९८५–८६		१९८६–८७		१९८७–८८	
	एकूण	नक्त	एकूण	नक्त	एकूण	नक्त	एकूण	नक्त
टपाल कार्यालय बचत बँक ..	३.७१	(–)०.१८	४.२०	०.११	५.२४	०.६४	५.१२	(–)०.१५
संचित मुदत ठेव ..	०.१५	०.०८	०.१५	०.०६	०.१३	०.०३	०.१४	०.०७
पुनरावर्ती ठेव ..	१.२५	०.४७	२.२६	१.१५	२.८६	०.९५	३.३८	०.८६
समयबद्ध ठेव ..	०.५१	०.१०	०.७३	०.१९	०.३४	(–)०.१४	०.४२	(–)०.०९
सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी ..	०.१५	०.१५	०.०४	०.०४	०.१८	०.१८	०.२२	०.२२
राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (२ री मालिका)	..	..	०.१२	०.०४	०.०८	०.०३	०.०१	(–)०.०५
राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (६ वी मालिका)	१.०७	१.०७	२.६१	२.४८	२.६२	२.४७	२.५२	१.८१
राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (७ वी मालिका)	०.०८	०.०८	०.१५	०.१४	०.१५	०.१२	०.१०	०.०५
इंदिरा विकास पत्रे ..	..	..	..	..	१.०७	१.०७	१.३०	१.३०
राष्ट्रीय बचत योजना, १९८७ ..	..	..	..	..	..	..	०.०१	०.०१
मासिक प्राप्ती योजना ..	..	..	..	..	..	..	०.१९	०.१९
राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे ३, ४, ५ व इतर	..	..	..	(–)०.१७	..	(–)०.२२	०.०१	(–)०.१९
सामाजिक सुरक्षा प्रमाणपत्रे ..	०.०१	०.०१	..	..	..	..	..	..
एकूण ..	६.९३	१.७८	१०.२६	०.०४	१२.६७	५.३३	१३.४२	४.०३

[२७] अल्पबचत संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

तक्ता क्रमांक ४

जिल्ह्यातील आयात निर्यात व्यापार

(वजन = ००० मण)
(किंमत = ००० रुपये)

वस्तू	१९०४		१९००		१८९९	
	वजन	किंमत	वजन	किंमत	वजन	किंमत
निर्यात						
कच्चा कापूस ..	५५१	११,१५८	२२२	४,२६४	३८०	५,६१९
कापूस उत्पादन (देशी)	९९	३,१७१	६२	१,८७७	५०	१,५२२
ज्वारी व बाजरी ..	१३	२४	१६	५२	६३	१८०
इतर धान्य व डाळी	४५	११९	४९	१७३	६३	१८०
हाडे व कातडी ..	४	१३७	१०	२०२	५	१०५
ताग व ज्यूट ..	९	८७	७	६२	६	४९
तेलबिया ..	४४१	९१४	१९४	७२०	१५५	५९२
तूप ..	९	२४५	९	२६७	१३	३०४
चारा ..	८	१२	३१	४९	५	१४
इतर वस्तू* ..	८७	..	८४	..	५८	..
एकूण ..	१,२६६	१५,८६७	६८४	७,६६६	७९८	८,५६५
आयात						
कोळसा ..	५१५	१२९	३७५	९४	३३१	८३
कापड उत्पादन ..	२०	९२०	१२	४९०	१३	५२१
अन्नधान्य व डाळी ..	२८८	८५३	६८१	२,३४५	३८८	१,२२८
ताग व ज्यूट ..	१९	१८४	८	७२	१०	८५
धातू ..	३५	४४८	१२	१४८	३६	३९४
रॉकेल ..	४८	१८४	११	५६	२६	१२१
मीठ ..	६७	२१६	५९	२२५	४९	१८९
साखर ..	९७	७३३	५५	४१३	४३	२७९
लाकूड ..	१८५	३२८	५९	१३६	११६	२३१
नारळ ..	१५	१०२	८	५७	७	४६
इतर वस्तू ..	२७	२४६	१३	१३०	२९	२६६
इतर वस्तू* ..	१९७	..	२४९	..	२११	..
एकूण ..	१,५१३	४,३४३	१,५४२	४,१६६	१,२५९	३,४४३

* किंमत उपलब्ध नाही.

तक्ता क्रमांक ५

वर्धा बाजारतळावरील प्रमुख वस्तूंची उलाढाल

(आवक क्विंटलमध्ये व किंमत रुपयात)

वस्तू		१९७०–७१		१९७५–७६		१९८०–८१		१९८६–८७	
		आवक	किंमत	आवक	किंमत	आवक	किंमत	आवक	किंमत
कापूस	..	८६,८५६	२,३७,७७,४२८	१,०३,०८०	२,९८,७९,८६८	१,५१,१५०	८,०२,३३,०००	१,५२,५८८	८,११,४४,७०८
ज्वारी	..	१९०	१०,६१३	८,२८३	७,०१,२१०	१५,२३०	२०,९७,०००	१४,६२९	२१,३१,१५८
गहू	..	५,९७१	६,०१,४९०	२९,०४७	२९,८६,९४८	८,३७०	१६,१६,०००	६,५०६	१५,४४,४५५
तूर	..	४०,४७६	४१,४७,७६३	३४,४९१	४५,५९,८५१	२८,०२०	८७,६२,०००	२२,०९३	१,३०,१७,५२२
मूग	..	७७६	८४,५६३	२,१७६	२,९१,८११	उ. ना.	उ. ना.	२३	१०,५४९
हरभरा	..	८८९	६८,१८०	६८२	१,२४,४००	५५०	१,९३,०००	३,१३८	१०,८३,०६९
जवस	..	३,३३०	५,२९,४८४	५,६७०	१०,६२,२६३	उ. ना.	उ. ना.	१२	९,४९५
भुईमूग	..	१,१५५	१,४२,५२८	१,४६०	२,४८,५९६	३६०	१,३२,०००	८८८	६,८८,६९४

उ. ना. = उपलब्ध नाही.

तक्ता क्रमांक ६

सिंदी बाजारतळावरील प्रमुख वस्तूंची उलाढाल

(आवक क्विंटलमध्ये व किंमत रुपयात)

वस्तू	१९७३–७४		१९७५–७६		१९८०–८१		१९८६–८७	
	आवक	किंमत	आवक	किंमत	आवक	किंमत	आवक	किंमत
कापूस ..	२९,०३४	८०,२५,४५३	४७,७४५	१,४४,३४,२४२	८४,५८४	४,४०,६७,१३५	९२,८४६	४,९८,०९,५७५
तूर ..	२,६२६	४,३२,४५२	२,०९३	३,०८,०६५	४,३८७	१३,०३,५९६	४०२	२,२५,०६९
ज्वारी ..	३,९३९	२,९०,७८०	१,५०४	१,३१,२४१	१,४५६	२,३९,८६५	७०	१०,४३६
गहू ..	१,००९	१,२५,९१६	९८६	१,५३,२५८	६,३७३	११,९१,०४८	४८	१०,२५०
हरभरा ..	१३३	२५,०८८	१२९	१६,३२१	१०२	२४,४५८	१०	३,०४७
तीळ ..	१८८	७६,७५२	४७	१६,३७१	७	४,७३२	..	..
जवस ..	७८४	२,४२,११०	२,१४७	४,३९,५२३	४०	२०,०६९	३	२,१०१

तक्ता क्रमांक ७

पुलगाव बाजारतळावर विनियमित केलेल्या वस्तूंची आवक व किंमत

(आवक क्विंटलमध्ये व किंमत रुपयात)

वस्तू	१९७२–७३ आवक	१९७२–७३ किंमत	१९७५–७६ आवक	१९७५–७६ किंमत	१९८०–८१ आवक	१९८०–८१ किंमत	१९८६–८७ आवक	१९८६–८७ किंमत
कापूस ..	८१,६७२	२,०५,१०,९५३	६२,११८	१,६८,७५,९४९	१०,७३,३५९	५,५३,३९,०६५	१,०७,३७२	५,६८,४२,५८६
तूर ..	१२,३६४	२१,३९,०८७	८,३४१	१०,७५,८५९	१,९७७	६,२१,७५५	७,०९४	५०,९०,३२९
गहू ..	२५१	२९,९५५	८८२	१,३०,६१५	४८५	१,०९,१२५	१५९	३६,५१५
भुईमूग ..	९७८	५३,९८२	७८०	१,३३,५५७	४०	१५,२४०	११२	६२,४३७
ज्वारी ..	उ. ना.	उ. ना.	१४५	१५,३७०	१,७९१	२,१७,७११	३,२०५	४,७३,१६०
हरभरा ..	१०४	१४,२६३	९०	११,२७३	७९	१९,७५०	३५७	१,१६,८३४
मूग ..	९८३	१,९५,८०२	११८	२८,२६७	७६	२४,७७६	१०४	४१,९२४
जवस ..	४७	९,२२५	८०	१७,०९३	..	..	..	..

उ. ना.=उपलब्ध नाही.

तक्ता क्रमांक ८

आर्वी बाजार आवारातील प्रमुख वस्तूंची उलाढाल

(आवक क्विंटलमध्ये व किंमत रुपयात)

वस्तू		१९७२–७३		१९७६–७७		१९८०–८१		१९८६–८७	
		आवक	किंमत	आवक	किंमत	आवक	किंमत	आवक	किंमत
कापूस	..	१,१५,४९४	२,१५,४०,५६०	६६,२११	२,१८,८१,९००	६८,५७२	३,५०,०७,३९८	९४,३७२	५,३८,०१,०९८
तूर	..	२६,०१७	२४,५०,५८०	४,६१७	११,४३,५००	८,१३७	३५,९६,३६५	८,०९३	४६,२९,११४
मूग	..	१०२	१०,२७२	३३	५,२३०	..	..	४१	१५,१२३
भुईमूग	..	१,१८३	१,२३,५६०	१५९	४१,६३०	..	..	..	..
ज्वारी	..	२,६१९	२,६१,९००	५,८८३	४,८६,३००	६९	१०,३५२	१,४२७	१,९२,८५३
हरभरा	..	..	..	१५३	२१,८४०	२९	९,१४०	११३	४०,६५८
गहू	..	..	..	१,१६१	१,५७,८००	६४	१०,३५२	१४६	३७,९०३

तक्ता क्रमांक ९

हिंगणघाट बाजार आवारात विनियमित केलेल्या प्रमुख वस्तूंची आवक व किंमत

(आवक क्विंटलमध्ये व किंमत रुपयात)

वस्तू		१९७०–७१		१९७५–७६		१९८०–८१		१९८६–८७	
		आवक	किंमत	आवक	किंमत	आवक	किंमत	आवक	किंमत
कापूस	..	८५,९३१	१,७१,०१,१४७	१,००,६२९	२,९०,५३,५६०	१,९१,७५४	९,९५,५८,५०३	१,९१,६५८	१०,१५,१६,७७७
गहू	..	३,४४४	३,३१,२७७	८,०३३	१४,३८,३५९	२,९७४	४,६९,३०८	२,६४७	५,८५,९६०
ज्वारी	..	७५	४,२९०	२,०३५	१०,३६७	५,१४७	२,०५,११७	९,६७३	२०,८४,८१४
मूग	..	१,२४९	१,३५,१९८	१,८४८	२,४२,३०८	१,५३८	१,८३,३४५	१६०	९४,५०४
हरभरा	..	४९१	३८,३४६	८४०	१,०७,००५	३,२३५	६,९९,४५७	२,९६४	१५,३५,७२३
तूरडाळ	..	१२२	१४,५१२	१६	१,९२५	२	७५०	..	..
जवस	..	८,३९७	१३,६७,१३९	९,६८८	७,९९,९५९	९९०	४,२६,८४३	४,६९५	२९,९८,८४४
तीळ	..	१,३४६	३,३३,५५१	१,७५०	६,१७,२१७	३,८४५	९,६१,९३०	१२,१३०	२,०१,६४,५७३

तक्ता क्रमांक १०

तालुका खरेदी-विक्री संघांची माहिती

(रुपये)

तालुका खरेदी-विक्री संघ	स्थापना	वर्ष	भाग भांडवल	राखीव निधी	नफा	तोटा	शेतमालाची विक्री	ग्राहकोपयोगी वस्तूंची विक्री
वर्धा ..	५–४–१९४४	१९८०–८१	२,१८,६१५	२,४०,४१७	२,३४,१३९	..	६७,३६,२९५	४६,५३,४११
		१९८५–८६	३,२३,५८५	५,२२,७४६	५१,३५५	..	६५,०५,८६९	४२,१९,१८०
समुद्रपूर ..	२५–१–१९६०	१९८०–८१	५,६९,६७०	८३,५३८	९२,७५७	..	७९,४९,३८५	२०,५८,४६९
		१९८५–८६	५,७२,०२०	२,१६,९०८	२७,५५५	..	५७,३३,८८४	१८,१८,८३९
देवळी ..	२३–६–१९३७	१९८०–८१	१,३९,२५०	५४,११०	१७,२९५	..	३८,२९,८२५	१०,६४,०००
		१९८५–८६	४,७७,५५०	१,१५,९७७	१८,००६	..	४९,३७,९१३	१८,०३,६००
हिंगणघाट ..	१३–२–१९२९	१९८०–८१	९५,३५०	५,५१,३८९	९५,१९०	..	८८,५१,२४१	३३,८७,१९४
		१९८५–८६	२,७३,३४२	९,१४,१४६	८२,१७५	..	६३,७९,६२४	४९,५९,१५१
सिंदी ..	५–२–१९६०	१९८०–८१	१,४७,३००	९१,५००	२६,७६८	..	५५,५६,०००	२३,६२,०००
		१९८५–८६	१,५१,९००	५०,००१	५९,०००	..	८६,९४,०००	३२,६०,०००
आष्टी ..	१९–६–१९८५	१९८०–८१	..	..	..	..	..	..
		१९८५–८६	१,२२,७४६	८७,४१२	६९,६०९	..	२९,१४,८३२	..
आर्वी ..	१९–२–१९२९	१९८०–८१	४,५६,०००	६,६५,१८१	..	९,९३,३७६	४१,४६,३००	१४,१३,७००
		१९८५–८६	७,९६,७२१	७,४०,०४५	..	१,०५,०१७	९५,४०,०००	३५,२६,०००
कारंजा ..	२५–१–१९६०	१९८०–८१	३३,५६०	४३,८३३	३९,६६९	..	३४,२४,८४०	१,३४,१५८
		१९८५–८६	४१,०७५	४१,९२६	५०,१८८	..	१९,०१,६०५	८०,३५२

तक्ता क्रमांक ११

जिल्ह्यातील घाऊक व किरकोळ व्यापारात गुंतलेल्या व्यक्ती, १९८१[२८]

बाब	एकूण	
	पुरुष	महिला
ऊक व्यापार—		
खाद्य पदार्थ, कापड, प्राणी आणि मादक द्रव्ये व पेये	४०३	५
रसायने, वीज व इंधन	२९	..
लाकूड, कागद, कातडी व हाडे	५०	..
यंत्रसामग्री, विद्युत उपकरणे, इत्यादी ..	२५	..
इतर उत्पादने	८८	..
रकोळ व्यापार—		
खाद्य पदार्थ, पेये, तंबाखू व मादक द्रव्ये ..	६,८१८	६०१
कापड	१,३८५	१०
इंधन व घरगुती उपयुक्त वस्तू	१,२४१	९८
इतर उत्पादने	१,२९२	७५

[२८] **सेन्सस ऑफ इंडिया, १९८१, सिरीज १२, महाराष्ट्र, जनरल इकॉनॉमिक टेबल्स,** पृ. ५१०–११.

तक्ता क्रमांक १२

अधिकृत शिधावाटप दुकानांतून वाटप केलेल्या वस्तू, १९८७–८८

(वजन क्विंटलमध्ये, किंमत रुपयात)

वस्तू		वर्धा	सेलू	देवळी	आर्वी	कारंजा	हिंगणघाट	समुद्रपूर
गहू ..	वजन	७२,७६३	१३,८८५	५०,३९८	३९,६९६	११,१२५	४९,८९३	१५,१६०
	किंमत	१,४८,००,४२०	२८,३०,९९७	१,०२,४८,१९२	८०,९०,७०५	२२,७१,४१५	१,०१,४७,१८३	३०,८९,६८२
तांदूळ ..	वजन	२७,६५३	९,३८२	१,७८,४८	१९,६००	६,३१९	२०,३०२	६,१३६
	किंमत	८४,९९,०३६	२८,८४,७०१	५६,३१,७१७	६०,१०,८४६	१९,४६,१६५	६२,४१,५२४	१८,९८,४८०
ज्वारी ..	वजन	५,५३७	१९४	७५०	७९	५८	१,६७०	१८९
	किंमत	४८,०३०	२६,३१८	९९,५१७	१०,८०३	७,९४६	२,२८,५२२	२५,६७५
पामोलिन तेल ..	वजन	४,३४५	१,५७१	२,९७२	३,४२७	१,१५१	३,१५९	१,५४७
..	किंमत	५५,००,५५४	१९,४६,६१४	३६,६१,७३५	४२,८४,२२८	१४,३०,००१	३९,१७,१७४	१९,२७,४६४
साखर ..	वजन	१३,७७०	४,५३२	७,३६४	९,०८१	३,५३१	९,१७९	३,७१९
..	किंमत	६७,५८,८७५	२२,२२,३९५	३६,१५,०९०	४४,५८,७३५	१७,३५,२८५	४५,०९,३१५	१,८२,६६५

तक्ता क्रमांक १३

जिल्ह्यातील एकाधिकार कापूस खरेदी

(खरेदी क्विंटलमध्ये)

उपविभाग	१९७२–७३		१९७३–७४		१९७४–७५		१९७५–७६		१९७६–७७	
	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या
वर्धा	१,६२,८५५	३०,६६०	७१,४९४	१२,९७२	२,३२,३३०	४२,६३४	१,५०,८२४	२७,७७५	९५,४५५	१९,६४२
आर्वी	१,२१,०३७	२४,०६८	३२,५५४	६,१४७	१,६३,९४४	३०,४६९	१,१३,९१०	२१,९२६	९३,४५४	१०,२२१
पुलगाव	८१,७७०	१४,४३०	१९,०४०	३,३७१	१,०२,१५५	१८,१८१	६२,११९	१०,७३०	६४,४१२	१२,७६८
सिंदी	..	..	..	..	..	..	..	..	४२,७६६	८,६५८
हिंगणघाट	..	..	३०,६८०	५,७९२	२,०१,८०२	३६,९८१	१,०१,७९२	१८,०१६	९३,९९३	१९,६५०

उपविभाग	१९७७–७८		१९७८–७९		१९७९–८०		१९८०–८१		१९८१–८२	
	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या
वर्धा	५८,३९६	११,५६२	..	४१,८६३	१,८४,०३७	३५,९३८	१,४८,८९६	२८,८१२	१,८७,१५५	३५,०९६
आर्वी	३१,८८६	६,५७६	८४,६२९	१७,५२८	१,४१,१५०	२७,५०९	९४,६९०	१८,७७९	१,२९,६७६	२५,३५६
पुलगाव	..	..	..	..	१,०६,२११	२०,६७९	८९,०४१	१६,९२४	१,०७,३७४	२०,३९०
सिंदी	..	..	..	..	८९,२६५	१७,४९५	८४,५८६	१६,६५४	१,१५,४५६	२२,३१२
हिंगणघाट	४७,७७६	९,६२७	१,०७,२८३	२२,५४८	१,९८,७३०	३९,३१०	१,८७,९४७	३७,२७९	२,१८,५३४	४१,८२२

तक्ता क्रमांक १३–समाप्त

उपविभाग	१९८२–८३		१९८३–८४		१९८४–८५		१९८५–८६		१९८६–८७		१९८७–८८	
	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या	खरेदी	गासड्या
वर्धा	१,०५,८६९	४०,२०४	१,४६,५८३	२७,०७१	१,९२,४५७	३७,९१३	३,१४,८५५	५९,५३८	१,७४,५३८	३३,९७४	६२,३८४	१२,९१२
आर्वी	२,०२,७५०	४१,२९६	१,१२,९१२	२१,८१२	१,८४,८३५	३८,१२९	२,६९,०४२	५१,२३९	१,२९,९६०	२५,९९८	१,२५,१०६	२५,०५१
पुलगाव	१,२५,००३	२५,२५६	८२,५०८	१५,८२६	१,२३,९३५	२५,१७७	१,७३,०२०	३४,०५५	१,०७,३५३	२१,३१२	६४,५२८	१२,९२७
सिंदी	१,२२,२५८	२४,०३७	९३,८६१	१७,३९१	१,२३,५८५	२४,८१३	१,६५,१८५	३१,२९०	९२,८२३	१७,९२८	५८,६८९	११,४३५
हिंगणघाट	२,३४,९५७	४७,१५७	१,३१,७८१	२४,८२३	१,७७,८९०	३५,६१९	२,७४,१९४	५३,५९७	१,६९,६८८	३४,२८२	१,२५,८१९	२५,०३६

प्रकरण ७–वाहतूक व दळणवळण

वाकाटक राजा प्रवरसेन दुसरा याने प्रवरपूर म्हणजेच सध्याच्या पवनारला आपली राजधानी स्थलांतरित केली होती. वाकाटक काळी प्रवरपूरला वैभवसंपन्नता होती. यावरून स्वाभाविक अनुमान काढता येते की, त्याकाळी रस्ते वाहतुकीच्या सुविधा उपलब्ध असतील. वाकाटक काळात अजिंठयाच्या काही लेण्यांचे काम पूर्ण झाले. त्या कामी वाकाटक राजांनी मदतही दिली होती. यावरूनही असे अनुमान काढता येईल की, प्रवरपूरपासून अजिंठयापर्यंत रस्ते अस्तित्वात असावेत. हा प्रदेश अकबराच्या अमलाखाली आला तेंव्हा पवनार, गाविलगड, नरनाळा, रामगड, माहूर व माणिकदुर्ग हे प्रमुख किल्ले असून त्यांच्या दरम्यान रस्ते होते. गोंड राजांनी रस्ते विकासासाठी प्रयत्न केल्याचा पुरावा उपलब्ध नाही. हा प्रदेश नागपूरकर भोसल्यांच्या अमलाखाली असतानासुद्धा रस्ते विकास केल्याचे पुरावे उपलब्ध नाहीत. पुढे ब्रिटिश अंमल प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनी जुन्या रस्त्यांची सुधारणा करून ते वाहतुकीसाठी अधिक योग्य करण्याचा प्रयत्न केला. वाहतूक सुविधांच्या विकासाची पहिली फलश्रुती म्हणजे १८६७ मध्ये खुला केलेला मुंबई-नागपूर लोहमार्ग होय. त्यानंतर १८७७ मध्ये वर्धा-वरोरा लोहमार्ग खुला करण्यात आला. विद्यमान शतकाच्या प्रारंभी नागपूरपासून हैदराबादपर्यंत प्रमुख रस्ता उपलब्ध होता. दुसरा प्रमुख रस्ता म्हणजे नागपूरपासून मुंबईकडे जाणारा महामार्ग होता. या रस्त्यांवरून बैलगाडी व घोडागाडीच्या सहाय्याने वाहतूक केली जात असे. वर्धा जिल्ह्यातील लोहमार्ग, विविध प्रवर्गातील रस्ते, पूल, राज्य परिवहन सेवा, डाक, तार व दूरध्वनी सेवा इत्यादी बाबींचा इतिहास या प्रकरणात दिलेला आहे. वर्धा भारताच्या केंद्रस्थानी असल्यामुळे तेथून देशातील सर्व भागांशी लोहमार्ग व रस्तामार्गे दळणवळण सुविधा उपलब्ध आहेत. किंबहुना याबाबतीत वर्ध्यास वरदान प्राप्त झालेले आहे हे खालील माहितीवरून दिसून येईल.

लोहमार्ग

भारताच्या केंद्रस्थानी असलेल्या वर्ध्यास रेल्वे सुविधांचे जणूकाही वरदान प्राप्त झाले आहे. वर्धा लोहमार्गाने भारतातील सर्व भागांशी जोडलेले आहे. मुंबई-नागपूर-कलकत्ता लोहमार्ग आणि मद्रास-दिल्ली-जम्मूतावी या ग्रॅण्ड ट्रंक मार्गांवरील हे जंक्शन आहे. त्यामुळे येथून पश्चिम, पूर्व, उत्तर व दक्षिण भारताशी थेट रेल्वे दळणवळण शक्य झालेले आहे. मुंबई-नागपूर लोहमार्गाच्या या जिल्ह्यातून जाणाऱ्या भागाची बांधणी १८६७ मध्ये सर्वतः पूर्ण होऊन हा मार्ग त्याच वर्षी वाहतुकीस खुला करण्यात आला. त्यानंतर १८७७ मध्ये वर्धा-वरोरा लोहमार्ग वाहतुकीस खुला करण्यात आला. सन १९०५ मध्ये वर्धा-वरोरा मार्ग चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूरच्या कोळसा खाणींना जोडण्यात आला. या प्रदेशातील सुपीक जमीन आणि कापसाच्या लागवडीमुळे रेल्वेमार्ग बांधण्यास उत्तेजन मिळाले असावे. वस्तुतः भुसावळ ते नागपूर हा मार्ग जरी औपचारिकरीत्या १८६७ मध्ये खुला करण्यात

आला तरी १८६२ मध्येच वर्ध्यापर्यंत लोहमार्ग तयार होता. किंबहुना वर्धा जिल्ह्याचे मुख्यालय कवठा गावावरून वर्ध्याला शासनाने स्थलांतरित केले ते रेल्वे सुविधेचा विचार डोळ्यासमोर ठेवूनच.

विद्यमान शतकाच्या प्रारंभी वर्ध्याहून मुलताईमार्गे थेट इटारसीला जोडणारा लोहमार्ग बांधण्याची योजना होती. या कामाचे सर्वेक्षण १९०२ मध्ये पूर्ण झाले होते. तथापि ही योजना अमलात न आणता दुसरी एक योजना तयार करण्यात आली होती. त्यानुसार वर्धा जिल्ह्याच्या उत्तर भागातून नागपूर ते अमरावती लोहमार्ग बांधण्याची योजना तयार केली होती. त्या योजनेचा दुसरा भाग म्हणून नागपूर-अमरावती संकल्पित लोहमार्गावरील एका सोयीस्कर ठिकाणाहून बेतूल जिल्ह्यातून इटारसीपर्यंत लोहमार्ग बांधण्याची योजना सरकारने तयार केली होती. तथापि या दोन्हीही योजना फलद्रूप झाल्या नाहीत.[१] अलीकडील आठ-दहा वर्षांत अशाच प्रकारची पर्यायी योजना रेल्वे मंत्रालयाच्या विचाराधीन असल्याचे कळते. त्यानुसार मद्रास-दिल्ली-जम्मूतावी ग्रॅण्ड ट्रंक रेल्वे जवळच्या मार्गाने नेण्याची संकल्पना आहे. संकल्पित योजनेनुसार हा मार्ग बल्लारपूर, चंद्रपूर, नागपूर इत्यादी स्थानके वगळून पांढरकवडा-वर्धा-काटोल या मार्गाने नेण्याबाबतचे सर्वेक्षण चालू आहे. याबाबतचा अधिकृत तपशील अद्याप प्राप्त झालेला नाही.

मुंबई-नागपूर-हावडा मार्ग : या रुंदमापी (Broad Gauge) लोहमार्गाची सुरुवात मुंबईहून होते. हा मार्ग पूर्वेकडे जातो. पूर्वीच्या जुन्या नागपूर-मुंबई रस्त्याला हा मार्ग कवठ्याजवळ छेदून जातो. या मार्गाचा भुसावळ ते नागपूर भाग १८६७ मध्ये वाहतुकी-साठी खुला करण्यात आला. या मार्गाचे दुहेरीकरण १९१९ ते १९३२ च्या दरम्यान पूर्ण करण्यात आले. मुंबईपासून ७२९ किलोमीटरवर वर्धा नदी पार केल्यानंतर हा मार्ग या जिल्ह्यात प्रवेश करतो. वर्धा जिल्ह्यातील लांबी सुमारे ६६ किलोमीटर असून त्यावर सध्या पुलगाव (७२९),[२] कवठा (७३६), दहेगाव (७४५), वर्धा (७५९), वर्धा पूर्व (७६२), सेवाग्राम (७६५), सेलू रोड (७७३), तुळजापूर (७८३) आणि सिंदी (७९०) ही नऊ स्थानके आहेत. सर्व स्थानकांवर आवश्यक त्या सोयी उपलब्ध आहेत. हा लोहमार्ग ज्या भूप्रदेशातून जातो तो सपाट, सुपीक व कापसाच्या पिकाला योग्य असून त्यावरून नेहमीच प्रवाशांची व मालाची वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. गेल्या अर्धशतकात या मार्गाचे वाणिज्यदृष्टचा महत्त्व वाढले आहे. या मार्गावरून १) मुंबई-कलकत्ता मेल नागपूर मार्गे, २) मुंबई-नागपूर विदर्भ एक्स्प्रेस (आठवड्यातून चार वेळा), ३) मुंबई-हावडा एक्स्प्रेस नागपूर मार्गे, ४) भुसावळ-नागपूर पॅसेंजर, ५) भुसावळ-वर्धा पॅसेंजर, ६) अहमदाबाद-मद्रास नवजीवन एक्स्प्रेस (आठवड्यातून चार दिवस), ७) दादर-नागपूर सेवाग्राम एक्स्प्रेस, ८) अहमदाबाद-हावडा एक्स्प्रेस, ९) काझीपेट-नागपूर पॅसेंजर व १०) नागपूर-कोल्हापूर महाराष्ट्र एक्स्प्रेस या गाड्या धावतात. मद्रास-दिल्ली-जम्मूतावी मार्गावरील गाड्यांची यातायात सुकर होण्यासाठी मूळ वर्धा स्थानकाच्या पूर्वेस अदमासे दोन कि. मी. अंतरावर वर्धा पूर्व नामक स्थानक १९७३ मध्ये बांधण्यात आले. त्यामुळे त्या मार्गावरील थेट गाड्या मूळ वर्धा स्थानकात न येता वर्धा पूर्व स्थानकावरून जातात. त्यासाठी वर्धा व वर्धा पूर्व दरम्यानच्या मार्शलींग यार्डात व इतर व्यवस्थेत आवश्यक ते बदल करण्यात

---

[१] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९०६, पृ. १६१.**

[२] कंसातील आकडे मुंबईपासून किलोमीटरमध्ये अंतर दर्शवितात.

ाले आहेत. भुसावळ-नागपूर लोहमार्ग व्यापारीदृष्टया महत्त्वाचा असल्याकारणाने ार्गाचे विद्युतीकरण करण्याचे रेल्वे बोर्डाने ठरविले. विद्युतीकरणाचे काम जवळ जवळ र्ण झाले आहे.

दिल्ली-मद्रास ग्रँड ट्रंक मार्ग : मुंबई-नागपूर-हावडा या रुंदमापी लोहमार्गावरील वर्धा येथून ा मार्ग निघतो. या लोहमार्गाची जिल्ह्यातील लांबी ४२ कि. मी. आहे. वर्धा-वरोरा हा ार्ग ग्रेट इंडियन पेनिन्सुला कंपनीच्या देखरेखीखाली असताना सन १८७७ मध्ये प्रवासा- ाठी खुला करण्यात आला. या मार्गावर जिल्ह्यात वर्धा, भूगाव (११),[३] सोनेगाव (१८), वाघोली (२६) आणि हिंगणघाट (३४) ही रेल्वे स्थानके असून त्यावर आवश्यक र्व सोयी आहेत. या मार्गाचा प्रदेश सपाट असून त्यावरून होणारी माल व प्रवासी वाहतूक ोठ्या प्रमाणात होते. या मार्गावरून १) न्यू दिल्ली-मद्रास जी. टी. एक्स्प्रेस, २) जम्मू- ावी-कन्याकुमारी हिमसागर एक्स्प्रेस (आठवड्यातून एकदा), ३) मद्रास-जम्मू तावी क्स्प्रेस, ४) निजामुद्दीन-हैद्राबाद दक्षिण एक्स्प्रेस, ५) लखनऊ-मद्रास एक्स्प्रेस, ६) त्रिवेंद्रम-न्यू दिल्ली केरळ मंगला एक्स्प्रेस, ७) गोरखपूर-हैद्राबाद एक्स्प्रेस (आठवड्यातून ीन दिवस), ८) गोरखपूर-कोचीन एक्स्प्रेस (आठवड्यातून दोन दिवस), ९) बिलासपूर- ोचीन एक्स्प्रेस (आठवड्यातून एकदा), १०) इंदोर-कोचीन एक्स्प्रेस (आठवड्यातून एकदा) व ११) सिरपूर-कागझनगर वर्धा पॅसेंजर या गाड्या धावतात. नागपूर-वर्धा-बल्लारशा ा रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण १९९० मध्ये पूर्ण झाले.

पुलगाव-आर्वी मार्ग : जिल्ह्यांतर्गत असलेला हा लोहमार्ग अरुंदमापी (Narrow Gauge) सून त्याची लांबी ३५ कि. मी. आहे. सन १९१७ मध्ये हा मार्ग प्रवाशांसाठी खुला करण्यात ाला. मुंबई-नागपूर लोहमार्गावरील पुलगाव स्थानकापासून हा मार्ग निघतो. या मार्गावर ुलगाव, सोरटा (६)[४], रोहणा (१५), रोहणा टाऊन (१६), धानोरी (२०), पार- ोठाण (२४), पाचेगाव (२८), खुबगाव (३१) आणि आर्वी (३५) अशी एकूण नऊ ेल्वे स्थानके आहेत. सर्व रेल्वे स्थानकांवर प्रवाशांसाठी आवश्यक त्या सोयी उपलब्ध ाहेत. पुलगाव ते आर्वी या स्थानकांच्या दरम्यान दररोज तीन पॅसेंजर गाड्या धावतात.

वरील तीन लोहमार्गांमुळे लोकांच्या प्रवासाची व मालवाहतुकीची चांगली सोय झालेली ाहे. शिवाय जिल्ह्याच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगतीस फार मोठी मदत ़ालेली आहे.

रस्ते

रस्त्यांना बरेच महत्त्व असून राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, मुख्य जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग व ग्राम मार्ग हे त्यांचे प्रवर्ग आहेत. लोहमार्गांना पूरक म्हणून यांना महत्त्व आहे. तथापि त्याहीपेक्षा जिल्ह्याच्या अंतर्भागात रस्त्यांचे महत्त्व अधिकच आहे.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची माहिती थोडक्यात पुढे दिली आहे.[५]

---

[३] कंसातील आकडे वर्ध्यापासून किलोमीटरमध्ये अंतर दर्शवितात.

[४] कंसातील आकडे पुलगावपासून किलोमीटरमध्ये अंतर दर्शवितात.

[५] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, व्हॉल्यूम-अे, १९०६, पृ. १६१–६३.**

जिल्ह्यातील जुन्या प्रमुख मार्गांपैकी (ओल्ड ट्रंक रोड) नागपूर ते हैद्राबाद हा दक्षिणेकडील मार्ग सिंदीच्या थोडा पूर्वेला वर्धा जिल्ह्यात प्रवेश करून जाम व नंदोरी मार्गे वरोऱ्याला जात होता. परंतु त्यावेळी या मार्गाची देखभाल ग्राम मार्ग म्हणून केली जात होती. वर्धा नदीच्या खोऱ्यातील पुलगाववरून देवळी आणि वायगावमार्गे हिंगणघाटकडे जाणाऱ्या मार्गाची लांबी ५९.५५ कि.मी. होती. पुढे याला जोडून असलेला व रेल्वेचा पूरक मार्ग म्हणून महत्त्व प्राप्त झालेला हिंगणघाट-जाम-समुद्रपूर हा संपूर्ण मार्ग पक्का करावयाचा होता. त्यावेळी फक्त पुलगाव ते नाचणगाव हा भागच पक्का झाला होता व बाकीचा भाग कच्चा होता. या रस्त्याला जोडून असलेला पुलगाव-आर्वी-आष्टी हा उत्तरेकडील एकूण ५७.९४ कि.मी. लांबीचा पक्का मार्ग आर्वी तालुक्यातील कृषिमाल रेल्वेकडे पोहोचविण्यास उपयुक्त असल्यामुळे फार महत्त्वाचा होता. त्याचा पुलगाव ते आष्टीपर्यंतचा ५७.६ कि.मी. भाग पक्का केला होता. रेल्वेच्या उत्तरेकडे नागपूरला वऱ्हाड व मुंबईशी वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणारे दोन जुने प्रमुख मार्ग जात होते. त्यांच्यापैकी दक्षिणेकडे जाणारा मार्ग सेलू-येळाकेळी व वायफडहून पुढे वर्धा नदी पार करून जिल्ह्याबाहेर जाणारा रस्ता होता. त्याची १९०६ च्या सुमारास ग्राम मार्ग म्हणून देखभाल केली जात होती. उत्तरेकडून नागपूरहून अमरावतीकडे जाणारा मार्ग आर्वी तहसीलच्या उत्तरेकडील कारंजा व ठाणेगावहून जात असे. भिष्णूर पार केल्यावर हा रस्ता अमरावती जिल्ह्यात प्रवेश करीत असे. तोही ग्राम मार्ग होता.

सन १९०५ मध्ये जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या रस्त्यांपैकी, १) पुलगाव-रोहणा-आर्वी-आष्टी, २) वर्धा-पवनार, ३) पुलगाव-नाचणगाव-देवळी-वायगाव-हिंगणघाट या मार्गाचा पुलगाव ते नाचणगाव हा भाग आणि ४) देवळी ते दहेगाव हे अनुक्रमे ५८; ८; ३.२५ व ८.०० कि.मी. लांबीचे रस्ते पक्के होते व ते वार्षिक १२,००० रुपये खर्च करून सुस्थितीत ठेवले जात होते. याशिवाय १२२.३१ कि.मी. लांबीचे कच्चे खडीचे रस्ते व ९६.५०-कि.मी. लांबीच्या कच्चा रस्त्यांचा पृष्ठभाग अनुक्रमे सार्वजनिक बांधकाम खाते व डिस्ट्रिक्ट कौंसिल वार्षिक अनुक्रमे ११,००० व २,३०० रुपये खर्च करून सुस्थितीत ठेवत असत.

इतर खडीच्या कच्च्या रस्त्यांपैकी वर्धा-पवनार, वर्धा-वायगाव, वर्धा-अंजी, वर्धा-देवळी सेलू-पवनार, जाम-नंदोरी, हिंगणघाट-पोहणा, खरांगणा-अंजी-वर्धा, हिंगणी-सेलू व हिंगणघाट-कोरा हे महत्त्वाचे रस्ते होते. याशिवाय अनेक हंगामी ग्राम रस्ते होते. हिंगणघाट-जाम-समुद्रपूर-गिरड व हिंगणघाट-वडनेर-पोहणा हे व्यापारीदृष्टया महत्त्वाचे रस्ते होते. वर्धा तालुक्यातील देवळीच्या आसपासच्या भागातील कापूस पुलगाव किंवा वर्धा येथे व धान्य दहेगावला नेत असत. उत्तरेतील आर्वी तालुक्यात पुलगाव-आर्वी-आष्टी हा सर्वाधिक महत्त्वाचा रस्ता होता. साहूर-आष्टी व कारंजा-धामकुंड-आर्वी या ग्राम रस्त्यांमुळे आर्वी तालुक्याच्या ईशान्य भागातील कृषिमाल प्रमुख रस्त्यावरील पेठांत आणणे फार सोयीचे होते. आर्वीहून वऱ्हाडमधील धामणगाव रेल्वे स्थानक पुलगावपेक्षा जवळ असल्याने रस्ता नसतानाही त्यावेळी आर्वी व धामणगावमध्ये लहान प्रमाणावर व्यापार चालत असे. म्हणूनच आर्वी ते धामणगाव रस्ता करण्याचा विचार होता. परंतु प्रस्तावित पुलगाव ते आर्वी रेल्वेमुळे त्याची जरुरी भासणार नाही असे वाटल्यावरून तो रस्ता बांधण्याचे तेव्हा सोडून दिले. याच कारणास्तव त्यावेळी आर्वी तालुक्यातील बऱ्याच रस्त्यांची सुधारणा करण्यात आली नाही.

जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण रस्त्यांची प्रवर्गानुसार तसेच पृष्ठभागानुसार माहिती खाली दिली आहे.

(मार्च अखेरची आकडेवारी)

प्रवर्ग	वर्ष					
	१९६१	१९६७	१९७३	१९७८	१९८१	१९८५
राष्ट्रीय महामार्ग	७२	१०७	१०७	१०८	१०८	१०७
राज्य महामार्ग	२१७	३२५	३३१	३२४	३२४	५०२
प्रमुख जिल्हा मार्ग	१४३	१६९	३८०	४०५	४१५	४८५
इतर जिल्हा मार्ग	६१	६३	२७८	३११	३०२	३८६
ग्रामीण रस्ते	४३	४६	९७२	४१८	३६४	६०३
अवर्गीकृत मार्ग	..	..	..	६६६	७८४	५९९
एकूण	५३६	७१०	२,०६८	२,२३२	२,२९७	२,६८२
पृष्ठभागानुसार वर्गवारी—						
डांबरी	..	२६८	३८७	३७३	४७४	६०९
खडीचा	..	४१७	६४२	७९८	८४४	८७१
कच्चा	..	२५	१,०३९	१,०६१	९७९	१,२०२
एकूण	..	७१०	२,०६८	२,२३२	२,२९७	२,६८२

राष्ट्रीय महामार्ग

वर्धा जिल्ह्यातून (१) धुळे-एदलाबाद-मलकापूर-नागपूर-कलकत्ता (क्रमांक ६) व (२) बनारस-नागपूर-केप कामोरीन (क्रमांक ७) हे दोन राष्ट्रीय महामार्ग जातात. या दोन्ही मार्गांची १ एप्रिल १९८५ रोजी जिल्ह्यातील एकूण लांबी १०७.११ कि. मी. होती.

धुळे-एदलाबाद-मलकापूर-नागपूर-कलकत्ता : हा मार्ग वर्धा जिल्ह्याच्या उत्तर भागातून पश्चिमेकडून पूर्वेकडे जातो. याची रुंदी ७.१ मीटर आहे. वर्धा जिल्ह्यात हा मार्ग कि. मी. क्र. १०४.२ ला प्रवेश करतो व कि. मी. क्र. ६०.७ वर तो संपतो.[६] यापैकी ७.१ कि. मी. लांबीचा घाटमार्ग असून बाकीचा सपाट प्रदेशातून जातो. घाटमार्गाची रुंदी ३.६६ मीटर आहे. या मार्गास तळेगाव येथे आर्वी-तळेगाव व आष्टी-तळेगाव हे राज्य मार्ग मिळतात. तळेगाव व कारंजा येथे शासकीय विश्रामगृहे आहेत. या मार्गामुळे मुंबई, जळगाव, अकोला,

[६] कि. मी. क्रमांक नागपूरपासून दिले आहेत.

अमरावती व नागपूरच्या बाजारपेठांशी वर्धा जिल्ह्याचा संपर्क शक्य झाला आहे. वर्ध जिल्ह्यातील सारवाडी, कारंजा, ठाणेगाव, सावली, रामदरा, तळेगाव व खडका ही गा या मार्गावर आहेत.

जिल्ह्यात या महामार्गावर एकूण १५ लहान पूल आहेत. वर्धा नदीवरील मोठा पू जिल्ह्याच्या सीमेवर परंतु अमरावती जिल्ह्याच्या कक्षेत आहे.

बनारस-नागपूर-केप कामोरीन : नागपूरकडून आलेल्या या महत्त्वाच्या मार्गाची वर्ध जिल्ह्यातील सुरुवात ४५.६६ कि.मी.[७] पासून होते. सर्वत्र ७.१ मीटर रुंदी असलेल हा मार्ग उत्तरेकडून दक्षिणेकडे जातो व ११० कि.मी. वर जिल्ह्याची सीमा ओलांडू पुढे जातो. या राष्ट्रीय महामार्गाला ५० कि.मी. वर कांडळी जोड रस्ता, ६२ कि.मी. व बोरी-सेवाग्राम जिल्हा मार्ग, ६५ कि.मी. वर जाम-समुद्रपूर-गिरड-उमरेड जिल्हा मा ७५ कि.मी. वर हिंगणघाट-वासी-कोरा जिल्हा मार्ग व ६५ कि.मी. वर जाम-वरोर चंद्रपूर राज्य महामार्ग जोडलेले आहेत.

या महामार्गामुळे चंद्रपूर, नागपूर व यवतमाळ या जिल्ह्यांशी तसेच मध्यप्रदेश व आं प्रदेश या राज्यांशी संपर्क साधला जातो. महामार्गावर कांडळी, जाम, हिंगणघाट, वडने दारोडा व पोहणा ही गावे आहेत. या मार्गावर वेणा नदीवर तीन, वर्धा नदी व नाग नाल्यावर प्रत्येकी एक असे एकूण पाच मोठे पूल असून इतर सात ठिकाणी लहान पूल आहे

राज्य महामार्ग

राज्य महामार्गांनी महत्त्वाची ठिकाणे, जिल्हा मुख्यालये, महत्त्वाच्या बाजारपेठ औद्योगिक केंद्रे, ऐतिहासिक व धार्मिक स्थळे जोडलेली आहेत. मार्च १९८५ अखेर व जिल्ह्यात एकूण सहा राज्य महामार्ग होते. या मार्गांची माहिती खाली दिली आहे.

नागपूर-बोरी-अर्धापूर-तुळजापूर : नागपूरकडून आलेला हा प्रमुख राज्य महामार्ग व जिल्ह्याच्या सीमेवरील सेलडोह गावाजवळ ४४.४० कि.मी. वर जिल्ह्यात प्रवेश कर १११.८० कि.मी. वर जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या शिरपूर गावानंतर यवतम जिल्ह्यात प्रवेश करतो. या मार्गाचा पृष्ठभाग डांबरी असून जिल्ह्यातील एकूण लां ६७.४० कि.मी. आहे. या मार्गावर केळझर (गणपतीचे मंदीर व शासकीय विश्रामगृह सेलू व जवळच बोरधरण, पवनार (विनोबाजींचा आश्रम), वर्धा (विश्रामभवन विश्रामगृह, पर्यटन महामंडळाचे हॉलिडे होम व जवळच सेवाग्राम) व देवळी ही मोठी ग आहेत. या मार्गाला केळझर-दहेगाव, सेलू-बोरधरण, सेलू-पवनार, आर्वी-वर्धा-वायग पुलगाव-देवळी-हिंगणघाट, गिरोली-अडेगाव-रत्नापूर, हुसनापूर-कोल्हापूर, पुलगाव-नाच गाव-शिरपूर हे मार्ग मिळतात. या मार्गावर बोर, धाम, यशोदा व वर्धा या मोठ्या न असून त्यावर पूल बांधलेले आहेत. हा रस्ता बारमाही वाहतुकीचा आहे. सन १९८६ पा या रस्त्यास प्रमुख राज्य मार्गाचा दर्जा दिला आहे. या मार्गाची प्रतिदिन वाहतूकभार मय ७,००० मेट्रिक टन आहे.

---

[७] कि.मी. क्रमांक नागपूरपासून दिले आहेत.

हिंगणघाट-देवळी-पुलगाव-अमरावती : या मार्गाची सुरुवात हिंगणघाटला होऊन पुलगाव नंतर अमरावती जिल्ह्यात प्रवेश करतो. जिल्ह्यातील लांबी ६३.३६ कि. मी. आहे. या मार्गावर वायगाव व देवळी ही मोठी गावे असून पुलगाव (मिलिटरी कँप व कापडाची गिरणी) व हिंगणघाटला शासकीय विश्रामगृहे आहेत. या मार्गाला पुलगाव-शिरपूर, देवळी-अंदोरी (अंजी), वायगाव-कापसी व सोनेगाव-अल्लीपूर हे महत्त्वाचे मार्ग मिळतात. शिवाय पुलगाव-आर्वी व आर्वी-वर्धा-वायगाव हे राज्य महामार्ग मिळतात. वर्धा नदीवर पूल बांधलेला आहे. हा डांबरी मार्ग बारमाही वाहतुकीस योग्य आहे. याची प्रतिदिन वाहतूकभार मर्यादा ३,००० मेट्रिक टन आहे.

पुलगाव-आर्वी-आष्टी-वरुड : पुलगावपासून सुरू होऊन उत्तर दिशेने जाणाऱ्या या मार्गाची लांबी ७७.२४ किलोमीटर असून साहूर येथे तो अमरावती जिल्ह्यात प्रवेश करतो यावर विरूळ, रोहणा, आर्वी, तळेगाव, आष्टी व साहूर ही मोठी गावे असून पुलगाव, आर्वी. व आष्टीला शासकीय विश्रामगृहे आहेत. या मार्गाला आर्वी-वर्धा-वायगाव (राज्य महामार्ग), वर्धा-वायफड-रसुलाबाद, अंजी-विरुळ, पिंपळखुटा-रोहणा-आष्टी-मोर्शी व आष्टी-थार हे महत्त्वाचे मार्ग मिळतात. तर धुळे-एदलाबाद-नागपूर हा राष्ट्रीय महामार्ग तळेगावला या मार्गास पार करतो. हा मार्ग बारमाही वाहतुकीस योग्य असून त्याची प्रतिदिन वाहतूकभार मर्यादा २,५०० मेट्रिक टन आहे.

आर्वी-वर्धा-वायगाव : आर्वीपासून सुरू होणारा हा डांबरी मार्ग ६८.६० कि. मी. वर वायगावला संपतो. या मार्गावर पिंपळखुटा (दही, दूध व तूप याबद्दल प्रसिद्ध), खरांगणा, अंजी, येळाकेळी, वर्धा व वायगाव ही मोठी गावे असून आर्वी, वाढोणा, अंजी व वर्धा येथे शासकीय विश्रामगृहे आहेत. या मार्गाला नागपूर-बोरी-तुळजापूर (राज्य महामार्ग), कारंजा-वाढोणा, रोहणा-पिंपळखुटा, कोंढाळी-खरांगणा (मोरांगणा), विरुळ-अंजी, सेलू-येळाकेळी व रसुलाबाद-वर्धा हे महत्त्वाचे मार्ग येऊन मिळतात. या मार्गावर धाम नदीवर पूल आहे. हा मार्ग बारमाही वाहतुकीचा असून त्याची प्रतिदिन वाहतूकभार मर्यादा ४,००० मेट्रिक टन आहे.

खरांगणा (मोरांगणा)-कोंढाळी : या मार्गाची लांबी २९.७६ कि. मी. असून सुरुवातीचा ४.६० कि. मी. भाग डांबरी आहे व उर्वरित खडीचा आहे. तो जिल्हा सीमेवरील काजळी गावाजवळ २९.७६ कि. मी. जवळ नागपूर जिल्ह्यात प्रवेश करतो. काचनूर, महाकाळी (महाकाळी प्रकल्प व महाकाली मातेचे मंदिर) व मासोद ही यावरील महत्त्वाची गावे आहेत. यास ठाणेगाव-बांगडापूर मार्ग मिळतो. याची प्रतिदिन वाहतूकभार मर्यादा ६०० मेट्रिक टन आहे.

जाम-वरोरा : याची सुरुवात जामला होऊन तो जिल्हा सीमेवरील १८.१० कि. मी. वर डोंगरगावला चंद्रपूर जिल्ह्यात प्रवेश करतो. मार्गावर नंदोरी हे मोठे गाव असून तेथे हिंगणघाट-वासी-कोरा रस्ता पार करतो. हा मार्ग डांबरी असून बारमाही वाहतुकीस योग्य आहे. याची प्रतिदिन वाहतूकभार मर्यादा ३,५०० मेट्रिक टन इतकी आहे.

प्रमुख जिल्हा मार्ग

सेलू-हिंगणी-बोरधरण : हा डांबरी मार्ग १५ कि. मी. लांब आहे. त्यावर घोराड व हिंगणी ही गावे असून बोर येथे शासकीय विश्रामगृह आहे. त्यास मालेगाव-आमगाव-हिंगणी रस्ता मिळतो. तो बारमाही वाहतुकीचा असून त्याची प्रतिदिन वाहतूकभार क्षमता

२,००० मेट्रिक टन आहे. सेलू ते हिंगणीपर्यंतचा रस्ता १९८५ मध्ये राज्य महामार्ग म्हणून दर्जोन्नत केला आहे.

पुलगाव-नाचणगाव-शिरपूर : हा २६ कि. मी. लांबीचा मार्ग पुलगाव ते नाचणगावपर्यंत डांबरी व शेवटचे तीन किलोमीटर खडीचा आहे. तो नागपूर-बोरी-तुळजापूर राज्य मार्गाला शिरपूरला मिळतो. या मार्गाला कोल्हापूर-हुसनापूर रस्ता येऊन मिळतो. मार्ग हंगामी वाहतुकीचा आहे. प्रतिदिन मार्गाची वाहतूकभार मर्यादा १,००० मेट्रिक टन आहे.

वर्धा-सेवाग्राम : ६.५ कि. मी. लांबीचा हा मार्ग डांबरी असून बारमाही वाहतुकीचा आहे. सेवाग्रामला प्रवाशांसाठी यात्री निवास व शासकीय विश्रामगृह असून वैद्यकीय महाविद्यालय आहे. वर्धा पूर्व रेल्वे स्थानकाजवळ रस्त्याच्या दोन्ही बाजूस महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाची वसाहत आहे. या रस्त्याला गोजी-येसंबा-बरबडी मार्ग मिळतो. याची प्रतिदिन वाहतूकभार मर्यादा २,००० मेट्रिक टन आहे.

आष्टी-मोर्शी : या रस्त्याची सुरुवात आष्टी गावाजवळ आष्टी-साहूर रस्त्यावर होऊन जिल्हा सीमेवरील सिर्री गावाजवळ तो संपतो. रस्त्याची लांबी १४.९० कि. मी. आहे. हा मार्ग हंगामी वाहतुकीस योग्य आहे. छोटी आर्वी, येनाडा, पिलापूर, सुबदा, नांदोरा व सिर्री ही मोठी गावे रस्त्यावर आहेत. सन १९८४ मध्ये हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुपूर्द केला.

आर्वी-देऊरवाडा-अमरावती : या रस्त्याची जिल्ह्यातील लांबी ८.५७ किलोमीटर असून त्यापैकी दोन कि. मी. डांबरी व ६.५७ कि. मी. खडीचा आहे. आर्वीहून निघणारा हा मार्ग पश्चिमाभिमूख जातो व वर्धा नदीस देऊरवाडा गावाजवळ पार करून अमरावती जिल्ह्यात प्रवेश करतो. यावर नांदपूर, धानोली व देऊरवाडा ही गावे आहेत. वर्धा नदीच्या पैलतीरावरील श्रीक्षेत्र कौण्डिण्यपूर येथे कार्तिक महिन्यात मोठी यात्रा भरते. या रस्त्याला जोडून असलेल्या नांदपूर-टाकरखेडा मार्गाचे बाकळी नदीवरील पुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या रस्त्याचा पृष्ठभाग खडीचा असून फक्त हंगामी वाहतुकीस योग्य आहे. सन १९८४ पासून हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपविलेला आहे.

वाढोणा-कारंजा : हा रस्ता आर्वी-वर्धा मार्गावर वाढोणा येथील जिल्हा परिषद विश्राम-गृहाजवळ सुरू होऊन उत्तरेस जातो व पुढे धुळे-एदलाबाद-नागपूर या राष्ट्रीय महामार्गाला कि. मी. क्रमांक ७७ वर कारंजा गावाजवळ मिळतो. याची एकूण लांबी २५ कि. मी. असून पृष्ठभाग खडीचा आहे. पुलाचे बांधकाम अपुरे असल्याने नियमित मोटार वाहतुकीस अयोग्य आहे.

कारंजा-जलालखेडा (जिल्हा सीमेपर्यंत) : वर्धा जिल्ह्यातून नागपूर जिल्ह्यात जाणाऱ्या व खडीचा पृष्ठभाग असलेल्या या रस्त्याची वर्धा जिल्ह्यातील लांबी १०.५ कि. मी. आहे. याची सुरुवात धुळे-एदलाबाद-नागपूर राष्ट्रीय महामार्गाच्या कि. मी. क्र. ७५ ला होऊन तो पुढे नागपूर जिल्ह्यात जातो. रस्त्यावर कारंजा, गोंधनी, नारा व वाघोडा ही मोठी गावे असून काकडा व परसोडी गावांकरिता एक जोड-रस्ता आहे. हा रस्ता हिवाळा व उन्हाळ्यात मोटार वाहतुकीस योग्य आहे. सन १९८४ मध्ये हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपविलेला आहे.

ठाणेगाव-हेटी-कुंडी-कन्नमवार ग्राम-बांगडापूर : हा रस्ता धुळे-एदलाबाद-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील ठाणेगावाजवळून निघून खरांगणा-कोंढाळी राज्य मार्गास बांगडापूरजवळ मिळतो. याची लांबी १०.८० किलोमीटर असून पृष्ठभाग खडीचा आहे. हेटी, कुंडी व कन्नमवार ग्राम ही मोठी गावे आहेत.

अंजी-विरुळ : हा मार्ग आर्वी-वर्धा-वायगाव या राज्य महामार्गावरील अंजीजवळून निघून अंजीच्या पश्चिमेस जातो व पुलगाव-आर्वी राज्य महामार्गास मिळतो. २३.६० कि.मी. लांबीच्या या रस्त्याचा पृष्ठभाग खडीचा असून तो बारमाही नाही. रस्त्यावर मांडवा, कोळम हेटी, पाचोड, पुलई, कृष्णापूर व विरुळ ही मोठी गावे आहेत.

रोहणा-पिंपळखुटा : हा रस्ता पुलगाव-आर्वी राज्य महामार्गावरील रोहणाजवळून निघून वर्धा-आर्वी रस्त्याला ३६ किलोमीटरवर पिंपळखुटा गावाजवळ मिळतो. पृष्ठभाग खडीचा असून मार्गावरील मोठ्या पुलांची कामे पूर्ण झाल्यामुळे तो बारमाही वाहतुकीस योग्य आहे. किन्हाळा, पांजरा व बोथली ही मोठी गावे रस्त्यावर आहेत.

सेलू-येळाकेळी : १२.२३ कि. मी. लांबीचा हा मार्ग आर्वी-वर्धा-वायगाव राज्य महामार्गावरील येळाकेळी जवळून निघून पूर्वेकडे जातो व वर्धा-नागपूर मार्गास सेलूजवळ मिळतो. हा मार्ग पूर्ण डांबरी असून त्यावर बाभूळगाव, सुरगाव व रेहकी खु. गावे आहेत. दोन्ही पुलांची कामे पूर्ण झाली असून सन १९८४ मध्ये तो सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुपूर्द केला.

हिंगणा-हिंगणी : नागपूर जिल्ह्यातील हिंगणा येथून हा रस्ता निघतो. वर्धा जिल्ह्यातील याची एकूण लांबी ३.६२ कि. मी. आहे. हा खडीचा मार्ग सेलू-बोरधरण रस्त्याला हिंगणीजवळ मिळतो. हा रस्ता बारमाही वाहतुकीस योग्य आहे.

सेलू रोड रेल्वे स्थानक ते सेलू : सेलू रोड स्थानक येथून निघणारा हा मार्ग उत्तरेकडे जाऊन वर्धा-नागपूर राज्य मार्गाला सेलू गावाजवळ मिळतो. याची लांबी ८ कि. मी. असून बारमाही वाहतुकीस योग्य आहे. सेलू गावाजवळचा १.६ किलोमीटर लांबीचा भाग डांबरी असून उर्वरित भाग खडीचा आहे.

सेवाग्राम ते सेवाग्राम रेल्वे स्थानक : अदमासे १.६ कि. मी. लांबीचा हा जोडमार्ग डांबरी पृष्ठभागाचा आहे. या बारमाही रस्त्याने जगप्रसिद्ध सेवाग्राम आश्रमात जाता येते.

वायगाव-कापसी : पुलगाव-देवळी-हिंगणघाट राज्य महामार्गावरील वायगाव येथून निघणाऱ्या या २२.१३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचा सुरुवातीचा ९ कि.मी. भाग डांबरी असून बाकीचा खडीचा आहे. यशोदा नदीवरील पुलाचे बांधकाम १९८३–८४ मध्ये पूर्ण झाले. परंतु बाकीच्या पुलांचे काम व्हावयाचे असल्याने पावसाळ्यात वाहतूक खंडित होते.

सोनेगाव-अल्लीपूर-कापसी : हा मार्ग सोनेगाव रेल्वे स्थानकापासून निघतो व नैऋत्येस जाऊन जिल्हा सीमेवर कापसीजवळ वायगाव-कापसी मार्गाला मिळतो. रस्त्याची लांबी २८ कि. मी. असून पृष्ठभाग खडीचा आहे. कापसीला कार्तिक महिन्यात मोठी यात्रा भरते.

सेवाग्राम-समुद्रपूर : खडीचा पृष्ठभाग असलेल्या या रस्त्याची लांबी ३०.४० कि. मी. आहे. सन १९८४ मध्ये हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुपूर्द केला.

शिरसगाव-वडनेर-धानोरा : २२.३५ कि.मी. लांबीचा व खडीचा असलेला हा मार्ग बारमाही वाहतुकीस योग्य नाही. हा रस्ता बनारस-नागपूर केप कामोरीन या राष्ट्रीय महामार्गाला वडनेरजवळ पार करतो.

सेलडोह-सिंदी-कांडळी : हा मार्ग नागपूर-वर्धा राज्य मार्गावरील सेलडोहपासून निघून आग्नेयेस बनारस-नागपूर–केप कामोरीन राष्ट्रीय महामार्गाला कांडळीजवळ मिळतो. सिंदी हे रेल्वे स्थानक व रस्त्याचे जंक्शन असून तेथे बाजारपेठ आहे. हा रस्ता एकूण १५.५ कि. मी. लांबीचा असून त्यापैकी ५.४ कि. मी. डांबरी आहे व उर्वरित खडीचा असून उघाडीच्या दिवसात वाहतुकीस योग्य आहे. रस्ता १९८४ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुपूर्द केला आहे.

जाम-समुद्रपूर-गिरड-उमरेड : बनारस-नागपूर-हैद्राबाद-केप कामोरीन राष्ट्रीय मार्गावरील जाम गावाजवळून निघणारा हा मार्ग पूर्वेस समुद्रपूर व गिरडमार्गे उमरेडकडे जातो. वर्धा जिल्ह्यातील लांबी २४.६४ कि. मी. आहे. जाम ते समुद्रपूर हा ४.४० कि. मी. लांबीचा रस्ता डांबरी असून तो बारमाही वाहतुकीस योग्य आहे. उर्वरित रस्ता फक्त हिवाळा व उन्हाळ्यात वाहतुकीस योग्य आहे. यावर जाम, समुद्रपूर व गिरड ही मोठी गावे असून गिरडला फरीदबाबा दर्गा आहे. सन १९८४ मध्ये हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुपूर्द करण्यात आला.

हिंगणघाट-नंदोरी-वासी-कोरा : बनारस-नागपूर-हैद्राबाद-केप कामोरीन राष्ट्रीय महामार्गावरील हिंगणघाट शहराच्या बाहेरून निघून ईशान्येकडे जाणाऱ्या २८ कि. मी. लांबीच्या या मार्गापैकी हिंगणघाट ते नंदोरी हा १४.४० कि. मी. लांबीचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून उर्वरित भाग जिल्हा परिषदेकडे आहे. हिंगणघाट ते वासी हा २०.४० कि. मी. लांबीचा रस्ता डांबरी असून उर्वरित खडीचा आहे. नंदोरी ते कोरा रस्ता पुलाच्या अभावी बारमाही वाहतुकीस योग्य नाही.

देवळी-अंदोरी : याची लांबी ११.६७ कि. मी. असून पृष्ठभाग खडीचा आहे. रस्त्याला पूर्व-पश्चिम जाणारा गिरोली-अडेगाव-रत्नापूर रस्ता कोळोना गावाजवळ मिळतो. कोल्हापूर नाल्याजवळील पुलाचे बांधकाम व्हावयाचे असल्यामुळे तो बारमाही वाहतुकीस योग्य नाही.

ठाणेगाव-काटोल (जिल्हा सीमेपर्यंत) **:** धुळे-एदलाबाद-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील ठाणेगावजवळून निघून हा मार्ग उत्तरेला काटोलकडे जातो. जिल्ह्यातील या मार्गाची लांबी ४.८ कि. मी. आहे. पृष्ठभाग खडीचा असून रस्ता बारमाही वाहतुकीस योग्य आहे. या रस्त्यावर धर्ती व बोरी गावे आहेत.

जिल्ह्यातील प्रमुख पुलांची माहिती तक्ता क्रमांक १ मध्ये दिली आहे.

इतर जिल्हा मार्ग

बांधकाम व देखभालीचे निकष याबाबत हे रस्ते कमी दर्जाचे असले तरी त्यांचा उपयोग असतोच. जिल्ह्यातील या प्रवर्गातील रस्त्यांची नावे खाली दिली आहेत.

	नाव	लांबी कि. मी.	पृष्ठभाग
१	रत्नापूर-कोळोना-अडेगाव-गिरोली	११	काही भाग खडीचा बाकी डांबरी
२	वर्धा-वायफड-रसुलाबाद	२६	काही डांबरी बाकी खडीचा
३	नांदगाव-बुरकोणी-पारडी	९	काही खडीचा बाकी कच्चा
४	साहूर-सुसुंद्रा-बेलगाव-नारा	२२	खडीचा
५	सेवाग्राम-खरांगणा (गोडे)-हमदापूर-कांडळी	२८	खडीचा
६	आष्टी-थार-बोटोना-पारडी	१३	खडीचा
७	बरबडी-धानोरा-येसंबा-गोजी	१९	काही भाग डांबरी
८	हिंगणी-आमगाव-माळेगाव	१७	खडीचा
९	सारवाडी-पारडी	४	खडीचा
१०	हिंगणघाट-पोहणा	५	काही डांबरी बाकी खडीचा
११	केळझर-दहेगाव	६	खडीचा
१२	गोल सडक (वर्धा शहरातील)	२	डांबरी
१३	डिस्ट्रिक्ट कोर्ट ते जेल	१	डांबरी
१४	सेलू-झडशी	८	खडीचा
१५	सेवाग्राम-खरांगणा	५	खडीचा
१६	देवळी-सोनेगाव (आबाजी)-मुरदगाव	८	खडीचा
१७	रत्नापूर-अडेगाव-गिरोली	२०	खडीचा
१८	सेवाग्राम-पवनार	५	डांबरी
१९	गिरड-कोरा	१६	खडीचा

महत्त्वाच्या रस्त्यावरील वाहतूक गणना तक्ता क्रमांक २ मध्ये दिली आहे.

ग्रामीण मार्ग

वर्धा जिल्हा परिषदेकडे १९६१–१९८१ योजनेनुसार तयार झालेले तसेच योजनाबाह्य परंतु नंतर योजनेत अंतर्भूत झालेले असे एकूण ३५२ कि. मी. लांबीचे खडीचे रस्ते आहेत. खालील विवरणाप्रमाणे मार्च १९८५ अखेर जिल्ह्यात ६०३ कि. मी. लांबीचे ग्रामीण रस्ते होते.

(लांबी कि. मी.)


तालुका		डांबरी	खडीचे	अपृष्ठांकित	एकूण
आष्टी	..	..	११.१०	४०.५०	५१.६०
कारंजा	..	०.६०	२१.२१	२३.५०	४५.३१
आर्वी	..	..	४७.४२	९३.३०	१४०.७२
देवळी	..	०.८०	२२.०९	५३.२०	७६.०९
वर्धा	..	..	४०.९८	२९.७०	७०.६८
सेलू	..	..	२१.३०	२६.२०	४७.५०
हिंगणघाट	..	०.६०	८.८०	८४.४०	९३.८०
समुद्रपूर	..	..	३१.१२	४६.३०	७७.४२
एकूण	..	२.००	२०४.०२	३९७.१०	६०३.१२

पंचवार्षिक योजनांतर्गत रस्ते विकास


शासनाने सर्वांगीण विकासाच्या योजनाबद्ध कार्यक्रमास प्रारंभ केला. पंचवार्षिक योजनांतर्गत शेती, शिक्षण, आरोग्य तसेच उद्योगाबरोबरच दळणवळण विकासास प्राधान्य दिले. सुधारित रस्ते विकास योजना तयार करून ती १९६०–६१ ते १९८०–८१ या काल-खंडात अमलात आणण्याचे ठरविले. या योजनेनुसार राज्य व प्रत्येक जिल्ह्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. त्यानुसार वर्धा जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या रस्त्यांच्या संकल्पित एकूण २,२७९.२२ कि. मी. लांबीपैकी २,१७५.१८ कि. मी. लांबीचे रस्ते बांधून पूर्ण केले आहेत. तसेच १९८१–२००१ रस्ते विकास योजनेनुसार जिल्ह्याकरिता निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या रस्त्यांच्या एकूण ३,३७५.९६ कि. मी. लांबीच्या उद्दिष्टापैकी मार्च १९८७ अखेर २,२३९.१० कि. मी. लांबीचे रस्ते बांधले. या योजनांचा उद्देश असा की, विकसित व शेतकी क्षेत्रातील प्रत्येक खेडे खडीच्या रस्त्यापासून २.४ कि. मी. पेक्षा जास्त लांब नसावे, अर्धशेतकी क्षेत्रातील खेडे खडीच्या रस्त्यापासून ४.८ कि. मी., तर बिगरशेतकी क्षेत्रातील प्रत्येक खेडे खडीच्या रस्त्यापासून १९.२ कि. मी. व कोणत्याही रस्त्यापासून ८ कि. मी. पेक्षा अधिक अंतरावर असता कामा नये. दुसऱ्या योजनेनुसार साध्य केलेल्या उद्दिष्टांची सांख्यिकीय माहिती तक्ता क्रमांक ३ मध्ये दिली आहे. सन १९५१–५२ ते १९५५–५६ या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात वर्धा जिल्हा मध्यप्रदेश राज्यात होता. परंतु दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत (१९५६) जिल्हा मुंबई राज्यात

वर्धा जिल्हा

रेल्वे व रस्ते



- जिल्हा सीमा
- तालुका सीमा
- जिल्हा मुख्यालय
- तालुका मुख्यालय
- रेल्वे, **स्टेशन (स्थानक)**
- ब्रॉड गेज
- नॅरो गेज
- राष्ट्रीय महामार्ग
- राज्य महामार्ग
- जिल्हा प्रमुख मार्ग



वर्धा नदी
वरूड कडे
मोर्शी कडे
साहूर
आष्टी
जलालखेडा कडे
काटोल कडे
कारंजा
ठाणेगाव
सारवाडी
नागपूर कडे
सावली
रामदरा
तळेगाव
अमरावती कडून
खडका
नागपूर कडे
मासोद
आर्वी
अमरावती कडून
खुबगाव
पाचेगाव
पारगोठाण
धानोरी
पिंपळखुटा
कायनूर
महाकाली
खरांगणा
रोहणा टाऊन
अंजी
येळाकेळी
सेलू
केळझर
तुळजापूर
पवनार
सेलू रोड
वर्धा
सोरटा
कवठा
दहेगाव
मुंबई कडून
चांदुर कडे
पुलगाव
सेवाग्राम
वर्धापूर्व
भूगाव
सोनेगाव
देवळी
वायगाव
वाघोली
हिंगणघाट
यवतमाळ कडून
दारोडा
वडनेर
राळेगाव कडे
पोहणा
हैदराबाद कडे
अमरावती जिल्हा
यवतमाळ जिल्हा
नागपूर

व १९६० मध्ये महाराष्ट्रात समाविष्ट झाला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत दळणवळणासाठी ३५.३३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतील अपुरी कामे पूर्ण करणे व नवीन कामांचा आराखडा तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत आखण्यात आला.

सन १९६२ मधील चिनी आक्रमण व १९६५ मधील पाकिस्तानी आक्रमणामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला. त्यातच १९६५–६६ मधील भीषण दुष्काळामुळे चौथ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा आव्हानात्मक परिस्थितीत तयार करावा लागला. पाचव्या, सहाव्या व सातव्या पंचवार्षिक योजनांमध्ये जिल्ह्याच्या दळणवळण विकासासाठी केलेल्या खर्चाचा तपशील खाली दिला आहे.

पंचवार्षिक योजना		प्रत्यक्ष खर्च (लाख रुपये)	एकूण खर्चाशी टक्केवारी
दुसरी पंचवार्षिक योजना— १९५६–५७ ते १९६०–६१	..	३५.३३	१५.२६
तिसरी पंचवार्षिक योजना— १९६१–६२ ते १९६५–६६	..	२३.५८	८.७५
वार्षिक योजना—			
१९६६–६७	..	१.०८	१.२८
१९६७–६८	..	०.७५	०.६७
१९६८–६९	..	०.५८	०.४६
चौथी पंचवार्षिक योजना— १९६९–७० ते १९७३–७४	..	८९.०७	१३.९२
पाचवी पंचवार्षिक योजना— १९७४–७५ ते १९७८–७९	..	१३६.३३	३.९८
वार्षिक योजना—			
१९७९–८०	..	४३.२५	३.५८
सहावी पंचवार्षिक योजना— १९८०–८१ ते १९८४–८५	..	४९२.९३	८.९२
सातवी पंचवार्षिक योजना— १९८५–८६ ते १९८९–९०	..	..	..
वार्षिक योजना—			
१९८५–८६	..	३६.२८	३.४०
१९८६–८७	..	८१.८३	९.५८

राज्य परिवहन

राज्य परिवहन यंत्रणेच्या राष्ट्रीयीकरणापूर्वी खाजगी परिवहन कंपन्या अस्तित्वात होत्या. त्यांची सेवा समाधानकारक नव्हती. संघटित प्रवासी वाहतुकीचा प्रारंभ १९४२ मध्ये मेसर्स मेकॅनिकल ट्रान्स्पोर्ट कंपनीने केला. या कंपनीने आपल्या व्यवस्थापन अधिकारात प्रवाशांच्या वाहतुकीसाठी १९४३ मध्ये नागपूर ऑम्नीबस कंपनी नावाची दुसरी यंत्रणा सुरू केली. इ. स. १९४५ मध्ये कंपनीस दि प्रॉव्हिन्शल ट्रान्स्पोर्ट कंपनी लि. असे नाव देण्यात आले. मात्र मेसर्स मेकॅनिकल ट्रान्स्पोर्ट ही मूळ कंपनीच व्यवस्थापन अभिकर्ता म्हणून कार्यरत होती. सदरहू कंपनीने १९४६ मध्ये आपली व्यवस्थापन एजन्सी शासनाला प्रत्यर्पित केली. शासनाकडे एजन्सीचे अधिकार आल्यानंतर कंपनीचे दि प्रॉव्हिन्शल ट्रान्स्पोर्ट सर्व्हिसेस असे नामाभिधान करून तिची देखरेख करण्याकरिता शासनाने संचालक मंडळ नेमले. परिवहन सेवेचे अशा प्रकारे राष्ट्रीयीकरण करण्यात आले तेव्हापासून ३१ ऑगस्ट १९५५ पर्यंत इंडियन कंपनीज ॲक्ट, १९३६, नुसार या कंपनीचा कारभार संयुक्त भांडवल कंपनी म्हणून चालू होता. त्या वर्षी शासनाने ही कंपनी ताब्यात घेतली. इ. स. १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना झाल्यानंतर ट्रान्स्फर्ड रोड ट्रान्स्पोर्ट अंडरटेकिंग्ज डिपार्टमेंट नामक बिभाग निर्माण करून त्याकडे विदर्भ व मराठवाडा भागातील परिवहन उपक्रमांची देखभाल शासनाने सोपविली. त्याबरोबर प्रॉव्हिन्शल रोड ट्रान्स्पोर्ट सर्व्हिसेसवर नियंत्रण प्रस्थापित झाले. महाराष्ट्र राज्य निर्मितीच्यावेळी ट्रान्स्फर्ड रोड ट्रान्स्पोर्ट अंडरटेकिंग्ज डिपार्टमेंटच्या अधिकार क्षेत्राखालील प्रॉव्हिन्शल ट्रान्स्पोर्ट सर्व्हिसेस, नागपूर, आणि मराठवाड्यातील स्टेट ट्रान्स्पोर्ट सर्व्हिसेस या दोन उपक्रमांव्यतिरिक्त बॉम्बे स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट कार्पोरेशन अस्तित्वात होती. पुढे १ जुलै १९६१ रोजी या तिन्ही उपक्रमांचे एकत्रीकरण करून त्यास महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट कार्पोरेशन असे नाव प्राप्त झाले.

वर्धा जिल्ह्यात वर्धा-नागपूर, नागपूर-हिंगणघाट, वर्धा-चंद्रपूर, हिंगणघाट-वरोरा वर्धा-सिंदी, वर्धा-देवळी, हिंगणघाट-समुद्रपूर, वरोरा-वणी, वर्धा-वायगाव आणि वर्धा-हिंगणघाट या दहा मार्गांवर १९४६ मध्येच प्रवासी वाहतुकीस सुरुवात झाली होती. मात्र या मार्गांवरील वाहतूक वर्धा जिल्ह्याच्या बाहेर असलेल्या आगारांमधून चालविण्यात येत होती. या मार्गांची लांबी ५०३ कि. मी. इतकी होती. वर्धा जिल्ह्यात १ जानेवारी १९५८ रोजी १२ वाहनांच्या ताफ्यासह पहिला आगार तळेगावला सुरू झाला.

डिसेंबर १९६५ अखेर तळेगाव आगारात १६ वाहनांची भर पडली व एकूण १३८.५ कि. मी. लांबीच्या चार मार्गांवरून वाहतूक सुरू झाली. तळेगाव आगारापासून निघणाऱ्या परिवहन मार्गांशिवाय जिल्ह्याबाहेरील आगारातून सुरू होणाऱ्या २३ मार्गांवरील सेवेचा जिल्ह्यातील प्रवाशांना लाभ होत असे. प्रवाशांच्या सोयीसाठी हिंगणघाट व तळेगावला कायम स्वरूपाची व वर्धा, जाम आणि आष्टीला तात्पुरती स्थानके बांधली होती. कर्मचाऱ्यांसाठी तळेगावला दवाखाना व विश्रांतीकक्षाची सोय होती.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने १९७६ मध्ये वर्धा जिल्ह्यासाठी स्वतंत्र विभाग सुरू केला. राज्यातील हा २६ वा तर नागपूर विभागातील आठवा विभाग होता. यवतमाळ,

अमरावती आणि चंद्रपूर विभागांतून चार आगार वेगळे करून ते वर्धा विभागात समाविष्ट करण्यात आले.

स्वतंत्र वर्धा परिवहन विभाग खऱ्या अर्थाने १ सप्टेंबर १९७७ पासून कार्यान्वित झाला. त्यावेळी या विभागात चार आगार असून वर्धा विभागातील तळेगाव आगार (स्थापना १ जानेवारी १९५८), आर्वी आगार (स्थापना २५ मार्च १९६२), वर्धा आगार (स्थापना १ ऑक्टोबर १९६४) व हिंगणघाट आगार (स्थापना ३१ मार्च १९७४) या चारही आगारांची १९८६–८७ मधील एकूण मार्गाची संख्या २४० होती, मार्गाची एकूण लांबी १२,८५४ कि. मी. तर प्रत्येक मार्गाची सरासरी लांबी ५३ कि. मी. होती. सन १९८६–८७ मध्ये या विभागात असलेल्या १६९ बसगाड्यांपैकी रस्त्यावर रोज सरासरी १३७ बसगाड्या सरासरी ७०,००० प्रवाशांची वाहतूक करीत. त्यावर्षी या विभागास राज्य परिवहन वाहतुकीपासून ६,८७,३६,००० रुपये उत्पन्न मिळाले. ते प्रत्येक प्रवाशामागे २६१ पैसे इतके होते.

सेवाग्राम व पवनार आश्रमांना भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी चांगली बस सेवा उपलब्ध आहे. वाढती प्रवासी वाहतूक विचारात घेऊन वर्धा येथे अंदाजे ११,००,००० रुपये खर्चून सोयींनी युक्त असे बसस्थानक बांधले आहे. नवीन स्थानकावरून २८ एप्रिल १९७८ पासून नियमित बससेवा सुरू झाली. तसेच केळझर, ढगा, महाकाळी व गिरड या धार्मिक स्थळी यात्रेच्यावेळी जादा बसगाड्यांची व्यवस्था करण्यात येते.

वर्धा विभागात वर्धा, आर्वी, हिंगणघाट व तळेगावला बस आगारे व कार्यशाळा असून वर्ध्याला विभागीय कार्यशाळा आहे. त्याचप्रमाणे वर्धा, देवळी, पुलगाव, सेलू, आर्वी, हिंगणघाट, जाम, तळेगाव व कारंजाला बांधलेली स्थानके आहेत. शिवाय १७ ठिकाणी अस्थायी स्थानके आहेत.

वाहने

वर्धा जिल्ह्यात १९८५ ते १९८९ या कालावधीत वापरात असलेल्या वाहनांची वर्गीकरणानुसार संख्या खाली दिली आहे.[८]

वाहन	मार्च १९८५	मार्च १९८६	मार्च १९८७	मार्च १९८८	मार्च १९८९
मोटार सायकल ..	२,१२४	२,४५३	२,६६७	२,८३०	३,३०५
स्कूटर ..	२,३५९	२,६८९	३,०६९	३,५५०	४,०९७
मोपेड ..	३,७४७	४,२५६	५,२०३	६,०९५	६,६६१
कार, जीप, स्टेशन वॅगन	१,२७७	१,३०७	१,३५७	१,४०२	१,४२१
टॅक्सी ..	१२	१८	२५	३५	४२
ऑटोरिक्षा ..	५३	६९	८६	११०	१२७
स्टेज कॅरेज ..	१६१	१६१	१६१	१६१	१६९
शाळेची बस ..	२	२	२	२	२
खाजगी सेवा वाहन ..	१०	१०	१०	१०	१०
ॲम्ब्युलन्स ..	१३	१३	१३	१३	१३
ट्रक—					
(अ) पब्लिक कॅरिअर	५५३	५८१	५३०	५५०	५५५
(ब) प्रायव्हेट कॅरिअर	१३२	१३२	६८	६८	६८
डिलिव्हरी व्हॅन—					
(अ) पब्लिक कॅरिअर	..	..	४२	४५	५७
(ब) प्रायव्हेट कॅरिअर	..	..	६४	६४	६४
ट्रॅक्टर ..	२२३	२५४	२७७	२९९	३११
ट्रेलर ..	१९९	२३२	२६०	२८९	३०१
इतर ..	२	३	३	४	४
एकूण ..	१०,८६७	१२,१८०	१३,८३७	१५,५२७	१७,२०७

[८] महाराष्ट्र शासन, मोटार वाहन विभागाची आकडेवारी, १९८५ ते १९८९.

वाहनापासून झालेल्या अपघातांची संख्या सतत वाढत आहे. यापैकी बरेच अपघात बेपर्वाईने वाहने चालविल्यामुळे होतात. शिवाय काही ठिकाणी रस्ते अरुंद असल्यामुळेही अपघात झाले. जिल्ह्यातील रस्ते अपघातांची आकडेवारी खाली दिली आहे.

अपघाताचे स्वरूप		१९८५	१९८६	१९८७	१९८८
प्राणघातक	..	३८	५५	५०	५२
गंभीर	..	२५	३४	३८	३९
किरकोळ दुखापती	..	९५	११०	११८	१२७
दुखापतीशिवाय	..	६५	६९	५२	७८
एकूण	..	२२३	२६८	२५८	२९६

सन १९८७ मध्ये जिल्ह्यात निरनिराळ्या वाहनांपासून झालेल्या अपघातांची आकडेवारी खाली दिली आहे.

वाहन		अपघातांची संख्या	अपघातग्रस्त वाहनांची टक्केवारी
बस	..	२१	८.१४
माल मोटारी	..	१०२	३९.५४
टॅक्सी	..	१२	४.६५
मोटार कार	..	३२	१२.४०
मोटार सायकल	..	४८	१८.६०
ऑटोरिक्षा	..	१२	४.६५
जीप	..	९	३.४९
इतर	..	२२	८.५३
एकूण	..	२५८	१००

उपरोक्त अपघातांपैकी २०८ (८०.६२ प्रतिशत) अपघात दिवसा झाले तर ४७ (६.९९ प्रतिशत) रात्री आणि तीन अपघातांबद्दल माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

विश्रामगृहे

दौऱ्यावरील शासकीय अधिकाऱ्यांसाठी अनेक ठिकाणी विश्रामगृहे उपलब्ध असून वर्धा शहरात एक विश्रामधाम आहे. इतर नागरिकांना देखील विहित शुल्क भरून ही सुविधा प्राप्त होऊ शकते. सार्वजनिक बांधकाम विभागाव्यतिरिक्त वन विभाग, पाटबंधारे विभाग व जिल्हा परिषदेच्या मालकीचीही विश्रामगृहे आहेत. सेवाग्रामला यात्री निवास आहे. शिवाय पर्यटकांच्या सोयीसाठी वर्धा रेल्वे स्थानकाजवळच महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाचे हॉलीडे होम आहे.

वर्धा जिल्ह्यातील विश्रामगृहांची १९८५ मधील माहिती खाली दिली आहे.

तालुका		ठिकाण	एकूण कक्षबंध
वर्धा	..	वर्धा	विश्रामधाम ३ व विश्रामगृह ८
		सेवाग्राम	३
		अंजी	२
सेलू	..	केळझर	२
		बोर	२
		सेलू	२
हिंगणघाट	..	हिंगणघाट	४
देवळी	..	पुलगाव	३
आर्वी	..	आर्वी	४
		तळेगाव	२
		वाढोणा	२
कारंजा	..	कारंजा	२
आष्टी	..	आष्टी	..

नवरगाव व गारपीट येथे वन विभागाची विश्रामगृहे आहेत.

टपाल व तार सेवा

वर्धा जिल्ह्यात १ एप्रिल १९८६ रोजी वर्धा येथील मुख्य डाक कार्यालयाखेरीज ३० उपडाक कार्यालये, तीन एक्स्ट्रा डिपार्टमेंटल सब ऑफिसेस, १४८ एक्स्ट्रा डिपार्टमेंटल ब्रँच ऑफिसेस अशी एकूण १८२ डाक कार्यालये व २१८ पोस्टमन होते. त्यावर्षी एकूण ८६६ पोस्टाच्या पेट्या होत्या.

दूरध्वनी : वर्ध्याला २५ सप्टेंबर १९३४ रोजी ५० लाईनचे पहिले स्वयंचलित दूरध्वनी विनिमय केंद्र सुरू झाले. त्यावेळी शहरात फक्त आठ दूरध्वनी होते. आर्वी, हिंगणघाट आणि पुलगावला सार्वजनिक दूरध्वनी कक्ष होते. सध्या वर्धा दूरध्वनी विनिमय केंद्राची ७०० लाईनची क्षमता असून ६५५ स्वयंचलित दूरध्वनी कार्यरत आहेत. याशिवाय दूरध्वनीचा एक स्वतंत्र प्रमुख मार्ग आहे. सन १९८४–८५ मध्ये जिल्ह्यात ४,४७० धारण क्षमता असलेली २० दूरध्वनी विनिमय केंद्रे होती. यापैकी ३,७६७ दूरध्वनी कार्यरत होते. शिवाय ग्रामीण भागात आठ ठिकाणी एल.डी.पी.सी.ओ. आहेत. दूरध्वनी विनिमय केंद्राची क्षमता १,००० लाईन इतकी वाढविण्यात येणार असून पिंपळखुटा, अंजी, अल्लीपूर आणि वडनेर गावी नवीन दूरध्वनी विनिमय केंद्रे व १० ठिकाणी एल.डी.पी.सी.ओ. सुरू करण्यात येणार आहेत. वर्धा शहर, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला, अमरावती, पुलगाव, आर्वी, हिंगणघाट आणि मुंबई बरोबर सरळ दूरध्वनीद्वारा जोडलेले आहे. जिल्ह्यात ३० सप्टेंबर १९८७ रोजी असलेल्या दूरध्वनी विनिमय केंद्रांची माहिती तक्ता क्रमांक ४ मध्ये दिली आहे.

तार सेवा : भारत सरकारच्या धोरणानुसार ५,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावी तारायंत्राची सोय उपलब्ध केली जाते. कमी लोकसंख्या असलेल्या गावी ही सोय उपलब्ध करण्यासाठी पोलीस स्टेशन, गटविकास कार्यालय अथवा इतर महत्त्वाच्या बाबीचा विचार केला जातो. डाक कार्यालयातून दूरमुद्रक यंत्राद्वारे तारा पाठविण्याची सोय वर्धा आणि हिंगणघाटला आहे. मोर्स सर्कीटवर वर्षाला ३,००० पेक्षा जास्त तारा हाताळणारी १२ कार्यालये आहेत. शिवाय दूरध्वनीद्वारा तारा हाताळणारी १५ कार्यालये आहेत. वर्ध्यास दूरध्वनी विनिमय केंद्रातून फोनोग्राम करण्याची सोय आहे.

सामूहिक दूरदर्शन संच : राज्य शासन सार्वजनिक श्रवणासाठी विहित पद्धतीने दूरदर्शन संच पुरविते. हे संच मुख्यतः ग्रामपंचायत कार्यालयास देण्यात येतात. सन १९८६–८७ पर्यंत शासनाने ५२ दूरदर्शन संच सार्वजनिक उपयोगासाठी दिले होते. मार्च १९८९ पर्यंत विविध तालुक्यांत शासनाने पुरविलेल्या दूरदर्शन संचांची संख्या पुढीलप्रमाणे होती :– वर्धा–२८, सेलू–१६, समुद्रपूर–१७, देवळी–२६, हिंगणघाट–३५, आर्वी–१०, आष्टी–८ व कारंजा–१६. जिल्ह्यातील जवळजवळ ७५ टक्के भागास नागपूर दूरदर्शन केंद्राच्या प्रसारण सेवेचा लाभ डिसेंबर १९८५ पासून मिळत आहे. वर्धा येथे केंद्र सरकारकडून एक अतिरिक्त लघुशक्ती दूरदर्शन केंद्र कार्यान्वित करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

तक्ता क्रमांक १

वर्धा जिल्ह्यातील मुख्य पूल, १९८३

रस्ता	नदी/नाला	जवळचे गाव	कि. मी. क्रमांक	कमानी	लांबी (फूट)	रुंदी (फूट)	सरासरी उंची	बांधकामाचा प्रकार	बांधकामाचे वर्ष	खर्चाचा अंदाज (रुपये)
नागपूर-वर्धा-यवतमाळ	नाला	सेलू	५७/२	६	१०८.५	१८	१४.०	आर.सी.सी.	उ. ना.	६,०००
—,,—	बोर	सेलू	६०/४	४	२४ प्रत्येकी	१८	१०.६	—,,—	—,,—	१५,०००
—,,—	धाम	पवनार	६८/०	१२	२४ —,,—	१८	६.०	—,,—	—,,—	३०,०००
देवळी-कळंब	यशोदा	इसापूर	९५/६००	५	१८ —,,—	१२	२०.०	—,,—	१९३७–३८	उ. ना.
—,,—	वर्धा	सिरपूर	१११/८०	२६	२२ —,,—	१२	२०.०	—,,—	१९३७–३८	१,००,०००
वर्धा-देवळी	भदाडी	हुसनापूर	८८/२००	१५	९.६ —,,—	—,,—	६.६	—,,—	१९४१	उ. ना.
वायगाव-देवळी	यशोदा	वर्धा	३१/८००	७	२५ —,,—	—,,—	..	—,,—	१९६४	१,५५,६३७
वर्धा-आर्वी	धाम	येळाकेळी	४८/०	११	२० —,,—	—,,—	७.०	दगडी	उ. ना.	२५,०००
—,,—	धाम	अंजी	४१/४००	८	२० —,,—	—,,—	१०.०	दगडी	उ. ना.	उ. ना.
खरांगणा-कोंढाळी	धाम	खरांगणा	०/६००	८	२५ —,,—	—,,—	..	आर.सी.सी.	१९७१	२,२३,०००
पुलगाव-अमरावती	वर्धा	पुलगाव	६४/६००	४२	१० —,,—	—,,—	७.०	—,,—	..	उ. ना.
पुलगाव-आर्वी	नाला	रोहणा	१५/५	७	३५ —,,—	—,,—	..	—,,—	१९७२	उ. ना.
—,,—	नाला	खुबगाव	३०/८००	४	४५ —,,—	—,,—	..	—,,—	१९७२	उ. ना.
खरांगणा-गोडे-हमदापूर-कांडळी	धाम	वाघळा	३/५००	१३	८५.५ —,,—	९	..	—,,—	१९८४	१३,६५,६३५
आर्वी-देऊरवाडा	बाकळी	नांदपूर	२/७००	९	८ —,,—	—,,—	..	—,,—	१९८०	४,६७,४५०
सेलू-झडसी-टाकळी	पंचधारा	झडशी	..	..	...	—,,—	..	—,,—	१९८४	उ. ना.

उ. ना. = उपलब्ध नाही.

तक्ता क्रमांक २

जिल्ह्यातील महत्त्वाच्या रस्त्यांवरील वाहतूक गणना (१५–१२–१९८६ ते २२–१२–१९८६ ची दैनिक सरासरी)

मार्गाचे नाव	गणना स्थानाचे ठिकाण		जलदगती वाहने				एकूण	मंदगती वाहने			एकूण	सरासरी वाहतूक-भार (टनामध्ये)
	कि. मी. क्रमांक	जवळपासचे गाव	मोटारी जीप व व्हॅन	बस-गाड्या	माल-मोटारी	रिक्षा, मोटार सायकली, स्कूटर		बैल-गाड्या	सायकली	इतर रिक्षा		
राष्ट्रीय महामार्ग—												
१ धुळे-एदलाबाद-मलकापूर-नागपूर-कलकत्ता	९८/२०	तळेगाव	३८६	२१२	१,७८४	३०९	२,६९१	७१	२९८	४	३७३	२१,६७८
२ बनारस-नागपूर-केप कामोरीन	५०/०	कोंढाळी	२८३	१२५	७६८	१३२	१,३०८	१९	७६	११	१०६	९,३३४
राज्य महामार्ग—												
१ नागपूर-बोरी-अर्धापूर-तुळजापूर	६०/००	बोर धरण	५४८	१३०	५०७	७५०	१,९३५	३९३	२,०९३	..	२,४८६	७,३८३
२ हिंगणघाट-पुलगाव-अमरावती	१३/६०	धोत्रा	३१८	६८	६१६	३१७	१,३१९	१५५	३४२	१०	५०७	७,२९७
–,,–	३९/००	देवळी	१०१	३७	२०४	१७९	५२१	१६६	६७६	..	८४२	२,५११

तक्ता क्रमांक २—चालू

	मार्गाचे नाव	गणना स्थानाचे ठिकाण		जलदगती वाहने				एकूण	मंदगती वाहने			एकूण	सरासरी वाहतूक-भार (टना-मध्ये)
		कि. मी. क्रमांक	जवळपासचे गाव	मोटारी जीप व व्हॅन	बस-गाड्या	माल-मोटारी	रिक्षा, मोटार सायकली, स्कूटर		बैल-गाड्या	सायकली	इतर रिक्षा		
३	पुलगाव-आर्वी-आष्टी-वरूड.	५८/८००	आष्टी	१५९	४५	३७४	३९४	९७२	४६५	१२४	३	५९२	४,७५९
४	आर्वी-वर्धा-वायगाव	३९/२००	वाढोणा	३३२	८४	६९०	४४९	१,५५५	६१४	१,७७४	..	२,३८८	७,७३८
५	खरांगणा-कोंढाळी-सावर-गाव-राज्य सीमेपर्यंत	०/०००	खरांगणा गोडे	९७	३१	२२२	१२६	४७६	१३२	२४७	..	३७९	२,४३२
६	जाम-चंद्रपूर-राजूरा-राज्य सीमेपर्यंत (जाम-वरोरा)	०/०००	जाम	५०५	१३९	१,२०४	२५४	२,१०२	२०४	२३८	६	४४८	१२,५२५

तक्ता क्रमांक ३

जिल्हा रस्ते विकास योजना १९८१–२००१ नुसार मार्च १९८७ पर्यंत साध्य केलेले उद्दिष्ट

(कि. मी.)

वर्गीकरण	१९८१-२००१ योजनेचे उद्दिष्ट	सा. बां. विभाग			जिल्हा परिषद			एकूण		
		डांबरी	खडीचा	मुरुमाचा	डांबरी	खडीचा	मुरुमाचा	डांबरी	खडीचा	मुरुमाचा
राष्ट्रीय महामार्ग ..	१०७.११	१०७.११	..	..	..	..	..	१०७.११	..	..
प्रमुख राज्य महामार्ग ..	६६.९७	६६.९७	..	..	..	..	..	६६.९७	..	..
राज्य महामार्ग ..	४८६.००	२८५.५९	१५७.६८	..	..	..	..	२८५.५९	१५७.६८	..
प्रमुख जिल्हा मार्ग ..	७०६.००	३५.९९	२६०.२१	..	१३.६१	१४७.९०	३४.६३	४९.६०	४०८.११	३४.६३
इतर जिल्हा मार्ग ..	६५५.००	१३.८८	६२.९८	..	५.००	२२९.८५	८१.०५	१८.८८	२९२.८३	८१.०५
ग्रामीण मार्ग ..	१,३५४.८८	..	३८.६९	..	२.००	२८७.६४	४०८.३२	२.००	३२६.३३	४०८.३२
एकूण ..	३,३७५.९६	५०९.५४	५१९.५६	..	२०.६१	६६५.३९	५२४.००	५३०.१५	१,१८४.९५	५२४.००

तक्ता क्रमांक ४

दूरध्वनी विनिमय केंद्रनिहाय माहिती

(३० सप्टेंबर १९८७)

विनिमय केंद्र		प्रमुख तार कार्यालय (पेरेंट ट्रंक एक्स्चेंज)	क्षमता	जोड
अंजी	..	वर्धा	२५	२०
आर्वी	..	आर्वी	२४०	२३४
आष्टी	..	आर्वी	९०	४९
खरांगणा	..	आर्वी	२५	२३
पिंपळखुटा	..	आर्वी	२५	११
रोहणा	..	आर्वी	२५	१६
सारवाडी	..	आर्वी	२५	१६
तळेगाव	..	आर्वी	२५	१९
देवळी	..	देवळी	१००	५८
कोल्हापूर	..	वर्धा	२५	१६
पुलगाव	..	पुलगाव	२००	१९८
अल्लीपूर	..	हिंगणघाट	२५	१८
हिंगणघाट	..	हिंगणघाट	४८०	४७५
कानगाव	..	हिंगणघाट	२५	१९
नंदोरी	..	हिंगणघाट	२५	१६
वडनेर	..	हिंगणघाट	२५	१८
कारंजा	..	आर्वी	४५	४२
समुद्रपूर	..	हिंगणघाट	४५	३९
गिरड	..	हिंगणघाट	२५	११
हिंगणी	..	सेलू	२५	२२
केळझर	..	सेलू	४५	३०
सेलू	..	सेलू	१००	६९
सिंदी	..	वर्धा	९०	५४
साहूर	..	आर्वी	२५	२३
सेवाग्राम	..	वर्धा	४५	१८
वर्धा	..	वर्धा	९००	८७०
एकूण	..		२,७३०	२,३८४

प्रकरण ८–आर्थिक विकास

उपलब्ध साधनसामग्री

वनसंपदा, जलसंपत्ती, सुपीक जमीन, श्रमशक्ती, खनिजसंपत्ती व उद्योगांना लागणारी आधारभूत संरचना यावर आर्थिक विकास अवलंबून असतो. या घटकांचा खाली आढावा घेतला आहे.

वर्धा कृषिप्रधान जिल्हा असून शेती हेच लोकांचे उपजीविकेचे साधन आहे. कृषि व्यवसायात असलेल्या कामगारांची एकूण कामगारांशी टक्केवारी १९६१ मध्ये ७७.४; १९७१ मध्ये ७६.४ आणि १९८१ मध्ये ७२.९ होती. लोकसंख्येच्या वाढीमुळे उपरोक्त टक्केवारीतील घट आर्थिकदृष्टया महत्त्वाची नाही. अर्थव्यवस्थेतील दुय्यम क्षेत्राचा विकास झाल्यामुळे ही घट झालेली असावी. जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी (६,२९,००० हेक्टर) ६९ टक्के क्षेत्र लागवडीलायक, ८ टक्के गुरचरण व कुरणे तर ७ टक्के क्षेत्र शेतीकरिता निरुपयोगी आहे. इतर क्षेत्रावर जंगल आणि अनुत्पादक बाबी आहेत. जिल्ह्यात कापसाकरिता सुयोग्य अशी काळी कसदार जमीन पुष्कळ आहे. बऱ्याच भागात गाळाची जमीन असून जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्यास ती अधिक उत्पादक होऊ शकेल. जिल्ह्यात मुख्यत: काळी, मोरांड, खरडी आणि बरडी जमीन आढळते. एकूण लागवडी खालील क्षेत्राच्या ७४ टक्के जमीन मोरांड, १६ टक्के जमीन खरडी आणि १० टक्के बरडी व रेताड आहे.

जिल्ह्यात पुरेशी जलसंपत्ती उपलब्ध नाही. तेथील प्रमुख नद्या म्हणजे वर्धा, वेणा, धाम बोर, पोथरा या होत. अलीकडील काळात जलसिंचन सुविधा निर्माण करण्याचे शासनाकडून प्रयत्न होत आहेत. त्यानुसार जून १९८९ पर्यंत बोर, पंचधारा, डोंगरगाव व पोथरा या मध्यम जलसिंचन प्रकल्पांतून २२,६४१ हेक्टर व २० लघुसिंचन प्रकल्पांमधून ६,८४९ हेक्टर सिंचनक्षमता उपलब्ध झाली. त्याशिवाय अप्पर वर्धा, लोअर वर्धा व लोअर वेणा या बांधकामाधीन मोठ्या प्रकल्पांमधून अनुक्रमे १७,६००; ५२,९८० व १५,४२६ हेक्टर क्षेत्रास जलसिंचनाचा लाभ होईल. तसेच बांधकाम सुरू असलेल्या धाम व मदन या मध्यम प्रकल्पांद्वारे भविष्यात अनुक्रमे १०,२१० व ३,२७५ हेक्टर जमिनीस सिंचनाचा लाभ होईल. याशिवाय १० उपसासिंचन योजनांद्वारे जून १९८६ पर्यंत ३,४०० हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाली.

या जिल्ह्यात वनक्षेत्र केवळ १४ टक्के असून त्यातून इमारती लाकूड व जळाऊ लाकूड उपलब्ध होऊ शकते. उद्योगधंद्यांना आवश्यक अशी वनस्पती फारशी उपलब्ध नाही. खनिजसंपत्तीच्या दृष्टीनेसुद्धा हा जिल्हा संपन्न नाही. उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी लागणारी खनिजे जिल्ह्यात सापडत नाहीत.

उपरोक्त विवेचन व या ग्रंथातील इतर प्रकरणांत दिलेल्या माहितीनुसार स्पष्ट होते की, वर्धा जिल्ह्यात नैसर्गिक साधनसामग्री उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याइतपत नाही. उद्योगधंद्याच्या दृष्टीने येथील उपयुक्त माल म्हणजे कापूस. कापसाच्या विपुल उत्पादनामुळे पुलगाव व हिंगणघाटला कापड गिरण्या स्थापन झाल्या. त्याबद्दलची कार्यकारणमीमांसा व विवेचन इतरत्र दिलेले आहे.

श्रमशक्तीचा विचार करता असे दिसते की, जिल्ह्याच्या एकूण ९,२६,६१८ लोकसंख्येपैकी १२.४१ प्रतिशत लोक शेतकरी, २०.५७ प्रतिशत शेतमजूर आणि ०.८२ प्रतिशत लोक घरगुती व यांत्रिकी कामगार होते (१९८१). एकूण लोकसंख्येपैकी ४५.२१ प्रतिशत लोकांची जनगणना प्राधिकाऱ्यांनी कामगार म्हणून गणना केली. जनगणनेमध्ये मुख्य कामगार म्हणून ज्यांची व्याख्या केली त्या कामगारांचे शेती, शेतमजुरी आणि घरगुती व यांत्रिकी उद्योग यांतील प्रमाण अनुक्रमे २८.९४, ४७.९८ आणि १.९३ प्रतिशत होते. एकूण कामगारांपैकी शेतकरी, शेतमजूर आणि घरगुती व यांत्रिकी कामगारांचे प्रमाण अनुक्रमे २७.४४, ४५.४९ आणि १.८३ प्रतिशत होते. बांधकाम, व्यापार व वाणिज्य, परिवहन, साठवण व दळणवळण आणि इतर व्यवसायांतील कामगारांचे एकूण कामगारांशी प्रमाण २५.२२ प्रतिशत होते. यावरून दिसून येईल की, एकूण कामगारांत अजूनही शेतकरी व शेतमजुरांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

कृषि अर्थव्यवस्था

इ. स. १६०१ मध्ये वऱ्हाड सुभा अकबराने हस्तगत केला. तत्कालीन **ऐन-इ-अकबरी** या ग्रंथात अबुल फझलने नमूद केले आहे की, गाविल, पवनार व खेरला सरकारमध्ये कापूस, ज्वारी, गहू व भाताचे पीक प्रामुख्याने घेतले जाई. येथील शेतजमीन सुपीक व समृद्ध होती. त्यामुळे या प्रदेशातून जमीन महसूल विपुल प्रमाणात प्राप्त होई. पुढे अठराव्या शतकात नागपूरच्या भोसले घराण्याची राजवट आल्यानंतर देशमुख व देशपांडे वंशपरंपरागत वतनदार बनले. हे वतनदार जमीन खंडाने देऊन सरकारचा वसूल जमा करीत असत. त्यामुळे शेतीमध्ये सुधारणा करण्यास उत्तेजन मिळू शकले नाही. वंशपरंपरागत वतनदारीमधून मालगुजारी पद्धती अस्तित्वात आली. प्रत्येक मालगुजाराकडे गावेच्या गावे असत. त्यामुळे शेती कसणाऱ्यांचे शोषण तर होईच परंतु शेतीविकास करण्यासाठी कोणतेही उत्तेजन मिळत नसे. ब्रिटिशांनी हा प्रांत हस्तगत केल्यानंतरसुद्धा हीच पद्धती अस्तित्वात राहिली. परिणामतः शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले नाहीत. अमेरिकेतील भीषण यादवी युद्धामुळे (१८६१–१८६५) इंग्लंडमधील कापड गिरण्यांना अमेरिकन कापूस मिळेनासा झाला. त्यामुळे भारतीय कापसास विलक्षण मागणी लाभली. परिणामतः वर्धा जिल्ह्यात कापूस लागवडीस उत्तेजन मिळाले. हिंगणघाटचा कापूस तत्पूर्वीच लँकेशायर व मँचेस्टर येथील कापड गिरण्यांमध्ये प्रसिद्धी पावला होता. अमेरिकन युद्धामध्ये निर्माण झालेल्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे येथील कापसास अधिकच मागणी वाढली. त्याचा परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर होणे अपरिहार्य होते. त्यामुळे जिल्ह्यातील बरीच पडीक जमीन लागवडीखाली आली. कापसाखालील क्षेत्रात अधिकाधिक वाढ झाली. पहिल्या महायुद्धाच्या काळातसुद्धा कापसास मागणी वाढल्यामुळे या पिकाखालील क्षेत्र वाढले. तथापि १९२० व १९२९ मध्ये अनियमित पावसामुळे कृषी अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झाला. तसेच सन १९३० च्या जागतिक मंदीचा अर्थव्यवस्थेवर अन्यंत प्रतिकूल

परिणाम झाला. कापसास मागणी नव्हती. अन्नधान्याचे भाव कमालीचे घटले. स्वाभाविकच शेतकऱ्यांची क्रयशक्ती फारच घटली. कृषी अर्थव्यवस्था जागतिक मंदीच्या तडाख्यातून १९३४ नंतर बाहेर पडली. पुढे दुसऱ्या महायुद्धाचा अर्थव्यवस्थेवर अनुकूल परिणाम होणे अपेक्षित होते. तथापि ब्रिटिश सरकारच्या आत्मकेंद्रित आर्थिक धोरणामुळे कृषी अर्थव्यवस्थेची मोठी हानी झाली. बाजारात अन्नधान्याच्या किमती वाढल्या, तथापि त्याचा लाभ शेतकऱ्यांना झाला नाही. शेती उत्पादनाचा उपयोग सरकारने प्रामुख्याने आपल्या युद्धप्रयत्नांसाठी केला. त्यामुळे युद्धजन्य परिस्थितीचा उपयोग शेतकऱ्याला न होता ब्रिटिशांनी इंग्लंडसाठी करून घेतला.

जिल्ह्यात १८९१–९२ मध्ये एकूण क्षेत्राच्या ५९.९४ टक्के क्षेत्र लागवडीखाली होते. त्यात पुढील ९४ वर्षांत वाढ होऊन ते सुमारे ७४.२१ टक्के झाले. इ. स. १८९१–९२ ते १९८५–८६ या कालावधीतील निवडक वर्षांतील लागवडीखालील क्षेत्र व त्याची भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी खाली दिली आहे.[१]

वर्ष		लागवडीखालील क्षेत्र (हेक्टर)	लागवडीखालील क्षेत्राची भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी
१८९१–९२	..	३,७७,१७०	५९.७४
१९०१–०२	..	३,९६,४१५	६३.५५
१९११–१२	..	४,०७,६७०	६५.४८
१९२१–२२	..	४,२२,७३८	६७.२५
१९३१–३२	..	४,२९,६१९	उ. ना.
१९४१–४२	..	३,९३,५४४	६२.६०
१९५१–५२	..	३,७८,५०३	६०.२०
१९६०–६१	..	४,१०,८००	६५.३४
१९७०–७१	..	४,३२,१००	६८.७०
१९८०–८१	..	४,५८,२००	७२.८५
१९८५–८६	..	४,६६,७००	७४.२१

महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांशी तुलना करता या जिल्ह्यातील लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

[१] **ॲग्रिकल्चरल स्टॅटिस्टिक्स ऑफ इंडिया** (भारत सरकार, नवी दिल्ली), व **स्टॅटिस्टिकल ॲबस्ट्रॅक्ट ऑफ महाराष्ट्र** (महाराष्ट्र शासन) (संबंधित वर्षे).

शासनाने केलेल्या कृषिगणनेनुसार १९७६–७७ मध्ये जिल्ह्यात ९९,५३९ वहिती खात्यांमध्ये ४,५४,०५३ हेक्टर वहिती क्षेत्र होते. वहिती क्षेत्रापैकी सर्वात जास्त क्षेत्र १० ते २० हेक्टर आकारमान गटातील असून ते २३.५६ टक्के होते, तर सर्वात कमी वहिती क्षेत्र ०.५ हेक्टरपेक्षा कमी आकारमान गटातील होते. त्याची टक्केवारी ०.१२ होती. वहिती खात्यांपैकी सर्वांत जास्त १९.७८ टक्के खाती एक ते दोन हेक्टर या आकारमान गटातील होती. सर्वांत कमी ०.०३ टक्के खाती ४० ते ५० हेक्टर या आकारमान गटातील होती. इ. स. १९७६–७७ मध्ये एकूण खात्यांपैकी वैयक्तिक खाती ८९.६ टक्के असून त्यांचे क्षेत्र ८७ टक्के होते. संयुक्त खाती ९.९ टक्के असून त्यांचे क्षेत्र ११.९ टक्के होते. संस्थांची खाती ०.५ टक्के असून त्यांचे क्षेत्र १.१ टक्के होते. १९७०–७१ च्या तुलनेत १९७५–७६ मध्ये संयुक्त खात्यांची संख्या कमी झाली तसेच त्यांचे क्षेत्रदेखील १२.६ टक्क्यांवरून ११.९ टक्के झाले.

इ. स. १९८०–८१ च्या कृषिगणनेनुसार जिल्ह्यात १,२२,०१९ वहिती खाती असून ४,५२,६५९ हेक्टर वहिती क्षेत्र होते. एकूण वहिती क्षेत्रापैकी सर्वात जास्त क्षेत्र दोन ते पाच आणि पाच ते दहा हेक्टर आकारमान गटात समप्रमाणात म्हणजे ३३ टक्के होते. सर्वात कमी वहिती क्षेत्र २० ते ५० हेक्टर आकारमान गटात असून ते ३ टक्के होते. एकूण वहिती खात्यांपैकी सर्वांत जास्त खाती दोन हेक्टरपेक्षा कमी व दोन ते पाच हेक्टर आकारमान गटात समप्रमाणात म्हणजे ३८ टक्के होती. सर्वांत कमी खाती २० ते ५० हेक्टर आकारमान गटात असून ती फक्त एक टक्का होती. सन १९८०–८१ मध्ये एकूण खात्यांपैकी वैयक्तिक खाती ९० टक्के असून त्यांचे क्षेत्र ८९ टक्के व संयुक्त खाती ९.७ टक्के असून त्यांचे क्षेत्र ११ टक्के होते. संस्थांची खाती ०.५ टक्के असून त्यांचे क्षेत्र एक टक्का होते.

इ. स. १९८१ च्या कृषिगणनेनुसार जिल्ह्यातील वहिती खात्यांच्या संख्येत १९७६–७७ पेक्षा वाढ दिसून येते. ही वाढ १९७५ च्या कमाल जमीन धारणेबाबतच्या कायद्यानुसार घालण्यात आलेल्या मर्यादामुळे झाली असावी. तथापि वहिती क्षेत्रात १९८१ मध्ये १९७६–७७ पेक्षा घट दिसून येते.[२]

अर्थव्यवस्थेत प्रमुख पिकांचे स्थान : जलसिंचनाच्या अपुऱ्या साधनांमुळे जिल्ह्यात पूर्वीपासूनच बहुतांश जिराईत पिके घेतली जातात. सध्या बोर, पंचधारा, डोंगरगाव व पोथरा मध्यम प्रकल्पांची कामे पूर्ण झाली असली तरी त्याद्वारे अल्पप्रमाणात जलसिंचनाची सोय उपलब्ध आहे. इ. स. १९८४–८५ मध्ये निव्वळ पिकांखालील क्षेत्रांपैकी ११,२४२ हेक्टर (२.७० टक्के) क्षेत्र जलसिंचनाखाली होते. यापैकी १०,१५९ हेक्टर (९० टक्के) क्षेत्रास विहिरींचे पाणी उपलब्ध होते. फक्त १,०८३ हेक्टर क्षेत्र कालव्यांखाली होते. जलसिंचन क्षेत्रांपैकी तृणधान्यांखाली ६०.८३ टक्के, कडधान्यांखाली १.८० टक्के, उसाखाली ०.२२ टक्के, मिरची, हळद व मसाल्यांचे पदार्थांखाली ३.७८ टक्के, फळे व भाजीपाल्याखाली २१.०४ टक्के, कापसाखाली ७.८५ टक्के तर गळिताच्या पिकांखाली २.८७ टक्के क्षेत्र होते. उर्वरित १.६१ टक्के जमिनीत किरकोळ पिके होती. या वर्षात जलसिंचन करणाऱ्या १४,१३२ विहिरी होत्या. त्यापैकी ९१ टक्के विहिरींवर विजेचे पंप होते, तर ९ टक्के विहिरींवर डिझेल पंप बसविलेले होते.[३]

[२] **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी : १९८८–८९**, (महाराष्ट्र शासन, मुंबई).

[३] **कित्ता.**

इ. स. १९०४–०५ मध्ये जिल्ह्यातील प्रमुख पिकांखालील क्षेत्राची एकूण पिकांखालील क्षेत्राशी टक्केवारी पुढीलप्रमाणे होती :—ज्वारी ३०, गहू १०, भात ०.८, कापूस ४०, अळशी ६, तीळ २, तूर ८, इतर गळिताची धान्ये २.२ व इतर १.०.[४]

नियोजन काळात १९५१–५२ मधील मुख्य पिकांचे उत्पादन व १९५१–१९५६ आणि १९५६–१९६० या कालावधीतील सरासरी उत्पादनासंबंधीची आकडेवारी खाली दिली आहे.[५]

(१०० टन)

पिके		१९५१–५२	१९५१–१९५६	१९५६–१९६०
			(वार्षिक सरासरी उत्पादन)	
भात	..	१७	८	१३
गहू	..	१४०	१७१	१६४
ज्वारी	..	१,०५५	८८४	६५३
इतर धान्ये	..	..	..	१
एकूण धान्ये	..	१,२१२	१,०६३	८३१
एकूण कडधान्ये	..	८०९	४७२	३०८
एकूण अन्नधान्ये	..	२,०२१	१,५३५	१,१३९
कापूस (प्रत्येकी ३९२ पौंड वजनाची गासडी)		६६९	५८०	४७०

सन १९५०–५१ ते १९५८–५९ या वर्षातील प्रमुख पिकांचे दर एकरी सरासरी उत्पादन खालीलप्रमाणे होते. (महाराष्ट्र = १००).

(टन)

पिके		नऊ वर्षांची सरासरी	पिके		नऊ वर्षांची सरासरी
भात	..	६८.८२	हरभरा	..	१०२.०६
गहू	..	१०७.०८	कापूस	..	८६.३६
ज्वारी	..	१२०.६३	तीळ	..	१२२.१६
तूर	..	१५०.३२	मोहरी व अळशी		१३३.६८

[४] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७४), पृ. २०५.

[५] **जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ : वर्धा,** १९६१ (महाराष्ट्र जनगणना कार्यालय, मुंबई).

इ. स. १९६१, १९७१, १९८१ व १९८५–८६ मध्ये निव्वळ पिकांखालील क्षेत्र, तृणधान्ये, कडधान्ये, अन्नधान्ये, ऊस व कापसाखालील क्षेत्राची एकूण पिकाखालील क्षेत्राशी टक्केवारी खालीलप्रमाणे होती.[६]

बाब	१९६०–६१	१९७०–७१	१९८०–८१	१९८५–८६
एकूण पिकांखालील क्षेत्र ..	१००	१००	१००	१००
निव्वळ पिकांखालील क्षेत्र	९९.१७	९८.१७	९३.१८	९४.४२
तृणधान्ये ..	४६.००	३२.३९	३८.३४	३२.७६
कडधान्ये ..	१२.३९	११.२४	१२.३५	११.६३
एकूण अन्नधान्ये ..	५६.९३	५०.५४	५०.६९	४४.३९
ऊस ..	उ. ना.	०.०२३	०.०४३	उ. ना.
कापूस ..	३६.६१	४२.४२	४१.१८	३७.६६
भुईमूग ..	०.२१	१.८०	२.३०	३.९८

इ. स. १९८५–८६ मध्ये एकूण पिकांखालील क्षेत्रापैकी ४४.३९ टक्के क्षेत्र अन्नधान्य पिकाखाली होते. या वर्षी महाराष्ट्रात व विदर्भात हे क्षेत्र अनुक्रमे ६९.६८ व ६२.८२ टक्के होते. एकूण अन्नधान्याचे महाराष्ट्रातील उत्पादन ८७,७९,००० मेट्रिक टन तर जिल्ह्यातील उत्पादन २,०८,२०० मेट्रिक टन होते. जिल्ह्याचे महाराष्ट्राच्या एकूण अन्नधान्य उत्पादनाशी प्रमाण २.३७ टक्के होते. या वर्षी विदर्भात वर्धा जिल्ह्याचा अन्नधान्याखालील क्षेत्र व उत्पादनाच्या दृष्टीने सातवा क्रमांक व दर हेक्टरी उत्पादनाच्या दृष्टीने चौथा क्रमांक होता. सन १९६०–६१ मध्ये तृणधान्यांखालील क्षेत्र १,८२,९०० हेक्टर होते, त्यात घट होऊन ते १९८५–८६ मध्ये १,४१,००० हेक्टर झाले. तसेच सन १९६०–६१ मध्ये तृणधान्यांचे उत्पादन ९,३५,००० मेट्रिक टन होते, त्यात वाढ होऊन ते १९८५–८६ मध्ये १,२१,७०० मेट्रिक टन झाले.

कडधान्याखालील क्षेत्रात १९८५–८६ मध्ये १९६०–६१ पेक्षा अल्पप्रमाणात वाढ झाली असली तरी उत्पादन व सरासरी उत्पन्नात घट झालेली दिसून येते.

खरीप ज्वारीखालील क्षेत्रात १९६०–६१ पेक्षा १९८५–८६ मध्ये २१,१०० हेक्टरची घट दिसून आली. तथापि उत्पादन व सरासरी उत्पन्नात अनुक्रमे ५८३ मेट्रिक टन व प्रति

[६] **कृषि विभागाची सांख्यिकीविषयक सर्वसाधारण जिल्हावार माहिती, भाग-२, १९८८–८९** (महाराष्ट्र शासन, पुणे).

हेक्टर ६२१ किलो वाढ दिसून आली. ही वाढ संकरित बियाणे, रासायनिक खते व पीक-संरक्षक औषधांच्या वापरामुळे झाली. सन १९८५–८६ मध्ये तृणधान्यांखालील क्षेत्रापैकी ७७.९७ टक्के क्षेत्र ज्वारीखाली होते. गव्हाचा तृणधान्य पिकांमध्ये दुसरा क्रमांक असून त्याखालील क्षेत्रात १९६०–६१ पेक्षा १९८५–८६ मध्ये १४,१०० हेक्टरने घट झाली. तथापि एकूण उत्पादन व सरासरी उत्पन्नात अनुक्रमे १०,६०० मेट्रिक टन व प्रति हेक्टर ५४९ किलो वाढ झाली. गव्हाखालील क्षेत्रात घट होण्याचे प्रमुख कारण कापसाखालील क्षेत्रात झालेली वाढ हे असावे. सन १९८५–८६ मध्ये गव्हाचा दर हेक्टरी उत्पादनाबाबत जिल्ह्याचा महाराष्ट्रात तिसरा तर विदर्भात पहिला क्रमांक होता. भाताचा तृणधान्यांमध्ये तिसरा क्रमांक असून भाताखालील क्षेत्रात १९६०–६१ पेक्षा १९८५–८६ मध्ये तिपटीने वाढ झाली. उत्पादनात पाचपट तर दर हेक्टरी सरासरी उत्पन्नात दुपटीने वाढ झाली. तूर हे जिल्ह्यातील कडधान्यांपैकी प्रथम क्रमांकाचे पीक असून १९६०–६१ पेक्षा १९८५–८६ मध्ये त्याखालील क्षेत्रात अदमासे दीडपट वाढ झाली. तथापि उत्पादन व सरासरी उत्पन्नात घट झाली. सन १९८५–८६ मध्ये जिल्ह्याचा तुरीच्या दर हेक्टरी सरासरी उत्पन्नाबाबत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक होता. हरभरा हे कडधान्यांपैकी दुसऱ्या क्रमांकाचे पीक असून १९६०–६१ पेक्षा १९८५–८६ मध्ये त्याखालील क्षेत्र, उत्पादन व दर हेक्टरी सरासरी उत्पन्नात अनुक्रमे २,००० हेक्टर, १,००० मेट्रिक टन व प्रति हेक्टर ७२ किलो वाढ झाली. ही वाढ १९८२ मध्ये प्रारंभिलेल्या भेट व प्रशिक्षण योजनेनुसार झाली.

नगदी पिकांमध्ये कापसाचा पहिला क्रमांक असून त्याखालील क्षेत्र व उत्पादनात १९६०–६१ पेक्षा १९८५–८६ मध्ये अनुक्रमे २५,४०० हेक्टर व १,१८,५०० मेट्रिक टन वाढ झाली. दर हेक्टरी सरासरी उत्पन्नात १०४ किलोने वाढ झाली. या वर्षी दर हेक्टरी रुईच्या सरासरी उत्पन्नात जिल्ह्याचा विदर्भात पहिला क्रमांक होता. भुईमूग दुसऱ्या क्रमांकाचे नगदी पीक असून १९६०–६१ पेक्षा १९८५–८६ मध्ये त्याखालील क्षेत्र व उत्पादनात अनुक्रमे १६,८०० हेक्टर व ९,००० मेट्रिक टन वाढ झाली. तथापि दर हेक्टरी सरासरी उत्पन्नात घट झाली.

पशुधन विकास

जिल्ह्यात १९८२ च्या पशुधनगणनेनुसार राज्यातील पशुधनाच्या फक्त दोन टक्के पशुधन होते. सन १९७२ ते १९७८ या कालावधीत पशुधनाच्या संख्येत ११.४७ टक्क्याने वाढ झाली, तर १९७८ ते १९८२ दरम्यान ४.१८ टक्क्याने घट झाली. मात्र १९७२ ते १९७८ या कालावधीत कुक्कुटांच्या संख्येत ४२ टक्के वाढ आणि १९७८ ते १९८२ या कालावधीत पाच टक्के घट झाली. पशुधन संख्येने जरी कमी असले तरी हा जिल्हा गौळाऊ जनावरांचे माहेरघर असून आर्वी, आष्टी व कारंजा भागात गोपालन मोठ्या प्रमाणात करतात. म्हशींच्या स्थानिक जातींचेही पालन करतात. पशुधनाच्या जोपासनेसाठी १९८४–८५ मध्ये वर्धा शहरात पशु वैद्यकीय सर्वचिकित्सालय, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र आणि जिल्ह्यात इतरत्र ८२ पशुवैद्यकीय संस्था व १५ कृत्रिम रेतन केंद्रे होती. याशिवाय विस्तार-कार्य व प्रात्यक्षिकांसाठी एक फिरते पथक होते. त्याच वर्षी जिल्ह्यातील १,९९,८१५ पशूंवर उपचार करण्यात आले. तसेच कृत्रिम रेतन केंद्रात १२,०६० जनावरांवर कृत्रिम गर्भधारणा करण्यात आली.

पशुधन विकास योजनेच्या कार्यपूर्तीची माहिती खाली दिली आहे.[७]

योजना	१९८३-८४	१९८४-८५	१९८५-८६	१९८६-८७	१९८७-८८ (जूनपर्यंत)
संकरित वासरे पैदास	९३५	१,१०३	१,२४३	१,७३७	२८२
कृत्रिम रेतन	४,७४५	५,७७८	६,३१६	७,७३४	१,५४४
जनावरांना लसटोचणी	४,१९,१६५	४,१५,८३९	५,१३,५५५	५,७८,१५२	८१,३८३
निकृष्ट वळूंचे खच्चीकरण	७,८५०	८,३७१	८,४७१	९,७८१	१,०१९
वैरणीसाठी बियाणे (किलोग्रॅम)	२,६१८	२,७३६	२,११३	९,४९५	४,०६५
वैरण विकासासाठी रोपटी	..	..	१९,८५०	२१,६२५	१०३
वैरण प्रात्यक्षिक भूखंड (हेक्टर)	३५	१३७	१५०	४६	..
नरकोंबडे वाटप	२००	१,०००	८६०	७५१	..
तलंगा वाटप	..	५००	१,९४७	३,१३३	..
एक दिवसाच्या कुक्कुटाचे वाटप.	..	१,००५	२,२१५	२,९५०	..

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागातर्फे पशुधन विकासावरील खर्चाची निवडक वर्षांची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		खर्च (रुपये)	वर्ष	खर्च (रुपये)
१९६५–६६	..	१,७८,७२६	१९८०–८१	११,९६,०७८
१९७०–७१	..	४,१८,७६५	१९८५–८६	२५,०९,८९३
१९७५–७६	..	६,१३,७७५	१९८६–८७	३०,०७,६३५

[७] अधिक माहितीसाठी प्रकरण ४–कृषि व जलसिंचन पहा.

जलसिंचन विकास

जलसंपत्तीच्या दृष्टीने हा जिल्हा संपन्न नाही. वर्धा व धाम व्यतिरिक्त इतर नद्या बारमाही नाहीत, त्यामुळे पाटबंधारे विकासावर मर्यादा पडते. स्वातंत्र्यपूर्व काळात जिल्ह्यात एकही पाटबंधारे प्रकल्प नव्हता. केवळ विहिरींद्वारे अत्यल्प जलसिंचन सुविधा उपलब्ध होती. जलसिंचनासाठी १९५६–५७ मध्ये ५,७२५ विहिरी उपयोगात होत्या. सन १९८३–८४ मध्ये विहिरींची सख्या ३९,३६२ पर्यंत वाढून एकूण जलसिंचनाखालील क्षेत्रापैकी ७० टक्के क्षेत्रात जलसिंचन झाले. दुसऱ्या योजनेत पाटबंधारे योजना हाती घेतल्यामुळे पुढील काळात विहिरींद्वारे होणाऱ्या जलसिंचनाखालील क्षेत्राच्या टक्केवारी-मध्ये घट होत गेली. तरीही विहिरींद्वारे होणाऱ्या प्रत्यक्ष जलसिंचनाखालील क्षेत्रात वाढ झाल्याचे दिसून येते. याचे कारण म्हणजे ग्रामीण विद्युतीकरणामुळे जलसिंचनासाठी विहिरीं-वरील विद्युतपंपांमध्ये झालेली वाढ होय. सन १९५०–५१ मध्ये विहिरींद्वारे ४,५३२ हेक्टर क्षेत्र जलसिंचनाखाली होते, त्यात वाढ होऊन ते १९८३–८४ मध्ये १७,८०१ हेक्टर झाले.

पहिल्या पंचवार्षिक योजना काळात या जिल्ह्यात एकही पाटबंधारे योजना नव्हती. दुसऱ्या योजनेच्या काळात १३,३६० हेक्टर जलसिंचनक्षमतेचा बोर प्रकल्प हाती घेण्यात आला. तसेच आष्टीला ३६० हेक्टर जलसिंचन क्षमतेच्या लघुसिंचनप्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले. पुढील पंचवार्षिक योजनांमध्ये हाती घेतलेल्या प्रकल्पांचा तपशील तक्ता क्रमांक १ मध्ये दिला आहे.[८]

जिल्ह्यातील विविध प्रकल्पांवर झालेला खर्च खालीलप्रमाणे होता.

(लाख रुपये)

योजना	मोठे प्रकल्प	मध्यम प्रकल्प	लघु प्रकल्प		एकूण
			राज्यस्तर	स्थानिकस्तर	
दुसरी योजना ..	..	१२५	..	..	१२५
तिसरी योजना ..	१९५	१	८	..	२०४
तीन वार्षिक योजना ..	५३	३	१८	..	७४
चौथी योजना ..	८	३०	५६	४८	१४२
पाचवी योजना ..	६	१८२	१५६	९५	४३९
दोन एक वार्षिक योजना	३	१९१	७१	११	२७५
सहावी योजना ..	९२६	९०९	१७१	९७	२१०३
१९८५–८६ ..	..	१८०.४७	६९.२९	३९.७३	२८९.४९
१९८६–८७ ..	४८१.७९	२२०.६७	२२.२४	४०.०८	७६४.७८
एकूण ..	१६७२.७९	१८४२.१४	५७१.५३	३३०.८१	४४१७.२७
१९८७–८८ ची तरतूद	२४३.८४	४७०.००	१३.६६	१८.००	७४५.५०

[८] सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिले आहेत.

जिल्ह्यातील विविध जलसिंचन योजनांद्वारे निर्माण झालेली सिंचनक्षमता खालील-प्रमाणे होती.

योजना		निर्मित सिंचनक्षमता ('०००' हेक्टर)	एकूण सिंचनक्षमता ('०००' हेक्टर)
दुसरी योजना ..	..	..	..
तिसरी योजना ..	..	५.०१	५.०१
तीन वार्षिक योजना ..	..	११.४८	१६.४९
चौथी योजना ..	..	२.२०	१८.६९
पाचवी योजना (१९७४–७८)	..	६.१८	२४.८७
वार्षिक योजना (१९७८–७९)	..	१.४९	२६.३६
वार्षिक योजना (१९७९–८०)	..	१.०७	२७.४३
वार्षिक योजना (१९८०–८१)	..	०.१९	२७.६२
वार्षिक योजना (१९८१–८२)	..	..	२७.६२
वार्षिक योजना (१९८२–८३)	..	१.३९	२९.०१
वार्षिक योजना (१९८३–८४)	..	१.९६	३०.९७
वार्षिक योजना (१९८४–८५)	..	०.६०	३१.५७
वार्षिक योजना (१९८५–८६)	..	१.०५	३२.६२

मागील काही वर्षांत जलसिंचन सुविधा वाढली असली तरी शेतकरी मोठ्या प्रमाणात तिचा लाभ घेत नाहीत. त्याबाबतची माहिती खाली दिली आहे.

(हेक्टर)

वर्ष		खरीप	रबी	उन्हाळी	बारमाही	एकूण
१९८३–८४	सिंचनक्षमता	१६,११६	१३,९५७	३६५	५४०	३०,९७८
	प्रत्यक्ष उपयोग	१७९	४,४७०	१,०८७	११	५,७४७
१९८४–८५	सिंचनक्षमता	१६,४१०	१४,२६३	३६०	५४६	३१,५७९
	प्रत्यक्ष उपयोग	३,४९२	५,२३३	६	४५	८,७७७
१९८५–८६	सिंचनक्षमता	१६,९७९	१४,९७९	३६०	५४६	३२,६२५
	प्रत्यक्ष उपयोग	६७६	४,१५१	६२	..	४,८८९
१९८६–८७	सिंचनक्षमता	१८,७६३	१२,७१३	४३०	५२०	३२,४२६
	प्रत्यक्ष उपयोग	२,७००	५,७००	२९६	४२	८,७३८

खरीप हंगामातील प्रत्यक्ष झालेले सिंचन रबी हंगामापेक्षा कमी आहे. तसेच उपलब्ध सिंचनक्षमतेचा रबी हंगामात ज्या प्रमाणात वापर होणे आवश्यक आहे त्या प्रमाणात झालेला नाही. कारण शेतकरी खरीप हंगामात पारंपरिक दीर्घ मुदतीची पिके घेतात व त्यामुळे रबी हंगामात दुसरे जलसिंचनायोग्य पीक घेण्यास क्षेत्र उपलब्ध नसते.

वाहतूक व दळणवळण

वर्धा जिल्ह्यात १९०५ मध्ये ७७.२५ किलोमीटर खडीचे, १२२.३० किलोमीटर मुरुमाचे व ९६.६० किलोमीटर कच्चे रस्ते होते. द्वितीय महायुद्धानंतरच्या २० वर्षांच्या काळात रस्त्यांच्या विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर प्रथम आराखडा १९४३ मध्ये तयार करण्यात आला. तो नागपूर योजना या नावाने प्रसिद्ध आहे. या आराखड्यानुसार राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग असे रस्त्यांचे प्रथमच वर्गीकरण करण्यात आले. तेव्हापासून राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांना मुख्य रस्ते म्हणून तर इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांना इतर रस्ते म्हणून ओळखले जाऊ लागले. नियोजन काळात रस्ते विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यानुसार जिल्ह्यात रस्त्यांचा झालेला विकास तक्ता क्रमांक २ मध्ये दिलेला आहे.

शेती विकास झालेल्या भागातील कोणतेही खेडे मुख्य रस्त्यापासून ८ किलोमीटरपेक्षा व इतर रस्त्यापासून ३.२० किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावर असू नये, तसेच शेतीच्या दृष्टीने मागास भागातील कोणतेही खेडे मुख्य रस्त्यापासून ३२.२० किलोमीटरपेक्षा व इतर रस्त्यांपासून ८ किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावर असू नये, ही नागपूर योजनेची दोन प्रमुख उद्दिष्टे होती. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ग्रिड व स्टार पद्धतीच्या आधारे रस्ते विकासाची दोन सूत्रे तयार करण्यात आली. या सूत्रांनुसार उद्दिष्टे ठरविण्यात आली. महायुद्धानंतरच्या काळात काही वर्षांमध्ये रस्त्यांचा विकास झपाट्याने होऊन नागपूर योजनेच्या उद्दिष्टांची पूर्ती मुदतपूर्व (१९६५) झाली. त्यामुळे १९६१–१९८१ दरम्यान रस्ते विकासाची नवीन योजना तयार करण्यात आली. या योजनेत १९७६ मध्ये सुधारणा करण्यात आली. योजनेची प्रगती खालील आकडेवारीवरून[१] दिसून येते.

(लांबी कि. मी.)

बाब	मुख्य रस्ते	इतर रस्ते	एकूण रस्ते
१९६१–१९८१ च्या मूळ योजनेतील उद्दिष्ट	८९५	१,३००	२,१९५
१९६१–१९८१ च्या सुधारित योजनेतील उद्दिष्ट	९१६	१,३४९	२,२६५
१ एप्रिल १९६१ ची स्थिती	४३४	१०४	५३८
१ एप्रिल १९८१ ची स्थिती	८४७	६६६	१,५१३
१ एप्रिल १९८१ च्या माध्यांची योजनेच्या सुधारित उद्दिष्टांशी टक्केवारी.	९२.४७	४९.३७	६६.८०

[१] महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल, पूर्वोक्त.

या योजनेनुसार रस्त्यांची १ एप्रिल १९८१ पर्यंतच्या कार्यपूर्तीची योजनेच्या सुधारित उद्दिष्टांशी टक्केवारी खाली दिली आहे.

	१९६१–१९८१ च्या सुधारित योजनेतील उद्दिष्टांची १ एप्रिल १९८१ रोजीच्या साध्याशी टक्केवारी		
	मुख्य रस्ते	इतर रस्ते	एकूण रस्ते
वर्धा जिल्हा ..	९२.४७	४९.३७	६६.८०
विदर्भ विभाग ..	८३.०९	४३.११	५८.५४
महाराष्ट्र राज्य ..	९०.०२	६६.९३	७६.०६

नागपूर योजनेनुसार १०० चौ. किलोमीटर क्षेत्रफळाकरिता १६.१५ किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात येऊन १९६१ मध्ये पूर्ण करण्यात आले. त्यामुळे १९६१–१९८१ च्या योजनेत १०० चौ. किलोमीटर क्षेत्रफळाकरिता सर्वसाधारणपणे ३२.३० किलोमीटर लांबीचे रस्ते प्राप्त होण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक स्थळाचे खालीलप्रमाणे अंतर ठरविण्यात आले.

क्षेत्र	कोणत्याही रस्त्यापासून कमाल अंतर (कि. मी.)		प्रति १०० चौ.कि.मी.
	खडीचा रस्ता	अन्य रस्ता	
विकसित कृषक क्षेत्र ..	६.४३	२.४०	४३.४७
अर्धविकसित क्षेत्र ..	१२.८७	४.८२	१८.६३
अविकसित आणि नापिक क्षेत्र	१९.३१	८.००	११.८०

इ. स. १९८१ मध्ये या योजनेचा कालावधी संपल्यानंतर १९८१–२००१ साठी रस्ते विकास योजना लागू करण्यात आली. त्यानुसार राज्यातील प्रत्येक खेडे कमीतकमी एका बारमाही रस्त्याने जोडण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार वर्धा जिल्ह्यासाठी ठरविण्यात आलेली उद्दिष्टे व १ एप्रिल १९८५ रोजी अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची लांबी खालीलप्रमाणे होती.[१०]

[१०] **रस्ते विकास योजना, १९८१–२००१, वर्धा जिल्हा.**

(लांबी कि. मी.)

प्रवर्ग	उद्दिष्ट		१ एप्रिल १९८५ रोजी अस्तित्वात असलेले रस्ते		साध्याची टक्केवारी	
	१९६१–१९८१ (सुधारित)	१९८१–२००१	१९६१–१९८१ योजनेप्रमाणे	नवीन लांबी	१९६१–१९८१ (सुधारित)	१९८१–२००१
राष्ट्रीय महामार्ग ..	१७४.०१	१०७.११	१०७.११	..	०.६१	१००
प्रमुख राज्य महामार्ग ..	४१.१२	६६.९७	६६.९७	..	१.६२	१००
राज्यमार्ग ..	२३२.१२	४८६.००	४३५.४९	५०.५१	१.८७	०.८९
प्रमुख जिल्हा मार्ग ..	४६५.३९	७०६.००	४८५.८५	२२०.१५	१.०४	०.६८
इतर जिल्हा मार्ग ..	५६४.४८	६५५.००	३८६.६४	२६८.३६	०.६८	०.५८
ग्रामीण मार्ग ..	८०१.२१	१,३५४.८८	६०३.१३	७५१.७५	०.७५	०.४४
एकूण ..	२,२७८.३३	३,३७५.९६	२,०८५.१९	१,२९०.७७	०.९१	०.६१

सेवायोजन[११]

वर्धा जिल्हा औद्योगिकदृष्टया मागासलेला असल्यामुळे रोजगाराच्या संधी अत्यल्प आहेत. सन १९८५ मध्ये पुलगाव कॉटन मिलमध्ये २,६९५, डागा कॉटन मिलमध्ये २,२००, मोहता कॉटन मिलमध्ये २,३५०, सार्वजनिक क्षेत्रात १९,९०० आणि इतर खाजगी क्षेत्रात ८,९१९ कामगारांना रोजगार उपलब्ध होता.

वर्धा जिल्हा सेवायोजन केंद्र १९५८ मध्ये स्थापन करण्यात आले. केंद्राच्या नोंदणी-पटावर १९८५ अखेर खालीलप्रमाणे बेरोजगारांची संख्या होती.

सातव्या इयत्तेपेक्षा कमी शिक्षित	..	६,६६९
सातवी ते शालांत परीक्षा अनुत्तीर्ण	..	१४,९२४
शालांत परीक्षा उत्तीर्ण	..	१६,१०४
उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण	..	२,१३३
पदवीधर	..	२,१०३
एकूण	..	४१,९३३

बेरोजगारांना नोकऱ्या मिळवून देणे अथवा स्वयंउद्योगाकडे प्रवृत्त करण्याच्या योजनेनुसार १९८४–८५ मध्ये १४० उमेदवारांना स्वयंउद्योगाकडे प्रवृत्त करण्यात आले. सेवायोजन कार्यालयातील निवडक वर्षांची रोजगारविषयक आकडेवारी खाली दिली आहे.

तपशील	१९५८–५९	१९६०–६१	१९७०–७१	१९८०–८१	१९८६–८७
नोंदणीकृत उमेदवार	६,९१६	७,७३२	६,६२३	८,६६३	७,३९७
अधिसूचित केलेली पदे	उ. ना.	१,०९७	१,३९०	९२३	३९३
नोकरी मिळालेले उमेदवार	५९५	७४३	१,०३०	५८७	३७०
नोकरी मिळालेल्यांची नोंदणीकृतांशी टक्केवारी.	९	९	१५	६	५
खाजगी क्षेत्रात नोकरी मिळालेले.	उ. ना.	..	६२३	१९	४१
सार्वजनिक क्षेत्रात नोकरी मिळालेले.	उ. ना.	७४३	४०७	५६८	३२९

[११] सेवायोजन अधिकारी, वर्धा जिल्हा.

जिल्ह्यातील अनुसूचित जाती व जमातींना मिळालेल्या रोजगाराची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		उमेदवार नोंदणी	अधिसूचित पदे	शिफारस केलेले उमेदवार	नोकरी प्राप्त उमेदवार
अनुसूचित जाती—					
१९८०–८१	..	२,२५२	५६	५६५	११
१९८६–८७	..	१,६३८	१५	३५७	२७
अनुसूचित जमाती—					
१९८०–८१	..	१,०९८	४८	३५४	११
१९८६–८७	..	४७४	२८	२९८	१६

निरनिराळ्या व्यवसायांत रोजगार उपलब्ध झालेल्या उमेदवारांची व्यवसायानुसार संख्या खाली दिली आहे.

प्रवर्ग	१९६०-६१	१९७०-७१	१९८०-८१	१९८६-८७
व्यावसायिक, तांत्रिक व संलग्न व्यवसाय.	..	..	१५९	१३
कारकून व तत्संबंधित व्यवसाय	३२६	३७१	१६७	१४१
शेतकरी, कोळी, शिकारी व उपयोजित व्यवसाय.	..	..	..	२२
वाहतूक व दळणवळण	..	..	५	..
कलाकुसरीची कामे करणारे, तांत्रिक कुशल व अर्ध-कुशल कामगार.	..	२०	९	१८
अवर्गीकृत कामगार	४१७	७०९	२४७	१७६

आर्थिक नियोजन[१२]

मर्यादित साधनसामग्रीतून अधिकाधिक विकासासाठी व अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील असमतोल दूर करण्यास्तव स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने आर्थिक नियोजनाचे धोरण अमलात आणले. राष्ट्रीय विकासाबरोबरच प्रादेशिक असमतोल घालविणे हे नियोजनामध्ये मार्गदर्शक तत्त्व मानण्यात येऊन त्या दृष्टीने भारत सरकार तसेच राज्य

[१२] या भागातील प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी जिल्हा सांख्यिकीय अधिकारी व नियोजन अधिकारी, वर्धा जिल्हा, यांनी पाठविलेल्या आकडेवारीवर आधारित आहे.

शासनाने १९५१–५२ पासून समयबद्ध नियोजन करण्यास प्रारंभ केला. त्यानुसार पहिली पंचवार्षिक योजना १९५१-५२ मध्ये सुरू करण्यात आली. सन १९५५–५६ ते १९६०-६१ मध्ये दुसरी पंचवार्षिक योजना आणि १९६१–६२ ते १९६५–६६ मध्ये तिसरी पंचवार्षिक योजना कार्यान्वित करण्यात आली. त्यानंतर देशात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे व आर्थिक अपसरणाची लाट पसरल्यामुळे १९६६–६७, १९६७–६८ व १९६८–६९ साठी वार्षिक योजना हाती घेण्यात आल्या. इ. स. १९६९–७० ते १९७३–७४ मध्ये चौथी पंचवार्षिक योजना आणि १९७४–७५ ते १९७८–७९ मध्ये पाचवी पंचवार्षिक योजना कार्यान्वित करण्यात आली. ऑगस्ट १९८० मध्ये सहाव्या योजनेच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. राज्य योजनेतील बहुसंख्य योजना सर्वसाधारण स्वरूपाच्या असून त्यांचा फायदा सर्व जिल्ह्यांना मिळण्याची तरतूद असते. तथापि काही योजना अशा असतात की, त्यांचा फायदा फक्त काही जिल्ह्यांनाच मिळतो. वर्धा जिल्ह्यातील सर्व योजनांसाठी झालेल्या खर्चाची माहिती खाली दिली आहे.

पहिली पंचवार्षिक योजना (१९५१–५२ ते १९५५–५६) : या योजनेत ३३७.७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. तथापि या कालावधीत प्रत्यक्ष २७०.४० लाख रुपये खर्च झाला.

द्वितीय पंचवार्षिक योजना (१९५६–५७ ते १९६०–६१) : हा जिल्हा प्रथम पंचवार्षिक योजना काळात मध्यप्रदेश राज्यात समाविष्ट होता. राज्य पुनर्रचनेनंतर आलेल्या द्वितीय पंचवार्षिक योजनाकाळात झालेल्या खर्चाचा तपशील खाली दिला आहे.

विकास कार्यक्रम		प्रत्यक्ष खर्च (लाख रुपये)	एकूण खर्चाशी टक्केवारी
कृषि व संलग्न सेवा	..	११४.६७	४९.५०
सहकार व सामूहिक विकास	..	..	..
सिंचन व ऊर्जा	..	४५.७८	१९.७७
उद्योग व खाणकाम	..	३.००	१.२९
वाहतूक व दळणवळण	..	३५.३३	१५.२६
सामाजिक सेवा	..	३२.४१	१३.९९
संकीर्ण	..	०.४२	०.१९
एकूण	..	२३१.६१	१००

तृतीय पंचवार्षिक योजना (१९६१–६२ ते १९६५–६६) : द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत आलेला अनुभव लक्षात घेऊन तृतीय पंचवार्षिक योजना आखण्यात आली. द्वितीय योजनेत अन्नधान्याचा प्रश्न बिकट झाल्यामुळे शेतीविकास व उत्पादन वाढीस प्राधान्य देण्यात आले. तृतीय योजनेत राज्याच्या ४९९ योजनांपैकी ६७ योजना जिल्हा

स्तरावर राबविण्यात आल्या. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील विकास कार्यक्रमावर झालेला खर्च खाली दिला आहे.

विकास कार्यक्रम		प्रत्यक्ष खर्च (लाख रुपये)	एकूण खर्चाशी टक्केवारी
कृषि व संलग्न सेवा	..	१०५.६५	३९.१९
सहकार व सामूहिक विकास	..	६७.७४	२५.१३
सिंचन व ऊर्जा	..	..	..
उद्योग व खाणकाम	..	२.९७	१.१०
वाहतूक व दळणवळण	..	२३.५८	८.७५
सामाजिक सेवा	..	६९.६०	२५.८३
संकीर्ण	..	..	..
एकूण	..	२६९.५४	१००

सन १९६२ पासून जिल्हा परिषद स्थापन झाल्यामुळे जिल्हास्तरावरील काही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आल्या.

वर्धा योजना (१९६४–६६)[१३] : महात्मा गांधींच्या सेवाग्राममधील वास्तव्याचे चिरंतन स्मारक उभारण्यासाठी राज्य शासन व अखिल भारतीय सर्वसेवा संघाने ऑगस्ट १९६० मध्ये सेवाग्राम परिसराच्या सर्वंकष विकासासाठी योजना तयार करण्याचे ठरविले. त्यानुसार जिल्हा विकास परिषदेने वर्धा तालुक्यासाठी १९६१–१९६६ साठी अंतरिम कृषि-औद्योगिक योजना तयार केली. तिला वर्धा योजना हे नाव प्राप्त झाले. तथापि योजनेतील त्रुटींचा परामर्ष घेता असे लक्षात आले की, लोकांच्या गरजा भागविण्याची व जनतेचा सहभाग प्राप्त करण्याची तिच्यात क्षमता नव्हती. म्हणून गरजांवर आधारित विकास कार्यक्रम तयार करण्यासाठी उपलब्ध साधनसामग्रीचे सर्वेक्षण व स्थानिक प्रतिनिधींशी चर्चा करून योजनेची पुनर्रचना करावी असे सर्वसेवा संघाने सुचविले. विनोबाजी भावे यांनी सुचविले की, ही योजना महात्मा गांधीजींच्या अंत्योदयाच्या तत्वप्रणालीवर आधारित असावी आणि योजनेची व्याप्ती संपूर्ण जिल्हाभर वाढवावी. ही तत्वे आधारभूत मानून दीर्घ मुदतीची वर्धा जिल्हा योजना तयार करण्याबद्दल पुणे येथील गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेस सुचविण्यात आले. त्यानुसार संस्थेने वर्ध्यातील प्रादेशिक नियोजन संस्थेच्या मदतीने जून-सप्टेंबर १९६१ मध्ये जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिकदृष्टया सर्वेक्षण केले.

संस्थेच्या अभ्यासावर आधारित असा जिल्हा योजनेचा एकात्मीकृत आराखडा ऑक्टोबर १९६२ मध्ये तयार करण्यात आला. तोपावेतो, जिल्हा परिषद कार्यान्वित झाल्याने तिच्याकडे जिल्हा योजनेचा आराखडा सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेने पंचायत समित्यांबरोबर

[१३] **महात्मा गांधींच्या विचारप्रणालीवर आधारित वर्धा जिल्ह्याची योजना उपगटाचा अहवाल** (योजना आयोग, भारत सरकार, १९८२).

विचारविनिमय करून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची अखेरची दोन वर्षे आणि चौथ्या योजनेच्या पाच वर्षांचा समावेश करून वर्धा जिल्हा योजनेस अंतिम स्वरूप दिले. ही योजना अमलात आणण्यासाठी असा निर्णय घेण्यात आला की, प्रायोगिक किंवा पथदर्शी स्वरूपाच्या बाबींखेरीज इतर बाबींच्या पूर्ततेसाठी राज्य शासनाने वर्धा योजनेसाठी वित्तव्यवस्था करावी, आणि प्रायोगिक किंवा पथदर्शी स्वरूपाच्या बाबींसाठी भारतीय योजना आयोगाने केंद्रीय मंत्रालयाकडून निधी पुरवावा.

राज्य योजनेमधून जिल्हा योजनेसाठी २८८.२३ लाख रुपयांची तरतूद करण्याचा विचार होता. तथापि वर्धा जिल्हा योजनेसाठी पाच वर्षांसाठी ४६१.६२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. जिल्हा परिषदेने ४६१.६२ लाख रुपयांच्या तरतुदीमध्ये वाढ करून ती ८६४.२३ लाख रुपये केली. ही वाढ लघुसिंचन, रस्तेविकास, सामान्य शिक्षण व सार्वजनिक आरोग्य विकासाच्या गरजा भागविण्यासाठी करण्यात आली. योजनेच्या अंमलबजावणीसाठी विभाग प्रमुखांनी जिल्हा परिषद व जिल्हा योजनेच्या कर्मचाऱ्यांना मदत करण्याबद्दल शिफारसही करण्यात आली. कार्यवाहीमध्ये समन्वय साधण्यासाठी शासनाने अतिरिक्त विकास आयुक्ताची प्रतिनियुक्ती केली. अशा प्रकारे ही योजना क्षेत्र-विकासाची व तळाच्या माणसाच्या उन्नतीची योजना म्हणून कार्यरत झाली.

वर्धा जिल्हा योजनेची अंमलबजावणी १९६४–६५ पासून सुरू झाली. योजनेत एकूण ४८ उपयोजना असून त्यांची कृषिविषयक कार्यक्रम, सहकार व सामूहिक विकास, वाहतूक व दळणवळण आणि सामाजिक सेवा या चार प्रमुख शीर्षात विभागणी केली. प्रारंभी उपयोजनांसाठी ९६ लाख रुपयांची तरतूद करून तिची विभागणी कृषि विकास ५४.७२ लाख रुपये, वाहतूक व दळणवळण २६ लाख रुपये, सामाजिक सेवा ७ लाख रुपये, सहकार व सामूहिक विकास ७.२८ लाख रुपये आणि इतर बाबींसाठी एक लाख रुपये याप्रमाणे करण्यात आली. उपरोक्त ४८ योजनांपैकी १६ योजना शासनाच्या मंजुरीअभावी आणि तांत्रिक अडचणीमुळे अमलात येऊ शकल्या नाहीत. योजनेवर १९६५–६६ मध्ये फक्त ३१.६३ लाख रुपये खर्च झाला.

गांधीजींच्या विचारप्रणालीचा अंगिकार करून बांधीलकीच्या भावनेतून कार्यवाही न झाल्याने योजनेचे मूळ उद्देश साकार होऊ शकले नाहीत आणि वर्धा योजना मृतप्राय झाली. पुढे याच पार्श्वभूमीवर दुसरी वर्धा योजना तयार करण्यात आली. कालक्रमानुसार तिची माहिती पुढे दिलेली आहे.

वार्षिक योजना (१९६६–६७, १९६७–६८ व १९६८–६९) : तृतीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत गंभीर स्वरूपाच्या अडचणी निर्माण झाल्या. सन १९६२ मधील चिनी आक्रमण व १९६५ मधील पाकिस्तानी आक्रमणामुळे राष्ट्रीय संरक्षणावर अतिरिक्त खर्च करावा लागला. तसेच १९६५–६६ मधील भीषण दुष्काळामुळे अर्थव्यवस्था विस्कळित झाली. परिणामतः चौथ्या पंचवार्षिक योजनेसंबंधी फेरविचार करून नियोजन प्रणालीमध्ये काही बदल करणे क्रमप्राप्त ठरले. त्यानुसार योजनेची पुनर्रचना करून १९६६–६७, १९६७–६८ व १९६८–६९ साठी वार्षिक योजनांची आखणी करण्यात आली. चौथ्या पंचवार्षिक योजनेसाठी योग्य पार्श्वभूमी तयार करणे हे या वार्षिक योजनांचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्यांस अनुसरून कृषी उत्पादनात वाढ, किमतींचे स्थैर्य आणि दुय्यम व तिय्यम

क्षेत्रांतील गुंतवणुकीस उत्तेजन यांवर भर देण्यात आला. सन १९६६–६७, १९६७–६८ व १९६८–६९ या वार्षिक योजनांतर्गत जिल्ह्यात विविध विकास शिर्षानुसार झालेला प्रत्यक्ष खर्च खाली दिलेला आहे.

विकास कार्यक्रम	वार्षिक योजना	प्रत्यक्ष खर्च (लाख रुपये)	एकूण खर्चाशी टक्केवारी
कृषि व संलग्न सेवा ..	१९६६–६७	३९.४५	४६.५९
	१९६७–६८	५२.०५	४६.५२
	१९६८–६९	५६.८१	४५.१३
सहकार व सामूहिक विकास ..	१९६६–६७	८.०४	९.४९
	१९६७–६८	९.३०	८.३१
	१९६८–६९	६.१८	४.९१
सिंचन व ऊर्जा ..	१९६६–६७	..	..
	१९६७–६८	..	..
	१९६८–६९	..	..
उद्योग व खाणकाम ..	१९६६–६७	१.०८	१.२८
	१९६७–६८	०.७५	०.६७
	१९६८–६९	०.५८	०.४६
वाहतूक व दळणवळण ..	१९६६–६७	२३.३६	२७.५९
	१९६७–६८	२०.१४	१८.००
	१९६८–६९	२३.७७	१८.८९
सामाजिक सेवा ..	१९६६–६७	१२.७५	१५.०५
	१९६७–६८	२९.६४	२६.५०
	१९६८–६९	३८.२८	३०.४१
संकीर्ण ..	१९६६–६७	..	..
	१९६७–६८	..	..
	१९६८–६९	०.२५	०.२०
एकूण ..	१९६६–६७	८४.६८	..
	१९६७–६८	१११.८८	..
	१९६८–६९	१२५.८७	..

चतुर्थ पंचवार्षिक योजना (१९६९–७० ते १९७३–७४) : उपरोक्त वार्षिक योजनांचे कालावधीत काहीसे आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले तरीसुद्धा चतुर्थ पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी आर्थिक परिस्थिती फारशी समाधानकारक नव्हती. त्यामुळे या योजनेसाठी परिस्थितीनुरूप धोरण ठरविण्यात आले. योजनेचा मसुदा १९६६ मध्ये तयार केलेला होता. तथापि बदललेल्या परिस्थितीत अर्थव्यवस्थेच्या गरजा लक्षात घेऊन मूळ प्रारूपात बदल करून १९६९ मध्ये नवीन प्रारूप तयार केला. त्यात स्थैर्याधिष्ठित विकास आणि आर्थिक स्वावलंबन ही उद्दिष्टचे ठरविली. या योजनेत कृषि उत्पादन, जलसिंचन आणि वीज, वाहतूक व दळणवळण आणि सामाजिक सेवा विकासाला प्राधान्य देण्यात आले. या योजनेत जिल्ह्यातील विकास कार्यक्रमांवर झालेला खर्च खाली दिलेला आहे.

विकास कार्यक्रम		प्रत्यक्ष खर्च (लाख रुपये)	एकूण खर्चाशी टक्केवारी
कृषि व संलग्न सेवा	..	३२७.००	५१.०७
सहकार व सामूहिक विकास	..	२६.०४	४.०६
जलसिंचन व ऊर्जा	..	..	..
उद्योग व खाणकाम	..	३.८५	०.६०
वाहतूक व दळणवळण	..	८९.०७	१३.९२
सामाजिक सेवा	..	१८६.७४	२९.१७
संकीर्ण	..	७.५२	१.१८
एकूण	..	६४०.२२	१००

जिल्हा नियोजन : पंचवार्षिक योजनांद्वारे आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यास्तव नियोजन प्रक्रियेत लोक प्रतिनिधींचा सहभाग वाढविणे आवश्यक असल्याकारणाने पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये जिल्हा नियोजनाची संकल्पना मांडण्यात आली. पाचव्या योजनेच्या आराखड्यात भारतीय नियोजन मंडळाने तद्विषयक मार्गदर्शक तत्त्वे विहित केली. तथापि तत्पूर्वीच जिल्हा नियोजनाचे तत्त्व महाराष्ट्र शासनाने स्वीकृत केले होते. समतोल विकास साधण्यासाठी नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने जिल्हा हा पायाभूत घटक मानण्याचा शासनाचा निर्णय महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी २० ऑगस्ट १९६९ रोजी विधिमंडळात जाहीर केला होता. महाराष्ट्र शासनाने २० ऑक्टोबर १९७२ रोजी केलेल्या ठरावानुसार प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन मंडळ स्थापन करण्याचे ठरविले. ठरावाच्या प्रस्तावात आरंभीच म्हटले आहे की, "नियोजनासाठी जिल्हा हा पायाभूत घटक मानावा आणि प्रत्येक जिल्ह्यासाठी दीर्घ दृष्टीने यथार्थदर्शी योजना तयार करावी असे शासनाने ठरविले आहे. जिल्ह्याजिल्ह्यांमधील तसेच एकेका जिल्ह्याच्या अंतर्गत वेगवेगळ्या भागामध्ये विकासाच्या बाबतीत जो असमतोल आढळतो तो अधिकात अधिक प्रमाणात क्रमशः दूर करण्यास अशा योजनेची मदत होईल. आज उपलब्ध असलेले आणि भविष्यात निर्माण होणारे मनुष्यबळ आणि इतर प्रकारची साधनसंपत्ती यांच्या आधारे शक्य असणारी विकासाची कमाल पातळी गाठण्याची संधी यामुळे प्रत्येक जिल्ह्यास मिळेल".

यावरून हे स्पष्ट होते की, नियोजन मंडळाच्या निर्णयापूर्वीच महाराष्ट्राने जिल्हा नियोजनाचा कार्यक्रम हाती घेतला. "माणूस" हा नियोजनाचा केंद्रबिंदू मानून गरजेवर आधारित कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हा नियोजन हे प्रभावी साधन म्हणून वापरण्यास प्रारंभ केला. पाचव्या योजनेच्या प्रारंभी, १९७४–७५ मध्ये, या ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली.

जिल्हा योजनेचा आराखडा तयार करणे, मंजूर जिल्हा योजनेच्या अंमलबजावणीवर नियंत्रण व देखरेख ठेवणे, तसेच अंमलबजावणी करणाऱ्या वेगवेगळ्या यंत्रणांमध्ये जिल्हा पातळीवर एकसूत्रता आणणे, ही जिल्हा नियोजन व विकास मंडळाची कार्ये होत. जिल्ह्यातील खासदार, आमदार आणि नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींचे मिळून हे मंडळ बनलेले असते. जिल्ह्याचा नियुक्त पालकमंत्री मंडळाचा व कार्यकारी समितीचा अध्यक्ष असतो. जिल्हाधिकारी मंडळाचा सदस्य-सचिव असतो. मंडळाची बैठक वर्षातून किमान दोन वेळा आणि कार्यकारी समितीची बैठक महिन्यात किमान एकदा तरी भरावी आणि त्यामध्ये जिल्हा पातळीवरील योजनांच्या प्रगतीची चर्चा व्हावी, अशी कार्यपद्धती विहित केलेली आहे. पंचायत राज संस्थांचे प्रतिनिधी जिल्हा नियोजन व विकास मंडळावर आणि मंडळाच्या कार्यकारी समितीवर आहेत. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी हे दोघे जिल्हा नियोजन व विकास मंडळ तसेच मंडळाची कार्यकारी समिती, आदिवासी क्षेत्र उपयोजनेची विशेष कार्यकारी समिती आणि जिल्ह्यासाठी वार्षिक योजनेचा मसुदा तयार करणाऱ्या समितीचेही सभासद आहेत. ज्या बैठकीमध्ये मंडळ जिल्हा योजनेस मंजुरी देते त्या बैठकींना तालुका पंचायत समित्यांच्या सभापतींनाही निमंत्रित केले जाते. जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समितीचा सभापती आणि आदिवासी क्षेत्र उपयोजनेच्या कार्यक्षेत्रामध्ये समाविष्ट तालुका पंचायत समित्यांचे सभापती हे आदिवासी क्षेत्र उपयोजनेच्या विशेष कार्यकारी समितीचे सभासद आहेत.

जिल्हा पातळीवर नियोजनाची पूर्वतयारी म्हणून पाचव्या पंचवार्षिक योजनेतील योजनांची राज्य आणि जिल्हा पातळीवरील योजनांमध्ये विभागणी करण्यात आली. राज्य शासनाद्वारे योजनेवर करावयाच्या एकूण नियोजित खर्चापैकी सुमारे ६० टक्के खर्च जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत करावा, तसेच तेवढ्या भागाची जबाबदारी जिल्हा मंडळावर सोपवावी अशी कल्पना होती. या कल्पनेनुसार मोठे पाटबंधारे आणि उद्योगधंद्यांसाठी सामूहिक उत्तेजन योजना यांचा जिल्हा पातळीवरील योजनांमध्ये समावेश केला. परंतु १९७६–७७ मध्ये व्यावहारिक कारणांसाठी वर्गीकरण बदलून त्यांचा राज्य पातळीवरील योजनांमध्ये समावेश करण्यात आला. त्यामुळे राज्याच्या योजनेमधील जिल्हा पातळीवरील योजनांचा भाग अदमासे ४० टक्के झाला.

पुढे अनुभवाने लक्षात आले की, जिल्हा पातळीवरील योजनांमध्ये समाविष्ट असलेल्यापैकी काही योजनांचे नियोजन आणि त्यांच्या निधीची तरतूद राज्यपातळीवर करणे आवश्यक ठरते. जेव्हा योजनांतर्गत नवीन योजना सुरू केल्या जातात किंवा केंद्र पुरस्कृत योजना भागीदारीच्या तत्त्वावर स्वीकारल्या जातात किंवा मोठ्या प्रमाणावर पैशांची तरतूद करावी लागते, तेव्हा अशा योजनांसाठी वेगळी वर्गवारी केली जाते. अशा योजनांना राज्य पातळीवरील संचित निधी (स्टेट पूल) योजना असे म्हणतात. त्यामुळे स्वाभाविकच जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत होणाऱ्या खर्चावरील भार थोडा कमी होतो. जिल्हा

पातळीवरील नियोजनासाठी उपलब्ध करावयाच्या निधीचे सूत्र शासनाने निश्चित केले आहे. त्यामध्ये जिल्ह्याची लोकसंख्या, मागासवर्गियांची संख्या, नागरी लोकसंख्या, कृषि, जलसिंचनाची उपलब्धी व औद्योगिक मागासलेपण, अवर्षणप्रवण क्षेत्र, वनक्षेत्र आणि विशेष समस्यांसाठी राखीव मानलेले क्षेत्र, या बाबींचा प्रामुख्याने विचार केला जातो. त्याबाबत गरजेनुसार पुनर्मूल्यमापन केले जाते. याचा उद्देश असा की, गरजेवर आधारित आर्थिक विकासाचा कार्यक्रम परिणामकारकपणे राबविणे शक्य व्हावे. या नियोजन तंत्रानुसार वर्धा जिल्ह्यासाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळ नेमण्यात आले.

पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४–७५ ते १९७८–७९) : राष्ट्रीय योजनेत नमूद केलेल्या ध्येय धोरणानुसार महाराष्ट्र राज्याच्या पाचव्या पंचवार्षिक योजनेत कृषि उत्पादनाकडे विशेष लक्ष, रोजगार निर्मिती, लोकांच्या मूलभूत गरजा भागविणे, इत्यादी प्रमुख उद्दिष्टे विहित केली होती. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील विविध विकास कार्यक्रमावर झालेला प्रत्यक्ष खर्च खाली दिला आहे.

विकास कार्यक्रम		प्रत्यक्ष खर्च (लाख रुपये)	एकूण खर्चाशी टक्केवारी
कृषि व संलग्न सेवा	..	४५२.३५	२६.४७
सहकार व सामूहिक विकास	..	१०.३८	०.६०
जलसिंचन व ऊर्जा	..	६०५.२४	३५.४०
उद्योग व खाणकाम	..	२२.३३	१.३०
वाहतूक व दळणवळण	..	१३६.३३	३.९८
सामाजिक सेवा	..	३०७.८९	१८.००
संकीर्ण	..	१७५.०७	१४.२५
एकूण	..	१,७०९.५९	१००

वार्षिक योजना (१९७९–८०) : सन १९७९–८० च्या वार्षिक योजनेंतर्गत जिल्ह्यातील विविध विकास कार्यक्रमावर झालेला प्रत्यक्ष खर्च खालीलप्रमाणे होता.

विकास कार्यक्रम		प्रत्यक्ष खर्च (लाख रुपये)	एकूण खर्चाशी टक्केवारी
कृषि व संलग्न सेवा	..	११६.८९	२०.४७
सहकार व सामूहिक विकास	..	१.९१	०.३३
जलसिंचन व ऊर्जा	..	२०३.४५	३५.६४
उद्योग व खाणकाम	..	७.५७	१.३३
वाहतूक व दळणवळण	..	४३.२५	७.५८
सामाजिक सेवा	..	९८.०१	१७.१६
संकीर्ण	..	९९.८८	१७.४९
एकूण	..	५७०.९६	१००

सहावी पंचवार्षिक योजना (१९८०–८१ ते १९८४–८५) : मे १९८० मध्ये पुनर्रचित भारतीय नियोजन आयोगाने राष्ट्रीय विकास परिषदेच्या विचारार्थ मार्गदर्शक तत्त्वांचा मसुदा तयार केला. ऑगस्ट १९८० मध्ये झालेल्या राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीत सहाव्या पंचवार्षिक योजनेची मुख्य उद्दिष्टे व आराखडा मंजूर करण्यात आला. राष्ट्रीय योजनेसाठी निर्धारित केलेल्या ध्येयधोरणानुसार महाराष्ट्राच्या सहाव्या पंचवार्षिक योजनेची ध्येयधोरणे निश्चित करण्यात आली. त्यानुसार विविध क्षेत्रातील स्थापित क्षमतेचा पूर्णत: वापर, स्वयंरोजगार निर्मिती, ग्रामीण भागातील जीवनमानात सुधारणा, कृषि व्यवसाय लाभप्रद करण्यास्तव बहुउद्देशीय दृष्टिकोनाचा अवलंब, या प्रमुख उद्दिष्टांची परिपूर्ती करण्याचे शासनाने ठरविले. तसेच कृषि क्षेत्रात विस्तार कार्यक्रमासाठी "बेनार" नामक दृष्टिकोन समोर ठेवून विकासाचा वेग वाढविण्याचे शासनाने ठरविले. त्यानुसार सहाव्या योजनेंतर्गत जिल्ह्यात विविध विकास कार्यक्रमांवर झालेला प्रत्यक्ष खर्च खालील-प्रमाणे होता.

विकास कार्यक्रम		प्रत्यक्ष खर्च (लाख रुपये)	एकूण खर्चाशी टक्केवारी
कृषि व संलग्न सेवा	..	१,०८४.९२	१९.६२
सहकार व सामूहिक विकास	..	५०.५१	०.९२
जलसिंचन व ऊर्जा	..	१,४५१.८८	२६.२६
उद्योग व खाणकाम	..	६७.६२	१.२३
वाहतूक व दळणवळण	..	४९२.९७	८.९२
सामाजिक सेवा	..	१,७७५.३१	३२.११
संकीर्ण	..	६०४.९६	१०.९४
एकूण	..	५,५२८.१७	१००

दुसरी वर्धा योजना[१४] : पहिली वर्धा योजना (१९६४–६६) विशेषतापूर्ण असली तरी ती अपेक्षाभंग करणारी ठरली व लवकरच मृतप्राय झाल्याचे कथन वर केले आहेच. अन्य जिल्ह्यांनी अनुकरण करावे इतपत ती योजना आदर्श ठरू शकली नाही. राहणीमान उंचावण्याचे इच्छित साध्यही प्राप्त होऊ शकले नाही. म्हणून या पार्श्वभूमीवर गांधीजींच्या विचारप्रणालीवर आधारित दुसरी योजना विकसित करण्याचा विचार पुढे आला. त्यानुसार योजनेस मूर्त स्वरूप देण्यासाठी योजना आयोगाने १९८१ मध्ये समिती नेमली. समितीने योजना आयोगाच्या नियंत्रणाखाली दुसरी वर्धा योजना तयार करण्यासाठी डॉ. एम. एस. स्वामीनाथन, सदस्य, योजना आयोग, यांच्या नियंत्रणाखाली उपगट स्थापन केला. उपगटाने १९८२ मध्ये योजनेबाबत आपला अहवाल तयार केला. त्यावर आधारित व गांधी विचारप्रणालीशी सुसंगत अशी योजना २ ऑक्टोबर १९८३ रोजी अस्तित्वात आली. या

[१४] **महात्मा गांधींच्या विचारप्रणालीवर आधारित वर्धा जिल्ह्याची योजना उपगटाचा अहवाल**, पूर्वोक्त.

योजनेद्वारे शासनाने या जिल्ह्यास विकासाच्या दृष्टीने आदर्श जिल्हा करण्याचे ठरविले आहे. जिल्ह्यातील सुमारे ६०,००० कुटुंबांना दारिद्र्य रेषेच्या वर आणणे, स्वावलंबन व सहभागाद्वारे सर्वांना काम व आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही योजनेची उद्दिष्टे ठरविण्यात आली. त्यानुसार शेती विकास कार्यक्रमात १४,०००; सुशिक्षित युवकांच्या शिक्षणात २,०००; लघु उद्योगात २,३००; ग्रामोद्योग कार्यक्रमात ११,०००; सेवा व्यवसाय कार्यक्रमात १६,४०० व प्रायोगिक स्वरूपाच्या नवीन योजनेत ८०० कुटुंबांना समाविष्ट करण्याबाबतचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

शासनाचा वीस कलमी कार्यक्रम लक्षात घेऊन पुढील सात वर्षांसाठी विकासाची उद्दिष्टे निर्धारित करण्यात आली. त्यानुसार सुमारे ५१,००० हेक्टर अतिरिक्त जमीन जलसिंचनाखाली आणणे, सुधारित बी-बियाण्यांद्वारे ज्वारीचे दर हेक्टरी उत्पादन १,२५० किलोवरून १,८०० किलोपर्यंत वाढविणे, डाळवर्गीय पिकांचे दर हेक्टरी उत्पादन ६५० किलोवरून ८५० किलोपर्यंत वाढविणे, बागायतीसाठी १०,५०० विहिरींचे बांधकाम हाती घेणे ७,००० जुन्या विहिरींची दुरुस्ती, २०,००० विहिरींवरील पंपांना विद्युतपुरवठा, फळ झाडांच्या लागवडीचे क्षेत्र ५,१०० हेक्टरवरून १०,९०० हेक्टरपर्यंत वाढविणे, ग्रामीण क्षेत्रात २१३ नवीन बालवाड्या सुरू करणे, जिल्हा रुग्णालयात १२५ अतिरिक्त खाटांची व्यवस्था करणे, रक्तपेढी सुरू करणे, १२० गावांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करणे, नागरी भागातील पाणीपुरवठा दरडोई ८० लिटरवरून १४० लिटरपर्यंत वाढविणे, जिल्ह्यातील २५ टक्के गावातील रस्ते व पूल बांधणे, १,००० लोकसंख्येचे प्रत्येक खेडे मुख्य रस्त्यास जोडणे, २,००० गोबर गॅस सयंत्र बसविणे, रेशीम उद्योग व कुटिरोद्योगांना प्रोत्साहन, इत्यादी बाबींचा योजनेत समावेश करण्यात आला आहे.

पुढील सात वर्षांत करावयाच्या कामासाठी योजनेसाठी १४४.०२ कोटी रुपयांची तरतूद अपेक्षित असून त्यात राज्य शासन ८५.७७ कोटी, केंद्र शासन ५.३४ कोटी, लाभार्थींचा वाटा १.६८ कोटी, स्थानिक ग्रामीण संस्था ०.८८ कोटी, स्थानिक नागरी संस्था ०.७६ कोटी, सहकारी बँका १०.१३ कोटी, व्यापारी बँका २८.९६ कोटी, खादी व ग्रामोद्योग महामंडळ ०.४६ कोटी आणि महामंडळांचे १०.०४ कोटी रुपयांचा समावेश आहे. सध्या जिल्हा नियोजन व विकास परिषद दरवर्षी सुमारे १० कोटी रुपये विविध विकासावर खर्च करते. हीच रक्कम दोन प्रतिशतने वाढवून येत्या ७ वर्षांत सुमारे ८५.७७ कोटी रुपये खर्च करण्यात येतील.

योजनेचा प्रारंभ सेवाग्राम व पिपरी या लघु पाणलोट क्षेत्रांच्या विकासाने करण्यात आला. विकासासाठी सेवाग्राम, नंदोरी, बरबडी, पिपरी, केळी, पांढरकवडा, महाकाळ, सारोडा व करताडा या गावांची निवड करण्यात आली आहे. सेवाग्राममधील ३०९ व पिपरीमधील ४८२ हेक्टर जमिनीत प्रथम काम सुरू होईल. यापैकी अनुक्रमे ३० व १५६ हेक्टर जमीन लागवडीयोग्य नसल्याने तेथे गवताची व फळझाडांची लागवड करण्यात येईल. तसेच गावामध्ये विहिरींची दुरुस्ती, नवीन विहिरी खोदणे, स्थानिक कारागिरांना उद्योगासाठी अर्थसहाय्य, गोबर गॅस सयंत्र बसविणे, सौर चुलींचे वाटप, पवनचक्क्या चालू करणे, सेवाग्रामला नाला ड्रेनिंगचे काम, आणि तेथील दारिद्र्यरेषेखालील ११५ कुटुंबांना उत्पन्न वाढविण्यासाठी साधनसामग्री पुरविणे इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

योजनेची अंमलबजावणी सुनियोजित करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीत लोकप्रतिनिधी, सेवाभावी संस्था, अधिकारी व पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. तसेच योजनेच्या कार्यवाहीसाठी अपर जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सातवी पंचवार्षिक योजना (१९८५–८६ ते १९८९–९०) : या योजनेत रोजगार निर्मिती, कृषि उत्पादकता वाढविणे व प्रादेशिक असमतोल दूर करणे ही मूलभूत उद्दिष्टे ठरविण्यात आलेली आहेत. सन १९८५–८६ व १९८६–८७ मध्ये विविध विकास कार्यक्रमांवर झालेला प्रत्यक्ष खर्च खालीलप्रमाणे आहे.

विकास कार्यक्रम	वर्ष	प्रत्यक्ष खर्च (लाख रुपये)	एकूण खर्चाशी टक्केवारी
कृषि व संलग्न सेवा ..	१९८५–८६	२२७.३६	२१.३४
	१९८६–८७	५०.२९	५.८८
सहकार व सामूहिक विकास	१९८५–८६	६.१३	०.५७
	१९८६–८७	१.९३	०.२३
सिंचन व ऊर्जा ..	१९८५–८६	२३१.६५	२१.७४
	१९८६–८७	१३७.३४	१६.०७
उद्योग व खाणकाम ..	१९८५–८६	१३.५४	१.२७
	१९८६–८७	११.६६	१.३६
वाहतूक व दळणवळण ..	१९८५–८६	३६.२८	३.४०
	१९८६–८७	८१.८३	९.५८
सामाजिक सेवा ..	१९८५–८६	३९६.१२	३७.१७
	१९८६–८७	५४९.६४	६४.३१
संकीर्ण ..	१९८५–८६	१५४.६८	१४.५१
	१९८६–८७	२१.९०	२.५७
एकूण ..	१९८५–८६	१,०६५.७६	१००
	१९८६–८७	८५४.५९	१००

विविध कल्याणकारी योजना

एकात्मीक ग्रामीण विकास योजना : ग्रामीण भागातील द्रारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे राहणीमान उंचावण्याकरिता ही योजना केंद्र व राज्य शासनांच्या पुरस्काराने राबविण्यात येत आहे. शासनाच्या वीस कलमी कार्यक्रमात या

योजनेचा तिसरा क्रमांक लागतो. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना अर्थसहाय्य देऊन स्वयं-रोजगाराद्वारे उत्पन्न वाढविण्याचे साधन उपलब्ध करून देणे हा योजनेचा प्रमुख उद्देश आहे. ही योजना जिल्ह्यातील राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी नागरी बँका, भूविकास बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व नोंदणीकृत सहकारी पतपुरवठा संस्थांच्या सहकार्याने जिल्हा पातळीवर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास संस्था, यांचेमार्फत तर तालुका पातळीवर पंचायत समित्यांचे गटविकास अधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येते. जिल्ह्यात ही योजना कृषि विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि उद्योग व सेवा विभागांतर्गत राबविण्यात येत आहे.

मदतीस पात्र कुटुंबाला ज्या प्रकारचा व्यवसाय करावयाचा असेल त्यासाठी कर्ज मिळण्यास्तव ग्रामसेवक व गटविकास अधिकाऱ्यांमार्फत बँकेकडे अर्ज करावा लागतो. बँकेकडून अर्जदार लाभार्थींना कर्ज मंजूर करण्यात येते. लाभार्थीस बँकेने कर्ज मंजूर केल्यावर त्यावर जिल्हा ग्रामीण विकास संस्थेकडून अनुदान देण्यात येते. अनुदानाची रक्कम बँकेने मंजूर केलेल्या कर्जातून वजा करता उर्वरित रकमेची लाभार्थीने ठराविक हप्त्यात परतफेड करावयाची असते. सध्या अनुदानाची रक्कम खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेली आहे.

अल्पभूधारक—२५ टक्केप्रमाणे व जास्तीत जास्त रु. ३,०००.

अत्यल्प भूधारक शेतमजूर—३३$\frac{1}{3}$ टक्केप्रमाणे व जास्तीत जास्त रु. ३,०००.

आदिवासी लाभार्थी—५० टक्केप्रमाणे व जास्तीत जास्त रु. ५,०००.

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील १८ ते ३५ वयोगटातील तरुणांना वेगवेगळ्या व्यवसायांचे प्रशिक्षण देऊन स्वतंत्र व्यवसाय सुरू करून देण्यात येतो किंवा प्रशिक्षितांना नोकरीही करता येते. प्रशिक्षण काळात लाभार्थींना ठराविक रक्कम देण्यात येते. ग्रामीण भागात आवश्यक असलेले प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येतात.

ही योजना राबविण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण ही संस्था (डिस्ट्रिक्ट रूरल डेव्हलपमेंट एजन्सी) ६ ऑगस्ट १९८१ रोजी पंजीबद्ध झाली. प्रारंभी अभिकरणाच्या नियंत्रण समितीचा अध्यक्ष जिल्हाधिकारी होता, तसेच नियोजन अधिकारी प्रकल्पाधिकारी होता. अभिकरणासाठी वेगळा कर्मचारीवर्ग नेमला नव्हता, त्यामुळे जिल्हाधिकाऱ्याच्या देखरेखीखाली योजना राबविण्यात येत होती. एप्रिल १९८२ मध्ये अभिकरणाच्या नियंत्रण समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली. तद्वतच गटविकास अधिकाऱ्यास पंचायत समिती पातळीवरील योजना राबविणारा अधिकारी म्हणून जबाबदार ठरविण्यात आले. योजनेचा पंचायत समिती स्तरावरील प्रथम आराखडा १९८२–८३ मध्ये तयार झाला. सन १९८२–८३ मध्ये जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणाचे स्वतंत्र कार्यालय स्थापन करून त्यासाठी प्रकल्पाधिकारी व सहाय्यक प्रकल्पाधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. या कार्यालयामार्फत जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या याद्या तयार करण्यात आल्या. अशा कुटुंबांची संख्या ५३,७५८ नोंदविण्यात आली, त्यापैकी अनुसूचित जातींची १४,८४० व अनुसूचित जमातींची २०,८३० कुटुंबे होती. ही योजना राबविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान देण्यात येते. योजनेची प्रगती पुढील आकडेवारीवरून दिसून येईल:

(लाख रुपये)

वर्ष	उपलब्ध निधी	खर्च	प्रत्यक्ष लाभार्थी		अनुसूचित जातींचे लाभार्थी		अनुसूचित जमातींचे लाभार्थी		बँकेतर्फे कर्ज वाटप
१९८१–८२ ..	उ. ना.	२६.२९	४,३४१		७८५		१,५१२		५६.२२
१९८२–८३ ..	५७.५१	५७.०७	४,४४१		उ. ना.		उ. ना.		१५१.९२
१९८३–८४ ..	७८.८४	७५.८३	६,१९६		१,३५५		१,६३२		१७५.२४
१९८४–८५ ..	१०९.९६	९१.२४	५,९५४		१,२५९		१,३५७		१५६.६३
			नवीन	जुने	नवीन	जुने	नवीन	जुने	
१९८५–८६ ..	७९.७३	६८.६९	३,१९१	३९४	८४६	११९	५९५	७८	१११.६६
१९८६–८७ ..	१०६.११	८१.६९	२,९३१	१,६१७	७५७	५१३	५८१	२९२	१२७.८०
१९८७–८८ ..	१३३.३६	१३१.७३	३,५९८	२,०२१	९७१	६५९	७२४	४९७	१९६.३२
१९८८–८९ ..	९४.८३	१०२.०४	२,८४८	८८६	७६०	२८६	५५५	२०७	१२१.१६

ही योजना राबविण्यासाठी बँकेमार्फत वित्त पुरवठा केला जातो. बँकेने मंजूर केलेले कर्ज व लाभार्थींना द्यावयाचे आर्थिक सहाय्य लाभार्थीस वस्तूरूपाने दिले जाते. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना नवीन विहिरी खोदणे, जुन्या विहिरींची दुरुस्ती, इलेक्ट्रिक मोटार व पंपसंच, ऑईल इंजिन, पाईप लाईन, सामुदायिक उपसा जलसिंचन, पीक प्रात्यक्षिके, जमीन सुधारणा, रासायनिक खते, अवजारे, साठवण पात्रे, दुभती जनावरे, शेळ्यामेंढ्या, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, ग्रामीण तरुणांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण, छोटे उद्योगधंदे वगैरेसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते. योजना सामूहिक रीतीने राबविण्यात येते.

सहाव्या पंचवार्षिक योजनेत या कार्यक्रमाकरिता प्रत्येक पंचायत समितीमधील दारिद्र्यरेषेखालील ३,००० कुटुंबांना ३५ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले. शिवाय या रकमेच्या दुप्पट रक्कम बँकांकडून कर्जरूपाने आर्थिक मदत देण्यात आली.

रोजगार हमी योजना : ग्रामीण भागातील अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर व बेरोजगारांना उत्पादक रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ही योजना १९७२ मध्ये सुरू केली. मे १९७२ मध्ये ही योजना वर्धा जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात कार्यान्वित करण्यात आली. तथापि १९७१–७२ ते १९७३–७४ या कालावधीतील दुष्काळी परिस्थितीमुळे योजना तात्पुरती स्थगित करावी लागली. योजनेची उपयुक्तता लक्षात घेऊन २० डिसेंबर १९७४ रोजी शासनाने राज्य विधानमंडळात ठराव संमत करून ग्रामीण भागातील प्रत्येक प्रौढास भारतीय संविधानातील राज्य धोरणाच्या निदेशक तत्त्वानुसार कामाचा कायदेशीर हक्क प्राप्त करून दिला. योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी उभारणे व साधनसंपत्ती वाढविण्यासाठी शासनाने १९७५ च्या महाराष्ट्र राज्य व्यावसायिक, व्यापारी व रोजगार अधिनियमानुसार व्यावसायिक, व्यापारी व कामगारांवर १ एप्रिल १९७५ पासून कर बसविला. सन १९७७ मध्ये महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम मंजूर करून या योजनेला सांविधिक स्वरूप देण्यात आले. या अधिनियमाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९७९ पासून सुरू झाली. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४१ नुसार रोजगाराचा कायदेशीर अधिकार प्राप्त करून देणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे.

जिल्हाधिकारी योजनेचा सर्वाधिकारी असतो. योजनेखालील कामासाठी उपयोजना तयार करून मुख्य जिल्हा योजनेशी त्याने सांगड घालावयाची असते. ही जिल्हा पातळीवरील योजना असल्यामुळे तिच्यासाठी जिल्हा नियोजनामध्ये तरतूद केली जाते. योजनेखाली सुरू करावयाची कामे केवळ उत्पादक स्वरूपाची नसतात, तर बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणे हा प्रमुख हेतू असतो. ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करण्याचा उद्देश असल्याने कामाच्या एकूण खर्चाच्या साठ टक्के रक्कम मजुरीवरच खर्च केली जाते. उर्वरित रक्कम साहित्यावर खर्च केली जाते. राहण्याच्या ठिकाणापासून शक्यतो जवळ काम देण्याचा प्रयत्न केला जातो. मजुरांच्या मजुरीसाठी किमान वेतन तत्त्वाचा अवलंब करून शेतीकाम व उत्पादनावर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्यात येते. सर्वसाधारणपणे सात तासांच्या कामास सहा रुपये मजुरी दिली जाते. अलीकडे मजुरीच्या दरात वाढ करण्यात आली आहे.

रोजगार देणे शक्य नसल्यास योजनेच्या फंडातून प्रतिदिनी एक रुपया याप्रमाणे रोजगार भत्ता मिळण्यास अर्जदार व्यक्ती पात्र ठरते. पन्नास व्यक्तींनी कामाची मागणी केल्यास नवीन काम सुरू करता येते.

योजनेखाली लघुपाटबंधारे, पाझर तलाव, सामूहिक विहिरी, मृद संधारण, भूविकास, वनविकास व रस्ते विकासाची कामे केली जातात. रोजगार हमी योजनेखाली पुरविलेले काम व दुष्काळ निवारण योजनेखाली पुरविलेले काम यामध्ये फरक असतो. कारण रोजगार हमीखालील काम उत्पादक स्वरूपाचे व सामाजिक मालमत्ता निर्माण करण्याचे असते. सन १९७४–७५ ते १९८६–८७ पर्यंतची जिल्ह्यातील मंजूर कामे, पूर्ण झालेली कामे व त्यावरील खर्च खालीलप्रमाणे होता.[१५]

(लाख रुपये)

काम	मंजूर कामे	पूर्ण झालेली कामे	चालू स्थितीतील कामे	खर्च	
				मंजुरी	खर्च
पाटबंधारे—					
मोठे	..	..	..		
मध्यम	..	..	..		
लघु	८४	२७	९		
मृद संधारण	२,४४१	२,३१२	५२		
भूविकास	२४९	२२५	..		
वन विकास	२८४	२०१	३४	१,६६४.४९	९९४.०८
रस्ते विकास व सार्वजनिक बांधकाम—					
रस्ते	२०४	१०३	२२		
नगरपालिका	..	..	..		
ग्रामीण गृहनिर्माण	..	..	..		
इतर कामे	..	..	..		
एकूण	३,२६२	२,८६८	११७	१,६६४.४९	९९४.०८

[१५] जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडून प्राप्त झालेली माहिती.

या योजनेखाली पाटबंधारे विकास, मृद संधारण, भूविकास, वनविकास, रस्ते विकास, व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामावर १९७९–८० पासून झालेला खर्च, निर्माण झालेले श्रमदिन व मजुरांच्या उपस्थितीची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष	खर्च	निर्मित श्रमदिन (लाख)	दैनिक सरासरी मजुरी (रुपये)	कामगारांची उपस्थिती		
				कमाल	किमान	मासिक सरासरी
१९७९–८०	९१.१९	२१.१८	४.३०	१४,६१३	१,४३९	७,०६०
१९८०–८१	१२९.६०	१९.२८	६.७२	१०,६३२	२,००५	६,४२५
१९८१–८२	१७८.१२	२२.७०	७.८४	१३,५७७	३,१७४	७,५६८
१९८२–८३	१३९.७७	१३.२४	१०.५५	८,८८५	१,८८३	४,४१२
१९८३–८४	९६.९७	६.४०	१५.१५	५,१०७	४७५	२,१३४
१९८४–८५	१११.१६	१०.२०	१०.८९	५,९८७	१,७४०	३,४००
१९८५–८६	१४३.९७	१०.९६	१३.१३	४,९४३	२,८७६	३,६५४
१९८६–८७	८३.९१	६.९३	१२.१०	५,१८४	१,४०१	२,३०९

या योजनेखाली मागासवर्गीय मजुरांची जिल्ह्यातील एकूण मजुरांशी टक्केवारी खालीलप्रमाणे होती.[१६]

वर्ष		मागासवर्गीय मजूर	मागासवर्गीय मजुरांची टक्केवारी	महिला मजूर	महिला मजुरांची टक्केवारी
१९७९–८०	..	४,६३०	५५ टक्के	३,२००	४० टक्के
१९८०–८१	..	३,५२०		२,५६०	
१९८१–८२	..	४,१५८		३,०२४	
१९८२–८३	..	२,४२०		१,७६०	
१९८३–८४	..	१,१५५		८४०	
१९८४–८५	..	१,८७०		१,३६०	
१९८५–८६	..	१,६५०		१,२००	
१९८६–८७	..	१,२६५		९२०	

[१६] जिल्हाधिकारी, वर्धा.

ही रोजगाराभिमुख समाजकल्याण योजना अत्यंत उपयुक्त असल्याचे दिसते. कृषि हंगामातील चढउतारानुसार मोठ्या संख्येने बेरोजगार लोक योजनेचा लाभ घेतात.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम : केंद्र सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम कार्यान्वित केला आहे. त्यावरील खर्चाचा ५० टक्के भाग केंद्र सरकारकडून मिळतो. केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार या कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना त्यापासून ग्रामीण भागात रोजगार निर्माण करण्याबरोबरच लोकांची आर्थिक स्थिती सुधारणे अथवा ग्रामीण जीवनाचा विकास करण्यासाठी कायम स्वरूपाची सार्वजनिक मालमत्ता निर्माण करण्याकडे विशेष लक्ष देण्यात येते.

महाराष्ट्रामध्ये रोजगार हमी अधिनियम १९७७ अनुसार ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे हे उद्दिष्ट साध्य होत असल्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमाचा उपयोग रोजगार हमी योजनेला पूरक कार्यक्रम म्हणून केला जात होता. परंतु राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमाखाली प्रत्यक्षपणे ग्रामीण जीवनाचा दर्जा सुधारण्यास्तव आवश्यक अशी स्थायी स्वरूपाची मालमत्ता निर्माण करावयाची असल्याने हा कार्यक्रम रोजगार हमी योजनेपासून अलग करण्याचे ठरले. त्यानुसार सप्टेंबर १९८२ मध्ये शासनाने आदेश काढून केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार हा कार्यक्रम कार्यान्वित केला. सन १९८२–८३ पासून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेची अंमलबजावणी जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणाकडे सोपविली आहे.

या कार्यक्रमातील निधीचे जिल्हावार वाटप केंद्र सरकारने विहित केलेल्या तत्त्वानुसार करण्यात येते. त्यानुसार ७५ टक्के वाटप जिल्ह्यातील शेतमजूर व सीमान्तिक शेतकऱ्यांचे प्रमाणात व २५ टक्के वाटप दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येच्या प्रमाणात अथवा, त्याबद्दल माहिती उपलब्ध नसल्यास, अनुसूचित जाती-जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात केले जाते. कार्यक्रमाच्या तरतुदीमधील १० टक्के रक्कम अनुसूचित जाती व जमातींच्या प्रत्यक्ष लाभार्थी योजनांसाठी राखून ठेवली जाते. उरलेली ९० टक्के रक्कम ग्रामपंचायतींच्या विकास कार्यासाठी असते. त्याकरिता ग्रामसभांनी सुचविलेल्या कामांनाच पंचायत समिती मंजुरी देते. प्रत्येक कामासाठी लागणारे साहित्य व मजुरीवरील खर्चाचे प्रमाण ४० : ६० असे विहित केले होते, त्यात बदल करून सध्या ५० : ५० प्रमाणात खर्च केला जातो.

या योजनेखालील मजुरांना नेहमीच्या शिधा पुरवठ्याशिवाय एक किलो धान्य दिले जाते. सवलतीच्या दराने धान्य उपलब्ध करून देण्याची योजना आता केंद्राने कार्यान्वित केली आहे. त्याप्रमाणे मजुरांना प्रत्येक दिवसाच्या कामासाठी दरडोई एक किलो गहू सवलतीच्या दराने दिला जातो.

कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामपंचायतीस शासनाचा प्रतिनिधी समजण्यात येते. कामाचे अंदाज व आराखडे गटपातळीवरील संबंधित अधिकाऱ्याकडून तयार करून पंचायत समित्यांची मंजुरी घ्यावी लागते. सामाजिक वनीकरण योजना आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या प्रत्यक्ष लाभाच्या योजनांची अंमलबजावणी जिल्हा पातळीवरील फलोत्पादन व सामाजिक वनीकरण विभाग आणि जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकाऱ्यामार्फत करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत झालेल्या खर्चाचा तपशील पुढे दिला आहे.[१७]

---

[१७] प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वर्धा यांचेकडील माहिती.

(लाख रुपये)

बाब	ग्रामपंचायतीची कामे		सामाजिक वनीकरण		अनुसूचित जाती व जमातीसाठी घरकुलांचे बांधकाम		आस्थापना खर्च	
	१९८५–८६	१९८६–८७	१९८५–८६	१९८६–८७	१९८५–८६	१९८६–८७	१९८५–८६	१९८६–८७
शासकीय अनुदान ..	५४.९२	५०.९६	१६.२८	२०.४०	६.४६	६.४९	३.४२	४.०८
जिल्हा ग्रामीण विकास संस्थेचे अनुदान ..	४८.००	३६.७५	४.११	२०.५०	४.१०	३.९४	..	..
रोख रक्कम ..	६७.३६	..	१७.६१	..	११.२५	..	५.२८	..
एकूण खर्च ..	५२.७६	६१.४९	७.७६	२३.०१	१.१२	७.८३	२.७८	२.७०
श्रमदिन निर्मिती ..	३.४८	३.२५	०.६२	१.३८	०.०८	०.५१	..	..

राष्ट्रीय ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम : प्रत्येक भूमिहीन कुटुंबातील कमीत कमी एका माणसाला वर्षातून १०० दिवस रोजगाराची हमी देण्यासाठी, रोजगाराची उपलब्धता वाढविण्यासाठी व ग्रामीण भागाच्या विकासासाठी स्थायी स्वरूपाची मालमत्ता निर्माण करण्यास्तव १०० टक्के केंद्रपुरस्कृत असलेला राष्ट्रीय ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम सबंध देशात १५ ऑगस्ट १९८३ ला सुरू झाला. ग्रामीण विकासाच्या या कार्यक्रमात जोड रस्ते, उपलब्ध जलसिंचनाचा पुरेपूर उपयोग, भूविकास, सामाजिक वनीकरण, मृद संधारण, लहान पाटबंधारे व भूमिहीनांसाठी घरकुले बांधणे इत्यादींचा अंतर्भाव आहे. या कार्यक्रमाची तत्त्वप्रणाली बहुतांशी महाराष्ट्र राज्याच्या रोजगार हमी योजनेप्रमाणेच आहे. या दोन्ही योजनांच्या कार्यवाहीमध्ये समन्वय साधण्यात आला आहे. यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारांना उत्पादक रोजगार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झालेला आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यात १९८५ ते जानेवारी १९८८ पर्यंत ग्रामीण भूमिहीनांसाठी ४५१ घरकुले बांधण्यात आली.

ट्रायसेम योजना : महाराष्ट्रात ही योजना १९८१–८२ मध्ये सुरू करण्यात आली. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील १८ ते ३५ वयोगटातील कामगारांना अर्थार्जनाचे पुरेसे साधन उपलब्ध करून देण्यासाठी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमात या योजनेचा समावेश करण्यात आला. याद्वारे शासकीय, निमशासकीय अथवा खाजगी संस्थांमार्फत प्रशिक्षणार्थींस स्वयंरोजगाराच्या विविध उद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील एकच व्यक्ती फक्त एका व्यवसायातील प्रशिक्षणासाठी पात्र असते. प्रशिक्षणासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या महिलांना प्राधान्य दिले जाते. प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांचा असून प्रशिक्षणार्थींस दरमहा ७५ ते २०० रुपये विद्यावेतन दिले जाते. तसेच उपकरण खरेदीसाठी २५० रुपयापर्यंत अर्थसहाय्य दिले जाते. प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस जिल्हा ग्रामीण विकास संस्थेकडून प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम मंजूर करून घ्यावा लागतो. प्रशिक्षणार्थींची निवड गटविकास अधिकाऱ्यां-मार्फत केली जाते. प्रशिक्षणानंतर लाभार्थींस स्वयंउद्योग सुरू करण्यासाठी उद्योग-सेवा-व्यापार योजनेखाली बँकांकडून प्रकल्प खर्चाच्या $\frac{2}{3}$ कर्ज व जिल्हा ग्रामीण विकास संस्थेकडून $\frac{1}{3}$ अनुदान देण्यात येते. वर्धा जिल्ह्यातील लाभार्थींची संख्या खाली दिलेली आहे.[१८]

वर्ष	प्रशिक्षित लाभार्थी				अर्थसहाय्य दिलेले लाभार्थी			
	एकूण	अनुसूचित जाती	अनुसूचित जमाती	महिला	एकूण	अनुसूचित जाती	अनुसूचित जमाती	महिला
१९८२–८३	२२३	७०	२७	१०१	१३२	४९	१८	४९
१९८३–८४	२८४	७५	२३	८३	१५३	५३	१८	१२
१९८४–८५	३३४	४०	३६	८०	१७०	५३	२३	९२
१९८५–८६	३५७	११५	५८	९८	१६०	६३	१८	४८
१९८६–८७	२१९	७९	२१	५९	८०	२५	९	४०
१९८७–८८	२३३	१०३	२६	६८	२८	१५	१	१०

[१८] प्रकल्प संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणा, वर्धा.

भारत सरकारने सातव्या योजनेत प्रत्येक गटातून ४० युवकांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठरवून दिलेले असून त्यासाठी युवकांची निवड करून त्यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खादी व ग्रामोद्योग केंद्र, तांत्रिक शाळा इत्यादी ठिकाणी प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले. जिल्ह्यात एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. या केंद्रात प्रारंभी ६० प्रशिक्षणार्थींची व्यवस्था असून पुढे ती १२० पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव आहे. सन १९८६–८७ मध्ये ६८ टक्के युवकांना प्रशिक्षण देण्यात आले.

भूमिहीनांसाठी घरबांधणी योजना : ही योजना शासनाने १९७४–७५ मध्ये सुरू केली. त्यानुसार किमान गरजा कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ग्रामीण भागामध्ये भूमिहीन व गृहहीन शेतमजूर व कारागिरांना ९.२९ चौरस मीटरचा भूखंड निशुल्क देण्यात येतो. घरकुलासाठी लागणारी सामग्री शासनाकडून मूळ किमतीत पुरविली जाते. मूळ योजनेत सुधारणा करून दहा वर्षे टिकणारी अर्धपक्की घरकुले बांधण्यासाठी ६,००० रुपयांपर्यंत खर्चास मंजुरी दिली. योजनेच्या प्रारंभापासून जिल्ह्यात राजस्व विभागाकडून बांधलेल्या घरकुलांची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		प्रत्येक घरकुलाचा खर्च (रुपये)	घरकुले (संख्या)		एकूण खर्च (रुपये)
			नवीन बांधणी	पुनर्बांधणी	
१९७४–७५	..	१५०	१,००४	..	१,५०,६००
१९७५–७६	..	३२०	३,४९३	..	११,१७,७६०
१९७६–७७	..	३५०	३,२७१	..	११,४४,८५०
१९७७–७८	..	७५०	३३६	..	२,५२,०००
१९७८–७९	..	१,३००	१००	..	१,३०,०००
१९७९–८०	..	१,३००	७३५	..	९,५५,५०
१९८०–८१	..	१,७००	४२७	६००	१७,४५,९००
१९८१–८२	..	१,७००	३८१	४०४	१३,३४,५००
१९८२–८३	..	१,७००	..	१,००७	१७,११,९००
१९८३–८४	..	२,७००	२८	८०५	२२,४९,१००
१९८४–८५	..	२,७००	८००	४४	२२,७८,८००
१९८५–८६	..	६,०००	२५०	..	१५,००,०००
१९८६–८७	..	६,०००	६००	..	३६,००,०००
१९८७–८८	..	..	४००	..	२१,९६,१०५
एकूण	..	..	११,८२८	२,८६०	२०३,६७,०१५

उपरोक्त घरकुलांव्यतिरिक्त इतर योजनांखाली पुढीलप्रमाणे घरे बांधण्यात आली.[१९]

कार्यक्रम	बांधलेली घरकुले	मार्च १९८६–डिसेंबर १९८७ कालावधीत बांधलेली घरकुले
ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम	३००	१२०
राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम	१५१	६१

सुशिक्षित बेकारांना अंशकालीन आर्थिक सहाय्य योजना : ही योजना १ जानेवारी १९७९ पासून महाराष्ट्रात सुरू करण्यात आली. या योजनेच्या पहिल्या भागात पदवीधर व शालांत परीक्षेनंतर पदविका धारण केलेल्या उमेदवारांना अंशकालीन काम मानधन तर दुसऱ्या भागात शालांत परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना नोकरी मिळविण्यासाठी येणारा खर्च भरून काढण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याचा समावेश आहे. सेवायोजन कार्यालय अथवा समाजकल्याण अधिकाऱ्याकडे नाव नोंदणीचा कालावधी तीन वर्षांचा असावा लागतो. उमेदवारास महिन्यातून १५ दिवस काम देण्यात येते. त्यासाठी त्याला तीन वर्षांपर्यंत दरमहा १०० रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येते. योजनेच्या दुसऱ्या भागातील सहाय्यास पात्र उमेदवार महाराष्ट्रातून शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेला असून २१ ते ३० वयोगटातील असावा लागतो. सेवायोजन कार्यालय अथवा समाज कल्याण अधिकाऱ्याकडे तीन वर्षांपूर्वी नोंदणी अत्यावश्यक असते. उमेदवारास उपरोक्त प्रयोजनार्थ १०० रुपये दोन वार्षिक हप्त्यात देण्यात येतात. योजनेची अंमलबजावणी जिल्हाधिकारी व तहसीलदारांकडे सोपविण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेतलेल्या उमेदवारांची आकडेवारी खाली दिली आहे.[२०]

वर्ष	पहिला भाग		दुसरा भाग	
	लाभधारक	झालेला खर्च (रुपये)	लाभधारक	झालेला खर्च (रुपये)
१९८१ ..	३८७	२,४८,६३५	१,८११	१,३४,६००
१९८२ ..	३३८	३,८८,६७७	२,२३३	२,३४,३५०
१९८३ ..	३०४	३,२९,९८३	२,४५०	१,४६,१५०
१९८४ ..	४३४	२,३८,८३०	२,६४७	१,६१,८५०
१९८५ ..	५३१	१,९३,७६१	३,२२१	२,३५,०००

[१९] जिल्हाधिकारी, वर्धा.

[२०] सेवायोजन अधिकारी, वर्धा.

रोजगार उत्तेजन कार्यक्रम (प्रशिक्षण) योजना : सुशिक्षित बेकारांसाठी १९७५–७६ पासून शासनाने ही योजना सुरू केली. व्यवसायाच्या प्रशिक्षणाद्वारे उमेदवाराची पात्रता वाढवून रोजगार उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. प्रशिक्षण सहा महिन्यांचे असून शासनातर्फे शैक्षणिक पात्रतेनुसार दरमहा १०० रुपयांपासून ४०० रुपयापर्यंत विद्यावेतन देण्यात येते. खाजगी क्षेत्रातील उद्योजकांकडे व शासकीय नियंत्रणाखालील आस्थापनातून प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देण्यात येते. सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणीकृत उमेदवारांमधून प्रशिक्षणार्थी उद्योजकांकडे पाठविण्यात येतात. जिल्ह्यातील योजनेच्या प्रारंभापासून लाभार्थींची आकडेवारी खाली दिली आहे.[२१]

वर्ष	लाभार्थी	वर्ष	लाभार्थी
१९७५–७६	१८१	१९८०–८१	१०८
१९७६–७७	९१	१९८१–८२	१२८
१९७७–७८	११२	१९८२–८३	१२३
१९७८–७९	१६४	१९८३–८४	९४
१९७९–८०	१८८	१९८४–८५	१२५

संजय गांधी निराधार अनुदान योजना : समाजातील असहाय्य दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासनाने २ ऑक्टोबर १९८० पासून ही योजना सुरू केली. वृद्धत्व, अपंगत्व किंवा असाध्य रोगांमुळे उदरनिर्वाह करू न शकणाऱ्यांसाठी ही योजना आहे. दहा वर्षाखालील मुले पोसण्याची जबाबदारी असलेल्या विधवांनाही सहाय्य देण्यात येते. पात्र व्यक्तीस दरमहा ६० रुपये मदत देण्यात येते. जिल्ह्यात खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात आले.[२२]

वर्ष		व्यक्ती	अर्थसहाय्य (रुपये)
१९८०–८१	..	३,५९३	२३,९१,८२०
१९८१–८२	..	४,९७४	३०,४८,३८७
१९८२–८३	..	६,३६८	४९,४५,६३७
१९८३–८४	..	७,२४३	५१,७९,१६२
१९८४–८५	..	७,१९३	४५,९६,३४०
१९८५–८६	..	७,१९१	५४,०७,२३८
१९८६–८७	..	७,०४३	५३,२१,०१८

[२१] सेवायोजन अधिकारी, वर्धा.

[२२] जिल्हाधिकारी, वर्धा.

संजय गांधी स्वावलंबन योजना : दुर्बल घटकातील व्यक्तींना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध व्हावे, तसेच व्यवसाय करता यावा या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने २ ऑक्टोबर १९८० पासून राज्यात ही योजना सुरू केली. पात्र लाभार्थीस तारणा-शिवाय २५,००० रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्याची तरतूद आहे. नियमित नोकरी करणारी एकही व्यक्ती नसलेल्या कुटुंबांना अग्रक्रम देण्यात येतो. जिल्ह्यातील लाभार्थींची आकडेवारी खाली दिली आहे.[२३]

वर्ष		लाभार्थी	कर्जवाटप (रुपये)
१९८०–८१	..	८५७	१५,९३,२७१
१९८१–८२	..	७१२	७,६०,१२०
१९८२–८३	..	७५९	८,९७,७५०
१९८३–८४	..	१०३	४७,४००
१९८४–८५	..	१,९५३	७,७४,६५०
१९८५–८६	..	३९२	३,०७,६००
१९८६–८७	..	४७९	४,२५,५००

श्रमजीवी कुटुंबकल्याण योजना : अपघाती मृत्यू अथवा कायम अपंगत्व आलेल्या व्यक्तींना आर्थिक सहाय्य देण्यासाठी १ ऑगस्ट १९८२ पासून महाराष्ट्र शासनाने वरील योजना सुरू केली. वार्षिक उत्पन्न ६,००० रुपयांपर्यंत असलेल्या कुटुंबांना सहाय्य दिले जाते. शेतमजूर, हमाल, घरगडी, हातगाडीवाले, विडी कामगार, चर्मकार व रिक्षावाल्यांना लाभ घेता येतो. जिल्ह्यात १९८६–८७ पर्यंत ५७ व्यक्तींना १,१३,००० रुपयांचे वाटप करण्यात आले.[२४]

भारतीय विकास लोक कार्यक्रम[२५] भारतीय विकास लोक कार्यक्रम (पीपल्स अ‍ॅक्शन फॉर डेव्हलपमेंट) हा केंद्र सरकारचा एक आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आहे. माणसासाठी समतोल व सकस आहार या विचारातून १९६० मध्ये जागतिक अन्न व कृषि संघटनेने भूकमुक्ती मोहीम सुरू केली. त्यावेळी भारतात या कार्यक्रमाचे बीज रोवले गेले. विकसित राष्ट्रांनी तिसऱ्या जगतातील राष्ट्रांना अन्नधान्य उत्पादन वाढीच्या कार्यक्रमात सहाय्य करावे असा मोहिमेचा उद्देश होता. कालांतराने १९७३ मध्ये या कार्यक्रमाचे स्वरूप व्यापक करून त्याचे भारतीय विकास लोक कार्यक्रम असे सरकारने नामकरण केले. नोंदणीकृत सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून ग्रामविकास प्रकल्प राबविले जातात. विकास कार्य अधिक गतीमान करण्यासाठी लोकांचा सहभाग मिळवला जातो.

[२३] जिल्हाधिकारी, वर्धा.

[२४] कित्ता.

[२५] **भारतीय विकास लोक कार्यक्रमाची १० वर्षे** (महाराष्ट्र शासन, मुंबई).

शेती, पशुधन, मत्स्योद्योग, कुक्कुटपालन, लघु पाटबंधारे, सामाजिक वनीकरण, ग्रामीण उद्योग, ग्रामीण आरोग्य, ग्रामीण रोजगार योजना, व्यवसाय प्रशिक्षण, महिला व बाल विकास, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता, रोजगार हमी कार्यक्रम, अनुसूचित जाती व जमातींच्या लाभधारकांना सहाय्य, घरकुल बांधणी, वेठबिगारी निर्मूलन, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम इत्यादींसाठी केंद्र सरकारकडून आर्थिक सहाय्य प्राप्त होते. वर्धा जिल्ह्यातील कार्यक्रमाची माहिती खाली दिलेली आहे.

शेतीसुधार प्रकल्प : हा प्रकल्प १९१४ मध्ये स्थापन झालेल्या मारवाडी शिक्षा मंडळ (विद्यमान शिक्षा मंडळ, वर्धा) या संस्थेद्वारे राबविण्यात येत आहे. यासाठी भा.वि.लो.क. समितीने ८०,००० रुपयांचे सहाय्य मंजूर केले आहे. संस्थेच्या ४०.४६ हेक्टर जमिनीपैकी १२.१४ हेक्टर जमीन प्रकल्पासाठी व रोपवाटीकेसाठी उपयोगात आणण्यात यावयाची आहे.

ग्रामविकास सुधारणा : आमगावच्या कृषि विकास संस्थेतर्फे हे कार्य करण्यात येत आहे. आमगाव परिसरातील अल्प व अत्यल्प भूधारकांना शेती उत्पादन वाढीसाठी भा.वि.लो.क. राज्य समितीने ९४,००० रुपयांचे अर्थसहाय्य दिलेले आहे. त्यातून संस्थेने प्रात्यक्षिक क्षेत्र निर्मिती, उपसा जलसिंचन योजना व बी-बियाणे वितरण हाती घेतले आहे. या कामासाठी संस्थेने काही गावे दत्तक घेतली आहेत.

आधुनिक तंत्राद्वारे उत्पादन वाढ : जिल्ह्यातील कानगाव परिसरातील अल्पभूधारक शेतकऱ्यांत आधुनिक शेती तंत्राचा प्रसार करून त्यांना उत्तम बी-बियाणे व रोपटी पुरविण्यासाठी ही योजना सदाराम पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठानने हाती घेतली. त्यासाठी भा.वि.लो.क.तर्फे ५०,००० रुपयांचे सहाय्य देण्यात आले. योजनेसाठी प्रतिष्ठानने कानगाव दत्तक घेतले आहे. प्रतिष्ठानच्या ८.०९ हेक्टर जमिनीपैकी ४.०४ हेक्टर जमिनीवर विविध जातींच्या कापसाचे बी व उर्वरित ४.०४ हेक्टरमध्ये संकरित ज्वारीच्या बियाण्याचे उत्पादन केले जाते.

कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी शेती प्रशिक्षण योजना : दत्तपूरच्या कुष्ठरोग निवारण संस्थेने ही योजना हाती घेतली असून भा.वि.लो.क. समितीने संस्थेला १०० रुग्णांचे शिक्षण व पुनर्वसनासाठी ५०,००० रुपयांचे सहाय्य दिले आहे. कृषि प्रात्यक्षिकेही आयोजित केली जातात.

भूमिहीन किसान मजूर संस्था व संघटन विकास केंद्र : ग्रामीण भागातील शेतमजूर व भूमिहीन लोकांना संघटित करून त्यांच्या कलेचा व श्रमाचा उपयोग करण्याचे कार्य भूमिहीन किसान मजूर विकास केंद्र करीत आहे. संस्थेने जिल्ह्यात हाती घेतलेल्या एका प्रकल्पाचा लाभ अदमासे ३,००० लोकांना होईल असे प्रस्तावित आहे. केंद्र समितीने त्यासाठी संस्थेला ३,०९,४०० रुपयांची आर्थिक मदत दिलेली आहे.

शेती फलोद्यान विकास कार्यक्रम : सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानने १४.५६ हेक्टर जमिनीत फलोद्यान विकास कार्यक्रम राबविण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यासाठी प्रतिष्ठानला भा.वि.लो.क.तर्फे ७०,००० रुपयांचे सहाय्य देण्यात आलेले आहे.

किंमती व भावपातळी

या जिल्ह्यातील किंमतीबाबतची माहिती १८५५ पासून उपलब्ध आहे. तत्पूर्वीची विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही. जिल्ह्याचा जमाबंदी अहवाल तयार करणाऱ्या

राय बहादुर पुरषोत्तमदास (१८९६) नामक अधिकाऱ्याने चार व्यापारी पेढ्यांच्या लेखा पुस्तकांचा अभ्यास करून संकलित केलेली माहिती उपलब्ध आहे. त्याच्या अभ्यासानुसार १८५५–१८६१ या कालावधीत एक रुपयाला गहू ८६ पौंड, जवस ७४ पौंड, कापूस २०.५ पौंड आणि ज्वारी ११६ पौंड अशा किमती होत्या. अमेरिकन यादवी युद्धामुळे (१८६१–१८६५) कापसाच्या किंमतीत भरमसाट वाढ झाली. त्यापाठोपाठ धान्याच्या किमतीही वाढल्या. इ. स. १८६१ ते १८६५ या कालावधीत गहू, जवस, ज्वारी आणि कापसाच्या किमती मागील दशकापेक्षा सुमारे तिपटीने वाढल्या. इ. स. १८६७ मध्ये रेल्वे मार्ग अस्तित्वात आल्यामुळे व अन्य कारणामुळे भावपातळी स्थिरावली. परंतु १८६१ नंतरच्या चलनवाढीची तीस वर्षीय जमाबंदी अहवालामध्ये दखलही घेण्यात आली नव्हती. कारण ही वाढ कायम स्वरूपाची असेल असा अंदाज नव्हता. तद्वतच अहवाल महसूल वाढीसाठीही तयार केलेला नव्हता. या अहवालात किमतीबाबत अल्पशी नोंद घेऊन महसुलाची आकडेवारी आधीच्या चाळीस वर्षांतील आकडेवारीप्रमाणे ठेवण्यात आली.

सन १८९२–१८९४ च्या जमाबंदी अहवालानुसार जमाबंदी अधिकारी या निष्कर्षावर आले की, १८६२–६३ नंतरच्या तीस वर्षांच्या जमाबंदी वर्षाला प्रमुख पिकांचे भाव सरासरी १५० टक्के वाढले. कापसाची किंमत तिपटीपेक्षा अधिक झाली. सन १८८८–१८९२ या जमाबंदी वर्षांतील सरासरी किमती पुढीलप्रमाणे होत्या :—एका रुपयास गहू ३४ पौंड, जवस २६ पौंड, ज्वारी ४८ पौंड व कापूस ५ पौंड. ज्वारी मुख्य अन्नधान्य पीक असले तरी जिल्ह्याची आर्थिक समृद्धी कापसावर अवलंबून आहे. ज्वारी निर्यात होत नसल्यामुळे ज्वारीच्या किमती शेतकऱ्यांवर विशेष परिणाम करीत नव्हत्या. सन १८९१ पासून पिंजलेल्या कापसाचा भाव वाढून १८९३ मध्ये रुपयास ३.८ पौंडपर्यंत वाढला. परंतु १८९८–९९ मध्ये हा दर ६ पौंडापर्यंत घसरला. सरासरी भाव मात्र ४ ते ५ पौंडाच्या दरम्यान होता. सन १९०३ मध्ये कापसाचा दर रुपयास ४.२ पौंड होता आणि १९०४ मध्ये तो ३.८ पौंड होता. अर्थातच लोकांनी कापूस विक्रीतून फायदा मिळविला. सन १८९१ नंतर ज्वारीच्या किमती नेहमी जमाबंदीकालीन किमतीपेक्षा जास्त होत्या. सन १८९१ ते १९०० या दशकात ज्वारीचा सरासरी भाव रुपयास ३६ पौंड होता, तर १९०१ ते १९०३ च्या दरम्यान तो ४० पौंड झाला. सन १८९७ मध्ये दरात भरमसाठ वाढ होऊन तो रुपयास २१ पौंड झाला. दुष्काळी वर्षात ज्वारी मागणी भागविण्याइतकीही पिकत नसे. गहू आणि जवसाचे दरसुद्धा जमाबंदी किमतीइतके कमी नव्हते. इ. स. १९०० मध्ये गव्हाचा भाव जास्त म्हणजे रुपयास १६ पौंड होता. सन १८९१–१८९५ या काळात गव्हाची सरासरी किंमत रुपयास २९ पौंड आणि १९०१ ते १९०४ मध्ये रुपयास २२ पौंड होती. सन १९०० च्या आसपास जवसाची किंमत फार वाढली. काही वर्षी जवसाचे किरकोळ दर जमाबंदी दराच्या जवळजवळ दुप्पट होते. क्वचितप्रसंगी ते जमाबंदी दरापेक्षा ५० टक्के अधिक होते. जवसाची १८९१ ते १९०० या कालावधीत सरासरी किंमत रुपयास १८ पौंड आणि १९०१ ते १९०४ मध्ये १५ पौंड होती. तथापि जवसाच्या वाढत्या किमती शेतकऱ्यांना जवसाखालील क्षेत्र वाढविण्यास प्रवृत्त करू शकल्या नाहीत. कारण कापूस उत्पादनापासून त्यांना फार मोठा लाभ मिळत होता.[२६]

[२६] वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९०६, पृ. १३३–३४.

किरकोळ वस्तूंच्या किमती : कृषि उत्पादनापेक्षा इतर किरकोळ वस्तूंच्या भाववाढीचे प्रमाण कमी होते. इ. स. १८६० ते १८७५ मध्ये मिठाची किंमत रुपयास १५½ ते १७ पौंड होती. जकात कमी झाल्यावर १८७६ ते १८८० दरम्यान त्यात घट होऊन रुपयास २० ते २२ पौंड झाली. सन १८९१ ते १९०३ च्या कालावधीत मिठाची किंमत रुपयास २१ पौंड किंवा त्यापेक्षा थोडी कमी होऊन स्थिर राहिली. स्थानिकरीत्या असे म्हटले जात होते की, मिठाची किंमत रुपयास २३ पौंडाचा मण या दरावर स्थिरावली होती. सन १९०३ मध्ये करात प्रथम सूट दिल्यामुळे किंमत आणखी घटून १४ आण्यास एक मण मीठ मिळू लागले. परंतु त्या वर्षी मुंबईत आगीमध्ये बरेच मीठ नष्ट झाल्याने किमतीत पुन्हा वाढ झाली. सन १९०४ मध्ये मिठाची किरकोळ किंमत रुपयास २१.७ पौंड होती. मिर्झापूरची साखर साधारणतः तीन ते साडेतीन रुपये मण (२० पौंडाचा मण) किंवा रुपयास ५.५ ते ६.५ पौंड अशी विकली जात असे. तर मॉरिशसची साखर २ रुपये ८ आणे मण किंवा रुपयास ८ पौंड किंवा त्यापेक्षा थोडी स्वस्त विकली जात होती. शुद्ध तूप दहा ते साडेदहा रुपये मण (२४ पौंडाचा मण) याप्रमाणे किंवा किरकोळीने रुपयास २ पौंड असे विकले जाई. कापसाची सरकी १ रुपया ४ आणे मण (४० शेर) आणि ग्रामीण भागात कडबा १५ रुपयांस हजार पेंढ्या व शहरी भागात २० रुपयांस हजार पेंढ्या या दराने विकला जाई. एका एकरात साधारणतः ५०० पेंढ्या होत असत. गवत शहरात साधारणतः ५ ते १० रुपयास हजार पेंढ्या याप्रमाणे विकले जाई. जळाऊ लाकडांचे दरही वाढले. जळाऊ लाकडे साधारणतः एक ते सव्वा रुपयास एक गाडी या दराने विकली जात.

नंतरच्या काळात रुपयाची क्रयशक्ती काही प्रमाणात कमी होऊन सर्व वस्तूंच्या किमती वाढल्या. पहिले महायुद्ध व त्यानंतरच्या एका वर्षात वाढत्या किमतींचा कल लक्षणीय होता. हा कल १९३० च्या जागतिक मंदीमुळे झालेल्या आर्थिक विध्वंसापर्यंत चालू होता. जागतिक मंदीचा प्रतिकूल परिणाम भारतातील कृषिमालाच्या किमतीवर होणे अपरिहार्य होते. परिणामतः भारतीय बाजारपेठेत सर्व वस्तूंच्या किमती अतिशय घसरल्या. ही घसरण १९३३ पर्यंत चालू राहिली. त्यानंतर मात्र किमती व जागतिक मागणीत वाढ झाली.

दुसऱ्या महायुद्धकाळात कापड, साखर, रॉकेल व औद्योगिक उत्पादनांच्या किमती भरमसाठ वाढल्या. तथापि सरकारच्या युद्धविषयक धोरणामुळे ज्वारी, कापूस या मुख्य पिकांच्या किमती घसरत राहिल्या. एका बाजूला वस्तूंचा तुटवडा होता तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या मालास मागणी नव्हती. मुंबई व कलकत्त्यावर जपानी हल्ल्याची शक्यता निर्माण झाल्यावर कापसाच्या गासड्या तिकडे नेण्यावर सरकारने कडक निर्बंध घातले. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती हलाखीची झाली.

इ. स. १९५३, १९५४ व १९५५ मधील चांगल्या शेती हंगामामुळे भावपातळीत सुधारणा झाली. तथापि १९५६–५७ मध्ये किमती वेगाने वाढल्या. सन १९५९–६० मध्ये जिल्ह्यात काही भागात अतिवृष्टी तर काही भागात दुष्काळामुळे भावपातळीतील वाढीने अत्युच्च शिखर गाठले. कोरीयन युद्धानंतर १९५९–६० मधील किमती तोपर्यंतच्या काळात सर्वात जास्त होत्या. सन १९६०–६१ आणि १९६१–६२ च्या उत्तम हंगामामुळे कृषि उत्पादनाच्या किमती पुन्हा घटल्या.

इ. स. १९६२ मधील चीनच्या आक्रमणामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम झाला. वस्तूंच्या वाढत्या किमतीमुळे आकस्मिक औद्योगिक मंदीची संभाव्यता निर्माण झाली.

इ. स. १९६० ते १९८६ पर्यंतच्या कृषिमालाच्या जिल्ह्यातील भावपातळीमधील चढउतार तक्ता क्रमांक ३ वरून दिसून येईल.

इ. स. १९८२ ते १९८५ या कालावधीत वर्धा शहरातील वस्तूंच्या सरासरी घाऊक व किरकोळ किमती खालीलप्रमाणे होत्या.[२७]

घाऊक किमती			किरकोळ किमती		
वस्तू	वर्ष	सरासरी भाव (रुपये प्रति क्विंटल)	वस्तू	वर्ष	सरासरी भाव (रुपये प्रति किलोग्रॅम)
गहू	१९८२	२२३	तांदूळ	१९८२	३.०३
(हावरा)	१९८३	२५०	(लुचई)	१९८३	३.५५
	१९८४	२१०		१९८४	३.३६
	१९८५	२८१		१९८५	३.००
तूर	१९८२	३५०	गहू	१९८२	२.३९
(पांढरी)	१९८३	४४१	(मध्यम)	१९८३	२.७७
	१९८४	४३०		१९८४	२.१६
	१९८५	३७६		१९८५	२.४८
भुईमूग	१९८२	३९५	ज्वारी	१९८२	१.४८
(लहान)	१९८३	४२३	(संकरित)	१९८३	१.४५
	१९८४	४५१		१९८४	१.५२
	१९८५	४६४		१९८५	१.८५
हरभरा	१९८२	२७५	साखर	१९८२	५.७५
(देशी)	१९८३	३००	(सी)	१९८३	४.९६
	१९८४	३९४		१९८४	५.३७
	१९८५	३८१		१९८५	६.५१
ज्वारी	१९८२	१३३	तेल	१९८२	१४.६३
(संकरित)	१९८३	१३८	(गुजरात	१९८३	१७.०१
	१९८४	१४४	शेंगदाणा)	१९८४	१६.१२
	१९८५	१२५		१९८५	१६.९८
कापूस	१९८२	६१४			
(एच-४ सुपर)	१९८३	६१४			
	१९८४	६१४			
	१९८५	६१४			

[२७] जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा.

वेतनपातळी

इ. स. १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण कामकऱ्यांपैकी सुमारे ७२.९ टक्के शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. यापैकी ४५.५ टक्के शेतमजूर आहेत. मजुरी व वेतनपातळीची माहिती १८७३ पासून उपलब्ध आहे. वर्धा जिल्ह्यासाठी स्वतंत्र आकडेवारी उपलब्ध नसली तरी नागपूरला हा जिल्हा लागून असल्यामुळे तेथील किंमती व मजुरीचे दर साधारणतः या जिल्ह्यासाठी प्रातिनिधिक समजता येतील. त्यानुसार १८७३ मध्ये शेतमजुरास सरासरी मासिक पाच रुपये, १८८१ मध्ये चार रुपये, १८९१ मध्ये चार रुपये आणि १९०१ मध्ये पाच रुपये दराने मजुरी मिळत होती. अमेरिकन यादवी युद्धामुळे (१८६१–१८६५) येथील कापसास मागणी वाढून कापूस व्यापार व उद्योगात तेजी आली होती. त्यामुळे मजुरीचे दर वाढलेले होते. तेजीचा प्रभाव ओसरल्यावर दर पुन्हा कमी झाले. सन १८९१ नंतर शेत-मजुरीच्या दरात बदल झाला. १८९३ मध्ये हा दर ५ रुपये ११ आणे होता. पुढे काही वर्षे दर स्थिर होते. शेतमजुरी १९०१ मध्ये ५ रुपये १० आणे, १९०२ मध्ये ६ रुपये आणि १९०३ मध्ये ५ रुपये १२ आणे होती. सन १८९१ नंतरच्या दशकात अकुशल कामगारांच्या मजुरीत सुमारे ५० टक्के वाढ झाली. सन १९०२ मध्ये कामकरी पुरुषांची दैनिक मजुरी चार ते पाच आणे आणि महिलेची मजुरी तीन आणे होती. सन १८९१ मध्ये पुरुषास तीन आणे व महिलेस दीड ते दोन आण मिळत असत. सन १९०४ मध्ये कारखान्यात काम करणाऱ्या पुरुषाची मजुरी सहा आणे आणि महिलेची चार आणे होती. पुरुषास महिन्याकाठी सहा रुपये मिळत. अकुशल कामगारांच्या मजुरीत ५० टक्के वृद्धी झाल्याचे दिसून येते. अगदी तळाच्या घटकास मिळणाऱ्या मजुरीत वाढ झाल्याचे दिसून येते. कुशल कामगारास १८९१ मध्ये दरमहा १५ रुपये तर १९०३ मध्ये २० रुपये वेतन मिळत असे. कुशल कामगारांच्या दैनिक मजुरीचे दर त्यांच्या व्यवसायानुसार सहा ते बारा आण्यापर्यंत होते.

एक वर्षासाठी अथवा सहा महिन्यांसाठी नियुक्त केलेल्या शेतमजुरास सालकरी म्हणतात. त्याचे वर्ष चैत्र प्रतिपदेपासून सुरू होते. मागील शतकाच्या शेवटी व चालू शतकाच्या आरंभी सालकऱ्याला रुढीनुसार दरमहा सहा कुडव (१२० पौंड) ज्वारी आणि वर्षास २० ते २५ रुपये रोख किंवा आठ कुडव (१६० पौंड) ज्वारी आणि वर्षास ५ रुपये रोख देत असत. या पूर्वीच्या काळी त्याला महिन्याला पाच कुडव (१०० पौंड) ज्वारी आणि वर्षास दोन ते पाच रुपये रोख एवढीच मजुरी दिली जात असे. उपरोक्त मजुरीव्यतिरिक्त त्याला हंगामाचे वेळी पाच कुडव ज्वारी, वर्षातून चार-पाच सणांचे वेळी अन्न, एक घोंगडी आणि एक पादत्राणाची जोडी देत असत. ज्वारीची किंमत रुपयास ४२ पौंड या दराने त्याला मिळणाऱ्या वार्षिक मजुरीचा दर ६० रुपयांच्या जवळपास होता. परंतु शेतमजूर त्यांची मजुरी बहुधा रोखीत मागत असत आणि रोखीत ती वर्षाला ६० ते ८० रुपयांपर्यंत जात असे. पुरुषोत्तमदास नामक जमाबंदी अधिकाऱ्याने नमूद केल्याप्रमाणे १८९२–१८९४ च्या जमाबंदी अहवालानुसार वर्षासाठी नियुक्त केलेल्या शेतमजुरास धान्य व पैसा दोन्ही साधारणतः महिन्यास तीन रुपये मिळत असत. मालगुजार किंवा मोठ्या जमीनदाराने

नेमलेल्या खाजगी गुराख्यास धान्याच्या स्वरूपात मिळणारी मजुरी शेतमजुरासारखीच असे. गावगुराख्यास गायीमागे दोन आणे महिना आणि म्हशीमागे चार आणे महिना मजुरी दिली जात असे. निंदणी व कापणीचे काम महिला करीत. खरीप हंगामात ज्वारीची एकदा व कापसाची दोन-तीन वेळा निंदणी करीत. निंदणीसाठी महिलांना अर्ध्या दिवसास तीन ते चार पैसे व पूर्ण दिवसास दीड ते दोन आणे देत असत. कापसाच्या निंदणीस एकरी पाच ते सात रुपयांपर्यंत खर्च येत असे. ज्वारीची कापणी पुरुष करत असत. त्याबद्दल त्यांना दिवसाला तीन पायल्या (७½ पौंड) धान्य देण्यात येत असे. ताटापासून कणसे कापून वेगळी करण्यासाठी महिलांना दिवसाकाठी दोन पायल्या (५ पौंड) मजुरी प्राप्त होई. मळणीसाठी याच दराने मजुरी दिली जाई. कापूस वेचणीसाठी महिलांना वेचलेल्या कापसाचा विसावा भाग मजुरी म्हणून देण्यात येई. हाच दर साधारणतः दुसऱ्या वेचणीच्या वेळीही काटेकोरपणे पाळला जाई. पैशाच्या स्वरूपात मजुरी द्यावयाची असल्यास १८ शेराच्या कापसाच्या मगास तीन किंवा चार आणे दिले जात. यानुसार महिला मजूर दिवसाला दोन आणे मजुरी मिळवीत असे. गव्हाच्या कापणीत २० पेंड्यातील एक पेंडी मजुरी म्हणून दिली जाई एका पेंडीतून साधारणतः ३ ते ४ पौंड धान्य निघत असे. महिलेस दिवसाकाठी एक तर पुरुषास दीड पेंडी मजुरी मिळत असे. तीन पुरुष मजूर दिवसाकाठी एक एकर शेतातील गव्हाची कापणी करीत असत. जवस उपटणे व अलग करण्यासाठी मोंगरीने झोडपणी महिला मजूर करीत. त्यासाठी दिवसाकाठी दोन आणे मिळत. राजस्थानातील राजपुतांना पिकाच्या राखणीस्तव तसेच शेताचा खंड व कर्जवसुलीसाठी नेमण्यात येई. हंगामात स्थानिक मजुरांचा तुटवडा भासत असे. त्यासाठी भंडारा, बालाघाट व चांदा भागातून मजूर येत. त्यांना झारी असे म्हणत. हे मजूर भाताचा हंगाम संपल्यानंतर वर्ध्यास येत असत आणि उन्हाळ्यात परत जात. मागील शतकाच्या अखेरीस काही वर्षात यापैकी बरेच लोक वर्ध्यास स्थायिक झाले.[२८]

सुतार, लोहार, चांभार, धोबी, न्हावी इत्यादी बलुतेदारांना त्यांच्या सेवेच्या मोबदल्यात वस्तूरूपाने मजुरी मिळत असे. सुतार, लोहार व न्हावी यांना इतरांपेक्षा अधिक मोबदला मिळत असे. इ.स. १९०४–१९१० या काळात सुतारास व लोहारास प्रत्येक चार बैलांच्या नांगरामागे किंवा ४० एकरांस अनुक्रमे १०० व ५० पौंड धान्य वर्षाकाठी देत. या मोबदल्यात सुतार व लोहार शेतीची सर्व अवजारे बनवून देत. काही वेळा सुतार आणि लोहारास बैलगाडीच्या दुरुस्तीसाठी २० पौंड अतिरिक्त धान्य देत असत. न्हाव्यास एका माणसाचे केस कापण्यासाठी वर्षाला २५ पौंड धान्य अथवा रोखीने काम केल्यास वर्षाला ६ आणे देत असत. याशिवाय प्रसंगतः केलेल्या कामासाठी बक्षीसही मिळत असे. धोब्यास खरीप हंगामात २० पौंड आणि रबी हंगामात ३० पौंड धान्य देत असत. तसेच मुलाच्या जन्मप्रसंगी २५ पौंड तर मुलीच्या जन्मप्रसंगी १२½ पौंड अतिरिक्त धान्य देत असत.[२९]

पुढील काळात वेतनपातळी व मजुरीच्या दरातील चढउतार प्रामुख्याने उपभोग्य वस्तूंच्या किंमत पातळीनुसार झालेले दिसतात. त्यातील महत्त्वाचे टप्पे म्हणजे पहिल्या महायुद्धाची तेजी आणि १९३०–१९३३ ची आर्थिक मंदी व दुसऱ्या महायुद्धाची तेजी हे होत.

---

[२८] वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७४, पृ. ४५९–६०.

[२९] किता, पृ. २९०–९१.

स्थूलमानाने मजुरांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येते :– शेतात काम करणारे शेतमजूर, सर्वसामान्य मजूर व कुशल काम करणारे कामगार. कुशल कामगारांच्या वेतनपातळीची सेलू, कारंजा व समुद्रपूर केंद्रांची माहिती खाली दिली आहे.

(रुपये)

केंद्र	वर्ष	कुशल कामगार			गुराखी
		सुतार	लोहार	चांभार	
सेलू ..	१९६४	४.००	४.०८	४.००	२.००
	१९७५	९.००	५.००	३.५०	३.००
	१९८२	२०	१५	५	१०
	१९८३	२२	१७	९	१०
	१९८४	२५	२०	१५	१०
कारंजा ..	१९६४	४.००	४.४२	४.६०	१.५०
	१९७५	६.४२	६.००	६.००	३.००
	१९८२	८	६	४	४
	१९८३	८	६	४	४
	१९८४	१५	१५	१०	१०
समुद्रपूर ..	१९६४	४.२७	३.८७	उ. ना.	१.२५
	१९७५	८.००	९.२५	३.२५	३.००
	१९८२	१६	१६	१६	६
	१९८३	१८	१८	१८	६
	१९८४	१९	१९	१९	७

वरील तीन केंद्रांतील शेतमजुरांच्या सरासरी मजुरीचे दर खालीलप्रमाणे होते.[३०]

[३०] जिल्हा सांख्यिकी अधिकारी, वर्धा.

(आकडे रुपयात)

वर्ष	सेलू		समुद्रपूर		कारंजा	
	पुरुष	महिला	पुरुष	महिला	पुरुष	महिला
१९७४	३.३३	१.५३	३.०२	१.६६	३.५०	१.२८
१९७५	३.७५	१.७५	३.८८	२.५०	३.५०	१.२५
१९७६	३.७५	१.७५	४.४६	२.१२	३.५६	१.३४
१९७७	४.००	२.००	५.००	२.००	५.००	२.७५
१९७८	४.००	२.००	५.००	२.००	५.००	३.००
१९७९	५.००	३.००	५.००	२.५०	५.००	३.००
१९८०	५.००	३.००	६.००	२.५०	५.००	३.००
१९८१	८.००	५.००	७.००	४.००	७.००	३.५०
१९८२	८.००	५.००	७.००	४.००	७.००	३.५०
१९८३	१२.००	६.००	८.००	४.००	७.००	३.५०
१९८४	१२.००	६.००	८.५०	४.००	८.००	४.००
१९८५	१२.००	६.००	९.००	५.००	८.००	५.००
१९८६	१५.००	६.००	९.००	६.००	१०.००	७.००
१९८७	१५.००	६.००	९.००	६.००	१२.००	७.००

महाराष्ट्रातील असंघटित शेतमजुरांची वेतनपातळी सुधारण्यासाठी व किमान वेतन निर्धारित करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या पागे समितीने १९७३ मध्ये राज्यातील शेतमजुरांच्या रोजगार स्थितीसंबंधीचा अहवाल सादर केला. समितीने शेतमजुरांची वेतननिश्चिती करण्यासाठी राज्याची तीन परिमंडळात विभागणी केली. पारदासानी व सुखथनकर समितीने निश्चित केलेल्या दुष्काळप्रवण क्षेत्राच्या बाहेरील परंतु परिमंडळ एकमध्ये समाविष्ट क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्राचा अंतर्भाव परिमंडळ क्रमांक दोनमध्ये केला. त्यात वर्धा जिल्ह्याचा समावेश होतो.

उपरोक्त अहवालावर शासनाने निर्णय घेऊन १९४८ च्या मुंबई किमान वेतन अधिनियमानुसार १४ मार्च १९७४ च्या असाधारण राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध

करून किमान वेतन दर जाहीर केले. हे दर २४ मार्च १९७४ पासून अमलात आले. वर्धा जिल्हा नागपूर विभागात समाविष्ट असून तेथे १९७४ चे सर्वसाधारण दर सालकऱ्यासाठी १,२०० रुपये, महिनेदार १०० रुपये आणि रोजंदार ३.०१ रुपये होते. कामकऱ्यास निर्धारित दरापेक्षा कमी वेतन दिल्यास अधिनियमानुसार जमीनदार, शेतकरी अथवा मालक शिक्षेस पात्र ठरतो. दिनांक १ नोव्हेंबर १९७८ पासून या जिल्ह्यासाठी किमान वेतनाचे दर सुधारून सालकऱ्यांसाठी वार्षिक १,८०० रुपये, महिनेदारास १५० रुपये व रोजंदारास दररोज ४.५० रुपये निर्धारित करण्यात आले. दिनांक १ फेब्रुवारी १९८३ पासून जिल्ह्यासाठी किमान वेतन दरात पुन्हा वाढ करून सालकऱ्यासाठी वार्षिक २,७६० रुपये, महिनेदारास २३० रुपये व रोजंदारास ७.०० रुपये निर्धारित करण्यात आलेले आहेत. हे दर परिस्थितीनुरुप परिवर्तनीय आहेत. किमान वेतन दरात मूळ वेतन, महागाई भत्ता व इतर सवलतींची किंमत अंतर्भूत आहे. या अधिनियमानुसार शेतमजुरांचे प्रत्यक्ष कामाचे ७ तास ठरविण्यात आलेले आहेत. महिला व पुरुष कामगारांचे किमान वेतन सारखेच आहे.

उपजीविकेचा आकृतिबंध

वर्धा जिल्ह्यातील राहणीमानाचा अभ्यास करण्यासाठी उपजीविकेच्या आकृतिबंधाचा थोडक्यात परामर्श घेणे आवश्यक आहे. त्यासाठी जनगणना प्राधिकाऱ्यांनी केलेल्या वर्गीकरणाप्रमाणे विविध व्यवसायांत काम करणाऱ्या कामगारांचे नऊ स्थूल आर्थिक वर्गांत पुढील वर्गीकरण विचारात घेण्यात आले आहे :— शेतकरी, शेतमजूर, खाणकाम व दगडकाम, पशुसंवर्धन, वन्यव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, शिकार आणि रोपणी व फळबागा तसेच अन्य तत्सम कामे, घरगुती उद्योगधंदे, घरगुती उद्योगांव्यतिरिक्त इतर उत्पादक उद्योगधंदे, बांधकाम, व्यापार व वाणिज्य, परिवहन, साठवण व दळणवळण आणि नोकरी व इतर व्यवसाय. या वर्गवारीनुसार जिल्ह्यात १९६१, १९७१ व १९८१ मध्ये विविध व्यवसायांतील कामगारांचे एकूण कामगारांशी शेकडा प्रमाण तसेच कामगारांची उपजीविकेच्या साधनानुसार वर्गवारी तक्ता क्रमांक ४ व ५ मध्ये दिलेली आहे. सन १९८१ मध्ये वरील वर्गीकरणात थोडा बदल करून खाणकाम, दगडकाम, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, शिकार आणि रोपणी व फळबागा तसेच घरगुती उद्योगांव्यतिरिक्त इतर उत्पादक उद्योगधंदे, बांधकाम, व्यापार व वाणिज्य, परिवहन, साठवण व दळणवळण, नोकरी इत्यादींची एकत्रित आकडेवारी इतर कामगार या शिर्षकाखाली दिलेली आहे. तसेच सीमांतिक कामगारांची (वर्षात सहा महिन्यांपेक्षा कमी दिवस काम करणारे) आकडेवारी वेगळी दाखविण्यात आलेली आहे.

जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येशी कामगार महिला व पुरुषांचे १९६१, १९७१ व १९८१ मधील तालुकावार प्रमाण तक्ता क्रमांक ६ मध्ये दिले आहे. याच तक्त्यात जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेची स्थूलमानाने कल्पना येण्यास्तव महाराष्ट्रातील कामगारांचे शेकडा प्रमाणही दिलेले आहे.

वर्धा जिल्ह्यात १९६१, १९७१ व १९८१ मध्ये शेतकरी व शेतमजुरांचे प्रमाण राज्य सरासरीहून अधिक होते. उद्योगधंद्यांचा विकास झालेला नसल्यामुळे कृषी व्यवसाय सर्वात अधिक महत्त्वाचा आहे. शेती व शेतमजुरी वगळता इतर सर्व

व्यवसायांतील कामकऱ्यांचे प्रमाण राज्य सरासरीपेक्षा कमी आहे. सन १९६१ मध्ये शेतकऱ्यांपेक्षा शेतमजुरांचे प्रमाण जास्त होते. कारण एकूण वहितीखालील जमिनीचे स्वामीत्व कमी भूधारकांकडे होते. इ. स. १९७१ मध्ये जिल्ह्यातील शेतमजुरांचे प्रमाण शेतकऱ्यांच्या दुप्पट होते. घरगुती उद्योगधंद्यातील कामगारांचे प्रमाण राज्यापेक्षा फक्त ०.५ प्रतिशत कमी होते. खाणकाम, दगडकाम इत्यादीमधील कामगारांचे प्रमाण राज्यापेक्षा ०.२ टक्के अधिक होते. सन १९८१ मध्येसुद्धा शेतमजुरांचे प्रमाण शेतकऱ्यांच्या प्रमाणापेक्षा अधिक होते. तसेच घरगुती उद्योगधंद्यांतील कामगारांचे प्रमाण राज्यापेक्षा फक्त ०.५ ने अधिक होते.

इ. स. १९६१ मध्ये जिल्ह्यातील कामगारांची संख्या एकूण लोकसंख्येच्या ४९.९ टक्के होती. १९६१–१९७१ या दशकात त्यात घट होऊन ती ३९.० टक्के झाली. तर १९७१ ते १९८१ दरम्यान त्यात पुन्हा वाढ होऊन ती ४५.२ टक्के झाली. राज्यातील १९६१, १९७१ व १९८१ मधील कामगारांच्या एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणापेक्षा जिल्ह्यातील प्रमाण अधिक होते.

वर्धा जिल्ह्यातील कामगारांच्या व्यवसायानुसार विभागणीवरून असे दिसून येते की, कृषि व्यवसायातील कामगारांचे एकूण कामगारांशी १९६१, १९७१ व १९८१ मधील शेकडा प्रमाण अनुक्रमे ७७.४, ७६.४ व ७२.९ होते. सन १९६१ ते १९८१ दरम्यान या प्रमाणात ४.५ टक्क्यांनी घट झाली. कारण इतर व्यवसायांमधील कामगारांमध्ये अल्पतः झालेली वाढ होय. या कालावधीत कृषी व्यवसायातील कामगारांच्या प्रमाणात घट झाल्यामुळे शेतीवरील भार कमी झाल्याचे दिसते. इ. स. १९६१ मध्ये घरगुती उद्योगधंद्यांमधील कामगारांचे एकूण कामगारांशी शेकडा प्रमाण ३.६ होते. त्यात घट होऊन ते १९७१ मध्ये २.५ झाले. मात्र इतर उत्पादक उद्योगधंद्यांतील हे प्रमाण १९६१ व १९७१ मध्ये अनुक्रमे ३.९ व ४.१ इतके होते. म्हणजे यात थोडी वाढ झाली. यावरून कामगारांना उपजीविकेचे साधन म्हणून इतर उत्पादक उद्योगधंद्यांमध्ये थोडा वाव मिळाला असे दिसते. बांधकाम व्यवसायातील कामगारांचे १९६१ मधील प्रमाण ०.९ टक्के आणि १९७१ मधील १.३ टक्के होते. व्यापार व वाणिज्यमधील कामगारांचे शेकडा प्रमाण १९६१ मध्ये ३.१ आणि १९७१ मध्ये ३.८ होते. परिवहन, साठवण व दळणवळणातील कामगारांचे शेकडा प्रमाण १९६१ मध्ये १.४ तर १९७१ मध्ये १.९ झाले. नोकरी व इतर व्यवसायांतील शेकडा प्रमाणात १९६१ पेक्षा १९७१ मध्ये ०.१ टक्क्याने वाढ झाली. तुलनात्मकदृष्ट्या पाहिल्यास घरगुती उद्योगधंदे सोडून इतर सर्व व्यवसायांमधील कामगारांच्या प्रमाणात १९६१ पेक्षा अल्प प्रमाणात वाढ झाली.

जनगणनेनुसार कामकऱ्यांची प्राथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्रांत विभागणी केली आहे. प्राथमिक क्षेत्रात शेतकरी, शेतमजूर, खाणकाम, दगडकाम, जंगलकाम, पशुसंवर्धन व मच्छीमार व्यवसायांचा अंतर्भाव होतो. द्वितीय क्षेत्रामध्ये घरगुती उद्योगधंदे, कारखाने व इतर उत्पादक उद्योगधंदे आणि बांधकामाचा समावेश होतो. तृतीय क्षेत्रात व्यापार आणि वाणिज्य, वाहतूक, दळणवळण व साठवण, नोकरी व इतर सेवांचा समावेश केला आहे. वर्धा जिल्ह्यात या तीन क्षेत्रांतील कामगारांची एकूण कामकऱ्यांशी असलेली टक्केवारी खाली दिली आहे.

वर्ष		प्राथमिक क्षेत्र	द्वितीय क्षेत्र	तृतीय क्षेत्र
१९६१	..	७९.३	८.२	१२.५
१९७१	..	७८.३	७.९	१३.८
१९८१	..	५६.२	१.८	२५.३

इ. स. १९८१ मध्ये तृतीय क्षेत्रात प्राथमिक क्षेत्रातील खाणकाम, दगडकाम, पशुसंवर्धन, वनव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, शिकार, फळबागा इत्यादी तर द्वितीय क्षेत्रातील घरगुती उद्योगांव्यतिरिक्त इतर उद्योग व बांधकाम यातील कामगारांची टक्केवारी मिळविण्यात आलेली आहे. त्यामुळे संबंधित क्षेत्रातील टक्केवारी कमी दिसून येते. प्रत्यक्षात तसे नसून ही आकडेवारी गोळा करताना १९८१ मध्ये वर्गीकरणात केलेल्या बदलाचा परिणाम आहे. उपरोक्त आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की, जिल्ह्यातील व्यवसाय रचना प्राथमिक उत्पादन स्वरूपाची आहे. हे अविकसित अर्थव्यवस्थेचे लक्षण समजता येईल.

सन १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण कामगारांची लोकसंख्येशी टक्केवारी ४५.२ असून पुरुष कामगारांचे प्रमाण २८ टक्के तर, महिलांचे प्रमाण १७.१ आहे. जनगणनेनुसार जिल्ह्यातील कामगारांची उपजीविकेच्या साधनानुसार वर्गवारी तक्ता क्रमांक ७ मध्ये दिलेली आहे. जिल्ह्यातील वयोमान गटाप्रमाणे एकूण कामकरी, महिला व पुरुषांचे शेकडा प्रमाण खाली दर्शविले आहे.

वर्ष		सर्व वये	०–१४	१५–२४	२५–५९	६० +
१९६१	एकूण	४९.९२	८.६९	७३.६४	८६.०४	६०.५६
	पुरुष	५७.६८	६.८२	८६.७९	९७.५७	७९.६९
	महिला	४१.८७	१०.५८	६०.४५	७२.५०	४३.२९
१९७१	एकूण	३९.१०	५.८२	४५.५५	७२.६०	५३.३५
	पुरुष	५१.७७	५.८४	५९.०४	९६.६३	७६.८९
	महिला	२५.७५	५.७२	२९.७०	४७.२६	७८.०५
१९८१	एकूण	४५.२१	७.१८	५४.५१	७९.४९	५३.२४
	पुरुष	५४.६०	६.५१	६४.९२	९६.४९	७०.५८
	महिला	३५.३१	७.८६	४२.१४	६१.८६	३५.००

रोजगाराचा दर्जा : कृषि व घरगुती व्यवसायांव्यतिरिक्त इतर क्षेत्रांतील कामगारांचे वर्गीकरण जनगणना प्राधिकाऱ्यांनी मालक, नोकर, एकेकटे कामकरी आणि कुटुंबातील कामगार असे केले असून त्यांची १९७१ च्या जनगणनेनुसार आकडेवारी खाली दिली आहे. या आकडेवारीवरून व त्यांच्या एकूण कामगारांशी असलेल्या प्रमाणावरून जिल्ह्यातील उपजीविकेचे साधन असलेल्या रोजगाराच्या दर्जाची कल्पना येते.

जिल्हा/महाराष्ट्र राज्य	एकूण/ग्रामीण/नागरी		एकूण कामकरी	मालक	नोकर	एकेकटे कामकरी	कुटुंबांतील कामकरी
वर्धा जिल्हा	एकूण	..	६४,२२५ (१००.००)	२,६३४ (४.१०)	४१,६३० (६४.८२)	१६,५९९ (२५.८५)	३,३६२ (५.२३)
	ग्रामीण	..	२५,८५९ (१००.००)	७१९ (२.७८)	१५,०९५ (५८.३८)	८,०९८ (३१.३२)	१,९४७ (७.५२)
	नागरी	..	३८,३६६ (१००.००)	१,९१५ (४.९९)	२६,५३५ (६९.१६)	८,५०१ (२२.१६)	१,४१५ (३.६९)
महाराष्ट्र राज्य	एकूण	..	५८,९६,४३९ (१००.००)	३,१७,५४१ (५.३८)	४३,१४,९४१ (७३.१८)	१०,२०,०४७ (१७.३०)	२,४३,९१० (४.१४)
	ग्रामीण	..	१५,२४,६९६ (१००.००)	५४,७२४ (३.५९)	९,४३,२२३ (६१.८७)	३,९९,८१७ (२६.२२)	१,२६,८३२ (८.३२)
	नागरी	..	४३,७१,७४३ (१००.००)	२,६२,८१७ (६.०१)	३३,७१,६१८ (७७.१२)	६,२०,२३० (१४.१९)	१,१७,०७८ (२.६८)

कंसातील आकडे एकूण कामगारांशी टक्केवारी दर्शवितात.

सन १९८१ च्या जनगणनेत कामगारांच्या वर्गीकरणात मुख्य कामगार आणि सीमांतिक कामगार असा बदल झाला. खालील सारणीत कृषी व घरगुती व्यवसायांव्यतिरिक्त मुख्य कामगारांचे मालक, नोकर, एकेकटे कामकरी आणि कुटुंबांतील कामगार असे वर्गीकरण केले आहे. त्यांची आकडेवारी खाली दिली आहे.

जिल्हा/महाराष्ट्र राज्य	एकूण/नागरी		मुख्य कामगार	मालक	नोकर	एकेकटे कामकरी	कुटुंबांतील कामकरी
वर्धा जिल्हा	एकूण	..	८३,९५१ (१००.००)	३,३०० (३.९३)	५१,१५६ (६०.९३)	२५,३९५ (३०.२४)	४,०९९ (४.८८)
	नागरी	..	४५,४७३ (१००.००)	२,१४७ (४.७२)	२८,७१७ (६३.१५)	१२,५९६ (२७.६९)	२,०११ (४.४२)
महाराष्ट्र राज्य	एकूण	..	८,६७४,५२१ (१००.००)	४५४,३८५ (५.२३)	६,१४६,७०६ (७०.८५)	१,६५६,३५८ (१९.०९)	४१७,०७२ (४.८०)
	नागरी	..	६,१००,३८८ (१००.००)	३५७,७६५ (५.८६)	४,५१३,७१९ (७३.९९)	९९९,२०० (१६.३७)	२२९,७४ (३.७६)

कंसातील आकडे मुख्य कामगारांशी टक्केवारी दर्शवितात.

व्यावसायिक वर्गीकरण : शेतीव्यतिरिक्त इतर व्यवसायांतील कामकऱ्यांची १९७१ व १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील व्यवसायनिहाय आकडेवारी तक्ता क्रमांक ८ मध्ये दिलेली आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी या आकडेवारीची शेतीव्यतिरिक्त इतर व्यवसायांतील एकूण कामगारांशी टक्केवारीही त्याच तक्त्यात कंसात दिलेली आहे.

राहणीमान दर्जा

राहणीमानावर प्रभाव पाडणाऱ्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक घटकांचा ऊहापोह या ग्रंथातील इतर प्रकरणांमध्ये केलेला आहे. या घटकांबरोबरच कुटुंबासाठी उपलब्ध निवारा या घटकाचाही राहणीमानावर प्रभाव पडतो. इ. स. १९०६ च्या वर्धा गॅझेटिअरनुसार गरीब शेतकरी व मजुरांची घरे मातीची आणि कौलारू छताची होती. त्यामध्ये बहुतांशी दोन खोल्या आणि गुरांसाठी गोठा होता. मालगुजार व जमीनदारांची घरे विटा-चुन्याची आणि प्रत्येक बाबीसाठी वेगवेगळ्या खोल्या असलेली होती. जंगलाजवळील भागात बांबूचे कुड व छपराची घरे होती. शहरातील घरे विटा, चुना, सिमेंट, लोखंड व लाकूड इत्यादींचा वापर करून बांधलेली होती.

सांप्रतकाळी जिल्ह्यातील नागरी भागात घरबांधणी नवीन पद्धतीची तर ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीची आहे. घरबांधणीबाबत १९८१ जनगणना अहवालात नागरी व ग्रामीण भागातील घरांच्या भिंती व छपराच्या बांधणीसाठी वापरलेल्या साधनसामग्रीनुसार घरांची संख्या तक्ता क्रमांक ९ मध्ये दिलेली आहे. त्यावरून घरमालक व भाडेकरूंच्या आर्थिक स्थितीबद्दल अनुमान काढता येते. इ. स. १९८१ च्या जनगणेनुसार निवासी घरांमधील खोल्यांच्या संख्येवरून तेथील लोकांच्या राहणीमानाबाबत अनुमान काढता येते. खोल्यांच्या संख्येशी कुटुंबांच्या संख्येची सांगड घालून अभ्यास केल्यास राहणीमानाची कल्पना येऊ शकते. त्यासाठी तक्ता क्रमांक १० मध्ये जिल्ह्यातील खोल्यांच्या संख्येनुसार वर्गीकरण दिलेले आहे.

घरांनुसार, विद्युत, शौचालय, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा या सोयींचा विचार केल्यास त्यावरून त्यात राहत असलेल्या लोकांच्या राहणीमानावर प्रकाश पडू शकतो. यासाठी खालील विवरणपत्रात विद्युत वापर, शौचालय, पाणीपुरवठ्याच्या सोयी-नुसार नागरी व ग्रामीण भागातील घरांची संख्या दिलेली आहे.

एकूण घरे		वीज वापरत असलेली घरे	
नागरी (१)	ग्रामीण (२)	नागरी (३)	ग्रामीण (४)
४२,३२०	१,३६,५५०	२८,९१५	३५,५५५

शौचालय असलेली घरे		पाणीपुरवठा असलेली घरे	
नागरी (५)	ग्रामीण (६)	नागरी (७)	ग्रामीण (८)
१७,५१५	..	२०,३७५	१५,०८०

तक्ता क्रमांक १

जिल्ह्यातील पंचवार्षिक योजनानिहाय जलसिंचन प्रकल्प

(हेक्टर)

पंचवार्षिक योजना	मोठे प्रकल्प		मध्यम प्रकल्प		लघु प्रकल्प (राज्यस्तर)		उपसा सिंचन प्रकल्प (राज्यस्तर)		एकूण	
	प्रकल्प	सिंचन क्षेत्र	प्रकल्प	सिंचन क्षेत्र	प्रकल्प	सिंचन क्षेत्र	प्रकल्प	सिंचन क्षेत्र	प्रकल्प	सिंचन क्षेत्र
दुसरी योजना ..	..	..	बोर	१३,३६०	१	३६०	..	..	२	१३,७२०
तिसरी योजना ..	अप्पर वर्धा	१६,५००	डोंगरगाव	६३०	२	४८०	..	..	४	१७,६१०
तीन वार्षिक योजना ..	..	..	..	..	..	..	..	..	..	..
चौथी योजना ..	..	..	..	..	१२	४,८२०	१०	२,१७०	२२	६,९९०
पाचवी योजना ..	..	..	अ) पंचधारा ब) धाम क) पोथरा	१,८२० ७,९२० ४,८६०	५	१,२९०	..	..	८	१५,८९०
दोन एक वार्षिक योजना	अ) लोअर वेणा ब) लोअर वर्धा	१४,०२४ ४४,१५०	मदन	२,५४०	३	८२०	..	..	६	६१,५३४
सहावी योजना ..	..	..	..	..	१	५८५	..	..	१	५८५
सर्व योजनांतील स्थानिक लघु पाटबंधारे व उपसासिंचन योजना	..	..	..	..	७४	५,०९१	..	..	७४	५,०९१
एकूण ..	३	७४,६७४	६	३१,१३०	९८	१३,४४६	१०	२,१७०	११७	१,२१,४२०

तक्ता क्रमांक २

रस्त्यांच्या वर्गीकरणानुसार रस्ते विकास, वर्धा जिल्हा[३१]

(लांबी किलोमीटर)

प्रवर्ग	१९५१–५२	१९५५–५६	१९६०–६१	१९६५–६६	१९६९–७०	१९७३–७४	१९७८–७९	१९८०–८१
राष्ट्रीय महामार्ग ..	७२	७२	७२	१०७	१०७	१०७	१०८	१०८
राज्य महामार्ग ..	१९९	१९९	२१७	३२५	३२६	३३१	३२४	३२४
प्रमुख जिल्हा मार्ग	८२	१०५	१४३	१६५	२९९	३८४	४१५	४१५
इतर जिल्हा मार्ग ..	६५	५२[३२]	६१	६४	८१	२१५	३२४	३०२
ग्रामीण मार्ग ..	..	..	४३	४६	१३०	४५३	४२९	३६४
अवर्गीकृत मार्ग ..	..	..	..	..	..	..	६६६	७८४
एकूण मार्ग ..	४१८	४२८	५३६	७०७	९४३	१,४९०	२,२६६	२,२९७

[३१] **स्टॅटिस्टिकल ॲब्स्ट्रॅक्ट ऑफ महाराष्ट्र (महाराष्ट्र शासन, मुंबई), व जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, वर्धा, १९६१** (महाराष्ट्र जनगणना कार्यालय, मुंबई).

[३२] वर्गवारीत बदल करण्यात आल्यामुळे लांबी कमी झाली.

तक्ता क्रमांक ३

कृषिमालाची भावपातळी, वर्धा जिल्हा[३३]

वर्ष		भावपातळी (प्रति क्विंटल–रुपये)								
		कापूस	गहू	ज्वारी	बाजरी	हरभरा	तूर	भुईमूग	तुरडाळ	तांदूळ (लुचई)
१९६०	..	१०२	४६	२९	४०	४०	४१.५०	६२	५२	८५
१९६५	..	४४०	८३	५१	९१	७८	४१.५०	६२	५२	९३
१९७०	..	२७९	१०२	५१	७२	९०	११६	६२	१३५	९३
१९७५	..	२७९	१६४	१३०	१०८	१४५	१४७	१७२	१८०	९३
१९८०	..	२७९	१९३	१३८	१४७	३४८	३१३	३६९	३७९	९३
१९८३	..	६१४	२१७	१३४	१५६	३२६	४२१	४७०	५७७	९३
१९८४	..	६१४	२०५	१२३	१६२	४१८	३४८	४८८	९००	९३
१९८५	..	६१४	२११	११८	१५५	४११	३६३	५१७	१०५०	९३
१९८६	..	५५०	२३३	१४६	१६७	३४५	५८९	७७६	११००	९३

[३३] जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा.

तक्ता क्रमांक ४

विविध व्यवसायांत काम करणाऱ्यांचे एकूण कामगारांशी शेकडा प्रमाण, वर्धा जिल्हा, १९६१, १९७१ व १९८१[३५]

व्यवसाय	१९६१		१९७१		१९८१	
	महाराष्ट्र	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा	महाराष्ट्र	जिल्हा
शेतकरी ..	४६.१	३३.९	३५.५	२५.२	३२.०	२७.४
शेतमजूर ..	२३.८	४३.५	२९.३	५१.२	२४.२	४५.५
घरगुती उद्योगधंदे ..	४.४	३.६	३.०	२.५	२.३	१.८
खाणकाम व दगडकाम, पशुसंवर्धन, वनव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, शिकार, आणि रोपणी, फळबागा व तत्सम कामे	२.१	१.७	१.७	१.९		
घरगुती उद्योगांव्यतिरिक्त इतर उत्पादक काम	६.९	३.९	१०.०	४.१		
बांधकाम ..	१.२	०.९	१.५	१.३	४१.५	२५.३
व्यापार व वाणिज्य ..	४.५	३.९	७.०	३.८		
परिवहन, साठवण व दळणवळण ..	२.३	१.४	३.०	१.९		
नोकरी व इतर व्यवसाय ..	८.५	८.०	९.०	८.१		
एकूण कामगार ..	१००.००	१००.००	१००.००	१००.००	१००.००	१००.००

[३४] सेन्सस ऑफ इंडिया, जनरल पॉप्युलेशन टेबल्स, १९६१, १९७१ व १९८१.

तक्ता क्रमांक ५

कामगारांची उपजीविकेच्या साधनानुसार वर्गवारी, १९६१, १९७१ व १९८१[35]

व्यवसाय	१९६१	१९७१	१९८१
शेतकरी ..	१,०७,१४७	७६,९३५	१,१५,०११
शेतमजूर ..	१,३७,६५७	१,५६,२०२	१,९०,६४३
घरगुती उद्योगधंदे ..	११,४७६	७,४७३	७,६७७
खाणकाम व दगडकाम, पशुसंवर्धन, वनव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, शिकार आणि रोपणी, फळबागा व तत्सम कामे	५,४४२	५,६४०	
घरगुती उद्योगांव्यतिरिक्त इतर उत्पादक काम	१२,३१६	१२,७००	१,०५,६८३[36]
बांधकाम ..	२,९९४	३,८३३	
व्यापार व वाणिज्य ..	९,८९५	११,६८१	
परिवहन, साठवण व दळणवळण	४,३१२	५७,७९८	
नोकरी व इतर व्यवसाय ..	२५,३९९	२४,५७३	
एकूण कामगार ..	३,१६,६३८	३,०४,८३५	४,१९,०१४

[35] कित्ता.

[36] यात सीमांत कामगारांची संख्या अंतर्भूत आहे.

तक्ता क्रमांक ६

कामगार महिला व पुरुषांचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण, वर्धा जिल्हा, १९६१, १९७१ व १९८१[३७]

बाब	एकूण कामगार			पुरुष			महिला		
	१९६१	१९७१	१९८१	१९६१	१९७१	१९८१	१९६१	१९७१	१९८१
महाराष्ट्र	१८,९४८,४८१ (४७.९)	१८,३९०,२७९ (३६.५)	२६,७१८,२३० (४२.६)	११,६६२,२६४ (२९.५)	१३,६०३,०३२ (२७.०)	१७,४१५,३४५ (२१.७)	७,२८६,२१७ (१८.४)	४,७८७,२४७ (९.५)	९,३०२,८८५ (१४.८)
वर्धा जिल्हा	३,१६,६३८ (४९.९)	३,०४,८३५ (३९.०)	४,१९,००० (४५.२)	१,८६,२५४ (२९.४)	२,०७,११८ (२६.५)	२,५९,८०० (२८.०)	१,३०,३८४ (२०.५)	९७,७१७ (१२.५)	१,५९,२०० (१७.१)
वर्धा तालुका	१,३३,४०४ (४८.०)	१,३१,४४२ (३६.८)	१,७९,५०० (४२.२)	८२,२३८ (२९.६)	९२,५४६ (२५.९)	१,१५,६०० (२७.२)	५१,१६६ (१८.४)	३८,८९६ (१०.९)	६३,९०० (१५.०)
आर्वी तालुका	९६,८२९ (५४.०)	९३,७०९ (४३.०)	१,२४,३०० (४९.९)	५५,१११ (३०.७)	६१,०३१ (२८.०)	७४,३०० (२९.८)	४१,७१८ (२३.३)	३२,६७८ (१५.०)	५०,००० (२०.०)
हिंगणघाट तालुका	८६,४०५ (५१.६)	७९,६८४ (३९.०)	१,१५,२०० (४५.६)	४८,९०५ (२९.२)	५३,५४१ (२६.२)	६९,९०० (२७.७)	३७,५०० (२२.४)	२६,१४३ (१२.८)	४५,३०० (१८.०)

कंसातील आकडे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण दर्शवितात. तालुकानिहाय आकडे विभाजनपूर्व तालुक्यांचे आहेत.

[३७] **सेन्सस ऑफ इंडिया, जनरल पॉप्युलेशन टेबल्स, १९६१, १९७१ व १९८१.**

तक्ता क्रमांक ७

उपजीविकेच्या साधनानुसार कामगारांची वर्गवारी, वर्धा जिल्हा, १९८१[३८]

वर्गवारी	जिल्हा	ग्रामीण	नागरी
(अ) मुख्य कामगार ..	३,९७,२८२ (९४.७)	३,३५,३८६ (९४.७)	६१,८९६ (९५.६)
१) शेतकरी ..	१,१५,०११ (२७.४)	१,१०,८०७ (३१.३)	४,२०४ (६.५)
२) शेतमजूर ..	१,९०,६४३ (४५.५)	१,८०,३६६ (५०.९)	१०,२७७ (१५.९)
३) घरगुती उद्योग, उत्पादक उद्योग, प्रक्रिया आणि दुरुस्ती	७,६७७ (१.८)	५,७३५ (१.६)	१,९४२ (३.०)
४) इतर कामगार ..	८३,९५१ (२०.०)	३८,४७८ (१०.९)	४५,४७३ (७०.२)
(ब) सीमान्त कामगार ..	२१,७३२ (५.३)	१८,८५९ (५.३)	२,८७३ (४.४)
एकूण कामगार (अ + ब) ..	४,१९,०१४ (१००.००)	३,५४,२४५ (१००.००)	६४,७६९ (१००.००)

कंसातील आकडे एकूण कामगारांशी टक्केवारी दर्शवितात.

[३८] कित्ता, १९८१.

तक्ता क्रमांक ८

कृषी व्यवसायाव्यतिरिक्त इतर व्यवसायांतील कामकरी, वर्धा जिल्हा, १९७१, १९८१[३९]

वर्गीकरण	१९७१		१९८१	
	वर्धा जिल्हा	महाराष्ट्र राज्य	वर्धा जिल्हा	महाराष्ट्र राज्य
व्यावसायिक, तांत्रिक व तत्संबंधित कामकरी	८,८३९ (१२.३३)	५,८९,४५२ (९.१२)	१०,६९८ (११.२३)	८,६५,०३६ (८.९८)
प्रशासकीय, कार्यकारी व व्यवस्थापनविषयक कामकरी	२,३०३ (३.२२)	२,१९,६५६ (३.४०)	२,७६९ (२.९१)	३,४५,१५९ (३.५९)
कारकुनी व तत्संबंधित कामकरी	८,३८० (११.७०)	८,११,७८७ (१२.५७)	११,५०३ (१२.०८)	११,१७,८६७ (११.६१)
विक्री व्यवसायातील कामकरी	९,०८६ (१२.६८)	८,३५,८१० (१२.९४)	११,८०७ (१२.४०)	११,५०,७९० (११.९५)
शेतकरी, कोळी, शिकारी, लाकूडतोडे व तत्संबंधित कामकरी	४,३८१ (६.१२)	२,७१,४१६ (४.२०)	५,५१० (५.७९)	४,४५,१५१ (४.६२)
खाण, दगडखाण व तत्संबंधित कामकरी; वाहतूक व दळणवळण व्यवसायातील कामकरी; कारागीर, उत्पादक उद्योजक आणि ज्यांचे वर्गीकरण अन्यत्र केलेले नाही असे कामकरी	३०,९८४ (४३.२२)	२९,७६,८९३ (४६.०८)	३८,६५० (४०.५९)	४२,३३,१३५ (४३.९६)
सेवा, क्रीडा व मनोरंजन क्षेत्रातील कामकरी	६,३८४ (८.९०)	६,६३,१३२ (१०.२७)	७,१०० (७.४६)	८,०२,४७१ (८.३३)
व्यवसायाच्या दृष्टीने वर्गीकरण करता येत नाही असे कामकरी	१,३४१ (१.८३)	९१,६२० (१.४२)	३,५९० (३.७७)	३,३५,४१८ (३.४८)
रोजगाराच्या शोधात असलेले नवीन कामकरी	..	..	१,८२८ (१.९२)	२,०८,०४२ (२.१६)
व्यवसायाची अपर्याप्त अथवा अस्पष्ट माहिती दिलेले कामकरी	..	..	१,७६४ (१.८५)	१,२७,३७५ (१.३२)
एकूण ..	७१,६९८ (१००.००)	६४,५९,७६६ (१००.००)	९५,२१९ (१००.००)	९६,३०,४४४ (१००.००)

कंसातील आकडे एकूण संख्येशी टक्केवारी दर्शवितात.

[३९] १९७१ करिता **सांख्यिकीय गोषवारा, १९७८–७९**, पृ. ७१.
१९८१ करिता **सेन्सस ऑफ इंडिया, महाराष्ट्र, १९८१, जनरल इकॉनॉमिक टेबल्स, पार्ट थ्री, ए अँण्ड बी (फोर)**, पृ. १०८-२०, ४७६-८८, ५४२-५२, ८९२-०४.

तक्ता क्रमांक ९

जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण विभागांतील घरबांधणीच्या साधनसामग्रीनुसार घरांची संख्या, १९८१ [४०]

नागरी

भिंतीची सामग्री	जनगणना घरे	गवत, पाने, लाकूड, माती, कच्च्या विटा, बांबू	कौले, स्लेट, पत्रे	लोखंड, जस्त व अन्य धातूंचे पत्रे	अॅस्बेस्टॉस सिमेंट पत्रे	विटा, चुना, दगड	दगड	आर. बी. सी., आर. सी. सी.	इतर सामग्री
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
गवत, बांबू, काटक्या ..	५,८१५	१,०००	..	७७०	२०	..	..	..	४,०२५
माती ..	९,११५	३०५	७,५६०	१,०५०	१०	..	..	..	१९०
कच्च्या विटा ..	४,५६५	१००	३,८१०	५२५	३०	३५	..	५०	१५
लाकूड ..	१८०	..	११०	६०	१०	..	..	..	..
पक्क्या विटा ..	२०,६६५	९०	१२,३१५	२,२४०	५५०	६४०	१५	४,५२०	२९५
लोखंडी अथवा इतर धातूंचे पत्रे	२१५	..	९५	७०	५	..	..	४०	५
दगड ..	१७०	..	१५०	५	१०	..	..	५	..
सिमेंट काँक्रीट ..	१,५०५	३०	२१५	४५	६५	१००	..	१,०३०	२०
इतर साधनसामग्री ..	९०	..	५०	१०	..	..	..	५	२५

ग्रामीण

गवत, बांबू, काटक्या ..	२१,१२०	६,५००	..	१,८००	१६०	..	..	..	१२,६६०
माती ..	९९,०७०	६,१७०	८८,३१५	३,९७०	८५	..	..	..	५३०
कच्च्या विटा ..	३,४६२	५५५	२,७४०	३३५	१५	४५	..	४०	३५
लाकूड ..	४६०	४५	२३५	२५	८०	..	..	..	७५
पक्क्या विटा ..	९,८८०	११०	७,५६०	७५०	१९५	३२५	१५	८५०	७५
लोखंडी अथवा इतर धातूंचे पत्रे	३२५	१०	९५	५५	१४०	१०	..	५	१०
दगड ..	१,१०५	५	३८५	३०	६५५	१०	१०	..	१०
सिमेंट काँक्रीट ..	५९५	२०	१९५	२५	१०	५५	५	२७५	१०
इतर साधन सामग्री ..	५३०	७०	१६५	४५	..	५	५	५	२३५

[४०] सेन्सस ऑफ इंडिया, १९८१, महाराष्ट्र, हाऊसहोल्ड टेबल्स, पार्ट अेट, अे ॲण्ड बी (वन), पृ. २५०, ४६६.

तक्ता क्रमांक १०

नागरी व ग्रामीण क्षेत्रातील जनगणना घरांमधील खोल्यांच्या संख्येनुसार वर्गीकरण, वर्धा जिल्हा [४१]

एकूण/ ग्रामीण/ नागरी	घरातील सदस्य संख्या	घरांची संख्या	एकही खोली नसलेले	एक खोली असलेले	दोन खोल्या असलेले	तीन खोल्या असलेले	चार खोल्या असलेले	पाच खोल्या असलेले	सहा खोल्या असलेले	खोल्या नमूद न केलेले	एकूण खोल्यांची संख्या	संस्थागत घरे	ओसाड घरे
एकूण ..	१	१२,६८०	१,०१५	८,००५	१,१८०	१९०	३५	२५	२०	१,५१०	११,३४०	१०	६९०
	२	१५,९७०	१,०००	९,८३०	२,३५५	३६०	१२५	३५	४५	१,८७०	१६,५७०	५	३४५
	३	१९,७८०	१,२१०	१२,१३०	३,३५५	५५०	१३०	४०	२०	२,०७५	२१,३४५	१०	२६०
	४	२६,५६०	१,५८५	१५,५९०	४,९७५	९०५	२००	६०	३०	२,८४०	२९,५३५	५	३७०
	५	३३,१८०	१,६३५	१९,३६५	६,६९५	१,४२०	२८५	७५	९०	३,३८०	४०,१३५	५	२३०
	६ +	७३,२३५	३,२३५	३७,५३०	१८,४६०	४,७८०	१,५३०	४००	४६०	६,२३५	१००,६३०	१३५	४७०
ग्रामीण ..	१	९,५५५	८५५	५,८५०	८२५	१४०	२५	२०	१५	१,३४०	८,२३०	१०	४७५
	२	१२,४२०	८५५	७,३६०	१,८००	२६०	९०	२५	३५	१,६८०	१२,४४०	..	३१५
	३	१५,४४०	१,०५५	९,२५०	२,५१५	३६०	१००	१५	१०	१,९००	१५,९००	५	२३०
	४	२०,८६५	१,३८५	१२,०६०	३,७१५	५७०	११५	४०	१०	२,६१५	२१,९२०	..	३५५
	५	२६,२३५	१,४३०	१५,२७०	५,०३०	९२५	१४५	४५	४५	३,१२०	२९,२४५	५	२२०
	६ +	५४,१६५	२,९४०	२७,८५५	१३,०००	२,९५५	८९५	२३०	१५५	५,६२०	६८,५६५	११०	४०५
नागरी ..	१	३,१२५	१६०	२,१५५	३५५	५०	१०	५	५	१७०	३,११०	..	२१५
	२	३,५५०	१४५	२,४७०	५५५	१००	३५	१०	१०	१९०	४,१३०	५	३०
	३	४,३४०	१५५	२,८८०	८४०	१९०	३०	२५	१०	१७५	५,४४५	५	३०
	४	५,६९५	२००	३,५३०	१,२६०	३३५	८५	२०	२०	२२५	७,६१५	५	१५
	५	६,९४५	२०५	४,०९५	१,६६५	४९५	१४०	३०	४५	२६०	१०,८९०	..	१०
	६ +	१९,०७०	२९५	९,६७५	५,४६०	१,८२५	६३५	१७०	३०५	६१५	३२,०६५	२५	६५

[४१] कित्ता, पृ. ५७६-७७.

प्रकरण ९–प्रशासन

जमीन महसूल

महसूल प्रशासनाचा इतिहास : जमीन महसूल पद्धती प्राचीन काळापासून प्रचलित आहे. इ. स. ३०० च्या सुमारास कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये तत्कालीन प्रशासकीय रचनेसंबंधी उल्लेख आढळतात. त्याकाळीसुद्धा प्रत्येक गावातील किंवा गावांच्या समुहातील जमिनीचे प्रकार आणि महसुलासंबंधीचे सविस्तर अभिलेखविषयक विवरण ठेवणारे अधिकारी होते. जमिनीच्या एकूण उत्पादनापैकी २५ ते ३३ प्रतिशत भाग महसूल म्हणून आकारण्यात येई. वर्धा जिल्ह्याची मुघलपूर्व महसूल प्रशासनाची माहिती उपलब्ध नाही. इ. स. १५९६ मध्ये वऱ्हाड मुघलांनी हस्तगत केला. त्यावेळी त्याचा महसूल ६४,३२,०३,१९४ दाम (४० दाम = १ रुपया) होता. इ. स. १६०१ मध्ये वऱ्हाड सुभ्यातील गाविल सरकारचा महसूल १३,४६,६६,१४० दाम; पवनार सरकारचा १,३४,४०,४०० दाम व खेरला सरकारचा १,७६,००,००० दाम होता.[१] नागपूरच्या भोसल्यांच्या दरबारी ब्रिटिश रेसिडेन्टची नेमणूक झाल्यापासून (जानेवारी १८०४) प्रशासनाची संपूर्ण सत्ता रेसिडेन्टच्या हाती आली. तेव्हापासून वर्धा जिल्ह्याचा महसूल प्रशासनाचा इतिहास प्रथमच सुसंगत स्थितीत आढळतो. इ. स. १९०६ मध्ये प्रकाशित झालेल्या **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर** मधील महसूल प्रशासनाच्या माहितीचा सारांश खाली दिला आहे.[२]

मराठ्यांची महसूल पद्धती : नागपूर संस्थान खालसा केल्यावर १३ मार्च १८५४ पासून नागपूर प्रांतावर ब्रिटिशांची सार्वभौम सत्ता प्रस्थापित झाली. वस्तुतः रेसिडेन्टची नियुक्ती झाल्यापासून सर्व प्रशासन रेसिडेन्टच्याच देखरेखीखाली चाले (१८०४). पुढे रिचर्ड जेन्कीन्स रेसिडेन्ट पदी आल्यावर त्याने १८१८ पासून नवीन प्रशासन पद्धती अमलात आणली होती. तत्कालीन जिल्ह्याच्या परिस्थितीचे जेन्कीन्सने अतिशय सुंदर विवेचन केलेले आहे. त्याच्या अहवालानुसार महसुलाची वार्षिक आकारणी करून परगाण्यासाठी स्थूल रक्कम ठरविण्यात येई आणि परगणा अधिकारी किंवा कमाविसदार पाटलांच्या सल्ल्याने या महसुलाची विभागणी खेड्यांवर करीत. हंगाम सुरू होण्यापूर्वी पाटलांकडून अभिसंकेत घेण्यात येत असले तरी ज्या रकमेची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली जाई ती रक्कम अगोदर ठरलेली नसे आणि हंगामाचे स्वरूप स्पष्ट झाल्यानंतर काही महिन्यांनी त्यांना ती कळविण्यात येई. प्रत्येकाच्या कुवतीनुसार त्या त्या वर्षी सारा भरण्याचे ठरविण्यात आल्यामुळे सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होई. वर्षातील महसुलाबाबत पाटील जेव्हा सुरुवातीचे अभिसंकेत पूर्ण करत त्यावेळी निश्चित किती रकमेसाठी ते जबाबदार आहेत, याची मात्र

---

[१] इर्फान हबीब, **ॲन ॲटलास ऑफ दि मुघल एम्पायर** (ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली, १९८२), पृ. ३६.

[२] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०६, पृ. १८५–२०९.

त्यांना कल्पना नसे. या पद्धतीतून रयतेमध्ये महसूल जबाबदारीचे संविभाजन करण्याची सोय निर्माण झाली. गावच्या मुख्य जमिनीच्या भागाला "चाल" जमीन म्हणत. त्यासाठी खंड निश्चित केलेला नसे. परंतु इतर भागातील चाल जमिनी विचारात घेऊन प्रत्येक शेताची महसूलक्षमता दर्शविणारी किमत ठरविण्यात येई. या किमतीला ऐनवसुली म्हणत. रयतेकडे असणाऱ्या शेताच्या ऐनवसुलीनुसार महसुलाचे संविभाजन करण्यात येई. ज्याच्याकडे ६ पैं ऐनवसुली क्षेत्र होते, त्यास १२ पैं क्षेत्राच्या महसुलाचा निम्मा महसूल भरावा लागे. या पद्धतीमुळे वर्षाच्या सुरुवातीस प्रत्येकाने भरावयाचा महसूल निश्चित करणे शक्य होई. ऐनवसुली प्रत्येक वर्षी बदलत असे. परंतु ही ऐनवसुली खेड्यातील सर्वच जमिनीस लागू होत नव्हती. काही जमिनी वार्षिक कायम भाडेपट्ट्याने दिल्या होत्या. अशा जमिनीस "ठोक" जमीन म्हणत. परंतु ठोक जमिनी हलक्या प्रतीच्या असल्यामुळे त्यात लागवड करण्यास शेतकरी नाखूष असत. गावाचा एकूण वसूल ठरविला जाई, त्यावेळी ठोक जमिनीचा खंड एकूण वसुलातून कमी करून राहिलेला वसूल ऐनवसुलीच्या प्रमाणात चाल जमिनीवर बसविण्यात येई. चाल व ठोक जमिनीतील फरक कायम स्वरूपाचा नसे. जेव्हा जमिनीची उत्पादकता कमी होई त्यावेळेस चाल जमिनी ठोक जमिनी होत व उत्पादन क्षमता वाढे त्यावेळेस ठोक जमिनीचे रूपांतर चाल जमिनीत होई. प्रत्येक वर्षी अभिलेख तयार केले जात. त्यास लागवण म्हणत. उत्तर भारतातील जमाबंदीसारखे त्याचे स्वरूप असे. त्या अभिलेखात रयताचे नाव, त्याच्याकडील चाल जमीन, प्रत्येक शेताची ऐनवसुली याबाबत माहिती समाविष्ट केलेली असे. शेतसाऱ्याची वसुली ठरल्यानंतर ऐनवसुलीच्या प्रत्येक घटकावर जो धारा आकारला जाई त्याचीही या अभिलेखात नोंद केली जाई.

धारणाधिकाराच्या सुरक्षिततेचा अभाव : या महसूल पद्धतीला बाधा येईल असे कोणतेही वंशपरंपरागत हक्क पाटील किंवा रयतेला दिले नव्हते. पाटलाविषयी जेन्कीन्स म्हणतो : " The Patel is the Agent of Government for apportioning and collecting the rent of his villages, for which his responsibility is absolute, and he possesses a subordinate and rather undefined magisterial and judicial authority. The remuneration for agency or responsibility, which is paid either in money or rent-free land besides certain trifling dues and privileges is commonly one-fourth of the Government share, subject to various deductions which reduce it to about one-sixth. The office is held at the pleasure of Government, being neither hereditary nor saleable, and on the ejection or resignation of the incumbent no *malikana* is allowed. It is true that Patels are frequently succeeded by their sons or other members of their family, not however by virtue of any hereditary right, but by sufferance or a new appointment by Government, and whoever the incumbent may be, he is charged with the full exercise of all the duties and entitled to all the privileges of the office unencumbered with any interference or claim on the part of his predecessor or family." [३] पाटलाने दिलेल्या वार्षिक भाडे तत्त्वावर रयतेला जमिनी दिल्या जात. एकाच शेताची कायमची लागवड किंवा भाडेपट्टा एक वर्षाहून अधिक कालावधीसाठी करण्याची पद्धती प्रचलित नव्हती.

---

[३] कित्ता, पृ. १८७.

मराठ्यांनी महसुलात केलेली वाढ : मराठ्यांच्या कारकिर्दीत पिकांच्या हंगामाचे स्वरूप व मध्यवर्ती सरकारची आर्थिक गरज या निकषानुसार महसुलात वाढ किंवा घट केली जाई. यातूनच कायम स्वरूपाची सारा मागणी (ऐनवसुली) सुरू झाली. मराठ्यांनी गोंडांकडून हा प्रदेश काबीज केला त्यावेळस तेथे जी महसूल मागणी प्रचलित होती तीच ही ऐनवसुली जमाबंदी होय. पाटलाच्या सल्ल्याने वार्षिक जमाबंदीच्या वेळी लागवडीच्या कमी–अधिक प्रमाणानुसार या मागणीत फेरफार केला जाई. सारा आकारणी वाढविण्यासाठी मराठ्यांनी ऐनवसूल जमाबंदीच्या काही प्रमाणात कर बसविले. त्याला "पट्टी" किंवा "बारगण" म्हणत. ही पट्टी पहिल्या रघुजी भोसलेच्या काळात (१७२८–५५) ऐन जमाबंदीच्या ८० टक्के होती. पुढील काळात त्यात वाढ होऊन दुसऱ्या रघुजी भोसलेच्या कारकिर्दीत (१७९२–१८१६) ती १३० टक्के झाली. जमीन महसुलाव्यतिरिक्त मराठ्यांनी व्यापार व इतर व्यवसायांवर कर आकारणी करून महसूल वाढविला.

ब्रिटिश व्यवस्थापन : ब्रिटिश व्यवस्थापन कालावधीत वार्षिक जमाबंदी ऐवजी त्रैवार्षिक जमाबंदी लागू करण्यात आली. तसेच प्रशासन उत्साही बनले. वार्षिक कागदपत्रांचे कोष्टक तयार करून प्रत्येक जमिनीला नाव देण्यात आले. तसेच वार्षिक महसूल आकारणी ठरविली. कानूनगो नामक वसुलीची नोंद ठेवणाऱ्या ग्रामाधिकाऱ्याला पावसाळ्यात संबंधित प्रदेशाचा दौरा करून लागवणीची माहिती अधीक्षकाला सादर करावी लागे. सारा वसुली लागवणीवर आधारित होती. त्या पद्धतीत पुढे बदल करण्यात आला. " Instead of being a record of the distribution of the aggregate village assessment, it became a record of the details on which the aggregate village assessment was to be framed."[४] परिणामी पाटलाला खंड पद्धतीची कल्पना असल्यामुळे खेड्यातील मिळकतीची लागवण पद्धती अविश्वसनीय मार्गदर्शक ठरली. गावच्या अविश्वसनीय अभिलेखांमुळे नागपूर व वर्ध्याच्या ३० वर्षीय जमाबंदीच्या वेळेस खेड्यांतील मिळकत ठरविणे शक्य झाले नाही.

मराठ्यांच्या महसूल पद्धतीमुळे महसूल प्रशासनात निर्माण झालेल्या वाईट प्रथा दूर करून सुधारणा केल्या. गाव अभिलेखांत बराच गोंधळ होता. त्या अभिलेखांच्या तपासणीअंती शासनाने महसुलात बरीच सूट सुद्धा दिली. मराठा काळात पुष्कळशी गावे ओसाड पडली होती आणि युद्धानंतर किंमती घसरल्या होत्या. ब्रिटिशांकडे व्यवस्थापन आल्यानंतर त्यांनी लोकांच्यामध्ये विश्वास निर्माण केला. पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी लोकांना प्रोत्साहन दिले. रेसिडेन्टच्या व्यवस्थापनामुळे झालेली सुधारणा खालील विवरणातील आकडेवारीवरून स्पष्ट होते.

वर्ष	महसूल वसुली (रुपये)	वर्ष	महसूल वसुली (रुपये)
१८१८	१२,४६,७७८	१८२२	१३,५७,९४५
१८१९	११,६६,४९०	१८२३	१३,५१,७२२
१८२०	१२,४५,३१०	१८२४	१३,५३,६८२
१८२१	१३,१२,०८४	१८२५	१३,७२,१७२

४ कित्ता, पृ. १८९.

किमतीमध्ये बरीच मोठी घट झाली तरी जमीन महसूल एक लाख रुपयांनी वाढला, तसेच सात वर्षांच्या कालावधीत लागवडीखालील क्षेत्रातही वाढ झाली.

रयतेचे संरक्षण : उत्तरेकडील जिल्ह्यांतील पद्धतीचा अवलंब केल्यानंतर रयतेविषयी पाटलाचे अधिकार मर्यादित व विनियंत्रित करणे हे ब्रिटिश व्यवस्थापनाचे धोरण ठरले. जरी हे धोरण चालू ठेवले असले तरी जेन्कीन्सच्या पाटलांच्या बाजूकडे झुकणाऱ्या ध्येय–धोरणाशी ते जुळणारे नव्हते. जेन्कीन्सने लिहिले की, " It was requisite to touch with a tender hand the relation between the patels and ryots; to avoid unnecessary interference, and discourage litigation; to redress well-founded complaints but mainly to rely on the effects of moderate demands on the part of Government, and equitable conduct in its operations for realising them, as well as on the consequent excitement of competition among the patels for agricultural labour, to produce a gradual amelioration in the condition of the ryots."[५] इतर कर आणि बारगण रद्द करून किंवा त्यांचे खंडाशी एकत्रीकरण करण्यात आले. शिवाय नवीन कर लादण्यावर बंधन घातल्यामुळे रयतेला कोणताही भोगवटा अधिकार देण्यात आला नाही. " There are frequent complaints from ryots against patels for depriving them of fields they have cultivated for many years, the patel either wishing to cultivate the land himself or to raise the rent. No interference is exercised on the part of the Superintendents unless any violation of positive agreement can be made out by the complainant."[६] रयतेचे धारणा अधिकार चालू ठेवण्याचे सरकारने मान्य केले नव्हते. वर्षाच्या सुरुवातीस पाटील व रयतांच्या बैठकीत "पान–विडयाचे" वाटप होई. पाटलाने दिलेल्या पानाचा रयताने केलेला स्वीकार म्हणजेच त्यावर्षी कूळ म्हणून त्याला मिळालेली मान्यता असा अर्थ होई. मि. ॲडॉकने म्हटले आहे की, " In the Resident's account of the relations of the Patel and ryots with the Government, we may first discern that leaning in favour of the Patel as against the ryot which in after years developed into the award by Sir Richard Temple of proprietary rights."[७] देवगड जिल्ह्यातील पाटलांना कुळांकडील खंडाच्या भरण्यातील दिरंगाईबाबत त्यांची गुरे किंवा अवजारे विकण्यास पूर्वीप्रमाणे मुभा नव्हती. कर्जापोटी एखाद्या शेतकऱ्याने गावातून स्थलांतर केले तर थकबाकी दिल्याशिवाय त्याला इतरत्र स्थायिक होता येत नव्हते, अशा तऱ्हेचे आदेश होते.

सन १८५५ मध्ये नागपूरच्या कमिशनरने काढलेल्या आदेशानुसार रयतेने जमीन सुधारणा केल्यास केवळ त्या कारणावरून खंड वाढविण्यास पाटलाला मनाई करण्यात आली. तसेच नवीन धारण क्षेत्राच्या खंड निश्चितीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास तो ग्राम पंचायतीकडे विचारार्थ पाठविण्याची सक्ती करण्यात आली होती. इ. स. १८१८ ते तीस वर्षीय जमाबंदीपर्यंतच्या कालावधीत ब्रिटिशांच्या या धोरणामुळे खंडामध्ये किंवा सारा आकारणीत वाढ झाली नाही. कुळांचा खंड वाढविण्यास

[५] **कित्ता**, पृ. १९१.

[६] **कित्ता**, पृ. १९१.

[७] **कित्ता**, पृ. १९१–९२.

पाटलाला मनाई करण्यात आली. कारण त्याने तसे केले असते तर भाडेपट्टा आणि त्याच्या महसुलातील वाटा वाढला असता. बऱ्याच कालावधीतील फेर तपासणीच्या अभावी खंडाच्या दरात ढळढळीत असमानता निर्माण झाली.

ब्रिटिश रेसिडेन्टच्या सुधारणांमुळे चांगली स्थिती प्राप्त झालेला आणि महसुलात वाढ झालेला देवगड प्रदेश १८३० मध्ये नागपूरच्या राजाकडे सोपविण्यात आला. परंतु १८३०–१८५४ या कालावधीत व्यवस्थापनात ढिलाई निर्माण झाली. नागपूरच्या राजाने जरी ब्रिटिश महसूल आकारणी पद्धत चालू ठेवली, तरी ती यशस्वीरीत्या राबविण्यात कुचराई झाल्यामुळे एकूण महसुलात घट झाली. सेटलमेंट ऑफिसर, भंडारा, याने याबाबत लिहिले की, "During the time of Subahs which followed the British Protectorate the same means of discovering the resources of the villages were resorted to, but as the eye of the master became less searching, so did the labours of the subordinate decrease. In the course of time, each succeeding assessment was made on the rent-roll, the size of the home farm was also attended to and a greater or less precentage on the gross assets allowed according to the reputed value of the home lands. When the Patels and cultivators came to understand that so much depended on the accounts they themselves showed, the amounts so exhibited had a tendency to decrease. Sudden diminutions were naturally suspected and were looked into, but a Patel who managed skilfully had little difficulty in lightening his burdens."[८] तीस वर्षीय जमाबंदीबाबत ज्यावेळेस अन्वेषण करण्यात आले, त्यावेळेस गाव अभिलेखांत नोंदलेला खंड अगदीच अविश्वसनीय असल्याचे आढळून आले. चांद्यामधील भोसले राजवटीत वंशपारंपरिक पाटलांची दडपशाही वाढली होती. परंतु तिसऱ्या रघुजीच्या अधिकाराखालील वर्धा आणि नागपूर भागात अशी कृत्ये घडण्यास विशेष संधी मिळाली नाही. या दोन भागांचा महसूल १८३० मध्ये १३.८७ लाख रुपयांवरून १८५४ मध्ये १३.०८ लाख रुपयापर्यंत कमी झाला.

तीस वर्षीय जमाबंदी (१८६०–६६) : जमाबंदीचे काम सुरू होण्यापूर्वी वर्धा आणि नागपूर भागांचा महसूल ११.५६ लाख रुपये होता. जमाबंदीचे आदेश जरी १८६० मध्ये निर्गमित केले होते, तरी वर्ध्याच्या प्राथमिक सर्वेक्षणाचे काम १८५८ मध्ये सुरू झाले होते. जमाबंदीच्या प्रारंभी वर्धा नागपूर जिल्ह्याचा भाग होता. सन १८६२ मध्ये स्वतंत्र वर्धा जिल्हा अस्तित्वात आला व १८६६ मध्ये जमाबंदी पूर्ण करण्यात आली. या काळात नागपूर व वर्धा जिल्ह्यांतील काही गावांचे फेरवाटप करण्यात आले. जिल्ह्याच्या जमाबंदीसाठी शिवाई जमा (सिवाई) म्हणजेच शेत-साऱ्याशिवाय इतर वसुली वगळून राहिलेल्या गाव उत्पन्नाच्या ६० टक्के महसूल मागणी हे तत्त्व ठरविण्यात आले. निव्वळ सारा आकारणीत वाढ न करता परि-स्थितीनुरूप सारा सूट देणे आणि सारा आकारणीतील अनियमितपणा दूर करणे या बाबी नजरेसमोर ठेवून सारा आकारणी करण्यात आली. पूर्वीच्या मराठा सारा आकारणीचे दर फारच जास्त होते. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने दऱ्हाडात स्थलांतर केल्याचे १८५७ मध्ये आढळून आले. सुधारित जमाबंदीच्या वेळेस सर्वसाधारण

[८] **कित्ता,** पृ. १९३.

महसूल भार जाचक नव्हता. तरीही पुष्कळशा खेड्यांचा महसूल मोठ्या प्रयासाने वसूल करण्यात आला. सुधारित जमाबंदीमुळे जिल्ह्याच्या एकूण महसुलात काही फरक पडला नाही. परंतु शेतकऱ्यांना फायदा मिळाला. वर्धा जिल्ह्याच्या काही भागातील महसूल मात्र १० टक्क्यांनी वाढविण्यात आला. एकूण ९८८ खेड्यांपैकी, २१९ खेड्यांना महसूल सूट देण्यात आली, ३९५ खेड्यांच्या आकारणीत वाढ करण्यात आली आणि राहिलेल्या ३७४ खेड्यांच्या बाबतीत काही बदल केला नाही.

जमाबंदीचा परिणाम : जिल्ह्याच्या तत्कालिन भागावर ५.२३ लाख रुपये महसूल आकारणी करण्यात आली. गाव मिळकतीचा ६.७२ लाख रुपये अंदाज करण्यात आला आणि मिळकतीच्या ७९ टक्क्यापर्यंत महसूल कमी झाला. पिकाखालील दर एकरी महसूल भार ९ आणे ७ पै होता. विश्वसनीय कागदपत्रांच्या अभावी जमाबंदी अनुभवाधिष्ठित होती आणि त्यामुळे काही खेड्यांची सारा आकारणी जास्त होती. तसेच जमाबंदीसाठी १८६२ पूर्वीच्या किमती आधारभूत मानल्या होत्या. त्यामुळे अमेरिकन युद्धामुळे (१८६१–१८६५) झालेली भाववाढ विचारात घेतली नाही. जमाबंदी पूर्ण झाल्यानंतर लगेच मुंबईशी रेल्वे वाहतूक सुरू झाली. तथापि १८६२ पूर्वीची किंमत पातळी दृष्टिपथात आली नाही.

भूकर सर्वेक्षण (१८८७–१८८९) : तीस वर्षीय जमाबंदीसाठी गाव अभिलेख व जमिनीचे नकाशे तयार करण्यात आले होते. परंतु नंतर त्यांचे जतन करण्यात आले नाही. सन १८८४ पर्यंत पटवाऱ्यांची नेमणूक झाली नव्हती. सर्वेक्षणासाठी पटवारी व भूमापकांची मदत घेण्यात आली. दुर्बिण भूमापक सर्वेक्षण १८८७ मध्ये सुरू होऊन १८८९ मध्ये पूर्ण झाले. त्यासाठी प्रत्येक चौरस मैलाचा खर्च २४ रुपये आला. भूकर सर्वेक्षण १८८८ मध्ये हाती घेऊन १८९१ मध्ये पूर्ण करण्यात आले. त्याचा खर्च प्रति चौरस मैलास २५ रुपये आला.

मलिक मकबुझा : तीस वर्षीय जमाबंदीच्या वेळेस ३५,००० एकरांवर (वहिवाटीच्या ४ टक्के) मलिक मकबुझा म्हणजे मालकीहक्क प्रदान करण्यात आले. हे धारणाधिकार गावच्या उत्पन्नाच्या हिश्श्याऐवजी ज्यांनी जमीन घेतलेली आहे अशा मालकाच्या कुटुंबातील व्यक्तीला किंवा मुकादम कुटुंबाच्या प्रतिनिधीस किंवा ज्यांच्याकडून जमिनी काढून घेतलेल्या आहेत व ज्या कुळांनी जमिनीची मोठ्या प्रमाणावर सुधारणा केली आहे अशा व्यक्तींना प्रदान केले. ४५,००० रुपयांपासून ५१,००० रुपयांपर्यंत भाडेमूल्य वाढविण्यात आले. त्यानुसार दर एकरी दर १५ आणे ७ पै झाला. हा दर तीस वर्षीय जमाबंदीच्या तुलनेने (१ रुपया २ पै) बराच कमी होता. मलिक मकबुझा जमीन स्थायिक नसलेल्या ब्राह्मणांकडे असून ते पोटभाड्याने देतात. सुमारे ४४ टक्के जमीन पोटभाड्याने दिली होती आणि दर एकरी सरासरी भाडेमूल्य १ रुपया १४ आणे ६ पै होते.

पूर्ण वहिवाटदार कूळ : तीस वर्षीय जमाबंदीच्या वेळेस २,०६,००० एकरांचे पूर्ण भोगवटा धारणाधिकार देण्यात आले. या धारणाधिकारांपैकी काही विशेषाधिकार काढून टाकल्यामुळे जमाबंदीच्या सुरुवातीच्या काळात जवळजवळ ३२,००० एकरांचे धारणाधिकार क्षेत्र कमी करण्यात आले. भाडेमूल्य १.४५ लाख रुपयांहून १.८२ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आले.

वहिवाटदार कूळ : जमाबंदीच्या कालावधीत वहिवाट धारणाधिकाराखालील क्षेत्र १,५१,००० एकरांहून ४,२४,००० एकरांपर्यंत वाढले. हे क्षेत्र एकूण वहिवाट क्षेत्राच्या ३७ टक्के होते. याबाबतच्या भाडेमूल्यामध्ये लक्षणीय वाढ झाली नाही. परंतु दर एकरी भार ९ टक्क्यांनी वाढला. भाडे अधिनियमातील हक्कांची इतर जिल्ह्यातील कुळापेक्षा या जिल्ह्यातील कुळांना चांगली जाणीव होती. सेटलमेंट ऑफिसरने असे नमूद केले आहे की, भोगवटा अधिकार प्राप्त झाल्यानंतर जुन्या सामान्य कुळांनी त्यांच्याकडील अभिलेखात नोंदलेल्या भाडेमूल्यात वाढ करण्यास नकार दिला. या प्रकरणातील कुळांच्या बाबतीत भाडेमूल्य ३.३२ लाख रुपयांहून ४.०५ लाख रुपयांपर्यंत वाढविले. त्यामुळे दर एकरी भाडेमूल्याचा दर १५ आणे ३ पै झाला.

सामान्य कूळ : सामान्य कुळांकडे ४,३४,००० एकर क्षेत्र होते. परंतु भोगवटा अधिकार प्राप्त झाल्यामुळे हे क्षेत्र २,७४,००० एकरांपर्यंत कमी झाले. सामान्य कुळाकडील जमिनीच्या बाबतीत दर एकरी भाडेमूल्य ९ आणे २ पै होते, ते वाढून १३ आणे १० पै झाले. जमिनीची निगमन किंमत फक्त १.८८ लाख रुपये व भाडेमूल्य २.३७ लाख रुपये असल्यामुळे भाडेमूल्यात वाढ झालेली आढळली. त्यामुळे सर्वसाधारण वृद्धीचा विचार करण्यात आला नाही, तथापि रक्कम अदा करण्यातील असमानता दूर करण्यात आली आणि भाडेमूल्यातील जादा वाढ मालगुजारांच्या संमतीने कमी करण्यात आली. त्यानुसार भाडेमूल्य २.३१ लाखावर निर्धारित करण्यात आल्यामुळे प्रति एकरी दर १३ आणे ६ पै झाला. भाडेमूल्यातील समायोजन खालीलप्रमाणे होते.

(प्रति एकरी दर)

कुळाचा प्रकार		१८६३ च्या जमाबंदीच्या वेळेस	पुनरीक्षणा-पूर्वी	पुनरीक्षणानंतर
		आणे पै	आणे पै	रुपये आणे पै
पूर्ण वहिवाटदार कूळ	..	१२ – १०	१३ – २	१ – ० – ८
वहिवाटदार कूळ	..	११ – ५	१२ – ६	० – १५ – ३
सामान्य कूळ	..	९ – २	१३ – १०	० – १३ – ६
सरासरी	..	१० – ७	१३ – १	० – १५ – ०

किंमत वाढीच्या प्रमाणात ही वाढ अल्प होती आणि मालगुजारांनी सामान्य कुळांवर लादलेल्या वाढीपेक्षाही कमी होती. पोटभाड्याने दिलेल्या जमिनीच्या आकडेवारीवरून असे दिसते की, पूर्ण वहिवाट क्षेत्राच्या ३० टक्के व वहिवाट क्षेत्राच्या २६ टक्के क्षेत्र दुप्पट दराने कुळांनी पोटभाड्याने दिले होते. सन १८६३ च्या जमाबंदीच्या वेळेस एकूण भाडेमूल्य ५.२५ लाख रुपये होते, ते मालकांनी ७.१३ लाख रुपयांपर्यंत व सेटलमेंट ऑफिसरने ८.१८ लाख रुपयांपर्यंत वाढविले. इतर

दोन कुळांपेक्षा सामान्य कुळांना कमी दराने आकारणी केली होती. ही भाडेमूल्य आकारणीची एक विशेषता होती. याला कारण म्हणजे सामान्य कुळाकडील निकृष्ट प्रतीची जमीन होय.

मालकांची स्वतःची जमीन आणि इतर उत्पन्न : मालकांच्या स्वतःच्या जमिनीपैकी १,३६,००० एकर सिरा (sir) (उत्कृष्ट) जमीन होती तर ६६,००० एकर खुदकास्त जमीन होती. ही एकूण जमीन वहिवाटीच्या १८ टक्के होती. या जमिनीच्या मूल्य निर्धारणासाठी १ रुपया ९ पै दर आकारण्यात आला. त्याचवेळी रयतेसाठी १५ आणे आणि पूर्ण वहिवाट क्षेत्रासाठी १ रुपया ८ पै दर होता. ही जमीन उत्तम प्रतीची असून दर एकरी २ रुपये ४ आणे १० पै या दराने ३०,००० एकर क्षेत्र पोटभाड्याने दिले होते. शिवाई, म्हणजे शेतसाऱ्याव्यतिरिक्त इतर वसुली उत्पन्न, ३१,००० रुपये धरण्यात आले. पूर्वीच्या जमाबंदीच्या वेळेस ते १४,००० रुपये होते आणि त्यावर आकारणी केली नव्हती. मालगुजारांना जंगल उत्पादनापासून बरेच उत्पन्न मिळत होते. गावच्या पडीक क्षेत्राचे उत्पन्न दर एकरी १ आणा ९ पै शिवाई होते.

मिळकतींची तुलना : पूर्वीची जमाबंदी व पुनरीक्षणाच्या वेळी असलेल्या मिळकतीची आकडेवारी खाली दिली आहे.

	३० वर्षीय जमाबंदी (रुपये)	१८९२–९४ मधील जमाबंदी (रुपये)
मलिक मकबुझाचा भरणा व कुळांचा खंड ..	५,६०,०००	८,६९,०००
सिरा आणि खुदकास्त जमिनीचा खंड ..	९८,०००	२,१४,०००
शिवाई उत्पन्न ..	१४,०००	३२,०००
एकूण ..	६,७२,०००	११,१५,०००

महसुलातील वाढ : मलिक मकबुझा वगळता मिळकतीच्या ६० टक्के सारा आकारणी करण्याचे प्रमाण सरकारने स्वीकारले होते. डोंगराळ प्रदेशातील उत्पन्न फार महत्त्वाचे नसले तरी तुलनेने जादा होते. त्यासाठी कमी दर आकारण्यात आले. पूर्वीच्या जमाबंदीच्या वेळेस खेड्यातील मिळकतीच्या ६० टक्के भाग व उच्चतम मिळकतीचा ६५ टक्के भाग धरण्यात आला होता. परंतु भारत सरकारच्या आदेशाने नंतर हे उपाय रद्द करण्यात आले आणि ११,००० रुपये महसूल कमी करून सारा आकारणी ६० टक्के करण्यात आली. सुधारित महसूल ६.६४ लाख रुपये (सुधारित मिळकतीच्या ५९¾ टक्के) झाला. मलिक मकबुझा भरणा वगळता ही टक्केवारी ५८ टक्के होती. प्रत्यक्ष महसुलातील वाढ १.३२ लाख रुपये होती. एकूण ६.६४ लाख रुपये महसुलापैकी २१,००० रुपये अभिहस्तांकित केले. त्यामुळे निव्वळ महसूल ६.४३ लाख रुपये झाला

लागवडी क्षेत्राच्या प्रति एकराचा महसूल भार १० आणे २ पै होता. पूर्वीच्या जमाबंदीच्या वेळेस हा दर ९ आणे ७ पै होता. तसेच लागवड क्षेत्र १८ टक्के आणि गाव मिळकत ६५ टक्क्यांनी वाढली.

जमाबंदीचा कालावधी व खर्च : नवीन जमाबंदी १८९३ ते १८९५ या कालावधीमध्ये सुरू झाली आणि तिची मुदत १९१० ते १९१२ मध्ये संपली. भूकर सर्वेक्षणाचा आणि जमाबंदीचा एकूण खर्च १.३२ लाख रुपये होता. मालगुजारी भागातील प्रति चौरस मैलाचा खर्च ६० रुपये होता. इतर प्रांतातील जमाबंदीशी तुलना करता ही जमाबंदी कमी खर्चात पार पडली.

खास धारणाधिकार आणि उपखंड : जिल्ह्यामध्ये जमीनदारी मालमत्ता नसून सर्व खेड्यांची आकारणी सामान्य धारणाधिकारानुसार करण्यात आली. जवळजवळ ३,००० एकर क्षेत्र वेस्ट लँड नियमाखाली अन्यसंक्रमित करण्यात आले. जिल्ह्यात वनग्रामे किंवा रयतवारी खेडी नव्हती. खंड सहसा वस्तूंच्या रूपात स्वीकारला जात नसे. शेती उत्पादनाच्या हिश्श्याच्या करारावर जमिनी पोटभाड्याने देण्याची प्रथा ही प्रत्यक्षात मजुरांना रोजगार पुरविण्याची पद्धत होती. वाईट हंगामाच्या वेळेस मालक खंड वसूल करू शकत नसे. परंतु पुष्कळ वेळा बियाण्याची वसुली बतीयादाराकडून करण्यात येई.

महसूल-मुक्त आणि उक्ता खंड (Quit-Rent) **अनुदान :** सन १९०३–०४ मध्ये खेड्यांतील ७२,००० एकर जमीन व धारण क्षेत्रापैकी ६,५०० एकर क्षेत्र सारा-मुक्त होते. आणि २७,००० रुपयांचा महसूल अभिहस्तांकित करण्यात आला होता. जमाबंदी काळापासून अभिहस्तांकित महसुलामध्ये वाढ झाली. परंतु महसुल-मुक्त अनुदानात वाढ झाल्याचे निदर्शनास आले नाही. नागपूरच्या राजाच्या खाजगी मालमत्तेमधील उक्त खंड व महसूल–मुक्त अशा २२ खेड्यांचा महत्त्वाच्या मुआफी (Muafi) अनुदानात समावेश केला होता. पाच खेड्यांचा समावेश असलेली पहाड फरीद नावाची मालमत्ता नागपूरच्या भूतपूर्व गोंड राजाने गिरडमधील मुसलमान अवलीयाच्या कबरीच्या परिरक्षा खर्चासाठी दिली होती. हे अनुदान ब्रिटिश सरकारने पुढे चालू ठेवले.

महसुलातील तात्पुरती सूट : हिंगणघाट तहसीलमधील मुख्यतः गव्हाचे उत्पादन करणाऱ्या भागावर वाईट हंगामामुळे प्रतिकूल परिणाम झाला आणि त्यामुळे तेथे महसुलात तात्पुरती सूट देण्यात आली. सन १८९७–९८ पासून ही सूट २ ते ४ वर्षांकरिता देण्यात आली. त्यामुळे एकूण ९,००० रुपये महसुलाची हानी झाली. पुन्हा सन १९०० च्या दुष्काळामुळे ६२ गावांमधील महसुलात सूट देण्यात आली. या गावांतील एकूण पिकाखालील क्षेत्रात दुष्काळामुळे १५ टक्क्यांनी घट झाली. सन १९०२–०३ पासून लागोपाठ तीन वर्षांकरिता देण्यात आलेल्या सुटीमुळे शासनाची १६,००० रुपये महसुलाची हानी झाली. जमाबंदीनंतर वाईट हंगामामुळे उत्पादनात घट झाली तरी शेतकऱ्यांनी महसूल भरणा मात्र वेळच्या वेळी केला.[१]

---

[१] **कित्ता,** पृ. १८५–२०९.

जिल्ह्यात १८८०–८१, १८९०–९१, १९००–०१ व १९०३–०४ मध्ये अनुक्रमे रुपये ४,७९,५११, रुपये ५,१९,७७१, रुपये ६,७२,२८८ व रुपये ६,४१,६३८ जमीन महसूल गोळा झाला होता.

इ. स. १८९५ मध्ये जमाबंदीची पहिली फेरतपासणी करण्यात आली. त्यानंतर बरीच वर्षे पिकांच्या असमाधानकारक हंगामामुळे तसेच १८९६–९७ व १८९९–१९०० मध्ये दुष्काळ पडल्यामुळे १९०३ मध्ये पहिली जमाबंदी अमलात आली. तिची मुदत १९१०–१२ पर्यंत वाढविण्यात आली. जमाबंदीच्या दुसऱ्या फेरतपासणीची मुदत १९३०–३२ मध्ये समाप्त झाली. परंतु त्यानंतर अद्याप जमाबंदीची फेरतपासणी झालेली नाही.

सध्या जिल्ह्यात प्रचलित असलेली सारा आकारणी पद्धती स्थूलमानाने महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच आहे. जमीन महसूल ठरविताना कृषीयोग्य जमीन, बिगर शेतजमीन आणि इतर उपयोगाखालील जमिनीचे मूल्यनिर्धारण करताना जमिनीचा प्रकार, मूल्यांकन व उत्पादनक्षमता विचारात घेतली जाते. जिल्ह्यातील जमीन महसुलाची १९६५–६६ पासूनची आकडेवारी तक्ता क्रमांक १ मध्ये दिलेली आहे.[१०]

इतर महसूल : जमीन महसुलाबरोबरच शासनाला इतर करांद्वारे उत्पन्न मिळते, त्यामध्ये जाहिरात कर, शिक्षण उपकर, रोजगार हमी कर, करमणूक कर, मुद्रांक शुल्क व नोंदणी फी यांचा समावेश होतो.

करमणूक कर चित्रपट व इतर मनोरंजन कार्यक्रमांवर (उदा. यात्रेमधील फिरते पाळणे व खेळ, व्हिडिओ व प्रवेश शुल्क असलेले मेळावे) आकारला जातो. मुंबई करमणूक कर अधिनियम, १९५८ नुसार करमणूक कर जमा करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याला सक्षम प्राधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. जिल्हाधिकारी तहसीलदारांना तालुक्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नेमतो. डिसेंबर १९७२ पर्यंत या करवसुलीकरिता व चित्रपटगृहांच्या तपासणीकरिता स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमला नव्हता. परंतु १ डिसेंबर १९७२ पासून करमणूक कर चुकविण्याच्या प्रवृत्तीला आळा घालून कराची वसुली करण्यासाठी जिल्ह्यासाठी एक निरीक्षक नेमण्यात आला.

करमणूक करासंबंधी आकडेवारी खाली विवरणात दिली आहे.

(रुपये)

वर्ष		करमणूक कर	अधिभार	जाहिरात कर
१९६५–६६	..	२,४७,७५१	उ. ना.	उ. ना.
१९७०–७१	..	५,७५,२२५	उ. ना.	उ. ना.
१९७५–७६	..	८,८६,३११	२,३१,३५९	उ. ना.
१९८०–८१	..	१६,५७,५३६	४,०२,३३६	२,७९९
१९८६–८७	..	४७,१४,२९४	उ. ना.	उ. ना.
१९८८–८९	..	४६,५६,५४६	उ. ना.	उ. ना.

उ. ना. = उपलब्ध नाही.

[१०] सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिलेले आहेत.

शैक्षणिक उन्नतीसाठी संचित निधी जमा करण्यास्तव १९६२ पासून शिक्षण उपकर आकारण्यात येतो. हा उपकर नगरपालिका हद्दीतील जमिनी, इमारती आणि विशिष्ट नगदी पिकांवर आकारला जातो. नगरपालिकेला हा महसूल गोळा करण्यासाठी सेवा शुल्क दिले जाते. शिक्षण उपकराचा महसूल खाली दिला आहे.

(लाख रुपये)

वर्ष	वसूल रक्कम	वर्ष	वसूल रक्कम
१९७७–७८	.. ०.६८	१९८१–८२	.. ६.००
१९७८–७९	.. १.००	१९८५–८६	.. १.०३
१९७९–८०	.. १.५०	१९८७–८८	.. १.६६
१९८०–८१	.. ५.५५	१९८८–८९	.. १.७६

रोजगार हमी योजना राबविण्यासाठी १९७५ पासून रोजगार हमी कर दोन प्रकारे वसूल केला जातो : (१) नगरपालिका हद्दीतील ज्या जमिनी व इमारती बिगर निवासी कामासाठी वापरल्या जातात त्या मिळकतीवर एक ते तीन टक्के या प्रमाणित दराने वार्षिक भाडे किमतीच्या प्रमाणात कर बसविला जातो. (२) जलसिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या जमिनीवरील पिकांवर प्रति हेक्टरी २५ रुपये प्रमाणे कर आकारला जातो.

रोजगार हमी कराचा महसूल खाली दिला आहे.

(लाख रुपये)

वर्ष	वसूल रक्कम	वर्ष	वसूल रक्कम
१९७७–७८	.. ०.९७	१९८१–८२	.. १.१०
१९७८–७९	.. १.५०	१९८५–८६	.. ०.९६
१९७९–८०	.. २.५०	१९८७–८८	.. ०.४९
१९८०–८१	.. १.६०	१९८८–८९	.. १.०६

प्रशासकीय व्यवस्था

सध्याचा वर्धा जिल्हा **ऐन-इ-अकबरी** (१६०१) अनुसार खेरला, गाविलगड व पवनार सरकारमध्ये विभागला होता.[११]

जिल्हा निर्मिती : डिसेंबर १८५३ मध्ये तिसरा रघुजी भोसले मरण पावल्यावर गादीला वारस नसल्यामुळे ब्रिटिशांनी नागपूर संस्थान खालसा करून १३ मार्च

[११] अधिक माहितीसाठी **प्रकरण-२ इतिहास** पहावे.

१८५४ पासून ब्रिटिश रेसिडेन्टची सत्ता प्रस्थापित केली. इ. स. १८६१ मध्ये सेंट्रल प्रॉव्हिन्सेस नामक प्रांताची निर्मिती केली. त्यावेळेस सध्याचा वर्धा जिल्हा नागपूर जिल्ह्यात समाविष्ट होता. तथापि प्रशासनिक अडचणी, उद्योगधंदे व कापसाची मोठी बाजारपेठ यांचा साकल्याने विचार करून ब्रिटिशांनी १८६२ मध्ये नागपूर जिल्ह्याचे विभाजन करून वर्धा जिल्हा निर्माण केला. जिल्ह्याचे मुख्यालय सुरुवातीस पुलगावजवळील कवठा गावी होते. इ. स. १८६६ मध्ये ते पालकवाडी येथे हलविण्यात आले व त्यास वर्धा नाव देण्यात आले. इ. स. १८६२ ते १८६६ या कालावधीत नागपूर व वर्धा जिल्ह्यांतील गावांची अदलाबदल करण्यात आली. नागपूर जिल्ह्यातील आष्टी परगणा, कोंढाळी व केळझरमधील काही भाग तसेच जुन्या गिरड परगण्यातील अधिकांश भाग वर्धा जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला. तर वर्धा जिल्ह्यातील बेला परगण्यातील १२२ गावे नागपूर जिल्ह्यास जोडण्यात आली.[१२] प्रशासनाच्या सोयीसाठी जिल्ह्याची वर्धा, आर्वी व हिंगणघाट तालुक्यांत विभागणी केली. इ. स. १९०६ मध्ये वर्धा तालुक्यात ४६९, आर्वीमध्ये ४९७ व हिंगणघाटमध्ये ४१५ गावे होती.

मध्यप्रातांच्या निर्मितीनंतर प्रशासनासाठी चीफ कमिशनरची नेमणूक करण्यात आली. चीफ कमिशनरचा दर्जा गर्व्हनरपेक्षा कमी होता. तसेच त्यास गर्व्हनरपेक्षा अधिकारही कमी होते. इ. स. १८९६ ते १९०० दरम्यान मध्यप्रांतात पडलेल्या दुष्काळावर मात करण्यासाठी भारत सरकारला या प्रांताला ताबडतोब मदत करणे जरुरीचे होते. या प्रांताला दीर्घ मुदतीचे महसुली उत्पन्न प्राप्त होण्यासाठी हैद्राबादच्या निजामाकडून वऱ्हाडचा भाग भाडेपट्ट्याने घेण्यात आला आणि १९०३ मध्ये तो सेंट्रल प्रॉव्हिन्सेसला जोडण्यात आला.[१३] त्यापूर्वी हा भाग बेरार (वऱ्हाड) प्रांतात होता. इ. स. १९२८ मध्ये सर्व पक्षीय परिषदेने बेरार प्रांत हा सेंट्रल प्रॉव्हिन्सेसपासून वेगळा करावा अशी चळवळ सुरू केली. परंतु ही चळवळ १९३३ मध्ये थंडावली. या दरम्यान हैद्राबादच्या निजामाने बेरार प्रांत सेंट्रल प्रॉव्हिन्सेसमध्ये ठेवण्यास संमती दिल्याने हा प्रांत वेगळा करण्यात येणार नाही असे भारत सरकारने जाहीर केले. इ. स. १९५६ पर्यंत हा भाग मध्यप्रदेश राज्यात समाविष्ट होता. भाषावार प्रांतरचनेनुसार झालेल्या राज्य पुनर्रचनेनंतर (१९५६) वर्धा जिल्हा द्विभाषिक मुंबई राज्यात आणि मे १९६० पासून महाराष्ट्र राज्यात विलीन करण्यात आला. इ. स. १९८१ मध्ये प्रशासकीय सोयीसाठी विदर्भातील सर्व जिल्ह्यांची पुनर्रचना करून महाराष्ट्रातील उर्वरित विभागाप्रमाणे पंचायत समितीचे क्षेत्र हा एक तालुका समजून वर्धा जिल्ह्याची पुनर्रचना केली. त्यानुसार वर्धा, आर्वी व हिंगणघाट तालुक्यांची पुनर्रचना करून एकूण सात तालुके करण्यात आले. तसेच दिनांक १५ ऑगस्ट १९८४ रोजी आर्वी व कारंजा तालुक्यांची दुसऱ्यांदा पुनर्रचना करून आष्टी तालुका निर्माण केला. इ. स. १९८५ मध्ये जिल्ह्यात एकूण ९६१ वस्ती असलेली गावे व ४२० ओसाड गावे होती.[१४] ओसाड गावांच्या बाबतीत या जिल्ह्याचा महाराष्ट्रात वरचा क्रमांक लागतो. प्रशासकीय कारभारासाठी हा

---

[१२] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०६, पृ. १९४.

[१३] **बेकर, डि. यू. ई.** पूर्वोक्त, पृ. ९.

[१४] **वर्धा जिल्हाधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित.**

जिल्हा तीन उपविभागात विभागला असून त्यातील तालुक्यांची लोकसंख्या व क्षेत्रफळ खालीलप्रमाणे आहे.

उपविभाग	तालुका	क्षेत्रफळ[१५] (चौ. कि. मी.)	लोकसंख्या
वर्धा ..	वर्धा	७५६.१३७	२,०२,६८०
	देवळी	६४७.८७२	१,२८,७३४
	सेलू	७०१.९०४	९३,६०१
आर्वी ..	आर्वी	८८१.७९२	१,३०,०२५
	कारंजा	४७४.९९०	५६,६२८
	आष्टी	६१८.५१०	६२,२२८
हिंगणघाट ..	हिंगणघाट	९०५.०९१	१,५७,०९४
	समुद्रपूर	१,०४३.३३७	९५,४४७

जिल्हाधिकारी : सन १८६२ मध्ये जिल्हा निर्मिती झाल्यापासून वर्धा जिल्ह्याची प्रशासकीय यंत्रणा डेप्युटी कमिशनरच्या नियंत्रणाखाली होती. मुंबई इलाख्यातील जिल्हाधिकाऱ्यांना जी कर्तव्ये पार पाडावी लागत ती सर्व कर्तव्ये डेप्युटी कमिशनर पार पाडत असे. ब्रिटिश प्रशासनाचा प्रतिनिधी म्हणून त्यास सर्वाधिकार होते. महसूल प्रशासनाव्यतिरिक्त पोलीस प्रशासनावरसुद्धा त्याची काही बाबतीत सत्ता असे. जिल्हा दंडाधिकाऱ्याची भूमिका तोच बजावत असे. पुढे डेप्युटी कमिशनरऐवजी जून १९४७ मध्ये कलेक्टरची नेमणूक करण्यात आली. श्री. के. एम. दस्तूर हे या जिल्ह्याचे पहिले जिल्हाधिकारी होते.

स्वातंत्र्यपूर्व काळी डेप्युटी कमिशनरच्या कामाचे स्वरूप बरेच भिन्न होते. स्वातंत्र्य आंदोलन चिरडण्यासाठी सरकाराला मदत करणे हा देखील त्याच्या कामाचा भागच होता. जिल्हा प्रशासनाचा प्रमुख, जिल्हा दंडाधिकारी व इंग्रज सरकारचा प्रतिनिधी असे त्याच्या कामाचे स्वरूप होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जिल्हाधिकाऱ्याच्या कामाचे स्वरूप खूपच बदलले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापनेमुळे जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकार क्षेत्रावर मर्यादा पडत गेल्या व त्याचे अधिकार कमी झाले. इ. स. १९५३ पासून न्यायदानाचे काम हे शासनांगापासून वेगळे करण्यात आल्यामुळे तो कार्यभार कमी झाला आहे. तसेच १९६२ पासून जिल्हा परिषदेकडे विकासविषयक कामे सोपविली गेली. तरीसुद्धा जिल्हाधिकाऱ्याचे जिल्हा प्रशासनात शासनाचा प्रतिनिधी म्हणून महत्त्वाचे स्थान टिकून आहे. जिल्ह्यातील मुलकी कारभार आणि शांतता व सुव्यवस्था राखण्याची महत्त्वाची कामे करावी लागतात.

[१५] जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.

जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांच्या कार्यांमध्ये समन्वय साधून विकास योजना सुकर करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यावर असते. त्यासाठी जिल्हा स्तरावर समन्वय समिती नेमलेली आहे. जिल्हा प्रशासनात जिल्हाधिकाऱ्याला मदत करण्यासाठी जी शंकोनात्मक (Pyramidal) पद्धती आहे त्यात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडल निरीक्षक, पटवारी व पाटलाचा समावेश असतो.

वर्धा, आर्वी व हिंगणघाट उपविभागांच्या प्रशासनिक कारभारासाठी उपविभागीय अधिकारी नेमलेले आहेत. नियोजन व विकास कार्यक्रमात वाढ झाल्यामुळे उपविभागीय अधिकाऱ्याच्या कामात वाढ झालेली आहे. उपविभागीय अधिकारी हा तहसीलदार आणि जिल्हाधिकाऱ्यामधील दुवा असतो. तहसीलदार हा तालुक्याचा मुख्य महसूल अधिकारी असतो. जिल्ह्यात आठ तालुके असून त्या ठिकाणी तहसीलदार व दोन नायब तहसीलदार आहेत. ते उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यास महसुलासंबंधी मूलभूत स्वरूपाची मदत करतात. तहसीलदाराला महसुलाव्यतिरिक्त तगाई कर्ज, विक्रीकर, उत्पादन शुल्क व इतर सरकारी महसुलाची वसुली तसेच काही न्यायिक कामे करावी लागतात. त्यात मामलेदार कोर्ट कायद्यानुसार चौकशी आणि आदेश, दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यांची कार्यवाही, जमीन महसुलाच्या वसुली अर्जाबाबत निर्णय, प्रत्येक खेड्यातील अधिकार अभिलेखांच्या संबंधातील तंट्याची चौकशी इत्यादी कामांचा समावेश होतो. तहसीलदार पदसिद्ध तालुका दंडाधिकारी असून फौजदारी व्यवहार संहितेनुसार त्याला सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ते अधिकार असतात.

तहसीलदाराला मदत करण्यासाठी आणि ग्रामपातळीवरील पटवाऱ्याच्या कामावर देखरेख ठेवण्याचे काम मंडल निरीक्षक करतो. ब्रिटिश राजवटीत त्यांना महसूल निरीक्षक म्हणून संबोधित असत. इ. स. १९०६ मध्ये वर्धा तालुक्यात देवळी, सेलू व सालोद; आर्वी तालुक्यात आष्टी, कारंजा व रसूलाबाद आणि हिंगणघाट तालुक्यात वडनेर, मांडगाव व गिरार येथे महसूल निरीक्षक होते. एका महसूल निरीक्षकाच्या अधिकाराखाली २४ पटवारी व १५३ महसूल गावे होती.[१६] सध्या मंडल निरीक्षकाच्या अधिकाराखाली सुमारे ३५ ते ४० गावे असतात. इ. स. १८८४ पर्यंत जिल्ह्यात पटवाऱ्यांची नेमणूक केली नव्हती. गाव कारभाराचे दस्तऐवज व विकासासंबंधीच्या नोंदी तसेच महसूल गोळा करण्याचे काम मालगुजार करीत होते. या पद्धतीमुळे गावच्या कागदपत्रात व महसुलात एकसूत्रीपणा नव्हता. यासाठी १८८४ मध्ये मालगुजारांच्या संमतीने पटवाऱ्यांच्या नेमणुकीस सुरुवात झाली. दस्तऐवज व पिकांच्या नोंदी, जमीन महसूल इत्यादी कामे त्यांच्याकडे सोपविण्यात आली आणि त्यासाठी त्यांना वंशपरंपरागत वतने दिली. काही पटवारी पगारी होते. इ. स. १८९४–९५ मध्ये जिल्ह्यात २१७ पटवारी होते. त्यापैकी ८१ वर्धा तालुक्यात, ७६ हिंगणघाट तालुक्यात व ६० आर्वी तालुक्यात होते. यामध्ये २१ वंशपरंपरागत कुलकर्णी पटवारी होते.[१७] एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रत्येक खेड्याकरिता स्वतंत्र पोलीस पाटलाची व्यवस्था नव्हती. मुलकी पाटील हाच बहुतांशी पोलीस पाटलाचे काम करी. त्याच्या हाताखाली शेतसनदी शिपाई असत. दिनांक १ जानेवारी १९६३ पासून

---

[१६] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९०६, पृ. ११–१२.

[१७] कित्ता, पृ. २११.

मुलकी पाटलांची पदे रद्द करण्यात येऊन त्यांची सर्व कामे पोलीस पाटलांकडे सोपविण्यात आली. सध्या जी कामे कोतवाल करतो ती पूर्वी महार करीत असत. गावकीवर नेमून दिलेल्या महारांना "पोडवार" म्हणत व घरची कामे करणाऱ्याला "राबता महार" किंवा "घर महार" म्हणत. ही कामे करण्याकरिता त्यांना वंशपरंपरागत वतने दिलेली होती त्यावेळी कोतवालाकडे एक किंवा दोन गावे असत. यासाठी त्यांना पगार तसेच रयतेकडून सालबंदी मिळत असे. इ. स. १९१२ मध्ये कोतवालांची संख्या खालीलप्रमाणे होती.[१८]

तालुका		वेतनानुसार कोतवालांची संख्या		
		४३ ते ४८ रुपये	४९ ते ५४ रुपये	५५ ते ६० रुपये
वर्धा	..	१८७	९०	१७३
हिंगणघाट	..	११७	७४	१२०
आर्वी	..	१८०	२२४	५८

वंशपरंपरागत गावकामगार पद्धती १९५९ मध्ये रद्द करण्यात येऊन मासिक वेतनावर कोतवालांची नेमणूक करण्यात आली. प्रत्येक गावात एक किंवा दोन कोतवाल असतात.

पोलीस यंत्रणा

जिल्ह्यात १९०४ मध्ये पोलीस यंत्रणेतील ३७३ कर्मचाऱ्यांमध्ये जिल्हा अधीक्षक दोन निरीक्षक, आठ उपनिरीक्षक, ५५ जमादार व ३०७ शिपाई होते. याशिवाय ८७ जणांचे राखीव पोलीस दल होते. रेल्वे पोलीस दलात एक सार्जंट, दोन मुख्य शिपाई व १७ शिपाई होते. त्याचवर्षी जिल्ह्यात नऊ पोलीस स्टेशन व १५ पोलीस चौक्या होत्या.[१९] इ. स. १९६८ मध्ये ८३२ पोलिसांपैकी ४२ अधिकारी होते. या संख्येत वाढ होऊन १९७८ मध्ये जिल्ह्यात एकूण सहा पोलीस निरीक्षक, ३६ फौजदार, २२२ जमादार व ६६३ शिपाई होते. वर्गवारीनुसार पोलिसांची संख्या व पोलीस ठाण्यांसंबंधी माहिती तक्ता क्रमांक २ मध्ये दिलेली आहे.

पोलीस अधीक्षक हा जिल्ह्यातील पोलीस यंत्रणेचा प्रमुख आहे. इ. स. १९८६ मध्ये वर्धा व आर्वी उपविभागांत अनुक्रमे सहा व सात पोलीस ठाणी होती. वर्धा, हिंगणघाट व पुलगावला मंडल पोलीस निरीक्षक होते. पोलीस मुख्यालयात बिनतारी संदेश, वैद्यकीय विभाग, मोटार विभाग, शस्त्रविभाग, स्थानिक गुन्हे शाखा व विशेष शाखा आहेत.

कोर्टातील कामकाज पाहण्यासाठी १९८६ मध्ये एक वरिष्ठ पोलीस अभियोक्ता व पाच पोलीस अभियोक्ते होते. वर्धा येथे तीन व आर्वी आणि हिंगणघाटला प्रत्येकी एक अभियोक्ता होता. जिल्ह्यात घडलेल्या गुन्ह्यांची वर्गवारीनुसार संख्या तक्ता क्रमांक ३ मध्ये दिलेली आहे. सन १९०६ च्या **गॅझेटिअर**नुसार जिल्ह्यातील गुन्हेगारीचे प्रमाण विशेष लक्षणीय नव्हते. तथापि दिवाणी दाव्यांचे प्रमाण या प्रांतातील इतर जिल्ह्यांपेक्षा मोठे होते.

---

[१८] **रिपोर्ट ऑन दि लँड रेव्हेन्यू सेटलमेंट ऑफ दि वर्धा डिस्ट्रिक्ट**, १९०८–१२.

[१९] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९०६, पृ. २१९–२०.

कारागृह

सन १८९४ च्या तुरुंग कायद्यानुसार कारागृहांची प्रस्थापना करण्यात आली. जुन्या काळातील देखरेख किंवा रखवाली स्वरूपातील कार्यात बदल करून बंदिवानांचा शिक्षेचा कालावधी हा शिस्त, सुधारणा घडवून आणण्याकरिता, समाजात कायद्याची बंधने पाळणारा व शांतताप्रिय नागरिक म्हणून पुनर्वसन करण्यासाठी उपयोगात आणला जातो. स्वातंत्र्या-पूर्वी भारतात अस्तित्वात असलेले कारागृह प्रशासन इंग्रजी न्यायपद्धतीचे एक उपांग होते. रिफॉर्मेटरी स्कूल ॲक्ट (१८९७), प्रिझन्स ॲक्ट (१९००), आयडेंटीफिकेशन ॲण्ड प्रिझन्स ॲक्ट (१९२०), एक्सचेंज ऑफ प्रिझन्स ॲक्ट (१९४८), ट्रान्सफर ऑफ प्रिझन्स ॲक्ट (१९५०) आणि प्रिझन्स ॲक्ट १९५५ अन्वये कारागृह व्यवस्थापनात वेगवेगळ्या सुधारणा व तरतुदी करण्यात आल्या.

वर्ध्याला वर्ग तीनचे जिल्हा कारागृह १८६८ मध्ये बांधण्यात आले. सिव्हिल सर्जनच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या या कारागृहाची क्षमता ८१ होती. त्यात १९०१ व १९०४ मध्ये अनुक्रमे ५२ व ५७ कैदी होते.[२०] कैद्यांसाठी १९०४ मध्ये रुपये ५,६०० खर्च झाले. कारागृहातील मुख्य उद्योग खडी फोडण्याचा होता. सध्या जिल्हा कारागृहाव्यतिरिक्त आर्वी व हिंगणघाटला पोलीस लॉकअप आहेत. जिल्हा कारागृहाची क्षमता ८९ असून तेथे सहा महिन्यांची शिक्षा झालेले कैदी ठेवतात. जिल्हा कारागृहामध्ये बंदिवानांची संख्या खालीलप्रमाणे होती.

वर्ष		न्यायाधीन बंदी		सिद्धदोष बंदी	
		पुरुष	महिला	पुरुष	महिला
१९७७–७८	..	१,९९८	५९	८६८	३०
१९८०–८१	..	२,०७४	४३	७०७	१४
१९८५–८६	..	२,५८६	७४	५८९	१३

जिल्हा कारागृहाभोवती दहा हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी आठ हेक्टरमध्ये भाजीपाला व इतर पिके घेतात. शेतमालापासून १९७७–७८ व १९८५–८६ मध्ये अनुक्रमे २१,५४५ व ८२,४८० रुपयांचे उत्पन्न मिळाले. कारागृहात कैद्यांना आध्यात्मिक पाठ देण्यात येतात तसेच भजन, किर्तनाचे कार्यक्रम केले जातात.

नगरसेना

नागरी संरक्षण कार्यात शासनाला मदत करण्यासाठी वर्ध्याला नगरसेनेची १९४७ मध्ये स्थापना करण्यात आली. तथापि प्रत्यक्ष नगरसेना नियुक्तीस प्रारंभ झाला १९६३ मध्ये. त्यावर्षी आर्वी व हिंगणघाटला आणि १९६६ मध्ये वर्ध्याला पथक उभारण्यात आले.

[२०] **किस्ता**, पृ. २२१.

नगरसेना सैनिकांना प्रशिक्षण देण्याकरिता १९७७ मध्ये जिल्ह्यात १३ प्रशिक्षण केंद्रे होती. त्याद्वारे पद कवायत, शस्त्र कवायत, अग्निशमन, विमोचन, प्रथमोपचार, शारीरिक शिक्षण, पीक संरक्षण व हत्यारांचे प्रशिक्षण देण्यात येते. सन १९८७ मध्ये १,२०० नगरसेना सैनिक होते.

न्यायालये

नागपूरकर भोसल्यांच्या काळी स्थानिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या न्यायनिवाड्यावर थेट दरबाराकडे अपील करण्यास मुभा होती. तथापि स्थानिक अधिकाऱ्यांची दंडेली व मालगुजारांच्या प्रभावामुळे दरबाराकडे अपील करण्याचे धाडस फारच थोडे लोक दाखवीत असत. जिल्हा न्यायालय १८६४ चे सुमारास स्थापन झाले. ब्रिटिशांनी न्यायदानात बरीच सुधारणा करून संहिता अमलात आणली. तथापि १९२१ पर्यंत न्यायशाखा स्वतंत्र नव्हती. महसूल विभागाकडेच न्यायदान करण्याचे अधिकार होते. सन १९२१ मध्ये स्वतंत्र न्यायशाखा निर्माण करण्यात आली, तरीसुद्धा डेप्युटी कमिशनरला व तहसीलदारांना न्यायविषयक काही अधिकार होते. न्यायदानाचे काम शासनांगापासून १९५३ मध्ये वेगळे करण्यात आले.

जिल्हा व सत्र न्यायाधिशाच्या हाताखाली दोन सहाय्यक न्यायाधिश आणि इतर सत्र न्यायाधिश काम करतात. त्यांच्या अधिकार कक्षेत संपूर्ण जिल्हा येतो. ते दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे मूळ दावे आणि अपिलाचे काम पाहतात.

दिवाणी न्यायाधिशाच्या पुढे जिल्ह्यातील दिवाणी विशेष मूळ दावे आणि दिवाणी साधारण मूळ दावे चालतात.

वर्ध्याला दोन दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठस्तर) आणि मॅजिस्ट्रेट प्रथम वर्ग आहेत. हिंगणघाट आणि आर्वी येथे दोन दिवाणी न्यायाधीश आणि मॅजिस्ट्रेट प्रथम वर्ग आहेत. ते दिवाणी आणि फौजदारी खटले चालवितात. विशेष मॅजिस्ट्रेट प्रथम वर्ग यांचे मुख्यालय नागपूर येथे असून ते जिल्ह्यातील मोटार वाहनविषयक फौजदारी खटले चालवितात. तक्ता क्रमांक ४ मध्ये दिवाणी व फौजदारी न्यायालयांनी केलेल्या कामाची आकडेवारी दिली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था

वर्धा जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा ब्रिटिशपूर्व काळातील इतिहास उपलब्ध नाही. इतके मात्र खरे की, वाकाटक काळी गावाचे नियंत्रण करणाऱ्या ग्रामपंचायती व न्यायदान मंडळे अस्तित्वात होती. मर्यादित अधिकार कक्षेत स्वायत्त ग्रामीण न्यायव्यवस्था रूढ होती. गोंड काळीसुद्धा अशा संस्था कार्यरत होत्या.

इ. स. १८५७ च्या भयानक उद्रेकानंतर ब्रिटिशांनी जनमानसावर ठसा उमटविण्यासाठी काही सुधारणा केल्या. कालांतराने लॉर्ड रिपनच्या सुधारणांनुसार सी. पी. अँड बेरार प्रांतासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कायदा, १८८३ मध्ये संमत करण्यात आला. या कायद्यान्वये काही गावांचे गट बनवून ग्रामीण स्थानिक प्रशासन क्षेत्र बनविले. प्रत्येक गटासाठी एक लोकल बोर्ड व जिल्ह्यासाठी डिस्ट्रिक्ट कौन्सिल स्थापण्यात आले. लोकल बोर्ड

डिस्ट्रिक्ट कौन्सिलचे प्रतिनिधी म्हणून काम करीत. त्यामुळे त्यांना फक्त समर्पिक अधिकार होते. स्थानिक प्रशासन व्यवस्था भक्कम पायावर उभी करून स्थानिक संस्थांना अधिक अधिकार देण्याच्या उद्देशाने १९२० मध्ये मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक स्वराज्य कायदा (C. P. and Berar Local Government Act) अमलात आणला.

रवि शंकर शुक्लांचे पहिले कॉंग्रेस मंत्रिमंडळ १९३७ मध्ये अस्तित्वात आल्यावर ग्राम संस्थांना अधिक प्रातिनिधिक करण्याचा प्रथमच प्रयत्न झाला. त्यानुसार १९३९ मध्ये मध्यप्रदेश आणि वऱ्हाड स्थानिक स्वराज्य संस्था (दुरुस्ती) अधिनियम अमलात आणून महत्त्वाची सुधारणा करण्यात आली. सन १९४६ च्या व्हिलेज पंचायत ॲक्टनुसार एक हजाराहून अधिक लोकसंख्येच्या प्रत्येक गावासाठी व त्याहून कमी लोकसंख्येच्या ग्राम-समुहासाठी ग्रामपंचायत निर्माण करण्यात आली. प्रत्येक प्रौढ व्यक्तीस मतदानाचा हक्क प्रदान करून पंचायतीची निवडणूक घेण्यात येई. निवडून आलेल्या सभासदांमधून सरपंच व उपसरपंचाची निवड केली जाई. ग्रामपंचायतीच्या कार्याची अनिवार्य व वैकल्पिक अशा दोन वर्गात वर्गवारी करून सार्वजनिक आरोग्य, रस्ते बांधणी, जन्म–मृत्यू नोंदणी, पाणी-पुरवठा आणि सार्वजनिक हिताची कामे अनिवार्य करण्यात आली. वैकल्पिक कार्यांमध्ये कृषी विकास, सहकार, पशुसंवर्धन सुविधा, धर्मशाळा इत्यादी कार्यांचा समावेश करण्यात आला. उपरोक्त कायद्यानुसार "जनपद सभा" व्यापक पायावर उभारण्यात येऊन त्यांना अधिकार प्रदान करण्यात आले. जनपद सभा ही यंत्रणा या प्रदेशाची खास यंत्रणा होती. लोकल बोर्ड व डिस्ट्रिक्ट कौन्सिल नष्ट करून प्रत्येक तालुक्यासाठी जनपद सभा निर्माण करण्यात आली. जनपद सभांचे कार्य पूर्वीच्या यंत्रणेपेक्षा अधिक व्यापक होते. प्रारंभी जनपद सभा शासन नियुक्त होत्या. इ. स. १९५२ मध्ये त्या लोकनियुक्त बनल्या. सन १९५६ च्या राज्य पुनर्रचनेनंतरही १९६२ पर्यंत जनपद सभा कार्यरत होत्या.

ग्रामपंचायतींच्या इतिहासातील पुढील टप्पा म्हणजे १९५८ चा बॉम्बे व्हिलेज पंचायत ॲक्ट या प्रदेशातही अमलात आला. या अधिनियमानुसार ग्रामपंचायतींना अधिकाधिक अधिकार प्राप्त झाले. जिल्ह्यासाठी डिस्ट्रिक्ट व्हिलेज पंचायत ऑफिसर नेमण्यात आला.

पंचायत राज

पंचायत राज स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियमानुसार वर्धा जिल्ह्यात १९६२ मध्ये जिल्हा परिषद आणि सात पंचायत समित्या निर्माण करण्यात आल्या. आर्वी व कारंजा पंचायत समित्यांचे विभाजन करून १५ ऑगस्ट १९८४ रोजी आष्टीची आठवी पंचायत समिती स्थापन करण्यात आली. सांप्रत काळी वर्धा, देवळी, सेलू, हिंगणघाट, समुद्रपूर, आर्वी, कारंजा व आष्टी येथे पंचायत समित्यांची मुख्यालये आहेत.

जिल्हा परिषदेचे कामकाज स्थायी समिती आणि अर्थ, बांधकाम, कृषि, शिक्षण, आरोग्य व समाजकल्याण या विषय समित्यांमार्फत चालते. आय. ए. एस. संवर्गातील मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद प्रशासनाचा प्रमुख असतो. परिषदेचा अध्यक्ष लोकनियुक्त असून त्यास विपुल अधिकार आहेत. प्रत्येक विषय समितीसाठी सभापती असतो तर प्रत्येक पंचायत समितीच्या लोकनियुक्त प्रमुखासही सभापती असेच म्हणतात.

लोकांचा अधिकाधिक सहभाग प्राप्त करून विकास कार्याची प्रगती करण्यास्तव जिल्हा परिषद कार्यरत आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्त्व समोर ठेवून जिल्हा परिषदेची लोकनियुक्त यंत्रणा उभी करण्यात आलेली आहे. ही यंत्रणा कार्यकारी यंत्रणेवर देखरेख ठेवते. त्यासाठी लोकप्रतिनिधींना बरेच अधिकार देण्यात आलेले आहेत. जिल्ह्यातील कृषी अर्थव्यवस्था, दळणवळण, कुटिरोद्योग, पशुसंवर्धन, आरोग्य सुविधा व ग्रामीण भागातील शिक्षण सेवा याबाबत नियोजन करून आराखडे तयार करण्यात येतात. जिल्हा नियोजनाची प्रक्रिया सुरू केल्यापासून परिषदेच्या विकास कार्याला विशेष गती प्राप्त झाली आहे (याबाबतची अधिक माहिती प्रकरण ८—आर्थिक विकास यात दिलेली आहे.) लोक-प्रतिनिधींच्या सहभागाने तयार केलेल्या योजना जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या कार्यकारी यंत्रणेद्वारे राबविल्या जातात. प्रत्यक्ष कार्यवाहीचा आढावा घेण्याची लोक प्रतिनिधींना संधी मिळते. त्यामुळे प्रशासन यंत्रणेवर त्यांचा अंकुश राहतो.

वर्धा जिल्हा परिषदेचे उत्पन्न व खर्चाची माहिती तक्ता क्रमांक ५ मध्ये दिली आहे.

जिल्ह्यातील पंचायत समित्यांची त्रोटक उपलब्ध माहिती खाली दिली आहे.

पंचायत समिती, वर्धा : या समितीची १ एप्रिल १९५८ रोजी विकास खंड म्हणून स्थापना झाली. या विकास खंडामध्ये प्रथम स्तर व द्वितीय स्तरामध्ये भरीव विकास कार्य झाले असून सध्या हा खंड पोस्ट स्टेज दोनमध्ये कार्यरत आहे. समितीच्या अधिकार क्षेत्रात १५३ गावे असून ७० ग्रामपंचायती व ४९ गट ग्रामपंचायती आहेत. समितीचे भौगोलिक क्षेत्र ७५६.१३ चौ. कि. मी. असून १९८१ च्या जनगणनेनुसार पंचायत समितीची लोकसंख्या १,१६,७८३ होती.[२१]

पंचायत समिती, देवळी : ही समिती विकास खंडाच्या द्वितीयोत्तर अवस्थेत आहे. पंचायत समितीमध्ये १४६ खेडी असून ६० ग्रामपंचायती आहेत. या विकास खंडाचे क्षेत्रफळ ६३४.९६ चौ. कि. मी. असून १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८१,६५३ होती.

पंचायत समिती, सेलू : या विकास खंडाची स्थापना राष्ट्रीय सेवा विस्तार गट म्हणून १९५३ मध्ये झाली. पंचायत समितीमध्ये १७६ गावे असून ६० ग्रामपंचायती आहेत. समितीचे भौगोलिक क्षेत्र ६३९.२३ चौ. कि. मी. असून १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८८,५३२ होती.

पंचायत समिती, हिंगणघाट : इ. स. १९५७ मध्ये सुरू झालेल्या या विकास खंडाचे १९६२ मध्ये हिंगणघाट पंचायत समितीमध्ये रूपांतर झाले. दिनांक १ मे १९८६ रोजी या पंचायत समितीमधून तरोडा, सावली व साक्रा ही गावे वर्धा पंचायत समितीमध्ये समाविष्ट करण्यात आली. त्याच वेळी समुद्रपूर पंचायत समितीमधून सावली वाघ, सेलू, मुरपाड, मानोरा, सेगाव व वैजापूर ही गावे या पंचायत समितीला जोडण्यात आली.[२२] पंचायत समितीमध्ये १८६ गावे आहेत.

पंचायत समिती, समुद्रपूर : या विकास खंडाची स्थापना १ एप्रिल १९५७ रोजी झाली. हा विकास खंड द्वितीयोत्तर अवस्थेत कार्यरत आहे. समितीमध्ये २३० गावे असून ७२

[२१] जिल्हा परिषद वर्धा, **वार्षिक प्रशासन अहवाल,** १९८६–८७, पृ. २७४.

[२२] **कित्ता.**

ग्रामपंचायती आहेत. समितीचे कार्यक्षेत्र ९६३.३३ चौ. कि. मी. असून १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ९२,०३६ होती.

पंचायत समिती, आर्वी : या समिती अंतर्गत २२४ गावे असून ६५ ग्रामपंचायती आहेत. समितीचे एकूण क्षेत्र ७८६.१ चौ. कि. मी. असून १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८५,७४६ होती. ही पंचायत समिती २६ डिसेंबर १९८४ रोजी बरखास्त करून प्रशासक नेमण्यात आला.

पंचायत समिती, कारंजा : या विकास खंडाची स्थापना १९५७ मध्ये झाली होती. सध्या ही समिती विकास खंडाच्या तिसऱ्या अवस्थेत आहे. समितीच्या कार्यक्षेत्रात ११८ गावे असून क्षेत्रफळ ४०६.०० चौ. कि. मी. असून १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ७०,२९१ होती. दिनांक २६ डिसेंबर १९८४ रोजी समिती बरखास्त करून प्रशासक नेमण्यात आला.

पंचायत समिती, आष्टी : ही पंचायत समिती १५ ऑगस्ट १९८४ रोजी आर्वी व कारंजा तालुक्यांची दुसऱ्यांदा पुनर्रचना करून अस्तित्वात आली. समितीच्या अधिकाराखाली ४६६.२१ चौ. कि. मी. क्षेत्र असून त्यात १५३ गावे, १० स्वतंत्र ग्रामपंचायती व २६ गट ग्रामपंचायती आहेत. १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ५७,१६८ होती.

पंचायत राज प्रणालीच्या प्रारंभानंतर शासनाने ग्रामपंचायतींचे कार्यक्षेत्र वाढविले आहे. त्यासाठी त्यांना अनेक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. ग्रामपंचायतींच्या कामकाजात दैनंदिन गावकारभार आणि विकासविषयक कामांना अग्रक्रम देण्यात आला आहे. शेती सुधारणा व लघु सिंचनाच्या काही योजना ग्रामपंचायतींकडे सोपविण्यात आलेल्या आहेत. शिवाय पाणीपुरवठा, शाळा व इतर सार्वजनिक इमारती बांधणे, गावाची स्वच्छता व रोग प्रतिबंधक उपाययोजना, संकटग्रस्तांना मदत, विकासासाठी सहकारी चळवळींना प्रोत्साहन, विहिरी, रस्ते, मोऱ्या व पुलांचे बांधकाम, अशा प्रकारची कार्ये पार पाडण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर टाकण्यात आली आहे. शिवाय ग्राम संरक्षण, शांतता आणि सुव्यवस्थेसाठी शासनाला मदत करण्याचीही जबाबदारी टाकण्यात आली आहे.

ग्रामपंचायतींना घरे व मालमत्तेवरील कर, जकात, बाजार कर व जिल्हा परिषदेचे अनुदान या बाबींपासून उत्पन्न मिळते. जमीन महसुलाच्या ३० टक्के रक्कम अथवा दरडोई एक रुपया या दोहोमध्ये जी रक्कम अधिक असेल तेवढे सरकारी अनुदान ग्रामपंचायतीस मिळते. सन १९७२–७३ पासून हे अनुदान १०० टक्क्यापर्यंत वाढविण्यात आले असून वाढीव रकमेपैकी ५० टक्के रक्कम ग्रामपंचायतींना ग्रामीण रोजगार योजनावर खर्च करावी लागते. तक्ता क्रमांक ६ मध्ये एकूण ग्रामपंचायती व सभासद संख्या व तक्ता क्रमांक ७ मध्ये ग्रामपंचायतींचे उत्पन्न व खर्च दिलेला आहे.

नगरपालिका

आर्वी, हिंगणघाट व देवळी येथे १८६७ मध्ये नगरपालिका स्थापन करण्यात आल्या. त्यानंतर वर्धा, पुलगाव व सिंदी नगरपालिका स्थापन झाल्या. राज्य पुनर्रचनेपूर्वी जिल्ह्यातील नगरपरिषदांचा कारभार सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँन्ड बेरार म्युनिसिपालिटीज ॲक्ट,

१९३२, नुसार चालत होता. हा जिल्हा महाराष्ट्र राज्यात विलीन झाल्यानंतर नगरपरिषदांचा कारभार १९६५ च्या महाराष्ट्र म्युनिसिपालिटीज ॲक्टनुसार चालतो. हा अधिनियम १५ जून १९६६ पासून अंमलात आला. सर्व नगरपालिका पूर्णपणे लोकनियुक्त असून त्यांच्या अधिकारकक्षेत अधिकाधिक बाबी आणलेल्या आहेत. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत. नगरपालिकेचा कार्यकाल पाच वर्षांचा असून शासनाला काही विशिष्ट परिस्थितीत ही मर्यादा सहा वर्षांपर्यंत वाढविण्याचे किंवा त्या अगोदर ती बरखास्त करण्याचा अधिकार आहे. इ. स. १९६५ च्या उपरोक्त अधिनियमानुसार संचालक, नगरपालिका प्रशासन, सर्व नगरपालिकांवर नियंत्रण ठेवतो. नगरपालिकांचे 'अ' 'ब' आणि 'क' असे वर्ग पाडले असून वर्धा व हिंगणघाट नगरपालिका 'ब' वर्गात तर आर्वी, देवळी, सिंदी व पुलगाव नगरपालिका 'क' वर्गात मोडतात.

आर्वी नगरपालिका (स्थापना १८६७) : सन १९०१ मध्ये १२ सदस्यांची समिती असून त्यापैकी तीन सभासद नामनिर्देशित व नऊ निवडून दिलेले होते. त्यावर्षी शहराची **लोकसंख्या** १०,६७६ होती. इ. स. १८६७, १९०१ व १९०४–०५ मध्ये पालिकेचे उत्पन्न अनुक्रमे ३०,०००; १४,००० व ३०,००० रुपये व खर्च २२,८००; १४,००० व २३,००० रुपये होता. सन १९८६–८७ मध्ये नगराचे क्षेत्रफळ ३.१६ चौ. कि. मी. व ३० प्रभाग (वॉर्ड) होते. सन १९८१ मध्ये शहराची लोकसंख्या ३१,११९ होती. शहराला सारंगपुरी तलावातून पाणीपुरवठा केला जातो. शिवाय २४२ खाजगी व ८८ सार्वजनिक विहिरी आहेत. नगरपालिका नऊ प्राथमिक शाळा, एक विद्यालय व उच्च माध्यमिक शाळा, पशुवैद्यक सहाय्य केंद्र, क्षय रुग्णालय, सार्वजनिक दवाखाना व दोन आयुर्वेदिक दवाखाने चालविते. नगरपालिका उद्यानात बालवाडी व प्राणीसंग्रहालय आहे.

हिंगणघाट नगरपालिका (१८६७) : प्रारंभी नगरपालिकेचा कारभार शासन नियुक्त प्रशासकीय अधिकारी चालवित होता. इ. स. १९०१ मध्ये परिषदेच्या १२ सदस्यांमध्ये तीन नामनिर्देशित व नऊ निवडून आलेले होते. तेव्हा शहराची लोकसंख्या १२,६६२ होती. इ. स. १९०१ व १९०४–०५ मध्ये परिषदेचे उत्पन्न अनुक्रमे ३५,००० व ६८,००० रुपये व खर्च ३५,००० व ७२,००० रुपये होता. सन १९१८ मध्ये लोकप्रतिनिधींच्या हाती कारभार आला. सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळामार्फत विद्युतपुरवठा केला जातो. सन १८५३ पासून वेणा नदीवरील पंपींग स्टेशनमधून शहराला पाणीपुरवठा केला जात होता. नंतर १९६७ मध्ये पाण्याची टाकी बांधून पाणीपुरवठ्यात वाढ करण्यात आली. इ.स. १९८६–८७ मध्ये नगराचे क्षेत्रफळ ६.४८ चौ. कि. मी. व ३९ प्रभाग होते. सन १९८१ मध्ये शहराची लोकसंख्या ५९,०७५ होती. नगरपालिका दोन पूर्व प्राथमिक, १४ प्राथमिक व **दोन** माध्यमिक शाळा, एक रुग्णालय, सुतिकागृह व कुटुंब कल्याण केंद्र चालविते.

देवळी नगरपालिका (१८६७) : इ. स. १९०१ मध्ये परिषदेच्या सात सभासदांपैकी दोन नामनिर्देशित व पाच निवडून आलेले होते. तेव्हा शहराची लोकसंख्या ५,००८ होती. इ. स. १९०३–०४ व १९०४–०५ मध्ये परिषदेचे उत्पन्न अनुक्रमे ६,००० व ६,५०० रुपये आणि खर्च ६,६०० व ५,८०० रुपये होता. सन १९८६–८७ मध्ये नगराचे क्षेत्रफळ ८.१ चौ. कि. मी. व २० प्रभाग होते. सन १९८१ मध्ये शहराची लोकसंख्या

११,५६६ होती. सन १९८६–८७ मध्ये नगरपालिका तीन पूर्वप्राथमिक, चार प्राथमिक व एक माध्यमिक शाळा, सुतिकागृह, दवाखाना व कुटुंब कल्याण केंद्र चालवित होती.

वर्धा नगरपालिका (१८७४) : वर्धा नगराची स्थापना १८६६ मध्ये झाल्यावर व तेथे जिल्हा मुख्यालय उभारल्यावर नगरपालिका स्थापन करणे स्वाभाविकच होते. विद्यमान शतकाच्या प्रारंभी या नगराची लोकसंख्या ९,८७२ असून नगर समितीत १६ सदस्य (४ नामनिर्देशित) होते. इ. स. १९८६–८७ मध्ये नगराचे क्षेत्रफळ ७.७७ चौ. कि. मी. व ४२ प्रभाग होते. सन १९८१ मध्ये शहराची लोकसंख्या ८८,४९५ होती. सध्या नगराला धाम नदीतून पाणीपुरवठा केला जातो. सन १९८६–८७ मध्ये पालिका २३ पूर्व-प्राथमिक, ३० प्राथमिक, एक माध्यमिक व एक उच्च माध्यमिक शाळा चालवित होती. शहरात ५.६९ कि. मी. रस्ते सिमेंटचे, ४९.९३ कि. मी. डांबरी व ४०.३१ कि. मी. खडीचे होते.

पुलगाव नगरपालिका (१९०२) : प्रारंभी पालिकेचे नऊ सभासद होते. सन १९८५–८६ मध्ये त्यांची संख्या ३३ झाली. सन १९०२ मध्ये नगरपरिषदेचे उत्पन्न १६,५०० रुपये व खर्च १५,५०० रुपये होता. सन १९०५ मध्ये नगरपरिषदेने एक दवाखाना सुरू केला तसेच शहरात पहिली प्राथमिक शाळा १९२२ मध्ये सुरू केली. सन १९८६–८७ मध्ये ३० प्रभागांचे एकूण क्षेत्रफळ २.६७ चौ. कि. मी. होते. सन १९८१ मध्ये शहराची लोकसंख्या ३१,३५८ होती. सन १९८६–८७ मध्ये नगरपालिका दोन पूर्व-प्राथमिक, सहा प्राथमिक आणि एक माध्यमिक शाळा व एक कनिष्ठ महाविद्यालय चालवित होती. नगरपालिकेचे रुग्णालय, सुतिकागृह व कुटुंब कल्याण केंद्र आहे. शहराला वर्धा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. शहरात १.५० कि. मी. रस्ते डांबरी व १७.२० कि. मी. खडीचे आहेत.

सिंदी नगरपालिका (१९१४) : स्थापनेच्या वेळी नगरपरिषदेचे नऊ सदस्य होते. सन १९८६–८७ मध्ये नगराचे क्षेत्रफळ ७.२ चौ. कि. मी. व प्रभाग २० होते. त्याच वर्षी नगरपालिका बालक मंदिर, दोन पूर्व-प्राथमिक, पाच प्राथमिक आणि एक माध्यमिक शाळा, रुग्णालय व सुतिकागृह चालवित होती. शहराला नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

तक्ता क्रमांक ८ मध्ये सर्व नगरपालिकांचे उत्पन्न व तक्ता क्रमांक ९ मध्ये खर्च दिलेला आहे.

तक्ता क्रमांक १

जमीन महसुलापासून शासनास मिळालेले उत्पन्न

(रुपये)

वर्ष		वर्षारंभीची एकूण मागणी	मागील थकबाकी	एकूण मागणी	सूट व विलंबन	प्रत्यक्ष जमा
१९६५–६६	..	१४,१९,०९८	८,३७,१३०	२२,५६,२२८	उ. ना.	१३,६०,६७६
१९७०–७१	..	१४,३६,१५१	८,९५,५५२	२३,३१,७०३	६२,८७७	७,७३,५७०
१९७५–७६	..	१४,५६,३१७	१५,५८,२३३	३०,१४,५५०	७,५४,४८६	१४,५१,२०६
१९८०–८१	..	१२,०१,२३९	१५,६३,३४४	२७,६४,५८३	११,८०,०२८	१,००,९७३
१९८५–८६	..	८,९४,०००	उ. ना.	उ. ना.	उ. ना.	७,५३,०००
१९८८–८९	..	८,४६,०००	उ. ना.	उ. ना.	उ. ना.	६,५५,०००

तक्ता क्रमांक २

पोलीस कर्मचारी व पोलीस ठाणी

बाब	१९६५–६६	१९७०–७१	१९७५–७६	१९८०–८१	१९८४–८५	१९८७–८८
अधीक्षक ..	१	१	१	१	१	१
उपअधीक्षक ..	२	२	२	३	४	४
निरीक्षक ..	४	४	५	५	५	४
उपनिरीक्षक ..	३६	३६	३७	३९	४२	८२९
शिपाई ..	८१९	९९५	१,०२३	९१७	९१९	१,१८२
पोलीस स्टेशन ..	१२	१२	१३	१३	१४	१४
पोलीस चौकी ..	३	४	७	७	६	६
सब-पोस्ट ..	उ. ना.	उ. ना.	उ. ना.	२१	३	उ. ना.
लॉकअप ..	१२	१२	१२	१२	१२	उ. ना.

तक्ता क्रमांक ३

वर्गवारीनुसार गुन्ह्यांची संख्या

बाब	१९७५	१९७७	१९८३	१९८५	१९८७
मनुष्यवधाचा प्रयत्न व सदोष मनुष्यवध ..	२४	३५	५१	६०	६८
दरोडा ..	१	५	६	४	३
लूटमार ..	५१	६७	५२	३०	४३
घरफोडी ..	४८४	४३८	३६८	३५४	२८०
सायकली, गुरे, तांबा तार, इ. चोऱ्या	१५२	१३६	१५७	१२०	९३
खिसे कापणे ..	४७	६६	४५	२६	२५
इतर चोऱ्या ..	८५४	८४५	७९१	उ. ना.	८६५
फसवणूक ..	४१	४७	५३	२९	३६
विश्वासघात ..	५३	६३	२५	२६	२४
अपक्रिया ..	३८	५७	६४	५९	६६
दंगा ..	३४	४८	२८	३९	४९
दुखापत ..	१९८	२४४	उ. ना.	उ. ना.	उ. ना.
पळवून नेणे ..	१०	९	१९	३०	२३
इतर ..	४३२	६३१	१,२६७	१,४५२	१,५९२

तक्ता क्रमांक ४

दिवाणी आणि फौजदारी न्यायालयांची माहिती

	दिवाणी				फौजदारी			
	मूळवाद		इतर अपिले		मूळवाद		इतर अपिले	
	नियमित अपिले	इतर अपिले	नियमित अपिले	इतर अपिले	नियमित अपिले	इतर अपिले	नियमित अपिले	इतर अपिले
१९६४ ..	१,३१४	१,९०६	१८१	१०	७,६१६	१९७	१४४	४७
१९६६ ..	१,११२	१,४१०	१०३	२०	५,२२९	३२१	९०	१६
१९६८ ..	१,०५६	१,००२	१२२	३२	५,५२०	३०२	१९०	८२
१९७० ..	१,३२६	१,१७३	६४	२८	६,१५०	१२०	११६	५८
१९७२ ..	८२३	८५३	१४७	३१	५,३५६	५१	१६४	३८
१९७४ ..	८९३	८६२	१०७	१	५,५२२	९८	१५०	५१
१९७६ ..	१,३०३	९३५	२४	५२	७,६१८	उ. ना.	१५५	१९
१९७८ ..	१,६७७	१९५	१२५	३०	६,०८५	२७०	११७	३६
१९८० ..	१,८२९	२२१	१००	४८	८,६९७	५८	६८	७६
१९८२ ..	१,११५	१३३	६३	२२	६,६७०	७४	४९	९०
१९८४ ..	२,०३५	१६५	८८	४५	७,९२२	१४२	६०	६२
१९८६ ..	२,११६	१४०	८८	४५	९,६६६	३४१	५७	९८

तक्ता क्रमांक ५

वर्धा जिल्हा परिषद लेखाविषयक माहिती, १९८६–८७

बाब	जमा (रुपये) जिल्हा परिषद	जमा (रुपये) राज्य शासन	जमा (रुपये) एकूण	बाब	खर्च (रुपये) जिल्हा परिषद	खर्च (रुपये) राज्य शासन	खर्च (रुपये) एकूण
कर व फी ..	१,७८,३४८	..	१,७८,३४८	सामान्य प्रशासन	११,२०,५९३	१,९३,४९,६९०	२,०४,७०,२८३
स्थानिक उपकर व पट्टी	५०,१३,८०९	..	५०,१३,८०९	शिक्षण ..	५,७८,५४८	५,६६,६५,१६८	५,७२,४३,७१६
शासकीय अनुदान	२९,९७,४०३	११,६१,५२,६९७	११,९०,९०,१००	सार्वजनिक बांधकाम	५,४२,५१६	६२,२१,९६२	६७,६४,४७८
इतर साधने ..	२९,७०,३२३	६,५९,६३२	३६,२९,९५५	स्वच्छता व आरोग्य	१८,६१,९४४	१,६०,५२,३४०	१,७९,१४,२८४
				संकीर्ण ..	३३,५६,०६१	१,४८,४९,९३२	१,८२,१५,९९३
एकूण ..	१,१०,५९,८८३	११,६८,१२,३२९	१२,७९,१२,२१२	एकूण ..	७४,५९,६६२	११,३१,४९,०९२	१२,०६,०८,७५४
कर्जे ..	३६,३८,६६६	(–) ५,२८,५७९	३१,१०,०८७	कर्जे ..	३३,८२५	१०,३६०	४४,१८५
ठेवी, आगाऊ रक्कम	८६,०३,२५३	..	८६,०३,२५३	ठेवी, आगाऊ रक्कम	८९,७३,१९३	..	८९,७३,१९३
संकीर्ण ..	७,३६,१०,०००	..	७,३६,१०,०००	संकीर्ण ..	७,३६,१०,०००	..	७,३६,१०,०००
एकूण भांडवली ..	८,५८,५१,९१९	(–) ५,२८,५७९	८,५३,२३,३४०	एकूण ..	८,२६,१७,०१८	१०,३६०	८,२६,२७,३७८
आरंभीची शिल्लक	..	..	१,७४,५७,३४३	अखेरची शिल्लक ..	..	..	२,७४,५६,७६३
एकूण ..	..	..	२३,०६,९२,८९५	एकूण ..	..	..	२३,०६,९२,८९५

तक्ता क्रमांक ८

नगरपालिकांचे उत्पन्न, १९८६–८७

(हजार रुपये)

	वर्धा	हिंगणघाट	पुलगाव	आर्वी	देवळी	सिंदी
एकूण कर व फी ..	९,९२८	५,७८६	३,११४	२,३७९	७४३	६२९
विशेष अधिनियमानुसार वसूली	२	उ. ना.	६	१	उ. ना.	उ. ना.
नगरपालिकेची मालमत्ता आणि उपयोगिता सेवा-पासून प्राप्त	१,२८९	२०६	२३	१६३	२९०	९५
शासकीय अनुदान ..	५,०४३	२,८२२	१,८६८	१,७०५	४२०	४२५
इतर शासकीय अनुदाने ..	४,३४८	२,०००	१,३४५	१,९३४	८६५	८८५
स्थानिक निधी व इतर उत्पन्ने	उ. ना.	३,२११	६७२	४३	उ. ना.	उ. ना.
अग्रीम धन ..	४७६	उ. ना.	उ. ना.	८	७७	२७
ठेवी ..	३९०	उ. ना.	३०	३०	२९	२८
इतर ..	३८२	उ. ना.	६	उ. ना.	७७	उ. ना.

तक्ता क्रमांक ९

नगरपालिकांचा खर्च, १९८६–८७

(हजार रुपये)

	वर्धा	हिंगणघाट	पुलगाव	आर्वी	देवळी	सिंदी
प्रशासन ..	८२८	४५८	२९०	५४२	२१२	२२७
कर वसुली ..	२,०३६	९६७	५९४	६८४	३९१	२७८
सार्वजनिक सुरक्षा ..	९३१	४५८	१८३	२१५	१२८	७४
सार्वजनिक आरोग्य ..	५,८६३	४,११०	३,४९९	२,१३०	५१८	५११
जलनिःसारण ..	१,१३८	५९७	३१८	२०७	७६	उ. ना.
बांधकाम ..	४०६	८६१	४९	१२६	५८	४२
शिक्षण ..	३,३९७	२,२६३	१,४९९	१,८७८	४२१	७३३
वृक्षसंवर्धन ..	१८३	उ. ना.	३८	उ. ना.	६	उ. ना.
दुर्बल घटकांवरील खर्च ..	३७२	४२	१५०	२४	५०	११
अंशदाने व निधी वर्गणी ..	२,४५६	१,५६२	३१७	११२	४	उ. ना.
संकीर्ण ..	१०६	१४०	६११	३५	१०६	४

प्रकरण १०—सामाजिक सेवा

शिक्षण, आरोग्य व्यवस्था, समाजकल्याण व धर्मादाय संस्था या सामाजिक सेवांचा इतिहास व त्यांची विद्यमान काळातील माहिती या प्रकरणात दिली आहे.

शिक्षण

शिक्षणाचा इतिहास

वाकाटक काळी पवनार ऊर्फ प्रवरपूर येथे वाकाटकांचे मुख्यालय असल्यामुळे तेथे शैक्षणिक सुविधा असणारच. उपलब्ध माहितीनुसार प्रवरपूरला विद्वान ब्राह्मण होते. त्यांनी धर्मज्ञान विकसित करण्यास्तव पाठशाळा काढल्या होत्या. त्यातून धार्मिक ग्रंथांचे व पौरोहित्याचे शिक्षण दिले जाई. वाकाटकांच्या संपन्न काळात शैक्षणिक प्रगती बरीच झाली असावी. पुढे यादवांची राजवट स्थापन झाल्यावर शिक्षणास राजाश्रय मिळाला. बहमनी राजवट या प्रदेशावर प्रस्थापित झाल्यावर शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ जरी झाली नसली तरी शैक्षणिक कार्यात बहमनी राजांनी व्यत्यय आणल्याचे दिसत नाही. बहमनींच्या अंतानंतर स्थानिक गोंड राजे प्रबळ झाले. त्यांनी मुघल सम्राटांचे अधिपत्य स्वीकारून प्रशासन व्यवस्था आपणाकडे कायम ठेवली. गोंड राजांच्या काळी अस्तित्वात असलेल्या शिक्षण व्यवस्थेची माहिती उपलब्ध नाही. पुढे नागपूरकर भोसल्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचाही तपशील उपलब्ध नाही.

सन १८५४ मध्ये हा प्रदेश ब्रिटिशांकडे आल्यानंतर पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रारंभ झाला. ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी शिक्षणाचे कार्य हाती घेतले. इ. स. १८८२ मध्ये लॉर्ड रिपनने अमलात आणलेल्या सुधारणांनुसार प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक संस्थांकडे सोपविण्यात आली. त्या काळी आर्वी, वर्धा व हिंगणघाट ही शैक्षणिक केंद्रे बनली. वर्धा व हिंगणघाट येथील अँग्लो-व्हर्नाक्युलर शाळांना १९०५ मध्ये हायस्कूलचा दर्जा देण्यात आला. इ. स. १८६५ च्या सुमारास आर्वीला स्थापन झालेल्या नेटिव लायब्ररीने विद्याप्रसार कार्यात मोलाची कामगिरी केली. इतके मात्र खरे की, नागपूरसारखे मोठे शहर जवळच असल्यामुळे वर्धा जिल्ह्यात मोठ्या शाळा अथवा महाविद्यालये स्थापन होऊ शकली नाहीत. येथील सर्वच विद्यार्थी विद्यार्जनासाठी नागपूरला जात असत.

इ. स. १९२० च्या सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँण्ड बेरार लोकल सेल्फ-गव्हर्नमेंट अॅक्टनुसार विदर्भातील स्थानिक स्वराज्य संस्थांना स्थिरता लाभली. त्यांच्याकडे शिक्षण हा विषय सोपविण्यात आला. सन १९३९ च्या अधिनियमानुसार डिस्ट्रिक्ट कौन्सिल व लोकल बोर्ड अस्तित्वात आले. त्यांच्याकडे शिक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली. तथापि ही प्रशासनिक व्यवस्था १९४९ च्या सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँण्ड बेरार लोकल सेल्फ-गव्हर्नमेंट

ॲक्टनुसार बदलण्यात आली. पुढे १९५२ मध्ये प्रत्येक तालुक्यासाठी जनपदसभा स्थापन करण्यात आल्या जनपदसभांना व्यापक अधिकार देऊन प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली.

वर्धा जिल्ह्यात राष्ट्रीय शिक्षणावर भर देण्यात आला. महात्मा गांधींनी १९२० मध्ये उभारलेल्या असहकार चळवळीत सरकारी शिक्षण संस्थांवर व्यापक प्रमाणात बहिष्कार घालण्यात आला. इ. स. १९१२ मध्ये जमनालाल बजाज यांनी स्थापन केलेल्या मारवाडी हायस्कूलमध्ये १९२० पासून राष्ट्रीय शिक्षण देण्यास प्रारंभ करण्यात आला. इ. स. १९२० नंतर वर्ध्यात राष्ट्रीय जागृतीच्या प्रेरणा वेगाने पसरू लागल्या. सत्याग्रहाश्रम व गांधी सेवा संघ यांच्या पाठोपाठ १९२४ मध्ये महिलाश्रमाची स्थापना झाली. त्या संस्थेने राष्ट्रीय महिला शिक्षणाचा शास्त्रशुद्ध पाया घातला आणि एक आदर्श महिला संस्था म्हणून नाव-लौकिक मिळविला. महात्माजींचे वास्तव्य या संस्थेत काही दिवस होते. प्रारंभीच्या कार्यकर्त्यांमध्ये भागीरथी उपाध्याय, शांतीबेन रानीवाला, मालती थत्ते, कमलाबाई लेले, मीरा मुंदडा, नाना आठवले, श्रीधर हरी थत्ते, भवानीप्रसाद मिश्र आदी कार्यकर्त्यांचा समावेश होता. महिलाश्रमात गांधीजी, विनोबा भावे व जमनालाल बजाज यांचे मार्गदर्शन लाभत असे.

इ. स. १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टनुसार प्रांतिक स्वायत्ततेचा उदय झाला त्यानुसार प्रांतिक कायदेमंडळासाठी निवडणुका घेण्यात आल्या. काँग्रेसचा १९३७ चा निवडणूक जाहीरनामा गांधीजी व पं. नेहरूंनी वर्ध्यालाच तयार केला. निवडणूक जाहीर-नाम्यानुसार ग्रामीण भागात शिक्षण प्रसारावर भर देण्यात आला. सन १९३७ मध्ये मध्यप्रांत व वऱ्हाड राज्यामध्ये काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाले. नवीन मंत्रिमंडळाने काँग्रेसच्या धोरणानसार ग्रामीण भागात शिक्षण विकास करण्यावर भर दिला. अनेक प्रकारच्या प्रशासकीय व धोरणात्मक सुधारणा केल्या. त्याचबरोबर राष्ट्रीय शिक्षण व स्वावलंबनावर भर देण्यासाठी गांधीजींनी मूलगामी कल्पना मांडल्या. गांधीवादी शिक्षणतज्ञ श्रीमननारायण अगरवाल यांच्या पुढाकाराने शिक्षणतज्ञ के. जी. सैय्यदिन यांच्या अध्यक्षते-खाली १९३७–३८ मध्ये वर्ध्याला एक परिषद भरली. परिषदेत गांधीजींनी दोन कल्पना मांडल्या–(१) मूलभूत शिक्षण एखाद्या व्यवसायाशी जोडले जावे, आणि (२) मूलोद्योगातून विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचा मार्ग खुला करण्यात यावा. या कल्पनांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अवलंब करण्यासाठी १९३७ मध्ये झाकीर हुसेन समिती नेमण्यात आली. इ. स. १९३८ च्या हरिपुरा काँग्रेस अधिवेशनात काँग्रेसने ही योजना मान्य केली. त्यानुसार जो अभ्यासक्रम तयार करण्यात आला त्यास "नयी तालीम" असे नाव देण्यात आले. नयी तालीम पद्धती ग्रामीण भारताच्या दृष्टीने एक क्रांतिकारक पाऊल होते. या पद्धतीचा प्रचार करण्याची जबाबदारी श्रेष्ठ गांधीवादी शिक्षणतज्ञ ई. डब्ल्यू. आर्यनायकम व त्यांच्या सुविद्य पत्नी आशाताई आर्यनायकम यांनी स्वीकारली. या शिक्षण पद्धतीचा अखिल भारतात प्रचार करण्यासाठी सेवाग्रामला हिंदुस्थानी तालिमी संघ स्थापन करण्यात आला. या संघाची जबाबदारी आर्यनायकम दांपत्याने स्वीकारली. गांधीजी हयात असेपर्यंत तालिमी संघाने विस्तृत प्रगती केली. तालिमी संघाच्या यशासाठी आर्यनायकम दांपत्याने पुढील काळातही निष्ठापूर्वक कार्य केले.

हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा देण्यावर काँग्रेसने भर दिला. बऱ्याच विचारांती हिंदी हीच स्वतंत्र भारताची राष्ट्रभाषा असावी असा काँग्रेसने ठराव केला. त्याचाच एक भाग म्हणून १९३६ मध्ये नागपूरला हिंदी साहित्य संमेलन भरविण्यात आले. या संमेलनास गांधीजींनी मौलिक मार्गदर्शन केले. वर्धा परिसरात एकामागून एक अशा बऱ्याच राष्ट्रीय संस्था स्थापन होत होत्या. त्याचाच एक भाग म्हणून गांधीजींच्या हस्ते १९३७ मध्ये राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्ध्याला स्थापन करण्यात आली. समितीने राष्ट्रभाषा प्रचार कार्यास जोरदार चालना दिली. ती समिती राष्ट्रभाषेच्या परीक्षा घेणारे लहानसे विद्यापीठच बनली. नागपूरच्या पडछायेमध्ये वर्धा जिल्हा असल्यामुळे तेथे महाविद्यालयांचा प्रसार होण्यास विलंब लागणे अपरिहार्य होते. जिल्ह्यात पहिले महाविद्यालय स्थापन झाले ते गोविंदराम सेकसरिया वाणिज्य महाविद्यालय (१९४०). स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बरीच महाविद्यालये अस्तित्वात आली, त्यांचा तपशील या प्रकरणात आलेला आहेच.

मुंबई प्रांतातील शैक्षणिक पद्धतीपेक्षा विदर्भातील पद्धती वेगळी होती. विदर्भात इयत्ता ४ थी पर्यंत प्राथमिक शिक्षण, तर ५ वी ते ७ वी चे वर्ग असलेल्या शाळांना मिडल स्कूल म्हणत असत. तत्कालीन आकृतिबंधानुसार ८ वी ते १० वीचे वर्ग असलेल्या शाळांना माध्यमिक शाळा तर ८ वी ते ११ वीचे वर्ग असलेल्या शाळांना उच्च माध्यमिक शाळा म्हणत असत. विदर्भ प्रदेश मुंबई राज्यात १९५६ मध्ये विलीन झाल्यानंतरसुद्धा हीच पद्धती अस्तित्वात होती. पुढे एकभाषी महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतरसुद्धा (१९६०) हीच पद्धती सुरू राहिली. राज्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा भागात वेगवेगळ्या पद्धती प्रचलित होत्या. या पद्धतींमध्ये सुसूत्रता आणून एकत्रीकरण करण्याचा सरकारने निर्णय घेतला. त्यानुसार १९७२ पासून संपूर्ण राज्यभर १० + २ + ३ हा नवीन शैक्षणिक आकृतिबंध लागू करण्यात आला. यानुसार इयत्ता १० वीत माध्यमिक शालान्त परीक्षा तर १२ वीत उच्च माध्यमिक परीक्षा घेण्यात येते. महाविद्यालयीन अभ्यासक्रम तीन वर्षांचा करण्यात आलेला आहे.

साक्षरता

ब्रिटिश राजवटीपूर्वी साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते. समाजातील उच्च पदस्थांमध्ये साक्षरतेचा काही अंशी प्रसार झालेला होता. महिलांमध्ये तसेच मागासलेल्या जाती-जमातींमध्ये साक्षरतेचे प्रमाण नगण्य होते. इ. स. १९०१ च्या जनगणनेनुसार साक्षरतेच्या प्रमाणानुसार या जिल्ह्याचा तत्कालीन प्रांतात सातवा क्रमांक होता, फक्त ७.६ प्रतिशत पुरुष साक्षर होते. महिलांच्या साक्षरतेची स्थिती दारूण होती, जिल्ह्यात केवळ २९२ महिला साक्षर होत्या. मुसलमानांपैकी १.५ प्रतिशत व्यक्ती साक्षर होत्या.[१] परंतु ब्रिटिश अमदानीत जसजसा पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार झाला तसतसा त्याचा जनमानसावर प्रभाव पडून साक्षरतेचे प्रमाण वाढू लागले.

इ. स. १९११ मध्ये जिल्ह्यातील तालुकानिहाय साक्षर लोकसंख्या पुढीलप्रमाणे होती.

---

[१] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९०६, पृ. २२२.

तालुका	०–१५ वर्षे		१५–२० वर्षे		२० वर्षे +	
	पुरुष	महिला	पुरुष	महिला	पुरुष	महिला
वर्धा	१,२७२	५३	१,०८५	३५	६,५६८	१५४
हिंगणघाट	१,०४७	४२	८२३	२४	५,२९९	८०
आर्वी	४९४	१७	४९४	१३	३,३१६	४०

इ. स. १९३१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील साक्षरतेचे दर चौरस मैलास प्रमाण खाली दिलेले आहे.

वर्ष	वयोगट					
	१० +		१५ ते २०		२० पेक्षा अधिक	
	पुरुष	महिला	पुरुष	महिला	पुरुष	महिला
१९०१	९४	२	१२५	३	९५	२
१९११	१२०	३	१६७	५	११७	३
१९२१	१३७	९	१९३	२१	१३३	७
१९३१	१५७	१२	२०१	१७	१५६	८

इ. स. १९४१ मधील ५,१९,३३० लोकसंख्येपैकी ६४,२६१ व्यक्ती साक्षर होत्या. त्यात वर्धा तालुक्यातील २९,३०५ पुरुष व ५,४९४ महिला; हिंगणघाटमधील १०,७९८ पुरुष व २,९९९ महिला; व आर्वीतील १२,१९६ पुरुष व ३,४६९ महिलांचा समावेश होता.

काँग्रेस मंत्रिमंडळाने १९३७ मध्ये साक्षरता मोहिमेचा शुभारंभ करून शैक्षणिक जागृतीस चालना दिली. प्रौढ शिक्षण योजना अमलात आणली. स्वाभाविकपणे साक्षरतेचे प्रमाण वाढले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर निरक्षरतेचे उच्चाटन करणे व भावी पिढीला शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे हे लोकनियुक्त सरकारने एक आव्हान म्हणून स्वीकारले. त्यासाठी कल्याणकारी व लोकाभिमुख सरकारने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत १४ वर्षे वयाखालील मुलांची मोफत शिक्षणाची सोय केली. शिवाय १९५५–५६ पासून आर्थिकदृष्टया मागासलेल्या वर्गांना व अनुसूचित जाती–जमातींच्या लोकांना शिक्षणासाठी आर्थिक सवलतीही दिल्या. याच काळात खाजगी शिक्षण संस्थांची झपाटयाने वाढ होऊन खेडोपाडी शिक्षणाचा

प्रसार झाला. खालील विवरणामध्ये १९०१ ते १९८१ या कालावधीमधील जिल्ह्यातील साक्षरतेची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी दिली आहे.

वर्ष		पुरुष	महिला	एकूण
१९०१	..	७.५७	०.१५	३.८९
१९११	..	९.११	०.२३	४.७१
१९२१	..	१०.६४	०.७३	५.७५
१९३१	..	१२.३२	१.०९	६.७७
१९४१	..	१९.११	४.६६	१२.३७
१९५१	..	३३.४५	८.६२	२१.१८
१९६१	..	४३.४४	१६.९८	३०.४५
१९७१	..	५२.५५	३०.२९	४१.७१
१९८१	..	६१.०१	४०.५३	५१.०५

तक्ता क्रमांक १ मध्ये १९६१, १९७१ व १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी तर तक्ता क्रमांक २ मध्ये वरील तीन वर्षांची शैक्षणिक दर्जानुसार साक्षरतेची आकडेवारी दिलेली आहे. सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिलेले आहेत.

पूर्व-प्राथमिक शिक्षण

पूर्व-प्राथमिक शिक्षणाची सुरुवात विद्यमान शतकात झाली. युरोपियन धर्मोपदेशकांनी किंडरगार्टन शाळांची स्थापना केली. सन १९३० नंतर मॉटेसरी पद्धतीच्या शाळा सुरू झाल्या. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक खाजगी शाळांनी याबाबत बरेच कार्य केले. भारत सरकारने १९५३ मध्ये स्थापन केलेल्या केंद्रीय समाज कल्याण मंडळाने ग्रामीण भागात बालवाड्या स्थापन करून खाजगी संस्थांना अनुदान देऊन प्रोत्साहन दिले.[२] वर्धा जिल्ह्यात १९८६–८७ मध्ये १९६ पूर्व-प्राथमिक शाळा होत्या. त्यामध्ये ३,१२३ विद्यार्थी होते.

प्राथमिक शिक्षण

दिनांक ९ डिसेंबर १८७९ रोजी नागपूरला स्थापन झालेल्या वेदशाळेत वर्धा व आर्वीचे काही विद्यार्थी शिकत असल्याचा दावा केला जातो. ब्रिटिश अधिकारारूढ झाल्यावर मिशनरी कार्यकर्त्यांनी पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रारंभ केला. इ. स. १८५८ मध्ये नागपूरला चर्च

[२] पाटील लीला व कुलकर्णी विश्वंभर, **आजचे शिक्षण आजच्या समस्या** (श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८५), पृ. १५.

ऑफ स्कॉटलंडने वित्त सहाय्य दिलेली सेंट उर्सुला प्रायमरी शाळा सुरू झाली. त्यानंतर लवकरच रेव्ह. हिस्लॉपने अशाच प्रकारची शाळा नागपूरला सुरू केली. त्यात पाल्यांना पाठविण्यास पालकांचा विरोध होता. तथापि कालांतराने नागपूर व अमरावती पाठोपाठ आर्वी-वर्धा भागातील मुलेही इंग्रजी शाळांमध्ये जाऊ लागली. उत्तरोत्तर वर्धा जिल्ह्यातही शाळांची संख्या वाढत जाऊन इ. स. १८७०–७१ मध्ये ५८ शाळा अस्तित्वात होत्या. त्यात २,९९४ विद्यार्थी विद्यार्जन करीत होते. इ. स. १८८२ च्या लॉर्ड रिपनच्या सुधारणानुसार व इंडियन एज्युकेशन कमिशनच्या शिफारशींनुसार प्राथमिक शिक्षण स्थानिक संस्थांकडे सोपविले. इ. स. १८८०–८१ व १८९०–९१ मध्ये शाळांची संख्या अनुक्रमे ७१ व ९६ पर्यंत वाढली. त्यातील विद्यार्थी संख्या ३,६८५ व ५,२९६ होती.

वर्धा जिल्ह्यातील प्राथमिक शाळा व विद्यार्थ्यांची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		प्राथमिक शाळा	मुले	मुली	एकूण
१९०१–०२	..	१००	५,१५१	१०८	५,२५९
१९०४–०५	..	९८	३,८७३	१३३	४,००६
१९१०–११	..	१११	४,७५१	२०४	४,९५५
१९२०–२१	..	१५३	६,४३८	३५८	६,७९६
१९२५–२६	..	२३१	७,३०१	५१५	७,८१६

इ. स. १९०५ मध्ये जिल्ह्यातील ९८ शाळांपैकी तीन शाळा मिशनतर्फे चालविल्या जात होत्या व सात शाळा खाजगी होत्या. इ. स. १९०६ मध्ये वर्धा, हिंगणघाट, आर्वी व सिंदी येथे मुलींच्या शाळा होत्या.

वर्धा नगरपरिषदेने १ जुलै १९२८ पासून व आर्वी नगरपरिषदेने १६ जून १९३० पासून नगरपरिषद क्षेत्रात सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. इ. स. १९३१–३२ व १९३६–३७ मध्ये जिल्ह्यातील मुलांच्या प्राथमिक शाळांची स्थिती खालीलप्रमाणे होती.[३]

वर्ष		शाळा	विद्यार्थी	उपस्थित विद्यार्थ्यांची टक्केवारी
१९३१–३२	..	१९६	११,७३८	९६
१९३६–३७	..	१७२	११,०५१	७९

इ. स. १९३६–३७ मध्ये जिल्ह्यातील एकूण ९३९ खेड्यांपैकी १७८ खेड्यांत शाळांची सोय होती आणि ३२२ खेड्यांना नजिकच्या शाळांचा फायदा उपलब्ध होता.

[३] रिपोर्ट ऑन दि स्टेट अ‍ॅण्ड प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन इन सी. पी. अ‍ॅण्ड बेरार, १९३२–३३ व १९३७–३८.

इ. स. १९३७ ते १९३९ या कालावधीत काँग्रेस मंत्रिमंडळाने सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास केला. त्याला ग्रामीण भागातून चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे शाळांच्या संख्येत विशेष वाढ झाली. जिल्हा परिषद स्थापन होईपर्यंत जनपदसभा व नगरपालिकांकडे प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था होती. इ. स. १९६२ नंतर नगरपालिका कार्यक्षेत्र वगळता सर्व प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या अधिकाराखाली आले. प्राथमिक शाळांची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष	प्राथमिक शाळा	मुले	मुली	एकूण
१९५०–५१ ..	३४५	१२,२३५	९,६१२	२१,८४७
१९५५–५६ ..	५०९	२०,६६७	१६,२३८	३६,९०५
१९६०–६१ ..	७१२	३६,६६१	२२,८०७	५९,४६८
१९६५–६६ ..	८०१	४६,४९८	३३,६२१	८०,११९
१९७०–७१ ..	८६८	५५,७९८	४३,७६६	९९,५६४
१९७५–७६ ..	८८४	६०,३८२	४९,२९३	१,०९,६७५
१९८०–८१ ..	९३२	६८,८२८	६०,१९७	१,२९,०२५
१९८५–८६ ..	९७३	७४,८१०	६८,९४५	१,४३,७५५
१९८६–८७ ..	९८२	७३,७५८	६७,३०५	१,४१,०६३

प्राथमिक शाळांचे व्यवस्थापन केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद, नगरपालिका व खाजगी संस्थांमार्फत चालते. व्यवस्थापनानुसार जिल्ह्यातील शाळांची आकडेवारी तक्ता क्रमांक ३ मध्ये दिलेली आहे. इ. स. १९८५–८६ मध्ये एकूण ९७३ प्राथमिक शाळांपैकी ८८ टक्के शाळा जिल्हा परिषदेच्या व्यवस्थापनाखाली होत्या.

शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे शिक्षकांच्या संख्येत वाढ होणे अपरिहार्य आहे. जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		पुरुष शिक्षक	महिला शिक्षक	एकूण	प्रशिक्षित शिक्षक
१९५०–५१	..	४९१	२५१	७४२	३७१
१९५५–५६	..	७३१	३७३	१,१०४	५८५
१९६०–६१	..	१,३३३	६८०	२,०१३	१,२४८
१९६५–६६	..	२,१७४	५२८	२,७०२	२,१०८
१९७०–७१	..	२,४०१	६०५	३,००६	२,८७४
१९७५–७६	..	२,६३६	६३०	३,२६६	३,१०८
१९८०–८१	..	२,५५१	७४३	३,२९४	३,१४४
१९८५–८६	..	२,६०५	१,०७०	३,६७५	३,४९५
१९८६–८७	..	२,५५७	१,१०५	३,६६२	३,५२६

माध्यमिक शिक्षण

इ. स. १८८२ च्या इंडियन एज्युकेशन कमिशनने माध्यमिक शाळा असा शब्दप्रयोग करण्यास सुरुवात केली. त्यानुसार जुन्या इंग्लिश शाळांना माध्यमिक शाळा असे नाव मिळून माध्यमिक शिक्षण (Secondary Education) हा शब्दप्रयोग रूढ झाला.[४] सन १८९१–९२ ते १९३६–३७ दरम्यानची शाळा व विद्यार्थ्यांची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		शाळा	मुले	मुली	एकूण
१८९१–९२	..	१२	१,२५८	१२	१,२७०
१८९५–९६	..	१२	१,२८१	१२	१,३९३
१९००–०१	..	१२	१,२८४	उ. ना.	१,२८४
१९०५–०६	..	१४	१,२५२	उ. ना.	१,२५२
१९१०–११	..	१३	१,४९०	उ. ना.	१,४९०
१९१५–१६	..	१६	उ. ना.	उ. ना.	उ. ना.
१९२०–२१	..	२४	२,१००	८६	२,१८६
१९२५–२६	..	२४	२,२३५	१६४	२,३९९
१९३५–३६	..	३६	४,३४५	१६२	४,५०७

उ. ना. = उपलब्ध नाही.

व्हर्नाक्युलर मिडल स्कूलमध्ये इंग्रजी विषय सक्तीचा नव्हता. इंडियन मिडल स्कूलमध्ये मात्र इंग्रजी विषय शिकवला जाई. त्या शाळांमध्ये आठवीचे वर्ग होते. इ. स. १९३६–३७ मध्ये २७ व्हर्नाक्युलर मिडल स्कूलमध्ये १,६५३ विद्यार्थी शिकत होते. मुलांच्या इंडियन मिडल स्कूलची संख्या १९३७–३८ मध्ये १२ असून त्यात १,५८५ विद्यार्थी होते.[५]

स्वातंत्र्योत्तर काळात माध्यमिक शिक्षणाची निकड भासू लागली. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी अनेक शिक्षण संस्था पुढे आल्या. पुढील विवरणपत्रात इ. स. १९५१ पासूनची माध्यमिक शाळांची स्थिती दर्शविली आहे.

[४] वर्तक, डॉ. रजनी महादेव, **महाराष्ट्र शैक्षणिक प्रशासन आणि जिल्हा परिषदा** (डॉ. रजनी वर्तक, ठाणे, १९७५), पृ. १०५.

[५] **रिपोर्ट ऑन दि स्टेट अॅण्ड प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन इन सी. पी. अॅण्ड बेरार, १९३६–३७ व १९३७–३८.**

वर्ष		शाळा	मुले	मुली	एकूण
१९५०–५१	..	१८	३,४७१	२,७२६	६,१९७
१९५५–५६	..	२४	६,४१४	५,०३९	११,४५३
१९६०–६१	..	५४	१४,४७६	४,८२६	१९,३०२
१९६५–६६	..	९५	२५,२४९	१०,९७२	३६,२२१
१९७०–७१	..	१०६	२७,१९३	१५,१००	४२,२९३
१९७३–७४	..	११६	उ. ना.	उ. ना.	४३,६७१
१९८०–८१	..	१०६	२५,०४८	२०,७८१	४५,८२९
१९८५–८६	..	१३१	२५,२९९	२३,५४६	४८,८४५
१९८६–८७	..	१३५	२६,५८९	२६,४२५	५३,०१४

उ. ना. = उपलब्ध नाही.

माध्यमिक शिक्षण मुख्यत्वे खाजगी संस्थांच्या कार्यकक्षेत आहे. अशासकीय माध्यमिक शाळांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याची योजना १९७७–७८ पासून सुरू करण्यात आली.[६] सध्या खेडयांतील माध्यमिक शाळांचे प्रशासन जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आलेले आहे. तक्ता क्र. ४ मध्ये व्यवस्थापनानुसार शाळांची संख्या दिलेली आहे.

कनिष्ठ महाविद्यालये

नवीन शैक्षणिक आकृतिबंधानुसार १० + २ + ३ हा पदवीपर्यंतचा सुधारित अभ्यासक्रम १९७२ पासून अमलात आला. जून १९७२ मध्ये आठव्या इयत्तेसाठी हा अभ्यासक्रम प्रथम लागू करण्यात आला. त्यानुसार दहावीपर्यंत शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची शालांत परीक्षा मार्च १९७५ मध्ये प्रथम घेण्यात आली. जुन्या अभ्यासक्रमानुसार ऑक्टोबर १९७४ पर्यंतच्या परीक्षेत नापास विद्यार्थ्यांसाठी मार्च १९७५ पासून काही वेळा वेगळी परीक्षा घेण्यात आली. मार्च १९७५ च्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना जून १९७५ पासून +२ स्तरावरील अकरावीत प्रवेश देण्यात आला. नवीन अभ्यासक्रमानुसार मार्च १९७७ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक परीक्षा प्रमाणपत्र प्राप्त झाले. उच्च माध्यमिक अभ्यासक्रम प्रामुख्याने कनिष्ठ महाविद्यालयात शिकविला जातो. त्याशिवाय ज्या शाळांनी ११ व १२ वीचे वर्ग चालविण्याची तयारी दर्शविली, त्यांना विहित नियमानुसार अभ्यासक्रम पूर्ण करण्याची परवानगी देण्यात आली. त्यानुसार + २ चा अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालये तसेच काही शाळांमध्ये शिकविला जातो. काही कनिष्ठ महाविद्यालये स्वतंत्र असली तरी बहुतेक

[६] कार्यक्रम अंदाजपत्रक, शिक्षण व सेवायोजन विभाग, १९८६–८७ (महाराष्ट्र शासन), पृष्ठ १५८.

कनिष्ठ महाविद्यालये महाविद्यालयांशी संलग्न आहेत. उच्च महाविद्यालयांतील काही प्राध्यापक कनिष्ठ वर्गांनाही शिकवितात. जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष			कनिष्ठ महाविद्यालये	विद्यार्थी
१९७८–७९	..	..	९	१३,०४९
१९८१–८२	..	..	१७	२०,३५३
१९८२–८३	..	..	१८	२२,३९४
१९८४–८५	..	..	२४	२९,१२४
१९८६–८७	..	..	३९	४१,७९१

तक्ता क्र. ५ मध्ये माध्यमिक शाळांतील शिक्षकांची संख्या दिली आहे.

उच्च शिक्षण

इ. स. १९४० पर्यंत जिल्ह्यात उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध नव्हती. त्यावर्षी स्थापन झालेल्या गोविंदराम सेकसरिया वाणिज्य महाविद्यालयाने वाणिज्य विद्याशाखेतील उच्च शिक्षणाची सोय निर्माण केली. नागपूरला हिस्लॉप महाविद्यालय (१८८४) व मॉरिस महाविद्यालय (१८८५) स्थापन झाल्यावर बहुसंख्य विद्यार्थी मुंबई व पुण्यापेक्षा नागपूरला जाणे पसंत करू लागले. तत्पूर्वी उच्च शिक्षणासाठी काही विद्यार्थी पुणे, मुंबई व कलकत्त्याला जात होते. नागपूरला १९०६ मध्ये कृषि महाविद्यालय स्थापन झाल्याने त्या शाखेतील विद्यार्थी शिक्षणास्तव नागपूरलाच जाणे पसंत करीत. नागपूरला महाविद्यालयीन शिक्षण सुविधा उपलब्ध झाल्याने वर्धा जिल्ह्यात महाविद्यालये स्थापन करण्यास स्वातंत्र्य-पूर्वकाळी वाव नव्हता. नागपूर विद्यापीठ स्थापन (४ ऑगस्ट १९२३) होण्यापूर्वी नागपूर व अमरावतीची महाविद्यालये अनुक्रमे अलाहाबाद व मुंबई विद्यापीठाशी संलग्न होती. आर्वी, वर्धा व हिंगणघाटचे बरेच विद्यार्थी नागपूर विद्यापीठातून विद्याविभूषित होऊन बाहेर पडले.

स्वातंत्र्योत्तर काळात महाविद्यालये स्थापन करण्यास उत्तेजन मिळाले. सध्या (१९८८) जिल्ह्यात १३ महाविद्यालये असून त्यापैकी सहा कला व वाणिज्य विद्याशाखा, दोन शिक्षण-शास्त्र आणि प्रत्येकी एक विज्ञान, वाणिज्य, ग्रामीण सेवा, अभियांत्रिकी व वैद्यक विद्या-शाखांमध्ये विद्यादान करणारी आहेत.

जिल्ह्यातील उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय महाविद्यालय म्हणून सेवाग्रामच्या महात्मा गांधी वैद्यकीय महाविद्यालयाचा उल्लेख करावा लागतो. महात्मा गांधी जन्म-शताब्दीप्रीत्यर्थ (१९६९) भारतात जे अनेक उपक्रम हाती घेण्यात आले त्यापैकीच हा एक उपक्रम. शताब्दीप्रीत्यर्थ महात्माजींचे मान्यवर सहकारी खान अब्दुल गफारखान ऊर्फ

सरहद्द गांधीसुद्धा सेवाग्रामला उपस्थित राहिले. त्या संपूर्ण सोहळ्याचा एक भाग म्हणून कस्तुरबा गांधींच्या स्मरणार्थ हे ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय १९६९ मध्ये स्थापन करण्यात आले. ग्रामीण भारतातील हे पहिले वैद्यकीय महाविद्यालय होय. तेथे प्रतिवर्षी एम. बी. बी. एस. अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाच्या वर्गात ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यापैकी ३० जागा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी व उर्वरित अखिल भारतीय उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या आहेत. विद्यार्थी प्रवेशाबद्दलची एक विशेषता म्हणजे त्यासाठी प्रवेश परीक्षा घेतली जाते व परीक्षेसाठी शास्त्र विषयांव्यतिरिक्त गांधी तत्त्वज्ञान व विचारप्रणाली यावर एक पेपर असतो. या संस्थेच्या स्थापनेत महाराष्ट्र शासनाचा सहभाग असला तरी संस्थेचा सर्व कारभार सांभाळत आहेत डॉ. सुशिला नायर. ही गांधीवादी विदुषी व विचारवंत गांधीजींची डॉक्टर व सचिव होती. वैद्यकीय महाविद्यालय नागपूर विद्यापीठाच्या वैद्यकीय अभ्यासक्रमाबरोबरच ग्रामीण आरोग्याकडे विशेष लक्ष देते. बऱ्याच पाश्चिमात्य वैद्यकीय विशारदांनी या कामी मार्गदर्शन केले आहे.

जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांची माहिती तक्ता क्र. ६ मध्ये दिली आहे.

शिक्षक प्रशिक्षण

इ. स. १९०६ मध्ये जिल्ह्यात शिक्षक प्रमाणपत्र परीक्षेचे तीन वर्ग होते.[७] प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी वर्ध्याला बेसिक ट्रेनिंग इन्स्टिटयूट एप्रिल १९३८ मध्ये सुरू करण्यात आली.[८] इ. स. १९६३–६४ मध्ये जिल्ह्यात एकूण ११ प्रशिक्षण संस्था होत्या, त्यापैकी पाच संस्थांमधून प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण मिळत होते. अध्यापक विद्यालयांची माहिती खाली दिली आहे.

वर्ष	संस्था	विद्यार्थी			शिक्षक		प्रशिक्षित
		मुले	मुली	एकूण	पुरुष	महिला	
१९५०–५१	२	१६०	८०	२४०	१३	५	१८
१९५५–५६	२	१६०	८०	२४०	१३	५	१८
१९६०–६१	४	२९६	९२	३८८	३४	७	३१
१९६५–६६	४	३३७	८५	४२२	३०	७	३३
१९७०–७१	४	३१५	८०	३९५	३१	७	३६
१९७५–७६	४	१३६	१६२	२९८	२८	७	३५
१९८०–८१	५	६७	१९७	२६४	२५	७	३२
१९८३–८४	५	१३७	१२८	२६५	२३	९	३२
१९८६–८७	५	११४	१४८	२६२	२३	११	३४

[७] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९०६, पृ. २२१.

[८] **रिपोर्ट ऑफ दि कमिटी ऑन टीचर्स एज्युकेशन इन महाराष्ट्र स्टेट**, पृ. ३२.

पूर्वी विदर्भातील माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षणासाठी जबलपूरच्या स्पेन्स ट्रेनिंग कॉलेजमध्ये पाठविण्यात येई. ही व्यवस्था १९४२-४३ पर्यंत चालू होती. त्यानंतर विदर्भात खाजगी अध्यापक महाविद्यालयांची स्थापना झाली. इ. स. १९६२-६३ मध्ये विदर्भातील ३९ प्रशिक्षण संस्थांपैकी दोन शासकीय व तीन खाजगी अध्यापक महाविद्यालये वर्धा जिल्ह्यात होती. अध्यापक महाविद्यालयांची माहिती खाली दिली आहे.

वर्ष	संस्था	विद्यार्थी			शिक्षक		
		मुले	मुली	एकूण	पुरुष	महिला	एकूण
१९७६-७७	१	९६	५८	१५४	उ. ना.	उ. ना.	उ. ना.
१९७९-८०	१	१०९	१०२	२११	९	२	११
१९८०-८१	१	१४०	९९	२३९	९	२	११
१९८१-८२	१	७१	९१	१६२	९	२	११
१९८२-८३	१	७८	८१	१५९	८	२	१०
१९८४-८५	१	उ. ना.	उ. ना.	१२२	उ. ना.	उ. ना.	उ. ना.

व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण

तांत्रिक शिक्षणाची सोय नागपूरला उपलब्ध होती. तथापि वर्धा जिल्ह्यात ही सोय उपलब्ध झाली अगदी अलिकडे. वस्तुत: गांधीजीप्रणित नयी तालीम हा व्यावसायिक शिक्षणाचाच भाग होता. त्याचा प्रारंभही झाला वर्ध्यालाच. तथापि अभियांत्रिकी तंत्राचा उपयोग करून शिक्षण देण्याचे कार्य पंचवार्षिक नियोजनांपासूनच सुरू झाले. अशा प्रकारचे शिक्षण आता औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्र शिक्षण शाळा, तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालये या स्तरांवरून दिले जाते.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय. टी. आय.) : या संस्थांमधून निरनिराळ्या अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी व्यवसायांतील प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना संधाता (Welder), वीजतंत्री, कातारी, शिवण, यांत्रिकी, सुतारकाम, छपाई, इत्यादींचे शिक्षण दिले जाते. हा अभ्यासक्रम एक ते दोन वर्षांचा असतो. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांची संख्या खाली दिली आहे. या संस्था शासकीय आहेत.

स्थळ	स्थापना	१९७९	१९८२	१९८५	१९८६
पूलगाव ..	१९६२	३६०	३९२	३९२	३९२
वर्धा ..	१९८१	..	१९२	२०४	२०४

तंत्र शिक्षण शाळा : नवीन आकृतिबंधानुसार (१० + २ + ३) इयत्ता ८ वी ते १० वी व उच्चस्तर माध्यमिक पातळीवर इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये तांत्रिक शिक्षण दिले जाते. शालांत परीक्षेला तांत्रिक विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना तांत्रिक उच्च माध्यमिक शाळा, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश देण्यात येतो. जिल्ह्यातील तंत्रशाळांची १९८७–८८ ची माहिती खाली दिली आहे.

संस्था	स्थापना	विद्यार्थी	शिक्षक
शासकीय तांत्रिक विद्यालय, वर्धा ..	१९५५	उ.ना.	उ.ना.
सिव्हिल ॲण्ड रुरल इंजिनिअरिंग पॉलिटेक्निक, वर्धा	१९६३	३६१	३०
शासकीय तांत्रिक विद्यालय, हिंगणघाट ..	१९७६	५२०	१२
शासकीय तांत्रिक विद्यालय, आर्वी ..	१९७७	६९	८
हुतात्मा राष्ट्रीय स्कूल, आर्वी ..	१९८२	६०	५
शासकीय तांत्रिक विद्यालय, देवळी ..	१९८५	१८०	४
रंगलाल केडजीवाल पॉलिटेक्निक, पुलगाव	१९८८	१००	१२

तंत्रनिकेतन : अभियांत्रिकी पदविका पाठ्यक्रमासाठी तंत्रनिकेतने स्थापन केलेली आहेत. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना तंत्रनिकेतनात प्रवेश मिळतो. तांत्रिक आणि प्रात्यक्षिक शिक्षणावर त्यात भर दिला जातो.

वर्धा जिल्ह्यात १९८६–८७ मध्ये दोन अनुदानप्राप्त व एक विनाअनुदान अशासकीय तंत्रनिकेतन होते.

अभियांत्रिकी महाविद्यालय : इ. स. १९८३–८४ मध्ये यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेने सेवाग्रामला अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन केले. त्यात स्थापत्य, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स आणि यंत्र अभियांत्रिकी हे विषय शिकविले जातात. १९८६–८७ मध्ये महाविद्यालयात एकूण २४० विद्यार्थी होते. बोरगाव (मेघे) येथे औषधनिर्माण महाविद्यालय असून १९८६–८७ मध्ये त्यात ६० विद्यार्थी होते.

ग्रंथालये

ग्रंथालयांचे शिक्षण व ज्ञान प्रसाराच्या कामी महत्त्व ओळखून वर्धा जिल्ह्यात पहिले वाचनालय इ. स. १८६५ मध्ये आर्वीस स्थापन करण्यात आले. १९६७ मध्ये ग्रंथालय कायदा पास झाला. ग्रंथालयासाठी नवीन अनुदान संहिता १९७१ पासून अस्तित्वात आली. ग्रंथालयांची ग्रंथसंपदा व सदस्य संख्या लक्षात घेऊन त्यांना अ, ब, क, ड असा दर्जा दिला जातो. जिल्ह्यातील दोन प्रसिद्ध ग्रंथालयांची माहिती पुढे दिली आहे.

लोकमान्य वाचनालय, आर्वी (स्थापना १८६५) : प्रारंभी तेलंगराय देवस्थानात नेटिव लायब्ररी सुरू झाली. तिचे १९०१ मध्ये व्हिक्टोरिया लायब्ररी व १९२७ मध्ये लोकमान्य वाचनालय असे नामांतर झाले. इ. स. १९२७ मध्ये वाचनालय इमारतीचे सभागृह व टॉवर बांधण्यात आले. सुरुवातीपासूनच आर्वीमधील वकील, शिक्षक व समाज-कार्यकर्त्यांनी रस घेतल्यामुळे हे वाचनालय सांस्कृतिक चळवळीचे केंद्र बनले. पारतंत्र्याच्या काळात राष्ट्रीय चळवळीचे पडसाद तेथे उमटले. महर्षी धोंडो केशव कर्वे, शंकराचार्य, डॉ. कुर्तकोटी, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, लो. टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर इत्यादी मान्यवर व्यक्तींनी वाचनालयास भेटी दिल्या. इ. स. १९८४ मध्ये वाचनालयात ३५,००० पुस्तके, १८ दैनिके, ३२ साप्ताहिके व ७५ मासिके होती.

गांधी ज्ञान मंदिर वाचनालय, वर्धा : गांधी ज्ञान मंदिराची कल्पना प्रथम १९३७ मध्ये जमनालालजी बजाज यांनी मांडली. गांधी विचारधारा व साहित्य तसेच तत्संबंधी संशोधन करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्याची कल्पना होती. परंतु या कल्पनेला मूर्त स्वरूप येऊ शकले नाही. इ. स. १९५० नंतर या योजनेस गती मिळाली. या मंदिराकरिता राज्य शासनाने सात एकर जमीन अनुदान म्हणून दिली. इ. स. १९५० मध्ये वाचनालयाच्या इमारतीचे भूमिपूजन डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी केले व १९५३ मध्ये पं. जवाहरलाल नेहरुंच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन झाले. हे वाचनालय वर्धा शहरातील प्रमुख वाचनालय असून त्याला "अ" वर्ग मिळालेला आहे. वाचनालयात १९८४–८५ मध्ये २७,७२२ पुस्तके, १२ साप्ताहिके, पाच पाक्षिके व २६ मासिके एवढी ग्रंथसंपदा होती. इ. स. १९८४–८५ मध्ये वाचनालयाचे उत्पन्न २०,००७ रुपये व खर्च १९,२२४ रुपये होता.

वर्धा जिल्ह्यातील ग्रंथालयांची आकडेवारी खाली दिली आहे (१९८५).

तालुका	जिल्हा ग्रंथालय	तालुका पातळीवरील ग्रंथालये				एकूण
	ब वर्ग	अ वर्ग	ब वर्ग	क वर्ग	ड वर्ग	
वर्धा ..	१	१	२	४	९	१७
सेलू ..	..	..	..	२	८	१०
देवळी ..	..	..	१	२	६	९
हिंगणघाट ..	..	..	१	३	८	१२
आर्वी ..	..	१	..	४	११	१६
समुद्रपूर ..	..	..	..	..	५	५
कारंजा ..	..	..	१	४	१३	१८
एकूण ..	१	२	५	१९	६०	८७

वृत्तपत्रे

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी वर्तमानपत्रे अत्यल्प होती. मुंबई, पुणे व नागपूर शहरे वृत्तपत्रे काढण्यात आघाडीवर होती. स्वातंत्र्यानंतर मराठी वृत्तपत्रांची संख्या वाढली. वर्धा जिल्ह्यात **झंझावात** हे वृत्तपत्र हिंगणघाटहून व **वर्धा मार्केट** हे वर्धा येथून अनुक्रमे १९६२ व १९६८ मध्ये सुरू झाले. त्यानंतर **प्रतापगडचे वारे** हे सायं दैनिक वर्ध्याहून १९७५ मध्ये प्रकाशित होऊ लागले.

वर्ध्यातून **प्रतापगडचे वारे** व **विधाता** ही दैनिके आणि **जनसंग्राम, श्रमिक संघर्ष, जनसहयोग, जनता शक्ती, सिद्धार्थ जगत, नवमत, समय सूर्य** व **जागरण** ही साप्ताहिके व **कृषि वार्तापत्र** हे मासिक प्रकाशित होते. आर्वीतून **आर्वी टाईम्स** व **आर्वी समाचार**, पुलगावहून **पुलगाव टाईम्स** व **विवेक वार्ता** आणि हिंगणघाटहून **पार्थसारथी** व **झंझावात** नामक साप्ताहिके प्रकाशित होतात. ही नियतकालिके लहान असून त्यांचा खपही अत्यल्प आहे.

सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सेवा

सार्वजनिक आरोग्य विभागाची सुरुवात १८५८ मध्ये देवी निर्मूलन विभाग म्हणून झाली. सन १८९५ मध्ये या विभागावर आयुक्ताची नेमणूक करण्यात आली. इ. स. १९०६ मध्ये जिल्ह्यातील दहा दवाखान्यांपैकी तीन वर्ध्यात, दोन हिंगणघाटला, दोन पुलगावला आणि सिंदी, देवळी व आर्वीत प्रत्येकी एक होता. वर्ध्यातील स्कॉटिश फ्री चर्चचे रुग्णालय सर्वात मोठे असून तेथे ४४ खाटा उपलब्ध होत्या. चर्च मिशनकडून चांगली वैद्यकीय सेवा मिळत होती. मिशनतर्फे वर्ध्यात कुष्ठरोग सुधारगृहसुद्धा चालविले जाई. सन १९०४ मध्ये सार्वजनिक दवाखान्यामध्ये ४४८ आंतररुग्ण व १,०२,४४३ बाह्यरुग्णांची नोंद आढळते. वर्धा, देवळी, आर्वी व हिंगणघाटच्या दवाखान्यांमध्ये देवीची लस टोचण्यात येत असे.

वैद्यकीय सुविधा अत्यंत कमी दर्जाच्या होत्या. प्रजेमध्ये आरोग्यविषयक जागृतीचा अभाव होता. इ. स. १८९७ मध्ये प्लेगची भयानक साथ पसरली. त्यात शेकडो लोक मरण पावले. प्लेग, कॉलरा, देवी व हिवतापामुळे मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण भयानक होते.

जिल्ह्यातील जन्म-मृत्यूविषयक आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		जन्म	जन्माचे दर हजारी प्रमाण	मृत्यू	मृत्यूचे दर हजारी प्रमाण
१८९१	..	१७,४७१	४३.५८	१६,८६९	४२.०८
१९०१	..	१२,६६२	३२.८०	११,३००	२९.३४
१९११	..	२२,९०३	४९.८१	१५,०१४	३२.६५
१९२१	..	१९,९९८	४३.१२	१९,७८६	४३.६७
१९२९	..	२०,३८०	४३.९५	१६,२१६	३४.९७
१९४१	..	२५,५५८	४९.५०	१७,०४२	३३.०१
१९६१	..	२६,७५१	४२.१७	१३,७९७	२१.७५
१९८४	..	१७,०१३	१७.९	५,५७३	५.८

इ. स. १९१० मध्ये प्लेगच्या साथीने २,४१८ लोक व १९१८ मध्ये तापाच्या साथीने ३५,५१४ लोक मृत्यू पावले होते. स्वातंत्र्योत्तर काळात आरोग्यविषयक सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे तसेच काही रोगांचे निर्मूलन करण्यासाठी शासनाने योजनाबद्ध प्रयत्न केल्यामुळे मृत्यूचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत असल्याचे दिसते. सन १९७५ पासून जन्माचे दर हजारी प्रमाणही कमी झालेले आहे. शासनाने कुटुंब नियोजन कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविल्यामुळे हे प्रमाण कमी झाल्याचे आढळते.

पूर्वी अनुभवी सुईणीकडून किंवा घरातील वयस्कर महिलेच्या मार्गदर्शनाखाली बाळंतपण घरातच होत असे. साहजिकच वैद्यकीय सोयींच्याअभावी बालमृत्यूचे प्रमाण जास्त होते. परंतु प्रसुतिशास्त्रात होत गेलेली प्रगती आणि नवनवीन औषधांचे शोध यामुळे सर्वसामान्यांचा वैद्यकीय उपचाराकडे कल वाढला. परिणामी बाळंतपणासाठी सुतिकागृहामध्ये जाण्याची प्रवृत्ती वाढू लागली. शासनाने ग्रामीण भागात सुरू केलेली प्रसुतिगृहे व बालसंगोपन केंद्रे याद्वारे बालमृत्यूच्या प्रमाणात घट झाली आहे. जिल्ह्यातील बालमृत्यूची आकडेवारी खाली दिली आहे.

विभाग		१९७२	१९७७	१९८२	१९८३
आर्वी	..	२३२	१७७	१००	१०९
देवळी	..	२४०	१६३	८३	८८
हिंगणघाट	..	४०२	२२२	१७२	११५
कारंजा	..	३२६	१८१	१२५	११२
सेलू	..	१९८	६६	६४	६५
वर्धा	..	४९२	२८४	१७१	१६६
समुद्रपूर	..	३०१	१६५	८८	८१
एकूण	..	२,१९१	१,२५८	८०३	७३६

विविध रोगांमुळे जिल्ह्यात झालेल्या मृत्यूंची आकडेवारी तक्ता क्रमांक ७ मध्ये दिलेली आहे.

हिवताप : पूर्वी हिवताप सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने एक गंभीर समस्या होती. या रोगामुळे अनेक लोक मृत्युमुखी पडत हे खालील आकडेवारीवरून दिसून येईल.

वर्ष		मृत्यू	वर्ष		मृत्यू
१८९४	..	११,८१२	१९५७	..	५,४९२
१९००	..	७,१३०	१९६१	..	३,९४६
१९१२	..	७,२०६	१९७०–७१	..	१५०
१९१८	..	३५,५१४	१९७५–७६	..	९६
१९२९	..	७,२२२	१९७९–८०	..	५७
१९४०	..	६,५८२	१९८३	..	१
१९४५	..	८,११४			

इ. स. १९५० मध्ये जिल्ह्यात या रोगाचा प्रचंड फैलाव झाला होता. सन १९५३ ते १९५८ दरम्यान राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक घरात वर्षातून दोनदा डी.डी.टी. चा फवारा मारण्यात आला. कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाल्यावर १९५८ मध्ये राष्ट्रीय हिंवताप निर्मूलन कार्यक्रम सुरू करण्यात आला. वर्धा जिल्ह्याकरिता स्वतंत्र हिवताप निर्मूलन केंद्र नसल्यामुळे १९७६ पर्यंत येथील हिवताप निर्मूलन कार्य नागपूर केंद्रामार्फत केले जात असे. इ. स. १९७६ पासून वर्ध्यात स्वतंत्र केंद्र स्थापन करण्यात आले. या योजनेनुसार घरोघरी जाऊन रोग्यांची रक्त तपासणी करून औषधोपचार केला जातो. तसेच घरे व जनावरांच्या गोठ्यांमध्ये डी.डी.टी. आणि बी.एच. सी. सारख्या जंतुनाशकांची फवारणी करण्यात येते. रोग्यावर औषधोपचार करण्यासाठी प्राथमिक आरोग्य व शासकीय रुग्णालयांत मलेरिया निवारण केंद्रे उपलब्ध आहेत.

हिवताप चिकित्सालय, जंतुनाशक फवारणी व रक्त तपासणी संबंधीची माहिती खाली दिली आहे.

हिवताप चिकित्सालये

वर्ष	प्राथमिक आरोग्य केंद्रे	सरकारी दवाखाने	हिवताप पथके	उपचार केलेले रुग्ण	औषधी गोळ्यांचे वाटप
१९८१–८२	२	२	१	३०,४९९	९१,४९७
१९८५–८६	८	२	१	२२,४९३	६६,३५४

जंतुनाशकांची फवारणी

वर्ष		पहिली फवारणी (घरे)	दुसरी फवारणी (घरे)	विशेष फवारणी
१९७७	..	३,७९,९५७	३,९६,८७२	..
१९८१–८२	..	४,९४,१११	२,५५,२५०	..
१९८५–८६	..	२,९५,१२८	३,०८,३५५	५६,००७

हिवताप रक्त तपासणी

वर्ष		गोळा केलेले रक्त नमुने	तपासलेले रक्त नमुने	दूषित रक्त नमुने	मूलगामी रुग्णांची संख्या
१९७७	..	८३,०५४	८३,०५४	९५५	८९१
१९८१–८२	..	१,१०,६३५	१,१०,६३५	१,५१४	१,३७३
१९८५–८६	..	१,५६,३४६	१,५६,३४६	६९५	६८८

देवी : वर्धा जिल्ह्यात इ. स. १८९६ मध्ये देवीची साथ विस्तृत प्रमाणावर पसरून १,०५४ लोक मृत्यू पावले होते. देवीच्या रोगाने मृत्यू पावलेल्या व्यक्तींची उपलब्ध आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		मृत्यू	वर्ष		मृत्यू
१८९१	..	५४	१९३०	..	२६
१८९५	..	५८१	१९३८	..	२६
१९००	..	२१९	१९४०	..	३१४
१९०५	..	७२३	१९४५	..	२९३
१९१०	..	३०७	१९५०	..	५५९
१९२०	..	९८	१९६५	..	७०
१९२६	..	५०९	१९७०–७१	..	२

ऑक्टोबर १९६२ पासून राष्ट्रीय देवी रोग निर्मूलन योजना महाराष्ट्रात कार्यान्वित करण्यात आली. सुरुवातीस या योजनेचे उद्दिष्ट देवी प्रतिबंधक लस टोचून रोगाची लागण कमी करणे हे होते. एप्रिल १९६७ पासून महाराष्ट्र व्हॅक्सीनेशन ॲक्ट राज्यात लागू करण्यात आला. सर्व प्रतिबंधक उपाययोजना करून सुद्धा सन १९६८ पर्यंत हा रोग साथीच्या स्वरूपात अस्तित्वात होता. नवजात अर्भकांना जन्मताच दहा दिवसांचे आत देवीची लस टोचण्याची व्यवस्था प्रसुतिगृहात व घरोघरी सुरू करण्यात आली. रोगप्रतिबंधक उपायांमुळे १९७१ पासून वर्धा जिल्ह्यात देवीमुळे एकही व्यक्ती मृत्यू पावली नाही असा दावा आहे.

पटकी (कॉलरा) : पटकीची लागण प्रामुख्याने जत्रेच्या ठिकाणी झालेली आढळून येते. पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध नसते तसेच स्वच्छतेचा अभाव असतो. लोकांच्या अज्ञानामुळे रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. काही वेळा पावसाळ्यात रोगाचा प्रादुर्भाव होतो. पटकी नियंत्रण कार्यक्रमांतर्गत साथीचा प्रत्यक्ष उद्‌भव होण्यापूर्वी रोगप्रतिबंधक उपाय योजना राबविल्या जातात.

वर्धा जिल्ह्यात या रोगाचा १९०० मध्ये फार मोठ्या प्रमाणात फैलाव झाला होता. त्यावर्षी या रोगाने ४,९११ व्यक्ती मृत्यू पावल्या. जिल्ह्यात मृत्यू पावलेल्या व्यक्तींची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		मृत्यू	वर्ष		मृत्यू
१८९१	..	१२३	१९४५	..	२,०९४
१९००	..	४,९११	१९५०	..	१३८
१९०६	..	२,६३८	१९६५–६६	..	१४
१९१०	..	९६४	१९७०–७१	..	३
१९१६	..	४,४२५	१९७५–७६	..	२
१९२६	..	३७२	१९८३–८४	..	३
१९३८	..	१,७६२			

हत्तीरोग (फायलेरिया) : हा रोग मुख्यतः डासांपासून होतो. दाट लोकवस्तीच्या ठिकाणी जलनिःसारणाच्या सुविधा उपलब्ध नसल्यास हत्तीरोगाची लागण त्वरित होऊ शकते. रोगाला आळा घालण्यासाठी शासनाने १९५५ मध्ये हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम सुरू केला. या योजनेच्या अंतर्गत अळी प्रतिबंधक उपाययोजना, डासांचे विच्छेदन करणे, रक्त नमुने तपासणे, रोग्यांवर उपचार करणे, इत्यादी कार्यक्रम हाती घेण्यात येतात. वर्धा जिल्ह्यात १५ फेब्रुवारी १९७९ रोजी हत्तीरोग संशोधन व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. केंद्राच्या कक्षेत संशोधनाकरिता वर्धा तालुक्यातील २२ गावे होती. इ. स. १९८०–८१ मध्ये केंद्राच्या सेवाग्राम व पवनार येथे शाखा होत्या. याशिवाय पुणे, ठाणे, नागपूर, औरंगाबाद व अकोला येथे असलेली केंद्रीय सर्वेक्षण पथके त्यांच्या अधिकारक्षेत्राखाली असलेल्या विभागाची पाहणी करतात. नागपूर येथील सर्वेक्षण पथकाने इ. स. १९८५–८६ मध्ये वर्धा जिल्ह्याची पाहणी केली.

हत्तीरोग फिरते चिकित्सालय सुरू करण्यात आले आहे. चिकित्सालयाच्या अधिकार-क्षेत्रात ५०,००० लोकवस्ती असते. हे चिकित्सालय रात्री सर्वेक्षण करून हत्तीरोगी शोधून काढून त्यांच्यावर उपचार करते. वर्धा जिल्ह्यात अशा प्रकारचे चिकित्सालय अंजी या गावी १ नोव्हेंबर १९८५ पासून सुरू झाले.

वर्धा येथील संशोधन व प्रशिक्षण केंद्राने १९८६–८७ मध्ये जागतिक आरोग्य संघटना व सेवाग्राम वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने एक संशोधन प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पामध्ये मुख्यतः रोगनिदान व औषधोपचार तसेच विविध समस्यांवर संशोधन करण्यात येते. या कार्यक्रमाखाली सहा शहरांतील २.३१ लाख लोकसंख्येचा समावेश होतो. हत्ती-रोगासंबंधीची माहिती खाली दिली आहे.

वर्ष	तपासलेले रक्त नमुने	दूषित रक्त नमुने	एकूण रुग्ण	विच्छेदन केलेल्या डासांची संख्या	दूषित डासांची संख्या	वापरलेले अळी प्रति-बंधक तेल (लीटर)
१९७६–७७	९,७२३	११६	उ. ना.	८,०९८	उ. ना.	२२,८८८
१९७७–७८	७,१८०	६१०	४१	९,२८१	उ. ना.	१४,६०५
१९८१–८२	७,४२८	६६४	५२	८,३१६	५३	१३,८७९
१९८५–८६	१६,९१२	८३०	१३८	७,८२४	१६७	३३,८९५

उ. ना. = उपलब्ध नाही.

क्षयरोग : पूर्वी क्षयरोग भयंकर रोग मानला जात होता. त्यावर आयुर्वेदिक उपाय करीत असत. सन १९५४ पासून बी. सी. जी. लस टोचण्याची मोहीम शासनाने हाती घेतली. इ. स. १९५५ पासून बी. सी. जी. व क्षयरोग विभाग सार्वजनिक आरोग्य विभागाला जोडण्यात आला. क्षयरोगाचे नियंत्रण व निर्मूलन करण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत

बी. सी. जी. पथक व क्षयरोग विविक्ती कक्ष सुरू करण्यात आलेला आहे. क्षयरोगाने मृत्यू पावलेल्यांची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		मृत्यू	वर्ष		मृत्यू
१९६१	..	३२,०३२	१९७५	..	१५०
१९६५	..	१९१	१९८०	..	१२९
१९७०	..	१९४	१९८४	..	१४३

प्लेग : हा रोग फार भयंकर होता. या रोगाची साथ आल्यानंतर सर्व लोक शहर अथवा गावाबाहेर राहण्यासाठी जात असत, म्हणून त्याला महामारीचा रोग तसेच गाठीचा रोग असे संबोधण्यात येत असे. आरोग्य सेवेतील प्लेग पथकाची स्थापना १९४८ मध्ये झाली. इ. स. १९५३ पासून महाराष्ट्रात प्लेगचा प्रादुर्भाव झालेला नाही. वर्धा जिल्ह्यात या रोगाने मृत्यू पावलेल्यांची आकडेवारी खाली दिली आहे.

वर्ष		मृत्यू	वर्ष		मृत्यू
१८९८	..	१२५	१९१५	..	८४२
१९००	..	२	१९२०	..	२५४
१९०५	..	३९७	१९२६	..	४७२
१९१०	..	२,४१८	१९२९	..	२६

कुष्ठरोग : या रोगाविषयी फार पूर्वीपासून लोकांच्या मनात घृणा व भीती आहे रोगामुळे मानवी शरीराला विकृती येते. कुष्ठरोग संसर्गजन्य असल्याचा समज असल्याने रोग्यास समाजापासून दूर ठेवले जात होते. परंतु सध्या शासनाच्या प्रयत्नाने या रोगासंबंधीची भीती हळूहळू कमी होत आहे. इ. स. १९०१ मध्ये वर्धा जिल्ह्यात ३४२ कुष्ठरोगी होते. त्यावर्षी कुष्ठरोग्यांचे प्रमाण १०,००० लोकसंख्येमागे नऊ होते. महिलांपेक्षा पुरुषांमध्ये या रोगाचे प्रमाण जास्त होते. त्यावेळी फ्री चर्च मिशन रुग्णालयात कुष्ठरोग्यांवर उपचार केले जात असत. कुष्ठरोग नियंत्रण पथके, सर्वेक्षण, शिक्षण व उपचार केंद्रे, नागरी कुष्ठरोग केंद्रे, पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया केंद्रे, कुष्ठरोग प्रशिक्षण केंद्रे इत्यादी केंद्रांद्वारे कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम राबविला जातो. याशिवाय स्वयंसेवी संस्थांसुद्धा कुष्ठरोग निवारण व पुनर्वसनाचे काम करतात. कुष्ठरोगासंबंधी माहिती खाली दिली आहे.

वर्ष		कुष्ठ प्रमाण (दर हजारी)	सर्वेक्षण, शिक्षण व उपचार केंद्रे	नागरी कुष्ठरोग केंद्रे	कुष्ठरोग नियंत्रक पथके
१९७६–७७	..	१८.८५	२१	३	१
१९८१–८२	..	१८.८५	२१	३	२
१९८५–८६	..	१०.०९	२१	४	२

वर्ष		सर्वेक्षण केलेली गावे	सर्वेक्षण केलेली लोकसंख्या	आढळलेले रुग्ण	रुग्णांचे दर हजारी प्रमाण
१९७६–७७	..	८८६	६,५४,११६	८८६	१.३५
१९८१–८२	..	३२४	२,६१,१५८	उ. ना.	उ. ना.
१९८५–८६	..	४१७	३,३३,४४६	उ. ना.	उ. ना.

उ. ना. = उपलब्ध नाही.

जिल्ह्यामध्ये कुष्ठरोग्यांवर उपचार करणाऱ्या महारोगी सेवा समिती, दत्तपूर (ता. वर्धा), व गांधी मेमोरिअल लेप्रसी फाऊंडेशन, वर्धा या दोन मानसेवी संस्था आहेत.[१] इ. स. १९८४–८५ मध्ये या संस्थांमध्ये अनुक्रमे ५०० व ३२ खाटांची सोय होती. तसेच काशीखेड लेप्रसी कॉलनीमध्ये १५ खाटांची सोय होती.

कुटुंब कल्याण

प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या ही एक राष्ट्रीय समस्या बनल्यामुळे त्याबाबत उपाययोजना करणे अगत्याचे ठरले. लोकशाही तत्त्वांच्या कक्षेत राहूनच ही समस्या सोडविणे आवश्यक असल्यामुळे लोकजागृती, लोक शिक्षण व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे शासनाने ठरविले. यासाठी भारत सरकारने कुटुंब नियोजन धोरणाचा स्वीकार केला. महाराष्ट्रात कुटुंब नियोजन योजनेचा प्रारंभ १९५७ मध्ये झाला. या योजनेनुसार नागरी व ग्रामीण भागात कुटुंब नियोजन केंद्रे उघडण्यात आली. त्यांच्या-द्वारे पुरुष व महिला नसबंदी शस्त्रक्रिया, गर्भाशय वलये बसविणे, गर्भधारणाविरोधी गोळ्या वाटणे, गर्भप्रतिबंधक साधने पुरविणे इत्यादी कार्यक्रम हाती घेण्यात येतात. ग्रामीण भागात ही केंद्रे प्राथमिक आरोग्य केंद्रांना जोडण्यात आलेली आहेत. भित्तीपत्रके, सिनेमा स्लाईड, वर्तमानपत्रे आणि इतर प्रचार माध्यमाद्वारे लोकांना कुटुंब कल्याणाचे महत्त्व पटवून देण्यात येते. शासकीय आणि सेवाभावी संस्थांव्यतिरिक्त खाजगी डॉक्टरांनाही कुटुंब नियोजन कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात येते. कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे १९७७ पासून कुटुंब कल्याण कार्यक्रम असे नामाभिधान करण्यात आले. वर्धा जिल्ह्यात पहिले ग्रामीण कुटुंब नियोजन केंद्र १९५७–५८ मध्ये समुद्रपूरला उघडण्यात आले. सन १९५८ मध्ये आर्वीला आणखी एक केंद्र उघडण्यात आले. इ. स. १९६७ मध्ये जिल्ह्यात एकूण नऊ ग्रामीण कुटुंब नियोजन केंद्रे होती. इ. स. १९८५–८६ मध्ये त्यांची संख्या ३५ पर्यंत वाढली. जिल्ह्यातील कुटुंब नियोजन कार्यक्रमाविषयी आकडेवारी खाली दिली आहे

वर्ष		कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया			गर्भाशय वलये
		पुरुष	महिला	एकूण	
१९६१–६२	..	३४७	उ. ना.	३४७	उ. ना.
१९६५–६६	..	९३४	२१	९५५	१,३३७
१९६९–७०	..	१,१४७	६२३	१,७७०	२७
१९७३–७४	..	४७४	१,७१४	२,१८८	२०
१९७७–७८	..	८२	१,०५७	१,१३९	७४
१९८१–८२	..	४,२८०	३,४९०	७,७७०	५१६
१९८५–८६	..	१,४०५	४,७५५	६,१६०	५,०२९

उ. ना. = उपलब्ध नाही

[१] या संस्थांची माहिती पुढे दिली आहे.

कुटुंब कल्याण केंद्रांची ग्रामीण व नागरी विभागानुसार आकडेवारी खालील प्रमाणे होती.

वर्ष		ग्रामीण कुटुंब कल्याण केंद्रे		नागरी कुटुंब कल्याण केंद्रे		
		शासकीय केंद्रे	शासकीय उपकेंद्रे	शासकीय केंद्रे	शासकीय उपकेंद्रे	शासकीय संघटना
१९७७–७८	..	८	५४	१	१	२
१९८१–८२	..	८	२७	१	१	३
१९८५–८६	..	८	२७	१	१	३

माता व बाल आरोग्य सेवा : हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्यात नोव्हेंबर १९६९ पासून सुरू करण्यात आलेला आहे. मुलांना होणारा घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात आणि गरोदरपणी किंवा बाळंतपणी महिलांना होणारा धनुर्वात यापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी ही योजना आहे. या योजनेंतर्गत संसर्गजन्य रोगांविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण करणारी तिहेरी लस टोचण्यात येते. दुहेरी लसीमार्फत धनुर्वात प्रतिबंधक योजना १९७५–७६ मध्ये सुरू करण्यात आली.

सकस आहाराअभावी उद्‌भवणाऱ्या रक्त क्षयावरील प्रतिबंधक योजनेखाली फॉलिक ॲसिड व फेरस सल्फेटयुक्त गोळ्या गरोदर महिला, माता तसेच मुलांना वाटण्यात येतात. " अ " जीवनसत्त्वाअभावी मुलांना येणाऱ्या अंधपणाविरुद्ध प्रतिबंधक उपाययोजना १९७५-७६ मध्ये जिल्ह्यास लागू करण्यात आली. ही योजना सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, कुटुंब कल्याण केंद्रे, प्रसुतीपश्चात केंद्रे, वैद्यकीय महाविद्यालयीन रुग्णालये, नगरपालिका, जिल्हा रुग्णालये व स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविली जाते. योजनेखाली जिल्ह्यात झालेल्या कामाची माहिती तक्ता क्रमांक ८ मध्ये दिलेली आहे.

आरोग्य मार्गदर्शक[१०] : ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य सेवेचा चांगला लाभ देण्यास्तव भारत सरकारच्या आदेशानुसार ऑक्टोबर १९७७ पासून महाराष्ट्र राज्यात ग्रामीण आरोग्य मार्गदर्शक योजना टप्प्याटप्प्याने कार्यान्वित झाली. दर हजार लोकसंख्येमागे एका आरोग्य मार्गदर्शकाची तरतूद या योजनेत आहे. राष्ट्रीय हिवताप नियंत्रण योजनेखाली आलेल्या व बहुविध आरोग्य सेवा कार्यान्वित झालेल्या महाराष्ट्रातील वर्धा, अकोला, अमरावती, रत्नागिरी व कोल्हापूर या पाच जिल्ह्यांत स्वयंसेवकांच्या प्रशिक्षणाने या योजनेस सुरुवात झाली. आरोग्य मार्गदर्शक हा शासकीय सेवक असून त्याने राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाद्वारे गावकऱ्यांना आरोग्य शिक्षण देणे, पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण, किरकोळ आजारावर उपचार, लस टोचणीचा लाभ घेणाऱ्यांची यादी तयार करणे व कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा स्वीकार करण्यास उद्युक्त करणे ही कामे करावयाची असतात. वर्धा जिल्ह्यातील प्रशिक्षित मार्गदर्शकांची संख्या पुढे दिली आहे.

[१०] **कार्यक्रम अंदाजपत्रक, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग, १९८०–८१** (महाराष्ट्र शासन), पृ. १३२.

वर्ष		प्रशिक्षित आरोग्य मार्गदर्शक	वर्ष		प्रशिक्षित आरोग्य मार्गदर्शक
१९७८–७९	..	१५९	१९८४–८५	..	७९७
१९८२–८३	..	३३	१९८५–८६	..	८३५
१९८३–८४	..	२२			

वैद्यकीय सुविधा

ब्रिटिशपूर्व काळी दवाखान्यांच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे आयुर्वेदिक पद्धतीचे अल्प प्रमाणात ज्ञान असलेल्या वैद्यांवरच लोकांना अवलंबून रहावे लागत असे. प्रतिबंधक उपायांच्या अभावी प्लेग, क्षयरोग, देवी व कॉलरा यासारख्या भयंकर रोगांमुळे मृत्यूचे प्रमाण फार मोठे होते. इ. स. १९०६ मध्ये वर्धा जिल्ह्यात पुलगाव येथे दोन, हिंगणघाट, आर्वी, सिंदी व देवळीला प्रत्येकी एक दवाखाना होता. वर्ध्यात दोन, आर्वी व हिंगणघाटला प्रत्येकी एक अशी चार रुग्णालये होती. त्यापैकी वर्धा येथील स्कॉटिश फ्री चर्च रुग्णालयात सर्वात जास्त म्हणजे ४४ खाटांची सोय होती.

जिल्ह्यातील दवाखाने व डॉक्टरांची आकडेवारी तक्ता क्र. ९ मध्ये दिलेली आहे. इ. स. १९७५ मध्ये जिल्ह्यात शासकीय व नगरपरिषदेचे एकूण ४७ दवाखाने होते. त्यावर्षी एक ग्रामीण रुग्णालय (वडनेर), आठ प्राथमिक आरोग्य केंद्रे व आठ ग्रामीण कुटुंबकल्याण केंद्रे जिल्ह्यात कार्यरत होती. इ. स. १९८६–८७ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत पुढीलप्रमाणे सेवा उपलब्ध होती :— तीन ग्रामीण रुग्णालये, २२ ॲलोपॅथिक दवाखाने, ११ आयुर्वेदिक दवाखाने, २४ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १६३ उपकेंद्रे, ७ मंडी आरोग्य केंद्रे, १३ सुतिकागृहे आणि १९ महिला आरोग्य पर्यवेक्षक केंद्रे.[११] शिवाय वर्ध्याला के. ई. एम. जनरल व पोलीस रुग्णालय होते.

समाजकल्याण

औद्योगीकरणामुळे कामगारविषयक प्रश्नांची भर पडली. यातूनच कामगार कल्याण व पर्यायाने सामाजिक सुरक्षिततेची कल्पना उदयास आली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कल्याणकारी राज्याच्या कल्पनेस सांविधानिक मान्यता मिळाल्याने सामाजिक सुरक्षिततेची उपाय-योजना करणे आवश्यक झाले. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जमाती व इतर मागासलेल्या वर्गांचे सर्वांगीण कल्याण करण्याची जबाबदारी शासनाने घेतली. या योजनांच्या कार्यवाहीत सुसंगती आणणे आवश्यक वाटल्याकारणाने अगोदरच अस्तित्वात असलेल्या समाजकल्याण विभागाची व्याप्ती वाढविण्यात आली. दिनांक १ मे १९८३ पासून समाजकल्याण विभाग व आदिवासी विकास विभाग स्वतंत्र करण्यात आले. नाट्य महोत्सव, तमाशा महोत्सव व कुस्तीगीर परिषद या सारख्या सांस्कृतिक क्षेत्रातही समाजकल्याण विभागाने कार्यव्याप्ती वाढविली. समाजकल्याण कार्याचे मुख्यत्वे दोन भाग पडतात. पहिल्या भागात सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाची विविध योजनांद्वारे

[११] वर्धा जिल्हा परिषद, **वार्षिक प्रशासन अहवाल, १९८६–८७, पृ.** ५.

शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती करून त्यांना इतर पुढारलेल्या वर्गाच्या पातळीवर आणण्याच्या कार्याचा समावेश होतो. तर दुसऱ्या भागात समाजसुधारणा कार्याचा समावेश होतो. यामध्ये शारिरीक व मानसिक अपंगत्व असलेले, अनाथ, निराधार अथवा कुमार्गाला लागलेली मुले, तसेच भिकारी व गुन्हेगारांचे पुनर्वसन करणे, लोकनाट्य, कुस्ती, कला, खेळ इत्यादी कार्याद्वारे समाजसुधारणा करण्याचा अंतर्भाव होतो.

शिक्षण : मागासलेल्या वर्गात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून शासनाने शिक्षणाच्या वेगवेगळ्या स्तरांवर विद्यार्थ्यांना आर्थिक सवलती दिल्या आहेत. त्यामध्ये शिष्यवृत्ती, फी माफी, वसतिगृहांची सोय व आश्रम शाळांचा समावेश होतो. प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण घेताना मागासवर्गीय विद्यार्थ्यास शैक्षणिक शुल्क द्यावे लागत नाही, तसेच प्रवेश फी व परीक्षा फीसुद्धा शासन अनुदान म्हणून देते. मागासवर्गीय विद्यार्थ्यातील शुल्क माफी व परीक्षा शुल्क लाभार्थींची माहिती खाली दिली आहे.

वर्ष		मुले	मुली	वर्ष		मुले	मुली
१९७९–८०	..	५६	१८	१९८३–८४	..	७२	३१
१९८१–८२	..	२४	६	१९८६–८७	..	२९	१०

भारत सरकारची शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती मिळालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे होती.

वर्ष		वैद्यकीय	अभियांत्रिकी	शेतकी	व्यावसायिक	इतर
१९७७–७८	..	५०	५६	२	उ. ना.	२,३१७
१९८१–८२	..	५१	उ. ना.	उ. ना.	५५	१,९०८
१९८३–८४	..	३४	१०५	१३	१३६	३,२२८
१९८६–८७	..	९०	३२	१७	१७३	४,९५०

उ. ना. = उपलब्ध नाही.

पुष्कळ ठिकाणी शैक्षणिक सोयी उपलब्ध नसल्यामुळे मागासवर्गीय मुलांना दुसऱ्या गावी जाऊन रहावे लागते. अशा विद्यार्थी व विद्यार्थिनींकरिता शासनातर्फे वसतिगृहे चालविली जातात. गुणवान व होतकरू विद्यार्थ्यांना त्यामुळे पुढील शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन मिळते. वसतिगृहात विद्यार्थ्यांची निवास व भोजनाची व्यवस्था विनामूल्य करण्यात येते. शिवाय त्यांना सर्व पुस्तके व लेखन साहित्यही मोफत पुरविण्यात येते.

शिवाय खाजगी संस्थांमार्फतही मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे चालविण्यात येतात. वसतिगृहांसंबंधीची माहिती खाली दिली आहे.

बाब	१९७६–७७	१९८०–८१	१९८४–८५	१९८७–८८
(१) वसतिगृहे—				
मुलांची	१	२	२	३
मुलींची	१	१	२	१
(२) विद्यार्थी—				
अनुसूचित जाती ..	२६	७१	१४२	११९
अनुसूचित जमाती ..	२२	५२	१८	९५
विमुक्त जाती/भटक्या जमाती	२	४	..	१५
आर्थिकदृष्टचा मागासलेले ..	१२	३७	५५	५६

विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील मुलांसाठी आश्रमशाळा योजना १९५३ मध्ये सुरू करण्यात आली. शिक्षणासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध करून देऊन मुलांवर चांगले संस्कार व्हावे आणि पुढारलेल्या समाजातील मुलांबरोबर त्यांना सहजीवनाचा लाभ घेता यावा या हेतूने आश्रमशाळांची योजना शासनाने कार्यान्वित केली. ही योजना १९७४–७५ पर्यंत शिक्षण संचालनालय राबवित होते. जून १९७५ पासून ही योजना समाजकल्याण विभागामार्फत राबविली जाते. आश्रमशाळांची माहिती खाली दिली आहे.

वर्ष	आश्रमशाळा	विद्यार्थी	वर्ष	आश्रमशाळा	विद्यार्थी
१९७७–७८ ..	१	६१	१९८४–८५ ..	१	२४०
१९८०–८१ ..	१	१९५	१९८६–८७ ..	१	५८०
१९८२–८३ ..	१	२६७	१९८७–८८ ..	१	५६०

दुर्बल घटकांची सुधारणा : आर्थिक व सामाजिक दृष्टचा मागासवर्गियांच्या उन्नतीबरोबरच समाजकल्याण विभाग समाजातील दुर्बल घटकांसाठीही कार्य करतो. या कार्यक्रमात महिला कल्याण, अपंगांचे पुनर्वसन, कुटुंब व बालकल्याण, निराधार महिलांना संरक्षण व रोजगार उपलब्ध करून त्यांचे पुनर्वसन, अनाथ व निराधार मुलांची निगा, अनाथगृहे स्थापन करणे, गलिच्छ वस्तीतील मुलांना सकस आहार, अपंगांना प्रशिक्षण देऊन पुनर्वसन करणे, इत्यादींचा समावेश होतो.

बालगुन्हेगार अभिक्षणगृह : मुंबई मुलांचा कायदा, १९४८ अन्वये कार्यान्वित झालेली एक शासकीय संस्था वर्ध्यास आहे. बालगुन्हेगारीला आळा घालून भावी पिढीला संस्कारक्षम नागरिक बनविण्याचे कार्य या संस्थेमार्फत केले जाते. संस्थेतील वास्तव्य कालावधीमध्ये मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच व्यवसाय शिक्षणही दिले जाते. इ. स. १९८७–८८ मध्ये तेथे ६० सहवासी (Inmates) होते.

अनाथगृहे : इ. स. १९७३ मध्ये कायदाविरहित बालकल्याणाच्या योजना राबविण्याकरिता बालग्राम (महाराष्ट्र) नामक संस्था स्थापन करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्रात अनेक अनाथगृहे सुरू करण्यात आली. निराधार मुलांना कौटुंबिक जीवन जगण्याची संधी देऊन एक पर्यायी कुटुंब चालविणे हा योजनेचा उद्देश आहे. वर्धा येथील अनाथगृहात १९८८–८९ मध्ये २५ मुले होती.

महिला कल्याण : गलिच्छ वस्तीतील दुर्बल घटकांतील महिलांना स्थानिक मार्गदर्शन केंद्रामार्फत व्यावसायिक मार्गदर्शन व नोकरीसाठी प्रयत्न केले जातात. जिल्ह्यात १९८६–८७ व १९८८–८९ मध्ये अनुक्रमे तीन व आठ मार्गदर्शन केंद्रे होती.

अपंगांचे पुनर्वसन : अंध, कर्णबधीर व विकलांग व्यक्तींना शालेय शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आणि वैद्यकीय उपचार उपलब्ध करून शासनाने विशेष निवासी विद्यालये स्थापन केलेली आहेत. विशेष विद्यालयात मुलांची राहण्याची व इयत्ता चौथीपर्यंत शिक्षणाची व्यवस्था असते. इ. स. १९८७-८८ मध्ये जिल्ह्यात एक अंध शाळा व मुकबधिरांसाठी चार शाळा होत्या. अंध शाळेमध्ये ५० तर मुकबधिरांच्या शाळांमध्ये १६५ विद्यार्थी होते. त्या वर्षी एक अपंग बहुउद्देशिय संमिश्र केंद्रही होते. त्यामध्ये १५ विद्यार्थी होते. शिष्यवृत्ती प्राप्त झालेल्या अपंग मुलांची माहिती खाली दिली आहे.

वर्ष	अंध	मुकबधीर	अस्थिव्यंग
१९७७–७८	उ. ना.	१	उ. ना.
१९८०–८१	उ. ना.	१	उ. ना.
१९८२–८३	८	५८	उ, ना.
१९८४–८५	२	९	१७३
१९८६–८७	उ. ना.	उ. ना.	१००
१९८७–८८	१	३	१०५

उ. ना. = उपलब्ध नाही.

धर्मादाय संस्था

विविध क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने समाजकल्याणार्थ बऱ्याच स्वयंसेवी संस्था स्थापन झालेल्या आहेत. अशा संस्थांचे नियमन १९५० च्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमान्वये (Bombay Public Trusts Act) केले जाते. सन १८६० च्या सोसायटीज

रजिस्ट्रेशन ॲक्टनुसार स्थापन झालेल्या संस्थांचाही त्यात समावेश होतो. धर्मादाय आयुक्तांच्या अधिकारक्षेत्रातील १५ प्रादेशिक कार्यालयांपैकी एक कार्यालय चंद्रपूरला असून वर्धा जिल्हा त्या कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात येतो. जिल्ह्यात नोंदणी झालेल्या विविध प्रकारच्या संस्थांची माहिती खाली दिली आहे (३० जून १९८५).

विश्वस्त मंडळांची वर्गवारी	प्रकार	नोंदणी-कृत विश्वस्त मंडळे	मालमत्तेची किमत		सरासरी वार्षिक उत्पन्न (रु.)
			जंगम (रु.)	स्थावर (रु.)	
हिंदू विश्वस्त मंडळे	अ	५१६	७,७३,९५२	१,९२,८३,४५१	७,८६,५००
मुसलमान विश्वस्त मंडळे	ब	६४	३०,२५४	२,३६,००२	९८,१००
ठराविक जाती-करिता नसलेली विश्वस्त मंडळे	इ	२४९	६४,८४,४३२	४८,४४,७२६	८,७७,४००
संस्था नोंदणी अधि-नियम १८६० अन्वये नोंदणी झालेली विश्वस्त मंडळे	फ	६६७	४२,९७,१४४	३,५०,८४,१४४	१८,९५,८००

वर्धा जिल्ह्यातील काही निवडक स्वयंसेवी संस्थांची माहिती खाली दिली आहे.

गांधी मेमोरिअल लेप्रसी फाऊंडेशन : सेवाग्रामला १९५१ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेच्या शाखा नारासीपूर (कर्नाटक), चिलाकलापल्ली (आंध्रप्रदेश), मरारीकुलम (केरळ) व बलरामपूर (पूर्व बंगाल) या ठिकाणी आहेत. सेवाग्रामच्या मूळ संस्थेचे कामकाज सेवाग्राम कुष्ठरोगी विभाग, रेफरल रुग्णालय व वर्धा आरोग्य शिक्षण केंद्रामार्फत चालते. सेवाग्रामला फक्त बाह्य रुग्णांवर उपचार केले जातात. केंद्राच्या कक्षेत एकूण ३६ गावे होती. परंतु १९७५ मध्ये त्यातील नऊ गावे हस्तांतरित करण्यात आली. इ. स. १९८४–८५ मध्ये या शासकीय कुष्ठ केंद्रात १७,७९८ व्यक्तींची तपासणी करण्यात आली, त्यापैकी १,२०० रुग्णांना रोगमुक्त करण्यात आले. रेफरल रुग्णालयाची स्थापना १९६५ मध्ये वर्ध्यात झाली. रुग्णालयात बाह्यरुग्ण कक्ष, ३२ खाटा असलेला एक आंतररुग्ण कक्ष, भौतिक उपचार कक्ष व एक चाचणी कक्ष आहे. इ. स. १९८४ मध्ये ३,९३५ बाह्य रुग्णांवर व ६,६४३ आंतररुग्णांवर उपचार करण्यात आले. आरोग्य शिक्षण केंद्रामार्फत आरोग्य शिक्षणाचा कार्यक्रम राबविला जातो.

महारोगी सेवा समिती, दत्तपूर : इ. स. १९३६ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेत कुष्ठरोग्यांवर उपचार केले जातात. तेथे आंतररुग्ण व बाह्यरुग्ण विभाग आणि संस्थेची शेती असून त्यामध्ये कुष्ठरोगी काम करतात. याशिवाय शिवणकाम, विणकाम, दुग्ध-व्यवसाय व चर्मोद्योगाचे कुष्ठरोग्यांना शिक्षण दिले जाते. कुष्ठरोग्यांनी शेतीमधून काढलेले उत्पन्न पुढीलप्रमाणे होते.

(रुपये)

वर्ष	उत्पन्न	नफा	वर्ष	उत्पन्न	नफा
१९६६	३९,२८४	९,२९७	१९७८	४,५९,१५०	२,२६,२७३
१९७०	१,२०,२२७	३९,७१९	१९८३	८,९०,०९३	१,९८,०१२
१९७४	६,८५,१८९	१,९२,३८७			

महिला समाज, वर्धा : या संस्थेची स्थापना १९३६ मध्ये झाली. सामाजिक न्याय, वैयक्तिक नीतीमत्ता, समान हक्क व संधी या तत्त्वांवर आधारलेला समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने या संस्थेचे कार्य चालू आहे. इ. स. १९३६ मध्ये संस्थेचे फक्त २५ सभासद होते. सन १९८४ मध्ये ९२ सभासद होते. संस्थेमार्फत बालक मंदिर, प्राथमिक शाळा व शिवण वर्ग चालविला जातो. तसेच भजनी मंडळाचे कार्यक्रमही आयोजित केले जातात.

राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा : इ. स. १९३६ मध्ये नागपूरला हिंदी साहित्य सम्मेलन भरले होते. लखनौ काँग्रेस अधिवेशनानंतर वर्ध्याला परत येत असताना महात्मा गांधी, वल्लभभाई पटेल व जमनालालजींना साहित्य सम्मेलनास मार्गदर्शन करण्यास्तव आग्रह करण्यात आला. त्याला मान देऊन गांधीजी, पटेल व बजाज सम्मेलनास उपस्थित राहिले. त्यांच्या सुचनेनुसार हिंदी प्रचार समिती स्थापन करण्याचे ठरले. त्याप्रमाणे १५ सदस्यांची हिंदी प्रचार समिती स्थापन करण्यात येऊन (१९३७) तिचे मुख्यालय वर्धा शहरी ठेवण्यात आले. पुढे समितीचे राष्ट्रभाषा प्रचार समिती असे नामांतर करण्यात आले. सर्व प्रांतात हिंदीच्या प्रचारासाठी प्रांतीय समित्यांचे एकत्रीकरण करण्यात आले. समितीने राष्ट्रभाषा अध्यापन मंदिराची वर्ध्यात स्थापना केली. समितीद्वारा **सबकी बोली** हे मुखपत्र चालविले जात होते. मुखपत्राचे १९५० मध्ये **राष्ट्रभाषा** असे नामांतर करण्यात आले. समिती हिंदी भाषेच्या विविध प्रकारच्या १३ परीक्षा घेते. राष्ट्रभाषा शिक्षण केंद्रात प्रारंभिक व परिचयचे वर्ग घेतले जातात. राष्ट्रभाषा विद्यालयात कोविदपर्यंत व राष्ट्रभाषा महाविद्यालयात साहित्य–रत्नपर्यंत अभ्यासक्रम शिकविला जातो. समिती अंतर्गत संपूर्ण भारतभर ५१७ शिक्षण केंद्रे, ५३४ राष्ट्रभाषा महाविद्यालये व ३४ केंद्रीय महाविद्यालये कार्यरत आहेत. वर्धा केंद्रीय महाविद्यालयात नागभूमीतील विद्यार्थ्यांना हिंदी शिकविण्यासाठी विशेष सोयी उपलब्ध आहेत. समितीने सुमारे ७५ पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. समितीमध्ये ३५ सदस्य असून त्यामध्ये १९ प्रांतीय सभासद आहेत. संपूर्ण देशात समितीची चार हजार केंद्रे असून तेथील आठ हजार कार्यकर्ते प्रचार कार्य करतात.

जमनालाल बजाज केंद्रीय ग्रामोद्योग अनुसंधान संस्था, वर्धा (स्थापना नोव्हेंबर १९५५) **:** गांधीजींच्या प्रेरणेने १९३४ मध्ये मगनवाडीमध्ये अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळ स्थापन

झाले. त्यासाठी जमनालाल बजाज यांनी मगनवाडी येथील स्वत:ची जागा प्रदान केली. या संस्थेचे पहिले व्यवस्थापक जे. सी. कुमारप्पा होते. संस्थेचे १९४८ मध्ये सर्व सेवा संघात व १९५५ मध्ये ज. ब. कें. ग्रा. अ. संस्थेत रुपांतर झाले. इ. स. १९५७ पासूनही संस्था खादी आणि ग्रामोद्योग महामंडळाच्या अधिकाराखाली कार्यरत आहे. ग्रामोद्योगातील समस्यांचा विचार करून सुधारित साधने, तंत्रज्ञान व प्रक्रिया विकसित करणे हे या संस्थेचे ध्येय आहे. खादी व ग्रामोद्योग महामंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या या संस्थेने तेलघाणी, अखाद्य तेल व साबण उद्योग आणि हात बनावटीचा कागद तयार करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

कस्तुरबा हेल्थ सोसायटी, सेवाग्राम : डॉ. सुशिला नायर यांच्या प्रयत्नातून या संस्थेची स्थापना ११ नोव्हेंबर १९६४ रोजी झाली. तत्पूर्वी महात्मा गांधींनी सेवाग्रामला कस्तुरबाजींच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९४४ मध्ये लहानसे रुग्णालय सुरू केले होते. प्रथम ते गांधी स्मारक निधीमार्फत चालविले जात होते. सन १९६४ नंतर ते कस्तुरबा हेल्थ सोसायटीने ताब्यात घेतले. वर लिहिल्याप्रमाणे गांधी जन्मशताब्दीतील एक उपक्रम म्हणून उपरोक्त सोसायटीने १९६९ मध्ये महात्मा गांधी इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस ही संस्था स्थापन करून वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले. हे महाविद्यालय भारतातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आहे. या संस्थेमार्फत निसर्गोपचार आणि योग केंद्र, कस्तुरबा ग्रामीण आरोग्य केंद्र चालविले जाते.

मारवाडी शिक्षा मंडळ, वर्धा : जमनालालजी बजाज यांच्या प्रेरणेने या मंडळाची १९१० मध्ये स्थापना झाली. जमनालालजींनी मंडळाच्या विद्यमाने १९१२ मध्ये मारवाडी हायस्कूल सुरू केले. राष्ट्रीय शाळांची मोहीम गांधीजींनी सुरू केल्यावर हायस्कूलला नवभारत विद्यालय हे नाव प्राप्त झाले. सन १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत या विद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षक तुरुंगात गेल्यामुळे विद्यालय बंद पडले. नंतर त्या ठिकाणी गोविंदराम सेकसरिया महाविद्यालयाचे वर्ग भरू लागले. कालांतराने महाविद्यालय नवीन वास्तूत गेले. सध्या त्या ठिकाणी जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालय सुरू आहे. या मंडळाने गोविंदराम सेकसरिया महाविद्यालयात मातृभाषा माध्यमाचा महाविद्यालयीन शिक्षणात पहिला प्रयोग केला (१९४५).

महिलाश्रम, वर्धा (स्थापना १९२४) : जमनालालजींनी कार्यान्वित केलेला महिलाश्रम भारतातील एक नामांकित संस्था मानण्यात येत असे. प्रथम हा आश्रम हिंदू महिला मंडळ या नावाने सुरू होता. इ. स. १९३३ मध्ये त्याचे महिलाश्रम असे नामांतर करण्यात आले. या संस्थेने राष्ट्रीय महिला शिक्षणाचा शास्त्रशुद्ध पाया घालून एक आदर्श महिला संस्था निर्माण केली आहे. तेथे महिलांना स्वावलंबी जीवन जगण्याचे शिक्षण दिले जाते. शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर महिलांना "विनीत" ही पदवी दिली जाते.

अखिल भारतीय चरखा संघ, सेवाग्राम : चरखा संघाची स्थापना महात्मा गांधींनी १९२५ मध्ये अहमदाबादला केली होती. इ. स. १९३३ मध्ये गांधीजी वर्ध्याला आल्यानंतर संघाचे कार्यालय तेथे नेण्यात आले. संघामार्फत मगनवाडीत खादी विद्यालय आणि प्रशिक्षणाचे कार्य सुरू झाले. त्यानंतर इतर ठिकाणी खादी उत्पादन केंद्रे सुरू झाली. आज सुद्धा सेवाग्रामच्या चरखा संघातून खादी संशोधन कार्य चालू आहे.

तक्ता क्रमांक १

वर्धा जिल्ह्यातील साक्षरतेची टक्केवारी, १९६१, १९७१ व १९८१

तालुका[१]		एकूण			ग्रामीण विभाग			नागरी विभाग		
		पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला	एकूण
आर्वी ..	१९६१	३८.८८	१४.७४	२७.०१	३६.२३	१२.५५	२४.५९	५८.३९	३०.७७	४४.७९
	१९७१	५१.५७	२९.५७	४०.८०	५०.०४	२७.६५	३९.००	६३.६०	४३.५३	५३.८५
	१९८१	५८.२८	३८.०७	४८.९४	५७.६३	३६.०२	४७.०८	७०.७५	५२.४८	६१.९५
वर्धा ..	१९६१	४७.५९	२०.२२	३४.२४	३९.४०	१३.३६	२६.५०	६४.३३	३५.६२	५०.७९
	१९७१	५५.२८	३३.५७	४४.७९	४८.६१	२६.६६	३७.८७	६८.००	४७.७१	५८.४३
	१९८१	६३.६५	४४.१५	५४.२०	५७.९३	३६.८३	४७.६६	७५.०१	५९.०२	६७.३२
हिंगणघाट ..	१९६१	४१.१०	१३.८७	२७.६१	३५.२०	९.७१	२२.५१	६१.४८	२८.९०	४५.६३
	१९७१	४८.६५	२५.४०	३७.३१	२१.०६	४३.७७	३२.५७	६६.२६	४१.५१	५४.४०
	१९८१	५८.२३	३६.९२	४७.८२	५४.०३	३२.१७	४३.३१	७१.७७	५२.७८	६२.६२
एकूण जिल्हा ..	१९६१	४३.४४	१६.९८	३०.४५	३७.२४	१२.११	२४.८०	६२.८१	३३.२३	४८.६६
	१९७१	५२.५५	३०.२९	४१.७१	४७.७१	२५.१२	३६.७९	६७.००	४५.६७	५६.८६
	१९८१	६१.०१	४०.५३	५१.०५	५६.७५	३५.२७	४६.२७	७३.६४	५६.५४	६५.४०

[१] तालुके पुनर्रचनेपूर्वीचे.

तक्ता क्रमांक २

वर्धा जिल्ह्यातील शैक्षणिक स्तरासंबंधी माहिती १९६१, १९७१ व १९८१

	१९६१			१९७१			१९८१		
	एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला
(नागरी विभाग)									
एकूण लोकसंख्या ..	१,५०,०१५	७८,२६१	७१,७५४	१,९१,१०२	१,००,२६७	९०,८३५	२,३१,५१०	१,१९,९२२	१,११,५८८
निरक्षर ..	७७,०१५	२९,१०३	४७,९१२	८२,४४४	३३,०८९	४९,३५५	८०,१०४	३१,६०७	४८,४९७
साक्षर (शैक्षणिक दर्जा नसलेले) ..	२५,५६०	१५,२६७	१०,२९३	२६,५८७	१४,५३५	१२,०५२	३१,८४४	१६,९८९	१४,८५५
शैक्षणिक दर्जा असलेले——									
१ प्राथमिक किंवा ज्युनिअर बेसिक	४०,२२३	२७,७९२	१२,४३१	३६,०५३	२१,११७	१४,९३६	४३,३९०	२३,१६३	२०,२२७
२ माध्यमिक ..	..	..	..	२७,९३९	१७,७७४	१०,१६५	३९,९५६	२३,०४८	१६,९०८
३ शालांत व अधिक ..	५,९६६	५,००४	९६२	१४,२८०	१०,५८६	३,६९४	२२,२८७	१४,७९५	७,४९२
४ पदवीसमान नसलेली तांत्रिक शिक्षण पदविका	३९	३९	..	६५	५०	१५	२४	१५	९
५ पदवीसमान नसलेली तांत्रिक शिक्षणाव्यतिरिक्त इतर पदविका	९०	६९	२१	६८५	५१९	१६६	..	..	..
६ पदवी किंवा पदव्युत्तर दर्जा (तांत्रिक शिक्षणाव्यतिरिक्त)	८९३	७८७	१०६	२,३८९	२,०७८	३११	६,५४१	५,०४७	१,४९४

तक्ता क्रमांक २—समाप्त

	१९६१			१९७१			१९८१		
	एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला	एकूण	पुरुष	महिला
पदवी व पदव्युत्तर दर्जाच्या समान तांत्रिक शिक्षण पदवी किंवा पदविका									
१ अभियांत्रिकी ..	२६	२६	..	५५	५५	..	१५१	१४६	५
२ वैद्यकीय शिक्षण ..	३१	२७	४	८९	७४	१५	२७७	१९९	७८
३ कृषी ..	१६	१५	१	..	..	..	५३	५३	..
४ पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय ..	४	४	..	९४	९४	..	५	५	..
५ तंत्र शिक्षण ..	५	५	..	..	..	..	..	..	..
६ अध्यापन ..	७०	४७	२३	४२३	२९७	१२६	८७२	५६२	३१०
इतर ..	७७	७६	१	..	..	..	..	..	..
(ग्रामीण विभाग)									
लोकसंख्या ..	४,८४,२६२	२,४४,६३३	२,३९,६२९	५,८५,९०२	२,९७,४००	२,८८,५०२	६,९५,१०८	३,५५,७७४	३,३९,३३४
निरक्षर ..	३,६४,१४८	१,५३,५३८	२,१०,६१०	३,७२,१४८	१,५६,९३९	२,१५,२०९	३,७३,५१४	१,५३,८६४	२,१९,६५०
साक्षर (शैक्षणिक दर्जा नसलेले)	७०,१६८	५०,६६८	१९,५००	८०,२६९	४३,९८३	३६,२८६	१,१५,८८९	६९,२८२	४६,६०७
शैक्षणिक दर्जा असलेले—									
१ प्राथमिक ..	४८,०३०	३८,७०४	९,३२६	८३,९५८	५९,५३८	२४,४२०	१,०८,२८८	६५,२८६	४३,००२
२ माध्यमिक ..	..	..	..	४२,८८८	३१,००१	११,८८७	६४,६०६	४१,५१९	२३,०८७
३ शालांत व अधिक ..	१,९१६	१,७२३	१९३	६,६३९	५,९३९	७००	३२,८११	२५,८२३	६,९८८

तक्ता क्रमांक ३

व्यवस्थापनानुसार प्राथमिक शाळांची संख्या

	१९६५–६६	१९७०–७१	१९७५–७६	१९८०–८१	१९८५–८६	१९८६–८७
केंद्र सरकार	१	१	१	..	२	२
राज्य शासन	२	२	२	२	४	४
जिल्हा परिषद	७२२	७८७	८०२	८३१	८५९	८६४
नगरपालिका	६०	६०	६०	६६	६९	६९
खाजगी (अनुदान प्राप्त) ..	१४	१६	१५	२०	१९	१९
खाजगी (अनुदान नसलेल्या) ..	२	२	४	१३	२०	२४
एकूण	८०१	८६८	८८४	९३२	९७३	९८२

तक्ता क्रमांक ४

व्यवस्थापनानुसार माध्यमिक शाळा

	१९६५–६६	१९७०–७१	१९७५–७६	१९८०–८१	१९८५–८६	१९८६–८७
केंद्र शासन	..	..	..	१	१	१
राज्य शासन	..	..	..	२	२	२
ज़िल्हा परिषद	३	३	३	..	१	१
नगरपालिका	६	७	६	५	२	१
खाजगी (अनुदानप्राप्त) ..	८६	९६	१०७	९८	८३	८५
खाजगी (अनुदान नसलेल्या) ..	..	..	..	..	४२	४५
एकूण	९५	१०६	११६	१०६	१३१	१३५

तक्ता क्रमांक ५

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची संख्या

	१९६४–६५	१९७०–७१	१९८०–८१	१९८५–८६
माध्यमिक				
पुरुष	६४४	१,०८७	१,२९५	१,१८५
महिला	९७	२१०	२७६	३२८
एकूण	७४१	१,२९७	१,५७१	१,५१३
उच्च माध्यमिक				
पुरुष	३८६	३९०	४८२	९२४
महिला	५९	६०	७०	१८९
एकूण	४४५	४५०	५५२	१,११३
एकूण शिक्षक	१,१८६	१,७४७	२,१२३	२,६२६
प्रशिक्षित शिक्षक				
पुरुष	६५९	१,२२६	१,६७४	१,९८०
महिला	११९	२२३	३३५	४९४
एकूण	७७८	१,४४९	२,००९	२,४७४
प्रशिक्षित शिक्षकांचे शेकडा प्रमाण				
पुरुष	५८.१	६९.५	९४.२	९३.९
महिला	७२.१	८२.६	९६.८	९५.६
एकूण	५९.८	७१.५	९४.६	९४.२

तक्ता क्रमांक ६

वर्धा जिल्ह्यातील महाविद्यालये, १९८६–८७

महाविद्यालय	स्थापना	प्राध्यापकांची संख्या	विद्याशाखा	विद्यार्थी संख्या
गोविंदराम सेकसरिया वाणिज्य महाविद्यालय, वर्धा	१९४०	२२	वाणिज्य	१,७७७
स्वावलंबी शिक्षण महाविद्यालय, वर्धा	१९५८	८	शिक्षण	१३४
यशवंत महाविद्यालय, वर्धा	१९६०	४१	वाङमय, समाजविज्ञान, गृहविज्ञान, विधी	१,६७३
रा. सं. बिडकर कला-वाणिज्य महाविद्यालय, हिंगणघाट ..	१९६१	३३	वाङमय, समाजविज्ञान, वाणिज्य, विज्ञान	१,१५३
जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा	१९६२	४०	विज्ञान	७६०
कला-वाणिज्य महाविद्यालय, आर्वी	१९६३	१५	वाङमय, समाजविज्ञान, वाणिज्य	७६५
सुवालाल पाटणी कला-वाणिज्य महाविद्यालय, पुलगाव ..	१९६४	९	वाङमय, समाजविज्ञान, वाणिज्य	६४०
महात्मा गांधी इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, सेवाग्राम, वर्धा ..	१९६९	८७	वैद्यकीय शिक्षण	३८६
कॉलेज ऑफ रुरल सर्व्हिसेस, पिंपरी, वर्धा	१९७०	८	ग्रामीण सेवा	१५१
यशवंत महाविद्यालय, सेलू	१९७२	७	वाङमय, समाजविज्ञान	१४९
अभियांत्रिकी महाविद्यालय, सेवाग्राम	१९८३	३८	अभियांत्रिकी	७२३
यशवंत महाविद्यालय, देवळी	१९८५	५	वाङमय, समाजविज्ञान, वाणिज्य	१२७
शिववैभव शिक्षण महाविद्यालय, वर्धा	१९८६	९	शिक्षण	९२

तक्ता क्रमांक ७

वर्धा जिल्ह्यातील मृत्यू संख्या

आजार	१९६५	१९६८	१९७२	१९७५	१९७८	१९८१	१९८४
हिवताप	१३	१२	६	७	..	२	..
कॉलरा	५	७	६	२	..	५	..
क्षयरोग	१९१	२०५	१८६	१५०	९७	१३२	१८३
न्युमोनिया	१२१	१२८	११५	५०	३४	३७	७१
अतिसार व अमांश	७०७	८४०	५१२	३९९	२२३	२०४	१३९
विषमज्वर	..	२२६	१४७	९६	५७	..	८२
कर्करोग	२३	४१	५७	५३	४८	८२	५८
श्वसन रोग	१,०१०	९२०	८००	७५९	५१०	५७९	४६२
देवी	१७	..	..	..	..	..	..
इतर कारणे	७,३३६	८,२१२	५,८१३	५,१०४	४,२३७	५,०७७	४,५०९
एकूण मृत्यू..	९,४२३	१०,५९१	७,६४२	६,६२०	५,२०६	६,११८	५,५०४

तक्ता क्रमांक ८

माता व बाल आरोग्यासंबंधी माहिती

वर्ष	अर्भकांना लस टोचणी व मातांचे धनुर्वातापासून संरक्षण		पक्षघात, विषमज्वर व बी. सी. जी. लस टोचणी	माता व बालकांना कुपोषणाविरुद्ध प्रतिबंधक उपाय		अंधपणाविरुद्ध प्रतिबंधक उपाय
	माता	बालके	बालके	माता	बालके	बालके
१९७७–७८	७,२८२	३६,४२७	उ. ना.	१४,२०८	७,६४८	१४,५८६
१९७८–७९	१०,४९०	३०,७८५	उ. ना.	६,३७८	८,१०४	१६,६६१
१९७९–८०	३९,४०६	१,३२,३८५	उ. ना.	२४,५१४	२२,४९९	५८,४४८
१९८०–८१	१३,७१४	४१,०४५	३७,६३२	२७,५६८	२५,३८६	१७,०७५
१९८१–८२	२१,७२९	५२,०६२	८,०९८	१६,६४८	१५,००३	६०,४९६
१९८२–८३	१५,०००	३०,५४५	११,२३१	३६,४९१	३५,३५१	४२,३००
१९८३–८४	३६,४५७	४९,१३७	२४,४२९	४४,१७२	४९,७२०	४३,८९८
१९८४–८५	४३,८७५	३९,३५५	३३,७९०	५८,१३३	७३,४४२	४३,७३१

उ. ना. = उपलब्ध नाही.

तक्ता क्रमांक ९

वर्धा जिल्ह्यातील वैद्यकीय सोयी

	१९६८	१९७२	१९७६	१९८०	१९८४
रुग्णालये	७	७	७	९	१३
सूतिकागृहे	१९	१९	१९	१९	२२
दवाखाने	३९	४५	४६	५९	४५
प्राथमिक आरोग्य केंद्रे	८	८	८	८	११
डॉक्टर	७३	१०४	१९४	१८२	१६८
वैद्य	१०	१२	७	१२	९
परिचारिका	१७७	२०४	२५४	३४३	३४८
खाटा	५७९	८९४	९९७	१,०८९	१,३४९
आंतररुग्ण	१०,४९१	१४,१८०	२१,०१०	८२,८४३	४०,५६९
बाह्यरुग्ण	९,१७,६६४	१०,२२,५७०	१२,५१,५६६	१२,४५,०००	९,५७,०००

प्रकरण ११–संस्कृति[1]

प्राचीन वारसा

पवनारला अतिप्राचीन काळापासून सांस्कृतिक वारसा आहे. हा प्रदेश मौर्य साम्राज्यात समाविष्ट असल्याचा पुरावा चंद्रपूर जिल्ह्यातील देवटेक येथे सापडलेल्या अशोकाच्या शिलालेखावरून मिळालेला आहे. पवनारला इ. स. पूर्व सुमारे एक हजार वर्षांपासून मानववस्ती होती. पवनारच्या उत्खननाद्वारे या जिल्ह्याच्या सांस्कृतिक इतिहासावर उत्तम प्रकाशझोत पडला. सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने डॉ. शां. भा. देव यांनी इ. स. पूर्व १००० पासून ते इ. स. १५०० पर्यंत पाच कालखंड पाडलेले आहेत. पवनार उत्खननामध्ये सापडलेली रंगीत खापरे लोहयुगापूर्वीची असल्यामुळे ती प्रागैतिहासिक (Proto-Historic) काळातील असावीत. वाङ्मयीन परंपरेनुसार अगस्त्य मुनी विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेकडे आलेला पहिला आर्य होता. त्याने गोदातीरी वास्तव्य करून कौंडिण्यपूरच्या आसमंतात संचार केला असावा.

इ. स. २५० पासून अदमासे ५५० पर्यंत वाकाटकांनी विदर्भावर राज्य केले. दक्षिणेत राज्य करणाऱ्या राजवंशांमध्ये वाकाटक राजवंश सर्वश्रेष्ठ होता असे इतिहासकार मानतात. त्यांच्या कामगिरीचा या प्रदेशातील संस्कृतीवर फार मोठा परिणाम झाला. विशेष म्हणजे अदमासे दीडशे वर्षांपूर्वी वाकाटकांचे नावही इतिहासकारांना माहीत नव्हते. वाकाटकांचे नाव सर्वप्रथम ज्ञात झाले ते सन १८३६ मध्ये शिवनी येथे सापडलेल्या द्वितीय प्रवरसेनाच्या ताम्रपटावरून. त्यानंतरही बरीच वर्षे वाकाटकांचा इतिहास अज्ञात होता. सन १८६२ मध्ये डॉ. भाऊ दाजी लाड यांनी केलेले संशोधनही अगदीच त्रोटक होते. त्यानंतर डॉ. कृष्णस्वामी अय्यंगार यांनी या राजवंशावर अधिक प्रकाश पाडला. पुढे डॉ. काशीप्रसाद जयसवाल यांनी वाकाटकांच्या उज्वल इतिहासाकडे विद्वानांचे लक्ष वेधून घेतले. तथापि वाकाटकांच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाची भर पडली ती अकोला जिल्ह्यातील वाशीमला सन १९३९ मध्ये सापडलेल्या द्वितीय विंध्यशक्ती नामक राजाच्या ताम्रपटाने. अशाप्रकारे वाकाटकांच्या इतिहासाबाबत ज्ञानामध्ये हळूहळू भर पडली. या बाबीचे येथे विवेचन करावयाचे नाही. तथापि तत्कालीन धार्मिक परिस्थिती, स्थापत्य व शिल्पकला याबाबतची माहिती खाली देण्यात आली आहे. सांस्कृतिक वारसाबाबत विवेचन करताना या प्रकरणात पुरातत्त्वीय शिल्पे, संत परंपरा, साहित्य व साहित्यिक, वैदर्भी बोली, लोकसाहित्य व संगीत याबाबत माहिती दिलेली आहे.

वाकाटकांच्या काळी अभूतपूर्व धार्मिक जागृती झाली होती. वाकाटकांचा मूळपुरुष गृहपती वाकाटक हा बौद्ध धर्माचा अनुयायी होता. तथापि लवकरच त्याच्या वंशजांचे

---

[1] हे लेखन डॉ. कि. का. चौधरी, कार्यकारी संपादक व सचिव, महाराष्ट्र गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, यांनी केलेले आहे.

धर्मपरिवर्तन होऊन ते वैदिक व पौराणिक धर्माचे एकनिष्ठ अनुयायी बनले. वाकाटक राजांनी अश्वमेध यज्ञ आणि अग्निष्टोमादि यज्ञयाग केल्याचे ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. विद्वान ब्राह्मणांना श्रौत याग करण्यास राजे भरपूर अर्थसहाय्य करीत. वाकाटक काळात पौराणिक हिंदू धर्माचाही खूप उत्कर्ष झाला. त्यांनी अनेक हिंदू देवालये बांधली. त्यापैकीच प्रभू रामचंद्राचे एक उत्तुंग देवालय पवनारला धाम नदीच्या तीरावर होते. या देवालयाच्या जागेवर सध्या आचार्य विनोबा भावे यांचा सुप्रसिद्ध पवनार आश्रम आहे.[२] त्या प्राचीन देवालयातील काही शिल्पे येथे सापडली आहेत. **रामायण** महाकाव्यातील विविध प्रसंगांच्या शिल्पकृती देवालयात होत्या. विनोबाजींच्या आश्रम परिसरात खोदकाम करताना रामजन्म, वनवासगमन, भरतभेट, सुग्रीव–वाली युद्ध व वालिवध या रामचरित्रातील प्रसंगांचे चित्रण करणारे शिल्पपट सापडले. यापैकी एका शिल्पपटाकरिता विनोबाजींनी एक कुटी बांधून घेतली व त्याला "भरतभेट" असे नाव दिले. या शिल्पपटात (डावीकडून) सीता, राम, भरत व लक्ष्मण यांच्या मूर्ती आहेत. अदमासे १५३० वर्षांपूर्वीच्या या मूर्तींच्या मुखांवरील भाव बोलके आहेत. चित्रकूट पर्वतावर झालेल्या भरतभेटीच्या भावस्पर्शी प्रसंगाची कलाविष्काराद्वारे केलेली ही सुंदर अभिव्यक्ती आहे. पवनार म्हणजे द्वितीय प्रवरसेनाने आपल्या कारकिर्दीच्या अकराव्या वर्षानंतर आपल्या नावे वसवलेले प्रवरपूर असावे. तेथे त्याने आपली राजधानी स्थलांतरित केली होती.[३] प्रवरपूरचे हे देवालय द्वितीय प्रवरसेनाने त्याची आई प्रभावती गुप्ता हिच्या सांगण्यावरून बांधले असावे. प्रभावती गुप्ता ही रामभक्त होती.

वाकाटक कालात हिंदू धर्माप्रमाणे बौद्ध धर्मही प्रचलित होता. बौद्ध लेणी किंवा इतर अवशेष जरी जिल्ह्यात उपलब्ध नसले तरी या धर्माचे तेथे बरेच अनुयायी असावेत असे इतिहासकारांचे मत आहे. वाकाटकांच्या दानपत्रांवरून तत्कालीन धार्मिक प्रवृत्तीवर प्रकाश पडतो. त्यावरून असे दिसते की, बौद्ध धर्माचे महत्त्व कमी होऊन हिंदू धर्माचा प्रभाव वाढत होता.

वाकाटकांच्या शिलालेखांवरून तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर फारसा प्रकाश पडत नाही. इतके मात्र दिसून येते की, त्या काळी वर्णव्यवस्था प्रचलित होती. परंतु त्यामध्ये बराच लवचिकपणा होता. वाकाटक राजे स्वतः ब्राह्मण असले तरी त्यांचे काही मांडलिक क्षत्रीय होते. सामान्यतः आपापल्या जातीमध्ये विवाह करण्याची प्रवृत्ती होती, तरी अनुलोम-विवाह सुद्धा होत असत. त्याचे एक उदाहरण म्हणजे द्वितीय रुद्रसेन या ब्राह्मणजातीय वाकाटक राजपुत्राचा विवाह प्रभावती गुप्ता या वैश्य राजकन्येशी झाला होता. तरी सुध्दा तिचे पुत्र यथाकाल राजे बनले. बऱ्याच ब्राह्मणांनी क्षत्रीय तरुणींशी विवाह केल्याचेही दिसते.

वेदशास्त्रपारंगत ब्राह्मणांची उणीव नव्हती. काही ब्राह्मण श्रौत व गुह्य यागांचे पौरोहित्य करीत. नैष्ठिक ब्रह्मचर्य पालन करणाऱ्या ब्राह्मणांचे उल्लेखही सापडतात. काही ब्राह्मण तसेच क्षत्रीय राज्य शासनात उच्च पदावर असावेत. अजंठ्याच्या लेण्यांतील चित्रांमध्ये

[२] मिराशी, डॉ. वा. वि., **वाकाटक नृपति व त्यांचा काल** (नागपूर विश्वविद्यालय, नागपूर, १९५७), पृ. १०५.

[३] कित्ता, पृ. १०५–०६.

पुरुष व महिलांची सुंदर वस्त्रे दिसतात. तत्कालीन कालिदासाचे काव्य व नाटकांमध्ये पोशाखांचे वर्णन उत्कृष्टरीत्या चितारले आहे. त्यावरून तत्कालीन वस्त्र व अलंकारांची कल्पना येते.

वाकाटक कालात संस्कृत कवींना उदार आश्रय होता. काही राजे स्वत: उत्कृष्ट कवी होते. वाकाटकांचे बहुधा सर्व लेख संस्कृतमध्येच लिहिलेले आहेत. या काळामध्ये "वैदर्भी रीती" नामक उत्कृष्ट काव्यशैली उदयास आली. ही काव्यशैली सर्वत्र प्रसिद्धी पावली. कविकुलगुरू कालिदास यानेदेखील आपली नाटके व काव्य वैदर्भीरीतीत लिहिली. यावरून विदर्भातील तत्कालीन संस्कृत काव्याचा दर्जा दिसून येतो. त्याकाळात **हरिविजय** हे उत्कृष्ट प्राकृत काव्य निर्माण झाले. **हरिविजय**चा कर्ता होता सर्वसेन नावाचा राजा. सर्वसेन वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेचा संस्थापक होता असे डॉ. मिराशी यांनी प्रतिपादन केले आहे.

वाकाटकांच्या नंतरसुध्दा वर्णव्यवस्था कायम होती. तथापि ब्राह्मण आपला पारंपरिक व्यवसाय सोडून क्षात्रधर्म आचरण करू लागले, संरक्षणदलात सामील होऊ लागले. काही ब्राह्मण जमीनदारी करू लागले तर अनेकांनी सावकारी पेशा पत्करला. क्षत्रीय कृषिव्यवसाय तसेच व्यापारावर उपजीविका करू लागले. व्यावसायिक अभिसरणाबरोबर चातुर्वर्णाची पकड कालांतराने शिथील होऊ लागली. इतके मात्र खरे की, शुद्र वर्गातील लोकांची पिळवणूक व त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला नाही. त्याबाबत मध्ययुगीन काळात संतांचे शिष्य व प्रबुध्द वारकरीपंथीय साधूंनी मोलाची कामगिरी केली. शूद्रांकडे अनुकंपेच्या दृष्टीने पाहण्यासाठी संतांनी बरेच समाजप्रबोधन केले. कोणतीही राजवट जे करू शकली नाही ते समाजप्रबोधन कार्य वर्धा जिल्ह्यात आर्वीचे तेलंगराय व संत मायवाई यासारख्या संन्यस्त व्यक्तींनी केले. किंबहुना इ. स. १५५० च्या सुमारास तेलंगरायने स्थापन केलेल्या आर्वीस तेलंगरायांची आर्वी असे संबोधतात. त्यांच्या कार्याचा तपशील या प्रकरणात दिलेला आहे.

हिंदू राजवटीचा अंत : देवगिरीच्या मराठी भाषिक यादवांच्या अपकर्षसमयी वर्धा जिल्ह्यासकट संपूर्ण विदर्भ, सध्याचा पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, मध्य प्रदेशचा महाराष्ट्रालगतचा प्रदेश, दक्षिण गुजरातचा काही भाग आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांवर यादवांचे राज्य होते. राज्याच्या बहुतांश भागात आर्थिक सुबत्ता होती. यादवांच्या उत्तेजनाखाली कला, साहित्य, व्यापार व कुटिरोद्योगांची विपुल भरभराट झाली. परराष्ट्र व्यापारही वृध्दिंगत झालेला होता. पैठण, देवगिरी व विदर्भातून उंची कापड निर्यात करून त्या मोबदल्यात सुवर्णप्राप्ती होत असे. इ. स. १२९६ मध्ये देवगिरीचे राज्य वैभव व संपन्नतेच्या शिखरावर पोहोचले[४] असे निश्चितपणे म्हणता येईल. इषामीने (Ishami) देवगिरीच्या वैभवाचे केलेले वर्णन[५] जरी यादवांच्या राजधानीपुरतेच मर्यादित असले तरी त्यावरून विदर्भाच्या वैभवाची कल्पना करणे शक्य आहे. महानुभावपंथी वाङमयानुसार अचलपूर व रिद्धपूरला पंथाची केंद्रे होती, आणि सर्व राज्यात तीर्थक्षेत्रांना व देवस्थानांना

[४] शेरवानी, एच. के. व जोशी, पी. एम. (संपा.), **हिस्टरी ऑफ मिडीव्हल डेक्कन, ग्रंथ १** (आंध्र प्रदेश शासन, हैदराबाद, १९७३), पृ. ३६.

[५] **इषामी : फुतूहुज–सलातीन** (Futuhu's-Salatin) मध्ये देवगिरीचे काव्यात्मक वर्णन दिले आहे.

राजांकडून विपुल दान मिळत असे. ब्राह्मणांना अध्ययन व विद्यादानास्तव मदत करण्यासाठी गावे अग्रहार म्हणून लावून दिलेली होती. वर्धा नदीच्या पूर्वेकडील प्रदेश त्या काळी "झाडि-मंडल" म्हणून प्रसिध्द होता. त्याचाही महानुभावपंथी वाङमयात उल्लेख आहे.

दख्खनचा प्रसिद्ध इतिहासकार मुहम्मद कासिम फेरिश्ता ऊर्फ हिंदुशाह याने **गुलशन-इ-इब्राहीमी** या सुप्रसिद्ध ग्रंथात लिहिल्याप्रमाणे अलाउद्दिन खलजीने १२९६ मध्ये देवगिरीच्या तहानुसार सहा मण सोने, सात मण मोती, दोन मण पाचू, रत्ने व हिरे, १००० मण चांदी, रेशमी कापडाच्या ४,००० गासड्या आणि इतर मौल्यवान दख्खनी वस्तू, हत्ती, घोडे व इतर मिळकत हस्तगत केली. यावरून तत्कालीन यादव राज्याच्या सुस्थितीची कल्पना येऊ शकते.

अलाउद्दिन खलजीच्या विजयानंतर दिल्लीकडून सूफी धर्मप्रसारक मोठ्या संख्येने दक्षिणेत आले. असा दावा केला जातो की, तेराव्या शतकाच्या अखेरीस व चौदाव्या शतकाच्या प्रारंभी इकडे आलेल्या सूफी धर्मप्रचारकांमुळे सुलतानी राजवट दक्षिणेत स्थिरावण्यास मदत झाली. इ. स. १३०९ च्या सुमारास सातशे सूफी दक्षिणेत धर्मप्रचारात कार्यरत होते.

विविध कालावधींमध्ये वऱ्हाडच्या सीमा बदलत गेल्या. यादवकालीन वऱ्हाडात वर्धा नदीच्या पूर्वेकडील प्रदेश समाविष्ट होता. इ. स. १३४७ मध्ये बहमनींचा उदय झाल्यावर सुद्धा वऱ्हाडची प्रादेशिक व्याप्ती सर्वसाधारणपणे यादव काळात होती तशीच राहिली. तथापि बहमनींची केंद्रसत्ता दुर्बल झाल्यामुळे राज्याचे तुकडे पडून आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही, बरीदशाही, व इमादशाही या स्वतंत्र राज्यसत्ता निर्माण झाल्या. वऱ्हाडच्या इमादशाहीचा अंमल मात्र वर्धा नदीच्या पूर्वेकडील प्रदेशावर स्थापन होऊ शकला नाही. वर्धा वऱ्हाडची पूर्व सीमा बनली. शेरवानी व जोशी यांनी वर्धा नदी ही इमादशाही राज्याची सीमा रेखा दाखविली आहे.[६] त्यांनी तयार केलेल्या नकाशावरून (१४६०–१५७४) वर्धा जिल्हा गोंडवनात समाविष्ट असून त्यावर गोंड राजांचे राज्य होते. वुलसले हेग या इतिहासकाराने दाखविल्याप्रमाणेसुद्धा बहमनी काळात १३९८ पर्यंत बहमनी साम्राज्याची पूर्व सीमा पेंच नदीपर्यंत पोहोचली होती.[७] तथापि बहमनींच्या विघटनानंतर अस्तित्वात आलेल्या इमादशाहीची सीमा वर्ध्यापर्यंतच मर्यादित होती.[८]

काही बहमनी राजांच्या काळात धार्मिक सहिष्णुता असली तरी इतर राजांच्या अमलाखाली हिंदू प्रजाजनांना दुय्यम नागरिकांचा दर्जा प्राप्त झाला. वैफल्य व दैन्यावस्था पसरली. गोंड राजे द्रविड वंशाचे हिंदू होते. म्हणून गोंड प्रबळ झाल्यावर हिंदूंना आपले मूळ स्थान प्राप्त झाले असावे.

चक्रधरस्वामींच्या **लीळाचरित्र** ग्रंथात अचलपूरचा (नंतरचे एलिचपूर) अळजपूर असा उल्लेख आढळतो. तेथे महानुभावपंथाचे केंद्र असल्याचे वर म्हटलेच आहे. तत्कालीन

---

[६] शेरवानी व जोशी, पूर्वोक्त, पृ. २८६–८७ मधील नकाशा.

[७] हेग वुलसले (संपा.), **दि केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया, ग्रंथ ३** (एस. चांद अँड कं., नवी दिल्ली, १९६५), पृ. १९२–९३ मधील नकाशा. क्र. ४.

[८] कित्ता, पृ. ४३२–३३ मधील नकाशा क्र. ६.

विदर्भात नाथ संप्रदाय व दत्त संप्रदायाचाही प्रचार झालेला असावा. दत्त संप्रदायाचे अध्वर्यु नृसिह सरस्वतींचा जन्म तर याच प्रदेशातील कारंजा (लाड) गावी झालेला. या ठिकाणाहून इकडे धर्मप्रचार झालेला दिसतो. बहमनी काळात वैदिक धर्मसंवर्धनाचे कार्य सरस्वतींनी धडाडीने केले. **गुरुचरित्र** ग्रंथातील उल्लेखानुसार अलाउद्दिन अहमद दुसरा (१४३६–५८) याच्या कारकिर्दीत धर्मसहिष्णुता होती.

फेरिश्ताच्या काळी हिंदू समाजात बालविवाह प्रचलित होता. **ज्ञानेश्वरी** व **लीळाचरित्र** हे ग्रंथही याची साक्ष देतात.[९] तत्कालीन समाजात सतीची प्रथा रूढ होती. रामदेव यादवच्या सिंघण नामक पुत्राने राणी असलेल्या आपल्या सावत्र आईस तिच्या इच्छेविरुद्ध सती जाण्यास भाग पाडल्याची कथा हृदयद्रावक आहे.[१०]

पुढे १४ मार्च १५९६ रोजी अहमदनगरची चांदबिबी व अकबरपुत्र मुराद यांच्यात झालेल्या तहानुसार मुघलांनी वऱ्हाड हस्तगत केला. मध्यंतरीच्या संक्रमणावस्थेनंतर ऑगस्ट १६०० मध्ये वऱ्हाड मुघल साम्राज्यात समाविष्ट झाला. त्यामध्ये वर्धा जिल्ह्याचा समावेश असल्याचे दिसते. इतके मात्र खरे की, मुघलांच्या सार्वभौम सत्तेखाली गोंड राजे हेच गोंडवनाचे वास्तविक सत्ताधिश बनले. गोंडांची अबाधित अधिसत्ता राहिली ती नागपूरकर भोसल्यांच्या प्रस्थापनेपर्यंत.

पुरातत्त्वीय शिल्पे व सांस्कृतिक वारसा

पवनार म्हणजे विदर्भावर तिसऱ्या ते सहाव्या शतकांत राज्य करणाऱ्या वाकाटक राजांची प्रवरपूर नामक राजधानी असावी असे अलीकडील इतिहासकारांनी प्रतिपादन केले आहे. प्रवरपूरचा उल्लेख राजा प्रवरसेन दुसरा याच्या ताम्रपटांत आलेला आहे. या नगरात असताना प्रवरसेन याने हे ताम्रपट प्रदान केले. इतिहासकार मोरेश्वर दीक्षित यांच्या मते प्रवरसेन पहिला या राजाने प्रवरपूर नगर स्थापन केले. तथापि प्रा. वा. वि. मिराशी यांच्या मते वाकाटकांची पहिली राजधानी रामटेकजवळील नंदीवर्धनला होती व प्रवरसेन दुसरा याने राजधानीचे प्रवरपूरला स्थलांतर केले.[११] डॉ. मिराशी यांचे प्रतिपादन उचित वाटते. विनोबा भावे यांचा पवनार आश्रम बांधला जात असताना त्या परिसरात गुप्त व वाकाटक शैलींची मोठमोठी शिल्पे सापडली. त्यापैकी गंगा मूर्तीच्या शिल्पावर "गंगा भगवती" असा लेखही आहे. याशिवाय पवनारला वेळोवेळी भग्न शिल्पे, नाणी, मणी इत्यादी अवशेष सापडले. त्यावरून संशोधनाच्या दृष्टीने नागपूर विद्यापीठाच्या विद्यमाने १९६७ मध्ये डॉ. शां. भा. देव यांच्या नेतृत्वाखाली उत्खनन करण्यात आले. त्याद्वारे विदर्भाचा इतिहास, संस्कृती आणि शिल्पकलेबाबत बहुमोल माहिती उपलब्ध झाली आहे. पवनारच्या वेशीत चौदाव्या-पंधराव्या शतकांतील देवनागरी लिपीत उत्कीर्ण केलेला एक शिलालेख उपलब्ध झाला. त्याशिवाय तेथील एका घरात बुऱ्हान निजामशहाचा देवनागरी लिपीतील दुसरा लेखही भिंतीत बसविलेला आहे. मुख्य टेकाडावर असलेली मशीद, किल्ला आणि तटबंदी या सर्वांवरून वाकाटक ते मुसलमान काळ या विस्तृत कालखंडातील लोकवस्तीची माहिती मिळते.

---

[९] शेरवानी व जोशी, पूर्वोक्त, पृ. २१७.

[१०] कित्ता.

[११] अधिक माहितीसाठी प्रकरण २-इतिहास पहावे.

डॉ. देव यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या उत्खननाचा मुख्य उद्देश पवनार व प्रवरपूर यांचा समन्वय दाखविणे शक्य आहे काय हे पाहणे होता. त्यासाठी विस्तृत प्रमाणावर उत्खनन करणे आवश्यक होते. तथापि त्यावर काही मर्यादा पडल्या. मर्यादा पडण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण असे की, पवनारच्या सर्वात उंच प्राचीन टेकाडावर मशीद व दर्गा असल्याने उत्खनन करणे अशक्य झाले. शिवाय टेकडीच्या मालकीबद्दल वाद निर्माण झाला. परिणामत: मर्यादित स्वरूपात उत्खनन केल्यामुळे सर्वच माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. एवढे मात्र निश्चित की, जो पुरावा उपलब्ध झाला त्यामुळे इतिहासात बहुमोल भर पडली आहे.

पवनारला बरीच प्राचीन नाणी सापडली आहेत. रोमन मद्यकुंभाचे आत राळ चिकटलेले तुकडे उत्खननात सापडले. हे तुकडे इसवी सनाच्या प्रारंभीचे असावेत. तत्पूर्वीच्या काळात विदर्भ मौर्य साम्राज्यात समाविष्ट असल्याचा पुरावा चंद्रपूर जिल्ह्यातील देवटेक येथे सापडलेल्या सम्राट अशोकाच्या शिलालेखावरून मिळतो.

संकलित पुराव्यांवरून स्पष्ट होते की, विदर्भाच्या सांस्कृतिक इतिहासाची प्राचीनता वाकाटक काळाच्या बऱ्याच मागे नेता येते. त्या दृष्टीने पवनार उत्खननाचे महत्त्व फार मोठे ठरते. कारण त्यावरून इतिहासकारांनी असे दाखवून दिले आहे की, पवनारला इ. स. पूर्व सुमारे एक हजार वर्षांपासून मानववस्ती होती. त्या काळापासून मध्ययुगीन मुसलमानी काळापर्यंत वस्तीमध्ये वाढ झाल्याचे आढळून आले. पुरातत्त्वीय आणि वाङमयीन पुराव्यांचा मेळ घातल्यास सुसंगत असा इतिहास लिहिणे आता शक्य झाले आहे.

पवनारचे उत्खनन प्रामुख्याने किल्ला या नावाने ओळखल्या जाणाऱ्या टेकाडावर करण्यात आले. शिवाय तटबंदीजवळ आणि बाजूच्या परिसरातही उत्खनन करण्यात आले. सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची माहिती मिळाली ती किल्ल्यावरील "पवनार-१" यामधील उत्खननाद्वारे. पवनार-१ या खड्डयात अदमासे सात मीटरपर्यंत खोदकाम करणे शक्य झाले. त्यामध्ये आढळलेल्या पुराव्यानुसार सर्वप्रथम मानववस्ती काळ्या मातीवरील घनदाट जंगले तोडून केली असावी. त्यानंतर निरनिराळ्या कालखंडात वस्ती झाली. पवनार-१ खड्डयात निरनिराळ्या वस्त्यांचे नऊ थर उत्खननाद्वारे मिळाले. सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने डॉ. देव यांनी पुढीलप्रमाणे कालखंड मानलेले आहेत. कालखंड पहिला—इ. स. पूर्व १०००; कालखंड दोन अ—इ. स. पूर्व ५०० ते १००; कालखंड दोन ब—इ. स. पूर्व १०० ते इ. स. तिसरे शतक; कालखंड तीन—इ. स. ३०० ते ८०० आणि कालखंड चार—इ. स. १००० ते १५००.[१२]

विविध कालखंडांची कालनिश्चिती तत्कालीन थरात सापडलेल्या विविध वस्तूंवरून करण्यात आली. त्यावरून तत्कालीन मानवी जीवनाची कल्पना करता येते. पहिल्या कालखंडात काळ्या रंगात तांबड्या पृष्ठभागावर रंगविलेल्या व काळ्या-तांबड्या मातीच्या भांड्यांचा वापर दिसून येतो. एका पांढऱ्या भांड्यावर रंग लावलेला नमुनासुद्धा मिळाला आहे. परंतु लोखंडाचा अभाव हे महत्त्वाचे वैशिष्टच दिसून येते. दुसऱ्या कालखंडाच्या पूर्वार्धात लोखंडाचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला, रंगीत खापरे लुप्त झाली. काळ्या-तांबड्या रंगांचा उपयोग मात्र चालू राहिला. दुसऱ्या कालखंडाच्या उत्तरार्धात इतर सर्व

[१२] देव, डॉ. शां. भा, "पवनार उत्खनन : एक मूल्यमापन", **विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक : १९६७** (नागपूर, १९६७).

बाबी तशाच राहिल्या, परंतु पवनारचा रोमन लोकांशी व्यापारविषयक संपर्क आला असे दिसते. कारण त्या काळात रोमन बनावटीचे मद्यकुंभ, उत्कृष्ट मणी, मडक्यांवर चिकटविलेली सिंहमुखे आणि इतर वस्तू वापरात होत्या. तिसऱ्या कालखंडात क्षत्रप व विष्णुकुंडीन राजांची कलचूरी नाणी, मातीच्या मूर्ती, भक्कम बांधणीची घरे व उत्कृष्ट शिल्पे प्रचलित होती. डॉ. देव यांच्या मते हा कालखंड पवनारच्या सांस्कृतिक इतिहासात अत्यंत भरभराटीचा होता.[१३] या भरभराटीला चौथ्या कालखंडात उतरती कळा लागली. कारण या काळातील मातीची भांडी निकृष्ट दर्जाची दिसून आली. चिनीमातीची नक्षीदार भांडी, मुसलमान काळातील काचेच्या द्रवाचा लेप दिलेली मडकी व तत्कालीन नाणी यावरून या कालखंडाची मर्यादा इ. स. चे दहावे ते पंधरावे शतक अशी ठरविता आली. यावरून पवनारला अदमासे अडीच हजार वर्षे सलगपणे वस्ती झाली असे डॉ. देव यांनी दाखवून दिले. विदर्भात इतक्या प्राचीन वस्तीचा उत्खननित पुरावा प्रथमच मिळाला हे विशेष होय.

उत्खननावरून असे दाखविण्यात आले आहे की, विदर्भातील पहिली मानववस्ती पवनारला धाम नदीच्या काठावरील जंगल तोडून झाली असावी. पहिल्या कालखंडात मातीची घरे बांधून राहणाऱ्या लोकांनी घागरी अथवा कळशी यासारखी मडकी तयार करून त्यावर तपकिरी-तांबड्या रंगाचा लेप देण्याची कला अवगत केली असावी. मातीच्या भांड्यावर सुंदर नक्षीकाम केले जाई. या मडक्यांची बनावट व भाजणी उच्च दर्जाची नसली तरी अशा आकाराची व रंगकाम केलेली मडकी विदर्भात इतरत्र कोठेही सापडलेली नाहीत. त्या लोकांना लोखंडाचा वापर अजिबात माहीत नव्हता. प्रत्येक वसाहत ५० ते १०० घरांची असून घरे १०′ × ९′ असावीत. हे लोक मच्छीमारी करून आपला उदरनिर्वाह करीत असे दिसते. गायी, बैल व शेळ्या यांच्या हाडांवरून असे दिसते की, हे लोक पशुधनाचे संगोपन करीत असत. शेती हाही त्यांचा महत्त्वाचा धंदा असला पाहिजे.

यानंतरच्या काळात लोखंडाचा वापर सुरू झाल्यामुळे मानवी जीवनाची प्रगती झालेली दिसते. कालांतराने चुन्याचा वापर करून लाकडी वासे वापरून कौलारू घरे बांधण्याची प्रथा सुरू झाली. घरांचा आकार काटकोन चौकोनी होता. छपरावरील कौले पक्की बसविण्यात येत होती. अशा तऱ्हेच्या शाकारलेल्या घरांची बांधणी मौर्य-सातवाहन काळात महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही प्रचलित होती, असे आढळून आले आहे. लोखंडी वस्तूंव्यतिरिक्त, शंखाच्या बांगड्या, शंखाचे मणी व रंगीबेरंगी दगडाचे मणी वापरात होते.

पवनारचा रोमन लोकांशी सांस्कृतिक व व्यापारी संबंध आल्याच्या पुराव्यावरून असे दिसून येते की, पवनार येथील लोक पुष्कळ पुढारलेले होते. रोमन मद्यकुंभ जवळजवळ चार फूट उंच असून त्यांचे बूड निमुळते असल्याने ते लोखंडी तिवईवर ठेवून जहाजातून भारतात आणले जात असत. उत्कृष्ट काचेचे व दगडी मणी, मूर्ती व शंखाच्या बांगड्या यावरून त्या लोकांची राहणी कशी होती यावर प्रकाश पडतो.

पुढील काळात पवनारला प्रथमच विटांची घरे बांधण्यात आली असे दिसते. घरावर चांगल्यापैकी कौले घालून उत्कृष्ट निवारा निर्माण केल्याचे दिसते. इ. स. तिसरे ते आठवे शतक या दरम्यानच्या काळातील घरे, तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या महाक्षत्रप रुद्रसेन या राजाची चांदीची नाणी, कृष्णराज कलचूरीचे अशुद्ध चांदीचे नाणे आणि विष्णुकुंडीन

---

[१३] कित्ता.

राजाची तांब्याची नाणी सापडल्यामुळे या कालखंडाची कालमर्यादा इ. स. तिसरे शतक ते आठवे शतक अशी निश्चित करता आली. या कालखंडात उत्कृष्ट दगडी मणी, कोरीव काम केलेल्या शंखाच्या बांगड्या, काचेची कर्णभूषणे, एकरंगी काचेच्या बांगड्या, सुंदर लोलक व ताईत लोक वापरत होते. एका ताईतावर असलेली गौतम बुद्धाची मूर्ती सुबकपणे कोरलेली पाहून त्या काळात कलाकुसर किती प्रगत होती याचा प्रत्यय येतो. वाकाटक राजे पवनारला राज्य करीत असल्याने तत्कालीन समृद्धी पवनारच्या अवशेषाद्वारे दिसून येते. या काळातील सुबक गणेश मूर्ती पवनारला मिळाल्या असून त्यावरून कलाकौशल्याची प्रचिती येते. गणेश देवता, माता आणि बालक, मातृदेवता व खेळणी या सर्वांची शैली वाकाटक शैलीप्रमाणेच आहे. इ. स. दहावे शतक ते पंधरावे शतक या कालखंडात बांधलेली घरे निकृष्ट बांधणीची होती असे उत्खननात आढळून आले. अस्थिर राजकीय परिस्थिती आणि जुलमी राज्यकर्त्यांचा लोकजीवनावर प्रतिकूल परिणाम झालेला असावा. चिनी-मातीची जी भांडी सापडली त्यावर नाजूक फुलांची नक्षी रंगविलेली आढळते. सुलतानी राजवट आल्यानंतर नक्षीदार भांडी प्रचलित झाली. त्यावर काचेचा द्रव दिल्याचे आढळते. बहुरंगी काचेच्या बांगड्या प्रचलित झाल्या.

मुसलमान काळात गावाभोवती भक्कम तटबंदी बांधलेली असून तिला अनेक प्रचंड बुरूज होते. त्यांचे अवशेष आजही आढळतात.

पवनार उत्खनन मर्यादित असल्यामुळे पवनार आणि प्रवरपूर यांचा समन्वय निश्चितपणे दाखविता आला नाही. दुसरे असे की, प्रवरपूर ही राजधानी होती असे खुद्द वाकाटकांच्या ताम्रपटात कुठेही सांगितलेले नाही, असे डॉ. देव यांनी प्रतिपादन केले आहे. प्रवरपुराहून ताम्रपट प्रदान केलेले असले तरी त्या संदर्भात "प्रवरपुरात" असे फक्त शब्द आढळतात. पण त्यापेक्षा अधिक माहिती मिळत नाही. तिसरे असे की, प्रवरपूरचे पवनार असे रूप झाले असावे किंवा कसे याचा विचार भाषाशास्त्राच्या दृष्टीने करणे संयुक्तिक ठरेल. तथापि निश्चितपणे असे म्हणता येईल की, इसवी सनाचे तिसरे शतक ते आठवे शतक या काळात पवनारला समृद्धी होती.

पवनार उत्खननाची सर्वात महत्त्वाची फलश्रुती अशी की, सर्वप्रथम वस्तीशी संलग्न असलेली पवनारची रंगीत खापरे लोहयुगाच्या पूर्वीच्या स्तरातील असल्याने ती प्रागैतिहासिक (Proto-Historic) काळातील ठरतात. त्याद्वारे प्रागैतिहासिक काळातील विदर्भामधील आद्य वसाहतीचे सम्यकदर्शन पवनार उत्खननाने घडविले आहे.[१४]

वाङ्मयीन परंपरेनुसार असे म्हणता येईल की, मध्य भारतापासून दक्षिणेकडील प्रदेश घनदाट जंगलांनी व्यापलेला होता. अगस्त्य हा विंध्य पर्वत पार करून दक्षिणेकडे आलेला पहिला आर्य. त्याने गोदातीरी आपले वास्तव्य कायम केले. गोदातटावरील आश्रमांच्या समुहाला जनस्थान असे नाव पडले.

कंसवध मूर्ती : पवनार आश्रम परिसरात नव्याने बांधलेल्या "भरतभेट" मंदिराच्या आवारात कंसवध मूर्ती भिंतीत बसविलेली आहे. अदमासे सहा फूट उंच आणि पाच फूट रुंद असलेली ही मूर्ती पवनारला सापडलेल्या सर्व मूर्तीत सर्वाधिक भव्य आहे. मूर्ती प्राचीन शिल्पशैलीचा अभ्यास तसेच मूर्तीविज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे.

[१४] कित्ता.

महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांच्या मते ही मूर्ती राम–रावण युद्धाची[१५] तर म. के. ढवळीकरांच्या मते ती अंधकासुरवध[१६] मूर्ती असावी. परंतु अ. प्र. जामखेडकर व गो. बं. देगलुरकर यांनी ती कंसवध मूर्ती असल्याचे सप्रमाण सिद्ध केले आहे. शिल्पपटात उजव्या बाजूस अगदी खाली एक हत्ती निचेष्ट होऊन पडला आहे. त्याने पाठीमागचे गुडघे टेकलेले असून पुढचे पाय मुडपलेले आहेत. सोंडेचे वेटोळे आणि पोट जमिनीवर आदळल्यासारखे दिसतात. हत्तीचा एक दातसुद्धा तुटला आहे आणि पाठीवर माहूत उताणा पडला असून त्याचे शिर आणि हात लोंबत आहेत. या दोघांच्या वरच्या बाजूस एक व्यक्ती उताणी पडली असून तिने स्वतःला आपल्या बाहूवर कसेबसे तोलून धरले आहे. या असहाय्य अवस्थेत त्या व्यक्तीच्या छातीवर पाय रोवून हत्तीच्या मस्तकावरून "आलीढ" पवित्र्याने वरच्या बाजूला एक व्यक्ती झेपावत आहे. आलीढ पवित्र्यातील व्यक्तीचा नेम कठड्यापलीकडे उभे राहिलेल्या मुकुटधारी व्यक्तीकडे आहे. मुकुटधारी व्यक्तीने आपले केस धरणाऱ्या मारेकऱ्याचा हात धरून ठेवला आहे आणि आपला चेहरा दुसरीकडे वळविला आहे. मध्यवर्ती मुकुटधारी व्यक्तीशेजारी आणखी एक व्यक्ती असून ती शिल्पात डाव्या बाजूला चाललेले बाहुयुद्ध बघण्यात दंग झालेली दिसते. दोघा मल्लांपैकी एक तरुण व दुसरा थोराड दिसतो. तरुण मल्ल डाव्या हाताचा विळखा दुसऱ्याच्या गळ्याभोवती घालून, उजव्या हाताने त्याचा उजवा दंड आवळत डाव्या गुडघ्याची दुसणी देऊन त्याला जेर करीत आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे शिल्पपटातील हत्ती म्हणजे कुवलयापीड आणि चाणूर–मुष्टिकांचा पाडाव झाल्यानंतर कंसाचा वध करण्यासाठी कृष्ण त्याला मंचावरून खाली ओढतो आहे हा प्रसंग प्रस्तुत शिल्पाचा मुख्य विषय आहे. बलराम आणि कृष्णावर कंसाने सोडलेल्या कुवलयापीडाने त्यांना मारण्याचा प्रयत्न केला. परंतु कृष्णाने त्याला चकवून जेर केल्याने कुवलयापीडाने आपल्या गुडघ्यावर वसकण मारली. त्यानंतर कृष्णाने दोन्ही हातांनी कुवलयापीडाचा दात उपटून त्या दातानेच त्याच्यावर प्रहार केला व माहुताला मारले. उपरोल्लेखित उताणी पडलेली व्यक्ती म्हणजे चाणूर होय. कृष्णाने चाणुराशी बाहूयुद्ध करून त्याला ठार केले. त्यानंतर कृष्णाने तोसलकाला ठार केले. आखाड्यातून कृष्णाने एखाद्या सिंहाप्रमाणे वेगाने वर झेप घेतली. प्रेक्षागारातील नागरांना तो झेप घेताना दिसलाच नाही. एकदम कंसाजवळ दिसला. त्याने आपला परिघासारखा हात पुढे झेपावला आणि कंसाच्या केसांना धरून त्याला आखाड्यात ओढले. शिल्पपटात झेपावणारा कृष्ण कंसाच्या केसांना धरून ओढत असल्याचे दिसून येते. कंसाच्या शेजारी त्याचा भाऊ सुनामन् हा बलराम-मुष्टिकाचे बाहूयुद्ध पहात आहे. कंस उजव्या हाताने कृष्णाचा डावा हात धरून प्रतिबंध करीत आहे. कृष्णाचा आवेश मोठ्या कौशल्याने या शिल्पात उतरविला आहे. शिल्पात कृष्ण व बलराम सुकुमार वाटतात तर चाणूर व मुष्टिक थोराड चित्रित केले आहेत.

---

[१५] मिराशी, डॉ. वा. वि., **स्टडिज इन इंडॉलॉजी, खंड २**, पृ. २७२–८४.

[१६] ढवळीकर, डॉ. म. के., "**पवनार येथील अंधकासुरवध मूर्ती**", **विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक : १९६६** (नागपूर).

शिल्पातील घटकरचनेच्या (Composition) दृष्टीने तर हे शिल्प अप्रतिमच मानले पाहिजे. कृष्णाने केलेले कंसघर्षण हा तर या शिल्पाचा गाभा, त्यामुळे शिल्पात प्रथम दृष्टी खिळत असेल तर दोघांवर. कंसाची दृष्टी डाव्या बाजूला वळलेली आणि सुनामन् तर बलराम-मुष्टिकाचे मल्लयुद्ध पाहण्यात दंग झालेला दिसतो. त्यामुळे कृष्ण-कंसावरून दृष्टी वळते ती बलराम-मुष्टिकाकडे. या दोघांना निराळ्या पातळीवर संतुलन कुवलयापीड व माहुताने होते आणि चाणूर त्यांना जोडणारा दुवा आहे. त्यामुळे बलराम-मुष्टिकावरून नजर परत कृष्णाकडे वळते. अशा रीतीने हे शिल्प प्रेक्षकांची नजर मध्यवर्ती प्रसंगावर खिळवून ठेवण्यात शिल्पकार पूर्ण यशस्वी झालेला आहे.

मिराशी व ढवळीकर यांचे शिल्पविषयाबाबत दुमत असले तरी त्या दोघांनी व जामखेडकरांनी हे शिल्प पाचव्या शतकातील असल्याचे मान्य केले आहे.[१७]

शिल्पातील आकृतींचे चित्रण अत्यंत हळूवारपणे व नैसर्गिकरीत्या केलेले आहे. त्यांचे शरीर-सौष्ठव, घोटिवपणा व आवेश यांचा आविष्कार प्रभावी आहे. कला-वैशिष्टयाच्या दृष्टीने विचार करता या मूर्तींचे अजंठयाच्या भित्ती-चित्रांत आणि शिल्पांत प्रकट होणाऱ्या शैलीशी साधर्म्य दिसून येते.

पवनार परिसरामध्ये इतरही अनेक मूर्ती व शिल्पांचे अवशेष प्राप्त झालेले आहेत. त्यात राम, लक्ष्मण व सीता हे सुमंत प्रधानाच्या रथातून वनवासात जात असल्याचे एक शिल्प आहे. राणी कौसल्याजवळील बाल्यावस्थेतील रामाचीही मूर्ती सापडलेली आहे. तसेच वनवासातून परत आलेले राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आणि सीता यांचा शिल्पपट, वाली-सुग्रीव यांचे युद्ध, विष्णूची सुंदर चतुर्भुज मूर्ती इत्यादी शिल्पे येथे सापडलेली आहेत.

विदर्भ साहित्य संघ संशोधन समितीच्या विद्यमाने पोहणा गावी केलेल्या संशोधनात गौतम बुद्धाची मूर्ती व ब्रह्मदेवाची चार मुखे असलेली दुर्मिळ मूर्ती सापडली. पोहणा येथे राजा प्रवरसेनचा तिसरा मुलगा पृथ्वीषेण राहत असावा असे काही अभ्यासकांनी प्रतिपादन केले आहे. पोहण्याचे पुरातत्त्वीय संशोधनसुद्धा महत्त्वाचे मानता येईल.

वर्ध्याहून २४ किलोमीटर अंतरावरील एकूर्ली गावी अलाउद्दिन खलजीच्या काळातील (चौदाव्या शतकातील) तांब्याची १६० नाणी सापडली आहेत. एकूर्लीनजीक एक शेत नांगरत असताना मातीच्या हंडयामध्ये ही नाणी सापडली. नाण्यांवर अरबी लिपीत "दस्तगीर" व "तनका" असे शब्द कोरलेले आहेत. तनका नावाचे नाणे अलाउद्दिन खलजीच्या काळात प्रचलित होते. ज्या हंडयामध्ये ही नाणी सापडली तो हंडादेखील सुंदर बनावटीचा आहे.

वर्ध्यापासून २६ किलोमीटर अंतरावरील केळझर प्रसिद्ध आहे ते तेथील स्वयंभू समजल्या जाणाऱ्या गणपती मंदिरासाठी. येथे भगवान विष्णूची मूर्तीसुद्धा सापडली आहे. ही चतुर्भुज मूर्ती अदमासे एक मीटर उंच आणि अर्धा मीटर रुंद असून तिच्या हातांमध्ये शंख, चक्र, गदा व पद्म आहे. ही मूर्ती स्थलांतरित करण्यास ग्रामस्थांनी प्रतिकार केल्यामुळे तेथेच राहिली व तेथे मंदिर झाले. केळझर गावाचा प्राचीन वाङमयामध्ये उल्लेख आढळतो. तेथे जैन तीर्थंकार महावीराच्या काही मूर्ती तसेच जैन संस्कृतीचे बरेच अवशेष सापडलेले आहेत. त्यावरून केळझरच्या प्राचीन संस्कृतीची कल्पना येते. तेथे बालाजीचीसुद्धा मूर्ती सापडलेली आहे. केळझर परिसरात बौद्धकालीन अवशेषही सापडले आहेत. धम्मचक्र प्रवर्तनानंतर तेथे बुद्ध विहार स्थापन करण्यात आला.

---

[१७] जामखेडकर, डॉ. अ. प्र., व देगलुरकर, प्रा. गो. बं., "पवनार येथील शिल्पपटाचा पुनर्विचार", **युगवाणी, एप्रिल–मे १९७४** (नागपूर). पृ. २४–२९.

हिंदू धर्मपंथ

वर्धा जिल्ह्यातील बहुसंख्य हिंदू वारकरी पंथीय आहेत. पंढरपूरचा विठ्ठल (पांडुरंग) हे त्यांचे आराध्य दैवत होय. बरेच भाविक आषाढी एकादशी अथवा कार्तिकी एकादशीला पंढरपूरच्या यात्रेस जातात. अलीकडील काळात हे प्रस्थ कमी होत असले तरी १९५०–१९६० पूर्वी जिल्ह्यातून बरेच भाविक पालखीबरोबर पंढरपुरापर्यंत पदयात्रा करीत असत. वाहतुकीच्या सुविधांमुळे अलीकडील काळात शेकडो भाविक रेल्वेमार्गाने पंढरपूरला दरवर्षी जातात. त्यात पुरुषांप्रमाणे महिलांचाही समावेश असतो. वारकरी पंथियांमध्ये विविध जातींच्या लोकांचा समावेश आहे. वारकरी पंथीय वैष्णव आहेत. तथापि वैष्णव-शैव असा वाद येथे उपस्थित झाल्याचे आढळले नाही. खरे तर बरेच वैष्णवसुद्धा महादेवाची आराधना करतात. वारकऱ्यांचे खालोखाल महानुभाव पंथीय हिंदू मोठ्या प्रमाणात आहेत. चक्रधरस्वामींच्या **स्थान पोथी** मध्ये वर्धा जिल्ह्यातील गावांचा उल्लेख सापडतो. महाराष्ट्रात महानुभावांची जी अत्यल्प मंदिरे आहेत त्यापैकी एक या जिल्ह्यातील पिपरी येथे आहे.

वारकरी आणि महानुभाव संप्रदायांव्यतिरिक्त दत्त संप्रदाय, रामदासी संप्रदाय व नाथ संप्रदायाचे अनुयायी या भागात आढळतात. तथापि त्यांची संख्या मोठी नाही. लिंगायत पंथाचा देखील जिल्ह्यात बराच प्रसार झालेला आहे. शिवलिंग धारण करून महादेवाची पूजा करणारे लिंगायत परंपरेने धार्मिक वृत्तीचे आहेत.

महात्मा ज्योतिबा फुलेप्रणित सत्यशोधक चळवळ आणि राजर्षी शाहू व भास्करराव जाधव यांनी प्रसार केलेल्या "बहुजनसमाज" आंदोलनाचा प्रसार वर्धा जिल्ह्यातही झाला होता. या दोन्ही विचारप्रणालींचा पश्चिम महाराष्ट्रातील पुढाऱ्यांनी विदर्भात प्रसार केला. त्यास वर्धा जिल्ह्यातील स्थानिक समाजसुधारकांनी चांगला प्रतिसाद दिला. या भागात सत्यशोधक जलसे व मेळावे चांगले गाजत व त्यास लोकांचा प्रतिसादही पुष्कळ मिळत असे. या चळवळींचा सामाजिक जीवनावर बराच प्रभाव पडला व जनजागृतीस थोडा हातभार लागला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व प्रबोधनकार के. सी. ठाकरे यांनीही जिल्ह्यात बरेच सामाजिक प्रबोधन केले.

संत परंपरा

वर्धा जिल्ह्यातील धार्मिक जीवनात वारकरी संप्रदाय आणि महानुभाव पंथ यांना बरेच महत्त्व आहे. वारकरी संप्रदायाच्या स्थापनेपासून त्या पंथाचा या भागात विपुल प्रचार झाला. संत ज्ञानेश्वरांच्या अमृतवाणीने भाविकजनांची मने काबीज केली. अध:पतनाच्या मार्गावर असलेल्या समाजात भक्तिमार्गाद्वारे आत्मविश्वास निर्माण केला. भक्तिमार्गाचा पुरस्कार करणारे पुष्कळ संत निर्माण झाले. आध्यात्मिक ज्ञानाबरोबर लोककल्याणाची बीजे पेरली गेली. गहन अशा संस्कृत भाषेतील धर्मज्ञान मराठीत निर्माण करून अध्यात्मिक ज्ञानभांडार जनतेला खुले केले. धार्मिक जीवनात कर्मकांडाचा अनावश्यक प्रभाव कमी करण्याचेही संतमहंतांनी प्रयत्न केले. समाजातील उच्चनीच भाव दूर करून अस्पृश्योद्धाराचा पुरस्कार केला.

विदर्भामध्ये बरीच मोठी संत परंपरा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज, गुलाबराव महाराज आणि गजानन महाराज यांचे कार्य सर्वश्रुत आहे. तथापि त्यांच्या-व्यतिरिक्त अनेक संत या भूमीत होऊन गेलेले आहेत. आर्वी शहर हे तर संतांची भूमी

म्हणून गौरवप्राप्त आहे. तेथे मागील सव्वाचारशे वर्षांत अनेक संत आणि सत्पुरुष होऊन गेले. त्यातील बहुसंख्य संतांनी वारकरी संप्रदायाचा पुरस्कार करून भागवतधर्म भोळ्या भाविकांपर्यंत पोहोचविला. त्यांचे कार्य निश्चितच उल्लेखनीय आहे. वर्धा जिल्ह्यातील संतांचा थोडक्यात परिचय करून देण्याचा प्रयत्न खाली केला आहे. खाली दिलेली माहिती स्थानिक लेखकांचे स्फूट लेखन आणि काही जाणकार व्यक्तींच्या मुलाखतीवर आधारित आहे.

सुमारे सव्वाचारशे वर्षांपूर्वी आर्वी गावात तेलंगराय महाराज नामक एक थोर पुरुष होऊन गेला. तेलंगराय आर्वीतील आद्यसंत मानला जातो. तो धर्मनिरपेक्ष संत मानला जातो. इ. स. १८७० मध्ये प्रकाशित केलेल्या **गॅझेटिअर ऑफ दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस** या ग्रंथात असा उल्लेख आहे की, "तेलंगराय वली यांनी सुमारे तीनशे वर्षांपूर्वी आर्वी गाव वसविले असे म्हणतात. हिंदू तसेच मुसलमान लोक तेलंगराय आपल्या धर्माचे असल्याचा दावा करून त्यांच्या आर्वी येथील समाधीची पूजा करतात." तेलंगरायाची समाधी आजही आर्वीत अस्तित्वात आहे. तेलंगरायाचा कालावधी जरी निश्चितपणे उपलब्ध नसला तरी त्याच्या नावाचा आर्वी गावाशी संबंध जोडला जातो. ग्रामदेवता म्हणून तेलंगरायाची लोक पूजा करतात.

तेलंगरायानंतर आर्वीत जानकीबाई सीताराम पांडे ऊर्फ संत मायबाई उदयास आली. काही अभ्यासकांच्या मते आर्वीच्या संत परंपरेची मायबाई आद्य अध्यात्मिक अधिष्ठान ठरते. तिचा कालावधी निश्चितपणे ज्ञात नसला तरी असे म्हणतात की, मायबाईचा आर्वीतील अंतिम काल १८५७ च्या स्वातंत्र्य समरापूर्वीचा असावा. मायबाई ही राणी लक्ष्मीबाई आणि अहिल्याबाई होळकर यांची समकालीन असावी. **भक्तमहिमामृत**[१८] या पोथीमध्ये मायबाईच्या निर्वाणाची तिथी दिली आहे, पण त्यात वर्षाचा उल्लेख नाही. या पोथीत तिची बरीच माहिती दिलेली आहे. मायबाईचे माहेर मोर्शी तालुक्यातील शिरखेड असून तिचा पती सीताराम पांडे चांदूर तालुक्यातील होता. या उभयतांनी आर्वीत आपला देह ठेवला. आर्वीत मायबाईचा मठ आहे. आडकुजी महाराज मायबाईचा शिष्य होता. प्रसिद्ध राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मायबाईच्या शिष्याचा शिष्य म्हणजे संत आडकुजीचा शिष्य होता. तुकडोजीने १९६५ मध्ये उरळी कांचनहून आर्वीस पाठविलेल्या एका पत्रात या भूमीचा पुढीलप्रमाणे गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे.

"....भारताच्या अनेक नगरांना पाहण्याचा श्रीगुरुदेवाच्या दयेने मला प्रसंग आला आहे. त्या अनेक नगरांतून जे नगर मला चिंतनीय, मननीय, आदरणीय वाटले त्यात आर्वीचा समावेश आहे. हे मी विसरणार नाही. माझ्या पूर्ववयात लहानपणी या संतभूमीत मला भक्तिभावाने मायबाई, घाटे गुरुजी, झामसिंह, अवघडनाथ, यतीजी जमनादास, गोदाबाई, परिसरातील लहानुजी, भजनी श्री. शंकरराव, भानुदासादि भजनी परंपरा चालविणारी मंडळी, या सर्व संत विभूतींच्या पवित्र स्थानाचे दर्शन घेण्याचे योग आले आहेत. अशी ही संतभूमी, साहित्य संगीतभूमी, भजनभूमी, एवढेच नाही तर राष्ट्रकार्यात बलिदान देण्याला तत्पर अशी सत्याग्रहीभूमी....या सर्वांचा समावेश ज्या नगरात आहे अशा इतिहासाने व्यापलेले हे नगर आहे. माझ्या वैराग्याची

---

[१८] सीताराम गुर्जर ग्रामोट (आर्वी) यांनी ही पोथी संकलित केली.

व पागलपणाची तंद्री लागलेल्या जीवनात मला येथे मधामधात बरेच दिवस राहण्याचे योग आले आहेत. श्रीसंत आडकुजीबाबा तसेच श्री. वासुदेव शास्त्री घाटे महाराज हे तर आता आता विदेही वृत्तीत रमताना मी पाहिले आहेत. येथील दर्शन म्हणजे महान संतांचे कार्य, त्यांचे आध्यात्मिक अधिष्ठान, त्यांचा निर्मोही विदेहीपणा व जनतेवर आत्मवत प्रेम या सत्कार्याचा प्रभाव असलेले हे नगर आहे. अजूनही येथे बाराही मास मधामधात पुण्यतिथी, सभा, कीर्तने, देशभक्तांची भाषणे, अन्नदान आदि होतातच. . .''

राष्ट्रसंत तुकडोजीचा गुरु संत आडकुजी महाराज याचा जन्म आर्वीत कासार कुळात १४ नोव्हेंबर १८२१ रोजी त्रिपुरी पौर्णिमेस झाला. त्याच्या वडिलांचे नाव सदाशिवराव फिसके हे होते. राष्ट्रसंताने एका गीतात आपल्या गुरुबद्दल गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. संत आडकुजीने अध्यात्मिक प्रेरणा घेतली ती आपली गुरु संत मायबाईकडून. त्याने समाजामध्ये अध्यात्मिक प्रेरणांचा प्रसार करून मोठी कामगिरी केली. तुकडोजीच्या रूपाने एक राष्ट्रसंत निर्माण केला. आडकुजीने इ. स. १९२१ मध्ये कार्तिक शुद्ध पौर्णिमेला देहत्याग केला.

एकोणिसाव्या शतकात आर्वीत अनेक सत्पुरुष निर्माण झाले. तेथील एक योगी अवघडनाथ हा होता. त्याने योगसाधना करून आध्यात्मज्ञानाचा प्रसार केला. पुढे अवघडनाथ वाराणसीस निघून गेला. विदर्भ परिसरात त्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो. त्याच्या नावे एक मोठा उत्सव प्रतिवर्षी साजरा करण्यात येतो.

आर्वीतील सत्पुरुष झामसिंग महाराजाचा जन्म १८६३ मध्ये झाला असावा. त्याने १९०३ मध्ये **ब्रह्मविचार** नामक ग्रंथ प्रकाशित केला. आपल्या प्रवचनाद्वारे लोकजागृतीचे कार्य हाती घेतले. त्याने लिहिलेली भजने, आरत्या व भक्तिगीतांमुळे त्याची संतकवींमध्ये गणना करावी लागेल. इ. स. १९२० मध्ये तो मृत्यू पावला. दामोदर शास्त्री घाटे ऊर्फ अप्पाजी महाराज याचा जन्म तळेगाव दशसहस्र येथील वेदपंडित रामचंद्र नारायण शास्त्रीच्या पोटी १८३० मध्ये भाद्रपद अमावास्येला झाला. घाटे घराण्यात संस्कृत ग्रंथांचा संग्रह असल्यामुळे अप्पाजीने बरेच संस्कृत अध्ययन केले. त्याने संस्कृत काव्य आणि काव्यशास्त्राचा कसून अभ्यास केला. पुढे विरक्ती धारण केल्यावर प्रवचन देण्याचा उपक्रम सुरू केला. त्याच्या प्रवचनांमुळे त्याला बरीच प्रसिद्धी मिळाली. आर्वीच्या सीताराम गुर्जर गामोट नावाच्या संतकवीने **भक्तमहिमामृत** नावाचा ओवीबद्ध ग्रंथ संकलित केला. त्यात अप्पाजीचे आख्यान आढळते. त्याला १९०४ च्या फाल्गुन वद्य द्वादशीस मृत्यू आला.

विसाव्या शतकातील वैदर्भीय संत मंडळीत लहानुजी महाराजाचा समावेश होतो. या सत्पुरुषाने वऱ्हाडी भाषेमधूनही परमार्थाचा प्रचार केला. अमरावती जिल्ह्यातील चांदूर तालुक्यातील मंगरूळ गावी १८८० च्या फाल्गुन शुद्ध द्वितीयेला लहानुजीचा जन्म झाला. त्याच्या पित्याचे नाव अभिमानजी भांडे होते. [त्याच्या जन्माआधी अमावास्येला एकोणिसाव्या शतकातील प्रसिद्ध खग्रास सूर्यग्रहण झाले होते.] लहानुजी राष्ट्रसंत तुकडोजीपेक्षा वयाने सुमारे पंचवीस वर्षांनी मोठा होता. तुकडोजीने त्याचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आढळतो. सदाचार आणि धर्माचरण प्रसाराचे कार्य लहानुजीने केले. राष्ट्रसंत तुकडोजीने त्याला गुरुबंधू मानले होते. ऑगस्ट १९७१ मध्ये त्याचे निर्वाण झाले.

लहानुजीचा शिष्य भानुदास महाराज अल्पावधीतच उदयास आला. तुकडोजीप्रमाणेच भानुदासने भक्तिरसाने ओथंबलेली भजने गाऊन लोकरंजन केले. त्याचा विद्याव्यासंग चांगला असून त्याच्यावर तुकडोजीचा प्रभाव होता असे मानले जाते. मूळचा वरुड गावातील अच्युत महाराज यानेदेखील वर्धा जिल्ह्यात संत परंपरा चालू ठेवली. त्यानेही तुकडोजी महाराजाकडून अध्यात्मिक प्रेरणा घेतली व बऱ्याच ओव्या रचल्या. त्याचे काही साहित्य प्रकाशित झालेले आहे. त्यात ३५ प्रकाशित पुस्तके असल्याचा दावा केला जातो. (तथापि ही पुस्तके उपलब्ध झाली नाहीत). आपल्या गोड आवाजातून रसाळ भक्तिगीते आणि ओव्या गाऊन भाविकजनांचे मनोरंजन करण्याबाबत त्याची ख्याती आहे. त्याचा जन्म जानेवारी १९२४ मध्ये झाला. आर्वीचा तुकाराम महाराज हा आणखी एक सत्पुरुष. आर्वीजवळ आनंदवाडीस त्याचा आश्रम आहे. त्याचा जन्म औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यात गोदावरीकाठी नागमठाणला झाला. देहूचे सुप्रसिद्ध संतशिरोमणी तुकाराम महाराजांचा वंशज रामभाऊ देहूकर याच्याकडून त्याने दीक्षा घेतली व विपुल संतवाङ्मय मुखोद्गत केले. आर्वीच्या बाबामहाराजाचा जन्म जोशी कुटुंबात १९२५ मध्ये श्रावण शुद्ध चतुर्दशीला झाला. मायबाईच्या परंपरेतीलच तो एक ब्रह्मचारी सत्पुरुष. तुकडोजीच्या सानिध्यात त्याने बरीच ज्ञानसाधना केली. श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे बरेच कार्य करून त्याने जनजागृतीसाठी विपुल प्रवचने दिली. त्याची प्रवचने विदर्भाव्यतिरिक्त मुंबई, कोल्हापूर, पुणे, इंदूर व बडोद्यालाही होत असत. त्याच्या साहित्यकृतीत संत ज्ञानेश्वरांच्या बाराव्या अध्यायाचे दर्शन घडविणारा **दिव्यामृतधारा** नावाचा प्रबंध आहे. इ. स. १९७२ च्या दत्तजयंतीस त्याने देहत्याग केला.

संत ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्र सारस्वतास सौंदर्य आणि वैभव प्राप्त करून दिले. नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास आणि चक्रधरस्वामींनी महाराष्ट्र सारस्वताच्या वास्तूवर कळस चढविला. भक्तिमार्गाचे गोड रसायन सामान्यजनापर्यंत पोहोचविले. नैराश्य व वैफल्यातून विमोचनाचा मार्ग दाखविला आणि त्याचबरोबर मराठी भाषा समृद्ध केली. या संत परंपरेमध्ये नगाजी महाराजाचा समावेश करावा लागेल. समर्पक रूपक आणि रसानुकूल अशा दृष्टांतांचा उपयोग करून नगाजी महाराजाने पुष्कळ अभंग लिहिले. कवित्वापेक्षा परमार्थप्राप्तीला जास्त महत्त्व दिले. त्याच्या भावकाव्यात हृदयाचे आत्मनिवेदन दिसते. नगाजीचे अभंग विशेषतापूर्ण आहेत.[१९] नाभिक जीवनातील शब्द व वाक्प्रचारांना संत सेना महाराजाच्या अभंगांनी जशी मराठीत प्रतिष्ठा प्राप्त करून दिली तशीच कामगिरी नगाजीने केलेली दिसते. शेतकरी जीवनातले शब्द-संकेत अध्यात्माच्या परिभाषेत आणून मराठी भाषा विकसित करण्याचे काम नगाजीच्या अभंगांनी केले आहे. नगाजीचा जन्म पारडी (हिंगणघाट तालुका) येथे न्हावी कुटुंबात अदमासे १५० ते १७५ वर्षांपूर्वी झाला. उपलब्ध माहितीनुसार त्याचा जन्म शके १६७६ कार्तिक शुद्ध पंचमीला होऊन शके १७६६ आश्विन वद्य द्वितीयेला तो निधन पावला. वस्तुतः नगाजीचे आईवडील मेहेकर (बुलढाणा जिल्हा) येथील होते. वडील विठ्ठलपंतसुद्धा अध्यात्मिक प्रवृत्तीचा होता. मेहेकर परिसरात दुष्काळ पडल्यामुळे विठ्ठलपंत नागपूरकडे स्थलांतरास निघाला. वाटेत पारडीच्या मालगुजाराने त्याला आश्रय दिला. तेथेच नगाजीचा जन्म

[१९] डोळके, प्रा. सुरेश म. "विदर्भातील एक संतकवी : नगाजी महाराज", **विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक : १९६२ नागपूर.**

झाला. बालपणापासून नगाजीची प्रवृत्ती अध्यात्माकडे होती. नगाजीला संत ज्ञानेश्वरांच्या काव्याची उत्कृष्ट जाण होती. **भक्तमहिमामृत** नामक ओवी संग्रहात नगाजीबद्दल माहिती दिलेली आहे. नगाजी महाराजाची मोठी शिष्यपरंपरा असून त्याची पुण्यतिथी भक्ति-भावाने साजरी केली जाते. त्याच्या अभंगात विपुल काव्यगुण व भक्तिरसाचा सुंदर आविष्कार दिसून येतो. शेतकरी जीवनातील रुपकांमुळे हे अभंग ग्रामीण भाविकांना आकर्षून घेतात. शब्दसंपत्ती, वाक्प्रचार चातुर्य आणि प्रतिभा या वाङमयगुणांचे त्यांत दर्शन होते.

वर्धा जिल्ह्यात होऊन गेलेले सत्पुरुष व महाराजांमध्ये माधव विठ्ठल रत्नपारखी ऊर्फ सद्गुरु माधवनाथ महाराज, बऱ्हाणपुरे महाराज (मांडगाव), केकाजी महाराज (सेलू), आबाजी महाराज (दहेगावपासून ६.५ कि. मी. वरील सोनेगाव), सदाराम महाराज (आर्वी), गौरीशंकर महाराज (सिंदी), भगवंतराय महाराज, अनंतदास महाराज आणि विक्तूबाबा यांचा समावेश होतो.

साहित्यिक व वैचारिक लेखक

वैचारिक लेखनात अत्यंत मानाचे स्थान प्राप्त केलेल्या लेखकांमध्ये महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, श्रीकृष्णदासजी जाजू, श्रीमननारायण अगरवाल, आचार्य काका कालेलकर, शिवाजीराव भावे, बाळकोबा भावे, आचार्य दादा धर्माधिकारी, कुंदर दिवाण, श्रीमती मदालसा नारायण, प्रा. ठाकुरदासजी बंग, नारायणदासजी जाजू, दामोदरदास मुंदडा, निर्मला देशपांडे, उमाशंकर शुक्ल, राधाकृष्ण बजाज, डॉ. म. गो. बोकरे इत्यादी लेखकांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

आचार्य विनोबा भावे, काका कालेलकर, दादा धर्माधिकारी, कुंदर दिवाण, निर्मला देशपांडे या थोर लेखकांनी मराठी तसेच हिंदी भाषेमधून विचारप्रवर्तक आणि अध्यात्मिक साहित्यनिर्मिती केलेली आहे. डॉ. श्रीमननारायण, श्रीकृष्णदासजी जाजू, मदालसा नारायण, ठाकूरदासजी बंग, नारायणदास जाजू, भदंत आनंद कौसल्यायन, उमाशंकर शुक्ल, आसाराम वर्मा इत्यादी साहित्यिकांनी दर्जेदार हिंदी तसेच इंग्रजी लेखन करून विचार-प्रवर्तक साहित्यामध्ये मोलाची भर टाकली आहे. विनोबाजींचे वाङमय हे तर जगातील वाङमयामध्ये आपला ठसा उमटवून गेले आहे. विनोबाजी लिखित मराठी **गीताई** च्या जानेवारी १९८८ पर्यंत १४३ आवृत्त्या निघून एकूण १७,२०,००० प्रतींचे वितरण झाले. जगाच्या वाङमयातील दुसऱ्या कोणत्याही साहित्यकृतीच्या इतक्या प्रती विकल्या गेलेल्या नाहीत असे म्हटले जाते. **गीताई** म्हणजे मूळ संस्कृत **भगवद्गीता** ग्रंथाचे प्रासादिक मराठी-मधून काव्यात्मक निरूपण होय. **गीताई** बद्दलचे विनोबाजींचे हृद्गत खाली उधृत केलेल्या ओळीवरून खरोखरच सार्थ वाटते.

गीताई माऊली माझी, तिचा मी बाळ नेणता ।
हसता रडता पडता उचलोनी घेई कडेवरी ।।

गीताई चे लेखन विनोबांनी ७ ऑक्टोबर १९३० ते ६ फेब्रुवारी १९३१ पर्यंत पूर्ण केले. सन १९३२ मध्ये विनोबाजी धुळे कारागृहात असताना **गीताई** च्या हस्तलिखितावर त्यांनी हात फिरवून अंतिम स्वरूप दिले. या काव्यात्मक निरूपणाचे सुप्रसिद्ध हिंदी कवी

सियारामशरण गुप्त यांनी हिंदीमध्ये काव्यात्मक भाषांतर केले. असेच किशोरलाल मश्रूवाला यांनी गुजराथीमध्ये **गीताई** चे भाषांतर केले. सन १९३२ मध्ये धुळे कारागृहात विनोबांनी दिलेली विद्वत्तापूर्ण प्रवचने, **गीता प्रवचने** नावाने प्रकाशित झाली. मराठी वाङ्मयातील विचारधनामध्ये या ग्रंथास फार मोठे स्थान प्राप्त झाले. या ग्रंथाचे सर्व भारतीय भाषां-व्यतिरिक्त इंग्रजी व नेपाळी भाषांमध्येसुद्धा भाषांतर झाले. या ग्रंथाच्या लक्षावधी प्रती प्रकाशित झालेल्या आहेत.

वैयक्तिक सत्याग्रहासाठी विनोबांना १९४० मध्ये नागपूर कारागृहात ठेवलेले असताना त्यांनी **स्वराज्य शास्त्र** हा ग्रंथ लिहिला. हे पुस्तक म्हणजे प्रा. हेरॉल्ड लास्कीच्या **ग्रामर ऑफ पॉलिटिक्स** या महान ग्रंथाची प्रतिकृती होय.

उर्वरित साहित्यिकांनीही मराठी वाङ्मयात बरीच भर घातली आहे. त्याविषयी उपलब्ध माहिती खाली दिली आहे.

पवनार आश्रमातर्फे परमधाम प्रकाशन या नावाखाली आजपावेतो उत्कृष्ट वैचारिक साहित्य प्रकाशित झाले आहे. हे साहित्य मराठी, हिंदी तसेच इंग्रजी भाषेमधून प्रकाशित झाले आहे. परमधाम प्रकाशनातर्फे प्रकाशित वैचारिक पुस्तकांचे लेखक भारतीय कीर्तीचे विचारवंत आणि दर्जेदार लेखक आहेत. त्यांच्यामध्ये महात्मा गांधी, विनोबा भावे, काका कालेलकर, दादा धर्माधिकारी, अप्पासाहेब पटवर्धन, बाळकोबा भावे, शिवाजी भावे, मनोहर दिवाण, कुंदर दिवाण, वामनराव कुंटे, बाळुभाई मेहता, रामभाऊ, प्रेमा कंटक, जयप्रकाश नारायण, बाबुलाल गांधी, दा. न. शिखरे, मनुबेन गांधी, मदालसा नारायण, निर्मला देशपांडे, कमलनयन बजाज, अमृत मोदी, शांतिबहन, बबलभाई मेहता, डॉ. रेनॉर सी. जॉन्सन, इत्यादींचा समावेश होतो. त्यांची पुस्तके मान्यता पावलेली आहेत. त्यात अध्यात्मिक साहित्याबरोबरच मानवधर्म, जीवनदृष्टी, शिक्षण विचार, विश्वशांती संदेश, सर्वोदय दर्शन, सेवाधर्म, व्रतस्थ जीवन, नीतीकथा, भावप्रगटन, शिशुकाव्य, चरित्र, प्रार्थना, आहार व आरोग्य या विषयांवरील मौलिक पुस्तकांचा समावेश आहे. हे वाङ्मय जरी मराठी आणि हिंदी भाषांमध्ये असले तरी विश्ववाङ्मयात त्यास स्थान मिळण्याजोगे आहे. हे सर्वच साहित्य १९२१ नंतरच्या कालावधीमध्ये निर्माण झालेले आहे. पवनार आणि सेवाग्रामचा परिसर गांधीवादी चळवळ आणि विचारधारा यांच्या प्रेरणांनी प्रेरित झाल्यानंतर ही वाङ्मयनिर्मिती झालेली आहे. डॉ. मधुकर चान्सरकर, डॉ. म. गो. बोकरे, व डॉ. प्र. रा. शेजवलकर यांनी अर्थशास्त्र व तत्सम विषयांवर पुष्कळ लेखन केले आहे.

विदर्भ साहित्य संघाची १४ जानेवारी १९२३ रोजी नागपूरला स्थापना झाल्यानंतर विदर्भात आणि वर्धा जिल्ह्यात ललित साहित्य आणि साहित्यसमीक्षा यावरील पुस्तकांची निर्मिती होण्यास चालना मिळाली. विदर्भ साहित्य संघाच्या निर्मितीमध्ये वर्ध्याचे नारायण केशव बेहेरे व मनोहरपंत बोबडे यांनी महत्त्वाची कामगिरी केली. विदर्भ साहित्य संघाच्या स्थापनेत महत्त्वाचा वाटा होता पुढील साहित्यप्रेमी व्यक्तींचा : अमरावतीचे बाळकृष्ण गणेश ऊर्फ अण्णासाहेब खापर्डे, श्रेष्ठ नाटककार वीर वामनराव जोशी, नानासाहेब बामणगावकर, दामोदर केशव ओक, पु. बा. साठे, नी. ब. ऊर्फ बापूसाहेब भवाळकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर (श्रेष्ठ नाटककार), केशव लक्ष्मण दफ्तरी (संशोधक), कृष्ण-शास्त्री घुले, आनंदराव टेकाडे, गोपाळ अनंत ओगले, नारायण नरसिंह फडणीस व दु. आ.

तिवारी (खानदेशातील कवी). साहित्य संघाचे पहिले अध्यक्ष परभणीचे केशवराव कोरटकर होते. उपाध्यक्षपदी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, माधव श्रीहरी अणे, यादव माधव काळे, बाळकृष्ण गणेश खापर्डे, नी. ब. ऊर्फ बापूसाहेब भवाळकर, नारायण नरसिंह फडणीस यांची नेमणूक करण्यात आली होती. पुढे महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक आणि लेखकांच्या प्रयत्नांनी विदर्भ साहित्य संघाची भरभराट झाली. अलीकडील काळात विदर्भ साहित्य संघाच्या विश्वस्त मंडळावर वर्धा जिल्ह्यातील वामन शिवदास बारलिंगे यांची नियुक्ती झाली. वर्ध्यास विदर्भ साहित्य संघाची शाखा आहे.

विदर्भ साहित्य संघाचे २७ वे साहित्य संमेलन वर्ध्यात २५ व २६ नोव्हेंबर १९६७ रोजी भरले होते. त्याचप्रमाणे विदर्भ साहित्य संघाचे २८ वे साहित्य संमेलन आर्वीत १४ व १५ फेब्रुवारी १९७० रोजी भरले होते. वर्धा साहित्य संमेलनास पु. बा. भावे तर आर्वी साहित्य संमेलनास शं. ग. सुरडकर यांचे अध्यक्षपद लाभले होते. मराठी साहित्य महामंडळाच्या विद्यमाने भरणारे ४८ वे साहित्य संमेलन वर्ध्याला ११ ते १३ मे १९६८ पर्यंत प्रा. पु. शि. रेगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

साहित्य आणि साहित्यिकांच्या संख्येत अलीकडील काळात बरीच भर पडत आहे. त्याबरोबरच महाराष्ट्र साहित्य संमेलन, विदर्भ साहित्य संमेलन यांच्या जोडीला जिल्हा साहित्य संमेलनाचाही प्रसार होऊ लागला आहे. त्याचा प्रत्यय वर्धा जिल्ह्यातही येत आहे. दि. १७ व १८ जानेवारी १९८७ रोजी वर्धा नगरात वर्धा जिल्हा साहित्य संमेलन प्रथमच संपन्न झाले. त्यामुळे साहित्य क्षेत्रात चैतन्य निर्माण झाल्यासारखे दिसते.

मराठी कथा, कविता, नाटक, चरित्र व वाङ्मय समीक्षा या साहित्यक्षेत्रांत पुष्कळांनी हातभार लावला आहे. वऱ्हाडी बोलीभाषेतही अभंग, ओव्या, शब्दकोश, कथा व नाटक अशा साहित्याची निर्मिती होऊ लागली आहे. मराठी साहित्यामध्ये मोलाची भर टाकणारे काही मान्यवर साहित्यिक वर्धा जिल्ह्याने दिले आहेत. संत साहित्यात श्रीधर विष्णू परांजपे, ल. रा. पांगारकर, वि. गं. कावळे, स्वामी राम, तु. ज. केदार व के. ब. ऊर्फ तात्याजी कदम यांनी बरीच भर घातली आहे. प्रा. विद्याधर उमाठे, प्रा. मा. गो. देशमुख, मो. रा. देशमुख, आसाराम वर्मा, मधुकर वाबगावकर, डॉ. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे, देविदास सोटे, मा. गो. वैद्य (**तरुण भारत** चे माजी संपादक), गोपाळ देशमुख, मधुकर देशमुख, या. मु. पाठक, बामणगावकर, डॉ. सदाशिव अंबादास डांगे, शरदचंद्र यशवंत गुणे, चंद्रहास पांडुरंग जोशी, प्रा. भानुदास श्रीधर परांजपे, मनोहर लक्ष्मण वऱ्हाडपांडे इत्यादींनी साहित्याच्या विविध शाखांमध्ये लेखन केलेले आहे. याशिवाय मधुकर आष्टीकर, वामनराव चोरघडे, मधुकर केचे, द. रा. गोमकाळे इत्यादी साहित्यिकांनी काही काळ वर्धा जिल्ह्यात वास्तव्य केले आहे. ही श्रेयनामावली पूर्ण नसून केवळ प्रतिकात्मक आहे. अगदी अलीकडच्या काळातही वर्धा जिल्ह्यातून नवीन साहित्यिकांची पिढी पुढे येत आहे. सर्वांची नावे येथे उद्धृत करणे शक्य नाही, कारण कोणतीही नामावली परिपूर्ण असू शकणार नाही. इतके मात्र खरे की, विदर्भ साहित्य संघाच्या वर्धा शाखेने नवोदित साहित्यिकांना उत्तेजन दिले. विदर्भ साहित्य संघ साहित्यिकांना व्यासपीठ देण्याचे कार्य करतो. जिल्हा साहित्य संमेलनाद्वारे नवोदितांना व्यासपीठ प्राप्त होते, तर जुन्या साहित्यिकांचा सखोल परिचय करून दिला जातो. नाट्य दिग्दर्शक व नट धैर्यशील वाघ यांचाही उल्लेख करणे आवश्यक आहे.

सन १९३० नंतर ग्रामीण साहित्याला चालना मिळाली. स्वातंत्र्य आंदोलन काळात राष्ट्रीय उद्धार आणि क्रांतीची प्रेरणा साहित्यामधून प्रकट झाली. महात्मा गांधींच्या चळवळीचा आणि विचारांचा साहित्यावर परिणाम झाला. तत्कालीन सामाजिक समस्यांचे प्रतिबिंब त्यात उमटले. अमरावतीचे वीर वामनराव जोशी यांची नाटके राष्ट्रीय जागृतीचे महान कार्य करून गेली. वामनरावांची नाटके मराठी वाङमयात चिरंतन ठरली. त्यामधून मध्यमवर्गाने बरीच प्रेरणा आत्मसात केली. वीर वामनरावांचा एक चाहता वर्ग वर्धा जिल्ह्यामध्ये होऊन गेला आणि आजही आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी प्रेरणेमधून काही साहित्यिकांनी दलित साहित्य निर्मितीचा विडा उचलला आहे. समाजातील दलित आणि गरीब जनतेच्या आशाआकांक्षा आणि त्यांच्या जीवनातील विदारक वस्तुस्थितीचे दलित साहित्यातून दर्शन घडते. वर्धा जिल्ह्यातदेखील दलित साहित्यिकांची एक पिढी निर्माण झालेली आढळते. त्यात सतीश पावडे, राजेंद्र मुंढे, अशोक चोपडे, प्रशांत पनवेलकर इत्यादींचा समावेश करण्यात येतो.

ललित साहित्य क्षेत्रातही काही मान्यवर लेखकांचा साहित्य अकादमीने तयार केलेल्या चरित्रकोशांत उल्लेख केलेला आहे. त्यातून संकलित माहिती खालील परिच्छेदामध्ये दिली आहे.[२०]

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेंद्र शिवदास बारलिंगे (जन्म २० जुलै १९१९) हे आर्वी परिसरातील सुप्रसिद्ध साहित्यिक आहेत. नागपूर आणि ऑक्सफर्ड विद्यापीठांतून शिक्षण प्राप्त झालेले डॉ. बारलिंगे यांनी सौंदर्य-शास्त्रावर **सौंदर्याचे व्याकरण** नामक पुस्तक लिहून साहित्यामध्ये मोलाची भर घातली आहे. नवोदित लेखकांना उत्तेजन देण्याचे कार्य बारलिंगे करीत आहेत.

वर्ध्यात जन्मलेले (१८ एप्रिल १९२६) पद्माकर गणेश चितळे यांनी **इमला, भोगनृत्य, पोर्टर** आणि **डाळिंबाचे दाणे** ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. गोविंद विनायक देशमुख (जन्म १७ जानेवारी १८८२) हे व्यवसायाने वकील असले तरी त्यांनी साहित्यनिर्मिती करून ठेवली आहे. तीन खंडांमध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या **कालसमुद्रातील रत्ने** या ग्रंथास प्रसिद्धी मिळाली.

आर्वीचे मनोहर लक्ष्मण वऱ्हाडपांडे (जन्म २३ जून १९३६) यांनी **कोल्हटकर आणि हिराबाई, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, भ्रमर परागु नेती**, आणि **ट्रॅडिशन्स ऑफ इंडियन थिएटर** ही पुस्तके लिहिली आहेत. वर्धा जिल्ह्यातील महाबळा गावी जन्मलेले (१९ डिसेंबर १९२७) डॉ. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे हे कवी, कथा लेखक व चरित्रकार असून त्यांची **या मनाचा पाळणा, कोल्होबाची करामत, भारतीय स्त्रीरत्ने** आणि **नागपूरी बोली : भाषाशास्त्रीय अभ्यास** ही पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. न्यायतीर्थ सत्यभक्त (जन्म १० नोव्हेंबर १८९९) हे परप्रांतीय हिंदी लेखक असून त्यांनी बोरगावच्या सत्याश्रमात

---

[२०] साहित्य अकादमी, **व्हूज व्हू ऑफ इंडियन रायटर्स**, १९६१ आणि १९८३ मध्ये प्रकाशित चरित्रकोश (नवी दिल्ली).

वास्तव्य केले. **सत्येश्वर गीता, दिव्य दर्शन, नरक स्वर्ग के चित्र, जैन धर्म मिमांसा** (३ खंड) **व सत्यामृत** (३ खंड) इत्यादी ग्रंथसंपदा निर्माण करून त्यांनी साहित्यात मोठी भर घातली.

आचार्य विनायक नरहर भावे (जन्म ११ सप्टेंबर १८९५) हे मूळचे रायगड जिल्ह्यातील गागोदे गावचे असले तरी त्यांची सर्व हयात पवनार परिसरामध्ये गेलेली आहे. त्यांनी विपुल साहित्यनिर्मिती केलेली आहे. त्यांनी केलेल्या **गीताई** चा उल्लेख वर आलेलाच आहे. शंकर त्रंबक ऊर्फ दादा धर्माधिकारी (जन्म १८ जून १८९९) यांचे सेवाग्रामला बरेच दिवस वास्तव्य होते. गांधीवादी धर्माधिकारींनी निर्माण केलेल्या साहित्यामध्ये पुढील साहित्यकृतींचा समावेश होतो : **क्रांतिनिष्ठा, स्नेहाचे झरे, आपल्या गणराज्याची घडण, अंतरीचे उमाळे** ही मराठी पुस्तके, आणि **साम्ययोग की राहपर** हे हिंदी पुस्तक. दत्तात्रय बाळकृष्ण ऊर्फ काका कालेलकर (जन्म १ डिसेंबर १८८५) हे मूळचे सातारा जिल्ह्यातील असले तरी त्यांचे सेवाग्रामला बरेच दिवस वास्तव्य होते. त्यांनी मराठी, हिंदी आणि गुजराथी भाषांमधून दर्जेदार साहित्यनिर्मिती केलेली आहे. त्यांच्या साहित्यामध्ये निबंध, प्रवासवर्णन, समाजशास्त्र आणि आत्मचरित्र या साहित्यप्रकारांचा समावेश आहे. राष्ट्रीय कीर्तीच्या लेखकांमध्ये कालेलकरांना मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. आनंद भिकू कौसल्यायन (जन्म ५ जानेवारी १९०५, मृत्यू १९८८) यांचेसुद्धा वर्ध्यात बरेच दिवस वास्तव्य होते त्यांनी हिंदी आणि इंग्रजी भाषांमधून अदमासे २० पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. वर्धा राष्ट्रभाषा प्रचार समितीचेदेखील त्यांनी विपुल कार्य केलेले आहे. राष्ट्रभाषा हिंदीच्या प्रसाराचे बरेच श्रेय कौसल्यायन यांना देणे क्रमप्राप्त आहे.

संस्कृत वाङमयाचे अभ्यासक डॉ. सदाशिव अंबादास डांगे यांचा जन्म हिंगणघाटला (२३ ऑगस्ट १९२२) झालेला असून मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे ते बरेच दिवस विभाग प्रमुख होते. त्यांनी **हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञान, अश्वत्थाची पाने, क्रिटिक ऑन संस्कृत ड्रामाज, लिजेंड एन महाभारत, पॅस्टोरल सिंबॉलिझम फ्रॉम ऋग्वेद, वेदिक कन्सेप्ट ऑफ फील्ड ॲंड दि डिव्हाईन फ्रक्टीफिकेशन,** इत्यादी ग्रंथ लिहून ज्ञानात भर घातली आहे. वर्ध्यात जन्मलेले (३१ ऑक्टोबर १९१७) शरदचंद्र यशवंत गुणे यांनी बऱ्याच इंग्रजी साहित्यकृतीचे मराठीत भाषांतर केले आहे. चंद्रहास पांडुरंग जोशी (जन्म विरुळ, १ जुलै १९२९) यांनी चरित्रात्मक कादंबऱ्या, कथा व स्फूट लेखन करून साहित्य सेवा केली आहे. प्रा. भानुदास श्रीधर परांजपे (जन्म १६ मार्च १९१४) यांनी मराठीतून पुष्कळ साहित्य प्रसिद्ध केलेले आहे. त्यांच्या साहित्यामध्ये कथा व नाटच वाङमयाचा समावेश होतो. त्यांची पुढील पुस्तके प्रकाशित झालेली आहेत : **वसंताच्या खुणा, नवनाथ, मत्स्येंद्रनाथ, दख्खनचा वाघ** आणि **मुलांसाठी माडखोलकर.**

वर उल्लेख केल्याप्रमाणे श्रीमननारायण अगरवाल (जन्म १५ जून १९१२) यांनी हिंदी आणि इंग्रजीमधून विपुल साहित्यनिर्मिती केलेली आहे. त्यामध्ये कवितांव्यतिरिक्त विचारप्रवर्तक वाङमयाचा समावेश आहे. राष्ट्रीय विचार, राष्ट्रवाद आणि गांधीवादी अर्थशास्त्र यामध्ये त्यांनी मोलाची भर टाकलेली आहे. विनोबा भावे यांचे उत्कृष्ट चरित्र लिहून त्यांनी चरित्र वाङमयात भर घातली आहे.

वर्धा येथे राष्ट्रभाषा प्रचार समिती १९३७ पासून कार्यरत असून समितीने हिंदी साहित्य आणि राष्ट्रभाषा प्रचार क्षेत्रात चांगली कामगिरी केलेली आह. राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या धुरीणांमध्ये आनंद भिकू कौसल्यायन, रामेश्वर दयालु दुबे, शंकरराव लोंढे आणि मदनमोहन शर्मा यांचा समावेश होतो. हे सर्वच हिंदी लेखक असून त्यांनी साहित्यामध्ये बरीच भर घातलेली आहे. स्वातंत्र्य आंदोलन काळात राष्ट्रभाषा प्रचार करून या धुरीणांनी मोलाचे राष्ट्रकार्य केले. उमाशंकर शुक्ल यांनीसुद्धा पत्रकारिते-व्यतिरिक्त हिंदी साहित्यामध्ये भर घातलेली आहे. स्वातंत्र्य आंदोलन काळात वर्ध्यात गांधीजींचे वास्तव्य असताना उमाशंकरजीनीं पत्रकारितेचा व्यवसाय स्वीकारला आणि त्या क्षेत्रात अत्यंत जबाबदारीने काम केले. दिनांक ११ नोव्हेंबर १९४२ पासून प्रा. भन्साळींनी आरंभीलेल्या ६२ दिवसांच्या उपोषणाबाबत सरकारी बंधनांना मुरड घालून त्यांनी सफाईदारपणे वृत्तप्रसारण केले. किंबहुना तेव्हापासूनच त्यांच्या वृत्तपत्र व्यवसायास खरा प्रारंभ झाला. स्वातंत्र्योत्तर काळात काशी नगरी प्रभारीणी सभेकडून कलकत्त्यास त्यांना "पत्रकार शिरोमणी" ही उपाधी प्रदान करण्यात आली.

लोकसाहित्य : वर्धा जिल्ह्यातही वैदर्भीय लोकसाहित्य मोठ्या प्रमाणात आढळते. त्यामध्ये रसाळ स्त्री गीते, ईश्वरभक्तीपर गीते, बोधप्रद गाणी, बालगीते इत्यादी प्रकारांचा समावेश होतो. या साहित्याद्वारे समाजाचे चित्र रेखाटलेले दिसते. त्यातील धार्मिक वृत्ती ही अध्यात्म, परमार्थ किंवा भक्ती या संप्रदायांची नाही. ती आहे साधीसुधी देवधर्माची प्रेरणा. त्यात ईश्वराविषयीचे प्रेम व आपले भले व्हावे ही कामना आहे. देव आपला पाठी-राखा आहे अशी भोळी श्रद्धा आहे. लोकसाहित्यात सौंदर्य स्थळेही कमी नाहीत. त्यात विनोदाबरोबर करुण रसही ओथंबून भरलेला आहे. शृंगार रसाचा आविष्कारही विपुल आहे. गाण्याची रचना सुंदर लयबद्ध झालेली दिसते. हे साहित्य म्हणजे मोठा ठेवा आहे. सकाळी जात्यावरील गाण्यांच्या निमित्ताने किंवा सण व उत्सव प्रसंगी हे साहित्य कानावर पडते. आज जीवनातून दळणाचे जाते गेले आणि त्याबरोबर स्त्री गीतांना ओहोटी लागली. लोक संस्कृतीच्या पाऊल खुणा उमटलेली ही थरथरत्या हृदयाची स्पंदने लिखित स्वरूपात जतन न केल्यास त्यांचा ऱ्हास होईल असे वाटते.[२१]

वैदर्भी भाषा : विदर्भातील बोलीभाषा पश्चिम महाराष्ट्रातील मराठीपेक्षा वेगळी वाटते. वैदर्भी भाषेची काही खास विशेषता आहे. या भाषेवर हिंदीचा प्रभाव तर दिसतोच, परंतु शब्दोच्चाराची पद्धतीही वेगळी आहे. महानुभाव पंथाच्या वाङ्मयामध्ये आणि विशेषत: चक्रधराच्या **लीळाचरित्र** ग्रंथात वैदर्भी शब्दांचा समावेश झालेला आढळतो. अलीकडील काही वर्षांत या भाषेत कथा, कादंबऱ्या, नाटके व कविता लिहिल्या गेल्या आहेत. वऱ्हाडी साहित्यिकांची संमेलनेदेखील भरत असतात. प्रसिद्ध संतकवी तुकडोजी महाराज या बोलीचा प्रभावीपणे उपयोग करीत असत.

वऱ्हाडी भाषेत दीर्घ स्वर ऱ्हस्व रीतीने उच्चारिले जातात. त्याप्रमाणे "ए" बद्दल "अ" किंवा "इ" हे स्वर योजतात. बऱ्याच वेळी पुल्लिंगी व स्त्रीलिंगी रूपे सारखीच होतात.

---

[२१] पत्की, उमेश विनायक, "विदर्भातील लोकसाहित्य" (अप्रकाशित **शोधनिबंध**, नागपूर विद्यापीठ, नागपूर).

उच्चारांचे चढउतार ही वऱ्हाडीची विशेषता आहे. अलीकडील काळात या बोलीला विद्यापीठ अभ्यासक्रमातही स्थान मिळावे अशी भाषाभिमानी लोकांकडून मागणी होत आहे. वऱ्हाडी भाषेतील २,५०० शब्द असलेला शब्दकोश १९७४ मध्ये प्रकाशित झाला. बोलीभाषेतील म्हणींचाही त्यात समावेश आहे.

भाषाशास्त्रज्ञ डॉ. ग्रिअर्सन यांच्या मते वऱ्हाडी व नागपुरी या मराठीच्या दोन पोटभाषा (Dialect) असून वर्धा नदीने त्या भाषिक प्रदेशांची सीमा रेखा आखलेली आहे. वर्धेच्या पश्चिमेकडील प्रदेशात वऱ्हाडी तर पूर्वेकडील भागात नागपुरी पोटभाषा प्रचलित आहे असे डॉ. ग्रिअर्सनचे मत आहे. तथापि या दोन पोटभाषांमधील फरक अत्यल्प आहे. स्थलपरत्वे त्यांत काहीसा बदल दिसून येतो. वस्तुतः वर्धा परिसरातील बोलीभाषा वऱ्हाडी व नागपुरी पोटभाषांच्या मिश्रणाने तयार झालेली असावी. वऱ्हाडी भाषेबद्दल डॉ. ग्रिअर्सनचे अभिप्राय महत्त्वाचे असल्यामुळे त्यांच्याच शब्दात सांगणे उचित. ते म्हणतात :–

> " Berari should historically represent the purest Marathi, for Berar corresponds to the ancient Vidarbha or Maharashtra. The political centre of gravity, however, in after centuries moved to the west and with it the linguistic standard. Marathi has a copious literature of great popularity. The poets wrote in the true local vernacular " [२२]

समाजप्रबोधन व आर्वी : वर्धा जिल्ह्याच्या सांस्कृतिक इतिहासात आर्वी नगराचे विशेष स्थान आहे. तेथील संतपरंपरा व धार्मिक उत्थापनाचा आढावा या प्रकरणात अन्यत्र घेतलेला असल्यामुळे त्याची पुनरावृत्ती करण्याची आवश्यकता नाही. आर्वीमध्ये १८६५ मध्ये स्थापन झालेल्या नेटिव लायब्ररीचे जिल्ह्याच्या सांस्कृतिक इतिहासात महत्त्व आहे. सन १८६७ मध्ये नगरपालिका व १८६८ मध्ये इंग्रजी शाळा स्थापन झाल्यामुळे लायब्ररीचे महत्त्व वाढले व विकासास चालनाही मिळाली. दिनांक २२ जानेवारी १९०१ रोजी सम्राज्ञी व्हिक्टोरियाचे निधन झाल्यावर त्यावर्षीच्या अक्षय तृतीयेच्या सुमारास नागपूर प्रांताचा चीफ कमिशनर अँड्र्यू एच. एल. फ्रेजर याच्या हस्ते ग्रंथालयाचे व्हिक्टोरिया लायब्ररी असे नामांतर करण्यात आले. ग्रंथालयाची ही आद्य इमारत अजूनही नवीन इमारतीच्या मागे अस्तित्व टिकवून आहे. तेथे नगरभवन उपलब्ध होते. त्यात सभा व व्याख्याने होत असत. पुढे ग्रंथालयासाठी नवीन प्रशस्त इमारत बांधण्यात आली आणि १९२७ मध्ये ग्रंथालयास लोकमान्य वाचनालय असे नवे नाव देण्यात आले. विद्यमान नगरभवन १९११ मध्ये बांधलेले आहे.

आर्वीस अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांनी भेट दिल्याचे उल्लेख आढळतात.[२३] लोकमान्य टिळक १९१८ मध्ये व महात्मा गांधी १९२१ मध्ये आर्वीस आल्यावर राष्ट्रीय जागृतीचे वारे वाहू लागले. स्वराज्य पक्षाची सभा नागपूरला भरली असताना पं. मोतीलाल नेहरू सुद्धा १९२५ मध्ये या नगरात येऊन गेले. सेंट्रल लेजिस्लेटिव काऊन्सिलच्या निवडणूक प्रचारानिमित्ताने डॉ. मुंजेंच्या बाजूने प्रचार करण्यास्तव पं. मदन मोहन मालवीय आर्वीला

[२२] ग्रिअर्सन, डॉ. **इंडिया सेन्सस रिपोर्ट, १९०१,** मधील "भाषा" यावरील प्रकरण.

[२३] कदम, के. ब. (संपा.), **लोकमान्य वाचनालय, आर्वी : शतसांवत्सरिक संस्मरण : १८६५–१९८२** (आर्वी), यावर आधारित माहिती.

१९२६ मध्ये आले होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी १९३३ मध्ये ग्रंथालयाच्या विद्यमाने सामाजिक प्रबोधनपर भाषणे दिली. कॉंग्रेस अध्यक्ष डॉ. राजेन्द्र प्रसाद यांची १९३४ मधील आर्वी भेट नागरिकांना उद्‌बोधक वाटल्याखेरीज राहिली नाही. महात्माजींचे वर्धा-सेवाग्रामला वास्तव्य झाल्यावर ते आर्वीस पुन्हा आले होते.

गांधीजींचे सहकारी श्रीकृष्णदासजी जाजू यांचे घराणे आर्वीचे. त्यांच्या सहकार्याने अनेक रचनात्मक कार्यकर्ते व राष्ट्रप्रेमी आर्वीला येऊन प्रबोधनकार्य करीत असत.

झाशीची राणी लक्ष्मीबाई हिचे मूळ घराणे अमरावतीचे आहे. लक्ष्मीबाईचा सावत्र भाऊ चिंतामण मोरोपंत तांबे १८९९ ते १९०२ या कालावधीत आर्वीचा तहसीलदार होता. तहसीलदार या नात्याने तो पदसिद्ध नगराध्यक्षसुद्धा होता. आपल्या कारकिर्दीमध्ये त्याने आर्वीच्या सांस्कृतिक जीवनात बराच रस घेतला. पुढे आर्वीतून बदली झाल्यावर तो १९१० मध्ये सेवानिवृत्त झाला आणि नागपूरला स्थायिक झाला. नागपूरलाच त्याला १८ डिसेंबर १९३४ रोजी देवाज्ञा झाली.

लोकमान्य वाचनालयात हजारो ग्रंथाव्यतिरिक्त अदमासे ३०० दुर्मिळ व अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथांची जपणूक केलेली आहे. त्यात इ. स. १८०० व १८०७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचा समावेश आहे. शिवाय बरीच इंग्रजी व मराठी दुर्मिळ मासिके व नियतकालिके उपलब्ध आहेत. हे सर्व ग्रंथभांडार संशोधन व लेखनासाठी अतिशय उपयुक्त आहे.

किर्लोस्कर नाटक कंपनी पुण्यात भरभराटीस असताना आर्वीमध्ये मानाजी नामक गृहस्थाने रंगभूमीस प्रोत्साहन दिले. धार्मिक नाटके रंगभूमीवर आणण्यास त्याने मदत केली. त्याच्या उत्तेजनामुळे ललित, भजन व कीर्तनांचे कार्यक्रम होऊ लागले. त्यातून महादेवराव जळीत व बाबूलाल महाराज यांचेसारखे संगीतज्ञ तेथे निर्माण झाले. आर्वीच्या सरस्वती संगीत विद्यालयाने (१९६०) संगीत प्रसाराचे बरेच कार्य केले. त्यातून शास्त्रीय संगीताचा रसिक वर्ग, अल्पांशाने का होईना, पण निर्माण झाला.

संगीत

वर्धा जिल्ह्यात काही संगितोपासक निर्माण झाले. नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांचे असंख्य चाहते रसिक तेथे होऊन गेले व आजही आहेत. भारतीय शास्त्रीय संगीताचा चाहता रसिक वर्ग बऱ्याच गावी आढळतो. त्याशिवाय जिल्ह्यात चांगल्या प्रतीचे काही गायक व वादक कलाकार होऊन गेले आणि आजही आढळतात. त्यापैकी काही गायक व वादक कलाकारांची उपलब्ध माहिती खाली दिली आहे.[२४]

आर्वी येथे जन्मलेला (१८८८–८९) बाबुलालजी भट्ट हा एक प्रसिद्ध हार्मोनियमवादक होऊन गेला. त्याचा पिता गोवर्धनराव भट्ट भजन, कीर्तन करीत असल्यामुळे बाबुलालजीवर बालपणापासून संगीताचे संस्कार झाले. बाबुलालजीने पोरबंदरचा आचार्य घनश्यामजी आणि मुंबईच्या पारशी नाटक कंपनीतील हार्मोनियमवादक जगतसिंग

[२४] ही माहिती नारायण गोविंद मंगरुळकर यांनी लिहिलेल्या **वैदर्भीय संगितोपासक** या पुस्तकातील माहितीवर आधारित आहे.

यांच्याकडून हार्मोनियमवादनाची साधना केली. किराना घराण्याचे अध्वर्यु खाँसाहेब अब्दुल करीम खान यांच्याशीसुद्धा त्याने परिचय करून घेण्यात यश मिळविले होते. पुढे गुजरातमध्ये गेल्यानंतर पं. ओंकारनाथ ठाकूर यांच्या सान्निध्यात जाऊन ओंकारजींना साथसंगत करण्याचा बहुमान मिळविला. त्याने आर्वीत संगीत प्रसार करून आपले शिष्य निर्माण केले. गोविंदराव मुलताईकर, नथूबुवा पुरी, श्रीधरराव व महादेवराव जळीत यांचा बाबुलालच्या शिष्यांत समावेश होतो. महात्मा गांधींपुढे आपली कला पेश करण्याचे भाग्य बाबुलालजीस प्राप्त झाले होते. हार्मोनियमवादनाशिवाय कंठसंगीतातसुद्धा त्याने प्राविण्य मिळविले.

बापुराव रपाटे हा वर्ध्यातील एक प्रसिद्ध तबलावादक. बापुरावजीचा जन्म रसुलाबादला १९०५ मध्ये होऊन २० डिसेंबर १९५३ रोजी मृत्यू आला. प्राथमिक अध्ययनानंतर बापुरावजीने पुण्यातील गांधर्व महाविद्यालयात तीन वर्षे शिक्षण घेऊन सोलो तबलावादन आणि साथसंगतीचे तंत्र अवगत केले. बलवंत नाटक मंडळी आणि इतरही नाटक कंपन्यांमध्ये तबलावादन करून संगीतसाधना केली. पं. बळीरामपंत पांडे यांच्याकडून मार्गदर्शन घेऊन त्याने पुष्कळ गायक व कीर्ननकारांना साथसंगत केली. त्यासाठी आर्वीपासून कलकत्ता हैदराबाद, रतलाम, उज्जैन, इंदूर इत्यादी शहरांत भ्रमण केले. अदमासे पंचवीस वर्षे तबला शिक्षक म्हणून काम करून शिष्यगण निर्माण केला.

प्रसिद्ध गायक जे. एल. रानडे वर्ध्यातील महिलाश्रम संस्थेत संगीत शिक्षक होते आकाशवाणीच्या मुंबई, नागपूर व पुणे केंद्रांवरून त्यांचे शास्त्रीय संगीताचे अनेक कार्यक्रम वेळोवेळी प्रसारित झाले. ख्यालगायकीच्या त्यांच्या पुष्कळ ध्वनिमुद्रिका प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांचा जन्म सांगलीत २७ मार्च १९०५ रोजी होऊन साताऱ्याला शिक्षण झाले न्यायालयात नोकरी करीत असतानाच संगीत अध्ययनाचा प्रारंभ करून पं. विनायकराव पटवर्धन, गजाननराव जोशी व जगन्नाथबुवा पुरोहित यांसारख्या संगीतज्ञांकडून मार्गदर्शन घेतले. संगीतावरील त्यांचे एक पुस्तक प्रकाशित झालेले आहे. रामदास वासुदेव शास्त्री ऊर्फ भाऊजी काळे हा सुद्धा एक प्रसिद्ध गायक होऊन गेला. कंठसंगीताची प्रारंभीची तालीम नागपूरच्या शंकरराव पटवर्धनकडे घेऊन भाऊजीने ग्वाल्हेरचे सुप्रसिद्ध गायक पं. राजाभय्या पूछवाले आणि पुण्याचे पं. विनायकराव पटवर्धन यांचे मार्गदर्शन घेतले. राजाभय्या पूछवाले ग्वाल्हेर गायकीचे ज्येष्ठ पुरस्कर्ते होते. भाऊजीचे मूळ गाव नागपूर जिल्ह्यातील हिंगणा हे होय. पुढे त्याने वर्ध्यात वास्तव्य केले व संगीत प्रचारार्थ संगीत विद्यालय देखील स्थापन केले. ख्यालगायकी आणि भजन या दोन्हीही संगीत प्रकारांत त्याने नाव मिळविले आणि बरेच शिष्य निर्माण केले.

वर्ध्यातील गायक कलाकारांमध्ये भास्करराव नारायण संगीत यांनी मानाचे स्थान मिळविले. आपल्या वडिलांकडून त्यांनी संगीताचे अध्ययन करून पुढे ग्वाल्हेरला उच्च शिक्षणासाठी प्रयाण केले. ग्वाल्हेरमध्ये पं. राजाभय्या पूछवाले आणि कुंडलगुरू यांच्याकडून तालीम घेतली. ग्वाल्हेरचे राजदरबार गायक पं. बाळाभाऊ उमडेकर शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली भास्कररावांनी ग्वाल्हेर येथून "संगीतभूषण" व गांधर्व महाविद्यालयातून "संगीत अलंकार" या पदव्या प्राप्त केल्या. संगीताची सेवा करण्याच्या दृष्टीने वडिलांचे जन्मस्थान असलेल्या वर्धा शहरात त्यांनी १९४१ मध्ये शिवानंद संगीत विद्यालय स्थापन केले. हे विद्यालय अद्यापही चांगली संगीत सेवा करीत आहे. पं. भातखंडेंच्या

संगीत शिक्षणपद्धतीचा तेथे पुरस्कार करण्यात येतो. ख्यालगायकीत त्यांनी बरेच नाव मिळविले. भास्कररावांच्या संगीताचा वारसा त्यांचा मुलगा प्रकाश पुढे चालवित आहे. प्रकाशने संगीतामध्ये डॉक्टरेट पदवी प्राप्त करून आकाशवाणीच्या औरंगाबाद केंद्रावर संगीत दिग्दर्शक पद मिळविले. संगीत घराण्यामध्ये संगीताचा वारसा चालविणारी ही तिसरी पिढी होय. आर्वी तालुक्यातील एका शेतकरी कुटुंबात जन्मलेला (१४ डिसेंबर १९१४) महादेवराव जळीत हा एक वादक कलाकार होऊन गेला. हार्मोनियमवादन आणि तबलावादनाचे त्याने पुष्कळ अध्ययन केले. उपरोक्त बाबुलालजी भट्टचा तो शिष्य होता. बरीच भ्रमंती केल्यानंतर त्याने व्हायोलिनपटू पं. व्ही. जी. जोग यांच्याकडून व्हायोलिनवादनाचे शिक्षण घेऊन आकाशवाणीच्या लखनौ केंद्रावर काही दिवस नोकरीही केली. पुढे जुलै १९६१ मध्ये आर्वीला सरस्वती संगीत विद्यालय नामक संस्था स्थापन करून ती अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाशी संलग्न केली. त्याचे दोन्ही पुत्र वादक कलाकार असून मुलगी संगीत विशारद आहे. महादेवरावचे आकाशवाणीवरून वेळोवेळी बरेच कार्यक्रम झाले. बळवंतराव काळे या कलाकाराने (जन्म हिंगणी येथे १ जानेवारी १९२२ रोजी) आपल्या वडील बंधूकडून हार्मोनियमवादन आणि संगीताचे प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या 'संगीत प्रवीण' परीक्षेत यश मिळविले. आकाशवाणीच्या नागपूर केंद्रावरून त्याने संगीताचे पुष्कळ कार्यक्रम सादर केले. गायनाशिवाय संगीत शिक्षणाच्या माध्यमातून या कलाकाराने लौकिक मिळविला.

शांतशीला सत्यनाथन, पूर्वाश्रमीची शांता साळवे, ही सुद्धा वर्धा जिल्ह्यातील संगीत तज्ञ आहे. तिचा जन्म छिंदवाडा येथे ६ मे १९२४ रोजी झाला. शरच्चंद्र श्रीधर परांजपे तिचे गुरू होते. संगीताचे प्रारंभीचे शिक्षण नागपूरला घेऊन ती पुढे ग्वाल्हेरला गेली. ग्वाल्हेरचे प्रसिद्ध गायक पंडित राजाभय्या पूछवाले आणि पंडित नारायणराव गुणे यांचे मार्गदर्शन घेऊन तिने १९५० मध्ये माधव संगीत महाविद्यालयातून "संगीत निपुण" ही पदवी प्राप्त केली. भारताच्या पहिल्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीत झालेल्या संगीत संमेलनात गायनाची शांताबाईला संधी मिळाली. आकाशवाणीच्या नागपूर केंद्रावरून तिने पुष्कळ कार्यक्रम सादर केले. गांधीवादी कार्यकर्ते श्री. सत्यनाथन यांच्याशी तिचा विवाह झाला. सेवाग्राम येथील वास्तव्यात थोर गांधीवादी कार्यकर्त्या आशादेवी आर्यनायकम यांच्याशी संपर्क आल्यामुळे 'रविंद्र संगीत' आत्मसात करण्याची तिला संधी प्राप्त झाली. पुढे केरळमध्ये गेल्यावर कर्नाटिक संगीताचा अभ्यास केल्यामुळे तिला भिन्न भाषांमध्ये कार्यक्रम सादर करण्याची क्षमता प्राप्त झाली. गांधी जन्म शताब्दीनिमित्ताने बी. बी. सी. रेडिओसाठी १९६९ मध्ये तिच्या भजनगायनाचे ध्वनिमुद्रण करण्यात आले. सन १९७० मध्ये वर्ध्यातील यशवंत महाविद्यालयात संगीताच्या प्राध्यापिका म्हणून तिने नोकरी पत्करली. ख्याल, ठुमरी, तराणा, नाट्यसंगीत, रविंद्र संगीत इत्यादी संगीत प्रकार आकाशवाणी तसेच मैफिलीद्वारे सादर केले.

वर्धा जिल्ह्यातील बहुसंख्य संगीतज्ञ एखाद्या विशिष्ट घराण्याचे पुरस्कर्ते नसले तरी त्यांच्या गानपद्धतीवर ग्वाल्हेर घराण्याची छाप पडलेली दिसते. ग्वाल्हेर परंपरेतील राजाभय्या पूछवाले यांचा त्यांच्यावर प्रभाव दिसतो.

उपरोक्त गायक व वादक कलाकारांव्यतिरिक्त वर्धा जिल्ह्यामध्ये पुष्कळ कीर्तनकार होऊन गेले. त्यांनी आपल्या रसाळ वाणीद्वारे आणि गायनाद्वारे लोकरंजनाचे कार्य पार

पाडले. संगीत शिक्षणास वाहून घेतलेल्या शिवानंद संगीत विद्यालयाव्यतिरिक्त (स्थापना १९४१) वर्धा नगरात श्रीराम संगीत विद्यालय (स्थापना १९४०), श्रीदत्त संगीत विद्यालय (स्थापना १९५९) व महिलाश्रम संगीत विद्यालय (स्थापना १९६१) ही विद्यालये या कलाक्षेत्रात कार्यरत आहेत. सांस्कृतिक वारसा प्राप्त असलेल्या आर्वी नगरात बाबुलालजीच्या प्रेरणेने महादेवराव जळीत या कलाकाराने १५ जुलै १९६१ रोजी सरस्वती संगीत विद्यालय स्थापन केले. हिंगणघाटलाही १९६१ पासून संगीत विद्यालय कार्यरत आहे.

शिल्पकला आणि चित्रकला

वर्धा जिल्ह्याने भारताला दोन महान कलाकार दिलेले आहेत. ते म्हणजे विठ्ठल बडगेलवार व त्यांची पत्नी प्रभा बडगेलवार. बी. विठ्ठल व बी. प्रभा या नावांनी कलाप्रेमींना ज्ञात असलेल्या या दांपत्याचा विवाह १९५६ मध्ये होऊन ते आता मुंबईत वास्तव्य करून आहेत. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कलाकारांमध्ये त्यांचा समावेश करणे क्रमप्राप्त आहे. कलेची उपजत ओढ असलेला वर्ध्याच्या गरीब घरातील विठ्ठल वयाच्या अकराव्या वर्षी पलायन करून मुंबईस आला. पदपथावर वास्तव्य करून हमाली वा तत्सम व्यवसाय करून उदरनिर्वाह करू लागला. कंटाळून घरी परत आल्यावर शाळेत दाखल झाला त्यानंतरसुद्धा त्याचे पुस्तकी शिक्षणात मन रमेना. म्हणून तो कानपूरला पळाला व तेथून नागपूर स्कूल ऑफ आर्टमध्ये दाखल झाला. तेथेच प्रभा या कलाप्रेमी युवतीशी त्याची ओळख होऊन ते दोघे मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये दाखल झाले. उत्तरोत्तर दोघांनी कलासाधना करून उत्कृष्ट प्राविण्य मिळविले.

बी. विठ्ठल अत्यंत संवेदनाक्षम व सृजनशील चित्रकार व शिल्पकार आहेत. भारतीय चित्रकलेत आणि शिल्पकलेत त्यांनी मौलिक भर घातलेली आहे. कोणत्याही कलाप्रणालीशी अथवा पारंपरिकतेशी बांधीलकी न पत्करता त्यांनी आपल्या स्वतंत्र शैलीचाच आविष्कार केलेला दिसतो. जगविख्यात सर्वश्रेष्ठ कलाकार हेन्री मूर याचा जरी विठ्ठलवर अत्यल्प प्रभाव असला तरी त्यांची कलाकृती स्वतःच्या शैलीचाच आविष्कार करणारी आहे.

प्रभाबाईवर पॉल क्ली आणि पाश्चिमात्य आधुनिक कलेचा (Modern Art) प्रारंभीच्या काळात प्रभाव पडला होता. तथापि नंतर त्यांनी सुप्रसिद्ध भारतीय चित्रकार अलमेलकर, पळशीकर आणि अमृता शेर-गिल यांच्या शैलीचा स्वीकार करून अजिंठा चित्रकृतींमध्ये रस घेतला. उत्तरोत्तर त्यांनी अजिंठा कलाविष्कारातून आपली शैली निर्माण केली. त्यांनी देशात तसेच परराष्ट्रात आपल्या कलाकृतींची बरीच प्रदर्शने भरविली. भारतातील गरिबी व दैन्य या विषयांवर त्यांनी बरीच कलानिर्मिती केली. सुप्रसिद्ध कलासमीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी त्यांच्या कलेबद्दल पुढील उद्गार काढलेले आहेत. "It is a world of simple beauty of life marked by hard work, painted with a childlike interest in its formal rhythm. The aim of the artist is clearly to please, to convey the deep happiness she herself has felt in mixing with this humble world and enjoying its colour and beauty."[२५]

---

[२५] निस्सीम एझिकेल, **बी. विठ्ठल अ‍ॅण्ड बी. प्रभा**, (मुंबई, १९८६), या पुस्तिकेवर आधारित.

वर्ध्यातील तिसरे चित्रकार त्र्यं. ग. पाटणकर यांचाही उल्लेख करणे आवश्यक आहे कामठीला जन्मलेले पाटणकर शिक्षक व्यवसायास्तव आष्टीस आले आणि कलेची उपासना करू लागले. चित्रकलेव्यतिरिक्त त्यांनी मूर्तिकलेतसुद्धा प्राविण्य मिळविले. त्यांच्या प्रेरणेने डिसेंबर १९६६ मध्ये विदर्भस्तरावर प्रशस्त चित्रकला प्रदर्शन संपन्न झाले.

स्थापत्य व शिल्पाच्या दृष्टीने नमूनेदार असलेले वर्ध्याचे गीताई मंदिर विलोभनीय आहे. त्याची माहिती पुढील प्रकरणात दिलेली आहे.

प्रकरण १२–प्रेक्षणीय स्थळे

पवनार तथा प्रवरपुरास प्राचीन काळापासून ऐतिहासिक परंपरा आहे. वाकाटक राजा दुसऱ्या प्रवरसेनाने प्रवरपूर स्थापन करून तेथे आपली राजधानी स्थलांतरित केली असा अंदाज पुरातत्त्वज्ञांनी अलीकडे मांडलेला आहे. ऐतिहासिक परंपरेची साक्ष देणारी अनेक स्मारकशिल्पे व त्यांचे अवशेष अस्तित्वात आहेत. नागपूर विद्यापीठाच्या विद्यमाने करण्यात आलेल्या पवनार उत्खननानुसार (फेब्रुवारी १९६७) विलक्षण महत्त्वाचे ऐतिहासिक पुरावे उपलब्ध झालेले आहेत. संशोधनानुसार प्रवरपूरची प्राचीनता इ. स. पूर्व अदमासे १००० पर्यंत जाते. भरत-राम भेटीचे दृश्य, रामाला सोडून सुमंत रथ परत नेत असल्याची शिल्पाकृती, गंगा भगवतीची मूर्ती व कंसवध मूर्ती विशेषतापूर्ण आहेत. या स्मारक-शिल्पांमधून धार्मिक तसेच वास्तुशास्त्र परंपरेचे सम्यक दर्शन घडते. प्रवरपूरच्या संशोधनाने या परिसराच्या इतिहासावर चांगला प्रकाशझोत टाकलेला आहे.

केळझरच्या प्राचीन काळातील अवशेषांचेही नागपूर विद्यापीठातील अभ्यासकांनी संशोधन केले आहे. त्यातील काही अवशेष फार प्राचीन असून हिंदू व जैन धर्मांचे द्योतक असलेल्या या मूर्तीचा अभ्यास होत आहे. मूर्तिभंजकांच्या दुष्टपणामुळे बरीच शिल्पे नष्ट झाली. तरीसुद्धा शिल्लक राहिलेल्या शिल्पांवरून तत्कालीन वैभवाची कल्पना येते.

तथापि येथे नमूद करणे आवश्यक आहे की, वर्धा जिल्ह्यात पारंपरिक अर्थाने प्रेक्षणीय स्थळे कमीच आहेत. तरीसुद्धा वर्धा-सेवाग्राम-पवनार येथे हजारो देशी व परदेशी पर्यटक जात असतात. याला कारण तेथील प्रेक्षणीय स्थळे नसून प्रेरणास्थळे आहेत. भारतीय लोक जातात तेथील गांधीजींच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या ठिकाणांचे दर्शन घेण्यासाठी. परदेशी पर्यटक जातात गांधीवादाच्या अभ्यासासाठी.

इतिहासाची साक्ष देणारे काही शिलालेख व ताम्रपट सापडलेले आहेत. त्यांची माहिती संबंधित स्थळांच्या वर्णनात दिलेली आहे.

विद्यमान प्रकरणात दिलेली स्मारके, शिल्पे व प्रेक्षणीय स्थळांची माहिती १९०६ मध्ये प्रकाशित झालेले **वर्धा गॅझेटिअर**, १९७४ मध्ये प्रकाशित झालेले सुधारित **वर्धा गॅझेटिअर**, पवनार उत्खननाचा अहवाल, संशोधनपर ग्रंथ व लेख, ऐतिहासिक कथा आणि समक्ष सर्वेक्षणाद्वारे प्राप्त केलेली आहे. या कार्यालयाने १९८६ मध्ये सर्वेक्षण करूनही माहिती प्राप्त केलेली आहे. या सर्व माहितीच्या आधारे लेखन करून प्रेक्षणीय स्थळांची मांडणी वर्णानुक्रमे केलेली आहे. दंतकथावर आधारित माहिती तपासून घेणे प्रत्येक बाबतीत शक्य झाले आहे असे नाही. माहिती शक्यतोवर वस्तुनिष्ठ करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अंजी

अंजी (वर्धा ता., २०°–५०′ उ., ७८°–३०′ पू., लोकसंख्या ४,६१४) धाम नदीच्या काठी **वर्धा-आर्वी रस्त्यावर वर्ध्याच्या वायव्येस १४.४ कि.मी. आहे. भोसले राजवटीपर्यंत हे**

एक लहानसे खेडे होते. भोसले राजवटीत मातीची गढी उभारण्यात आली आणि अधिकाऱ्यांनी लोकांना वस्तीसाठी प्रोत्साहित केले. त्यानंतर ते परगण्याचे केंद्र बनले. परंतु नंतर कमावीसदाराने आपले मुख्यालय आर्वीस हलविले. येथील गढीचे अवशेष आढळतात. येथे हातमाग कापड विणाई व रंगविण्याचा व्यवसाय होता. गावात तीन हिंदू मंदिरे, मशीद, मठ व सहा दर्गे आहेत. चैत्र वद्य पंचमीला नरसाईची व दुसरी नारायणबुवाची जत्रा भरते. छोडो भारत आंदोलनात अंजीकरांनी मोलाची भर घातली.

अल्लीपूर

अल्लीपूर (हिंगणघाट ता., २०°–३०′ उ., ७८°–४०′ पू., लोकसंख्या ६,५४२) वर्ध्याच्या आग्नेयेस २५.७५ कि.मी. असून वर्धा व सोनेगाव (९ कि.मी.) रेल्वे स्थानकांशी पक्क्या रस्त्याने जोडलेले आहे. अल्लीपूर म्हणजे अल्लाचे गाव. एका आख्यायिकेनुसार पाठलाग करणाऱ्या कुत्र्यांवर या ठिकाणी ससा उलटला व त्याने कुत्र्यांशी लढत दिली. एका भित्र्या प्राण्याने धैर्य दाखविलेले पाहून ही जागा निश्चितच शूरांची भूमी असावी असे समजून एका मुसलमान वलीने येथे गाव वसविले. वलीची येथे कबर असून नोव्हेंबरात मोठा उरुस भरतो. हे खेडे अनेक वर्षे एलिचपूरच्या नबाबाच्या ताब्यात होते. तथापि यास निर्विवाद पुरावा नाही नबाबाने मेजर जनरल वेलस्लीला मराठ्यांविरुद्धच्या असईच्या मोहिमेत मदत केल्यामुळे नागपूरकर भोसल्यांनी हे खेडे त्याच्याकडून काढून घेतले व नागपूरच्या चिटणवीस घराण्यास दिले. अल्लीपूर काही काळ तालुका मुख्यालय होते. येथे एक गढी, जुने महादेवाचे देऊळ व नमाजगाह आहे. नमाजगाह सुमारे २७५ वर्षापूर्वी बांधला असून मार्चमध्ये तेथे उरुस भरतो. इ. स. १९०० च्या भीषण दुष्काळात २,२०० रुपये खर्चून येथील तलाव दुरुस्त केला होता. गढीचे बरेच अवशेष अद्यापि पहावयास मिळतात.

आर्वी

आर्वी (तालुका मुख्यालय, २०°–३१′ उ., ७८°–४५′ पू., लो. सं. ३१,११९; न. पा. १८६७) शहर वर्ध्याच्या वायव्येस ५४.७५ कि. मी. आहे. येथील आधीचे रहिवासी फुलमाळी असून ते अडवी फुलांची लागवड करीत त्यावरून गावास आर्वी नाव पडले असे म्हणतात. दुसऱ्या एका आख्यायिकेनुसार, या गावाची स्थापना १५५६ च्या सुमारास तेलंगराय नावाच्या साधूने केल्याने गावास तेलंगरायाची आर्वी असेही म्हणतात. तेलंगरायास हिंदू व मुसलमान आपल्या धर्माचा मानून त्याच्या कबरीला पूज्य मानतात. **ऐन-इ-अकबरी** मधील उल्लेखानुसार १६०१ मध्ये गाविल सरकारमध्ये आर्वी महाल समाविष्ट होता.[१] नागपूरकर भोसल्यांच्या राजवटीत आर्वीस कमावीसदाराचे मुख्यालय होते. गावात महादेवाची दोन, रामाचे व जैनांचे प्रत्येकी एक मंदिर व संत मायबाईचा मठ आहे.[२] महादेव मंदिर जुने असून त्याचा सभामंडप प्रशस्त आहे. येथे महाशिवरात्र आणि दसऱ्याला मोठ्या यात्रा भरतात. मायबाई मठात कृष्ण व लक्ष्मीनारायणाचे देऊळ आहे. कृष्णाच्या देवळासमोर मायबाईचा पती व मुलाची समाधी आहे. मार्गशीर्ष वद्य त्रयोदशीला त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उत्सव होतो. आर्वीला कापसाची मोठी बाजारपेठ आहे.

---

[१] इर्फान हबीब, पूर्वोक्त, ३६.

[२] अधिक माहितीसाठी याच ग्रंथातील प्रकरण ११–संस्कृति पहावे.

आर्वीचे लोकमान्य वाचनालय, नेटिव लायब्ररी या नावाने, १८६५ मध्ये स्थापन झाले. इ. स. १९०१ मध्ये त्याचे नामकरण व्हिक्टोरिया लायब्ररी असे झाले. इ. स. १९१८ मध्ये लोकमान्य टिळक आर्वीस आल्यानंतर त्यांचे नाव वाचनालयास देण्याचा नागरिकांनी प्रयत्न केला, तथापि ब्रिटिशांनी विरोध केल्याने तो प्रयत्न फसला. कालांतराने त्यास लोकमान्य वाचनालय नाव पडले. आर्वी संतांची आर्वी म्हणूनही प्रसिद्ध आहे. संत मायबाई, संत आडकुजी, संत भानुदास, संत तुकाराम (आर्वीचे), संत आप्पाजी महाराज, संत बाबा महाराज, झामसिंग महाराज, भगवंतराव महाराज, इत्यादी संतांचा आर्वीशी घनिष्ठ संबंध आलेला आहे. आर्वीस सांस्कृतिक महत्त्व तर फारच आहे. राष्ट्रीय जागृतीच्या काळात तेथे लोकमान्य टिळक, न. चिं. केळकर, मुकुंदराव जयकर, तेजबहादुर सप्रू, पंडित मोतीलाल नेहरू, पंडित मदन मोहन मालवीय व महात्मा गांधींचे आगमन झाले होते. राष्ट्रीय चळवळीत या गावाचा सहभाग १९२० पासून वाढून १९४२ मध्ये त्याचा परिपोष झाला.

आष्टी

आष्टी (तालुका मुख्यालय, २१°–१२′ उ., ७८°–१०′ पू., लो. सं. ८,०५०) वर्ध्याच्या उत्तरेला ७८.८६ कि.मी. सातपुड्याच्या पायथ्याशी आहे. हे गाव गवळी राजवटीपासूनचे असल्याचे सांगतात. गवळी राजवटीनंतर याचे महत्त्व कमी झाले. जहांगीर बादशहाने आष्टी, आमनेर, पवनार व तळेगाव परगणे जहागीर म्हणून मुहम्मद खान नियाझी या उच्चपदस्थ अफगाण उमरावास दिल्यावर, त्याने आष्टीची पुनःप्रस्थापना करून सभोवतालच्या शेतीचा विकास घडवून आणला.[३] त्याचे १६२७ मध्ये निधन झाल्यावर दफन स्थळी मुघल स्थापत्य पद्धतीची सुंदर कबर बांधण्यात आली. त्याच्यानंतर त्याचा वारस अहमदखान नियाझीकडे आष्टी आले. इ. स. १६५१ मध्ये त्याचा मृत्यू झाल्यानंतर, उपरोक्त कबरीशेजारीच त्याचे दफन करून त्या ठिकाणी त्याच पद्धतीची दुसरी कबर बांधण्यात आली. गावाजवळील टेकडीवर पीर वजित नावाच्या मुसलमान अवलियाची कबर आहे. यास हिंदू व मुसलमान लोक भजतात. पिराच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी मोठा उरुस भरतो. गावात कपालेश्वराचे मंदिर आहे. पूर्वी हे गाव आष्टी व अहमदपूर या दोन गावांत विभागले होते. आता अहमदपूर ओसाड आहे. आष्टी गावात तेली व माळ्यांची वस्ती आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या आरती मंडळाचे येथे केंद्र होते.

आष्टी गावाने इतिहासात महत्त्वाचे नाव मिळविले ते तेथील स्वातंत्र्य संग्रामाने. छोडो भारत आंदोलनात १६ ऑगस्ट १९४२ रोजी आष्टीस महान रणधुमाळी घडली. याबाबतचा संगतवार इतिहास या ग्रंथातील प्रकरण २–इतिहास मध्ये दिलेला आहे.

कवठा

कवठा (देवळी तालुका, २०°–४५′ उ., ७८°–५५′ पू., लो. सं. २,०५२) देवळीच्या वायव्येस १५ कि.मी. वरील हे गाव भुसावळ-नागपूर रेल्वे मार्गावरील स्थानक असून तेथे कवठाची झाडे मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे त्यास हे नाव पडले आहे. इ. स. १८६२ मध्ये वर्धा जिल्हा अस्तित्वात आल्यानंतर येथे १८६२ ते १८६६ पर्यंत जिल्हा मुख्यालय होते. या गावी प्रेक्षणीय वास्तू नाही.

[३] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९०६, पृ. २३४.

कापसी

कापसी (हिंगणघाट तालुका, २०°–२५′ उ., ७८°–३५′ पू., लो. सं. ८६०) खेडे वर्ध्याच्या दक्षिणेला ३३.८ कि. मी. अंतरावर वर्धा नदीकाठी आहे. कापसामुळे गावाचे नाव कापसी पडले असा१९०६ च्या **गॅझेटिअर** मध्ये उल्लेख आहे. गावात लक्ष्मीनारायणाचे सुंदर मंदिर असून ते नानाजी महाराज नावाच्या साधूने १८९० मध्ये बांधले. लक्ष्मीनारायणाची मूर्ती काळ्या दगडाची व ९१ सें. मी. उंच आहे. या मंदिरासमोरच नानाजी महाराजांची समाधी आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जत्रा भरते. जत्रेत ३०/४० हजारावर भाविक जमतात.

कारंजा

कारंजा (तालुका मुख्यालय, २१°–१०′ उ., ७८°–२५′ पू., लो. सं. ६,७४५) वर्ध्याच्या उत्तरेस ६४ कि. मी. धाम नदीकाठी टेकडीवर असून चहुबाजूच्या उतारावर पूर्वी उसाचे मळे होते. तेथील करंजीच्या (Pangamia albagra) झाडांमुळे गावाचे नाव कारंजा पडले. हे गाव इ. स. १६०० च्या सुमारास आष्टीचा जहागीरदार नबाब मुहम्मद खान नियाझीने वसविल्याचा दावा केला जातो, पण त्यास पुरावा नाही. कोष्टयांची वस्ती मोठी असून हे गाव पूर्वी हातमागाचे कापड व सतरंज्यासाठी प्रसिद्ध होते. संत्रीच्या बागा व गौळाऊ जातीच्या बैलांच्या पैदासीमुळे गावास अलीकडे प्रसिद्धी मिळाली आहे.

केळझर

केळझर (सेलू तालुका, २०°–५०′ उ., ७८°–४५′ पू., लो. सं. ३,००८) गाव वर्ध्याच्या ईशान्येला वर्धा-नागपूर मार्गावर २८.२५ कि.मी. असून **ऐन-ए-अकबरी** मध्ये (१६०१) त्याचा पवनार सरकारमधील केळझर महालाचे मुख्यालय असा उल्लेख आहे.[४] वास्तविक हे गाव **महाभारत** कालीन चक्रनगर असून तेथे पांडवांनी वास्तव्य केल्याचे पोथी वाङमयातून दिसते. भीमाने तेथील एका राक्षसास ठार केल्याची दंतकथा आहे. केळझरच्या प्राचीन किल्ल्यातील अवशेषांचे स्थानिक व नागपूर विद्यापीठातील अभ्यासकांनी संशोधन केले आहे. त्यातील काही अवशेष फार प्राचीन कालीन असून हिंदू व जैन संस्कृतीचे द्योतक असलेल्या मूर्तींबाबत अभ्यास होत आहे. येथील तळयात विष्णूची अतिशय सुंदर मूर्ती (१.०२ × ०.५१ मी.) मिळाली असून तिच्या हातात शंख, चक्र, गदा व पद्म आहे. केळझर परिसरात महावीराच्या व जैन संस्कृतीच्या द्योतक अशा अनेक भग्न मूर्तीही सापडल्या आहेत. सुमारे ४० वर्षांपूर्वी विष्णूची आकृती असलेल्या सुवर्णमुद्रा किल्ल्यात आढळल्याचे सांगतात. गावात एका गृहस्थाकडील चक्रांकित दगड अशोककालीन असल्याचा दावा केला जातो. एका नागरिकाला बालाजी व नंदीची मूर्ती सापडली असून त्याला मिळालेला अशोकस्तंभ त्याने १९६८–६९ मध्ये नागपूर विद्यापीठाकडे सुपूर्द केला. डॉ. वि. भि. कोलते यांनी येथील अनेक मूर्ती जैनधर्मीय असल्याचा निर्वाळा दिला आहे. किल्ल्याच्या दरवाज्यावरील कोरीव मूर्तींचा अभ्यास होणे आवश्यक आहे. तेथे गणपतीचे हेमाडपंती मंदिर असून प्राचीन काळी बुद्धविहार असल्याचाही दावा केला जातो. केळीच्या पिकावरून नाव पडलेल्या या गावास अशोक काळापासून सांस्कृतिक वारसा असून येथे प्राचीन स्तूपक आहे.

---

[४] इर्फान हबीब, पूर्वोक्त, ३६.

गारपीट

गारपीट (कारंजा तालुका, २१°–००' उ., ७८°–२६' पू., लो. सं. ४८६) हे रम्य वनग्राम वर्ध्यापासून ६४.४० कि.मी. असून त्याच्या परिसरातील दाट जंगलात वन्य पशू आढळतात. येथे उंच ठिकाणी असलेल्या वन विभागाच्या विश्रामगृहातून भोवतालचा हिरव्यागार वनश्रीचा विहंगम देखावा दिसतो. सहलीचे ठिकाण म्हणून विकास होण्यासारखा आहे. तेथे वनशाळा आहे.

गिरड

गिरड (समुद्रपूर तालुका, २०°–३५' उ., ७९°–०५' पू., लो. सं. ३,६९७) वर्ध्याच्या पूर्वेस ५९.२ कि. मी. व हिंगणघाटच्या पूर्वेस ३२ कि. मी. नागपूर जिल्हा सरहद्दीवर आहे. एका आख्यायिकेनुसार दैत्य गिधोबा व मुसलमान अवलिया शेख ख्वाजा फरीदच्या नावावरून गावास हे नाव पडले असावे. उत्तरेत जन्मलेला हा अवलिया सुमारे तीस वर्षे भटकत राहिल्यावर इ. स. १२४४ च्या सुमारास येथे टेकडीवर राहू लागला. टेकडीवर गिधोबा नामक नरभक्षक दैत्याचे वास्तव्य होते. शेख फरीदकडे त्याने खाण्यासाठी मागितले असता फरीदने दिलेली भाकरी खाऊन त्याची भूक शमली. शेख फरीदने त्याची तहान भागविण्यासाठी जमिनीवर काठी मारून टेकडीवर तळे निर्माण केले. त्यातील पाणी पिऊन शांत न होता त्याने उलट शेख फरीदला कुस्तीचे आव्हान दिले. शेख फरीदने त्यास इतक्या जोरात जमिनीवर आदळले की, तो जमिनीत पुरला गेला. त्याचा एक पाय तेवढा वर राहिला. पायाची आकृती दगडी स्तंभाच्या रुपाने आजही दिसते. गावाजवळील तलाव शेख फरीदनेच निर्माण केल्याचे सांगतात. त्यात कासवे आढळतात. गिरडजवळील या टेकडीवर पहाड फरीद नावाचे दुसरे गाव असून तेथे शेख ख्वाजा फरीदची समाधी आहे. दुसऱ्या आख्यायिकेनुसार दोन बंजारा व्यापारी फळे व मसाले घेऊन जात होते. शेख फरीदने त्यांना त्यात काय आहे अशी पृच्छा केली असता त्यांनी अवलियाची चेष्टा करून त्यात दगड आहेत असे उत्तर दिले. शेख फरीदने तुम्ही म्हणालात तसेच घडेल असे म्हणताच त्या मालाचे दगड झाले. व्यापाऱ्यांना पश्चाताप होऊन ते शेख फरीदला शरण गेले. शेख फरीदने त्यांना दगड फेकून देऊन गोण्यात झाडाचा पालापाचोळा भरण्यास सांगितले. या पालापाचोळयाचे सोन्या-चांदीत रूपांतर झाले. या चमत्कारामुळे व्यापाऱ्यांनी सोने-चांदी वाटून टाकले व ते शेख फरीदचे शिष्य बनले. या टेकडीभोवती नारळ व जायफळाच्या आकाराचे दगड आहेत. ते उपरोक्त चमत्काराने झालेले दगड आहेत असे लोक सांगतात. टेकडीवर बंजारा व्यापाऱ्यांच्या दोन कबरी आहेत. नारळ व जायफळाच्या आकाराचे दगड ठिसूळ असून भाविक त्यांचे चूर्ण व्याधिग्रस्त अवयवांना लावतात. यातील सत्यासत्य पडताळण्याइतका पुरावा नाही. तथापि शेख फरीदबाबत आजही विलक्षण श्रद्धा दिसते. टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या तटबंदिस्त विहिरीत शेख फरीद शीर्षासनावस्थेत तपस्या करीत असे अशी आख्यायिका आहे.

शेख फरीदच्या समाधी समोरील तलावाच्या काठावर प्राचीन राम मंदिर आहे. रामनवमीच्या दिवशी तेथे मोठी यात्रा भरते. मोहरमच्या दहा दिवसांच्या उत्सवात फरीद बाबाविषयी भक्तिभाव दिसून येतो. अब्दुल-हमीद लाहोरीलिखित **बादशहा नामा** ग्रंथात गिरड-मांडगाव महालाचा उल्लेख आहे, तर त्याचाच उल्लेख **ऐन-ए-अकबरी** मध्ये मांडगाव-गिरड असा आहे.[५]

---

[५] इर्फान हबीब, पूर्वोक्त, पृ. ३६.

घोराड

घोराड (सेलू तालुका, २०°–५०′ उ., ७८°–४०′ पू., लो. सं. ५,७४५) वर्ध्याच्या उत्तरेस १७.७ कि.मी. बोर नदीकाठी आहे. पूर्वी हे खेडे नागपूरकर भोसल्यांच्या ताब्यात होते. नदीकाठी केजाजी महाराजाचे सुंदर मंदिर असून तेथे नोव्हेंबर (दिवाळीच्या आसपास) व रामनवमीला यात्रा भरतात.

जाम (जांब)

जाम (समुद्रपूर ता., २०°–००′ उ., ७९°–५०′ पू., लो. सं. १,२२१) हिंगणघाटच्या पूर्वेस ११ कि.मी आहे. येथील मोकासदार अठोळे याचेकडे संस्कृत भाषेतील दक्षिणेकडील पेटिकाशीर्षक लिपीतील वाकाटक राजा दुसऱ्या प्रवरसेनाचा ताम्रपट सापडला आहे. त्याची तिथी दुसरे शासनवर्ष, आश्विन शुद्ध द्वितीया असून मुख्य उद्देश द्वितीय प्रवरसेनाने सुप्रतिष्ठाहारातील कोथुरक गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे दान तैत्तिरीय-शाखीय कौंडिण्यगोत्री कोलुट्टक नामक गणयाजी ब्राह्मणास दिले होते. ताम्रपट नागवर्मनने लिहिला आहे. ताम्रपटात प्रवरसेन (प्रथम)–विष्णुवृद्ध गोत्रातील वाकाटक सम्राट; गौतमी-पुत्र वाकाटक नृपती प्रवरसेन (प्रथम) याचा पुत्र; भवनाग-भारशिव राजा, गौतमीपुत्राचा सासरा; रुद्रसेन (प्रथम)-वाकाटक नृपती, गौतमीपुत्राचा पुत्र; पृथ्वीषेण (प्रथम)–वाकाटक नृपती, रुद्रसेन (प्रथम) चा पुत्र; रुद्रसेन (द्वितीय)–वाकाटक नृपती, पृथ्वीषेण (प्रथम) चा पुत्र, प्रभावती गुप्ता–रुद्रसेन (द्वितीय) ची पत्नी, गुप्त राजकन्या; देवगुप्त-गुप्त नृपती चंद्रगुप्त (द्वितीय), प्रभावती गुप्ताचा पिता; प्रवरसेन (द्वितीय)–वाकाटक नृपती, रुद्रसेन (द्वितीय) चा दान देणारा पुत्र; कोलुट्टक-दान स्वीकारणारा कौंडिण्यगोत्री ब्राह्मण, कृष्ण यजुर्वेद तैत्तिरीय शाखा; चक्रदेव–दूतक; नागवर्मन–लेखक या व्यक्तिनामांचा तसेच नंदिवर्धन (नागपूर जिल्ह्यातील नगरधन), कोथुरक–ओळख पटत नाही, वुन्ना (वेणा) नदीवरील हल्लीचे मनगाव असावे, चिंचापल्ली–मनगावच्या दक्षिणेस ८०० मीटरवर चिंचोली, बोथिकवाटक–मनगावच्या वायव्येस ५ कि. मी. वरील बोथाड, मंडुकीग्राम-मनगावच्या उत्तरेस ३ कि.मी. वरील मांडगाव, सुप्रतिष्ठाहार (हिंगणघाट तालुका) या ग्रामनामांचा समावेश आहे. यावरून जामची प्राचीनता किमान सन २५० पासून असल्याचा पुरावा लाभला आहे.[६]

जऊरवाडा

जऊरवाडा (कारंजा तालुका, २१°–५०′ उ., ७८°–१०′ पू., लो. सं. ६८४) जिल्ह्यातील एक आदर्श वनग्राम आर्वीच्या ५७.९४ कि.मी. उत्तरेस आहे. इ. स. १९५८ मध्ये तेथे सर्वोदय केंद्राची स्थापना झाल्यापासून सभोवतालच्या ४४ गावांच्या सर्वांगीण विकासाचा कार्यक्रम सुरू झाला.

ठाणेगाव

ठाणेगाव (कारंजा तालुका, २१°–०५′ उ., ७८°–३५′ पू., लो. सं. २,३०६) जुन्या नागपूर–अमरावती रस्त्यावर आर्वीपासून ४८.३ कि. मी. असून गावात देवीचे पुरातन

[६] देव, डॉ. शां. भा., पूर्वोक्त, पृ. १५६.

मंदिर आहे. मंदिरातील मोठ्या परंतु अस्पष्ट संस्कृत शिलालेखावरून मंदिर १२२३ (शालीवाहन शके ११४५) मध्ये बांधले असावे.[७] हे हेमाडपंती मंदिर सुस्थितीत असले तरी शिल्पकलेच्या दृष्टीने त्यास विशेष महत्त्व नाही.

ढगा

ढगा (कारंजा तालुका, २१°–००′ उ., ७८°–२५′ पू., लो. सं. २४२) हे वनग्राम सातपुड्यातील ढगा डोंगरावर धाम नदीच्या उपनदीकाठी आहे. येथून सुमारे तीन कि. मी. अंतरावर एका गुंफेतील महादेवाची पिंड स्वयंभू असल्याचे स्थानिक लोक मानतात. ढगा भवन म्हणून ज्ञात असलेल्या या ठिकाणी महाशिवरात्रीस मोठी जत्रा भरते. स्थानिक पर्यटनस्थळ म्हणून तेथे लोक जातात.

तळेगाव

तळेगाव (वर्धा तालुका, १६ कि. मी., २०°–०५′ उ., ७८°–१०′ पू., लो. सं. ३,३४३) वर्धा-बल्लारशा रेल्वे मार्गावरील सोनेगाव स्थानकापासून ३ कि. मी. आहे. येथे महादेवाचे व दत्तात्रयाचे मंदिर आहे. महादेवाचे हेमाडपंती मंदिर अतिशय जुने असून मोडकळीस आले आहे. तळेगावला पूर्वी कपडे रंगविण्याचा व्यवसाय चालत असे. येथे जुन्या बांधकामाचे अनेक अवशेष मिळाले आहेत. महाशिवरात्रीला यात्रा भरते.

देऊरवाडा

देऊरवाडा (आर्वी तालुका, २०°–५५′ उ., ७८°–०५′ पू., लो. सं. १,४६६) आर्वीच्या वायव्येस ९.७० कि.मी. वर्धा नदीच्या पूर्व काठावर आहे. देऊरवाडा किंवा देवळवाडा म्हणजे देवळांचे गाव. नदीपलीकडील काठावर अमरावती जिल्ह्यातील इतिहास प्रसिद्ध कौंडिण्यपूर असून, त्यामुळेच या गावास महत्त्व प्राप्त झाले आहे. कौंडिण्यपूरला कार्तिक अमावस्येपासून मार्गशीर्ष शुद्ध दशमीपर्यंत मोठी जत्रा भरते. ही जत्रा कौंडिण्यपूर व देऊरवाडा या दोन्ही गावांच्या परिसरात भरते.

देवळी

देवळी (तालुका मुख्यालय, २०°–३९′ उ., ७८°–२९′ पू., लो. सं. ११,५६६; न. प. १८६७) वर्ध्यापासून १७.७ कि.मी. आहे. गावात जवळजवळ २५ देवळे, एक मशीद, दोन दर्गे व धर्मशाळा आहे. एकोणिसाव्या शतकात देवळी कापसाच्या व्यापारासाठी प्रसिद्ध होते. जिल्ह्यातील सर्वात मोठा गुरांचा बाजार येथे भरतो. पूर्वी येथील खण व सतरंज्या प्रसिद्ध होत्या. गावात राष्ट्रकूटांचा इ. स. ९४० मधील ताम्रपट मिळाला आहे.[८] ताम्रपटाची तिथी शक वर्ष ८३२ (गत वर्ष), वैशाख वद्य ५, शर्वरी संवत्सर असून प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश नंदिवर्धन (नागपूर) जिल्ह्यातील तालपुरूंषक हे खेडे भारद्वाज गोत्री. वैदिक वाजिकाण्वशाखीय ब्राह्मणांना दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे दान राष्ट्रकूट नृपती कृष्ण (तृतीय) ऊर्फ अकालवर्ष याने आपला बंधू जगत्तुंग याच्या नावाने, आपली राजधानी मान्यखेट येथे राहत असताना, उपरोक्त तिथीस दिले. या दानपत्रात राष्ट्रकूटांची

---

[७] देव, पूर्वोक्त, पृ. १८१.

[८] देव, पूर्वोक्त, पृ. १९६-९७.

पूर्ण वंशावळ दिली आहे. ताम्रपट योग्राष्टच याने लिहिला आहे. ताम्रपटात रट्ट, दंतिदुर्ग, कृष्णराज (प्रथम), गोविंदराज (द्वितीय), निरुपम कलिवल्लभ, जगत्तुंग (प्रथम), नृपत्तुंगदेव, कृष्णराज (द्वितीय), जगत्तुंग (द्वितीय), इंद्र (तृतीय), अमोघवर्ष (प्रथम), अमोघवर्ष (द्वितीय), गोविंद (चतुर्थ), कृष्णराज (तृतीय), दंतिग, वप्पुक, राचमल्ल, भूतार्य, राजादित्य, अण्णिग, जगत्तुंग (तृतीय), रिषिअप्प, योग्राष्टच, चेवानन्वेर व भाइल्ल या व्यक्तिनामांचा तसेच तालपुरुंषक, मादार्टढिढर, मोहमग्राम, वध्रीर व नंदिवर्धन या ग्रामनामांचा समावेश आहे.[९]

नाचणगाव

नाचणगाव (देवळी तालुका, २०°–४१′ उ., ७८°–१५′ पू., लो. सं. ९,१०५) वर्ध्याच्या नैऋत्येस ३३.७ कि.मी. व पुलगाव रेल्वे स्थानकाच्या दक्षिणेस ३.२ कि.मी. आहे. येथील गढीचा पेंढाऱ्यांविरुद्धच्या लढाईत चांगला उपयोग झाला होता. गावात चार मंदिरे, मठ, दोन मशिदी व दर्गा आहे. हनुमान जयंती व महाशिवरात्रीनिमित्ताने दोन जत्रा भरतात.

नारायणपूर

नारायणपूर (समुद्रपूर ता., २०°–२५′ उ., ७८°–५५′ पू., लो. सं. ७८०) वर्ध्यापासून सुमारे ४९ कि.मी. असून येथे विठ्ठलाचे जुने हेमाडपंती मंदिर व गोपाळकृष्ण मंदिर आहे.

पवनार

पवनार (वर्धा ता., २०°–४७′ उ., ७८°–४१′ पू., लो. सं. ७,०८७) हे पुरातन गाव वर्ध्याच्या ईशान्येस ९ कि. मी. असून त्यास समृद्ध ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.[१०] पवनार म्हणजेच वाकाटक राजा दुसऱ्या प्रवरसेनची राजधानी प्रवरपूर असे सिद्धांत पुरातत्त्वज्ञांनी अलीकडे मांडलेले आहेत. पूर्वी रूढ असलेल्या समजुतीप्रमाणे पवन नामक रजपूत राजाच्या नावावरून पवनार हे नाव पडले. पवन राजाची या परिसरात अधिसत्ता असावी. या राजाबद्दलच्या आणि त्याने केलेल्या चमत्कारांबद्दल दंतकथा आहेत.[११] **ऐन-ए-अकबरी** मध्ये पवनारचा पनार असा उल्लेख केलेला असून १६०१ मधील वऱ्हाड सुभ्यातील १६ सरकारांमध्ये (उपविभाग) पनार सरकार समाविष्ट असल्याचे म्हटले आहे. पनार सरकारचे मुख्यालय याच गावी असल्याचेही अबुल फझलने नमूद केले आहे.

वर्धा व नागपूर शहरे त्या मानाने अलीकडची आहेत. पवनार मात्र अतिप्राचीन आहे. इ. स. पूर्व १००० पासून तेथे मानव वसाहत असावी असे पुरातत्त्वज्ञांचे मत झाले आहे. नागपूर विद्यापीठाच्या विद्यमाने करण्यात आलेल्या पवनार उत्खननाद्वारे विलक्षण महत्त्वाचे पुरावे उपलब्ध झाले आहेत. वस्तुतः पवनार उत्खनन पूर्ण झालेले नाही. काही अपरिहार्य व विवाद्य बाबी उपस्थित झाल्याने उत्खनन अर्धवट सोडावे लागले. संशोधनाद्वारे प्राप्त

---

[९] कित्ता.

[१०] अधिक माहिती इतिहास आणि संस्कृती या प्रकरणांमध्ये दिलेली आहे.

[११] याबाबतची माहिती **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९७४, पृ. ६४४-४५ वर दिलेली आहे. या माहितीचे आधार साहित्य उपलब्ध नसल्याने तिची येथे द्विरुक्ती करण्यात आलेली नाही.

झालेले पुरावे विपुल आहेत, तथापि आणखी प्राप्त होण्याची शक्यताही विपुल आहे. प्रा. वा. वि. मिराशींच्या मते वाकाटक राजा दुसऱ्या प्रवरसेनाने आपल्या कारकिर्दीच्या अकराव्या वर्षानंतर रामटेकजवळील नगरधन तथा नंदीवर्धन येथून आपली राजधानी प्रवरपूरला स्थलांतरित केली. प्रवरपूर प्रवरसेनने वसविल्यामुळे त्यास हे नाव प्राप्त झाले असे मिराशींनी प्रतिपादले आहे. तथापि पवनार व प्रवरपूर एकच असल्याचा निश्चित पुरावा नाही असे मानणारे संशोधकही आहेत. विद्यमान ग्रंथासाठी प्रवरपूर व पवनार एकच असल्याचे मानण्यात येत आहे.

पवनार उत्खननातील संशोधनानुसार प्रवरपूरची प्राचीनता इ. स. पूर्व अदमासे १००० पर्यंत जाते. उत्खननाचे मूल्यमापन या ग्रंथातील प्रकरण ११–संस्कृति यात केलेले असल्याने त्याची द्विरुक्ती येथे करण्याची आवश्यकता नाही. इतके मात्र म्हणावेच लागेल की, धाम नदीच्या परिसरातील दाट जंगल तोडून मानव वसाहत केली असावी. येथील लोकांची घरे मौर्य-सातवाहनकालीन घरांप्रमाणे होती. रोमन साम्राज्याशी पवनारचे व्यापारी संबंध असावेत. येथे सापडलेल्या काही अवशेषांनुसार असे म्हणता येईल की, वाकाटककाळात येथे समृद्धी होती.

दुसऱ्या प्रवरसेनाची आई प्रभावती गुप्ता विष्णुभक्त असल्यानें तिच्या आज्ञेवरून त्याने रामाचे[१२] सुंदर मंदिर बांधले. राममंदिराचे काही अवशेष धाम नदीकाठी मिळाले आहेत. **रामायणा**तील काही प्रसंगांचे कोरीव कामही त्यात आढळले. येथे सापडलेल्या अवशेषांमध्ये विष्णूची मूर्ती, भरत-राम भेटीचे दृश्य, रामाला सोडून सुमंत रथ परत नेत असल्याची शिल्पाकृती, मकरावर उभ्या असलेल्या गंगा भगवतीची मूर्ती, धेनुकासूरवध मूर्ती[१३] व कंसवध मूर्ती विशेषतापूर्ण आहेत. गंगेची मूर्ती फ्रेंच शिल्पाकृतींची बरोबरी करू शकेल. गंगा भगवतीच्या मूर्तीवर ब्राह्मी लिपीत "गंगा भगवती" ही अक्षरे कोरली आहेत. भरतभेटीचे शिल्प २ मी. उंच व १.५ मी. रुंद असून विनोबाजींच्या आश्रमात भरतभेट मंदिरात ठेवले आहे. धेनुकासुरवध मूर्तीशिल्पास मिराशींनी वालिवध मूर्ती म्हटले असून जामखेडकरांनी ते धेनुकासुरवध मूर्तीशिल्प असल्याचे सप्रमाण सिद्ध केले आहे. मिराशींनीही ते मान्य केले आहे.[१४] धेनुकासुरवध व कंसवध या दोन स्वतंत्र मूर्ती आहेत. शिल्पपटात बलराम प्त्यालीढ पवित्र्यात मांडीवर हात ठेवून उभा आहे. त्याच्या उजव्या हातात पाठीमागचे पाय धरलेले गाढव आहे. ताडवृक्षावर असलेले गाढव धेनुकासुर असून बलरामाच्या पाठीमागे कृष्ण व सुदामा असावेत. कंसवध मूर्तीही उठावदार आहे. ढवळीकरांच्या मते ती अंधकासुरवध (महादेव अंधकासुराचा वध करीत असलेली) मूर्ती असावी.[१५] तर मिराशींच्या मते ती राम-रावण युद्धाची मूर्ती असावी. परंतु जामखेडकर व देगलुरकरांनी

---

[१२] जामखेडकर व देगलुरकर यांच्या मते ते कृष्ण मंदिर असावे ("पवनार येथील शिल्पपटाचा पुनर्विचार", **युगवाणी**, एप्रिल–मे, १९७४, नागपूर, पृ. २४–२९).

[१३] मिराशींच्या मते ही मूर्ती वालिवध मूर्ती असावी (**प्रा. पोतदार सन्मान ग्रंथ**, १९५०, पृ. १–७).

[१४] जामखेडकर, "पवनार येथील तथाकथित वालिवध मूर्ती प्रतिमा क्र. ३," **विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक १९७४**, पृ. १४५–५५.

[१५] ढवळीकर, "पवनार येथील अंधकासुरवध मूर्ती", **विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक १९६९**, नागपूर, पृ. २.

ती कंसवध मूर्तीच असल्याचे सिद्ध केले आहे.[१६] कुवलयापीड (कंसाचा पिसाळलेला हत्ती) आणि चाणूर-मुष्टिकाचा पाडाव झाल्यानंतर कंसाचा वध करण्यासाठी कृष्ण त्याला खाली ओढण्यासाठी झेपावत असल्याचा प्रसंग शिल्पाचा विषय आहे.[१७] पवनारला सापडलेल्या नागेश व गणेश मूर्तीही सुबक व सुंदर आहेत.

ऐन-इ-अकबरीमध्ये पवनारच्या किल्ल्याचे वर्णन असून गडाच्या तीन बाजू दोन नद्यांनी वेढलेल्या असल्याची त्यात माहिती दिलेली आहे. हा गड भक्कम असल्याचेही त्यात लिहिलेले आहे. आजही गडाचे मोठे बुरुज, तटबंदी व भव्य प्रवेशद्वाराचे अवशेष आढळतात. पवनारची मशीद केव्हा बांधली तो निश्चित काळ ज्ञात नाही. तथापि मशिदीच्या दगडांवरील कोरीव कामावरून पुरातत्त्वज्ञांचे मत झाले आहे की, हे दगड इ. स. ३०० ते ८०० च्या दरम्यान कोरलेले असावेत.[१८] ही मशीद मुसलमान राजवटीचे अवशेष दर्शविते. मुसलमान शिल्पपद्धतीवर हिंदू पद्धतीचा प्रभाव दिसतो, ही या मशिदीची विशेषता मानता येईल.

धाम नदीच्या दुसऱ्या काठावर बरीच प्राचीन शिवलिंगे आहेत. जवळच वर्ध्याच्या कैलास महाराज नामक व्यक्तीने महादेव मंदिर बांधले आहे. मंदिरातील विशेषता म्हणजे मुख्य पिंडीव्यतिरिक्त अकरा पिंडी असून त्यावरून बारा ज्योतिर्लिंग एकत्र आणल्याचे सूचित केले आहे. नदीच्या पात्रात पंचधारेनजीक शिवलिंगाच्या प्रतिकृती कोरलेल्या आहेत. लोक त्यांची भक्तिभावे पूजा करतात. त्यांच्या निर्मितीबाबतचा कालखंड अनिश्चित असून काहींच्या मते त्या अलीकडील आहेत.

पवनारचा प्राचीन सांस्कृतिक वारसा समृद्ध खरा, परंतु संपूर्ण भारतीय जनतेचे आणि विशेषत: गांधीवादी जनतेचे श्रद्धास्थान बनले पवनारचा परमधाम आश्रम. आचार्य विनोबांनी १९३७ मध्ये स्थापन केलेला हा आश्रम ही भारतातील एक नमुनेदार संस्था होय. पवनारला येण्यापूर्वी विनोबाजींचे २५ डिसेंबर १९३२ पासून नालवाडीत वास्तव्य होते. तथापि तेथे त्यांचे स्वास्थ चांगले राहत नसे, म्हणून ते १९३७ मध्ये पवनारला जमनालालजींच्या लाल बंगला नामक निवासात राहण्यास गेले. विनोबाजींनी तेथे व्यापक पायावर आश्रम उभारला. याच आश्रमातून १९४१ च्या व्यक्तिगत सत्याग्रहात भाग घेण्यासाठी विनोबांनी प्रयाण केले होते. छोडो भारत आंदोलनात विनोबा व इतर आश्रमवासियांना अटक करण्यात आली, तथापि आश्रमाचे कार्य अंशत: चालूच होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आश्रम पुन्हा ऊर्जितावस्थेत आला. तेथूनच विनोबांनी भूदान व ग्रामदानाची भारतीयांना प्रेरणा दिली. महिलांना अध्यात्मिक साधना करणे सुलभ होण्यासाठी त्यांनी १३ मार्च १९५९ रोजी ब्रह्मविद्या मंदिराची स्थापना केली. या संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन करण्याचे येथे प्रयोजन नाही. इतके मात्र म्हटले पाहिजे की, संस्थेची ख्याती देशभर पसरली. पूज्य विनोबांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या व त्यांच्या कार्याचे दर्शन घडविणाऱ्या परमधाम आश्रमाकडे हजारो देशी व विदेशी पर्यटक आकृष्ट होतात. हजारोंचे हे श्रद्धास्थान आहे तर लाखोंनी त्यातून प्रेरणा घेतली आहे.

---

[१६] जामखेडकर, व देगलुरकर, "पवनार येथील शिल्पपटाचा पुनर्विचार, **युगवाणी, एप्रिल–मे १९७४,** नागपूर, पृ. २४–२९.

[१७] अधिक माहितीस्तव प्रकरण ११–संस्कृति पहावे.

[१८] देव व ढवळीकर, पूर्वोक्त, पृ. २.

परमधाम आश्रमासमोर नदी पात्रात गांधीजींच्या अस्थींचे विसर्जन करण्यात आले (फेब्रुवारी १९४८ चा पहिला आठवडा). राष्ट्रपित्याचे स्मरणार्थ तेथे महात्मा गांधी स्तंभ व भव्य छत्री उभारण्यात आली. या स्मारक छत्रीच्या मुख्य स्तंभावर महात्माजींची काही वचने संगमरवरी दगडात कोरली आहेत. हजारो जनसामान्य व गांधीवादी तेथे जाऊन भक्तिभावाने अभिवादन करतात. परमधाम हे प्रेक्षणीय स्थळ नसून प्रेरणास्थळ आहे, साधनास्थळ आहे. आश्रमातील निवाऱ्याचे वर्णन वास्तुशिल्पाच्या दृष्टिकोनातून करता येणार नाही. कारण तेथील शिल्प वास्तूचे नसून प्रेरणेचे आहे, साधनेचे आहे.

पार्डी

पार्डी (हिंगणघाट ता. २०°–३०′ उ., ७८°–५५′ पू., लो. सं. ७१०) वेणा नदीच्या काठी वर्ध्याच्या पूर्वेस २७.३७ कि. मी. आहे. गावातील मुरलीधराच्या पुरातन मंदिराजवळ गोकुळाष्टमीपासून पाच दिवस मोठी जत्रा भरते. ही जत्रा संत नगाजी महाराजाच्या स्मृतिप्रीत्यर्थ भरते.[१९]

पुलगाव

पुलगाव (देवळी तालुका, २०°–४४′ उ., ७८°–१०′ पू., लो. सं. ३१, ३५८; न. पा. १९०२) शहर वर्धा नदीच्या काठी वर्ध्यापासून ३०.५८ कि. मी. नैऋत्येस आहे. पूर्वी गावाचे नाव गुंजखेडा होते. रेल्वे पूल बांधताना मजुरांची वस्ती झाल्याने गावास पुलगाव नाव पडले. मुंबई-नागपूर व पुलगाव-आर्वी रेल्वे मार्गावरील जंक्शन असून तेथे कापड गिरणी आहे. गावात मदनमोहन, बुद्ध, बालाजी, मारुती व विठ्ठलाची मंदिरे आहेत. बालाजीचे मंदिर जुने आहे. बुद्ध मंदिरातील बुद्धाची ब्रॉन्झची मूर्ती थायलंडमधून आणली आहे. मदनमोहन मंदिर सुमारे ७५ वर्षापूर्वी बांधले आहे.

पोहणा

पोहणा (हिंगणघाट तालुका, २०°–२०′ उ., ७८°–४०′ पू., लो. सं., २,३४८) वर्धा नदीकाठी वर्ध्याच्या दक्षिणेला ५० कि. मी. आहे. पवनारचा राजा पवन याच्या नावावरून गावाचे नाव पडले अशी समजूत होती.[२०] याच पवन राजावरून पवनारचे नाव पडले होते अशीही समजूत होती, परंतु पवनारला झालेल्या उत्खननावरून पवनारला वाकाटक राजा दुसऱ्या प्रवरसेनची राजधानी होती व प्रवरसेनामुळेच पवनार नाव पडल्याचे आता मानले जाते. पवनार, पौनी व पोहणा या स्थळांमध्ये थोडे साम्य आहे. पौनी वैनगंगेच्या, पवनार धामच्या व पोहणा वर्धा नदीकाठी आहे. तिन्ही ठिकाणी गढ्या असून त्यांत दगडी बांधणीच्या सारख्या विहिरी आहेत. तिन्ही ठिकाणी महादेव मंदिरे आहेत. त्यावरून पोहणा गाव प्रवरसेन (प्रथम) चा नातू व रुद्रसेनाचा पुत्र पृथ्वीषेण याने वसविले असावे असे मत स्थानिक अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. येथे रूद्रेश्वराचे पुरातन मंदिर आहे. गाभाऱ्यातील पिंड फार मोठी आहे. आपल्या पित्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ पृथ्वीषेण याने हे मंदिर बांधले असावे असा अंदाज आहे. महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते.

---

[१९] अधिक माहितीसाठी या ग्रंथातील प्रकरण ११–संस्कृति पहावे.

[२०] **वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९०६, पृ. २५३.

पोहण्यातील चिरेबंदी व घडीव दगडांवरून प्राचीन काळी हे गाव प्रसिद्ध असावे. पोहण्यास एक बुद्ध मूर्ती व एक ब्रह्मदेवाची चौमुखी मूर्ती सापडली आहे. काहींच्या मते ही मूर्ती ब्रह्मदेवाची नसून शंकराची असावी. परंतु मूर्ती चौमुखी असल्याने व कपाळावरील गंध उभे असल्याने ती ब्रह्मदेवाचीच असावी असे म्हणण्यास वाव आहे. बुद्धाच्या मूर्तीबद्दल वाद असून काहींच्या मते ती महावीराची असावी. परंतु ही मूर्ती विवस्त्र नसून तिला लंगोटी आहे, त्यावरून ती बुद्धाची असावी असे वाटते.[२१] दुसऱ्या शतकात नागार्जुन बौद्ध पंडिताने बौद्ध धर्माचा सर्वत्र प्रसार केला. तो मूळचा विदर्भातील होता व त्याची गुहा रामटेकला आहे.

बोरी (बोरधरण)

बोरी (सेलू ता., २०°–५५′ उ., ७८°–४०′ पू., लो. सं. १,११६) गाव वर्ध्याच्या ईशान्येस ३२.२७ कि. मी. आहे. नजीकच बोर नदीवर मातीचे धरण बांधण्यात आले आहे. धरणाच्या परिसरात सुंदर बाग व अभयारण्य निर्मून पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यात आले आहे. वनराजींनी नटलेल्या टेकड्यांचा हा परिसर विलोभनीय बनलेला आहे.

भिडी

भिडी (देवळी ता., २०°–३०′ उ., ७८°–२०′ पू., लो. सं. २,७२९) गाव वर्ध्याच्या नैऋत्येस २८.९७ कि. मी. आहे. येथे हेमाडपंती पद्धतीचे कोरीव दगडांचे महादेव मंदिर आहे. मंदिराचा कथित जनक गोपाळकृष्णाचे त्यास नाव प्राप्त झाले. या महादेव मंदिरात कृष्ण जन्माष्टमीचाही उत्सव भरतो.

मनेरी

मनेरी (आर्वी ता., २१°–०५′ उ., ७८°–५५′ पू., लो. सं. ६३१) गाव आर्वीच्या उत्तरेस ४ कि. मी. आहे. त्याला वर्धमनेरी असेही म्हणतात. या गावास अलीकडे प्रसिद्धी मिळाली ती संत भानुदास व सेवाभावी संस्थांमुळे. अंध विद्यामंदिर, सद्‌गुरु विद्यामंदिर, मागासवर्गीय वसतिगृह, अपंग धर्मशाळा, मूकबधिर विद्यालय, धर्मार्थ दवाखाना व श्रीकृष्ण ग्रंथालय या त्या संस्था होत. येथे रामनवमीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो.

मांडगाव

मांडगाव (समुद्रपूर ता., २०°–३५′ उ., ७८°–५०′ पू., लो. सं. ३,५७२) वर्ध्याच्या नैऋत्येला ३०.५८ कि. मी. वेणा, वर्धा आणि यशोदा नद्यांच्या संगमावर आहे. मांडो नामक संतपुरुषाच्या वास्तव्यावरून गावास त्याचे नाव देण्यात आल्याचा दावा करण्यात येतो. तेथे मुरलीधर मंदिर, मुसलमान अवलियाची कबर व ब्रह्मपुरे नामक संतपुरुषाचे स्मारक आहे. गावात आषाढी एकादशी, कृष्ण जन्माष्टमी व रामनवमीला उत्सव भरतात.

---

[२१] सोटे, प्रा. दे. गं., यांच्याकडून प्राप्त माहिती.

रोहणा

रोहणा (आर्वी ता., २०°–५०′ उ., ७८°–२०′ पू., लो. सं. ३,४०२) गाव आर्वी–पुलगाव रेल्वे मार्गावर वर्ध्याच्या वायव्येस ३७ कि. मी. आहे. सभोवतालच्या रोहण वृक्षांमुळे गावाला हे नाव पडले असावे. कृष्णाजी शिंदेने अठराव्या शतकात बांधलेल्या किल्ल्याचे अवशेष गावात आढळतात. शिंदे तेथील स्थानिक अधिकारी असल्याचे म्हणतात.

रोहणी

रोहणी (देवळी ता., २०°–३०′ उ., ७८°–२०′ पू., लो. सं. १,३७०) गाव वर्ध्याच्या नैऋत्येस ४० कि. मी. वर्धा नदीकाठी आहे. या गावासही रोहण वृक्षामुळे हे नाव पडले असावे. हे गाव जुन्या हेमाडपंती कोटेश्वर महादेव मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. एका दंतकथेनुसार महर्षी वसिष्ठांचे येथे वास्तव्य होते व त्यांनी हे मंदिर बांधले आहे. तथापि त्यास सत्या-सत्यतेचा पुरावा नाही. येथे वर्धा नदी उत्तरवाहिनी झालेली आहे. या स्थानास कोटेश्वर किंवा भस्मागिरी असेही म्हणतात.

वडनेर

वडनेर (हिंगणघाट ता., २०°–२५′ उ., ७८°–४०′ पू., लो. स. ४,१२७) हिंगणघाट-पासून १६ कि. मी. आहे. देशमुख घराण्याच्या ताब्यातील या गावाचे कर्जापोटी एका सावकाराकडे हस्तांतरण झाले होते. श्रीकृष्णाचे मंदिर असून आषाढी पौर्णिमेला तेथे जत्रा भरते.

वर्धा

वर्धा (जिल्हा मुख्यालय, २०°–४५′ उ., ७८°–८७′ पू., लो. सं. ८८,४९५, न. पा. १८७४) शहर मुंबई-नागपूर व दिल्ली-मद्रास रेल्वे मार्गावरील महत्त्वाचे जंक्शन आहे. इ. स. १८६६ मध्ये येथे कवठचाहून जिल्हा मुख्यालय हलविण्यात आले. त्यापूर्वी गावास पालकवाडी म्हणत. भाजी पिकविणारी वाडी ती पालकवाडी. वर्धा नदीमुळे गावास हे नाव देण्यात आले. फक्त भूगोलात स्थान असलेल्या या नगरास ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले जमनालाल बजाज व महात्मा गांधींमुळे. गांधीजींनी वर्धा व नंतर सेवाग्रामला वास्तव्य केल्यामुळे वर्ध्यास राजकीय महत्त्व प्राप्त झाले.[२२] महात्मा गांधी, विनोबा भावे व जमनालाल बजाज यांच्यामुळे अनेक संस्था उदयास आल्या.

पारंपरिक अर्थाने वर्धा हे पर्यटनस्थळ नव्हे. तथापि तेथे हजारो देशी व परदेशी पर्यटक जातात ते तेथील गांधीवादी संस्था पाहण्यासाठी. परदेशी अभ्यासकही मोठ्या संख्येने येतात. गांधीवाद, राज्यशास्त्र व स्वातंत्र्य आंदोलन इतिहासाचे अभ्यासक अधिक असतात. येथील मगन संग्रहालय हे सुद्धा एक आकर्षण आहे. मगन संग्रहालयात हस्तकला, कुटिरोद्योग व खादीविषयक उपकरणे व उत्पादनांचे प्रदर्शन केलेले आहे. वर्धा नगरातील प्रेक्षणीय वास्तू म्हणजे लक्ष्मीनारायण मंदिर व गीताई मंदिर.

लक्ष्मीनारायण मंदिर : जमनालाल बजाज यांच्या आजोबांनी हे मंदिर १९०५ मध्ये बांधले. मंदिर अतिशय भव्य असून त्याच्या आतील बाजूस संगमरवरी दगडाची फरशी

---

[२२] अधिक माहितीस्तव प्रकरण २–इतिहास पहावे.

आहे. लक्ष्मीनारायणाच्या मूर्ती सुंदर आहेत. मंदिराला केवळ धार्मिक महत्त्व नसून धर्मसुधारणा व अस्पृश्योद्धार या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले आहे. जमनालालजींनी १९ जुलै १९२८ रोजी मंदिर हरिजनांना खुले केले. गांधीवादी सामाजिक क्रांतिपर्वातील ही वाटचाल होती. भारतात कोठेही घडले नव्हते ते येथे घडले. गांधीजींना अभिप्रेत अशी समाजसुधारणा करण्याचे धैर्य दाखविले जमनालालजींनी. हरिजनांना प्रवेश देणारे भारतातील हे पहिलेच मंदिर होय. याबाबतीत देशविदेशातून चांगल्या प्रतिक्रिया प्रकट झाल्या. या महत्त्वपूर्ण घटनेबाबत गांधीजींचे खालील मनोगत मननीय वाटतात.

"श्रीलक्ष्मीनारायण मंदिरासारखे सुप्रसिद्ध मंदिर अस्पृश्यांना जाहीरपणे खुले करण्यात येत असता सनातन्यांनी विरोधाचा ब्रही काढू नये, हे खरोखर आश्चर्यकारक आहे. आजपर्यंत अत्यंत पवित्र व इतरांना मनाई असलेल्या हिंदू मंदिराचा ऊंबरठा ओलांडण्यास अस्पृश्य लोक पुढे येत आहेत, हे पाहूनही सनातनधर्माच्या नावाखाली धर्ममार्तंडांनी गोंधळ माजविला नाही, हे खरोखरच महत्त्वपूर्ण आहे. अस्पृश्यतेविरुद्ध चालू असलेल्या चळवळीची किती आश्चर्यकारक प्रमाणात प्रगती झाली आहे याचे हे स्पष्ट निदर्शक आहे. सुधारणेच्या खऱ्या चळवळीसाठी दृढनिष्ठा व चिकाटी यांच्याद्वारे कणखर लोकमत कसे बनविता येते, तेही यावरून दिसून येईल. शेठ जमनालाल बजाज व त्यांचे सहकारी विश्वस्त यांनी हा जो धाडसी उपक्रम केला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि सबंध हिंदुस्थानभर त्यांचे अनुकरण केले जाईल अशी मी आशा बाळगतो."

मंदिराच्या बाजूला एक धर्मार्थ औषधालय चालविले जाते. मंदिराला ग्रंथालय असून त्यात संस्कृत, प्राकृत व हिंदी भाषेतील **वेद, उपनिषदे, भागवत**, इत्यादी ग्रंथांचा संग्रह आहे. वर्धा रेल्वे स्थानकाजवळ मंदिराच्या मालकीची सेठ बच्छराज धर्मशाळा आहे.

गीताई मंदिर : या मंदिराची उभारणी एक प्रार्थनास्थळ म्हणून करण्यात आलेली नसून गांधीजींचा सत्य, अहिंसा व करुणेचा संदेश वास्तुरूपाने चिरंतन करण्यासाठी केलेली आहे. एका अर्थाने गांधीजी, आचार्य विनोबाजी व जमनालालजींचे हे स्मारक आहे, तर दुसऱ्या अर्थाने **भगवद्‌गीता** धर्मग्रंथात कथन केलेल्या कर्मयोग व सांख्ययोगाचे हे दृश्यस्वरूप आहे. भारताच्या विविध भागांतून दगडाचे चिरे आणून बसविण्यात मोठे औचित्य आहे. दगडांमधील विविधता भारतीय जीवनाची विविधता दर्शविते. विविध रंग चित्रमय भारताचे रूप दर्शवितात. या विविधतेत एकता दाखविण्याचा प्रयत्न आहे. गांधीवादी विचारसरणी व सर्वोदय तत्त्वप्रणालीचा पुरस्कार करण्याचा त्यामागे मनोदय आहे. मंदिरे छतांनी बंदिस्त असतात. तथापि बंदिस्तपणा विरहित असे हे मंदिर आहे. आकाश हेच छत व अवकाश हीच त्याची मर्यादा, हा विचार त्यामागे आहे. जीवनदृष्टी संकुचित असू नये ही त्यामागची धारणा आहे. भारतीय जीवनात महत्त्व असलेली गाय व दारिद्र्यनिर्मूलनाचे एक साधन असलेला चरखा प्रतिक म्हणून दाखविले आहेत.

अशा तऱ्हेचे मंदिर बांधून महात्मा गांधी, जमनालाल बजाज आणि आचार्य विनोबा भावे यांचे स्मारक उभारण्याची कल्पना प्रथमतः कमलनयन बजाज यांनी मांडली. या स्मारकापासून भारतीय समाजाने या तीन नेत्यांचा जीवनक्रम व त्यांच्या शिकवणुकीचा आदर्श घ्यावा व ते नयनरम्यही असावे अशी त्यांची इच्छा होती. म्हणूनच त्यांनी येथे **गीताई** मंदिर बांधले. **गीताई** म्हणजे **भगवद्‌गीतेचे** आचार्य विनोबा भावे यांनी केलेले

मराठी रूपांतर. मंदिराची पायाभरणी सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान यांच्या हस्ते ४ नोव्हेंबर १९६९ रोजी झाली. मंदिराचा भूमिपूजन समारंभ जमनालाल बजाज यांच्या ७५ व्या जन्मदिनी (४ नोव्हेंबर १९६४) विनोबाजींच्या हस्ते झाला. प्रथमतः मंदिराची प्रतिकृती तयार करण्यात आली व त्यानंतर मंदिराच्या प्रत्यक्ष बांधकामाला १ मे १९७७ रोजी प्रारंभ झाला. मंदिराचे उद्‌घाटन भारताचे तत्कालीन उपराष्ट्रपती एम. हिदायतुल्ला यांनी ७ ऑक्टोबर १९८० रोजी केले. हा दिवस उद्‌घाटनाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा मानला पाहिजे, कारण ५० वर्षापूर्वी याच दिवशी विनोबांनी **गीताई** लेखनाला सुरुवात केली होती.

मंदिराच्या महादरवाज्याची रचना पवित्र ठावणीप्रमाणे केली आहे. हिंदू धर्मग्रंथ हे ठावणीच्या आधाराने वाचले जात असल्याकारणाने हा दरवाजा ठावणीच्या आकाराचा केला. जरी हा दरवाजा सिमेंट काँक्रीटमध्ये बांधला आहे तरी तो लाकडात बांधल्याचा भास होतो. दरवाजाचे सिमेंट बसविताना त्यामध्ये देवदाराचे लाकूड वापरून हा दरवाजा लाकडी असल्याचा आभास निर्माण केला आहे. या महादरवाजाची रुंदी ३.६६ मी. असून त्यावर **महाभारता**तील अर्जुनाच्या रथाच्या चाकाची प्रतिकृती कोरलेली आहे. प्रत्येक चाकाला आठ आरे आहेत. दरवाजातून आत गेल्यावर एक भव्य स्तंभ लागतो. स्तंभावर स्वस्तिक कोरलेले असून त्याचा चौथरा उत्तर प्रदेशातील चुनार येथून आणलेल्या गुलाबी रंगाच्या दगडाचा आहे. स्तंभ चौकोनी असून तो बंगळुरनजीकच्या कुप्पम येथून आणलेल्या गुळगुळीत दगडाचा आहे. गुलाबी दगडात कोरलेले स्वस्तिक काळ्या स्तंभावर बसविलेले आहे. विनोबांची **गीताई** बद्दलची भावना दर्शविणारा श्लोक त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षरात या स्तंभावर कोरला आहे. तो श्लोक असा—

गीताई माऊली माझी तिचा मी बाळ नेणता ।

पडता रडता घेई उचलोनी कडेवरी ।

त्याचप्रमाणे विनोबांचा सत्य, प्रेम आणि करुणेचा संदेश याच स्तंभावर कोरण्यात आला आहे.

सुमारे पंचवीस पायऱ्या उतरल्यानंतर २.१३ मी. उंच व ४.८८ मी. लांब भुयार लागते. भुयाराला कमान असून आत कमलनयन बजाज यांच्या अंतिम इच्छेप्रमाणे त्यांच्या रक्षेचा कलश ठेवलेला आहे. तेथून तेवीस पायऱ्या चढून गेल्यानंतर गीताई मंदिरात प्रवेश होतो. नजीकच खान अब्दुल गफारखान यांनी बसविलेला मंदिराच्या कोनशिलेचा दगड आहे.

गीताई मंदिराची कल्पना व त्याचा आकार नाविन्यपूर्ण आहे. संपूर्ण मंदिराचा आकार सर्व गांधीवाद्यांना पवित्र असलेला चरखा व जमनालाल बजाज यांना प्रिय असलेली गोमाता यांच्या प्रतिकात्मक आहे. अशा तऱ्हेने हे मंदिर म्हणजे महात्मा गांधी व जमनालाल बजाज यांच्या स्मारकाची निशाणीच होय. प्रचंड दगडांची एका ओळीत केलेली गुंफण मंदिराची परिसीमा बनविते. मंदिराचा ईशान्येकडील भाग चरख्याच्या आकारासारखा आहे. तर पूर्वेकडील भाग गायीच्या पाठीच्या आकारासारखा आहे. दक्षिणेकडील बाजूस गायीची शेपटी व मागील पाय तर नैऋत्य बाजूस गायीची कास व पुढील पाय दिसतो. **पश्चिमेस गोमुख दिसते.**

श्रीमद्भगवद्गीते मध्ये सात अधिकरण व अठरा अध्यायांत ७०० श्लोक आहेत. **गीताई** हे **भगवद्गीतेचे** रूपांतर असल्याकारणाने त्यामध्येसुद्धा सात अधिकरण व १८ अध्याय आणि ७०० श्लोक आहेत. **गीताई** मधील प्रत्येक श्लोक स्वतंत्र दगडावर कोरण्यात आला आहे. त्यामुळे श्लोक कोरलेले सातशे दगड आहेत. याशिवाय अध्याय क्रमांक देण्यासाठी अठरा व अधिकरण देण्यासाठी सात, अनुक्रमणिकेकरिता दोन, **गीताई** नावाकरिता एक असे स्वतंत्र दगड वापरलेले आहेत. शिवाय अधिकरणाच्या मालेचे व अध्याय मालेच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी एक व हलत्या दरवाजाकडील दोन दगड उभारले आहेत. बिजागरीवर आधारित फिरता दरवाजा वयस्कर व्यक्तींना सुलभतेने मंदिरात प्रवेश करता यावा म्हणून वापरला आहे. एकूण ७३२ दगडांच्या ओळीने मंदिराची परिसीमा बनलेली आहे. प्रत्येक दगडाची उंची २.७४ मी., रुंदी ०.६१ मी. व जाडी ०.३१ मी. असून वजन चौदा ते पंधरा क्विंटल आहे. प्रत्येक दगडाचा पृष्ठभाग यंत्राच्या सहाय्याने व रासायनिक प्रक्रियेने गुळगुळीत केला आहे. त्यामुळे प्रेक्षकास त्यात आपले प्रतिबिंब दिसू शकते. दगड प्रबलित काँक्रीटमध्ये बसविले आहेत. दोन दगडामध्ये ८ सें. मी. अंतर आहे. दगडावर श्लोक कोरण्यासाठी प्रथम धातूच्या पत्र्यावर कोरीव काम करण्यात आले व त्यानंतर घासलेल्या गुळगुळीत दगडांवर त्या आधारे कलाकारांनी कोरीव काम केले. कोरलेले श्लोक इतके स्पष्ट आहेत की दहा फूट अंतरावरून सुद्धा वाचता येतात. वाचणे सोपे व्हावे म्हणून कोरीव अक्षरे काही ठिकाणी रंगविलेली आहेत. एकच अधिकरणातील श्लोका-करिता असलेले दगड समपातळीवर ठेवले आहेत. या सर्व दगडांच्यामध्ये रंगीत दगडां-द्वारे फरसबंदी करण्यात आली असून त्यावर निसर्गचित्रे कोरली आहेत. दोन दगडां-मधील जागेत हरळीचे गवत लावण्यात आले आहे. या मंदिराकरिता वापरलेले दगड इराई धरण (चंद्रपूरमधील ताडोबाजवळ), सावनेर (नागपूर), येळाकेळी (वर्धा), जोतिबा (कोल्हापूर), बंगळुर तसेच तामिळनाडू, उत्तर प्रदेश व राजस्थानमधून आणले आहेत.

अठरा अध्यायांत दिलेल्या गीतेमधील श्लोकांचे वर्णन पुढे दिले आहे.

अध्याय पहिला—या अध्यायातील श्लोक काळ्या लाल झाक असलेल्या वज्रतुंड (ग्रॅनाइट) दगडात कोरलेले आहेत. सर्व दगड हे एकाच दर्जाचे आहेत. हा भाग गायीच्या शिंगाचा आभास निर्माण करतो.

अध्याय दुसरा—यातील श्लोक लाल रंगाच्या वज्रतुंड दगडात कोरलेले असून ते बंगळुर परिसरातून आणले आहेत. या अध्यायाच्या काही भागाला गायीच्या शिंगाचा आकार दिलेला आहे, तर ६८ व्या श्लोकापासून चौथ्या अध्यायापर्यंत चरख्याचा आभास होतो.

अध्याय तिसरा—बंगळुर परिसरातून आणलेला करड्या रंगाचा वज्रतुंड दगड या अध्यायाकरिता वापरला आहे.

अध्याय चौथा—यामधील श्लोक तपकिरी रंगाच्या तामीळनाडूत मिळालेल्या वज्रतुंड दगडात कोरलेले आहेत.

अध्याय पाचवा—या अध्यायाकरिता उत्तर प्रदेशात चुनार येथे मिळणारा गुलाबी रंगाचा वालुकामय दगड वापरण्यात आला आहे. या अध्यायापासून चरख्याच्या दुसऱ्या भागाला सुरुवात होते.

अध्याय सहावा—कुप्पम येथून आणलेल्या पांढऱ्या दगडावर काळे ठिपके असलेल्या वज्रतुंड दगडाचा उपयोग या अध्यायासाठी केला आहे.

अध्याय सातवा—या अध्यायातील श्लोकांचे कोरीव काम कुप्पमच्या गुलाबी वज्रतुंड दगडावर केले आहे. या अध्यायापासून दहाव्या अध्यायापर्यंत गायीच्या पाठीचा भास होतो.

अध्याय आठवा—या अध्यायाकरिता कुप्पम येथे मिळणारा काळ्या रंगाचा वज्रतुंड दगड वापरण्यात आला आहे.

अध्याय नववा—या अध्यायातील शिलालेखासाठी कुडप्पम येथील गडद करड्या रंगाचा वज्रतुंड दगड वापरण्यात आला आहे. सूर्यप्रकाशात वाचणे सोयीचे व्हावे म्हणून या कोरीव अक्षरांवर अल्युमिनियमचे पाणी दिले आहे.

अध्याय दहावा—या अध्यायातील श्लोक गुलाबी रंगाच्या वज्रतुंड दगडात कोरलेले आहेत.

अध्याय अकरावा—गंदीपेठ येथून आणलेल्या करड्या रंगाचा वज्रतुंड दगड या अध्यायाकरिता वापरण्यात आला आहे. या भागाला गायीच्या शेपटीचा आकार दिला आहे.

अध्याय बारावा—राजस्थानमधील करोळीहून आणलेला लाल वालुकामय दगड या अध्यायाकरिता वापरण्यात आला आहे. या अध्यायापासून चौदाव्या अध्यायाच्या काही भागापर्यंत गायीच्या मागच्या पायाचा आकार दिला आहे.

अध्याय तेरावा—या अध्यायाकरिता करड्या रंगाचा वज्रतुंड दगड वापरला आहे.

अध्याय चौदावा—या अध्यायाकरिता कोल्हापूर जवळील जोतिबा डोंगरातून प्राप्त टणक बेसाल्ट दगड वापरण्यात आला आहे.

अध्याय पंधरावा—या अध्यायाकरिता कुप्पमचा काळा वज्रतुंड दगड वापरला आहे.

अध्याय सोळावा—फिक्कट गुलाबी रंगावर काळे ठिपके असलेला वज्रतुंड दगड या अध्यायाकरिता वापरला आहे. याला गायीच्या पोटाचा आकार आहे.

अध्याय सतरावा व अठरावा—पवित्र **गीताई** चे अंतिम दोन अध्याय बंगळुरहून आणलेल्या करड्या रंगाच्या वज्रतुंड दगडांत कोरलेले आहेत. याला गायीच्या पुढच्या पायाचा आकार आहे.

मंदिराच्या आवारात जमनालाल बजाज, त्यांची आई बिरदीबाई, पत्नी जानकीदेवी आणि महात्मा गांधींचे सहकारी किशोरलाल मश्रूवाला यांची स्मारके आहेत. जवळच असलेल्या विहिरीचे पाणी खेळवून नेपाळातील त्रिशुळी नदीची प्रतिकृती केली आहे. गीताई मंदिराच्या आजूबाजूच्या भागाचे सौंदर्य वाढविण्याचे काम सुरू आहे. मंदिरासमोरील शांती कुटीत महात्मा गांधी व जमनालाल बजाजांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कायम स्वरूपाचे प्रदर्शन उभारले आहे. या प्रकल्पाचा संपूर्ण खर्च प्रामुख्याने बजाज कुटुंबियांनी केला आहे. मंदिरास प्रेरणादायी साधनास्थळ म्हणून महत्त्व प्राप्त होत आहे.

विरुळ

विरुळ (आर्वी तालुका, २०°–४५′ उ., ७८°–२०′ पू., लो. सं. ३, ४०२) पुलगाव-आर्वी रस्त्यावर आर्वीच्या दक्षिणेला २५.८ कि. मी. आहे. ते पुलगाव-आर्वी रेल्वे मार्गावरील

स्थानकही आहे. गावातील आबाजी महाराजाच्या समाधीस हिंदू व मुसलमान पूज्य मानतात. आबाजीच्या स्मरणार्थ कार्तिक वद्य नवमीला जत्रा भरते. गावात लहानमोठी चौदा देवळे, दोन मशिदी व दोन दर्गे आहेत.

सालोड (हिरापूर)

सालोड (हिरापूर) (वर्धा तालुका, २०°–४०′ उ., ७८°–३०′ पू., लो. सं. ५,४५०) वर्ध्याच्या पश्चिमेस ८ कि. मी. आहे. हिरापूर ओसाड असून तेथील रहिवासी सालोडला स्थलांतरित झाले आहेत. गावात लहानमोठी दहा मंदिरे, तीन मठ, एक धर्मशाळा आणि सदानंद महाराज नामक सत्पुरुषाचे स्मारक आहे. त्याप्रीत्यर्थ फाल्गुन शुध्द चतुर्थीला जत्रा भरते.

सिंदी

सिंदी (सेलू तालुका, २०°–४५′ उ., ७८°–५०′ पू., लो. सं. ९,८९७, न. पा. १९४८) शहराच्या सभोवताली सिंदीची झाडे असल्यामुळे त्यास हे नाव पडले असावे. वर्धा-नागपूर रेल्वे मार्गावरील हे स्थानक वर्ध्याच्या पूर्वेस ३०.६७ कि. मी. आहे. या शतकाच्या आरंभी येथे तीन जिनींग प्रेसींग कारखाने व कापसाचा मोठा व्यापार चालत असे. पूर्वी येथे घोंगड्या व सुती गालीचे विणत असत. गावात लहानमोठी नऊ देवळे, दोन मशिदी व सात दर्गे आहेत.

सेलू

सेलू (तालुका मुख्यालय, २०°–२०′उ., ७८°–४५′ पू., लो. सं. ६,८१४) वर्ध्याच्या ईशान्येस १२.७ कि. मी. व सेलू रोड रेल्वे स्थानकाच्या उत्तरेस ७.२४ कि. मी. आहे. सेलू येथे पूर्वी गोंडांची वसाहत होती. तेव्हा गाव जमीन महसुलापासून मुक्त होते. गावात जुन्या गढीचे अवशेष आहेत. पूर्वी पवनार सरकारात सेलू परगणा होता. गावात सहा मंदिरे, दोन मठ व एक मशीद आहे. या परिसरात केळी व संत्र्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते.

सेवाग्राम

सेवाग्राम (वर्धा ता., २०° ३०′ उ., ७८° ५०′ पू., लो. सं. ३,५६४) म्हणजे पूर्वीचे अज्ञात, हरिजन वस्ती असलेले दैन्यावस्थेतील सेगाव. जमनालालजींच्या मालकीच्या (मालगुजारीमधील) सेगावला प्रथम कु. मॅडेलीन स्लेड तथा मीराबेन वास्तव्य करू लागल्या. हरिजनसेवेचे व्रत घेतलेल्या मीराबेनचे कार्य बघून गांधीजींनी तेथे वास्तव्य करण्याचा निर्धार केला व ३० एप्रिल १९३६ रोजी महात्माजी तेथे दाखल झाले. तेव्हापासून सेगावचे आमूलाग्र परिवर्तन होऊन तेथे भारताची "राष्ट्रीय" राजधानी उदयास आली. याबाबतचा इतिहास प्रकरण २–इतिहास यामध्ये दिलेला आहे. यथावकाश सेगावचे नामांतर सेवाग्राम असे केले व नजीकच्या मुंबई-नागपूर लोहमार्गावर रेल्वे स्थानकही उभारण्यात आले.

पारंपरिक दृष्टीने सेवाग्राम ऐतिहासिक अथवा प्रेक्षणीय स्थळ नाही. तथापि भारतातूनच नव्हे तर अखिल जगतातून येथे पर्यटक येतात. पूर्वाश्रमीच्या या अज्ञात स्थळी महान

इतिहास घडला. साम्राज्यशाहीला खिळखिळे केले. जगाला प्रेरणा दिल्या. गांधीवाद्यांचे तीर्थस्थान बनले तर साम्राज्यवाद्यांचे भयस्थान. येथे पर्यटक येतात ते प्रेरणा घेण्यासाठी अथवा भक्तिभावापोटी. वास्तुशिल्पाच्या दृष्टीने उल्लेखनीय वास्तू येथे नाहीत. येथे आहेत केवळ कुटी आणि त्या कुटींमध्ये आहे प्रेरणादायी काव्य.

आदिनिवास : प्रारंभी गांधीजी येथे आल्यावर आपल्या परिवारासह आदिनिवासात राहत असत. आदिनिवासापासून २२.८६ मी. अंतरावर मीराबेननी स्वत:साठी कुटी बांधून घेतली. पुढे आदिनिवासात खूप गर्दी झाल्यावर गांधीजी मीराबेनच्या कुटीत राहावयास गेले व मीराबेननी आपल्यासाठी दुसरी छोटी कुटी बांधली. या दोन्ही कुटींना अनुक्रमे बापू कुटी व बापू दप्तर अशी नावे देण्यात आली.

बापू कुटी : ही शिंदीच्या झाडाची पाने मातीने लिंपून बांधलेली आहे. कुटीवर गावठी कौले असून आतील बापूंची बैठक खादीच्या शुभ्र कापडाने आच्छादली आहे. येथूनच गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीची सूत्रे हलविली. बापू कुटीचे लुई फिशर या गांधीवादी अमेरिकन पत्रकाराने समक्ष भेटीसमयी (जून १९४२) केलेले मननीय वर्णन त्याच्याच शब्दात कथन करणे उचित वाटते. तो म्हणतो : " When I entered Gandhi's room, six men in white were sitting on the floor of his room. A woman in black sari was pooling the rope of a fan. There was only one decoration in the room, a glass covered, black and white print of Jesus Christ, on which were printed the words, 'He is Our Peace'. There was a board behind his back and a pillow between the board and back".[२३] उपरोक्त वर्णनात समाविष्ट नसलेली उल्लेखनीय बाब म्हणजे गांधीजींच्या तीन "तत्त्वज्ञ माकडां"च्या लाकडी प्रतिमा. बापू कुटीतील स्वयंपाक कक्ष, स्नानगृह व शौचालय सुद्धा विशेषतापूर्ण आहे. त्यातून व्यक्त होते महात्माजींचे मनोगत. स्वाभाविकच कुटीचे जसेच्या तसे जतन करण्यात येत आहे.

बा कुटी : गांधीजींच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांची ही कुटी. प्रथम त्यांचे वास्तव्य गांधीजींसमवेत आदिनिवासामध्ये होते. पुढे ते गैरसोयीचे वाटल्याने जमनालाल बजाजांनी गांधीजींच्या संमतीने कस्तुरबांसाठी स्वतंत्र कुटी उभारली. छोडो भारत आंदोलनाआधी २ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी गांधीजींसमवेत सेवाग्राम सोडले. आगाखान पॅलेस नामक तुरुंगातच त्यांचे निधन झाल्यामुळे त्या आपल्या कुटीत परत आल्याच नाहीत.

बापू कुटी व बा कुटी बांधल्यानंतर आदिनिवासाचा उपयोग अतिथीगृहासारखा होऊ लागला.

आखरी निवास : जमनालाल बजाजांनी बापू कुटी व बा कुटींच्यामध्ये स्वत:साठी बांधलेल्या जमना कुटीचा अनेक वेळा गांधीजी उपयोग करीत. इ. स. १९४६ मध्ये गांधीजी खोकल्याने आजारी असता वैद्यकीय सल्ल्यानुसार या कुटीत राहू लागले. दिनांक २५ ऑगस्ट १९४६ रोजी गांधीजी याच कुटीतून दिल्ली व पुढे नोवाखालीस हिंदू-मुसलमान दंगे शमविण्यासाठी गेल्यावर पुन्हा ते सेवाग्रामला परत आले नाहीत. म्हणून या कुटीला आखरी निवास म्हणतात. या कुटीचे जोते इतर कुट्यांपेक्षा उंच आहे.

---

[२३] **फिशर,** लुई, ए विक वुइथ गांधी.

महादेव कुटी : बापू कुटीसमोर महादेवभाई देसाई यांच्यासाठी महादेव कुटी बांधण्यात आली.

किशोर कुटी : ही कुटी किशोरलाल मश्रूवाला यांच्यासाठी होती.

रुस्तम भवन : आश्रमात येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्था व्हावी म्हणून सेठ रुस्तमजी जीवनजी यांचे पुत्र जालभाई यांनी हे भवन बांधले.

दिनांक ३० एप्रिल १९३६ ते २५ ऑगस्ट १९४६ या दहा वर्षांच्या महात्माजींच्या येथील वास्तव्यात अनेक क्रांतिकारी घटना घडल्या. त्यांचा खोल ठसा देशाच्या राजकीय व सामाजिक जीवनावर उमटला. भारताच्या इतिहासातील नवे पर्व सुरू झाले. गांधीजींच्या "खेड्याकडे चला" संदेशानुसार ते स्वतः सेगावला येऊन राहिले. ग्रामीण जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी अठरा कलमी रचनात्मक कार्यक्रम दिला. त्यात खादी उत्पादन, स्वदेशी, ग्रामोद्योग, नई तालिम, राष्ट्रभाषा, कुष्ठ सेवा इत्यादी महत्त्वपूर्ण बाबी आहेत. येथे राहून गांधीजींनी अनेकविध संस्था उभारल्या. त्यात गांधी सेवा संघ, चरखा संघ, गोसेवा संघ, हरिजन सेवक संघ, कुष्ठरोग सेवा समिती, मगन संग्रहालय, नई तालिम संघ, कस्तुरबा ट्रस्ट, निसर्गोपचार आश्रम या प्रमुख होत. परचुरेशास्त्री या संस्कृत पंडिताच्या कुष्ठरोगावर त्यांनी स्वतः उपचार केले. त्यांच्यासाठी त्यांनी बापू कुटीच्या पूर्वेस थोड्या अंतरावर एक कुटी बांधून घेतली.

इंग्लंडचा उमराव लॉर्ड लोथियन जून १९४० मध्ये गांधीजींच्या विनंतीनुसार तीन दिवस सेवाग्रामला राहिला. त्या प्रसंगीचे त्याचे मनोगत पुढीलप्रमाणे होते:– "माझ्या सबंध जीवनात हे तीन दिवस जसे शांतीत गेले तसे कधीही, कुठेही गेले नाहीत. असा एकांतवास मला कधी मिळाला नाही." इ. स. १९३६ मध्ये खान अब्दुल गफारखान गांधीजींसमवेत सेवाग्रामला राहिले. खादी कार्यक्रम विकासाची जबाबदारी गांधीजींनी आपला नातू कृष्णदास गांधी यावर सोपविली व कस्तुरबा रुग्णालयाजवळ खादी कार्यकर्ता निवास आणि खादी विद्यार्थी छात्रालय उभारले.

विख्यात अमेरिकन पत्रकार लुई फिशरने जून १९४२ च्या पहिल्या आठवड्यात सेवाग्रामला भेट दिल्यानंतर आश्रम व गांधीजींबाबत त्यांनी पुढीलप्रमाणे प्रशंसा केली आहे :– "गांधीजींच्या सान्निध्यात मला त्यांचेबद्दल वचक वाटला नाही. मला वाटले, मी एका अतिशय गोड, सौम्य, मोकळ्या, स्वच्छ, आनंदी, शहाण्या व अतिशय सुसंस्कृत मनुष्याच्या संगतीत आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा चमत्कारही मला जाणवला. जवळ जबरदस्त संघटनेचे सामर्थ्य अगर सत्ता नसताना गांधीजींनी आपल्या विस्कळित देशाच्या कानाकोपऱ्यात स्वतःच्या प्रभावाची किरणे फाकवली होती ! इतकेच नव्हे तर विभागलेल्या जगाच्याही कानाकोपऱ्यात ती पोचवली होती ! .... लोकांपर्यंत पोहचण्याची त्यांची साधने म्हणजे प्रत्यक्ष संपर्क, क्रिया, प्रत्यक्ष उदाहरण (जीवनातून) आणि सत्य, अहिंसा, साधनशुद्धी, अशासारख्या थोड्या त्रिकालाबाधित सिद्धांतांशी निष्ठा !"

गांधीजींनी येथूनच चर्मोद्योग, सुतारकाम, कुंभारकाम, तेलघाण्या, मधुमक्षिकापालन इत्यादी ग्रामोद्योग सुधारित पद्धतीने करण्याचे प्रोत्साहन दिले. सेवाग्रामला त्यांनी वनमहोत्सव सुरू केला. बापू कुटीसमोरील पिंपळवृक्ष गांधीजींनीच लावला. आश्रमातील सर्व

वास्तू स्मारक म्हणून सुरक्षित राहाव्यात म्हणून सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान नावाची संस्था १९६८ पासून कार्यरत आहे. ही संस्था नई तालिमचेही संचलन करते.

गांधीजींच्या वेळेपासून सुरू असलेली सामूहिक प्रार्थना आजही चालू आहे. पहाटेची प्रार्थना बापू कुटीत व सायंकाळची प्रार्थना प्रार्थनाभूमीत होते. आश्रमात किशोरकुटीसमीप छोट्या भूखंडात सामूहिक शेतीद्वारा श्रमसाधना केली जाते.

भारत सरकारच्या पर्यटन विभागातर्फे आश्रमासमोर अलीकडेच एक यात्री निवास सुरू करण्यात आले आहे. त्याची व्यवस्था आश्रमाकडेच आहे. येथील कस्तुरबा हॉस्पिटल कस्तुरबा गांधींच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९४४ मध्ये स्थापन झाले असून त्याला लागून १२ ऑगस्ट १९६९ रोजी डॉ. सुशिला नायर यांनी महात्मा गांधी वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले.

सोनेगाव (आबाजी)

सोनेगाव (देवळी ता., २०°–३५′ उ., ७८°–३०′ पू., लो. सं. १,२८०) मुंबई-नागपूर रेल्वे मार्गावरील दहेगाव रेल्वे स्थानकापासून सुमारे ६.५ कि. मी. आहे. येथे जुन्या गढीचे अवशेष, कृष्ण आणि लक्ष्मीनारायणाची मंदिरे आणि आबाजी महाराजाचे स्मारक आहे. आबाजीच्या स्मृतिप्रीत्यर्थ आषाढी व कार्तिकी एकादशीला यात्रा भरते.

हिंगणघाट

हिंगणघाट (तालुका मुख्यालय, २०°–३४′ उ., ७८°–५१′ पू., लो. सं. ५९,०७५ ; न. पा. १८६७) शहर दिल्ली-मद्रास रेल्वे मार्गावर वर्ध्याच्या दक्षिणेस ३३.५ कि. मी. वेणा नदीच्या काठी आहे. हिंगणघाट याचा अर्थ हिंगणाची झाडे असलेला घाट. या भागात हिंगणाची झाडे आढळतात. येथे सापडलेला ताम्रपट पुण्याच्या भांडारकर प्राच्य-विद्या संशोधन संस्थेत उपलब्ध आहे. त्यानुसार हे शहर पाचव्या शतकात वाकाटक राजा दुसरा प्रवरसेनच्या कारकिर्दीत वसविले असावे. प्रभावती गुप्ताच्या एका आज्ञापत्रात हिंगणघाटचा उल्लेख दंगुणग्राम असा आहे, तर एका जाम कोथुरक ताम्रपटात शहराचा उल्लेख सुप्रतिष्ठाहार (हिंगणघाट तालुका) असा केला आहे.[२४]

हिंगणघाट परिसरात उत्तम प्रतीचा कापूस पिकतो. कापसामुळेच हिंगणघाट मागील शतकापासून प्रसिद्धीस आले.[२५] पूर्वी येथील बनी जातीचा कापूस लँकेशायरला पाठविला जात असे. येथील मल्हारी-मार्तंडाचे जुने मंदिर भोसल्यांचा सरदार लालबा दादबा बिडकरने आपल्या मातोश्रीच्या स्मरणार्थ १७९२ ते १८०५ कालावधीत बांधले. मंदिरासाठी वरोरा, भांदक, भटाला व इतर ठिकाणाहूण दगड आणले होते. राजस्थानातील नामांकित रचनाकारांनी खूप परिश्रम करून विदर्भातील उत्कृष्ट स्मारक शिल्पांमध्ये या मंदिराच्यारूपाने भर घातली. संपूर्ण मंदिरावर कलापूर्ण शिल्पपट्टिका आणि मूर्ती आहेत. लंकादहन, रामचंद्रांची वानरसेना व राम-रावण युद्ध ही शिल्पे उत्कृष्ट आहेत. तसेच रुक्मिणी-स्वयंवर, द्रौपदी-स्वयंवर, अमृतमंथन, यमपुरी, गणपती व महाकालीची शिल्पे देखील उल्लेखनीय आहेत. मल्हारी उर्फ खंडोबाच्या भव्य व कलात्मक मूर्ती-खेरीज मंदिरातील गणपती आणि नंदीच्या मूर्ती नजरेत भरतात.

[२४] देव,पूर्वोक्त, पृ. १५६.

[२५] अधिक माहितीसाठी प्रकरण ५–उद्योगधंदे पहावे.

बंसीलाल कोचर यांनी १९५५ मध्ये बांधलेले जैन मंदिर म्हणजे विदर्भातील अत्युत्कृष्ट धार्मिक स्थळांपैकी एक होय. त्यातील काचकाम विशेष नजरेत भरते. देशभरातून जैन भाविक हिंगणघाटला मोठ्या संख्येने येतात. शेठ मथूरादासजी मोहता यांनी बांधलेली वृंदावन बाग शहराच्या सौंदर्यामध्ये भर घालते. शहरापासून अदमासे दीड किलोमीटर वरील या बागेत सुंदर तलाव आहे. शेठ ठाकूरदासजी पोतदार यांनी बांधलेल्या शिव बागेत विश्वनाथाचे मंदिर आहे. शिवाय गंगा व शिवाजी नावाच्या बागा आहेत. शिवाजी उद्यानात छत्रपती शिवाजीचा पुतळा आहे. मंदिराव्यतिरिक्त हिंगणघाटामध्ये तीन मशिदी व दोन दर्गे असून गावात उरूस भरतो. संत गाडगे महाराजांच्या स्मरणार्थ मार्गशीर्षमध्ये मोठी यात्रा भरते.

हिंगणी

हिंगणी (सेलू ता., २०°–५०′ उ., ७८°–४०′ पू., लो. सं. ४,७२७) वर्ध्याच्या ईशान्येला २५.७५ कि. मी. आहे. हे गाव भोसल्यांचा चंद्रपूरचा सुभेदार रघुनाथपंताने १८०० मध्ये वसवून गढी, देवळे व विहिरी बांधून परिसरात आंबा व चिंचेची झाडे लावली. गावात मठ, मशीद व दर्गा आहे. महाशिवरात्रीला जत्रा भरते.

खैरवाडा

खैरवाडा[२६] (कारंजा ता., २१°–००′ उ., ७८°–२५′ पू., लो. सं. ४०५) या गावी १९८१–८२ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयातर्फे उत्खनन करण्यात आले. त्यात सुमारे १४०० बृहदश्मयुगीन (इ. स. पू. १०००–७००) शिळावर्तुळे[२७] सापडली. बृहदश्मयुगीन संस्कृतीत दफनांचे अनेक प्रकार आढळतात. शिळावर्तुळ दफन, अश्मपेटी दफन, दफनकुंभ किंवा शैलगृहदफन यावरून विशिष्ट वर्गात विशिष्ट दफन पद्धती होती असे दिसते. खैरवाड्यातील बहुतांश शिळावर्तुळे ही शिळावर्तुळ दफने असल्याचे पुरातत्त्व तज्ज्ञांचे मत आहे. तत्कालीन संस्कृतीमध्ये अंत्यविधीला महत्त्व असल्याचे या पुरावशेषांवरून दिसते. खैरवाड्यास सापडलेल्या शिळावर्तुळांपैकी फक्त सहा-सात शिळावर्तुळांचाच सखोल अभ्यास झाला आहे.

भिष्णूर

भिष्णूर–(आष्टी तालुका, २०°–५०′ उ., ७८°–४५′ पू., लो. सं. १,१८४) वर्धा नदीच्या काठी आर्वीच्या वायव्येस १७.७ कि. मी. वर आहे. हे गाव रघुजी भोसले पहिला याने गुप्तवार्ता विभागाचा प्रमुख संतोजी नाईक मराठा यास इनाम दिले होते.

---

[२६] अधिक माहितीस्तव प्रकरण २–इतिहास पहावे.

[२७] डॉ. ग. का. माने यांनी १५०० शिळावर्तुळे असल्याचे नमूद केले आहे. ("दख्खनमधील बृहदश्मयुगीन संस्कृतीच्या धार्मिक समजुती आणि आर्थिक सामाजिक विभेदन"–**संशोधक, मार्च-जून १९८९**, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.)

संदर्भ सूची

अ. अप्रकाशित साहित्य

अ. १. शासकीय व निमशासकीय कार्यालयांकडून प्राप्त झालेली माहिती

अल्पबचत संचालनालय
आयुर्विमा महामंडळ
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद
कामगार आयुक्त
कृषी अधिकारी, प्रशिक्षण व भेट योजना
कृषी उत्पन्न बाजार समित्या (सर्व)
कृषी पुनर्वित्त आणि विकास महामंडळ
कृषी वित्त महामंडळ
कृषी विभाग, जिल्हा परिषद
कृषी संचालनालय
खादी ग्रामोद्योग मंडळ
जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, महाराष्ट्र सर्कल
जिल्हा उद्योग केंद्र
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
जिल्हा कामगार अधिकारी
जिल्हा कारागृह
जिल्हा कोषागार
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
जिल्हाधिकारी
जिल्हा नियोजन कार्यालय
जिल्हा परिषद
जिल्हा पुरवठा कार्यालय
जिल्हा पोलीस अधीक्षक
जिल्हा माहिती कार्यालय
जिल्हा मुद्रांक कार्यालय
जिल्हा सहकारी बोर्ड
जिल्हा सांख्यिकी कार्यालय
डाक व तार कार्यालय
तालुका खरेदी विक्री संघ (सर्व)
दारूबंदी व उत्पादन शुल्क कार्यालय
दुग्धशाळा विकास कार्यालय
नगरपरिषदा (सर्व)
नगरसेना कार्यालय
नगर रचना कार्यालय
नियोजन विभाग, मंत्रालय

पशुसंवर्धन कार्यालय
पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद
पाटबंधारे मंडळ, वर्धा
भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळ
भारतीय औद्योगिक विकास बँक
भूमी अभिलेख कार्यालय
भूमी संपादन कार्यालय
मत्स्यव्यवसाय विकास कार्यालय
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ
महाराष्ट्र राज्य भूविकास बँक
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ
महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ
महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ
महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन
मोसम विज्ञान अपर महानिदेशक, भारत सरकार, पुणे
मृद सर्वेक्षण विभाग
मृद संधारण कार्यालय
वन विभाग कार्यालय
विदर्भ विकास महामंडळ
रिझर्व बँक ऑफ इंडिया
शिक्षण व सेवायोजन संचालनालय
समाजकल्याण कार्यालय
सार्वजनिक बांधकाम विभाग
सेवायोजन कार्यालय
पुराभिलेख संचालनालय, मुंबई
पुरातत्त्व संचालनालय, मुंबई
भारतीय राष्ट्रीय अभिलेखागार, नवी दिल्ली
फोर्टनाईटली रिपोर्ट ऑफ दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲण्ड बेरार गव्हर्मेंट (ऑगस्ट १९४२ ते डिसेंबर १९४४)
सी. पी. ॲण्ड बेरार गुप्तवार्ता पोलिसांचे अहवाल (१९४२–४३)
स्पेशल क्रिमिनल कोर्टाचे निकालपत्र (१९४२–४३)
होम पोलिटिकल फाईल क्र. ३/७९/४२, भारतीय राष्ट्रीय अभिलेखागार, नवी दिल्ली

अ. २. **अप्रकाशित हस्तलिखित**

पत्की, उमेश विनायक : **विदर्भातील लोकसाहित्य** (अप्रकाशित शोधनिबंध, नागपूर विद्यापीठ, नागपूर)
वाळुंजकर, गोपाळ राजाराम : **ग्रामसेवा मंडळाचा इतिहास**
गामोट, सीताराम गुर्जर : **हस्तलिखित पोथी** (आर्वी)

ब. कार्यालयीन प्रकाशने

अॅक्शन प्लॅन, १९८३–८४ ते १९८७–८८, जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा

अॅग्रिकल्चरल स्टॅटिस्टिक्स ऑफ इंडिया, १९१०–११, १९२०–२१, १९३०–३१ (गव्हर्मेंट ऑफ इंडिया, नवी दिल्ली)

अॅग्रिकल्चरल सेन्सस, १९७६–७७ (कृषी विभाग, महाराष्ट्र शासन)

अर्थ विवरण पत्रक आणि कामाचा कार्यक्रम, १९८५–८६ (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ)

इंडिया सेन्सस रिपोर्ट, १९०१ (भारत सरकार)

ए फॅक्ट बुक ऑन एम्प्लॉयमेंट एक्सचेंज स्टॅटिस्टिक्स, १९७१–१९८२ (शिक्षण व सेवायोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई)

कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, खंड ६२ (भारत सरकार, नवी दिल्ली, १९७५)

—,,— खंड ७५ (१९७९)

—,,— खंड ७६ (१९७९)

—,,— खंड ९० (१९८४)

कॉंग्रेस रिसपॉन्सीबीलीटी फॉर दि डिस्टर्बन्सेस : १९४२–४३ (भारत सरकार, नवी दिल्ली, १९४३)

कार्यक्रम अंदाजपत्रक : १९८७–८८, कृषी व सहकार विभाग (महाराष्ट्र शासन)

कार्यक्रम अंदाजपत्रक : १९८७–८८, ग्राम विकास विभाग (महाराष्ट्र शासन)

कार्यक्रम अंदाजपत्रक : १९८६–८७, भाग-१-नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग (महाराष्ट्र शासन)

कार्यक्रम अंदाजपत्रक : १९८१–८२, भाग-१-आरोग्य व स्वच्छता, नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभाग (महाराष्ट्र शासन)

कार्यक्रम अंदाजपत्रक : १९८७–८८, पाटबंधारे विभाग (महाराष्ट्र शासन)

कार्यक्रम अंदाजपत्रक : १९८७–८८, शिक्षण व सेवायोजन विभाग (महाराष्ट्र शासन)

कार्यक्रम अंदाजपत्रक : १९८७–८८, महसूल व वनविभाग (महाराष्ट्र शासन)

कार्यक्रम अंदाजपत्रक : १९८९–९०, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग (महाराष्ट्र शासन)

कार्यक्रम अंदाजपत्रक : १९८६–८७, सार्वजनिक आरोग्य विभाग, कुटुंब कल्याण (महाराष्ट्र शासन)

कार्यक्रम अंदाजपत्रक : १९८७–८८, सार्वजनिक आरोग्य विभाग, सार्वजनिक आरोग्य व ग्रामीण आरोग्य (महाराष्ट्र शासन)

क्रेडिट प्लॅन अँड अॅक्शन प्लॅन, वर्धा डिस्ट्रिक्ट, १९८३–८५ (बँक ऑफ इंडिया, मुंबई)

कृषी विभागाची सांख्यिकीविषयक सर्वसाधारण जिल्हावार माहिती : १९८५–८६ व १९८८–८९ (महाराष्ट्र शासन, पुणे)

क्लायमेट ऑफ महाराष्ट्र (इंडिया मीटिअरॉलॉजिकल डिपार्टमेंट, गव्हर्मेन्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, १९७२)

जिल्हा जनगणना निर्देशग्रंथ, वर्धा, १९६१, १९७१ व १९८१ (महाराष्ट्र जनगणना कार्यालय, मुंबई)

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, १९६१–६२ ते १९८७–८८ (अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई)

पाटबंधारे विषयक आकडेवारी, भाग–१–सिंचन क्षमता (पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र शासन, १९८८)

ब्रॉड सॉइल झोन्स ऑफ महाराष्ट्र (डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चर, पुणे, १९६९)

भारतीय विकास लोक कार्यक्रमाची दहा वर्षे (महाराष्ट्र शासन, मुंबई)

महाराष्ट्र अर्थ व सांख्यिकी त्रैमासिक पत्रिका (अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई, निवडक अंक)

महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा (अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई, निवडक अंक)

महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या प्रशासन पुनर्रचना समितीचा अहवाल, १९६८ व १९७२ (महाराष्ट्र शासन, मुंबई)

महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर : बॉटनी ॲण्ड फ्लोरा ऑफ महाराष्ट्र (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८७)

———,,——— : **हिस्टरी : एशंन्ट पिरिअड** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६७)

———,,——— : **हिस्टरी : मिडीव्हल पिरिअड** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७२)

———,,——— : **लँग्वेज ॲण्ड लिटरेचर** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७१)

महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास, १९५०–५१ ते १९६०–६१ (महाराष्ट्र शासन, मुंबई)

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, १९८८–८९ (महाराष्ट्र शासन, मुंबई)

महाराष्ट्राचे जिल्हे, वर्धा, १९६१ व १९८९ (माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई)

महाराष्ट्रातील जिल्हावार उद्योगांबाबतचा अहवाल, १९७९–१९८१ (अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई)

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल (नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८४)

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ : सुवर्ण महोत्सव (मुंबई, १९७१)

महाराष्ट्रातील व्यावसायिक शिक्षण व तंत्रशिक्षण अहवाल, १९८४, १९८५ व १९८६ (महाराष्ट्र शासन, मुंबई)

महाराष्ट्र स्टेट को. ऑप. मार्केटिंग फेडरेशन, वार्षिक अहवाल (संबंधित वर्ष)

महात्मा गांधी संकलित वाङमय, खंड ३७ (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७०)

महात्मा सहकारी साखर कारखाना, वार्षिक अहवाल, १९८६–८७

मोटार वाहन विभागाची आकडेवारी : १९८५ ते १९८९ (महाराष्ट्र शासन, मुंबई)

रस्ते विकास योजना : १९८१–२००१, वर्धा जिल्हा (सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा)

रिझर्व बँक ऑफ इंडिया : बँकींग स्टॅटिस्टिक्स, १९८६

रिपोर्ट ऑफ दि कमिटी ऑन टिचर्स एज्युकेशन इन महाराष्ट्र स्टेट (शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन)

रिपोर्ट ऑफ दि फॅक्ट फाईंडिग कमिटी फॉर सर्व्हे ऑफ स्केअरसिटी एरियाज, भाग-२ (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७३)

रिपोर्ट ऑन दि लॅण्ड रेव्हेन्यु सेटलमेंट ऑफ वर्धा डिस्ट्रिक्ट, १८९१–९४ व १९०८–१२

रिपोर्ट ऑन दि स्टेट अँण्ड प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन इन सी. पी. अँण्ड बेरार, १९३१–३२, १९३७–३८

रिपोर्ट ऑन रिसोर्सेस सर्व्हे ऑन लाईव्ह स्टॉक, डेअरी अॅण्ड पोल्ट्री डेव्हलपमेंट (नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई)

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक अहवाल, १९८२–८३

रोजगार हमी योजना, सांख्यिकीय माहिती, १९८५ (नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई)

वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, व्हाल्यूम-ए (१९०६)

वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, व्हाल्यूम-बी, स्टॅटिस्टिकल टेबल्स, १८९१–१९२८ (१९२९)

वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, रिव्हाईज्ड एडिशन (महाराष्ट्र शासन, १९७४)

वर्धा जिल्हा परिषद, वार्षिक प्रशासन अहवाल, १९८५–८६

शिक्षणावर दृष्टिक्षेप : सांख्यिकीय अहवाल, १९७४ ते १९८५ (शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे)

शेतमजूर किमान वेतन पुनर्निर्धारण समितीचा अहवाल, (महाराष्ट्र शासन, १९७७)

सहकारी मार्गदर्शक, सांख्यिकीय विवरण पुस्तिका, १९८२–८३ (वर्धा जिल्हा सहकारी बोर्ड, मर्यादित)

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, हुतात्मा स्मारके, यादी

सिझन अॅण्ड क्रॉप रिपोर्ट, बॉम्बे स्टेट (संबंधित वर्षाचे) (मुंबई शासन व महाराष्ट्र शासन, पुणे)

सेन्सस ऑफ इंडिया, १९२१––

(१) सी. पी. अॅण्ड बेरार

(२) सी. पी. अॅण्ड बेरार : इंडस्ट्रियल स्टॅटिस्टिक्स, पार्ट टू

सेन्सस ऑफ इंडिया, १९६१––

(१) महाराष्ट्र : फेअर्स ॲण्ड फेस्टिव्हल्स, पार्ट सेव्हन बी

(२) महाराष्ट्र : जनरल इकॉनॉमिक टेबल्स, पार्ट थ्री ए ॲण्ड बी-वन, पार्ट थ्री ए ॲण्ड बी-टू, पार्ट थ्री ए ॲण्ड बी–थ्री

सेन्सस ऑफ इंडिया, १९७१––

(१) सीरीज ११–महाराष्ट्र : पार्ट ए

(२) महाराष्ट्र : जनरल इकॉनॉमिक टेबल्स, पार्ट टू-बी-वन, पार्ट टू-बी-टू

(३) महाराष्ट्र : जनरल पॉप्युलेशन टेबल्स, पार्ट टू-ए

(४) महाराष्ट्र : स्पेशल टेबल्स ऑन शेडयूल्ड कास्टस ॲण्ड शेडयुल्ड ट्राईब्ज, पार्ट फाईव्ह-ए

(५) महाराष्ट्र : टाऊन डिरेक्टरी, पार्ट सिक्स-९

(६) सीरीज १२–महाराष्ट्र : सोशल ॲण्ड कल्चरल टेबल्स

सेन्सस ऑफ इंडिया, १९८१–

(१) महाराष्ट्र : जनरल पॉप्युलेशन टेबल्स, पार्ट टू-ए

(२) महाराष्ट्र : फर्टिलिटी टेबल्स, पार्ट फोर-ए ॲण्ड बी

(३) महाराष्ट्र : टाऊन डिरेक्टरी, पार्ट टेन-ए

(४) महाराष्ट्र : हाऊसहोल्डस ॲण्ड हाऊसहोल्ड पॉप्युलेशन बाय लँग्वेज मेनली स्पोकन इन दि हाऊसहोल्डस

(५) फायनल फिगर्स ऑफ टोटल पॉप्युलेशन, शेडयुल्ड कास्टस ॲण्ड शेडयुल्ड ट्राईब्ज पॉप्युलेशन

(६) सीरीज १२–महाराष्ट्र : प्रायमरी सेन्सस ॲबस्ट्रॅक्ट, पार्ट टू-बी

सोर्स मटेरियल फॉर ए हिस्टरी ऑफ दि फ्रीडम मुव्हमेंट इन इंडिया, खंड १, १८१८–१८८५ (मुंबई शासन, १९५७)

सोर्स मटेरियल फॉर ए हिस्टरी ऑफ दि फ्रीडम मुव्हमेंट इन इंडिया, खंड २, १८८५–१९२० (मुंबई शासन, १९५८)

स्टॅटिस्टिकल ॲबस्ट्रॅक्ट ऑफ महाराष्ट्र स्टेट (संबंधित वर्षाचे) (महाराष्ट्र शासन, मुंबई)

हँडबुक ऑफ बेसिक स्टॅटिस्टिक्स, महाराष्ट्र स्टेट (संबंधित वर्षे) (महाराष्ट्र शासन, मुंबई)

क. वृत्तपत्रे व नियतकालिके

युगवाणी

राजपत्र : सी. पी. ॲण्ड बेरार गव्हर्मेन्ट (२२ ऑगस्ट १९४२)

लोकसत्ता

स्टेटस्मन, नवी दिल्ली

विदर्भ संशोधन मंडळ (वार्षिक, संबंधित वर्षे)

ड. लेख

चौधरी, के. के. : "महात्माजींचे पुण्यधाम : सेवाग्राम", **लोकसत्ता,** २८ सप्टेंबर १९८६, मुंबई

जामखेडकर, डॉ. अ. प्र., व देगलूरकर, प्रा. गो. बं. : "पवनार येथील शिल्पपटाचा पुर्नविचार" **युगवाणी,** एप्रिल-मे १९७४, (नागपूर)

डोळके, प्रा. सु. म. : "विदर्भातील एक संतकवी : नगाजी महाराज", **विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक,** १९६२ (नागपूर)

ढवळीकर, डॉ. म. के. : "पवनार येथील अंधकासुरवधमूर्ती", **विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक,** १९६६ (नागपूर)

देव, डॉ. शां. भा. : "पवनार उत्खनन : एक मूल्यमापन", **विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक,** १९६७ (नागपूर)

मिराशी, डॉ. वा. वि. : "प्रवरपूर : ॲन एन्शंट कॅपिटल ऑफ वाकाटक नृपति", **विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक** (नागपूर)

शेंडे, वि. प्र. : "आदित्यराजाचा अचलपूर ताम्रपट", **विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक,** १९७४ (नागपूर)

इ. दुय्यम प्रकाशने

अकोलकर, प्रा. ग. वि. : **महाराष्ट्रातील शिक्षणाची वाटचाल** (१९५० ते १९७४) (श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७४)

—,,— : **माध्यमिक शिक्षण** (समाज प्रबोधन संस्था, पुणे, १९६५)

अकोलकर, प्रा. ग. वि., व सहस्रबुद्धे, दि. ह. : **उच्च माध्यमिक शिक्षण स्वरूप, कार्यवाही** (श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७३)

अबुल फझल : **ऐन–इ–अकबरी**

अँड्र्यूज, सी. एफ., आणि मुकर्जी, गिरीजा : **दि राईज ॲण्ड ग्रोथ ऑफ दि काँग्रेस इन इंडिया,** (जॉर्ज ॲलन ॲण्ड अन्वीन, लंडन, १९३८)

आपटे, पां. श्री. : **महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास** (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, १९५८)

—,,— : **महाराष्ट्रातील शिक्षणाचा इतिहास : १९६० ते १९८५** (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, १९८७)

इकबाल नारायण (संपा.) : **पंचायत राज ॲडमिनिस्ट्रेशन इन महाराष्ट्र** (पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७४)

इर्फान हबीब : **ॲन ॲटलास ऑफ दि मुघल एम्पायर** (ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली, १९८२)

इलियट अँड डॉसन : **हिस्टरी ऑफ इंडिया ॲज टोल्ड बाय इटस् ओन हिस्टोरियन्स**

इषामी फुतुहुज–सलातीन

एलफिन्स्टन, माऊन्टस्टुअर्ट : **हिस्टरी ऑफ इंडिया**

कदम, के. ब. : **लोकमान्य वाचनालय, आर्वी : शतसांवत्सरिक संस्मरण,** १८६५–१९८२

—,,— : **संतसमागम** (डॉ. पडोळे प्रकाशन, अमरावती, १९७५)

कनिंगहॅम : **आर्कियालॉजिकल रिपोर्टस,** खंड १७

कडवे, रघुनाथ :**१९४२ चा आष्टी स्वातंत्र्य संग्राम** (संस्कार प्रकाशन, नागपूर, १९८६)

करंदीकर, अ. ज. : **क्रांतीकारी टिळक नि त्यांचा काळ** (काळ प्रकाशन, पुणे, १९६९)

कर्वे, डॉ. इरावती : **हिंदू समाज : एक अन्वयार्थ** (दि. धों. कर्वे, पुणे, १९७५)

—,,— : **मराठी लोकांची संस्कृति** (रा. ज. देशमुख, पुणे, १९६२)

कानेटकर, मा. ज. : **नागपूर प्रांताचा इतिहास** : १८८५ ते १९३५ (ना. भ. खरे, नागपूर १९३५)

कामथ, एम. व्ही. : **गांधीज कुली : लाईफ ॲण्ड टाईम्स ऑफ रामकृष्ण बजाज** (अलाईड पब्लिशर्स, अहमदाबाद, १९८८)

कामथ, एम. व्हीं., व पिंगळे, श्रीरंग (संपा.) : **वैभव : रामकृष्ण बजाज फेलिसिटेशन व्हाल्यूम** (महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई, १९७३)

कानजी द्वारकादास : **टेन इअर्स टू फ्रीडम** : १९३८–१९४७ (पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८)

काळे, पु. बा. : **अनसूयाबाई आणि मी** (पु. बा. काळे, नागपूर, १९६२)

काळे, या. मा. : **वऱ्हाड प्रांताचा इतिहास**

केतकर, श्री. व्यं. : **महाराष्ट्रीय ज्ञानकोश**

केळकर, श्रीपाद : **छोडो भारत** : १९४२ (कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८३)

कंटक, प्रेमा : **पुण्यधाम सेवाग्राम,** (सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान, १९६९)

—,,— : **सत्याग्रही महाराष्ट्र** (जी. डब्ल्यू. कुळकर्णी, पुणे, १९४०)

कुंटे, भ. ग. : **गुलशने इब्राहिमी,** फेरिश्ताच्या मूळ ग्रंथाच्या इंग्रजी भाषांतराचे मराठी रूपांतर (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८२)

कुळकर्णी, आ. वि. : **लोकमान्य टिळक यांची गेली आठ वर्षे** (आ. वि. कुळकर्णी, मुंबई)

कॅशमन, रिचर्ड : **दि मिथ ऑफ दि लोकमान्य** (युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस, कॅलिफोर्निया, १९७५)

कोलते डॉ. वि. भि. : **महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख** (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८७)

कोचनेक, स्टॅनले ए. : **दि काँग्रेस पार्टी ऑफ इंडिया : दि डायनॅमिक्स ऑफ वन पार्टी डेमॉक्रसी** (प्रिन्सटन युनिव्हर्सिटी प्रेस, प्रिन्सटन, न्यू जर्सी, १९६८)

कृष्णन, व्ही. एस. (संपा.) : **हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन मध्यप्रदेश** (मध्यप्रदेश शासन, नागपूर, १९५६)

खरे, ग. ह. : **मध्ययुगीन दख्खनच्या इतिहासाची साधने**, खंड ४ (भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३०)

खापर्डे, बा. ग. : **श्री दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र** (प्रसाद प्रकाशन, पुणे, १९६२)

खोबरेकर, वि. गो. : **इंग्रजी सत्तेविरुद्ध महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव**

गद्रे, प्रा. गिता व गद्रे, प्रा. ल. रा. : **शिक्षणाचा इतिहास**, भाग १ व २ (नूतन प्रकाशन, पुणे, १९७६)

गद्रे, ना. कृ. : **महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग** (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९७१)

गाडगीळ, पां. बा. : **भारताचे आर्थिक नियोजन**

गावडे, लक्ष्मीकांत व वैद्य, हेमचंद्र (संपा.) : **वर्धा दर्शन**

ग्लॅडविन (संपा.) : **ऐन-इ-अकबरी**

घुर्ये, डॉ. जी. एस. : **कास्ट, क्लास अ‍ॅण्ड ऑक्युपेशन**

चोरघडे, वामनराव : **धर्मकीर्तन** (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८६)

चोप्रा, डॉ. पी. एन. (संपा.) : **क्वीट इंडिया मुव्हमेंट : ब्रिटिश सिक्रेट डॉक्युमेंटस** (इंटरप्रिन्ट, नवी दिल्ली, १९८६)

—,,— : **टोअर्डस फ्रीडम : १९३७–१९४७** (आय. सी. एच. आर., नवी दिल्ली, १९८५)

चौधरी, के. के. : **महाराष्ट्र अ‍ॅण्ड इंडियन फ्रीडम स्ट्रगल** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८५)

—,,— : **हिस्टरी ऑफ बॉम्बे : मॉडर्न, पिरिअड**(महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८७)

चौधरी, मधुकर धनाजी (संपा.) : **फैजपूर काँग्रेस सुवर्ण महोत्सव गौरव ग्रंथ** (फैजपूर काँग्रेस सुवर्ण महोत्सव समिती, फैजपूर, १९८७)

जामखेडकर, डॉ. अ. प्र. : **"नॅरेटिव्ह स्कल्पचर्स फ्रॉम पवनार : ए रीअ‍ॅप्रेजल", इंडियन एपिग्रॉफी अ‍ॅण्ड इटस् बेअरिंग ऑन आर्ट हिस्टरी** (वाराणशी, १९७५)

जोशी, पं. महादेवशास्त्री (संपा.) : **भारतीय संस्कृतिकोश**, (भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, निवडक खंड)

जोशी, पं. महादेवशास्त्री : **तीर्थरूप महाराष्ट्र**, भाग १ व २ (कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९७५)

जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.) : **मराठी विश्वकोश**, खंड १ ते १३ (मराठी विश्वकोश मंडळ, महाराष्ट्र शासन, मुंबई)

जोशी, वि. श्री. : **महाराष्ट्रातील कायदेभंगाचा इतिहास** (वि. श्री. जोशी, मुंबई, १९५१)

ठोसर, प्र. के. : **महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांच्या आठवणी** (रा. धों. दातार, नागपूर १९६८)

ढवळीकर, म. के. : **एक्सकॅव्हेशन अ‍ॅट इनामगाव** (डेक्कन कॉलेज, पुणे, १९८८)

—,,— : **पवनार एक्सकॅव्हेशन** (नागपूर, १९७०)

ढेरे, रा. चिं., : **संतसाहित्य आणि लोकसाहित्य : काही अनुबंध** (श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७८)

तेंडूलकर, डी. जी. : **महात्मा : लाईफ ऑफ मोहनदास करमचंद गांधी,** खंड १ ते ८ (व्ही. के. झवेरी अँण्ड डी. जी. तेंडूलकर, मुंबई, अनुक्रमे १९५१, १९५१, १९५२, १९५२, १९५२, १९५३, १९५३ व १९५४)

दिक्षीत, के. आर. : **महाराष्ट्र इन मॅप्स** (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई)

दिक्षीत, मो. गं. : **मध्यप्रदेश के पुरातत्त्व की रूपरेखा**

देगलुरकर, डॉ. गो. बं.: **टॅपल आर्किटेक्चर अँण्ड स्कल्पचर इन महाराष्ट्र** (नागपूर, १९७९)

—,,— : **पुरातत्त्व विद्या** (महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७६)

—,,— : **महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८२)

देव, एस. व्ही. : **काँग्रेसचा इतिहास म्हणजेच हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास** (गो. आ. देशपांडे, पुणे, १९३५)

देव, एस. बी., व ढवळीकर, एम. के. : **पवनार एक्सकॅव्हेशन** (नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९६८)

देशपांडे, चं. धुं. : **महाराष्ट्राचा भूगोल** (नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, १९७६)

देशपांडे, वामनराव : **महाराष्ट्राचे संगीतातील कार्य** (महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७४)

दोशी, डॉ. शरयू (संपा.) : **महाराष्ट्र** (मार्ग पब्लिकेशन, मुंबई, १९८५)

नानेकर, कृ. र., आणि खांदेवाले, श्री. वि. : **विदर्भातील भूदान** (नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९७०)

नंदा, बी. आर. : **वर्धा इन इंडियाज फ्रीडम स्ट्रगल** (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८६)

निस्सीम एझिकेल : **बी. विठ्ठल अँण्ड बी. प्रभा** (मुंबई, १९८६)

नेने, ह. ना. (संपा.) : **महाराष्ट्रीय आद्य चरित्रकार म्हाईभट्ट संकलित लीळाचरित्र,** भाग-१,

पटवर्धन, अण्णासाहेब : **माझी जीवनयात्रा** (अण्णासाहेब पटवर्धन, वर्धा, १९७१)

पराडकर, डॉ. मो. दि., देशपांडे, रं. रा., म्हाळे, प्रा. राम, व भोसले, बा. वा. (संपा.) : **राष्ट्रभाषा प्रचार समिती रजत जयंती ग्रंथ,** १९६३ (बम्बई हिंदी विद्यापीठ)

पाटील, लिला व कुळकर्णी विश्वंभर : **आजचे शिक्षण-आजच्या समस्या** (श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८५)

पेंडसे, डॉ. शं. दा. : **महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास** (सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर १९६५)

प्रेम नारायण : **प्रेस अँण्ड पॉलीटिक्स इन इंडिया : १८९५–१९०५** (मुनशीराम मनोहरलाल, दिल्ली, १९७०)

बेकर, डी. ई. यू. : **चेंजिंग पोलिटिकल लीडरशीप इन अॅन इंडियन प्रॉव्हिन्स : दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँण्ड बेरार : १९१९–३९** (ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, नवी दिल्ली, १९७९)

बक्षी, एस. आर. : **काँग्रेस ॲण्ड क्वीट इंडिया मुव्हमेंट** (क्रायटेरियन पब्लिकेशन्स, नवी दिल्ली, १९८६)

बाबर, डॉ. सरोजिनी (संपा.) : **आदिवासींचे सण उत्सव** (शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८३)

बियाणी, ब्रिजलाल : **वऱ्हाडाची स्वातंत्र्य सेवा : १९२०–१९३५** (विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमिटी, अकोला, १९३५)

ब्राऊन, जे. एम. : **गांधी ॲण्ड सिव्हिल डिसओबीडियन्स : दि महात्मा इन इंडियन पॉलीटिक्स : १९२८–३४** (केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९७७)

भागवत, आचार्य स. ज. : **जीवन-शिक्षण अर्थात वर्धा शिक्षण योजना** (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, १९४९)

मंगरूळकर, ना. गो. : **वैदर्भीय संगीतोपासक**

मन्सर्ग, निकोलस, ॲण्ड ल्युंबी, इ. डब्ल्यू. आर. (संपा.) : **दि ट्रान्सफर ऑफ पॉवर: १९४२–४७** (खंड १ ते ४) (हर मॅजेस्टिज स्टेशनरी ऑफिस, लंडन, अनुक्रमे १९७० १९७१, १९७१ व १९७३)

मिराशी, डॉ. वा. वि. : **कलचुरी नृपति आणि त्यांचा काळ** (मध्यप्रदेश शासन, १९५६)

—,,— : **वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ** (नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९५७)

—,,— : **स्टडीज इन इंडॉलॉजी**, खंड-२

—,,— : **सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख** (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९७९)

मुजुमदार, आर. सी., व मुजुमदार, ए. के. (संपा.) : **स्ट्रगल फॉर फ्रीडम : दि हिस्टरी ॲण्ड कल्चर ऑफ दि इंडियन पीपल** (भारतीय विद्याभवन, मुंबई, १९६९)

मुजुमदार, डी. एन. : **रेसेस ॲण्ड कल्चर ऑफ इंडिया**

मेअर, ए. सी. : **कास्ट ॲण्ड किनशिप इन सेंट्रल इंडिया -ए व्हिलेज ऑफ इटस् रिजन** (रोटलेज ॲण्ड केगॅन पॉल, लंडन, १९७०)

रसेल, आर. व्ही., आणि हिरालाल, पंडित : **दि ट्राईब्ज ॲण्ड कास्टस ऑफ दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ऑफ इंडिया** (मॅकमिलन ॲण्ड कंपनी, लंडन, १९१६), पाच खंड

राव, डॉ. आर. व्ही. : **सेवाग्राम : गांधीजीज आश्रम ॲण्ड अदर इन्स्टिटयुशन्स इन वर्धा:** (सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान, १९६९)

रेगे, म. पु. (संपा.) : **इंडियन नॅशनल काँग्रेस : १८८५–१९८५** (प्राज्ञ पाठशाळा मंडळ वाई, १९८६)

लांडगे, दे. गो. : **नागपूरचा सांस्कृतिक इतिहास** (मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर, १९५४)

वर्तक, डॉ. रजनी महादेव : **महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक प्रशासन आणि जिल्हा परिषदा** (१९७५)

वुल्सले हेग (संपा.) : **दि केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया,** खंड ३ (एस. चांद ॲण्ड कं., नवी दिल्ली, १९६५)

वैद्य, डॉ. सुमन, व कोठेकर, डॉ. शांता : **महाराष्ट्रातील काँग्रेसचा स्वातंत्र्य लढा (१९८५–१९२०)** (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८५)

शुक्ल, उमाशंकर : **राष्ट्रतीर्थ सेवाग्राम और वर्धा** (सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान, सेवाग्राम, १९७०)

शेरवानी, एच. के. : **बहमनीज ऑफ दि डेक्कन**

—,,— : **इंडियन हिस्टरी कॉंग्रेस** (हैद्राबाद, १९६३)

शेरवानी, एच. के., आणि जोशी, पी. एम. (संपा.) : **हिस्टरी ऑफ मिडीव्हल डेक्कन,** खंड १ (आंध्र प्रदेश शासन, हैदराबाद, १९७३)

शेजवलकर, टी. एस. : **नागपूर अफेअर्स : सिलेक्शन ऑफ मराठी लेटर्स फ्रॉम दी मेणवली दप्तर** (डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च इन्स्टिटट्युट, पुणे, १९५४)

श्रीवास्तव, ए. एल. : **मुघल एम्पायर**

श्रीमन नारायण : **विनोबा : हिज लाईफ ॲण्ड वर्क** (पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७०)

—,,— : **बिल्डर्स ऑफ मॉडर्न इंडिया : जमनालाल बजाज** (माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, १९७३)

सरदेसाई, गोविंद सखाराम : **मराठी रियासत,** खंड १ ते ५ (स. मा. गर्गे संपादित आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, अनुक्रमे १९८८, १९८८, १९८९, १९९० व १९९०)

सरदेसाई जी. एस. : **न्यू हिस्टरी ऑफ दि मराठाज,** खंड १–२

सार्दळ शं. धों. : **गांधीजी प्रणीत वर्धा शिक्षण योजना** (केशव भिकाजी ढवळे, मुंबई, १९४९)

सांकलिया, ह. धी. : **प्रीहिस्टरी ॲण्ड प्रोटो-हिस्टरी ऑफ इंडिया ॲण्ड पाकिस्तान** (डेक्कन कॉलेज, पुणे, १९७४)

सावंत, स. य. : **महाराष्ट्रातील दिव्य वनौषधी** (कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७४)

साळी, शं. आ. : **दायमाबाद** (आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, नवी दिल्ली, १९८६)

सीतारामय्या, डॉ. पट्टाभी : **हिस्टरी ऑफ दि इंडियन नॅशनल कॉंग्रेस,** खंड १–२ (एस. चांद आणि कंपनी, नवी दिल्ली)

सेन, एस. पी. (संपा.) : **डिक्शनरी ऑफ नॅशनल बायोग्राफी :** खंड १–४ (इन्स्टिटट्युट ऑफ हिस्टॉरिकल स्टडीज, कलकत्ता)

हरदास, बाळशास्त्री : **धर्मवीर डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांचे चरित्र,** भाग १ (काळ प्रकाशन, पुणे, १९६६)

हट्टन, जे. एच. : **कास्ट इन इंडिया** (ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९६९)

ऋग्वेदी : **आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास** (प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई, १९७९)

—,,— : **नागपूर प्रांताचा इतिहास : १८८५–१९३५** (नागपूर प्रांतिक कॉंग्रेस महोत्सव मंडळ, नागपूर, १९३५)

—,,— : **हिस्टरी ऑफ इंडियन रेल्वेज** (रेल्वे मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली)

—,,— : **हूज हू ऑफ इंडियन रायटर्स,** १९६१ आणि १९८३ (साहित्य अकादमी, नवी दिल्ली)

सूची

ख

ध

न

प

य

र

ल

श

स

ह

* * *

वाय ३–१०३० पु.–१.९२

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.

ात्माजींची
कुटी (बापू
कुटी,
१९३७),
सेवाग्राम







बापू कुटी व
आदिनिवास,
सेवाग्राम

जींचे
वास
(जून
६),
ग्राम







कस्तुरबा कुटी (बा कुटी), सेवाग्राम




महात्मा गांधी छत्री (फेब्रुवारी १९४८), पवनार



भरतभेट मंदिर, पवनार आश्रम



गीताई मंदिर
महाद्वार
(१९८०),
वर्धा




गीताई मंदिर,
स्वस्तिक स्तंभ




ताई मंदिर



लक्ष्मीनारायण
मंदिर
(१९०५),
वर्धा



गणेश मंदि
केळझर





लक्ष्मीनारायण
मंदिर
(१८९०),
कापशी




मल्हारी-
मार्तन्ड मंदिर
(१७९२-
१८०५),
हिंगणघाट

मल्हारी-
र्तन्ड मंदिर,
शिल्पपट्टिका






पार्श्वनाथ
मंदिर
(१९५५),
हिंगणघाट




शेख फरीद दर्गा, गिरड

मल्हारी-मार्तन्ड मंदिर, शिल्पपट्टिका, हिंगणघाट



ल्हारी-मार्तन्ड मंदिर, शिल्पपट्टिका






सवधमूर्ती, पवनार आश्रम

धेनुकासूरवधमूर्ती, पवनार आश्रम



भरतभेटमूर्ती, पवनार आश्रम





ुकासूरवधमूर्ती, पवनार आश्रम

गंगाभगवतीमूर्ती, पवनार आश्रम





कंसवधमूर्ती, पवनार आश्रम